श्री

ज्ञानेश्वरी.

हा सुप्रसिद्ध व प्रासादिक ग्रंथ

अण्णा मोरेश्वर कुंटे,

यांनीं पाठांतरें व अर्थनिर्णायक टीपा देऊन

तयार केला,

तो

त्यांचेच देखरेखीखालीं

मुंबईत

ावजी दादाजी यांच्या "निर्णयसागर" छापखान्याचे मालक

तुकाराम जावजी

यांनीं

वे० शा० वासुदेवशास्त्री पणशीकर

यांजकडून शुद्ध करवून छापून प्रसिद्ध केला.

शके १८१६—सन १८९४.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या कायद्याप्रमाणें नोंदून सर्व हक्क
प्रकाशकानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

विनंति.

श्रीमद्भगवद्गीतेवर ज्ञानेश्वरमहाराजांनीं जी टीका केली तिचें नांव भावार्थदीपिका. तीच ज्ञानेश्वरी या नांवानें हल्लीं सुप्रसिद्ध आहे. या ग्रंथावर भाविक लोकांची मोठी श्रद्धा आहे हें योग्यच आहे. परंतु माझें ह्मणणें असें आहे कीं, महाराष्ट्रभाषा बोलणारे जेवढे आहेत त्या सर्वांची या ग्रंथावर श्रद्धा असावी, तथापि असें नसण्याचें कारण ज्ञानेश्वरीची भाषा दुर्बोध आहे असें बहुतेकांचें ह्मणणें आहे. परंतु हा दुर्बोधपणा केवळ ज्ञानेश्वरीचा आहे असें ह्मणतां येत नाहीं. ज्या मूलग्रंथावर ह्मणजे भगवद्गीतेवर ही टीका आहे, तोच ग्रंथ मुळीं गूढ आहे. वेद, वेदांगें, उपनिषदें, शास्त्रें, इत्यादिकांतील जें सनातन आर्यधर्माचें भांडार, त्या सर्वांचा उल्लेख या ग्रंथांत झाला आहे. हा उल्लेख करण्याचा प्रयत्न जर साधारण पुरुषापासून झाला असता, तर तो यथायोग्य व्हावा तसा कधींच झाला नसता. परंतु श्रीकृष्णपरमात्मा यांच्या मुखांतून ही भगवद्गीता निघाली, व ती केवळ सामान्य मनुष्यास दिली, असें नाहीं; तर निस्सीम भगवद्भक्त असा जो अर्जुन त्याला ती दिली आहे. याचा प्रसंग कोणता हें श्रीमद्भगवद्गीतेच्या पहिल्या अध्यायावरून सहज समजतें. सनातन आर्यधर्माचा मथितार्थ या गीतेंत गोंविला असल्याकारणानें ही गूढार्था आहे हें सहजच लक्षांत येईल; ह्मणूनच रामानुज, वाल्लभ, शांकर, इत्यादिक निरनिराळे मतानुयायी, प्राचीन व अर्वाचीन म्लेंच्छ व यवनलोक, तसेच हल्लीं यवन व म्लेंच्छभाषानिष्णात आमचे लोक, यांनीं निरनिराळ्या प्रकारांनीं या भगवत्प्रणीत गीतेचे अनेक तऱ्हेचे अर्थ केले आहेत.

विद्या, ज्ञान किंवा इतर ऐहिक साधनांनीं हा ग्रंथ समजावयाचा नाहीं. याला ईश्वरी प्रसादच पाहिजे. अथवा ज्या भगवंतांनीं ही गीता सांगितली त्याच भगवंतांनीं हिचा अर्थ प्रतिपादन केला पाहिजे. ज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र जे लोक नीट विचार करून पाहातील त्यांची त्यांच्या अमानुष अवतारावद्दल खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं. खरा गीतेचा अर्थ ज्ञानेश्वरीच.

आपण कोण, कोठून आलों, कोठें जाणार, या जगताची अशी व्यव-

स्था कां, अशा तऱ्हेच्या मोठ्या गहन विषयांचें प्रतिपादन ज्ञानेश्वरींत झालें आहे. या विषयांचे गर्भितार्थ मूळ गीतेमध्यें आहेत; तथापि त्यांचा उल्लेख ज्ञानेश्वरींत इतक्या मार्मिक रीतीनें जाहला आहे कीं, ज्ञानेश्वरीचें पठण करणाराच्या मनावर या मुद्यांचा ठसा उमटल्याशिवाय राहत नाहीं.

भक्ति, ज्ञान आणि वैराग्य, कर्म, उपासना आणि ज्ञान, अथवा कोणच्याही तऱ्हेची मनुष्याच्या मनास सन्मार्गादिशा लावण्याची योजना होवो; आत्मानात्मविचाराचे हवे त्या तऱ्हेचे शास्त्राचे उल्लेख असोत; माया व ब्रह्म यांविषयीं पाहिजे त्या तऱ्हेचें विवेचन होवो; पण जर खरें इंगित समजलें नाहीं तर तें ज्ञान केवळ उपहासास्पद होतें.

ज्ञानेश्वरीचा खरा मुद्दा आपण कोण आहोंत याची ओळख पटविण्याचा आणि ज्ञान व कर्म यांची सांगड घालून देण्याचा आहे. कर्ममार्ग ह्मणजे ज्ञानमार्गापासून केवळ निराळा आहे ही जी समजूत ती खरी नाहीं, व तत्त्ववित्पणा ह्मणजे कांहीं मोठें गूढ आहे असेंही नाहीं. जगतांत ज्या स्थितीमध्यें आपण आहोंत त्या स्थितीला अनुसरून यथाप्रसंग कर्माचरण केलें असतां कार्यभाग होतो. कोण्या प्रसंगीं कसें वर्तन करावें या संबंधानें जे अनेक संशय मनुष्याच्या मनांत उत्पन्न होतात त्यांचें निर्विवाद विवेचन या ज्ञानेश्वरींत झालें आहे.

माया ह्मणजे साक्षात् जें ब्रह्म त्याची छाया आहे. याच मायेपासून सर्व त्रैलोक्य उत्पन्न झालें. हीच प्रकृति होय. हिचे भेद दोन—शुद्धसत्त्वप्रधान माया आणि रजतमांनीं युक्त माया—ती अविद्या. हें विवेचन ज्ञानराजांनीं सातव्या अध्यायांत केलें आहे. हे सर्व व्यष्ट्यात्मक जीव अविद्येनें वेष्टित होऊन दुस्तर भवाब्धींत कल्पांचेकल्प गटकळ्या खात राहिल्यानें आपलें कर्तव्याकर्तव्य मुळींच विसरले. त्यामुळें त्यांस असें वाटतें कीं, आपण जन्मास आल्याचें सार्थक्य काय तें प्रपंच साधणें हें होय. सूर्योदयापासून अस्तमानपर्यंत नानातऱ्हेच्या व्यवसायांनीं द्रव्य मिळवून कुटुंबाचें पोषण करणें, हें मुख्य कर्तव्य असून आपण केलेल्या भलभलत्या युक्ती लोकांस न समजूं देतां प्रतिष्ठितपणानें लोकांत दिवस काढणें हेंच शाहाणपण व यांतच अब्रू आहे. आपले वाडवडील ज्या मार्गानें संसार करित आले त्याच मार्गानें आपण जावें हें बरें, असें ह्मणून रात्रंदिवस मोठ्या दक्षतेनें वागत असतात. अशा स्थितींत जन्माचे जन्म गेले व पुढेंही जातील. ही दुर्लभ नरतनु बहुत सुकृतानें मिळाली आहे.

तेव्हां आयुष्यांतील एकेक क्षण जो जातो तो सुद्धां मोलवान असून त्याची किंमत न समजतां सर्व आयुष्य कवडीच्या मोलानें घालवितात. हें सर्व प्राणी मायेच्या आधीन झाले आहेत ह्मणून होतें.

सुखोत्पत्तीकरितां सदासर्वकाळ मनुष्याचा प्रयत्न आहे. पृथ्वीवरील कोणत्याही देशांतील कारस्थानें पहा, त्या सर्वांचा उद्देश सुखप्राप्ती आहे. परंतु सुख प्राप्त होतें कोणच्या प्रकारचें याविषयीं मात्र निर्णय झाला नाहीं. सनातन हिंदुधर्मशास्त्रांत मात्र या सुखप्राप्तीचा खरा निर्णय झाला आहे. त्याप्रमाणें सुखप्राप्ति होऊन पूर्णकाम झालेले महात्मे या भरतखंडांत अनेक होऊन गेले आहेत.

आधिभौतिक संपत्तीपासून सुखप्राप्ति होत नाहीं, व ज्याला सध्या सुधारणूक, उन्नति, वैभव इत्यादिक नांवें पाश्चिमात्य लोक देतात तीं सर्व क्षणिक आहेत. ह्याचें अनुकरण दुर्दैवानें आह्मी करूं लागलों आहोंत. अक्षय सुखाचीं साधनें, अमर उन्नति आणि चिरायु वैभव हीं सर्व आह्मांजवळ असतां; क्षणिक सुख, क्षणिक उन्नति आणि क्षणिक वैभव यांच्या पाठीस आह्मी लागत आहोंत ह्या आमच्या मूर्खपणाला काय ह्मणावें?

पृथ्वींतील मोठमोठीं राष्ट्रें पहा, कोणीतरी पराधीन आहेत काय? भरतखंडच कां पराधीन असावें? तर तें पराधीन असण्याला कांहीं कारणें आहेत. सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां हीं कारणें सहज लक्षांत येतात. पाश्चिमात्य राष्ट्रें आपापली उन्नति करण्याकरितां जे प्रयत्न करीत आहेत त्यांकडे लक्ष दिलें असतां अंगावर कांटा उभा राहिल्याशिवाय राहणार नाहीं. अशा देशांच्या उन्नतीची दिशाच पाहूं या. मोठा आरमार, प्रबल सैन्य, हुशार योद्धे व विपुल सामग्री घेऊन परराष्ट्रांत जावें, तेथील लोकांस नाना तऱ्हेचीं दुःखें देऊन त्यांचें स्वातंत्र्य हरण करावें, किंबहुना त्यांचें जीवित्व हरण करून स्वराज्य स्थापन करावें, मग तेथें आधिभौतिक संपत्तीचे संभार भरून चित्रविचित्र नगररचना, वाडे, तलाव, धर्मशाळा, तारायंत्रें, आगगाड्या इत्यादिक क्षणिक मोहक सुखाचीं साधनें उभारून अमुक देश आह्मीं सुधारला अशी जगांत आपली प्रशंसा करून घेतात! परंतु खरें सुख व खरी उन्नति, तीं एकीकडेच राहिलीं.

खरी सुखाची प्राप्ति ह्मणजे आत्मसंतोष. ज्ञानोबा ह्मणतात—

नाना दुःखीं प्राप्तीं । जया उद्वेग नाहीं चित्तीं । आणि सुखाचिया आर्ती । अडपयाचिजेना ॥ ९४ ॥ अर्जुना तयाच्या ठायीं । कामक्रोध सहजें नाहीं । आणि भयातें नेणे कहीं । परिपूर्ण तो ॥९५॥ जो सर्वत्र सदा सरिसा । परिपूर्ण चंद्र कां

जैसा । अधमोत्तम प्रकाशा- । माजी न ह्मणे ॥ ९६ ॥ ऐसी अनवच्छिन्न समता । भूतमात्रीं सदयता । आणि पालट नाहीं चित्ता । कोणे वेळीं ॥ ९७ ॥ गोमटें कांहीं पावे । तरी संतोषें तेणें नाभिभवे । जो ओखटेनि नागवे । विषादासी ॥ ९८ ॥ तो अहंकारातें दवडूनी । सकल काम सांडोनी । विचरे विश्व होऊनी । विश्वामाजी ॥ ९९ ॥ ज्ञा० अ० २.

कोणच्याही गोष्टीचा अभिलाष नसणें–अगोदर शारीरिक किंवा मानसिक दुःख व्हावयाचेंच नाहीं, आणि जरी कदाचित झालें तरी त्याविषयीं निष्काळजी, सदासर्वकाल सुप्रसन्न, कामक्रोधरहित, भय हें कशाचें नसणें– अशा तऱ्हेचें अनुपम सौख्य ही आह्मां हिंदु लोकांची संपत्ति.

अनादि कालापासून अशी संपत्ति प्राप्त व्हावी ह्मणून या भरतखंडामध्यें अनेक महात्म्यांनीं प्रयत्न करून ते पूर्णकाम झाले आहेत. त्यांचा मोठा जय ह्मटला ह्मणजे मनोजय. ज्या दुष्ट मनाच्या योगानें सर्व दुःखप्राप्ति होते, ज्याच्या योगानें परम सुखास एकीकडे ठेवून यत्किंचित क्षणिक सुखाकडे मनुष्य वळतो, व मनामध्यें अनेक कल्पनातरंग उत्पन्न होतात त्याचें स्पष्ट उदाहरण पाश्चिमात्य उन्नतीचें जें मोठें मोहधोंगडें आमच्या देशावर येऊन पडलें आहे, व ज्याच्या मोहपाशांनीं आह्मी आमचें पूर्वीचें खरें वैभव विसरत जाऊन भलतेच दिशेकडे बहकत आहोंत तें आहे. आमच्या खऱ्या वैभवाची व सुखाची एक अनंतअंश देखील या पाश्चिमात्य उन्नतीला किंमत नाहीं.

ज्ञानेश्वरींत जो जो विषय पाहावा तो तो लोकोत्तर असून सुबोध व सरळ प्रतिपादन केला आहे. कर्म, उपासना व ज्ञान हीं तीन काय तीं आत्मसंतोषाचीं मुख्य साधनें. लोक भिन्नरुचीचे आहेत ह्मणून तीं सर्व परमदयाळू ज्ञानराजांनीं निरनिराळीं व त्यांच्या त्यांच्या फलदर्शनपूर्वक ठिकठिकाणीं स्पष्ट सांगितलीं आहेत. यांतून कोणत्याही एका मार्गास अनुसरलें तरी कार्यभाग घडल्यावांचून निःसंशय राहणार नाहीं. केवळ लोकोद्धारार्थ प्रतिपादन केलेल्या श्रीज्ञानेश्वरांच्या या ज्ञानेश्वरीचें कोणीही प्रेमभावानें पूर्ण विश्वास ठेवून रात्रंदिवस परिशीलन करील तर तो अनायासें ईशकृपेस पात्र होऊन दुस्तर भवसमुद्र पार होईल. मात्र जसें विषयी पुरुषाचें मन निरंतर विषयाकडे धांवतें तसें सदोदित ज्ञानेश्वरीचेंच व्यसन लागलें पाहिजे.

हा विषय इतका महत्वाचा असून याजकडे लोकांचें दुर्लक्ष कां झालें असावें या गोष्टीचा विचार केला ह्मणजे दोन कारणें लक्षांत येतात. तीं हीं कीं, एक या प्राण्याचें प्रतिबंधक पूर्वसंचित आड येणें व दुसरें या ग्रंथांत अर्थगांभीर्यता असल्यानें दुर्बोधपणा. जशी गीता भगवदुक्त असून तिला ज्ञाते अपौरुषेय आहे असें पूर्णपणें पूज्यबुद्धीनें मानितात तसेंच ज्ञानेश्वरीबद्दलही विचार केला असतां ज्ञानराजही अवतारी पुरुष असें ह्मटल्याशिवाय राहवत नाहीं. कारण हा ग्रंथ त्यांनीं केवळ आपल्या वयाच्या १६ व्या वर्षी तयार केला, एवढेंच नव्हे, तर गीतेचा उद्दिष्ट अर्थ यांत पूर्णपणें दाखविला आहे. ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे! याची कल्पना सुद्धां करितां येत नाहीं. तरी त्यांचें अलौकिक ज्ञान व कर्तुमकर्तुशक्यता मनांत आणली ह्मणजे त्यांस अगाध व अशक्य मुळींच नाहीं.

ज्ञानेश्वरीच्या थोरवीचें आपण अल्पमति कोठवर वर्णन करणार? ज्यांनीं आपला सर्व जन्म रात्रंदिवस तत्परपणानें या ज्ञानेश्वरीच्या परिशीलनांत घालविला त्यांनीं अनुभवाअंतीं आपले उद्गार प्रकट केले आहेत:—

ज्ञानेश्वरीपाठीं । जो वोवी करील मन्हाटी ।
तेणें अमृताचे ताटीं । जाण नरोटी ठेविली ॥

एकनाथ.

ह्या व अशातऱ्हेच्या अनेक लेखांवरून हिची मातब्बरी सहज लक्षांत येण्यासारखी आहे. ह्मणूनच आजपर्यंत मोठमोठे विद्वान, वेदांतनिष्णात असून प्रस्थानत्रयीज्ञाचा बाणा बाळगणारेसुद्धां ज्ञानेश्वरीपर्यंत येऊन हात टेंकतात; मग सामान्यांची तर गोष्टच नको. या ग्रंथाचा अर्थ केवळ विद्वत्तेच्या जोरावर लावूं इच्छिणारांची घमेंड सर्वथैव व्यर्थ आहे. याचें खरें हृद्य भगवत्साक्षात्कारी महानुभाव तुकारामादिकांनींच जाणलें. व अशाच तऱ्हेच्या तत्वज्ञानी सद्गुरूची पूर्वपुण्योदयानें ज्यास गांठ पडली असेल त्यास यत्किंचित् ज्ञान होईल. प्रसादाशिवाय केवळ कोरडें शाब्दज्ञान लढविण्यानें याचें ज्ञान होऊन मनाला समाधान कदापि होणें नाहीं, तर याच ग्रंथाची गोडी व व्यसन लागलें पाहिजे. आणि ती गोडी उत्पन्न होण्याला तरी थोडीबहुत शब्दार्थज्ञानाची अपेक्षा आहे. असा अन्योन्याश्रय आहे ह्मणून साधारणतः ज्ञानेश्वरी जाणूं इच्छिणाऱ्या लोकांला शब्दार्थज्ञान तरी व्हावें अशा इच्छेनें यावर यथामति टिप्पणी देण्याचा प्रयत्न केला आहे.

ज्ञानेश्वरीवर टिप्पणी देण्यास माझ्यासारख्यानें प्रवृत्त होणें हें एक प्रकारचें साहस आहे हें खरें, परंतु "अकरणात् मंदकरणं श्रेयः" व "नभः पतंत्यात्मसमं पतत्रिणः" या न्यायानें यथाशक्ति, यथामति या कामीं झटणें निंद्य होणार नाहीं असें मनांत आणून या उद्योगास आरंभ केला आहे. ज्ञानेश्वरीवर कोश आहेतच, हा प्रयत्न कशाला पाहिजे असें कित्येक ह्मणतील, पण ज्ञानेश्वरी वाचणारांला वाचतेवेळीं अपरिचित शब्द सांपडला कीं आणा कोश, पहा परिभाषा, असे प्रत्येक शब्दार्थाचे वेळीं श्रम होतात आणि हा दीर्घ प्रयास पडूं लागला ह्मणजे औदासीन्यानें तो विषय सोडून देतात व शंका जशाचीतशी राहाते. हे क्लेश दूर व्हावे ह्मणून त्या कोशांच्या आधारें ठिकठिकाणीं बहुतेक शब्दांवर भरपूर टीपा दिल्या आहेत व कोठेंकोठें ओंवी विशेष अवघड वाटली तेथें सर्व ओंवीचा अर्थ दिला आहे. कोठें संबंधवार अन्वय मात्र दाखविला आहे, व ज्ञानराजांनीं मागचा हवाला दिला तेथें स्थलाचा निर्देश केला आहे. कित्येक जागीं पूर्वीच्या पृष्ठांत जरी शब्दार्थ आला आहे तरी तोच शब्द मागें शोधावा लागूं नये ह्मणून दुसऱ्या पृष्ठावर आला कीं पुनः दिला आहे. ज्ञानेश्वरीच्या कांहीं हस्तलिखित प्रति मिळाल्या त्यांवरून निघालेलीं पाठांतरें व अधिक ओंव्या मिळाल्या त्या टीपांवर निरनिराळ्या स्वतंत्र देऊन पाठांतरेंही दिलीं आहेत. ज्ञानेश्वरी वाचतां वाचतां अनायासें गीतेच्याही पदांचा अर्थ समजावा या हेतूनें गीतेंतील ज्या श्लोकांची ज्ञानराजांची टीका चालू असेल त्या श्लोकांतील क्वचित् श्लोकार्धप्रतीकें, श्लोकचरण व कोठें कोठें एकेक पद त्या त्या ओंवीच्या आरंभीं [ ] अशा चिन्हांत बारीक टैपांनीं दिलीं आहेत. ज्ञानेश्वरांनीं विषयप्रतिपादन करितांना गीतेबाहेरीलही विषय ज्या जागीं घेतला आहे, त्यांतील पदांचा निर्देश क्वचित केला आहे. परंतु तो हें गीतेंतील पद नव्हे असें स्पष्ट समजण्याकरितां [' '] अशा विशेष चिन्हांत दाखविला आहे. एतावता हा अशातन्हेचा प्रयत्न करीत असतां मतिदोषानें किंवा दृष्टिदोषानें जरी भूल राहिली असेल तरी परिश्रमज्ञ गुणग्राही क्षमा करतील, व हें पुस्तक जिज्ञासूंच्या साह्याला अंशतः उपयोगीं पडेल अशी आशा आहे; ती पूर्ण करणारे श्रीज्ञानराज यांच्या चरणीं हा माझा अल्पउद्योग समर्पण असो.

अण्णा मोरेश्वर कुंटे.

ज्ञानेश्वरीची अध्यायानुक्रमणिका.

अध्याय.	विषयाचें नांव.	श्लोकसंख्या.	ओंवीसंख्या.	पृष्ठ.
१	अर्जुनविषाद.	४७	२७५	१
२	सांख्ययोग.	७२	३७५	२१
३	कर्मयोग.	४३	२७६	९०
४	ब्रह्मार्पणयोग.	४२	२२५	७०
५	संन्यासयोग.	२९	१८०	८८
६	अभ्यासयोग.	४७	४९७	१०२
७	ज्ञानविज्ञानयोग.	३०	२१०	१३७
८	अक्षरब्रह्मयोग.	२८	२७१	१५४
९	राजविद्याराजगुह्ययोग.	३४	५३५	१७४
१०	विभूतिविस्तारयोग.	४२	३३५	२०९
११	विश्वरूपदर्शनयोग.	५५	७०८	२३२
१२	भक्तियोग.	२०	२४७	२७६
१३	क्षेत्रक्षेत्रज्ञयोग.	३४	११७१	२९०
१४	गुणत्रयविभागयोग.	२७	४१६	३४६
१५	पुरुषोत्तमयोग.	२०	५९९	३६८
१६	दैवासुरसंपद्विभागयोग.	२४	४७३	३९९
१७	श्रद्धात्रयविभागयोग.	२८	४३३	४२५
१८	मोक्षसंन्यासयोग.	७८	१८११	४४९
		७००	९०३७	
	एकंदर		९७३७	

नमः परमात्मने ।



मंगलम् ।

पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ।
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनी-
मंब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥ १ ॥
प्रपन्नपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये ।
ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः ॥ २ ॥
सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः ।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ ३ ॥
वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥ ४ ॥

पुणें इंदिरा प्रेस.
मराठा लायब्ररी.
त्र्यंबक हरी आवटे

ज्ञानेश्वरी.

श्रीगणेशाय नमः ।

ॐ नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ ॥ देवा तूंचि गणेश । *सकळमतिप्रकाश । म्हणे निवृत्तिदास । अवधारिजो जी ॥ २ ॥ हें शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुवेष । तेथ वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ॥ ३ ॥ स्मृती तेचि अवयव । देखा आंगीकभाव । तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ॥ ४ ॥ अष्टादश पुराणें । तींचि मणिभूषणें । पदपद्धती खेवणें । प्रमेयरत्नाचीं ॥ ५ ॥ पदबंध नागर । तेंचि रंगावलि अंबर । जेथ साहित्य वाणें सपूर । उजाळाचें ॥ ६ ॥ देखा काव्यनाटका । जें निर्धारितां सकौतुका । त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ॥ ७ ॥ नाना प्रमेयाची परी । निपुणपणें पाहतां कुसरी । दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भलीं ॥ ८ ॥ जेथ व्यासादिकांची मती । तेचि मेखळा मिरवती । चोखाळपणें झळकती । पल्लवसडका ॥ ९ ॥ देखा षडदर्शनें म्हणिपती । तेचि भुजांची आकृती । म्हणऊनि विसंवाद धरिती । आयुधें हातीं ॥ १० ॥ तरी तर्क तोचि †फरशु । नीतिभेद अंकुशु । वेदान्त तो महारसु । मोदक मिरवे ॥ ११ ॥ एके हातीं दंत । जो स्वभावता खंडित । तो बौद्धमतसंकेत । ‡वार्तिकाचा ॥ १२ ॥ मग सहजें सत्कारवाद । तो पद्मकर वरद । धर्मप्रतिष्ठा तो सिद्ध । अभयहस्त ॥१३॥ देखा विवेकवंत सुविमळ । तोचि शुंडादंड सरळ । जेथ परमानंद केवळ । महासुखाचा ॥ १४ ॥ तरी संवाद तोचि दर्शन ॥ जो समताशुभ्रवर्ण । देव उन्मेषसूक्ष्मेक्षण । विघ्नराज ॥ १५ ॥ मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं । बोधमदामृत मुनी । अलीं सेविती ॥ १६ ॥ प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ । सरिसे एकवटती इभ । मस्त-

* सकलार्थमति, सकल मथितार्थ, सकलार्थप्रकाश. † परशु. ‡ चार्वाकांचा.

१ उत्पत्तिविनाशरहित अनादि, ओंकार. २ उपनिषदांनीं वर्णित. ३ स्वतः स्वतःसच जाणणाऱ्या. ४ ऐका. ५ वेद. ६ अकारादिक. ७ मन्वादि. ८ शरीराचे. ९ कोंदण. १० तत्वार्थ. ११ उत्तम. १२ रंगयुक्त. १३ वस्त्र. १४ बारीक तंतूचें. १५ दीप्तीचें. १६ प्रकार. १७ कुशलता. १८ कडदोरा. १९ स्वच्छपणानें. २० पदराचे अग्रभाग. २१ पातंजल, सांख्य, वैशेषिक, न्याय, मीमांसा, आणि वेदांत-हीं सहा दर्शनें, अथवा-'सौरं च वैष्णवं शाक्तं शैवं वैनायकं तथा । स्कांदं च शक्तिमार्गश्च दर्शनानि षडैव हि ॥' २२ मतांतर. २३ न्यायशास्त्र. २४ अर्थशास्त्र. २५ अर्धा. २६ व्याससूत्रावरील वृत्तीचें व्याख्यान. २७ अतिनिर्मळ. २८ दांत. २९ ज्ञान. ३० वाटल्या. ३१ धर्म आणि ब्रह्ममीमांसा. ३२ भ्रमर. ३३ तत्वार्थरूप पोवळें. ३४ गंडस्थळ. ३५ हत्ती.

कावरी ॥ १७ ॥ उपरि *वेदोपनिषदें । जियें उदारज्ञानमकरंदें । तियें कुसुमें †मुकुटीं सुगंधें । शोभती ‡भलीं ॥ १८ ॥ अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल । मकार महामंडल । मस्तकाकारें ॥ १९ ॥ हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म केवळलें । तें मियां श्रीगुरुकृपा नमिलें । आदिबीज ॥ २० ॥ आतां अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी । ते श्रीशारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ॥ २१ ॥ मज हृदयीं सद्गुरु । जेणें तारिलों हा संसारपूरु । ह्मणऊनि §विशेषें अल्लादरु । विवेकावरी ॥ २२ ॥ जैसें डोळ्यां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे । मग वास पाहिजे तेथ प्रगटे । महानिधी ॥ २३ ॥ कां चिंतामणी आलिया हातीं । सदां विजयवृत्ति मनोरथीं । तैसा मी पूर्णकाम श्रीनिवृत्ती । ज्ञानदेव ह्मणे ॥ २४ ॥ ह्मणोनि जाणतेनें गुरु भजिजे । तेणें कृतकार्य होइजे । जैसें मूळसिंचनें सहजें । शाखा पल्लव संतोषती ॥ २५ ॥ कां तीर्थें जियें त्रिभुवनीं । तियें घडती समुद्रावगाहनीं । ना तरी अमृतरसस्वादनीं । रस सकळ ॥ २६ ॥ तैसा पुढतपुढती तोचि । मियां अभिवंदिला श्रीगुरूचि । अभिलाषित मनोरुचि । पुरविता तो ॥ २७ ॥ आतां अवधारा कथा गहन । जे सकळ ¶कथां जन्मस्थान । कीं अभिनव उद्यान । विवेकतरूचें ॥ २८ ॥ ना तरी सर्वसुखाची आदि । जे प्रमेयमहानिधि । नाना नवरससुधाब्धि । परिपूर्ण हे ॥ २९ ॥ कीं परमधाम प्रगट । सर्व विद्यांचें मूळपीठ । शास्त्रजातां वैसौट । अशेषांचें ॥ ३० ॥ ना तरी सकळ धर्मांचें माहेर । सज्जनाचें जिव्हार । लावण्यरत्नभांडार । शारदेचें ॥ ३१ ॥ नाना कथारूपें ||भारती । प्रगटली असे $त्रिजगती । ओविष्करोनि महामती । व्यासाचिये ॥ ३२ ॥ ह्मणोनि हा काव्यां रावो । ग्रंथगुरुवेतीचा ठावो । एथूनि रसां झाला ओवो । रसाळपणाचा ॥ ३३ ॥ तेवींचि आइका आणीक एक । एथूनि शब्दश्री सच्छास्त्रिक । आणि महाबोधीं कोवळीक । दुणावली ॥३ ४ ॥ एः चातुर्य शाहणें झालें । प्रमेय रुचीस आलें । आणि सौभाग्य पोखलें । सुखाचें एथ ॥ ३५ ॥ माधुर्यीं मधुरता । शृंगारीं सुरेखता । रूढपण +चित्तां । +दिसलें भलें ॥ ३६ ॥ एथ कळाविदपण कळा । पुण्यासि प्रताप आंगळा । ह्मणऊनि जन्मेजयाचे अवलीळा । दोष हरले

---

* दशोपनिषदें. † मुक्ति. ‡ भाळीं. § विशेष मनीं आदरु. ¶ कौतुकां जन्म.° || भारतीं. $ त्रिजगतीं. + दिसे.

---

१ ज्ञानसुगंधानें युक्त. २ वेद. ३ कौटाळिलें. ४ ॐकार. ५ अपूर्व. ६ सरस्वती. ७ वाट, मार्ग. ८ जेवढीं. ९ तेवढीं. १० स्नानानें. ११ प्रार्थिला. १२ इच्छित. १३ बाग. १४ तात्पर्य, सिद्धांत. १५ अथवा. १६ वस्तु. १७ आश्रय. १८ जिव्हाळा. १९ प्रवेशोनी. २० राजा. २१ थोरपणाचा. २२ डौल. २३ शोभा. २४ उत्तम शास्त्र. २५ कोमलता. २६ तत्वार्थ. २७ पुष्ट झालें. २८ श्रेष्ठता. २९ कुशलता. ३० अधिक. ३१ सहज.

॥ ३७ ॥ आणि पाहतां नांवेक[1] । रंगीं सुरंगतेची आगळिक । गुणा सुगुणपणाचें *बिकें[2] । बहुवस एथ ॥ ३८ ॥ भानुतेजें धवळलें । जैसें त्रैलोक्य दिसे उजळिलें । तैसें व्यासमती कैवळिलें[3] । मिरवे विश्व ॥ ३९ ॥ कां सुक्षेत्रीं बीज घातलें[4] । तें आपुलियापरी विस्तारिलें । तैसें भारतीं सुरवाडलें[5] । अर्थजात ॥ ४० ॥ ना तरी †नगरांतरीं वसिजे । तरी नागरचि होइजे[6] । तैसें व्यासोक्तितेजें । धवळत सकळ ॥ ४१ ॥ कीं प्रथमवयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी[7] । प्रगटे जैसी आगळी । अंगनाआंगीं ॥ ४२ ॥ ना तरी उद्यानीं मांधवी घडे[8] । तेथ वनशोभेची खाणी उघडे । आदिलापासोनि[9] अपाडें[10] । जियापरी ॥ ४३ ॥ नाना धनीभूत[11] सुवर्ण । जैसें न्याहाळितां साधारण[12] । मग अळंकारीं बरवेपण[13] । निवाड दावी ॥ ४४ ॥ तैसें व्यासोक्ति अळंकारिलें । आवडे तें बरवेपण पातलें[14] । तें जाणोनि आश्रयिलें । इतिहासीं ॥ ४५ ॥ नाना पुरतिये[15] प्रतिष्ठेलागीं । सांनीव[16] धरूनि आंगीं । पुराणें आख्यानरूपें जगीं । भारता आलीं ॥ ४६ ॥ ह्मणऊनि महाभारतीं नाहीं । तें नोहे लोकीं तिहीं । येणें कारणें[17] ह्मणिपे पाहीं । व्यासोच्छिष्ट जगत्त्रय ॥ ४७ ॥ ऐसी जगीं सुरस कथा । ते जन्मभूमि परमार्था । मुनि[18] सांगे नृपनाथा । जन्मेजया ॥ ४८ ॥ ‡जें अद्वितीय उत्तम । पवित्रैक निरुपम[19] । परम मंगळधाम[20] । अवधारिजो ॥ ४९ ॥ आतां भारतकमळपराग[21] । गीताख्य प्रसंग । जो संवादला श्रीरंग । अर्जुनेसीं ॥ ५० ॥ ना तरी शब्दब्रह्माब्धि । मथियला व्यासबुद्धि[22] । निवाडिलें निरवधि[23] । नवनीत हें[24] ॥ ५१ ॥ मग ज्ञानाग्निसंपर्कें । कंडसिलें[25] विवेकें । पद आलें परिपाकें[26] । ओमोदासी[27] ॥ ५२ ॥ जें अपेक्षिजे विरक्तीं । सदां अनुभविजे संतीं । सोहंभावें पारंगतीं[28] । रमिजे जेथ ॥ ५३ ॥ जें आकर्णिजे भक्तीं । जें आदिवंद्य § त्रिजगतीं । ते भीष्मपर्वी संगती । सांगिजेल ॥ ५४ ॥ जें भगवद्गीता ह्मणिजे । जें ब्रह्मेशानीं[29] प्रशंसिजे । जें सनकादिकीं सेविजे । आदरेसीं ॥ ५५ ॥ जैसें ¶शारदीचिये[30] चंद्रकळे । माजि अमृतकण कोंवळे[31] । ते वेंचिती[32] मनें मवाळें[33] । चकोरतेलगे[34] ॥ ५६ ॥ तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा । अति हळुवारपण चित्ता । आणूनियां[35] ॥ ५७ ॥ हे[36] शब्दवीण संवादिजे[37] । इंद्रियां नेणतां भोगिजे । बोलाआदि झोंबिजे । प्रमे-

* बीक. † नगरीं. ‡ जे. § त्रिजगती. ¶ शारदीचिये.

१ क्षणभर. २ सामर्थ्य. ३ कौटाळलें. ४ चांगल्या शेतांत. ५ सुखावलें. ६ सर्वअर्थ. ७ नगरवासी, शहाणा. ८ तारुण्यदशेंत. ९ शोभा. १० वसंतशोभा. ११ पहिल्यापेक्षां. १२ विशेषतः. १३ लगड. १४ निदानीं, वेगळें. १५ प्राप्त झालें. १६ पूर्ण. १७ नम्रता, लघुत्व. १८ म्हटलें जातें. १९ वैशंपायन. २० उपमारहित. २१ कल्याणाचें स्थान. २२ पुष्परेणु. २३ काढलें. २४ अवधिरहित, अपार. २५ गीता. २६ कढविलें. २७ पक्वतेनें, २८ रुचीला, माधुर्याला. २९ पार पावलेल्यांनीं. ३० ब्रह्मा आणि शंकर यांनीं. ३१ शरदृतूच्या. ३२ घेती. ३३ कोंवळ्या. ३४ जमिनीवर राहणाऱ्या चकोर पक्ष्यांचीं पिलें. ३५ मऊपणा. ३६ गीता. ३७ बोलावी. ३८ झटावें.

यासी ॥ ५८ ॥ जैसे भ्रमर [१]पराग नेती । परी कमळदळें नेणती । तैसी परी आहे सेविती । ग्रंथीं इये ॥ ५९ ॥ कां आपुला [२]ठाय न सांडितां । आलिंगिजे चंद्र प्रगटतां । हा [३]अनुराग भोगितां । [४]कुमुदिनी जाणे ॥ ६० ॥ ऐसेनि गंभीरपणें । स्थिरावलेनि अंतःकरणें । [५]आथिला तोचि जाणे । मानूं *इये ॥ ६१ ॥ अहो अर्जुनाचिये [६]पांती । जे [७]पाँरिसणया योग्य होती । तिहीं कृपा करूनि संतीं । [८]अवधान द्यावें ॥ ६२ ॥ हें [९]सलगी म्यां ह्मणीतलें । चरणां लागोनि विनविलें । प्रभू सखोल हृदय आपुलें । ह्मणूनियां ॥ ६३ ॥ जैसा स्वभाव मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा । तरी अधिक तयाचा । संतोष [१०]आंथी ॥ ६४ ॥ तैसा तुह्मीं मी अंगिकारिला । सज्जनीं आपुला ह्मणीतला । तरी उणें सहजें [११]उपसाहला । प्रार्थूं †काई ॥ ६५ ॥ परी अपराध तो [१२]आणीक आहे । जें मी गीतार्थ [१३]कवेळूं पाहें । तें अवधारिजे विनवूं लाहें । ह्मणऊनियां ॥ ६६ ॥ हें [१४]अनाँवर न विचारितां । वायांचि [१५]धिवसा [१६]‡उपनला चित्ता । येरवीं काय भानुतेजीं [१७]खद्योता । शोभा [१८]आंथी ॥ ६७ ॥ कीं टिटिभूं [१९]चांचुवरी । माप [२०]सूये सागरीं । मी नेणत त्यापरी । प्रवर्तें एथ ॥ ६८ ॥ आयका आकाश [२१]गिवसावें । तरी आणीक त्याहूनि थोर होआवें । ह्मणऊनि [२२]अपाड हें [२३]ओघवें । निर्धारितां ॥ ६९ ॥ तया गीतार्थाची थोरी । स्वयें शंभू विवरी । जेथ भवानी प्रश्न करी । चमत्कारोनी ॥ ७० ॥ तेथ हर ह्मणे नेणिजे । देवी जैसें कां स्वरूप तुझें । तैसें हें नित्य नूतन देखिजे । गीतातत्त्व ॥ ७१ ॥ हा वेदार्थसागर । जया निद्रितांचा घोर । तो स्वयें श्रीसर्वेश्वर । प्रत्यक्ष अनुवादला ॥ ७२ ॥ ऐसें जें [२४]अगाध । जेथ [२५]वेडावती वेद । तेथ अल्प मी मतिमंद । काय होय ॥ ७३ ॥ हें अपार कैसेनि कवळावें । महातेज कवणें [२६]धवळावें । गगन मुठीं [२७]सुवावें । मशकें केवीं ॥ ७४ ॥ परी एथ असे एक आधारु । तेणेंचि बोलें मी सधरुं । §जैं सानुकूळ श्रीगुरु । ¶ज्ञानदेवो ह्मणे ॥ ७५ ॥ येऱ्हवीं तरी मी मूर्ख । जरी जाहला अविवेक । तऱ्ही संतकृपादीपक । सोज्वळ असे ॥ ७६ ॥ लोहाचें कनक होये । हें सामर्थ्य ||परिसींच आहे । कां मृतही जीवित [२८]लाहे । अमृतसिद्धि ॥ ७७ ॥ जरी प्रगटे सिद्धिसरस्वती । तऱ्ही मुकया [२९]आंथि भारती । एथ वस्तुसामर्थ्यशक्ती । नवल कायी ॥ ७८ ॥ कां जयातें कामधेनु माय । तयासी [३०]अप्राप्य

---

* येथिंचा. † काय. ‡ उपजला. § जे सानुकूळ. ¶ ज्ञानदेव. || परिसींच कीं आहे.

---

१ पुष्परेणु. २ स्थल. ३ प्रीति. ४ चंद्रविकासी कमलीनी. ५ भाग्यवान्. ६ पंक्तींत. ७ श्रवणाला. ८ लक्ष. ९ लडिवाळपणानें. १० आहे. ११ क्षमा करण्याला. १२ आकळूं. १३ आवरण्याला. कठिण. १४ धैर्य. १५ उपजला. १६ काजव्याला. १७ टिटवी. १८ चोंचीनें. १९ घाली. २० गवसणी करून आच्छादावें. २१ अशक्य. २२ सर्व. २३ योगनिद्रेतील घोरणें. २४ खोल. २५ स्तब्ध हातात. २६ उजळावें. २७ घालावें. २८ समर्थ. २९ लखलखीत. ३० पावतो. ३१ वाणी. ३२ दुर्लभ.

कांहीं आहे । ह्मणऊनि मी प्रवर्तों[1] लाहें । ग्रंथीं इये ॥ ७९ ॥ तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें[2] । करूनि घ्यावें हें तुमतें[3] । विनवित असें ॥ ८० ॥ आतां देइजो अवधान[4] । तुह्मी बोलविला मी बोलेन । जैसें चेष्टे[5] सूत्राधीन । दारुयंत्र ॥ ८१ ॥ तैसा मी अनुगृहीत । साधूंचा निरूपित । ते आपला अलंकारित । भलतयापरी ॥ ८२ ॥ तंव श्रीगुरु ह्मणती राहीं । हें तुज बोलावें नलगे कांहीं । आतां ग्रंथा चित्त देईं । *झडकरी वेगां ॥ ८३ ॥ या बोला निवृत्तिदास । पावूनि परम उल्हास । ह्मणे परिसा मना अवकाश । देवूनियां ॥ ८४ ॥

धृतराष्ट्र उवाच–**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।**
मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥

तरी पुत्रस्नेहें मोहित । [धृतराष्ट्र उवाच] धृतराष्ट्र असे पुसत । ह्मणे संजया सांगें मात । [धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे] कुरुक्षेत्रींची ॥ ८५ ॥ जें धर्मालय[7] ह्मणिजे । [मामकाः पांडवाश्चैव] तेथ पांडव आणि माझे । [समवेता युयुत्सवः] गेले असती व्याजें[8] । जुंझाचेनि ॥ ८६ ॥ [किमकुर्वत संजय] तरी तिहीं येतुला[9] अवसरीं । काय किंजत[10] असे येरयेरीं[11] । तें झडकरी कथन करीं । मजप्रती ॥ ८७ ॥

संजय उवाच–**दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ।**
आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥
पश्यैतां पांडुपुत्राणामाचार्य महतीं चमूम् ।
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥ ३ ॥

[संजय उवाच—पांडवानीकं व्यूढं] तिये वेळीं तो संजय बोले । ह्मणे पांडवसैन्य उंचेललें[12] । जैसें महाप्रळयीं पसरलें । कृतांतमुख[13] ॥ ८८ ॥ तैसें तें घनदाट । उठावलें एकवाट[14] । जैसें उसळलें कालकूट । धरी कवण ॥ ८९ ॥ नातरी वडवानल सांदुकला[15] । प्रलयवातें पोखिला[16] । सागर शोषूनि उधवला[17] । अंबरासी ॥ ९० ॥ तैसें दळ दुर्धर । नानाव्यूहीं परिकर[18] । अवगमलें[19] भयासुर । तिये काळीं ॥ ९१ ॥ [दुर्योधनस्तदा दृष्ट्वा तु] तें देखोनि दुर्योधनें । अव्हेरिलें[20] कवणें मानें । जैसें न गणिजे पंचाननें[21] । गजघटांतें[22] ॥ ९२ ॥ [आचार्यमित्यर्ध] मग द्रोणापासीं आला । तयातें ह्मणे [पश्यैत्यर्ध] हा देखिला? । कैसा दळभार

---

* झडकरी. ॥ ८३ ॥

---

१ धजावतों. २ मान्य. ३ तुम्हाला. ४ लक्ष. ५ नाचे. ६ कळसूत्री लांकडी बाहुली. ७ धर्माचें घर. ८ निमित्तानें. ९ इतक्या. १० करिते झाले. ११ परस्परांत. १२ खवळलें. १३ काळाचें तोंड. १४ एकदम. १५ भडकला. १६ पोसला. १७ प्रदीप्त झाला. १८ आकाशापर्यंत. १९ रचना. २० तयार. २१ भासलें. २२ तिरस्कारिलें. २३ सिंहानें. २४ हत्तींचा कळप.

उचलला । पांडवांचा ॥ ९३ ॥ गिरिदुर्ग जैसें चालतें । [व्यूढमित्यर्धं] तैसे विविध व्यूह भंवते । रचिले आंथि बुद्धिमतें द्रुपदकुमरें ॥ ९४ ॥ जो कां *तुह्मी शिष्य आपुला । †विद्या देऊनि कुरुठा केला । तेणें हा सैन्यसिंधु पाखरिला । देखदेख ॥ ९५ ॥

अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ।
युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥ ४ ॥

[अत्र शूरा इत्यर्धं] आणीकही असाधारण । जे शस्त्रास्त्रीं प्रवीण । क्षात्रधर्मीं निपुण । वीर आहाती ॥ ९६ ॥ जे बळें प्रौढी पौरुषें । भीमार्जुनासारिखे । ते सांगेन कौतुकें । प्रसंगेंची ॥ ९७ ॥ [युयुधान इत्युत्तरार्धं] एथ युयुधान सुभट । आला असे विराट । महारथी श्रेष्ठ । द्रुपद वीर ॥ ९८ ॥

धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् ।
पुरुजित्कुंतिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः ॥ ५ ॥
युधामन्युश्च विक्रांत उत्तमौजाश्च वीर्यवान् ।
सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥ ६ ॥

[धृष्टकेतुरिति । स्पष्टमन्यत्] चेकितान धृष्टकेतु । काशीराज विक्रांतु । उत्तमौजा नृपनाथु । शैब्य देख ॥ ९९ ॥ हा कुंतिभोज पाहें । एथ युधामन्यु आला आहे । आणि पुरुजितादि राय हे । सकळ देख ॥ १०० ॥ हा सुभद्राहृदयनंदन । जो अपर नवा अर्जुन । तो अभिमन्यु ह्मणे दुर्योधन । देखें द्रोणा ॥ १ ॥ आणीकही द्रौपदीकुमर । हे सकळही महारथी वीर । मिती नेणिजे परि अपार । मीनले असती ॥ २ ॥

अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ।
नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥ ७ ॥
भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः ।
अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥ ८ ॥

[अस्माकमिति] आतां आमुच्या दळीं नायक । जे रूढ वीर सैनिक । ते प्रसंगें आइक । सांगिजती ॥ ३ ॥ [संज्ञार्थमिति] उद्देशें एक दोनी । जा-

* तुह्मी शिक्षापिला. † विद्येसि वसौटा.

१ डोंगरी किल्ले. २ सैन्यरचना. ३ आहेत. ४ धृष्टद्युम्नानें. ५ शहाणा. ६ पसरिला. ७ महान्. ८ आहेत. ९ प्रौढीनें. १० पुरुषार्थानें. ११ योद्धा. १२ पराक्रमी. १३ हा नवा अर्जुनच काय. १४ गणती. १५ मिळाले. १६ मुख्य. १७ सांगतों. १८ जातात.

यिजती बोलोनी । [भवानित्यर्धं] तुह्मी आदिकरूनी । मुख्य जे जे ॥ ४ ॥ हा भीष्म गंगानंदनु । जो प्रतापतेजस्वी भानु । रिपुगजपंचाननु । कर्ण वीर ॥५॥ एकेकाचेनि मनोव्यापारें । हें विश्व होये सैरे । हा कृपाचार्य न पुरे । एकलाचि ॥ ६ ॥ [अश्वत्थामेत्यर्धं] एथ विकर्ण वीर आहे । हा अश्वत्थामा पैल पाहें । याचा अंडदर सदां वाहे । कृतांत मनीं ॥ ७ ॥ समितिंजय सौमदत्ति ।

अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ।
नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥

[अन्येच बहवः शूराः] ऐसे आणीकही बहुत आहाती । जयांचिया बळा मिती । धाताही नेणे ॥ ८ ॥ [नानाशस्त्रप्रहरणाः] जे शस्त्रविद्यापारंगत । मंत्रावतार मूर्त । हो कां जें अस्त्रजात । एथूनि रूढ ॥ ९ ॥ हे अप्रतिमल्ल जगीं । पुरता प्रताप आंगीं । [मदर्थे त्यक्तजीविताः] परी सर्व प्राणें मजचि-लागीं । आंरायिले असती ॥ ११० ॥ पतिव्रतेचें हृदय जैसें । पतिवांचूनि न स्पर्शे । मी सर्वस्व यां तैसें । सुभटांसी ॥ ११ ॥ आमुचिया काजाचेनि पोडें । देखती आपुलें जीवित्व थोकडें । ऐसे निरवधि चोखडे । स्वामिभक्त ॥ १२ ॥ [सर्वे युद्धविशारदाः] जुंझती कुळकणी जाणती । कळे कीर्तिसी जिती । हें बहु असो क्षात्रनीती । एथोनियां ॥ १३ ॥ ऐसे सर्वांपरी पुरते । वीर दळीं आमुतें । आतां काय गणूं यांतें । अपार हे ॥ १४ ॥

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥ १० ॥

[तदिति] वरी क्षमियांमाजि श्रेष्ठ । जो जगजेठी जगीं सुभट । तया देवैवे-पणाचा पोट । भीष्मासि पैं ॥१५॥ आतां याचेनि बळें गर्वसलें । हें दुर्ग जैसें पन्नासिलें । येणें पाडें थेंकुलें । लोकत्रय ॥ १६ ॥ [पर्याप्तं तु] आधींच समुद्र पाहीं । तेथ दुर्वाडपण कवणा नाहीं । मग वडवानळ तैसेयाही । विरजा जैसा ॥ १७ ॥ नातरी प्रलयवन्हि महावात । या दोघां जैसा सांघात । तैसा हा गंगासुत । सेनापति ॥ १८ ॥ आतां येणेंसीं कवण भिडे । [अपर्याप्तं] हें पांडवसैन्य कीर थोकडें । वरिचिलेनि पाडें । दिसत असे ॥१९॥ [इदमिति]

---

१ शत्रु हेच कोणी हत्ती त्यांचा नाशक सिंह. २ संकल्पमात्रानें. ३ धाक. ४ आहेत. ५ ब्रह्मा. ६ शस्त्रयुद्धांत निपुण. ७ साक्षात्. ८ समग्र अस्त्रें. ९ ज्यांस प्रतिस्पर्धी नाहीं असे. १० अनुसरले. ११ योग्यतेनें. १२ उणें. १३ निःसीम. १४ उत्तम. १५ चातुर्य. १६ जीववितीं, जिंकिती. १७ क्षत्रि-यांचा धर्म. १८ आमच्या. १९ इंद्रियनिग्रही. २० सेनापतित्वाचा. २१ अधिकार. २२ आच्छादिलें. २३ सेनाचक्र. २४ रचिलें. २५ याच्या योग्यतेपुढें, तुलनेनें. २६ अल्प. २७ दुर्घटत्व. २८ साह्यकर्ता. २९ संयोग. ३० भीष्म. ३१ निश्चयें. ३२ थोडें. ३३ वर सांगितलेल्या आमच्या सैन्याच्या तुलनेनें.

वरी भीमसेन[१] बेथु । तो जाहला असे सेनानाथु । ऐसें बोलोनियां मातु[२] । सांडिली[३] तेणें ॥ १२० ॥

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः ।
भीष्ममेवाभिरक्षंतु भवंतः सर्व एव हि ॥ ११ ॥

[अयनेष्विति] मग पुनरपि काय बोले । सकळ सैनिकांतें ह्मणितलें । आतां दळभार आपुलाले । *सरसे[४] करा ॥ २१ ॥ [यथाभागमवस्थिता इति] जया जिया अक्षौहिणी[५] । तेणें तिया †आवरणी[६] । वैरगण कवणकवणी । महारथिया ॥ २२ ॥ ‡तेणें तिया आवरिजे । भीष्मांतळीं राहिजे । [भवंतः सर्व एव हीति] द्रोणातें ह्मणे पाहिजे[७] । तुह्मी सकळ ॥ २३ ॥ [भीष्ममेवाभिरक्षंतु] हाचि एक रक्षावा । मी तैसा हा देखावा । येणें दळभार आघवा[८] । सांच[९] आमुचा ॥२४॥

तस्य संजनयन् हर्षं कुरुवृद्धः पितामहः ।
सिंहनादं विनद्योच्चैः शंखं दध्मौ प्रतापवान् ॥ १२ ॥

[तस्येत्यर्धं] या §राजयाचिया बोला । सेनापति[१०] संतोषला । [सिंहनादं विनद्योच्चैः] मग तेणें केला । सिंहनाद[११] ॥ २५ ॥ तो गाजत असे अद्भुत । दोहीं सैन्यांआंत । प्रतिध्वनि[१२] न समात[१३] । उपजत असे ॥ २६ ॥ तयाचि तुळगासवें[१४] । वीरवृत्तीचेनि थावें[१५] । [शंखं दध्मौ] दिव्य शंख भीष्मदेवें । आस्फुरिला[१६] ॥ २७ ॥ ते दोन्ही नाद मिनले[१७] । तेथ त्रैलोक्य बैधिरीभूत[१८] जाहलें । जैसें आकाश कां पडिलें । तुटोनियां ॥ २८ ॥ घडघडीत अंबर । उचंबळत सागर । क्षोभलें[१९] चराचर । कांपत असे ॥ २९ ॥ तेणें महाघोषगजरें । दुमदुमिताती गिरिकंदरें[२०] । तंव दळामाजि रणतुरें[२१] । आस्फुरिलीं ॥ १३० ॥

ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।
सहसैवाभ्यहन्यंत स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥ १३ ॥

[ततः शंखाश्चेति] उदंड सैंघ[२२] वाजतें । भयानकें खोंखातें[२३] । महाप्रळय जेथें । ¶धोकडांसीं[२४] ॥३१॥ भेरी निशाण[२५] मांदळे[२६] । शंख कोंहळा[२७] भोंगळ[२८] । [सहसैवेति] आणि भयासुर रणकोल्हाळ । सुभटांचे[२९] ॥ ३२ ॥ आवेशें भुजा त्रोहाटिती[३०] ।

---

* सज्ज. † आवरणी. ‡ तेणें ते. § राजाचिया. ¶ धाकडांसी.

---

१ दांडगा. २ बोलणें. ३ टाकिलें. ४ एकत्र, सज्ज. ५–२१८७० रथ, तितकेच हत्ती, हत्तींचे तिप्पट घोडे, पांचपट पायदळ=२१८७००. ६ युद्धस्थानीं. ७ वांटणी. ८ दहा हजार योद्धयांशीं एक युद्ध करणारा. ९ आज्ञेखालीं. १० व्यवस्था ठेवा. ११ सर्व. १२ वास्तविक, खरा. १३ भीष्म. १४ सिंहनाद नांवाच्या शंखाची गर्जना. १५ सामावत नाहीं. १६ प्रतिध्वनी. १७ बळें. १८ बाजविला. १९ एकत्र झाले. २० वह्न्यासारखें. २१ स्थावर जंगम. २२ पर्वतांच्या गुहा. २३ रणवाद्यें. २४ बहुतप्रकारचीं वाजत्रें. २५ कर्कश. २६ बळवानांस. २७ नौबद. २८ ध्वज. २९ रणवाद्यविशेष. ३० झांज. ३१ तुतारी. ३२ योद्धयांचे. ३३ थोपटती.

विसणेले[1] हांका देती । जेथ महामद भद्रजाती[2] । आवरती ना ॥ ३३ ॥ तेथ भेडांची[3] कवण मात । *कांचेया केर[4] फिटत । जेणें दचकला कृतांत । आंग नेघे ॥ ३४ ॥ एकां उभयांचि प्राण गेले । चांगांचे[5] दांत बैसले । बिरुदाचे[6] दादुले[7] । हिंवताती[8] ॥ ३५ ॥ [सशब्दस्तुमुलोऽभवदिति] ऐसा अद्भुत तूरबंबाळ । ऐकोनि ब्रह्मा व्याकुळ । देव ह्मणती प्रळयकाळ । वोढवला आजि ॥ ३६ ॥

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ ।
माधवः पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥ १४ ॥
पांचजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः ।
पौंड्रं दध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदरः ॥ १५ ॥
अनंतविजयं राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिरः ।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥ १६ ॥

[तत इति] ऐसी स्वर्गीं मात । देखोनि तो आकांत । तंव पांडवदळाआंत । वर्तलें कायी ॥ ३७ ॥ [श्वेतैर्हयैर्युक्ते] हो कां निजसार[9] विजयाचें । कीं तें भांडार[10] महातेजाचें । जेथ गरुडाचिये जांवळिचे[11] । कांतले[12] चान्ही ॥ ३८ ॥ [महति स्यंदने इति] कीं पाखांचा मेरु जैसा । रहंवरें[13] मिरवतसे तैसा । तेजें कोंदाटलिया[14] दिशा । जयाचेनि ॥ ३९ ॥ [माधवः पांडवश्चैव] जेथ अश्ववाहक[15] आपण । वैकुंठींचा राणा जाण । तया रथाचे गुण । काय वर्णूं ॥१४०॥ ध्वजस्तंभावरी वानर[16] । तो मूर्तिमंत शंकर । सारथी शार्ङ्गधर । अर्जुनेसी ॥१४१॥ देखा नवल[17] तया प्रभूचें । अद्भुत प्रेम भक्ताचें । †जें सारथ्यपण पार्थाचें । करीत असे ॥ ४२ ॥ [पांचजन्यं हृषीकेशः] पांइक[18] पाठिसीं घातला । आपण पुढां राहिला । तेणें पांचजन्य आस्फुरिला[19] । अवलीळाचि[20] ॥ ४३ ॥ परी तो महाघोष थोरु ॥ गर्जत असे गंहिरु[21] । जैसा उदेला लोपी दिनकरु । नक्षत्रांतें ॥ ४४ ॥ तैसे तूर[22] बंबाळ भंवते । कौरवदळीं गाजत होते । ते हारपोनि नेणों केउते । गेले तेथ ॥ ४५ ॥ [देवदत्तं धनंजयः] तैसाचि देखें येरें[23] । निनादें ‡अतिगजरें । देवदत्त धनुर्धरें[24] । आस्फुरिला[25] ॥ ४६ ॥ ते दोनी शब्द अचाट[26] । मिनले[27] एकवट । तेथ ब्रह्मकटाह[28] शतकूट[29] । हों पाहत असे ॥ ४७ ॥ [पौंड्रं दध्मौ इत्यर्धं] तंव भीमसेन विर्सणेला[30] । जैसा महाकाळ खवळला । तेणें पौंड्र आस्फुरिला । महा-

* काचया. † जे सारथ्य° ‡ अतिगहिरें.

१ सरसावून. २ हत्ती. ३ भित्र्यांची. ४ कचे तर पाचोळ्यासारखे उडाले. ५ उभे असतां. ६ व्रीद बांधलेले असे थोर. ७ कांपतात. ८ वाद्यध्वनी. ९ बरोबरीचे, सोयरिकेचे. १० जोडले. ११ उत्तम रथ. १२ भरल्या. १३ सारथि. १४ मारुति. १५ आश्चर्य. १६ सेवक. १७ वाजाविला. १८ सहज. १९ गंभीर. २० सूर्य. २१ वाद्यगजर. २२ कोटें. २३ अर्जुनानें. २४ अद्भुत. २५ मिळाले. २६ ब्रह्मांड. २७ शंभर तुकडे. २८ आवेशला.

शंख ॥ ४८ ॥ तो महाप्रळयजलधर । जैसा *गडगडित गंहिर । [अनंतविजयमित्यर्धं] तंव अनंतविजय युधिष्ठिर । अस्फुरित असे ॥ ४९ ॥ [नकुलः सहदेवश्चेत्यर्धं] नकुळें सुघोष । सहदेवें मणिपुष्पक । जेणें नादें अंतक । गजबजला ठाके ॥ १५० ॥

काश्यश्च परमेष्वासः शिखंडी च महारथः ।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥ १७ ॥
द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।
सौभद्रश्च महाबाहुः शंखान्दध्मुः पृथक् पृथक् ॥ १८ ॥
स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥ १९ ॥

[काश्यश्चेति] तेथ भूपती होते अनेक । द्रुपद द्रौपदेयादिक । हा काशीपति देख । महाबाहू ॥ ५१ ॥ [सौभद्रश्चेति] तेथ अर्जुनाचा सुत । [सात्यकिश्चापराजितः] सात्यकि अपराजित । [धृष्टद्युम्नः] धृष्टद्युम्न नृपनाथ । [शिखंडी चेति] शिखंडी हन ॥ ५२ ॥ [विराटश्च] विराटादि नृपवर । जे सैनिक मुख्य वीर । [शंखान्दध्मुः पृथक् पृथक्] तिहीं नानाशंख । निरंतर अस्फुरिले ॥ ५३ ॥ [स घोषः–तुमुल इति] तेणें महाघोषनिर्घातें । [नभश्च पृथिवीं चैव] शेष कूर्म अवचितें । गजबजोनि भूभारातें । सांडूं पाहाती ॥ ५४ ॥ तेथ तिन्ही लोक डळमळित । मेरु मांदार †आंदोलित । समुद्रजळ उसळत । कैलासवरी ॥ ५५ ॥ पृथ्वीतळ उलथों पहात । आकाश असे आसुडत । तेथ सैंडा होत । नक्षत्रांचा ॥ ५६ ॥ सृष्टि गेलीरे गेली । देवां मोकळवादी जाहली । ऐसी एक टाळी पिटिली । सत्यलोकीं ॥ ५७ ॥ दिहांची दिन थोकेला । जैसा प्रळयकाळ मांडला । तैसा हाहाकार जाहाला । तिहीं लोकीं ॥ ५८ ॥ तें देखोनि आदिपुरुष विस्मित । ह्मणे झेणें होय पां अंत । मग लोपिला अद्भुत । संभ्रम तो ॥ ५९ ॥ ह्मणोनि विश्व सांवरलें । एऱ्हवीं युगान्त होतें वोडवलें । ‡जैं महाशंख आस्फुरिले । कृष्णादिकीं ॥ १६० ॥ तो घोष तरी उपसंहरेला । [व्यनुनादयन्] परी पडिसाद होता राहिला । [धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्] तेणें दळभार विध्वंसिला । कौरवांचा ॥ ६१ ॥ जैसा गजघटाआंत । सिंह-

* घडघडिला. † मंदर. ‡ जैं वेळीं.

१ प्रलयकालींचा मेघ. २ गंभीर. ३ यम. ४ प्रतिविंध्यादि. ५ अभिमन्यु. ६ ही, आणखी. ७ धक्क्यानें. ८ झोके घेतात. ९ हालत. १० वर्षाव. ११ आश्रयरहित. १२ ब्रह्मलोकीं. १३ दिवसासच. १४ गुप्त झाला. १५ ब्रह्मा. १६ कदाचित्. १७ आवेश. १८ जगत्. १९ लय पावला. २० प्रतिध्वनि. २१ हत्तींच्या कळपांत.

लीलें[1] विदारित । तैसा हृदयांतें भेदित । कौरवांचिया ॥ ६२ ॥ तो गाजत जंव आइकती । तंव उभेचि हियें[2] घालिती । एकमेकांतें ह्मणती । सावध रे सावध ॥ ६३ ॥

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः ।
प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः ॥ २० ॥

[अथ व्यवस्थितानिति] तेथ बळेंप्रौढीपुरते[3] । महारथी वीर होते । तिहीं पुनरपि दळातें । आवरिलें ॥ ६४ ॥ मग सैरिसेपणें *उठावले । दुर्णवटोनि[4] उचलले । तया दंडीं[5] क्षोभलें । लोकत्रय ॥ ६५ ॥ [प्रवृत्ते शस्त्रसंपाते] तेथ बाणवरी[6] धनुर्धर । वर्षताति निरंतर । जैसे प्रळयांत जलधर । अनिवार कां ॥६६॥ [दृष्ट्वा] ते देखिलिया अर्जुनें । संतोष घेऊनि मनें । मग संभ्रमें[9] †सेने । दिठी[10] घालीतसे ॥ ६७ ॥ [व्यवस्थितान्-धार्तराष्ट्रान्] तंव संग्रामीं[11] सज्ज[12] जाहले । सकळ कौरव देखिले । [धनुरुद्यम्य पांडवः] तंव लीला धनुष्य उचलिलें । पांडुकुमरें ॥ ६८ ॥

हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।
अर्जुन उवाच–**सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥ २१ ॥**

[हृषीकेशमिति] ते वेळीं ‡अर्जुन ह्मणतसे देवा । आतां झडकरी रथ पेलावा[13] । [सिनयोरिति] नेऊनि मध्यें घालावा । दोहीं दळां ॥ ६९ ॥

यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् ।
कैर्मया सह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे ॥ २२ ॥
योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः ।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३ ॥

[यावदेतानित्यर्ध] जंव मी नावेक[14] । हे सकळ वीर सैनिकें[15] । न्याहाळीन[16] अशेख[17] । जुंझते जे ॥ १७० ॥ [य एतेऽत्र समागताः] एथ आले असती[18] आघवे । [कैर्मयेत्यर्ध] परी कवणेंसीं म्यां जुंझावें । हें रणीं लागे पहावें । ह्मणऊनियां ॥ ७१ ॥ [धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेः] बहुतकरूनि कौरव । हे आतुर[19] दुःस्वभाव । वांटिवांवीण[20] हांव[21] । बांधिती जुंझीं ॥७२॥ [योत्स्यमानानवेक्षेऽहं] जुंझाची आवडी

---

* एकवटले. † दिठी सेने ।. ‡ ते वेळीं म्हणतसे.

---

१ सहज. २ धैर्य, हृदय. ३ बलवत्तेनें पूर्ण. ४–१०००० शीं योद्धा. ५ सिद्धतेनें. ६ दोहींकडून. ७ सैन्ययोगानें. ८ बाणावर बाण. ९ त्वरेनें. १० दृष्टी. ११ युद्धांत. १२ सिद्ध. १३ न्यावा. १४ क्षणभर. १५ योद्धे. १६ पाहीन. १७ संपूर्ण. १८ सर्व. १९ उतावळे. २० पराक्रमावांचून. २१ डौल.

धरिती । परी संग्रामीं धीर[1] नव्हती । हें सांगोनि रायाप्रती । काय संजयो ह्मणे ॥ ७३ ॥

संजय उवाच–एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ।
सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥ २४ ॥

[एवमित्यर्ध] आइका अर्जुन इतुकें बोलिला । [सेनयोरिति] तंव श्रीकृष्णें रथ पेलिला[2] । दोहीं सैन्यांमाजि केला । उभा तेथें ॥ ७४ ॥

भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम् ।
उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥ २५ ॥
तत्रापश्यत् स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् ।
आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ॥ २६ ॥
श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ।
तान्समीक्ष्य स कौंतेयः सर्वान्बंधूनवस्थितान् ॥ २७ ॥

[भीष्मेत्यर्ध] जेथ भीष्मद्रोणादिक । जैवळिकेचि[3] सन्मुख । पृथिवीपति[4] आणिक । *बहु आहाती[5] ॥ ७५ ॥ तेथ स्थिर करूनियां रथ । अर्जुन असे पाहत । तो दळभार[6] समस्त । †संभ्रमेंसीं[7] ॥ ७६ ॥ [उवाचेति] मग देवा ह्मणे देख देख । हे गोत्र[8] गुरु अशेख[9] । तंव कृष्णा मनीं नावेक[10] । विस्मो[11] जाहला ॥ ७७ ॥ तो ‡आपणयां[12] आपण ह्मणे । एथ कायी कवण जाणे । हें मनीं धरिलें येणें । परी कांहीं आश्चर्य असे[13] ॥ ७८ ॥ ऐसी पुढील से[14] घेत । तो सहजें जाणे हृदयस्थ[15] । परि उगा असे निवांत । तिये वेळीं ॥७९॥ [तत्रेत्यर्ध] तंव तेथ पार्थ सकळ । पितृ पितामह केवळ । [आचार्यानिति] गुरु बंधु मातुळ । देखता जाहला ॥ १८० ॥ इष्ट मित्र[16] आपुले । कुमर जन देखिले । हे सकळ असती आले । तयांमाजी ॥ ८१ ॥ [श्वशुरानिति] सुहृज्जन[17] सासरे । [सर्वानिति] आणीकही सखे सोइरे । कुमर पौत्र[18] धनुर्धरें[19] । देखिले तेथ ॥ ८२ ॥ जयां उपकार होते केले । कीं आपदीं[20] जे रक्षिले । हें असो वडिल §धाकुले[21] । आदिकरूनी ॥ ८३ ॥ [सेनयोरिति] ऐसें गोत्रचि दोहीं दळीं । ¶उदित[22] जालें असे केळीं[23] । [तानिति] हें अर्जुनें तिये वेळीं । अवलोकिलें ॥ ८४ ॥

कृपया परयाऽविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ।

[कृपया परयाऽविष्टः] तेथ मनीं गजबज जाहली । आणि आपैसी[24] कृपा

---

* बहुत. † संभ्रमेंसी. ‡ अपणपयां § धाकुटे. ¶ उद्यत.

---

१ गंभीर. २ लोटिला. ३ नातेवाईक. ४ राजे. ५ आहेत. ६ सेना. ७ त्वरेनें. ८ स्वकुळांतील. ९ सर्व. १० क्षणभर. ११ आश्चर्य. १२ आपणाशीं. १३ स्मृति, आठवण. १४ अंतरात्मा, मनोगत. १५ मित्र. १६ नातू. १७ संकटसमयीं. १८ लहान. १९ उत्सुक. २० कलहीं. २१ आपोआप.

*उपजली । तेणें अपमानें निघाली । वीरवृत्ति ॥ ८५ ॥ जिया उत्तमकुळींचिया होती । आणि गुणलावण्य आथि । तिया आणिकीतें न साहती । सुतेजपणें ॥ ८६ ॥ नविये आवडिचेनि भरें । कामुक निजवनिता विसरे । मग पाडेंवीण अनुसरे । भ्रमला जैसा ॥ ८७ ॥ कीं तपोबळें ऋद्धी । पातलिया भ्रंशे बुद्धी । †मग तया विरक्तासिद्धी । ‡नाठवे ती ॥ ८८ ॥ तैसें अर्जुना तेथ जाहालें । असतें पुरुषत्व गेलें । जे अंतःकरण दिधलें । कारुण्यासी ॥ ८९ ॥ देखा मंत्रज्ञ बरळ जाय । तेथ कां जैसा संचार होय । तैसा तो धनुर्धर महामोहें । आकळिला ॥ १९० ॥ ह्मणऊनि असता धीर गेला । हृदया §द्रव आला । जैसा चंद्रें ¶कळीं शिवतला । सोमकांत ॥ ९१ ॥ तयापरी पार्थ । अतिस्नेहें मोहित । [विषीदन्निदमब्रवीत्] मग सखेद असे बोलत । श्रीअच्युतेसीं ॥ ९२ ॥

अर्जुन उवाच–दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ॥ २८ ॥
सीदंति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥ २९ ॥
गांडीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते ।
न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ॥ ३० ॥

[अर्जुन उवाच–दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण] तो ह्मणे अवधारीं देवा । म्यां पाहिला हा मेळावा । तंव गोत्रवर्ग आघवा । देखिला एथ ॥ ९३ ॥ [युयुत्सुं समुपस्थितं] हे संग्रामीं $ उदित । जाहाले असती कीर समस्त । पण आपणपेयां उचित । केविं होय ॥ ९४ ॥ येणेंनांवेंचि नेणों कायी । मज आपणपें सर्वथा नाहीं । मन बुद्धी ठायीं । स्थीर नोहे ॥ ९५ ॥ [वेपथुश्च शरीरे मे] देखें देह कांपत । [मुखं च परिशुष्यति] तोंड असे कोरडें होत । विकळता उपजत । गात्रांसी ॥ ९६ ॥ [रोमहर्षश्च जायते] सर्वांगा कांटाळा आला । [त्वक् चैव परिदह्यते] अति संताप उपजला । [गांडीवं स्रंसते हस्तात्] तेथें बेंबळें हात गेला । गांडीवाचा ॥ ९७ ॥ तें न धरतचि निघेलें । परि नेणेचि हातोनि पडिलें । ऐसें हृदय असे व्यापिलें ।

* कृपा आली. † मग विरक्तता, विरक्तां. ‡ आठवेना. § द्राव. ¶ करीं शिंपिला. $ उद्यत.

१ तो अपमान न साहून वीरवृत्ति (शौर्य) अर्जुनाला सोडून निघाली. २ ज्या. ३ सौंदर्य. ४ आहे. ५ त्या. ६ तेजोधिक्यानें. ७ नव्या. ८ विषयी. ९ आपली स्त्री. १० योग्यतेवांचून. ११ तपश्चर्येच्या जोरानें. १२ संप्राप्ति. १३ प्राप्त झाली असतां. १४ वैराग्य. १५ असलेलें. १६ ममतेस. १७ भ्रमिष्ट, मंत्रोच्चारांत प्रमाद. १८ बाधा. १९ आकर्षला. २० दयेचा पाझर. २१ कळांनीं, किरणांनीं. २२ स्पर्शिला. २३ चंद्रकांतमणि. २४ दुःखयुक्त. २५ कृष्णाशीं. २६ ऐक. २७ समुदाय. २८ सर्व. २९ उद्युक्त. ३० निश्चयें. ३१ आपणालाच. ३२ यामुळें. ३३ व्याकुळपणा. ३४ कांटा. ३५ ढिला. ३६ निसटलें.

मोहें येणें ॥ ९८ ॥ जें वज्रापासोनि[1] कठिण । दुर्धर अतिदारुण । तयाहून असाधारण[2] । हें स्नेहनवल ॥ ९९ ॥ जेणें संग्रामीं हर[3] जिंतिला[4] । निवातकवचांचा ठाव फेडिला[5] । तो अर्जुन मोहें कवळिला[6] । क्षणामाजी ॥ २०० ॥ *जैसें भ्रमर भेदी कोडें[7] । भलतैसें काष्ठ कोरडें । परि †कळिकेमाजि[8] सांपडे । कोंवळिये ॥ १ ॥ तेथ उत्तीर्ण[9] होईल प्राणें । परि तें कमळदळ चिरूं नेणे । तैसें कठिण कोवळेपणें । स्नेह[10] देखा ॥ २ ॥ हे आदिपुरुषाची माया । ब्रह्मेयांही[11] नयेचि[12] आया । ह्मणऊनि भुलविला ऐकें राया[13] । संजयो ह्मणे ॥ ३ ॥ [न च शक्नोम्यवस्थातुं] अवधारीं मग तो अर्जुन । देखोनि सकळ स्वजन । विसरला अभिमान । संग्रामींचा ॥ ४ ॥ कैसी नेणों सदयता[14] । उपनली[15] तेथ चित्ता । मग ह्मणे कृष्णा आतां । नासिजे[16] एथ ॥ ५ ॥ [भ्रमतीव च मे मनः] माझें अतिशयें मन व्याकुळ । [सीदंति मम गात्राणि] होतसे वाचा बरळ[17] । जे वधावे हे सकळ । येणेंनांवें[18] ॥ ६ ॥

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ।
न च श्रेयोऽनु पश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥ ३१ ॥

[हत्वा स्वजनमाहवे] या कौरवां जरी वधावें । तरी युधिष्ठिरादिकां ‡कां न वधावें । हे येरयेर[19] आघवे[20] । गोत्रज आमुचे ॥ ७ ॥ [न च श्रेयोऽनु पश्यामि] ह्मणोनि जळो हें जुंझें[21] । प्रत्यया[22] नये मज । एणें काय काज । महापापें ॥ ८ ॥ [निमित्तानीत्यर्थः] देवा बहुतांपरी पाहतां । एथ वोखटें होईल[23] जुंझतां । §वरी कांहीं चुकवितां । लाभ आंथी[24] ॥ ९ ॥

न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ।
किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ॥ ३२ ॥
येषामर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च ।
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ॥ ३३ ॥

[न कांक्षे विजयं कृष्ण] तया विजयवृत्ती[25] कांहीं । मज सर्वथा काज[26] नाहीं । [न च राज्यं] एथ राज्य तरी कायी । ¶पावोनियां ॥ २१० ॥ या सकळांतें वधावें । [किं भोगैः] मग जे भोग भोगावे । ते जळोत आंधवे[27] । पार्थ ह्मणे ॥ ११ ॥ [सुखानि च] तेणें सुखेंवीण होईल । तें भलतैसें सोहिजेल[28] । वरि

* जैसा. † कमळकळिके. ‡ युधिष्ठरादिकां न. § वर. ¶ हें पाहुनियां.

१ वज्रापेक्षां. २ मोठें. ३ शंकर. ४ जिंकिला. ५ नाहींसा केला. ६ आवडीनें. ७ कोणतेंही. ८ कळींत. ९ मुक्त. १० ममता. ११ ब्रह्मदेवाला. १२ आवांक्यांत, आटोक्यांत. १३ धृतराष्ट्रा. १४ दयाभूतपणा. १५ उपजली. १६ न राहावें. १७ भ्रमिष्ट. १८ यामुळें. १९ एकमेक. २० सर्व. २१ युद्ध. २२ अनुभवाला, प्रतीतीस. २३ वाईट. २४ आहे. २५ जयाकांक्षा. २६ कार्य. २७ कोणतेंही. २८ सोसवेल.

जीवितही वेंचिजेल । याचिलागीं ॥ १२ ॥ [किं नो राज्येन गोविंद] परी यांसी घात कीजे । मग आपण राज्यसुख भोगिजे । हें स्वप्नींही मन माझें । करूं न शके ॥ १३ ॥ [जीवितेन वा] तरी आह्मीं कां जन्मावें । कवणालागीं जियावें । *जरी वडिलां यां चिंतावें । विरुद्ध मनें ॥ १४ ॥ पुत्रातें इच्छी कुळ । तयाचें कायि हेंचि फळ । जे निर्दळिजे केवळ । गोत्र आपुलें ॥ १५ ॥ हें मनींचि केविं धरिजे । आपण †वज्राचेंया होइजे । वरि घडे तरी कीजे । भलें इयां ॥ १६ ॥ [यिषामर्थे कांक्षितं नो] आह्मीं जें जें जोडावें । तें समस्तीं इहीं भोगावें । हें जीवितही ‡उपकारावें । काजीं इयांच्या ॥ १७ ॥ आह्मी दिगंतींचे भूपाळ । विभांडूनि सकळ । मग संतोषविजे कुळ । आपुलें जें ॥ १८ ॥ [त इमेऽवस्थिता युद्धे] तेचि हे समस्त । परि कैसें कर्म विपरीत । जे जहाले असती उद्यत । जुंझावया ॥ १९ ॥ [प्राणांस्त्यक्त्वा धनानि च] अंतोरियां कुमरें । सांडोनियां भांडारें । शस्त्राग्रीं जिव्हारें । ओरोपुनी ॥ २२० ॥ ऐसियांतें कैसेनि मारूं । कवणावरी शस्त्र धरूं । निजहृदया करूं । घात केवीं ॥ २१ ॥

आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ।
मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबंधिनस्तथा ॥ ३४ ॥

[आचार्या इति] हे नेणसी तूं कवण । परि पैलें भीष्म द्रोण । जयांचे उपकार असाधारण । आह्मां बहुत ॥ २२ ॥ [मातुला इति] एथ शौलक सासरे मातुळे । आणि बंधु कीं हे सकळ । पुत्र नातू केवळ । इष्टही असती ॥ २३ ॥ अवधारीं अति जिवळिकेचे । हे सकळही सोयरे आमुचे । म्हणोनि दोष आंथि वाचे । बोलतांचि ॥ २४ ॥

एतान्न हंतुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ॥ ३५ ॥

[एतान्नेति] हे वरी भलतें करितु । आतांचि एथें मारितु । परी आपण मनें घातु । न चिंतावा ॥ २५ ॥ [अपि त्रैलोक्येति] त्रैलोक्यींचें अनकळित । जरी राज्य §होईल प्राप्त । तरी हें अनुचित । नाचरें मी ॥ २६ ॥ जरी आजि एथ ऐसें

---

* जें वडिलयां. † वज्राऐसेया. ‡ उपेंगा जावें. § जोडेल येथ.

१ जीवही जरी खर्चिला. २ करावा. ३ जगावें. ४ संहारावें. ५ वज्रासारखा कठोर. ६ यांस. ७ यांनीं. ८ उपयोगीं लावावें. ९ यांच्या. १० सर्व दिशांचे. ११ राजे. १२ जिंकून. १३ सिद्ध. १४ स्त्रिया. १५ मुलें. १६ खजिने. १७ अंतःकरणें, आपले जीव. १८ ठेवून. १९ कसा. २० पलीकडील. २१ सामान्य नव्हेत. २२ मेहुणा, बायकोचा भाऊ. २३ जवळचे. २४ आहे. २५ पुनः. २६ कराते. २७ उपद्रवरहित. २८ करणार नाहीं.

कीजे । तरी कवणाच्या मनीं उरिजे । सांगें मुख केवीं पाहिजे । तुझें कृष्णा ॥ २७ ॥

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ।
पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ॥ ३६ ॥

[निहत्येत्यर्धं] जरी वध करीं *गोत्रजांचा । तरी वैसौटा होऊनि दोषांचा । मज जोडिलासि तूं हातींचा । दूर होसी ॥ २८ ॥ [पापमेवाश्रयेदिति] कुळहरणीं पातकें । तियें आंगीं जडती अशेखें । तये वेळीं तूं कवणें कें । देखावासी ॥२९॥ जैसा उद्यानामाजि अनळ । संचरला देखोनि प्रबळ । मग क्षणभरी कोकिळ । स्थिर नोहे ॥ २३० ॥ कां सकर्दम सरोवर । अवलोकुनी चकोर । न सेवित अव्हेर । करूनि निघे ॥ ३१ ॥ तयापरी तूं देवा । मज झकऊन नयेसि †मावा । जरी पुण्याचा वोलावा । नाशिजैल ॥ ३२ ॥

तस्मान्नार्हा वयं हंतुं धार्तराष्ट्रान्सबांधवान् ।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ॥ ३७ ॥

[तस्मान्नार्हा वयं हंतुं] म्हणोनि मी हें न करीं । इये संग्रामीं शस्त्र न धरीं । हें किडाळ बहुतीं परीं । दिसतसे ॥ ३३ ॥ तुजसीं अंतराय होइल । मग सांगें आमुचें काय उरेल । तेणें ‡दुःखें हियें फुटेल । तुजवीण कृष्णा ॥ ३४ ॥ [धार्तराष्ट्रान्सबांधवान्] म्हणऊनि कौरव हे वधिजती । [सुखिनः स्याम माधव] मग आह्मी भोग भोगिजती । [स्वजनं हि कथं हत्वा] हे असो मात अर्धडती । अर्जुन म्हणे ॥ ३५ ॥

यद्यप्येते न पश्यंति लोभोपहतचेतसः ।
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥ ३८ ॥
कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९ ॥

[यद्यप्येते इति] हे अभिमानमदें भुलले । जन्हीं पां संग्रामा आले । [कथं न ज्ञेयमिति] तन्हीं §आह्मां हित आपुलें । जाणावें लागे ॥ ३६ ॥ हें ऐसें कैसें करावें । [कुलक्षयकृतं इति] जे आपुले आपण ¶मारावें । जाणतजाणतांचि से-

---

* गोत्राचा. † माधवा. ‡ तेणें दुःखें फुटेल । हियें माझें. § आह्मीं. ¶ मरावें.

---

१ उरावें. २ आश्रयस्थान. ३ सांपडलेला. ४ कुलाच्या घातानें. ५ सर्व. ६ कोठें. ७ बागेंत. ८ अग्नि. ९ अत्यंत. १० चिखलानें युक्त. ११ तिरस्कार. १२ टकवून. १३ मायेनें. १४ ओल. १५ हिणकट. १६ वियोग. १७ हृदय. १८ न घडणारी. १९ उन्मत्तपणानें. २० समजूनउमजून.

वावें । [1]काळकूट ॥ ३७ ॥ [कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिरिति] [2]हों जी मार्ग चालतां । पुढां सिंह [3]जोहाला अवचितां । तो तंव चुकवितां । लाभ [4]आथि ॥ ३८ ॥ असता प्रकाश सांडावा । मग अंधकूप [5]आश्रावा । तरी तेथ कवण देवा । लाभ सांगें ॥ ३९ ॥ कां समोर *आग्नि देखोनी । जरी न [6]वंचिजे [7]वोसंडोनी । तरी †क्षणीं एका कवळुनी । जाळूं सके ॥ २४० ॥ [पापादस्मान्निवर्तितुं] तैसे दोष हे [8]मूर्त । अंगीं [9]वोजों असती पाहात । हें जाणतांही केवि [10]एथ । प्रवर्तावें ॥ ४१ ॥ ऐसें पार्थ तिये अवसरीं । ह्मणे देवा अवधारीं । या [11]कल्मषाची थोरी । सांगेन तुज ॥ ४२ ॥

कुलक्षये प्रणश्यंति कुलधर्माः सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥ ४० ॥

[कुलक्षये इति] जैसें काष्ठें काष्ठ [12]मथिजे । तेथ [13]वन्हि एक उपजे । तेणें [14]काष्ठजात जाळिजे । [15]प्रज्वळलेनी ॥ ४३ ॥ तैसा गोत्रींचि परस्परें । जरी वध घडे मत्सरें । तरी तेणें ‡महादोषें घोरें । कुळचि नाशे ॥ ४४ ॥ [धर्मे नष्टे इति] ह्मणवूनि एणें पापें । वंशजधर्म लोपे । मग अधर्मचि आरोपे । कुळामाजी ॥ ४५ ॥

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः ।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥ ४१ ॥

[अधर्माभिभवादिति] एथ सारासार विचारावें । कवणें काय आचरावें । आणि [16]विधिनिषेध [17]आघवे । [18]पौरुषति ॥ ४६ ॥ असता दीप दवडिजे । मग अंधकारीं [19]राहाटिजे । तरी उजूचि कां §अडखुळिजे । जयापरी ॥ ४७ ॥ तैसा कुळीं कुळक्षय होय । तये वेळीं तो [20]आद्यधर्म जाय । मग [21]आन कांहीं आहे । पापावांचुनी ॥ ४८ ॥ जैं [22]यमनियमें [23]ठाकती । तेथ इंद्रियें [24]सैरा ¶राहाटती । ह्मणऊनि [25]व्यभिचार घडती । कुळस्त्रियां ॥ ४९ ॥ [स्त्रीषु दुष्टास्विति] उत्तम अधमीं संचरती । ऐसे [26]वर्णावर्ण मिसळती । तेथ समूळ [27]उपडती ।

---

* आगी. † क्षणा. ‡ दोषें । कुळचि. § आडळिजे. ¶ विचरती.

---

१ कालकूट नांवाचें विष. २ अहोजी. ३ आळा. ४ अकस्मात्. ५ आहे. ६ अंधारयुक्त विहीर. ७ स्वीकारावा. ८ न जाइजे. ९ टाकून. १० प्रत्यक्ष. ११ लागों. १२ कसें. १३ पातकाची. १४ घांसावें. १५ अग्नि. १६ लांकडांचा समुदाय. १७ प्रदीप्त झाल्यानें. १८ एका कुळांत. १९ कुलधर्म. २० कर्तव्याकर्तव्य. २१ सर्व. २२ नष्ट होती, खुंटती. २३ फिरावें. २४ अनादि, मुख्य. २५ अन्य. २६ यम=मनाचें आकलन, नियम=इंद्रियांचें आकलन. २७ राहती. २८ स्वेच्छ. २९ पापाचरण. ३० ब्राह्मणशूद्रादि परस्पर. ३१ उच्छेद पावती.

जातिधर्म ॥ २५० ॥ जैसी चोहटाचिये बळी । *पाविजे सैरा काउळीं । तैसीं महापापें कुळीं । संचरती ॥ ५१ ॥

संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ।
पतंति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः ॥ ४२ ॥

[संकर इत्यर्धे] मग कुळा तया अशेखा । आणि कुळघातकां । येरयेरां नरका । जाणें आथि ॥ ५२ ॥ देखें वंशवृद्धि समस्त । यापरी होय पतित । [पतंति पितर इति] मग वोवांडिती स्वर्गस्थ । पूर्वपुरुष ॥ ५३ ॥ जेथ नित्यादि क्रिया ठाके । आणि नैमित्तिक †क्रिया पारुखे । तेथ कवणा तिळोदकें । कवण अर्पी ॥ ५४ ॥ तरी पितर काय करिती । कैसेनि स्वर्गी वसती । म्हणोनि तेही येती । कुळापासीं ॥ ५५ ॥ जैसा नखाग्रीं व्याळ लागे । तो शिखांत व्यापी वेगें । तेवीं आब्रह्म कुळ अवघें । आप्लविजे ॥ ५६ ॥

दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः ।
उत्साद्यंते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ॥ ४३ ॥
उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।
नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥ ४४ ॥
अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।
यद्राज्यसुखलोभेन हंतुं स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥

[दोषैरिति] देवा अवधारीं आणीक एक । एथ घडे पहा पातक । जे संगदोषें हा लौकिकें । ‡भ्रंशे पडे ॥ ५७ ॥ जैसा घरीं आपुला । वन्हिवसें §अग्नि लागला । तो आणिकांहीं प्रज्वळिला । जाळूनि घाली ॥ ५८ ॥ [उत्साद्यंत इति] तैसिया तया कुळसंगती । जे जे लोक वर्तती । तेही ¶बाधा पावती । निमित्तें येणें ॥ ५९ ॥ [उत्सन्नेति] तैसें नाना दोषें सकळ । ||अर्जुन म्हणे तें कुळ । [नरके इति] मग महाघोर केवळ । निरय भोगी ॥ २६० ॥ पडिलिया तिये ठायीं । मग कल्पांतींही $उकल नाहीं । येसणें पतन कुलक्षयीं । अर्जुन म्हणे ॥ ६१ ॥ [अनुशुश्रुम] देवा हें विविध कानीं ऐकिजे । [अहो इति] परि अद्भुनिवरी त्रास नुपजे । हृदय वज्राचें हें काय कीजे । अवधारीं पां

* पाविती. † कर्म. ‡ भ्रंश पावे. § वन्हि. ¶ बाधु. || आप्लविजे तें. $ उघड.

१ चार वाटा एकत्र होतात तो, चव्हाठा. २ सहज. ३ कावळ्यांनीं. ४ अशेषा, सर्वांला. ५ परस्परांला. ६ आहे. ७ नष्ट. ८ पडतात, ढकलतात. ९ नित्य स्नानसंध्यादि कर्म. १० राहते. ११ पर्व आदि उद्देशून कर्म. १२ बंद होते. १३ तर्पण. १४ सर्प. १५ शेंडीपर्यंत. १६ बुडविजे. १७ लोकाचार. १८ नाश पावे. १९ माजघरीं. २० पीडा. २१ भयंकर. २२ नरक. २३ कोण्याही कल्पांत. २४ सुटका. २५ एवढें, असें. २६ नानाप्रकारें. २७ उद्भवत नाहीं.

॥ ६२ ॥ [यदिति] अपेक्षिजे राज्यसुख । जयालागीं तें तंव क्षणिक । ऐसें जाणतांही दोखें । अव्हेरूं ना ॥ ६३ ॥ जे हे वडिल सकळ आपुले । वधावया दिठी सूंदले । सांग पां काय *थेंकुलें । घडलें आह्मा ॥ ६४ ॥

यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥ ४६ ॥

[यदीति] आतां यावरी जें जियावें । तयापासूनि हें वरवें । जे शस्त्रें सांडूनि साहावे । बाण यांचे ॥ ६५ ॥ [धार्तराष्ट्रा इति] तयावरी होय जितुकें । तें मरणही वरि निकें । परी येणें कल्मषें । चाडें नाहीं ॥ ६६ ॥ ऐसें देखून सकळ । अर्जुनें आपुलें कुळ । मग म्हणे राज्य तें केवळ । निरयभोग ॥ ६७ ॥

संजय उवाच–**एवमुक्त्वार्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ।**
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥ ४७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादेऽर्जुनविषादयोगो नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

[एवमुक्त्वार्जुनः संख्ये] ऐसें तिये अवसरीं । अर्जुन बोलिला समरीं । संजय ह्मणे अवधारीं । धृतराष्ट्रातें ॥ ६८ ॥ [शोकसंविग्नमानसः] मग अत्यंत उद्वेगला । न धरत गहिंवर आला । [रथोपस्थ उपाविशत्] तेथ उडी घातली खालां । रथौनियां ॥ ६९ ॥ जैसा राजकुमर पैदच्युत । सर्वथा होय उपहत । कां रवि राहुग्रस्त । †कळाहीन ॥ २७० ॥ नातरी महासिद्धिसंभ्रमें । जिंतिलों तापस भ्रमें । मग आकळूनि कामें । दीन कीजे ॥ ७१ ॥ तैसा तो धनुर्धर । अत्यंत दुःखें जर्जर । दिसे जेथ रहंवरें । त्याजिला तेणें ॥ ७२ ॥ [विसृज्य सशरं चापं] मग धनुष्यबाण सांडिले । नें धरत अश्रुपात आले । ऐसें ऐक ‡राया वर्तलें । संजयो ह्मणे ॥ ७३ ॥ आतां यावरी तो वैकुंठनाथ । देखोनि सखेद पार्थ ।

---

* थोकलें. † प्रभाहीन. ‡ तेथ वर्तलें.

---

१ इच्छावें. २ दोष. ३ टाकीत नाहीं. ४ दृष्टीपुढें. ५ घातले. ६ कमी. ७ जगावें. ८ ल्याहून. ९ सोसावे. १० चांगलें. ११ पापेंकरून. १२ गरज. १३ नरकभोग. १४ समयीं. १५ समरांगणांत. १६ उदास झाला. १७ आवरण्यास अशक्य. १८ हुंदका. १९ रथांतून. २० स्थानभ्रष्ट. २१ मानरहित. २२ निस्तेज. २३ समारंभानें. २४ जिंकिला. २५ तपस्वी. २६ इच्छेनें. २७ रथोत्तम. २८ दुःखयुक्त.

कवणेपरी [1]परमार्थ । निरूपील ॥ ७४ ॥ *ते सविस्तर [2]पुढारी कथा । अति सकौतुक ऐकतां । ज्ञानदेव ह्मणे आतां । निवृत्तिदास ॥ २७५ ॥

इति श्रीज्ञानदेवकृतभावार्थदीपिकायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

श्लोक ४७, ओव्या २७५

---

* क्षेपक—वेदीं त्रिकांडनिरूपण । कर्म उपासना ज्ञान । हेंचि श्रीकृष्ण आपण । निरूपित असे ॥ २७५ ॥ जेणें अर्जुनाचा मोह नाशे । सम्यक् ज्ञान प्रकाशे । ऐसीं उत्तरें विश्वेशें । बोलिजती ॥ २७६ ॥ जे उत्तरमीमांसा उपनिषदें । ते मथूनियां गोविंदें । निरूपिजैल स्वानंदें । जेणें पार्थ उमजे ॥ २७७ ॥

---

१ तत्वज्ञान. २ पुढील.

पुणे नगर वाचन मंदिर, पुणे
वर्ग प ..... क्रमांक १२१५१२

ज्ञानेश्वरी.

श्री. श्रीनिवास मोडक, पुणे
यांजकडुन सप्रेम भेट

अध्याय २ रा.

संजय उवाच–तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।
विषीदंतमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥

[संजय उवाच—] मग संजयो ह्मणे रायातें । [तं तथा] आइकें तो पार्थ तेथें । [अश्रुपूर्णाकुलेक्षणं] शोकाकुळ रुदनातें । करीत असे ॥ १ ॥ तें कुळ देखोनि समस्त । [कृपयाविष्टं] स्नेह उपनलें अद्भुत । तेणें द्रवलें असे चित्त । करुणेपरी ॥ २ ॥ जैसें लवण जळें झळंबलें । नातरी अभ्र वातें हाले । तैसें सधीर परि विरमलें । हृदय तयाचें ॥ ३ ॥ ह्मणोनि कृपा आकळिला । [विषीदंतमित्यर्थं] दिसतसे अति कोमाइला । जैसा कर्दमीं रुपला । राजहंस ॥ ४ ॥ तयापरी तो पांडुकुमर । महामोहें अति जर्जर । देखोनि श्रीशार्ङ्गधर । काय बोले ॥५॥

श्रीभगवानुवाच–कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥

[श्रीभगवानुवाच—कुतस्त्वा] म्हणे अर्जुना आदि पाहीं । हें उचित काय ईये ठायीं । तूं करण हें कायी । करीत आहासी ॥६॥ तुज सांगें काय झालें । करण उणें आलें । करितां काय ठेलें । खेद कांयिसा ॥ ७ ॥ तूं अनुचिता चित्त नेदिसी । धीर *कंहीं न सांडिसी । तुझेनि नामें † अपयशीं । दिशा लंघिजे ॥८॥ तूं शूरवृत्तीचा ठेवो । क्षत्रियांमाजि रावो । तुझिया लौठेपणाचा आवो । तिहीं लोकीं ॥ ९ ॥ तुवां संग्रामीं हरे जिंकिला । निवातकवचांचा ठाय फेडिला । पंवाडा तुवां केला । गंधर्वासीं ॥ १० ॥ पाहतां तुझेनि पोडें । दिसे त्रैलोक्यही थोकडें । ऐसें पुरुषत्व चोखडें । पार्था तुझें ॥ ११ ॥ तो तूं कीं आजि

* कांहीं. † अपेशीं, आपैशी.

१ शोकानें व्याप्त. २ करिता झाला. ३ उपजलें. ४ अपूर्व. ५ विरघळलें. ६ भारी, कशा रीतीनें. ७ मीठ. ८ विरघळतें. ९ वाऱ्यानें. १० धैर्ययुक्त. ११ विरघळलें. १२ ममतेनें. १३ म्लान झाला. १४ चिखलांत. १५ ग्रस्त. १६ ह्या जागीं. १७ आहेस. १८ कमी. १९ राहिलें. २० कशाकरितां. २१ अयोग्याला. २२ देऊं नको. २३ सांडूं नको. २४ अपयशानें, अपेशानें. २५ उल्लंघावी. २६ स्थल, ठिकाण. २७ शौर्याचा. २८ प्रतिष्ठा, डौल. २९ शंकर. ३० शूरपणा, कीर्ति. ३१ बरोबरीनें. ३२ लहान. ३३ चांगलें.

येथें । सांडूनियां वीरवृत्तीतें । [कश्मलमिदं] अधोमुख रुदनातें । करीत आहासी ॥ १२ ॥ विचारीं तूं अर्जुनु । कीं कारुण्यें कीजैसी दीनु । सांग पां अंधकारें भानु । ग्रासिला आथी ॥ १३ ॥ ना तरी पवन मेघासि बिहे । कीं अमृतासि मरण आहे । पाहें पां इंधनचि गिळोनि जाये । पावकातें ॥ १४ ॥ कीं लवणेंचि जळ विरे । संसर्गें काळकूट मरे । सांग पां महाफणी दर्दुरें । गिळिजे कायी ॥ १५ ॥ सिंहासि झोंबे कोल्हा । *ऐसा अपाड आथि कें जाहाला । परी तो त्वां सांच केला । आजि एथ ॥ १६ ॥ [विषमे समुपस्थितम्] म्हणोनि अर्जुनी अर्जुना । झेंणें चित्त देसी या हीना । वेगीं धीर करूनियां मना । सावध होईं ॥ १७ ॥ सांडीं हें मूर्खपण । ऊठीं घे धनुष्यबाण । संग्रामीं हें कवण । कारुण्य तुझें ॥ १८ ॥ [अनार्यजुष्टं] हां गा तूं जाणता । तरी न विचारिसी कां आतां । सांगें जुंझावेळे सदयता । उचित कायी ॥ १९ ॥ [अस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन] हें असतिये कीर्तिसी नाश । आणि पारत्रिकासि अपभ्रंश । म्हणे जगन्निवास । अर्जुनातें ॥ २० ॥

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥

[क्लैब्यं मा स्म गमः पार्थ] म्हणोनि शोक न करीं । तूं पुरता धीर धरीं । हे शोच्यता ओव्हेरीं । †पांडुकुमरा ॥२१॥ [नैतत्त्वय्युपपद्यते] तुज नव्हे हें उचित । येणें नासेल जोडलें बहुत । तूं अर्जुनि ‡तरी हित । विचारीं पां ॥ २२ ॥ येणें संग्रामाचेनि अवसरें । एथ कृपाळुपण नुपकरे । हे आतांचि काय सोयरे । जाहले तुज ॥ २३ ॥ तूं आधींचि काय नेणसी । कीं हे गोत्रज नोळखसी । वायांचि काय करिसी । §अतिशय आतां ॥ २४ ॥ आजिचें हें जुंझ । काय जन्मा नवेल तुज । हें परस्परें तुह्मां व्याज । सदांचि आथी ॥ २५ ॥ [क्षुद्रं] तरी आतां काय जाहालें । कायि स्नेह उपेनलें । हें नेणिजे परि कुडें केलें । अर्जुना तुवां ॥ २६ ॥ मोह धरिलियां ऐसें होईल । जे असती प्रतिष्ठा जाईल । आणि परलोकही अंतरेल । ऐहिकेंसी ॥ २७ ॥ [हृदयदौर्बल्यं] हृदयाचें

---

* ऐसा पाड. † पंडुकुमरा. ‡ वरी. § अतिसो.

---

१ खालीं तोंड घालून. २ विचार कर, विचारवान्. ३ केला गेलास. ४ आहे १ ५ वारा. ६ भय पावे. ७ जळण. ८ अग्नीला. ९ मोठा सर्प. १० बेडूकानें. ११ विलक्षणपणा. १२ कोठें. १३ खरा. १४ चित्त देऊं नको. १५ माया. १६ अगा. १७ ज्ञाता. १८ विचार न करिसी. १९ योग्य. २० असलेल्या. २१ परलोकगतीला. २२ मुकणें. २३ खेद. २४ टाक. २५ प्रसंगी. २६ उपयोगीं नाहीं. २७ पराकाष्ठा, पाल्हाळ. २८ आश्चर्य. २९ कौरवांपांडवांना. ३० निमित्त. ३१ आहे. ३२ उत्पन्न झालें. ३३ मला समजत नाहीं. ३४ वाईट. ३५ चुकेल. ३६ इहलोकासह.

ढिलेपण । एथ निकयासि[1] नव्हे कारण । [त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप] हें संग्रामीं पतन जाण । क्षत्रियांसीं ॥ २८ ॥ ऐसेनि तो[2] कृपावंत । नानापरी असे शिकवित । हें ऐकोनि पांडुसुत । काय बोले ॥ २९ ॥

अर्जुन उवाच–कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ।
इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४ ॥

[अर्जुन उवाच–कथमिति] देवा हें येतुलेवरी[3] । बोलावें नलगे अवधारीं[4] । आधीं तूंचि विचारीं । संग्राम हा ॥ ३० ॥ हें जुंझ नव्हे प्रमाद[5] । एथ प्रवर्तलिया दिसतसे बाध[6] । हा उघड लिंगभेद[7] । वोडवला आह्मां ॥ ३१ ॥ [पूजार्हावरिसूदन] देखें मातापितरें अर्चिजती[8] । सर्वस्वें तोष पावविजती[9] । तियें पाठीं केविं वधिजती[10] । आपुलिया हातीं ॥ ३२ ॥ देवा संतवृंद[11] नमस्कारिजे[12] । कां घडे तरी पूजिजे । हेवांचुनि केविं निंदिजे[13] । स्वयें वाचा ॥ ३३ ॥ तैसे गोत्रगुरु[14] आमुचे[15] । हे पूजनीय आह्मां नेमाचे । मज बहुत भीष्मद्रोणांचें[16] । वर्ततसे ॥ ३४ ॥ [इषुभिः प्रतियोत्स्यामि] जयालागीं मनें विरूं[17] । आह्मी स्वमीं न शकों धरूं । तयां प्रत्यक्ष केवीं[18] करूं । घात देवा ॥ ३५ ॥ वरि जळो हें जियालें[19] । एथ अवघेयांसि[20] हेंचि काय जाहालें । जे यांच्या वधीं अभ्यासिलें[21] । मिरविजे आह्मी ॥ ३६ ॥ मी पार्थ द्रोणाचा केलों[22] । येणें धनुर्वेद मज दिधला । तेणें उपकारें काय ओभारैला[23] । वधीं तयातें ॥ ३७ ॥ जेथींचिया कृपा[24] लाहिजे वर । तेथेंचि मनें व्यभिचार[25] । तरी काय मी भस्मासुर । अर्जुन म्हणे ॥ ३८ ॥

गुरूनहत्वा हि महानुभावान् श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।
हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव भुंजीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ॥५॥

[गुरूनहत्वा हि महानुभावान्] देवा समुद्र गंभीर आइकिजे । वरि तोहि[26] ओहाच[27] देखिजे । परी क्षोभ मनीं नेणिजे । द्रोणाचिये ॥ ३९ ॥ हें अपार जें गगन[28] । वर तयाही होईल मान[29] । परी अगाध[30] भलें गहन । हृदय याचें ॥ ४० ॥ वरि अमृतही विटे[31] । कीं कोळवशें वज्रही फुटे । परि मनोधर्म न

१ चांगुलपणाला. २ श्रीकृष्ण. ३ इतकें. ४ ऐक. ५ चूक. ६ पीडा. ७ मोठ्यांचा उच्छेद, शंका. ८ प्राप्त झाली. ९ पूजिलीं जातात. १० पावतात. ११ त्याच्या उलट. १२ साधुसमूह. १३ हें सोडून. १४ कुलगुरु. १५ पूज्य. १६ स्मरतें. १७ वैर, वांकडें. १८ कोणत्या प्रकारें. १९ जीवालय, शरीर, जिणें. २० अवघेयांसी सर्वसुखास-सर्वतोपरि-काय तें एक शरीरच काय ? २१ केलेला शिष्य. २२ आभारी. २३ कृपेनें. २४ लाभिजे. २५ विपर्यास. २६ बाहेरूनच, वरवरच. २७ आकाश. २८ माप. २९ खोल. ३० बिघडेल. ३१ काळाधीनतेनें.

लोटे । विकरविलाही ॥ ४१ ॥ स्नेहालागीं माये । ह्मणिपें कीर होये । परि कृपा ते मूर्त आहे । द्रोणीं इये ॥ ४२ ॥ हा कारुण्याची आदि । सकळगुणांचा निधि । विद्यासिंधु निरवधि । अर्जुन ह्मणे ॥ ४३ ॥ हा येणें मानें महंत । वरि आह्मांलागीं कृपावंत । आतां सांग पां येथें घात । चिंतूं येईल ॥ ४४ ॥ [श्रेयो भोक्तुं] ऐसे हे रणीं वधावे । मग आपण *सुखें राज्य भोगावें । तें मना नये आघवें । जीवितेसीं ॥ ४५ ॥ हे येणें मानें †दुर्धर । जे यांहीहूनि भोग सधर । ते असतु एथवर । [भैक्ष्यमपीह लोके] भिक्षा मागतां भली ॥ ४६ ॥ नातरी देशत्यागें जाइजे । कां गिरिकंदर सेविजे । परी शस्त्र ‡आतां न धरिजे । इयांवरी ॥ ४७ ॥ [हत्वार्थकामांस्तु गुरून्] देवा नवनिशितीं शरीं । वीवरोनि यांचा जिव्हारीं । [भोगान् रुधिरप्रदिग्धान्] भोग गिवसावे रुधिरीं । बुडाले जे ॥ ४८ ॥ [इहैव भुंजीय] ते काद्रूनि काय कीजेती । लिप्त केविं सेविजती । §मज नये हे उपपत्ती । याचिलागीं ॥ ४९ ॥ ऐसें अर्जुन ते अवसरीं । म्हणे श्रीकृष्णा अवधारीं । परि तें मना नयेचि मुरारी । आइकोनियां ॥ ५० ॥ हें जाणोनि पार्थ भ्याला । मग पुनरपि बोलों लागला । म्हणे देवो कां चित्त या बोला । देतीचि ना ॥ ५१ ॥

न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।
यानेव हत्वा न जिजीविषामस्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥६॥

[कतरन्नो गरियः] येन्हवीं माझ्या चित्तीं जें होतें । तें मी विवरूनि बोलिलों एथें । परि निकें काय यापरौतें । तें ¶तुह्मी जाणा ॥ ५२ ॥ [यानेवस्वधै] पैं विरुं जयांसि ऐकिजे । आणि या बोलींचि प्राण सांडिजे । ते एथ संग्रामव्याजें । उभे आहाती ॥ ५३ ॥ [यद्वा जयेम) आतां ऐसेयांतें वधावें [यदि वा नो जयेयुः) कीं अव्हेरूनियां निघावें । [न चैतद्विद्मः] या दोहींमाजि बरवें । तें नेणों आह्मीं ॥ ५४ ॥

कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ७

---

* राज्यसुख. † दुर्भर. ‡ होतें. § मज मना नये. ¶ ते उपदेशिजोजी.

---

१ जात नाहीं. २ क्षोभविला. ३ आई. ४ म्हणावी. ५ खरें, निश्चयानें. ६ मूर्तिमंत. ७ ह्या. ८ मूळ. ९ ठेव, खाण. १० मर्यादारहित. ११ सर्व. १२ जीवापासून, मनापासून. १३ राज्यसुखापेक्षां. १४ मोठे. १५ असोत. १६ पर्वताची गुहा. १७ यांवर. १८ ताजी धार लावलेल्या बाणांनीं. १९ प्रहार करून. २० मर्मस्थानीं. २१ शोधावे. २२ रक्तांत. २३ करावेत. २४ युक्ति. २५ म्हणोन. २६ देत नाहीं. २७ स्पष्ट करून. २८ खरें. २९ पलीकडे. ३० वैर. ३१ असें बोलतांच. ३२ युद्धाच्या निमित्तानें. ३३ आहेत. ३४ टाकून.

[कार्पण्यदोषोपहतस्वभावः] आह्मां काय [3]उचित । तें पाहतां न [2]स्फुरे येथ । जे [3]मोहें येणें चित्त । व्याकुळ माझें ॥ ५५ ॥ तिमिरें[4]रावरुद्ध जैसें । दृष्टीचें तेज अंशे । मग [5]पांसींच असतां न दिसे । [6]वस्तुजात ॥ ५६ ॥ [धर्मसंमूढचेताः] देवा तैसें मज जाहलें । जे मन हें [7]भ्रांती ग्रासिलें । आतां काय हित आपुलें । तेंही नेणें ॥ ५७ ॥ [पृच्छामि त्वां] तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें । [8]निकें तें आह्मां सांगावें । जे [3]सखा सर्वस्व आंघवें । आह्मांसि तूं ॥ ५८ ॥ [शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नं] तूं गुरु बंधु पिता । तूं आमुची इष्ट देवता । तूंचि सदां [9]रक्षिता । [10]आपदीं आमुतें ॥ ५९ ॥ जैसा शिष्यातें गुरू । सर्वथा नेणे अव्हेरूं । कीं सरितांतें सागरू । त्यजी केवीं ॥ ६० ॥ नातरी [11]अपत्यातें माये । सांडूनि जरी जाये । तरी तें कैसेनि [12]जिये । ऐकें कृष्णा ॥ ६१ ॥ तैसा सर्वांपरी आह्मांसी । देवा तूंचि एक [13]आहासी । आणि बोलिलें जरी न [14]मनिसी । मागील माझें ॥ ६२ ॥ [यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे] तरी उचित काय आह्मां । जें [15]व्यभिचरेना धर्मा । तें झडकरीं पुरुषोत्तमा । सांग आतां ॥ ६३ ॥

न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्यच्छोकमुच्छोषणमिंद्रियाणाम् ।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाधिपत्यम् ॥८॥

[नहीत्यर्धं] हें सकळ [16]कुळ देखोनी । जो शोक [17]उपनलासे मनीं । तो तुझिया वाक्यावांचुनी । न *जाय आणिकें ॥ ६४ ॥ [अवाप्येत्यर्धं] एथ पृथ्वीतल [18]आंप होईल । हें महें[19]द्रपदही पाविजेल । परि मोह हा न फिटेल । मानसींचा ॥ ६५ ॥ जैसीं सर्वथा [20]बीजें आहा[21]ळलीं । तीं [22]सुक्षेत्रीं जन्ही पेरिलीं । तरी न [23]विरूढती सिंचलीं । [24]आंवडे तैसीं ॥ ६६ ॥ नातरी आयुष्य [25]पुरलें आहे । तरी † औषधें कांहीं नोहे । एथ एकचि [26]उपेगा जाये । [27]परमामृत ॥ ६७ ॥ तैसें राज्यभोग-समृद्धी । [28]उजीवन नोहे ‡इये बुद्धी । एथ जिव्हाळा कृपानिधी । कारुण्य तुझें ॥ ६८ ॥ ऐसें अर्जुन तेथें बोलिला । तंव क्षण एक भ्रांती सांडिला । मग पुनरपि व्यापिला । [29]उर्मी तेणें ॥ ६९ ॥ कीं [30]मज पाहतां उर्मी नोहे । हें [31]अंतारिसें [32]गमत आहे । तो ग्रासिला महामोहें । काळसर्पें ॥ ७० ॥ [33]सवर्म हृदय-

* न वचे. † औषधी. ‡ जीवबुद्धि.

१ योग्य. २ न सुचे. ३ कारण, ज्यापेक्षां. ४ तिमिर नांवाचा नेत्ररोग, अंधारानें वेष्टित. ५ आपणाजवळ. ६ कोणताही पदार्थ. ७ संशयानें. ८ खरें, निश्चयात्मक. ९ सर्व. १० आपत्तिकाळीं. ११ नव्यांला. १२ मुलाला. १३ वांचेल. १४ आहेस. १५ मानीत नाहींस. १६ विरुद्ध नाहीं. १७ गोतवळा. १८ उपजला आहे. १९ प्राप्त. २० इंद्रपद. २१ बियाचें धान्य. २२ भाजलेलीं. २३ चांगल्या शेतांत. २४ उगवत नाहींत. २५ हवीं तेवढीं, मनाजोगीं. २६ सरलें. २७ उपयोगीं येते. २८ मोठें अमृततुल्य औषध, भगवन्नामामृत. २९ या बुद्धीनें उत्तेजन येत नाहीं. ३० आश्रय. ३१ वेग, लहर. ३२ मला वाटतें. ३३ वेगळेंच. ३४ वाटत. ३५ मर्मयुक्त.

कल्हारीं । तेथ कारुण्यवेलेच्या भरीं । लागला ह्मणोनि लहरी । भांजेचि ना ॥ ७१ ॥ हें जाणोनि ऐसी प्रौढी । जो दृष्टिसवेंचि विष फेडी । तो धांवया श्रीहरी गारुडी । पातला कीं ॥ ७२ ॥ तैसिया पंडुकुमरा व्याकुळा । मिरवतसे श्रीकृष्ण जवळा । तो कृपावशें अवलीळा । रक्षील आतां ॥ ७३ ॥ ह्मणोनि तो पार्थु । मोहफणिग्रस्तु । म्यां ह्मणितला हा *हेतू । जाणोनियां ॥ ७४ ॥ मग देखा तेथ फाल्गुनु । घेतला असे भ्रांती कवळूनु । जैसा घनपडळीं भानु । आच्छादिजे ॥ ७५ ॥ तयापरी तो धनुर्धर । जाहलासे दुःखें जर्जर । जैसा ग्रीष्मकाळीं गिरिवर । वणवला कां ॥ ७६ ॥ ह्मणोनि †सहजें सुनीळ । कृपामृतें सजळ । तो वोळला श्रीगोपाळ । महामेघ ॥ ७७ ॥ तेथ ‡सुदर्शनांची द्युती । तेचि विद्युल्लता झळकती । गंभीर वाचा ते आयती । गर्जनेची ॥ ७८ ॥ आतां तो उदार कैसा वर्षेल । तेणें अर्जुनाचळ निवेल । मग नवी विरूढी फुटेल । उन्मेषाची ॥ ७९ ॥ ते कथा आइका । मनाचिया आराणुका । ज्ञानदेव ह्मणे देखा । निवृत्तिदास ॥ ८० ॥

संजय उवाच–एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ।
न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूवह ॥ ९ ॥

[संजय उवाच—एवमिति] ऐसें संजय असे सांगत । ह्मणे राया तो पार्थ । पुनरपि शोकाकुळित । काय बोले ॥ ८१ ॥ [न योत्स्य इति] आइकें सखेद बोले श्रीकृष्णातें । आतां नाळवावें तुह्मी मातें । मी सर्वथा न जुंझें एथें । भरंवसेनी ॥ ८२ ॥ ऐसें येकिहेळां बोलिला । मग मौन धरूनि ठेला । तेथ श्रीकृष्ण विस्मयो §पावला । देखोनि तयातें ॥ ८३ ॥

तुमवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।
सेनयोरुभयोर्मध्ये विषीदंतमिदं वचः ॥ १० ॥

[हृषीकेशः] मग आपुलां चित्तीं ह्मणे । एथ हें कायि आंदरिलें येणें । अर्जुन सर्वथा कांहीं नेणे । काय कीजे ॥ ८४ ॥ हा उमजे आतां कवणेपरी । कैसेनि धीर स्वीकारी । जैसा ग्रहातें पंचाक्षरी । अनुमानी कां ॥ ८५ ॥ ना तरी असाध्य देखोनि व्याधि । अमृतासम दिव्य ¶ओषधि । वैद्य सूची निर-

---

* संकेतू. † सहज. ‡ सुदर्शनाची. § पातला. ¶ औषधी.

---

१ हल्कमळीं. २ वेगानें, लाटांनीं. ३ मोडेना, भंगेना. ४ मोठा प्रसंग. ५ धावून रक्षणारा. ६ सहज ७ मोहरूपी सर्पानें ग्रासलेला. ८ अर्जुन. ९ वेंगाटून. १० ढगांच्या पडद्यांनीं. ११ उन्हाळ्यांत. १२ डोंगरास वणवा लागला. १३ उत्तम श्यामवर्ण. १४ वर्षेला. १५ दांतांचें तेज. १६ विस्तार. १७ अर्जुन हाच पर्वत. १८ पालवी. १९ विचाराची, ज्ञानाची. २० समाधान, शांति. २१ शोकानें व्याप्त. २२ भीड घालूं नये. २३ एकदम. २४ राहिला. २५ आश्चर्य. २६ आपल्या. २७ आरंभिलें. २८ समजेल २९ ज्योतिषी, मंत्री. ३० परीक्षा करी. ३१ अपरिहार्य. ३२ आठवण करून काढतो, योजतो

वधि । निदानींची ॥ ८६ ॥ तैसें विवरीत असे श्रीअनंत । [सेनयोरिति] तया दोहीं सैन्यांआंत । जयापरी पार्थ । भ्रांति सांडी ॥८७॥ तें कारण मनें धरिलें । मग संरोष बोलों आदरिलें । जैसें मातेच्या कोपीं थोंकलें । स्नेह आथी ॥८८॥ कीं औषधाचिया कडवटपणीं । जैसी अमृताची पुरवणी । ते आहाच न दिसे परि गुणीं । प्रकट होय ॥ ८९ ॥ [तमुवाच] तैसी वरिवरी पाहतां उदासें । आंत तरी अतिसुरसें । तियें वाक्यें हृषीकेशें । बोलों आदरिलीं ॥ ९० ॥

श्रीभगवानुवाच–अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।
गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडिताः ॥ ११ ॥

[श्रीभगवानुवाच—] मग अर्जुनातें ह्मणितलें । आह्मी आजि हें नवल देखिलें । जें तुवां एथ आदरिलें । मोंझारींचि ॥ ९१ ॥ [त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे] तूं जाणता तरी ह्मणविसी । परी नेणिवेतें न सांडिसी । आणि शिकवूं ह्मणों तरी बोलसी । बहुसाल नीति ॥ ९२ ॥ जैसा अंधा लागे पिसें । मग तें सैरा धांवे जैसें । तुझें शाहाणपण तैसें । दिसतसे ॥ ९३ ॥ तूं *आपणापें तरी नेणसी । [अशोच्यानन्वशोचः] परी या कौरवांतें शोचूं †पाहासी । हा बहु ‡विस्मय आह्मांसी । पुढतपुढती ॥ ९४ ॥ [प्रहसन्निव भारत इति १० श्लोकस्थं] तरी सांग §पां अर्जुना । तुजपासूनि स्थिति या त्रिभुवना । हे अनादि ¶विश्वरचना । तें लटकें कायी ॥ ९५ ॥ एथ समर्थ एक आंथी । तयापासूनि भूतें होती । तरी हें वायांचि काय बोलती । जगामाजी ॥ ९६ ॥ हो कां सांप्रत ऐसें जाहालें । जे हे जन्ममृत्यू तुवां सृजिले । आणि नाश पावे नाशिलें । तुझेनि कायी ॥ ९७ ॥ तूं भ्रमलेपणें अहंकृती । यांसि घात न ||धरिसी चित्तीं । तरी सांगें कायि हे होती । चिरंतनें ॥ ९८ ॥ कीं तूं एक वधिता । आणि सकळ लोक हा मरता । ऐसी भ्रांति झणें चित्ता । येवों देसी ॥ ९९ ॥ अनादिसिद्ध हें आंघवें । होत जात स्वभावें । तरी तुवां कां शोचावें । सांगें मज ॥ १०० ॥ परी मूर्खपणें नेणसी । न चिंतावें ते चिंतिसी । आणि तूंचि नीति सांगसी । आह्मांप्रति

---

* आपणातें. † पावसी. ‡ विस्मो. § गा अर्जुना; मज अर्जुना. ¶ सिद्ध. || करिसी.

---

१ आणीवाणीची. २ विचार करीत. ३ क्रोधयुक्त. ४ क्रोधांत. ५ गुंत झालेलें. ६ आहे.७ व्याही, भरती. ८ वरवरच. ९ प्रारंभ केला. १० मध्येंच. ११ अज्ञानपणाला. १२ नानाप्रकारची. १३ जन्मांधाला. १४ हवें तिकडे, यथेच्छ. १५ स्वताला. १६ शोक करूं. १७ आश्चर्य. १८ वारंवार. १९ पालन, आधार. २० आहे. २१ प्राणिमात्र, पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश. २२ व्यर्थ. २३ उत्पन्न केले. २४ चिरंजीव. २५ कदाचित् नको. २६ सर्व. २७ शोक करावा.

॥ १ ॥ [गतासूनित्यर्धे] देखें विवेकी जे होती । ते दोहींतेंही न शोचिती । जे होय जाय हे भ्रांती । ह्मणऊनियां ॥ २ ॥

न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः ।
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ॥ १२ ॥

[न चेत्यर्धे] अर्जुना सांगेन आइक । एथ आह्मी तुह्मी देख । आणि हे भूपति अशेख । आदिकरूनी ॥ ३ ॥ [न चेत्यर्धे] नित्यता ऐसेचि असोनी । नातरी निश्चित क्षया जाउनी । हे भ्रांति वेगळी करूनी । दोन्ही नाहीं ॥ ४ ॥ हें उपजे आणि नाशे । तें मार्यावशें दिसे । येन्हवीं तत्त्वता वस्तु जें असे । तें अविनाशचि ॥ ५ ॥ जैसें पवनें तोय हालविलें । आणि तरंगाकार जाहालें । तरी कवण कें जन्मलें । *ह्मणोंये तेथ ॥ ६ ॥ तेंचि वायूचे स्फुरण ठेलें । आणि उदक सहज †सपाट जाहालें । तरी आतां काय निमालें । विचारीं पां ॥ ७ ॥

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहांतरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥

[देहिन इति] आइकें शरीर तरी एक । परी वयसाभेदें अनेक । हें प्रत्यक्षचि देख । प्रमाण तूं ॥ ८ ॥ एथ कौमारत्व दिसे । मग तारुण्यीं तें अंशे । ‡परी देहीच न नाशे । एकेकासवें ॥ ९ ॥ [तथेति] तैसीं चैतन्याच्या ठायीं । इयें शरीरांतरें होती जाती पाहीं । ऐसें जाणे तया नाहीं । व्यामोहदुःख ॥ ११० ॥

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः ।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥ १४ ॥

[मात्रास्पर्शा इति] एथ नेणावया हेंचि कारण । जें इंद्रियां आधीनपण । तिहीं आकळिजे अंतःकरण । ह्मणऊनि भ्रमे ॥ ११ ॥ इंद्रियें विषय सेविती । तेथ हर्ष शोक उपजती । ते अंतर आळविती । संगें येणें ॥ १२ ॥ जयां विषयांचा ठायीं । ऐकनिष्ठता कहीं नाहीं । तेथ दुःख आणि कांहीं । सुखही दिसे ॥ १३ ॥ देखें शब्दाची व्याप्ति । निंदा आणि स्तुती । तेथ द्वेषाद्वेष उपजती । श्रवणद्वारें ॥ १४ ॥ मृदु आणि कठिण । हे स्पर्शाचे दोनी गुण । जे वेधूचेनि

---

* म्हणों तेथ; म्हणोंये एथ. † सपाटलें. ‡ देहचिन्ह न नशे.

---

१ विचारवान्. २ उत्पन्न होणें व मरणें या दोहोंलाही. ३ राजे. ४ संपूर्ण. ५ नित्य. ६ असणार. ७ जाणार. ८ मायेच्या योगानें. ९ खरेपणानें. १० परब्रह्म. ११ नाशरहित. १२ वाऱ्यानें. १३ उदक. १४ कोठें. १५ बंद झालें. १६ स्थिर. १७ लय पावलें. १८ वयपरत्वें. १९ बाळपण. २० आत्मा, देहाभिमानी जीव. २१ चिच्छक्ति. २२ हीं. २३ भ्रांति. २४ वश्य, स्वाधीन. २५ ओढावें. २६ बुडविती. २७ स्थैर्य. २८ कधीं. २९ शरीराचे.

संगें कारण । संतोषखेदां ॥ १५ ॥ [१]भ्यासुर आणि सुरेख । हें रूपाचें स्वरूप देख । जें उपजवी सुखदुःख । नेत्रद्वारें ॥ १६ ॥ सुगंध आणि दुर्गंध ॥ हा [२]परिमळाचा भेद । जो [३]घ्राणसंगें विषाद । तोष देता ॥ १७ ॥ तैसाचि [४]द्विविध रस । उपजवी प्रीतित्रास । ह्मणूनि हा [५]अपभ्रंश । विषयसंग ॥ १८ ॥ देखें इंद्रियां [६]अधीन होइजे । तें शीतोष्णातें पाविजे । आणि *सुखदुःखीं [७]आकळिजे । [८]आपणपें ॥ १९ ॥ या विषयांवांचूनि कांहीं । आणीक सर्वथा [९]रम्य नाहीं । ऐसा स्वभावचि पाहीं । इंद्रियांचा ॥ १२० ॥ [आगमापायिन इति] हे विषय तरी कैसे । [१०]रोहिणीचें जळ जैसें । कां स्वप्नींचा आभासे । [११]भद्रजाति ॥ २१ ॥ देखें अनित्य [१२]ते यापरी । ह्मणऊनि तूं अव्हेरीं । हा सर्वथा संग न धरीं । धनुर्धरा ॥ २२ ॥

यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ ।
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ १५ ॥

[यं हीति] हे विषय जयातें [१३]नाकळिती । [समेति] तया †सुखदुःखें न [१४]पवती । आणि [१५]गर्भवाससंगती । नाहीं तया ॥ २३ ॥ तो ‡नित्यरूप पार्था । वोळखावा सर्वथा । जो या इंद्रियार्थां । [१६]नागवेचि ॥ २४ ॥

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।
उभयोरपि दृष्टोऽतस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १६ ॥

[तत्त्वदर्शिभिः] आतां अर्जुना §कांहीं एक । सांगेन मी आइक । जें [१७]¶विचारें- [१८]श्लोक । वोळखती ॥ २५ ॥ [उभयोरपि दृष्टोऽतस्त्वनयोः] या [१९]उपाधिमाजी गुप्त । [२०]चैतन्य असे सर्वगत । तें तत्त्वज्ञ ||सतत । स्वीकारिती ॥ २६ ॥ [२१]सोलिलीं पयें [२२]जैसें । एक होऊनि [२३]मिनलें असे । परी निवडूनि राजहंसें । वेगळें कीजे ॥२७॥ कीं अग्निमुखें [२४]किडाळ । तोडोनियां [२५]चोखाळ । निवडिती केवळ । [२६]बुद्धिमंत ॥ २८ ॥ ना तरी [२७]जाणिवेच्या [२८]आयणी । करितां दधि [२९]कंडसणी । मग [३०]नवनीत

* दुःखें. † सुखदुःखें दोनी न. ‡ नित्य तृप्त. § आणीक एक. ¶ विचार- || संत.

१ भयंकर. २ वासाचा. ३ घ्राणेंद्रियाच्या योगानें. ४ दुःख. ५ आनंद. ६ दोन प्रकारचा. ७ अविचार, स्वरूपापासून पतन. ८ स्वाधीन. ९ आवरिला जातो. १० स्वतः आपण. ११ रमविणारे. १२ रोहिण=११ पासून १२ पर्यंत काल, त्यांत दिसतें म्हणून रोहिण, मृगजळ. १३ गजांतलक्ष्मी. १४ विषय. १५ न आकर्षती. १६ न पावती. १७ मातेच्या उदरांत राहणें. १८ न सांपडे, स्वाधीन होत नाहीं. १९ जेणें. २० जगामध्यें. २१ चिच्छक्ति. २२ सर्वव्यापक. २३ ब्रह्मस्वरूप जाणणारे, यथार्थवादी. २४ उदकांत. २५ दूध. २६ मिळालें असतां. २७ हीन, डांकलग. २८ शुद्ध सुवर्ण. २९ सोनार. ३० ज्ञानाच्या. ३१ चातुर्यानें. ३२ घुसळणें. ३३ लोणी.

निर्वाणीं[१]। दिसे जैसें ॥ २९ ॥ कीं भूस[२] बीं एकवट। उपणितां[३] राहे घनवट[४]। तेथ उडे तें फळकट[५]। जाणों आलें ॥ १३० ॥ [नासतो विद्यते भावः] तैसें विचारितां निरसलें। तें प्रपंच सहजें सांडवलें। [नाभावो विद्यते सतः] मग तत्त्वता[६] तत्त्व उरलें। ज्ञानियांसि ॥ ३१ ॥ ह्मणोनि अनित्याच्या ठायीं। तयां आस्तिक्यबुद्धि नाहीं। निष्कर्ष[७] दोहींही। देखिला असे ॥ ३२ ॥

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम्।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥

[अविनाशि तु तद्विद्धि] देखें सारासार विचारितां। भ्रांति ते पाहीं असारता। तरी सार तें स्वभावता। नित्य जाणें ॥ ३३ ॥ [येन सर्वमिदं ततं] हा लोकत्रयाकार। तो जयाचा विस्तार। तेथ नाम वर्ण[८] आकार। चिन्ह नाहीं ॥ ३४ ॥ [विनाशमिति] जो सर्वदा सर्वगत। जन्मक्षयातीत[९]। तया केलियाहि घात। *कदा नोहे ॥ ३५ ॥

अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ १८ ॥

[अंतवंत इमे देहाः] आणि शरीरजात[१०] आघवें। हें नाशवंत स्वभावें। [नित्यस्येति। शेषं स्पष्टं] ह्मणोनि तुवां जुंझावें। पंडुकुमरा ॥ ३६ ॥

य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम्।
उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते ॥ १९ ॥

[य एनमिति] तूं धरूनि देहाभिमानातें। दिठी[११] सूनि[१२] शरीरातें। मी मारिता हे मरते। ह्मणत[१३] आहासी ॥ ३७ ॥ [उभाविति] तरी अर्जुना तूं हें नेणसी। जरी तत्त्वता[१४] विचारिसी। तरी वधिता[१५] तूं नव्हसी। ते वध्य[१६] नव्हती ॥ ३८ ॥

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे २०
वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम्।
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हंति कम् ॥ २१ ॥

[न जायत इति] जैसें[१७] स्वप्नामाजि देखिजे। तें स्वप्नींचि सांच[१८] ओपजे। [अज इति] मग †चेऊनियां[१९] पाहिजे। तंव कांहीं नाहीं ॥ ३९ ॥ [न हन्यते

* कहीं. † चेऊनि जंव.

१ शेवटीं. २ कोंडायुक्त धान्य. ३ पाखडतां. ४ सारभूत धान्य. ५ फोल. ६ यथार्थ. ७ ज्ञान्यांला. ८ सत्यताबुद्धि. ९ निर्णय, सिद्धांत. १० जाती, रंग, रूप. ११ जन्मनाशरहित. १२ सर्व शरीरधारी, आकारास आलेले सर्व. १३ दृष्टि. १४ टेवून. १५ आहेस. १६ मारणारा. १७ नाश पावत नाहींत. १८ सत्य. १९ वाटे. २० जागें होऊन.

हन्यमाने शरीरे] *तैसी हे जाण माया । तूं भ्रमत आहासि वायां । शब्दें हाणितलिया छाया । जैसी आंगीं न रुपे ॥ १४० ॥ [वेदेति] कां पूर्ण कुंभ उलंडला । तेथ बिंबाकार दिसे अंशला । परी भानु नाहीं नासला । तयासवें ॥ ४१ ॥ नातरी मठीं आकाश जैसें । मठाकृती अवतरलें असे । तो भंगलिया आपैसें । स्वरूपचि ॥ ४२ ॥ [कथमिति] तैसें शरीराच्या लोपीं । सर्वथा नाश नाहीं स्वरूपीं । ह्मणऊनि तूं हे नारोपीं । भ्रांति बापा ॥ ४३ ॥

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही २२

[वासांसीति] जैसें जीर्ण वस्त्र सांडिजे । मग नूतन वेढिजे । [तथेति] तैसें देहांतरातें स्वीकारिजे । चैतन्यनाथें ॥ ४४ ॥

नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥

अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ २४ ॥

[नैनं छिंदंति शस्त्राणि] हा अनादी नित्यसिद्ध । निरुपाधि विशुद्ध । ह्मणऊनि शस्त्रादिकीं छेद । न घडे †यया ॥ ४५ ॥ [न चैनं क्लेदयंत्यापः] हा प्रळयोदकें नोप्पवे । [नैनं दहति पावकः] हा ‡अग्नीदाह न संभवे । [न शोषयति मारुतः] एथ महाशोष न प्रभवे । मारुताचा ॥ ४६ ॥ [नित्य इति] अर्जुना हा नित्य । अचळ हा शाश्वत । सर्वत्र सदोदित । परिपूर्ण हा ॥ ४७ ॥

अव्यक्तोऽयमचिंत्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २५ ॥

[अचिंत्योऽयं] हा तर्कीचिये दिठी । गोचरें नोहे किरीटी । ध्यान याचिये भेटी । उत्कंठा वाहे ॥ ४८ ॥ हा सदा दुर्लभ मना । आंप नोहे साधना । निःसीम हा अर्जुना । पुरुषोत्तम ॥ ४९ ॥ [अविकार्योऽयमुच्यते] हा गुणत्रया र-

* अर्जुना तैसी. † तया, इया. ‡ अग्निदाहो.

१ वार केल्यास. २ लागत नाहीं. ३ भरलेला. ४ पालथा झाला. ५ प्रतिबिंबरूप. ६ नष्ट झाला. ७ घर इत्यादिकांत. ८ पोकळी. ९ आकारास आलें. १० आपोआप. ११ नाशांत. १२ चित्कलेच्या ठायीं, आत्म्याच्या ठायीं. १३ आरोपूं नको. १४ फाटकें, जुनें. १५ नेसावें. १६ दुसरें शरीर. १७ आत्म्यानें. १८ उत्पत्तिरहित. १९ नित्य असणारा. २० मायावरणादिरहित. २१ याला. २२ न बुडे. २३ वायूचा. २४ कालत्रयीं अबाध्य. २५ तर्कशास्त्राच्या दृष्टीनें. २६ प्रत्यक्ष. २७ (किरीट घालून युद्धास तयार झालेल्या) अर्जुना. २८ योग्याचें ध्यान. २९ उत्सुकता. ३० प्राप्त. ३१ पाररहित.

हित । अनादि [३]अविकृत । [अव्यक्तोऽयं] [३]व्यक्तीसि अतीत । सर्वरूप ॥ १५० ॥ [तस्मादिति] अर्जुना ऐसा हा जाणावा । सकळात्मक देखावा । मग सहजें शोक [३]आघवा । हरेल तुझा ॥ ५१ ॥

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।
तथाऽपि त्वं महाबाहो नैनं शोचितुमर्हसि ॥ २६ ॥

[अथेत्यर्धे] अथवा ऐसा नेणसी । तूं [५]अंतवंतचि मानिसी । तऱ्हीं [६]शोचूं न पवसी । पंडुकुमरा ॥ ५२ ॥ जे [७]आदि स्थिति [८]अंतें । हा निरंतर असे नित्य । जैसा प्रवाह [९]अनुस्यूत । गंगाजळाचा ॥ ५३ ॥ तें आदि नाहीं खंडलें । समुद्रीं तरी असे मिनलें । आणि [१०]जातांचि मध्यें [११]उरलें । दिसे जैसें ॥ ५४ ॥ [१२]ईयें तीन्हीं तयापरी । [१३]सरसींच सदा अवधारीं । भूतांसि कवणीं [१४]अवसरीं । [१५]ठाकतीना ॥ ५५ ॥ [तथेति] ह्मणोनि हें आघवें । एथ तुज नलगे शोचावें । जे [१६]स्थितीचि हे स्वभावें । अनादि ऐसी ॥ ५६ ॥ नातरी हें अर्जुना । नयेचि तुझिया मना । †[१७]जे देखोनि लोक अधीना । जन्मक्षया ॥ ५७ ॥ तरी एथें कांहीं । तुज शोकासि कारण नाहीं । ‡हे जन्म मृत्यु पाहीं । अपरिहर ॥ ५८ ॥

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ २७ ॥

[जातस्य हि ध्रुवो मृत्युः] उपजे तें नाशे । [ध्रुवं जन्म मृतस्य च] नाशलें पुनरपि दिसे । हें घटिकायंत्र [१८]तैसें । परिभ्रमे गा ॥ ५९ ॥ नातरी [१९]उदो [२०]अस्तु [२१]आपैसे । अखंडित होत जात जैसे । हें जन्ममरण तैसें । अनिवार जगीं ॥ १६० ॥ महाप्रळय [२२]अवसरें । हें त्रैलोक्यही संहरे । [तस्मादपरिहार्येऽर्थे] ह्मणोनि हा न परिहरे । आदि अंत ॥ १६१ ॥ [न त्वं शोचितुमर्हसि] तूं जरी हें ऐसें मानिसी । तरी खेद कां करिसी । काय जाणतचि नेणसी । धनुर्धरा ॥ ६२ ॥ एथ आणिकही एक पार्था । तुज [२३]बहूतीं परी पाहातां । दुःख करावया सर्वथा । [२४]विषो नाहीं ॥ ६३ ॥

---

* उगलें. † तें देखोनि. ‡ जे.

---

१ विकार न पावणारा. २ रामकृष्णादि आकारास. ३ सर्व. ४ वर सांगितल्याप्रमाणें. ५ नाशवंत. ६ शोक करूं नको. ७ उत्पत्ति. ८ पालन. ९ संहार. १० अखंड. ११ मिळालें. १२ वाहत्या प्रवाहांत. १३ हीं. १४ सारखीं. १५ समयीं. १६ प्राप्त होत नाहींत. १७ सृष्टिक्रम. १८ लोक जन्ममरणाचे आधीन आहेत हें पाहून. १९ कालज्ञानार्थ वाळूचें घड्याळ, राहाटगाडगें. २० उदय. २१ अस्त. २२ आपोआप. २३ बेळीं. २४ अनेक तऱ्हांनीं. २५ विषय, ठिकाण.

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ २८ ॥

[अव्यक्तादीनि भूतानि] जिये[१] समस्तें इये[२] भूतें । जन्माआदि अमूर्तें[३] । मग पातलीं व्यक्तीतें[४] । जन्मलेया ॥ ६४ ॥ [अव्यक्तनिधनान्येव] तिये[५] क्षयासि जेथ जाती । तेथ निभ्रांत आनें[६] नव्हती । देखें पूर्वस्थितीच येती । आपुलिये ॥ ६५ ॥ [व्यक्तमध्यानि भारत] येरे[७] मध्यें जें प्रतिभासे[८] । तें निद्रिता स्वप्न जैसें । तैसा आकार हा मायावशें[९] । *सत्स्वरूपीं ॥ ६६ ॥ ना तरी पवनें[१०] स्पर्शिलें नीर[११] । †पढियांसे[१२] तरंगाकर[१३] । कां परापेक्ष[१४] अळंकार । व्यक्ती[१५] कनकीं ॥ ६७ ॥ तैसें सकळ हें मूर्त[१६] । जाण पां मायाकारित । जैसें आकाशीं बिंबत । अभ्रपटळ[१७] ॥ ६८ ॥ तैसें आदीचि जें नाहीं । [तत्र का परिदेवना] तयालागीं तूं रुदसी[१८] कायी । तूं अवीट[१९] तें पाहीं । चैतन्यें[२०] एक ॥ ६९ ॥ जयाची[२१] आर्तीचि भोगित । विषयीं त्यजिले संत । जयालागीं विरक्त[२२] । वनवासिये ॥ १७० ॥ दृष्टी सूनि[२३] जयातें । ब्रह्मचर्यादि व्रतें । मुनीश्वर तपातें । आचरताती ॥ ७१ ॥

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चाऽन्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥२९॥

[आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनं] एक अंतरीं निश्चळ[२४] । जें निहाळितां[२५] केवळ । विसरले सकळ । संसारजात[२६] ॥७२॥ [आश्चर्यवद्वदति तथैव चान्यः] एकां गुणानुवाद करितां । उपरती होऊनि चित्ता । निरवधि तल्लीनता[२७] । निरंतर ॥७३॥ [आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति] एक ऐकतांचि निवाले[२८] । ते देहभावीं[२९] सांडिले । [श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्] एक अनुभवें पातले । तद्रूपता[३०] ॥ ७४ ॥ जैसे सरितौघ[३१] समस्त । समुद्रामाजि मिळत । परी ‡मागुते न समात[३२] । परतले नाहीं ॥ ७५ ॥ तैसिया योगीश्वरांचिया मती । मिळणीं सवें एकवटती । परी जे विचारूनि पुनरावृत्ती[३३] । भजतीचिना[३४] ॥ ७६ ॥

---

* स्वरूपीं नाहीं. † प्रतिभासे. ‡ मागुते.

---

१ जीं. २ हीं. ३ जन्मापूर्वी. ४ निराकार. ५ आकाराला. ६ तीं. ७ निःसंशय. ८ अन्य. ९ दुसरें. १० भासतें, दिसतें. ११ दृश्य वस्तु; जग. १२ आत्म्यावर. १३ वायूनें. १४ उदक, १५ भासे. १६ लाटारूप. १७ दुसऱ्याच्या इच्छेनें होणारे. १८ प्रकटपणा. १९ सुवर्ण. २० साकार. २१ ढगाचा पडदा. २२ रडसी. २३ न विटणारें. २४ ज्ञानकला. २५ ज्या चैतन्याची इच्छा उत्पन्न झाल्यावर मनुष्यास विषय आपोआप सोडतात. २६ आवडी. २७ वैराग्यसंपन्न. २८ घालून. ठेवून. २९ ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ व संन्यास. ३० चलनरहित. ३१ पाहतां. ३२ खटपट. ३३ विषयनिवृत्ति. ३४ निःसीम. ३५ त्यांत निमग्नपणा. ३६ शांत झाले. ३७ मीपणानें. ३८ तदाकारता. ३९ नद्यांचे प्रवाह. ४० माघारे. ४१ समुद्रांत न मातां. ४२ मिळतांच. ४३ पुनर्जन्म. ४४ सेवीतच नाहींत, पावत नाहींत.

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥ ३० ॥

[देहीति] जें सर्वत्र *सर्वही देहीं । जया करितांही घात नाहीं । तें विश्वात्मक तूं पाहीं । चैतन्य एक ॥ ७७ ॥ [तस्मादिति] इयाचेनि स्वभावें । हें होत जात आघवें । तरी सांग काय शोचावें । एथ तुवां ॥ ७८ ॥ एऱ्हवीं तरी पार्था । तुज कां नेणों नें मनें चित्ता । परी किडाळ हें शोचितां । बहुतां परी ॥ ७९ ॥

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि ।
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥ ३१ ॥

[स्वधर्ममिति] तूं अझुनि कां न विचारिसी । काय हें चिंतित आहासी । स्वधर्म तो विसरलासी । †तरावें जेणें ॥ १८० ॥ या कौरवां भलतें जाहालें । अथवा तुजचि कांहीं पातलें । कीं युगचि हें बुडालें । जऱ्ही एथ ॥ ८१ ॥ तरी स्वधर्म एक आहे । तो सर्वथा त्याज्य नोहे । [न विकंपितुमर्हसि] मग तरि जेल काय पाहें । कृपाळूपणें ॥ ८२ ॥ अर्जुना तुझें चित्त । जऱ्ही जाहालें द्रवीभूत । तऱ्ही हें अनुचित । संग्रामसमयीं ॥ ८३ ॥ अगा गोक्षीर जरी जाहालें । तरी पथ्यासि नाहीं ‡घेतलें । ऐसेनिहि विष होय सुदलें । नवेज्वरीं देतां ॥ ८४ ॥ तैसें आनीं आन करितां । नाश होईल §स्वहिता । ह्मणऊनि तूं आतां । सावध होईं ॥ ८५ ॥ [धर्म्याद्धीति] वांयांचि व्याकुळ कायी । आपुला निजधर्म पाहीं । जो आचरितां बाध नाहीं । कवणें काळीं ॥ ८६ ॥ जैसें मार्गेंचि चालतां । ¶अपायो न पवे सर्वथा । कां दीपाधारें वर्ततां । नाडळिजे ॥ ८७ ॥ तयापरी पार्था । स्वधर्में राहाटतां । सकळ कामपूर्णता । सहजें होय ॥ ८८ ॥ ह्मणोनि यालागीं पाहीं । तुह्मां क्षत्रियां आणिक कांहीं । संग्रामावांचूनि नाहीं । उचित जाणें ॥ ८९ ॥ निष्कपट होआवें । उसिणें घाईं जुंझावें । हें असो काय सांगावें । प्रत्यक्षावरी ॥ १९० ॥

---

* सर्वी. † तरिजे. ‡ म्हणितलें. § हिता. ¶ अपावो.

---

१ जगद्रूप. २ याच्या. ३ सर्व. ४ शोक करावा. ५ तुझ्या चित्ताला कां मानवत नाहीं हें मला समजत नाहीं. ६ गौण, हिणकट. ७ आहेस. ८ कोणतेंही. ९ प्राप्त झालें. १० त्यागण्यास योग्य. ११ खेदयुक्त. १२ अयोग्य. १३ गाईचें दूध. १४ घातलें. १५ विषम ज्वऱ्याला. १६ एकानें दुसरें, भलतेंच. १७ व्यर्थ. १८ म्लान. १९ प्रत्यवाय, दोष. २० हानि. २१ दिव्याच्या आश्रयानें. २२ अडखळत नाहीं. २३ वर्तणूक करितां. २४ मनोरथसिद्धि. २५ याकरितां. २६ व्हावें. २७ समोरासमोर घाव करून.

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्धमीदृशम् ॥ ३२ ॥

[यदृच्छया चोपपन्नं] अर्जुना जुंझ देख आतांचें । हें हो *कां दैव तुमचें । कीं निधान सकळ धर्मांचें । प्रगटलें असे ॥ ९१ ॥ हा [स्वर्गद्वारमपावृतं] संग्राम काय ह्मणिपे । कीं स्वर्गचि येणें रूपें । मूर्त कां प्रतापें । †उदय केला ॥ ९२ ॥ नातरी गुणाचेनि पतिकरें । आर्तीचेनि पडिभरें । हे कीर्तीचि स्वयंवरें । आली तुज ॥ ९३ ॥ [सुखिन इति] ‡क्षत्रियें बहुत पुण्य कीजे । तैं जुंझ ऐसें लाहिजे । जैसें मार्गें जातां आंडळिजे । चिंतामणीसी ॥ ९४ ॥ ना तरी जांभया पसरे मुख । तेथ अवचटें पडे पीयूख । तैसा हा संग्राम देख । पातला असे ॥ ९५ ॥

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥ ३३ ॥

[अथेत्यर्धं] आतां हा ऐसा अव्हेरिजे । मग नाथिलें शोचूं बैसिजे। [ततः स्वधर्मं] तरी आपण ओहाणा होइजे । आपणपेयां ॥ ९६ ॥ पूर्वजांचें जोडलें । आपणचि होय धाडिलें । जरी आजि शस्त्र सांडिलें । रणीं §इये ॥ ९७ ॥ [कीर्तिं च हित्वा] तरी असती कीर्ति जाईल । जगचि अभिशाप देईल । आणि गिंवसित पावतील । महादोष ॥ ९८ ॥ जैसी भर्तारेंहीन वनिता । उपहती पावे सर्वथा । मग तैसी दशा जीविता । स्वधर्मेंवीण ॥ ९९ ॥ [पापमवाप्स्यसि] ना तरी रणीं शेवं सांडिजे । चौमेरीं गिधीं विदारिजे । तैसें §स्वधर्महीना अभिभविजे । महादोषीं ॥ २०० ॥

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यंति तेऽव्ययाम् ।
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ ३४ ॥

[अकीर्तिमित्यर्धं] ह्मणोनि स्वधर्म हा सांडसील । तरी पापा वरिपडा होसील । आणि अपेश तें न वेचेल । कल्पांतवरी ॥ १ ॥ जाणतेनि तंवचि जियावें ।

* कां जें. † उदो. ‡ क्षात्रीं. § स्वधर्मे.

१ ठेवा. २ म्हणावा. ३ मूर्तिमंत. ४ अनुभवानें, प्रतीतीनें. ५ प्रतिभरें, आसक्तीनें, आधिक्यें. ६ प्राप्त व्हावें. ७ आदळावें, अकस्मात् आढळावें. ८ इच्छित फळ देणारा मणि. ९ जांभईनें. १० अकस्मात्. ११ अमृत. १२ टाकावा. १३ नसतें. १४ हानी करणारा. १५ स्वतः आपणाला. १६ गमावलें. १७ ह्या. १८ असलेली. १९ तळतळाट. २० शोधीत. २१ पतिविरहित. २२ स्त्री. २३ अपमान. २४ प्रेत. २५ चोहोंकडून. २६ गिधाडांनीं. २७ महादोष जिंकतात. २८ प्राप्त. २९ दूर होणार नाहीं. ३० ज्ञात्यानें. ३१ जगावें.

जंव अपकीर्ति आंगा न पवे[१]।[संभावितस्य चाकीर्तिः]आणि सांग पां केविं[२] निगावें[३]। एथोनियां ॥ २ ॥ तूं निर्मत्सर[४] सदयता[५] । एथूनि निघसील कीर[६] मौघाँता[७] । परी ते गति[८] समस्तां । नें मनेल यया[९] ॥ ३ ॥ हे चहूंकडूनि कवळितील[१०] । बाण[११] वैरी घेतील । तेथ पार्था न सुटिजेल । कृपाळूपणें ॥ ४ ॥ [मरणादतिरिच्यते] ऐसेनिहि प्राणसंकटें[१२] । जरी विपायें[१३] पां निघणें *घटे[१४] । तरी तें जियालें[१५] वोखटें[१६] । मरणाहुनी ॥ ५ ॥

भयाद्रणादुपरतं मंस्यंते त्वां महारथाः ।
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ ३५ ॥

[भयादिति] तूं आणिकही एक न विचारिसी । एथ संभ्रमें[१७] जुंझों आलासी । आणि संकणवपणें[१८] निवालासी । मोंगुता[१९] जरी ॥ ६ ॥ [मंस्यंते त्वां] तरी तुझें[२०] तें अर्जुना । या वैरियां दुर्जना । कां प्रत्यया येईल[२१] मना । सांगें मज ॥ ७ ॥

अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यंति तवाहिताः ।
निंदंतस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३६ ॥

[अवाच्यवादानिति] हे झणती गेलारे गेला । अर्जुन आह्मा बिहाला[२२] । हा सांगें बोल उरला । निकी[२३] कायी ॥ ८ ॥ लोक सायासें करूनि बहुतें[२४] । वेंचिती आपुलीं जीवितें । परी वाढविती कीर्तीतें । धनुर्धरा ॥ ९ ॥ ते तुज अनायासें[२५] । अनेकळित[२६] जोडिली असे । हें अद्वितीय जैसें । गगन[२७] आहे ॥ २१० ॥ [येषां च त्वं बहुमतो] तैसी कीर्ति निःसीम[२८] । तुझ्या ठायीं निरुपम[२९] । तुझे गुण उत्तम । तिहीं लोकीं ॥ ११ ॥ दिगंतींचे[३०] भूपती । भाट[३१] होऊनि वाखाणिती । जे ऐकिलियां देचकती[३२] । कृतांतादिक[३३] ॥ १२ ॥ ऐक ऐसी महिमा धनवट[३४] । गंगा तैसी चोखट[३५] । जया देखी जगीं सुभट[३६] । वाँठ[३७] जाहाले ॥ १३ ॥ [भूत्वा] तें पौरुष[३८] तुझें अद्भुत । आइकोनियां हे समस्त । जाले अति विरक्त । जीवितेंसी ॥ १४ ॥ जैसा सिंहाचिया हांका । युगांत[३९] होय मदमुखा[४०] । तैसा कौरवां

* घडे.

१ पावत नाहीं. २ कसें. ३ निघावें. ४ अभिमानरहित. ५ कनवाळूपणानें. ६ निश्चयें. ७ माघारा. ८ दयामूलक पलायन. ९ न मानेल, वाटेल. १० ह्यांला. ११ वेढितील. १२ नंतर. १३ जिवाच्या आकांतानें. १४ कदाचित्. १५ वांचणें. १६ वाईट. १७ समारंभानें. १८ ममताळूपणानें. १९ माघारा. २० दयालुत्व. २१ अनुभवास. २२ भ्याला. २३ चांगला. २४ खरचितात. २५ अक्लेश, सहज. २६ आकाश. २७ अतीशय. २८ उपमारहित. २९ देशांतरींचे. ३० स्तुतिपाठ करणारे. ३१ भितात. ३२ यमादिक. ३३ गहन. ३४ चांगली. ३५ ज्यास पहातां. ३६ महायोद्धे. ३७ तटस्थ, स्तब्ध. ३८ शौर्य. ३९ प्रलय. ४० उन्मत्त हत्तीला.

अशेखां । धाक तुझा ॥ १५ ॥ जैसे पर्वत वज्रातें । नातरी सर्प गरुडातें । तैसे अर्जुना हे तूतें । मानिती सदा ॥ १६ ॥ तें अगाधपण जाईल । [यास्यसि लाघवं] मग *हीनत्व आंगा येईल । जरी मागुता निघसील । न जुंझतचि ॥ १७ ॥ आणि हे पळतां पळों नेदिती । धरूनि अवकळा करिती । न गणित कुंटी बोलती । आइकतां तुज ॥ १८ ॥ [तत इति] मग ते वेळीं हियें फुटावें । आतां लैठेपणें कां न जुंझावें । हें जिंतलें तरी भोगावें । †महीतळ ॥ १९ ॥

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ३७ ॥

[हत इति] नातरी रणीं एथ । जुंझतां वेंचलें जीवित । तरी स्वर्गसुख अनकळित । पावसील ॥ २२० ॥ [तस्मादिति] ह्मणोनि ये गोष्टी । विचार न करीं किरीटी । आतां धनुष्य घेऊनि उठीं । जुंझ वेगीं ॥ २१ ॥ देखें स्वधर्म हा आचरतां । दोष नाशे असंता । तुज भ्रांति हे कवण चित्ता । ‡पातकाची ॥ २२ ॥ सांगें पुढेंचि काय बुडिजे । कां मागीं जातां आडळिजे । §परी विपायें चालों नेणिजे । तरी तेंही घडे ॥ २३ ॥ अमृतें तरीचि मरिजे । जरी विषेसीं सेविजे । तैसा ¶स्वधर्मीं दोष पाविजे । हेतुकपणें ॥ २४ ॥ ह्मणोनियां पार्था । हेतु सांडूनि सर्वथा । तुज क्षात्रवृत्ति जुंझतां । पाप नाहीं ॥ २५ ॥

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ ३८ ॥

[सुखदुःखे इति] सुखीं संतोषा न यावें । दुःखीं विषादा न भजावें । आणि लाभालाभ न धरावे । मनामाजी ॥ २६ ॥ ऐथ विजयपण होईल । कीं सर्वथा देह जाईल । हें आधींचि कांहीं पुढील । चिंतावेंना ॥ २७ ॥ [ततो युद्धाय युज्यस्व] औपणयां उचिता । $स्वधर्मे रोहटतां । जें पावे तें निवांतीं । साहोनि जावें ॥ २८ ॥ [नैवं पापमवाप्स्यसि] ऐसेयां मनें होआवें । तरी दोष न घडे स्वभावें । ह्मणोनि आतां जुंझावें । निभ्रांत तुवां ॥ २९ ॥

---

* हीनावो. † पृथ्वीतळ. ‡ एथ पातकाची. § जरी. ¶ स्वधर्मे. $ स्वधर्मातेंचि.

---

१ सर्वांस. २ गंभीरता. ३ नीचपणा. ४ फजिती. ५ कुडी, निंदा. ६ हृदय. ७ शूरपणानें. ८ जिंकिलें. ९ पृथ्वीचें राज्य. १० खचिलें, गेलें. ११ उपद्रवरहित, निरामय. १२ अर्जुना. १३ असलेला. १४ नावेनें. १५ आपटावें, अडखळावें, ठेंच लागावी. १६ कदाचित्. १७ विषावरोबर, विषमिश्रित. १८ सकामतेनें, हेतु धरून. १९ क्षत्रियधर्मानें. २० खेद मानूं नये. २१ समरंगणांत. २२ चिंतूं नये. २३ आपल्याला. २४ व्यवहार करितां. २५ स्वस्थपणें. २६ असें दृढ. २७ व्हावें.

एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु ।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि ॥ ३९ ॥

[एषेति] हे सांख्यस्थिति मुकुळित । सांगितली तुज एथ । आतां बुद्धियोग निश्चित । अवधारीं पां ॥ २३० ॥ [बुद्ध्येति] जया बुद्धियुक्ता । जालिया पार्था । कर्मबंध सर्वथा । बाधूं न पवे ॥ ३१ ॥ जैसें वज्रकवच लेइजे । मग शस्त्रांचा *वर्षावो साहिजे । परी जैतेंसीं उरिजे । अचुंबित ॥ ३२ ॥

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ ४० ॥

[नेहाभिक्रम इति] तैसें अहिक तरी न नशे । आणि मोक्ष तो उरला असे । जेथ पूर्वानुक्रम दिसे । चोखाळत ॥ ३३ ॥ कर्माधारें राहाटिजे । परी कर्मफळा न †निरीक्षिजे । जैसा मंत्रज्ञ न बंधिजे । भूतबाधा ॥ ३४ ॥ तियापरी जे सुबुद्धि । आंपु ‡जालिया निरवधि । हा असताचि उपाधि । आकळूं न सके ॥ ३५ ॥ जेथ न संचरे पुण्यपाप । जें सूक्ष्म अति निष्कंप । गुणत्रयादि लेप । न लगे गति जेथ ॥ ३६ ॥ [स्वल्पमिति] अर्जुना ते पुण्यवशें । जरी अल्पचि हृदयीं बुद्धि प्रकाशे । तरी अशेषही नाशे । संसारभय ॥ ३७ ॥

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ।
बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ ४१ ॥

[व्यवसायेति] जैसी दीपकळिका धाकुटी । परी बहु तेजातें प्रगटी । तैसी सद्बुद्धि हे थेकुटी । ह्मणों नये ॥ ३८ ॥ पार्था बहुतीं परी । हे अपेक्षिजे विचारशूरीं । जे दुर्लभ चराचरीं । सद्वासना ॥ ३९ ॥ आणिकासारिखा बहुबस । जैसा नोहे जोडे परिस । कां अमृताचा लेश । दैवगुणें ॥ २४० ॥ तैसी

* वरिखाव. † निरिखिजे. ‡ जालया.

१ ज्ञानयोग, ज्ञानावस्था (सांख्य म्हणजे आत्मतत्त्वज्ञान = अपरोक्षज्ञान). २ संक्षिप्त. ३ कर्मयोग, कर्मानुष्ठान, समाधियोग. ४ ऐक. ५ निःसंगकर्मानुष्ठानज्ञानसंपन्न. ६ न शके. ७ वज्राचें कवच. ८ वृष्टि. ९ जयरूप, जयी. १० अबाध. ११ ऐहिक. १२ न नाशे. १३ न अंतरतां. १४ ज्या बुद्धियोगांत पूर्वानुक्रम (सांख्ययोग)स्पष्ट दिसतो. १५ वर्तावें. १६ कर्मापासून होणाऱ्या फळाला. १७ न पाहावें. १८ देवर्षि. १९ जुमानीत नाहीं, बाधा पावत नाहीं. २० प्राप्त. २१ निःशेष. २२ न शिरे. २३ निश्चल. २४ लागत नाहींत. २५ सुबुद्धि, आत्मज्ञान, ईश्वरप्रसादप्राप्ति. २६ पुण्याईनें. २७ दिव्याची ज्योत. २८ प्रकाशाला. २९ अल्प. ३० इच्छावी. ३१ विचारज्ञांनीं. ३२ दगडादिक दुसरे. ३३ पुष्कळ. ३४ न मिळे. ३५ अंश. ३६ नशीबानें.

दुर्लभ सद्बुद्धि । जिये परमात्माचि [1]अवधि । जैसा गंगेसि [2]उदधि । निरंतर ॥ ४१ ॥ *तैसें ईश्वरावांचुनि कांहीं । [3]जिये आणिक †[4]लोहाणें नाहीं । ते एकचि बुद्धि पाहीं । अर्जुना जगीं ॥ ४२ ॥ [बहुशाखा इति] ‡[5]येरें [6]ते दुर्मती । जे बहुधा असे [7]विकरती । तेथ निरंतर रमती । [8]अविवेकिये ॥ ४३ ॥ ह्मणोनि तयां पार्था । स्वर्ग संसार नरकावस्था । आत्मसुख सर्वथा । दृष्ट नाहीं ॥ ४४ ॥

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः ।
वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ ४२ ॥

[वेदवादरताः पार्थ] वेदाधारें बोलती । केवळ कर्म [9]प्रतिष्ठिती । परी कर्मफळीं [10]आसक्ती । धरूनियां ॥ ४५ ॥ [स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां] ह्मणती संसारीं जन्मिजे । यज्ञादिक कर्म कीजे । मग स्वर्गसुख भोगिजे । [यामिमां पुष्पितां वाचं] [11]मनोहर ॥ ४६ ॥ [नान्यदस्तीति वादिनः] एथ हेंवांचूनि कांहीं । आणिक सर्वथा सुखचि नाहीं । [प्रवदंत्यविपश्चितः] ऐसें अर्जुना बोलती पाहीं । दुर्बुद्धि ते ॥ ४७ ॥

कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥

[कामात्मान इति] देखें [12]कामनाअभिभूत । होऊनि कर्मे आचरत । [भोगैश्वर्यगतिं प्रति] ते केवळ भोगीं चित्त । देऊनियां ॥४८॥ [क्रियाविशेषबहुलां] [13]क्रियाविशेषें बहुतें । न [14]लोपिती [15]विधीतें । [16]निपुण होऊनि धर्मांतें । [17]अनुष्ठिती ॥ ४९ ॥

भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥

[व्यवसायेति] परी एकचि [18]कुडें करिती । जे स्वर्गकाम [19]मनीं धरिती । [20]यज्ञपुरुषा चुकती । भोक्ता जो ॥ २५० ॥ §जैसा कर्पूराचा राशि कीजे । मग अग्नि लाऊनि दीजे । कां मिष्टान्नीं [21]संचरविजे । [22]कोळकूट ॥ ५१ ॥ दैवें अमृतकुंभ जोडला । तो पायें हाणोनि उलंडिला । तैसा नासिती धर्म [23]निपजला । हेतुकपणें [24]॥ ५२ ॥ [25]सायासें पुण्य [26]अर्जिजे। मग संसार कां [27]अपेक्षिजे । [तया-

* तैसी. † लाणी. ‡ येरीते. § जैसी कर्पूराची.

१ शेवट, सीमा, पर्यवसान. २ समुद्र. ३ जिला. ४ प्राप्त करून घेणें. ५ याशिवाय दुसऱ्या, स्वर्गादि सुख व भोग यांत निमग्न होणाऱ्या. ६ विकार पावविणारी. ७ अविचारी. ८ स्वरूपानंद. ९ स्थापिती. १० लोभ. ११ मनाला हरण करणारें, मनगमतें. १२ कामाच्या स्वाधीन, सहेतुकपणें. १३ अनेक प्रकारचीं अनुष्ठानें. १४ नाशिती. १५ कर्तव्य प्रयोगादिकांला. १६ निष्णात. १७ आचरतात. १८ वाईट. १९ स्वर्गेच्छा. २० ईश्वरास. २१ मिसळावें. २२ कालकूट नांवाचें विष. २३ उत्पन्न झालेला. २४ सकामपणानें. २५ श्रमानें. २६ संपादावें. २७ इच्छावा.

पहतचेतसां] परी नेणती ते काय कीजे । अप्राप्त देखें ॥ ५३ ॥ [भोगैश्वर्यप्रसक्तानां] जैसी रांधेवणी रसोय निकी । करूनियां मोलें विकी । तैसा भोगासाठीं अविवेकी । धाडिती धर्म ॥ ५४ ॥ ह्मणोनि हे पार्था । दुर्बुद्धि देख सर्वथा । तयां वेदवादरतां । मनीं वसे ॥ ५५ ॥

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥ ४५ ॥

[त्रैगुण्यविषया वेदाः] तिहीं गुणीं आवृत । हे वेद जाण निभ्रांत । ह्मणोनि उपनिषदादि समस्त । सात्विक ते ॥ ५६ ॥ येरं रजतमात्मक । जेथ निरूपिजे कर्मादिक । जे केवळ स्वर्गसूचक । धनुर्धरा ॥ ५७ ॥ [निस्त्रैगुण्यो भवार्जुन] ह्मणोनि तूं जाण । हे सुखदुःखासीच कारण । एथ झणें अंतःकरण । रिघों देसी ॥ ५८ ॥ तूं गुणत्रयातें अव्हेरीं । [निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो] मी माझें हें न करीं । [निर्योगक्षेम आत्मवान्] एक आत्मसुख अंतरीं । विसंब झणी ॥ ५९ ॥

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥ ४६ ॥

[यावानिति] जरी वेदें बहुत बोलिलें । विविध भेद सूचिले । तन्ही आपण हित आपुलें । तेंचि धेपे ॥ २६० ॥ जैसा प्रगटलिया गंभस्ती । अशेषही मार्ग दिसती । तरी तेतुलेहि काय चोंलिजती । सांगें मज ॥ ६१ ॥ कां उदकमय सकळ । जन्ही जाहालें असे महीतळ । तरी आपण धेपे केवळ । ओर्त्तीचजोगें ॥ ६२ ॥ [तावानिति] तैसे ज्ञानी जे होती । ते वेदार्थातें विवरिती । मग अपेक्षित तें स्वीकारिती । शाश्वत जें ॥ ६३ ॥

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ ४७ ॥

[कर्मण्येवाधिकारस्ते] ह्मणोनि आइकें पार्था । याचि परी पाहातां । तुज उचित होय आतां । स्वकर्म हें ॥ ६४ ॥ आह्मी समस्तही विचारिलें । तंव

---

१ अज्ञानी. २ स्वयंपाक करणारी. ३ स्वयंपाक. ४ चांगला. ५ अविचारी. ६ गमाविती. ७ वेदांतील अर्थवादांत मग्न झालेले. ८ वेष्टित. ९ अन्य. १० कदाचित्, नको. ११ शिरूं देऊं. १२ टाक. १३ अहंममता. १४ विसंबूं नको. १५ अनेक. १६ सुचविले. १७ ध्यावें. १८ सूर्य. १९ तितकेही. २० चालले जातात. २१ जलरूप. २२ इच्छेपुरतें. २३ विचार करतात. २४ इच्छित. २५ नाश न पावणारें.

ऐसेंचि हें मना आलें । जे न सांडिजे तुवां आपुलें । विहित[1] कर्म ॥ ६५ ॥ [मा फलेषु कदाचन] परी कर्मफळीं[2] आस[3] न करावी । [मा ते संगोऽस्त्वकर्मणि] आणि *अकर्मीं[4] संगती न व्हावी । [मा कर्मफलहेतुर्भूः] हे सत्क्रियाचि[5] आचरावी । हेतूविण ॥ ६६ ॥

योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥४८॥

[योगस्थ इत्यर्धं] तूं योगयुक्त होउनी । फळाचा संग टाकुनी । मग अर्जुना चित्त[6] देउनी । करीं कर्में ॥ ६७ ॥ [सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा] परी आदरिलें[7] कर्म दैवें । जरी समाप्तीतें पावे । तरी विशेषें तेथ तोषावें[8] । हेंही नको ॥ ६८ ॥ कीं निमित्तें कोणे एकें । तें सिद्धी न वचतांचि[9] ठाके । तरी तेथिचेनि अपरितोखें[10] । क्षोभावें[11] ना ॥ ६९ ॥ आचरतां सिद्धी गेलें । तरी कांजाचि[12] कीर[13] आलें । परी ठेलेयाही[14] सगुण[15] जाहालें । ऐसेंचि मानीं ॥ २७० ॥ देखें जेतुलालें[16] कर्म निपजे । तेतुलें आदिपुरुषीं[17] समर्पिजे । तरी परिपूर्ण सहजें । जाहालें जाणें ॥ ७१ ॥ [समत्वं योग उच्यते] देखें सतासतकर्मीं[18] । †हें जे सरसेपण[19] मनोधर्मीं । तेचि योगस्थिती उत्तमीं । प्रशंसिजे ॥ ७२ ॥

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥ ४९ ॥
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥ ५० ॥

[बुद्धियोगाद्धनंजय] अर्जुना समत्व[20] चित्ताचें । तेंचि सार जाण योगाचें । जेथ मन आणि बुद्धीचें । ऐक्य[21] आथि ॥ ७३ ॥ तो बुद्धियोग विवरितां[22] । [दूरेण ह्यवरं कर्म] बहुतें[23] पाडें पार्था । दिसे हा अरुता[24] । कर्मयोग ॥ ७४॥ [तस्मादिति] परी तेंचि कर्म आचरिजे । तरीच हो[25] योग पाविजे । जे कर्मशेष[26] सहजें । योगस्थिती ॥ ७५ ॥ [बुद्धौ शरणमन्विच्छेति] ह्मणोनि बुद्धियोग सधर[27] । तेथ अर्जुना होईं स्थिर । मनें करीं अव्हेर[28] । फळहेतूचा ॥ ७६ ॥ [बुद्धियुक्त इति]

* कुकर्मी. † हें जें.

१ कर्तव्यकर्म. २ कर्मजन्य फळाविषयीं. ३ आस्था. ४ निषिद्धकर्मीं. ५ सत्कर्म. ६ आरंभिलेलें. ७ संतोषावें. ८ न जातां. ९ राहे. १० असंतोषानें. ११ त्रासूं नये. १२ कार्यास. १३ निश्चयें. १४ राहिलें असतांही. १५ सफळ. १६ जेवढें. १७ उत्पन्न होतें. १८ तेवढें. १९ ईश्वरीं. २० बरें चाईट. २१ सारखेपण. २२ साम्यता. २३ आहे. २४ विचार करितां. २५ पुष्कळमानानें. २६ आलीकडचा. २७ बुद्धियोग. २८ कर्मसिद्धि. २९ बळकट. ३० तिरस्कार.

जे बुद्धियोगा *[1]योजिले । तेचि [3]पारंगत जाहाले । [3]इहीं उभयसंबंधीं सांडिले । पापपुण्यीं ॥ ७७ ॥

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।
जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छंत्यनामयम् ॥ ५१ ॥

[कर्मजमिति] ते कर्मीं तरी वर्तती । परी कर्मफळा [4]नातळती । [जन्मबंधविनिर्मुक्ताः] आणि [5]यातायाती [6]लोपती । अर्जुना तयां ॥ ७८ ॥ [पदं गच्छंत्यनामयं] मग [7]निरामयभरित । पावती पद [8]अच्युत । ते बुद्धियोगयुक्त । धनुर्धरा ॥७९॥

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।
तदा गंतासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥ ५२ ॥

[यदा ते मोहेति] तूं ऐसा [9]तैं होसी । जैं मोहातें [10]यया सांडिसी । आणि वैराग्य मानसीं । [10]संचरेल ॥ २८० ॥ [तदेति] मग [11]निष्कळंक [12]गहन । उपजेल आत्मज्ञान । तेणें [13]निचाड होईल मन । [14]अपैसें तुझें ॥ ८१ ॥ तेथ आणिक कांहीं जाणावें । कां मागील तें स्मरावें । हें अर्जुना [15]आघवें । [16]पारुषेल ॥ ८२ ॥

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥ ५३ ॥

[श्रुतीति] इंद्रियांचिया संगती । [17]जिये [18]पैसर होतसे मती । ते स्थिर होईल [19]मागुती । आत्मस्वरूपीं ॥ ८३ ॥ [समाधाविति] समाधिसुखीं केवळ । जैं बुद्धि होईल निश्चळ । तैं पावसी तूं सकळ । योगस्थिति ॥ ८४ ॥

अर्जुन उवाच-**स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।**
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥५४॥

[अर्जुन उवाच-]तेथ अर्जुन ह्मणे देवा । हाचि †अभिप्रावो आघवा । मी पुसेन आतां सांगावा । कृपानिधी ॥ ८५ ॥ मग अच्युत ह्मणे सुखें । जें किरीटी तुज [20]निकें । तें पूस पां [21]उन्मेखें । मनाचेनि ॥ ८६ ॥ या बोला पार्थें । ह्मणीतलें सांग पां श्रीकृष्णातें । [स्थितप्रज्ञस्य का भाषा] काय [22]ह्मणिपे स्थितप्रज्ञातें । वोळखों केवीं ॥ ८७ ॥ [स्थितधीः] आणि स्थिरबुद्धि जो [23]ह्मणिजे । [किं प्रभाषेत]

---

* योजले. † अभिप्राय.

---

१ उद्युक्त झाले. २ पार. ३ यांनीं. ४ न शिवती. ५ जन्ममरणादि एरझारा. ६ ब्रह्मानंदभरित, सुखानें भरलेला. ७ अविनाशी. ८ तेव्हां. ९ ह्मा. १० शिरेल. ११ निर्दोष. १२ अतिखोल, १३ निष्काम, निर्धास्त. १४ आपोआप. १५ सर्व. १६ राहील. १७ जी. १८ विस्तृत. १९ पुनः. २० चांगलें. २१ संतोषानें. २२ वर्णावें, ह्मणावें. २३ ह्मटला जातो, ह्मणावा.

तो कैसिया चिन्हीं जाणिजे । [समाधिस्थस्य केशव] जो समाधिसुख भुंजे[१] । अखंडित ॥ ८८ ॥ [किमासीत] तो कवणे स्थिती असे । [व्रजेत किं] कैसेनि रूपीं विलसे[२] । देवा सांगावें हें ऐसें । लक्ष्मीपती ॥ ८९ ॥ तंव परब्रह्म अवतरण[३] । जो षड्गुणाधिकरण[४] । तो काय श्रीनारायण[५] । बोलत असे॥२९०॥

श्रीभगवानुवाच–प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ५५ ॥

[श्रीभगवानुवाच–पार्थ] ह्मणे अर्जुना परियेसीं[६] । [मनोगतान्] जो हा अभिलाष[७] प्रौढ[८] मानसीं । तो अंतराय स्वसुखेंसीं । करीत असे ॥ ९१ ॥ जो सर्वदा नित्यतृप्त[९] । अंतःकरणभरित । परी विषयामाजि पतित । जेणें संगें कीजे ॥ ९२ ॥ [प्रजहाति यदा कामान्सर्वान्] तो काम सर्वथा जाये । [आत्मन्येवात्मना तुष्टः] जयाचें आत्मसंतोषीं मन राहे । [स्थितप्रज्ञस्तदोच्यते] तोचि स्थितप्रज्ञ होये । पुरुष जाणें ॥ ९३ ॥

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ ५६ ॥

[दुःखेष्विति] नाना दुःखीं प्राप्तीं[१०] । जया उद्वेग[११] नाहीं चित्तीं । आणि सुखाचिया आर्ती[१२] । अडपैचिजेना[१३] ॥९४॥ [वीतरागभयक्रोधः] अर्जुना तयाच्या ठायीं । कामक्रोध सहजें नाहीं । आणि भयातें नेणे कहीं[१४] । परिपूर्ण तो ॥ ९५ ॥ [स्थितधीर्मुनिरुच्यते] ऐसा जो निरवधी[१५] । तो जाण पां स्थिरबुद्धी । जो निरसूनि[१६] उपाधी[१७] । भेदरहित ॥ ९६ ॥

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।
नाभिनंदति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५७ ॥

[यः सर्वत्रानभिस्नेहः] जो सर्वत्र सदा सरिसा[१८] । परिपूर्ण चंद्र कां जैसा । अधमोत्तम प्रकाशा । माजि न ह्मणे ॥ ९७ ॥ ऐसी अनवच्छिन्न[१९] समता । भूतमात्रीं सदयता । [तत्तत्प्राप्य शुभाशुभं] आणि पालट नाहीं चित्ता । कवणे वेळे ॥ ९८ ॥ [नाभिनंदति न द्वेष्टि] गोमटें[२०] कांहीं पावे । तरी संतोषें तेणें *नाभि-

* न वैभवे.

१ भोगी. २ रममाण होतो, वर्तन करतो. ३ अवतार. ४ ऐश्वर्य, धर्म, यश, लक्ष्मी, ज्ञान, आणि विज्ञान हे सहा गुण यांचा आधार. ५ ऐक. ६ इच्छा. ७ प्रबल, मोठा. ८ विघ्न. ९ प्राप्त झालीं असतां. १० त्रास. ११ आशा. १२ अडचणींत पडत नाहीं. १३ कधीं. १४ केवळ. १५ सोडून. १६ उपसर्ग, संसार. १७ सारखा. १८ अखंड. १९ प्राणिमात्रावर. २० चांगलें. २१ ताटा पावत नाहीं.

भवे । जो ओखटेनि नागवे । विषादासी ॥ ९९ ॥ ऐसा हरिखशोकरहित । जो आत्मबोधभरित । [तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता] तो जाण पां प्रज्ञायुक्त । धनुर्धरा ॥ ३०० ॥

यदा संहरते चायं कूर्मोऽगानीव सर्वशः ।
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५८ ॥

[यदेति] कां कूर्म जिया परी । उवाइला अवेव पसरी । नातरी इच्छावशें आवरी । आपुले आपण ॥ १ ॥ [इंद्रियाणीति] तैसीं इंद्रियें आपैतीं । जयाचें म्हणितलें करिती । तयाची प्रज्ञा जाण स्थिती । पावली असे ॥ २ ॥ *

विषया विनिवर्तंते निराहारस्य देहिनः ।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥ ५९ ॥

[विषया इति] अर्जुना आणिकही एक । सांगेन ऐकें कवतिक । जे विषयातें साधक । त्यजिती नियमें ॥ ३ ॥ श्रोत्रादि इंद्रियें आवरिती । [रसवर्जं] परी रसेंने नियम न करिती । ते सहस्रधा कवळिजती । विषयीं इहीं ॥ ४ ॥ जैसी वरिवरी पालवी खुडिजे । आणि मुळीं उदक घालिजे । तरी कैसेनि नाश निपजे । तया वृक्षा ॥ ५ ॥ तो उदकाचेनि बळें अधिकें । जैसा आडवेनि आंगें फांके । तैसा मानसीं विषय पोखे । रसनाद्वारें ॥ ६ ॥ येरां इंद्रियां विषय तुटे । तैसा नियमूं नये रसु हटें । जे जीवनचि हें न घटे । येणेंविण ॥ ७ ॥ [रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते] मग अर्जुना स्वभावें । ऐसियाही नियमातें पावे । जैं कां परब्रह्म अनुभवें । होऊनि जाइजे ॥ ८ ॥ तैं शरीरभाव नासती । इंद्रियें विषय विसरती । जैं सोहंभावप्रतीती । प्रगट होय ॥ ९ ॥

यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः ।
इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥ ६० ॥

[पुरुषस्य विपश्चितः] येऱ्हवीं तरी अर्जुना । हें आंया नये साधना । जे जे रोहाटताति जतना । निरंतर ॥ ३१० ॥ [यततो ह्यपि कौंतेय] जयातें अभ्या-

* क्षेपक—तैं तयाची प्रज्ञा । स्थिर जाली प्राज्ञा । इये अर्थीं अवज्ञा । करूं नको ॥ ३०३ ॥

१ वाईटानें. २ पावत नाहीं. ३ दुःखाला. ४ हर्ष. ५ कांसव. ६ आनंदांत असतां. ७ अवयव. ८ स्वाधीन. ९ म्हटलेलें. १० नवल. ११ मुमुक्षु, योगसाधन करणारे. १२ नियमन करून, दमन करून. १३ वासनेचा, अभिलाषाचा. १४ हजारों प्रकारांनीं. १५ वेढले जातात. १६ खुडावी, छेदावी. १७ विस्तारतो. १८ वासनाद्वारें. १९ इतर. २० इच्छेचा निग्रह होतो. २१ जीव देणारें. २२ आपण ब्रह्म असा अनुभव. २३ स्वाधीनतेस. २४ वागतात. २५ यत्नानें.

साची धरटी । यमनियमांची तोटी । जे मनातें सदा मुठी । धरूनि आहाति ॥ ११ ॥ [इंद्रियाणि प्रमाथीनि] तेंही किजती कासाविसी । या इंद्रियांची प्रौढी ऐसी । जैसी मंत्रज्ञातें विंवसी । भुलवी कां ॥ १२ ॥ देखें विषय हे तैसे । पावती ऋद्धिसिद्धीचेनि मिषें । [हरंति प्रसभं मनः] मग आकळिती स्पर्शें । इंद्रियांचेनी ॥ १३ ॥ तिये संधी मन जाये । मग अभ्यासीं थोटावलें ठाये । ऐसें बळकटपण आहे । इंद्रियांचें ॥ १४ ॥

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।
वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६१ ॥

[तानि सर्वाणि संयम्य] *ह्मणोनि आइकें पार्था । यांतें निर्दळी जो सर्वथा । सर्वविषयीं आस्था । सांडूनियां ॥ १५ ॥ [तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता] तोचि तूं जाण । योगनिष्ठेसि कारण । [वशे हि यस्येंद्रियाणि] जयाचें विषयसुखें अंतःकरण । †झकवे ना ॥ १६ ॥ [युक्त आसीत मत्परः] जो आत्मबोधयुक्त । होऊनि असे सतत । जो मातें हृदयाआंत । विसंबेना ॥ १७ ॥ येन्हवीं बाह्य विषय तरी नाहीं । परी मानसीं होईल जरी कांहीं । तरी सांद्यंतचि पाहीं । संसार असे ॥ १८ ॥ जैसा कां विषाचा लेश । घेतलियां ‡होय बहुवस । मग निभ्रांत करी नाश । जीवितासी ॥ १९ ॥ तैसी विषयाची शंका । मनीं वसती देखा । घात करी अशेखा । विवेकजाता ॥ ३२० ॥

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२ ॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥

[ध्यायत इति] जरी हृदयीं विषयस्मृति । तरी निःसंगाही आपजे संगती । [संगात्संजायते कामः] संगें प्रगटे मूर्ती । अभिलाषाची ॥ २१ ॥ [कामात्क्रोधोऽभिजायते] जेथ काम उपजला । तेथ क्रोध आधींचि आला । [क्रोधाद्भवति संमोहः] क्रोधीं असे ठेविला । संमोह जाणें ॥ २२ ॥ [संमोहात्स्मृतिविभ्रमः] संमोहा जालियां व्यक्ती । तरी नाश पावे स्मृती । चंडवातें ज्योती । हरे जैसी ॥ २३ ॥ कां अस्तमानीं निशि । जैसी सूर्यतेजातें ग्रासी । तैसी दशा स्मृतिभ्रंशीं ।

* हेंचि सार गा. † झांकवेना. ‡ होत.

१ गस्त. २ बांध. ३ आहेत. ४ योगाभ्यासीही. ५ केले जातात. ६ महत्त्व, बळ. ७ भूत. विघ्नदेवता. ८ निर्बल होऊन राहतें. ९ संहारी. १० फसत नाहीं. ११ विसरत नाहीं. १२ सर्व, १३ अल्पस्वल्प. १४ स्मरण. १५ उपजे. १६ प्रचंड वाऱ्यानें. १७ नष्ट. १८ रात्र.

प्राणियासी ॥ २४ ॥ [स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो] मग अज्ञानांध केवळ । तेणें आप्लु-विजे सकळ । तेथ बुद्धि होय व्याकुळ । हृदयामाजी ॥ २५ ॥ जैसें जात्यंधा पैंळणी पावे । मग तें काकुळती सैरा धांवे । तैसी बुद्धीसि होती भंवे । धनुर्धरा ॥ २६ ॥ ऐसा स्मृतिभ्रंश घडे । मग सर्वथा बुद्धि अवघडे । तेथ समूळ हें उपडे । ज्ञानजात ॥ २७ ॥ [बुद्धिनाशात्प्रणश्यति] चैतन्याच्या भ्रंशीं । शरीरा दशा जैसी । तैसें पुरुषा बुद्धिनाशीं । होय देखें ॥ २८ ॥ म्हणोनि आइकें अर्जुना । जैसा विस्फुलिंग लागे इंधना । मग तो प्रौढ जालिया त्रिभुवना । पुरों शके ॥ २९ ॥ तैसें विषयांचें ध्यान । जरी विषायें वाहे मन । तरी येसणें हें पतन । गिंवसीत पावे ॥ ३० ॥

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ६४ ॥

[विधेयात्मा] म्हणोनि विषय आघवे । सर्वथा मनौनि सांडावे । [रागद्वेषेत्सर्धी] मग राग द्वेष स्वभावें । नाशतील ॥३१॥ पार्था आणिकही एक । जरी नाशले हे रागद्वेष । तरी इंद्रियां विषयीं बाधक । रमतां नाहीं ॥ ३२ ॥ जैसा सूर्य आकाशगत । रश्मिकरें जगातें स्पर्शत । तरी संगदोषें काय लिंपत । तेथिचेनि ॥ ३३ ॥ तैसा इंद्रियार्थीं उदासीन [आत्मवश्यैः] आत्मरसींचे निर्भिन्न । जो कामक्रोधविहीन । होऊनि असे ॥ ३४ ॥ तरी † विषयांतही कांहीं । आपणपेंवांचूनि नाहीं । मग विषय कवण कायी । बाधितील कवणा ॥ ३५ ॥ जरी उदकीं उदकें बुडिजे । कां अग्नि आगी पोळिजे । तरी विषयसंगें आप्लुविजे । परिपूर्ण तो ॥ ३६ ॥ ऐसा आपणचि केवळ । होऊनि असे निखिल । [प्रसादमधिगच्छति] तयाची प्रज्ञा अचळ । निभ्रांत मानीं ॥ ३७ ॥

प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ६५ ॥

[प्रसादे इति] देखें अखंडित प्रसन्नता । आथी जेथ चित्ता । तेथ रिगणें नाहीं समस्तां । संसारदुःखां ॥ ३८ ॥ जैसा अमृताचा निर्झर । प्रसवे जयाचा

* रश्मीकरूनि. † विषयांतया.

१ बुडवावें, बुडतें. २ म्लान, कासावीस. ३ जन्मांधाला. ४ धांवाधांव. ५ दीनतेनें. ६ कसें तरी, हवें तिकडे. ७ भ्रम, जन्ममरण. ८ अवघडली जाते. ९ उपड़ून जातें. १० जीवाच्या नाशानें. ११ ठिणगी. १२ जळणाला. १३ कदाचित्. १४ येवढें. १५ शोधित येतें. १६ मनांतून, मनापासून. १७ इंद्रियांसि विषयसेवनानें. १८ किरणांनीं. १९ लिप्त होतो. २० इंद्रियांनीं ग्राह्य विषयांचे ठायीं. २१ परिपूर्ण. २२ रहित. २३ स्वतःआपणाशिवाय. २४ बुडेल. २५ सर्व. २६ बुद्धि. २७ आहे. २८ प्रवेश करणें. २९ झरा.

जेठर[1] । तया क्षुधेतृषेचा अडदर[2] । कांहींचि नाहीं ॥ ३९ ॥ [प्रसन्नचेतस इति] तैसें हृदय प्रसन्न होये । तरी दुःख कैंचें[3] कें आहे । तेथ अपैसी[4] बुद्धि राहे । परमात्मरूपीं ॥ ३४० ॥ जैसा निर्वातींचा[5] दीप । सर्वथा नेणें कंप[6] । तैसा स्थिरबुद्धि *स्वस्वरूप[7] । योगयुक्त ॥ ४१ ॥

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चाऽयुक्तस्य भावना ।
न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ॥ ६६ ॥

[अयुक्तस्य] ये युक्तीची कैंडसणी[8] । नाहीं जयाच्या अंतःकरणीं । तो आकळिला जाण गुणीं[9] । विषयादिकीं ॥ ४२ ॥ [नास्ति बुद्धिः] तया स्थिरबुद्धि पार्था । कहीं[10] नाहीं सर्वथा । [न चायुक्तस्य भावना] आणि स्थैर्याची आस्था । तेही नुपजे ॥४३॥ [न चाभावयतः शांतिः] निश्चळत्वाची भावना । जरी नव्हेचि देखें मना । तरी शांति केवीं[11] अर्जुना । आंप[12] होय ॥ ४४ ॥ [अशांतस्य कुतः सुखं] जेथ शांतीचा जिव्हाळा[13] नाहीं । तेथ सुख विसरोनि न रिघे कहीं । जैसा पापियाच्या ठायीं । मोक्ष न वसे ॥ ४५ ॥ देखें अग्निमाजि घांपती[14] । तियें बीजें जरी विरूढती[15] । तरी अशांता[16] सुखप्राप्ती । घडों शके ॥ ४६ ॥ ह्मणोनि अयुक्तपण[17] मनाचें । तेंचि सर्वस्व दुःखाचें । याकारणें इंद्रियांचें । दमन[18] †कीजे ॥ ४७ ॥

इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ।
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवांभसि ॥ ६७ ॥

[इंद्रियाणामिति] इंद्रियें जें जें ह्मणती । तें तेंचि जे पुरुष करिती । ते तरलेचि न तरती । विषयसिंधु ॥ ४८ ॥ [तदस्येति] जैसी नाव थंडियें[19] ठाकितां । जरी वरेपडी[20] होय ‡दुर्वाता[21] । तरी चुकलाही मागौता[22] । अपावो[23] पावे ॥ ४९॥ तैसी प्राप्तेंही पुरुषें । इंद्रियें लोंलिलीं[24] जरी कौतुकें । तरी ओंकमिला[25] जाण दुःखें । संसारिकें[26] ॥ ३५० ॥

तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६८ ॥

[तस्मादिति] ह्मणोनि आपुलीं आंपणपया[27] । जरी इंद्रियें येती आंया[28] ।

---

* सत्स्वरूप. † निकें. ‡ दुस्वर्ता.

१ उदर. २ भय. ३ कोठें. ४ आपोआप. ५ निवाऱ्यांतला. ६ विचार. ७ पाशांनीं. ८ शब्दादिकांनीं. ९ कधीं. १० कशी. ११ प्राप्त. १२ उद्भव. १३ घातलेलीं. १४ उगवती. १५ द्वैतभाव असणाऱ्यास, दुश्चित्तास. १६ अनियमितपण. १७ निग्रह. १८ तीरास. १९ प्राप्त. २० भोंवरा, वादळ. २१ पुनः. २२अपाय. २३ पोशिलीं. २४ ओढिला. २५ संसारसंबंधी. २६ आपणास. २७ स्वाधीन.

तरी अधिक कांहीं धनंजया । सार्थक असे ॥ ५१ ॥ देखें कूर्म जियापरी । उवाइला[1] अवयव पसरी । नातरी इच्छावशें आवरी । आपणपेंचि[2] ॥ ५२ ॥ [इंद्रियाणीति] तैसीं इंद्रियें अपैतीं[3] होती । जयाचें ह्मणितलें करिती । तयाची प्रज्ञा जाण स्थिती । *पातली असे ॥ ५३ ॥ आतां †आणिक एक गोहन[4] । पूर्णाचें चिन्ह । अर्जुना तुज सांगेन । ‡परिस पां ॥ ५४ ॥

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ ६९ ॥

[या निशेति] देखें भूतजात[5] निदेलें[6] । तेथेंचि जया पाहलें[7] । [यस्यामिति] आणि जीव जेथ चेईले[8] । तेथ निद्रित जो ॥ ५५ ॥ तोचि तो निरुपाधि[9] । अर्जुना तो स्थिरबुद्धि । तोचि जाणें निरवधि । मुनीश्वर ॥ ५६ ॥

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशंति यद्वत् ।
तद्वत्कामा यं प्रविशंति सर्वे स शांतिमाप्नोति न कामकामी ॥७०॥

[आपूर्यमाणमिति] पार्था आणीकही परी । तो जाणों येईल । अवधारीं । [समुद्रमापः प्रविशंति यद्वत्] जैसी अक्षोभता[10] सागरीं । अखंडित ॥ ५७ ॥ जन्ही सरितौघ[11] समस्त । परिपूर्ण होऊनि मिळत । तन्ही अधिक नोहे §ईषत[12] । मर्यादा न सांडी ॥ ५८ ॥ ना तरी ग्रीष्मकाळीं सरिता । शोषूनि जाती ¶समस्ता । परी न्यून नव्हे पार्था । समुद्र जैसा ॥ ५९ ॥ [तद्वदिति] तैसा प्राप्तीं ऋद्धि सिद्धी । तयासि क्षोभ नाहीं बुद्धी । आणि न पवतां न बाधी । अधृति[13] तयातें ॥ ३६० ॥ सांगें सूर्याच्या घरीं । प्रकाश काय[14] $वाती[15]-वेन्ही । कां न लविजे[16] तरी अंधकारीं । कोंडेल तो ॥ ६१ ॥ देखें ऋद्धि सिद्धि तयापरी । आली गेली से[17] न करी । तोचि गुंतला असे अंतरीं । महासुखीं ॥ ६२ ॥ जो आपुलेनि नागरपणें[18] । इंद्रभुवनातें पांबळें[19] ह्मणे । तो केविं रंजे पालवणें[20] । भिल्लांचेनि ॥ ६३ ॥ जो अमृतातें ठिं[21] ठेवीं । तो जैसा कांजी न सेवी । तैसा स्वसुखानुभवी । न भोगी ऋद्धि ॥ ६४ ॥ पार्था नवल हें पाहीं । जेथ स्वर्गसुखा लेखणी[22] नाहीं । [न कामकामी] तेथ ऋद्धिसिद्धि कायी । प्रार्थिता होती ॥ ६५ ॥

---

* पावली. † आणिकही. ‡ परियेसीं पां. § निश्चित. ¶ सर्वथा. $ वातीवरी.

---

१ सुखावलेला, स्वेच्छा. २ स्वतः. ३ वश. ४ खोल, गूढ. ५ प्राणिमात्र. ६ निजलेलें. ७ उजाडलें. ८ जागे झाले. ९ उपाधी रहित. १० शांतता. ११ नद्यांचा प्रवाह. १२ किंचित्. १३ अधैर्य. १४ सारखा, एवढा. १५ न लावील. १६ आठवण, स्मृति. १७ शहाणपणानें, आपल्या घराच्या सौंदर्यानें. १८ तुच्छ, हलकें. १९ पर्णकुटीनें. २० नांव, दोष. २१ परवा, गणना. २२ अल्प, साधारण.

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः ।
निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति ॥ ७१ ॥

[स शांतिमधिगच्छति] ऐसा आत्मबोधें तोषला । जो परमानंदें पोखला[1] । तोचि स्थिरप्रज्ञ[2] भला । वोळख तूं ॥ ६६ ॥ [निर्ममो निरहंकारः] तो अहंकारातें दवडुनी । [विहायेति] सकळ काम सांडुनी । विचरे[3] विश्व होउनी । विश्वामाजी ॥ ६७ ॥

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।
स्थित्वाऽस्यामंतकालेऽपि ब्रह्म निर्वाणमृच्छति ॥ ७२ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
सांख्ययोगो नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

[एषेति] हे ब्रह्मस्थिति[4] निःसीम[5] । जे[6] अनुभविती[7] निष्काम । [ब्रह्मनिर्वाणमृच्छति] ते पावले परब्रह्म । अनायासें ॥ ६८ ॥ [स्थित्वाऽस्यामंतकालेऽपि] जे चिद्रूपीं मिळतां । देहांतींची व्याकुळता । आड ठाकों न सके चित्ता । *प्राज्ञा[8] जया[9] ॥ ६९ ॥ तेचि हे स्थिति[10] । स्वमुखें श्रीपति । सांगत अर्जुनाप्रति । संजयो ह्मणे ॥ ३७० ॥ [उत्तराध्यायबीजं] ऐसें कृष्णवाक्य ऐकिलें । तेथ अर्जुनें मनीं ह्मणितलें । आतां आमुचिया †काजा आलें । उपपत्ती[11] इया ॥ ७१ ॥ जें कर्मजात[12] आघवें । एथ निराकारिलें[13] देवें । तरी पारुषलें[14] म्यां जुंझावें । ह्मणूनियां ॥७२॥ ऐसा श्रीअच्युताचिया बोला । चित्तीं धनुर्धर उबायिला[15] । आतां प्रश्न करील भला । आशंकोनी ॥ ७३ ॥ तो प्रसंग असे नागर[16] । जो सकळ धर्मासि आगर[17] । कीं विवेकामृतसागर । प्रांतहीन[18] ॥ ७४ ॥ जो आपण सर्वनाथ । निरूपिता होईल श्रीअनंत । ज्ञानदेव सांगेल मात । निवृत्तिदास ॥ ३७५ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

श्लोक ७२, ओव्या ३७५.

---

* प्रज्ञा. † काजा कीर आलें.

१ पोसला, पुष्ट झाला. २ स्थिरबुद्धि. ३ फिरे. ४ सीमारहित. ५ ज्ञानस्वरूपांत. ६ ज्ञान्याला. ७ ज्या ब्रह्मस्थितीनें. ८ युक्ति. ९ सर्व कर्मे. १० निषेधिलें. ११ राहिलें. १२ हर्ष पावला. १३ सुंदर. १४ उत्पत्तिस्थान. १५ अमर्याद, पाररहित.

ज्ञानेश्वरी.

अध्याय ३ रा.

अर्जुन उवाच–ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।
तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥ १ ॥

[अर्जुन उवाच–ज्यायसीति] मग आइका अर्जुनें ह्मणितलें । देवा तुह्मी जें वाक्य बोलिलें । तें म्यां निकें[१] परिसिलें । कृपानिधी ॥ १ ॥ *तेथ कर्म आणि कर्ता । उरेचिना पाहतां । ऐसें मेत[२] तुझें श्रीअनंता । निश्चित जरी ॥ २ ॥ [तदिति] तरी मातें केविं श्रीहरी । ह्मणसी पार्था संग्राम करीं[३] । ईये[४] लाजसीना महाघोरीं । कर्मीं सुतां[५] ॥ ३ ॥ हां गा कर्म तूंचि अशेष[६] । निराकारिसी निःशेष[७] । तरी मजकरवीं हें सिंहक[८] । कां †करविसी ॥ ४ ॥ तरी हेंचि विचारीं श्रीहृषीकेशा । तूं ‡मान देसी[९] कर्मलेशा[१०] । आणि येसणी[११] हे हिंसा । करवीत आहासी ॥ ५ ॥

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥ २ ॥

[व्यामिश्रेणेति] देवा तुवांचि ऐसें बोलावें । तरी §आह्मी नेणतीं[१२] काय करावें । आतां संपलें[१३] ह्मणों पां आघवें । विवेकाचें[१४] ॥ ६ ॥ हां गा उपदेशु जरी ऐसा । तरी अपभ्रंश[१५] तो कैसा । आतां पुरेला[१६] आह्मा धिवसा[१७] । आत्मबोधाचा ॥ ७ ॥ वैद्य पथ्य वारूनि जाये । मग जरी आपणचि विष[१८] सुये[१९] । तरी रोगिया कैसेनि जिये[२०] । सांगें मज ॥ ८ ॥ जैसें आंधळें सुइजे[२१] ओंह्मटा[२२] । ¶कां मोजवण[२३] दिजे मर्कटा[२४] । तैसा उपदेश हा गोमटा[२५] । वोढवेला[२६] आह्मां ॥ ९ ॥ मी आधींचि कांहीं नेणें । वरी कवळिलों[२७] मोहें[२८] येणें । श्रीकृष्णा विवेक याकारणें[२९] । पुसिला तुज ॥ १० ॥ तंव तुझी एकेक नवाई[३०] । एथ उपदेशामाजि गोवाई[३१] ।

* जेथ. † करविसी तूं. ‡ मानुन देसी. § नेणतीं आम्हीं. ¶ कीं.

१ चांगलें. २ मनोगत, अभिप्राय. ३ युद्ध. ४ ह्या. ५ घालितां. ६ सर्व. ७ निषेधिसी. ८ वध, हिंसा. ९ कर्ममार्गास. १० एवढी. ११ अज्ञान्यांनीं. १२ आटपलें काय? १३ विचाराचें. १४ भ्रष्टपणा. १५ पूर्ण झाला. १६ मनोरथ, इच्छा. १७ सांगून. १८ घालील. १९ वांचेल. २० धाडावें, घालवावें. २१ आडमार्गीं. २२ मद्य आदि कैफी पदार्थ. २३ माकडाला. २४ सुरेख, आवडता. २५ मात झाला. २६ ग्रस्त झालों. २७ भ्रांतीनें. २८ नवल, मजा. २९ गुंतागुंत.

श्री. श्रीनिवास मोडक, पुणे

तरी [1]अनुसरालिया काई । ऐसें कीजे ? ॥ ११ ॥ आह्मीं [2]तेनुमनजिवें । तुझिया बोला वोठंगावें [3]। आणि तुवांचि ऐसें करावें । तरी सरलें ह्मणें ॥ १२ ॥ आतां ऐसियापरी बोधिसी । तरी निकें [4]आह्मां करिसी । एथ ज्ञानाची [5]आस कायसी । अर्जुन ह्मणे ॥ १३ ॥ तरी ये [6]जाणिवेचें कीर [7]सरलें । [बुद्धि मोहयसीव मे] परी आणीक एक असें जाहालें । *[8]जे थितें [9]डहुळलें । मानस माझें ॥ १४ ॥ तेवींचि श्रीकृष्णा हें तुझें । चरित्र कांहीं नेणिजे । †[10]जरी चित्त पाहसी माझें । येणें मिषें ॥ १५ ॥ नातरी [11]झकवीत आहासी मातें । कीं [12]तत्त्वाचि कथिसी [13]धवतिनें । हें [14]अवगमितां [15]निरुतें । जाणवेना ॥ १६ ॥ [तदेकं वद निश्चित्य] ह्मणोनि आइकें देवा । हा भावार्थ आतां न बोलावा । मज विवेक सांगावा । [16]मल्हाटा जी ॥ १७ ॥ मी अत्यंत [17]जड असें । परि ऐसाहि ‡[18]निकें परियेसें । श्रीकृष्णा बोलावें तुवां तैसें । §[19]एकनिष्ठ ॥ १८ ॥ देखें रोगातें [20]जिणावें । औषध तरी देयावें [21]। परी तें अति [22]रुच्य व्हावें । मधुर जैसें ॥ १९ ॥ तैसें सकळार्थभरित । तत्त्व सांगावें तरी [23]उचित । [येन श्रेयोऽहमाप्नुयां] परी [24]बोधे माझें चित्त । जयापरी ॥ २० ॥ देवा तुजऐसा निज गुरु । आजि [25]आर्तीधणी कां न करूं । एथ भीड [26]कवणाची धरूं । तूं माय आमुची ॥ २१ ॥ हां गा कामधेनूचें [27]दुभतें । दैवें जाहालें [28]आपैतें । तरी कामनेची कां तेथें । [29]वाणि कीजे ॥ २२ ॥ जरी चिंतामणी हाता चढे । तरी वांछेचें कवण [30]सांकडे । कां आपुलेनि [31]सुरवाडें । इच्छावें ना ॥ २३ ॥ देखें अमृतसिंधूतें ठाकावें । मग [32]तहानाचि जरी [33]फुटावें । तरी [34]सायास कां करावे । मागील ते ॥ २४ ॥ तैसा जन्मांतरीं बहुतीं । ¶उपासितां श्रीकमळापती । तो तूं दैवें आजि हातीं । जाहालासि जरी ॥ २५ ॥ तरी [35]आपुलेया सवेसा [36]। कां न मागावासि परेशा । देवा [37]सुकाळ हा मानसा । [38]पाहिला असे ॥ २६ ॥ देखें [39]सकळार्तिचें [40]जियालें । आजि पुण्य [41]यशासि आलें ।

---

* जें थितें होतें. † परी. ‡ निका. § एकनिष्ठा. ¶ उपासिती कमळापति । तूं दैवें.

१ शरणागताला. २ सर्वप्रकारें. ३ आश्रय करावा. ४ कल्याण. ५ घोटाळा. ६ इच्छा. ७ ज्ञानाचें. ८ निश्चयें. ९ स्थिर (स्थित) असलेलें. १० या निमित्तानें. ११ फसवीत आहेस. १२ ब्रह्मस्वरूप. १३ गूढार्थानें. १४ अनुमान करितां. १५ खरें, निश्चित. १६ स्पष्ट, प्राकृत. १७ मंदमति. १८ चांगलें. १९ भक्ति ठेवण्यास एकच योग्य, निष्ठेस एकच योग्य. २० जिंकावें. २१ द्यावें. २२ स्वादिष्ट, रुचिकर. २३ योग्य. २४ समज घेईल. २५ इच्छेची तृप्ति. २६ मर्यादा. २७ दूध आदि गोरस. २८ प्राप्त. २९ कमताई. ३० संकट. ३१ सुखें, आवडेल तसें. ३२ प्राप्त व्हावें. ३३ ताहानेनें तडफडावें. ३४ अमृतसिंधूपाशीं येऊन अमृत प्राप्त होण्याचा सायास कां ? ३५ आपल्या. ३६ स्वेच्छेनें. ३७ समृद्धि. ३८ झाला. ३९ सर्व इच्छेचे. ४० जीवसाफल्य. ४१ फळास.

पुणे नगर वाचन मंदिर, पुणे

हे मनोरथ जाहाले । विजयी माझे ॥ २७ ॥ जी जी परममंगळधामा । सकळदेवदेवोत्तमा । तूं स्वाधीन आजि आह्मां । ह्मणऊनियां ॥ २८ ॥ जैसें मातेच्या ठायीं । अपत्या अनवसर नाहीं । स्तन्यालागूनि पाहीं । जियापरी ॥ २९ ॥ तैसें देवा तूतें । *पुसिजतसें आवडे तें । आपुलेनि आर्तें । कृपानिधी ॥ ३० ॥ तरी पैरत्रिकीं हित । आणि आचरितां तरी उचित । तें सांगें एकनिश्चित । पार्थ ह्मणे ॥ ३१ ॥

श्रीभगवानुवाच–लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥ ३ ॥

[पुरा प्रोक्ता मयानघ] या बोला श्रीअच्युत । ह्मणत असे विस्मित । अर्जुना हा धर्वनित । अभिप्रावो ॥ ३२ ॥ जे बुद्धियोग सांगतां । †सांख्यमतसंस्था । प्रकटिली स्वभावता । प्रसंगें आह्मी ॥ ३३ ॥ तो उद्देश तूं नेणसीचि । ह्मणोनि ‡क्षिणलासि वायांचि । तरी आतां जाणें मीचि । उक्त दोन्हीं ॥ ३४ ॥ अवधारीं वीरश्रेष्ठा । [लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा] ये लोकीं या दोनी निष्ठा । मजचि पासूनि प्रगटा । अनादिसिद्धा ॥ ३५ ॥ [ज्ञानयोगेन सांख्यानां] एक ज्ञानयोग ह्मणिजे । जो सांख्यीं अनुष्ठिजे । जेथ वोळखीसवें पाविजे । तद्रूपता ॥ ३६ ॥ [कर्मयोगेन योगिनां] एक कर्मयोग जाण । जेथ साधकजन §निपुण । होऊनियां निर्वाण । पावती वेळे ॥ ३७ ॥ हे मार्ग तरी दोनी । परी एकवटती निदानीं । जैसी सिद्धसाध्यभोजनीं । तृप्ति एक ॥ ३८ ॥ कां पूर्वापर सरिता । भिन्न दिसती वाहतां । मग सिंधूमिळणीं ऐक्यता । पावती शेखीं ॥ ३९ ॥ तैसीं दोनीही मतें । सूचिती एका कारणातें । परी उपास्ति ते योग्यते । आधीन असे ॥ ४० ॥ देखें उत्पळवनासरिसा । पक्षी फळासि झोंबे जैसा । सांगें नर केविं तैसा । पावे ¶वेगा ॥ ४१ ॥ तो हळू हळू ढोलेंढाळें । केतुलेनि एके वेळे । मार्गाचेनि बळें । निश्चित ठाकी ॥ ४२ ॥ तैसें देख पां विहं-

---

* पुसिजेतसें आवडतें. † सांख्ययोगसंस्था. ‡ क्षोभलासि. § निष्पण्ण. ¶ वेगें पावे तें.

---

१ जयशाली. २ कल्याणाचें स्थान. ३ अवेळ. ४ दुग्धपानाला. ५ इच्छेनें. ६ परलोकीं. ७ साश्चर्य. ८ संक्षिप्त. ९ ज्ञानयोग. १० आत्मानात्मविचार. ११ हेतु, मतलब, अर्थ. १२ श्रमलास. १३ ज्ञानयोग व कर्मयोग. १४ नियमस्थिति, मोक्षपरता. १५ नित्यसिद्ध. १६ आचरावा. १७ ब्रह्मरूपत्व. १८ मुमुक्षु. १९ कुशल. २० मोक्ष. २१ चित्तशुद्धिकालीं. २२ एकत्र होतात. २३ शेवटीं. २४ तयार व तयार करण्याचें अन्न. २५ किंवा. २६ पूर्वपश्चिम नद्या. २७ समुद्रांत मिळाल्यानें. २८ अखेरीस. २९ सुचवितात. ३० उपासना. ३१ उड्डाणावरोवर. ३२ या ढाळीवरून त्या ढाळीवर. ३३ कांहीं वेळानें. ३४ साधतो.

गममतें । अधिष्टूनि ज्ञानातें । सांख्य सेंद्य मोक्षातें । आकलिती ॥ ४३ ॥ येर योगिये कर्माधारें । विहितेंचि निजाचारें । पूर्णता अवसरें । पावते होती ॥४४॥

न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।
न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ॥ ४ ॥

[न कर्मणामनारंभात्] वांचोनि कर्मारंभ उचित । न करितां सिद्धवत । कर्महीना निश्चित । होइजेना ॥ ४५ ॥ कीं प्राप्तकर्म सांडिजे । येतुलेनि *नैष्कर्म्य होइजे । हें अर्जुना वायां बोलिजे । मूर्खपणें ॥ ४६ ॥ [सिद्धिं समधिगच्छति] सांगें पैलतीरा जावें । ऐसें व्यसन कां जेथ पावे । तेथ नावेतें त्यजावें । घडे केवीं ॥ ४७ ॥ [अश्नुते] ना तरी तृप्ति इच्छिजे । तरी कैसेनि पाक न कीजे । कीं सिद्धही न सेविजे । केविं सांगें ॥ ४८ ॥ जंव निरीतता नाहीं । तंव व्यापार असे पाहीं । मग संतुष्टीच्या ठायीं । कुंठे सहजें ॥ ४९ ॥ [नैष्कर्म्यं पुरुषः] ह्मणोनि आइकें पार्था । जया नैष्कर्म्यपदीं आस्था । तया उचित कर्म सर्वथा । त्याज्य नोहे ॥ ५० ॥ [न च संन्यसनादेव] आणि आपुलालिये चाडे । आपादिलें हें मांडे । कीं त्यजिलें कर्म सांडे । ऐसें आहे ॥ ५१ ॥ हें वायांचि सैरा बोलिजे । †उकल तरी देखोनि पाहिजे । परी त्यजितां कर्म न त्यजे । निभ्रांत मानीं ॥ ५२ ॥

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ५ ॥

[प्रकृतिजैर्गुणैः] जंव प्रकृतीचें अधिष्ठान । तंव सांडी मांडी हें अज्ञान । जे चेष्टा ते गुणाधीन । अपैसी असे ॥ ५३ ॥ [कार्यते ह्यवशः कर्म सर्वः] देखें विहितें कर्म जेतुलें । तें सगळें जरी वोसंडिलें । तरी स्वभाव काय निमाले । इंद्रियांचे ॥ ५४ ॥ सांगें श्रवणीं ऐकावें ठेलें । कीं नेत्रींचें तेज गेलें । हें नासारंध्र बुझालें । परिमळ नेघे ॥ ५५ ॥ ना तरी प्राणापानगति । कीं निर्विकल्प जा-

* निःकर्म, नैष्कर्म्या. † उकलों.

१ पक्षीपद्धतीनें. २ आश्रय करून. ३ ज्ञानी. ४ लगेच. ५ इतर. ६ वर्णाश्रमधर्माला विहित कर्मानें. ७ अवकाशानें. ८ कर्म केल्यावांचून सिद्धासारिखें कर्महीन निश्चयानें होववत नाहीं. ९ एवढ्यानें. १० कर्म न करण्यास योग्य. ११ आशा. १२ निरिच्छपणा. १३ परमहंसस्थिति, मोक्षपदीं. १४ इच्छेकरितां. १५ संपादिलें. १६ घडेल. १७ स्वच्छंद, अद्वातद्वा. १८ अनुभव; पाहिजे तर विचार करून उलगडा कर. १९ मायेचें. २० आश्रय. २१ त्याग व ग्रहण. २२ वर्तन. २३ आपोआप. २४ शास्त्रोक्त. २५ जितकें. २६ टाकिलें. २७ लय पावले. २८ बंद झालें. २९ नाकाचें भोंक. ३० हृदयस्थ व गुदस्थ वायूची गति. ३१ कल्पनारहित.

हाली मति[1]। कीं क्षुधातृषादि आर्ति[3]। खुंटलिया ॥ ५६ ॥ हे स्वभावबोध[3] ठेले। कीं चरण चालों विसरले। हें असो काय निमाले[4]। जन्म मृत्यू ॥ ५७ ॥ हें न ठकेची[5] जरी कांहीं। तरी *सांडिलें तें कायी। ह्मणोनि कर्मत्याग नाहीं। प्रकृतिमंतां[6] ॥ ५८ ॥ †कर्म पराधीनपणें। निपजत असे प्रकृतिगुणें। येरीं धरी, मोकळीं, अंतःकरणें। वाहिजे[7] वायां ॥ ५९ ॥ देखें रथीं आरूढिजे। मग जरी निश्चळ बैसिजे। तरी‡ चळ होऊनि हिंडिजे। परतंत्रा ॥ ६० ॥ कां उचलिलें वायुवशें। चळे शुष्क पत्र जैसें। निचेष्ट[8] §आकाशें। परिभ्रमे ॥ ६१ ॥ [नहीत्यर्थ] तैसें प्रकृतिआधारें। कर्मेंद्रियविकारें। निष्कर्मही[9] व्यापारे। निरंतर ॥ ६२ ॥ ह्मणऊनि संग जंव प्रकृतीचा। तंव त्याग न घडे कर्माचा। ऐसियाहि[10] करूं ह्मणती तयांचा। आग्रहचि उरे ॥ ६३ ॥

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्।
इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ ६ ॥

[कर्मेंद्रियाणि संयम्य] जे उचित कर्म सांडिती। मग नैष्कर्म्य[11] हों पाहती। परी कर्मेंद्रियप्रवृत्ती। निरोधुनी[12] ॥ ६४ ॥ [य आस्ते मनसा स्मरन्] तयां कर्मत्याग न घडे। जें कर्तव्य मनीं सांपडे। [मिथ्याचारः स उच्यते] वरी नटती तें फुंडें[13]। दरिद्र जाण ॥ ६५ ॥ [इंद्रियार्थान् विमूढात्मा] ऐसे ते पार्था। विषयासक्त सर्वथा। वोळखावे तत्त्वता। भ्रांति नाहीं ॥ ६६ ॥ आतां देईं अवधान[14]। प्रसंगें तुज सांगेन। या नैराश्याचें[15] चिन्ह। धनुर्धरा ॥ ६७ ॥

यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन।
कर्मेंद्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥

[यस्त्विति] जो अंतरीं दृढ। परात्मरूपीं गूढ। ¶बाह्य तरी रूढ[16]। लौकिकें[17] जैसा ॥ ६८ ॥ तो इंद्रियां आज्ञा न करी। विषयांचें भय न धरी। प्राप्त कर्म नाव्हेरी[18]। उचित जें जें ॥ ६९ ॥ [कर्मेंद्रियैः कर्मयोगं] तो कर्मेंद्रियें कर्मीं। रोहटतां[19] तरी न नियमी[20]। परी तेथिचेनि उर्मी[21]। झांकोळेना[22] ॥ ७० ॥ [असक्तः] तो कामनामात्रें न धेपे[23]। मोहमळें न लिंपे। जैसें जळीं जळें न शिंपे[24]।

---

* सांडिलें येथ तें. † कर्म परतंत्रा पराधीनपणें. ‡ तरी न चालतां जाइजे। परतंत्रपणें. § निचेष्ट परी. ¶ बाह्यांतरीं.

---

१ मन. २ इच्छा. ३ निजणें व जागणें. ४ चुकले. ५ न राहे. ६ देहाभिमान्यांला, मायाधीनांला, ७ समजणें व्यर्थ. ८ वाळलेलें पान. ९ चैतन्यरहित. १० निष्काम. ११ इतक्यावर. १२ कर्मविमुक्त होऊं. १३ आखडून, आवरून. १४ स्पष्ट. १५ लक्ष. १६ निरिच्छतेचें, निरिच्छांचें. १७ बाह्यात्कारीं. १८ आचरणारा. १९ जनाचार, लोकाचार. २० न टाकी. २१ वागत असतां. २२ आवरीत नाहीं. २३ वेगानें. २४ आच्छादत नाहीं. २५ आकळला जात नाहीं. २६ भिजत नाहीं.

पद्मपत्र ॥ ७१ ॥ तैसा संसर्गामाजि असे । सकळां सारिखा दिसे । जैसें तोयसंगें आभासे । भानुबिंब ॥ ७२ ॥ [स विशिष्यते] तैसें सामान्यत्वें पाहिजे । तरी साधारणचि देखिजे । येरवीं निर्धारितां नेणिजे । सोय जयाची ॥ ७३ ॥ ऐशा चिन्हीं चिन्हित । देखसी तोचि मुक्त । आशापाशरहित । वोळख पां ॥ ७४ ॥ अर्जुना तोचि योगी । विशेषीजे जो जगीं* । ह्मणोनि ऐसा होय यालागीं । ह्मणिपें तूतें ॥ ७५ ॥ तूं मानसा नियम करीं । निश्चळ होयें अंतरीं । मग कर्मेंद्रियें† व्यापारीं । वर्ततु सुखें ॥ ७६ ॥

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।
शरीरयात्राऽपि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ ८ ॥

[शरीरेति] ‡ह्मणोनि नैष्कर्म्य होआवें । तरी एथ तें न संभवे । आणि निषिद्ध केविं राहाटावें । विचारीं पां ॥ ७७ ॥ [नियतं कुरु कर्म त्वं] ह्मणोनि जें जें उचित । आणि अवसरेंकरूनि प्राप्त । तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ॥ ७८ ॥ [कर्म ज्यायो ह्यकर्मणः] पार्था आणिकही एक । नेणसी तूं हें कौतिक । जें ऐसें कर्ममोचक । आपैसें असे ॥ ७९ ॥ देखें अनुक्रमाधारें । स्वधर्म जो आचरे । तो मोक्ष §तेणें व्यापारें । निश्चित पावे ॥ ८० ॥

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः ।
तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर ॥ ९ ॥

[यज्ञार्थात्कर्मणः] स्वधर्म जो बापा । तोचि नित्य यज्ञ जाण पां । ह्मणोनि वर्ततां तेथ पापा । संचरे नाहीं ॥ ८१ ॥ [अन्यत्र] हा निजधर्म जैं सांडे । आणि कुकर्मीं रति घडे । तैंचि बंध पडे । सांसारिक ॥ ८२ ॥ [तदर्थमिति] ह्मणोनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड यज्ञ याजन । जो करी तया बंधन । कहींच न घडे ॥ ८३ ॥ [लोकोऽयं कर्मबंधनः] हा लोक कर्मे बांधिला । जो परतंत्रा झाला । तो नित्य यज्ञातें चुकला । ह्मणोनियां ॥ ८४ ॥ आतां येचि विषयीं पार्था । तुज सांगेन एक मी कथा । जैं सृष्टयादिसंस्था । ब्रह्मेनें केली ॥ ८५ ॥

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोस्त्विष्टकामधुक् ॥ १० ॥

[सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा] तैं नित्य यागसहितें । सृजिलीं भूतें समस्तें । परी

---

* ~~जगीं ऐसा.~~ † कर्मेंद्रियें हीं. ‡ ~~ह्मणसी.~~ § तेणेंचि द्वारें.

---

१ संसारांत. २ सामान्य. ३ मार्ग, स्थिति. ४ वर्णन करावा, आगळा आहे. ५ ह्मणतों. ६ आकलन, दमन. ७ कर्मरहित व्हावें. ८ शास्त्रविरुद्ध. ९ समयानुसार. १० कामना सोडून, निष्काम. ११कौतुक. १२ आपोआप कर्म सोडविणारें. १३ वर्णाश्रमानुरूप अधिकाराप्रमाणें. १४ शिरकाव, रीघ. १५ आवड. १६ कधींही. १७ प्रकृतीनें, मायेनें. १८ जग (सृष्टि) इत्यादिकांची व्यवस्था. १९ ब्रह्मदेवानें. २० उत्पन्न केलीं.

नेणतीचि तियें[1] यज्ञातें । सूक्ष्म ह्मणउनी ॥ ८६ ॥ [पुरोवाच प्रजापतिः] ते वेळीं प्रजीं विनविला[2] ब्रह्मा । देवा काय *आश्रयो एथ आह्मा । तंव ह्मणे तो कैमळजन्मा[3] । भूतांप्रति ॥ ८७ ॥ [अनेन प्रसविष्यध्वं] तुह्मा वर्णविशेषवर्शे[4] । आह्मी हा स्वधर्म विहिला[5] असे । [एष वोस्त्विष्टकामधुक्] यातें उपासा[6] मग ऑपैसे[7] । पुरती काम ॥ ८८ ॥ तुह्मी व्रत नियम न करावे । शरीरातें न पीडावें[8] । दूरि कैंही न †वंचावें[9] । तीर्थांसि गा ॥ ८९ ॥ योगादिकें साधनें । सांकांक्ष[10] आराधनें । मंत्र[11] यंत्र विधानें । झणी[12] करा ॥ ९० ॥ देवतांतरा[13] न भजावें । हें सर्वथा कांहीं न करावें । तुह्मी स्वधर्ममयज्ञीं[14] यजावें । अनायासें ॥ ९१ ॥ अहेतुकें[15] चित्तें । अनुष्ठा पां[16] यातें । पतिव्रता पतीतें । जियापरी ॥ ९२ ॥ तैसा स्वधर्मरूप मखें[17] । हाचि सेव्यें[18] §तुह्मां एक । ऐसें सत्यलोकनायक[19] । बोलता जाहाला ॥ ९३ ॥ देखा स्वधर्मातें भजाल । तरी कामधेनु[20] हा होईल । मग प्रजा हो न संडिल । तुमतें[21] ¶कदा ॥ ९४ ॥

देवान्भावयताऽनेन ते देवा भावयंतु वः ।
परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ११ ॥

[देवानिति] जैं येणेंकरूनि समस्तां । परितोष[22] होईल देवतां । मग ते तुह्मा ईप्सितां[23] । अर्थांतें देती ॥ ९५ ॥ या स्वधर्मपूजा पूजितां । देवतागणां समस्तां । योगक्षेम[24] निश्चिता । करिती तुमचा ॥ ९६ ॥ [परस्परं भावयंतः] तुह्मी देवांतें भजाल । देव तुह्मां तुष्टतील । ऐसी परस्परें घडेल । प्रीति जेथ ॥ ९७ ॥ [श्रेयः परमवाप्स्यथ] तेथ तुह्मी जें करूं ह्मणाल । तें अपैसें सिद्धी जाईल । वांछितही पुरेल[25] । मानसींचें ॥ ९८ ॥ वाचासिद्धी पावाल । आज्ञापक[26] होआल । म्हणियें[27] तुमतें मागतील । महाऋद्धि ॥ ९९ ॥ जैसें ऋतुपतीचें[28] द्वार । वनश्री[29] ॥ निरंतर । वोळगे फळभार । लावण्येसीं ॥ १०० ॥

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यंते यज्ञभाविताः ।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सः ॥ १२ ॥

[इष्टानिति] तैसें सर्व सुखेंसहित । दैवचि मूर्तिमंत । येईल देखा[30] काढत ।

---

* आश्रो. † नवजावें. ‡ ययातें. § तुम्हासि. ¶ सदा. ‖ वनश्री सेवी.

---

१ तीं. २ प्रार्थिला. ३ ब्रह्मा. ४ ब्राह्मणादि जातिपरत्वें. ५ नियमित केला. ६ आचरा. ७ आपोआप. ८ कोटेंही. ९ जावें. १० सकाम, कामनिक. ११ तांत्रिक अनुष्ठानें. १२ करूं नका. १३ इतर देवतांस १४ स्वधर्म व वर्णधर्म हाच यज्ञ. १५ निष्काम. १६ यज्ञ. १७ आदरणीय. १८ इच्छिलेलें देणाऱ्या कामधेनूसारखा हेतु पुरविणारा. १९ तुम्हाला. २० संतोष. २१ इच्छिलेल्या. २२ अप्राप्त वस्तूची प्राप्ति. २३ प्राप्त वस्तूचें पालन. २४ पूर्ण होईल. २५ आज्ञाकर्ते. २६ चाकर, आज्ञा. २७ वसंतसमयीं. २८ अरण्यशोभा. २९ आश्रय करी. ३० मार्ग शोधित.

तुह्मापाठीं ॥ १ ॥ ऐसे समस्त भोगभरित । होआल तुह्मी अनार्त । जरी स्वधर्मैकनिरत । वर्ताल बापा ॥ २ ॥ [तैर्दत्तानप्रदायैभ्यो] कीं जालिया सकळ संपदा । जो अनुसरेल इंद्रियमदा । लुब्ध होऊनियां स्वादा । विषयांचिया ॥ ३ ॥ तिहीं यज्ञभावितीं सुरीं । जे हे संपत्ति दिधली पुरी । तयां स्वधर्मीं सर्वेश्वरीं । न भजेल जो ॥ ४ ॥ अग्निमुखीं हवन । न करील देवतापूजन । प्राप्तवेळ *भजन । ब्राह्मणाचें ॥ ५ ॥ विमुख होईल गुरुभक्ती । आदर न करील अतिथी । संतोष नेदील ज्ञाती । आपुलिये ॥ ६ ॥ [यो भुंक्ते] ऐसा स्वधर्मक्रियारहित । आथिलेपणें गर्वित । केवळ भोगासक्त । होईल जो ॥ ७ ॥ [स्तेन एव सः] तया मग †अपावो थोर आहे । जेणें तें हातिंचें सकळ जाये । देखा प्राप्तही न लाहे । भोग भोगूं ॥ ८ ॥ जैसें गेतायु शरीरीं । चैतन्य वास न करी । कां निर्दैवाच्या घरीं । ‡न राहे लक्ष्मी ॥ ९ ॥ तैसा स्वधर्म जरी लोपला । तरी सर्व सुखाचा थारा मोडला । जैसा दीपासवें हरपला । प्रकाश जाय ॥ ११० ॥ तैसी निजवृत्ति जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे । आइका प्रजाहो फुडें । विरंचि ह्मणे ॥ ११ ॥ ह्मणऊनि स्वधर्म जो सांडील । तयातें काळ दंडील । चोर ह्मणूनि हरील । सर्वस्व तयाचें ॥ १२ ॥ मग सकळ दोष भेवंते । गिंवसोनि घेती तयातें । रात्रिसमयीं श्मशानातें । भूतें जैसीं ॥ १३ ॥ तैसीं त्रिभुवनींचीं दुःखें । आणि नानाविधें पातकें । दैन्यजात तितुकें । तेथेंचि वसे ॥ १४ ॥ ऐसें होय तया उन्मत्ता । मग न सुटे बापा रुदंतां । कल्पांतींही सर्वथा । प्राणिगण हो ॥ १५ ॥ ह्मणऊनि निजवृत्ति हे न सांडावी । इंद्रियें बरळों नेदावीं । ऐसें प्रजांतें शिकवी । चतुरानन ॥ १६ ॥ जैसें जळचरां जळ सांडे । मग तत्क्षणीं मरण मांडे । हा स्वधर्म तेणें पांडें । विसंबों नये ॥ १७ ॥ ह्मणोनि तुह्मी समस्तीं । आपुलालिया कर्मीं उचितीं । निरत व्हावें पुढतपुढती । ह्मणिपत असे ॥ १८ ॥

यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्वकिल्बिषैः ।
भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ॥ १३ ॥

[यज्ञशिष्टाशिनः संतो] देखा विहित क्रियाविधि । निर्हेतुकी बुद्धि । जो

---

* भोजन. † अपाय. ‡ संपत्ति जैसी.

१ सुखी, निरामय, पूर्णकाम. २ इंद्रियांच्या उन्मत्तपणास. ३ यज्ञानें संतुष्ट झालेल्या देवांनीं. ४ आले वेळीं, यथाकाळीं. ५ न देईल. ६ संपन्नपणें. ७ दुःख, आपाय. ८ न लाभे, लाभत नाहीं. ९ आयुष्य सरलेल्या. १० जीवात्मा. ११ आश्रय, स्थान. १२ ब्रह्मा. १३ सोडील. १४ आसपास. १५ वेढून, शोधून. १६ सर्व दुःखें. १७ रडतां १८ स्वधर्म. १९ पाहिजे तसें वागूं देऊं नये. २० त्याप्रमाणें. २१ विसरूं नये. २२ तत्पर. २३ वारंवार. २४ म्हणत, सांगत. २५ कर्मानुष्ठान. २६ निरिच्छ.

असतिये[1] समृद्धि । विनियोग[2] करी ॥ १९ ॥ गुरु गोत्र अग्नि पूजी । अवसरीं[3] भजे द्विजीं । निमित्तादिकीं[4] यजी । पितरोदेशें ॥१२०॥ या यज्ञक्रिया उचिता । यज्ञेशीं हवन करितां । हुतशेष[5] स्वभावता । उरे जें जें ॥ २१ ॥ तें सुखें आपुले घरीं । कुटुंबेसीं भोजन करी । [मुच्यंते सर्वकिल्बिषैः] कीं भोग्यचि तें निवारी । कल्मषातें[6] ॥ २२ ॥ तें यज्ञावशिष्ट[7] भोगी । ह्मणोनि सांडिजे तो अघीं[8] । जया-परी महारोगी । *अमृतसिद्धी ॥२३॥ कीं तत्त्वनिष्ठ[9] जैसा । नागवे[10] भ्रांतिलेशा । तो शेष[11] भोगी तैसा । नाकळे[12] दोषा ॥२४॥ ह्मणोनि स्वधर्मे जें अर्जे[13] । तें स्वध-र्मेंचि विनियोगिजे[14] । मग उरे तें भोगिजे । संतोषेसीं ॥ २५ ॥ हेंवांचूनि पार्था । राहाटों नये अन्यथा । ऐसी आद्य हे कथा । श्रीमुरारि सांगे ॥ २६ ॥ [भुंजते ते त्वघं पापा] जे देहचि आपणपें[15] मानिती । आणि विषयांतें भोग्य ह्मणती । यापरतें[16] न स्मरती । आणिक कांहीं ॥ २७ ॥ हें यज्ञोपकरण सकळ । नेणतसाते[17] बरळ[18] । अहंबुद्धि[19] केवळ । भोगूं पाहती ॥ २८ ॥ इंद्रियरुचीसारिखें । करविती पाक[20] निकें[21] । ते पापिये पातकें । सेविती जाण ॥ २९ ॥ हें संपत्ति-जात आघवें[22] । हवनद्रव्य मानावें । मग स्वधर्मयज्ञें अर्पावें । आदिपुरुषीं[23] ॥ १३० ॥ [ये पचंत्यात्मकारणात्] हें सांडोनियां मूर्ख[24] । आपणपेयालागीं देख । निपजविती पाक । नानाविध ॥ ३१ ॥ जिहीं यज्ञ सिद्धी जाये । परेशा[25] तोष होये । तें हें सामान्य अन्न न होये । ह्मणोनियां ॥ ३२ ॥ हें न ह्मणावें सा-धारण । अन्न ब्रह्मरूप जाण । †हें जीवनहेतु कारण । विश्वा[26] यया ॥ ३३ ॥

अन्नाद्भवंति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥

[अन्नादिति] अन्नास्तव[27] भूतें । प्ररोह[28] पावती समस्तें । मग पर्जन्य या अ-न्नातें । सर्वत्र प्रसवे[29] ॥ ३४ ॥ [यज्ञादिति] तया पर्जन्या यज्ञीं जन्म । यज्ञातें प्रगटी कर्म ।

---

*अमृतसेवनीं. † जें.

---

१ यथाशक्ति. २ खर्च, उपयोग. ३ समयोचित. ४ पर्वकाळीं. ५ हवन द्रव्यांतील अवशेष. ६ पापातें. ७ यज्ञावशिष्ट सेवन करितो ह्मणून त्यापासून अघें (दुःखें) पळतात. ८ ब्रह्मनिष्ठ. ९ न सांपडे. १० यज्ञावशिष्ट. ११ आकर्षला जात नाहीं. १२ संपादावें. १३ खर्चावें. १४ आपणच. १५ यापलीकडे. १६ यज्ञसंबंधी. १७ न जाणून, अज्ञ होत्साते. १८ भ्रांत. १९ अहंकारानें. २० उत्तम पक्कान्नें. २१ सर्व संपत्ति. २२ परमेश्वरीं. २३ त्यजून. २४ आपल्याकरितां. २५ परमे-श्वराला. २६ जगताला. २७ अन्नापासून. २८ वाढ, वृद्धि. २९ निपजवितो.

कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥

[कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि] कर्मासि आदि ब्रह्म । वेदरूप ॥ ३५ ॥ [ब्रह्माक्षरसमुद्भवं] मम वेदांतें *परात्पर । प्रसवतसे अक्षर । [तस्मादिति] ह्मणऊनि हें चराचर । ब्रह्मबद्ध ॥ ३६ ॥ परी कर्माचिये मूर्ति । यज्ञीं अधिवास श्रुति । ऐकें सुभद्रापति । अखंड गा ॥ ३७ ॥

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।
अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ १६ ॥

[एवं प्रवर्तितं चक्रं] ऐसी हे आदि परंपरा । संक्षेपें तुज धनुर्धरा । सांगीतली या †अध्वरा । लागूनियां ॥ ३८ ॥ [नानुवर्तयतीह यः] ह्मणूनि समूळ हा उचितु । स्वधर्मरूप क्रतु । नानुष्ठी जो मैत्तु । लोकीं इये ॥ ३९ ॥ [अघायुरिंद्रियारामो] तो पातकांची राशी । जाण भार भूमीसी । जो कुकर्मे इंद्रियांसी । उपेगा गेला ॥ १४० ॥ [मोघं पार्थ स जीवति] तें जन्मकर्म सकळ । अर्जुना अति निष्फळ । जैसें कीं अभ्रपटळ । अकाळींचें ॥ ४१ ॥ कां गळां स्तन अजेचे । तैसें जियालें देखें तयाचें । जया अनुष्ठान स्वधर्माचें । घडेचिना ॥ ४२ ॥ ह्मणोनि ऐकें पांडवा । हा स्वधर्म कवणें न संडावा । सर्वभावें भजावा । हाचि एक ॥ ४३ ॥ हां गा शरीर जरी जाहलें । तरी कर्तव्य वोघें आलें । मग उचित कां आपुलें । वोसंडावें ॥ ४४ ॥ परिस पां सव्यसाची । मूर्ति लोहोनि देहाची । खंती करिती कर्माची । ते ‡गांवढे गा ॥ ४५ ॥

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ १७ ॥

[यस्त्विति] देखें असतेनि देहधर्मे । एथ तोचि एक न लिंपे कर्मे । जो अखंडित रमे । आपणपें ॥ ४६ ॥ [आत्मनीति] जे तो आत्मबोधें तोषला । तरी कृतकार्य देख जाहला । ह्मणोनि सहजें सांडवला । कर्मसंगा ॥ ४७ ॥

---

* परापर, पसवर. † अवसरा. ‡ गांवढेपण गा.

---

१ अविनाशी ब्रह्म. २ ब्रह्माधीन. ३ कर्माची मूर्ती जो यज्ञ त्यांत श्रुतीचा अधिवास (राहणें) आहे. ४ मालिका. ५ यज्ञासंबंधी. ६ यज्ञ. ७ उन्मत्त. ८ वाईट कर्मानें. ९ उपयोगी झाला. १० शेळीचे. ११ जीवित. १२ स्वभावें, प्रवाहानें. १३ टाकावें. १४ दोनीं हातांनीं बाण सोडणाऱ्या अर्जुना. १५ प्राप्त होऊन. १६ अडाणी. १७ देहव्यापार चालत असतां. १८ आपणाशीं. १९ मुकला.

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ १८ ॥

[नैव तस्येत्यर्धे] तृप्ति जालिया जैसीं । साधनें सरतीं अपैसीं । देखें आत्मतुष्टीं तैसीं । कर्में नाहीं ॥ ४८ ॥ [न चेत्युत्तरार्धे] जंववरी अर्जुना । तो बोध भेटेना मना । तंवचि या साधना । भजावें लागे ॥ ४९ ॥

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥ १९ ॥

[तस्मादिति] ह्मणऊनि तूं नियत । सकळ कामनारहित । होऊनियां उचित । स्वधर्में राहाटें ॥ १५० ॥ [असक्त इति] *जे स्वधर्में निष्कामता । †अनुसरले पार्था । ते ‡कैवल्यपद तत्त्वता । पावले जगीं ॥ ५१ ॥

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।
लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ॥ २० ॥

[कर्मणैवेति] देख पां जनकादिक । कर्मजात अशेख । न सांडितां मोक्षसुख । पावते जाहले ॥ ५२ ॥ [लोकसंग्रहमिति] याकारणें पार्था । होआवी कर्मीं आस्था । हे आणिकाही एका अर्था । उपकारेल ॥ ५३ ॥ जे आचरतां आपणपयां । देखी लागेल लोका यया । तरी चुकेल §हा अपाया । प्रसंगेंचि ॥ ५४ ॥ देखें प्रांसार्थ जाहाले । जे निष्कामता पावले । तयांही कर्तव्य असे उरलें । लोकांलागीं ॥ ५५ ॥ मागीं अंधासरिसा । पुढें देखणाही चाले जैसा । अज्ञाना प्रकटावा धर्म तैसा । आचरोनी ॥ ५६ ॥ हां गा ऐसें जरी न कीजे । तरी अज्ञाना काय उमजे । तिहीं कवणेंपरी जाणिजे । मार्गातें या ॥ ५७ ॥

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २१ ॥

[यद्यदिति] एथ वडील जें जें करिती । तया नाम धर्म ठेविती । तेंचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ ॥ ५८ ॥ [स यदिति स्पष्टं] हें ऐसें असे स्वभावें । ह्मणोनि कर्म न संडावें । विशेषें आचरावें । लागे संतीं ॥ ५९ ॥

---

* जें कर्में. † जे अनुसरले. ‡ कैवल्य परम पद तत्त्वता. § या अपाया.

---

१ आपोआप. २ आत्मस्वरूपीं, स्वरूपानंदांत. ३ आचरावें. ४ नियमशील, सदोदित. ५ स्वरूपप्रतिष्ठा, अद्वितीय ब्रह्मभाव. ६ संपूर्ण. ७ व्हावी, असावी. ८ उपयोगीं पडेल. ९ स्वतः. १० मार्ग, दीक्षा, चाल. ११ दुःखाला. १२ पूर्णमनोरथ. १३ डोळस. १४ समजेल. १५ श्रेष्ठ, वृद्ध, आप्त.

न मे पार्थाऽस्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ २२ ॥

[न मे पार्थेति] आतां आणिकाचिया गोठी । कायशा सांगों किरीटी । देखें मीचि इये राहाटी । वर्तत असें ॥ १६० ॥ काय सांकडें कांहीं मातें । कीं कवणें एकें आर्तें । आचरें मी धर्मातें । ह्मणसी जरी ॥ ६१ ॥ तरी पुरतेपणालागीं । आणिक दुसरा नाहीं जगीं । ऐसी सामग्री माझ्या आंगीं । जाणसी तूं ॥ ६२ ॥ [नानवाप्तमिति] मृत गुरुपुत्र आणिला । तो तुवां पवाडा देखिला । तोही मी उगला । कर्मीं वर्तें ॥ ६३ ॥

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ।
मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ २३ ॥

[यदीति] परी स्वधर्मीं वर्तें कैसा । सांकांक्ष कां होय जैसा । तयाचि एका उद्देशा । लागोनियां ॥ ६४ ॥ [मम वर्त्मेति] जें भूतजात सकळ । असे आह्मां-आधीनचि केवळ । तरी न व्हावें बरळ । ह्मणोनियां ॥ ६५ ॥

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ।
संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ २४ ॥

[न कुर्यां कर्म चेदहं] आह्मी पूर्णकाम होउनी । जरी आत्मस्थिती राहुनी । [संकरस्येति] तरी प्रजा हे कैसेनी । निस्तरेल ॥ ६६ ॥ [उत्सीदेयुरिति] इहीं आमुची वास पाहावी । मग वर्ततीपरी जाणावी । ते लोकस्थिति आघवी । नासिली होईल ॥ ६७ ॥ ह्मणोनि समर्थ जो एथें । आथिला सर्वज्ञते । तेणें विशेषें कर्मातें । त्यजावें ना ॥ ६८ ॥

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत ।
कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥ २५ ॥

[सक्ताः कर्मणीति] देखें फळाचिया आशा । आचरे कोंमुक जैसा । [कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तः] कर्मीं भेर होआवा तैसा । *निरीशाही ॥ ६९ ॥ [चिकीर्षुर्लोक-

---

* वैराग्येंसी.

१ दुसऱ्याच्या. २ गोष्टी. ३ संकट. ४ इच्छेनें. ५ अतर्क्यैश्वर्यानें, पूर्णपणानें. ६ प्रत्येक कार्योपयोगी सामान. ७ सांदीपनीचा पुत्र. ८ मोठेपणा, कीर्ति. ९ उगाच, निरिच्छपणें. १० साभिलाष. ११ हेतूकरितां. १२ भ्रष्ट. १३ षड्गुणैश्वर्यसंपन्न ब्रह्मांडाचा स्वामी. १४ योगैश्वर्यतेनें, चिदात्मस्थिति, कूटस्थ. १५ वर्तेल, पार पडेल. १६ वर्तन, वाट. १७ वर्तनक्रम. १८ जनमर्यादास्थापन, वर्णाश्रमधर्मव्यवस्था. १९ संपन्न. २० फलेच्छु. २१ आवड. २२ निरिच्छास देखील.

संग्रहं] जे पुढतपुढती[1] पार्था। हे सकळ लोकसंस्था। रक्षणीय[2] सर्वथा। ह्मणऊनियां ॥ १७० ॥ मार्गाधारें[3] वर्तावें। विश्व हें मोहरे[4] लावावें। अलौकिक नोहावें[5]। लोकांप्रति ॥ ७१ ॥

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम्।
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥ २६ ॥

[न बुद्धिभेदमिति] जें सायासें स्तन[6] सेवी। तें पक्कान्नें केविं जेवी। ह्मणोनि बाळका जैसीं नेदावीं[7]। धनुर्धरा ॥ ७२ ॥ तैसी कर्मीं जयां *अयोग्यता[8]। तयांप्रति नैष्कर्म्यता[9]। न प्रगटावी खेळतां। आदिकरुनी[10] ॥ ७३ ॥ [जोषयेदिति] तेथें सत्क्रियाचि लावावी। तेचि एकी प्रशंसावी[11]। निष्कर्मीही[12] दावावी। आचरोनी ॥ ७४ ॥ तया लोकसंग्रहालागीं[13]। वर्ततां कर्मसंगीं। तो कर्मबंध आंगीं। वोजेलना[14] ॥ ७५ ॥ जैसी बहुरूपियांची रावो राणी। स्त्रीपुरुषभावो नाहीं मनीं। परी लोकसंपादणी[15]। तैसीच करिती ॥ ७६ ॥

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।
अहंकारविमूढात्मा कर्ताऽहमिति मन्यते ॥ २७ ॥

देखें पुढिलाचें[16] वोझें। जरी आपुला माथां घेइजे। तरी सांगें कां न दाटिजे[17]। धनुर्धरा ॥ ७७ ॥ [प्रकृतेरिति] तैसीं शुभाशुभें कर्में। †जियें निपजती प्रकृतिधर्में[18]। [अहमिति] ‡तियें मूर्ख मतिभ्रमें। मी §कर्ता ह्मणे ॥ ७८ ॥ ऐसा ¶अहंकारारूढ। एकदेशी[19] मूढ। तया हा परमार्थ गूढ[20]। प्रगटावा ना ॥ ७९ ॥ हें असो प्रस्तुत[21]। सांगिजेल तुज हित। तें अर्जुना देऊनि चित्त। अवधारीं पां ॥ १८० ॥

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः।
गुणा गुणेषु वर्तंत इति मत्वा न सज्जते ॥ २८ ॥

[तत्त्वविदिति] जे[22] ||तत्त्वज्ञानियांच्या ठायीं। तो प्रकृतिभाव नाहीं। जेथ कर्मजात[23] पाहीं। निपजत असे ॥ ८१ ॥ ते देहाभिमान सांडुनी। गुणकर्में

---

*योग्यता. † जें. ‡ तें. § करिता. ¶ अहंकाराधिरूढ. || तत्त्वज्ञाच्या.

---

१ वारंवार. २ पाळली पाहिजे. ३ मार्गास. ४ न व्हावें. ५ देऊं नयेत. ६ अनधिकार. ७ कर्म न करणें, कर्माविषयीं उदासीनपणा. ८ उगाच. ९ मुख्यत्वेंकरून. १० स्तवावी. ११ निष्काम जनांनीं. १२ वर्णाश्रमधर्मसंरक्षणासाठीं. १३ लागणार नाहीं. १४ राजा. १५ लोकांची समजूत. १६ दुसऱ्याचें. १७ दबावें. १८ देहइंद्रियादि धारण केलेल्या मायेच्या रजतमादि गुणांच्या योगानें. १९ जड इंद्रियादिकांचे ठिकाणीं मी भोक्ता कर्ता इत्यादि विपरीत(एकदेशीय)बुद्धि, प्रत्यग्लक्षण. २० गहन, समजण्यास व आचरण्यास कठीण. २१ सांप्रत. २२ कारण. २३ कर्मसमूह.

वोलांडुनी । [गुणा गुणेषु वर्तंते] साक्षिभूत होउनी । वर्तती देहीं ॥ ८२ ॥ [इति मत्वा न सज्जते] ह्मणोनि शरीरीं जरी होती । तरी कर्मबंधा नाकळती । जैसा कां भूतचेष्टा गंभस्ती । घेपवेना ॥ ८३ ॥

प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जंते गुणकर्मसु ।
तानकृत्स्नविदो मंदान्कृत्स्नविन्न विचालयेत् ॥ २९ ॥

[प्रकृतेरिति] एथ कर्मीं तोचि लिंपे । जो गुणसंभ्रमें घेपे । प्रकृतीचेनि आटोपें । वर्तत असे ॥ ८४ ॥ [तानिति] इंद्रियें गुणाधारें । राहाटती निजव्यापारें । [कृत्स्नविदिति] तें परकर्म बलात्कारें । आपादी जो ॥ ८५ ॥

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युद्ध्यस्व विगतज्वरः ॥ ३० ॥

[मयीति] तरी उचित कर्मे आघवीं । तुवां आचरोनि मज अर्पावीं । परी चित्तवृत्ति न्यासावी । आत्मरूपीं ॥ ८६ ॥ [निराशीर्निर्ममो भूत्वा] हें कर्म मी कर्ता । कां आचरेन यॉं अर्था । ऐसा अभिमान झेंणें चित्ता । रिघों देसी ॥ ८७ ॥ तुवां शरीरपरा नोहावें । कामनाजात सांडावें । मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ॥ ८८ ॥ [युद्धयस्व] आतां कोदंड घेऊनि हातीं । आरूढ पां इये रथीं । देईं आलिंगन वीरवृत्ती । समाधानें ॥८९॥ जगीं कीर्ति रूढवीं । स्वधर्माचा मान वाढवीं । इया भारापासोनि सोडवीं । मेदिनी हे ॥ १९० ॥ [विगतज्वरः] आतां पार्था निःशंक होईं । या संग्रामा चित्त देईं । एथ हेंवांचूनि कांहीं । बोलों नये ॥ ९१ ॥

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठंति मानवाः ।
श्रद्धावंतोऽनसूयंतो मुच्यंते तेऽपि कर्मभिः ॥ ३१ ॥

[ये मे इति] *हें अनुपरोध मत माझें । जिहीं परमादरें स्वीकारिजे । [श्रद्धावंत इति] श्रद्धापूर्वक अनुष्ठिजे । धनुर्धरा ॥ ९२ ॥ तेही सकळ कर्मीं वर्तत । जाण पां कर्मरहित । ह्मणोनि हें निश्चित । करणीय गा ॥ ९३ ॥

---

* ऐसें.

---

१ चित्तवृत्तिनिरोध होऊन, केवल द्रष्टा ही स्थीति पावून. २ बद्ध होत नाहींत. ३ सूर्य. ४ सांपडत नाहीं, करवित नाहीं. ५ उपाधि (माया) गुणसंबंधानें विपरीतबुद्धी(भ्रमा)प्रत पावल्यानें. ६ स्वाधीन होऊन. ७ स्वीकारी, घेतो. ८ विहित, योग्य. ९ ठेवावी, योजावी. १० या फलासाठीं. ११ कदाचित् नको. १२ देहाधीन. १३ सर्व हेतु. १४ समयोचित. १५ धनुष्य. १६ शौर्याला. १७ वाढीव. १८ पृथ्वी. १९ सिद्ध, अखंड, अबाध. २० आचरतील. २१ करण्यास योग्य.

ये त्वेतदभ्यसूयंतो नानुतिष्ठंति मे मतम् ।
सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥

[ये त्विति] ना तरी [1]प्रकृतिमंत होउनी । इंद्रियां [2]लेळा देउनी । जे हें माझें [3]मत अव्हेरुनी । [4]वोसंडिती ॥ ९४ ॥ जे सामान्यत्वें [5]लेखिती । अवज्ञा करूनि देखिती । कां [6]अर्थवाद ह्मणती । वाचाळपणें ॥ ९५ ॥ [सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि] ते [7]मोहमदिरा *भुलले । विषयविषें [8]घारले । अज्ञानपंकीं बुडाले । निभ्रांत मानीं ॥ ९६ ॥ [नष्टान्] देखें [9]शेंवाच्या हातीं दिधलें । जैसें कां रत्न वायां गेलें । ना तरी [10]जात्यंधा [11]पोहलें । प्रमाण नोहे ॥ ९७ ॥ कां चंद्राचा उदय जैसा । उपयोगा [12]नवचे [13]वोयसा । मूर्खा विवेक हा तैसा । रुचेल ना ॥९८ ॥ तैसे जे पार्था । विमुख या परमार्था । तयांसीं भाषण सर्वथा । करावेंना ॥ ९९ ॥ [अचेतसः] ह्मणोनि ते न मानिती । आणि निंदाही करूं †लागती । सांगें [14]पतंग काय [15]साहाती । प्रकाशातें ॥ २०० ॥ पतंगा दीपीं आलिंगन । तेथ त्यासि अचुक मरण । तेविं विषयाचरण । [16]आत्मघाता ॥ १ ॥

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।
प्रकृतिं यांति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥ ३३ ॥

[सदृशं चेष्टत इति] ह्मणोनि इंद्रियें एकें । जाणतेनि [17]पुरुखें । [18]लीळावीं ना कौतुकें । आदिकरुनी ॥ २ ॥ हां गा सर्पेसीं खेळों येईल । कीं [19]व्याघ्रसंसर्ग सिद्धी जाईल । सांगें [20]हालाहल जिरेल । सेविलेंया काई ॥ ३ ॥ देखें खेळतां अग्नि लागला । मग तो न सांवरे जैसा [21]उधवला । तैसा इंद्रियां लळा दिधला । भला नोहे ॥ ४ ॥ येरवीं तरी अर्जुना । या शरीरा पराधीना । कां नाना-[22]भोगरचना । मेळवावी ॥ ५ ॥ आपण सायासेंकरूनि बहुतें । सकळाही स-[23]मृद्धिजातें । [24]उदोअस्त या देहातें । प्रतिपाळावें कां ॥ ६ ॥ सर्वस्वें [25]शिणोनि एथें । [26]‡ओजवावीं संपत्तिजातें । तेणें स्वधर्म सांडूनि देहातें । पो-[27]खावें काई ॥ ७ ॥ [प्रकृतिं यांति भूतानीति] मग हें तंव पांच मेळावा । शेखीं [28]अडुसरेल पंचत्वा । ते वेळीं केला कें [29]गिंवसावा । शीण आपुला ॥ ८ ॥ ह्म-

* भ्रमले. † लाहाती. ‡ अर्जावीं.

१ प्रकृतिकार्य आपणावर आरोपून देहाभिमानी होऊन. २ इच्छित, लाड. ३ तिरस्कारून. ४ टाकून देतात. ५ गणतात. ६ प्ररोचनावाक्य, स्तुतिमात्र. ७ मोह हाच कोणीएक मद्य त्यानें. ८ व्यापले, माजले. ९ अज्ञानचिखलांत. १० प्रेताच्या. ११ जन्मांधानें. १२ पाहिलें. १३ नपडे. १४ चोराला, कावळ्याला. १५ पतंगाला उजेड कसा सहन होईल. १६ स्वरूपापासून पतनास. १७ पुरुषानें. १८ लाड करूं नयेत. १९ वाघाचा सहवास. २० कालकूट विष. २१ भडकला. २२ विषयभोग. २३ अहोरात्र. २४ श्रमून. २५ मिळवावीं. २६ पोसावें. २७ संघात, जमाव. २८ पांच ठिकाणीं पांच तत्त्वांस. २९ कोठें शोधावा.

णूनि केवळ देहभरण । तें जाणें उघडी नागवण । यालागीं एथ अंतःकरण । देयावेंना ॥ ९ ॥

इंद्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपंथिनौ ॥ ३४ ॥

[इंद्रियस्येति] येन्हवीं इंद्रियांचिया अर्था । सारिखा विषय पोषितां । संतोष कीर चित्ता । आपजेल ॥ २१० ॥ परी तो सर्वचोराचा सांगात । जैसा नावेक स्वस्थ । जंव नगराचा प्रांत । सांडिजेना ॥ ११ ॥ बापा विषयांची मधुरता । झणें आवडी उपजे चित्ता । तो परिणाम विचारितां । प्राण हरी ॥ १२ ॥ देखें इंद्रियीं काम असे । तो लावी *सुखदुरासे । जैसा गळीं मीन आमिषें । भुलविजे गा ॥ १३ ॥ परी तयामाजि गळु आहे । जो प्राणातें घेऊनि जाये । तो जैसा ठाउवा नोहे । झांकलेपणें ॥ १४ ॥ तैसें अभिलाषें येणें कीजेल । विषयांची आशा धरिजेल । तरी वरपडा होइजेल । क्रोधानळा ॥ १५ ॥ जैसा कवळोनियां पारधी । घातेचिये संधी । आणी मृगातें बुद्धी । साधावया ॥ १६ ॥ [तयोरिति] एथ तैसीचि परी आहे । म्हणूनि संग हा तुज नोहे । पार्था दोन्ही काम क्रोध हे । घातक जाणें ॥ १७ ॥ म्हणऊनि हा †आश्रयोचि न करावा । मनेंही आठवो न धरावा । एक निजवृत्तीचा वोलांवा । नासों नेदीं ॥ १८ ॥

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥

[श्रेयान्स्वधर्मो विगुणः] अगा स्वधर्म हा आपुला । जरी कां कठिण जाहाला । तरी हाचि अनुष्ठिला । भला देखें ॥ १९ ॥ [परधर्मात्स्वनुष्ठितात्] येरु आचार जो परावा । तो देखतां कीर बरवा । परी आचरतेनि आचरावा । आपुलाचि ॥ २२० ॥ सांगें शूद्रघरीं औषधीं । पक्कान्नें आहाति बरवीं । तीं द्विजें केविं सेवावीं । ‡दुर्बळ जरी जाहाला ॥ २१ ॥ हें अनुचित कैसेनि कीजे । अग्राह्य केविं इच्छिजे । अथवा इच्छिलेंही पाविजे । विचारींपां

* दुःख दुरासे. † आश्रोचि, ‡ दुबळा जरी.

१ शरीरपोषण. २ हानि, बुडवणूक. ३ देवूं नये. ४ इंद्रियांस योग्य, आवडता. ५ सेवितां. ६ निश्चयें. ७ उत्पन्न होईल. ८ सावासारख्या चोराची सोबत, स्नेहभावानें वागणाऱ्या चोराची. ९ क्षणभर. १० जर. ११ सुखासारखी वाटणारी दुराशा. १२ मत्स्य. १३ मांसानें. १४ गळ. १५ ठाऊक. १६ स्वाधीन. १७ क्रोधाग्नीला. १८ मारण्याची संधि साधून. १९ मारण्याकरितां. २० जिव्हाळा. २१ बिघडवूं नको. २२ अन्य. २३ दुसऱ्याचा. २४ करणारांनीं. २५ सर्व. २६ दरिद्री.

॥ २२ ॥ तरी लोकांचीं [1]धवळारें । देखोनियां [2]मनोहरें । असतीं आपुलीं [3]तेणारें । मोडावीं केवीं ॥ २३ ॥ [स्वधर्मे निधनं श्रेयः] हें असो [4]वनिता आपुली । कुरूप जरी जाहाली । तन्ही भोगितां तेचि भली । जियापरी ॥ २४ ॥ तेविं आवडे तैसा [5]सांकड । आचरतां जन्ही [6]हुवाड । तन्ही स्वधर्मचि [7]सुरवाड । *[8]परत्रींचा ॥ २५ ॥ [परधर्मो भयावहः] हा गा साकर आणि दूध । हें [9]गौल्यें कीर प्रसिद्ध । परी [10]कृमिदोषीं विरुद्ध । घेपे केवीं ॥ २६ ॥ ऐसेनिही जरी सेविजेल । तरी ते [11]ओळुकीचि उरेल । जे तें परिणामीं [12]पथ्य नव्हेल । धनुर्धरा ॥ २७ ॥ ह्मणोनि [13]आणिकांसि जें विहित । आणि [14]आपणपेयां अनुचित । तें नाचरावें जरी हित । विचारिजे ॥ २८ ॥ या स्वधर्मातें अनुष्ठितां । वेचुं [15]हो-ईल जीविता । तोहि निका [16]वरी [17]उभयतां । दिसत असे ॥ २९ ॥ ऐसें समस्त सुरशिरोमणी । बोलिजे जेथ श्रीशार्ङ्गपाणी । [अर्जुन उवाच–] तेथ अर्जुन ह्मणे विनवणी । असे देवा ॥ २३० ॥ हें जें तुह्मीं सांगीतलें । तें सकळ कीर म्यां परिसिलें । तरी आतां पुसेन कांहीं आपुलें । [18]अपेक्षित ॥ ३१ ॥

अर्जुन उवाच–**अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।**
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥ ३६ ॥

[अथेति] तरी देवा हें कैसें । †जे ज्ञानियांचिही स्थिति [19]अंशे । मार्ग सांडूनि [20]अनारिसे । चालत देखों ॥ ३२ ॥ सर्वज्ञही ‡जे होती । हे उपायही जाणती । तेही परधर्मे [21]व्यभिचरती । कवणें गुणें ॥ ३३ ॥ बीजा आणि भुसा । अंध निवाड [22]नेणे जैसा । [23]नेणिवेक देखेणाही तैसा । [24]बरळे कांहीं ॥ ३४ ॥ [अनिच्छन्निति] जे असता संग सांडिती । तेचि संसर्ग करितां न [25]धाती । वनवासीही सेविती । [26]जनपदातें ॥ ३५ ॥ [बलादिव नियोजितः] आपण तरी लपती । सर्वस्वें पाप चुकविती । परी बळात्कारें [27]सुइजती । तयाचि माजी ॥ ३६ ॥ जयाची जीवें घेती [28]विवंसी । तेचि जडोनि ठाके जीवेंसीं । चुकवितां ते [29]गिवंसी । तयातेंचि ॥ ३७ ॥ ऐसा बलात्कारु एक दिसे । तो कवणाचा एथ आग्रहो असे । हें बोलावें हृषीकेशें । पार्थ ह्मणे ॥ ३८ ॥

---

* परत्रिकींचा. † जेथ. ‡ होती । उपाय.

---

१ चुनेगची घरें. २ सुंदर. ३ गवताचीं झोंपडीं. ४ स्त्री. ५ कठीण. ६ दुर्घट. ७ सुखकर. ८ परलोकीं. ९ गोडीनें. १० जंतांच्या व्याधितांनीं. ११ घ्यावें. १२ तृप्तता, आवड. १३ हितकर होणार नाहीं. १४ दुसऱ्यांस. १५ आपणाला. १६ खर्च. १७ श्रेष्ठ. १८ दोन्ही लोकीं. १९ इच्छित. २० विघडते. २१ वेगळे. २२ व्यभिचार करतात, स्वकीय सोडून परकीय आचरतात. २३ पृथक्पणा. २४ एकादे वेळीं. २५ चांगल्या दृष्टीचा. २६ चुकतो. २७ तृप्त होत नाहींत. २८ गांवाला, देशाला. २९ घातले जातात. ३० पिशाच. ३१ शोधी.

श्रीभगवानुवाच–**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।**
महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ ३७ ॥

[श्रीभगवानुवाच–] तंव हृदयकमळ आराम[1]। योगियांचा निष्काम[2]। तो ह्मणतसे पुरुषोत्तम। सांगेन आइक ॥ ३९ ॥ [काम एष क्रोध एषः] तरी हे काम क्रोध पाहीं। जयांतें कृपेची सांठवण[3] नाहीं। हे कृतांताच्या ठायीं[4]। मानिजती ॥ २४० ॥ हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचे वाघ[5]। भजनमार्गींचे मांग। मारेक[6] जे ॥ ४१ ॥ हे देहदुर्गीचे धोंडे[7]। इंद्रियग्रामींचें कोंडे[8]। यांचें व्यामोहादिक *बंड। जगावरी ॥ ४२ ॥ [रजोगुणसमुद्भवः] हे रजोगुण[11]†मानसाचे। समूळ आसुरियेचे[12]। धाष्टपण[13] ययांचें। अविद्या[14] केलें ॥ ४३ ॥ हे रजाचे कीर जाहाले[15]। परी तमासी पढियंते[16] भले। तेणें निजपद यां दीधलें[17]। प्रमाद मोह ॥ ४४ ॥ हे मृत्यूच्या नगरीं। मानिजती निकियापरी[18]। जे जीविताचे वैरी। ह्मणऊनियां ॥ ४५ ॥ [महाशनः] जयांसि भुकेलियां आमिषा[19]। हें विश्व न पुरेचि घांसा। ‡कुंवाडियाचिया[20] आशा। चौळीत[21] असे ॥ ४६ ॥ कौतुकें कवळितां मुठी। जिये चवदा भुवनें थेंकुटीं[22]। तिये भ्रांतिही धाकुटी। वोल्हीदुल्ही[23] ॥ ४७ ॥ जे लोकत्रयाचें भोंतुकें[24]। खेळतांचि खाय केवतिकें[25]। तिच्या दासीपणाचेनि बिकें[26]। तृष्णा जिये[27] ॥ ४८ ॥ हें असो मोहें मानिजे। यांतें अहंकारें घेपे[28] दीजे। जेणें जग आपुलिया भोजें[29]। नाचवीत असे ॥ ४९ ॥ [महापाप्मा] जेणें सत्याचा भोकसा[30] काढिला। मग असत्य तृणकुटा[31] भरिला। तो दंभ रूढविला। जगीं इहीं ॥ २५० ॥ सांधी शांति नागविली। मग माया मांगी शृंगारिली। तियेकरवीं विटाळविलीं। साधुवृंदें[32] ॥ ५१ ॥ इहीं विवेकाची त्रोय[33] फेडिली। वैराग्याची §साल[34] काढिली। जितेया[35] मान मोडिली। उपशमाची ॥ ५२ ॥ इहीं संतोषवन खांडिलें[36]। धैर्यदुर्ग पाडिलें। आनंदरोप सांडिलें। उपडूनियां ॥ ५३ ॥ इहीं बोधाचीं रोपें लुंचिलीं[37]। सुखाची लिपिही पुसिली। जिव्हारीं[38]

---

* दबडे, दळवाड. † माणसाचे. ‡ वाडी याची, वाडियाची. § खाल.

१ हृदयाला रममाण करणारा, हृदयविश्रांती. २ योगी ज्याचें निर्हेतुकपणें साधन करतात. ३ लवलेश. ४ काळाच्या. ५ ज्ञानरूप ठेवा. ६ खोऱ्यांतील, घळींतले. ७ मारेकरी. ८ दगड. ९ गांवकुसूं. १० अज्ञानादिक. ११ रजोगुणरूप दोर. १२ आसुरी=अविद्या, तिजपासून झाले, आसुरी संपत्तीचे. १३ दाईपणा. १४ मायेनें. १५ रजोगुणाचे. १६ आवडते. १७ असावधपणा. १८ मित्राप्रमाणें. १९ भक्ष्य. २० उदीम, व्यापार. २१ उलटापालट करताहेत. २२ तुच्छ. २३ फार प्रिय, जिवलग. २४ मुलांचें खाद्य भातुकली. २५ कौतुकानें. २६ बळें. २७ इच्छा जिवंत असते. २८ देवघेव होते. २९ हौसेनें. ३० आंतील गर्भ. ३१ गवताचा केलेला सांगाडा. ३२ पतिव्रता. ३३ साधूंचे समूह. ३४ रक्षण, आश्रय. ३५ कातडी. ३६ जीवंत. ३७ खोदलें. ३८ तोडलीं. ३९ नांव. ४० जिव्हाळ्यांत.

आगी [१]सूदली । तापत्रयाची ॥ ५४ ॥ हे आंगा तंव घडले । जीवींचि [२]आथि जडले । परी [३]नातुडती गिंवसिले । ब्रह्मादिकां ॥ ५५ ॥ हे चैतन्याचे शेजारी । वसती ज्ञानाच्या एका हारीं । [विद्धयेनमिह वैरिणं] ह्मणोनि प्रवर्तती महामारी । सांवरती ना ॥ ५६ ॥ हे जळेंवीण बुडविती । आगीवीण जाळिती । न बोलतां कवळिती । प्राणियांतें ॥ ५७ ॥ हे शस्त्रेंवीण [४]साधिती । दोरेंवीण बांधिती । ज्ञानियासी तरी वधिती । पैज घेउनी ॥ ५८ ॥ हे चिखलेंवीण रोविती । पाशेंवीण गोविती । हे कवणाजोगे न होती । आंतुवटपणें ॥ ५९ ॥

धूमेनाव्रियते वह्निर्यथाऽदर्शो मलेन च ।
यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥ ३८ ॥

[यथोल्बेनावृतो गर्भः] जैसी चंदनाची मुळी । गिंवसोनि [७]घेपे व्याळीं । ना तरी [८]उल्बाची खोळी । गर्भस्थासी ॥ २६० ॥ [धूमेनेति] कां प्रभावीण भानु । धूमेंवीण हुताशनु । जैसा दर्पण मळहीनु । कहींच नसे ॥ ६१ ॥ [तथा तेनेदमावृतं] तैसें इहींवीण एकलें । आह्मीं ज्ञान नाहीं देखिलें । जैसें कोंडेनि [९]पांगुतलें । बीज निपजे ॥ ६२ ॥

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।
कामरूपेण कौंतेय दुष्पूरेणाऽनलेन च ॥ ३९ ॥

[आवृतं ज्ञानमेतेन] तैसें ज्ञान तरी शुद्ध । परी इहीं असे [१०]प्रबुद्ध । [ज्ञानिनो नित्यवैरिणा] ह्मणोनि तें [११]अगाध । होऊनि ठेलें ॥ ६३ ॥ आधीं यांतें [१२]जिणावें । मग तें ज्ञान पावावें । [कामेत्यर्धं] तंव [१३]पराभवो न संभवे । रागद्वेषां ॥ ६४ ॥ यांतें [१४]साधावया लागीं । जें बळ *आणिजे आंगीं । तें इंधनें जैसीं आगी । [१५]सांवावो होय ॥ ६५ ॥

इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥

तैसे उपाय किजती जे जे । [एतैरित्यर्धं] ते यांसीच होती [१७]विरजे । ह्मणोनि हटियातें [१८]जिणिजे । इहींचि जगीं ॥ ६६ ॥ ऐसियाही [१९]सांकडां बोला । एक उपाय आहे भला । तो करितां जरी आंगवला । तरी सांगेन तुज ॥ ६७ ॥

*बाणिजे.

१ घातली. २ आहेत. ३ सांपडत नाहींत. ४ मारितात. ५ बळकटपणें. ६ कवटाळून, शोधून. ७ घेतली जाते. ८ सर्पांनीं. ९ गर्भवेष्टनाची. १० आच्छादिलेलें. ११ रोधलेलें. १२ खोल, शोधण्यास कठीण. १३ जिंकावें. १४ तो वेळपर्यंत रागद्वेषांचा पराभव नाहीं. १५ मारण्यास. १६ सहाय १७ विरजण, साहाय. १८ हट्टानें, हट्टयोगांना, हठयोगानें, १९ अशाही सांकडा=संकटाला एक उपाय, बोला=उक्त किंवा सांगण्याला आहे. २० मानवला, अनुकूळ झाला.

तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥ ४१ ॥

[इंद्रियाणीत्यर्धं] इयांचा पहिला [1]कुरुठा इंद्रियें । एथूनि प्रवृत्ति कर्मातें [2]विये । [तस्मादित्यर्धं] आधीं [3]निर्दळूं घालीं तियें । सर्वथैव ॥ ६८ ॥

इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥ ४२ ॥

मग मनाची धांव [4]पैरुषेल । आणि बुद्धीची सोडवण होईल । इतुकेनि [5]थोरा मोडेल । या पापियांचा ॥ ६९ ॥

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥ ४३ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
कर्मयोगो नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

[संस्तभ्यात्मानमात्मना] हे अंतरींचू नि जरी फिटले । [जहीत्यर्धं] तरी निभ्रांत जाण [6]निवटले । जैसें [7]रश्मीवीण उरलें । मृगजळ नाहीं ॥ २७० ॥ तैसे राग द्वेष जरी निमाले । [एवं बुद्धेः परं बुद्ध्वा] तरी ब्रह्मींचें स्वराज्य *आलें । मग तो भोगी सुख आपुलें । आपणचि ॥ ७१ ॥ ते गुरुशिष्याची †गोठी । ‡पिंडापदाची गांठी । तेथ स्थिर राहोनि नुठी । कवणे काळीं ॥ ७२ ॥ ऐसें सकळ सिद्धांचा रावो । देवीलक्ष्मीयेचा नाहो । राया ऐकें देवदेवो । बोलता जाहला ॥ ७३ ॥ आतां पुनरपि तो अनंत । [8]आद्य एकी मात । सांगेल तेथ पंडुसुत । प्रश्न करील ॥ ७४ ॥ तया बोलाचा [9]हेन [10]पाड । कीं [11]रसवृत्तीचा निवाड । येणें श्रोतयां होईल [12]सुरवाड । श्रवणसुखाचा ॥ ७५ ॥ ज्ञानदेवो ह्मणे निवृत्तीचा । [13]चांग उठावा §करूनि [14]उन्मेषाचा । मग संवाद श्रीहरिपार्थाचा । भोगावा बापा ॥ २७६ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥
श्लोक ॥ ४३ ॥ ओव्या ॥ २७६ ॥

---

*जाहालें. † गोष्टी. ‡ पिंडपदाची. § धरूनि.

१ घरटें. २ प्रसवे. ३ नाशून. ४ कुंठित होईल. ५ आश्रय. ६ मेले. ७ किरणांशिवाय. ८ नाश पावले. ९ जीवब्रह्माची. १० नाथ. ११ प्रथम गोष्ट. १२ समुच्चयार्थक अव्यय. १३ योग्यता. १४ रसिकभाषणाचा, रसभरितपणाचा. १५ अनुकूलता, सुख. १६ चांगला. १७ उत्हासाचा, ज्ञानाचा.

ज्ञानेश्वरी.

अध्याय ४ था.

आजि श्रवणेंद्रिया *पाहलें । जे येणें गीतानिधान देखिलें । आतां स्वप्नचि हें तुकलें । †साचासारिखें ॥ १ ॥ आधींचि विवेकाची गोठी । वरि प्रतिपादी श्रीकृष्ण जगजेठी । आणि भक्तराज किरीटी । परिसत असे ॥ २ ॥ जैसा पंचमालाप सुगंध । कीं परिमळ आणि सुस्वाद । भला जाहला विनोद । कथेचा इये ॥ ३ ॥ कैसी आंगलिक दैवाची । जे गंगा जोडिली अमृताची । हो कां जे तपें श्रोतयांचीं । फळा आलीं ॥ ४ ॥ आतां इंद्रियजात आघवें । ‡तिहीं श्रवणाचें घर रिघावें । मग संवादसुख भोगावें । गीताख्य हें ॥ ५ ॥ हा §अतिसो अति प्रसंगें । सांडूनि कथाचि ते सांगें । जे कृष्णार्जुन दोघे । बोलत होते ॥ ६ ॥ ते वेळीं संजयो रायातें ह्मणे । अर्जुन अधिष्ठिला दैवगुणें । जे अतिप्रीती श्रीनारायणें । बोलिजत असे ॥ ७ ॥ जें न सांगेचि पितया वसुदेवासी । जें न सांगेचि माते देवकीसी । जें न सांगेचि बंधु बळिभद्रासी । तें गुह्य अर्जुनेंसीं बोलत ॥ ८ ॥ देवी लक्ष्मीये एवढी जवळिक । §तेही न देखे या प्रेमाचें सुख । आजि श्रीकृष्णप्रेमाचें बिकें । यातेंचि आंथी ॥ ९ ॥ सनकादिकांचिया आशा । वाढीनल्या कीर बहुवसा । परी त्याही येणें मानें यशा । येतीचिना ॥ १० ॥ या श्रीजगदीश्वराचें प्रेम । एथ दिसतसे निरुपम । कैसें पार्थें येणें सर्वोत्तम । पुण्य केलें ॥ ११ ॥ हो कां जयाचिया प्रीती । अमूर्त हा आला व्यक्ती । मज एकेकवंकी याची स्थिती । आंवडत असे ॥ १२ ॥ येऱ्हवीं हा योगियां नाडळे । वेदार्थासि नाकळे । जेथ ध्यानाचेही डोळे । पावतीना ॥ १३ ॥ तो हा निजस्वरूप । अनादि निष्कर्ष । परी कवणे मानें सकृप । ¶जाहला आहे ॥ १४ ॥ हा त्रैलोक्यपटीची घडी । आकाराची पैलथडी । कैसा याचिये आवडी । $आंवरला असे ॥ १५ ॥

---

* पिकलें. † साचासारिसें. ‡ तेंही श्रवणाचे घरीं रिघावें. § परी तेही. ¶ जाहलें. $ अवतरला.

---

१ कानांला. (एतावत्कालपर्यंत जें श्रवण तें स्वप्नवत् होतें, पण श्रुतज्ञतेचें खरेपण आज प्रकाशास आलें.) २ उजाडलें. ३ ठेवा. ४ तुल्य झालें, मानलें. ५ खऱ्याप्रमाणें. ६ गोष्ट. ७ जगश्रेष्ठ. ८ अर्जुन. ९ सप्तस्वरांतील पांचवा. १० सुवास. ११ मधुर. १२ कौतुक, रमणूक. १३ आधिक्य, अपूर्वाई. १४ सर्व इंद्रियें. १५ परस्पर (कृष्णार्जुन) प्रश्नोत्तररूप भाषणाचें सुख. १६ पाल्हाळ. १७ युक्त झाला. १८ सत्वगुणानें. १९ सन्निध राहणारी. २० बळ. २१ आहे. २२ निश्चयें. २३ अतिशय. २४ यात्प्रमाणें. २५ निर्गुण. २६ एकाकार, एका कारणानें. २७ वाटत आहे. २८ आढळत नाहीं. २९ कळत नाहीं. ३० जन्मरहित, ३१ अचल. ३२ दयाळू. ३३ वस्त्राची. ३४ परतीर, पलीकडे. ३५ स्वाधीन झाला.

श्रीभगवानुवाच—**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।**
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ १ ॥

[श्रीभगवानुवाच—इममिति] **मग देव ह्मणे पंडुसुता । हाचि योग आह्मीं विवस्वता । कथिला परी ते वार्ता । *बहुवा दिवसांची ॥ १६ ॥** [विवस्वानिति] **मग तेणें विवस्वतें रवी । हे योगस्थिती आघवी । निरूपिली बरवी । मनुप्रति ॥ १७ ॥ मनूनें आपण अनुष्ठिली । मग इक्ष्वाकुवा उपदेशिली ।** [एवं परंपराप्राप्तं] **ऐसी परंपरा विस्तारिली । आद्य हे गा ॥ १८ ॥**

एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।
स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ २ ॥

[इमं राजर्षयो विदुः] **मग आणिकही या योगातें । राजर्षि जाहले जाणते ।** [स कालेनेह महता योगो नष्टः] **परी तेथोनि आतां सांप्रतें । नेणिजे कोण्ही ॥ १९ ॥ जे प्राणीयां कामीं भर । देहाचिवरी आंदर । ह्मणोनि पडिला विसर । आत्मबोधाचा ॥ २० ॥ †अव्हांटलिया आस्था बुद्धि । विषयसुखचि परमावधि । जीव तैसा उपाधि । आवडे लोकां ॥ २१ ॥ येरवीं तन्ही खेवणें-यांच्या गांवीं । पाटावें काय करावीं । सांगें जात्यंधा रवी । काय आंथि ॥२२॥ कां बहिरयाच्या आस्थानीं । कवण गीतातें मानी । कीं कोल्हेया चांदणी । ‡आवडी उपजे ॥ २३ ॥ पैं चंद्रोदया आरौतें । जयांचे डोळे फुटती असते । ते कावळे केविं चंद्रातें । वोळखती ॥ २४ ॥ तैसी वैराग्याची शिवे न देखती । जे विवेकाची भाषा नेणती । ते मूर्ख केविं पावती । मज ईश्वरातें ॥ २५ ॥ कैसा नेणों मोहें वाढिनला । तेणें बहुतेक काळ व्यर्थ गेला । ह्मणोनि योग हा लोपला । लोकीं इये ॥ २६ ॥**

स एवाऽयं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ।
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥ ३ ॥

[स एवेति] **तोचि हा आजि आतां । तुजप्रति कुंतीसुता । सांगीतला आह्मीं तत्त्वता । भ्रांति न करीं ॥ २७ ॥** [रहस्यं ह्येतदुत्तमं] **हें जीवींचें निज गुज ।**

*बहुतां. † अव्हांटली. ‡ अनावडी.

१ निवृत्तिप्रवृत्तिलक्षण ज्ञानकर्मयोग. २ सूर्याला. ३ फार. ४ सूर्यानें. ५ सर्व. ६ चवदा मनूंतील सातवा वैवस्वत मनु. ७ इक्ष्वाकुनामक पुत्राला. ८ पुरातन. ९ विषयसेवनीं आवड. १० आवड. ११ आस्था व बुद्धि या दोनी आडमार्गानें गेल्या. १२ शेवटची मर्यादा. १३ वाटे. १४ दिगंबर, जैन, क्षारपाणिक. १५ उंची वस्त्रें. १६ जन्मांधाला. १७ उपयोगी आहे. १८ सभेंत. १९ चोराला. २० पहा, निश्चयार्थक अव्यय. २१ अगोदर. २२ सीमा, हद्द. २३ विचारायें नांव देखील. २४ भ्रम. २५ जिवापाड गुप्त गोष्ट.

परी केविं राखों तुज । जे पढियेसी तूं मज । ह्मणऊनियां ॥ २८ ॥ [भक्तोसि मे सखा चेति] तूं प्रेमाचा पुतळा । भक्तीचा जिव्हाळा । मैत्रियेची चिंत्कळा । धनुर्धरा ॥ २९ ॥ तूं अनुसंगाचा ठावो । आतां तुज काय वंचों जावों । जरी संग्रामारूढ आहों । जाहालों आह्मी ॥ ३० ॥ तरी नावेक हें सहावें । गोजाबज्यही न धरावें । परी तुझें अज्ञानत्व हरावें । लागे आधीं ॥ ३१ ॥

अर्जुन उवाच–**अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ।**
कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥ ४ ॥

[अर्जुन उवाच–] तंव अर्जुन ह्मणे श्रीहरी । माय आंपुलेयाचा स्नेह करी । *तेथ विस्मय काय अवधारीं । †कृपानिधे ॥३२॥ तूं संसारश्रांतांची साउली । अनाथ जीवांची माउली । आमुतें कीर प्रसवली । तुझीच कृपा ॥ ३३ ॥ देवा पांगुळ एकाधें विईजे । तरी ‡जन्मौनि जोजार साहिजे । §तें बोलों काय तुझें । तुजचि पुढां ॥ ३४ ॥ आतां पुसेन जें मी कांहीं । तेथें निकें चित्त देईं । तेवींचि देवें कोपावें नाहीं । बोला एका ॥ ३५ ॥ [त्वमादौ प्रोक्तवानिति] तरी मागील जे वार्ता । तुवां सांगीतली होती अनंता । ते नावेक मज चित्ता । मानेचिना ॥ ३६ ॥ [परं जन्म विवस्वतः] जे तो विवस्वत ह्मणजे कायी । ऐसें हें वडिलां ठाउवें नाहीं । तरी तुवांचि केविं कहीं । उपदेशिला ॥ ३७ ॥ तो आइकिजे बहुतां काळांचा । [अपरं भवतो जन्म] आणि तूं तंव श्रीकृष्ण सांपेचों । ह्मणोनि गा इये मातुचा । विसंवादु ॥ ३८ ॥ तेवींचि देवा चरित्र तुझें । आपण ¶कांहींचि नेणिजे । हें लटिकें केविं ह्मणिजे । ऐकिहेळां ॥ ३९ ॥ [कथमेतद्विजानीयां] परी हेचि मातु आघवी । मी परियेसें ऐशी सांगावी । ॥जे कां तुवां तया रवी । उपदेश केला ॥ ४० ॥

श्रीभगवानुवाच–**बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।**
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ ५ ॥

[श्रीभगवानुवाच–] तंव श्रीकृष्ण ह्मणे पंडुसुता । तो विवस्वत जैं होता । तैं आह्मी नसों ऐसी चित्ता । भ्रांति जरी तुज ॥ ४१ ॥ तरी तूं गा हें नेणसी । [बहूनि मे व्यतीतानीति] पैं जन्में आह्मा तुह्मासी । बहुतें गेलीं [न त्वं वेत्थ परंतप]

---

* येथ. † कृपानिधि. ‡ जन्मोनि. §हें. ¶ काय जाणिजे. ॥ जे तुवांचि सवि केवीं.

१ न सांगतां ठेवूं. २ जिवलग, आवडतोस. ३ मूर्ति. ४ जीव. ५ विश्वासास योग्य ठिकाण. ६ प्रतारणा. ७ युद्धाला सज्ज. ८ क्षणभर. ९ गडबड.. १० बाळकाचा. ११ आश्चर्य. १२ संसारांत श्रमलेल्यांची. १३ निश्चयेंकरून. १४ व्यावें. १५ जन्मापासून. १६ जंजाळ. १७ चांगलें. १८ ठाऊक. १९ सांप्रतचा. २० गोष्टीचा. २१ विरोध. २२ एकदम. २३ सूर्य.

परी न स्मरसी । आपुलीं तूं ॥ ४२ ॥ [तान्यहं वेद सर्वाणि] मी जेणें जेणें[1] अवसरें[2] । जें जें होऊनि अवतरें[3] । तें तें समस्तही स्मरें । धनुर्धरा ॥ ४३ ॥

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ ६ ॥

[अजोऽपि सन्] ह्मणोनि हें[4] आघवें । मागील मज आठवे । मी अजही [संभवाम्यात्ममायया] परि संभवें[5] । प्रकृतियोगें ॥ ४४ ॥ [अव्ययात्मा] माझें[6] अव्ययत्व तरी न नसे । परी होणें जाणें एक दिसे । तें प्रतिबिंबे मायावशें । माझ्याचि ठायीं ॥ ४५ ॥ माझी स्वतंत्रता तरी न मोडे । परी कर्माधीन ऐसा[7] आवडे । तेंही भ्रांति बुद्धि तरी घडे । येन्हवीं नाहीं ॥ ४६ ॥ कीं एकचि दिसे दुसरें । तें दर्पणाचेनि[8] आधारें । येन्हवीं काय वस्तुविचारें । दुजें आहे ॥ ४७ ॥ तैसा अमूर्तचि मी किरीटी । [प्रकृतिं स्वामधिष्ठाय] परी प्रकृति जैं[9] अधिष्ठीं[10] । [भूतानामीश्वरोऽपि सन्] तैं साकारपणें[11] नटनटीं[12] । कार्यालागीं ॥ ४८ ॥

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ७ ॥

[तदात्मानं सृजाम्यहं] जें धर्मजात आघवें[13] । युगायुगीं[14] म्यां रक्षावें[15] । ऐसा ओघ[16] हा स्वभावें[17] । आद्य असे ॥ ४९ ॥ ह्मणोनि अजत्व परतें ठेवीं[18] । मी अव्यक्तपणही नाठवीं[19] । [यदा यदा हीति पादाः ३] जे वेळीं धर्मातें अभिभवी[20] । अधर्म हा ॥ ५० ॥

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ८ ॥

[परित्राणाय साधूनां] ते वेळीं[21] आपुल्याचेनि[22] कैवारें[23] । मी साकार होऊनि अवतरें[24] । [विनाशाय च दुष्कृतां] मग अज्ञानाचे आंधारें । गिळूनि[25] घालीं[26] ॥ ५१ ॥ अधर्माची अवधी[27] तोडीं[28] । दोषांचीं लिहिलीं फाडीं । सज्जनाकरवीं[29] गुढी[30] ।

---

१ ज्या ज्या वेळीं. २ सर्व. ३ जन्मरहित. ४ देहधारण करितों, अवतार घेतों. ५ अनादिआत्ममाया अंगीकारून. ६ अविनाशिता, नाशशून्यत्व. ७ बिघडत नाहीं. ८ प्रतिभासतें. ९ लोकांस वाटतो. १० अविद्याआवृतबुद्धीनें. ११ प्रकृतिरूप आरशाच्या. १२ माझ्या नित्य शुद्धबुद्धस्वरूपाचा विचार केला असतां. १३ निराकार. १४ माझी माया जी शुद्धसत्वात्मिक वैष्णवी शक्ति. १५ अधिष्ठान करून, स्वीकारून, वश करून. १६ साकारपणानें नटासारिखा नटतों, परमार्थता नव्हे, लोकदृष्ट्या देहवान् होतों. १७ प्रत्येक युगांत. १८ प्रवाह. १९ जन्मरहितपणा. २० निराकारपणा. २१ पराभवी, ह्रास करतो. २२ माझ्या भक्तांच्या कैवारानें, पक्षानें. २३ टाकितों. २४ सीमा, अवकाश. २५ ध्वज.

सुखाची उभवीं ॥ ५२ ॥ दैत्यांचीं कुळें नाशीं । [धर्मसंस्थापनार्थाय] साधूंचा मान गिंवशीं । धर्मासीं नीतीसीं । शेंसे भरीं ॥ ५३ ॥ मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेकदीप उजळीं । तैं योगियां पाहे दिवाळी । निरंतर ॥ ५४ ॥ *स्वसुखें विश्व कोंदे । धर्मचि जगीं नांदे । भक्तां निघती दोंदें । सात्विकांचीं ॥ ५५ ॥ तैं पापांचा अंचळ फिटे । पुण्याची पेंहांट फुटे । जैं मूर्ति माझी प्रगटे । पंडुकुमरा ॥ ५६ ॥ [संभवामि युगे युगे] ऐसेया काजालागीं । अवतरें मी †युगीं युगीं । परी हेंचि वोळखे जो जगीं । तो विवेकिया ॥५७॥

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥ ९ ॥

[जन्मेति] माझें अजत्वें जन्मणें । अक्रियताचि कर्म करणें । हें अविकार जो जाणे । तो परममुक्त ॥ ५८ ॥ [त्यक्त्वेति] तो चालिला संगें न चले । देहींचा ‡देहीं नाकळे । मग पंचत्वीं तंव मिळे । माझ्याचि रूपीं ॥ ५९ ॥

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः ।
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ १० ॥

[वीतरागभयक्रोधाः] येन्हवीं परापर न शोचिती । जे कामनाशून्य होती । वांटा कोणे वेळीं न वचती । क्रोधाचिया ॥ ६० ॥ [मन्मया मामुपाश्रिताः] §सदा मियांचि आथिले । माझिया सेवा जियाले । कीं आत्मबोधें तोषले । वीतराग जे ॥ ६१ ॥ [बहवो ज्ञानतपसा पूताः] जे तपोतेजाचिया राशी । कीं एकायतन ज्ञानासी । जे पवित्रता तीर्थांसी । तीर्थरूप ॥ ६२ ॥ [मद्भावमागताः] ते मद्भावा सहजें आले । मी तेचि ते होऊनि ठेले । जे मज तयां उरले । पैदर नाहीं ॥ ६३ ॥ सांगें पितळेचि गंधिकोळिक । जैं फिटली होय निःशेख । तैं सुवर्ण काइ आणिक । जोडूं जाइजे ॥ ६४ ॥ तैसे यमनियमीं केंहसले । जे तपोज्ञानें चोखाळले । मी तेचि ते जाहले । एथ संशयो कायसा ॥ ६५ ॥

---

* सत्सुखें. † युगमयुगीं. ‡ देहा. § जे सदा.

---

१ आच्छादन करतों, छत्र धरतों. २ मळवट भरितों, लग्न लावितों. ३ अविद्येची. ४ उजाडे, विकासे. ५ भरे. ६ शुद्धसत्त्वप्रधानांचीं. ७ पर्वत फुटे. ८ उदय. ९ ज्ञानी. १० जन्मादिविकारराहित्यानें. ११ अखंड. १२ आकळला जात नाहीं. १३ मरणकाळीं. १४ आप पर, मागील पुढील. १५ शोक करीत नाहींत. १६ मार्गाला. १७ न जाती. १८ माझ्या योगानें. १९ भाग्यवान्. २० वांचले. २१ निरिच्छ. २२ एकच स्थान. २३ माझ्या स्वरूपाला. २४ पडदा, अंतर. २५ गंज, कीट. २६ यम, नियम आदि अष्टांगयोगांनीं. २७ शुद्ध झाले. २८ निर्मळ झाले.

ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।
मम वर्त्माऽनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ११ ॥

[ये यथा मां प्रपद्यंते] येऱ्हवीं तरी पाहीं । जे जैसे माझ्याठायीं । [तांस्तथैव भजाम्यहं] भजती तयां मीही । तैसाचि भजें ॥ ६६ ॥ [मम वर्त्माऽनुवर्तंते इति] देखें मनुष्यजात सकळ । हें स्वभावता भजनशीळ । जाहालें असे केवळ । माझ्या ठायीं ॥ ६७ ॥ परी ज्ञानेंवीण नाशिले । जे बुद्धिभेदासि आले । *त्यांणीं एकाची यया कल्पिलें । अनेकत्वें ॥ ६८ ॥ ह्मणऊनि अभेदीं भेद देखती । यया अनामया नामें ठेविती । देवी देवो ह्मणती । †अचर्चातें ॥ ६९ ॥ जें सर्वत्र सदा सम । तेथ विभाग अधमोत्तम । मतिवशें सभ्रम । विवंचिती ॥ ७० ॥

कांक्षंतः कर्मणां सिद्धिं यजंत इह देवताः ।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥ १२ ॥

[यजंत इह देवताः] मग नानाहेतुप्रकारें । यथोचितें उपचारें । मानिलीं देवतांतरें । उपासिती ॥ ७१ ॥ [कांक्षंतः कर्मणां सिद्धिं] एथ जें जें अपेक्षित । तें तैसेंचि पावती समस्त । परी तें कर्मफळ निश्चित । वोळख तूं ॥ ७२ ॥ वांचूनि देतें घेतें आणिक । निभ्रांत नाहीं सम्यक । [क्षिप्रं हीति] एथ कर्मचि फळसूचक । मनुष्यलोकीं ॥ ७३ ॥ जैसें क्षेत्रीं जें पेरिजे । तेंवांचूनि आन न निपजे । कां पाँहिजे तेंचि देखिजे । दर्पणाधारें ॥ ७४ ॥ ना तरी कंडेया तळवटीं । जैसा आपलाचि बोलु किरीटी । पडिसादु होऊनि उठी । निमित्तयोगें ॥ ७५ ॥ तैसा समस्तां यां भजना । मी साक्षिभूत पैं अर्जुना । एथ प्रतिफळे भावना । आपुलाली ॥ ७६ ॥

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।
तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥ १३ ॥

[चातुर्वर्ण्यमिति] आतां याचिपरी जाण । चाऱ्ही हे वर्ण । सृजिले म्यां

---

* तपेंचि या कल्पिलें. † अज अचर्चातें.

---

१ मनुष्यमात्र. २ विविधधर्मपद्धति. ३ या (माझा) एकालाच. ४ नामादिर हिताला. ५ चर्चा करण्यास अशक्य, अनिर्वाच्य. ६ भेद. ७ भ्रांतिष्ट. ८ मानिती. ९ उपायांनीं. १० दुसरे देव अग्नि, इंद्र इत्यादि. ११ इच्छित. १२ मजशिवाय दुसरें. १३ खरें पाहतां. १४ शेतांत. १५ अन्य, दुसरें. १६ उत्पन्न होत नाहीं. १७ जें पाहिलें जातें तेंच दृष्टीस पडलें जातें. १८ डोंगराच्या कड्याखालीं, गिरिकंदरीं. १९ शब्द. २० प्रतिध्वनि, पडशब्द. २१ सिद्धि पावे. २२ उत्पन्न केले.

गुण[1]। कर्मविभागें[2] ॥७७॥ जे प्रकृतीचेनि आधारें। गुणाचेनि व्यभिचारें[3]। कर्मे तदनुसारें। विवंचिलीं[4] ॥ ७८ ॥ [तस्य कर्तारमपि मां] एथ एकचि हें धनुष्यपाणी[5]। परी जाहालें गा चहूंवर्णीं। ऐसी गुणकर्मकडसणी[6]। केली सहजें ॥ ७९ ॥ [विद्ध्यकर्तारमव्ययं] ह्मणोनि आइकें पार्था। हे वर्णभेदसंस्था। मी कर्ता नव्हे सर्वथा। *याचिलागीं ॥ ८० ॥

न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफले स्पृहा।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥ १४ ॥

[न मामिति] हें मजचिस्तव जाहालें। परी म्यां नाहीं केलें। [इति मामिति] ऐसें जेणें जाणितलें। तो सुटला गा ॥ ८१ ॥

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ १५ ॥

[एवं ज्ञात्वेति] मागील मुमुक्षु जे होते। तिहीं ऐसिया जाणोनि मातें। कर्मे केलीं समस्तें। धनुर्धरा[7] ॥ ८२ ॥ †पेरितां बीजें जैसीं दैगधलीं[8]। नुगवतीचि[9] पेरिलीं। तैसीं ‡कर्मेंचि परि तयां जाहालीं। मोक्षहेतु[10] ॥ ८३ ॥ [कुरु कर्मैवेति] एथ आणिकही एक अर्जुना। हे कर्माकर्मविवंचना[11]। आपुलिये चाडें[12] सज्ञाना। योग्य नोहे ॥ ८४ ॥

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः।
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १६ ॥

[किं कर्म किमकर्मेति] कर्म ह्मणिपे[13] तें कवण। अथवा अकर्मीं काय लक्षण। ऐसें विचारितां [कवयोऽप्यत्र मोहिताः] विचक्षण[14] गुंफोनि[15] ठेले ॥ ८५ ॥ जैसें कां कुडें[16] नाणें। खऱ्याचेनि सारखेपणें। डोळ्याचेचि देखणे[17]। संशयीं घाली ॥ ८६ ॥ तैसें नैष्कर्म्यतेचेनि भ्रमें[18]। गिंवसिजेत[19] आहाती कर्मे। जे दुजी सृष्टि

---

* याचिहेतु. † पेरितें. ‡ कर्मेंचि तयां.

---

१ गुण व कर्मे यांच्या भेदानें. सत्व, रज, तम हे तीन गुण व शम, दम, शौर्य, तेज, कृषि, वाणिज्य, सेवा इत्यादिकानें; ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य व शूद्र असा गुणकर्मीचा विचार. २ उलटापालटीनें. ३ मानिलीं. ४ धनुर्धरा. ५ विवेक, विचार. ६ ब्राह्मणक्षत्रियादि उत्तम मध्यम नीच ही विभागस्थापना. ७ मजपासून. ८ मोक्षाची इच्छा करणारे. ९ भाजलेलीं. १० रुजत नाहींत. ११ मुक्तीला कारण. १२ प्रवृत्ति व निवृत्ति; शास्त्रोक्त कर्म व नैष्कर्म्य यांची वाटाघाट. १३ महत्व, योग्यता, गरज. १४ म्हटलें जातें. १५ विचारी, शाहाणे. १६ गोंधळून राहिले. १७ खोटें. १८ पहाणें. १९ कर्मरहितपणानें, निष्काम, अहेतुक कर्म. २० सांपडले जातात, गुंततात.

मनोधर्मे[1] । करूं सकती ॥ ८७ ॥ वांचूनि[2] मूर्खांची गोठी[3] कायसी । एथ मोहले[4] गा *दीर्घदर्शी[5] । [तत्ते कर्म प्रवक्ष्यामि] ह्मणोनि आतां तेचि परियेसीं । सांगेन तुज ॥ ८८ ॥

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ।
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥ १७ ॥

[कर्मणो ह्यपि बोद्धव्यं] तरीं कर्म ह्मणिजे स्वभावें । जेणें विश्वाकार संभवे । तें सम्यक् आधीं जाणावें । लागे एथ ॥ ८९ ॥ [बोद्धव्यं च विकर्मणः] मग वर्णाश्रमासि[6][7] उर्चित[8] । जें विशेष कर्म विहित । तेंही वोळखावें निश्चित । उपयोगेंसीं[9] ॥ ९० ॥ [अकर्मणश्च बोद्धव्यं] पांठी[10] जें निषिद्ध ह्मणिपे । तेंही बुझावें[11] स्वरूपें । [यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्. १६] येतुलेनि[12] कांहीं न गुंफे[13] । आपैसेंचि[14] ॥ ९१ ॥ [गहना कर्मणो गतिः] येन्हवीं जग हें कर्माधीन । ऐसीयाची व्याप्ती[15] गहन[16] । परी †तें असो आइकें चिन्ह । प्राप्तांचें ॥ ९२ ॥

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।
स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ १८ ॥

[कर्मण्यकर्म यः पश्येत्] जो सकळकर्मीं वर्ततां । देखे आपुली नैष्कर्म्यता । कर्मसंगें निराशता[17] । फळाचिया ॥ ९३ ॥ [अकर्मणि च कर्म यः] आणि कर्तव्यतेलागीं । जया दुसरें नाहीं जगीं । ऐसिया नैष्कर्मता तरी चांगी[18] । बोधली[19] असे ॥ ९४ ॥ [स बुद्धिमान्] ‡तरी क्रियाकलाप[20] औघवा[21] । आचरत दिसे बरवा । तोचि तो ये चिन्हीं जाणावा । ज्ञानिया गा ॥ ९५ ॥ जैसा कां जळापाशीं उभा ठाके । तो जरी औपणपें[22] जळामाजि देखे । तरी तो निभ्रांत वोळखे । ह्मणे मी वेगळा आहें ॥ ९६ ॥ अथवा नावे[23] हेंन[24] जो रिगे । तो थडियेचे[25] रुख[26] जातां देखे वेगें । तेचि सांचोकारें[27] पाहों जों लागे । तंव रुख ह्मणे अचळ[28] ॥ ९७ ॥ तैसें सर्वकर्मीं असणें । तें फुडें[29] मानूनि वांयाणें[30] । मग आपण जो जाणे । नैष्कर्म्य ऐसा ॥ ९८ ॥

---

* क्रांतदर्शी. † तें आइकें. ‡ परी.

---

१ मनाच्या चंचल धर्मामुळें. २ याशिवाय, यापुढें. ३ गोष्ट, कथा. ४ भ्रम पावले. ५ दूरदृष्टीचे, ज्ञानी. ६ 'कर्मचितो लोकः' कर्मापासून सृष्टि व ही विश्वरचना. ७ वर्ण=ब्राह्मण आदि. ८ आश्रम=ब्रह्मचर्य आदि ४ यांस. ८ योग्य. ९ फळासह. १० याउलट. ११ जाणावें. १२ एवढ्यानें. १३ गुंतत नाहीं. १४ आपोआप. १५ व्यापकपण. १६ खोल. १७ निरिच्छपणा. १८ चांगल्या. १९ समजला. २० अनुष्ठानआदि. २१ सर्व. २२ आपलें स्वरूप. २३ नौकेंत. २४ समुच्चयार्थक अव्यय. २५ नदीच्या तीराचे. २६ वृक्ष. २७ खरें. २८ स्थावर. २९ स्पष्ट. ३० खोटें.

आणि [1]उदोअस्ताचेनि प्रमाणें । जैसें [2]नें चलतां सूर्याचें चालणें । तैसें नैष्कर्म्यतत्त्व जाणे । कर्मींचि असतां ॥ ९९ ॥ [मनुष्येषु] तो मनुष्यासारिखा तरी [3]आवडे । परी मनुष्यत्व तया न घडे । जैसें जळामाजी न बुडे । भानुबिंब ॥ १०० ॥ [स युक्तः कृत्स्नकर्मकृत्] तेणें न पाहतां विश्व देखिलें । न करितां सर्व केलें । न भोगितां भोगिलें । भोग्यजात ॥ १ ॥ एकेचि ठायीं बैसला । परि सर्वत्र तोचि गेला । हें असो विश्व जाहाला । [4]आंगेंचि तो ॥ २ ॥

यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः ।
ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः ॥ १९ ॥

[यस्य सर्वे इति] जया पुरुषाच्या ठायीं । कर्माचा तरी [5]खेदु नाहीं । तरी फळापेक्षा कांहीं । संचरेना ॥ ३ ॥ आणि हें कर्म मी करीन । अथवा [6]आदरिलें सिद्धी नेईन । येणें संकल्पेंही जयाचें मन । विटाळे ना ॥ ४ ॥ [ज्ञानाग्नीति] ज्ञानाग्नीचेनि मुखें । जेणें जाळिलीं कर्मे [7]अशेखें । तो परब्रह्मचि [8]मनुष्यवेखें । वोळख तूं ॥ ५ ॥

त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयः ।
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति सः ॥ २० ॥

[त्यक्त्वेति] जो शरीरीं उदास । फळभोगीं [9]निरासु । नित्यता उल्हास । होऊनि असे ॥ ६ ॥ [कर्मणीति] जो संतोषाचा [10]गाभारां । आत्मबोधाचिया *[11]वोगरीं । पुरे न ह्मणेचि धनुर्धरा । [12]आरोगितां ॥ ७ ॥

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ।
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ २१ ॥
यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः ।
समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते ॥२२॥

[निराशीर्यतचित्तात्मा] कैसी अधिकाधिक आवडी । घेत महासुखाची गोडी । [त्यक्तसर्वपरिग्रहः] सांडोनियां आशा [13]कुरोंडी । अहंभावेसीं ॥ ८ ॥

---

* ओवरां.

---

१ उदय. २ चालत नसतां. ३ वाटे. ४ सर्व विषय. ५ स्वरूपेंकरून स्वतः. ६ वियोग. ७ शिरेना. ८ प्रारंभिलेलें. ९ संपूर्ण. १० मनुष्यवेषानें. ११ निरिच्छ. १२ मध्यगृह. १३ जेवण. १४ भोजन करितां. १५ ओवाळणी.

[यदृच्छालाभसंतुष्टो] ह्मणोनि अवसरें जें जें पावे । तेणेंचि तो सुखावे । जया आपुलें आणि परावें । दोन्हीं नाहीं ॥ ९ ॥ [शारीरं केवलं कर्म] तो दिठी जें पाहे । तें आपणचि होऊनि जाये । आइके तें आहे । तोचि जाहला ॥ १० ॥ चरणीं हेंन चाले । मुखें जें जें बोले । ऐसें चेष्टाजात तेतुलें । आपणचि जो ॥ ११ ॥ हें असो विश्व पाहीं । जयासि आपणपेंवांचूनि नाहीं । [कुर्वन्नाप्नोति किल्बिषं] आतां कवण तें कर्म कायी । बाधी तयातें ॥ १२ ॥ [द्वंद्वातीतो विमत्सरः] हा मत्सर जेथ उपजे । तेतुलें नुरेचि *जया दुजें । तो निर्मत्सर काइ ह्मणिजे । बोलेवरी ॥ १३ ॥ [समः सिद्धावसिद्धौ च] ह्मणोनि सर्वोपरी मुक्त । [कृत्वापि न निबध्यते] तो सकर्मचि कर्मरहित । सगुण परि गुणातीत । एथ भ्रांति नाहीं ॥ १४ ॥

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ।
यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ २३ ॥

[गतसंगस्येति] तो देहसंगें तरी असे । परि चैतन्यासारिखा दिसे । पाहतां परब्रह्माचेनि कसें । चोखाळ भला ॥ १५ ॥ [यज्ञायाचरतः कर्म] ऐसाही परी कौतुकें । जरी कर्मे करी यज्ञादिकें । [समग्रं प्रविलीयते] तरी तियें लया जाती निःशेखें । तयाच्याचि ठायीं ॥ १६ ॥ अकाळींचीं अभ्रें जैशीं । उर्मीवीण आकाशीं । हारपती आपैशीं । उदयलीं सांतीं ॥ १७ ॥ तैसीं विधिविधानें विहितें । जरी आचरे तो समस्तें । तरी तियें ऐक्यभावें ऐक्यातें । पावतीचि गा ॥ १८ ॥

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ २४ ॥

[ब्रह्मार्पणमिति] हें हवन मी होतां । कां इंये यज्ञीं हा भोक्ता । ऐसिया बुद्धीसि नाहीं भिन्नता । ह्मणऊनियां ॥ १९ ॥ जे इष्टयज्ञ यजावे । तें हविमंत्रादि आघवें । तो देखतसे अविनाशभावें । आत्मबुद्धि ॥ १२० ॥ [ब्रह्मकर्मसमाधिना] ह्मणऊनि ब्रह्म तेंचि कर्म । ऐसें बोधा आलें जया सम । तया कर्तव्य तें नैष्कर्म्य । धनुर्धरा ॥ २१ ॥ [ब्रह्मैव तेन गंतव्यं] आतां अविवेक कुमारत्वा मुकले । जयां विरक्तीचें पाणिग्रहण जाहालें । मग उपासन जिहीं आणिलें । योगाग्नीचें ॥ २२ ॥

---

* तया.

---

१ समयानुसार. २ दुसऱ्याचें. ३ दृष्टीनें. ४ समुच्चयार्थक अव्यय. ५ चलनवलनादि. ६ तितकें, तेवढें. ७ विश्वाविषयीं विचार करितां. ८ स्वतःशिवाय. ९ शब्दांनीं. १० गुणांपलीकडचा ब्रह्मस्वरूपी. ११ निर्गुण. १२ कसोटीनें. १३ शुद्ध. १४ संपूर्ण. १५ वृष्टीवांचून. १६ आपोआप. १७ आल्याबरोबर, होत्सातीं. १८ यज्ञादिकर्मे. १९ यज्ञ करणारा आचार्य. २० ह्मा. २१ होमाचे मंत्र व द्रव्यें इत्यादि. २२ बालपणास. २३ अंतरले. २४ वैराग्याचें. २५ लग्न, परिग्रह. २६ भक्ति.

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ।
ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥ २५ ॥

[दैवमिति] जे यजनशील[1] अहर्निशीं । जिहीं अविद्या हविली[2] मनेंसीं । गुरुवाक्यहुताशीं[3] । हवन केलें ॥ २३ ॥ तिहीं योगाग्निकीं[4] यजिजे । तो दैवयज्ञ म्हणिजे । *जेणें आत्मसुख कामिजे[5] । पंडुकुमरा ॥ २४ ॥ दैवास्तव पाळण । †जो चिंतीना देहभरण । तो महायोगी जाण । दैवयोगें ॥ २५ ॥ [ब्रह्माग्नाविति] आतां अवधारीं सांगेन आणिक । जे ब्रह्माग्नी साग्निक[6] । तयांतें यज्ञेंचि यज्ञ देख । उपासिजे ॥ २६ ॥

श्रोत्रादीनींद्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति ।
शब्दादीन्विषयानन्य इंद्रियाग्निषु जुह्वति ॥ २६ ॥

[श्रोत्रादीनीति] एक संयमाग्निहोत्री[7] । ते युक्तित्रयाच्या मंत्रीं[8] । यजन करिती पवित्रीं । इंद्रियद्रव्यीं ॥ २७ ॥ [शब्दादीनिति] एकां वैराग्य रवि विवळे[9] । तंव संयतीविहार[10] केले[11] । तेथ अपावृत्त[12] जाहाले[13] । इंद्रियानळ ॥ २८ ॥ तिहीं विरक्तीची ज्वाळा घेतली[14] । तंव विकारांचीं इंधनें[15] पळिपेलीं[16] । तेथ आशाधूमें[17] सांडिलीं । पांचही कुंडें[18] ॥ २९ ॥ मग वाक्यविधीचिया[19] निरवडी । विषय आहुती उदंडीं । हवन केलें कुंडीं । इंद्रियाग्नीच्या ॥ ३० ॥

सर्वाणींद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ।
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥ २७ ॥

[आत्मसंयमयोगाग्नौ] एकीं यथापरी पार्था । दोष क्षाळिले सर्वथा । ‡एकीं हृदयारणीं[20] मंथी[21] । विवेक केला ॥ ३१ ॥ तो उपशमें[22] निहटिलें[23] । धैर्यभारें दाटिलें[24] । गुरुवाक्यें काढिला । बळकटपणें[25] ॥ ३२ ॥ [ज्ञानदीपिते] ऐसें संभरसें[26]

---

* जेथ. † ऐसा निश्चय परिपूर्ण । जो चिंतीना देहभरण । तो महा योगिया. ‡ आणिकीं.

---

१ रात्रंदिवस यज्ञ करणारे. २ होमिली. ३ गुरुवाक्यरूप अग्नींत. ४ योगरूप अग्नींत. ५ इच्छावें. ६ अग्नियुक्त, अग्निहोत्री. ७ आत्मसंयमरूप अग्नीमध्यें होम करणारे. ८–१ वज्रासन, २ जालंधर, ३ ओढियाण; अथवा आहार विहार, चेष्टा, निद्रा व बोध परिमित हें युक्तित्रय. ९ सूर्य. १० प्रकटे, स्पष्ट कळे. ११ नेम, संयम = इंद्रियनिग्रह. १२ कुंडें. १३ उघड केलेला. १४ त्यांनीं. १५ लांकडें. १६ पेटविलीं. १७ धुरानें. १८ अंतःकरणपंचक. १९ गुरुवाक्य. २० कौशल्य. २१ हृदयामध्यें विवेकरूप अरणी(मंथनकाष्ठा)च्या. २२ मंथनानें, घर्षणानें. २३ शांतीनें. २४ नेट धरिला. २५ दृढ झाला. २६ सर्व वृत्तींच्या ऐक्यानें.

मंथन केलें । तेथ झडकरी काजा आलें । जे उजीवन[1] जाहालें । ज्ञानाग्नीचें ॥ ३३ ॥ पहिला ऋद्धिसिद्धीचा संभ्रम[2] । तो निवर्तोनि गेला धूम । मग प्रगटला सूक्ष्म । विस्फुलिंग[3] ॥३४॥ तया मनाचें मोकळें । तेंचि पेटवण घातलें । जें *यमनियमीं हळवारलें[4] । आइतें होतें ॥ ३५॥ तेणें सादुकपणें[5] ज्वाळा समृद्धा[6] । [सर्वाणि] मग वासनांतराचिया समिधा । स्नेहसि[7] नाना विधा । जाळिलिया ॥ ३६ ॥ [इंद्रियकर्माणि] तेथ सोहंमंत्रें दीक्षितीं[8] । इंद्रियकर्माचिया आहुती । तिये ज्ञानानळीं प्रदीप्तीं[9] । [जुह्वति] दिधलिया ॥ ३७ ॥ [प्राणकर्माणि चापरे] पाठीं प्राणकर्माचिये स्नुवेनिशीं[10] । पूर्णाहुती पडलिया हुतांशीं[11] । तेथ अवभृथ[12] समरसीं । सहजें जाहालें ॥ ३८ ॥ मग आत्मबोधिचें सुख । जें संयमाग्नीचें हुतशेष[13] । तोचि पुरोडाश[14] देख । घेतला तिहीं ॥ ३९ ॥ एक ऐशिया इहीं यजनीं । मुक्त ते जाहाले त्रिभुवनीं । या यज्ञक्रिया तरी[15] नानी । परि प्राप्य तें एक ॥ १४० ॥

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथाऽपरे ।
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥ २८ ॥

[द्रव्ययज्ञा इति] एक द्रव्ययज्ञ ह्मणिपती[16] । एक तपसामग्रिया[17] निपजविती । एक योगयागही[18] आहाती । जे सांगितले ॥ ४१ ॥ [दैवमेवापरे यज्ञं श्लो. २५। स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च] एकीं शब्दीं शब्द यजिजे[19] । तो वाग्यज्ञ ह्मणिजे । ज्ञानें ज्ञेय[20] गमिजे । तो ज्ञानयज्ञ ॥ ४२ ॥ हें अर्जुना सकळ कुवाडें[21] । जें अनुष्ठितां अतिसोकडें[22] । [यतयः संशितव्रताः] परी जितेंद्रियासीचि[23] घडे । योग्यतावशें ॥ ४३ ॥ ते प्रवीण[24] तेथ भले । आणि योगसमृद्धि आथिले[25] । ह्मणोनि आपणपां[26] तिहीं केलें । आत्महवन ॥ ४४ ॥

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथाऽपरे ।
प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥ २९ ॥

[अपाने जुह्वतीति] मग अपानाग्नीचे[27] मुखीं । प्राणद्रव्यें देखीं । हवन केलें

---

* यमदमीं.

---

१ प्रदीपन, उद्दीपन. २ मोह. ३ ठिणगी. ४ वाढून हलकें झालें. ५ प्रदीप्तपणानें. ६ मोहरूप तुपासहित. ७ यज्ञकर्ते. ८ ज्ञानाग्नींत. ९ होमांत आहुति घालण्याचें यज्ञपात्र त्यासह. १० अग्नींत. ११ यज्ञाच्या शेवटचें स्नान. १२ होम करून राहिलेलें द्रव्य. १३ यज्ञसंबंधी चरु. १४ भिन्नभिन्न. १५ म्हटला जातो. १६ साहित्य. १७ अष्टांगयोगरूप यज्ञ. १८ होम केला जातो. १९ जाणण्यास योग्य. २० पाविजे. २१ विकट. २२ कठीण. २३ इंद्रियें स्वाधीन असणाराला. २४ कुशल. २५ भाग्यवान्. २६ आपल्याचठायीं. २७ अपानव्यायुरूप अग्नींत.

एकीं । अभ्यासयोगें ॥ ४५ ॥ [प्राणायामपरायणाः] एक अपान प्राणीं अर्पिती । [प्राणापानगती रुद्ध्वा] एक दोहींतेंही निरुंधिती । ते प्राणायामी ह्मणिपती । पंडुकुमरा ॥ ४६ ॥

अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति ।
सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ३० ॥

[अपरे इति] एक वज्रयोगक्रमें । सर्वाहारसंयमें । प्राणीं प्राण संभ्रमें । हवन करिती ॥ ४७ ॥ [सर्वेऽपीति] ऐसे मोक्षकाम सकळ । समस्त हे यजनशीळ । जिहीं यज्ञद्वारां मनोमळ । क्षाळण केले ॥ ४८ ॥ जया अविद्याजात जाळितां । जें उरलें निजस्वभावता । जेथ अग्नि आणि होता । उरेचिना ॥ ४९ ॥ जेथ यजितयाचा काम पुरे । यज्ञींचें विधान सरे । मागुतें जेथोनि वोसरे । क्रियाजात ॥ १५० ॥ विचार जेथ न रिगे । *हेतु जयातें नेघे । जें द्वैतदोषसंगें । लिंपेचिना ॥ ५१ ॥

यज्ञशिष्टामृतभुजो यांति ब्रह्म सनातनम् ।
नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ३१ ॥

[यज्ञशिष्टामृतभुजो] ऐसें अनादिसिद्ध चोखटें । जें ज्ञान यज्ञावशिष्ट । तें सेविती ब्रह्मनिष्ठ । ब्रह्माहंमंत्रें ॥ ५२ ॥ ऐसे शेषामृतें धाले । [यांति ब्रह्म सनातनं] कीं अमर्त्यभावा आले । ह्मणोनि ब्रह्म ते जाहाले । अनायासें ॥ ५३ ॥ [नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य] येरां विरक्ति माळ न घालिचि । जयां संयमाग्नीची सेवा न घडेचि । जे योगयाग न करितीचि । जन्मले सांते ॥ ५४ ॥ जयां ऐहिक धड नाहीं । [कुतोऽन्यः कुरुसत्तम] तयांचें परत्र पुसशी काई । ह्मणोनि †असो हे गोष्टी पाहीं । पंडुकुमरा ॥ ५५ ॥

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।
कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥ ३२ ॥

[एवमिति] ऐसें बहुतीं परी अनेग । जे सांगीतले तुज कां योग । ते

---

* हेतु जेथ न निगे. † सागों कां वाई.

---

१ निरोध करितात. २ म्हटले जातात. ३ हठयोग. ४ सर्व विषय हेच आहार ते बंद करून ५ मोक्षेच्छु. ६ यज्ञकर्ते. ७ धुतले. ८ सर्व अज्ञान. ९ होम करणारा. १० यज्ञ करणाराचा. ११ यज्ञक्रिया. १२ नाहींसें होतें. १३ मीमांसा. १४ न्याय. १५ चांगलें, शुद्ध. १६ यज्ञाचें शिल्लक. १७ 'अहं ब्रह्मास्मि' या मंत्रानें ब्रह्मरूप होतात. १८ तृप्त झाले. १९ अमरपणाला. २० होत्साते, पासून. २१ या लोकींचें. २२ परलोकींचें. २३ अनेक. २४ यज्ञ.

विस्तारूनि वेदें चांग[1]ला । ह्मणितले आहाती[2] ॥ ५६ ॥ [कर्मज्ञानिति] परि तेणें विस्तारें काय करावें । हेंचि *कर्मसिद्ध जाणावें । येतु[3]लेनि कर्मबंध स्वभावें । पावेलना ॥ ५७ ॥

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ ३३ ॥

[श्रेयानिति] अर्जुना वेद जयांचें मूळ । जे क्रि[4]यांविशेष स्थूळ । जया नें[5]व्हाळियेचें फळ । स्वर्गसुख ॥ ५८ ॥ ते द्रव्यादियाग [6]कीर होती । परी ज्ञानयज्ञाची सैं[7]री न पवती । जैसी [8]तारातेजसंपत्ती । दि[9]नकरापाशीं ॥ ५९ ॥ देखें परमात्म सुख[10]निधान । साधावया योगीजन । जें न वि[11]संबिती अंजन । [12]उन्मेषनेत्रीं ॥ १६० ॥ [सर्वमिति] जें धांवतया कर्माची [13]लोणी । नैष्कर्म्य बोधाची खाणी । जें भुकेलिया [14]धणी । साधनाची ॥ ६१ ॥ जेथ प्रवृत्ति पां[15]गुळे जाहाली । तर्काची दृष्टी गेली । जेणें इंद्रियें विसरलीं । विषयसंग ॥ ६२ ॥ मनाचें मनपण गेलें । जेथ बोलाचें †बोलकेपण ठेलें । जयामाजि सांपडलें । ज्ञे[16]य दि[17]से ॥ ६३ ॥ जेथ वैराग्याचा [18]पांग फिटे । विवेकाचाही सो[19]स तुटे । जेथ न पाहतां सहज भेटे । औ[20]पणपें ॥ ६४ ॥

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ३४ ॥

[तद्विद्धि प्रणिपातेन] तें गा ज्ञान पैं बरवें । जरी मनीं आं[21]थि जाणावें । तरी संतांतें भजावें । सर्वस्वेसीं ॥ ६५ ॥ जे ज्ञानाचा कु[22]रुठा । तेथ सेवा हा दो[23]रिवंठा । तो स्वाधीन करी सुभटा । वोळ[24]गोनी ॥६६॥ [सेवया] तरी ते[25]नुमनुजीवें । चरणासी लागावें । आणि अ[26]गर्वता करावें । दास्य सकळ ॥ ६७ ॥ [परिप्रश्नेन] मग अपेक्षित जें आपुलें । [उपदेक्ष्यंति ते ज्ञानं] तेंही सांगतील पुसिलें । जेणें अंतःकरण बोधलें । सं[27]कल्पा नये ॥ ६८ ॥

यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव ।
येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥ ३५ ॥

[ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ३४] जयाचेनि वाक्य [28]उजिवडें । जाहालें चित्त नि[29]धडें ।

---

* कर्मज जाणावें. † बोलपणें.

---

१ चांगले. २ सांगितले. ३ एवढ्यानें. ४ यज्ञादि कर्मे. ५ अपूर्वतेचें. ६ निश्चयें. ७ बरोबरी. ८ नक्षत्रांचा प्रकाश. ९ सूर्य. १० सुखाचा ठेवा. ११ न सोडिती. १२ ज्ञाननेत्रीं. १३ शेवट. १४ तृप्ति. १५ लंगडी. १६ जाणण्यास योग्य. १७ हीनता, दारिद्र्य. १८ उत्कंठा. १९ आपोआप. २० आहे. २१ घर. २२ उंबरा. २३ सेवा करून. २४ सर्वथैव. २५ अभिमान सोडून. २६ मनोव्यापार. २७ उजेडानें. २८ धैर्यवान्, पराक्रमी.

ब्रह्माचेनि पांडें । निःशंक होय ॥ ६९ ॥ [येन भूतानीति] ते वेळीं ओपणपेंया सहितें । इयें अशेषेंहि भूतें । माझ्या स्वरूपीं अखंडितें । देखसी तूं ॥ १७० ॥ [यज्ज्ञात्वेति] ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल । तैं मोहांधकार जाईल । जैं श्रीगुरुकृपा होईल । पार्था गा ॥ ७१ ॥

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ ३६ ॥

[अपीति] जरी कैल्मषाचा आगरु । तूं भ्रांतीचा सागरु । व्यामोहाचा डोंगरु । होऊनि *असशी ॥७२॥ [सर्वमिति] तन्ही ज्ञानशक्तिचेनि पांडें । हें आघवेंचि गा थोकेंडें । ऐसें सामर्थ्य असे चोखेंडें । ज्ञानीं इये ॥ ७३ ॥ देखें विश्वसंभमाऐसा । जो अमूर्ताचा कैंडवसा । तो जयाचिया प्रकाशा । पुरेचिना ॥ ७४ ॥ तया कायसे हे मनोमळ । हें बोलतांचि अति किडाळ । नाहीं येणें पाडें ढिसाळ । दुजें जगीं ॥ ७५ ॥

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ ३७ ॥

[ज्ञानाग्निरिति] सांगें भुवनत्रयाची कोंजळी । जे गगनामाजि उधवली । तिये प्रळयींचे वाहटुळी । काय अभ्र पुरे ॥ ७६ ॥ [यथैधांसीति] कीं पवनाचेनि कोपें । पाणियेंचि जो † पळिपे । तो प्रळयानळ दडपे । तृणकाष्ठें काई ॥७७॥

नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विंदति ॥ ३८ ॥

[नहि ज्ञानेन सदृशं] ह्मणोनि असो हें न घडे । तें विचारितांचि असंगडें । पुढती ज्ञानाचेनि पांडें । पवित्र न दिसे ॥ ७८ ॥ एथ ज्ञान हें उत्तम होये । आणिकही एक तैसें कें आहे । जैसें चैतन्य कां नोहे । दुसरें गा ॥ ७९ ॥ या महातेजाचेनि कैसें । जरी चोखाळ प्रतिबिंब दिसे । कां गिंवसिलें गिंवसे । आकाश हें ॥ १८० ॥ नातरी पृथ्वीचेनि पांडें । कांटाळें जरी जोडे ।

* आहासी. † पळिपें.

१ योग्यतेनें, बरोबरीनें. २ आपणासह. ३ उजेडेल. ४ पापाचा. ५ खाण. ६ भ्रमाचा. ७ विचाराच्या. ८ सर्व. ९ लहान. १० चांगलें. ११ विश्ववैभवासारखा. १२ निराकाराचा. १३ गवाक्षछिद्रादिकांतून पडणारे किरण. १४ वाईट, खोटें. १५ मोठें. १६ त्रैलोक्याची. १७ काजळ, धूर. १८ उधळली. १९ वायधुळी. २० वाऱ्याच्या. २१ जाळी. २२ प्रळयकाळींचा अग्नि. २३ असंगत. २४ कोठें. २५ कसोटीनें. २६ शुद्ध. २७ कवटाळलें असतां. २८ योग्यतेनें, तुलनेनें, बरोबर.

तरी उपमा ज्ञानीं घडे । पंडुकुमरा ॥ ८१ ॥ [पवित्रमिह विद्यते] ह्मणूनि बहुतीं परी पाहतां । पुढतपुढती निर्धारितां । हे ज्ञानाची पवित्रता । ज्ञानींचि ओथि ॥ ८२ ॥ जैसी अमृताचि चवी निवडिजे । तरी अमृताचिसारिखी ह्मणिजे । तैसें ज्ञान हें उपमिजे । ज्ञानेसींचि ॥ ८३ ॥ [तत्स्वयमिति] आतां यावरी जें बोलणें । तें वायांचि वेळ फेडणें । तंव सांचचि हें पार्थ ह्मणे । जें बोलत असां ॥८४॥ परि तेंचि ज्ञान केविं जाणावें । ऐसें अर्जुनें जंव पुसावें । तंव तें मनोगत देवें । जाणीतलें ॥ ८५ ॥ मग ह्मणतसे किरीटी । आतां चित्त देयीं इये गोठी । सांगेन ज्ञानाचिये भेटी । उपाय तुज ॥ ८६ ॥

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति ॥ ३९ ॥

आत्मसुखाचिया गोडिया । विटे जो कां सकळ विषयां । जयाच्या ठायीं इंद्रियां । मानु नाहीं ॥ ८७ ॥ [श्रद्धावान् लभते ज्ञानं] जो मनासी चाड न सांगे । जो प्रकृतीचें केलें नेघे । जो श्रद्धेचेनि संभोगें । सुखिया जाहाला ॥ ८८ ॥ तयातेंचि गिंवसित । तें ज्ञान पावे निश्चित । जयामाजि अचुंबित । शांति असे ॥ ८९ ॥ [ज्ञानं लब्ध्वा परां शांतिं] तें ज्ञान हृदयीं प्रतिष्ठे । आणि शांतीचा अंकुर फुटे । [अचिरेणाधिगच्छति] मग विस्तार बहु प्रकटे । आत्मबोधाचा ॥ १९० ॥ मग जेउती वास पाहिजे । तेउती शांतीचि देखिजे । तेथ आपपर नेणिजे । निर्धारितां ॥ ९१ ॥ ऐसा हा उत्तरोत्तर । ज्ञानबीजाचा विस्तार । सांगतां असे अपार । *परि असो आतां ॥ ९२ ॥

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥ ४० ॥

[अश्रद्दधानश्च] ऐकें जया प्राणियाच्या ठायीं । इया ज्ञानाची आवडी नाहीं । तयाचें जियालें ह्मणों काई । वरी मरण चांग ॥ ९३ ॥ [अज्ञश्च] शून्य जैसें गृह । कां चैतन्येंवीण देह । तैसें जीवित तें संमोह । ज्ञानहीन ॥ ९४ ॥ अथवा ज्ञान कीर ओंपु नोहे । परि ते चाड एकी जरी वाहे । तरी तेथ जिव्हाळा कांहीं आहे । प्राप्तीचा पैं ॥ ९५ ॥ [संशयात्मा] वांचूनि ज्ञानाची

---

* परियेसीं.

---

१ वारंवार. २ आहे. ३ स्वाद, गोडी. ४ वेळ घालविणें. ५ खरेंच. ६ कसें. ७ गोष्टीस. ८ प्राप्तीस. ९ निजानंदाच्या गोडीनें. १० लालन. ११ मायेचें. १२ आस्तिक्यबुद्धि. १३ शोधीत. १४ येई. १५ निर्लेप, संपूर्ण. १६ जेथें, जेवढी. १७ वाट. १८ तेथें, तेवढी. १९ वांचणें, जिणें. २० चांगलें. २१ ओसाड. २२ जिवाविरहित. २३ निश्चयें. २४ प्राप्त. २५ वागवितो. २६ तत्व.

गोठी[1] कायसी । परि ते आस्थाही न धरी मानसीं । तरि तो संशयरूप हु-
ताशीं[2] । पडिला जाण ॥ ९६ ॥ जे अमृतही परि नावडे । ऐसें सावियाचि[3]
अरोचेक जैं पडे । तैं [विनश्यति] मरण आलें असें फुडें । जाणोंये कीं ॥९७॥ तैसा
*विषयसुखें[4] रंजे[5] । जो ज्ञानेसींचि[6] माजे । तो संशय अंगिकारिजे । एथ भ्रांति
नाहीं ॥ ९८ ॥ [नायं लोकोऽस्ति न परो] मग संशयीं जरी पडिला । तरी नि-
भ्रांत जाणें नासला । तो ऐहिक परत्रा [न सुखं संशयात्मनः] मुकला । सु-
खासि गा ॥ ९९ ॥ जया काळज्वर[7] आंगीं बाणे । तो शीतोष्णें जैशीं नेणे ।
आंगी आणि चांदिणें । सरिसेंचि मानी ॥ २०० ॥ तैसें साच आणि लटिकें ।
विरुद्ध आणि निकें[8] । संशयी तो नोळखे । हिताहित ॥ १ ॥ हा रात्री दिवस
पाहीं । जैसा जात्यंधा[9] ठाउवा[10] नाहीं । तैसें संशयीं असतां कांहीं । मना
नये ॥ २ ॥

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम् ।
आत्मवंतं न कर्माणि निबध्नंति धनंजय ॥ ४१ ॥

[योगसंन्यस्तेति] ह्मणऊनि संशयाहूनि थोर । आणिक नाहीं पाप[11] घोर[12] । हा
विनाशाची वांगुर[13] । प्राणियांसी ॥ ३ ॥ येणें कारणें तुवां त्यजावा । आधीं
हाचि एक जिणावा[14] । जो ज्ञानाचिया अभावा । माजि[15] असे ॥ ४ ॥ जैं अज्ञा-
नाचें गंडेद[16] पडे । तैं हा बहुवस[17] मनीं वाढे । ह्मणोनि सर्वथा मार्ग मोडे । वि-
श्वासाचा ॥ ५ ॥ [आत्मवंतमिति] हृदयीं हाचि न समाये[18] । बुद्धीतें गिवसूनि[19]
ठाये । तेथें संशयात्मक होये । लोकत्रय ॥ ६ ॥

तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ।
छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥ ४२ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
ब्रह्मार्पणयोगोनाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

[तस्मादिति] ऐसा जरी थोरावे[20] । तरी उपायें एकें आंगवे[21] । जरी हातीं होय
बरवें । ज्ञानखड्ग[22] ॥ ७ ॥ तरी तेणें ज्ञानशस्त्रें तिखेटें[23] । निखळ[24] हा निवटे ।

---

* विषयसुखस्जें.

१ गोष्ट. २ अग्नीत. ३ सहजच. ४ अरुचि. ५ सुख पावे. ६ ज्ञानाला माजतो. ७ ऊन. ८ अनुकूल. ९ जन्मांधास. १० ठाऊक. ११ भयंकर. १२ जाळें. १३ जिंकावा. १४ आंत, मध्यें. १५ निविड. १६ अत्यंत. १७ सामावत नाहीं. १८ आच्छादून. १९ माजला. २० स्वाधीन होतो. २१ ज्ञानरूप तरवार. २२ तीव्र. २३ अगदीं निवळ. २४ मरे.

मग निःशेष [1]सता फिटे । मानसींचा ॥ ८ ॥ [छित्त्वैनमिति] याकारणें पार्था । उठीं वेगीं [2]वैरौता । नाश करोनि हृदयस्था । संशयासी ॥ ९ ॥ ऐसें सर्वज्ञाचा बाप । जो श्रीकृष्ण ज्ञानदीप । तो ह्मणतसे [3]सकृप । ऐकें राया ॥ २१० ॥ तंव या पूर्वापार बोलाचा । विचारूनि कुमर पंडूचा । कैसा प्रश्न *अवसरींचा । करिता होईल ॥ ११ ॥ ते कथेची संगती । भावाची संपत्ती । रसाची [4]उन्नती । ह्मणिपेल पुढां ॥ १२ ॥ जयाचिया बरवेपणीं । कीजे आठांरसांची वोंवाळणी । जो सज्जनाचिये [5]आयणी । विसावा जगीं ॥ १३ ॥ जें शांतचि अभिनवेल । ते परियसा मन्हाटे बोल । जे समुद्राहूनि सखोल । अर्थभरित ॥ १४ ॥ जैसें बिंब तरी †बचकेचि एवढें । परि प्रकाशासि त्रिभुवन [10]थोकडें । शब्दाची व्याप्ति तेणें पाडें । अनुभवावी ॥ १५ ॥ ना तरी ‡कामितयाचिया इच्छा । फळे कल्पवृक्ष जैसा । बोल व्यापक होय तैसा । तरी अवधान द्यावें ॥ १६ ॥ हें असो काय ह्मणावें । सर्वज्ञ जाणती स्वभावें । तरी निकें चित्त द्यावें । हे विनंति माझी ॥ १७ ॥ जेथ [11]साहित्य आणि शांति । हे [12]रेखा दिसे बोलती । जैसी लावण्यगुण कुळवती । आणि पतिव्रता ॥ १८ ॥ [13]आधींचि साखर आवडे । तेचि जरी ओखदीं [14]जोडे । तरी सेवावी ना कां [15]कोडें । [16]नावांनावां ॥ १९ ॥ सहजें मलयानिल मंद सुगंध । तया अमृताचा होय स्वाद । आणि तेथेंचि जोडे नाद । जरी दैवगत्या ॥ २२० ॥ तरी स्पर्शें सर्वांग निववी । स्वादें जिव्हेतें नाचवी । तेविंचि कानांकरवीं ह्मणवी । बाप माझा ॥ २१ ॥ तैसें कथेचें इये ऐकणें । एक श्रवणासि होय पारणें । आणि संसारदुःख §[17]मूळवणें । विकृतीविणें ॥ २२ ॥ जरी मंत्रेंचि वैरी मरे । तरी वायां कां बांधावे [18]कुटारे । रोग जाय दुधें साखरें । तरी निंब कां पियावा ॥ २३ ॥ तैसा मनाचा मार न करितां । आणि इंद्रियां दुःख न देतां । एथ मोक्ष असे आयता । श्रवणाचिमाजि ॥ २४ ॥ ह्मणोनि [19]आथिलिया आरिणुका । गीतार्थ हा निका । ज्ञानदेव ह्मणे आइका । निवृत्तिदास ॥ २२५ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

श्लोक ४२, ओव्या २२५

---

* हन अवसरींचा. † बचकेएवढें. ‡ कामितयाचि इच्छा. § उजवणें.

१ दुःख, क्षत, किंतु. २ वर. ३ दयाळू. ४ समयोचित. ५ अधिकपणा, वाढ. ६ म्हटली जाईल. ७ बुद्धीला, तत्वनिर्णयेच्छा. ८ अपूर्व प्रकटेल. ९ सूर्याचें मंडळ. १० लहान, अल्प. ११ कवित्वरचना. १२ औषधांत. १३ आनंदानें. १४ वारंवार. १५ घालवणें. १६ कटियार. १७ संपन्न असतां. १८ समाधान.

ज्ञानेश्वरी.

अध्याय ५ वा.

अर्जुन उवाच-संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ।
यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥ १ ॥

[अर्जुन उवाच-संन्यासं कर्मणां कृष्ण] मग पार्थ श्रीकृष्णातें ह्मणे । हांहो हें कैसें तुमचें बोलणें । एक होय तरी अंतःकरणें । विचारूंये ॥ १ ॥ मागां सकळकर्माचा संन्यासु । तुह्मीच निरोपिला होता बहुवसु । [पुनर्योगं च शंससि] तरी कर्मयोगीं केवि अतिरसु । पोखीतसां[1] पुढती[2] ॥ २ ॥ ऐसें[3] द्वैर्थ हें बोलतां । आह्मा नेणतयांच्या चित्ता । आपुलिये[4] चाडे श्रीअनंता । उमज[5] नोहे ॥ ३ ॥ ऐकें *एकसारातें[6] बोधिजे । तरी एकनिष्ठचि बोलिजे । हें आणिकीं[7] काय सांगिजे । तुह्मांप्रति ॥ ४ ॥ तरी याचिलागीं तुमतें । म्यां रोउळासि[8] विनविलें होतें । जे हा परमार्थ ध्वनितें[9] । न बोलावा ॥ ५ ॥ परी मागील असो देवा । [यच्छ्रेय एतयोरेकमिति] आतां प्रस्तुतीं उकल[10] देखावा । सांगें दोहींमाजि बरवा । मार्ग कवण ॥ ६ ॥ जो परिणामींचा निर्वाळा[11] । अचुंबित[12] ये फळा । आणि अनुष्ठितां प्रांजळा[13] । †सवियाचि[14] ॥ ७ ॥ जैसें निद्रेचें सुख[15] न मोडे । आणि मार्ग तरी बहुसाल सांडे । तैसें सुखासना[16] सांगडें[17] । सोहपें[18] होय ॥ ८ ॥ येणें अर्जुनाचेनि बोलें । देवो मनीं रिझले[19] । मग होईल ऐकें ह्मणितलें । संतोषोनियां[20] ॥ ९ ॥ देखा कामधेनुऐसी माये । सदैवा जया होये । तो चंद्रहीपरि लाहे[21] । खेळावया ॥ १० ॥ पाहें पां श्रीशंभूची प्रसन्नता । तया उपमन्युचिया आर्ता[22] । काय क्षीराब्धि[23] दूधभाता । देइजेचिना ॥ ११ ॥ तैसा औदार्याचा कुरुठा[24] । श्रीकृष्ण आपु जाहालिया सुभटा[25] । कां सर्व सुखाचा वसौटा[26] । तोचि नोहावा[27] ॥ १२ ॥ एथ चमत्कार कायसा । गोसावी[28] श्रीलक्ष्मीकांता-ऐसा । आतां आपुलिया संवेसा[29] । मागावा कीं ॥ १३ ॥ ह्मणोनि अर्जुनें ह्म-

---

* एकसरातें. † सवियाची.

---

१ पोसतां, वाढवितां. २ पुनः. ३ दोन अर्थांचें, गूढ. ४ तुमच्याप्रमाणें. ५ समज. ६ एकच तत्वांश. ७ दुसऱ्यानें. ८ तुम्हाला. ९ घरीं, श्रीगुरूस. १० गूढार्थानें. ११ उलगडा. १२ दाखवा. १३ शेवटींचा. १४ निवाडा. १५ विनचूक. १६ सुगम. १७ सहज. १८ पालखीसारखें. १९ सोपें. २० संतोषले. २१ लाभे. २२ इच्छेसाठीं. २३ दुधाचा समुद्र. २४ घर. २५ प्राप्त. २६ योद्धयाला. २७ आश्रय. २८ न व्हावा. २९ धनी. ३० स्वेच्छा.

णितलें । तें हांसोनि येरें दिधलें । तेंचि सांगेन बोलिलें। काय कृष्णें ॥ १४ ॥

श्रीभगवानुवाच–**संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।**
तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥ २ ॥

[श्रीभगवानुवाच–संन्यास इति] तो ह्मणे गा कुंतीसुता । हे संन्यासयोग विचारितां । मोक्षकर[1] तत्त्वता । दोनीही होती ॥ १५ ॥ [तयोरिति] तरी जाणानेणां[2] सकळां । हा कर्मयोग करीं[3] प्रांजळां । जैसी नाव स्त्रियां बाळां । तोयतरणीं[4] ॥ १६ ॥ तैसें सारासार पाहिजे । तरी सोहंपा[5] हाचि देखिजे । येणें संन्यासफळ लाहिजे । अनायासें ॥ १७ ॥ आतां याचिलागीं सांगेन । तुज संन्यासियाचें चिन्ह । मग सहजें[6] हे अभिन्न । जाणसी तूं ॥ १८ ॥

ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति ।
निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ॥ ३ ॥

[न कांक्षति] तरी गेलियाची[7] से[8] न करी । न पवतां[9] चाड[10] न धरी । जो सुनिश्चळ[11] अंतरीं । मेरु जैसा ॥ १९ ॥ [निर्द्वंद्वो हि महाबाहो] आणि मी माझें ऐसी आठवण[12] । विसरलें जयाचें अंतःकरण । [ज्ञेयःस नित्यसंन्यासी] पार्था तो संन्यासी[13] जाण । निरंतर ॥ २० ॥ जो मनें ऐसा जाहला । संगीं तोचि सांडिला । [सुखं] ह्मणोनि सुखें सुख पावला । अखंडित ॥ २१ ॥ आतां गृहादिक[14] ओघवें[15] । तें कांहीं नलगे त्यजावें । जें[16] घेतें जाहालें स्वभावें । निःसंग ह्मणऊनि ॥ २२ ॥ [बंधात्प्रमुच्यते] देखें अग्नि विझोनि जाये । मग जे राखोंडी केवळ होये । तैं ते कापुसें विर्वसुंये[17] । जियापरी ॥ २३ ॥ तैसा असतेनि[18] उपाधी । नाकळिजे[19] तो कर्मबंधीं । जयाचिये बुद्धि । संकल्प नाहीं ॥ २४ ॥ ह्मणोनि कल्पना[20] जैं सांडे । तैंचि गा संन्यास घडे । इयें कारणें दोनी सांगडे । संन्यास योग ॥ २५ ॥

सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पंडिताः ।
एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विंदते फलम् ॥ ४ ॥

[सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति] येन्हवीं तरी पार्था । जे मूर्ख होती सर्वथा ।

---

१ मोक्ष देणारे. २ जाणत्यानेणत्यांस. ३ निश्चयें. ४ सुलभ. ५ नौका. ६ उदक तरण्यास. ७ सुलभ. ८ मिळवावें. ९ कर्मयोग व संन्यासयोग. १० आठवण. ११ इच्छा. १२ अतिस्थिर. १३ संसारानें. १४ सर्व. १५ जें अंतःकरण गृहादिक घेतें, तें घेणारें अंतःकरण स्वभावें निःसंग जाहालें म्हणून कांहीं टाकावें लागत नाहीं. १६ झांकतां येते. १७ असतांही. १८ बांधला जात नाहीं. १९ विकल्प. २० सारखे.

ते *सांख्ययोगसंस्था । जाणती केवीं ॥ २६ ॥ सहजें ते अज्ञान । ह्मणोनि ह्मणती ते भिन्न । [न पंडिताः] येऱ्हवीं दीपाप्रति काइ आंधान । प्रकाश आंहती ॥ २७ ॥ [एकमप्यास्थित इति] पैं सम्यक एकें अनुभवें । जिहीं देखिलें तत्त्व आघवें । ते दोहींतेंही ऐक्यभावें । मानिती गा ॥ २८ ॥

यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।
एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥ ५ ॥

[यत्सांख्यैरिति] आणि सांख्यीं जें पाविजे । तेंचि योगीं गमिजे । ह्मणोनि ऐक्य दोहींतें सहजें । इयापरी ॥ २९ ॥ [एकमिति] देखें आकाशा आणि अवकाशा । भेदु नाहीं जैसा । तैसें ऐक्य योगसंन्यासा । वोळखे जो ॥ ३० ॥ तयासींचि जगीं पाहिलें । आपणपें तेणेंचि देखिलें । जया सांख्य योग जाणावले । भेदेंविण ॥ ३१ ॥

संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ।
योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाऽधिगच्छति ॥ ६ ॥

[योगयुक्त इति] जो युक्तिपंथें पार्था । चढे मोक्षपर्वता । तो महासुखाचा निमथा । वेंहिला पावे ॥ ३२ ॥ [संन्यासस्त्विति] येरा योगस्थिती जया सांडे । तो वायांचि गा हव्यासीं पडे । परि प्राप्ति कहीं न घडे । संन्यासाची ॥ ३३ ॥

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः ।
सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ७ ॥

[योगयुक्तो विशुद्धात्मा] जेणें भ्रांतीपासूनि हिरतलें । गुरुवाक्यें मन धुतलें । मग आत्मस्वरूपीं घातलें । †रोऊनियां ॥ ३४ ॥ जैसें समुद्रीं लवण न पडे । तंव वेगळें अल्प आवडे । मग होय सिंधूचिएवढें । मिळे तेव्हां ॥ ३५ ॥ [विजितात्मा जितेंद्रियः] तैसें संकल्पोनि काढिलें । जयाचें मनचि चैतन्य जाहालें । [सर्वभूतात्मभूतात्मा] तेणें एकदेशियें परी व्यापिलें । लोकत्रय ॥ ३६ ॥

---

* कर्मसंस्था. † हिरोनियां.

---

१ ज्ञानयोग व कर्मयोग यांची व्यवस्था. २ निरनिराळे. ३ आहेत. ४ तथापि. ५ चांगलें. ६ परब्रह्मस्वरूप. ७ ज्ञानमार्गानें. ८ कर्मयोगानें. ९ पावावें. १० पोकळीला. ११ उघड झालें, उजाडलें. १२ स्वतः आपण. १३ योगमार्गानें. १४ ब्रह्मसुखाचा. १५ मस्तक. १६ सत्वर. १७ कर्मयोग. १८ छंदांत. १९ कधीं. २० हिरावून घेतलें. २१ आंत शिरवून, खोंचून. २२ मीठ. २३ वाटतें. २४ संकल्पापासून. २५ ब्रह्मरूप. २६ परिच्छिन्नानें.

[कुर्वन्नपि न लिप्यते] आतां कर्ता कर्म करावें। हें खुंटलें[१] *तया स्वभावें। आणि करी जन्ही औघवें। तन्ही अकर्ता तो ॥ ३७ ॥

नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ।
पश्यन्शृण्वन्स्पृशन्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपन्श्वसन् ॥ ८ ॥
प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि ।
इंद्रियाणींद्रियार्थेषु वर्तंत इति धारयन् ॥ ९ ॥

[नैव किंचिदिति] जे पार्था तया देहीं। मी ऐसा आठऊ नाहीं। तरी कर्तृत्व कैचें काई। उरे सांगें ॥ ३८ ॥ ऐसें तेनुल्यागेंविण। अमूर्ताचे गुण। दिसती संपूर्ण। योगयुक्तां ॥ ३९ ॥ येन्हवीं आणिकांचिये परी। तोही एक शरीरी। अशेषाही व्यापारीं। वर्तत दिसे ॥ ४० ॥ [पश्यन्शृण्वन्स्पृशन्जिघ्रन्] तोही नेत्रीं पाहे। श्रवणीं ऐकत आहे। परी तेथिंचा सर्वथा नोहे। नवल देखें ॥ ४१ ॥ स्पर्शासि तरी जाणे। परिमळ सेवी घ्राणें। [प्रलपन्] †अवसरोचित बोलणें। तयाहि आंथि ॥ ४२ ॥ [अश्नन् गृण्हन्] आहारातें स्वीकारी। [विसृजन्] त्यजावें तें परिहरी। [स्वपन्] निद्रेचिया अवसरीं। निदिजे सुखें ॥४३॥ [गच्छन्] आपुलेनि इच्छावशें। तोही गा चालत दिसे। पैं सकळ कर्म ऐसें। राहाटे कीर ॥ ४४ ॥ हें सांगों काइ एकैक। [श्वसन्] देखे श्वासोश्वासादिक। [उन्मिषन्निमिषन्नपि] आणि निमिषोन्मिष। आदिकरूनि ॥ ४५ ॥ पार्था तयाचे ठायीं। हें आघवेंचि आंथि पाहीं। परि तो कर्ता नव्हे कांहीं। प्रतीतिबळें ॥ ४६ ॥ जैं भ्रांतिसेजे सुतला। तैं स्वप्नसुखें भुतला। मग तो ज्ञानोदयीं चेइला। ह्मणोनियां ॥ ४७ ॥

ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः ।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥ १० ॥

[ब्रह्मण्याधाय कर्माणि] आतां अधिष्ठानसंगती। [इंद्रियाणींद्रियार्थेष्विति श्लो. ९]

---

* तयाचें. † अवसरेंचि.

---

१ राहिलें. २ सर्व. ३ शरीर असतांही. ४ विदेहीचें. ५ इतरांप्रमाणें. ६ आश्चर्य. ७ सुगंध. ८ नाकानें. ९ समयोचित. १० आहे. ११ टाकतो. १२ निजतो. १३ निश्चयें. १४ नेत्र मिटणें व उघडणें. १५ अनुभवाच्या. १६ जेव्हां भ्रांति असते तेव्हांच सुखदुःखांचा संबंध; स्पष्ट ज्ञानदशेंत (जागृतींत) हें कांहीं नाहीं म्हणून कर्तृत्व नाहीं. १७ निजला. १८ अनुभविला. १९ जागृत झाला. २० अधिष्ठान (ब्रह्म) जो मी त्याची संगति, त्या मला भक्तिपुरस्सर सर्व समर्पण करून.

अशेषाही इंद्रियवृत्ती । आपुलालिया अर्थीं । वर्तत आहाती ॥ ४८ ॥ [संगं त्यक्त्वा करोति यः] दीपाचेनि प्रकाशें । गृहींचे व्यापार जैसे । देहीं कर्मजात तैसें । योगयुक्ता ॥ ४९ ॥ तो कर्में करी सकळें । [लिप्यते नेति] परी कर्मबंधा नाकळे । जैसें न सिंपे जळीं जळें । पद्मपत्र ॥ ५० ॥

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिंद्रियैरपि ।
योगिनः कर्म कुर्वंति संगं त्यक्त्वाऽत्मशुद्धये ॥ ११ ॥

[कायेन] देखें बुद्धीची भाष नेणिजे । मनाचा अंकुर नुदैजे । ऐसा व्यापार तो बोलिजे । शरीर गा ॥ ५१ ॥ हेंच मराठें परियेसीं । तरी बाळकाची चेष्टा जैसी । योगिये कर्में करिती तैसीं । केवळा तनु ॥ ५२ ॥ [मनसा] मग पांचभौतिक संचलें । जेव्हां शरीर असो निदेलें । तेथें मनचि राहाटे एकलें । स्वप्नीं जेवीं ॥ ५३ ॥ नवल ऐकें धनुर्धरा । कैसा वासनेचा संसारा । देहीं होनेदी उजगरा । परी सुखदुःखें भोगी ॥ ५४ ॥ इंद्रियांचा गांवीं नेणिजे । ऐसा व्यापार जो निपजे । तो केवळ गा ह्मणिजे । मानसाचा ॥ ५५ ॥ [योगिनः कर्म कुर्वंति] योगिये तोही करिती । परी कर्में ते न बंधिजती । जे सांडिली आहे संगती । अहंभावाची ॥ ५६ ॥ आतां जाहालिया श्रमहत । जैसें पिशाचाचें चित्त । [केवलैरिंद्रियैरपि] मग इंद्रियांचें चेष्टित । विकळ दिसे ॥ ५७ ॥ स्वरूप तरी देखे । आंळविलें आइके । शब्द बोले मुखें । परि ज्ञान नाहीं ॥ ५८ ॥ हें असो कोंजेंविण । जें जें कांहीं करणें । तें केवळ कर्म जाण । इंद्रियांचें ॥ ५९ ॥ [बुद्ध्या] मग सर्वत्र जें जाणतें । तें बुद्धीचें कर्म निरुतें । वोळखे अर्जुनातें । *ह्मणे श्रीहरी ॥ ६० ॥ ते बुद्धि धुरे करुनी । कर्म करिती चित्त देउनी । परि ते †कर्मापासुनी । मुक्त दिसती ॥ ६१ ॥ जे बुद्धीचिये ठाँवूनि देहीं । तया अहंकाराची सेचि नाहीं । ह्मणोनि ‡कर्म करितां पाहीं । चोखाळले ॥ ६२ ॥ [संगं त्यक्त्वा] अगा करितेनवीण कर्म । तेंचि तें निष्कर्म । हें जाणती सुवर्म । गुरुगम्य जें ॥ ६३ ॥ [आत्मशुद्धये] आतां शांतरसाचें भरितें । सांडीत आहे पात्रांतें । जें बोलणें बोलांपरौतें ।

---

* ह्मणे हरी. † नैष्कर्म्यापासुनी. ‡ कर्में करितो.

---

१ सर्व. २ विषयांमध्यें. ३ सर्व कर्में. ४ भिजे. ५ भास, वार्ता. ६ उगवत नाहीं. ७ देहाचा. ८ सुलभ रीतीनें. ९ ऐक. १० नुस्ते, केवळ. ११ बनलेलें, घटित. १२ निजलें. १३ देहाला उजागरा (जागा होऊं न देतां—न कढूं देतां). १४ उत्पन्न होतो. १५ मनाचा. १६ बांधले जात नाहींत. १७ कारण. १८ भ्रमयुक्त. १९ अव्यवस्थित. २० हाक मारलेली. २१ निष्कारण. २२ खरें. २३ पुढें, प्रमुख. २४ आरूढ होऊन, स्थान असून. २५ बुद्धिपासून देहापर्यंत ज्याला अहंकाराची से (आठवण) नाहीं. २६ शुद्ध. २७ कर्तृत्वाच्या अभिमानावांचून. २८ गुरूपासून मिळणारें. २९ पूर. ३० पलीकडे.

* बोलवलें ॥ ६४ ॥ एथ इंद्रियांचा पांगु । जया फिटला आहे चांगु । तयासीचि आथि लागु । परिसावया ॥ ६५ ॥ हा असो अतिप्रसंग । न संडी पां कथालाग । होईल श्लोकसंगती भंगु । ह्मणऊनियां ॥ ६६ ॥ जें मना आकळितां कुवाडें । धांधुसितां †बुद्धीसी नातुडे । तें दैवाचेनि सुरवाडें । सांगवलें तुज ॥ ६७ ॥ जें शब्दातीत स्वभावें । तें बोलींचि जरी फावे । तरी आणिकें काय करावें । कथा सांगें ॥ ६८ ॥ हा आर्तिविशेष श्रोतयांचा । जाणोनि दास निवृत्तीचा । ह्मणे संवाद दोघांचा । परिसोनि परिसा ॥ ६९ ॥ मग श्रीकृष्ण ह्मणे पार्थातें । आतां प्रश्नाचें चिन्ह पुरतें । सांगेन तुज निरुतें । चित्त देईं ॥ ७० ॥

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिमाप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ॥ १२ ॥

[युक्त इति] तरी आत्मयोगें आथिलां । जो कर्मफळाशीं विटला । तो घर रिघोनि वरिला । शांती जगीं ॥ ७१ ॥ [अयुक्त इति] येर कर्मबंधें किरीटी । अभिलाषाचिया गांठी । केळासला खुंटी । फळभोगाच्या ॥ ७२ ॥

सर्वकर्माणि मनसा संन्यस्याऽस्ते सुखं वशी ।
नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥ १३ ॥

[सर्वकर्माणीति] जैसा फळाचिये हांवे । तैसें कर्म करी आघवें । मग न कीजेचि येणें भावें । उपेक्षी जो ॥ ७३ ॥ तो जयाकडे वासु पाहे । तेउती सुखाची सृष्टि होये । तो ह्मणे तेथ राहे । महाबोध ॥ ७४ ॥ [नवद्वारे इति] नवद्वारे देहीं । तो असतचि परि नाहीं । करितचि न करी कांहीं । फळत्यागी ॥ ७५ ॥

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ।
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥ १४ ॥

[लोकस्य सृजति प्रभुः] जैसा कां सर्वेश्वर । पाहिजे तंव निर्व्यापार । परि

---

* ~~बोलवलें तुज.~~ † ~~बुद्धी नातुडे.~~ ‡ एक कर्मबंधें.

---

१ दैन्य, पराधीनपणा. २ उत्तम. ३ आहे. ४ सवड, अधिकार. ५ विषयांतराचें वर्णन. ६ कथेचा संबंध. ७ नाश. ८ अवघड, कोड. ९ शोधितां. १० न सांपडे. ११ अनुकूलतेनें, प्रफुल्लतेनें. १२ बोलण्यापलीकडचें. १३ स्पष्ट होतें. १४ इच्छाविशेष. १५ योग्याचें. १६ खरें. १७ आत्मज्ञानानें. १८ भाग्यवान्. १९ शांतीनें. २० कर्मफलाची इच्छा. २१ खिळला, बद्ध केला. २२ आशेनें. २३ सर्व. २४ मार्ग. २५ तेवढी. २६ पाहावा. २७ अकर्ता.

तोचि रची विस्तार । त्रिभुवनाचा ॥ ७६ ॥ [न कर्तृत्वं न कर्माणि] आणि कर्ता ऐसें म्हणिपे । तरी कवणें कर्मीं न शिंपे । जे हातपावो न लिंपे । उदासवृत्तीच्या ॥ ७७ ॥ योगनिद्रा तरी न मोडे । अकर्तेपणा सैंळु न घडे । परि महाभूतांचें देंळवाडें । उभारी भलें ॥ ७८ ॥ [न कर्मफलसंयोगमिति] जगाच्या जीवीं आहे । परी कवणाचा कैंहीं नोहे । जगचि हें होय जाये । तो शुद्धीही नेणे ॥ ७९ ॥

नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ।
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः ॥ १५ ॥

[नादत्ते इति] पापपुण्यें अशेषें । *पासींचि असतु न देखें । आणि साक्षीही होऊं न ठाके । येरी गोष्टी कायसी ॥ ८० ॥ पैं मूर्तींचेनि मेळें । तो मूर्तचि होऊनि खेळे । परि अमूर्तपण न मैळे । दादुलयाचें ॥ ८१ ॥ [अज्ञानेनेति] तो सृंजी पाळी संहारी । ऐसें बोलती जें चराचरीं । तें अज्ञान गा अवधारीं । पंडुकुमरा ॥ ८२ ॥

ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः ।
तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥ १६ ॥

[ज्ञानेनेति] तें अज्ञान जैं समूळ तुटे । तैं भ्रांतीचें मंसैरें फिटे । मग अकर्तृत्व प्रकटे । मज ईश्वराचें ॥ ८३ ॥ एथ ईश्वर एक अकर्ता । ऐसें मानलें जरी चित्ता । आणि तोचि मी हें स्वभावता । आदीचि आहे ॥ ८४ ॥ ऐसेनि विवेकें उदो चित्तीं । [तेषामिति] तयासि भेद कैंचा त्रिजगती । देखे आपुलिया प्रतीती । जगचि मुक्त ॥ ८५ ॥ जैशी पूर्वदिशेच्या राउळीं । उदया येतांचि सूर्य दिवाळी । कीं येरीही दिशां तियेचि काळीं । कोंळिमा नाहीं ॥ ८६ ॥

तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः ।
गच्छंत्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥ १७ ॥

[तद्बुद्धय इति] बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान । ब्रह्मरूप भावी आपणा आपण । ब्रह्मनिष्ठा राखे †पूर्ण । तत्परायण अहर्निशीं ॥ ८७ ॥ ऐसें व्यापक ज्ञान भलें ।

---

* तिये पासीं. † पूर्ण । अहर्निशीं.

---

१ म्हणावा. २ लिप्त होत नाहीं. ३ पाय. ४ छल, अभिमान. ५ समुदाय. ६ कधीं. ७ जवळ असतांही. ८ द्रष्टा, पाहणारा. ९ राहे. १० आकार, देही. ११ निराकार. १२ विघडत नाहीं. १३ प्रभूचें. १४ उत्पन्न करी. १५ अंधकार, काजळी. १६ उदय. १७ अनुभवानें. १८ घरीं. १९ उजाळी. २० अंधार. २१ मानी. २२ रात्रंदिवस.

जयांचिया हृदया गिंवसित[1] आलें । तयांची *समताद्दष्टि बोलें । †विशेषूं[2] काई ॥ ८८ ॥ [गच्छंतीति] एक आपणपेंचि जैसें । ते देखती विश्व तैसें । हें बोलणें कायसें । नवल एथ ॥ ८९ ॥ परी दैव जैसें कैवतिकें । कहींचि दैन्य न देखे । कां विवेक हा नोळखे । भ्रांतीतें जेवीं ॥ ९० ॥ ना तरी अंधकाराची वानी । जैसा सूर्य न देखे स्वप्नीं । अमृत नायके कानीं । मृत्युकथा ॥ ९१ ॥ हें असो संताप कैसा । चंद्र न स्मरे जैसा । भूतीं भेद नेणती तैसा । ज्ञानिये ते ॥९२॥

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥ १८ ॥

[विद्याविनय–श्वपाके च] मग हा मैशकु[3] हा गज । कीं श्वपच हा द्विज । पैलें[4] इतर हा आत्मज[5] । हें उरलें कें[6] ॥ ९३ ॥ ना तरी हे धेनु हें श्वान । एक गुरु[7] एक हीन । हें असो कैचें स्वप्न । जागतया[8] ॥ ९४ ॥ [पंडिताः समदर्शिनः] एथ भेद तरी कीं देखावा । जरी अहंभाव[9] उरला होआवा । तो आधींचि नाहीं[10] आघवा[11] । आतां विषम[12] काई ॥ ९५ ॥

इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥ १९ ॥

[निर्दोषं हि समं ब्रह्म] ह्मणोनि सर्वत्र सदा सम । तें आपणचि अद्वय ब्रह्म । हें संपूर्ण जाणें वर्म । समद्दष्टीचें ॥ ९६ ॥ [इहैव तैर्जितः सर्गो] जिहीं विषयसंग न सांडितां । इंद्रियांतें न दंडितां । परि भोगिली निःसंगता । कामनेविण ॥ ९७ ॥ जिहीं लोकांचेनि आधारें । लौकिकेंचि[13] व्यापारें[14] । परि सांडिलें निदुसुरें[15] । लौकिक हें ॥ ९८ ॥ जैसा जनामाजि खेंचरु[16] । असतूचि जना नव्हे गोचरु[17] । तैसा शरीरीं परि संसारु । नोळखे तयातें ॥ ९९ ॥ हें असो पवनाचेनि मेळें[18] । जैसें जळींचि जळ लोळे । तें आणिकें ह्मणती वेगळें । केळोळ[19] हे ॥ १०० ॥ [तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः] जैसें नाम रूप तयाचें । येरहवीं ब्रह्मचि तो साचें[20] । [येषां साम्ये स्थितं मनः] मन साम्या[21] आलें जयाचें । सर्वत्र गा ॥ १ ॥ ऐसेनि समद्दष्टी जो होये । तया पुरुषा लक्षणही आहे । अर्जुना संक्षेपें सांगेन पाहें । अच्युत ह्मणे ॥ २ ॥

---

* समदृष्टि. † त्रिशेषु.

---

१ शोधीत. २ विशेषेंकरून सांगूं. ३ स्वतः आपण. ४ कौतुकानें. ५ नमुना, स्वरूप. ६ ऊष्मा. ७ माशी. ८ अंत्यज. ९ पलीकडचा. १० कोठें. ११ थोर. १२ जागृताला. १३ मीपणा. १४ व्हावा. १५ सर्व. १६ भिन्न, विरुद्ध. १७ जाण. १८ व्यावहारिक. १९ अज्ञानी, मूढ. २० भूत, समंध. २१ असून. २२ दिसत नाहीं. २३ वायूच्या. २४ तरंग, लाटा. २५ साक्षात्. २६ समतेला.

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाऽप्रियम् ।
स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितः ॥ २० ॥

[स्थिरबुद्धिरसंमूढो] तरी मृगजळाचेनि पूरें । जैसें न लोटिजे कां गिरिवरें । [न प्रहृष्येदिति] तैसा शुभाशुभीं न विकरे । पातलिया जो ॥ ३ ॥ [ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितः] तोचि तो निरुता । समदृष्टि तत्त्वता । हरी ह्मणे पंडुसुता । तोचि ब्रह्म ॥ ४ ॥

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विंदत्यात्मनि यत्सुखम् ।
स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ॥ २१ ॥

[बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा] *जया आपणपें सांडूनि कहीं । इंद्रियग्रामावरि येणें नाहीं । तो विषय न सेवी हें काई । विचित्र येथ ॥ ५ ॥ [सुखमक्षय्यमश्नुते] सहजें स्वसुखाचेनि अपारें । सुरवाडलेनि अंतरें । रचिला ह्मणऊनि बाहिरें । पाउल न घली ॥ ६ ॥ सांगें कुमुददळाचेनि तटें । जो जेविला चंद्रकिरणें चोखटें । तो चकोर कायि वोळुवटें । चुंबित असे ॥ ७ ॥ [विंदत्यात्मनि यत्सुखं] तैसें आत्मसुख उपाइलें । [स ब्रह्मयोगयुक्तात्मा] जयासि आपणपेंचि फावलें । तया विषय सहज सांडवलें । ह्मणों काई ॥ ८ ॥ येऱ्हवीं तरी कौतुकें । विचारूनि पाहें पां निकें । या विषयाचेनि सुखें । झकविजती कवण ॥ ९ ॥

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ।
आद्यंतवंतः कौंतेय न तेषु रमते बुधः ॥ २२ ॥

[ये हि संस्पर्शजा भोगाः] जिहीं आपणपें नाहीं देखिलें । तेचि इहीं इंद्रियार्थीं रंजले । जैसें रंक कां आळुकैलें । †तृषातें सेवी ॥ १० ॥ नातरी मृगें तृषापीडितें । संभ्रमें विसरोनि जळातें । मग तोयबुद्धी बरेडीतें । टाकूनि येती ॥ ११ ॥ तैसें आपणपें नाहीं दिठें । जयातें स्वसुखाचे सदा खरांटे । तयासीचि विषय हे गोमटे । आवडती ॥ १२ ॥ [आद्यंतवंतः] येऱ्हवीं विषयीं

---

* जो आपणपें सांडूनि कांहीं. † तृषान्नें सेवी.

---

१ विकार पावत नाहीं. २ खरा. ३ आत्मस्वरूपाला. ४ इंद्रियसमुदाय, इंद्रियाधीन. ५ चमत्कारिक. ६ अमर्याद. ७ सुख पावलेल्या. ८ मनानें. ९ घाली. १० चंद्रविकासी कमल. ११ चांगलीं. १२ वाळवंट. १३ उत्पन्न झालें. १४ प्राप्त झालें. १५ फसती. १६ स्वस्वरूप. १७ सुखावले. १८ दरिद्री. १९ भुकेलें. २० कोंड्याला. २१ अथवा. २२ तहानेलीं. २३ भ्रमानें. २४ पाणी असें मानून. २५ माळ जमिनीवर. २६ अनुभवलें. २७ शेतांतील कापलेल्या धांटांचे जमिनींतील खुंट. २८ सुंदर.

सुख आहे । हें बोलणेंचि सारिखें नोहे । तरी विद्युत्स्फुरणें कां न पाहे । जगामाजी ॥ १३ ॥ सांगें वातवर्ष*आतपधरे । ऐसें अभ्रच्छायाचि जरी †सरे । तरी त्रिमोळिकें धवळारें । करावीं कां ॥ १४ ॥ [भोगाः] ह्मणोनि विषयसुख जें बोलिजे । तें नेणतां गा वायां जल्पिजे । जैसें महुर कां ह्मणिजे । विषकंदातें ॥ १५ ॥ ना तरी भौमा नाम मंगळ । रोहिणीतें ह्मणती जळ । तैसा सुखप्रवाद बरळ । विषयिक हा ॥ १६ ॥ हे असो ओघवी बोली । सांग पां सर्पफणीची साउली । ते शीतल होईल केतुली । मूषकासी ॥ १७ ॥ जैसा आमिषकवल पांडवा । मीन ‡न सेवी तंवचि बरवा । तैसा विषयसंग आघवा । निभ्रांत जाणें ॥ १८ ॥ हे विरक्तांचिये दृष्टी । जैं न्याहाळिजे किरीटी । तैं पांडुरोगाचिये पुष्टी । सारिखें दिसे ॥ १९ ॥ [दुःखयोनय एव ते] ह्मणोनि विषयभोगीं जें सुख । तें साद्यंतचि जाण दुःख । परि काय करिती मूर्ख । न सेवितां नसरे ॥ १२० ॥ तें अंतरें नेणती बापुडे । ह्मणोनि अगत्य सेवणें घडे । सांगें पूयपंकींचे किडे । काय चिळसी घेती ॥ २१ ॥ तयां दुःखियां दुःखचि जिव्हार । ते विषयकर्दमींचे दर्दुर । ते भोगजळींचे जळचर । सांडिती केवीं ॥ २२ ॥ आणि दुःखयोनी जिया ओहती । तिया निरर्थका तरी नव्हती । जरी विषयांवरी विरक्ती । धरिती जीव ॥ २३ ॥ ना तरी गर्भवासादि संकट । कां जन्ममरणींचे कष्ट । हे विसांवेवीण वाट । वाहवी कवणें ॥ २४ ॥ जरीं विषयीं विषयो सांडिजेल । तरी महादोषीं कें वसिजेल । आणि संसार हा शब्द नव्हेल । लटिका जगीं ॥ २५ ॥ ह्मणोनि अविद्याजात नाथिलें । तें तिहींचि सांच दाविलें । जिहीं सुखबुद्धी घेतलें । विषयदुःख ॥ २६ ॥ [कौंतेय] याकारणें गा सुभटा । हा विचारितां विषय वोखटा । तूं झेंपें कहीं या वाटा । विसरोनि जाशी ॥ २७ ॥ [न तेषु रमते बुधः] पैं यातें विरक्त पुरुष । त्यजिती कां जैसें विष । निराशा तयां दुःख । दाविलें नावडे ॥२८॥

---

* आतपधरें. † पुरे. ‡ न वोवी.

---

१ योग्य. २ विजेच्या चमकण्यानें. ३ वात (वारा), वृष्टि (पाणी), आतप (ज्योति, उजेड) धरे (धरणारे); ऐसें अभ्रच्छायाचि = अशा झालेल्या ढगांच्या छायेनें; सरे = जर निर्वाह होईल. ४ तीन मजली चुनेगची घरें. ५ वडवडावें. ६ मधुर. ७ वत्सनाभास. ८ मंगळ ग्रहाला. ९ मृगजळास. १० उपभोगांत सुख आहे हें बोलणें. ११ व्यर्थ. १२ सर्व. १३ किती. १४ मासांचा घांस. १५ मत्स्य. १६ पाहावें. १७ मुळापासून अखेरपर्यंत. १८ याचें हृद्य कारण. १९ पुवाच्या खंदकांतील. २० कंटाळा, किळस. २१ जीवाचें सुख, जिव्हाळा. २२ विषयरूप घाणींतले. २३ बेडूक. २४ ज्या आहेत. २५ विश्रांतीवांचून. २६ चालावी. २७ विषयासक्तांनीं. २८ कोठें. २९ होणार नाहीं काय? ३० सर्व अज्ञान. ३१ लटकें. ३२ खरें. ३३ वाईट. ३४ कदाचित् नको. ३५ कधीं. ३६ निश्चयात्मक अव्यय.

शक्नोतीहैव यः सोढुं प्राक् शरीरविमोक्षणात् ।
कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥ २३ ॥

[शक्नोतीहैव—वेगं] ज्ञानियांच्या हेन ठायीं । याची मातही कीर नाहीं । देहीं देहभाव जिहीं । स्वबश केले ॥ २९ ॥ [स युक्तः स सुखी नरः] जयातें बाह्याची भाष । नेणिजेचि निःशेष । अंतरीं सुख । एक आथि ॥ १३० ॥ परि तें वेगळेपणें भोगिजे । जैसें पक्षियें फळ चुंबिजे । तैसें नव्हे तेथ विसरिजे । भोगितेपणही ॥ ३१ ॥ भोगीं अवस्था एकी उठी । ते अहंकाराचा अंचळ लोटी । मग सुखेंसि घे आंळी । गाढेपणें ॥ ३२ ॥ तिये आलिंगनमेळीं । होय आपेंआप कवळी । तेथ जळ जैसें जळीं । वेगळें न दिसे ॥ ३३ ॥ कां आकाशीं वायो हरपे । तेथ दोन्ही हे भाष लोपे । तैसें सुखचि उरे स्वरूपें । सुरतीं तिये ॥ ३४ ॥ ऐशी द्वैताची भाष जाय । मग ह्मणों जरी एकचि होय । तरी तेथ साक्षी कवण आहे । जाणतें जें ॥ ३५ ॥

योंऽतःसुखोंऽतरारामस्तथांतर्ज्योतिरेव यः ।
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ २४ ॥
लभंते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः ।
छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥ २५ ॥

[योंऽतः सुखोंऽतरारामः] ह्मणोनि असो हें आघवें । एथ न बोलणें काय बोलावें । ते खुणाचि पावेल स्वभावें । आत्माराम ॥ ३६ ॥ जे ऐसेनि सुखें मातले । आपणपांचि आपण राहिले । ते मी जाणें निखिळ वोतले । सोमरस्याचे ॥ ३७ ॥ ते आनंदाचे अनुकार । सुखाचे अंकुर । कीं महाबोधें विहार । केले जैसे ॥ ३८ ॥ ते विवेकाचें गांव । कीं परब्रह्मींचे स्वभाव । ना तरी अळंकारले अवयव । ब्रह्मविद्येचे ॥ ३९ ॥ ते सत्वाचे सात्विक । कीं चैतन्याचे आंगिक । हें बहु असो एकैक । वानिसी काई ॥१४०॥ तूं संतस्तवनीं रतसी । तरी कथेची से न करिसी । कीं निरोळीं बोली देखसी । सनागर ॥ ४१ ॥ परि तो रसातिशयो मुकुळीं । मग ग्रंथार्थदीप उजळीं । करीं साधुहृदयराउळीं । मंगळ उखा ॥ ४२ ॥ ऐसा गुरूचा उवायिला । निवृत्तिदासासी पा-

१ समुच्चयार्थक अव्यय. २ वार्ताही. ३ निश्चयें. ४ आपल्या स्वाधीन. ५ विषयाचा भास. ६ आहे. ७ पदर, पडदा. ८ सोडी. ९ आलिंगन. १० दृढतेनें. ११ आकर्षण, आलिंगन. १२ वाव, अवकाश. १३ बोलणें. १४ ऐक्यपणांत. १५ माजले. १६ स्वस्वरूपानें. १७ मी समजतों. १८ निखालस, सर्व. १९ ब्रह्मानंदाचे. २० आकार. २१ क्रीडास्थान. २२ आत्मज्ञानाचे. २३ जीवात्म्याचे. २४ शरीरावयव. २५ वर्णन करिसी. २६ आठवण. २७ निर्गुणविषयांत; निरालंबीं. २८ अति चांगले, प्रेमयुक्त. २९ संक्षिप्त कर, आटप. ३० हृदयमंदिरांत. ३१ कल्याणाचा उदय. ३२ प्रसन्नपणा.

तला । मग तो ह्मणे कृष्ण बोलिला । तेंचि आइका ॥ ४३ ॥ [स योगी ब्रह्मनिर्वाणं] अर्जुना अनंतसुखाच्या डोहीं । एकसरां[1] तळचि घेतला जिहीं । मग थिरावोनि[2] तेही । तेंचि जाहाले ॥ ४४ ॥ [तथांतर्ज्योतिरेव यः] अथवा आत्मप्रकाशें[3] चोखें । जो आपणपेंचि[4] विश्व देखे । [लभते ब्रह्मनिर्वाणं] तो *देहेंचि[5] परब्रह्म सुखें । मानूं येईल ॥ ४५ ॥ [क्षयः क्षीणकल्मषाः] जें सांचोकारें[6] परम । ना तें अक्षर[7] निःसीम । जिये गांवींचे निष्काम[8] । अधिकारिये ॥ ४६ ॥ जें महर्षी वाढलें । [छिन्नद्वैधा यतात्मानः] विरक्ताभागा फिटलें । [सर्वभूतहिते रताः] जें निःसंशया पिकलें । निरंतर ॥ ४७ ॥

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।
अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥ २६ ॥

[कामक्रोध इति] जिहीं विषयापासोनि हिरतलें[9] । चित्त आपुलें आपण जिंतिलें[10] । ते निश्चित जेथ सुतले[11] । चेतीचिना[12] ॥ ४८ ॥ [अभित इति] तें परब्रह्म निर्वाण[13] । जें †आत्मविदांचें[14] कारण । तेंचि ते पुरुष जाण । पंडुकुमरा ॥४९॥ ते ऐसे कैसेनि जाहाले । जे देहींचि ब्रह्मत्वा आले । हें पुससी तरी भलें । संक्षेपें सांगों ॥ १५० ॥

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवांतरे भ्रुवोः ।
प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यंतरचारिणौ ॥ २७ ॥

[स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यान्] तरी वैराग्याचेनि आधारें । जिहीं विषय देवडूनि[15] बाहिरें[16] । शरीरीं एकंदरें[17] । केलें मन ॥ ५१ ॥ [चक्षुश्चैवांतरे भ्रुवोः] सहजें तिहीं संधी भेटी । जेथ भ्रूपल्लवा[18] पडे गांठी । तेथ पाठिमोरी दिठी[19] । पाडिली[20] निया[21] ॥ ५२ ॥ [प्राणापानाविति] सांडूनि दक्षिण[22] वाम । प्राणापानसम । चित्तेंसी व्योम[23] । गोमिये करिती ॥ ५३ ॥

यतेंद्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः ।
विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ॥ २८ ॥

[यतेंद्रियेति] तेथ जैसीं रथ्योदकें[23] सकळें । घेऊनि गंगा समुद्रीं मिळे । मग

---

* देहींच. † आत्मविद्यांचें.

---

१ ऐक्यतेनें. २ स्थीर होऊन. ३ चांगल्या. ४ आपणच, स्वतःच. ५ खरेपणानें. ६ अविनाशी. ७ निरिच्छ. ८ विरक्तांच्या हिश्शास आलें. ९ हिरावून घेतलें. १० जिंकलें. ११ निजले. १२ जागे होत नाहींत. १३ कैवल्यपद. १४ आत्मज्ञान्यांचें. १५ बाहेर घालवून. १६ एकनिष्ठ. १७ इडा, पिंगला व सुषुम्णा या तिहींची जेथें भेट होते. १८ डोळ्यांच्या पांपण्यांची. १९ दृष्टि. २० माघारी राहून, ठेवून. २१ उजवें डावें. २२ आकाशांत जाणारे. २३ रस्त्यावरील उदकें.

एकेक वेगळें । निवडूं नये ॥ ५४ ॥ तैसी वासनांतराची विवंचना । मग आपैसी पारुखे अर्जुना । जे वेळीं गगनीं लयो मना । पवनें कीजे ॥ ५५ ॥ जेथ हें संसारचित्र उमटे । तो मनोरूप पट फाटे । जैसें सरोवर आटे । मग *प्रतिभा नाहीं ॥ ५६ ॥ [विगतेच्छेति] तैसें मन एथ मुदल जाय । मग अहंभावादिक कैं आहे । ह्मणोनि शरीरेंचि ब्रह्म होय़े । अनुभवी तो ॥ ५७ ॥

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ॥ २९ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे संन्यासयोगो नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

[लभंते ब्रह्मनिर्वाणमिति २५ श्लोके उक्ताः] आह्मी मागां हन सांगितले । जे देहींचिं ब्रह्मत्व पावले । [भोक्तारं यज्ञतपसामिति ज्ञानमार्गेण] ते येणें मार्गें आले । ह्मणऊनियां ॥ ५८ ॥ [ज्ञात्वेति] आणि यमनियमांचे डोंगर । अभ्यासाचे सागर । क्रमोनि हें पार । पातले ते ॥ ५९ ॥ तिहीं आपणपें करूनि निर्लेपं । प्रपंचाचें धेतलें माप । मग †सांच शांतीचें चित्स्वरूप । होऊनि ठेले ॥१६०॥ [एतच्छ्लोकव्याख्यानमंतिमाध्याये व्याख्यास्यति । उत्तराध्यायबीजम्] ऐसा योगयुक्तीचा उद्देश । जेथ बोलिला हृषीकेश । तेथ अर्जुन सुदंश । ह्मणोनि चमत्कारिला ॥ ६१ ॥ तें देखिलियां कृष्णें जाणितलें । मग हांसोनि पार्थातें ह्मणितलें । काइ पां चित्त उबाइलें । इये बोलीं तुझें ॥ ६२ ॥ तंव अर्जुन ह्मणे देवो । परचित्तलक्षणाचा रावो । भला जाणितला जी भावो । मानस माझा ॥ ६३ ॥ म्यां जें कांहीं विवरूनि पुसावें । तें ‡आधींचि जाणितलें देवें । तरी बोलिलें तेंचि सांगावें । विवळ करूनि ॥ ६४ ॥ येन्हवीं तरी अवधारा । जो दाविला तुह्मी अनुसारा । तो पैल्हण्याहूनि पायउतारा । सोहपा जैसा ॥ ६५ ॥ तैसा सांख्याहूनि प्रांजळा । आह्मासारिखिया §अबळां । ¶एथ आहे कांहीं परिकाळा । तो साहों ये वर ॥ ६६ ॥ ह्मणोनि एक वेळ देवा । तोचि पैडताळा

---

* प्रतिभास. † साचा शांतीचेंचि रूप. ‡ आधींच कवळिलें. § आभोळां. ¶ एथ आहाति परि कांहीं काळा.

---

१ इतर इच्छेची. २ आपोआप. ३ राहे. ४ वायूनें. ५ वस्त्र. ६ प्रतिबिंब. ७ कोठें. ८ यम, नियम, आसन, धारणादिक योगमार्गाचे. ९ आपलें, आपणास. १० उपाधिरहित. ११ खरें. १२ जीव, चिच्छक्ति. १३ अभिप्राय. १४ मार्मिक, ज्ञाता. १५ चमत्कार पावला. १६ पाहतांच. १७ प्रसन्न झालें. १८ दुसऱ्याच्या मनोगताचा. १९ विचार करून. २० स्पष्ट, विस्तार. २१ ऐका. २२ मार्ग. २३ खोल पाण्यांत पोंहून जाण्यापेक्षां पायउतारा सोपा. २४ सुगम. २५ निर्बळांला. २६ परंतु कांहीं काळानें. २७ अनुभव, पर्यायानें सांगणें.

घेयावा । विस्तारेल तरी सांगावा । साद्यंतचि ॥ ६७ ॥ तंव श्रीकृष्ण ह्मणती होकां । तुज हा मार्ग गमला निकां[1] । तरी काय जाहालें आइकीं जो कां । सुखें बोलों ॥ ६८ ॥ अर्जुना तूं परिससी । परिसोनि अनुष्ठिसी[2] । तरी आह्मासीचि वाणि[3] कायसी । सांगावयाची ॥ ६९ ॥ आधींच चित्त मायेचें[4] । वरी मिषें[5] जाहालें पढियंतयाचें[6] । आतां तें अद्भुतपण स्नेहाचें । कवण जाणे ॥ १७० ॥ ते ह्मणे कारुण्यरसाची वृष्टी । कीं नवया[7] स्नेहाची सृष्टी । हें असो नेणिजे दृष्टी । हरीची वानूं ॥ ७१ ॥ जे अमृताची वोतली । कीं प्रेमचि पिऊन मातली । ह्मणोनि अर्जुनमोहें गुंतली । निघों नेणें ॥ ७२ ॥ हें बहु जें जें जल्पिजेल । तेथें कथेसि फांक[8] होईल । परि तें स्नेहरूपा न येल । बोलवरी ॥ ७३ ॥ ह्मणोनि विसुरा[9] काय येणें । तो ईश्वर कवळावा कवणें । जो आपुलें मान[10] नेणे । आपणचि ॥ ७४ ॥ तरी मागील ध्वनी[11]आंत । मज गमला सांवियाचि[12] मोहित । जे बळात्कारें असे ह्मणत । परिस बापा ॥ ७५ ॥ अर्जुना जेणें जेणें भेदें[13] । तुझें कां चित्त बोधे । तैसें तैसें विनोदें[14] । निरूपिजेल ॥ ७६ ॥ तो कोइसया[15] नांव योग । तयाचा कवण उपेगु[16] । अथवा अधिकारप्रसंग । कवणा एथ ॥ ७७ ॥ ऐसें जें जें कांहीं । उक्त[17] असे इये ठाईं । तें आघवेंचि पाहीं । सांगेन आतां ॥ ७८ ॥ तूं चित्त देऊनि अवधारीं । ऐसें ह्मणोनि श्रीहरी । बोलिजेल ते पुढारी[18] । कथा आहे ॥ ७९ ॥ श्रीकृष्ण अर्जुनासीं संगे[19] । न सांडोनि सांगेल योग । तो व्यक्त[20] करूं प्रसंग । ह्मणे निवृत्तिदास ॥ १८० ॥

इति श्रीज्ञानदेवकृतायां भावार्थदीपिकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

श्लोक २९, ओव्या १८०

पुणे नगर वाचन मंदिर, पुणे
वर्ग ५ क्रमांक १२१७१२

५५ ४/२७
श्री. श्रीनिवास मोडक, पुणे
यांजकडून सप्रेम भेट

१ चांगला. २ आचरसी. ३ न्यूनता. ४ ममतेचें. ५ निमित्त. ६ आवडत्याचें. ७ नवीन लग्नाचीं मुलें. ८ वर्णन करूं. ९ विस्तार. १० आश्चर्य. ११ प्रमाण. १२ सूचित अभिप्राय. १३ सहज, अकस्मात्. १४ प्रकारें. १५ कौतुकानें. १६ काय नांवाचा. १७ उपयोग. १८ सांगितलेलें. १९ सर्व. २० पुढें. २१ सहवास. २२ स्पष्ट.

ज्ञानेश्वरी.

अध्याय ६ वा.

मग *रायातें[1] संजयो ह्मणे जी । तोचि अभिप्राय अवधारिजो । श्रीकृष्ण सांगती आतां जो । योगरूप ॥ १ ॥ सहजें ब्रह्मरसाचें †परगुणें[2] । केलें अर्जुनालागीं नारायणें । कीं तेचि अवसरीं पाहुणे[3] । पातलों आह्मी ॥ २ ॥ कैसी दैवाची थोरी[4] नेणिजे । जैसें तान्हेलिया तोय[5] सेविजे । कीं तेंचि चवी[6] करूनि पाहिजे । तंव अमृत आहे ॥ ३ ॥ तैसें आह्मा तुह्मा जाहालें । जें‡ आडमुठी[7] तत्त्व फावलें[8] । तंव धृतराष्ट्रें ह्मणितलें । हें न पुसों तूतें ॥ ४ ॥ तया संजया येणें बोलें । रायाचें हृदय चोजवलें[9] । जे अवसरीं[10] आहे घेतलें । कुमरांचिया ॥ ५ ॥ हें जाणोनि मनीं हांसिला । ह्मणे ह्मातारा[11] मोहें नाशिला । येन्हवीं बोलें[12] तरी भला जाहाला । अवसरीं इये ॥ ६ ॥ परि तें तैसें कैसेनि होइल । जौलंधा कैसें पाहिल[13] । तेवींचि येरू रोष घेइल[14] । ह्मणोनि बिहे[15] ॥ ७ ॥ परि आपण चित्तीं आपुला । निकियापरि[16] संतोषला । जे तो संवादु[17] फावला । श्रीकृष्णार्जुनाचा ॥ ८ ॥ तेणें आनंदाचेनि धालेपणें[18] । सांभिप्राय अंतःकरणें । आतां आदरेसीं बोलणें । घडेल तया ॥ ९ ॥ तो गीतेमाजि[19] पैठींचा[20] । प्रसंग असे आर्यणीचा[21] । जैसा क्षीरार्णवीं अमृताचा । निवाड जाहाला ॥ १० ॥ तैसें गीतार्थाचें सार । जें विवेकसिंधूचें पारें[22] । नाना योगविभवभांडार[23] । उघडलें कां ॥ ११ ॥ जें आदिप्रकृतीचें विसवणें[24] । जें शब्दब्रह्मासि न बोलणें[25] । जेथूनि गीतावल्लीचें ठाणें[26] । प्ररोह[27] पावे ॥ १२ ॥ तो अध्याय साहावा । वरि सोहिल्याचिया बरवा[28] । सांगिजेल ह्मणोनि परिसावा । चित्त देउनी ॥ १३ ॥ माझा मनोहाठाचि[29] बोल कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंके[30] । ऐसीं अक्षरें रसिकें[31] । मेळवीन ॥ १४ ॥ जिये कोंवळिकेचेनि

---

* रायातें म्हणे संजयो. † पारणें. ‡ अडमुठी.

---

१ धृतराष्ट्राला. २ मेजवानी, भोजन. ३ महत्व. ४ पाणी. ५ चाखून. ६ अनायासें. ७ ब्रह्म. ८ प्राप्त झालें. ९ जाणवलें. १० बाधेनें, संचारानें. ११ पुत्रवात्सल्यानें. १२ अंध हा बोल, अंधळा हें नांव. १३ जन्मांधाला. १४ दिसेल. १५ हा. १६ भय पावे. १७ चांगल्या रीतीनें. १८ परस्पर प्रश्नोत्तरभाषणाचें सुख. १९ तृप्तीनें. २० मनांतल्या अर्थासह. २१ सहाव्या अध्यायांतील सटीचा. २२ तत्वनिर्णयाचा. २३ पैलथडी. २४ अथवा, अनेक. २५ योगसंपत्तीचा जामदारखाना. २६ आदिमायेचें. २७ विश्रांतिस्थान. २८ वेदाला. २९ गीतारूप वेलीचें. ३० स्वरूप. ३१ अंकुर. ३२ सर्व कौशल्याच्या उपसंहारासहित. ३३ प्राकृत, साधा. ३४ प्रतिज्ञेनें. ३५ मधुर. ३६ मृदुतेच्या बरोबरीनें.

पाडें । दिसती [१]नादींचे रंग थोडे । [२]वेधें [३]परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥ १५ ॥ ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होती जिभा । बोलें इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां ॥ १६ ॥ सहजें शब्द तरी विषो श्रवणाचा । परि [६]रसना ह्मणे रस हा आमुचा । घ्राणासि भाव जाय परिमळाचा । हा [७]तोचि होईल ॥ १७ ॥ नवल बोलतीये [८]रेखेची [९]वाहाणी । देखतां डोळा पुरों लागे [१०]धणी । ते ह्मणती उघडली खाणी । रूपाची हे ॥१८॥ जेथ संपूर्ण [११]पद उभारे । तेथ मनचि धांवे बाहिरें । बोलें [१२]भुजाही आविष्करे । आलिंगावया ॥ १९ ॥ ऐसीं इंद्रियें आपुलालिया [१३]भावीं । *झोंबती परि तो [१४]सरिसेपणेंचि [१५]वोळावी । जैसा एकला जग [१६]चेववी । सहस्रकर ॥ २० ॥ तैसें शब्दाचें व्यापकपण । देखिजे [१७]असाधारण । पाहातयां [१८]भावज्ञां [१९]फावती गुण । [२०]चिंतामणीचे ॥ २१॥ हें असो तयां बोलांचीं तटें भलीं । वरी [२१]कैवल्यरसें [२२]वोगरलीं । ही [२३]प्रतिपत्ति मियां केली । निष्कामासी ॥ २२ ॥ आतां [२४]आत्मप्रभा नित्य नवी । तेचि करूनि [२५]ठाणदिवी । जो इंद्रियांतें चोरूनि जेवी । तयासीचि [२६]फावे ॥ २३ ॥ तेथ श्रवणाचेनि [२७]पांगें । [२८]वीण श्रोतयां व्हावें लागे । हे मनाचेनि निजांगें । भोगिजे गा ॥ २४ ॥ अहाच बोलाची [२९]वोलीफ फेडिजे । आणि ब्रह्माचियाचि आंगा [३०]घडिजे । मग सुखेंसीं [३१]सुरवाडिजे । सुखाचिमाजि ॥ २५ ॥ ऐसें हळुवारपण जरी येइल । तरीच हें [३२]उपेगा जाइल । येऱ्हवीं [३३]ओघवी †गोष्टी होइल । मुकया बहिरयाची ॥ २६ ॥ परि तें असो आतां [३४]आघवें । नलगे श्रोतयांतें [३५]कैसावें । जे अधिकारिये एथ स्वभावें । निष्कामकाम ॥ २७ ॥ जिहीं आत्मबोधाचिया आवडी । केली स्वर्गसंसाराची [३६]कुरोंडी । तेवांचूनि एथिंची गोडी । नेणती आणिक ॥ २८ ॥ जैसा [३७]वायसीं चंद्र नोळखिजे । तैसा प्राकृतीं ग्रंथ हा नेणिजे । आणि तो हिमांशुचि [३८]जेवि [३९]खोजें । चकोराचें ॥ २९ ॥ तैसा सज्ञानासी तरी हा ठावो । आणि अज्ञानासी

---

* झोंबतां. † गोठी.

---

१ सतसुरांचे. २ छंदें. ३ बळ. ४ कलह, कळ. ५ विषय. ६ जिव्हा. ७ तो बोल परिमळच होईल. ८ अक्षरांची, कवित्वाची. ९ पद्धत, सरणि. १० तृप्ति. ११ अर्थावबोधक शब्द अथवा वाक्य. १२ मन आवेशानें बाहु उभारून बोलास आलिंगावयास धांवतें. १३ स्वभावीं. १४ ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें. १५ बोध करी. १६ जागवी, प्रकाशवी. १७ सूर्य. १८ विशेष. १९ अर्थ जाणणारांस. २० आढळती. २१ इच्छित देणाऱ्या मण्याचे. २२ मोक्षरसानें. २३ वाढलीं. २४ मेजवानी, ग्रंथरचना. २५ आत्मज्योति. २६ ठाण (स्थान) दाखविणारा दिवा, अधिष्ठानबोधक. २७ लाभे. २८ गरजेवांचून. २९ आच्छादन, गवसणी. ३० व्हावें. ३१ सुख भोगावें. ३२ सूक्ष्मता, नाजूकपणा. ३३ उपयोगास. ३४ सर्व. ३५ सावध करावें. ३६ ओवाळणी. ३७ चोरांनीं. ३८ चंद्र. ३९ खाद्य.

आन[1] गांवो । ह्मणोनि बोलावया विषय पहाहो । विशेष नाहीं ॥ ३० ॥ परि अनुवादलों[2] मी प्रसंगें । तें सज्जनीं उपसहावें[3] लागे । आतां *सांगेन काय श्रीरंगें । निरोपिलें जें ॥ ३१ ॥ तें बुद्धीही †आकळितां सांकडे[4] । ह्मणऊनि बोलीं विपायें[5] सांपडे । परि श्रीनिवृत्तिकृपादीपउजियेडें । देखेन[6] मी ॥ ३२ ॥ जें दिठीही न पविजे[7] । तें दिठीवीण देखिजे । जरी अतींद्रिय लाहिजे[8] । ज्ञानबळ ॥ ३३ ॥ नातरी जें धातुवादाही[9] न जोडे । तें लोहींचि पंधरें[10] सांपडे । जरी दैवयोगें चडे । परिस हाता ॥ ३४ ॥ तैसी सद्गुरुकृपा होये । तरी करितां काय आपुलें[11] नोहे । ह्मणऊनि ते अपार मातें आहे । ज्ञानदेव ह्मणे ॥ ३५ ॥ तेणेंकारणें मी बोलेन । बोलीं अरूपाचें रूप दावीन । अतींद्रिय परि भोगवीन । इंद्रियांकरवीं ॥ ३६ ॥ [श्रीभगवानुवाच–] आइका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हे साही गुणवर्य । वसती जेथ ॥ ३७ ॥ ह्मणोनि तो भगवंत । जो निःसंगाचा सांगात[12] । तो ह्मणे पार्था दत्तचित्त[13] । होई आतां ॥ ३८ ॥

श्रीभगवानुवाच–अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥ १ ॥

आइकें योगी[14] आणि संन्यासी[15] जनीं । हे एकचि सिनेंने[16] झणीं[17] मानीं । येन्हवीं विचारिजती जंव दोन्ही । तंव एकचि ते ॥ ३९ ॥ सांडिजे दुजया नामाचा आभास[18] । तरी योग तोचि संन्यास । पाहातां ब्रह्मीं नाहीं अवकाश[19] । दोहींमाजि ॥ ४० ॥ जैसें नामाचेनि अनारिसेपणें[20] । एका पुरुषातें बोलावणें[21] । कां दोहीं मार्गीं जाणें । एकाचि ठाया ॥ ४१ ॥ ना तरी एकचि उदक सहजें । परि सिनेंना[22] घटीं भरिजे । तैसें भिन्नत्व जाणिजे । योगसंन्यासाचें ॥ ४२ ॥ आइकें सकळ संमतें जगीं । अर्जुना †पाहें तोचि योगी । [अनाश्रितः कर्मफलं] जो कर्में करूनि रोगी[23] । नोहेचि फळीं ॥ ४३ ॥ जैसी मही हे उद्भिजें[24] । जनी अहंबुद्धीवीण सहजें । आणि तेथिचीं तियें बीजें[25] । अपेक्षीना ॥ ४४ ॥ तैसा §अन्वयाचेनि[26] आधारें । जातीचेनि अनुकारें[27] । जें जेणें अवसरें[28] । करणें पावे ॥ ४५ ॥ [कार्यं कर्म करोति यः] तें तैसेंचि उचित करी । परि सांटोप[29]

---

* सांगेन श्रीरंगें. † कवळितां. ‡ गाहें. § आम्नायाचेनि.

---

१ अन्य. २ बोललों. ३ क्षमा करावें. ४ कठीण. ५ कष्टानें, कदाचित्. ६ दृष्टीस. ७ इंद्रियातीत. ८ लाभेल. ९ किमयाकरणारास. १० पंधरांच्या दराचें सोनें. ११ प्राप्त. १२ सोबती. १३ लक्ष दे. १४ निरिच्छ कर्माचरण करणारे, फलेच्छा नसून कर्माचरण करणारे. १५ सर्वसंगपरित्यागी, निपटून कर्म त्याग करणारा. १६ वेगळे वेगळे. १७ मानूं नको. १८ आरोप. १९ समावेष. २० वेगळेपणें. २१ आळवणें, हाक मारणें. २२ वेगळे वेगळे कुंभांत. २३. इच्छु. २४ वृक्षादिक. २५ विये, उत्पादी. २६ वंशाच्या, आत्मव्याप्तीच्या. २७ अनुरूप. २८ अहंकारयुक्त.

नोहे शरीरीं । आणि बुद्धीही करोनि *फळवेरी । जायेचिना ॥ ४६ ॥ [स संन्यासी च योगी च] ऐसा तोचि संन्यासी । पार्था गा परियेसीं । तोचि भरंवसेनिसीं । योगीश्वर ॥ ४७ ॥ [न निरग्निर्न चाक्रियः] वांचूनि उचित कर्म प्रासंगिक । तयातें ह्मणे हें †सांडावें बद्धक । तरी टांकोटींकीं आणिक एक । मांडीचि तो ॥ ४८ ॥ जैसा क्षौळूनियां लेप एक । सवेंचि लाविजे आणिक । तैसेनि आग्रहाचा पाईक । विचंबे वायां ॥ ४९ ॥ गृहस्थाश्रमाचें वोझें । कपाळीं आधींचि आहे सहजें । कीं तेंचि संन्यासें वाढविजे । सरिसें पुढती ॥ ५० ॥ ह्मणूनि अग्निसेवा न सांडितां । कर्माची रेखा नोलांडितां । आहे योगसुख स्वभावता । आपणपांचि ॥ ५१ ॥

यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पांडव ।
नह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥ २ ॥

[यं संन्यासमिति] ऐकें संन्यासी तोचि योगी । ऐसी एकवाक्यतेची जगीं । गुढी उभविली अनेगीं । शास्त्रांतरीं ॥ ५२ ॥ [न ह्यसंन्यस्त इति] जेथ संन्यासिला संकल्प तुटे । तेथचि योगाचें सार भेटे । ऐसें हें अनुभवाचेनि धेटे । सांचें जया ॥ ५३ ॥

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ ३ ॥

[आरुरुक्षोर्मुनेर्योगं] आतां योगाचळाचा निमथा । जरी ठाकावा आथि पार्था । [कर्म कारणमुच्यते] तरी सोपानां या कर्मपथा । चुकां झणी ॥ ५४ ॥ यमें यमनियमाचेनि तळवटें । रिगे आसनाचिये पाउलवाटे । येई प्राणायामाचेनि ‡आडकाठें । वरौता गा ॥ ५५ ॥ [योगारूढस्य तस्यैव] मग प्रत्याहाराचा अंधाडा । जो बुद्धीचियाहि पायां निसरडा । जेथ हेटिये सांडिती होडी । कडेलग ॥ ५६ ॥ [शमः कारणमुच्यते] तरी अभ्यासाचेनि बळें । प्रत्या-

---

* फळवरी. † सांडी न. ‡ अडकंठें.

---

१ फलाच्या आशेपर्यंत. २ याशिवाय. ३ नैमित्तिक. ४ टांकतां टाकतां, लागलाच. ५ धुवून. ६ नोकर. ७ गुटमळतो. ८ पुनः. ९ श्रौत, स्मार्त होमादि. १० मर्यादा. ११ आपणच. १२ ध्वज लाविला. १३ बहुतांनीं. १४ सोडलेला. १५ निश्चयानें, दृढतेनें. १६ खरें. १७ कर्मरूप पर्वताचा. १८ मस्तक. १९ चढावा. २० जिन्यास. २१ चुकूं नको. २२ कर्ममार्गानें. २३ तळाकडून. २४ योगांतील अनेकविध आसनांच्या. २५ सुलभ मार्गानें. २६ अष्टांगयोगांतील चवथें अंग. २७ आडमार्गानें, कड्यानें. २८ वर. २९ विषयांपासून इंद्रियें खेंचणें. ३० मध्यभाग. ३१ घसरण्याजोगा. ३२ हठयोगी. ३३ प्रतिज्ञा, पैज. ३४ कडेलोट होईल म्हणून.

हारीं निराळें । *नखी लागेल ढाळेंढाळें । वैराग्याची ॥ ५७ ॥ ऐसा पवं चेनि पाठारें । येतां धारणेचेनि पैसारें । क्रमी ध्यानाचें चवरें । सांडे तंव ॥ ५८ ॥ मग तया †मार्गाची धांव । पुरेल प्रवृत्तीची हांव । जेथ साध्यसाधना खेंव । समरसें होय ॥ ५९ ॥ जेथ पुढील पैस पारुखे । मागील सरावें तें ठाके । ऐसिये ‡सरिसीये भूमिके । समाधि राहे ॥ ६० ॥ येणें उपायें योगारूढ । जो निरवधि जाहाला प्रौढ । तयाचिया चिन्हाचा निवाड । सांगेन आइकें ॥ ६१ ॥

यदा हि नेंद्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ।
सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥ ४ ॥

[यदा हि नेंद्रियार्थेषु] तरी जयाचिया इंद्रियांचिया धरा । नाहीं विषयांचिया येरझारा । जो आत्मबोधाचा वोवरां । पोहुडला असे ॥ ६२ ॥ [न कर्मस्वनुषज्जते] जयाचें सुखदुःखाचेनि आंगें । झेंगडलें मानस चेवो नेघे । विषय पासींही आलियां से न रिघे । हें काय ह्मणऊनि ॥ ६३ ॥ [सर्वसंकल्पसंन्यासी] इंद्रियें कर्माच्याठायीं । वाढीनलीं परि कहीं । फळहेतूची चाड नाहीं । अंतःकरणीं ॥ ६४ ॥ असतेनि देहें ऐतुला । जो चेतुचि दिसे निदेलां । [योगारूढस्तदोच्यते] तोचि योगारूढ भला । वोळखें तूं ॥ ६५ ॥ तेथ अर्जुन ह्मणे अनंता । हें मज विस्मो बहु आइकतां । सांगें तया ऐसी योग्यता । कवणें दीजे ॥ ६६ ॥

उद्धरेदात्मनात्मानमात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ५ ॥

[उद्धरेदात्मनात्मानं] तंव हांसोनि कृष्ण ह्मणे । तुझें नवल ना हें बोलणें । कवणासि काय दिजेल कवणें । अद्वैतीं एथ ॥ ६७ ॥ [नात्मानमवसादयेत्] पैं व्यामोहाचिये शेजे । बळिया अविद्या §निद्रित होइजे । ते वेळीं दुःस्वप्न हा भोगिजे । जन्ममृत्यूचा ॥ ६८ ॥ [आत्मैव ह्यात्मनो बंधुः] पाठीं अवसांत ये

* नखीं. † कर्माची. ‡सरसिये. § निदैजे.

१ निरालंबी, निर्गुणी. २ आश्रय, आधार. ३ हळूहळू. ४ पाठबळानें. ५ यमनियमादि गुणयुक्त मनाचे स्थितीनें. ६ मार्ग. ७ उल्लंघी. ८ शेवट. ९ चालणें. १० इच्छा. ११ भेट, आलिंगन. १२ ब्रह्मानंदीं. १३ पाऊल बंद होतें. १४ अशा अवेस्थच्या जवळ. १५ ध्येय वस्तूच्या ठिकाणीं मनाची एकाग्रस्थिति, पक्वदशा. १६ अत्यंत. १७ निर्णय. १८ खोलींत. १९ निजला. २० भिडलें, संघटित झालेलें. २१ उत्कंठा. २२ जवळ. २३ स्मरण. २४ कधीं. २५ एवढा. २६ जागा असतां. २७ निजला. २८ नवल. २९ भ्रांतीचे. ३० आंथरुणावर. ३१ बळकट अज्ञानानें. ३२ नंतर. ३३ अकस्मात्.

चेवो[1]। तैं तें अवधेंचि होय वावो[2]। ऐसा उपजे नित्य सद्भावो। तोही आपणपांचि[3] ॥ ६९ ॥ [आत्मैव रिपुरात्मनः] ह्मणऊनि आपणचि आपणयां। घात किजेत असे धनंजया। चित्त देऊनि नाथिलिया[4]। देहाभिमाना ॥ ७० ॥

बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६ ॥

[बंधुरात्मा इति] हा विचारूनि अहंकार सांडिजे। मग असतीचि[5] वस्तु होइजे। तरी आपली स्वस्ति[6] सहजें। आपण केली ॥ ७१ ॥ [अनात्मनस्त्विति] येऱ्हवीं कोशकीटकाचिया परी। तो आपणयां आपण वैरी। जो आत्मबुद्धि[7] शरीरीं। *चारुस्थळी ॥ ७२ ॥ कैसे प्राप्तीचिये वेळे। निदैवां[8] आंधळेपणाचे डोहळे[9]। कीं असते आपुले डोळे। आपण झांकी ॥ ७३ ॥ कां कवण एक भ्रमलेपणें। मी तों नव्हे गा चोरलों[10] ह्मणे। ऐसा नाथिला[11] छंद अंतःकरणें। घेऊनि ठाके ॥ ७४ ॥ येरवीं होय तें तोचि आहे। परि काइ[12] कीजे बुद्धि तैसी नोहे। देखा स्वप्नींचेनि घायें। कीं मरे साचें ॥ ७५ ॥ जैसी ते शुकाचेनि[13] आंगभारें। नळिका भोविन्नली[14] एरी[15] मोहरें। तरी तेणें उडावें परि न पुरे। मनशंका ॥ ७६ ॥ वायांचि मान पिळी। अंडुवें[16] हियें[17] आंवळी। †टिटांतु[18] नळी। धरूनि ठाके ॥ ७७ ॥ ह्मणे बांधला मी फुंडा[19]। ऐसिया भावनेचिया पडे खोडां[20]। कीं मोकळिया पायांचा चवडा[21]। गोंवी अधिकें[22] ॥ ७८ ॥ ऐसा कोंजिंवीण[23] आंतुडला[24]। तो सांग पां काय आणिकें[25] बांधला। ‡मग न सोडीच जन्ही नेला। तोडूनि अर्धा ॥ ७९ ॥ ह्मणऊनि आपणयां आपणचि रिपु। जेणें वाढविला हा संकल्पु। येरें[26] स्वयंबुद्धी ह्मणे बापु। जो नाथिलें[27] नेघे ॥ ८० ॥

जितात्मनः प्रशांतस्य परमात्मा समाहितः।
शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥ ७ ॥

[जितात्मन इति] तया स्वांतःकरणजिती[28]। सकळकामोपशांता[29]। परमात्मा

---

* चारुस्थळा. † टिटांत. ‡ मग नोसंडीच.

---

१ जागृती. २ व्यर्थ. ३ आपोआप, स्वतःच. ४ केला जात. ५ लटिक्या. ६ असलेली, सद्रूप. ७ खरें स्वरूप, ब्रह्म. ८ कल्याण. ९ आपल्या आंगाभोंवतीं घर बांधणारा किडा. १० शरीर हेंच आपण आहोंत असा आत्म्यावर अध्याहार करतो. ११ हतभाग्याला. १२ हौस. १३ हरवलों. १४ लटिका. १५ राघूच्या भारानें. १६ फिरली. १७ उलट, दुसरीकडे. १८ संकोचित, वांकडी. १९ छाती. २० पायांत. २१ खरा. २२ खोड्यांत. २३ गुंतवी. २४ निरर्थक. २५ सांपडला. २६ दुसऱ्यानें. २७ इतर. २८ मन जिंकणाराला. २९ इच्छा शांत झालेल्याला.

परौता[1] । दूर नाहीं ॥ ८१ ॥ जैसा किडाळाचा[2] दोष जाये । तरी पं-धेरें[3] तेंचि होये । तैसें *जीवा ब्रह्मत्व आहे । संकल्पलोपीं[4] ॥ ८२ ॥ हा घटा-कार जैसा । निमालिया[5] तया अवकाशा । नलगे मिळों जाणें आकाशा । आना[6] ठाया ॥ ८३ ॥ तैसा देहाहंकार नाथिला । हा समूळ जयाचा नाशिला । तोचि परमात्मा संचला । आधींचि आहे ॥ ८४ ॥ [शीतोष्णेति] आतां शीतो-ष्णाचिया[7] वाहणी[8] । तेथ सुखदुःखाची कडसणी[9] । इयें नसमाती[10] कांहीं बो-लणीं[11] । मानापमानाचीं ॥ ८५ ॥ जे जियेवांटा[12] सूर्य जाये । तेउतें[13] तेजाचें विश्व होये । तैसें तया पावे तें आहे । तोचि झणउनी ॥ ८६ ॥ देखें मेघौनि[14] सु-टती धारा । तिया न रुपती[15] जैसिया सागरा । तैसीं शुभाशुभें योगीश्वरा । †नव्हती[16] आंनें[17] ॥ ८७ ॥

ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः ।
युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचनः ॥ ८ ॥

[ज्ञानविज्ञानतृप्तात्मा] जो हा विज्ञानात्मक[15] भावो । तया विवंरितां[16] जाहला वावो[17] । मग लागला जंव पाहों । तंव ज्ञान तें तोचि ॥ ८८ ॥ [कूटस्थः] आतां व्यापक कीं एकदेशी[18] । ऊहापोहि[19] जे ऐसी । ते करावी ठेली[20] आपैसी । दुजेनवीण ॥ ८९ ॥ [विजितेंद्रियः] ऐसा शरीरींचि परि कौतुकें । परब्रह्माचे-नि पोडें[21] तुके[22] । जेणें जिंतलीं[23] एकें । इंद्रियें गा ॥ ९० ॥ तो जितेंद्रियें[24] सहजें । [युक्त इत्युच्यते योगी] तोचि योगयुक्त ह्मणिजे । जेणें सोनें थोर नेणिजे । क-वणें काळीं ॥ ९१ ॥ [समलोष्टाश्मकांचनः] देखें सोनयाचें निखळ[25] । मेरुयेसणें[26] ढिसाळ[27] । आणि मातियेचें डिखळ[28] । कीं सरिसेंचि[29] मानी ॥ ९२ ॥ पाहातां पृथ्वीचें मोल थोडें । ऐसें अनर्घ्य[30] रत्न चोखडें[31] । देखें दगडाचे निपाडें[32] । निचाड[33] ऐसा ॥ ९३ ॥

---

* जिवात्मत्व. † बाधिती ना.

---

१ पलीकडे. २ हिणकटाचा. ३ उत्तमकशी सोनें. ४ चित्तवृत्तिनिरोधानें संकल्प नाश पावल्यानें. ५ नाश पावला असतां. ६ अन्य स्थलीं. ७ खोटा. ८ भरीव, सर्वत्र सांठलेला. ९ शीतोष्णें, वाहाणी=क्रमानें येतां जातां सुखदुःखाची कडसणी=विचार व मान अपमान इयें न समाती=हीं बोलणीं जेथें राहत नाहींत. १० ज्या मार्गानें. ११ तितकें. १२ मेघापासून. १३ खुपत नाहींत. १४ भिन्न होत नाहींत. १५ संसारिक ज्ञान. १६ विचारितां. १७ व्यर्थ. १८ अव्यापक. १९ तर्क वितर्क. २० आपोआप राहिली. २१ बरोबरीनें. २२ तोलला जातो, तुल्य समज. २३ जिंकिलीं. २४ इंद्रियें स्वाधीन ठेवणारा. २५ लहान. २६ शुद्ध. २७ मेरुपर्वताएवढें. २८ मोठें. २९ ढेंकूळ. ३० सारखेंच. ३१ अमोल. ३२ चांगलें. ३३ निष्काम.

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु ।
साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥ ९ ॥

[सुहृन्मित्रेति] तेथ सुहृद आणि शत्रु । कां उदास आणि मित्रु । हा भाव-भेद विचित्रु । कल्पू कैंचा ॥ ९४ ॥ तया बंधु कोण कांह्यांचा । द्वेषिया कवण तयाचा । मीचि विश्व ऐसा जयाचा । बोध जाहाला ॥ ९५ ॥ [साधुष्वपि च पापेषु] मग तयाचिये दृष्टी । अधमोत्तम असे किरीटी । काय *परिसाँचिये कसवटी । वानिया कीजे ॥ ९६ ॥ ते जैसी निर्वाणीं सुवर्णचि करी । [समबुद्धिर्विशिष्यते] तैसी जयाची बुद्धी चराचरीं । होय †साम्याचि उजरी । निरंतर ॥ ९७ ॥ जे ते विश्वाळंकाराचे विसुरे । जरी आहाती आनानें आकारें । तरी घडलें एकचि भांगारें । परब्रह्में ॥ ९८ ॥ ऐसें जाणणें जें बरवें । तें फावलें तया आघवें । ह्मणोनि अहोंचवाहाचे न झकवे । येणें आकारचित्रें ॥ ९९ ॥ घापे पटामाजि दृष्टी । दिसे तंतुची सैंधे सृष्टी । परि तो एकवांचूनि गोष्टी । दुजी नाहीं ॥ १०० ॥ ऐसेनि प्रतीती हें गवसे । ऐसा अनुभव जयातें असे । तोचि समबुद्धी हें अनारिसें । नव्हे जाणें ॥ १ ॥ जयाचें नांव तीर्थरावो । दर्शनें प्रशस्तीसि ठावो । जयाचेनि संगें ब्रह्मभावो । भ्रांतासही ॥ २ ॥ जयाचेनि बोलें धर्म जिये । दिठी महासिद्धीतें विये । देखें स्वर्गसुखादि इये । खेळ जयाचा ॥ ३ ॥ विषयीं जरी आठवला चित्ता । तरी दे आपुली योग्यता । हें असो तयातें प्रशंसितां । लाभ आथि ॥ ४ ॥

योगी युंजीत सततमात्मानं रहसि स्थितः ।
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥ १० ॥

[योगीति] पुढती अस्तवेना ऐसें । जया पाहलें अद्वैतदिवसें । मग आपण-पांचि आपण असे । अखंडित ॥ ५ ॥ [एकाकीति] ऐसिया दृष्टी जो विवेकी ।

---

* परिसाची. † साम्याचि.

---

१ मित्र. २ परका. ३ भिन्नभाव. ४ विचित्र कल्पना. ५ कशाचा. ६ परिसावर कसवटी केली तर निरनिराळे वानाचें (हीन, मध्यम, उत्तम आदि) सोनें होईल काय? ७ केवळ, उत्तम. ८ स्पष्ट, स्पष्टता. ९ समुदाय, आश्चर्य. १० सुवर्ण. ११ समजलें. १२ वरचेवर. १३ फसवत नाहीं. १४ चित्रविचित्र विश्वरचनेनें. १५ घातल्यानें. १६ वस्त्रावर. १७ सूतमय. १८ केवळ, सर्व. १९ अनुभवानें. २० प्राप्त होतें, सांपडतें. २१ खोटें, वेगळें. २२ तीर्थांचा राजा, प्रयाग. २३ पूज्यतेला. २४ जगतो. २५ दृष्टीनें. २६ प्रसवे. २७ सहज. २८ स्तुति केली असतां. २९ आहे. ३० पुनः. ३१ लोपेना. ३२ प्रातःकाळ झाला, उदय झाला. ३३ आपला आपणच.

पार्था तो एकाकी[1] । सहजें अपरिग्रही[2] जो तिहीं लोकीं[3] । तोचि ह्मणउनी ॥६॥ ऐसियें असाधारणें[4] । निष्पन्नाचीं[5] लक्षणें । आपुलेनि बहुवसपणें[6] । श्रीकृष्ण बोले ॥ ७ ॥ जो ज्ञानियांचा बाप[7] । देखणेयांचे दिठीचा दीप[8] । जया दादुलयाचा[9] संकल्प । विश्व रची ॥ ८ ॥ प्रणवाचिये पेठे[10] । जाहालें शब्दब्रह्म *माजिठें[11] । तें जयाचिये यशा धाकुटें[12] । वेढूं न पुरे ॥ ९ ॥ जयाचेनि आंगिकें[13] तेजें । आंवो रविशशीचिये वणिजे[14] । ह्मणऊनि जग हें वेसजे[15] । वीण असे तया ॥ ११० ॥ हां गा नामचि एक जयाचें । पाहतां गगनही दिसे टांचें[16] । गुण एकैक काय तयाचे । †कलिशील[17] तूं ॥ ११ ॥ ह्मणोनि असो हें वानणें[18] । सांगों नेणों कवणाचीं लक्षणें । दोंवावीं मिषें येणें[19] । कां बोलिलों तें ॥ १२ ॥ ऐकें द्वैताचा ठावोचि फेडी[20] । ते ब्रह्मविद्या किजेल उघडी[21] । तरि अर्जुना पढिये हे गोडी[22] । नाशेल हन ॥ १३ ॥ ह्मणोनि तें तैसें बोलणें । नव्हे संपातळ[23] आड लावणें । केलें मनचि वेगळवाणें[24] । भोगावया ॥ १४ ॥ जया सोहंभाव ‡अटक[25] । मोक्षसुखालागोनि रंक[26] । तयाचिये दिठीचा झेंणें[27] कळंक । लागेल तुझिया प्रेमा ॥ १५ ॥ विपायें[28] अहंभाव ययाचा जाइल । मी तेंचि हा जरी होइल । तरि मग काय कीजेल । एकलेया ॥ १६ ॥ दिठीचि[29] पाहतां निविजे[30] । कां तोंड भरोनि बोलिजे । ना तरी दाटूनि[31] खेंव[32] दीजे । ऐसें कोण आहे ॥ १७ ॥ आपुलिया मना बरवी । असमाई[33] गोठी[34] जीवीं । ते कवणेंसि चावळावी[35] । जरी ऐक्य जाहलें ॥ १८ ॥ इया काकुळती जनार्दनें । अन्योपदेशाचेनि हेतासनें[36] । बोलिलोंमाजि[37] मन, मनें । आलिंगूं सरलें ॥ १९ ॥ हें परिसतां जरि कोनडें[38] । तरि जाण पां पार्था उघडें । श्रीकृष्ण सुखाचेंचि रूपडें । वोतलें गा ॥ १२० ॥ हें असो वेथसेचिये[39] शेवटीं । जैसें एकचि विये वांझोटी । मग ते मोहाची त्रिपुटी[40] । नाचों लागे ॥ २१ ॥ तैसें जाहालें श्रीअनंता । ऐसें तरि मी न ह्मणता । जरी तयाचा न देखता । अतिशय एथ ॥ २२ ॥ पाहा पां नवल कैसें चोज[41] । कें उपदेश कोउतें[42] जुंझ[43] । परि पुढें

* माजिवटें. †आकलिशील. ‡ हा अटक.

१ अद्वितीय. २ संग्रह न करणारा. ३ असामान्य. ४ सिद्धांचीं. ५ षड्गुणैश्वर्यसंपन्नतेनें. ६ पाहाणाऱ्यांच्या दृष्टीचा प्रकाशक. ७ समर्थाचा. ८ ॐकाराच्या. ९ बाजारांत. १० उत्कृष्ट वस्त्र. ११ आच्छादूं शकत नाहीं. १२ अंगींच्या. १३ प्रतिष्ठा. १४ वाणिज्यास, व्यापारास. १५ प्रकाशावांचून. १६ लहान. १७ जाणशील. १८ प्रशंसणें. १९ या निमित्तानें दाखवावीं ह्मणून बोललों. २० नाहींशा करी. २१ केली जाईल. २२ अतिप्रिय. २३ पडदा. २४ भिन्न. २५ अडथळा. २६ दीन. २७ कदाचित्. २८ कदाचित्. २९ दृष्टीनें. ३० शांत व्हावें. ३१ आनंदानें दृढ. ३२ आलिंगन. ३३ न मावणारी. ३४ गोष्ट. ३५ बोलावी. ३६ युक्तीनें, मिषानें. ३७ बोलण्यांत. ३८ अवघड. ३९ वयाच्या. ४० प्रपंचरचना. ४१ ज्ञानें, आवड. ४२ कोठें. ४३ कोणीकडे युद्ध.

वालभाचें[1] भोजे[2]। नाचत असे ॥ २३ ॥ आवडी आणि लाजवी। व्यसन आणि शिणवी। पिसें[3] आणि न भुलवी। तरि तें काइ[4] ॥ २४ ॥ ह्मणऊनि भावार्थ तो ऐसा। अर्जुन मैत्रियेचा *कुवासा[5]। कीं सुखें शृंगारलिया मानसा[6]। दर्पण[7] तो ॥ २५ ॥ यापरी बाप पुण्यपवित्र। जगीं भक्तिबीजासि सुक्षेत्र[8]। तो श्रीकृष्णकृपे पात्र। याचिलागीं ॥ २६ ॥ हो कां आत्मनिवेदनातळींची[9]। जे पीठिकां[10] होय सख्याची। पार्थ अधिष्ठात्री[11] तेथिंची। मातृका गा ॥ २७ ॥ पासींचि गोसावी[12] वर[13] न वानिजे। †मा या पाइकाचा गुण घेइजे[14]। ऐसा अर्जुन तो सहजें। पढिये[15] हरी ॥ २८ ॥ पाहा पां अनुरागें[16] भजे। जे प्रियोत्तमें[17] मानिजे। ते पतीहूनि काय न वानिजे। पतिव्रता ॥ २९ ॥ तैसा अर्जुनचि विशेषें स्तवावा। ऐसें आवडलें मज जीवा। जे तो त्रिभुवनींचिया दैवां। एकायतन[18] जाहाला ॥ १३० ॥ जयाचिया आवडीचेनि पांगें[19]। अमूर्तही मूर्ति ओवगे[20]। पूर्णाहि परि लागे। अवस्था[21] जयाची ॥ ३१ ॥ तंव श्रोते ह्मणती दैव। कैसी बोलाची हेवाव[22]। काय नादातें[23] हन बरव[24]। जिणोनि[25] आली ॥ ३२ ॥ हां हो नवल नोहे देशी[26]। मऱ्हाटी बोलिजे तरि ऐशी। वोणें[27] उमटता हे आकाशीं। साहित्य†रंगाचें[28] ॥ ३३ ॥ कैसें उन्मेखचांदिणें[29] तोर[30]। आणि भावार्थु पडे गार। हेचि श्लोकार्थ कुमुदिनी फार[31]। §सावित्या होती ॥ ३४ ॥ चाडचि ¶निचाडां[32] करी। ऐसी मनोरथीं ये थोरी। तेणें विवळले[33] अंतरीं। तेथ डोले[34] आला ॥ ३५ ॥ तें निवृत्तिदासें जाणितलें। मग अवधान द्या ह्मणितलें। नवल पांडवकुळीं पाहिलें। कृष्णदिवसें[35] ॥ ३६ ॥ देवकीयां[36] उदरीं वाहिला। यशोदा सायासें[37] पाळिला। शेखीं उपेगा[38] गेला[39]। पांडवांसी ॥३७॥ ह्मणऊनि बहुदिवस वोळगावा[40]। कां अवसरू[41] पाहोनि विनवावा। हाही सोसें[42] तया सदैवा[43]। पडेचिना ॥ ३८ ॥ हें असो कथा सांगें वेगीं। मग अर्जुन ह्मणे सलगी[44]। देवा इयें संतचिन्हें आंगीं। न ठकती[45] माइया ॥ ३९ ॥ येन्हवीं

---

* कुवासा. † मग. ‡ रंगाची. § सवित आहाती. ¶ निचाड.

---

१ प्रीतीचें. २ प्रेम, कौतुक. ३ वेड. ४ मग त्याची प्रतिष्ठा काय? ५ आश्रय. ६ आरसा. ७ चांगलें शेत. ८ योग्य. ९ नवव्या भक्तीच्या मागची, आठवी. १० आसन. ११ आश्रयभूत. १२ देवता. १३ इंद्रियदमन करणारांत श्रेष्ठ. १४ वर्णन करावा. १५ मग. १६ सेवकाचा. १७ अतिप्रिय. १८ प्रीतीनें. १९ नवऱ्यानें. २० एकच अधिष्ठान. २१ तंत्रानें, प्रसारानें. २२ स्वीकारी. २३ उत्कंठा. २४ आवड. २५ नादब्रह्मातें, वेदातें. २६ सौंदर्य. २७ जिंकून. २८ देशभाषा. २९ प्रकार. ३० स्वरूपीं. ३१ श्रवणसुखाचें. ३२ ज्ञान. ३३ चकचकित. ३४ प्रसृत. ३५ सहज, सर्वथा. ३६ निष्काम. ३७ प्रकाशले. ३८ विस्मय. ३९ उजाडलें. ४० कृष्ण हाच दिवस त्यानें. ४१ देवकीनें. ४२ शेवटीं. ४३ उपयोगीं पडला. ४४ सेवावा. ४५ समय. ४६ आशा. ४७ दैववानाला. ४८ लडिवाळपणानें. ४९ वसत नाहींत.

या लक्षणाचिया निजसारा । मी अपाडें कीरें अपुरा । परि तुमचेनि बोलें अवधारा । थोरावें जरी ॥ १४० ॥ जी तुह्मी चित्त देयाल । तरी ब्रह्म *मियां होइजेल । काय जाहालें अभ्यासिजेल । सांगाल जें ॥ ४१ ॥ हांहो नेणों कवणाची काहाणी । आइकोनि श्लाघिजत असों अंतःकरणीं । ऐसी जाहालेपणाची शिरियाणी । कायसी देवा ॥ ४२ ॥ हें आंगें म्यां होइजो कां । येतुलें गोसावी आपुलेपणें कीजो कां । तंव हांसोनि श्रीकृष्ण होकां । करूं ह्मणती ॥ ४३ ॥ देखा संतोष एक न जोडे । तंवचि सुखाचें सेंधे सांकडें । मग जोडलिया कवणेकडे । अपुरें असे ॥ ४४ ॥ तैसा सर्वेश्वर †बळिया सेवकें । ह्मणोनि ब्रह्मही होय तो कौतुकें । परि कैसा भारें आंतला पिकें । दैवाचेनि॥४५॥ जो जन्मसहस्रांचियासाठीं । इंद्रादिकांहीं महाग भेटी । तो अधीन केतुला किरीटी । जे बोलही न साहे ॥ ४६ ॥ मग ऐका जें पांडवें । ह्मणितलें म्यां ब्रह्म होआवें । तें अशेषही देवें । अवधारिलें ॥ ४७ ॥ तेथ ऐसेंचि एक विचारिलें । जे या ब्रह्मत्वाचे डोहळे जाहाले । परि उदरा वैराग्य आहे आलें । बुद्धीचिया ॥ ४८ ॥ येन्हवीं दिवस तरी या अपुरे । परि वैराग्यवसंताचेनि भरें । जे सोहंभावमहुरें । मोडोनि आला ॥ ४९ ॥ ह्मणोनि प्राप्तिफळीं फळतां । ययासि वेळ न लगेल आतां । होय विरक्त ऐसा अनंता । भरंवसा जाहाला ॥ १५० ॥ ह्मणे जें जें हा ‡अधिष्ठील । तें आरंभींच यया फळेल । ह्मणोनि सांगीतला न वचेल । अभ्यास वायां ॥ ५१ ॥ ऐसें विवरोनियां श्रीहरी । ह्मणितलें तिये अवसरीं । अर्जुना हा अवधारीं पंथराज ॥ ५२ ॥ तेथ प्रवृत्तिरूच्या बुडीं । दिसती निवृत्तिफळाचिया कोडी । जिये मार्गींचा कापडी । महेश आझुनी ॥ ५३ ॥ पैं योगिवृंदें वहिलीं । ओडवीं आकाशीं निघालीं । कीं तेथ अनुभवाच्या पाउलीं । §धोरणें पडिला ॥ ५४ ॥ तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें । धांव घेतली एकसरें । कीं येर सकळ मार्ग निदसुरे । सांडूनियां ॥ ५५ ॥ पाठीं महर्षी येणें आले । साधकांचे सिद्ध जाहाले । आत्मविद थोरावले । येणेचि पंथें ॥ ५६ ॥ हा मार्ग जैं देखिजे ।

---

* माझें होईल. † सांगेल स्वमुखें. ‡ अनुष्ठील. § धारण.

१ पूर्ण तात्पर्यास. २ अपरिमित. ३ निश्चयें. ४ महत्व मानावें. ५ द्याल. ६ गोष्ट. ७ स्तुति करीत राहूं. ८ महाआवड, मोठेपणा. ९ इतके. १० फार. ११ संकट. १२ बळकट सेवाधर्मानें. १३ भरानें. १४ दडपलेला. १५ दुर्मिळ. १६ केवढा. १७ अर्जुनाला. १८ सर्व. १९ अपुरते. २० मोहोरानें. २१ अतोनात भारानें. २२ श्रीकृष्णाला. २३ ग्रहण करील, आचरील. २४ व्यर्थ जाणार नाहीं. २५ राजमार्ग. २६ संसारवृक्षाखालीं. २७ मोक्षफळाच्या. २८ कोटी. २९ यात्रेकरू. ३० शंकर. ३१ निराळें, सत्वर. ३२ आडव्यातिडव्या मार्गानें. ३३ हमरस्ता. ३४ सरळमार्गानें. ३५ एकसारखी. ३६ अज्ञानांतील. ३७ पूर्वी. ३८ तत्वज्ञानी. ३९ श्रेष्ठ झाले.

तैं ताहान भूक विसरिजे । रात्रिदिवस नेणिजे । वाटे इये ॥ ५७ ॥ चालतां पाउल जेथ पडे । तेथ अपवर्गाची खाणी उघडे । ओव्हांटलिया तरि जोडे । स्वर्गसुख ॥ ५८ ॥ निगिजे पूर्वीलिया मोहरा । कीं येइजे पश्चिमेचिया घरा । निश्चळपणें धनुर्धरा । चालणें एथिचें ॥ ५९ ॥ येणें मार्गें जया ठाया जाइजे । तो *गांव आपणचि होइजे । हें सांगों काय सहजें । जाणसी तूं ॥१६०॥ तेथें पार्थें ह्मणितलें देवा । तरि तेंचि मग केव्हां । कां आर्तिसमुद्रौनि न काढावा । बुडंतु जी मी ॥ ६१ ॥ तंव कृष्ण ह्मणती ऐसें । हें †उत्संखळ बोलणें कायसें । आह्मी सांगतसों आपैसें । वरि पुशिलें तुवां ॥ ६२ ॥

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः ।
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥ ११ ॥

[शुचौ देशे प्रतिष्ठाप्य] तरी विशेषें आतां बोलिजेल । परि तें अनुभवें उपेगा जाईल । ह्मणोनि तैसें एक लागेल । स्थान पाहावें ॥ ६३ ॥ जेथ आराणुकेचेनि कोडें । बैसलिया उठों नावडे । वैराग्यासि दुणीव चढे । देखिलिया जें॥६४॥ जो संतीं वसविला ठावो । संतोषासि सांवावो । मना होय उत्सावो । धैर्याचा ॥ ६५ ॥ अभ्यासचि आपण यातें करी । हृदयातें अनुभव वरी । ऐसी रम्यपणाची थोरी । अखंड जेथ ॥ ६६ ॥ जया आड जातां पार्था । तपश्चर्या मनोरथा । पाखांडियाही आस्था । समूळ होय ॥ ६७ ॥ स्वभावें वाटे येतां । जरि वरपडा जाहाला अवचितां । तरि सकामही परि मोघौता । निघों विसरे ॥ ६८ ॥ ऐसेनि न राहतयातें राहावी । भ्रमतयातें बैसवी । थापटूनि चेववी । विरक्तीतें ॥ ६९ ॥ हें राज्य ‡वर सांडिजे । मग निवांता एथेंचि असिजे । ऐसें शृंगारियांहि उपजे । देखत खेवो ॥ १७० ॥ जे येणें मानें बरवंट । आणि तैसेंचि अतिचोखट । जेथ अधिष्ठान प्रगट । डोळां दिसे ॥ ७१ ॥ आणिकही एक पहावें । जें साधकीं वसतें होआवें । आणि जनाचेनि पायरवें । § रुळेचिना ॥ ७२ ॥ जेथ अमृताचेनीपाडें । मुळाही सकट गोडें । जोडंती दाटें झाडें । सदा फळती ॥ ७३ ॥ पाउला ¶पाउला उदकें । ||वर्षाकाळावीण अतिचोखें । निर्झरें कां विशेषें । सुलभें जेथें ॥ ७४ ॥ हा

* ठाव. † उत्सुक. ‡ वरि. § मळेचिना. ¶ पाउलीं. || वर्षाकाळींही चोखें.

१ मोक्षाची. २ आडमार्गानें गेलें असतांही. ३ निघावें. ४ पूर्वेच्या. ५ मार्गानें. ६ उत्कंठासागरांतून. ७ बुडत आहें. ८ उतावळीचें. ९ आपण होऊन. १० पुनः. ११ उपयोगीं पडेल. १२ समाधान व्हावें या इच्छेनें. १३ दुप्पटपणा, दृढपणा. १४ सहाय, अधिकत्व. १५ हर्ष. १६ मध्यें, जवळ जातां. १७ प्राप्त. १८ एकाएकीं. १९ मावारा. २० उठवी. २१ चांगलें. २२ पाहातांच. २३ चांगलें. २४ शुद्ध. २५ ब्रह्मस्वरूप. २६ वस्ती. २७ वर्दळ. २८ मळेना. २९ तुलनेनें. ३० सांपडतात. ३१ फळांनीं युक्त असणारी. ३२ पावसाळ्यावांचून. ३३ निर्मळ. ३४ झरे.

आंतपही[1] अळुमाळ[2]। जाणिजे तरि शीतळ। पवन[3] अति निश्चळ। मंद झुळके[4] ॥ ७५ ॥ बहुतकरूनि निःशब्द[5]। दाट न रिघे श्वापद[6]। शुंक[7] हन षट्पद[8]। तेउतें[9] नाहीं ॥ ७६ ॥ पाणिलगें[10] हंसें। दोनी चारी सारसें[11]। कवणे एके वेळे बैसे। कोकिळही होकां ॥ ७७ ॥ निरंतर नाहीं। तरि आलीं गेलीं कांहीं। होतुं[12] कां मयूरेंही। आह्मी ना न ह्मणों ॥ ७८ ॥ परि आवश्यक पांडवा। ऐसा ठाव जोडावा। तेथ निगूढ[13] मठ होआवा। कीं[14] शिवालय ॥ ७९॥ दोहीं-माजि आवडे तें। जें मानलें होय चित्तें। बहुतकरूनि एकांतें। बैसिजे गा ॥ १८० ॥ [स्थिरमासनमात्मनः] ह्मणोनि तैसें तें जाणावें। मनराहतें[15] पाहावें। राहेल तेथ रचावें[16]। आसन ऐसें ॥ ८१ ॥ [चैलाजिनकुशोत्तरं] वरि चोखटें[17] मृगसेवडी[18]। माजि धूतवस्त्राची[19] घडी। तळवटीं[20] अमोडी[21]। कुशांकुर[22][23] ॥ ८२ ॥ सकोमळ सरिसे। सुबद्ध राहती आपैसे। एकपाडें तैसे। वोजा[24] घालीं ॥ ८३ ॥ [नात्युच्छ्रितं नातिनीचं] परि सांवियाचि[25] उंच होइल। तरि आंग हन डोलेल। नीचें[26] तरी पावेल। भूमिदोष[27] ॥ ८४ ॥ ह्मणोनि तैसें न करावें। समभाव धरावें। हें बहु असो होआवें। आसन ऐसें ॥ ८५ ॥

तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेंद्रियक्रियः ।
उपविश्यासने युंज्याद्योगमात्मविशुद्धये ॥ १२ ॥

[तत्रैकाग्रं मनः कृत्वा] मग तेथ आपण। एकाग्र अंतःकरण। करूनि सद्गुरु-स्मरण। अनुभविजे ॥ ८६ ॥ [आत्मविशुद्धये] जेथ स्थिरतेनि[28] आदरें। सबाह्य सात्विकें भरे। जंव काठिण्य विरे। अहंभावाचें ॥ ८७ ॥ [यतचित्तेंद्रियक्रियः] विषयांचा विसर पडे। इंद्रियांची कैसमस[29] मोडे। मनाची घडी घडे। हृदयामाजी ॥ ८८ ॥ ऐसें ऐक्य हें सहजें। [युंज्यात्] फावे[30] तंव राहिजे। [उपविश्यासने] मग तेणेंचि बोधें बैसिजे। आसनावरी ॥ ८९ ॥ [योगं] आतां आंगातें आंग वरी। पवनातें पवन धरी। ऐसी अनुभवाची उजरी[31]। होंचि लागे ॥ १९० ॥ प्रवृत्ति मावळती[32] मोहरे। समाधि ऐलोंडी[33] उतरे। आघवें अभ्यासूं सरे। बैसतें[34] खेवो ॥ ९१ ॥ मुद्रेची[35] प्रौढी ऐशी। तेचि सांगिजेल आतां परि-

१ ऊन. २ थोडा. ३ वारा. ४ वाहतो. ५ शब्दरहित. ६ जनावरें. ७ राघु. ८ भ्रमर. ९ तेथें. १० पाण्याच्या आधारानें. ११ चक्रवाकपक्षी. १२ असोत. १३ गुप्त स्थान. १४ अथवा. १५ मन स्थिर होईल असें स्थळ. १६ घालावें. १७ सुंदर. १८ मृगचर्म, कृष्णाजिन. १९ मध्यें. २० धुतलेल्या वस्त्राची. २१ खालीं. २२ साग्र. २३ दर्भ. २४ रीति, चांगलें व्यवस्थित. २५ कदाचित्. २६ सखल. २७ गारठा, वाळवी इत्यादि. २८ स्मरणानें. २९ कासाविसी. ३० प्राप्त होई. ३१ उत्कर्ष, स्वच्छता. ३२ मागें फिरे. ३३ आलीकडे. ३४ वसल्याबरोबर. ३५ मुद्रा व आसन यांमध्यें भेद आहे. मांड्यांपासून खालच्या आंगाची अभ्यासाचे वेळेस जी स्थिति होते तें आसन. आणि बाहूंपासून वरच्या आंगाची जी ठेवण होते त्याचें नांव मुद्रा. आसनें ८४००० व त्यांत प्रमुख ८४ सांगितलीं आहेत. घेरंडसंहितेंत २५ व हठप्रदीपिकेंत. १० मुद्रा वर्णिल्या आहेत, तथापि आलीकडे आसन व मुद्रा हे दोनी शब्द एकार्थी झाले आहेत.

येसीं । तरि [1]ऊरु या [2]जंघनासी । जडोनि घालीं ॥ ९२ ॥ चरणतळें [3]देंहडीं । [4]आधारद्रुमाच्या बुडीं । [5]सुघटितें [6]गाढीं । संचरीं पां ॥ ९३ ॥ [7]सव्य तो तळीं [8]ठेविजे । तेणें [9]सिवणीमध्य पीडिजे । वरि बैसे तो सहजें । [10]वामचरण ॥९४॥ [11]गुदं [12]मेढ्रा[13]आंतौतीं । चारी [14]अंगुळें [15]निगुतीं । तेथ [16]सार्ध सार्ध प्रांतीं । सांडूनियां ॥९५॥ [17]माजि अंगुळ एक निगे । तेथ टांचेचेनि उत्तरभागें । नेहेटिजे वरि आंगें । [18]पेललेनी ॥ ९६ ॥ उचलिलें कां नेणिजे । तैसें *[19]पृष्ठांत उचलिजे । [20]गुल्फद्वय धरिजे । तेणेंचि मानें ॥ ९७ ॥ मग शरीर संचुं[21] पार्था । अशेषही सर्वथा । [22]पार्ष्णींचा माथा । [23]स्वयंभ होय ॥९८॥ अर्जुना हें जाण । मूळबंधाचें लक्षण । [24]वज्रासन गौण[25] । नाम यासी ॥ ९९ ॥ ऐसी [26]आंधारीं मुद्रा पडे । आणि [27]अर्धींचा मार्ग मोडे । तेथ [28]अपान [29]आंतुलेकडे । †[30]वोहोटां लागे ॥ २०० ॥

समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः ।
संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥ १३ ॥

[समं कायशिरो] तंव [31]करसंपुट आपैसें । वाम चरणीं बैसे । बाहुमूळीं दिसे । [32]थोरींव आली ॥ १ ॥ माजि [33]उभारिलेनि दंडें । शिरकमळ होय [34]गाढें । नेत्रद्वारींचीं [35]कवाडें । लागूं पाहती ॥ २ ॥ [संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं] [36]वरिचिलें पार्ती । ढळती । तळींचीं तळीं पुंजाळती । तेथ [37]अर्धोन्मीलित स्थिती । [38]उपजे तया ॥ ३ ॥ दिठी राहोनि आंतुलेकडे । बाहेर पाउल घाली कोडें । ते ठायीं ठावो पडे । [39]नासाग्रपीठीं ॥ ४ ॥ ऐसें आंतच्या आंतचि रचे । बाहेरि मागुतें [40]नें वचे । ह्मणोनि राहणें [41]आंधिये दिठीचें । तेथेंचि होय ॥५॥ [दिशश्चानवलोकयन्] आतां दिशांची भेटी घ्यावी । कां रूपाची ‡[42]वाट पहावी । हे [43]चाड सरे आघवी । आपसया ॥ ६ ॥ [ग्रीवं धारयन्नचलं स्थिरः] मग

* पृष्ठांतर. † चोहोटां. (चढां). ‡ वास.

१ मांडी. २ पोटरी. ३ एका पायावर भार ठेवून दुसरा वर वांकडा ठेवणें. ४ गुदस्थानाच्या. ५ सुस्थिर. ६ वळकट. ७ शिरकवावीं. ८ उजवी टांच. ९ कृपणावरून गुदस्थानापर्यंत असणारी शिवणरेषा. १० डावा पाय. ११ अपानद्वार. १२ शिश्नामधील. १३ केवळ, नुसती, युक्तीनें. १४ दीड दीड अंगुल. १५ मध्यें. १६ राहातें. १७ खोंटेच्या. १८ नेट करावा, दाबावें. १९ तोलून धरून. २० पाठीच्या कण्याचा शेवटला भाग. २१ घोटे. २२ समग्र. २३ खोंटेचा. २४ दुसऱ्या आधाराशिवाय स्वतःच आधारयुक्त. २५ वायु बांधला जातो म्हणून बंध म्हणावा. या प्रयोगांत अपानवायूला बळानें ऊर्ध्वगं करतात. २६ मुख्य नव्हे. २७ गुदापासून वर दोन अंगुल व मेढ्राचे खालीं दोन अंगुल व मध्यें चार अंगुल विस्तृत असें हें आधारपद्म अथवा चक्र अथवा मूलाधारचक्र पहिलें. २८ खालचा. २९ गुदद्वारा वाहणारा वायु. ३० आंतल्या बाजूस. ३१ संकोचों. ३२ द्रोणाकार हात. ३३ उंचपणा. ३४ दंड उभे राहिल्यानें. ३५ गाडलेल्यासारखें. ३६ पांपण्या. ३७ वरचीं. ३८ पसरती. ३९ अर्धी मिटलेली व अर्धी उघडलेली. ४० दृष्टि. ४१ कौतुकानें. ४२ नाकाच्या शेंड्यावर. ४३ जात नाहीं. ४४ अर्ध्या दृष्टीचें. ४५ इच्छा.

कंठनाळ आटे । हनुवटी हेडौती दाटे । ते गाढी होऊनि नेहटे । वक्षस्थळीं ॥ ७ ॥ माजि घंटिका लोपे । वरि बंध जो आरोपे । तो जालंधर म्हणिपे । पंडुकुमरा ॥ ८ ॥ नाभी वरी पोखे । उदर हें थोके । अंतरीं फोंके । हृदयकोश ॥ ९ ॥ स्वाधिष्ठानावरिचिले कांठीं । नाभिस्थानतळवटीं । बंध पडे किरीटी । *वोढियाणा तो ॥ २१० ॥ ऐसी शरीराबाहेरलीकडे । अभ्यासाचीं पांखर पडे ॥

प्रशांतात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः ।
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥

[प्रशांतात्मा] तंव आंत त्रांय मोडे । मनोधर्माची ॥ ११ ॥ कल्पना निमे । प्रवृत्ती शमे । आंग मन विरमे । सांवियाचि ॥ १२ ॥ क्षुधा काय जाहाली । निद्रा केउती गेली । हे आठवणही हारपली । न दिसे वेगां ॥ १३ ॥ जो मूळबंधें कोंडला । अपान मांधौता मुरडला । तो सवेंचि वरी सांकडला । धरी फुंगू ॥ १४ ॥ क्षोभलेपणें माजे । उवाइलाठायीं गाजे । मणिपूरेंसीं झुंजे । राहोनियां ॥ १५ ॥ [विगतभी:] मग थांवलिये वोहटुळी । सैंघ घेऊनि †घर डेहुळी । बोळपणींची कुही टुळी । बाहेर । धाली ॥ १६ ॥ भीतरीं वेळी न धरे । कोठ्यामाजी संचरे । कफपित्ताचे थारे । उरों नेदी ॥ १७ ॥ धातूचे समुद्र उलंडी । मेदाचे पर्वत फोडी । आंतली मजा काढी । अस्थिगत ॥१८॥ नाडीतें सोडवी । गात्रांतें विघडवी । साधकातें भेडसावी । परि बिहावें ना ॥ १९ ॥ व्याधीतें दावी । सवेंचि हारवी । आप पृथ्वी कालवी । एकवाट ॥ २२० ॥ [श्रीभगवता संक्षेपेणोक्तं योगं विशेषेण व्याचष्टे ब्रह्मचारिव्रते स्थितः] तंव येरीकडे धनुर्धरा । आसनाचा ‡उंबारा । शक्ति करी उंजगरा । कुंडलिनी तें ॥ २१ ॥ नागिणीचें पिलें । कुंकुमें नाहलें । वेळण घेऊनि आलें ।

* वोढियाण. † घर डुळी. ‡ उभारा.

१ गळ्याची नळी. २ गळ्याखालच्या खळगीला लागे. ३ दाबतें. ४ कंठमणी. ५ या नांवाचा कंठस्थानांतील बंध. ६ नाभीवर येते. ७ सपाट होतें. ८ हृदयाकाश, हृदयकमल. ९ हें द्वितीय पद्म अथवा चक्र लिंगमूलांत आहे. हें रक्तवर्ण साहा दलांचें आहे. १० सुषुम्नामार्गानें नाभीचे वरचे भागानें उजवीकडे वर वायु जातो तो बंध. ११ पसरलेली दशा. १२ रक्षण, ठिकाण. १३ खुंटे. १४ व्यापेलेपण. १५ सहज. १६ कोठें. १७ आधारबंधांत बद्ध झाला. १८ माघारा फिरला. १९ संकुचित झाला. २० फुगोटा. २१ तीव्रतेनें. २२ प्रशस्त स्थळीं. २३ नाभिस्थलांतील तृतीयचक्र हेमवर्ण दशदल आहे. २४ शांत झालेली. २५ वायधुळीनें. २६ सर्व. २७ घर धांडोळी, घराचा झाडा करी. २८ पूर्वीची. २९ कुचकी घाण, रोग. ३० वेढा. ३१ ठिकाणें. ३२ पालथे करी. ३३ हाडांतील. ३४ वायुमार्गास. ३५ अवयवांला. ३६ भीतियुक्त करिते. ३७ भिऊं नये. ३८ पाणी. ३९ दुसरीकडे. ४० स्थैर्यानें, उष्णतेनें. ४१ जागे. ४२ कुंडलिनीला. ४३ वेटाळें.

सेजे जैसें ॥ २२ ॥ तैसी ते कुंडलिनी । मोटकी औट वळणी । अधोमुख सर्पिणी । निदेली असे ॥ २३ ॥ विद्युल्लतेची विडी । वन्हिज्वाळांची घडी । पंधरेयाची चोखडी । घाटींव जैशी ॥ २४ ॥ तैसी सुबंध आटंली । पुटीं होती दाटलीं । ते वज्रासनें चिमुटली । सावध होय ॥ २५ ॥ तेथ नक्षत्र जैसें उलंडलें । कीं सूर्याचें आसन मोडलें । तेजाचें बीज विरूढलें । अंकुरेंशीं ॥२६॥ तैसी वेढियातें सोडिती । कवतिकें आंग मोडिती । कंदावरी शक्ती । उठिली दिसे ॥ २७ ॥ सहजें बहुतां दिवसांची भूक । वरि चेवविली तें होय मिष । मग आवेशें पसरी मुख । ऊर्ध्व उजू ॥ २८ ॥ तेथ हृदयकोशींतळवटीं । जो पवन भरे किरीटी । तया संगेळेयाची मिठी । देऊनि घाली ॥ २९ ॥ मुखींच्या ज्वाळीं । तेळीं वरी कवळी । मांसाची वेडवाळी । आरोगूं लागे ॥ २३० ॥ जे जे ठाय सेमांस । तेथ अहाच जोडे घांस । पाठी एकदोनी घांस । हियेंही भरी ॥ ३१ ॥ मग तळवे तळहात शोधी । ऊर्ध्वींचें खंडे भेदी । झाडा घे संधी । प्रत्यंगाचा ॥ ३२ ॥ *अधोभाग तरी न सांडी । परि नखींचेंही सत्व काढी । त्वचा †धुवूनि जडी । पांजरेंशीं ॥३३॥ अस्थीचे नळे निरपे । शिरांचे हीरे वोरपे । तंव बाहेरी विरूढी करपे । रोमबीजाची ॥३४॥ मग सप्तधातूंच्या सागरीं । ताहानेली घोट भरी । आणि सवेंचि उन्हाळा करी । खडखडीत ॥३५॥ नासापुटौनि वारा । जो जातसे अंगुळें बारा । तो गचिये धरूनि माघारा । आंत घाली ॥ ३६ ॥ तेथ अधवरौतें आकुंचे । ऊर्ध्वतळौतें खाचे । तया खेवामाजि चक्राचे । पैदर उरती ॥ ३७ ॥ येऱ्हवीं तरी दोन्ही तेव्हांचि मिळती । परी कुंडलिनी नावेक दुचित्ती होती । ते तयातें ह्मणे परौती । तुह्मीचि केलें एथें ॥ ३८ ॥ आइकें पार्थिव धातु आघवी । आरोगितां कांहीं नुरवी । आणि आपातें तंव ठेवी । पुसोनियां ॥ ३९ ॥ ऐसीं दोन्नीं भूतें खाये । ते वेळीं संपूर्ण धाये । मग सौम्य होऊनि राहे ।

* आधार. † धूनि.

१ निजेला. २ लहान. ३ साडेतीन वळणी. ४ निजलेली. ५ कंकणासारखें वर्तुळ. ६ सोन्याची. ७ घोटून चकचकीत केलेली. ८ उत्तम बंधयुक्त. ९ पातळ केली. १० पुट दिल्यानें. ११ पेंचांत सांपडली. १२ उगवलें. १३ कौतुकानें. १४ नाभीवर. १५ वेल. १६ जागी केली. १७ वरती नीट. १८ हृदयकमळाखालीं. १९ सर्वांलाच. २० ज्वाळांनीं. २१ खालीं वर. २२ घास. २३ खाऊं लागे. २४ मांसयुक्त. २५ सहज. २६ ग्रास. २७ हृदयांत. २८ भाग. २९ दरएक अवयवाचा. ३० हाडांच्या सांपळ्यास. ३१ साफ करी. ३२ जाळी. ३३ वाढ, वृद्धि. ३४ केंसांच्या मुळांची. ३५ रस, असृक्, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र हे शरीरांतील सात धातु. ३६ नाकपुड्यांतून. ३७ गच्च मानेस धरून. ३८ खालचें वर ओढतें. ३९ वरचें खालीं खचतें. ४० आलिंगनामध्यें. ४१ पडदे. ४२ इडा व पिंगला. ४३ क्षणभर. ४४ व्यग्र, कोपायमान होती. ४५ पृथ्वीसंबंधीं. ४६ भक्षितां. ४७ उदकाला. ४८ पृथ्वी व आप. ४९ तृप्त होय.

सुषुम्नेपाशीं ॥२४०॥ तेथ तृप्तीचेनि संतोषें । गरळ *जें वमी मुखें । तेणें तियेचेनि पीयूषें । प्राण जिये ॥ ४१ ॥ तो अग्नि आंतूनि निघे । परि सबाह्य निववूंचि लागे । ते वेळीं कंसु बांधिती आंगें । †सांडिली पुढती ॥४२॥ मार्ग मोडती नाडीचे । नवविधपण वायूचें । जाय ह्मणऊनि शरीराचे । धर्म नाहीं ॥ ४३ ॥ इडा पिंगळा एकवटती । गांठी ‡तिन्ही सुटती । सांही पदर फुटती । चक्रांचे हे ॥ ४४ ॥ मग शशी आणि भानु । ऐसा कल्पिजे जो अनुमानु । तो वातीवरी पवनु । गिंवसितां न दिसे ॥ ४५ ॥ बुद्धीची § फुलिका विरे । परिमळ घ्राणीं उरे । तोही शक्तीसवें संचरे । मध्यमेमाजी ॥ ४६ ॥ तंव वरिलेकडोनि डोळे । चंद्रामृतांचें तळें । कोनवडोनि मिळे । शक्तिमुखीं ॥ ४७ ॥ ¶तेणें नाळकें रस भरे । तो सर्वांगामाजि संचरे । जेथिंचा तेथ मुरे । प्राणपवनें ॥ ४८ ॥ तांतलिये मुसें । मेण निघोनि जाय जैसें । मग कोंदली राहे रसें । वोतलेनी ॥ ४९ ॥ तैसें पिंडाचेनि आकारें । ते कळाचि कां अवतरे । वरि त्वचेचेनि पदरें । पांधुरली असे ॥ २५० ॥ जैसी आभाळाची बुंथी । करूनि राहे गभस्ती । मग फिटलिया दीप्ती । धरून्ये ॥ ५१ ॥ तैसा आहाचवरि कोरडा । त्वचेचा असे पातोडा । तो झडोनि जाय कोंडा । जैसा होय ॥ ५२ ॥ मग काश्मीरीचें स्वयंभ । कां रत्नबीजा निघाले कोंभ । अवयवकांतीची भांब । तैसी दिसे ॥ ५३ ॥ ना तरी संध्यारागिंचे रंग । काढूनि वळिलें तें आंग । कीं अंतरज्योतिचें लिंग । निवाळिलें ॥ ५४ ॥ कुंकुमाचें भरींव । सिद्ध रसाचें वोतिंव । मज पाहतां सांवेव । शांतीचि

---

* जेवीं वमिजे. † सांडिला. ‡ तरी सुटती. § पुलिका. ¶ तणें वंकनाळ सुभरें.

१ देहामध्यें सार्धलक्षत्रय ज्या नाड्या आहेत त्यांमध्यें १४ मुख्य. त्या १४ मध्यें इडा, पिंगला आणि सुषुम्ना मुख्य. आणि त्या तिहींमध्येंही सुषुम्ना मुख्य असून परमपदाची दात्री आहे. दुसऱ्या सर्व तिच्या आश्रयानें शरीरांत राहातात. इचीं सहा स्थानें व सहा शक्ति आहेत. आणि ही इडा व पिंगला यांच्या मध्यें आहे. २ विषाची वांती करी. ३ अमृतानें. ४ वांचे. ५ विषरूप. ६ सामर्थ्य. ७ पूर्वी सांडलेला. ८ अहंकारसंयुक्त वासनालंकृत प्राण याचे वृत्तिभेदानें अनेक प्रकार शरीरांत आहेत. तथापि त्याचे दहा नामभेद आहेत, त्यांत प्राण हा सोडून बाकी नऊ—अपान, समान, उदान, व्यान, नाग, कूर्म, कृकर, देवदत्त आणि धनंजय. ९ डाव्या नाकपुडींतील नाडी. १० उजव्या नाकपुडींतील नाडी. ११ साहा. १२ चंद्र. १३ सूर्य. १४ शोधितां. १५ विकास. १६ सुगंध. १७ सुषुम्नेंत. १८ हलूच. १९ सत्रावीचें. २० एका अंगानें. २१ कुंडलिनीमध्यें. २२ त्या बाजूच्या नळीनें. २३ तो रस प्राणवायूनें जेथचा तेथेंच मुरतो. २४ तापलेले मुशींतून. २५ गच भरलेली. २६ शरीराच्या. २७ कांती. २८ पडद्यानें. २९ अभ्रांचा बुरखा. ३० आभाळ गेल्यावर. ३१ उगाच. ३२ पापोद्रा. ३३ स्फटिकाचें. ३४ शोभा. ३५ संध्याकाळच्या आकाशरंगाचे. ३६ आंतल्या प्रकाशाचें. ३७ स्वच्छ केलें. ३८ मला वाटतें. ३९ मूर्तिमंत.

ते ॥ ५५ ॥ तें आनंदचिन्मींचें लेपण[1]। ना तरी महासुखाचें रूप। कीं संतोषतरूचें रोप[2]। थांवलें जैसें ॥ ५६ ॥ तो कैनकचंपकाचा[3] कळा। कीं अमृताचा पुंतळा[4]। नाना सौसिनला[5] मळा। कोंवळिकेचा[6] ॥ ५७ ॥ हो कां जे शारदियेचेनि वोलें। चंद्रबिंब *पाल्हेलें। कां तेजचि मूर्त[7] बैसलें। आसनावरी ॥ ५८ ॥ तैसें शरीर होये। जे वेळीं कुंडलिनी चंद्रे[8] पिये। मग देहाकृति बिहे[9]। कृतांत[10] गा ॥ ५९ ॥ वार्धक्य तरी बहुडे[11]। तारुण्याची गांठी विघडे। लोपली उघडे। बाळदशा ॥ २६० ॥ वयसा[12] तरी येतुलेवरी[13]। येन्हवीं बाळाचा बळार्थ[14] करी। धैर्याची थोरी। निरुपम ॥ ६१ ॥ कैनकद्रुमाच्या[15] पालवीं। रत्नकळिका नित्य नवी। नखें तैसीं बरवीं। नवीं निघती ॥ ६२ ॥ दांतही[16] आनें[17] होती। परि अपाडें[18] सोनेजती। जैसीं दुबाँहीं[19] बैसे पांती[20]। हिरेयांची ॥ ६३ ॥ मोणिकुलियांचिया[21] कणिया। सांवियाचि[22] अणुप्रमाणिया। तैसिया सर्वांगीं उधवती[23] ओणिया। रोमांचिया ॥६४॥ करचरणतळें। जैसी कां रातोत्पलें[24]। पाखाळींव[25] होती डोळे। काय सांगों ॥ ६५ ॥ निडारांचेनि[26] कोंदाटें। मोतियें नावरती संपुटें[27]। मग शिंवणी[28] जैसी उंटटे[29]। शुक्तिपल्लवांची ॥ ६६ ॥ तैसी पांतियांचिये[30] कवळिये[31] नसमाये[32]। दिठी जोंकळोनि[33] निघों पाहे। आधिलीचि[34] परी होये। गगना †कवळिती ॥ ६७ ॥ आइकें देह होय सोनियांचें। परि लाघव[35] ‡यें वायूचें। जे आप आणि पृथ्वीचे। अंश नाहीं ॥ ६८ ॥ मग समुद्रापैलिकडील देखे। स्वर्गींचा आलोच[36] आइके। मनोगत ओळखे। मुंगियेचें ॥ ६९ ॥ पवनाचा वारिकां[37] वळघे। चाले तरी उदकीं पाउल न लागे। येणें येणें प्रसंगें। येती बहुता सिद्धि ॥ २७० ॥ आइकें प्राणाचा हात धरूनी। गगनाची पांउठी[38] करुनी। मध्यमेचेनि दांदराहुनी[39]। हृदया आली ॥ ७१ ॥ ते कुंडलिनी जगदंबा। जे चैतन्यचक्रवर्तीची[40] शोभा। जया विश्वबीजाचिया कोंभा[41]। साउली केली ॥ ७२ ॥ जे शून्यलिंगाची पिंडी[42]। जे परमात्मयाशिवाची करंडी[43]। जे प्रणवाची[44] उघडी। जन्मभूमी ॥७३॥ हें असो ते कुंडलिनीबाळी।

---

* पाहेलें. † कळिती. ‡ इये वायूचें.

---

१ रंग. २ स्थिर झालें. ३ सोनचांफ्याचा. ४ मूर्ति. ५ भरास आला. ६ नाजूकपणाचा. ७ शरद्ऋतूच्या. ८ शोभतें, पसरलें. ९ अमृत. १० भय पावतो. ११ यम. १२ मागें फिरे. १३ वय. १४ येथवर. १५ बळशब्दाचा अर्थ. १६ सुवर्णवृक्षाच्या. १७ दुसरे. १८ अपूर्व. १९ लहान होतात. २० दोन्ही बाजूंनीं. २१ पंक्ति. २२ माणिकांच्या. २३ सहज. २४ उद्भवती. २५ अग्रें. २६ लाल कमलें. २७ स्वच्छ. २८ निवडल्यासमान्यें. २९ शिंपल्यांचा जोड. ३० सांधा. ३१ सुटे. ३२ पांपण्यांचें. ३३ मिटणें. ३४ दृष्टी. ३५ व्यापून. ३६ स्वाधीन. ३७ लघुत्व. ३८ नाद, मंदभाषण, मसलत. ३९ घोड्यावर. ४० वेंधे, चढे. ४१ पायरी. ४२ सुषुम्नेचे. ४३ जिन्यावरून. ४४ जीवात्म्याची. ४५ जगद्बीज, ओंकार. ४६ बैठक. ४७ सांवळी, संपुष्ट. ४८ ओंकाराची.

हृदयाआंत आली । तंव *[1]अनाहताची बोली । [2]चावळे ते ॥ ७४ ॥ शक्तीचिया आंगा लागलें । बुद्धीचें चैतन्य होतें जाहालें । तें तेणें आइकिलें । [3]अळुमाळ ॥ ७५ ॥ †[4]घोषाचा कुंडीं । [5]नादचित्रांचीं रुपडीं । [6]प्रणवाचिया [7]मोडी । रेखिलीं ऐसीं ॥ ७६ ॥ हेंचि कल्पावें तरी जाणिजे । परि कल्पितें कैचें आणिजे । तरि नेणो काय गाजे । तियेठायीं ॥ ७७ ॥ विसरोनि गेलों अर्जुना । जंव नाश नाहीं [8]पवना । तंव वाचा [9]आथी गगना । ह्मणऊनि [10]धुमे ॥ ७८ ॥ तया अनाहताचेनि मेघें । आकाश दुमदुमों लागे । तंव ब्रह्मस्थानीचें [11]बेगें । सहज फिटे ॥ ७९ ॥ आइकें कमलगर्भाकारें । जें महदाकाश दुसरें । जेथ चैतन्यें ‡[12]अर्धातुरें । होऊनि असिजे ॥ २८० ॥ तया हृदयाच्या परिवरीं । कुंडलिनिया परमेश्वरी । तेजाची [13]शिदोरी । [14]विनियोगिली ॥ ८१ ॥ बुद्धीचेनि शाकें । [15]हेंतबोनें निकें । द्वैत तेथ न देखे । तैसें केलें ॥ ८२ ॥ निजकांती हारविली । मग प्राणचि केवळ जाहाली । ते वेळीं कैसी गमली । ह्मणावी पां ॥ ८३ ॥ होकां जे पवनाची पुतळी । पांधुरली होती सोनेसळी । ते फेडूनियां वेगळी । ठेविली तिया ॥ ८४ ॥ नातरी वायूचेनि आंगें [16]झगटली । दीपाची दृष्टी नि-[17]मटली । कां लखलखोनि हारपली । वीज गगनीं ॥ ८५ ॥ तैसी हृदयकमळें [18]वेन्हीं । दिसे जैसी सोनियाची सरी । ना तरी प्रकाशजळाची [19]झरी । वाहत आली ॥ ८६ ॥ मग ते हृदयभूमी [20]प्रोकेळे । जिराली कां एके वेळे । तैसें शक्तीचें रूप [21]मावळे । शक्तीचिमाजी ॥ ८७ ॥ तेव्हां तरी शक्तीचि ह्मणिजे । येव्हवीं तो प्राण केवळ जाणिजे । आतां [22]नादबिंदु नेणिजे । कळाज्योती ॥ ८८ ॥ मनाचा हन मार । कां पवनाचा §आधार । ध्यानाचा आदर । ¶नाहीं परी ॥ ८९ ॥ हे कल्पना घे सांडी । ते नाहीं इये [23]परवडी । हे महाभूतांची [24]फुडी । [25]आटणी देखा ॥ २९० ॥ पिंडें पिंडाचा ग्रास । तो हा [26]नाथसंकेतींचा [27]दंश । परि दाऊनि गेला [28]उद्देश । श्रीमहाविष्णु ॥ ९१ ॥ तया ध्वनिताचें केणें सोडुनी । यथार्थाची घडी झाडुनी । [29]उपलविली म्यां जाणुनी । [30]ग्राहीक श्रोते ॥ ९२ ॥

---

*अनुहाताची, अनाहाताच्या बोली. † नादाच्या. ‡ अर्धातुरें. § पवनाचा धर. ¶ नाहीं जेथ.

---

१ या नांवाच्या हृदयस्थचक्राची. २ बोलूं लागे. ३ किंचित्. ४ योगधारणेनें दहा नादांचा ध्वनि ऐकूं येतो त्याच्या, घोषाकार परा नांवाची पहिली वाचा आधारचक्रीं आहे. ५ मध्यमा. ६ ओंकाराच्या. ७ आकारानें. ८ कल्पना करणारें. ९ गर्जे. १० वायूला. ११ आहे. १२ शब्द करी. १३ खिडकी, खिळी. १४ अतृप्त, अधांतरीं. १५ गुप्तस्थानीं, घरीं. १६ न्याहारी. १७ व्यवस्था केली. १८ नैवेद्य. १९ पीतांबर. २० लागली. २१ झांकली. २२ हृदयकमलापर्यंत. २३ झरा. २४ पोकळीमध्यें. २५ लय पावे. २६ मध्यमा वाचा, सिद्धांत. २७ प्राप्तीपर्यंत. २८ स्पष्ट. २९ निर्मळदशा. ३० शिव. ३१ गूढाभिप्राय. ३२ हेतु. ३३ विकला असतां पैसा होण्याजोगा माल. ३४ विस्तारिली. ३५ गिऱ्हाईक.

युंजन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः ।
शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥ १५ ॥

[युंजन्नेवं सदात्मानं] ऐकें शक्तीचें तेज जेव्हां लोपे । तेथ देहाचें *रूप हारपे । मग तो डोळ्यामाजि लपे । जगाचिया ॥ ९३ ॥ येव्हवीं[1] आधिलाचि ऐसें । सावयव[2] तरी दिसे । परि वायूचें जैसें । वळिलें होय ॥ ९४ ॥ नातरी कैंदळीचा[3] गाभा । बुंथी[4] सांडोनि उभा । कां अवयवचि नेभा[5] । उदयला तो ॥ ९५ ॥ तैसें होय शरीर । तैं तें ह्मणिजे खेचर[6] । हें पद होतां चमत्कार । पिंडजेनीं[7] ॥ ९६ ॥ देखें साधक निघोनि जाये । मागां पाउलांची वोळ राहे । तेथ ठायीं ठायीं होये । अणिमादिक[8] ॥ ९७ ॥ परि तेणें काय काज आपणपयां[9] । अवधारीं ऐसा धनंजया । लोप आथी[10] भूतत्रया[11] । देहींच्या देहीं ॥ ९८ ॥ पृथ्वीतें[12] आप विरवी । आपातें तेजें[13] जिरवी । तेजातें पवन[14] हरवी । हृदयामाजी ॥ ९९ ॥ पाठीं आपण एकला उरे । परि शरीराचेनि[15] अनुकारें[16] । [योगी नियतमानसः] मग तोही[17] निगे अंतरें । गगना[18] मिळे ॥ ३०० ॥ ते वेळीं कुंडलिनी हे भाष जाये । मग मारुत[19] ऐसें नाम होये । परि शक्तीपण तें आहे । जंव न मिळे शिवीं[20] ॥ १ ॥ मग जालंधर[21] सांडी । कैकारांत[22] फोडी । गगनाचिये पाडीं[23] । पैठी होय ॥ २ ॥ ते ओंकाराचिये पाठी । पाय देत उठाउठी । पैठयंतीचिये[24] पोउठी[25] । मागां घाली ॥ ३ ॥ पुढें तन्मात्रा[26] अर्धवरी । आकाशाच्या अंतरीं । भरती गमे सागरीं । सरितां[27] जेवीं ॥ ४ ॥ [मत्संस्थामधिगच्छति] मग ब्रह्मरंध्रीं[28] स्थिरावोनी । सोहंभावाच्या[29] बाह्या पसरुनी । परमात्मलिंगा[30] धावोनी । आंगा घडे ॥ ५ ॥ तंव महाभूतांची † जवनिक[31] फिटे । मग दोहींसि होय भेटें[32] । तेथ गगनासकट आटे । समरसीं[33] तिये ॥ ६ ॥ पैं मेघाचेनि मुखीं निवडला[34] । समुद्र कां वोघीं पडिला । तो मागुता जैसा आला । आपणपयां ॥ ७ ॥ तेवीं पिंडांचेनि[35] मिषें । पदीं[36] पद प्रवेशे । तें एकत्व होय तैसें । पंडुकुमरा ॥ ८ ॥ [शांतिं निर्वाणपरमां] आतां दुजें हन होतें । कीं एकचि हें आइतें । ऐशिये विवंचने-

* तेज. † जवनिका.

१ आधींच्यासारखेंच. २ साकार. ३ केळीचा. ४ बाहेरील सोपटें. ५ आकाशास. ६ आकाशसंचारी. ७ शरीरावयवांत. ८ योगधारणादि करणारा. ९ 'अणिमा महिमा चैव लघिमा गरिमा तथा । प्राप्तिः प्राकाम्यमीशित्वं वशित्वं चाष्टसिद्धयः ॥' १० आपल्याला. ११ आहे. १२ पृथ्वी, आप, तेज. १३ उदक. १४ अग्नि. १५ वायु. १६ आकारें. १७ निघोन. १८ आकाशाला. १९ ब्रह्मांत. २० कंठनाडी आकुंचन करून हनुवटी वक्षस्थलावर दाबली असतां जालंधरबंध होतो. 'कंठमाकुंच्य हृदये स्थापयेच्चिबुकं दृढम् । बंधो जालंधराख्योऽयम्. २१ सुषुम्नानाडी. २२ बरावर. २३ प्रविष्ट. २४ परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाचांतील दुसरीच्या. २५ पायरी. २६ सूक्ष्मभूतें. २७ नदी. २८ मस्तकाच्या पोकळींत. २९ परमात्माच मी. ३० परब्रह्माचें चिन्ह. ३१ पडदा. ३२ ऐक्य. ३३ ब्रह्मानंदीं. ३४ रिघला. ३५ कुंडलिनीच्या निमित्तानें. ३६ ब्रह्मपदीं.

पुरतें । उरेचिना ॥ ९ ॥ गगनीं गगन लया जाये । ऐसें जें कांहीं आहे । तें अनुभवें जो होय । तो होऊनि ठाके ॥ ३१० ॥ ह्मणोनि तेथिंची मात । न चढेचि बोलाचा हात । जेणें संवादाचिया गांवाआंत । पैठी कीजे ॥ ११ ॥ अर्जुना येऱ्हवीं तरी । इया अभिप्रायाचा जे गर्व धरी । ते पाहें पां वैखरी । दुरी ठेली॥१२॥भ्रूलता मागलीकडे । तेथ मकाराचेंचि आंग न मांडे । सडेयां प्राणा सांकडें।गगना येतां॥१३॥पाठीं तेथेंचि तो भेसळला । तैं शब्दाचा देवो मावळला । मग तयाही वरी आटु भंविन्नला । आकाशाचा ॥ १४ ॥ आतां महाशून्याचिया डोहीं । जेथ *गगनासीचि थावो नाहीं । तेथ तांगा लागेल काई । बोलाचा इया॥१५॥ह्मणूनि †ओंकारामाजि सांपडे । कीं कानावरी जोडे। हें तैसें नव्हे फुडें । त्रिशुद्धी गा ॥ १६ ॥ जें ‡कांहीं दैवें । अनुभविलें फावे । तैं आपणचि हें ठाकावें । होऊनियां ॥ १७ ॥ पुढती जाणणें तें नाहींचि । ह्मणोनि असो किती हेंचि । बोलावें आतां वायांचि । धनुर्धरा ॥ १८ ॥ ऐसें शब्दजात मावोतें सरे । तेथ संकल्पाचें आयुष्य पुरे । वाराही जेथ न शिरे । विचाराचा ॥ १९ ॥ जें उन्मनियेचें लोवण्य । जें तुर्येचें तारुण्य । अनादि जें अगण्य । परमतत्त्व ॥ ३२० ॥ जें विश्वाचें मूळ । जें योगद्रुमाचें फळ । जें आनंदाचें केवळ । चैतन्य गा ॥ २१ ॥ जें आकाराचा प्रांत । जो मोक्षाचा एकांत । जेथ आदि आणि अंत । विरोनि गेले ॥ २२ ॥ जें महाभूतांचें बीज । जें महातेजाचें तेज । एवं पार्था जें निज । स्वरूप माझें ॥ २३ ॥ ते हे चतुर्भुज कोंभेली । जयाची शोभा रूपासि आली । देखोनि नास्तिकीं नोकिलीं । भक्तवृंदें॥२४॥तें अनिर्वाच्य महासुख । पैं आपणचि जाहले §जे पुरुष । जयांचे कां निकर्ष । प्राप्तिवेरी ॥ २५ ॥ आह्मी साधन हें जें सांगितलें । तेंचि शरीरा जिहीं केलें । ते आमुचेनि पाडें आले । निर्वाळलेया ॥ २६ ॥ परब्रह्माचेनि रसें । देहाकृतीचियेनि मुसें । वोतींव जाहाले तैसे । दिसती आंगें ॥ २७ ॥ जरि हे प्रतीति हन अंतरीं फांके । तरी विश्वचि हें अवघें झांके ।

---

* गगनासि ठावो. † अक्षरामाजि. ‡ कहीं. § ते पुरुष.

---

१ सिद्ध होतो. २ चवथी वाचा. ३ भ्रुकुटीच्या, ब्रह्मरंध्राच्या. ४ ओंकारांतील तिसरी मात्रा, तुर्यावस्था. ५ एकट्याला. ६ संकट. ७ मिसळला. ८ दिवस. ९ आटणी, शरीरसंकोच. १० झाला. ११ शून्याधिष्ठान ब्रह्माच्या. १२ ठिकाण. १३ थांग. १४ अक्षरांत. १५ त्रिवार सत्य. १६ प्राप्त होतें. १७ राहावें. १८ नंतर. १९ सर्व बोलणें. २० मागें. २१ जींत मनाचा लय होतो ती पांचवी अवस्था, तिचें = सहजस्थितीचें. २२ सौंदर्य. २३ चवथी समाधिअवस्था. २४ ज्याला आदि नाहीं असें. २५ संख्येला अशक्य. २६ ब्रह्मस्वरूप. २७ योगरूप वृक्षाचें. २८ जीव. २९ शेवट. ३० लय पावले. ३१ मूळकारण. ३२ एतावता. ३३ कोमल उत्पन्न झाली. ३४ जेव्हां भक्तवृंदें नास्तिकांनीं नोकिलीं, छळलीं तेव्हां ही चतुर्भुज मूर्ति मीं धारण केली. ३५ बोलण्यास अशक्य. ३६ शेवट. ३७ प्राप्तीपर्यंत. ३८ बरोबरीनें. ३९ निर्मळपणास. ४० अनुभव.

तंव अर्जुन ह्मणे निकें । [१]साचचि जी हें ॥ २८ ॥ कां जे आपण आतां देव । हा बोलिले जो उपाव । तो प्राप्तीचा ठाव । ह्मणोनि घडे ॥ २९ ॥ इये अभ्यासीं जे दृढ होती । ते भरंवसेनि ब्रह्मत्वा येती । हें [२]सांगतियाचि रीती । कळलें मज ॥ ३३० ॥ देवा [३]गोठीचि हे ऐकतां । बोध उपजतसे चित्ता । मौ अनुभवें [४]तल्लीनता । नोहेलें [५]केविं ॥ ३१ ॥ ह्मणऊनि एथ कांहीं । अैनारिसें नाहीं । परि नावभरी चित्त देईं । बोला एका ॥ ३२ ॥ आतां कृष्णा तुवां सांगीतला योग । तो मना तरी आला [६]चांग । परि न शकें करूं [७]पांग । योग्यतेचा ॥ ३३ ॥ सहजें [८]आंगिक जेतुलें आहे । तेतुलियाचि जरि सिद्धि जाये । तरि हाचि मार्ग सुखोपायें । अभ्यासीन ॥ ३४ ॥ ना तरी देव जैसें सांगतील । तैसें आपणपें जरी न [९]ठकेल । तरी योग्यतेवीण होईल । तेंचि [१०]पुसों ॥ ३५ ॥ जीवींचिये ऐसी [११]धारण । ह्मणोनि पुसावया जाहालें कारण । मग ह्मणे तरी आपण । चित्त [१२]देईजो ॥ ३६ ॥ हां होजी अवधारिलें । जें हें साधन तुह्मी निरूपिलें । तें [१३]अैवडतयाहि अभ्यासिलें । [१४]फावों शके ॥ ३७ ॥ कीं योग्यतेवीण नाहीं । ऐसें हन आहे कांहीं । तेथ श्रीकृष्ण ह्मणती काई । धनुर्धरा ॥ ३८ ॥ हें [१५]कांज कीर [१६]निर्वाण । परि आणिकही जें कांहीं साधारण । [१७]तेंही अधिकाराचे वोडवेविण । काय सिद्धी जाय ॥ ३९ ॥ पैं [१८]योग्यता जे ह्मणिजे । *ते प्राप्तीचि अधीन जाणिजे । कां जे योग्य होऊनि कीजे । तें आरंभिलें फळे ॥ ३४० ॥ तरी तैसी एथ कांहीं । सावियेचि [१९]केणी नाहीं । आणि योग्यतेची काई । खाणी असे ॥ ४१ ॥ नावेक विरक्त । जाहला [२०]देहधर्मीं नियेत । तरि तोचि नव्हे व्यवस्थित । अधिकारिया ॥ ४२ ॥ [२१]येतुलालिये [२२]अैयणीमाजि [२३]जेवडें । योग्यपण तुतेंही जोडे । ऐसें प्रसंगें [२४]सांकडें । फेडिलें तयाचें ॥ ४३ ॥ मग ह्मणे पार्था । ते हे ऐसी व्यवस्था । [२५]अैनियतासि सर्वथा । योग्यता नाहीं ॥ ४४ ॥

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकांतमनश्नतः ।
न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥ १६ ॥

[नात्यश्नतस्तु योगोऽस्ति] जो [२६]रसेंनेंद्रियाचा [२७]अंकिलो । [न चातिस्वप्नशीलस्य]

* तें प्राप्तीचें आधीं न जाणिजे । कां जें.

१ सत्यच. २ सांगितल्याप्रमाणें. ३ गोष्ट. ४ तर मग. ५ तद्रूपपणा. ६ कशी होणार नाहीं. ७ वेगळें. ८ क्षणभर. ९ चांगला. १० दीनपणा, दुर्लभत्व. ११ स्वताचें साह्य. १२ जेवढें. १३ तेवड्याची. १४ प्राप्त न होईल. १५ विचारूं. १६ धारणा, इच्छा. १७ द्यावें. १८ भलत्यालाही. १९ प्राप्त होईल काय? २० कार्य. २१ निश्चयें. २२ मोक्षाचें. २३ योग्यतेवांचून. २४ जिला योग्यता म्हणतात ती प्राप्तीचे पूर्वी समजत नाहीं, कारण योग्यपणानेंच केलेलें कळतें, तर योग्यता प्राप्तीनंतर समजते. २५ तत्काळ मिळणारा. २६ पदार्थ. २७ विहित धर्मांत. २८ नेमाचा. २९ एवढाले. ३० इच्छेंत, युक्तींत. ३१ संशय. ३२ अव्यवस्थिताला. ३३ जिव्हेचा. ३४ अंकित झाला.

कां निद्रेसि जीवें[1] विकला । तो नाहीं एथ ह्मणितला । अधिकारिया ॥ ४५ ॥ [न चैकांतमनश्नतः] अथवा आग्रहाचिये बांदोडी[3] । क्षुधा तृषा कोंडी । आहारातें तोडी । मारूनियां ॥ ४६ ॥ [जाग्रतो नैव चार्जुन] निद्रेचिया वाटा नवचे । ऐसा दृढिवेचेनि[4] अवतरणें नाचे । तें शरीरचि नव्हें तयाचें । मग योग कवणाचा ॥ ४७ ॥ ह्मणोनि अतिशयें विषय सेवावा । *ऐसा बोध नोहावा[5] । कां सर्वथा निरोधावा[6] । हेंही नको ॥ ४८ ॥

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु[7] ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ १७ ॥

[युक्ताहारविहारस्य] आहार तरी सेविजे । परि युक्तीचेनि मापें[8] मविजे । [युक्तचेष्टस्य कर्मसु] क्रियाजात आचरिजे । तयाचि स्थिती ॥ ४९ ॥ †मोपितला बोल बोलिजे । मितलिया[9] पाउलीं चालिजे । [युक्तस्वप्नावबोधस्य] निद्रेही मान दीजे । अवसरें एकें ॥ ३५० ॥ जागणें जरी जाहालें । तरी व्हावें तें मितलें । येतुलेनि धातुसाम्य[11] संचलें । असेल सुख ॥ ५१ ॥ [योगो भवति दुःखहा] ऐसें युक्तीचेनि हातें । जैं इंद्रियां[12] वोपिजे[13] भातें । तैं संतोषासी[14] वाढतें[15] । मनाचि करी ॥ ५२ ॥

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते[16] ।
निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥ १८ ॥

[यदा विनियतं चित्तं] बाहेर युक्तीची मुद्रा[17] पडे । तंव आंत आंत सुख वाढे । तेथें सहजोंचे योग घडे । नाभ्यासितां ॥ ५३ ॥ [निःस्पृहः सर्वकामेभ्यो] जैसें भाग्याचिये भेंडसें[18] । उद्यमाचेनि[19] मिषें । मग संमृद्धिजात[20] आपैसें । घर रिघे ॥ ५४ ॥ [आत्मन्येवावतिष्ठते] तैसा युक्तिमंत कौतुकें । अभ्यासाचिया मोहरा[21] ठाके । आणि आत्मसिद्धीचि पिके । अनुभव तयाचा ॥ ५५ ॥ [युक्त इत्युच्यते तदा] ह्मणोनि युक्ति हे पांडवा । घडे जया सदैवा[22] । तो अपवर्गींचिये राणिवा[23] । अळंकरिजे[24] ॥ ५६ ॥

यथा दीपो निवातस्थो नेंगते सोपमा स्मृता ।
योगिनो यतचित्तस्य युंजतो योगमात्मनः ॥ १९ ॥

[योगिन इति] युक्ति योगाचें आंग पावे । ऐसें प्रयाग जेथ होय बरवें । तेथ

---

* अथवा विरोधही व्हावा. † मितला.

१ सर्वथैव. २ बंधन. ३ दृढतेच्या. ४ आसनानें. ५ न व्हावा. ६ बंद करावा. ७ मोजावा. ८ सर्व कर्मे. ९ मोजका. १० परिमित. ११ शरीरगत रक्तादि सात धातूंचें साम्य. १२ देणें. १३ पोटगी. १४ वृद्धि. १५ चर्या, दर्शन. १६ पूरानें. १७ उद्योगाच्या निमित्तानें. १८ सर्व संपति. १९ आपोआप. २० अभिमुख, समोर. २१ दैववानाला. २२ मोक्षाच्या. २३ राज्यास. २४ शोभिवतो.

क्षेत्रसंन्यासें स्थिरावे । मानस जयाचें ॥ ५७ ॥ [यथेति] तयातें योगयुक्त तूं ह्मण । हेंही प्रसंगें जाण । तें दीपाचें उपलक्षण । निर्वातींचिया ॥ ५८ ॥ आतां तुझें मनोगत जाणोनी । कांहीं एक आह्मी ह्मणोनी । तें निकें चित्त देऊनी । परिसावें गा ॥ ५९ ॥ तूं प्राप्तीची चाड वाहसी । परि अभ्यासीं दक्ष न होसी । तें सांग पां काय बिहसी । * दुवाडपणें ॥ ३६० ॥ तरि पार्था हें ह्मणें । †सायास घेशी हो मनें । वायां बागुल इयें दुर्जनें । इंद्रियें करिती ॥६१॥ पाहें पां आयुष्यातें अढळ करी । जें सरतें जीवित वारी । तया ‡औषधातें वैरी । काय जिव्हा न ह्मणे ॥ ६२ ॥ ऐसे हितासि जें जें निकें । तें सदाचि या इंद्रियां दुखे । येन्हवीं सोपें योगासारिखें । कांहीं आहे ॥ ६३ ॥

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥ २० ॥
सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥ २१ ॥

[निरुद्धं योगसेवया] ह्मणोनि आसनाचिया गाढिकां । जो आह्मी अभ्यास सांगितला निका । तेणें होईल तरी हो कां । निरोध ययां ॥६४॥ [यत्रोपरमते चित्तं] येन्हवीं तरी येणें योगें । जैं इंद्रियां विदाण लागे । तैं चित्त भेटों रिगे । आपणपेयां ॥ ६५ ॥ [यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि] परतोनि पाठिमोरें ठाके । आणि आपणियातें आपण देखे । देखत खेंवो वोळखे । ह्मणे तत्त्व हें मी ॥ ६६ ॥ [तुष्यति] तिये वोळखीचि सरिसें । सुखाचिया साम्राज्यीं बैसे । [सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यं] § मग आपणपां समरसें । विरोनि जाय ॥६७॥ [वेत्ति यत्र न चैवायं] जयापरतें आणिक नाहीं । [अतींद्रियं] जयातें इंद्रियें नेणती कहीं । [स्थितश्चलति तत्त्वतः] तें आपणचि आपुलया ठायीं । होऊनि ठाके ॥ ६८ ॥

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।
यस्मिंस्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥ २२ ॥

[यमिति] मग मेरूपासूनि थोरें । देह दुःखाचेनि डोंगरें । दोटिजो पां परी

*दुवाडपणा. †साहस. ‡औषधा काय वैरी । जीभ न ह्मणे. § तेथें चित्तपणें समरस.

१ ज्या स्थळीं नियम केला तें स्थळ शरीर असेपर्यंत न सोडणें. २ उपमा. ३ वारा नसलेल्या ठिकाणच्या, निवाऱ्यांतल्या. ४ आम्ही सांगतों तें. ५ चांगलें. ६ इच्छा धरतोस. ७ सावध. ८ भितोस. ९ दुर्घट म्हणून. १० कदाचित्. ११ धास्ती घेऊं नको. १२ मुलांस भय दाखविणें. १३ स्थिर. १४ संपणाऱ्या जीविताला मागें आणतें. १५ दृढपणानें १६ अटक. १७ निग्रह. १८ पाहतांच, तत्क्षणीं. १९ बरोबर. २० ब्रह्मानंदानें. २१ लय पावतें. २२ ढळपला जावो.

भारें । चित्त *नदटे ॥ ६९ ॥ कां शब्दें वरी तोडिलिया । देह अग्नीमाजि पडलिया । चित्त महासुखीं पैहुडलिया । †चेवो नेये ॥ ३७० ॥ [यस्मिन्निति] ऐसें आपणपां रिगोनि ठाये । मग देहाची वास न पाहे । आणिकचि सुख होऊनि जाये । ह्मणूनि विसरे ॥ ७१ ॥

तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् ।
स निश्चयेन योक्तव्यो योगो निर्विण्णचेतसा ॥ २३ ॥

[तं विद्यादिति] जया सुखाचिया गोडी । मन आर्तीची सेचि सोडी । ‡संसाराचें तोडी । गुंतलें जें ॥ ७२ ॥ जें योगाची बैरव । संतोषाची राणिव । ज्ञानाची जाणिव । जयालागीं ॥ ७३ ॥ [स निश्चयेनेति] तें अभ्यासिलेनि योगें । सांवयव देखावें लागे । देखिलें तरी आंगें । होइजेल गा ॥ ७४ ॥

संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ।
मनसैवेंद्रियग्रामं विनियम्य समंततः ॥ २४ ॥

[संकल्पप्रभवानिति] तरि तोचि योग बापा । एके परि आहे सोपा । जरी पुत्रशोक संकल्पा । दाखवीजे ॥ ७५ ॥ [मनसैवेति] हा विषयातें निर्मालिया आइके । इंद्रियें नेमाचिया धारणीं देखे । तरी हियें घालूनि मुके । जीवित्वासी ॥ ७६ ॥ ऐसें वैराग्य हें करी । तरी संकल्पाचि सरे वारी । सुखें धृतीचिया धवळारीं । बुद्धि नांदे ॥ ७७ ॥

शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत् ॥ २५ ॥
यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ २६ ॥

[बुद्ध्या धृतिगृहीतया] बुद्धि धैर्या होय वेसौटा । तरी मनातें अनुभवाचिया वाटा । [शनैरिति] हळु हळु आणूनि करी प्रतिष्ठा । आत्मभुवनीं ॥ ७८ ॥ याही एके परी । प्राप्ति आहे विचारीं । हें न §ठके तरी सोपारी । आणिक ऐकें ॥ ७९ ॥ [आत्मसंस्थमिति] आतां नियमचि हा एकला । जीवें करावा आपुला ।

---

* नदटे. † चेवोचि नेघें. ‡ संसाराचिया तोंडीं. § टके.

---

१ निजलें असतां. २ जागें होत नाहीं. ३ वाट. ४ इच्छेची. ५ आठवणच. ६ जें सुख संसाराचें गुंताडें तोडी. ७ शोभा. ८ राज्य. ९ ज्ञातेपणा. १० मूर्तिमंत. ११ आपणच तन्मय सुखरूप होईल. १२ संकल्पाला पुत्रशोक होईल तर, म्हणजे संकल्पाचे पुत्र जे कामक्रोधादिक ते नाहींसे झाले तर. १३ संकल्प. १४ लय पावले असतां. १५ स्थितींत. १६ हृदय. १७ यात्रा. १८ धैर्याच्या. १९ महालांत. २० आश्रय. २१ हें घडत नसल्यास. २२ सुलभ असें. २३ मनापासून.

जैसा कृतनिश्चयाचिया बोला । बाहेरा नोहे ॥३८०॥ [यत इति] जरी येतुलेनि चित्त स्थिरावे । तरी काजा आलें स्वभावें । नाहीं तरी घालावें । मोकळुनी ॥ ८१ ॥ [तत इति] मग मोकलिलें जेथ जाईल । तेथूनि नियमूचि घेऊनि येईल । ऐसेनि स्थैर्यचि होईल । *सावियाचि कीं ॥ ८२ ॥

प्रशांतमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।
उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ २७ ॥

[उपैति शांतरजसमिति] पाठीं केतुलेनि एके वेळे । तया स्थैर्याचेनि मेळें । आत्मस्वरूपा जवळें । येईल सहजें ॥८३॥ तयातें देखोनि आंगा घडेल । तेथ अद्वैतीं द्वैत बुडेल । आणि ऐक्यें तेजें उघडेल । त्रैलोक्य हें ॥ ८४ ॥ आकाशीं दिसे दुसरें । तें अभ्र जैं विरे । तैं गगनचि कां भरे । विश्व जैसें ॥ ८५ ॥ [प्रशांतेति] तैसें चित्त लया जाये । आणि चैतन्यचि आघवें होये । ऐसी प्राप्ति सुखोपायें । आहे येणें ॥ ८६ ॥

युंजन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः ।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते ॥ २८ ॥

[युंजन्निति] या सोपेया योगस्थिती । उकेल †देखिला गा बहुतीं । संकल्पाचिया संपत्ती । रुसोनियां ॥ ८७ ॥ [सुखेन ब्रह्मसंस्पर्शे] ते सुखाचेनि सांगातें । आलें परब्रह्म आंतौतें । तेथ लवण जैसें जळातें । सांडूं नेणें ॥ ८८ ॥ [अत्यंतं सुखमश्नुते] तैसें होय तिये मेळीं । मग सोमरस्याचिया राउळीं । महासुखाची दिवाळी । जेंगेंसि दिसे ॥ ८९ ॥ ऐसें आपले ‡पांयवरी । चालिजे आपुले पाठीवरी । हें पार्था नोगवे तरी । आन ऐकें ॥ ३९० ॥

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ २९ ॥
यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ३० ॥

[सर्वभूतस्थमिति] तरि मी तंव सकळ देहीं । असें एथ §विचार नाहीं ।

---

* सर्वेंचि यया. † देखिलें. ‡ पायठीवरी. § भ्रांती नाहीं.

---

१ केलेल्या निश्चयाच्या. २ एवढ्यानें. ३ कामीं पडेल. ४ योग्यतेनुरूप, सोडून. ५ मोकळें सुटलेप्रमाणानें. ६ तत्काळ. ७ कैक वेळां. ८ योगानें. ९ स्वतः. १० सर्वत्र ऐक्याचा प्रकाश होईल. ११ ढग. १२ ब्रह्मरूप. १३ सुलभ. १४ अनुभव. १५ सहित. १६ आंत. १७ ब्रह्मानंदाच्या मंदिरांत. १८ उत्साह. १९ जगतास. २० पायांनीं. २१ मागलेकडे, उलटें. २२ प्राप्त होत नाहीं, घडत नाहीं. २३ दुसरें.

आणि तैसेंचि माझ्याठायीं । सकळ असे ॥ ९१ ॥ हें ऐसेंचि संचलें । [ईक्षते] परस्परें मिसळलें । बुद्धी घेपे एतुलें । होआवें गा ॥ ९२ ॥ [योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः] येऱ्हवीं तरी अर्जुना । जो एकवटलिया भावना । सर्वभूतीं अभिन्ना । मातें भजे ॥ ९३ ॥ भूतांचेनि अनेकपणें । अनेक नोहे अंतःकरणें । केवळ *एकत्वचि माझें जाणे । सर्वत्र जो ॥ ९४ ॥ [तस्याहमिति] मग तो एक हा मियां । बोलतां दिसतसे वायां । येऱ्हवीं न बोलिजे तरि धनंजया । तो मीचि आहें ॥ ९५ ॥ [यो मां पश्यतीति] दीपा आणि प्रकाशा । एकवकीचा पोंड जैसा । तो माझ्याठायीं तैसा । मी तयामाजी ॥ ९६ ॥ जैसा उदकाचेनि आयुष्यें रस । कां गगनाचेनि मानें अवकाश । तैसा माझेनि रूपें रूपस । पुरुष तो गा ॥ ९७ ॥

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥ ३१ ॥

[सर्वभूतस्थितमिति] जेणें ऐक्याचिये दिठी । सर्वत्र मातेंचि किरीटी । देखिला जैसा पैटीं । तंतु एक ॥ ९८ ॥ कां स्वरूपें तरी बहुतें आहाती । परि तैसीं सोनीं बहुवें न होती । ऐसी ऐक्याचळाची स्थिती । केली जेणें ॥ ९९ ॥ नातरी वृक्षांचीं पानें जेतुलीं । तेतुलीं रोपें नाहीं लाविलीं । ऐसी अद्वैतदिवसें पोहली । रात्री जया ॥ ४०० ॥ [सर्वथा इति] तो पंचात्मकीं सांपडे । तरी मग सांग पां कैसेनि अंडे । तो प्रतीतीचेनि पाडें । मजसीं तुंके ॥ १ ॥ माझें व्यापकपण आघवें । गर्वसलें तयाचेनि अनुभवें । तरी न ह्मणतां स्वभावें । व्यापक जाहाला ॥ २ ॥ आतां शरीरीं तरी आहे । परि शरीराचा तो नोहे । ऐसें बोल वरी होये । तें करूं ये ॥ ३ ॥

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ ३२ ॥

[आत्मौपम्येन सर्वत्र] ह्मणोनि असो तें विशेषें । अथवा औपणपेंयासारिखें । जो चराचर देखे । अखंडित ॥ ४ ॥ [सुखं वा यदि वा दुःखं] सुखदुःखादि वर्मे ।

---

* एकतत्त्वचि.

---

१ भरलेलें, स्थिरावलेलें. २ बुद्धीनें घेतलें जाईल एवढें. ३ एकभावानें. ४ एका आकाराचा. ५ योग्यता. ६ पोकळी. ७ रूपवान्. ८ ऐक्यदृष्टीनें. ९ वस्त्रांत. १० आकार, अलंकार. ११ सुवर्णें. १२ ऐक्यरूप पर्वत. १३ उजेडली. १४ पंचभूतात्मक शरीरांत. १५ स्वरूपीं कां प्रतिबंध पावतो? १६ अनुभवाच्या बरोबरीनें. १७ तोलला जातो. १८ सांपडलें. १९ विशेषें अथवा आत्मसाम्यानें जो चराचर पाहतो.

कां शुभाशुभें कर्मे । दोनी ऐसीं मनोधर्मे । नेणेचि जो ॥ ५ ॥ हे समविषम भाव । आणिकही विचित्र जें सर्व । तें मानी जैसे अवयव । आपुले होती ॥ ६ ॥ [समं पश्यति योऽर्जुन] हें एकैक काय सांगावें । जया त्रैलोक्यचि आघवें । मी ऐसें स्वभावें । बोधा[1] आलें ॥ ७ ॥ [स योगी परमो मतः] तयाही देह एक कीर आथी[2] । *लौकिकीं[3] सुखदुःखी तयातें ह्मणती । परि आह्मांतें ऐसी प्रतीती । परब्रह्मचि हा ॥ ८ ॥ ह्मणोनि आपणपां विश्व देखिजे । आणि आपण विश्व होइजे[4] । ऐसें साम्यचि एक उपासिजे । पांडवा गा ॥ ९ ॥ हें तूतें बहुतीं प्रसंगीं । आह्मी ह्मणों याचिलागीं । जे साम्यापरौती[5] जगीं । प्राप्ति नाहीं ॥ ४१० ॥

अर्जुन उवाच-**योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।**
एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात्स्थितिं स्थिराम्॥३३॥
चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥ ३४ ॥

[अर्जुन उवाच-योऽयं योगस्त्वया प्रोक्तः] तंव अर्जुन ह्मणे देवा । तुह्मी सांगा कीर आमुचा कैंणवा[6] । [एतस्याहं न पश्यामि] परि न पुरें[7] जी स्वभावा । मनाचिया ॥ ११ ॥ हें मन कैसें केवढें । ऐसें पाहों ह्मणों तरी न सांपडे[8] । [चंचलत्वात्स्थितिं स्थिरां] येन्हवीं रोहटावया[9] थोडें । त्रैलोक्य यया ॥ १२ ॥ [चंचलं हि मनः कृष्ण] ह्मणोनि ऐसें कैसें घाडेल[10] । जें मेर्कट समाधी येईल[11] । [वायोरिव सुदुष्करं] †कां राहा ह्मणितलिया राहेल । महावात[12]? ॥ १३ ॥ [प्रमाथि] जें बुद्धीतें सळी[13] । [बलवत्] निश्चयातें टाळी । [दृढं] धैर्यैसीं हातफळी[14] । मिळऊनि जाय ॥ १४ ॥ जें विवेकातें भुलवी । संतोषासी ‡चोड[15] लावी । बैसिजे तरी हिंडवी । दाही दिशा ॥ १५ ॥ [तस्याहं निग्रहं मन्ये] जें निरोधलें घे उंवावो[16] । जया संयमचि होय सांवावो[17] । तें मन आपुला स्वभावो । सांडील काई ॥ १६ ॥ ह्मणोनि मन एक निश्चळ[18] राहेल । [साम्येन मधुसूदन] मग आह्मांसि साम्य §होईल । हें विशेषेंही न घडेल । याचिलागीं ॥ १७ ॥

श्रीभगवानुवाच-**असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।**
अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ॥ ३५ ॥

[श्रीभगवानुवाच-असंशयमिति] तंव श्रीकृष्ण ह्मणती सांचचि[19] । बोलत आहासि

---

* लोकही तयातें सुखदुःखी ह्मणती. † कां राहें. ‡ वाटे लावी. § येईल.

१ अनुभवास. २ निश्चयें. ३ आहे. ४ लोकव्यवहारांत. ५ समदृष्टीपलीकडे. ६ दयेनें. ७ पुरें पडणार नाहीं. ८ व्यवहार करण्यास, फिरण्यास. ९ माकड. १० मोठा वारा. ११ छळी. १२ हां हां ह्मणतां, हातावर हात देऊन. १३ इच्छा. १४ प्रसर. १५ सहाय. १६ स्थिर. १७ खरें.

तें तैसेंचि । यया मनाचा कीर[2] चपळचि । स्वभावो गा ॥ १८ ॥ [अभ्यासेनेति] परि वैराग्याचेनि आधारें । जरि लाविलें अभ्यासाचिये मोहरें[3] । तरि केतुलेनि एके अवसरें[3] । स्थिरावेल ॥ १९ ॥ कां जें यया मनाचें एक निकें[4] । जे देखिले गोडीचिया ठाया[5] सोके[6] । ह्मणोनि *अनुभवसुखचि कैवतिकें[7] । दावीत जाइजे ॥ ४२० ॥

असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ।
वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥ ३६ ॥

[असंयतात्मनेति] येऱ्हवीं विरक्ति जयांसि नाहीं । जे अभ्यासीं न रिघती कहीं । तयां नाकळे हें आह्मीही । नैमनूं कायी ॥ २१ ॥ परि यमनियमाचिया वाटा न चुकिजे[9] । कहीं वैराग्याची से[10] न करिजे । केवळ विषयजळीं ठाकिजे । बुडी देउनी ॥ २२ ॥ यया जोलिया[12] मानसा कहीं । युक्तीची कांबी[13] लागली नाहीं । तरी निश्चळ होईल काई । कैसेनि सांगें ॥ २३ ॥ ह्मणोनि मनाचा निग्रह[14] होये । ऐसा उपाय जो आहे । तो आरंभीं[15] मग नोहे । कैसा पाहों ॥ २४ ॥ [वश्यात्मनेति] तरी योगसाधन जितुकें । तें अवघेंचि काय लटिकें । परि †आपणयां[16] अभ्यासें न टके । ‡हेंचि ह्मणें ॥ २५ ॥ आंगीं योगाचें होय बळ । तरि मन केतुलें चपळ । काय महदादि[17] हें सकळ । आंपु[18]नोहे ॥ २६ ॥ तेथ अर्जुन ह्मणे निकें[19] । देवो बोलती तें न चुके । §साचचि योगबळेंसीं[20] नें तुके । मनोबळ ॥ २७ ॥ तरि तोचि योग कैसा केविं जाणों । आह्मी येतुले ¶दिवस याची मातुही[21] नेणों । ह्मणोनि मनातें जी ह्मणों । $अनावर[22] ॥ २८ ॥ हा आतां आंधवेया[23] जन्मा । तुझेनि प्रसादें पुरुषोत्तमा । योगपरिचय आह्मा । जाहाला आजी ॥ २९ ॥

अर्जुन उवाच–अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः ।
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥ ३७ ॥

---

* अनुभवसुखाचीं. † आपणपयां. ‡ हेंचि ह्मणों. § साचेंचि. ¶ येतुले दियाची. $ अनावर हें.

---

१ निश्चयें. २ रत्नाला. ३ कांहीं अवकाशानें. ४ चांगलें. ५ ठिकाणास. ६ चटक लागून राहतें. ७ कौतुकानें. ८ न समजे. ९ मानीत नाहीं. १० न जावें. ११ आठवण. १२ जन्मापासून उत्पन्न झालेल्या. १३ बैठक, धनुष्यकांब. १४ प्रतिबंध. १५ आरंभ कर. १६ आपणाला अभ्यास होत नाहीं असें तरी ह्मण. १७ मूळमाया आदि. १८ प्राप्त. १९ योगसामर्थ्यांशीं. २० बरोबरी पावत नाहीं. २१ गोष्टही. २२ अजिंक्य. २३ जन्मभर.

कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ।
अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥ ३८ ॥
एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।
त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते ॥ ३९ ॥

[अर्जुन उवाच–एतन्मे संशयं कृष्णेति] परि आणीक एक गोसांवियां । मज संशय असे सांविया । [त्वदन्य इति] तो तूंवांचूनि फेडावया । समर्थ नाहीं ॥ ४३० ॥ [अयतिरिति] ह्मणोनि सांगें श्रीगोविंदा । कवण एकु मोक्षपदा । झोंबत होता श्रद्धा । उपायेंविण ॥ ३१ ॥ [विमूढो ब्रह्मणः पथि] इंद्रियग्रामोनि निगाला । आस्थेचिये वाटा लागला । आत्मसिद्धीचिया पुढिला । नगरा यावया ॥ ३२ ॥ [अप्राप्य योगसंसिद्धिं] तंव आत्मसिद्धि न ठेकेचि । [अप्रतिष्ठो महाबाहो] आणि मागुतें न येववेचि । [नश्यति] ऐसा अस्तु गेला मोंझारींचि । आयुष्यभानु ॥ ३३ ॥ [छिन्नाभ्रमिवेति] जैसें अकाळीं आभाळ । अळुमाळ संपातळ । विपायें आलें केवळ । वर्षे ना वर्षे ॥ ३४ ॥ [कच्चिन्नोभयविभ्रष्टः] तैसीं दोन्हीं दुरावलीं । जे प्राप्ती तंव अलेग ठेली । आणि अप्राप्तिही सांडवली । श्रद्धा तया ॥ ३५ ॥ ऐसा *दोहोंला अंतरेला कांजी । [योगाच्चलितमानसः] जो श्रद्धेच्या †समाजीं । बुडला तया होजी । कवण गति ॥ ३६ ॥

श्रीभगवानुवाच–**पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।**
न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥ ४० ॥

[श्रीभगवानुवाच–पार्थ] तंव श्रीकृष्ण ह्मणती पार्था । [नहि कल्याणकृदिति] जया मोक्षसुखीं आस्था । तया मोक्षावांचूनि अन्यथा । गती आहे गा ॥ ३७ ॥ [नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते] परि एतुलें हेंचि एक घडे । जें माझारीं विसांवावें पडे । तेंही परि ऐसेनि सुरवाडें । जो देवां नाहीं ॥३८॥ येऱ्हवीं अभ्यासाचा उचलता । पाउलीं जरी चालता । तरि दिवसाआधीं ठाकिता । सोहंसिद्धीतें ॥३९॥ परि तेतुला वेग नव्हेचि । ह्मणऊनि विसावा तरि निकोचि । पाठीं मोक्ष तंव तैसाचि । ठेविला असे ॥ ४४० ॥

---

* दोंला. † समजीं.

---

१ हे स्वामी. २ साहजिक. ३ तुझ्याशिवाय. ४ विश्वासानें. ५ गांवाहून. ६ मार्गाला. ७ प्राप्त झाली नाहीं. ८ माघारें. ९ मावळला. १० मध्येंच. ११ किंचित्. १२ पडद्यासारखें. १३ कदाचित्. १४ राहत नाहीं व वृष्टीही करीत नाहीं.१५ दूर राहिली.१६ हरवली.१७ मुकला. १८ समुदायांत. १९ विश्रांति घ्यावी लागे. २० सुखानें. २१ विसावों. २२ तो मी, ब्रह्मप्राप्तीला. २३ तेवढा. २४ खरा.

प्राप्य पुण्यकृतॉल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ ४१ ॥

[प्राप्य पुण्यकृतामिति] ऐकें कैवतिक हें कैसें । जे शतमखा लोक सायासें । ते तो पावे अनायासें । कैवल्यकाम ॥ ४१ ॥ मग तेथिंचे जे अमोघ । अलौकिक भोग । भोगितांही सांग । *कांटाळे मन ॥ ४२ ॥ हा अंतराय अवचितां । कां वोढवली श्रीभगवंता । दिविभोग भोगितां । अनुतापी नित्य ॥ ४३ ॥ [शुचीनामिति] पाँठीं जन्में संसारीं । परि सकळ धर्माचिया माहेरीं । लांबा उगवे आगरीं । विभवश्रियेचा ॥४४॥ जयातें नीतिपंथें चालिजे । सत्यधूत बोलिजे । देखावें तें देखिजे । शास्त्रदृष्टी ॥ ४५ ॥ वेद तो जागेश्वरु । जया व्यवसाय निजाचारु । सारासार विचारु । मंत्री जया ॥ ४६ ॥ जयाच्या †कुळीं उचिता । जाली ईश्वराची ‡पतिव्रता । जयातें गृहदेवता । आदि ऋद्धि ॥ ४७ ॥ ऐसी निजपुण्याची जोडी । वाढिन्नली सर्वसुखाची कुळवाडी । तिये जन्मे तो सुरवाडी । योगच्युत ॥ ४८ ॥

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ ४२ ॥

तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥ ४३ ॥

[अथवा योगिनामिति] अथवा ज्ञानाग्निहोत्री । जे परब्रह्मश्रोत्री । महासुखक्षेत्री । आदिवंत ॥ ४९ ॥ जे सिद्धांताचिया सिंहासनीं । राज्य करिती त्रिभुवनीं । जे कूजती कोकिल वनीं । संतोषाच्या ॥ ४५० ॥ जे § विवेकद्रुमाचे मुळीं । बैसले ¶ आहाति नित्य फळीं । तयां योगियांचिया कुळीं । जन्म पावे ॥५१॥ मोटकी देहाकृती उमटे । [तत्र तं बुद्धिसंयोगमिति] आणि निजज्ञानाची पाहांट फुटे । सूर्यापुढें प्रगटे । प्रकाश जैसा ॥ ५२ ॥ तैसी देशेची वाट न पाहतां ।

---

* कौतुक पुरे. † कुळीं चिंता. ‡ कांता. § विवेकग्रामींचे. ¶ आथी.

---

१ नवल. २ इंद्राला. ३ मोक्ष इच्छिणारा. ४ निष्फल न होणारे. ५ अप्रतिम. ६ विघ्न. ७ प्राप्त झाला. ८ स्वर्गीचे भोग. ९ पश्चात्तापयुक्त. १० नंतर. ११ विश्रांतिस्थानीं. १२ शेत कापल्यावर पडलेल्या भातगोट्यांचें उगवणारें शेत, किंवा कापलेल्या बुडख्यांतून पुनः उगवतें तें. १३ ऐश्वर्याचा. १४ आराध्यदैवत, धनी. १५ व्यवहार. १६ आपला आचार. १७ प्रधान. १८ योग्य. १९ संपत्ति. २० उदीम, व्यापार. २१ सुखांत. २२ योगभ्रष्ट. २३ ज्ञानरूप अग्नीमध्यें हवन करणारे. २४ अध्युपासक, वैदिक. २५ मूळचे रहिवासी. २६ आत्मप्राप्तीच्या. २७ शब्द करितात. २८ विचारवृक्षाच्या. २९ लहानशी. ३० उजाडे. ३१ प्रौढ अवस्थेची.

वयसेचिया[१] गांवा न येतां । बाळपणींच सर्वज्ञता । वैरी[२] तयातें ॥ ५३ ॥ [यतते च तत इति] तिये सिद्धप्रज्ञेचेनि[३] लाभें । मनचि सौरस्वतें[४] दुभे । मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥ ५४ ॥ [एतद्धि दुर्लभतरमिति] ऐसें जें जन्म । जयालागीं देव सकाम[५] । स्वर्गीं ठेले जप होम । करिती सदां ॥ ५५ ॥ अमरीं[६] भाट होइजे । मग मृत्युलोकातें वानिजे[७] । ऐसें जन्म पार्था गा जें । तें तो पावे ॥ ५६ ॥

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।
जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ४४ ॥

[पूर्वाभ्यासेन तेनैव] आणि मागील जे सद्बुद्धि । जेथ जीवित्वा जाहाली होती अवधि[८] । मग तेचि पुढती निरवधि । नवी लाहे ॥ ५७ ॥ तेथ सदैवा[९] आणि पोयाळा[१०] । वरि दिव्यांजन[११] होय डोळा[१२] । मग देखे जैसीं अवलीळा[१३] । पाताळधनें ॥ ५८ ॥ [शब्दब्रह्मातिवर्तते] तैसे दुर्भेद[१४] जे अभिप्राय । कां गुरुगम्य[१५] हन ठाय । तेथ *संसरेवीण[१६] जाय । बुद्धि तयाची ॥ ५९ ॥ [ह्रियते ह्यवशोऽपि सः] बळियें इंद्रियें येती मना । मन एकवटे[१७] पवना । पवन सहजें[१८] गगना । मिळोंचि लागे ॥ ४६० ॥ ऐसें नेणों काय[१९] अपैसें[२०] । तयातेंचि कीजे अभ्यासें । समाधि घर पुसे । मानसाचें ॥ ६१ ॥ [जिज्ञासुरपि योगस्य] जाणिजे योग पीठींचा[२१] भैरवु[२२] । काय हा आरंभ भरंवसा[२३] गौरव । कीं वैराग्यसिद्धीचा अनुभव । रूपा आला ॥ ६२ ॥ हा संसार उमाणितें[२४] माप । कां अष्टांगसामग्रीचें द्वीप । जैसें परिमळेंचि[२५] धरिजे रूप । चंदनाचें ॥ ६३ ॥ तैसा संतोपाचा काय घडिला । कीं †सिद्धिभांडारींहुनि[२६] काढिला । दिसे तेणें मानें[२७] रूढला । साधकदशे ॥ ६४ ॥

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥ ४५ ॥

[प्रयत्नाद्यतमानस्तु] जे वर्षशतांचिया कोडी[२८] । जन्मसहस्रांचिया आडी[२९] ।

---

* सौरसें, सायासें. † सिद्धभांडारौनि.

---

१ वयाच्या. २ पाणिग्रहण करते. ३ सिद्धबुद्धीच्या योगानें. ४ सर्व विद्या दुभती. ५ हेतु धरणारे. ६ स्तुतिपाठक. ७ वर्णावें. ८ आयुष्याला. ९ शेवट. १० दैववान्. ११ पायाळू मनुष्य. १२ ईश्वरप्रसादिक अथवा लोकोत्तर काजळ, जेणेकरून साधारण मनुष्यास न दिसणारें दिसतें. १३ सहज. १४ अगम्य. १५ गुरूपासूनच प्राप्त होणारें. १६ कष्टावांचून, अचूक. १७ ऐक्य पावे. १८ आपोआप. १९ मुख्य स्थानावरचा. २० अधिदेवता. २१ मोठेपणा. २२ मोजणारें. २३ योगसाहित्याचें बेट. २४ सुगंधानें. २५ खजिन्यांतून. २६ साधक असून सिद्धासारखा दिसतो. २७ वाढला, उत्पन्न झाला. २८ कोटि. २९ आड, प्रतिबंध.

लंघितां पातला थडी[1]। आत्मसिद्धीची ॥ ६५ ॥ ह्मणोनि साधनजात[2] आघवें। अनुसरे तया स्वभावें। [योगी] मग आयतिये बैसे राणिवे[3]। विवेकाचिये ॥ ६६ ॥ पाठीं विचारितया[4] वेगां। तो विवेकही ठाके मागां। मग अविचारणीय[5] तें आंगा। घडोनि जाय ॥ ६७ ॥ [संशुद्धकिल्बिषः] तेथ मनाचें मेहुडें[6] विरे। पवनाचें पवनपण सरे। आपणपां[7] आपण मुरे। आकाशही ॥ ६८ ॥ प्रणवाचा माथा बुडे[8]। येतुलेनि अनिर्वाच्य सुख जोडे। ह्मणोनि आधींचि बोल बहुडे[9]। तयालागीं ॥ ६९ ॥ ऐसी ब्रह्मींची स्थिती। जे सकळा गतीसीं गती। तया अमूर्तीची मूर्ती। होऊनि ठाके ॥ ४७० ॥ [अनेकजन्मसंसिद्धः] तेणें बहुतीं जन्मीं मागिलीं। विक्षेपांचीं *पानवळें झाडिलीं[10]। ह्मणोनि उपजत खेवो[11] बुडाली। लग्नघटिका॥७१॥[ततो याति परां गतिं]आणि तद्रूपतेसि[12] सुलग्न। लागोनि ठेलें अभिन्न। जैसें लोपलें अभ्रें[13] गगन। होऊनि †ठाके ॥ ७२ ॥ तैसें विश्व जेथ होय। मीपौतें[14] जेथ लया जाये। तें विद्यमानेचि देहें। जाहला तो गा ॥ ७३ ॥

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।
कर्मिभ्यश्चाऽधिको योगी तस्माद्योगी भवाऽर्जुन ॥४६॥

[कर्मिभ्यश्चाधिको योगी]जया लाभाचिया आशा। करूनि धैर्यबाहूंचा भरंवसा। घालीत षट्कर्मांचा[15] धोरसा[16]। कर्मनिष्ठ॥७४॥ [ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः] कां जिये एकवस्तुलागीं। बांधोनि[17] ज्ञानाची वज्रांगी[18]। जुंझत प्रपंचेसीं समरंगीं[19]। ‡ज्ञानियोगा ॥ ७५ ॥ [तपस्विभ्योऽधिको योगी] अथवा निर्लागें[20] निसरडा। तपोदुर्गाचा ओंडकडा[21]। झोंबती तपिये चौंडा[22]। जयाचिया ॥ ७६ ॥ जें भजतियां भज्य[23]। याज्ञिकांचें याज्य[24]। एवं जें पूज्य। सकळां सदां ॥ ७७ ॥ तेंचि तो आपण। स्वयें जाहाला निर्वाण[25]। जें साधकांचें कारण। सिद्ध तत्व ॥ ७८ ॥ ह्मणोनि कर्मनिष्ठां वंद्य। तो ज्ञानियासि वेद्य[26]। तापसांचा ओद्य[27]। तपोनाथ ॥ ७९ ॥ पैं जीवपरमात्मसंगमा। जयाचें येणें जाहालें मनोधर्मा। तो शरीरीचि परि

---

* पानवळें. † ठके. ‡ ज्ञानियेगा.

१ किनारा. २ सर्व साधनें. ३ राज्यावर. ४ विचार करण्याचा जो वेग. ५ मेघ. ६ आपल्याच ठिकाणीं लीन होतें. ७ ओंकाराचा. ८ बोलण्यास अशक्य. ९ परावर्ते. १० समुदाय, पाण्यांतील सर्व मळ. ११ तावडतोब. १२ माधारा. १३ यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान व प्रतिग्रह हीं षट्कर्मे. १४ प्रवाह. १५ ठसून. १६ दृढ कवच. १७ युद्धभूमींत. १८ निराश्रय. १९ तटबंदीचा अर्धा तुटलेला कडा. २० इच्छेनें. २१ ज्याकरितां भजन करावयाचें तें. २२ ज्याकरितां यजन करावयाचें तें. २३ केवळ, कैवल्य तद्रूप. २४ जाणण्यास योग्य. २५ पहिला.

महिमा । ऐसी पावे ॥ ४८० ॥ [तस्माद्योगी भवार्ऽर्जुन] ह्मणोनि याकारणें । तूतें मी सदा ह्मणें । योगी होईं अंतःकरणें । पंडुकुमरा ॥ ८१ ॥

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥ ४७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अभ्यासयोगो नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

[योगिनामपीति] अगा योगी जो ह्मणिजे । तो देवाचा देव[1] जाणिजे । आणि सुख सर्वस्व माझें । चैतन्य[2] तो ॥ ८२ ॥ [श्रद्धावान्भजते यो मां] तेथ भजता[3] भजन भजावें । हें भक्तिसाधन जें आघवें । तो मीचि जाहालों अनुभवें । अखंडित ॥ ८३ ॥ [स मे युक्ततमो मतः] मग तया[4] आह्मा प्रीतीचें । स्वरूप बोलीं निर्वचे[5] । ऐसें नव्हे गा तों साचें । सुभद्रापती ॥ ८४ ॥ तया एकवटलिया[6] प्रेमा । जरी पाडें[7] पाहिजे उपमा । तरी मी देह तो आत्मा । हेचि होय ॥ ८५ ॥ ऐसें भक्तचकोरचंद्रें । बोलिलें गुणसमुद्रें । त्रिभुवनैकनरेंद्रें । संजय ह्मणे ॥ ८६ ॥ तेथ *आदीपासूनि पार्था । ऐकिजे ऐसीचि आस्था । दुणावली हें यदुनाथा । †भावों[8] सरलें ॥८७॥ कीं साँवियाचि मनीं संतोषला । जे बोला आरिसा जोडला । तेणें हरिखें आतां उपलवला[9] । निरूपील ॥ ८८ ॥ तो प्रसंग आहे पुढा । जेथ शांत[10] दिसेल उघडा । तो पालविजेल[11] मुडा[12] । प्रमेयबीजाचा ॥ ८९ ॥ जे सात्विकाचेनि वडेपें[13] । गेलें आध्यात्मिक खरेपें[14] । सहजें ‡निडारले[15] वाफे । चतुरचित्ताचे[16] ॥ ४९० ॥ वरी अवधानाचा वाफसा । लाधला सोनयाऐसा । ह्मणोनि पेरावया धिवसा[17] । श्रीनिवृत्तीसीं ॥ ९१ ॥ ज्ञानदेव ह्मणे मी चाडें । सद्गुरूनीं केलें कोडें[18] । माथां हात ठेविला तें फुडें । बीजचि[19] वाइलें ॥ ९२ ॥ ह्मणऊनि येणें मुखें जें जें निगे । तें संतांच्या हृदयीं साचेंचि लागे । हें असो सांगों श्रीरंगें । बोलिलें जें ॥ ९३ ॥ परि तें मनाच्या कानीं ऐकावें । बोल बुद्धीच्या डोळां देखावें । हे सांटोवाटीं[20] घ्यावे । चित्ता[21]-

---

* आदिलापासोनि. † पावों सरलें. ‡ निर्वाळलें.

---

१ जीव. २ भजन करणारा, भजन करणें व भजन करण्याचा देव ही त्रिपुटी. ३ त्याला व आम्हांला जी प्रीति होते तिचें स्वरूप. ४ सांगतां येत नाहीं. ५ बरोबरीनें. ६ समजलें, वाटूं लागलें. ७ सहज, सर्वथा. ८ संतोषानें. ९ उकलला. १० शांतिरस. ११ पेरील, विस्तारील. १२ तांदूल इत्यादिक भरून गोलाकार केलेला पेंढ्याचा गठ्ठा. १३ सार, सिद्धांत. १४ शोभा. १५ गुंताडें. १६ परिपक्व. १७ चित्तचतुष्टय=मन, बुद्धि, चित्त, अहंकार यांचा, शहाण्याच्या चित्ताचे. १८ पेरण्याजोगी ऊब, पिकण्याजोगा काल. १९ धैर्य. २० नवल. २१ पेरण्याकरितां निराळें ठेविलेलें धान्य. २२ अदलाबदली=चित्त देऊन त्याच्या मोबदला बोल घ्यावे.

चिया ॥ ९४ ॥ अवधानाचेनि हातें । *नेयावें हृदया आंतौतें । हे †रिझवील आयणीतें । सज्जनाचिये ॥ ९५ ॥ हे स्वहितातें नीजविती । परिणामातें जीविविती । सुखाची वाहती । लाखोली जिवां ॥ ९६ ॥ आतां अर्जुनेसीं श्रीमुकुंदें । नागर बोलिजेल विनोदें । तें वोंवियेचेनि प्रबंधें । सांगेन मी ॥ ४९७ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

श्लोक ४७, ओव्या ४९७.

---

* नेयावें पां. † रिझवितील.

---

१ न्यावें. २ आंत. ३ रमवील. ४ मनातें. ५ निवविती. ६ सर्वोत्कृष्ट.

ज्ञानेश्वरी.

अध्याय ७ वा.

श्रीभगवानुवाच–**मय्यासक्तमनाः पार्थ योगं युंजन्मदाश्रयः ।**
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥ १ ॥
ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥ २ ॥

[श्रीभगवानुवाच–मय्यासक्तमना इत्यर्धं] आइका मग तो श्रीअनंत । पार्थातें असे ह्मणत । पैं गा तूं योगयुक्त । जालासि आतां ॥ १ ॥ [असंशयं समग्रं मां] मज समग्रातें जाणसी ऐसें । आपलिया तळहातिंचें रत्न जैसें । [ज्ञानं तेऽहं सविज्ञानं] तुज ज्ञान सांगेन तैसें । विज्ञानेंसीं ॥२॥ एथ विज्ञानें काय करावें । ऐसें घेसी जरी मनोभावें । *तरी पैं आधीं जाणावें । तेंचि लागे ॥ ३ ॥ मग ज्ञानाचिये वेळे । झांकती जाणिवेचे डोळे । जैसी तीरीं नाव न ढळे । टेंकली सांती ॥ ४ ॥ तैसी जाणीव जेथ नेरिगे । विचार मागुतापाउलीं निघे । तर्क आयणी नेघे । आंगीं जयाच्या ॥ ५ ॥ अर्जुना तया नांव ज्ञान । येर प्रपंच हें विज्ञान । †तेथ सत्यबुद्धि तें अज्ञान । हेंही जाण ॥ ६ ॥ आतां अज्ञान अवघें हारपे । विज्ञान निःशेष करपे । आणि ज्ञान तें स्वरूपें । होऊनि जाइजे ॥७॥ [यज्ज्ञात्वेति] जेणें सांगतयाचें बोलणें खुंटे । ऐकतयाचें व्यसन तुटे । हें जाणणें सांनें मोटें । उरों नेदी ॥ ८ ॥ [इदं वक्ष्याम्यशेषतः] ऐसें वर्म जें गूढ । तें किजेल वाक्यारूढ । जेणें थोडेनि पुरे कोड । बहुत मनींचें ॥ ९ ॥

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥३॥

[मनुष्याणां सहस्रेषु] पैं गा मनुष्यांचिया सहस्रशा । माजि विपाइलेचिया

---

* तै पैं आधीं. † येथ.

---

१ निश्चयें. २ योगी. ३ सर्व प्रकारें, सर्वत्र व्याप्त. ४ प्रपंचज्ञान, विपरीतज्ञान, व्यवहारज्ञान. ५ असा ग्रह होईल. ६ ज्ञातृत्वाचे. ७ नौका. ८ असतां. ९ शिरत नाहीं. १० मागल्या पायीं, आला तसा च मागें. ११ निश्चय, तत्त्वनिर्णयेच्छा. १२ हौस, उद्योग, दुःख. १३ लहान मोठें. १४ सलोल, युत. १५ बोलण्यांत, वाक्यांत आणीन. १६ आवड, इच्छा. १७ विरळा, एखाद्याला.

येथ धिंवसा । तैसे या धिंवसेकरां बहुवसां । माजि विरळा जाणे ॥१०॥ जैसा भरलेया त्रिभुवना । आंत एक एक चांग अर्जुना । निवडूनि कीजे सेना । लेक्षवरी ॥ ११ ॥ [कश्चिद्यतति सिद्धये] कीं तयाहीपाठी । जे वेळीं लोहें मासातें घांटी । ते वेळीं विजयश्रीयेच्या पोटीं । एकचि बैसे ॥ १२॥ [यतताम-पि सिद्धानां] तैसे आस्थेच्या महापुरीं । रिघताति कोटिवरी । [कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः] परी प्राप्तीच्या पैलतीरीं । विपाइला निगे ॥१३॥ [यथा ज्ञास्यसि तच्छृणु १ श्लोक] ह्मणऊनि सामान्य गा नोहे । हे सांगतां वडिलें गोठि गा आहे । परी तें बोलों येईल पाहें । आतां प्रस्तुत ऐकें ॥ १४ ॥

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥

तरी अवधारीं गा धनंजया । [अहंकार इति] हे महदादिक माझी माया । जैसी प्रतिबिंबे छाया । निजांगाची ॥ १५ ॥ [भिन्ना प्रकृतिरष्टधा] आणि इयेतें प्रकृति ह्मणिजे । जे अष्टधा भिन्न जाणिजे । लोकत्रय निर्फजे । [इयं] इयेर्स्तव ॥१६॥ हे अष्टधा भिन्न कैसी । ऐसा धवनि धरिसी जरी मानसीं । तरी तेचि गा आतां परियेसीं । विवंचना ॥१७॥ [भूमिरिति] आप तेज गगन । मही मारुत मन । बुद्धि अहंकार हे भिन्न । आठै भाग ॥ १८ ॥

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥

[अपरेयं] या आठांची जे *साम्यावस्था । [इतस्त्वन्यामिति] ते माझी परम प्रकृति पार्था । [जीवभूतां महाबाहो] तिये नाम †व्यवस्था । जीव ऐसी ॥ १९ ॥ जे जडातें जीववी । चेतनेतें चेतवी । मना करवीं मानवी । शोक मोहो॥२०॥ पैं बुद्धीच्या अंगीं जाणणें । तें ‡ जिये जेवळिकेचें करणें । [ययेदं धार्यते जगत्] जिया अहंकाराचे विंदाणें । जगचि धरिजे ॥ २१ ॥

---

* ऐक्यावस्था. † अवस्था. ‡ जियेचिये.

---

१ धैर्य, छंद. २ धैर्यवंतास. ३ क्वचित्. ४ चांगला शूर. ५ लाखभर. ६ त्यानंतर. ७ शस्त्र. ८ शरीरगत मांसाला. ९ कापी, घटे, मिळे. १० जयलक्ष्मीच्या. ११ पदीं. १२ कोट्यवधि. १३ मोठी. १४ महत्तत्वआदि. १५ पडछाया पडते. १६ माया. १७ आठ प्रकारें. १८ उत्पन्न होतें. १९ इचेपासून. २० शंका, संशय. २१ विचार. २२ उदक. २३ उजेड, प्रकाश. २४ आकाश. २५ पृथ्वी. २६ वायु. २७ समान स्थिति. २८ आत्मस्वरूप. २९ अचेतनाला. ३० चेतना उत्पन्न करिते. ३१ सन्निधपणाचें. ३२ कौशल्यानें, विधानानें, कळसूत्रानें.

एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ ६ ॥

[एतदिति] ते सूक्ष्म प्रकृति कोडें[१]। जैं *स्थूळाचिया[२] आंगा घडे । तैं भूत[३]-सृष्टीची पडे । टांकसाळ ॥ २२ ॥ चतुर्विध ठसा । उमटों लागे आपैसा । मोला[४] तरीं सरिसा[५]। परि थरेंचि अनान[६] ॥ २३ ॥ होती चौऱ्यासीं लक्ष थरा । येरा मिती[७] नेणिजे भांडारा । भरे आदिशून्याचा गाभारा[८] । नाणेयांसी[९] ॥२४॥ ऐसें ऐकेतुकें[१०] पांचभौतिक[११]। पडती बहुवस टांक[१२]। मग तिये समृद्धीचे लेखें[१३] । प्रकृतीचि धरी[१४] ॥२५॥ जैं आंखूनि[१५] नाणें विस्तारी । पाठीं[१६] तयाची ओ[१७]-टणी करी । माजी कर्माकर्माचिया व्यवहारीं । प्रवर्तु[१८] दावी ॥ २६ ॥ हें रूपक[१९] परी असो । †सांगों[२०] उघड जैसें[२१] ये परियेसों[२२]। तरी नामरूपाचा अतिसो[२३]। प्रकृतीच कीजे ॥ २७ ॥ [अहमिति] आणि प्रकृति तंव माझ्या ठायीं । बिंबे[२४] येथ आन नाहीं । ह्मणोनि ‡आदि मध्य अवसान पाहीं । जगासि मी ॥२८॥

मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥

[मत्तः परतरमिति] हें रोहिणीचें[२५] जळ । तयाचें पाहातां येइजे मूळ[२६]। तैं रश्मि[२७] नव्हती केवळ । होय तें भानु[२८] ॥ २९ ॥ तयाचिपरी किरीटी । इया प्रकृती जालिये सृष्टी । जैं §उपसंहरूनि[२९] कीजेल[३०] ठी । तैं मीचि आहें ॥ ३० ॥ [मयीति] ऐसें होय[३१] दिसे न दिसे । हें मजचिमाजी[३२] असे । मियां विश्व धरिजे जैसें । सूत्रें मणि[३३] ॥ ३१ ॥ सुवर्णाचे मणी केले । ते सोनियाचे सुतीं वोंविले । तैसें म्यां जग धरिलें । सबाह्याभ्यंतरीं[३४] ॥ ३२ ॥

रसोऽहमप्सु कौंतेय प्रभाऽस्मि शशिसूर्ययोः ।
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥ ८ ॥

---

* स्थूळेचिया. † सांगा उघड जैसें परियेसों. ‡ आदिनिधन पाहीं. § संहार कीजेल पाठीं, कीजे लठी (लेखा).

१ आवडीनें. २ महाभूतांच्या. ३ प्राण्यांच्या उत्पत्तीची. ४ जरायुज, अंडज, स्वेदज आणि उद्भिज्ज या चोहोंचा. ५ चैतन्यरूप. ६ यासारखा. ७ जाति. ८ वेगळाल्या. ९ गणती. १० आकाश, मायेची कोठडी. ११ नाण्यांनीं. १२ एकतुल्य. १३ पंचमहाभूतांची. १४ नाणें, ठसे. १५ जमाखर्च. १६ माया. १७ रेघटून, मोजून, आकारून. १८ मग. १९ व्यवस्था, गाळणी. २० प्रवृत्ति. २१ सादृश्याचें उदाहरण. २२ येईल. २३ श्रवण करूं, समजण्याजोगें. २४ अतिशय. २५ मृगजळ. २६ किरण. २७ सूर्य. २८ अर्जुना. २९ नाश करून. ३० पर्यवसान. ३१ उत्पन्न होतें, दिसतें व नाहींसें होतें. ३२ माझ्यामध्यें. ३३ दोऱ्यानें. ३४ बाहेर आंत.

पुण्यो गंधः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।
जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥ ९ ॥

[रसोऽहमिति] ह्मणोनि उदकीं रस । कां पवनीं जो स्पर्श । शशिसूर्यीं जो प्रकाश । तो मीचि जाण ॥३३॥ [पुण्यो गंधः पृथिव्यां च] तैसाचि नैसर्गिक शुद्ध । मी पृथ्वीच्या ठायीं गंध । [शब्दः खे] गगनीं मी शब्द । [प्रणवः सर्ववेदेषु] वेदीं प्रणव ॥ ३४ ॥ [पौरुषं नृषु] नराच्या ठायीं नरत्व । जें अहंभाविये सत्व । तें पौरुष मी हें तत्व । बोलिजत असे ॥ ३५ ॥ [तेजश्चास्मि विभावसौ] अग्नि ऐसें आहाच । तेजीं नामाचें आहे कवच । तें परतें केलिया साच । निजतेज तें मी ॥ ३६ ॥ [जीवनं सर्वभूतेषु] आणि नानाविध योनि । जन्मोनि भूतें त्रिभुवनीं । वर्तत आहाति जीवनीं । आपुलाल्या ॥ ३७ ॥ एकें पवनेंचि पीती । एकें तृणास्तव जीती । एकें अन्नाधारें राहाती । जळें एकें ॥ ३८ ॥ ऐसें भूतप्रति ओनान । जें प्रकृतिवशें दिसे जीवन । तें ओघवाठायीं अभिन्न । मीचि एक ॥ ३९ ॥

बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।
बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥ १० ॥
बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम् ।
धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥ ११ ॥

[बीजं मां सर्वभूतानां] पैं आदिचेनि अवसरें । विरूढे गगनाचेनि अंकुरें । जें अंतीं गिळी अक्षरें । प्रणवपीठींचीं ॥ ४० ॥ जंव हा विश्वाकार असे । तंव जें विश्वाचिसारिखें दिसे । मग महाप्रळयदशे । *कैसेनि नव्हे ॥ ४१ ॥ ऐसें अनादि जें सहज । तें मी गा विश्वबीज । हें हातातळीं तुज । देइजत असे ॥ ४२ ॥ मग उघड करूनि पांडवा । जैं हें आणिसी सांख्याचिया गांवा । तैं ययाचा उपेग बरवा । देखसील ॥ ४३ ॥ परी हे अप्रासंगिक ओलाप ।

---

* केसेंही.

---

१ स्वाद. २ वायूंत. ३ स्वाभाविक. ४ सुवास. ५ आकाशांत. ६ ओंकार. ७ मनुष्यपणा. ८ बळ. ९ पराक्रम. १० खरें स्वरूप. ११ वरवरच, उगीच. १२ अग्नींत, प्रकाशीं. १३ आवरण. १४ दूर केलें असतां. १५ खरें तेज, स्वस्वरूप. १६ प्राणिमात्र. १७ उपजीविकेंत, अन्नानें. १८ वाराच पितात. १९ गवतानें उपजीविका करतात. २० प्रत्येक प्राण्याला. २१ निरनिराळें. २२ अन्न. २३ सर्व ठिकाणीं. २४ पहिल्यापासून, उत्पत्तिसमयीं. २५ अ, उ, म्-ओंकार. २६ कसें न जाईल. २७ उत्पत्तिनाशरहित. २८ जगाचें कारण. २९ हातावर. ३० विचारस्थितीच्या, आत्मानात्मविचाराच्या. ३१ उपयोग. ३२ प्रसंगास योग्य नव्हे. ३३ बोल.

आतां असतु बोलों संक्षेप । [तपश्चास्मि तपस्विषु] जाण तेपियांच्या ठायीं तप । तें रूप माझें ॥ ४४ ॥ [बलं बलवतां चाहमिति] बलियामाजि बळ । तें मी जाण अढळ । [बुद्धिर्बुद्धिमतामस्मि] बुद्धिमंतीं केवळ । बुद्धि ते मी ॥ ४५ ॥ [धर्माविरुद्धो भूतेष्विति] भूतांच्या ठायीं काम । तो मी ह्मणे आत्माराम । जेणें अर्थास्तव धर्म । थोर होय ॥ ४६ ॥ येऱ्हवीं विकाराचेनि पैसें । करी कीर *इंद्रियाच्याचि ऐसें । परी धर्मासि वेखासें । जावों नेदी ॥ ४७ ॥ जों अप्रवृत्तीचा अव्हांटा । सांडूनि विधीचियां निघे वाटा । तेवींचि नियमाचा दिवटा । सवें चाले ॥ ४८ ॥ काम ऐशिया वोजा प्रवर्ते । ह्मणोनि धर्मासि होय पुरतें । †मोक्षतीर्थींचे मुक्तें । संसार भोगी ॥ ४९ ॥ [कामोऽस्मि भरतर्षभ] जो श्रुतिगौरवाच्या मांडवीं । कामसृष्टीचा वेल वाढवी । जंव कर्मफळेंसि पालवी । अपवर्गीं ठेंके ॥५०॥ ऐसा नियत कां कंदर्प । जो भूतां यां बीजरूप । तो मी ह्मणे बापु । योगियांचा ॥ ५१ ॥ [तेजस्तेजस्विनामहं] हें एकेक किती सांगावें । आतां वस्तुजातचि आघवें । मजपासूनि जाणावें । ‡विकारलें असे॥५२॥

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये ।
मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥ १२ ॥

[ये चैव सात्त्विका भावा इति] जे सात्विक हन भाव । कां रजतमादि सर्व । [मत्त एवेति तान्विद्धि] ते मजरूपसंभव । वोळखें तूं ॥ ५३ ॥ [ते मयि] ते हे जाले तरी माझ्याठायीं । [न त्वहं तेषु] परी तयांमाजी मी नाहीं । जैसी स्वप्नींच्या डोहीं । जागृती न बुडे ॥ ५४ ॥ §जैसी रसाचीच सुघट । बीजैकणिका घनवट । परी तियेसरिव होय काष्ठ । अंकुरद्वारें ॥ ५५ ॥ मग तया काष्ठाच्या ठायीं । सांग पां बीजपण असे काई । तैसा मी विकारीं नाहीं । जरी विकारला ¶दिसें ॥ ५६ ॥ पैं गगनीं उपजे आभाळ । परी तेथ गगन नाहीं केवळ । अथवा आभाळीं होय सलिल । तेथ अभ्र नाहीं ॥ ५७ ॥ मग त्या उदकाचेनि आवेशें । प्रगटलें तेज जें लखलखीत दिसे । तिये विजूमाजि

---

* इंद्रियाचेयाचि. † मोक्षार्थींचें, मोक्षतीर्थींचि. ‡ विकरलें. § नातरी. ¶ असें.

---

१ असोंदे. २ तपस्व्यांच्या. ३ हेतु. ४ स्वस्वरूपांत रममाण होणारा. ५ द्रव्यसंग्रहनामक पुरुषार्थासाठीं. ६ मार्गानें, पैसपणानें. ७ विरुद्ध. ८. स्वधर्मत्यागाचा. ९ आडवाट. १० कर्तव्य कर्माच्या. ११ मशाल. १२ रीति, चांगुलपणा. १३ पूर्ण. १४ मुक्तीसाठीं. १५ वेदमहत्त्वाच्या. १६ अभिलाष. १७ मोक्षामध्यें. १८ काम. १९ कारणभूत. २० सर्व दृश्य पदार्थ. २१ विस्तार पावलें. २२ वृत्ति. २३ माझ्या रूपापासून उत्पन्न झालेले. २४ द्रव्ययुक्त, केवळ रसाचीच. २५ चांगली घडलेली. २६ बीं, दाणा. २७ घट्ट. २८ तिजपासून. २९ पाणी. ३० आविर्भावानें. ३१ विजेंत.

असे । सलिल कायि ॥ ५८ ॥ सांगें अग्नीस्तव धूम होये । तिये धूमीं काय अग्नि आहे । तैसा विकार हा मी नोहें । जरीं विकारला असें ॥ ५९ ॥

त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ।
मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥ १३ ॥

[त्रिभिर्गुणमयैर्भावैरिति] परि उदकीं जाली बाबुळी । ते उदकातें जैसी झांकोळी । कां वायांचि आभाळीं । आकाश लोपे ॥ ६० ॥ हां गा स्वप्न लटिकें म्हणों ये । परि निद्रावशें बाणलें होये । तंव आठव काय देत आहे । आपणपेयां ॥ ६१ ॥ हें असो डोळयांचें । डोळांचि पडळ रचे । तेणें देखणेपण डोळयांचें । न गिळिजे कायि ॥ ६२ ॥ तैसी हे माझीच बिंबली । त्रिगुणात्मक साउली । [मोहितं] कीं मजचि आड वोडवली । जेवनिका जैसी ॥ ६३ ॥ [नाभिजानाति] म्हणऊनि भूतें मातें नेणती । [मामेभ्य परमव्ययं] माझींच परी मी नव्हती । जैसीं जळींचीं जळीं न विरती । मुक्ताफळें ॥६४॥ पैं *पृथ्वीयेचा घट कीजे । सवेंचि पृथ्वीसि मिळे जरी मेळविजे । येर्‍हवीं तोचि अग्निसंगें सिजे । तरी वेगळा होय ॥ ६५ ॥ तैसें भूतजात सर्व । हे माझेचि कीर अवयव । परि मायायोगें जीव । दशे आले ॥ ६६ ॥ म्हणोनि माझेचि मी नव्हती । माझेचि मज नोळखती । अहंममताभ्रांती । विषयांध जाले ॥ ६७ ॥

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ १४ ॥

[दैवी ह्येषा] आतां महदादि हे [मम माया] माझी माया । उतरोनियां धनंजया । मी होइजे हें आया । कैसेनि ये ॥६८॥ जिये ब्रह्माचळाचा आंधाडा । पहिल्या संकल्पजळाचा उभाडा । सवेंचि महाभूतांचा बुडबुडा । सोना आला ॥ ६९ ॥ जे सृष्टीविस्ताराचेनि वोघें । चढत काळकळनेचेनि वेगें । प्रवृत्तिनिवृत्तीचीं तुंगें । तटें सांडी ॥७०॥ [गुणमयी] जे गुणघनाचेनि वृष्टिभरें ।

---

* पृथ्वीचा.

---

१ धूर. २ शैवाल. ३ आच्छादी. ४ अनुभविक दिसतें; ठसतें. ५ पडदा. ६ द्रष्टृत्व. ७ प्राप्त झाली. ८ पडदा. ९ होत नाहींत. १० विरघळत नाहींत. ११ मोत्यें. १२ मातीचा. १३ पिचला असतां. १४ जीवपणाला. १५ मी व माझें या भ्रांतीनें. १६ महत्तत्वआदि.१७ पार पडून, अतिक्रमून. १८ समजुतीस.१९ ब्रह्म हाच कोणी एक पर्वत त्याचा. २०मध्यभाग, अर्धकडा. २१ झरा.२२ लहानसा. २३ कालगतीच्या. २४ कर्ममार्ग व मोक्षमार्ग यांचीं. २५ उंच. २६ तीरें, डगरी. २७ सत्वादिगुण हेच कोणी मेघ त्यांच्या.

भरली मोहाचेनि महापूरें । घेऊनि जात नगरें । यमनियमाचीं ॥ ७१ ॥ जे द्वेषाच्या आवर्तीं दाटत । मत्सराचे वळसे पडत । माजि प्रमादादि तळपत । महामीन ॥ ७२ ॥ जेथ प्रपंचाचीं वळणें । कर्माकर्माचीं * वोभाणें । वरी † तर्तांती वोसाणें । सुखदुःखांचीं ॥ ७३ ॥ रतीचिया बेटा । आदळती कामाचिया लाटा । जेथ जीवेफेन ‡संघाटा । सैंध दिसे ॥७४॥ अहंकाराचिया चळिया । वरि मदत्रयाचिया उकळिया । जेथ विषयोर्मीच्या आकळिया । उल्हाळ घेती ॥ ७५ ॥ उदयास्ताचे लांढे । पाडीत जन्ममरणाचे चोंढे । जेथ पांचभौतिक बुडबुडे । होती जाती ॥ ७६ ॥ सम्मोह विभ्रम मासे । गिळिताति धैर्याचीं §आमिषें । तेथ देहडे भोंवत वळसे । अज्ञानाचे ॥ ७७ ॥ भ्रांतीचेनि खडुळें । रवलें आस्थेचें अवगाळें । रजोगुणाचेनि खळाळें । स्वर्ग गाजे ॥ ७८ ॥ तमाचे धोरसे वाड । सत्वाचें स्थिरपण जाड । [दुरत्यया] किंबहुना हे दुर्वाड । मायानदी ॥ ७९ ॥ पैं पुनरावृत्तीचेनि उंभडें । झळंबती सत्यलोकींचे हुंडे । घायें ¶ गडबडती धोंडे । ब्रह्मगोळकाचे ॥ ८० ॥ तया पाणियाचेनि वहिलेपणें । अझुनी न धरती वोभाणें । ऐसा मायापूर हा कवणें । तरिजेल गा ॥ ८१ ॥ येथ एक नेवलावो । जो जो कीजे तरणोपावो । तो तो अपावो । होय तें ऐक ॥ ८२ ॥ एक स्वैयंबुद्धीच्या बाहीं । रिगाले तयांची शुद्धीचि नाहीं । एक जाणिवेचे डोहीं । गर्वेंचि गिळिले ॥ ८३ ॥ एकीं वेदत्रयाचिया सांगडी । घेतल्या अहंभावाचिया धोंडी । ते मदमीनाच्या तोंडीं । सगळेचि गेले ॥ ८४ ॥ एकीं वयसेचें जोड बांधले । मग मन्मथाचिये कासे लागले । ते विषयमगरीं सांडिले । चघळूनियां ॥ ८५ ॥ आतां वार्धक्याच्या तरंगा । माजि मतिभ्रंशाचा जरंगा । तेणें कवळिजेताति पैंगा । चहूंकडे॥८६॥

---

* बोभणें. † तरताती. ‡ संघटा. § आविसें. ¶ गडबडती धेंडें.

---

१ भ्रांतीच्या. २ इंद्रियनिग्रह. ३ विधियुक्त कर्मे. ४ भोंवरा, वळसा. ५ वळणें. ६ असावधपणा आदि. ७ चमकतात. ८ मोठे मासे. ९ धरण. १० पूर. ११ तरंगतात. १२ पुरांतील लांकडें केर कचरा इत्यादि. १३ विषयसुखाचा. १४ जीव हेच फेस त्यांचा समुदाय. १५ पुष्कळ. १६ लाटा, चंचलतेनें. १७ विद्या, धन, सामर्थ्य हे तीन मद. १८ विषयतरंगांच्या. १९ लाटा. २० उज्वा, प्रसार. २१ पूर. २२ धरण, डोह. २३ शरीरें. २४ अत्यंत मोह. २५ मासें. २६ वांकडे, मोठे. २७ भोंवरे. २८ गढूळ पाणी. २९ घसरलें, संपलें. ३० दलदल. ३१ खळखळ वाजणारे ओढे. ३२ प्रवाह, धारा. ३३ मोठे. ३४ कठिण. ३५ झरे, उत्कर्षानें. ३६ आकळिती, विरवळवितात. ३७ बुरूज. ३८ घाईनें. ३९ त्वरेनें. ४० प्रवाह. ४१ आश्चर्य. ४२ तरण्याचा उपाय. ४३ हानि. ४४ आत्मबुद्धीच्या अभिमानानें. ४५ बाहुबळानें. ४६ ज्ञानाच्या. ४७ ऋक्, यजु, साम. ४८ मीपणाच्या. ४९ गर्वरूप माशाच्या. ५० वयाचें. ५१ बळ. ५२ मदनाच्या. ५३ विषयरूप सुसरीनें. ५४ बुद्धिभ्रंशाच्या. ५५ जाळें. ५६ कौटाळिले जातात.

आणि शोकाचा कडा उपडत । क्रोधाच्या आवर्तीं दाटत । आपदागिधीं चुंबिजत । उधवलीठायीं ॥ ८७ ॥ मग दुःखाचेनि * बरेंबटें बोबलें । पाठीं मरणाचे रेवें रेवलें । ऐसे कामाचे कासे लागले । ते गेले वायां ॥ ८८ ॥ एकीं यजनक्रियेची पेटी । बांधोनि घातली पोटीं । ते स्वर्गसुखाच्या कपाटीं । शिरकोनि ठेले ॥ ८९ ॥ एकीं मोक्षीं लागावयाचिया आशा । केला कर्मबाह्यांचा भरंवसा । परी ते पडिले वळसां । विधिनिषेधांच्या ॥ ९० ॥ जेथ वैराग्याची नाव न रिगे । विवेकाचा तांगा नलगे । वरि कांहीं तरोंये योगें । तरी विपाय तो ॥ ९१ ॥ ऐसें तरी जीवाचिये आंगवणें । इये मायानदीचें † तरणें । हें कासयासारिखें बोलणें । ह्मणावें पां ॥ ९२ ॥ जरी अपथ्यशीळा व्याधी । नाकळे साधूंसि दुर्जनाची बुद्धी । कीं रोंगी सांडी सिद्धी । आली सांती॥९३॥ जरी चोरा सभा दोटे । अथवा मीना गळ घोंटे । ना तरी भेडी उलटे । विवेसी जरी ॥ ९४ ॥ पोडस वागुरें करांडी । कां मुंगी मेरु वोलांडी । तरी मायेची पैलथडी । देखती जीव ॥ ९५ ॥ ह्मणऊन गा पंडुसुता । जैसी सकामा न जिणवेचि वनिता । तेवीं मायामय हे सरिता । न तरवे जीवां ॥ ९६ ॥ [मामेव ये प्रपद्यंते] येथ एकचि लीला तरले । जे सर्वभावें मज भजले । तयां ऐलीचें थडी सरलें । मायाजळ ॥ ९७ ॥ जयां सद्गुरु तारूं फुडें । जे अनुभवाचे कासे गाढे । जयां आत्मनिवेदन तरांडें । आकळलें ॥ ९८ ॥ जे अहंभावाचें वोझें सांडुनी । विकल्पाचिया झुळका चुकाउनि । अनुरागाचा निरुता होउनी । पाणिदेंडाळ॥९९॥जया ऐक्याचिया उतारा । बोधाचा जोडला तीरा । मग निवृत्तीचिया पैल तीरा । झेंपावले जे ॥ १०० ॥ ते उपरतीच्या वावीं ‡सेलंत । सोहंभावाचेनि थावें पेलंत । मग निघाले अनकळित । निवृत्तितटीं ॥ १ ॥ येणें उपायें मज भजले ॥ [मायामेतां तरंति ते] ते हे माझी माया तरले । परि ऐसे भक्त विपाइले । बहुवस नाहीं ॥ २ ॥

---

* बरटें. † उतरणें. ‡ झेलत.

---

१ भोंवऱ्यांत. २ आपत्तिरूप गिधाडांनीं. ३ टोंचले जातात. ४ निघाले जागीं. ५ चिखलांत. ६ माखले. ७ वाळूंत. ८ रुतले. ९ यज्ञादिकांची. १० पेटींत. ११ अडकून. १२ बाह्य कर्मांचा. १३ प्रवाहामध्यें. १४ कर्तव्याकर्तव्याच्या. १५ लाग, दोर. १६ अपाय. १७ स्वाधीन होणें. १८ पथ्य न करणारास. १९ आकळली जात नाहीं. २० विषयासक्त. २१ आली असतां. २२ भय पावे. २३ मत्स्याला. २४ भितरा. २५ पिशाच. २६ हरणाचें पोर. २७ दावें, जाळें. २८ कुरतुडी, तोडी. २९ परतीर. ३० विषयी पुरुषास स्त्री जिंकवत नाहीं. ३१ नदी. ३२ सहज. ३३ अलीकडच्याच कांठीं. ३४ जाहाज. ३५ बळकट. ३६ आत्मा ईश्वरास समर्पण करणें. ३७ तारूं. ३८ सांपडलें. ३९ अहंभावाचा. ४० पायउतार. ४१ सांगड. ४२ पावले, झेंप मारीत गेले. ४३ वैराग्याच्या. ४४ हातांनीं. ४५ तरंगतात. ४६ मीच ईश्वर अशा भावाच्या. ४७ बळें. ४८ पोंहत. ४९ अक्लेश. ५० मुक्तीच्या जवळ. ५१ विरळा, क्वचित्.

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यंते नराधमाः ।
माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥ १५ ॥
चतुर्विधा भजंते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ १६ ॥

[मूढाः] जे बहुतां एकां अवांतर । अहंकाराचा भूतसंचार । जाहाला ह्मणोनि विसर । आत्मबोधाचा ॥ ३ ॥ [दुष्कृतिनः] ते वेळीं नियमाचें वस्त्र नाठवे । पुढील अधोगतीची लाज नेणवे । आणि करितात जें न करावें । वेद ह्मणे ॥ ४ ॥ [नराधमाः] पाहें पां शरीराचिया गांवा । जयालागीं आले पांडवा । तो कार्यार्थ आघवा । सांडूनियां ॥ ५ ॥ [आसुरं भावमाश्रिताः] इंद्रियग्रामींचे राजबिदी । अहंममतेचिया जल्पवादीं । विकारांतरांची मांदी । *मेळवूनियां ॥ ६ ॥ [माययापहृतज्ञानाः] दुःखशोकाच्या घाईं । मारिलियाची सेचि नाहीं । हें सांगावया कारण काई । जे ग्रासिले मायां ॥ ७ ॥ [मां न प्रपद्यंते] ह्मणोनि ते मातें चुकले । [चतुर्विधा इति] ऐका चतुर्विध मज भजले । जिहीं आत्महित केलें । वाढतें गा ॥ ८ ॥ [आर्त इति] तो पहिला आर्त ह्मणिजे । दुसरा जिज्ञासु बोलिजे । तिजा अर्थार्थी जाणिजे । ज्ञानिया चौथा॥९॥

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥ १७ ॥

[तेषां] तेथ आर्त तो आर्तीचेनि व्याजें । जिज्ञासु तो जाणावयालागीं भजे । तिजेनि तेणें इच्छिजे । अर्थसिद्धि ॥ ११० ॥ मग चौथियाच्या ठायीं । कांहींचि करणें नाहीं । ह्मणोनि भक्त एक पाहीं । ज्ञानिया जो ॥ ११ ॥ [ज्ञानी नित्ययुक्तः] जे तया ज्ञानाचेनि प्रकाशें । फिटलें भेदाचें कवडसें । मग मीचि जाहाला समरसें । आणि भक्तही तेविंचि ॥ १२ ॥ परी आणिकांचिये दिठी नोवेक । जैसा स्फटिकचि भासे उदक । तैसा ज्ञानी †नव्हे कौतुक । सांगतां तो ॥ १३ ॥ जैसा वारा कां गगनीं विरे । मग वारेपण वेगळें नुरे । तेविं भक्त हे पैजे न सरे । जरीं ऐक्या आला ॥ १४ ॥ [एकभक्तिर्विशिष्यते]

* मेळविताती. † नोहे.

१ आडमार्ग, अन्य. २ आत्मज्ञानाचा. ३ सर्व. ४ इंद्रियसमूहाच्या. ५ राजमार्गांत. ६ बडबडीनें. ७ समुदाय. ८ आठवण. ९ चार प्रकारचे. १० संसारपीडित, रोगी. ११ ज्ञानप्राप्ति इच्छिणारा. १२ धनादिकांची इच्छा करणारा. १३ ज्ञानी, जाणता. १४ निमित्तें. १५ तिसऱ्या अर्थार्थ्यानें. १६ अंधार, पडच्छाया. १७ साम्यानंदरसानें, ऐक्यानें. १८ लोकदृष्टया. १९ क्षणभर. २० शांत होतो. २१ तसा जरी ऐक्याला आला तरी भक्त हा बाणा जात नाहीं. २२ प्रतिज्ञा.

जरी पवन हालवूनि पाहिजे । तरी गगनावेगळा देखिजे । येऱ्हवीं गगन तों सहजें । असे जैसें ॥ १५ ॥ तैसें शरीरीं हेन कर्में । तो भक्त ऐसा गमे । परी * अंतरप्रतीतिधर्में । मीचि जाला ॥ १६ ॥ [प्रियो हीति] आणि ज्ञानाचेनि उजिडलेपणें । मी आत्मा ऐसें तो जाणे । ह्मणऊनि मीही तैसेंचि ह्मणें । उचंबळलासांता ॥१७॥ हां गा जीवापैलीकडिली खुणे । जो पावोनि वावरों जाणे । तो देहाचेनि वेगळेपणें । काय वेगळा होय ॥ १८ ॥

उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥ १८॥

[उदारा इति] ह्मणोनि आपुलाल्या हिताचेनि लोभें । मज आवडे तोही भक्त झोंबे । परी मीचि करी वोलभें । ऐसा ज्ञानिया एक ॥ १९ ॥ पाहें पां दुभतेयाचिया आशा । जग धेनूसि करीतसे फांसा । परि दोरेंवीण कैसा । वत्साचा बळी ॥ १२० ॥ कां जे तनुमनप्राणें । तें आणिक कांहींचि नेणें । देखतसांतें ह्मणे । हे माय माझी ॥ २१ ॥ तें येणेंमानें अनन्यगती । ह्मणऊनि धेनूही तैसीचि प्रीती । तयालागीं लक्ष्मीपती । बोलिले साचें ॥ २२ ॥ हें असो मग ह्मणितलें । जे कां तुज सांगीतलें । तेही भक्त भले । पढियंते आह्मां ॥ २३ ॥ [आस्थित इति] परि जाणोनियां मातें । † जे पाहों विसरले ‡मागुतें । जैसें सागरा येऊनि सरिते । मुरडावें ठेलें ॥२४॥ तैसी अंतःकरणकुहरीं §जन्मली । जयाची प्रतीतिगंगा मज मीनली । तो मी हे काय बोली । फार करूं ॥ २५ ॥ येऱ्हवीं ज्ञानिया जो ह्मणिजे । तो चैतन्यचि केवळ माझें । हें न ह्मणावें परि काय कीजे । ¶न बोलेणें बोलों ॥ २६ ॥

बहूनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ १९ ॥

[बहूनां जन्मनामंते] जे तो विषयाची ||मोठी झाडी । माजि कामक्रोधांचीं सांकडीं । चुकावूनि आला पांडीं । सद्वासनेचिया ॥ २७ ॥ मग साधुसंगें

---

* अंतरें. † जो पाहों विसरला. ‡ मागौतें. § उपजली. ¶ न बोलों बोलें. || दाट झाडी.

---

१ वारा. २ समुच्चयार्थक अव्यय. ३ वाटतो. ४ स्वानुभवानें. ५ उदयानें. ६ हर्षयुक्त झाला असतां. ७ व्यवहार करण्यास जाणतो. ८ हवा तो. ९ प्रीति. १० दांवें. ११ वासराचा बळकट फांस. १२ पाहतांच. १३ यात्प्रकारें. १४ अन्य आधाररहित. १५ गाईलाही. १६ खरें. १७ आवडते. १८ माघारें. १९ नदीला. २० माघारें उलटणें राहिलें. २१ गुहेंत. २२ अनुभव हीच गंगा. २३ मिळाली. २४ जीव, चिच्छक्ति. २५ हें सांगूं नये पण उपाय नाहीं. २६ संकटें, अडचणी. २७ पहाडीं.

सुभटा । उजू सत्कर्मांचिया वाटा । अप्रवृत्तीचा अव्हांटा । डोंवलूनी ॥ २८ ॥ आणि जन्मशतांचा वाहतवणा । तेविं आस्थेचिया नें लेचि वाहणा । तेथ फळहेतुचा उगाणा । कवण चाळी ॥ २९ ॥ ऐसा शरीरसंयोगाचिये राती । माजि धांवतां सडियां आयती । तंव कर्मक्षयाची पाहाती । पाहांट जाली ॥ १३० ॥ [ज्ञानवान्] तैसीच गुरुकृपा उखा उजळली । ज्ञानाची वोतपली पडली । तेथ साम्याची ऋद्धि उघडली । तयाचिये *दृष्टी ॥३१॥ [मां प्रपद्यते] ते वेळीं जयाकडे वास पाहे । तेउता मीचि तया एक आहें । अथवा निवांत जरीं राहे । तन्हीं मीचि तया ॥ ३२ ॥ हें असो आणिक कांहीं । तया सर्वत्र मीवांचूनि नाहीं । जैसें सबाह्य जळ डोहीं । बुडालिया घटा॥३३॥ तैसा तो मजभीतरी । मी तया आंत बाहेरी । हें सांगिजेल बोलवरी । तैसें नव्हे ॥ ३४ ॥ ह्मणोनि असो हें इयापरी । तो देखे ज्ञानाची वाखारी । तेणें †संसरलेनि करी । आप विश्व ॥ ३५ ॥ [वासुदेवः सर्वमिति] हें समस्तही श्रीवासुदेव । ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भाव । ह्मणोनि भक्तांमाजी राव । आणि ज्ञानिया तोचि ॥ ३६ ॥ [स महात्मा सुदुर्लभः] जयाचिये प्रतीतीच्या वाखारां । पवाड होय चराचरा । तो महात्मा धनुर्धरा । दुर्लभ आथी ॥ ३७ ॥ येर बहुत जोडती किरीटी । जयांचो भजनें भोगासाठीं । जे आशातिमिरें दृष्टी । ‡मंद जाले ॥३८॥

कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यंतेऽन्यदेवताः ।

तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥ २० ॥

[कामैरिति] आणि फळाचिया हांवा । हृदयीं कामा जाला रिगावा । कीं तयाचिये धसणी दिवा । ज्ञानाचा गेला ॥ ३९ ॥ ऐसे उभयतां §आंधारीं पडले । ह्मणोनि पासींचि मातें चुकले । मग सर्वभावें अनुसरले । देवतांतरा ॥ १४० ॥ [प्रकृत्या नियताः स्वया] आधींच प्रकृतीचे पाइक । वरि भोगालागीं तंव रंकें । मग तेणें लोलुपत्वें कौतुक । कैसेनि भजती ॥ ४१ ॥ [तं तं नियममास्थाय] कैवणी तिया नियमबुद्धि । कैसिया हन उपचारसमृद्धि । कां अर्पण यथाविधि । विहित करणें ॥ ४२ ॥

---

* दिठी. † संचरलेनि. ‡ विषयमंद, +विषयांध जाले. § अंधारें पडलें.

१ वीरश्रेष्ठा अर्जुना. २ नीट. ३ आडमार्ग. ४ डावेकडे टाकून. ५ वाटसरू, प्रवासी. ६ धारण करीत नाहीं. ७ मार्ग, वहाणा, पादुका. ८ गणना. ९ रात्रीमध्यें. १० सडा, संगरहित, एकटा. ११ उजेडाची. १२ उषःकाळ, प्रातःकाळ. १३ कोवळें ऊन. १४ ऐश्वर्य. १५ वाट, मार्ग. १६ तेवढा. १७ आंत बाहेर सर्वत्र. १८ वाचेनें, शब्दानें. १९ व्यापार, दुकान. २० त्याचा सर्व व्यवहार मीच हें सर्व जग असें होऊन. २१ स्वानुभवाचा. २२ श्रेष्ठ. २३ विस्तार, महत्व. २४ आहे. २५ इच्छारूप अंधकारानें. २६ इच्छेनें. २७ संघट्टनानें, परिचयानें. २८ ~~इहपर, दोन मकारचे वर सांगितलेले भक्त.~~ २९ जवळ असून. ३० आराधूं लागले. ३१ दास. ३२ दीन. ३३ लंपटपणानें. ३४ कोणत्या. ३५ उपायसंपत्ति.

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याऽचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ २१ ॥

[यो य इति] पैं जो जिये[1] देवतांतरीं । भजावयाची[2] चाड करी । [तस्य तस्येति] तयाची ते चाड पुरी । पुरविता मी ॥ ४३ ॥ देवोदेवीं मीचि पाहीं । हाही निश्चय त्यासि नाहीं । भाव ते ते ठायीं । वेगळाला धरी ॥ ४४ ॥

स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।
लभते च ततः कामान्मयैव विहितान्हि तान् ॥ २२ ॥

[स तयेति] मग *तिया[3] श्रद्धायुक्त । तेथिंचें आराधान जें उचित । तें सिद्धिवरी[4] समस्त । वर्तों[5]लागे ॥ ४५ ॥ [लभते इति] ऐसें जेणें जें भाविजे । तें फळ तेणें पाविजे । परी तेंही सकळ निपजे । मर्जचिस्तव ॥ ४६ ॥

अंतवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ।
देवान्देवयजो यांति मद्भक्ता यांति मामपि ॥ २३ ॥

[अंतवत्तु फलं तेषां] †परी ते भक्त मातें नेणती । जे कल्पनेबाहेरी न निघती । म्हणोनि कल्पित[6] फळा[7] पावती । अंतवंत[8] ॥ ४७ ॥ [तद्भवत्यल्पमेधसां] किंबहुना ऐसें भजन । तें संसाराचेंचि साधन । येर फळभोग तो स्वप्न । नावभरी[9] दिसे ॥ ४८ ॥ [देवान्देवज्ञयो यांति] हें असो परौतें[10] । मग[11] हो कां आवडतें । परि यजी[12] जो देवतांतें । तो देवत्वासीचि ये ॥ ४९ ॥ [मद्भक्ता यांति मामपि] येर तनुमनप्राणीं । जे ‡ अनुसरले माझेयाचि वाहणीं[13] । ते देहाच्या निर्वाणीं[14] । मीचि होती ॥ १५० ॥

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते मामबुद्धयः ।
परं भावमजानंतो ममाव्ययमनुत्तमम् ॥ २४ ॥

[अबुद्धयः] परी तैसें न करिती प्राणिये । वांयां आपुल्या हितीं[15] वाणिये[16] । जे पोंहताति[17] पाणियें । तळहातिंचेनी ॥ ५१ ॥ [ममाव्ययं] नाना अमृताच्या सागरीं बुडिजे । मग तोंडा कां वज्रमिठी[18] पाडिजे[19] । आणि मनीं तरीं आठविजे । थिल्लरोदकातें[20] ॥ ५२ ॥ हें ऐसें कोसया[21] करावें । जें अमृतींही रिगोनि

* तया. † जरी. ‡ निरंतर.

१ ज्या, ज्या. २ इच्छा. ३ त्या, त्या. ४ पूजन. ५ सिद्धि होईपर्यंत. ६ करूं लागतो. ७ इच्छावें. ८ मजपासून. ९ इच्छिलेल्या. १० नाश पावणारें. ११ क्षणभर. १२ एकीकडे. १३ मग पाहिजे तें होवो. १४ पूजनादि करी. १५ मार्गी. १६ शेवटीं. १७ कल्याणाविषयीं. १८ तोटा करतात. १९ अथवा. २० घट्ट मिठी. २१ डबक्यांतील पाण्यास. २२ कां.

मरावें । तें सुखें अमृत होऊनि कां [१]नसावें । अमृतामाजी ॥ ५३ ॥ तैसा फळहेतूचा पांजरा । सांडूनियां धनुर्धरा । [अनुत्तमं] [२]कां प्रतीतिपाखीं चिदंबरा । [३]गोसावियां नोहावें ॥ ५४ ॥ जेथ उंचावलेनि पवाडें । सुखाचा पैसार जोडे । आपुलेनि [४]सुरवाडें । उडों ये ऐसा ॥ ५५ ॥ [अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते मां] तया उपमा माप कां [५]सुवावें । मज [६]अव्यक्ता व्यक्त कां मानावें । सिद्ध असतां कां *[७]निमावें । [८]सोधनवरी ॥ ५६ ॥ [परं भावमजानंतो] परि हा बोल आघवा । जरी विचारिजेतसे [९]पांडवा । तरी विशेषें या जीवा । न [१०]चोजवे गा ॥ ५७ ॥

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ।
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ २५ ॥

[योगमायासमावृतः] कां जे [११]योगमायापडळें । मूढोऽयं-लोकः] हे जाले आहाती आंधळे । [नाहं प्रकाशः सर्वस्य] ह्मणोनि प्रकाशाचेनि [१२]देहबळें । [नाभिजानाति] न देखती मातें ॥ ५८ ॥ [मां] येन्हवीं मी नसें ऐसें । †काय वस्तुजात असे । [अजं] पाहें पां ‡लवण जळरसें । रहित आहे ॥ ५९ ॥ [अव्ययं] [१३]पवन कवणातें न शिवेचि । आकाश [१४]कें न [१५]समायेचि । हें असो एक मीचि । विश्वीं आहें ॥ १६० ॥

वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ।
भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥ २६ ॥

[वेदाहं समतीतानि] येथें भूतें जियें §आहाति [१६]जेतुलीं । तियें मीचि होऊनि [१७]ठेलीं । [वर्तमानानि चार्जुन] आणि ¶[१८]वर्तत आहाति जेतुलीं । तींही मीचि ॥६१॥ [मां तु वेद न कश्चन] कां [१९]भविष्यमाणें जियें हीं । तींही मजवेगळीं नाहीं । हा [२०]बोलचि येन्हवीं कांहीं । होय ना जाय ॥ ६२ ॥ दोराचिया सापासी । डोबां [२१]बडियां ऐसी । संख्या न करवे कोण्हासी । तेविं भूतांसि [२२]मिथ्यत्वें ॥ ६३ ॥ ऐसा मी पंडुसुता । [२३]अनुस्यूत सदां असतां । या ||[२४]संसार जो भूतां ।

---

* नेमावें. † कांहीं. ‡ कवण. § अतीतलीं. ¶ वर्ततें. || संसाररजो भूतां.

---

१ न राहावें. २ पिंजरा, (शरीर.) ३ अनुभवरूपपंखानें. ४ चिदाकाशास. ५ धनी कां होऊं नये. ६ विस्तार, महत्वानें. ७ पिसारा. ८ सुखानें, इच्छेनुरूप. ९ घालावें. १० स्पष्ट नसणाराला. ११ नेम मारावें. १२ सिद्धीपर्यंत. १३ विचार करितां. १४ समजत नाहीं. १५ आदिमायेच्या पडद्यानें. १६ दिवसाच्या बळानें. १७ वायु. १८ कोठें. १९ सामावत नाहीं. २० जितकीं. २१ राहिलीं. २२ पुढें होणारीं. २३ हें बोलायाचेंच. २४ काळा. २५ कवडा. २६ खोटेपणानें. २७ अखंड. २८ या भूतांला जो संसार म्हणून आहे तो निराळ्या शब्दानें.

तो आनें बोलें ॥६४॥ तरि तेचि आतां थोडीसी । गोठी[1] सांगिजेल परियेसीं । जेथ अहंकारतनूसी । वोलभ[3] पडिलें ॥ ६५ ॥

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत ।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यांति परंतप ॥ २७ ॥

[इच्छाद्वेषसमुत्थेन] तेथ इच्छा हे कुमारी[4] जाली । मग ते कामाचिया तारुण्या आली । तेथ द्वेषेंसी मांडिली । वैराडिक[5] ॥ ६६ ॥ [द्वंद्वमोहेन भारत] तया दोघांस्तव जन्मला । ऐसा द्वंद्वमोह जाला । मग तो आजेयानें[6] वाढविला । अहंकारें ॥ ६७ ॥ तो धृतीसि[7] सदां प्रतिकूळ । नियमाही नांगवे[8] *स्थूळ । आशारसें[9] दोंदिल[10] । जाला सांता[11] ॥ ६८ ॥ असंतुष्टीचिया मदिरा[12] । मत्त होवोनि धनुर्धरा । विषयाचे वोवरां[13] । विकृतीसी[14] असे ॥ ६९ ॥ तेणें भावशुद्धीचिया वाटे[15] । विखुरले[16] विकल्पाचे कांटे । मग चिरिले[17] अव्हांटे[18] । अप्रवृत्तीचे ॥१७०॥ [सर्वभूतानि संमोहं] तेणें भूतें भांबावलीं[19] । [सर्गे यांति परंतप] म्हणोनि संसाराचिया ओडवामाजि[20] पडिलीं । मग महादुःखाच्या घेतलीं[21] । वोढी[22] वरी ॥ ७१ ॥

येषां त्वंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजंते मां दृढव्रताः ॥ २८ ॥

[येषां त्वंतगतं पापं] ऐसे विकल्पाचे वोयाणें[23] । कांटे देखोनि †सिणोणे[24] । जे मतिभ्रमाचें ‡पासावणें[25] । घेतीचिना ॥ ७२ ॥ उजू[26] एकनिष्ठेच्या पाउलीं । रगडूनि विकल्पाचिया भोलीं[27] । महापातकांची सांडिली । अटवी[28] [जनानां] जिहीं ॥ ७३ ॥ [पुण्यकर्मणां] मग पुण्याचे धांवा[29] घेतले । [भजंते मां दृढव्रताः] आणि माझी जवळीक[30] पावले । [ते द्वंद्वमोहनिर्मुक्ताः] किंबहुना ते चुकले । वाटवधेयां[31] ॥ ७४ ॥

जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतंति ये ।
ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाऽखिलम् ॥२९॥

[जरामरणमोक्षाय] येऱ्हवीं तरी पार्था । जन्ममरणाची निमे[32] कथा । [यतंति ये]

---

* सूळ, सवळ. † ससाणे. ‡ पासवणे.

---

१ गोष्ट. २ अभिमान व शरीर यांस. ३ प्रीति, सख्य. ४ मुलगी. ५ वऱ्हाड, लग्नसोहळा. ६ दोघांपासून. ७ आजानें. ८ धैर्यास. ९ विरोधी. १० न सांपडे. ११ दांडगा. १२ आशारूप दुग्धानें पुष्ट झाला असतां. १३ मद्यानें. १४ कोठडीमध्यें. १५ स्वभावशुद्धीनें. १६ पसरले. १७ काढले, फोडले. १८ आडमार्ग. १९ कुमार्गाचे. २० भ्रमलीं. २१ अरण्यांत. २२ स्वाधीन केला. २३ दांडे. २४ निष्फळ, व्यर्थ. २५ तीक्ष्ण. २६ सन्निध, जवळ होणें. २७ नीट. २८ भ्रमस्थानें. २९ अरण्य. ३० मदतीनें. ३१ सान्निध्य. ३२ वाटमाऱ्यांला. ३३ संपे.

ऐसिया प्रयत्नाते[1] आस्था । विये[2] जयाची ॥ ७५ ॥ [ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नं] तया तो प्रयत्नचि एके वेळे । मग समग्र परब्रह्में फळे । जया पिकलेया रस गळे । पूर्णतेचा ॥ ७६ ॥ ते वेळीं कृतकृत्यता[3] जग भरे । [अध्यात्मं कर्म चाखिलं] तेथ अध्यात्माचें[4] नैवलपण[5] पुरे । कर्माचें काम सरे । विरमे[6] मन ॥ ७७ ॥ ऐसा अध्यात्मलाभ तया । होय गा धनंजया । [मामाश्रित्य] भांडवल जया । उद्यमीं[7] मी ॥ ७८ ॥ तयातें साम्याचिये वाढी[8] । ऐक्याची संदि[9] कुळवाडी । तेथ भेदाचिया दुर्बळवाडी[10] । नेणिजे तया ॥ ७९ ॥

साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ।
प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥ ३० ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानविज्ञानयोगो नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

[साधिभूताधिदैवं मां] जिहीं साधिभूता[11] मातें । प्रतीतीचेनि[12] हातें । *धरूनि अधिदैवातें । शिवतलें गा ॥ १८० ॥ [साधियज्ञं च ये विदुः] जया जाणिवेचेनि वेगें । मी अधियज्ञ दृष्टी रिगें । [प्रयाणकालेऽपि च मां] ते तनूचेनि वियोगें । विन्हिये[13] नव्हती ॥ ८१ ॥ येऱ्हवीं आयुष्याचें सूत्र विघडतां । भूतांची उमटे[14] खंडाडता[15] । काय न मरतयाहि चित्ता । युगांत[16] नोहे ॥ ८२ ॥ परि नेणों कैसें पैं गा । जे जडोनि गेले माझिया आंगा । ते प्रयाणींचिया लगबगा । न सांडितीच मातें ॥ ८३ ॥ [ते विदुर्युक्तचेतसः] येऱ्हवीं तरी जाण । ऐसे जे निपुण । तेचि अंतःकरण । युक्त योगी ॥ ८४ ॥ [उत्तराध्यायबीजं] तंव इये शब्दकुपिकेतळीं[17] । नोडवेचि[18] अवधानाची[19] अंजुळी । जे नावेक अर्जुन तये वेळीं । मागांचि होता ॥ ८५ ॥ जेथ तद्ब्रह्मवाक्यफळें[20] । जियें नानार्थरसें रसाळें । †बहुतकें आहाति परिमळें[21] । भावाचेनि ॥ ८६ ॥ सहज कृपामंदा[22]निळें । श्रीकृष्णद्रुमाचीं वचनफळें । अर्जुन श्रवणाचिये[23] खोळे । अवचिति पडिलीं ॥ ८७ ॥ तियें प्रमेयांचीं[24] हो कां वळलीं । कीं ब्रह्मरसाच्या सागरीं चुबकळिलीं । मग तैसींच कां घोळिलीं । परमानंदें ॥ ८८ ॥ तेणें बरवेपणें निर्मळें । अर्जुना ‡उन्मेषाचे[25] डोहळे । घेताति[26] गळाले[27] । विस्मयामृताचे ॥८९॥ तिया सुखसंपत्ती जोडलिया । मग स्वर्गा[28] वांये[29] वांकुलिया । हृदयाच्या

---

* वरूनि. † बहुतें. ‡ अनिमेषाचे.

---

१ उत्पन्न करी. २ सफलतेनें. ३ आत्मज्ञानाचें. ४ नवेपणा. ५ शांत होतें. ६ व्यापारांत ७ व्याज. ८ सिद्ध होते. ९ संपत्ति. १० दैन्य. ११ साकाराला. १२ प्रतीतीशीं लग्न लागून. १३ दुःखी. १४ क्षोभ. १५ प्रळय. १६ शब्दरूप शिशी. १७ प्राप्त होत नाहीं. १८ सावधपणाची. १९ उपाधिनिरासपूर्वक आत्मज्ञानरूप फळें. २० पसरलेलीं. २१ मंद सुगंध बारीक वारा. २२ ओटींत, कानीं. २३ सारवस्तूचीं. २४ ज्ञानाचे. २५ घोट, रसधारा. २६ दाखवी. २७ वेडावणें.

जीवीं गुतकुलिया । होत आहाती ॥ १९० ॥ ऐसें वैरचिलीचि बरवा । सुख
जावों लागलें फावा । तंव रसस्वादाचिया हांवा । लाहो केला ॥ ९१ ॥
झडकरी अनुमानाचेनि करतळें । घेऊनि तियें वाक्यफळें । प्रतीतिमुखीं एके
वेळे । घालूं पाहे ॥ ९२ ॥ तंव विचाराचिया रसना न दाटती । परि हेतूच्या
दशनीं न फुटती । ऐसें जाणोनि सुभद्रापती । चुंबीर्चिना ॥ ९३ ॥ मग चम-
त्कारला ह्मणे । इयें जळींचीं मा तारांगणें । कैसा झंकविलों असलागपणें ।
अक्षरांचेनि ॥ ९४ ॥ इयें पदें नव्हती फुडिया । गगनाचिया घडिया । येथ
आमुची मती बुडोलिया । थांव न निघे ॥ ९५ ॥ वांचूनि जाणावयाची कें
गोठी । ऐसें जीवीं कल्पूनि किरीटी । तिया पुनरपि केली दृष्टी । यादवेंद्रा
॥ ९६ ॥ मग विनविलें सुभटें । हां हो जी यें एकवाटे । सांतही पदें अनु-
च्छिष्टें । नवलें *आहाती ॥ ९७ ॥ येऱ्हवीं अवधानाचेनि वेंहिलेपणें । नाना
प्रमेयांचे उगाणे । काय श्रवणाचेनि आंगवेणें । बोलों †लाहाति ॥ ९८ ॥ परि
तैसें हें नोहेचि देवा । देखिला अक्षरांचा मेळावा । आणि विस्मयाचिया
जीवा । विस्मयो जाला ॥ ९९ ॥ कानाचेनि गवाक्षद्वारें । बोलाचें रश्मी अ-
भ्यंतरें । पाहेना तंव चमत्कारें । अवधान ठाकलें ॥ २०० ॥ तेविंचि अर्थाची
चाड मज आहे । ते सांगतांही वेळ न साहे । ह्मणूनि निरूपण लवलाहें ।
किजो देवा ॥ १ ॥ असा मागील पडेताळा घेउनी । पुढां अभिप्राय ‡ दृष्टी
सूनी । तेविंचि माजि शिरऊनि । आर्ती आपुली ॥ २ ॥ कैसी पुसती पाहे
पां जाणिव । भिडेची तरी लंघों नेदी शिवे । येऱ्हवीं श्रीकृष्ण हृदयासि खेवे ।
देवों सरला ॥ ३ ॥ अहो श्रीगुरूतें जैं पुसावें । तें येणेंमानें सावध व्हावें ।
हें एकचि जाणें आघवें । सव्यसाची ॥४॥ आतां तयाचें तें प्रश्न करणें । वरी
सर्वज्ञ श्रीहरीचें बोलणें । हें संजयो आंवडलेपणें । सांगेल कैसें ॥ ५ ॥ तिये
अवधान द्यावें गोठी । बोलिजेल नीट मऱ्हाठी । जैसी कानाचे आधीं दृष्टी ।
उपयोगा जाये ॥ ६ ॥ बुद्धिचिया जिभा । बोलाचा न चाखतां गाभा । अक्ष-
रांचिया भांबा । इंद्रियें जिती ॥ ७ ॥ पाहा पां मौलतीचे कळे । घ्राणासि कीर
वाटले परिमळें । परि वैरचिया बरवा काइ डोळे । सुखिये नव्हती ॥ ८ ॥

---

* पाहाती. † राहाती. ‡ दिठी सूनि.

---

१ गुदगुल्या. २ बाहेरच. ३ प्रसर. ४ इच्छा. ५ प्रारंभ. ६ दडपत नाहींत. ७ दांतांनीं. ८ ओ-
ठास लावीना. ९ कीं हो. आश्चर्यार्थक अव्यय. १० फसलों. ११ सुगमपणें. १२ खऱ्या. १३ ठिकाण,
अंत लागत नाहीं, मार्ग सांपडत नाहीं. १४ कोठें, दुरापास्त. १५ एकत्र. १६ ब्रह्म, अध्यात्म इत्यादि
सप्त शब्द. १७ निराळेपणें, वेगानें. १८ अनुभव, निकाल. १९ मानणें, बळ. २० सांपडतात.
२१ जमाव. २२ झरोक्यांतून. २३ किरण. २४ उजाडेना. २५ प्रत्यंतर. २६ शिरवून, घालून.
२७ सीमा. २८ आलिंगन. २९ यापमाणें. ३० प्रेमानें, आवडीनें. ३१ सार. ३२ भ्रांती, शोभा.
३३ मोगरीचे. ३४ नासिकेला. ३५ बाहेरच्या. ३६ सुरेखपणानें.

तैसें देशियेचिया[1] हेवावा[2] । इंद्रियें करिती राणिवा[3] । मग प्रमेयांचिया गांवां । लेसा[4] जाइजे ॥ ९ ॥ ऐसेनि नागरपणें[5] । बोल[6] निमे तें बोलणें । ऐका ज्ञानदेव ह्मणे । निवृत्तीचा ॥ २१० ॥

इति श्रीज्ञानेश्वरविरचितायां भावार्थदीपिकायां सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

श्लोक ३०, ओंव्या २१०.

---

१ मराठी भाषेच्या. २ शोभेनें. ३ राज्य. ४ सिद्धांताच्या ५ चांगलेपणें, सिद्धांनीं. ६ चांगुलपणानें. ७ बोल बंद करणारें.

ज्ञानेश्वरी.

अध्याय ८ वा.

अर्जुन उवाच—किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ।
अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥ १ ॥

[अर्जुन उवाच—]मग अर्जुनें ह्मणितलें । हां हो जी अवधारिलें । जें म्यां पुसिलें । तें निरूपिजे ॥ १ ॥ [किं तद्ब्रह्मेति] सांगा कवण तें ब्रह्म । कायसया[1] नाम कर्म । अथवा अध्यात्म । काय *ह्मणिपे ॥ २ ॥ [अधिभूतमिति] अधिभूत तें कैसें । एथ अधिदैवत तें कवण असे । हें उघड मी परियेसें । ऐसें बोला॥३॥

अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।
प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥ २ ॥

[अधियज्ञ इति] देवा अधियज्ञ तो काई । कवण पां इये देहीं । हें अनुमानासि[2] कांहीं । दिठी न भरे ॥४॥ [प्रयाणकाले इति] आणि नियता[3] अंतःकरणीं । तूं जाणिजशी[4] देहप्रयाणीं[5] । तें कैसेनि हें शार्ङ्गपाणी । परिसवा मातें ॥ ५ ॥ देखा धवळारीं[6] चिंतामणींचा । जरी पेंडुलां[7] होय दैवांचा । तरी वोसणतांही[8] बोल तयाचा । सोपें न वचे ॥ ६ ॥ तैसें अर्जुनाचिया बोलासवें । आलें तेंचि ह्मणितलें देवें । परियेसें गा बरवें । जें पुसिलें तुवां ॥ ७ ॥ किरीटी कामधेनूचा पांडा[9] । वरी कल्पतरूचा आहे मांदोडा[10] । ह्मणोनि मनोरथसिद्धीचिया †चाडा[11] । तो नवल नोहे ॥ ८ ॥ श्रीकृष्ण कोपोनि ज्यासि मारी । तो ‡पावे[12] परब्रह्मसाक्षात्कारीं[13] । मी कृपेनें उपदेश करी । तो कैशापरी न पवेल ॥ ९ ॥ जैं §कृष्णाचि होइजे आपण । तैं कृष्ण होय आपुलें अंतःकरण । तेथवां संकल्पाचें आंगण । वोळंगती[14] सिद्धी ॥ १० ॥ परि ऐसें जें प्रेम । तें अर्जुनींचि आथि निःसीम । ह्मणऊनि तयाचे कोंभ[15] । सदां सफळ ॥ ११ ॥ याकारणें श्रीअनंतें । तें मनोगत तयाचें पुसतें । होईल जाणूनि आइतें । वोगरूनि[16] ठेविलें ॥ १२ ॥ जें अपत्य थानीं निगे । तयाची भूक ते मातेसीचि लागे ।

---

* ह्मणिजे. † पाडा. ‡ पावे ब्रह्म. § कृष्णाचें.

---

१ कोणाला. २ डोळ्यांत भरत नाहीं. ३ नियमित. ४ समजशील. ५ अंतकाळीं. ६ चिंतलेलें देणाऱ्या मण्याच्या मंदिरांत. ७ निजला. ८ बरळतां. ९ व्यर्थ. १० खोंड. ११ मंडप. १२ तर मग. १३ आलिंगिती, रावतात. १४ इच्छा. १५ वाढून. १६ जें बालक स्तनपान करीत असतें.

येन्हवीं तें शब्दें काय सांगे। मग स्तन्य दे येरी ॥ १३ ॥ ह्मणवोनि कृपाळुवा गुरूचियाठायीं। हें नवल नोहे कांहीं। परि तें असो आइका काई। जें देव बोलते जाहाले ॥ १४ ॥

श्रीभगवानुवाच–**अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते।**
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥ ३ ॥

[श्रीभगवानुवाच—अक्षरं] मग ह्मणीतलें सर्वेश्वरें। जें आकारीं इये खोंकरें। कोंदलें[2] असत न खिरे[3]। कवणे काळीं ॥ १५ ॥ [ब्रह्म परमं] येन्हवीं सपुरपण[5] तयाचें पाहावें। तरि शून्यचि नव्हे स्वभावें। वरि गगनाचेनि पोलवें[6]। गाळूनि घेतलें[7] ॥ १६ ॥ जें ऐसेंही परि विरूळें[8]। इये विज्ञानाचिये खोळे[9]। हालवलेंही न गळे। तें परब्रह्म ॥ १७ ॥ [स्वभावोऽध्यात्ममुच्यते] आणि आकाराचेनि जालेपणें[10]। जन्मधर्मातें नेणें। आकारलोपीं निर्मणे[11]। नाहीं कहीं ॥ १८ ॥ ऐसिया आपलियाचि सहजस्थिती। जया ब्रह्माची नित्यता असती[12]। तया नाम सुभद्रापती[13]। अध्यात्म गा ॥ १९ ॥ [भूतभावोद्भवकरो] मग गगनीं जेविं निर्मळें। नेणों कैंचीं एक वेळें। उठती घनपटळें[14]। नानावर्णें ॥ २० ॥ तैसे अमूर्तीं तिये विशुद्धें[15]। महदादि भूतभेदें। ब्रह्मांडाचे बांधे[16]। होंचि लागती ॥ २१ ॥ पैं निर्विकल्पाचिये बरडी[17]। फुटे आदिसंकल्पाची विरूढी[18]। आणि ते सवेंचि मोडोनि ये[20] ढांढी[21]। ब्रह्मगोळकांच्या ॥ २२ ॥ तया एकैकाचे भीतरी[22] पाहिजे। तंव बीजाचाचि भरिला[23] देखिजे। माजि होतियां जातियां नेणिजे। लेखें[24] जीवां ॥ २३ ॥ [विसर्गः] मग तया ब्रह्मगोळकांचे अंशांश। प्रसवती आदिसंकल्प *असमास[25]। हें असो ऐसी बहुवस। सृष्टी वाढे ॥ २४ ॥ परि दुजेनवीण एकला। परब्रह्मचि संचला। अनेकत्वाचा आला। पूर जैसा ॥ २५ ॥ तैसें समविषमत्व नेणों कैंचें। वायांचि चराचर रचे। पाहातां प्रसवतिया[26] योनीचे। लक्ष दिसती[27] ॥ २६ ॥ [कर्मसंज्ञितः] †येरी[28] जीवभावाचिये पोलविये[29]। कांहीं मर्यादा करूं नये। पाहिजे कवण हें आघवें विये। तंव मूळ तें शून्य[30] ॥ २७ ॥ ह्मणूनि कर्ता मुदल न दिसे। आणि सेखीं कारणही कांहीं

---

* असमहास. † परी ऐसिया जीव.

---

१ मोडकें–भोंकांचें शरीर. २ दाट भरलेलें. ३ क्षरे, गळे. ४ भरपूरपण. ५ पदरानें. ६ अशा रीतीनें. ७ विरळ, सूक्ष्म. ८ जन्मलेपणें. ९ दृश्य वस्तूच्या नाशानंतर. १० लीन होणें, मरणें. ११ असणारी. १२ अर्जुना. १३ गडद ढगांचें पटल. १४ निराकार शुद्ध ब्रह्मांत. १५ प्रकृति अहंकारादिकांच्या. १६ आकार. १७ कल्पनातीत शुद्ध ब्रह्माच्या. १८ माळजमिनींत. १९ अंकुर, वाढ. २० दाट भरून. २१ आकार. २२ आंत पाहावें तों. २३ भरणा. २४ गणना. २५ असंख्यात. २६ उत्पन्न होणाऱ्या जाती लाखों दिसतात. २७ इतर व्यक्ति. २८ अंकुर. २९ कांहीं नाहीं. ३० शेवटीं.

नसे । माजि कार्यचि आपैसें । वाढोंचि लागे ॥ २८ ॥ ऐसा करितेनवीण गोचर । अव्यक्तीं हा आकार । निपजे जो व्यापार । तया नाम कर्म ॥ २९ ॥

अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥ ४ ॥

[क्षरो भावः] आतां अधिभूत जें ह्मणिपे । तेंही सांगों संक्षेपें । तरि होय आणि हारपे । अभ्र जैसें ॥ ३० ॥ तैसें असतेपण आहाच । नाहीं होइजे हें साच । जयातें रूपा आणिती पांचेंपांच । मिळोनियां ॥ ३१ ॥ [अधिभूतं] भूतांतें अधिकरूनि असे । आणि भूतसंयोगें तरि दिसे । जें वियोगवेळे अंशे । नामरूपादिक ॥ ३२ ॥ तयातें अधिभूत ह्मणिजे । [पुरुषश्चाधिदैवतं] मग अधिदैवत पुरुष जाणिजे । जेणें प्रकृतीचें भोगिजे । उपार्जिलें ॥ ३३ ॥ जो चेतनेचा चक्षु । जो इंद्रियदेशींचा अध्यक्षु । जो देहास्तमानीं वृक्षु । संकल्पविहंगमाचा ॥ ३४ ॥ जो परमात्माचि परि दुसरा । जे अहंकारनिद्रा निद्रसुरा । ह्मणोनि स्वप्नाचिया वोरंबारा । संतोषे शिणे ॥ ३५ ॥ जीव येणेंनावें । जयातें ओळविजे स्वभावें । तें अधिदैवत जाणावें । पंचायतनीचें ॥ ३६ ॥ [अत्र देहे] आतां इयेचि शरीरग्रामीं । [अधियज्ञोऽहं] जो शरीरभावातें उपशमी । तो अधियज्ञ एथ गा मी । पंडुकुमरा ॥ ३७ ॥ [एव] येर अधिदैवाधिभूत । तेहि मीचि कीर समस्त । परि पंधरें किडाळा मिळत । तें काय सांकें नोहे ॥ ३८ ॥ तरि तें पंधरेपण न मैळे । आणि किडाळाचियाही अंशा न मिळे । परि जंव असे तयाचेनि मेळें । *तंव सांकेचि ह्मणिजे ॥ ३९ ॥ तैसें अधिभूतादि आघवें । हें अविद्येचेनि पोलवें । झांकलें तंव मानावें । वेगळें ऐसें ॥ ४० ॥ तेचि अविद्येची जेवनीक फिटे । आणि भेदभावाची अवधी तुटे । मग ह्मणों एक होऊनि जरी आटे । तरि दोनी काय होती ॥ ४१ ॥ पैं केशांचा गुंडाळा । वरि ठेविली स्फटिकशिळा । ते जंव †पाहिजे डोळां । तंव भेदली ‡गमती ॥ ४२ ॥ पाठीं केश परौते नेले । आणि भेदलेपण काय नेणों जाहालें । तरि डांक देऊनि सांदिलें । शिळेतें काई ॥ ४३ ॥ नो ते अखंडचि आयती । परि संगें भिन्न गमली होती । ते सारिलिया मागौती ।

---

* तें काय सांकें नोहे. † पाहिली. ‡ गमली.

१ करणारावांचून प्रत्यक्ष. २ लटकें. ३ पंचमहाभूतें परस्परांत आपापला अष्टमांश मिळाल्यानें (पंचीकरण होऊन) पंचात्मक झालेलीं. ४ आश्रय करून. ५ उत्पन्न केलेलें. ६ बुद्धीचा द्रष्टा. ७मुख्य, अधिपति. ८ शरीराच्या अंतीं.९मनोरथरूप पक्ष्यांचा. १०परंतु दुसरा झाला. ११कारण. १२निजलेला, अडाणी. १३ खटपट. १४ बोलिजे, ह्मणावें. १५ ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, व अधिदैव. १६ लयातें पावबी. १७ पंधरांच्या दराचें सोनें. १८ हिणकटाला. १९ डाकलग. २० पदरानें. २१ पडदा. २२ अंतर, मर्यादा. २३ फुटलीसी दिसते. २४ एके बाजूस. २५ नाहीं तरी. २६ स्वाभाविक.

जैसी कां तैसी ॥ ४४ ॥ तेवींचि अहंभाव जाये । तरि ऐक्य तें आधींचि आहे । हेंचि साचें जेथ होये । तो अधियज्ञ मी ॥ ४५ ॥ पैं गा आह्मी तुज । सकळ यज्ञ [1]कर्मज । सांगीतले जें काज । मनीं धरूनि ॥ ४६ ॥ तो हा सकळ जीवांचा विसावा । [2]नैष्कर्म्यसुखाचा ठेवा । परि उघड करूनि पांडवा । दाविजत असे ॥ ४७ ॥ पहिलें *[3]वैराग्यइंधन परिपूर्तीं । इंद्रियानळीं प्रदीप्तीं । विषयद्रव्याचिया आहुती । देऊनियां ॥ ४८ ॥ मग [4]वज्रासन तेचि [5]उर्वी । शोधूनि [6]आधारमुद्रा बरवी । वेदिका रचे मांडवीं । शरीराच्या ॥ ४९ ॥ तेथ [7]संयमाग्नीचीं कुंडें । इंद्रियद्रव्याचेनि [8]पवाडें । यजिजती उदंडें । [9]युक्तिधोषें ॥५०॥ मग मनप्राणसंयमें । हाचि हवनसंपदेचा [10]संभ्रमें । येणें संतोषविजे निर्धूमें । [11]ज्ञानानळ ॥ ५१ ॥ ऐसेनि हें सकळ ज्ञानीं [12]समर्पे । मग ज्ञान तें [13]ज्ञेयीं हारपे । पाठीं ज्ञेयचि स्वरूपें । †निखिल उरे ॥ ५२ ॥ तया नांव गा अधियज्ञ । ऐसें बोलिला जंव सर्वज्ञ [14] । तंव अर्जुन अतिप्राज्ञ [15] । तया पातलें तें ॥ ५३ ॥ हें जाणोनि ह्मणितलें देवें । पार्था परिसत आहासि बरवें । या कृष्णाचिया बोलासवें । येरु [16]सुखाचा जाहाला ॥५४॥ देखा बाळकाचिया [17]धणी धाइजे । कां शिष्याचेनि [18]जोहालेपणें होइजे । हें सद्गुरूचि एकलेनि जाणिजे । [19]कीं प्रसवतिया ॥ ५५ ॥ ह्मणोनि सात्विकभावांची [20]मांदी । कृष्णा आंगीं अर्जुना आधीं । न [21]समातसे परी बुद्धी । सांवरूनि देवें ॥ ५६ ॥ मग पिकलिया सुखाचा परिमळ । कीं निवालिया अमृताचा [22]कल्होळ । तैसा कोंवळा आणि रसाळ । बोल बोलिला ॥ ५७ ॥ [देहभृतां वर] ह्मणे परिसणेयांच्या राया । आइकें बापा धनंजया । ऐसी जळों सरलिया माया । तेथ ‡जाळितें तेंही जळे ॥ ५८ ॥

अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।

यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥ ५ ॥

[मामेव] जें आतांचि सांगीतलें होतें । अगा अधियज्ञ ह्मणितला जयातें । जे [23]आधींचि तया मातें । [अंतकाले च] §जाणोनि अंतीं ॥ ५९ ॥ तें देह झोळ [24]

---

* वैराग्येंधनपरिपूर्ति. † निखळ. ‡ जाळितेंही. § जाणों अंतीं.

---

१ 'कर्मजान्विद्धि तान्सर्वान्' इत्यादि चतुर्थाध्यायांत जो हेतु मनांत धरून कर्मज यज्ञ सांगितले तो हेतु हा. २ अहेतुक कर्माचरणसुखाचा. ३ वैराग्य हेंच जळण. ४ शब्दस्पर्शादिकांच्या ५ दोन मुख्य आसनांपैकीं एक. ६ पृथ्वी. ७ योनिमुद्रा. (शिवसंहिता ४–१–७.) ८ ओटा. ९ इंद्रियनिग्रहरूप अग्नीचीं. १० विस्तार, प्रसिद्ध. ११ योगमंत्रानें. १२ निग्रह. १३ समारंभ. १४ धुरांविरहित. १५ ज्ञानाग्नि. १६ अर्पण करावें. १७ जाणावयाचें जें त्यामध्यें. १८ श्रीकृष्ण. १९ महाबुद्धिमान्. २० तो अर्जुन. २१ तृप्तीनें तृप्त व्हावें. २२ पक्वदशेनें. २३ अथवा. २४ मातेनें. २५ समुदाय. २६ मावत नाहीं. २७ सुगंध. २८ लाटा. २९ श्रोत्यांत श्रेष्ठ, श्रुतज्ञ. ३० अगोदर. ३१ मिथ्या.

ऐसें मानुनी । [स्मरन्] ठेलें[1] आपणपें आपण होउनी । जैसा[2] मेठ गगना भरूनी । गगनींचि असे ॥ ६० ॥ ये[3] प्रतीतीचिया माजघरीं । तया निश्चयाची वोवरी[4] । आली ह्मणोनि बाहेरी । *तन्हेचि[5] से ॥ ६१ ॥ ऐसें सबाह्य ऐक्य संचलें[6] । मीचि होऊनि असतां रचिलें । [मुक्त्वा कलेवरं] बाहेरि भूतांचीं पांचहीं खवळें[7] । नेणतांचि पडिलीं ॥ ६२ ॥ [यः प्रयाति] आतां उभयां[8] उभेपण नाहीं जयाचें । मा पडिलिया गोहन[9] कवण तयाचें । ह्मणोनि प्रतीतीचिये पोटींचें । पाणी न हाले ॥ ६३ ॥ ते ऐक्याची आहे वोतिली । कीं नित्यतेचिया हृदयीं घातली । जैसी समरससमुद्दीं[10] धुतली । रुळेचि[11] ना ॥ ६४ ॥ पैं अथावीं[12] घट बुडाला । तो आंत बाहेरी उदकें भरला । पाठीं दैवगत्या जरी फुटला । तरी उदक काय फुटे ॥ ६५ ॥ नातरी सर्पें[13] कवच[14] सांडिलें । कां उंबारेनें[15] वस्त्र फेडिलें । तरी सांग पां काय मोडलें । अवेवांमाजी[16] ॥ ६६ ॥ तैसा आकार हा[17] आहाच भ्रंशे । वांचूनि वस्तू ते सांचलीचि असे । तेचि[18] बुद्धि जालिया विसुकुसे[19] । कैसेनि आतां ॥ ६७ ॥ [स मद्भावं याति] ह्मणोनि यापरी मातें । अंतकाळीं जाणतसाते[20] । जे[21] मोकळिती देहातें । ते मीचि होती ॥६८॥ येन्हवीं तरी साधारण । उरीं[22] आदळलिया मरण । जो आठव धरी अंतःकरण । तेंचि होइजे ॥ ६९ ॥ जैसा कवण एक[23] कोकुळती[24] । पळतां पवनगती[25] । दुपावलीं[26] अवचितीं । कुहामाजि[27] पडियेला ॥ ७० ॥ आतां तया पडणयाआरौतें[28] । पडण चुकवावया परौतें[29] । नाहीं ह्मणोनि तेथें । पडावेंचि[30] पडे ॥७१॥ तेविं मृत्यूचेनि अवसरें एकें । जें येऊनि जीवासमोर ठाके । तें होणें मग न चुके । भलतयापरी[31] ॥ ७२ ॥ [नास्त्यत्र संशयः] आणि जागतां जंव असिजे । तंव जेणें ध्यानें भावना भाविजे । डोळां लागतखेंवो[32] देखिजे । तेंचि स्वप्नीं ॥ ७३ ॥

यं यं वाऽपि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरम् ।
तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥ ६ ॥

[यं यमिति] तेविं जितेनि[33] अवसरें । जें आवडोनि[34] जीवीं उरे । तेंचि मरणा-

---

* वृत्ति न वचे.

१ स्वतः, आपण. २ देऊळ, घर इत्यादि. ३ अनुभवाच्या. ४ कोठडी. ५ स्मरण. ६ आंतबाहेर. ७ भरलें. ८ खवलें, कवचें. ९ उभे असलेल्यांस. १० कठिण. ११ पूर्णानंदैक्यांत. १२ मळेचिना, धुळींत मिळेना. १३ खोल. १४ कांत टाकिली. १५ उष्णतेमुळें. १६ अवयवामध्यें. १७ वरचेवर नाशे. १८ बुद्धीनें जाणलें असतां. १९ गोंधळे, कासावीस होणें. २० जाणत असतां. २१ सोडिती. २२ उरावर येऊन आदळलें असतां. २३ दीनतेनें. २४ वाऱ्याप्रमाणें. २५ दोन पावलांत. २६ कुळ्यांत. २७ पडण्याच्या अगोदर. २८ नंतर. २९ लागे. ३० कोणच्याही तऱ्हेनें. ३१ संकल्पादि मानसिक भाव. ३२ लागतांच. ३३ जिवंत असतेसमयीं. ३४ हृदयांत राहतें.

चिये[१] मेरे । फार[२] हों लागे ॥ ७४ ॥ [तं तमिति] आणि मरणीं[३] जया जें आठवे। तो तेचि गतीतें[४] पावे ।

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युद्ध्य च ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयः ॥ ७ ॥

[तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर] ह्मणोनि सदां स्मरावें । मातेंचि तुवां ॥७५॥ डोळां जें देखावें । कां कानीं हन ऐकावें । मनीं जें भावावें । बोलावें वाचे ॥ ७६ ॥ तें आंत बाहेरि आघवें । मीचि करूनि घालावें । मग सवीं काळीं स्वभावें । मीचि आहें ॥ ७७ ॥ [युद्ध्य च] अर्जुना ऐसें[४] जाहालिया । मग न मरिजे[५] देह गेलिया । मा संग्राम केलिया । भय काय तुज ॥ ७८ ॥ [मय्यर्पितमनोबुद्धिः] तूं मन बुद्धि साचेंसी[६] । जरी माझिया स्वरूपीं अर्पिसी । [मामेवैष्यस्यसंशयः] तरी मातेंचि गा पावसी । हे माझी भाक ॥ ७९ ॥ हेंचि कैंयिसया[७] वरी होये । ऐसा जरी संदेह वर्तत आहे । तरी अभ्यासूनि आदीं पाहें । मग नव्हे तरी कोपें ॥ ८० ॥

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थाऽनुचिंतयन् ॥ ८ ॥

[अभ्यासयोगेति] येणेंचि अभ्यासेसीं योगू । चित्तासि करी पां चांगू । अगा उपायबळें पंगू । *पेंहाड[९] ठाकी ॥ ८१ ॥ [परमं पुरुषं दिव्यं] तेविं †सदभ्यास[१०] निरंतर । चित्तासि परमपुरुषाची मोहरे[११] । लावीं मग शरीर । राहो अथवा जावो ॥ ८२ ॥ [याति पार्थानुचिन्तयन्] जें नाना गतीतें पाववितें । तें चित्त वरीलें[१२] आत्मयातें । मग कवण आठवी[१३] देहातें । गेलें कीं आहे ॥ ८३ ॥ पैं सरितेचेनि ओघें । सिंधुजळा मीनले[१४] घोघें[१५] । ते काय वर्तत आहे मागें । ह्मणोनि ‡पाहों येती ॥ ८४ ॥ नां[१५] ते समुद्रचि होऊनि ठेले । तेविं चित्ताचें चैतन्य[१६] जाहालें । जेथें[१७] यातायात निमालें । घनानंद जें ॥ ८५॥

कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्यः ।
सर्वस्य धातारमचिंत्यरूपमादित्यवर्णं तमसः परस्तात् ॥९॥

---

* पाडीं ठाकी, वाट टांकी. † सदभ्यासें. ‡ पाहों येतें.

१ वेळीं. २ वृद्धिंगत. ३ 'अंते मतिः सा गतिः' असा सिद्धांतच आहे. ४ आत्मानात्मविचारानें सर्व मद्रूप आहे असा निश्चय झाल्यावर. ५ देह गेला तरी अविनाशी आत्मा मरत नाहीं. ६ खरेपणानें. ७ कशानें. ८ लंगडा. ९ पर्वत चढे. १० सत्=चांगला किंवा ब्रह्मविचार याचा अभ्यास. ११ मार्ग. १२ अंगीकारील. १३ 'ब्रह्मानंदीं लागली टाळी । कोण देहातें सांभाळी ॥' तुका. १४ घोंघों ह्मणत. १५ तर ते. १६ ज्ञानकला. १७ जेथें यातायात=येरझार नाहीं व जें घनानंद चैतन्य, मन झालें.

[कवि] जयाचें आकारावीण असणें । जया जन्म ना निमणें[1] । जें आघवेंचि आघवेपणें[2] । देखत असे ॥ ८६ ॥ [पुराणं] जें गगनाहूनि जुनें[3] । [अणोरणीयांस-मनुस्मरेद्यः] जें परमाणूहूनि सानें[4] । [अनुशासितारं] जयाचेनि सन्निधानें[5] । विश्व चळे ॥ ८७ ॥ [सर्वस्य धातारमचिंत्यरूपं] जें सवींतें यया वियें[6] । विश्व सर्व जेणें जिये[7] । हेतु[8] जया बिहे[9] । अचिंत्य जें ॥ ८८ ॥ [तमसः परस्तात्] देखें[10] वोळंबा इं-गळ न चरे । *तेजीं तिमिर न शिरे[11] । जें देहाचें आंधारें[12] । चर्मचक्षूसीं[13] ॥ ८९ ॥ [आदित्यवर्णं] सुसडा[14] †सूर्यकणांच्या राशी[15] । जो नित्य उदो ज्ञानियांसी अस्तमानाचें जयासी[16] । आडनांव नाहीं ॥ ९० ॥

प्रयाणकाले मनसाचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।
भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक् स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् १०

[प्रयाणकाले मनसाचलेन] तया अव्यंगवाणेया[17] ब्रह्मातें । प्रयाणकाले[18] प्राप्ते । जो स्थिरावलेनि चित्तें । [अनुस्मरेद्यः श्लोक ९] जाणोनि स्मरे ॥ ९१ ॥ [योगबले-न चैव] बाहेर पद्मासन[19] रचुनी । उत्तराभिमुख बैसोनी । जीवीं सुख[20] सूनि[21] । कर्मयोगाचें ॥ ९२ ॥ [भक्त्या युक्तो] आंतु निर्मलेनि[22] मनोधर्मे । स्वरूपप्राप्तीचेनि प्रेमें । आपेंआप संभ्रमें[23] । मिळावया ॥ ९३ ॥ [भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य] आंकळ-लेनि योगें[24] । मध्यमा मध्यमार्गें[25] । अग्निस्थानौनि[26] निगे[27] । ब्रह्मरंध्रीं[28] ॥ ९४ ॥ तेथ ‡अचेत[29] चित्ताचा सांगात[30] । औहाचवाणा दिसे मांडत । जेथ प्राण गग-ना आंत[31] । संचरे कां ॥ ९५ ॥ [सम्यक्] परि मनाचेनि स्थैर्यें धरिला । भक्ती-चिया भावना भरला । योगबळें आवरला[32] । सज्ज होउनी ॥ ९६ ॥ तो जडा-जडातें विरवितूं[33] । §भ्रूलतामाजी[34] संचरतु । जैसा घंटानाद[35] ¶लयस्तु[36] । घंटे-सींच होय ॥ ९७ ॥ कां झांकलिये घटींचा दिवा । नेणिजे काय जाहाला केव्हां । या रीती जो पांडवा । देह ठेवी ॥ ९८ ॥ [स तं परं पुरुषमुपैति दिव्यं] तो केवळ परब्रह्म । जया परम पुरुष ऐसें नाम । तें माझें निजधाम । होऊनि ठाके ॥ ९९ ॥

---

* तेथ तिमिर. † सूर्यकिरणांच्या. ‡ अचेतन. § भ्रूपल्लवामाजि. ¶ लयस्थु.

---

१ मरणें. २ सर्वच. ३ आकाशापेक्षां. ४ सूक्ष्म कणाहून सूक्ष्म. ५ जवळ राहण्यानें. ६ जगतें. ७ न्यायशास्त्राचें अनुमान. ८ भितो. ९ जसी वोळंबा=वाळवी सर्व खाते परंतु इंगळ न चरे–इंगळा खाऊं शकत नाहीं तसा हेतु (न्यायशास्त्राचें अनुमान) सर्व ठिकाणीं चालतो परंतु वस्तूवर चालत नाहीं. १० प्रकाशस्थलीं एककालीं अंधार रिघूं शकत नाहीं. ११ दिवसाचा अंधार. १२ अज्ञानदृष्ट्या. १३ निर्मळ. १४ परिपूर्ण. १५ मरणसमय समीप आला असतां. १६ योगांतील पद्म या नांवाचें आसन. १७ घालून. १८ आंत एकवट केलेल्या. १९ त्वरेनें. २० संपादन केलेल्या. २१ सुषुम्ना. २२ आधारपद्मापासून मस्तकांतील आकाशास. २३ जड चित्ताच्या संगतीं. २४ उगाच बाहेरून असें दिसतें. २५ व्यापला. २६ चेतन अचेतनातें. २७ लीन करितो. २८ भ्रुकुटीमध्यें. २९ लयांत गुप्त.

यदक्षरं वेदविदो वदंति विशंति यद्यतयो वीतरागाः ।
यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥ ११ ॥

[यदक्षरं] सकळां जाणणेयां जे [1]लाणी । तिये जाणिवेची जे खाणी । तयां ज्ञानियांचिये [2]आयणी । जयातें [3]अक्षर ह्मणिपे ॥ १०० ॥ चंडेवातेंही न मोडे । तें गगनचि कीं [4]फुडें । वांचूनि जरी होईल [5]मेहुडें । तरी उरेल कैंचें ॥ १ ॥ तेविं जाणणेया जें [6]आकळलें । तें *जाणिवलेपणेंचि [7]उमाणलें । मग नेणवेचि तया ह्मणितलें । [8]अक्षर सहजें ॥ २ ॥ [वेदविदो वदंति] ह्मणोनि [9]वेदें[10]विद नर । ह्मणती जयातें अक्षर । जें [11]प्रकृतीसीं पर । परमात्मरूप ॥ ३ ॥ [विशंति यद्यतयो वीतरागाः] आणि विषयांचें विष [12]उलंडूनि । जे सर्वेंद्रियां प्रायश्चित्त देऊनि । [13]आहाति देहाचिया बैसोनि । झाडातळीं ॥ ४ ॥ ते यापरी विरक्त । जयाची निरंतर वाट पाहात । निष्कामासि [14]अभिप्रेत । सर्वदा जें ॥ ५ ॥ [यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति] जयाचिया आवडी । न गणिती ब्रह्मचर्याचीं [15]सांकडीं । निष्ठुर होऊनि [16]बापुडीं । इंद्रियें करिती ॥ ६ ॥ [तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये] ऐसें जें पद । दुर्लभ आणि अगाध । जयाचिये [17]थेंडिये वेद । †[18]चुंबुकळिले ठेले ॥ ७ ॥ [19]तें ते पुरुष होती । जे यापरी लया जाती । तरी पार्था हेचि स्थिती । एक वेळ सांगों ॥ ८ ॥ तेथ अर्जुनें ह्मणितलें स्वामी । हेंचि ह्मणावया होतों पां मी । तंव सहजें कृपा केली तुह्मी । तरी बोलिजो कां ॥ ९ ॥ परि बोलावें तें अति [20]सोहोपें । तेथें ह्मणितलें [21]त्रिभुवनदीपें । तुज काय नेणों संक्षेपें । सांगेन ऐक ॥ ११० ॥ तरी मना बाहेरिलीकडे । येयाची [22]सांविया [23]सेवे मोडे । हें हृदयाचिया डोहीं बुडे । तैसें कीजे ॥ ११ ॥

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥ १२ ॥

[सर्वद्वाराणि संयम्य] परि हें तरीच घडे । जरी [24]संयमाचीं अखंडें । सर्वद्वारीं कवाडें । [25]केळासती ॥ १२ ॥ [मनो हृदि निरुध्य च] तरी सहजें मन कोंडलें । हृदयींचि असेल [26]उगेलें । जैसें करचरणीं मोडलें । परिवेर [27]न संडी ॥ १३ ॥

---

* जाणवलेपण, जाणलेपण. † चुबकळिले.

---

१ अवधी. २ निर्णयीं, बुद्धीनें. ३ अविनाश. ४ मोठ्या वाऱ्यानें. ५ खरें, स्पष्ट. ६ मेघ. ७ समजलें. ८ अटकळींत आलें. ९ वेदार्थपारंगत. १० मायातीत. ११ ओलांडून. १२ आहेत. १३ इष्ट. १४ कठिणपण. १५ दीन. १६ तीरीं. १७ लीन झाले, मिळून चिन्म झाले. १८ दुर्लभपद. १९ सुगम. २० श्रीकृष्णानें. २१ सहज, सर्वथा. २२ सवय. २३ इंद्रियनिग्रहाचीं. २४ खिळतात. २५ निर्विकल्प. २६ कुटुंब.

*तैसें चित्त राहिल्या पांडवा । प्राणांचा प्रणवचि करावा । [मूर्ध्याधायात्मनः प्राणं] मग अनुवृत्तिपंथें आणावा । मूर्द्धिवरी ॥१४॥ [आस्थितो योगधारणां] तेथ आकाशीं मिळे न मिळे । तैसा धरावा धारणाबळें । जंव मात्रात्रय मावळे । †अर्धबिंबीं ॥ १५ ॥ तंववरी तो समीरु । निराळीं कीजे स्थिरु । मग लग्नीं जेविं ओंकारु । बिंबींचि विलसे ॥ १६ ॥

ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥ १३ ॥

[ओमिति] तैसें ओम् हें स्मरों सरे । आणि तेथेंचि प्राण पुरे । मग ‡प्रणवातीत उरे । पूर्णघन जें ॥ १७ ॥ ह्मणोनि प्रणवैकनाम । हें एकाक्षर ब्रह्म । जो माझें स्वरूप परम । स्मरतसाता ॥ १८ ॥ [यः प्रयातीति] यापरि त्यजी देहातें । तो त्रिशुद्धी पावे मातें । जया पावणयापरौतें । आणीक पावणें नाहीं ॥१९॥ §तेथ अर्जुना जरीं विपायें । तुझ्या जीवीं हन ऐसें जाये । ना हें स्मरण मग होये । कायसयावरी अंतीं ॥ १२० ॥ इंद्रियां ¶अनघड पडिलिया । जीवितांचें सुख बुडालिया । आंत बाहेरि उधडलिया । मृत्युचिन्हें ॥ २१ ॥ ते वेळीं बैसावेंचि कवणें । मग कवण निरोधी करणें । तेथ कोह्याचेनि अंतःकरणें । प्रणव स्मरावा ॥ २२ ॥ तरि गा ऐशिया हो ध्वनी । झणें थारा देशी गा मनीं । पैं नित्य सेविला मी निदानीं । सेवक होय ॥ २३ ॥

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ १४ ॥
मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।
नाप्नुवंति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥ १५ ॥

[अनन्यचेताः] जें विषयांसि तिळांजळी देउनी । प्रवृत्तीवरी निगर्ड $वाउनी । मातें हृदयीं सूनी । भोगिताती ॥ २४ ॥ [सततं] परि भोगितया नाराणुका । भेटणें नाहीं क्षुधादिकां । तेथ चक्षुरादि रंकां । कवण पाड ॥२५॥

---

* ऐसें. † अर्धबिंब. ‡ प्रणवांतीं. § येथ. ¶ अवघड. $ निगद्.

---

१ क्रमाक्रमानें. २ ब्रह्मरंध्रापर्यंत. ३ धारणाशक्तीनें. ४ अकार, उकार, मकार. ५ अर्धमात्रेंतच. ६ वायु. ७ आकाशीं. ८ ऐक्यावस्थेंत. ९ स्मरण्याचें रहातें. १० पूर्ण होतो. ११ ओंकाराहून पर. १२ ब्रह्मानंदस्वरूप. १३ प्रणव हेंच एक नांव ज्याचें. १४ स्मरत असतां. १५ निश्चयानें. १६ कदाचित्. १७ अवघड. १८ जीवंतपणा. १९ उघड झालें असतां. २० इंद्रियें. २१ कोणत्या. २२ संशयास. २३ कदाचित् नको. २४ शेवटीं. २५ सर्वथा सोडून. २६ शपथ वाहून. २७ शिरवून, ठेवून. २८ असमाधान.

[नित्यशः] ऐसे निरंतर [1]ऐकवटले । [यो मां स्मरति] जे अंतःकरणीं मजशीं [2]लिंगटले । मीचि होऊनि [3]आतले । उपासिती ॥ २६ ॥ [तस्याहं सुलभः पार्थ] तयां देहावसान जैं पावे । तैं तिहीं मातें स्मरावें । मग म्यां जरी न पावावें । तरि [4]उपास्ति ते कायसी ॥ २७ ॥ पैं रंक एक [5]आडलेपणें । काकुळती धांव गा धांव ह्मणे । तरि तयाचिये [6]ग्लानी धांवणें । काय न घडे मज ॥ २८ ॥ आणि भक्तांही तेचि दशा । तरी भक्तीचा सोसु कायसा । ह्मणऊनि हा [7]ध्वनी ऐसा । न वाखाणावा ॥ २९ ॥ तिहीं जे वेळीं मी स्मरावा । ते वेळीं स्मरिला कीं पावावा । तो [8]आभारही जीवा । साहवेचि ना ॥ १३० ॥ तें [9]ऋणवैपण देखोनि आंगीं । मी आपुलियाचि [10]उत्तीर्णत्वालागीं । भक्तांचिया [11]तनुत्यागीं । परिचर्या करीं ॥ ३१ ॥ [नित्ययुक्तस्य योगिनः] देहवैकल्याचा [12]वारा । झणें लागेल या सकुमारा । ह्मणोनि आत्मबोधाचे पांजिरां । [13]सुयें तयातें ॥ ३२ ॥ वरि आपुलिया स्मरणाची *[14]उवाइली । हींव [15]ऐसी करीं साउली । ऐसेनि [16]नित्य बुद्धि संचली । मी आणीं तयातें ॥ ३३ ॥ ह्मणोनि देहांतींचें सांकडें । [17]मोंझिया कहींचि न पडे । मी आपुलियातें आपुलीकडे । सुखेंचि आणीं ॥ ३४ ॥ वरचील देहाची गंवसणी फेडुनी । [18]ओहाच अहंकाराचे रज झाडुनी । शुद्धवासना निवडुनी । आपणपां मेळवीं ॥ ३५ ॥ आणि भक्तां तरी देहीं । विशेष [19]ऐकेवंकीचा ठाव नाहीं । ह्मणऊनि [20]अव्हेर करितां कांहीं । वियोग ऐसा न वाटे ॥ ३६ ॥ ना तरी देहांतींचि मियां यावें । मग आपणपें यातें न्यावें । हेंही नाहीं जें स्वभावें । जे आधींचि मज [21]मिनले ॥ ३७ ॥ [22]येरी शरीराचिया सलिलीं । असतेपण हेचि [23]सांउली । वांचूनि चंद्रिकां ते ठेली । चंद्रींच आहे ॥ ३८ ॥ ऐसे जे [24]निर्लयुक्त । तयांसि सुलभ मी सतत । [मामुपेत्य] ह्मणऊनि देहांतीं निश्चित । मीचि होती ॥ ३९ ॥ [दुःखालयं] मग क्लेशतरूची [25]वोडी । जे [26]तापत्रयाग्नीची [27]सेगडी । जे [28]मृत्युकाकासि [29]कुरोंडी । सांडिली आहे ॥ १४० ॥ जें दैन्याचें दुभतें । जें महाभयातें वाढवितें । जें सकळदुःखाचें पुरतें । भांडवल ॥ १४१ ॥ जें दुर्मतीचें मूळ । जें कुकर्माचें फळ । जें [30]व्यामोहाचें

---

* उपायली.

---

१ मजशीं ऐक्यास पावले. २ तल्लीन झाले. ३ व्यापले. ४ उपासना, भक्ती. ५ निरुपाय होऊन. ६ दुःखी. ७ हांव. ८ संशयात्मक अभिप्राय. ९ ओझें. १० कर्जाचें ओझें. ११ ऋणमुक्त, उतराई. १२ शरीरपतनानंतर. १३ सेवा. १४ विकलपणाचा. १५ कवच. १६ घालीं. १७ स्पष्ट. १८ गार, सौम्य. १९ अशा तऱ्हेनें सांचलेली बुद्धि मी अंतीं त्यास देतों. २० माझ्या भक्तांस. २१ व्यर्थ. २२ तादात्म्याचा. २३ तिरस्कार. २४ मिळाले. २५ बाकी राहिलेलें जें शरीर तद्रूप जें पाणी त्यांत. २६ प्रतिबिंब. २७ चांदणें. २८ सदा माझा निदिध्यासयुक्त. २९ बाग. ३० आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक हाच अग्नि. ३१ शेगडी. ३२ मृत्युरूप कावळा. ३३ ओवाळणी. ३४ भ्रांतीचें.

केवळ । स्वरूपचि ॥ ४२ ॥ जें संसाराचें बैसणें । जें विकाराचें उद्यानें । जें सकळ रोगांचें भाणें । वाढिलें आहे ॥ ४३ ॥ जें काळाचा *खिंच उशिटा । जें आशेचा †आंगवठा । जन्ममरणाचा वोलिंवटा । स्वभावें जें ॥ ४४ ॥ जें भुलीचें भरिंव । जें विकल्पाचें वोतिंव । किंबहुना पेंव । विंचुवांचें ॥ ४५ ॥ जें व्याघ्राचें क्षेत्र । जें पैण्यांगनांचें मित्र । जें विषयविज्ञानयंत्र । सुपूजित ॥ ४६ ॥ जें लांवेचा कळवळा । निवालिया विषोदकाचा गेळाळा । जें ‡विश्वासु आंगवळा । संवचोराचा ॥ ४७ ॥ जें कोढियाचें खेंव । जें काळसर्पाचें मार्दव । गोरियेचें स्वभाव । गायन जें ॥४८॥ जें वैरियाचा पाहुणेर । जें दुर्जनाचा आदर । हें असो जें सागर । अनर्थांचा ॥ ४९ ॥ [अशाश्वतं] जें स्वप्नीं देखिलें स्वप्न । जें मृगजळें सांसिनलें वन । जें धूम्ररजांचें गगन । ओतलें आहे ॥१५०॥ [पुनर्जन्म नाप्नुवंति] ऐसें जें हें शरीर । तें ते न पवतीचि पुढती नर । [महात्मानः] जे होऊनि ठेले अपार । स्वरूप माझें ॥ ५१ ॥

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।
मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ॥ १६ ॥

[आब्रह्मेति] येरहवीं ब्रह्मपणाचिये भेंडसे । न चुकतीचि पुनरावृत्तीचे वेंळसे । [मामिति] परि निवेंटलियाचें जैसें । पोट न दुखे ॥ ५२ ॥ ना तरीं चेइलिया नंतरें । न बुडिजे स्वप्नींचेनि महापूरें । तेविं मातें पावले ते संसारें । लिंपतीचि ना ॥ ५३ ॥ येरवीं जगदाकाराचें सिरें । जें चिरस्थाईयांचे धुरे । ब्रह्मभुवन गा चवेंरें । लोकांचळाचें ॥ ५४ ॥ जिये गांवींचा पैहार दिवोवरी । एका अमरेंद्रांचें आयुष्य नें धरी । विळोनि पांती उठी एकसरी । चवदाजणांची ॥ ५५ ॥

सहस्रयुगपर्यंतमहर्यद्ब्रह्मणो विदुः ।
रात्रिं युगसहस्रां तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥ १७ ॥

[सहस्रयुगपर्यंतमहः] जैं चौकडियां सहस्र जाये । तैं ठायेठावो विळेंचि होये ।

---

* खींच. † वसौटा. ‡ विश्वास आगळा.

---

१ बाग. २ जेवण, बोणें. ३ खिचडी. ४ शरीर. ५ वहाती वाट. ६ बाजारबसव्या, वेश्या. ७ विषयांच्या माहितीचें. ८ जखीण. ९ घोट. १० भरंवसा. ११ अनुकूळ झाला. १२ स्नेहभावानें वागणाऱ्या चोराचा. १३ आलिंगन. १४ मऊपणा. १५ पारध्याचें. १६ पाहुणचार. १७ भरलें. १८ धुराचें, मिथ्या. १९ महत्व, धेंडें. २० भोंवरे. २१ मेलेल्यांचें. २२ लिप्त होत नाहींत. २३ कारण, निमित्त. २४ बहुतकाळ राहणारांचें. २५ मुख्य अग्रभागीं. २६ शेवट. २७ त्रैलोक्यरूप पर्वताचें. २८ प्रहर. २९ इंद्राचें. ३० पुरत नाहीं. ३१ एका दिवसांत. ३२ पंक्ति, समुदाय. ३३ एकदम. ३४ चार युगें. ३५ वास्तविक. ३६ पुरा दिवस ब्रह्मदेवाचाच होतो.

[रात्रिं युगसहस्रां तां] आणि तैसेंचि सहस्रवरिये[1] पाहें । रात्री जेथ ॥ ५६ ॥ [यद्ब्रह्मणो विदुः]येवढें अहोरात्र[2] जेथिंचें । तेणें न लोटती[3] जे भाग्याचे । देखती ते स्वर्गींचे । चिरंजीवें[4] ॥ ५७ ॥ येरां सुरगणांची नेवाई[5] । विशेष सांगावी *तेथ काई । मुदल इंद्राचीचि दशा पाहीं । जे दिहाचे[6] चौदा ॥ ५८ ॥ [तेऽहोरात्रविदो जनाः] परि ब्रह्मयाचियाहि आठा प्रहरांतें । आपुलिया डोळां देखते । जे आहाति गा तयांतें । अहोरात्रविद[7] म्हणिजे ॥ ५९ ॥

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवंत्यहरागमे ।
राज्यागमे प्रलीयंते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥ १८ ॥
भूतग्रामः स एवाऽयं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।
राज्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥ १९ ॥

[अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः] तये ब्रह्मभुवनीं दिवसें पाहे । ते वेळीं गणना †कहीं[8] न समाये । ऐसें अव्यक्ताचें होये । व्यक्त[9] विश्व ॥ १६० ॥ [राज्यागमे प्रलीयंते] पुढती ‡देहाची[10] चौपाहारी[11] फिटे । आणि हा ओंकारसमुद्र[12] आटे । [भूत्वा] पाठीं तैसाचि मग पाहांटे । भरोंलागे[13] ॥ ६१ ॥ [प्रलीयते] शीरदीयेचिये[14] प्रवेशीं । अभ्रें जिरती आकाशीं । [भूत्वा] मग ग्रीष्मांतीं[15] जैशीं । निगती पुढती[16] ॥ ६२ ॥ [भूतग्रामः स एवायं] तैसी ब्रह्मदिनाचिये आदी । हे भूतसृष्टीची मांदी[17] । [अवशः] मिळे जंव सहस्रावधी[18] । निमित्त पुरे ॥ ६३ ॥ [राज्यागमे] पाठीं रात्रीचा अवसर[19] होये । [अव्यक्तसंज्ञके] आणि विश्व अव्यक्तीं[20] लया जाये । तोही युगसहस्र मोटेका[21] पाहे । [प्रभवत्यहरागमे] आणि तैसेंचि रचे ॥ ६४ ॥ [सहस्रयुगपर्यंतमित्यादिश्लोकत्रयतात्पर्यं] हें सांगावया काय उपपत्ती[22] । जे जगाचा प्रळयो आणि संभूती[23] । इये ब्रह्मभुवनींचिया होती । अहोरात्रामाजी ॥ ६५ ॥ कैसें §थोरिवेचें[24] मान पाहें पां । ¶तो सृष्टिबीजाचा सांटोपा[25] । परि पुनरावृत्तीचिया मापा[26] । शीगें[27] जाहाला ॥ ६६ ॥ येऱ्हवीं त्रैलोक्य हें धनुर्धरा । तिये गांवींचा गा पसारा । तो हा दिनोदयीं एकसरां । मांडेतें[28] असे ॥ ६७ ॥

---

* एथ. † कहीं. ‡ दिहाची. § थोरिवेचें. ¶ तिया.

---

१ तशाच हजार चौकडीपर्यंत. २ दिवस रात्र मिळून. ३ मरती. ४ बहुत काल असणारे. ५ नवल. ६ एका दिवसाचे. ७ कालज्ञानवेत्ते, ज्योतिषी. ८ कोठेंही सामावत नाहीं. ९ निराकाराचें. १० स्पष्ट, साकार. ११ दिवसाचे. १२ चार प्रहर. १३ अपार चराचर दृश्यमान जग. १४ शरत्काळाचे. १५ ग्रीष्मऋतूच्या शेवटीं. १६ पुनः. १७ समुदाय. १८ सहस्र वर्षांचा अवधि हेंच निमित्त तें पूर्ण होईपर्यंत. १९ समय. २० निराकारीं. २१ लहान. २२ युक्ति. २३ उत्पत्ति. २४ महत्व, थोरपणा. २५ कोठार, सांठवण. २६ अग्रभाग, माप भरल्यावर मग जो आणखी त्यावर ढीग करतात तो. (सर्वीमागून ते मरतात). २७ उगवतो.

पाठीं रात्रींचा [१]समो पावे। आणि अपैसाचि सांठवे। [२]ह्मणिये जेथिचें तेथ स्वभावें। [३]साम्यासि ये ॥ ६८ ॥ जैसें वृक्षपण बीजासि आलें। कीं मेघ हें गगन जाहालें। तैसें अनेकत्व जेथ सामावलें। तें साम्य ह्मणिपे ॥ ६९ ॥

परस्तस्मात्तु भावोऽन्यो व्यक्तोऽव्यक्तात्सनातनः।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥ २० ॥

[अव्यक्तात्] तेथ [४]समविषम न दिसे कांहीं। ह्मणोनि भूतें [५]भाष नाहीं। जेविं दुधचि जाहालिया दहीं। नामरूप जाय ॥ १७० ॥ तेविं [६]आकारलोपासरिसें। जगाचें जगपण [७]भ्रंशे। परि †*जेथें जाहालें तें जैसें। तैसेंचि असे ॥ ७१ ॥ तैं तया नांव सहज अव्यक्त। आणि †आकारा ये तेंचि व्यक्त। हें एकास्तव एक सूचित। येऱ्हवीं दोनी नाहीं ॥ ७२ ॥ ‡जैसें आटलिया रुपें। आटलेपण ते खोटी ह्मणिपे। पुढती तो घैनाकार हारपे। जे वेळीं अळंकार होती ॥ ७३ ॥ [परस्तस्मात्तु भावोऽन्यो व्यक्तः] हीं दोन्ही जैशीं होणीं। एकीं साक्षिभूत सुवर्णीं। तैसी [९]व्यक्ताव्यक्ताची [१०]कैडसणी। [११]वस्तूच्याठायीं ॥ ७४ ॥ [सनातनः] तें तरी व्यक्त ना अव्यक्त। नित्य ना नाशवंत। या दोहीं [१२]भावां अतीत। अनादिसिद्ध ॥ ७५ ॥ [यः स सर्वेषु भूतेषु] जें हें विश्वचि होऊनि असे। [नश्यत्सु न विनश्यति] परि विश्वपण नासिलेनि न नासे। अक्षरें पुसिल्या न पुसे। अर्थ जैसा ॥ ७६ ॥ पाहें पां तरंग तरी होत जात। परि तेथ उदक तें अखंड असत। §तेवीं [१३]भूताभावीं न नाशत। अविनाश जें ॥ ७७ ॥ ना तरी आटतिये अळंकारीं। [१४]नाटतें कनक असे जयापरी। तेवीं मरतिये ¶जीवाकारीं। अमर जें आहे ॥ ७८ ॥

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम्।
यं प्राप्य न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥ २१ ॥
पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया।
यस्यांऽतस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥ २२ ॥

[अव्यक्तः] जयातें अव्यक्त ह्मणों ये [१५]कोडें। ह्मणतां स्तुति हे ऐसें [१६]नावडे। जें $मन बुद्धी न सांपडे। ह्मणऊनियां ॥ ७९ ॥ [अक्षरः] आणि आकारा आ-

* जेथ. † आकार ये. ‡ जैसीं. § तेवीं भूतभावीं नाशवंत. ¶ जीवामाझारीं. $ मना बुद्धि.

१ समय. २ ह्मणून. ३ समान अवस्थेस येतें. ४ न्यूनाधिक. ५ बोल. ६ आकृतिनाशाबरोबर. ७ नाहींसें होतें. ८ लगड. ९ घट्टपणा. १० साकारनिराकाराची. ११ विचार. १२ ब्रह्माच्याठायीं. १३ स्थिति. १४ भूतें नाहींशीं झालीं असतां. १५ न आटणारें. १६ सुवर्ण. १७ कौतुकानें. १८ न वाटे.

लिया जयाचें । निराकारपण न वचे । आकारलोपें न[२] विसंचे । नित्यता गा ॥ १८० ॥ ह्मणोनि अक्षर जें ह्मणिजे । [इत्युक्तस्तमाहुः परमां गतिं] तेवींचि ह्मणतां बोधही उपजे । जया परौता पैसें[३] न देखिजे । या नांव परमगती ॥ ८१ ॥ [पुरुषः] *परि आघवा इहीं देहपुरीं । आहे निजेलियाचे परी । जे व्यापार करवी ना करीं । ह्मणऊनियां ॥ ८२ ॥ येऱ्हवीं जे शारीरचेष्टा । त्यामाजी एकिंही न ठके[६] गा सुभटा । दाही इंद्रियांचिया वाटा । वाहतचि आहाती ॥ ८३ ॥ †उकलूनि विषयांचा पेंठा[१०] । होत मनाचा चोहटा[११] । तो सुखदुःखांचा राजवांटा[१२] । भितरीही[१३] पावे ॥ ८४ ॥ परि रावो पहुडलिया सुखें । जैसा देशींचा व्यापार न ठके[१६] । प्रजा आपुलालेनि अभिलाखें[१७] । करितीच असती ॥८५॥ तैसें बुद्धीचें हन जाणणें । कां मनाचें घेणें देणें । इंद्रियांचें करणें । स्फुरण[१९] वायूचें ॥ ८६ ॥ हे देहक्रिया आघवी । न ‡करितां होय बरवी । जैसा न चलवितेनि रवी[१६] । लोक चाले ॥ ८७ ॥ अर्जुना तया परी । सुतला[१९] ऐसा आहे शरीरीं । ह्मणोनि पुरुष[२०] गा अवधारीं । ह्मणिपें जयातें ॥ ८८ ॥ आणि प्रकृती[२१] पतिव्रते । पडिला एकपत्नीव्रतें । येणेंही कारणें जयातें । पुरुष ह्मणोंये ॥८९॥ [स परः पार्थ] पैं वेदांचें बहुवसपण[२३] । देखेचिना जयाचें आंगण । हें गगनाचें पांघुरण । होय देखा ॥ १९० ॥ ऐसें जाणूनि योगीश्वर । जयातें ह्मणती §परात्पर । [अनन्यया] जें अनन्यगतीचें[३१] घर । गिवसीत[३३] ये ॥ ९१ ॥ [भक्त्या लभ्यस्तु] जे तनू[३३] वाचा चित्तें । नाइकती दुजिये गोष्टीतें । तयां ¶एकनिष्ठेचें[२१] पिकतें । सुक्षेत्र[३४] जें ॥ ९२ ॥ हें त्रैलोक्यचि पुरुषोत्तम । ऐसा साचा जयाचा मनोधर्म । तया आस्तिकाचा आश्रम । पांडवा गा ॥ ९३ ॥ [यं प्राप्य] जें निर्वाणींचें गौरवें[३५] । जें निर्गुणाची जोंणिव[३६] । जें सुखाची राणिवें[३७] । $निराशांसी ॥ ९४ ॥ जें संतोषियां वाढिलें ताट । जें अचिंतां[३९] अनाथाचें मायपोट । भक्तीसी उजू वाट । जया गांवा ॥ ९५ ॥ हें एकैक सांगोनि वायां । काय फार करूं धनंजया । पैं गेलिया जया ठाया । तो ठावोचि होइजे ॥ ९६ ॥ हिंवाचिया[३१] झुळुका । जैसें हिंवचि ||पडे उष्णोदका । कां सामोर +जालिया अर्का[३३] । तैसेंचि प्रकाश होये ॥ ९७ ॥ [यस्यांतस्थानि भूतानि] तैसा संसार जया गांवा । गेलेंसांता[३४]

---

* पैं आघवा.† उकलु विषयांचिया पेटा. ‡ करवितां. § परापर. ¶ एकनिष्ठाचें. $ नैराश्यासि. || पडिलें. + आलिया.

---

१ जात नाहीं. २ विघडे. ३ विस्तार, ठिकाण. ४ ब्रह्मप्राप्ति. ५ देहव्यापार. ६ राहे. ७ चालतच. ८ उघडून. ९ बाजार. १० चव्हाटा. ११ राजमार्ग, कारभार. १२ आंत. १३ राजा. १४ इच्छेनें. १५ चलन. १६ चालवितां. १७ निजला. १८ पुरि=शरीरांत शेते=निजतो असा. १९ माया. २० अतिशय. २१ एकनिष्ठतेचें. २२ शोधीत. २३ कायावाचामनेंकरून. २४ उत्तम शेत. २५ महत्व. २६ ज्ञान. २७ राज्य. २८ निःस्पृहांसी. २९ चिंतारहित. ३० अधिष्ठान, आश्रय. ३१ थंडीच्या. ३२ सूर्य. ३३ अंधार. ३४ गेला असतां.

पांडवा । होऊनि ठाके आघवा । मोक्षाचाचि ॥ ९८ ॥ [येन सर्वमिदं ततं] तरि अग्निमाजी आलें । जैसें इंधन अग्नि जाहालें । पाठीं न निवडेचि कांहीं केलें । काष्ठपण ॥ ९९ ॥ ना तरी साखरेचा माघौता । बुद्धिमंतपणेंही करितां । परि ऊंस नव्हे पंडुसुता । जियापरी ॥ २०० ॥ लोहाचें कनक जाहालें । हें एके परिसेंचि केलें । आतां आणिक कैंचें तें गेलें । लोहत्व आणी ॥ १ ॥ ह्मणोनि तूप होऊनि माघौतें । जेवीं दुधपणा न येचि निरुतें । [न निवर्तते] तेविं पावोनियां जयातें । पुनरावृत्ति नाहीं ॥ २ ॥ [तद्धाम परमं मम] तें माझें परम । साँचोकारें निजधाम । हें *अंतवट तुज वर्म । दाविजत असे ॥ ३ ॥

यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः ।
प्रयाता यांति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥ २३ ॥

[यत्र काले त्वनावृत्तिं] तेवींचि आणिकेंही एके प्रकारें । हें जाणतां आहे सोपारें । तरि देहें सांडितेनि अवसरें । जेथें मिळती योगी ॥ ४ ॥ [आवृत्तिं चैव योगिनः] अथवा अंचवटे ऐसें घडे । जे अनवसरें देह सांडे । तरि माघौतें येणें घडे । देहासीचि ॥ ५ ॥ [प्रयाता यांति] ह्मणोनि कौळशुद्धी जरी देह ठेविती । तरि ठेवीत खेंवी ब्रह्मचि होती । एरवीं अकाळीं तरी येती । संसारा पुढेती ॥ ६ ॥ तैसें सायुज्य आणि पुनरावृत्ती । †या दोन्ही अवसरा आहती । [तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ] तोचि अवसर तुजप्रती । प्रसंगें सांगों ॥ ७ ॥ तरि ऐकें गा सुभटा । पातलिया मरणाचा तोजिवटा । पांचै आपुलिया वाटा । निघती अंतीं ॥ ८ ॥ ‡ऐसा वरि वरिपडिला प्रयाणकाळीं । बुद्धीतें भ्रम §न गिळी । स्मृति नव्हे आंधळी । ¶न मरे मन ॥ ९ ॥ हा चेतनावर्ग आघवा । मरणीं दिसे टवटवा । $परि अनुभविलिया ब्रह्मभावा । गंवसणी होउनी ॥२१०॥ ऐसा सावध हा ||समाभावो । आणि निर्वाणवेन्हीं निर्वाहो । हें तरीच घडे सांवावो । अग्नींचा आथी ॥ ११ ॥ +पाहा पां वारेनें कां उदकें । जैं दिवियाचें दिवेपण झांके । तैं असतीच काय देखे । दिठी आपुली ॥ १२ ॥ तैसें देहांतींचेनि विषमवातें ।

---

* आतवट. † यी दोनी अवसराधीन आहाती. ‡ ऐसा वरि पडिलां. § न जाकळी. ¶ न कोंडे. $ ऐसा. || समवावो. + पाहें पां.

---

१ जळण. २निवडतां येत नाहीं. ३ मागून. ४ दुसरा परीस. ५ निश्चयें. ६ पुनः संसार, जन्म. ७ खरेपणानें. ८ अंतरंग, गुह्य. ९ सुलभ. १० देहत्यागकाळीं. ११ अकस्मात्. १२ अकाळीं. १३ शास्त्रोक्त शुद्धकाळीं. १४ तत्क्षणीं. १५ पुनः. १६ ब्रह्मार्शी ऐक्य. १७ समय आहेत. १८ धांदल, गुंगी, उन्मत्त. १९ पंचमहाभूतें. २० प्राप्त झालेल्या. २१ ग्रासी. २२ प्राणसमुदाय. २३ टवटवीत. २४ ब्रह्मभावास संरक्षक. २५ ऐक्यभाव २६ मरेपर्यंत. २७ सहाय. २८ दृष्टि. २९ वायुप्रकोपानें.

देह आंत बाहेरि श्लेष्मआतें । *तैं विझोनि जाय उजितें । अग्निचें तेव्हां ॥ १३ ॥ ते वेळीं प्राणासि प्राण नाहीं । तेथ बुद्धि असोनि करील काई । ह्मणोनि अग्निवीण देहीं । चेतना न थरे ॥१४॥ अगा देहींचा अग्नि जरी गेला । तरी देह नव्हे चिखल वोला । वायां आयुष्यवेळ आपुला । आंधारें गिंवसी ॥ १५ ॥ आणि मागील स्मरण आघवें । तें तेणें अवसरें सांभाळावें । मग देह त्यजूनि मिळावें । स्वरूपीं कीं ॥ १६ ॥ तंव तया देहश्लेष्माचे चिखलीं । चेतनाचि बुडोनि गेली । तेथ मागिली पुढिलीहि ठेली । आठवण ॥ १७ ॥ ह्मणोनि आधीं अभ्यास जो केला । तो मरण न येतां निमोनि गेला । जैसें ठेवणें न दिसतां मालवला । दीपु हातींचा ॥ १८ ॥ आतां असो हें सकळ । जाण पां ज्ञानासि अग्निमूळ । तया अग्नीचें प्रयाणीं बळ । संपूर्ण आथी ॥ १९ ॥

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।
तत्र प्रयाता गच्छंति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ २४ ॥

[अग्निर्ज्योतिरिति] आंत अग्निज्योतीचा प्रकाश । बाहेरी शुक्लपक्ष आणि दिवस । आणि सा मासांमाजि मास । उत्तरायण ॥ २२० ॥ [तत्र प्रयातेति] ऐसिया समयोगाची निरुती । लाहोनि जे देह ठेविती । ते ब्रह्मचि होती । ब्रह्मविद ॥ २१ ॥ [अभ्यादिपंचसोपानात्मकमर्चिरादिमार्गं दर्शयति] अवधारीं गा धनुर्धरा । येथवरि सामर्थ्य यया अवसरा । तेवींचि हा उजू मार्ग स्वपुरा । यावया पैं ॥ २२ ॥ एथ अग्नी हें पहिलें पायतरें । ज्योतिर्मय हें दुसरें । दिवस जाणें तिसरें । चौथें शुक्लपक्ष ॥ २३ ॥ आणि †सामास उत्तरायण । तें वरचील गा सोपानें । येणें सायुज्यसिद्धिसदन । पावती योगी ॥ २४ ॥ हा उत्तम काळ जाणिजे । यातें अर्चिरादि मार्ग ह्मणिजे । आतां अकाळ तोही सहजें । सांगेन आईक ॥ २५ ॥

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।
तत्र चांद्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥ २५ ॥

[धूमः] तरि प्रयाणाचिया अवसरें । वातश्लेष्मां सुभरें । तेणें अंतःकरणीं

* जैं. † सामासांमाजि.

१ कफव्याप्त. २ उजेड. ३ जीवकला. ४ शोधी. ५ नाश पावला. ६ उत्तरायणांतील सहा महिन्यांपैकीं कोणतातरी एक. ७ निरुक्ति, निश्चय. ८ स्वीकारून. ९ तत्त्ववेत्ते, ज्ञानी. १० समयाला. ११ स्वरूपाला. १२ पायरी. १३ तेजःपुंज. १४ शिडी. १५ ब्रह्मांत लीन होणें, चवथी मुक्ति. १६ अभ्यादिद्वारा जाण्याचा ऊर्ध्वमार्ग १७. अयोग्य काळ. १८ कफवातादि दोषांच्या. १९ भरानें.

आंधारें । कोंदलें ठाके ॥ २६ ॥ सर्वेंद्रियां लांकुड[1] पडे । स्मृति भ्रमामाजि बुडे । मन होय वेडें । कोंडे प्राण ॥ २७ ॥ अग्नीचें अग्निपण जाये । मग तो धूमचि अवघा होये । तेणें चेतेना[2] गिंवसिली[3] ठाये । शरीरींची ॥ २८ ॥ [रात्रिस्तथा कृष्णः] जैसें चंद्राआड आभाळ । सैंदट[4] दाटे सैंजळ[5] । मग गैंडद[6] ना उजाळ[7] । ऐसें झांबळें होय ॥ २९ ॥ कां मरे ना सावध । ऐसें जीवितासि पडे स्तब्ध । आयुष्य मरणाची मर्याद । वेळ ठाकी ॥२३०॥ ऐसी मनबुद्धि करणीं[8] । सभोंवतीं *धूंमकुळाची[9] कोंडणी । तेथ †जन्में[10] जोडलिये वोंहणी[11] । युगचि बुडे ॥ ३१ ॥ हांगा हातींचें जे वेळीं जाये । ते वेळीं आणिका लाभाची गोठी कें[12] आहे[13] । ह्मणऊनि प्रयाणीं तंव होय । येतुली दशा ॥ ३२ ॥ ‡ऐसी देहाआंत स्थिती[14] । बाहेरि कृष्णपक्ष वरि रीती[15] । [षण्मासा दक्षिणायनं] आणि सामासही वोडवती[16] । दक्षिणायन ॥ ३३ ॥ इये पुनरावृत्तीचीं घेराणीं[17] । आघवीं एकवटती जयाचिया प्रयाणीं । तो स्वरूपसिद्धीची कोंहाणी[18] । कैसेनि आइके ॥३४॥ [तत्र प्रयाता इति] §ऐसा जयाचा देह पडे । तया योगी ह्मणोनि[19] चंद्रवरी जाणे घडे । मग तेथूनि माघुता[20] बैंहुडे । संसारा ये ॥ ३५ ॥ आह्मीं अकाळ जो पांडवा । ह्मणितला तो हा जाणावा । आणि हाचि धूम्रमार्ग गांवा । पुनरावृत्तीचिया[21] ॥ ३६ ॥ येर तो अर्चिरादि[22] मार्गु[23] । तो वसता[24] आणि असलगु[25] । सांविया स्वस्त चांगु । निवृत्तीवरी[26] ॥ ३७ ॥

शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते ।

एकया यात्यनावृत्तिमन्ययाऽवर्तते पुनः ॥ २६ ॥

[शुक्लकृष्णे इति] ऐसिया अनादिया[27] दोनी वाटा । एकी उजू[28] एकी अव्हांटा[29] । ह्मणवूनि बुद्धिपूर्वक सुभटा । दाविलिया तुज ॥ ३८ ॥ कां जे मार्गामार्ग देखावे । साच लटिकें वोळखावें । हिताहित जाणावें । हिताचिलागीं ॥ ३९ ॥ पाहें पां नावं[30] देखतां बरवी । कोणी आड घाली काय अथावीं[31] । कां सुपंथ जाणोनि अडवीं[32] । रिगवत असे ॥ २४० ॥ जो विष अमृत वोळखे । तो अमृत

---

* धूमाकुळाचि. † जन्म. ‡ आणि देहाआंतु ऐसी स्थिति.§ ऐसें देह जयाचें.

---

१ लांकडासारखी दशा येते, काष्ठवत् पडतात. २ ज्ञान, जीवनकला. ३ आच्छादिलेली राहाते. ४ भरगच्च. ५ पाण्यानें युक्त. ६ अंधार. ७ प्रकाश, उजेड. ८ झुंजुक. ९ इंद्रियें. १० अति धुराची. ११ जन्मानें जोडलेल्याचा नाश होतो. १२ क्रमानें. १३ कोठें. १४ रात्र. १५ प्राप्त होतात. १६ ठिकाणें. १७ गोष्ट. १८ योगी होता म्हणून. १९ चंद्रलोकापर्यंत. २० फिरे, भोंवंडे. २१ जन्ममरणफेऱ्यांच्या. २२ अग्नि-उत्तरायणादि. २३ वस्ती असलेला. २४ सोपा. २५ सर्वथा. २६ मोक्षापर्यंत. २७ प्राचीन, आनादिकाळाचा. २८ सरळ. २९ आडवाट. ३० नौका. ३१ तळ न लागणाऱ्या खोल पाण्यांत. ३२ आडमार्गांत, अरण्यांत.

काय सांडूं शके । तेविं जो उजू वाट देखे । तो अव्हांटा नवचे ॥ ४१ ॥ ह्मणोनि *पुढें । पारखावें खरें कुडें । पारखिलें तरी न पडे । † अनवसरें कांहीं ॥ ४२ ॥ एऱ्हवीं देहांतीं थोर विषम । या मार्गाचें आहे संभ्रम । जन्में अभ्यासिलियाचें हन काम । जाईल वांयां ॥ ४३ ॥ जरि अर्चिरादि मार्ग चुकलिया । अवचटें धूम्रपंथें पडिलिया । तरी संसारपांथीं जुंतलियां । भवतचि असावें ॥ ४४ ॥ हे सायास देखोनि मोठे । आतां कैसेनि पां एकवेळ फिटे । ह्मणोनि योगमार्ग गोमटे । शोधिले दोन्ही ॥ ४५ ॥ [एकया यात्यनावृत्तिं] तंव एकें ब्रह्मत्वा जाइजे । [अन्ययाऽवर्तते पुनः] आणि एकें पुनरावृत्ती येइजे । परि दैवगत्या जो लाहिजे । देहांतीं जेणें ॥ ४६ ॥

नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ।

तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥ २७ ॥

[नैते इति] ते वेळीं ह्मणितलें हें नव्हे । वायां अवचटें काय पावे । देह त्यजूनि वस्तु होआवें । मार्गेंच कीं ॥ ४७ ॥ तरि आतां देह असो अथवा जावो । आह्मी तों केवळ वस्तूचि आहों । ‡कां जें दोरीं सर्पत्व वावो । दोराचिकडुनी ॥ ४८ ॥ मज तरंगपण असे कीं नसे । ऐसें हें उदकाप्रति कहीं भासे । तें भलतेव्हां जैसें । तैसें उदकचि कीं ॥ ४९ ॥ तरंगाकारें न जन्मेचि । ना तरंग §लोपें निमेचि । तेविं देहीं जे देहेंचि । वस्तु जाहाले ॥ २५० ॥ आतां शरीराचें तयांचिया ठाईं । आडनांवही उरलें नाहीं । तरि कोणें काळें काई । निमे तें पाहें पां ॥ ५१ ॥ मग ¶मार्गातें कासया शोधावें । कोणें कोठूनि कें जावें । जरी देशकाळादि आघवें । आपणचि $असे ॥ ५२ ॥ [नैते सृती पार्थ जानन्] आणि हां गा घट जे वेळीं फुटे । ते वेळीं तेथिचें आकाश लागे नीट वाटे । वाटा लागलें तरि गगना भेटे । येरवीं ||चुके ॥ ५३ ॥ पाहें पां ऐसें हन आहे । कीं तो आकारुचि जाये । येर गगन तें गगनींचि आहे । घटत्वाही आधीं ॥ ५४ ॥ [योगी मुह्यति कश्चन] ऐसिया बोधाचेनि सुरवाडें । मार्गामार्गाचें सांकडें । तया सोहंसिद्धां न पडे । योगियांसीं ॥ ५५ ॥ [तस्मात्] याकारणें [योगयुक्तो भवार्जुन] पंडुसुता । तुवां होआवें योगयुक्ता । [सर्वेषु कालेषु] +येतुलेनि सर्वकाळीं साम्यता । आपैसया

---

* फुडें. † अनवसरीं कहीं. ‡ कां दोरीं. § रूपें. ¶ मार्ग ते कासया शोधावे. $ असिजे. || काय चुके. + येतुलेनि.

---

१ ओळखावें. २ खोटें. ३ असमयीं, संकटांत. ४ भय. ५ जुंपलेल्यांनीं. ६ फिरत, जन्ममरणाच्या रहाटींत. ७ एकाएकीं. ८ ब्रह्मरूप. ९ खोटें, व्यर्थ. १० केव्हांही, भलत्या वेळीं. ११ कोठें. १२ सोईनें. १३ संकट. १४ ब्रह्मच आपण असा अनुभव झालेल्यांस. १५ आपोआप.

होईल ॥ ५६ ॥ मग भलतेथ भलतेव्हां । *देह असो अथवा जावा । परि अबंधा नित्य ब्रह्मभावा । विघड नाहीं ॥ ५७ ॥ तो कल्पादि जन्मा नागवे । कल्पांतीं मरणें नाघ्रवे । माजि स्वर्गसंसाराचेनि लाघवें । झंकवेना ॥ ५८ ॥ येणें बोधें जो योगी होये । तयासीचि या बोधाचें नीटपण आहे । कीं जे भोगातें पेलून पायें । निजरूपा ये ॥ ५९ ॥ पैं गा इंद्रादिका देवां । जयां सर्वस्वें स्वर्गीं गाजती राणिवा । तें सांडणें मानूनि पांडवा । डोंवली जो ॥ २६० ॥

टाकून

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम् २८

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन-
संवादे अक्षरब्रह्मयोगो नाम अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

[वेदेष्विति] जरी वेदाध्ययनाचें जालें । अथवा यज्ञाचें शेत पिकलें । कीं तप दानाचें जोडलें । सर्वस्व हन जें ॥ ६१ ॥ [अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा] तया आघवां पुण्यांचा †मेळा । भार ‡आंतौनि जया ये फळा । तें परब्रह्मा निर्मळा । §सांठि सरे ॥ ६२ ॥ जें नित्यानंदाचेनि मानें । उपमेचा कांटाळां न दिसे सानें । पाहा पां वेदयज्ञादिसाधनें । जया सुखा ॥ ६३ ॥ जें विटे ना सरे । भोगीतयाचेनि पवाडें पुरे । पुढती महासुखाचें सोयरें । भावंडचि ॥ ६४ ॥ ऐसें ¶दृष्टीचेनि सुखपणें । जयासी अदृष्टाचें बैसणें । जें शतमखाही आंगवणें । नोहेचि ॥एका ॥ ६५ ॥ [योगी] तयातें योगीश्वर अलौकिकें । दिठीचेनि हातितुकें । अनुमानती कौतुकें । तंव $हळवार आवडे ॥ ६६ ॥ मग तया सुखाची किरीटी । करूनियां गा पोंडठी । [परं स्थानमुपैति चाद्यं] परब्रह्माचिये पाठीं । आरूढती ॥ ६७ ॥ ऐसें चैराचरैकभाग्य । जें ब्रह्मेशां आराधने योग्य । योगियांचें +भाग्य । भोगधन जें ॥ ६८ ॥ जो

---

* देहबंध. † मळा. ‡ आंतौनियांचि ये. § सांठि न सरे. ¶ दृष्टीचि सुखपणें. || येकां. $ हळवट. + भोग्य.

---

१ बंधरहित. २ न सांपडे. ३ न बुडे. ४ फसत नाहीं. ५ कां कीं. ६ लोटून. ७ इंद्रादिक देव. ८ श्रुतीची गर्जना. ९ त्याज्य. १० दूर लोटी. ११ आंतून. १२ निर्मळ ब्रह्माचे प्राप्तीपुढें कांहीं नाहीं. १३ बरोबरी. १४ ताजव्यांत, उपमेच्या बरोबरीनें. १५ लहान. १६ इच्छेनें. १७ अदृश्यच. १८ इंद्रालाही. १९ स्वाधीन. २० अटकळीनें. २१ सूक्ष्म वाटे. २२ पायरी. २३ स्थावरजंगमांचें मुख्य भाग्य. २४ ब्रह्मदेव व शंकर यांला.

सकळकळांची कळा । जो *परमानंद[1] पुतळा । जो जिवाचा जिव्हाळा[2] । विश्वाचिया ॥ ६९ ॥ जो सर्वज्ञतेचा वोलावा । जो यादवकुळींचा †कुळदिवा । तो श्रीकृष्णजी पांडवा । प्रती बोलिला ॥ २७० ॥ ऐसा कुरुक्षेत्रीं वृत्तांत । संजयो रायासि असे सांगत । तेचि परियेसा पुढारी मात । ज्ञानदेव ह्मणे ॥ २७१ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

श्लोक २८, ओंव्या २७१.

---

* परमानंदाचा. † कुळिवा.

१ मूर्ति. २ जिव्हाळा.

ज्ञानेश्वरी.

अध्याय ९ वा.

तरिं अवधान येकलें दीजे । मग सर्वसुखासि पात्र होइजे । हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड आइका ॥ १ ॥ परी प्रौढी न बोलें होजी । तुह्मा सर्वज्ञांच्या समाजीं । देयावें अवधान हे माझी । विनवणी सलगीची ॥ २ ॥ कां जे लळेयाचे लळे सरती । मनोरथांचे *मनोरथ पुरती । जरी माहेरें श्रीमंतें होती । तुह्मांऐसीं ॥ ३ ॥ तुमचे या दिठिवेयाचिये वोलें । सासिन्नले प्रसन्नतेचे मळे । ते साउली देखोनि लोळें । श्रांत जी मी ॥ ४ ॥ प्रभू तुह्मी सुखामृताचे डोहो । †ह्मणोनि आपुलिया स्वेच्छा ‡वोलावा लाहों । तेथही जरी सलगी करूं बिहों । तरी निवों कें पां ॥ ५ ॥ §ना तरी बाळक बोबडां बोलीं । वांकुडा विचुंका पाउलीं । ते चोज करूनि माउली । रिझे जेवीं ॥ ६ ॥ तेविं तुह्मा संतांचा पंढियावो । कैसेनि तरी आह्मावरि हो । या बहुवा ओळुकिया जी आहों । सलगी करित ॥ ७ ॥ वांचूनि माझिये बोलतिये योग्यते । सर्वज्ञ भवादश श्रोते । काय धड्यावरी सारस्वतें । पढों सिकिजे ॥ ८ ॥ अवधारा आवडे तेसणां धुंधरु । परि महातेजीं न मिरवे काय करूं । अमृताचिया तार्टीं वोगरुं । ऐसी ¶रससोय कैंची ॥ ९ ॥ हां हो हिमकरासीं विंजणें । कीं नादापुढें आइकवणें । लेणियासि लेणें । हें कहीं आथी ॥ १० ॥ सांगा परिमळें काय तुरंबावें । सागरें कवणेठायीं नाहावें । हें गगनचि ओंडे आघवें । ऐसा पवाडु कैंचा ॥ ११ ॥ तैसें तुमचें अवधान धाय । आणि तुह्मी ह्मणा हें होये । ऐसें वक्तृत्व कवणा आहे । जेणें रिझा तुह्मी ॥ १२ ॥ तरि विश्वप्रगटितिया गभस्ती । काय हातिवेन न कीजे आरती । कां चुळो-

---

* मनोरे. † ह्मणऊनि आह्मी. ‡ वोलावो. § आणि बाळक. ¶ रसोय.

---

१ कथानुसंधान, लक्ष. २ योग्य. ३ आळ्यतेनें, ४ द्यावें. ५. लडिवाळपणाची. ६ आवड. ७ कृपादृष्टीच्या ओलाव्यानें. ८ भरास आले. ९ श्रमलेला. १० भीति पावूं. ११ कोठें शांतता होईल. १२ अव्यवस्थित, वांकडीतिकडी. १३ कौतुक. १४ आनंद पावते. १५ प्रीति. १६ इच्छेनें, मुकेनें, आवडीनें. १७ तुम्हांसारिखे. १८ धडे पाठ करून. १९ सरस्वतीपुत्रानें. २० तेवढा. २१ काजवा. २२ वाटूं. २३ पाकनिष्पत्ति. २४ हिम=गार आहेत कर=किरण ज्याचे अशा चंद्राला. २५ पंख्यानें वारा घालणें. २६ कोठें आहे. २७ हुंगावें. २८ अडके, सांठवे. २९ मोठा विस्तार. ३० तृप्त होय. ३१ सर्व जग प्रकाशमय करणाऱ्या सूर्याला. ३२ काडवातीनें. ३३ चूळभर पाण्यानें.

दकें [1]अपांपती । अर्घ्य *नेदिजे ॥ १३ ॥ प्रभू तुझी महेशाचिया मूर्ती । आणि मीं दुबळा अर्चितसें भक्ती । ह्मणोनि बोल जन्ही [2]गंगावती । तन्ही स्वीकाराल कीं ॥ १४ ॥ बाळक बापाचिये तार्टीं रिगे । आणि बापातेंच जेवऊं लागे । कीं तो संतोषलेनि वेगें । मुखचि [3]वोढवी ॥ १५ ॥ तैसा मी जरी तुह्माप्रती । चावटी करितसें बाळमती । तरी तुह्मी संतोषिजे ऐसी जाती । †प्रेमाची असे ॥ १६ ॥ आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें । तुह्मी संत घेतले असा [4]बौहें । ह्मणोनि केलिये सलगीचा नोहे । [5]औभार तुह्मा ॥ १७ ॥ अहो ‡तान्हयाचें लागतां झटें । तेणें अधिकचि पान्हा फुटे । रोषें प्रेम [6]द्विणवटे । [7]पढियंतयाचेनि ॥ १८ ॥ ह्मणऊनि मज लेंकुरुवाचेनि बोलें । तुमचें कृपाळूपण [8]निदैलें । तें चेइलें ऐसें जी जाणवलें । यालागीं बोलिलों मी ॥ १९ ॥ येन्हवीं चांदिणें पिकविजत आहे चेपणीं । कीं [9]वारया धापत आहे §वाहणी । हांहो गगनासि गंवसणी । घालिजे केविं ॥ २० ॥ आइका पाणि वोथिजोवें न लगे । नवनीतीं [10]माथुला न रिगे । तेविं लाजिलें व्याख्यान निगे । देखोनि जयातें ॥ २१ ॥ हें असो [11]शब्दब्रह्म जिये बाजे । शब्द मावळलेया निवांत निजे । तो गीतार्थ मन्हाटीया बोलिजे । हा [12]पांड काई ॥ २२ ॥ परि ऐसियाही मज [13]धिवसा । तो पुढतियाचि येकि आशा । जे ¶धिटींवो [14]करूनि भवादशां । [15]पढियंतया होआवें ॥२३॥ तरि आतां चंद्रापासोनि निववितें । जें अमृताहूनि जिववितें । तेणें अवधानें कीजे वाढतें । मनोरथां माझिया ॥२४॥ कां जैं [16]दिठिवो तुमचा वरुषे । तैं सकळार्थ सिद्धिमती पिके । येन्हवीं कोंभेला [17]उन्मेष सुके । जरी उदास तुह्मी ॥ २५ ॥ सहजें तरी अवधारा । वक्तृत्वा अवधानाचा होय चारा । तरी दोंदें [18]पेलती अक्षरां । [19]प्रमेयाचीं ॥ २६॥ अर्थ बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्रावोचि अभिप्रायातें वियें । भावाचा [20]फुलौरा होत जाये । मतिवरी ॥ २७ ॥ ह्मणूनि संवादाचा [21]सुवावो ढळे । तन्ही हृदयाकाशा [22]सारस्वते वोळे । आणि श्रोता ||दुश्चित तरि वितुळे । मांडला $रसु ॥ २८ ॥ अहो चंद्रकांत द्रवता कीर होये । परि ते हातवटी चंद्रीं

---

* न दीजे. † प्रेमाचीया. ‡ तान्हयाचि लागे झटे । तरी अधिकचि. § वाणी. ¶ धिटींव. || दुचिता. $ रसु.

---

१ समुद्राला. २ एक वनस्पती (निर्गुडी). ३ पुढें करी. ४ बहुत मोहानें. ५ भार, जड. ६ दुणावतें. ७ अत्यंत प्रियाचें. ८ निजलेलें. ९ जागृत जाहलें. १० आर्डींत. ११ वाऱ्याला घातला आहे मार्ग, (वाहणी=पादुका, वाहन, घोडा, रथ, इत्यादि.) १२ पातळ करावें. १३ रवि. १४ वेद. १५ योग्यता. १६ धैर्य. १७ धीटपण. १८ आवडतें, प्रीतिपात्र. १९ कृपादृष्टि. २० ज्ञान. २१ पुष्ट होती. २२ सिद्धांताचीं. २३ गुच्छ, पुष्पमाला. २४ अनुकूल वारा. २५ विद्या, वक्तृत्व प्राप्त होतें.

कीं आहे । ह्मणऊनि वक्ता तो वक्ता नोहे । श्रोतेनिविण ॥२९॥ परि आतां आमुतें गोड करावें । ऐसें तांदुळीं कासया विनवावें । *साइखडियानें काइ प्रार्थावें । सूत्रधारातें ॥ ३० ॥ †तो काय बाहुलियांचिया काजा नाचवी । कीं आपुलिये जाणिवेची कळा वाढवी । ह्मणऊनि आह्मा या ठेवाठेवी । काय काज ॥ ३१ ॥ तंव श्रीगुरु ह्मणती काइ जाहालें । हें समस्त ही आह्मा पावलें । आतां सांगें जें निरोपिलें । श्रीकृष्णदेवें ॥ ३२ ॥ येथ संतोषोनि निवृत्तिदासें । जी जी ह्मणऊनि उल्हासें । अवधारा श्रीकृष्ण ऐसें । बोलते जाहाले ॥ ३३ ॥

श्रीभगवानुवाच–**इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ।**
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥१॥

[श्रीभगवानुवाच–इदं तु ते गुह्यतमं] ना तरि अर्जुना हें बीज । पुढती सांगिजेल तूज । जें हें अंतःकरणींचें गुज । जिवाचिये ॥३४॥ [अनसूयवे] येणें मानें जीवाचें हियें ‡फोडावें । मग गुज कां पां मज सांगावें । ऐसें कांहीं स्वभावें । कल्पिशी जरी ॥ ३५ ॥ तरी परियेसीं गा प्राज्ञा । तूं आस्थेचीच संज्ञा । बोलिलिये गोष्टीची अवज्ञा । नेणसी करूं ॥ ३६ ॥ ह्मणोनि गूढपण आपुलें मोडो । वरि न §बोलणेंही बोलावें घडो । परि आमुचिये जीवींचें पडो । तुझ्या जिवीं ॥ ३७ ॥ अगा थानीं कीर दूध गूढ । परि थानासींचि नव्हे कीं गोड । ह्मणोनि सैरो कां सेवितयाची चाड । जरी अनन्य मिळे ॥३८॥ मुंडांडूनि बीज काढिलें । मग निर्वाळलिये भूमी पेरिलें । तरि तें सांडिविखुरी गेलें । ह्मणोंये काय ॥ ३९ ॥ यालागीं सुमन आणि शुद्धमती । जो अनिंदक अनन्यगती । ¶पैं गा गौप्यही परि तयाप्रती । चोवळिजे सुखें ॥ ४० ॥ तरि प्रस्तुत आतां गुणीं इहीं । तूं वांचून आणिक नाहीं । ह्मणोनि गूज तरी तुझ्याठायीं । लपऊं नये ॥ ४१ ॥ [ज्ञानं विज्ञानसहितं] आतां किती नांवानावा गुज । ह्मणतां कोंनडें वाटेल तुज । तरि सांगेन ज्ञान सहज । विज्ञानेसीं ॥४२॥ [प्रवक्ष्यामि] परि तेंचि ऐसेनि निवाडें । जैसें भेसळलें खरें कुडें । मग काढिजे फोडोवाडें । पारखूनियां ॥ ४३ ॥ कां चांचूचेनि सांडसें । खोंडिजे पय पाणी राजहंसें । तुज ज्ञान विज्ञान तैसें । वांटूनि देऊं ॥ ४४ ॥ [यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशु-

---

* साइखेडियानें. † तो कायि. ‡ फेडावें. § बोलावें. ¶ पैं गौप्यही.

१ बाहुलीनें. २ ज्ञानाची. ३ खटपट. ४ हृदय, गुह्य. ५ नांव. ६ पूर्ण होवो. ७ अन्य आश्रय न करणारा. ८ मुळ्यांतून पेरण्याचें बीं. ९ तयार केलेल्या, साफ केलेल्या. १० सांडून विखरून टाकलें. ११ प्रशस्त अंतःकरणाचा. १२ सांगावें. १३ वारंवार. १४ वांकडें. १५ संसारज्ञानासहित, व्यवहारिकज्ञानासहित, विपरीतज्ञानासहित. १६ खोटें. १७ स्पष्ट करून. १८ चोंचीचे. १९ निरनिराळें करावें.

भात्] मग वारयाचिया [1]धारसा । पडिनला कोंडा कां नुरेचि जैसा । आणि कणाचा आपैसा । [2]रोंशिवा जोडे ॥ ४५ ॥ तैसें जें जाणीतलेया [3]साठी । संसार संसाराचिये गांठी । लाऊनि बैसवी पाठीं । मोक्षश्रियेच्या ॥ ४६ ॥

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ २ ॥

[राजविद्या राजगुह्यं] जें जाणणेया सुविद्येच्या गांवीं । [4]गुरुत्वाची आचार्यपदवी । जें सकळगुह्याचा [5]गोसावी । पवित्रां रावो ॥ ४७ ॥ [धर्म्यं] आणि धर्माचें निजधाम । [इदमुत्तमं] तेविंचि उत्तमाचें उत्तम । पैं जया येतां नाहीं काम । जन्मांतराचें ॥४८॥ [प्रत्यक्षावगमं] [6]मोटकें गुरुमुखें उदै[7]जत दिसे । आणि हृदयीं स्वयंभचि असे । प्रत्यक्ष [8]फावों लागे तैसें । आपैसयाचि ॥ ४९ ॥ [कर्तुं] तेवींचि गा सुखाच्या [9]पांडटीं । चढतां येइजे जयाच्या भेटी । मग भेटल्या [10]कीर मिठी । [11]भोगणें याहि पडे ॥ ५० ॥ [सुसुखं] परि भोगाचिये ऐलीकडिलिये [12]मेरे । चित्त उभें ठेलें *[13]सुखाभरें । ऐसें [14]सुलभ आणि [15]सोपारें । वरि परब्रह्म ॥ ५१ ॥ [अव्ययं] पैं गा आणिकही एक यातें । जें हाता आलिया तरी न [16]वचे । आणि अनुभवितां कांहीं न वेचे । वरि विटेहि ना ॥ ५२ ॥ येथ जरी तूं [17]तार्किका । ऐसी हन घेसी शंका । ना येवढी वस्तु हे लोकां । उरली केविं पां ॥ ५३ ॥ जे [18]एकोत्तरेयाचिया वाढी । जळतिये आगीं घालिती उडी । ते अनायासें स्वगोडी । सांडिती केविं ॥ ५४ ॥ तरि पवित्र आणि रम्य । तेविंचि सुखोपाय †सुगम । आणि ‡[19]सुसुख परम [20]धर्म्य । वरि आपण जोडे ॥ ५५ ॥ ऐसा अवघाचि हा [21]सुरवाड आहे । तरीं जनाहातीं केविं उरों लाहे । हा शंकेचा ठाव कीर होये । परि न धरावी तुवां ॥ ५६ ॥

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ।
अप्राप्य मां निवर्तंते मृत्युसंसारवर्त्मनि ॥ ३ ॥

[अश्रद्दधानाः पुरुषाः] पाहें पां दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया प-

---

* सुखा भरे. † सुगम्य. ‡ स्वसुख परि धर्म्य.

---

१ प्रवाहांत. २ ढीग. ३ बरोबर. ४ नाश. ५ महत्त्वाची. ६ स्वामी. ७ थोडें. ८ उदयास येत. ९ प्राप्त होय. १० पायरीवर. ११ अन्य भोगण्याला मिठी पडते = अन्य विषय नकोसे होतात अथवा ज्याच्या भोगाकरितां मिठी = ऐक्य होतें, परंतु भोगापूर्वीच सुख होतें हा विशेष. १२ सीमेवर. १३ सुखार्थ. १४ सुखें मिळविण्यास योग्य. १५ अनायासें घेण्याजोगें. १६ जात नाहीं. १७ तर्कज्ञान्यामार्णे. १८ शेंकडा १ रुपया व्याज. १९ अतिसुखकारक. २० उत्कृष्ट धर्मयुक्त. २१ अनुकूळ.

दरा आड । परि तें अव्हेरूनि गोचिड । अशुद्धचि सेवी ॥ ५७ ॥ कां कमलकंदा आणि दुर्दरीं । नांदणूक एकेचि घरीं । परि पराग सेविजे भ्रमरीं । येरां चिखलचि उरे ॥ ५८ ॥ ना तरी निदैवाच्या परिवरी । लोह्या रुतलिया आहाति सहस्रवरी । परि तेथ बसोनि उपवास करी । कां दरिद्रें जिये ॥५९॥ [धर्मस्यास्य परंतप] तैसा हृदयामध्यें मी राम । असतां सर्वसुखाचा आराम । कीं भ्रांतासी काम । विषयांवरी ॥ ६० ॥ [अप्राप्येति] बहु मृगजळ देखोनि डोळां । थुंकिजे अमृताचा गिळितां गळाळा । तोडिला परिस बांधिला गळां । शुक्तिकाळाभें ॥ ६१ ॥ तैसी अहंममतेचिये लवडसवडी । मातें न पवतीचि बापुडीं । ह्मणोनि जन्ममरणाचिये दुथडीं । डोहुळितें ठेलीं ॥ ६२ ॥ येन्हवीं मी तरी कैसा । मुखाप्रति भानु कां जैसा । *केंही नसे न दिसे ऐसा । वाणीचा नोहें ॥ ६३ ॥

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।

मत्स्थानि सर्वभूतानि न चाऽहं तेष्ववस्थितः ॥ ४ ॥

[मया ततमिदं सर्वं जगत्] माझेया विस्तारलेपणाचेनि नांवें । हें जगचि नोहे आघवें । जैसें दूध मुराले स्वभावें । तरि तेंचि दहीं ॥६४॥ कां बीजचि जाहलें तरु । अथवा भांगारची आळंकारु । तैसा मज एकाचा विस्तारु । तें हें जग ॥ ६५ ॥ [अव्यक्तमूर्तिना] हें अव्यक्तपणें थिजलें । तेंचि मग विश्वाकारें वोथिजलें । तैसें †अमूर्तमूर्ति मियां विस्तारलें । त्रैलोक्य जाणे ॥ ६६॥ [मत्स्थानि सर्वभूतानि] महदादि देहांतें । इयें अशेषेंही भूतें । पैं माझ्याठायीं ‡बिंबितें । §जैसे जळीं फेण ॥ ६७ ॥ [न चाहं तेष्ववस्थितः] परि तया फेनाआंत पाहातां । जेवीं जळ न दिसे पंडुसुता । ना तरीं स्वप्नींची अनेकता । चेईलेया ¶नोहिजे ॥ ६८ ॥ तैसीं भूतें इयें माझ्याठायीं । बिंबती तयांमाजि मी नाहीं । इया उपपत्ती तुज पाहीं । सांगीतलिया मोगां ॥ ६९ ॥ ह्मणऊनि बोलिलिया बोलाचा अंतिसो । न किजे यालागीं हें असो । परि मज आंत पैसो । दिठी तुझी ॥ ७० ॥

---

* केंही दिसे न नसे. † अमूर्त मूर्तिमय. ‡ बिंबतें. § जैसा. ¶ नाहीं.

---

१ रक्त. २ बेडकांना. ३ मकरंद. ४ घरीं. ५ मोहोरा स्वर्ण इत्यादि पुरलेल्या. ६ बाग, विश्रांति. ७ घोट. ८ लगबगीनें. ९ दोनी तीरीं. १० घुसळत. ११ बोलण्याचा, न्यूनतेचा. १२ म्हणजे. १३ थिजलें. १४ सुवर्ण. १५ अस्पष्टपणानें. १६ पातळ झालें. १७ अमूर्तमूर्ति=निर्गुण असून साकार झालेला जो मी त्यानें. १८ महत्तत्त्वापासून देहापर्यंत. १९ प्रतिबिंब पावलेलीं. २० जागे झाल्यावर नाहींशी होते. २१ उपपादन. २२ सप्तमाध्यायाच्या 'येचैव सात्विका भावाः' ह्या बाराव्या श्लोकांत. २३ सप्तमाध्यायाच्या १२ व्या श्लोकांत. बोललेल्या २४ पाव्हाळ. २५ राहो, प्रवेशो. २६ दृष्टि.

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥

[नच मत्स्थानि भूतानि] आमुच्या प्रकृतीपैलीकडील भावो[1] । जरी कल्पनेवीण लागसी पाहों । तरि मजमाजि भूतें हेंही वावो[3] । जें मी सर्व ह्मणऊनी ॥ ७१ ॥ [भूतभृत्] येन्हवीं संकल्पाचिये सांजवेळे । नावेक तिमिरेजती बुद्धीचे डोळे[4] । ह्मणोनि अखंडितचि परि झांबळे[5] । भूतभिन्न ऐसें देखे ॥ ७२ ॥ [ममात्मा] तेचि संकल्पाची सांज जैं लोपे[6] । तैं अखंडितचि आहे स्वरूपें । जैसें शंका जातखेंवो[7] लोपे । सापपण माळेचें ॥ ७३ ॥ [भूतभावनः] येन्हवीं तरी भूमी आंतूनि स्वयंभ । काय घंडेया गाडगेयांचे निघती कोंभ[8] । परि ते कुलालमतीचे[9] गर्भ । उमटले कीं ॥ ७४ ॥ ना तरि सागरींच्या पाणीं । काय तरंगाचिया आहाती खाणी । ते अवांतर करणी[10] । वारयाची नव्हे ॥ ७५ ॥ पाहें पां कापसाच्या पोटीं । काय कापडाची होती पेटी । तो वेढीतैंयाचिया[11] दिठी । कापड जाहला ॥७६॥ जरी सोनें लेणें होऊनि घडे । तरि तयाचें सोनेपण *न मोडे । येर अलंकार हे वरिवचिलीकडे[12] । लेतयाचेनि भावें ॥ ७७ ॥ सांगें पडिसादाचीं प्रत्युत्तरें[13] । कां †अरिसा जें आविष्करे[14] । तें आपलें कीं सोचोकारें[15] । तेथेंचि होतें ॥ ७८ ॥ तैसी ‡इये निर्मळ माझ्या स्वरूपीं । जो भूतभावना[16] आरोपी । तयासि तयाच्या संकल्पीं । भूताभास असे ॥ ७९ ॥ तेचि कल्पिती[17] प्रकृती पुरे । §तरि भूताभास आधींच सरे[18] । मग स्वरूप उरे एकसरें । निखळ[19] माझें ॥ ८० ॥ हें असो आंगीं भरलिया भवंडी । जैशा भोंवत दिसती अरंडीदरडी[20] । तैशीं आपलिया कल्पना अखंडीं[21] । गमती भूतें ॥ ८१ ॥ [नच भूतस्थो] तेचि कल्पना सांडूनि पाहीं । तरि मी भूतीं भूतें माझियाठायीं । स्वप्नींही परि नाहीं । कल्पावयाजोगें ॥ ८२ ॥ [योगमैश्वरम्] आतां मीच येक भूतांतें धर्ता[22] । अथवा भूतांमाजि मी असता[23] । या संकल्पसन्निपाता[24] । आंतुलिया बोलिया ॥ ८३ ॥ ह्मणोनि परियेसीं गा प्रियोत्तमा । ¶यापरि मी विश्वेंसीं विश्वात्मा । जो इया लटकिया भूतग्रामा । भोव्य[25] सदां ॥ ८४ ॥ रश्मीचेनि[26] आधारें जैसें । $नव्हतेंचि मृगजळ आभासे । माझ्या-

---

* काय मोडे. † अरिसां. ‡ इयें निर्मळें. § आणि. ¶ मी विश्वासी विश्वात्मा. $ नव्हे तेंचि.

---

१ स्वरूप, सत्ता. २ मिथ्या. ३ कांहीं वेळ अंधक होती. ४ भ्रमांत पडे. ५ भूतांहून भिन्न व भूतें धारणकर्ता. ६ जातांक्षणीं. ७ हांडी मडकीं. ८ कुंभाराच्या बुद्धीचे. ९ वेगळी. १० वापरणाराच्या मतीनें. ११ वरवर. १२ प्रतिध्वनीचीं. १३ आरशांत. १४ प्रगट करी. १५ खरेपणानें. १६ भूताची कल्पना. १७ कल्पना करणारी. १८ नाहींसा होतो. १९ शुद्ध, निवळ. २० भोंवतालचें गिरिकंदर. २१ ब्रह्मीं. २२ धारण करणारा. २३ असणारा. २४ संकल्पाच्या सन्निपातें वायूच्या लहरींतील. २५ भावना करण्याजोगा. २६ किरणांच्या.

ठायीं[१] भूतजात तैसें । आणि मातेंही[२] भावी ॥ ८५ ॥ मी येपरीचा[३] भूतभावनु । परि सर्व भूतांसि अभिन्नु[४] । जैसी प्रभा आणि भानु । एकचि ते ॥ ८६ ॥ [पश्य मे] हा आमुचा ऐश्वर्ययोगु । तुवां देखिला कीं चांग । आतां सांगें कांहीं एथ लागु । भूतभेदाचा असे ॥ ८७ ॥ यालागीं मजपासूनि भूतें । आनें नव्हती हें निरुतें[६] । आणि भूतांवेगळिया मातें[७] । कांहींच न मनी हो ॥ ८८ ॥

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ६ ॥

[यथाकाशस्थितो नित्यमिति] पैं गगन जेवढें जैसें । पवनहि गगनीं तेवढाचि असे । सहजें हालविलिया वेगळा दिसे । येऱ्हवीं गगन तेंचि तो ॥ ८९ ॥ [तथा सर्वाणीति] तैसे भूतजात माझ्याठायीं । कल्पिजे तरी आभासे कांहीं । निर्विकल्पीं[८] तरी नाहीं । तेथ मीचि मी आघवें ॥ ९० ॥ ह्मणऊनि नाहीं आणि असे । हें कल्पनेचेनि[९] सौरसें[१०] । जे कल्पनालोपें भ्रंशे । आणि कल्पनेसवें होय ॥ ९१ ॥ तेंचि कल्पितें[११] मुदल जाये । तैं असे नाहीं हें कें आहे । ह्मणउनि पुढती तूं पाहें । हा ऐश्वर्ययोगु ॥ ९२ ॥ ऐसि या प्रतीति[१२] बोधसागरीं । तूं *आपणेयातें[१३] कल्होळ[१४] एक करीं । मग जंव पाहासी चराचरीं । तंव तूंचि आहासी ॥ ९३ ॥ या जाणणेयाचा चेवो[१५] । तुज आला ना ह्मणती । देवो तरी आतां द्वैत स्वप्न वावो[१६] । जालें कीं ना ॥ ९४ ॥ तरी पुढती जरी विपायें[१७] । बुद्धीसि कल्पनेची झोंप ये । तरि अभेदबोधु जाये । जैं स्वप्नीं पडिजे ॥ ९५ ॥ ह्मणोनि ये निद्रेची वाट मोडे । निखिळ उद्बोधाचेंचि आपणपें[१८] घडे । ऐसें वर्म जें आहे फुडें[१९] । तें दावों आतां ॥ ९६ ॥ तरी धनुर्धरा धैर्या[२०] । निकें अवधान देई या धनंजया । पैं सर्व भूतांतें माया । करी[२१] हरी गा ॥९७॥

सर्वभूतानि कौंतेय प्रकृतिं यांति मामिकाम् ।
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥ ७ ॥

[प्रकृतिं] जिये नांव †गा प्रकृती । जे द्विविध[२२] सांगीतली तुजप्रती । एकी

---

* आपणपेयातें. † कां प्रकृति.

---

१ प्राणिमात्र. २ कल्पी. ३ व्यापक विष्णु. ४ एकरूप, निराळा नव्हे. ५ संबंध. ६ खरें. ७ कधींही मानीत नाहीं. ८ वायु. ९ न कल्पितां कल्पनातीत. १० अभिप्रायानें, संबंधानें. ११ कल्पिणारें. १२ अनुभवानें. १३ आपल्याला. १४ तरंग. १५ जागृति. १६ व्यर्थ. १७ कदाचित्. १८ जागेपणाचें. १९ खरें. २० मूर्तिमंत धैर्यच असें मानून संबोधन देतात, हे धैर्यपुतळ्या. २१ उत्पत्ति व संहार करिते. २२ अध्याय ७ श्लोक ४–५ 'भूमिरापो', 'अपरेयमितः' यांत.

अष्टधा भेदव्यक्ती । दुजी जीवरूपा ॥ ९८ ॥ हा प्रकृतीविखो आघवा । तुवां मागां परिसिलासे पांडवा । [७ अध्याये भूमिरिति ४।५ श्लोकयोर्व्याख्यातं] ह्मणोनि असो काइ सांगावा । पुढतपुढती ॥९९॥ [मामिकां] तरी ये माझिये प्रकृती । [क्रल्पक्षये] महाकल्पाच्या अंतीं । [सर्वभूतानि कौंतेय] सर्व भूतें अव्यक्तीं । [यांति] ऐक्यासि येती ॥ १०० ॥ ग्रीष्माच्या अतिरसीं । सबीजें तृणें जैसीं । नागुती भूमीसी । सुलीनें होती ॥ १ ॥ कां वार्षिये ढेंढें फिटे । जेव्हां शारदीयेचा अनुघडु फुटे । तेव्हां घनजात आटे । गगनींचें गगनीं ॥ २ ॥ ना तरी आकाशाचे खोंपे । वायु निवांतचि लोपे । कां तरंगाकार हारपे । जळीं जेवीं ॥३॥ अथवा जागिनलिये वेळे । स्वप्न मनींचें मनीं मावळे । तैसें प्राकृत प्रकृतीं मिळे । कल्पक्षयीं ॥४॥ [पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहं] मग कल्पादीं पुढती । मीचि सृजीं ऐसी वदंती । तरी इयेविषयीं निरुती । उपपत्ती आइक ॥ ५ ॥

प्रकृतिं स्वामधिष्ठाय विसृजामि पुनः पुनः ।
भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥ ८ ॥

[प्रकृतिं स्वामवष्टभ्य] तरी हेचि प्रकृती किरीटी । मी स्वकीया सहजें अधिष्ठीं । तेथ तंतूंसमवायपटीं । जेविं विणावणी दिसे ॥ ६ ॥ [विसृजामि पुनः पुनः] मग तिये विणावणीचेनि आधारें । लाहाना चौकडिया पटत्व भरे । तैसी पंचात्मकें आकारें । प्रकृतीचि होय ॥ ७ ॥ जैसें विरजणियाचेनि संगें । दूधचि आटेजों लागे । तैसी प्रकृती आंगा रिगे । सृष्टीपणाचिया ॥ ८ ॥ बीज जळाची जवळीक लाहे । आणि तेचि शाखोपशाखीं होये । तैसें मज करणें आहे । भूतांचें हें ॥ ९ ॥ अगा नगर हें रायें केलें । या ह्मणणया साचपण कीर आलें । *परि निरुतें पाहातां काय सिणले । रायाचे हात ॥११०॥ आणि मी प्रकृती अधिष्ठीं तें कैसें । जैसा स्वप्नीं जो असे । मग तोचि प्रवेशे । जागृतावस्थे ॥ ११ ॥ तरि स्वप्नौनि जागृती येतां । काय पाय दुखती पंडुसुता । कीं स्वप्नामाजि असतां । प्रवास होय ॥ १२ ॥ या आघवियाचा अभिप्रावो कायी । जे हें भूतसृष्टीचें कांहीं । मज एकही करणें नाहीं । ऐसाचि अर्थ ॥ १३ ॥ [प्रकृतेर्वशात्] जैसी रायें अधिष्ठिली प्रजा । व्यापारे आपुलालिया

---

* तरी.

---

१ आठ प्रकारच्या रूपानें. २ मायेचा विषय. ३ वारंवार. ४ महाप्रळयाच्या शेवटीं. ५ अस्पष्ट जीवप्रकृतींत, अव्यक्त जी प्रकृति तींत. ६ उष्णकाळीं. ७ बीजासहित. ८ गुप्त होतात. ९ वर्षाकाळींचें. १० अवडंबर. ११ शरदृतूचा. १२ गुप्तपण प्रकटें. १३ पोटांत. १४ जागृतींत. १५ प्रकृतीपासून झालेलें. १६ बोलवा, वार्ता. १७ खरी. १८ उपपादन, युक्ति. १९ आश्रय करतों. २० तंतूंचा समुदाय–संबंध. २१ विणकर. २२ पंचमहाभूतात्मक. २३ विरजूं लागतें. २४ तें पाणीच बीजसान्निध्यानें शाखांत जातें. २५ स्वप्नांतून. २६ कारण.

काजा । तैसा प्रकृती संग माझा । येर करणें तें इयेचें ॥ १४ ॥ पाहें पां पूर्ण-चंद्राचिये भेटी । समुद्रीं अपार भरतें दाटी । तेथ चंद्रासि काय किरीटी । उपखा पडे ॥ १५ ॥ जड परि जवळिका । लोह *चळे तरिं चळो कां । तरि कवण शीण भ्रामका । सन्निधानाचा ॥ १६ ॥ किंबहुना यापरी । मी निजप्रकृती अंगिकारीं । आणि भूतसृष्टी ऐकसरी । प्रसवोंचि लागें ॥ १७ ॥ [भूतग्राममिमं कृत्स्नं] जो हा भूतग्राम आघवा । [अवशं] असे प्रकृतीअधीन पांडवा । जैसी बीजाचिया वेलेंपालवा । समर्थ भूमी ॥ १८ ॥ ना तरी बाळादिकां वैभवसा । गोसावी देहसंग जैसा । अथवा घनावळी आकाशा । †वर्षिये जेवीं ॥ १९ ॥ कां स्वप्नासि कारण निद्रा । तैसी प्रकृती हे नरेंद्रा । या अशेषाहि भूतसमुद्रा । गोसावि‍णी गा ॥ १२० ॥ स्थावरा आणि जंगमा । स्थूळा अथवा सूक्ष्मा । हे असो भूतग्रामा । प्रकृतीचि मूळ ॥ २१ ॥ ह्मणोनि भूतें हन सृंजावीं । कां सृजिलीं प्रतिपाळावीं । इयें ‡करणीं न येती आघवीं । आमुचिया आंगा ॥ २२ ॥ जळीं चंद्रकेचिया पसरती वेली । ते वांढी चंद्रें नाहीं केली । तेविं मातें पावोनि ठेली । दूरी कर्में ॥ २३ ॥

न च मां तानि कर्माणि निबध्नंति धनंजय ।
उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥ ९ ॥

[न च मां तानि कर्माणि] आणि सुटलिया सिंधुजळाचा लोट । न शके धरूं सैंधवाचा घांट । तेविं सकळ कर्मा मीचि शेवट । [निबध्नंति धनंजय] तौं काय बांधती मातें ॥ २४ ॥ धूमरजांची पिंजरी । वाजतिया वायूतें जरी होकारी । कां सूर्यबिंबामाझारीं । आंधारें §शिरे ॥ २५ ॥ हें असो पर्वताचिये हृदयींचें । जेविं पर्जन्यधारास्तव न खोंचे । तेविं कर्मजात प्रकृतीचें । न लगे मज॥२६॥ [उदासीनवदासीनं] येऱ्हवीं इयें प्रकृतीविकारीं । एक मीचि असें अवधारीं । परि उदासीनाचिया परीं । करीं ना करवीं ॥ २७ ॥ जैसा दीप ठेविला पैरिवरीं । कवणातें नियमी ना निवारी । आणि कवण कवणिये व्यापारीं । रिहाटे तेंहि नेणे ॥ २८ ॥ [असक्तं तेषु कर्मसु] तो जैसा कां साक्षिभूतु । गृहव्यापारप्रवृत्तिहेतु । तैसा भूतकर्मीं अनासक्तु । मी भूतीं असें ॥ २९ ॥ हा एकचि अभिप्रावो पुढतपुढती । काय सांगों बहुतां उपपत्ती । येथ ऐकेहेळा सुभद्रापती । येतुलें जाण पां ॥ १३० ॥

---

* चाले तरी चालो. † वर्षिये. ‡ करणें. § उरे, रिगे.

---

१ श्रम.२ लोहचुंबकाला.३ एकदम.४ प्राणिसमुदाय. ५ वेली पल्लवाला.६ वयास.७ आत्म्यास. ८ आकाशांत मेघ उत्पन्न होण्यास वर्षाकाळ कारण. ९ आई. १० उत्पन्न करावीं. ११ ह्या कृति. १२ उत्पत्ति. १३ मिठाचा. १४ धुराच्या कणांचा पिंजरा. १५ धांवबील, खोळंबवील.१६ न वेधे. १७ घरांत. १८ व्यवहार करतो. १९ द्रष्टा. २० गृहकृत्यांची प्रवृत्ति होण्यास कारण. २१ उदासीन. २२ पुनः पुनः. २३ एकवेळ.

हजातें करिती । [१]स्वयंभातें प्रतिष्ठिती । निरंतरातें [२]आव्हानिती । [३]विसर्जिती गा ॥ ६३ ॥ मी सर्वदा स्वतःसिद्ध । तो कीं बाळ तरुण वृद्ध । मज एकरूपा संबंध । जाणती ऐसे ॥ ६४ ॥ मज अद्वैतासि दुजें । मज अकर्तयासि काजें । मी अभोक्ता कीं [४]भुंजे । ऐसें ह्मणती ॥ ६५ ॥ मज अकुळाचें कुळ वानिती । मज नित्याचे [५]निधनें शिणती । मज सर्वांतरातें कल्पिती । [६]अरि मित्र गा ॥ ६६ ॥ मी [७]स्वानंदाभिराम । तया मज अनेकसुखाचा काम । आघवाचि मी असें सम । कीं ह्मणती एकदेशी ॥ ६७ ॥ मी आत्मा एक चराचरीं । ह्मणती एकाचा [८]कैपक्ष करीं । आणि कोपोनि एकातें मारीं । हेचि *[९]रूढविती ॥ ६८ ॥ किंबहुना ऐसे समस्त । जे हे [१०]मानुषधर्म प्राकृत । तयाचि नांव मी ऐसें विपरीत । ज्ञान तयांचें ॥ ६९ ॥ जंव आकार एक पुढां देखती । तंव हा देव येणें भावें भजती । मग तोचि विघडलिया टाकिती । नाहीं ह्मणोनि ॥ १७० ॥ मातें येणें येणें प्रकारें । जाणती मनुष्य ऐसेनि आकारें । ह्मणऊनि ज्ञानचि तें [११]आंधारें । ज्ञानासि करी ॥ ७१ ॥

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ।
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ॥ १२ ॥

[मोघाशाः] [१२]यालागीं जन्मले ते मोघ [१३]। जैसें [१४]वांझियेवीण मेघ । कां मृगजळाचे तरंग । दुरूनीचि पाहावे ॥ ७२ ॥ अथवा [१५]कोल्हेरीचे असिवार । ना तरी [१६]वोडंबरीचे अळंकार । कीं गंधर्वनगरीचे [१७]आवार । आभासती कां ॥ ७३ ॥ [१८]सांबरी वाढिन्नल्या सरळा । वरी फळ नाहीं आंत पोकळा । कां स्तन जाले गळां । शेळिये जैसे ॥ ७४ ॥ तैसें मूर्खांचें तया जियेंलें । [मोघकर्माणः] आणि धिग कर्म तयांचें निफजलें । जैसें सांवरी फळ आलें । [२१]घेपे ना दीजे ॥ ७५ ॥ [मोघज्ञानाः] मग जें कांहीं ते पढिन्नले । तें मर्कटें नारेळ तोडिलें । कां आंधळ्याहातीं पडिलें । मोतीं जैसें ॥ ७६ ॥ किंबहुना तयाचीं शास्त्रें । जैसीं कुमारीहातीं दीधलीं शस्त्रें । कां [२२]अशौच्या मंत्रें । बीजें कथिलीं ॥ ७७ ॥ [विचेतसः] तैसें ज्ञानजात तयां । आणि जें कांहीं आचरलें गा धनंजया । तें आघवेंचि गेलें वायां । जे [२३]चित्तहीन ॥ ७८ ॥ [राक्षसीमासुरीं चैव] पैं तमोगुणाची

---

* वाढविती. + सर्वविशेषेहीन

---

१ स्वतःसिद्धाला. २ आवाहन करतात. ३ विसर्जन करतात, पोंचवितात. ४ भोगी. ५ मरणानें. ६ शत्रुमित्र. ७ निजानंदांत निमग्न. ८ पाठ राखणा, कैवारी. ९ प्रसिद्धीस आणिती. १० मनुष्याचे धर्म. ११ काळोख, अज्ञान, १२ सारांश. १३ व्यर्थ. १४ पर्जन्यकाळावांचून. १५ मातीच्या चित्रांचे. १६ स्वार. १७ कपटविद्येचे. १८ गांवकुसूं. १९ शेर. २० वांचणें. २१ घेणें व देणें कांहीं नाहीं. २२ अशुद्ध, अशुचिभूतास. २३ चित्त स्वाधीन नसणारे.

राक्षसी । जे सुबुद्धीतें ग्रासी । विवेकाचा ठावचि पुसी । निशाचरी जे ॥७९॥ [प्रकृतिं मोहिनीं श्रिताः] तिये प्रकृती वैरपडे जाले । ह्मणऊनि *चिंतेचेनि कपाटें गेले । वरि तामसीयेचि पडिले । मुखामाजी ॥ १८० ॥ जेथ आशेचिये लाळे । आंत हिंसा जीभ लोळे । तेवींचि †असंतोषाचे ‡चाकळे । अखंड चघळी ॥ ८१ ॥ §जे अनर्थांचे कानवेरी । आवाळुवें चाटीत निघे बाहेरी । जे प्रमादपर्वतींची दरी । सदाचि मातली ॥ ८२ ॥ जेथ द्वेषाचिया दाढा । खसखसां ज्ञानाचा करिती रगडा । जे त्वंगस्थि गवसणी मूढां । स्थूलबुद्धी ॥ ८३ ॥ ऐसे आसुरिये प्रकृतीचे तोंडीं । जे जाले गा भूतोंडीं । ते बुडोनि गेले कुंडीं । व्यामोहाच्या ॥९४॥ एवं तमाचिये पडिले गर्ते । न पविजतीचि विचाराचेनि हातें । हें असो ते गेले जेथें । ते शुद्धीचि नाहीं ॥ ८५ ॥ ह्मणोनि असोतु इयें वायाणीं । कायसीं मूर्खाचीं ¶बोलणीं । वायां वाढवितां वाणी । शिणेल हन ॥८६॥ ऐसें बोलिलें देवें । तेथ जी जी ह्मणीतलें पांडवें । आइकें जेथ वाचा $विसवे । ते साधुकथा ॥ ८७ ॥

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।
भजंत्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥ १३ ॥

[महात्मानस्तु मां पार्थ] तरी जयाचे चोखटे मानसीं । मी होऊनि असें क्षेत्रसंन्यासी । जया निजेल्यातें उपासी । वैराग्य गा ॥८८॥ [दैवीं प्रकृतिमाश्रिताः] जयाचिया आस्थेचिया सद्भावा । आंत धर्म करी राणिवा । जयाचें मन ओलावा । विवेकासी ॥ ८९ ॥ जे ज्ञानगंगे नाहाले । पूर्णता जेऊनि धाले । जे शांतीसि झाले । पैलव नवे ॥ १९० ॥ जे परिणामा निघाले कोंभ । जे धैर्यमंडपाचे स्तंभ । जे आनंदसमुद्दीं कुंभ । चुंबुकुळोनि भरिले ॥ ९१ ॥ [भजंति] ॥जयां भक्तीची येतुली प्रौढी । जे कैवल्यातें परतें सर ह्मणती । जयाचिये लीळेमाजि नीती । जियाली दिसे ॥९२॥ [अनन्यमनसः] जे आघवांचि करणीं । लेइले शांतीचीं लेणीं । जयांचें चित्त गर्वसणी । व्यापका मज ॥ ९३ ॥ [ज्ञात्वा भूतादिमव्ययं] ऐसे जे महानुभाव । दैविये प्रकृतीचें दैव । जे जाणोनियां

---

* चित्तावें कपाटें (चित्तावरण), कपाळें. † संतोषाचे. ‡ कवळे. § जेथ. ¶ काहाणी. $ विसावे. || जयांजिये.

---

१ जखीण. २ ग्रस्त. ३ विक्षिप्त, चिंताद्वारें. ४ मांसगोळे. ५ कानापर्यंत. ६ ओंठप्रांत. ७ जी माया प्रमाद (भूल)रूप पर्वताच्या गुहेंत माजली आहे. ८ कारण. ९ चर्म व हाडें यांनीं भरलेला देहच ज्यांना आपल्या स्थूलबुद्धीला गवसणी झालेला आहे. १० राक्षसी. ११ भूतवळी. १२ भ्रांतीच्या. १३ खळग्यांत, भोंवऱ्यांत. १४ ही निष्फल कथा राहूं दे. १५ वर्णन. १६ विश्रांति पावे. १७ निर्मळ. १८ जिवितावधि एकाच क्षेत्रीं वास्तव्याचा संकल्प केलेला. १९ सेवा करी. २० राज्य. २१ तृप्त झाले. २२ पालवी. २३ बुडवून. २४ शक्ति. २५ मोक्षाला. २६ सजीव. २७ इंद्रियांचेठायीं. २८ खोळ. २९ भाग्य.

सर्व । स्वरूप माझें ॥ ९४ ॥ मग वाढतेनि प्रेमें । मातें भजती जे महात्मे । परि दुजेपण[7] मनोधर्मे[8] । शिवतलें नाहीं ॥ ९५ ॥ *ऐसे मीच होऊनि पांडवा । करिती माझी सेवा । परि नेवलाव[9] तो सांगावा[10] । असे आइक ॥ ९६ ॥

सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रताः ।
नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥ १४ ॥

[सततं कीर्तयंतः] तरी कीर्तनाचेनि[11] †नटनाचें[12] । नाशिले व्यवसाय[13] प्रायश्चित्ताचे[14] । जे नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥ ९७ ॥ यमदमा अवकळा आणिली । तीर्थें ठायावरूनि उठविलीं । यमलोकींची ‡खुंटिली[15] । राहाटी आघवी ॥ ९८ ॥ यम[16] ह्मणे काय यमावें । दम ह्मणे कवणातें दमावें । तीर्थें ह्मणती काय खावें । दोष औषधासि नाहीं ॥ ९९ ॥ ऐसें माझेनि नामघोषें । नाहींचि §करिती विश्वाचीं दुःखें । अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥ २०० ॥ ते पाहांटेवीण पाहावित । अमृतेंवीण जीववित । योगेंवीण दावित । कैवल्य डोळां ॥ १ ॥ परि राया रंका पाड[17] धरूं । नेणती सैनेयां थोरीं[18] कंडसणी[19] करूं । एकसरें आनंदाचें ¶आवारु[20] । होत जगा ॥ २ ॥ कहीं एकाधेनि वैकुंठा जावें । तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें । ऐसें नामघोषगौरवें[21] । धवळलें[22] विश्व ॥ ३ ॥ तेजें सूर्य तैसे सोज्वळ । परि तोही अस्तवे हें किडाळ[23] । चंद्र संपूर्ण एखादे वेळ । हे सदा पुरते ॥ ४ ॥ मेघ उदार परी वोसरे[24] । ह्मणऊनि उपमेसि न पुरे । हे निःशंकपणें सपाखरे[25] । पंचानन[26] ॥ ५ ॥ $जयाचे वाचेपुढां भोजें[27] । अखंड नाम नाचत असे माझें । जें जन्मसहस्रीं वोळगीजे[28] । एकवेळ यावया ॥ ६ ॥ तो मी वैकुंठीं नसें । वेळ एक भोनुबिंबींही न दिसें । वरी योगियांचींही मानसें । उसमरडोनि[29] जाय ॥ ७ ॥ परी तयांपासीं पांडवा । मी हारपला गिंवसावा[30] । ॥जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥ ८ ॥ कैसे माझ्या गुणीं धाले[31] । देशकाळातें विसरले । कीर्तनसुखें सुखावले । आपणपांचि ॥ ९ ॥ कृष्ण विष्णु हरी गोविंद । या नामाचे निखिळ प्रबंध[32] । माजी आत्मचर्चा[33] विदश । उदंड गाती ॥ २१० ॥ [मां] हें

---

* ऐसें. † नडनाचे. ‡ गोठली. § करीत. ¶ आवरु. $ जयाचें. || जे नामघोष.

---

१ ज्यांच्या मनोधर्मीनें द्वैताला स्पर्श सुद्धा केला नाहीं. २ आश्चर्य. ३ सांगावयाचा आहे. ४ उत्साहानें नटनाच, कीर्तनांतील नटवत् जो नाच त्यानें. ५ प्रायः (बहुधा) चित्ताचे व्यवसाय, व्यापार. ६ नियमावें, निग्रह करावा. ७ उजेडवितो. ८ योग्यता. ९ लहानथोरांस. १० विचार. ११ मंदिर. १२ स्वच्छ केलें. १३ हीनपणा. १४ सरतो, पडत नाहीं. १५ सकृप. १६ शिव, सिंह. १७ आवडीनें. १८ आश्रयिजे. १९ सूर्यमंडळांत. २० उलंघोनि. २१ सांपडावा, शोधून काढावा. २२ तृप्त झाले. २३ ग्रंथ, कविता. २४ आत्मानात्मविचार.

बहु असो यापरी । कीर्तित[1] मातें अवधारीं । एक विचरिति[2] चराचरीं । पांडुकुमरा ॥ ११ ॥ [यतंतश्च] मग अणिक ते अर्जुना । *सावियां[3] बहुवा जतना । पंचप्राण मना । पाढाउ[4] †घेउनी ॥ १२ ॥ बाहेरी यमनियमांची कोंटी[5] लाविली । आंत वज्रासनाची पौळी[6] पन्नासिली । वरी प्राणायामाचीं मांडिलीं । वाहातीं यंत्रें ॥ १३ ॥ तेथ उल्हाटशक्तीचेनि उजिवडें । मन पवनाचेनि सुरवाडें[7] । संतराबियेचें[8] पाणियाडें[9] । बळाविलें ॥ १४ ॥ तेव्हां प्रत्याहारें[10] ख्याती केली । विकारांची ‡संपली[11] बोहली[12] । इंद्रियें बांधोनि आणिलीं । हृदयाआंत ॥ १५ ॥ [दृढव्रताः] §तंव धारणावारू[13] दाटिले । महाभूतांतें एकवटिलें । मग चतुरंग सैन्य निवटिलें । संकल्पाचें ॥ १६ ॥ तयावरी[14] जैतरे[15] जैत । ह्मणोनि ध्यानाचे निशाण[16] वाजत । दिसे तन्मयाचें झळकत । एकछत्र ॥ १७ ॥ ¶पाठीं[17] समाधिश्रियेचा अशेखा । आत्मानुभवराज्यसुखा । पट्टाभिषेक देखा । समरसें जाहाला ॥ १८ ॥ ऐसें हें गहन । अर्जुना माझें भजन । आतां ऐकें $सांगेन[18] । जे करिती एक ॥ १९ ॥ [भक्त्या] तरी दोन्ही पालवविरे[19] । जैसा एक तंतू[20] अंबरीं । तैसा मीवांचूनि चराचरीं । जाणती ना ॥ २२० ॥ आदि ब्रह्मा करुनी । शेवटीं मशक धरूनी । माजी समस्त हें जाणोनी । स्वरूप माझें ॥ २१ ॥ [नमस्यंतश्च मां] मग वांड[21] धाकुटें न ह्मणती । सजीव निर्जीव नेणती । देखिलीये वस्तु उजू ||[22] लुंठिती[23] । मीचि ह्मणोनि ॥ २२ ॥ आपुलें उत्तमत्व नाठवे । पुढील योग्यायोग्य **नेणवे[24] । एकसरें व्यक्तिमात्राचेनि नांवें[25] । नमूंचि आवडे ॥ २३ ॥ जैसें ††उंचींहूनि उदक पडिलें । तें तलवटवरी ‡‡येऊं[26] लागलें । तैसें नमिजे भूतजात देखिलें । ऐसा स्वभावचि तयांचा ॥ २४ ॥ कां फळलिया तरूची शाखा । सहजें भूमीसीं उतरे देखा । तैसें जीवमात्रां अशेखां । खोलावती[27] ते ॥ २५ ॥ अखंड अगर्वता होऊनि असती । तयांची विनय[28] होचि संपत्ती । जे जयजयमंत्रें आंपती । माझ्याठायीं ॥ २६ ॥ नामितां मानापमान गळाले । ह्मणोनि अवचितां मीचि जाहाले । [नित्ययुक्ता उपासते] ऐसे निरंतर मिसळले । उपासिती ॥ २७ ॥ अर्जुना हे गुरुवी[29] भक्ती । सांगीतली तुजप्रती । आतां ज्ञानयज्ञें यजिती । ते भक्त आइकें ॥ २८ ॥ परि

---

* सवियाचि. † घेती. ‡ संपिली बोहेरिली. § मग धारणा. ¶ पाठीं. $ सांगों आन. || लुंटति. ** न मनवे. †† उचीं उंदक. ‡‡ ये उगलें.

---

१ गुणानुवाद गात. २ हिंडतात. ३ सर्वथा. ४ वाटाड्या. ५ कुंपण. ६ मूलबंधाची. ७ आवार शृंगारिलें. ८ कुंडलिनीप्रकाशानें. ९ अनुकूलतेनें १० बुद्धीचें. ११ तळें. १२ इंद्रियांच्या अंतर्मुखतेनें. १३ बोलणें. १४ ध्यानपरिपकदशा हेच घोडे. १५ जयरे जय. १६ नगारा, भेरी. १७ अधिकार, गादी. १८ पदरांपर्यंत. १९ वस्त्रांत. २० मोठें. २१ गणतात. २२ सर्व वस्तूंच्या. २३ नमन करणें. २४ नम्र होती. २५ नम्रता. २६ श्रेष्ठ, मोठी.

भजन करिती हातवटी । तूं जाणत आहासि किरीटी । जे [१]मागां इया गोष्टी । केलिया आह्मीं ॥ २९ ॥ तंव आथि जी अर्जुन ह्मणे । हें [२]दैविकियाप्रसादाचें करणें । तरि काय *अमृताचें [३]आरोगणें । पुरे ह्मणवेल ॥ २३० ॥ या बोला श्रीअनंतें । लॉंगट †देखिलें तयातें । कीं सुखावलेनि चित्तें। डोलत असे॥३१॥ ह्मणे भलें केलें पार्था । येन्हवीं हा [४]अनवसर सर्वथा । परि बोलैवीतसे आस्था । तुझी मातें ॥ ३२ ॥ तंव अर्जुन ह्मणे हे कायी । चकोरेंवीण चां-दिणेंचि नाहीं । जगचि [६]निवविजे हा तयाच्या ठायीं । स्वभावो कीं जी ॥३३ ॥ येरें चकोरें तिये आपुलिये चाँडे । चाँचू करिती चंद्राकडे । तेविं आह्मी विनऊं तें [९]थोकडें । देवो कृपासिंधु ॥ ३४ ॥ जी मेघ आपुलिये [१०]प्रौढी । जगाची [११]आर्ती दवडी । वांचूनि चातकाची ताहान केवढी । तो वर्षाव पाहुनी ॥ ३५ ॥ परि चुळा एकाचिया [१२]चोंडे । जेविं गंगेतेंचि [१३]ठाकणें पडे । तेविं [१४]आर्त बहु कां थोडे । तरि कां सांगावें देवें ॥ ३६ ॥ तेथें देवें ह्मणितलें राहें । जो संतोष आह्मा जाहाला आहे । तयावरी स्तुती साहे । ऐसें उरलें नाहीं ॥ ३७ ॥ पैं [१५]परिसतु आहासि निकियापरी । [१६]तेंचि वक्तृत्वा [१७]वन्हाडी करी । ऐसें [१८]पुरस्करोनि श्रीहरी । आदरिलें ॥ ३८ ॥

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजंतो मामुपासते ।
एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥ १५ ॥

[ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजंतः] तरि ज्ञानयज्ञ तो एवंरूप । §जेथ आदि संकल्प हा [१९]यूप । महाभूतें मंडप । भेदें [२०]तो पशू ॥ ३९ ॥ मग पांचांचे जे विशेष गुण । अथवा इंद्रियें आणि प्राण । हेचि [२१]यज्ञोपचारभरण । अज्ञान घत ॥ २४०॥ तेथ [२२]मनबुद्धीचिया कुंडा । आंत ज्ञानाग्नि [२३]धडफुडा । साम्य तेचि [२४]सुहाडा । वेदिकों [२५]जाणें ॥ ४१ ॥ सविवेकमतीपाटव । तेचि मंत्र विद्यागौरव । शांति [२६]स्रुक्स्रुव । जीव [२७]यज्वा ॥ ४२ ॥ ¶तो [२८]प्रतीतीचेनि पात्रें ।

---

* अमृताचिया आरोगणें । काय पुरे ह्मणवे. † देखोनि. ‡ टाकावें. § तेथ. ¶ जो.

---

१ चतुर्थाध्यायांत 'श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञात्' ह्या ३० व्या श्लोकापासून अध्यायसमाप्तीपर्यंत वर्णिलेलें. २ परमेश्वरीकृपेचें. ३ सेवन, प्राशन. ४ लगट करणारा. ५ अप्रसंग, युद्धप्रसंगामुळें वारंवार त्याच गोष्टी तुला सांगण्याचा हा वेळ नव्हे; परंतु तुझ्याकरितां माझा कळवळा मला बोलावयास लावतो. ६ आनंदित करावें. ७ गरजेसाठीं. ८ चोंच. ९ अल्प. १० थोरपणानें. ११ पीडा. १२ इच्छेनें. १३ गांठणें. १४ दुःखी. १५ ऐकत आहेस. १६ उत्तम श्रवणच. १७ साहाय्य, मदत. १८. आधीं बोलून. १९ यज्ञस्तंभ. २० जीवेश्वर यांची भिन्नता. २१ यज्ञाचें साहित्य. २२ मन व बुद्धि या दोन कुंडीं. २३ खरा, प्रदीप्त. २४ बळकट. २५ ओटा. २६ विवेकयुक्त बुद्धीची कुशलता. २७ विद्यागौरव स्रुक् व शांति स्रुवा. २८ हवनपात्रें. २९ यज्ञ करणारा. ३० अनुभवाच्या.

विवेकमहामंत्रें । ज्ञानाग्निहोत्रें । भेद नाशी ॥ ४३ ॥ तेथ अज्ञान सरोनि जाये । आणि यजिता यजन हें ठाये । आत्मसमरसीं *न्हाये । अवभृथीं जेव्हां ॥ ४४ ॥ [एकत्वेन] तेव्हां भूतें विषय करणें । हें वेगळालें कांहीं न ह्मणे । आघवें एकचि ऐसें जाणें । आत्मबुद्धि ॥ ४५ ॥ जैसा चेइला तो अर्जुना । ह्मणे स्वप्नींची हे विचित्र सेना । मीचि जाहालों होतों ना । निद्रावशें ॥४६॥ आतां सेना ते सेना नव्हे । हें मीच एक आघवें । ऐसें एकत्वें मानवे । विश्व तया ॥ ४७ ॥ †मग तो जीव हे भ्रांष सरे । ओंब्रह्म परमात्मबोधें भरे । ऐसें भजती ज्ञानाध्वरें । एकत्वें येणें ॥ ४८ ॥ [पृथक्त्वेन] अथवा अनादि हें अनेक । जें आनासारिखें एका एक । आणि नामरूपादिक । तेंही विषम ॥४९॥ ह्मणोनि विश्व भिन्न भिन्न । परि न भेदे तयाचें ज्ञान । जैसे अवयव तरी आन आन । परि एकेचि देहींचे ॥ २५० ॥ कां शाखा सोनिया थोरा । परि आहाति ‡एकाचि तरुवरा । बहु रश्मि परि दिनकरा । एकाचे जेवीं ॥ ५१ ॥ तेवीं नानाविधा व्यक्ती । आनानें नामें §आनानी वृत्ती । ऐसें जाणती भेदलां भूतीं । अभेदा मातें ॥ ५२ ॥ येणें वेगळालेपणें पांडवा । करिती ज्ञानयज्ञ बरवा । जे न भेदती ¶जाणिवा । जाणते ह्मणउनी ॥५३॥ [बहुधा] ना तरी जेधवां जियेठायीं । देखती कां जें जें कांहीं । तें मीवांचूनि नाहीं । ऐसाचि बोध ॥ ५४ ॥ पाहें पां बुडबुडा जेउता जाये । तेउतें जळ तया एक आहे । मग विरे अथवा राहे । तन्ही जळाचिमाजी ॥५५॥ कां परमाणें परमाणु उचलले । ते पृथ्वीपणेवेगळे नाहीं गेले । आणि मीधौते जरी पडले । तरी पृथ्वीचि वरुते ॥ ५६ ॥ तैसें भलतेथ भलतेणें भावें । भलतेंही हो अथवा नोहावें । परि तें मी ऐसें आघवें । होऊनि ठेलें ॥ ५७ ॥ अगा हे जेव्हडी माझी व्याप्ती । तेव्हढीचि तयांची प्रतीती । ||तैसे बहुधाकारीं वर्तती । $मीचि होउनी ॥ ५८ ॥ [विश्वतोमुखं] हें भानुबिंब ओंवडे तया । संमुख जैसें धनंजया । +तैसे ते विश्वा इया । समोर सदां ॥ ५९ ॥ अगा तयांचिया ज्ञाना । पाठी पोट नाहीं अर्जुना । वायु जैसा ग-

---

* होये, अवभृथस्नान. † मग जीव. ‡ एकाचिये. § आनानावृत्ती, ऐसा. ¶ या जाणिका. || ऐसे. $ बहूचि. + ऐसा मी.

---

१ आत्मानंदरसांत. २ यज्ञाच्या शेवटचें स्नान. ३ शब्द, स्पर्श आदिक. ४ इंद्रियें. ५ जागृत झालेला. ६ जग. ७ भास, बोलणें. ८ नाहींसी होते. ९ ब्रह्मदेवापासून तृणापर्यंत. १० ज्ञानयज्ञानें. ११ एकाला एक निराळें. १२ लहान. १३ किरण. १४ अनेक. १५ भिन्न भूतांमध्यें. १६ ज्ञानाला. १७ जिकडे. १८ वाऱ्यानें. १९ बारीक कण. २० कोटें गेले तरी पृथ्वीपण गेलें नाहीं. २१ पुनः. २२ पाहिजे तेथें पाहिजे त्या भावनेनें. २३ न व्हावें. २४ अनुभव. २५ पाहिजे त्यास. २६ समोर.

गना । सर्वांगीं असे ॥ २६० ॥ [मामुपासते] तैसा मी जेतुला[1] आघवा । तेंचि *तुके[2] तयांचिया सद्भावा । तरी न करितां पांडवा । भजन जाहालें ॥ ६१ ॥ येन्हवीं तरी सकळ मीचि आहें । तरी कवणीं कें[3] उपासिला नोहें । एथ एके जाणणेवीर्णे[4] ठाये । अप्राप्तीसि ॥ ६२ ॥ परि तें असो येणें[5] उचितें । ज्ञानयज्ञें यैंजितसांते । उपासिती मातें । ते सांगीतले ॥ ६३ ॥ अखंड सकळ हें †सकळां मुखीं । सहज अर्पत असे मज एकीं । कीं नेणणे यासाठीं मूर्खीं । न पविजेचि मातें ॥ ६४ ॥

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाऽहमहमौषधम् ।
मंत्रोऽहमहमेवाऽज्यमहमग्निरहं हुतम् ॥ १६ ॥

[अहं क्रतुः] तोचि जाणिवेचा जरी उदय होये । तरी मुदल वेद मीचि आहें । आणि तो विधानातें[6] जया विये । तो क्रतुही मीचि ॥६५॥ [अहं यज्ञः] मग तया कर्मापासूनि बरवा । जो सांगोपांग आघवा । यज्ञ प्रगटे पांडवा । तोही मी गा ॥ ६६ ॥ [स्वधाहमहमौषधं] स्वाहा[7] मी स्वधा[8] । सोमादि[9] औषधी विविधा । [मंत्रोऽहमहमेवाज्यं] आज्य[10] मी समिधा[11] । मंत्र मी हवि ॥६७॥ [अहमग्निरहं हुतं] होता[12] मी हवन कीजे । तेथ अग्नी तो स्वरूप माझें । आणि हुतें[13] वस्तु जें जें । तेंही मीचि ॥ ६८ ॥

पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामहः ।
वेद्यं पवित्रमोंकार ऋक् साम यजुरेव च ॥ १७ ॥

[पिताहमस्य जगतः] पैं जयाचेनि अंगसंगें । इये प्रकृतीस्तव अष्टांगें । जन्म पाविजत असे जगें । तो पिता मीगा ॥ ६९ ॥ [माता] अर्धनारीनटेश्वरीं । जो पुरुष तोचि नारी । तेविं मी चराचरीं । माता ही होय ॥२७०॥ [धाता] आणि जाहालें जग जेथ राहे । जेणें जीवित वाढत आहे । तें मीवांचूनि नोहे । आन निरुतें[14] ॥ ७१ ॥ [पितामहः] इयें प्रकृतिपुरुषें दोन्हीं । उपजलीं जयाचिया अमनमनीं[15] । तो पितामह त्रिभुवनीं[16] । विश्वाचा मी ॥ ७२ ॥ [वेद्यं] आणि आघवेया जाणणेयाचिया वाटा[17] । जया गांवा येती गा सुभटा । वेदांचियाँ[18] चोहटां[19] । वेद्य[20] जें म्हणिजे ॥ ७३ ॥ [पवित्रं] जेथ नानामतां बुझावणी ‡आली ।

---

* तुक. † सकळमुखीं. ‡ झाली.

---

१ जेवढा संपूर्ण. २ तोल, प्रमाण. ३ कोठें. ४ पूर्णज्ञानाविषें. ५ या योग्य प्रकारें. ६ यजन करीत असतां. ७ विधि अनुष्ठानातें. ८ यज्ञ. ९ देवांस हवि देण्याचा मंत्र. १० पितरांस, हवि देण्याचा मंत्र. ११ सोमवल्ली. १२ शेळीचें तूप. १३ ऋत्विज. १४ होमद्रव्य. १५ अन्य खरें. १६ अमनस्क, मनसंकल्पांत. १७ चारी वेद एकत्र मिळण्याचें चोहटा = चवाठा (स्थान) त्यांत ज्याला वेद्य म्हणतात. १८ समजूत.

एकमेकां शास्त्रांची अनोळखी फिटली । चुकलीं ज्ञानें जेथ मिळों आलीं । जें पवित्र ह्मणिजे ॥ ७४ ॥ [ओंकारः] पैं ब्रह्मबीजा जाहाला अंकुर[2]। घोषध्वनीना-दाकार[3]। *तयाचें गा भवन[4] जो ओंकार । तोही मी गा ॥ ७५ ॥ जया ओं-काराचिये कुशीं[5]। अक्षरें होती अउमकारेंसीं । जियें उपजत वेदेंसीं । उठलीं तीन्हीं ॥ ७६ ॥ [ऋक्सामयजुरेव च] ह्मणोनि ऋग्यजुःसाम । हे तीन्ही ह्मणें मी आत्माराम । एवं मीचि कुलक्रम[6]। शब्दब्रह्माचा[7] ॥ ७७ ॥

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ।
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥ १८ ॥

[गतिः] हें चराचर आघवें । जिये प्रकृतीआंत सांठवे । ते शिणली[8] जेथ वि-संबे । ते परम गती मी ॥७८॥ [भर्ता] आणि जयाचेनि प्रकृती जिये । जेणें अ-धिष्ठिली[9] विश्व विये । जो येऊनि प्रकृती इये । गुणातें भोगी ॥७९॥ तो विश्व-श्रियेचा[10] भर्ता । मीचि गा एथ पंडुसुता । [प्रभुः] मी गोसावी[11] समस्ता । त्रै-लोक्याचा ॥ २८० ॥ आकाशें सर्वत्र वसावें । वायूनें नावभरी[12] †उगें[13] नसावें । पावकें[14] दाहावें । वर्षावें जळें ॥८१॥ पर्वतीं बैसका[15] न संडावी । समुद्रीं रेखा[16] नोलांडावी । पृथ्वीया भूतें वाहावीं । हे आज्ञा माझी ॥८२॥ म्यां ‡बोलविल्या वेद बोले । म्यां §चालविल्या सूर्य चाले । म्यां हालविल्या प्राण हाले । जो जगातें चालिता ॥ ८३ ॥ मियांचि नियमिलासांता[17]। काल ग्रासितसे भूतां । इयें ह्मणियागतें[18] पांडुसुता । सकळें जयाचीं ॥ ८४ ॥ जो ऐसा समर्थ । तो मी जगाचा नाथ । [साक्षी] आणि गगनाऐसा साक्षिभूत । तोही मीचि ॥ ८५ ॥ [निवासः] इहीं नामरूपीं आघवा । जो भरला असे पांडवा । आणि ¶नामरू-पांचाही वोलावा[19]। आपणचि जो ॥ ८६ ॥ जैसे जळाचे कल्लोळ[20]। आणि क-ल्लोळीं आंथी[21] जळ । ऐसेनि वसवीतसे सकळ । तो निवास[22] मी ॥८७॥ [शरणं] जो मज होय अनन्यशरण । त्याचें निवारीं मी जन्ममरण । यालागीं शरणा-गता शरण[23]। मीचि एक ॥ ८८ ॥ [सुहृत्] ॥मीचि एक अनेकपणें । वेगळालेनि प्रकृतिगुणें । जीतें[24] जगाचेनि प्राणें । वर्तत असें ॥ ८९ ॥ जैसा समुद्र थिल्लेर[25] न ह्मणतां । भलतेथ बिंबे सविता । तैसा ब्रह्मादि सर्वां भूतां । सुहृद तो मी

---

* तयाचें भुवन, तयाचें गाभेवन. † उगेया. ‡ बोलविला. § चालविला. ¶ नामरूपाचा. || मी येक.

---

१ रूप, परानांवाची वाचा. २ पश्यंती, मध्यमा आणि वैखरीरूप चतुर्विध वाचा. ३ मंदिर, सूक्ष्म अंकुर. ४ पोटीं. ५ अकार, उकार, मकारांसह. ६ वंशपरंपरा. ७ वेदाचा. ८ विश्रांति पावे. ९ आश्रय केली. १० विश्वलक्ष्मीचा पति. ११ धनी. १२ क्षणभर. १३ अग्नीनें जाळावें. १४ बैठक. १५ मर्यादा. १६ आज्ञा दिली असतां. १७ चाकर. १८ जिव्हाळा. १९ तरंग. २० आहे. २१ वसतिस्थान. २२ आश्रयस्थान. २३ जिवंत. २४ डबकें.

॥ २९० ॥ [प्रभवः प्रलयः] मीचि गा पांडवा । या त्रिभुवनासि वोल्हावा । सृष्टिक्षयप्रभवा[1] । मूळ तें मी ॥ ९१ ॥ [बीजं] बीज शाखांतें प्रसवे । मग तें रूखपण बीजीं समावे । तैसें संकल्पें होय आघवें । पाठीं संकल्पीं मिळे ॥ ९२ ॥ ऐसें जगाचें बीज संकल्प । अव्यक्त वासनारूप[4] । [स्थानं] तया कल्पांतीं जेथ निक्षेपे[5] । होय *तें मी ॥ ९३ ॥ [अव्ययं] इयें नामरूपें लोटती[6] । वर्णव्यक्ती आटती[7] । जातीचे भेद फिटती । जैं आकार[8] नाहीं ॥९४॥ [निधानं] तैं संकल्पवासनासंस्कार[9] । माघौतें[10] रचावया आकार । जेथ राहोनि असती अमर । तें निधान मी ॥ ९५ ॥

तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च ।
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ॥ १९ ॥

[तपाम्यहं] मी सूर्याचेनि वेषें । तपें[11] [निगृह्णामि] तैं हें शोषे । [अहं वर्षं] पाठीं इंद्र होऊनि वर्षें । [उत्सृजामि च] तैं पुढती भरे[12] ॥ ९६ ॥ [मृत्युश्च] अग्नि काष्ठें खाये । तें काष्ठचि अग्नि होये । तैसें मरतें मारितें पाहें । स्वरूप माझें ॥९७॥ यालागीं मृत्यूच्या भागीं जें जें । तें तेंही पैं रूप माझें । [अमृतं चैव] आणि न मरतें तंव सहजें । †मीचि आहें ॥ ९८ ॥ [सदसच्चाहमर्जुन] आतां बहु बोलोनि सांगावें । तें एकेहेळां[13] घे पां आघवें । तरी संतासतही[14] जाणावें । मीचि पैं गा ॥ ९९ ॥ ह्मणोनि अर्जुना मी नसें । ऐसा कवण ठाव असे । परि प्राणियाचें दैव कैसें । जे न देखती मातें ॥ ३०० ॥ तरंग पाणियेवीण सुकती[15] । रश्मि वातीवीण न देखती[16] । तैसे मीचि ते मी[17] नोहती[18] । विस्मो[19] देखें ॥ १ ॥ हें आंतबाहेर मियां कोंदलें[20] । जग निखिल माझेंचि वोतिलें । कीं कैसें कर्म तयां ‡आड आलें । जे मीचि नाहीं ह्मणती ॥ २ ॥ परि अमृत कुंहां[21] पडिजे । कां आपणपयांतें कडिये काढिजे । ऐसें अर्थी[22] काय कीजे । अप्राप्तासी ॥ ३ ॥ ग्रासा एका अन्नासाठीं । अंध धांवताहे किरीटी । आढळला चिंतामणि पायें लोटी । आंधळेपणें ॥ ४ ॥ तैसें ज्ञान जैं सांडूनि जाये । तैं ऐसी हे दशा आहे । ह्मणोनि कीजे तें केलें नोहे । ज्ञानेंविण ॥ ५ ॥ आंधळेया गरुडाचे पांख[23] आहाती । ते कवणा उपेगा जाती । तैसे सत्कर्माचे उपखे[24] ठाती । ज्ञानेंविण ॥ ६ ॥

---

* तें स्थान मी. † अविनाश मी. ‡ ओढवलें.

---

१ उत्पत्ति, स्थिति व नाश यांला. २ ठेवणें. ३ लय पावती. ४ नामरूपादि. ५ संस्काररूप वासनाशक्ती (यो. सू.). ६ नंतर. ७ तापतों. ८ एकदम. ९ आहे व नाहीं, असे व नसे. १० आटतात. ११ मी नाहींत. १२ आश्चर्य. १३ भरलें. १४ कूपांत. १५ असें समजणाऱ्यास. १६ पंख. १७ श्रम व्यर्थ.

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयंते ।
ते पुण्यमासाद्य सुरेंद्रलोकमश्नंति दिव्यान्दिवि देवभोगान् २०

[त्रैविद्याः] देख पां गा किरीटी । आश्रमधर्माचिया [१]राहाटी । विधिमार्गा [२]केसवटी । जे आपणचि होती ॥ ७ ॥ यजन करितां कौतुकें । तिहीं वेदांचा माथा [३]तुके । क्रिया फळेंसि उभी ठाके । पुढां जयां ॥ ८ ॥ [सोमपाः] ऐसे दीक्षित जे [४]सोमप । जे आपणचि यज्ञाचें स्वरूप । [पूतपापाः] तिहीं तया पुण्याचेनि नांवें पाप । जोडिलें देखें ॥ ९ ॥ [यज्ञैरिष्ट्वा] जे [५]श्रुतित्रयातें जाणोनि । [६]शतवरी यज्ञ करूनि । [मां] यजिलिया मातें चुकोनि । [स्वर्गतिं प्रार्थयंते] स्वर्गा वरिती ॥ ३१० ॥ जैसें कल्पतरुतळवटीं । बैसोनि झोळिये *देतसे गांठी । मग निदैवें [७]निघे किरीटी । दैन्यचि करूं ॥ ११ ॥ तैसे [८]शतक्रतु यजिलें मातें । कीं ईप्सितांति स्वर्गसुखातें । आतां पुण्य कीं हें नि-[९]रूतें । पाप नोहे ॥ १२ ॥ ह्मणोनि मजवीण पाविजे स्वर्ग । तो अज्ञानाचा पुण्यमार्ग । ज्ञानिये तयातें [१०]उपसर्ग । [११]हानि ह्मणती ॥ १३ ॥ येऱ्हवीं तरी नरकींचें दुःख । पावोनि †स्वर्गा नाम कीं सुख । [१२]वांचूनि नित्यानंद गा निर्दोष । तें स्वरूप माझें ॥ १४ ॥ मज येतां पैं सुभटा । या द्विविधा गा [१३]अन्हांटा । स्वर्ग नरक या वाटा । चोरांचिया ॥ १५ ॥ स्वर्गा [१४]पुण्यात्मकें पापें येइजे । पापात्मकें पापें नरका जाइजे । मग मातें जेणें पाविजे । तें शुद्ध पुण्य ॥ १६ ॥ आणि [१५]मंजचिमाजी असतां । जेणें मी [१६]दुरन्हावें पांडुसुता । तें पुण्य ऐसें ह्मणतां । जीभ न तुटे काई ॥ १७ ॥ [ते] ‡परि हें असो आतां प्रस्तुत । ऐकें यापरि ते दीक्षित । यजूनि मातें याचित । स्वर्गभोग ॥ १८ ॥ [पुण्यमासाद्य] मग मी न पविजे ऐसें । जें पापरूप पुण्य असे । §तेणें [१७]लाधलेनि [१८]सौरसें । स्वर्गा येती ॥ १९ ॥ [सुरेंद्रलोकं] जेथ अमरत्व हें सिंहासन । ऐरावतासारिखें वाहन । राजधानी भुवन । अमरावती ॥ ३२० ॥ [दिव्यान्दिवि देवभोगान्] जेथ महासिद्धींचीं भांडारें । अमृताचीं कोठारें । जिये गांवीं खि-[१९]ल्लारें । कामधेनूंचीं ॥ २१ ॥ ¶जेथ [२०]वोळगे देव [२१]पाइका । सैंध [२२]चिंतामणी-

* पाडितसे गांठी, पाडी गांठी. † स्वर्गनाम. ‡ परी तें. § तें साधलेनि. ¶ जेथ ओळगें देवां पाइकां.

१ रीतीप्रमाणें. २ कंसाची शिळा. ३ डोले. ४ यज्ञांतील सोमपान करणारे. ५ ऋग्, यजु व साम. ६ शंभरपर्यंत. ७ हतभाग्य. ८ भिक्षा मागावाला. ९ शंभर यज्ञांनीं.१० इच्छितात. ११ खरें. १२ उपद्रवरूप नाश. १३ यावेगळें. १४ आडवाटा. १५ ज्ञानोपासनाव्यतिरिक्त काम्यपुण्य जन्मादिकांला कारण होतें म्हणून पापात्मक पुण्य. १६ तो माझ्यांत असूनही ज्यामुळें मी त्यास अंतरतों तें पाप कसें नव्हे ? १७ प्राप्त झालेल्या पुण्यानें. १८ गोडीनें, हौसीनें. १९ कळप. २० प्राप्त होते. २१ देव जेथें सेवेसाठीं. २२ सर्वत्र.

चिया भूमिका । विनोदवनवाटिका । सुरतरूंचिया ॥ २२ ॥ गंधर्व गात गाणीं । जेथ रंभेऐशिया नाचणी । उर्वशीमुख्य विलासिनी । अंतौरियां ॥२३ ॥ मदन वोळगे शेजारें । जेथ चंद्र शिंपे सांबरें । पवनाऐसें ह्मणियारें । धांवणें जेथ ॥ २४ ॥ पैं बृहस्पती मुख्य आपण । ऐसे स्वस्तीश्रियेचे ब्राह्मण । *भाटिवेचे सुरगण । †बहुवस जेथें ॥ २५ ॥ लोकपाळ रांगेचे । राउत जिये ‡पदवीचे । उच्चैःश्रवा खांचे । §खेळणिये ॥ २६ ॥ हें असो बहु ऐसें । भोग इंद्रसुखासरिसे । [अश्नंति] ते भोगीजती जंव असे । पुण्यलेश ॥ २७ ॥

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति ।
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभंते ॥ २१ ॥

[ते तमिति] मग तया पुण्याची पाउटी सरे । सवेंचि इंद्रपणाची उटी उतरे । आणि येऊं लागती माघारें । मृत्युलोका ॥ २८ ॥ जैसा वेश्याभोगीं कवेडा वेचे । मग दारही चेपूं नये तियेचें । तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें । काय सांगों ॥ २९ ॥ [कामकामा लभंते] एवं ¶तिथियां मातें चुकले । जिहीं पुण्यें स्वर्ग कोंमिले । [गतागतं] तयां अमरपण तें वावो जालें । अंतीं मृत्युलोक ॥ ३३० ॥ मातेचिया उदेरकुहरीं । पचूनि विष्ठेच्या दांथरीं । उकडूनि नवमासवरी । जन्मजन्मोनि मरती ॥ ३१ ॥ अगा स्वर्गीं निधान फावे । परि चेइलियां हारपे आघवें । तैसें स्वर्गसुख जाणावें । वेदज्ञाचें ॥ ३२ ॥ [अनुप्रपन्नाः] अर्जुना ||वेदविदें जन्ही जाहला । तरि मातें नेणतां वायां गेला । कण सांडूनि उपणिला । कोंडा जैसा ॥ ३३ ॥ [एवं त्रयीधर्मं] ह्मणऊनि मज एकेंविण । हे त्रयीधर्म अकारण । आतां मातें जाणोनि कांहीं नेण । तूं सुखिया होसी ॥ ३४ ॥

अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ २२ ॥

[अनन्याश्चिंतयंतो मां] पैं सर्वभावेंसीं उखितें । जे वोपिले मज चित्तें । जैसा

---

* ताटिये. † पांतिकर जेथें. ‡ पदींचे. § खेवणीये. ¶ थिल्या मातें, स्थितिया, थितया. || वेद जरी.

---

१ उपवनें, बगीचे. २ नृत्य करणाऱ्या. ३ स्त्रिया. ४ पलंगावर. ५ पाण्याचा वर्षाव. ६ चाकर. ७ पराक्रमाचे स्तुतीपाठक. ८ माळकेंतले. ९ ज्या ठिकाणचे. १० इंद्राचा घोडा. ११ पुढें चालतेवेळेस दमे. १२ सारखे. १३ पायरी संपे. १४ तेज, रंग. १५ द्रव्य, कवडीही नाहींशी झाली म्हणजे मग तिच्या दारावर बोटदेखील लावतां येत नाहीं. १६ सर्वदा असणाराला. १७ इच्छिले. १८ व्यर्थ. १९ उदररूप गुहेंत. २० उकाड्यांत. २१ ठेवा प्राप्त होतो. २२ जागे झाल्यावर. २३ वेदार्थज्ञानी. २४ पाखडला, वाऱ्यावर धरला. २५ वेदोक्तधर्म. २६ उक्तें. २७ जे पुरुष आपले मनोभावानें मला विकले.

गर्भगोळ उद्यमातें । कोण्याही नेणे ॥ ३५ ॥ तैसा मीवांचूनि कांहीं । आणीक गोमटेंचि नाहीं । मजचि नाम पाहीं । जिणेया ठेविलें ॥ ३६ ॥ ऐसे अनन्यगतिकें चित्तें । चिंतितसाते मातें । [ये जनाः पर्युपासते] जे उपासिती तयांतें । मीचि सेवीं ॥ ३७ ॥ [तेषां नित्याभियुक्तानां] ते ऐकवटूनि जिये क्षणीं । अनुसरले गा माझिये वाहणीं । तेव्हांचि तयांची चिंतवणी । मजचि पडली ॥ ३८ ॥ [योगक्षेमं वहाम्यहं] मग तिहीं जें जें करावें । तें मजचि पडिलें आघवें । जैसी अजातपक्षाचेनि जीवें । पक्षिणी जिये ॥ ३९ ॥ आपुली ताहान भूक नेणे । तान्हया निकें तें *माउलीसचि करणें । तैसे अनुसरले मज प्राणें । तयांचें सर्व मी करीं ॥ ३४० ॥ तयां माझिया सायुज्याची चाड । तरि तेंचि पुरवीं कोड । कां सेवा ह्मणती तरी आंड । प्रेम सुयें ॥ ४१ ॥ ऐसा मनीं जो जो धरिती भावो । तो पुढां पुढां लागें तयां देवो । आणि दिधलियाचा निर्वाहो । तोही मीचि करीं ॥ ४२ ॥ हा योगक्षेम आघवा । तयांचा मजचि पडिला पांडवा । जयांचिया सर्व भावा । आश्रय मी ॥ ४३ ॥

येऽप्यन्यदेवताभक्ता यजंते श्रद्धयान्विताः ।
तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम् ॥ २३ ॥

[येऽप्यन्यदेवताभक्ता इति] आतां आणीकही संप्रदायें । परि मातें नेणती सर्मवायें । जे अग्निइंद्रसूर्यसोमाये । ह्मणऊनि यजिती ॥४४॥ [तेऽपीति] तेही कीर मातेंचि होये । कां जें हें आघवें मीचि आहें । परि ते भजती उजरी नव्हे । विषम पडे ॥ ४५ ॥ पाहें पां शाखा पल्लव रुखाचे । हे काय नव्हती एकाचि बीजाचे । परि पाणी घेणें मुळाचें । तें मुळींचि धांवे ॥ ४६ ॥ कां दाहाही इंद्रियें आहाती । इयें जरी एकेचि देहींचीं होती । आणि इहीं सेविले विषय जाती । एकाचि ठाया ॥ ४७ ॥ तरि करोनि रससोय बरवी । कानीं केविं भरावी । फुलें आणोनि तुरंबावीं । डोळां केविं ॥ ४८ ॥ तेथ रस तो मुखेंचि सेवावा । परिमळ तो घ्राणेंचि घ्यावा । तैसा मी तों यजावा । मीचि ह्मणोनि ॥ ४९ ॥ येर मातें नेणोनि भजन । तें वांयांचि गा आनेंआन । ह्मणोनि कर्माचे डोळे ज्ञान । तें निर्दोष होआवें ॥ ३५० ॥

---

* मायेसीच.

१ चांगलें. २ माझ्याचकरतां जीव ठेवला आहे, जीवनप्रवृत्तीला. ३ चिंतित असतां. ४ ऐक्यतेस येऊन. ५ मार्गाप्रत. ६ चिंता. ७ पंख न फुटलेल्या पक्ष्याच्या. ८ वांचे. ९ इच्छा. १० जवळ. ११ घालितों. १२ व्यवस्था. १३ योग=अप्राप्ताची प्राप्ति, क्षेम=प्राप्ताचें संरक्षण. १४ समष्टिरूपानें. १५ भजन, सरळ. १६ वांकडा. १७ वृक्षाचे. १८ घातलें जातें. १९ स्वयंपाक. २० हुंगावीं. २१ पूजावा. २२ कांहींतरी.

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।
न तु मामभिजानंति तत्त्वेनातश्च्यवंति ते ॥ २४ ॥

[अहं हि सर्वयज्ञानां] येऱ्हवीं पाहें पां पांडुसुता । या *[1]यज्ञोपहारां समस्तां । [भोक्ता च प्रभुरेव च] मीवांचूनि भोक्ता । कवण आहे ॥ ५१ ॥ मी सकळां यज्ञाची आदि । आणि यजना यया मीचि. [2]अवधि । [न तु मामभिजानंति] कीं मातें चुकोनि दुर्बुद्धि । देवा भजले ॥ ५२ ॥ गंगेचें उदक गंगे जैसें । अर्पिजे देवपितरोद्देशें । माझें मज देती तैसें । परि [3]अनानिभावीं ॥ ५३ ॥ [तत्त्वेनातश्च्यवंति ते] ह्मणऊनि ते पार्था । मातें न पवतीचि सर्वथा । मग मनीं [4]वाहिली जे आस्था । तेथ आले ॥ ५४ ॥

यांति देवव्रता देवान्पितॄन्यांति पितृव्रताः ।
भूतानि यांति भूतेज्या यांति मद्याजिनोऽपि माम् ॥२५॥

[यांति देवव्रता देवान्] †मनें वाचाकर्मणीं । ‡जयांचिया भजनीं देवांचिया वाहणी । ते शरीर जातिये क्षणीं । देवचि जाले ॥ ५५ ॥ [पितॄन्यांति पितृव्रताः] अथवा पितरांचीं व्रतें । [5]वाहाति जयांचीं चित्तें । जीवित सरलिया तयांतें । पितृत्व वरी ॥ ५६ ॥ [भूतानि यांति भूतेज्याः] कां क्षुद्र देवतादिभूतें । तियेंचि जयांचीं परमदैवतें । जिहीं अभिचारिकीं तयांतें । उपासिलें ॥ ५७ ॥ तयां देहाची जेवनिका फिटली । आणि भूतत्वाची प्राप्ति जाहाली । एवं संकल्पवशें फळलीं । कर्में §तयां ॥५८॥ [मद्याजिनोऽपि] मग मींचि डोळां देखिला । जिहीं कानीं मींचि ऐकिला । मींचि मनीं भाविला । वानिलों [6]वाचा ॥ ५९ ॥ सर्वांगीं सर्वांठायीं । मींचि नमस्कारिला जिहीं । ¶दानपुण्यादिकें जें कांहीं । तें माझियाचि मोहरां [7]॥३६०॥ जिहीं मातेंचि अध्ययन केलें । जे आंतबाहेरि मियांचि [8]धाले । जयांचें जीवित्व जोडलें । मजचिलागीं ॥ ६१ ॥ जे अहंकार वाहत आंगीं । आह्मी हरीचे [9]भूषावयालागीं । जे लोभिये एकचि जगीं । माझेनि लोभें ॥ ६२ ॥ जे माझेनि कामें सकाम । जे माझेनि प्रेमें सप्रेम । जे माझिया भुली सभ्रम । नेणती लोक ॥ ६३ ॥ जयांचीं जाणती मजचि शास्त्रें । मी जोडें जयांचेनि मंत्रें । ऐसे जे चेष्टामात्रें । भजले मज ॥ ६४ ॥ [मां] ते मरणाऐलीचकडे । मज मिळोनि गेले [10]फुंडे । मग मरणीं [11]आणिकीकडे । जातील केविं ॥ ६५ ॥ [यांति] ह्मणोनि [12]मद्याजी जे जाहाले । ते माझिया [13]सां-

---

* यज्ञोपचारां. † मन. ‡ जयांचीं भजनें. § तियें. ¶ दानपुण्यादि जें.

---

१ यज्ञांतील उपहार. २ परिणाम, शेवट. ३ वेगळ्या भावानें. ४ धरिली. ५ इंद्रियांनीं. ६ मार्ग, कारणें. ७ धरिती. ८ जारणमारण कर्म करणाऱ्यांनीं. ९ पडदा. १० वर्णिला. ११ मार्गाकडे. १२ तृप्त झाले. १३ भूषणासाठीं. १४ स्पष्ट. १५ दुसरीकडे. १६ माझें यजन करणारे. १७ ऐक्यास.

युज्या आले । जिहीं[3] उपचारमिषें दिधलें । आपणपें मज ॥६६॥ अर्जुना माझे ठायीं । आपणपेंवीण सौरस[2] नाहीं । मी उपचारें कवणाही । नाकळें गा ॥६७॥ एथ जाणीव[3] करी तोचि नेणे । आंथिलेपण[4] मिरवी तेंचि उणें । आह्मी जाहालों ऐसें जो ह्मणे । तो *कांहींचि नव्हे ॥ ६८ ॥ अथवा †यज्ञदानादि किरीटी । कां तपें हन जे हुंटहुटी[5] । ते तृणा एकासाठीं । न सरे एथ ॥ ६९ ॥ पाहें पां जाणिवेचेनि बळें । कोण्ही वेदांपासूनि[6] असे आगळें । कीं शेषाहूनि ‡तोंडाळें[7] । बोल कें आथी ॥ ३७० ॥ तोही आंथरुणातळवटीं दडे । येरु[8] नेति नेति ह्मणोनि बहुडे[9] । एथ सनकादिक वेडे । पिसे जाहाले ॥ ७१ ॥ करितां तापसांची कंडसणी[10] । कवण जवळां ठेविजे शूळपाणी[11] । तोहि अभिमान सांडूनि पायवणी[12] । माथा वाहे ॥ ७२ ॥ ना तरी आंथिलेपणें[13] सरिशी । कवणी आहे लक्ष्मियेऐसी । श्रियेसारिखिया[14] दासी । घरीं जियेतें ॥ ७३ ॥ तियां[15] खेळतां करिती घरकुलीं । तयां नामें अमरपुरें[16] जरि ठेविलीं । तरि न होती काय बाहुलीं । इंद्रादिक तयांचीं ॥ ७४ ॥ §तिया नावडोनि जेव्हां मोडती । तेव्हां महेंद्राचे रंक होती । तिया जिया झाडाकडे पाहाती । ते कल्पवृक्ष ॥ ७५ ॥ ¶ऐसिया जियेचिया जवळिका । सामर्थ्य घरींचिया पोइका[17] । ते लक्ष्मी मुख्यनायका । न मनेंचि एथ ॥ ७६ ॥ मग सर्वस्वें करूनि सेवा । अभिमान सांडूनि पांडवा । $ते पायं धुवायाचिया दैवा । पात्र जाहली ॥७७॥ ह्मणोनि थोरपण पेंव्हां[18] सांडिजे । एथ व्युत्पत्ती आघवी विसरिजे । जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी ॥ ७८ ॥ अगा सहस्रकिरणाचिये[19] दिठी[20] । पुढां चंद्रही लोपे किरीटी । तेथ खद्योत[21] कां हुंटहुटी[22] । आपुलेनि तेजें[23] ॥ ७९ ॥ तैसें लक्ष्मियेचें थोरपण न सरे । जेथ शंभूचेंही तप न पुरे । तेथ येर प्राकृत हेंदरें । केविं ||जाणों लाहें ॥ ३८० ॥ यालागीं शरीरसांडोवा[24] कीजे । सकळगुणांचें लोण उतरिजे । संपत्तिमद सांडिजे । कुरवंडी करूनी ॥ ८१ ॥

---

* कहींचि. † यज्ञदानादिकीं. ‡ तोंडागळें । बोलिं कें. § ते नावडोनि. ¶ ऐसें. $ तैं पाय. || जावों लाहे.

---

१ आराधन, सेवाहेतूनें. २ गोडी. ३ ज्ञानी म्हणविती. ४ संपन्नपणा, योग्यता. ५ कृतकृत्य. ६ उतावीळ, तळमळ. ७ वेदाहून. ८ बोलण्यांत तोंडानें जास्ती कोठें आहे. ९ वेद. १० हें नव्हे, तें नव्हे इत्यादि निषेधमुखानें. ११ मागें सरे. १२ विचार. १३ महादेवाचा. १४ विष्णुपादोदक, भागीरथी. १५ संपन्नपणानें तुळण्याजोगें. १६ सिद्धि. १७ ल्या सिद्धि. १८ देवांचीं नगरें. १९ सेवक. २० पलीकडे. २१ सूर्याच्या. २२ दृष्टीनें, २३ काजवा. २४ प्रकाशें. २५ देहाचें निंबलोण.

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ २६ ॥

[भक्त्युपहृतं] मग निःसीमभावउल्हासें । मज अर्पावयाचेनि मिसें । [फलं] फळ एक [1]आवडे तैसें । भलतयाचें हो ॥ ८२ ॥ [तदहं] भक्त माझियाकडे दावी । आणि मी दोन्ही हात वोडवीं [2]। [अश्नामि] मग देंठ न फेडितां [3]सेवीं । [4]आदरेंसीं ॥८३॥ [पुष्पं] पैं गा भक्तीचेनि नांवें । फूल एक मज द्यावें । तें लेखें तरि म्यां [5]तुरंबावें । परि मुखींचि घालीं ॥८४॥ [पत्रं] हें असो कायसीं फुलें । पानचि एक आवडतें जाहालें । तें साजूकही न हो सुकलें । भलतैसें ॥ ८५॥ परि सर्वभावें भरलें देखें । आणि भुकेला अमृतें तोखे । तैसें पत्रचि परी [6]तेणें सुखें । [7]आरोगूं लागें ॥ ८६ ॥ [तोयं] अथवा ऐसेंही एक घडे । जे पालाही परी न जोडे । तरि उदकाचें तंव [8]सांकडें । नव्हेल कीं ॥ ८७ ॥ तें भलतेथ [9]निमोलें । न जोडितां आहे जोडलें । [यो मे भक्त्या प्रयच्छति] तेंचि सर्वस्व करूनि अर्पिलें । जेणें मज ॥ ८८ ॥ तेणें वैकुंठापासोनि [10]विशाळें । मजलागीं केलीं [11]राउळें । कौस्तुभाहोनि निर्मळें । लेणीं दिधलीं ॥ ८९ ॥ दुधाचीं [12]सेजारें । क्षीराब्धीऐसीं मनोहरें । मजलागीं अपारें । [13]सृजिलीं तेणें ॥ ३९० ॥ [14]कर्पूर चंदन अगरु । ऐसेया सुगंधाचा महामेरु । *[15]मजहातिवा [16]लाविला दिनकरु । दीपमाळे ॥ ९१ ॥ गरुडासारिखीं वाहनें । मज सुरतरूचीं [17]उद्यानें । कामधेनूचीं गोधनें । अर्पिलीं तेणें ॥ ९२ ॥ मज अमृताहूनि सुरसें । [18]बोनीं [19]वोगरिलीं बहुवसें । ऐसा भक्तांचेनि उदकलेशें । परितोषें गा ॥ ९३ ॥ [प्रयतात्मनः] हें सांगावें काय किरीटी । तुवांचि देखिलें आपुलिया दिठी । मी सुदामयाचिया सोडीं गांठी । [20]पेंहयांसाठीं ॥ ९४ ॥ पैं भक्ती एकी मी जाणें । तेथ [21]सानें थोर न ह्मणें । आह्मी भावाचे पाहुणे । भलतेया ॥ ९५ ॥ येर पत्र पुष्प फळ । हें भजावया मिस केवळ । [22]वांचूनि आमुचियालागीं निष्फळ । [23]भक्तितत्व ॥ ९६ ॥ ह्मणोनि अर्जुना अवधारीं । तूं बुद्धी एकी [24]सोपारीं करीं । तरी सहजें आपुलिया मनोमंदिरीं । न विसंबें मातें ॥ ९७ ॥

---

* मजहातीं लाविला.

---

१ हवें तें. २ पुढें करीं. ३ तोडतां. ४ समज. ५ हुंगावें. ६ (द्रौपदीचें) शाकपत्र. ७ अमृततुल्य. ८ खाऊं लागतों. ९ संकट. १० किंमतीवांचून. ११ वैकुंठांहून. १२ देवळें. १३ शय्यास्थानें. १४ निर्माण केलीं. १५ कापूर चंदन इत्यादि माझ्या अंगास आवड्या हातीं लावून शेवटीं सूर्याची माझ्यापुढें दीपमाळा केली. १६ कडवाती. १७ बागा. १८ पक्वान्नें. १९ वाढिलीं. २० पोह्यांसाठीं. २१ लहान. २२ निष्फल = कलंकरहित भक्तीवांचून बाकी सर्व आम्हाला व्यर्थ. २३ सोपी, स्वाधीन कर. २४ विसरूं नको.

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २७ ॥

[यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्] जे जे कांहीं व्यापार करिसी । कां भोग हन भोगिसी । अथवा यज्ञीं यजिसी । नानाविधी ॥ ९८ ॥ ना तरी पात्रविशेषें दानें । कां सेवकां देसी जीवेंनें । [यत्तपस्यसि कौंतेय] तपादि हन साधनें । व्रतें करिसी ॥ ९९ ॥ [तत्कुरुष्व मदर्पणं] तें क्रियाजात आघवें । जैसें निपजेल स्वभावें । तें भावना करोनि करावें । माझिया मोहेरां ॥ ४०० ॥ परि सर्वथा आपुले जीवीं । केलियाचि *से कांहींचि नुरवीं । ऐसीं धुवोनि कर्में द्यावीं । माझिया हातीं ॥ १ ॥

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबंधनैः ।
संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥ २८ ॥

[शुभाशुभेति] मग अग्निकुंडीं बीजें घातलीं । तियें अंकुरदशे जेविं मुकलीं । तेविं न फळतीचि मज अर्पिलीं । शुभाशुभें ॥ २ ॥ अगा कर्में जैं उरावें । तैं तिहीं सुखदुःखीं फळावें । आणि तेंयातें भोगावया यावें । देहा एका ॥ ३ ॥ तें उगाणिलें मज कर्म । तेव्हांचि पुसिलें मरण जन्म । जन्मासवें श्रम । वरचिलही गेले ॥ ४ ॥ [संन्यासेति] ह्मणऊनि अर्जुना यापरी । पाहें बा वेळ नव्हेल भारी । हे संन्यासयुक्ति सोपारी । दिधली तुज ॥ ५ ॥ या देहाचिये बांदोडीं न पडिजे । सुखदुःखाचिया सागरीं न बुडिजे । सुखें सुखरूपा घडिजे । माझियाचि आंगा ॥ ६ ॥

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाऽप्यहम् ॥२९॥

[समोऽहं सर्वभूतेषु] †तो मी पुससी कैसा । तरि जो सर्वभूतीं सदा सरिसा । [न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः] जेथ आप पर ऐसा । भाग नाहीं ॥ ७ ॥ [ये भजंति तु मां भक्त्या] जे ऐसिया मातें जाणोनि । अहंकाराचा कुरुठा मोडोनि । जे जिवें कर्में करूनि । ‡मातें भजले ॥ ८ ॥ [मयि ते तेषु चाऽप्यहं] ते वर्तत दिसती देहीं । परि ते देहीं ना माझ्याठायीं । आणि मी तयांच्या हृदयीं । समग्र असें ॥ ९ ॥ सविस्तर वैटत्व जैसें । बीजकणिकेमाजि असे । आणि बीजकण

---

* शंका. † तरी मी पुससी कैसी । सर्वभूतीं सदा. ‡ भजती मातें.

१ वतनें, पगार. २ मार्गीं, संमुख. ३ आठवण. ४ कर्मातें. ५ हवाला केलें, झाडा करून सोडलें. ६ वेळ मिळणार नाहीं. ७ बंधनांत. ८ घरटा. ९ वडाचें झाड.

श्री. श्रीनिवास मोडक, पुणे
यांजकडुन सप्रेम भेट

वसे । वटीं जेवीं ॥ ४१० ॥ तेविं आह्मा तया परस्परें । बाहेर नामाचींचि अंतरें । वांचूनि आंतुवट वस्तुविचारें । मी तेचि ते ॥ ११ ॥ आतां जायांचें जैसें लेणें । आंगावरी ओहाचवाणें । तैसें देहधरणें । *उदास तयांचें ॥ १२ ॥ परिमळ †निघालिया पवनापाठीं । ‡मागें वोस फूल राहे देंठीं । तैसें आयुष्याचिये मुठी । केवळ देह ॥ १३ ॥ येर अवष्टंभ जो आघवा । तो आरूढोनि मन्हावा । मजचि आंत पांडवा । पैठा जाहाला ॥ १४ ॥

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ ३० ॥

[भजते मामनन्यभाक्] ऐसें भजतेनि प्रेमभावें । जयां शरीरही पाठीं न पवे । तेणें भलतया व्हावें । जातीचिया ॥ १५ ॥ [अपि चेत्सुदुराचारः] आणि आचार पाहातां सुभटा । तो दुष्कृताचा कीर सेलवांटा । परि जीवित वेचिलें चोहटां । भक्तीचिया कीं ॥ १६ ॥ अगा अंतीचिया मती । साचपण पुढिले गती । ह्मणोनि जीवित जेणें भक्ती । दिधलें शेखीं ॥ १७ ॥ [साधुरेव स मंतव्यः] तो §आधीं जरी दुराचारी । तरी सर्वोत्तमचि अवधारीं । जैसा बुडाला महापूरीं । न मरत निघाला ॥ १८ ॥ तयाचें जीवित ऐलथडिये आलें । ह्मणोनि बुडालेपण जेविं वायां गेलें । तेविं नुरेचि पाप केलें । शेवटलिये भक्ती ॥ १९ ॥ यालागीं दुष्कृती जन्ही जाहाला । तरि अनुतापतीर्थीं न्हाला । न्हाऊनि मजआंत आला । सर्वभावें ॥ ४२० ॥ तरि आतां पवित्र तयाचें कुळ । ओभिजात्य तेंचि निर्मळ । जन्मलेयाचें फळ । तयासीच ¶जोडलें ॥ २१ ॥ [सम्यग्व्यवसितो हि सः] $तो सकळही पढिंनला । तपें तोचि तपिंनला । अष्टांग अभ्यासिला । योग तेणें ॥ २२ ॥ हें असो बहुत पार्था । तो उतरला कर्में सर्वथा । जयाची अखंड गा आस्था । मजचिलागीं ॥ २३ ॥ अवघिया मनोबुद्धीचिया रोहटी । भरोनि ||एकनिष्ठेची पेटी । +मजमाजि किरीटी । निक्षेपिली जेणें ॥ २४ ॥

---

* सदा तयांचें. † निघालिया पाठीं. ‡ मागां. § आथी. ¶ जाहालें. $ तोचि सकळ पढिनला. || एक निष्ठतेची. + जेणें मजमाजि किरीटी । निक्षेपिली.

१ अंतरंग. २ मागून आणलेलें केव्हां तरी जाणारें. ३ वरवरच, व्यर्थ. ४ अहंकार, प्रपंच. ५ प्रविष्ट झाला. ६ पुनः प्राप्त होत नाहीं. ७ पापाचा. ८ उत्तम वांटा. ९ मागें 'आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च' इत्यादि चार प्रकारचा भक्तियोगचतुष्पथ चव्हाठा. १० आलीकडच्या कांठीं. ११ ज्ञानभक्तीनें शेवट. १२ पश्चात्तापरूप तीर्थांत. १३ कुलीनपणा. १४ योगमार्ग. १५ उतरून सर्व कर्मांच्या पार झाला. १६ वृत्तीनें. १७ ठेविली.

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति ।
कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ ३१ ॥

[न मे भक्तः प्रणश्यति] तो आतां [1]अवसरें मजसारिखा होइल । ऐसा हन भाव तुज जाइल । हां गा अमृता आंत राहिला । तया मरण कैंचें ॥ २५ ॥ पैं सूर्य जो वेळु [2]नुदैजे । *तयां वेळा कीं रात्रि [3]म्हणिजे । तेविं माझिये भक्तीविण जें कीजे । तें महापापा नोहे ॥ २६ ॥ [क्षिप्रं भवति धर्मात्मा] म्हणोनि तयाचिया चित्ता । माझी जवळिक पांडुसुता । तेव्हांचि तो तत्वता । स्वरूप माझें ॥ २७ ॥ जैसा दीपें दीप लाविजे । तेथ [4]आदील कोण हें नोळखिजे । तैसा सर्वस्वें जो मज भजे [5]तो मीचि होऊनि ठाके ॥ २८ ॥ [शश्वच्छांतिं निगच्छति] मग माझी नित्य शांती । [6]तैया दशा तेचि कांती । किंबहुना जिंती । माझेनि जीवें ॥ २९ ॥ [कौंतेय प्रतिजानीहि] एथ पार्था पुढतपुढती । तेंचि तें सांगों किती । जरी मियां चाड तरी भक्ती । न विसंबिजे गा ॥ ४३० ॥ अगा कुळाचिया चोखटपणा नलगे । [7]आभिजात्य झणी श्लाघा । व्युत्पत्तीचा वाउगा । सोसु कां वाहावा ॥ ३१ ॥ कां †[8]रूपवयसा माजा । [9]आथिलेपणें कां गाजा । एक भाव नाहीं माझा । तरी पालहाळ तें ॥ ३२ ॥ [10]कणेंवीण सोपटें । कणसें लागलीं घनदाटें । काय करावें गोमटें । वोस नगर ॥ ३३ ॥ ना तरी सरोवर आटलें । रानीं दुःखियां दुःखी भेटलें । कां वांझ फुलीं फुललें । झाड जैसें ॥ ३४ ॥ तैसें सकळ तें वैभव । अथवा कुळ जाति गौरव । जैसें शरीर आहे [11]सांवेव । परि जीवचि नाहीं ॥ ३५ ॥ तैसें माझिये भक्तीविण । जळो तें [12]जियालेपण । अगा पृथ्वीवरी पाषाण । नसती काई ॥ ३६ ॥ पैं [13]हिवरीची दाट साउली । सज्जनीं जैसी [14]वोळिली । तैसीं पुण्यें डावलूनि गेलीं । अभक्तांतें ॥ ३७ ॥ निंब निंबोळियां मोडोनि आला । तरि तो काउळियासींचि सुकाळ जाहाला । तैसा भक्तिहीन वाढिनला । दोषांचिलागीं ॥ ३८ ॥ कां षड्रस खापरीं वाढिले । वाढूनि चोहटां ठेविले । ते [15]सुणियांचे उपेगा आले । जियापरी ॥ ३९ ॥ तैसें भक्तिहीनाचें जिणें । जो स्वर्गीहि परि सुकृत नेणे । तेणें संसारदुःखासि भोंणे । वोगरिलें ॥४४०॥ म्हणोनि कुळ उत्तम नोहावें । जाती अंत्यजही व्हावें । वरि देहाचेनि नांवें । पशूचेंही लाभो ॥ ४१ ॥ पाहें पां

---

* त्या नाव रात्रि म्हणिजे. † रूपें वयसा.

---

१ अवकाशानें. २ ज्या वेळीं उदय पावत नाहीं. ३ पहिला. ४ त्याला तीच ती दशा (नित्य शांति इत्यादिक) व तीच कांति; फार काय ? माझ्या जीवानेंच त्याची जिती=जीवन आहे. ५ माझी. ६ लागणें नको. ७ कुलीनत्व. ८ स्तुति. ९ हांव. १० तारुण्यानें. ११ संपन्नत्वानें, योग्यतेनें. १२ गाबाळ. १३ दाण्यांशिवाय. १४ अवयवयुक्त. १५ जगणें. १६ एक निंद्य वृक्ष. १७ निषिद्ध केली. १८ फळांनीं. १९ कुत्र्यांचे. २० बोणे=ताट वाढलें. २१ महार आदि.

सावजें हातिरुं धरिलें । तेणें तया काकुळती मातें स्मरिलें । कीं तयाचें पशुत्व वावो जाहालें । पावलिया मातें ॥ ४२ ॥

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम् ॥३२॥

[येऽपि स्युः पापयोनयः] अगा *नांवें घेतां वोखटीं। जे आघवेया अधमाचिये शेवटीं । तिये पापयोनीही किरीटी । जन्मले जे ॥ ४३ ॥ ते पापयोनि †मूढ । मूर्ख जैसे कां दगड । [मां हि पार्थ व्यपाश्रित्य] परि माझ्याठायीं दृढ । सर्वभावें ॥ ४४ ॥ जयांचिये वाचे माझे आलाप । दृष्टी भोगी माझेंचि रूप । जयांचें मन संकल्प । माझाचि वाहे ॥ ४५ ॥ माझिया कीर्तीविण । जयांचे रिते नाहीं श्रवण । जयां सर्वांगीं भूषण । माझी सेवा ॥ ४६ ॥ जयांचें ज्ञान विषो नेणे । जाणीव मज एकातेंचि जाणे । जयां ऐसें लाभे तरी जिणें । येऱ्हवीं ‡मरण ॥ ४७ ॥ ऐसा आघवाचि परी पांडवा । जिहीं आपुलिया सर्वभावा । जियावयालागीं वोलावा । मीचि केला ॥ ४८ ॥ ते पापयोनीही होतु कां । ते श्रुताधीतही न होतु कां । परि मजसीं तुकितां तुका । तुटी नाहीं ॥ ४९ ॥ पाहें पां भक्तीचेनि आंथिलेपणें । §दैत्यीं देवां आणिलें उणें । माझें नृसिंहत्व लेणें । जयाचिये महिमे ॥ ४५० ॥ तो प्रल्हाद गा मजसाठीं । ¶घेतां बहुतें सदा किरीटी । कां जें मियां द्यावें तें गोष्टी । तयाचिया जोडे ॥ ५१ ॥ येऱ्हवीं दैत्यकुळ साँचोकारें । परि इंद्रही सरि न लाहे उपरें । ह्मणोनि भक्ति गा एथ सरे । जाति अप्रमाण ॥ ५२ ॥ राजाज्ञेचीं अक्षरें आहाती । तियें चौमा एका जया पडती । तया चामासाठीं जोडती । सकळ वस्तु ॥ ५३ ॥ वांचूनि सोनें रुपें प्रमाण नोहे । एथ राजाज्ञाचि समर्थ आहे । तेंचि चाम एक जैं लाहे । तेणें विकती आघवीं ॥ ५४ ॥ तैसें उत्तमत्व तैंचि तरे । तैंचि सर्वज्ञता सरे । जैं मनोबुद्धि $भरे । माझेनि प्रेमें ॥ ५५ ॥ ह्मणोनि कुळ जाति वर्ण । हें आघवेंचि गा अकारण । एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥ ५६ ॥ तेंचि भलतेणें भावें । मन मज आंतु येतें होआवें । आलें तरी आघवें । मागील वावो ॥ ५७ ॥ जैसे तंवचि वेहाळ वोहळ । जंव

---

* नांव घेतां वोखटी. † गूढ. ‡ मरण भलें. § दैत्यांदेवां. ¶ घेतां द्रुद्रें बहुतां कष्टीं. $ मोहरें.

---

१ नक्कानें. २ हत्ती. ३ व्यर्थ. ४ गोष्टी, नामोच्चार. ५ पांच विषय. ६ सर्वप्रकारें. ७ असेनात कां. ८ शास्त्र पढलेले. ९ माझी आणि त्यांची तुलना केली तर कांहीं कमती नाहीं. १० महत्वानें. ११ मोठेपणासाठीं. १२ त्या प्रल्हादाला माझ्याबद्दल घेतलें असतां. १३ खरेपणानें. १४ बरोबरी. १५ अधिकपणानें. १६ पुढारी होय. १७ कातड्याच्या तुकड्यावर. १८ विकत मिळती. १९ निर्फळ. २० नीचवर्णादिक. २१ व्यर्थ. २२ लहान ओढे.

न पवती गंगाजळ । मग होऊनि ठाकती केवळ । गंगारूप ॥ ५८ ॥ कां खैर चंदन काष्ठें । हे विवंचना तंवचि घटे । जंव न घापती एकवटे । अग्निमाजि ॥ ५९ ॥ [स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः] तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया । जाती तंवचि वेगळालिया । जंव न पवती मातें ॥ ४६० ॥ [तेऽपि यांति परां गतिं] मग जाति व्यक्ती पडे बिंदुलें । जेव्हां *भावें होती मज मीनले । जैसें लवणकण घातले । सागरामाजी ॥ ६१ ॥ तंववरी †नदनदीचीं नांवें । तंवचि पूर्वपश्चिमेचे यावे । जंव न येती आघवे । समुद्रामाजि ॥ ६२ ॥ हेंचि कवणे एके मिसें । चित्त माझेठायीं प्रवेशे । येतुलें हो, मग आपैसें । मीचि होणें असे ॥ ६३ ॥ अगा वरी फोडावयाचि लागीं । लोहो मिळो कां परिसाचे आंगीं । कां जे मिळतिये प्रसंगीं । सोनेंचि होईल ॥ ६४ ॥ पाहें पां वल्लभाचेनि व्याजें । तिया व्रजांगनाचि निजें । मज मिनलिया काय माझें । स्वरूप नव्हती ॥ ६५ ॥ ना तरी भयाचेनि मिसें । मातें न पविजेचि काय कंसें । कीं अखंड वैरवशें । चैद्यादिकीं ॥ ६६ ॥ अगा सोयरेपणेंचि पांडवा । माझें सायुज्य यादवां । कीं ममत्वें वसुदेवा- । दिकां सकळां ॥ ६७ ॥ नारदा ध्रुवा अक्रूरा । शुका हन सनत्कुमारा । इयां भक्ती मी धनुर्धरा । प्राप्य जैसा ॥ ६८ ॥ तैसाचि गोपिकांसि कोंमें । तयां कंसा भयसंभ्रमें । येरां घातका मनोधर्मे । शिशुपालादिकां ॥ ६९ ॥ अगा मी एकलाणीचें खागें । मज येवों ये भलतेनि मार्गें । भक्ति कां विषय ‡विरागें । अथवा वैरें ॥४७०॥ ह्मणोनि पार्था पाहीं । प्रवेशावया माझ्या ठायीं । उपायांची नाहीं । वाणी एथ ॥ ७१ ॥ आणि भलतिया जाति जन्मावें । §मग भजिजे कां विरोधावें । परि भक्ता का ¶वैरिया व्हावें । माझियाचि ॥ ७२ ॥ अगा कवणें एके बोलें । माझेपण जन्ही जाहालें । तरी मी होणें आलें । हाता निरुतें ॥ ७३ ॥ यालागीं पापयोनीही अर्जुना । कां वैश्य शूद्र अंगना । मातें भजतां सदना । माझिया येती ॥ ७४ ॥

किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।
अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥ ३३ ॥

[ब्राह्मणाः पुण्या भक्ताः] मग वर्णामाजि छत्रचामर । स्वर्ग जयाचें अग्रहार ।

---

* भाव होती. † नदानदीचीं. ‡ वैराग्यें. § मज. ¶ वैरी व्हावें.

---

१ विचार. २ घातले जात नाहींत. ३ शून्य. ४ आगमन. ५ परिसाला फोडण्याकरितां. ६ स्पर्शमात्रानें. ७ प्रीतीचे. ८ गोपस्त्रियांचे. ९ अंतःकरणानें. १० शिशुपालादिकांनीं. ११ भक्तीस्तव. १२ विषयबुद्धीनें. १३ निर्वाणींचें स्थान. १४ विरक्ततेनें. १५ उणीव. १६ माझ्याच. १७ खरें. १८ श्रेष्ठ. १९ इनाम गांव.

मंत्रविद्येसि माहेर । ब्राह्मण जे ॥ ७५ ॥ जे पृथ्वीतळींचे देव । जे तपोवतार[1] सावयव[2] । सकळतीर्थांसि दैव । उदयलें जे ॥ ७६ ॥ जेथ अखंड वसिजे यागीं । जे वेदांची वज्रांगी[3] । जयांचिये दिठीचिया उत्संगीं[4] । मंगळ वाढे ॥७७॥ जयांचिये आस्थेचेनि बोलें[5] । सत्कर्म *पालाहाळीं[6] गेलें । संकल्पें सत्य जियालें[7] । जयांचेनी ॥ ७८ ॥ जयांचेनि गा बोलें । अग्नीसि आयुष्य जाहालें । ह्मणोनि समुद्रें पाणी आपुलें । दिधलें यांचिप्रीती ॥ ७९ ॥ मियां लक्ष्मी †डावलोनि[8] केली परौती[9] । फेडोनि[10] कौस्तुभ घेतला हातीं । मग वोढविली वक्षस्थळाची वाखती[11] । चरणरजां ॥ ४८० ॥ आझूनि पाउलाची मुद्रा[12] । मी हृदयीं वाहें गा ‡सुभद्रा । जे आपुलिया दैवसमुद्रा । जतनेलागीं ॥ ८१ ॥ जयांचा कोप सुभटा । काळाग्निरुद्राचा वसौटा[13] । जयांचे प्रसादीं फुकटा । जोडती सिद्धी ॥ ८२ ॥ ऐसे §पुण्यपूज्य जे ब्राह्मण । आणि माझ्या ठायीं अतिनिपुण । [किं पुनः] आतां मातें पावती ते हे कवण । ¶समर्थावें[14] ॥ ८३ ॥ पाहें पां चंदनाचेनि $अंगानिळें[15] । ||शीतळितले[16] निंब होते जे जवळें । तिहीं निर्जिवीं देवांचीं निंडळें[17] । बैसणी[18] केली ॥ ८४ ॥ मग तो चंदन तेथें न पवे । ऐसें मनीं कैसेनि धरावें । अथवा पांतला[19] हें समर्थावें । तेव्हां काय सांच[20] ॥ ८५ ॥ तेथ निववील ऐसिया आशा । हरें[21] चंद्रमा आधा[22] ऐसा । वाहिजत असे शिरसा[23] । निरंतर ॥ ८६ ॥ तेथ निवविता आणि सगळा । परिमळें चंद्राहून आगळा । तो चंदन केविं अवलीळा[24] । सर्वांगीं न बैसे ॥८७॥ कां रथ्योदकें[25] जियेचिये कासे । लागलिया समुद्र जालीं अनायासें । तिये गंगेसि काय अनारिसें[26] । गत्यंतर असे ॥ ८८ ॥ [राजर्षयस्तथा] ह्मणोनि राजर्षी कां ब्राह्मण । जयां गति मति मीचि शरण । तयां त्रिशुद्धी मीचि निर्वाण[27] । स्थितीही मीचि ॥ ८९ ॥ [इमं प्राप्य] यालागीं शीतजर्जर[28] नावे । रिगोनि केविं निश्चित होआवें । कैसेनि उघडिया असावें । शस्त्रवर्षीं[29] ॥ ४९० ॥ आंगावरी पडतां पाषाण । न सुवावें केविं वोडंण[30] । रोगें +दाटला आणि उदासपण । वोखदेंसी ॥ ९१ ॥ जेथ चहूंकडे जळत वणवा । तेथूनि न निगिजे केविं पांडवा । तेविं लोका येऊनि सोपद्रवा । केविं न भजिजे मातें ॥ ९२ ॥ अगा मातें न भजावयालागीं । कवण बळ पां आ-

---

* पाहाळीं. † जवळोनि. ‡ नरेंद्रा. § पुण्यपुंज. ¶ समर्थणें. $ अंगअनिळें. || शीतळें. + दाटलिया.

---

१ तपश्चर्येचे अवतार. २ मूर्तिमान्. ३ बळकट कवच. ४ मांडीवर. ५ ओलाव्यानें. ६ विस्तारलें. ७ जीवित्व. ८ यांप्रीत्यर्थ. ९ ढकलून. १० काढून. ११ खळगी. १२ ठसा. १३ स्थान. १४ प्रतिपादावें. १५ अंगवायूच्या योगानें. १६ स्पर्शले. १७ मस्तकें. १८ वसण्याचीं स्थानें. १९ पातला म्हणून सांगितल्यावर मात्र खरें, नाहीं तर खोटें. २० महादेवानें. २१ अर्धा. २२ मस्तकावर. २३ सहज. २४ रस्त्यावरील उदकें. २५ निराळें, भिन्न. २६ शेवटीं. २७ शतावधी बोंकांच्या फुटक्या नावेंत. २८ शस्त्रवृष्टींत. २९ न घालावें. ३० ढाल.

पुलिया आंगीं । काइ घरीं कीं भोगीं । निश्चिंती केली ॥ ९३ ॥ ना तरी विद्या कीं वयसा । ययां प्राणियांसि हा ऐसा । मज न भजतां भरंवसा । सुखाचा कोण ॥ ९४ ॥ [असुखं] तरी भोग्यजात जेतुलें । तें एका देहाचिया निकिया लागलें । आणि एथ देह तंव असे पडिलें । काळाचिये तोंडीं ॥ ९५ ॥ बाप दुःखाचें केणें सुटलें । जेथ मरणाचें *भरें लोटलें । तिये मृत्युलोकींचें शेवटिलें । †हाटवेळे येणें जाहालें ॥ ९६ ॥ आतां सुखेंसि जीविता । कैंची ग्राहिकी किजेल पांडुसुता । काय राखोंडी फुंकितां । दीप लागे ॥ ९७ ॥ अगा विषाचे कांदे वाटुनी । जो रस घेइजे पिळुनी । तया नाम अमृत ठेउनी । जैसें अमर होणें ॥ ९८ ॥ तेविं विषयांचें जें सुख । तें केवळ परमदुःख । परि काय कीजे मूर्ख । ‡न सेवितां न सरे ॥ ९९ ॥ कां शीस खांडूनि आपुलें । पायींच्या खेतीं बांधिलें । तैसें मृत्युलोकींचें भलें । आहे आघवें ॥ ५०० ॥ ह्मणोनि मृत्युलोकीं सुखाची कहाणी । ऐकिजेल कवणाचिये श्रवणीं । कैंची सुखनिद्रा आंथरुणीं । इंगळाच्या ॥ १ ॥ [अनित्यं] जिये लोकींचा चंद्र क्षयरोगी । जेथ उदय होय अस्तालागीं । दुःख लेऊनि सुखाची आंगी । सळित जगातें ॥ २ ॥ जेथ मंगळाचिया अंकुरीं । सवेंचि अमंगळाची पडे § पोरी । मृत्यु उदराचिया परिवरीं । गर्भ गिंवसी ॥ ३ ॥ जें नाहीं तें तयातें चिंतवी । तंव तेंचि नेइजे गंधर्वीं । गेलियाची कवणें गांवीं । शुद्धी न लगे ॥ ४ ॥ अगा गिंवसितां आघविया वाटीं । परतलें पाउलचि नाहीं किरीटी । सैंघें निमालियाचिया गोष्टी । तियें पुराणें जेथिंचीं ॥ ५ ॥ जेथींचिये अनित्यतेची थोरी । करिता ब्रह्मयाचे आयुष्यवेरी । कैसें नाहीं होणें अवधारीं । निपटुनियां ॥ ६ ॥ [लोकं] ऐसी लोकींची जिये नांदणुक । तेथ जन्मले आथि जे लोक । तयांचिये निश्चिंतीचें कौतुक । दिसत असे ॥७॥ पैं दृष्टादृष्टाचिये जोडी । लागीं भांडवल न सुटे कवडी । जेथ सर्वस्वें हानि तेथ कोडी । वेंचिती गा ॥ ८ ॥ जो बहुवे विषयविलासें गुंफे । तो ह्मणती उवाईं पडिला सापें । जो अभिलाषभारें दडपे । तयातें सज्ञान ह्मणती

---

*भरे लोटले. † येणें जाहालें हाटवेळे. ‡ सेवितां न सरे. § पोरी, वोहोरी.

१ सर्व उपभोग्य वस्तु. २ बरेपणास. ३ माल. ४ समूह, 'भरे लोटले' अशा पाठीं १६० पायल्या=भरा. ५ मनुष्यरूपानें शेवटचें जन्म. ६ बाजाराच्या समयीं. ७ आतां जीविताला सुख होईल असा कोणता सवदा करावा. ८ गिराइकी. ९ सेवन न करितां दूर होत नाहीं, टाकीत नाहीं. १० तोडून. ११ क्षतांवर. १२ गोष्ट. १३ कानांनीं. १४ दुःख सुखाची आंगी=आंगरखा घेऊन लगाला छळतें (बाहेरून सुख असें वाटतें पण सर्व दुःखच आहे.) १५ आंगरखा. १६ छळित. १७ आच्छादन, 'पोरी' अशा पाठीं धान्यांत कीड पडते ती. १८ घरीं. १९ शोधी. २० बहुत. २१ कर्ता जो ब्रह्मा त्याचे. २२ आयुष्य सरेपर्यंत. २३ सर्वथैव. २४ कोट्यवधि द्रव्य. २५ अडके, गुंते. २६ सुखामध्यें. २७. प्रस्तुत.

॥ ९ ॥ जयाचें आयुष्य धाकुटें होय। *बळ प्रज्ञा जिरोनि जाय । तयाचे नमस्कारिती पाय । वडिल ह्मणुनी ॥ ५१० ॥ जंव जंव बाळ बळिया वाढे । तंव तंव भोजें नाचती कोडें । आयुष्य निमालें आंतुलियेकडे । ते ग्लानीचि नाहीं ॥ ११ ॥ जन्मलिया †दिवसदिवसें । होंलागे ‡काळाचेंयाचि ऐसें । कीं वाढती करिती उल्हासें। उभविती गुढिया ॥१२॥ अगा मर हा बोल न साहती । आणि मेलिया तरीं रडती । परि असतें §जात न गणिती । गाहिंसपणें ॥ १३ ॥ दर्दुर सापें गिळिजतु आहे उभा । कीं तो मासिया वेंटाळी जिभा । तैसे प्राणिये कवणे ¶लोभा । वाढविती तृष्णा ॥ १४ ॥ अहा कटकटा हें वोखटें । इये मृत्युलोकींचें उफराटें । [भजस्व मां] एथ अर्जुना जरिं अवचटें । जन्मलासी तूं ॥ १५ ॥ तरि झडझडोनि $वाहिला निघ । इये भक्तिचिये वाटे लाग । जिया पावसी अव्यंग । निजधाम माझें ॥ १६ ॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥ ३४ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे राजविद्याराजगुह्ययोगो नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

[मन्मना भव मद्भक्तो] तूं मन हें मीचि करीं । माझिया भजनीं प्रेम धरीं । [मां नमस्कुरु] सर्वत्र नमस्कारीं । मज एकातें ॥१७ ॥ [मद्याजी] माझेनि अनुसंधानें देख । संकल्प जाळणें निःशेष । मद्याजी चोख । याचि नांव ॥१८॥ [युक्त्वैवमात्मानं] ऐसा मियाँ आथिला होसी । [मामेवैष्यसि] तेथ माझियाचि स्वरूपा पावसी । हें अंतःकरणींचें तुजपासीं । बोलिजत असे ॥ १९ ॥ [मत्परायणः] अगा अवधियां चोरियाँ आपुलें । जें सर्वस्व आह्मी असे ठेविलें । तें पावोनि सुख संचलें । होऊनि ठासी ॥ ५२० ॥ ऐसें सांवळेनि परब्रह्में । तेणें भक्तकामकल्पद्रुमें । बोलिलें श्रीआत्मारामें । संजयो ह्मणे ॥ २१ ॥ अहो ऐकिजत असे कीं अवधारा । तंव इया बोला निवांत ह्मातारा । जैसा ह्मैसा ॥नुठी कां पुरा । तैसा उगाचि असे ॥ २२ ॥ तेथ संजयें माथा तुकिला । +अहो अमृताचा पाउस वर्षलां । कीं हा एथ असतुचि गेला । सेजियाँ गावां

---

*बाळप्रज्ञा. † देहदिवसें. ‡ काळाचेंचि. § जातें. ¶लाभा. $ वहिला.॥ नेणें.
+ अहा अमृताचा.

---

१ उणें होतें. २ बुद्धि. ३ संतोषानें. ४ कमी झालें. ५ आंतून. ६ दुःख. ७ काळाच्याच स्वाधीन. ८ वाढदिवस. ९ जात असतें तें जुमानीत नाहींत. १० मूर्खपणें. ११ हायहाय. १२ वाईट. १३ वायला, वेगळा. १४ अनुलक्षानें. १५ माझें यजन करणारा. १६ निर्मळ. १७ माझ्या योगानें संपन्न. १८ चोरून ठेवलेलें. १९ राहासी. २० स्वस्वरूपीं रममाण होणाऱ्या श्रीकृष्णानें. २१ टोणगा. २२ नदीच्या पूरांतून. २३ शेजारचे गांवीं.

॥ २३ ॥ तऱ्ही दातार हा आमुचा । ह्मणोनि हें बोलतां मैळेल वाचा । काय कीजे ययाचा । स्वभावचि ऐसा ॥ २४ ॥ परि बाप भाग्य माझें । जे वृत्तांत सांगावयाचेनि व्याजें । कैसा रक्षिलों मुनिराजें । श्रीव्यासदेवें ॥ २५ ॥ *येतुलें हें वाड सायसें । जंव बोलत असे दृढमानसें । तंव न धरवेचि आपुलिया ऐसें । सात्विकें केलें ॥ २६ ॥ चित्त †चाकाटलें आठु घेत । वाचा पांगुळली जेथिंची तेथ । आपादकंचुकित । रोमांच आले ॥ २७ ॥ अर्धोन्मीलित डोळे । वर्षताति आनंदजळें । आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें । बाहेरि कांपे ॥ २८ ॥ पैं आघवाचि रोममूळीं । आली स्वेदकणिका निर्मळी । लेइला मोतियांचीं कडियाळीं । आवडे तैसा ॥ २९ ॥ ऐसा महासुखाचेनि अतिरसें । जेथ आटणी हों पाहे जीवदशे । तेथ ‡निरोपिलें व्यासें । तें नेदीचि हों ॥५३०॥ आणिक §श्रीकृष्णाचें बोलणें । घोंकरी आलें श्रवणें । कीं देहस्मृतीचा तेणें । वांपसा केला ॥ ३१ ॥ तेव्हां नेत्रींचें जळ विसर्जी । सर्वांगींचा स्वेद परिमार्जी । तेवींचि अवधारा ह्मणे होजी । धृतराष्ट्रातें ॥ ३२ ॥ आतां श्रीकृष्णवाक्यबीजनिवाड । आणि संजय सात्विकाचा बिवड । ह्मणोनि श्रोतया होईल सुरवाड । प्रमेयपिकाचा ॥ ३३ ॥ अहो अळुमाळ अवधान देयावें । येतुलेनि आनंदाचे राशीवरी बैसावें । बाप श्रवणेंद्रियां दैवें । घातली माळ ॥ ३४ ॥ ह्मणोनि विभूतींचा जो ठावो । अर्जुना दावील सिद्धांचा रावो । तो ऐका ह्मणे ज्ञानदेवो । निवृत्तीचा ॥ ५३५ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

श्लोक ३४, ओंव्या ५३५.

---

* येतुलेनि. † एकवटलें. ‡ निरोविलें, (सोंपविलें.) § श्रीकृष्णार्जुनाचें.

१ धनी. २ दूषित होईल. ३ मोठें. ४ एथून पुढें अध्याय संपेपर्यंत आठ भाव वर्णिले आहेत ते हे–'स्तंभः स्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्याष्टौ सात्विका मताः ॥' इत्यादि. ५ आपणाला. ६ गढून गेलें. ७ संकोच, आटणी. ८ नखशिखांत आंगरख्यासारखे. ९ अर्धे उघडे. १० घामाचे बारीक कण. ११ माळा. १२ आकुंचन, हानि. १३ होऊं देईना. १४ झट्कर. १५ वाफ आलेली भूमि. १६ पुसी, टाकी. १७ पुसी. १८ खत. १९ आनुकूल्य. २० सिद्धांताचा. २१ किंचित्. २२ ईश्वरमूर्तींचीं स्थलें.

ज्ञानेश्वरी.

अध्याय १० वा.

नमो विशदबोधविदग्धा । विद्यारविंदप्रबोधा । पराप्रमेयप्रमदा । विलासिया ॥ १ ॥ नमो संसारतमसूर्या । अपरिमितपरमवीर्या । तरुणतरतूर्या । लालनलीला ॥ २ ॥ नमो जगदखिलपालना । मंगळमणिनिधाना । *सज्जनवनचंदना । आराध्यलिंगा ॥ ३ ॥ नमो चतुरचित्तचकोरचंद्रा । आत्मानुभवनरेंद्रा । श्रुतिसारसमुद्रा । मन्मथमन्मथा ॥ ४ ॥ नमो †सुभावभज्जना । भवेभकुंभभंजना । विश्वोद्भवभुवना । श्रीगुरुराया ॥ ५ ॥ तुमचा अनुग्रहो गणेश । जैं आपुला दे सौरस । तैं सारस्वतीं प्रवेश । बाळकाही आथि ॥ ६ ॥ जी दैविकी उदार वाचा । जैं उद्देश दे नाभिकाराचा । तैं नवरससुधाब्धीचा । ‡थोड लाभे ॥ ७ ॥ जी §आपुलिया स्नेहाची वागेश्वरी । जरी मुकेयातें अंगीकारी । तो वाचस्पतीसीं करी । प्रबंधहोडा ॥ ८ ॥ हें असो दिठी जयावरी झळके । कीं हा पद्मकर माथां पारुखे । तो जीवचि परि तुके । महेशेंसीं ॥ ९ ॥ एवढें ¶जिये महिमेचें करणें । ते वाचाबळें $वानूं मी कवणें । कां सूर्याचिया आंगा उटणें । लागत असे ॥ १० ॥ केउता कल्पतरुवरी फुलौरा । कायसेनि पाहुणेर क्षीरसागरा । कवणे वासीं कापुरा । सुवास देवों ॥ ११ ॥ चंदनातें कायसेनि चर्चावें । अमृतातें केउतें रांधावें । गगनावरी उभवावें । ||घडे केविं ॥ १२ ॥ तैसें श्रीगुरूचें महिमान । आकळितें कें असे साधन । हें जाणोनियां नमन । निवांत केलें ॥ १३ ॥ जरी प्रज्ञेचेनि ओथिलेपणें । श्रीगुरुसामर्थ्यरूप करूं ह्मणे । तरि तें मोतियां भिंग देणें । तैसें होईल ॥ १४ ॥ कां सोडेपंधरया रेजतवणी । तैसीं स्तुतीचीं बोलणीं । उगियाचि माथा ठेविजे च-

---

* खजन. † सुभावभजनभाजना. ‡ पवाड लाभे. § आपुला स्नेह तेचि. ¶ महिमेचें जिये. $ वानावें. || घडे कायि.

---

१ स्पष्ट बोध करण्याविषयीं कुशल. २ विद्या हेंच कमळ त्याला विकासविणारा. ३ प्रकृति स्त्रीशीं विलास करणारा. ४ अत्यंत तरुण तुर्येचें लालन हीच ज्याची लीला. ५ मदनाचें मंथन करणारा. ६ संसारगजाचें गंडस्थळ फोडणारा. ७ जगदुत्पत्तिस्थान. ८ प्रसाद. ९ सर्व विद्यांत. १० गुरूची. ११ अभयाचा. १२ थांग. १३ सरस्वती. १४ ग्रंथ करण्याची प्रतिज्ञा. १५ दृष्टी. १६ स्थीर होणें, विसावे, लोपे. १७ साम्य पावे. १८ लेप, रंग. १९ कोठून. २० फुलांचा भर. २१ लेप करावा. २२ उंच करावें. २३ कोठें. २४ भाग्यत्वानें. २५ अभ्रकाचें पुट देणें. २६ उत्तम सोन्याला. २७ रुप्याचें पाणी, मुलामा.

रणीं । हेंचि भलें ॥ १५ ॥ मग ह्मणितलें जी स्वामी । भलेनि ममत्वें देखिला तुह्मी । ह्मणोनि कृष्णार्जुनसंगमीं । प्रयागवट जाहालों ॥ १६ ॥ मागां दूध दे ह्मणितलियासाठीं । आघविया क्षीराब्धीची करूनि वाटी । उपमन्यूपुढें धूर्जटी । ठेविली जैसी ॥१७॥ ना तरी वैकुंठपीठनायकें । रुसला ध्रुव कवतिकें । बुझाविला देऊनि भातुकें । ध्रुवपदाचें ॥ १८ ॥ तैसी जे ब्रह्मविद्यारावो । सकळशास्त्रांचा विसंवता ठावो । ते भगवद्गीता वोंविये गावों । ऐसें केलें ॥ १९ ॥ जे बोलणियाचे रानीं हिंडतां । नायकीजे फळलिया अक्षराची वार्ता । *परि ते वाचाचि केली कल्पलता । विवेकाची ॥ २० ॥ होती देहबुद्धी एकसरी । ते आनंदभांडारा केली वोवरी । मन गीतार्थक्षीरसागरीं । जळशयन जालें ॥२१॥ ऐसें एकेक देवाचें करणें । तें अपार बोलों केविं मी जाणें । तऱ्ही अनुवादलों धीटपणें । तें उपसाहिजो जी ॥ २२ ॥ आतां आपुलेनि कृपाप्रसादें । मियां भगवद्गीता वोवीप्रबंधें । पूर्वखंड विनोदें । वाखाणिलें ॥ २३ ॥ प्रथमीं अर्जुनाचा विषाद । दुजीं बोलिला योग विशद । परि सांख्यबुद्धीसि भेद । दाऊनियां ॥ २४ ॥ तिजीं केवळ कर्म प्रतिष्ठिलें । तेंचि चतुर्थीं ज्ञानेसीं प्रगटिलें । पंचमीं †गेव्हरिलें । योगतत्त्व ॥ २५ ॥ तेंचि षष्ठामाजि प्रगट । आसनालागोनि स्पष्ट । जीवात्मभाव एकवट । होती जेणें ॥ २६ ॥ तैसी जे योगस्थिती । आणि योगभ्रष्टां जे गती । ते आघवीचि उपपत्ती । सांगीतली षष्ठीं ॥ २७ ॥ तयावरी सप्तमीं । प्रकृतिपरिहार उपक्रमीं । भजती जे पुरुषोत्तमीं । ते बोलिले चौन्ही ॥ २८ ॥ पाठीं ‡सप्त प्रश्नसिद्धी । बोलोनि प्रयाणसमयशुद्धी । एवं सकळवाक्यावधि । अष्टमाध्यायीं ॥ २९ ॥ §मग शब्दब्रह्मीं असंख्याकें । जेतुला कांहीं अभिप्राय पिके । तेतुला महाभारतें एकें । लक्षें जोडे ॥ ३० ॥ तिये ¶आघवाचि जें महाभारतीं । तें लाभे कृष्णार्जुनवचनोक्तीं । आणि जो अभिप्रावो गीते सातेंशतीं । तो एकलाचि नवमीं ॥ ३१ ॥ ह्मणोनि नवमींचिया अभिप्राया । सहसा मुद्रा लावावया । बिहेला वेद मग मी वायां । गर्व कां करूं ॥ ३२ ॥ अहो गुळा साखरे मीलयाचे । बांधे तरि एकाचि रसाचे । परि स्वाद गोडियेचे । आन आन जैसे ॥ ३३ ॥ एक जाणोनियां बोलती । एक ठायेंठाय जाणविती । एक जाणों जातां हारपती । जाणते गुणेसीं ॥ ३४ ॥ हे ऐसे अध्याय गीतेचे । $परि अ-

---

* ते वाचा केली. † गौरव्हविलें. ‡ सप्तमींच्या. § आतां. ¶ आघव्याचि. $ येथ, अनिर्वाच्यपण.

१ कृष्णार्जुनसंवाद हाच प्रयाग तो प्राप्त झालों. २ शंकरानें. ३ समजाविला. ४ खाऊ. ५ विश्रांतिस्थान. ६ क्षमा करावी. ७ पूर्वार्ध. ८ स्पष्ट. ९ गौरविलें. १० प्रतिपादन. ११ आरंभीं. १२ 'आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ' या श्लोकांत. १३ वेदान्तांत. १४ लक्षानें. १५ स्पष्ट सांगण्यास. १६ भ्याला. १७ ढेपींचें. १८ भिन्नभिन्न. १९ टिकाणोटिकाणीं.

निर्वाच्यपण नवमाचें । *तो अनुवादलों हें तुमचें । सामर्थ्य प्रभू ॥ ३५ ॥ अहो एकाची [१]शाटी तपिन्नली । एकीं सृष्टीवरि सृष्टि केली । एकीं पाषाणीं वाऊनि उतरलीं । समुद्रीं [२]कैटकें ॥ ३६ ॥ एकीं आकाशीं सूर्यातें धरिलें । एकीं चुळींचि सागरातें भरिलें । तैसें मज †मुकयाकरवीं बोलविलें । [३]अनिर्वाच्या तुह्मी ॥ ३७ ॥ परि हें असो एथ ऐसें । श्रीराम रावण जुंझिनले कैसें । श्रीराम रावण जैसे । मीनले समरीं ॥ ३८ ॥ तैसें नवमीं कृष्णाचें बोलणें । तें [४]नव मीचियाचि ऐसें मी ह्मणें । या निवाडा तत्त्वज्ञ जाणे । जया गीतार्थ हातीं ॥ ३९ ॥ एवं नवही अध्याय पहिले । मियां [५]मतीसारिखे वाखाणिले । आतां उत्तरखंड [६]उपाइलें । ग्रंथाचें ऐका ॥ ४० ॥ जेथ विभूतीप्रतिविभूती । प्रस्तुत अर्जुना सांगीजती । ते विदग्धा रसवृत्ती । ह्मणिपैल कथा ॥ ४१ ॥ देशियेचेनि नागरपणें । शांत शृंगारातें [७]जिणें । तरि वोंविया होती लेणें । साहित्यासी ॥ ४२ ॥ मूळग्रंथींचिया संस्कृता । वरि मऱ्हाटी नीट पाहातां । अभिप्राय मानलिया चित्ता । कवण ‡भूमी हें न चोजवे ॥ ४३ ॥ जैसें आंगाचेनि सुंदरपणें । लेणिया आंगाचि होय लेणें । तेथ अळंकारिलें कवण कवणें । हें [८]निर्वचेना ॥ ४४ ॥ तैसी देशी आणि संस्कृतवाणी । एका भावार्थाच्या सुखासनीं । शोभती [९]आयणी । चोखट आइका ॥ ४५ ॥ §उदयलिया भावारूप । करितां रसवृत्तीचें लागे [१०]वेडप । चातुर्य ह्मणे [११]पेडप । जोडलें आह्मां ॥ ४६ ॥ तैसें देशियेचें लावण्य । हिरोनि रसां आणिलें तारुण्य । मग रचिलें अगण्य । गीतातत्त्व ॥ ४७ ॥ जो चराचरपरमगुरु । चतुरचित्तचमत्कारु । तो ऐका यादवेश्वरु । बोलता जाहाला ॥ ४८ ॥ ज्ञानदेव निवृत्तीचा ह्मणे । ऐसें बोलिलें श्रीहरी तेणें । अर्जुना आघवियाचि [१२]मातू [१३]अंतःकरणें । [१४]धेंडौता आहासी ॥ ४९ ॥

श्रीभगवानुवाच–**भूय एव महाबाहो शृणु मे परमं वचः ।**
यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ॥ १ ॥

[श्रीभगवानुवाच–भूय एव] आह्मी मागील जें निरूपण केलें । तें तुझें अवधानचि पाहिलें । तंव [१५]टांचें नव्हे भलें । पुरतें आहे॥५०॥घटीं थोडेंसें उदक घालिजे । तेणें न गळे तरी वरिता भरिजे । ऐसा परिसौनि पाहिलासि तंव परिसविजे । ऐसेंचि होतसे ॥ ५१ ॥ [१६]अवचित यावरी $सर्व सांडिजे । मग चोख तरी तोचि भांडारी कीजे । तैसा किरीटी तूं आतां माझें । निजधाम कीं ॥५२॥ ऐसें अर्जुना येउतें सर्वेश्वरें । पाहोनि बोलिलें अत्यादरें । गिरी देखोनि [१७]सुभरे । मेघ जैसा ॥ ५३ ॥ तैसा कृपाळुवांचा रावो । [महाबाहो] ह्मणे आइकें

* परि अनुवादलों तो हें तुमचें. † नेणत्या. ‡ भूमिका. § उठालिया. $ सर्वस्व.

१ वस्त्र. २ वानरसमूह. ३ वाणीला अगम्य ब्रह्म. ४ मी नवा. ५ यथामति. ६ आरंभिलें. ७ सुंदर. ८ जिंके. ९ निवडत नाहीं. १० आवडीनें. ११ आश्रय. १२ प्रतिष्ठा. १३ गोष्टीला. १४ धड, ग्रहणास पात्र. १५ अल्प, अपुरें. १६ नकळत, अपरिचित. १७ भरून येतो.

गा महाबाहो । सांगितलाचि अभिप्रावो । सांगेन पुढती ॥ ५४ ॥ [वक्ष्यामि हितकाम्यया] पैं प्रतिवर्षीं क्षेत्रें[1] पेरिजे । *पिकाची जरी[2] वाढी देखिजे । यालागीं नुबगिजे[3] । वाहो करितां ॥ ५५ ॥ पुढतपुढती पुटें[4] देतां । जोडे वानियेची[5] अधिकता । ह्मणोनि सोनें पांडुसुता । शोधूंचि[6] आवडे ॥ ५६ ॥ तैसें एथ पार्था । तुज आभार[7] नाहीं सर्वथा । आह्मी आपुलियाचि स्वार्था । बोलों पुढती ॥ ५७ ॥ [यत्तेऽहं प्रीयमाणाय] जैसें बालका लेववि जे लेणें[8] । तयांप्रमाणें[9] बाळ काई जाणे । परि ते सुखाचे सोहळे भोगणें । माउलिये दिठी ॥ ५८ ॥ तैसें तुझें हित आघवें । जंव जंव कां तुज फावे[10] । तंव तंव आमुचें सुख दुणावे । ऐसें आहे ॥५९॥ आतां अर्जुना असो हे विकंडी[11] । मज उघड तुझी आवडी । ह्मणोनि तृप्तीची सवडी[12] । बोलतां न पडे ॥ ६० ॥ आह्मा येतुलियाचि[13] कारणें । तेंचि तें तुजशीं बोलणें । परि असो हें अंतःकरणें । अवधान देईं ॥ ६१ ॥ [शृणु मे परमं वचः] तरी ऐकें ऐकें गा सुवर्म[14] । वाक्य माझें परम । जें अक्षरें लेऊनि परब्रह्म । तुज खेंवासि[15] आलें ॥ ६२ ॥ परि किरीटी तूं मातें । नेणसी ना निरुतें । तरि तो गा जो मी एथें । तें विश्वचि हें ॥ ६३ ॥

न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः ।
अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ॥ २ ॥

[न मे विदुः] एथ वेद मुके जाहाले । मन पवन[16] पांगुळले । †रातीविण मावळले । ‡रविशशी ॥ ६४ ॥ [सुरगणाः] अगा उदरींचा गर्भ[17] जैसा । न देखे आपुलिये मायेची वयसा[18] । मी आघवेया देवां तैसा । नेणवे कांहीं ॥ ६५ ॥ [न महर्षयः] आणि जळचरां उदधीचें मान । मशका[19] नोलांडवेचि गगन । तेविं महर्षींचें ज्ञान । न देखेचि मातें ॥ ६६ ॥ [प्रभवं] मी कवण पां केतुला[20] । कवणाचा कैं जाहाला । या निरुती[21] करितां बोला । §कल्प गेले ॥ ६७ ॥ [अहमादिर्हि देवानामिति] कां जे महर्षी आणि या देवां । येरां भूतजातां सर्वां । मीचि आदि ह्मणोनि पांडवा । अवघड जाणतां ॥ ६८ ॥ उतरलें उदक पर्वत वेळघे[22] । जरी झाड वाढत मुळीं लागे[23] । तरी मियां[24] जालेनि जगें । जाणिजे मातें ॥ ६९ ॥ कां गोभेवनें वट ¶गिवसवे[25] । जरी तरंगीं सागर सांठवे[26] । कां परमाणुमाजी सामावे । भूगोळ हा ॥ ७० ॥ तैसि[27] मियां जालिया जीवां ।

---

* पिके तरी वाहो नुबगिजे । पिकासि वाहु देखिजे । अधिकाधिक. † रातिदिन. ‡ रविशशी जेथें. § युगें गेलीं. ¶ गंवसवे.

---

१ शेत. २ वृद्धि. ३ न कंटाळावें. ४ लागवड. ५ वरचेवर. ६ रंगाची. ७ शुद्ध करणें. ८ भार. ९ अलंकार. १० त्याप्रमाणें. ११ समजे. १२ चातुर्याचें भाषण. १३ शेवट. १४ एवढ्याकरितांच. १५ अत्यंत मार्मिका. १६ आलिंगनास. १७ खरें.१८ वारा, योग. १९ वय. २० माशीला. २१ केवढा. २२ निश्चय. २३ आश्रय करी. २४ माझ्यापासून झालेल्या जगें. २५ बीजांतील अंकुर. २६ झांकवे. २७ माझ्यापासून झालेल्या जीवांस.

महर्षी अथवा देवां। मातें जाणावया होआवा। अवकाश गा ॥ ७१ ॥ ऐसाही जरी विपायें। सांडूनि पुढील पाये। सर्वेंद्रियांसि होये। पाठिमोरा जो जो ॥ ७२ ॥ *प्रवर्तलाही वेगीं बहुडे। देह सांडूनि मागलीकडे। महाभूतांचिया चढे मायथावरी ॥ ७३ ॥

यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ।
असंमूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ३ ॥

[यो मामजं] तेथ राहोनि ठायठिके। स्वप्रकाशें चोखे। अजत्व माझें देखे। आपुलिया डोळां ॥ ७४ ॥ [अनादिं च वेत्ति लोकमहेश्वरं] मी आदिसीं पर। सकळ लोकमहेश्वर। ऐसिया मातें जो नर। यापरी जाणे ॥ ७५ ॥ तो पाषाणामाजि परिस। जैसा रसाआंत सिद्धरस। तैसा मनुष्याआंत तो अंश। माझाचि जाण ॥ ७६ ॥ [असंमूढः स मर्त्येषु] तें चालतें ज्ञानाचें बिंब। तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ। येर माणुसपण तें भांब। लौकिक भाग ॥ ७७ ॥ अगा अवचितां कां पुरा। माजि सांपडला हिरा। वरि पडिलिया नीरा। नांगवे †कांहीं ॥ ७८ ॥ तैसा मनुष्यलोकाआंत। तो जरी जाहाला प्राकृत। तन्ही प्रकृतिदोषाची मात। नेणेचि कीं ॥ ७९ ॥ तो आपणयेंचि सांडिजे पापीं। जैसा जळत चंदन सर्पीं। तेविं मातें जाणे तो संकल्पीं। वर्जूनि धोपे ॥ ८० ॥ [सर्वपापैः प्रमुच्यते] तेंचि आमुतें कैसें जाणिजे। ऐसें कल्पी जरी चित्त तुझें। तरी मी ऐसा हे माझे। भाव ऐकें ॥ ८१ ॥ जे वेगळालिया भूतीं। सारिखे होऊनि प्रकृती। विखुरले आहेति त्रिजगती। आघविये ॥ ८२ ॥

बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ।
सुखं दुःखं भवो भावो भयं चाऽभयमेव च ॥ ४ ॥
अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ।
भवंति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ॥ ५ ॥

[बुद्धिः] तेथ प्रथम जाण बुद्धी। [ज्ञानं] मग ज्ञान जें निरवधी। [असंमोहः] असंमोह सहनसिद्धी। [क्षमा सत्यं] क्षमा सत्य ॥ ८३ ॥ [दमः शमः] मग शम दम दोन्ही। [सुखं दुःखं] सुखदुःख वर्तत जनीं। [भवो भावो] अर्जुना भवा-

* नभ अलिप्त सर्वांसी। स्वयें अलिप्त होणें नभासी। हेंचि महाभूतांचिया माथयासी। चढणें साचें ॥ ७३ ॥ † कीं तो.

१ कदाचित्. २ बाह्यप्रवृत्ति. ३ सर्वेंद्रियप्रवृत्ति हटवून केवळ साक्षीभूत. ४ मागें फिरे. ५ ठिकाणचें ठिकाणीं स्थिर. ६ उत्तम, निर्मळ. ७ सर्वश्रेष्ठ. ८ अमृत. ९ भ्रम. १० न आटोपे. ११ स्वभयानें. १२ सर्व संकल्प, कल्पना टाकतात. १३ घातला जातो. १४ तर मी असा आहें कीं. १५ धर्म. १६ पसरले. १७ निःसीम. १८ मोह नसणें. १९ जन्म व नाश.

भाव मानीं । भावाचिमाजी ॥ ८४ ॥ [भयं चाभयमेव च] पैं भय आणि निर्भयता । [अहिंसा समता] अहिंसा आणि समता । [तुष्टिस्तपः] तुष्टि तप पांडुसुता । ओळख तूं ॥८५॥ [दानं यशोऽयशः] अगा दान यश अपकीर्ती । [भवंतीति] हे जे भाव सर्वत्र दिसती । ते मजचिपासूनि होती । भूतांचियाठायीं ॥ ८६ ॥ जैसीं भूतें आहाती सिनानीं । *तैसेचि हेही वेगळाले मानीं । एक उपजती माझ्या ज्ञानीं । एक नेणती मातें ॥ ८७ ॥ प्रकाश आणि कवडसें । हें सूर्याचिस्तव जैसें । प्रकाश उदयीं दिसे । तम अस्तुसीं ॥८८॥ आणि माझें जाणणें नेणणें । तैं तंव भूतांचिया भावाचें करणें । ह्मणोनि भूतीं †भावाचिया होणें । विषम पडे ॥ ८९ ॥ यापरी माझिया भावीं । हे ‡जीवसृष्टि आहे आघवी । गुंतली असे जाणावी । पांडुकुमरा ॥ ९० ॥ आतां इये जे सृष्टीचे पालक । जयांआधीन वर्तती लोक । ते अकरा भाव आणिक । सांगेन तुज ॥ ९१ ॥

महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ।

मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः ॥ ६ ॥

[महर्षयः सप्त पूर्वे] तरी आघवाचि गुणीं वृद्ध । जे महर्षीमाजि प्रबुद्ध । कश्यपादि प्रसिद्ध । सप्त ऋषी गा ॥ ९२ ॥ [चत्वारो मनवस्तथा] आणीकही सांगिजतील । जे कां चौदा आंतुल मुदल । स्वयंभूमुख्य वडिल । चारी मनु ॥ ९३ ॥ ऐसे हे अकरा । [मद्भावा मानसा जाताः] माझ्या मनीं जाहाले धनुर्धरा । सृष्टीचिया व्यापारा । लागोनियां ॥ ९४ ॥ जैं लोकांची व्यवस्था न पडे । जैं या त्रिभुवनाचें कांहीं न मोडे । तैं महाभूतांचें दळवाडें । अचुंबित असे ॥ ९५ ॥ तैंचि हे जाहाले । [येषां लोक इमाः प्रजाः] मग इहीं लोक केले । तेथ अध्यक्ष रचूनि ठेविले । इहीं जन ॥ ९६ ॥ ह्मणोनि अकराही हे राजा । मग येर जग यांचिया प्रजा । एवं विश्वविस्तार हा माझा । ऐसेंचि जाण ॥ ९७ ॥ पाहें पां आरंभीं बीज एकलें । मग तेंचि विरूढलिया बुड जाहालें । बुडीं कोंभ निघाले । खांदियांचे ॥ ९८ ॥ खांदियांपासूनि अनेका । फुटिलिया §नाना शाखा । शाखांस्तव देखा । पल्लव पानें ॥ ९९ ॥ पल्लवीं फूल फळ । एवं वृक्षत्व जाहालें सकळ । तें निर्धारितां केवळ । बीजचि आघवें ॥ १०० ॥ तैसें मी एकचि पहिलें । मग मी तेंचि मनातें व्यालें । तेथ सप्तऋषी आणि जाहाले । चारी मनु ॥ १ ॥ इहीं लोकपाळ केले ।

---

* तैसींच यें वेगळालीं मानीं. † भावाचें या. ‡ जीवसृष्टि आघवी. § शाखोपशाखा.

---

१ संतोष. २ निरनिराळीं. ३ उत्पन्न होतात. ४ अंधार. ५ सूर्यापासूनच. ६ अस्तमानीं. ७ कठीण. ८ सर्व गुणीं. ९ ज्ञाते. १० जे चौदा आंतील स्वयंभूमुख्य मुदल. ११ माझ्या मनापासून. १२ समुदाय. १३ अस्पृष्ट. १४ श्रेष्ठ. १५ वाढल्यावर, अंकुर आल्यावर. १६ निश्चयितां. १७ तसें मी, अहं हें पहिलें, त्या मीपासून मन, ब्रह्मदेव, त्यापासून सप्तऋषि इत्यादि.

लोकपाळीं विविध लोक सृजिले[1]। लोकांपासूनि निपजलें। प्रजाजात ॥ २ ॥ ऐसेनि हें विश्व येथें। मीचि *विस्तारिलोंसें निरुतें। परि भावाचेनि[3] हातें। मानें जया ॥ ३ ॥

एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः।
सोऽविकंपेन योगेन युज्यते नाऽत्र संशयः ॥ ७ ॥

[एतां विभूतिं] यालागीं सुभद्रापती। हे भाव इया माझिया विभूती। आणि यांचिया व्याप्ती। व्यापिलें जग ॥ ४ ॥ [योगं च] ह्मणोनि गा यापरी। ब्रह्मादिपिपीलिकांवरी। मीवांचूनि दुसरी। गोष्टीच नाहीं ॥ ५ ॥ [मम यो वेत्ति तत्त्वतः] ऐसें जाणे जो साचें। तया चेयिरें[5] जाहालें ज्ञानाचें। ह्मणोनि उत्तमाधमभेदाचें। स्वप्न न देखे ॥ ६ ॥ मी माझिया विभूती। विभूतीं अधिष्ठिलिया व्यक्ती। हें आघवें योगप्रतीती। एकचि मानी ॥ ७ ॥ [सोऽविकंपेन योगेन] ह्मणोनि निःशंकें येणें महायोगें। [युज्यते नात्र संशयः] मज[8] मीनले मनाचेनि अंगें। एथ संशय करणें न लगे। तो त्रिशुद्धी जाहाला ॥ ८ ॥ कीं जे ऐसें किरीटी। मातें भजे जो अभेदा दिठी। तयाचिये भजनाचे नेटीं। †मीचि लाभें ॥ ९ ॥ ह्मणऊनि अभेदें जो भक्तियोग। तेथ शंका नाहीं नये[10] खंग[11]। करितां ठेला[11] तरी चांग। तें सांगीतलें[12] पैठीं ॥ १० ॥ तोचि अभेद कैसा। हें जाणावया मानसा। ‡सादर जालां तरी परियेसा। बोलिजेल ॥ ११ ॥

अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते।
इति मत्वा भजंते मां बुधा भावसमन्विताः ॥ ८ ॥

[अहं सर्वस्य प्रभवः] तरि मीचि एक सर्वां। या जगा जन्म पांडवा। आणि [मत्तः सर्वं प्रवर्तते] मजचिपासूनि आघवा। निर्वाह यांचा ॥ १२ ॥ कल्लोळ[13]माळा–अनेगा। जन्म जळींचि पैंगा। आणि तया जळचि आश्रय तरंगा। जीवनहो जळ ॥ १३ ॥ ऐसें आघवांचि ठायीं। तयां जळचि जेवीं पाहीं। तैसा मीवांचूनि नाहीं। विश्वीं इये ॥ १४ ॥ [इति मत्वा भजंते मां] ऐसिया व्यापका मातें। मानूनि जे भजती भलतेथें। परि सांचोकारें[14] उदितें। प्रेमभावें ॥ १५ ॥ देश काळ वर्तमान। आघवें मजसीं करूनि अभिन्न। जैसा वायू होऊनि गगन। गगनींचि विचरे ॥ १६ ॥ [बुधा भावसमन्विताः] ऐसेनि

---

* प्रसवलोंसें. † मूर्ति मज (शोधिती.) ‡ सांज झाली (अवकाश.)

१ उत्पन्न केले. २ भावाच्या योगानें. ३ मानतें. ४ मुंगीपर्यंत. ५ जागृति. ६ मला मिळाले. ७ मनाच्या योगानें. ८ सिद्ध झाला. ९ ठिकाणीं, पत्त्यावर. १० थकणें, हरकत, प्रतिबंध. ११ खंड राहिला. १२ अ० ६ 'पार्थ नैवेह नामुत्र' ह्या ४० व्या श्लोकांत. १३ लाटा. १४ खऱ्या उत्कंठेनें.

जे निजज्ञानी[1] । खेळत सुखें त्रिभुवनीं । जगद्रूपा मनीं । सांठऊनि मातें ॥१७॥ जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत । हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ १८ ॥

मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् ।
कथयंतश्च मां नित्यं तुष्यंति च रमंति च ॥ ९ ॥

[मच्चित्ता मद्गतप्राणाः] चित्तें मीचि जाहाले । मियेंचि *प्राणें धाले । मग जीवों मरों विसरले । बोधाचिया भुली ॥ १९ ॥ [बोधयंतः परस्परं] मग तया बोधाचेनि माजें[3]। नाचती संवाद[4]सुखांचीं भोजें[5] । आतां एकमेकां घेपे दीजे । बोधचि वरी ॥ १२० ॥ जैसीं जवळिकेचीं सरोवरें । उचंबळलियां कालवती परस्परें । मग तरंगासीं धवळारें[6] । तरंगचि होती ॥ २१ ॥ तैसी येरयेरांचिये मिळणी[7] । पडत आनंदकल्लोळांची वेणी । §तेथें बोधबोधांचीं लेणीं । बोधेंचि मिरवी ॥ २२ ॥ जैसें सूर्यें सूर्यातें वोंवाळिलें । कीं चंद्रें चंद्रम्या ¶क्षेम दीधलें । ना तरीं सरिसेनि पोडें[8] मिनले । दोनी वोघ ॥ २३ ॥ तैसें प्रयाग होत सामरस्याचें[9] । वरी वोसाण[10] तरत सात्विकाचें । ते संवादचतुष्पथींचे[11] । गणेश जाहाले ॥ २४ ॥ [कथयंतश्च मां नित्यं] तेव्हां तया महासुखाचेनि भरें । धांवोनि देहाचिये गांवांबाहेरें । मियां धाले तेणें उद्गारें[12] । लागती गाजों ॥ २५ ॥ पैं गुरुशिष्याचिया एकांतीं । जे अक्षरा एकाचि[13] वंदंती । ते मेघाचियापरी त्रिजगती । गर्जती सैंघ[14] ॥२६॥ जैसी कमलकलिका जालेपणें । हृदयींचिया मकरंदातें राखों नेणे । दे राया रंका पारणें । आमोदाचें ॥ २७ ॥ [तुष्यंति च] तैसेंचि मातें विश्वीं कथित । कथितेनि तोषें कथूं विसरत । [रमंति च] मग तया विसरामाजि विरतें[15] । आंगें जनितें ॥ २८ ॥ ऐसें प्रेमाचेनि बहुवसपणें[16]। नाहीं राती दिवो[17] जाणणें । केलें माझें सुख अभ्यंगवाणें[18] । आपणपेयां जिहीं ॥ २९ ॥

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥ १० ॥

[तेषां] तयां मग जें आहो कांहीं । द्यावें अर्जुना पाहीं । ते ठायिंचीच तिहीं । घेतली सेलें[19] ॥ १३० ॥ [सततयुक्तानां] कां जे ते जिया वाटा । निगाले

* प्राण. † सुखाचेनि भोगें. ‡ मेळणी. § तेथें बोधाचीं. ¶ खेंव.

१ आत्मज्ञानी. २ माजवणानें. ३ संतोष. ४ चुनेगची घरें. ५ योग्यतेनें. ६ एकत्वाचें. ७ पुरांतील लांकडें, केरकचरा. ८ चव्हाट्यावरचे. ९ गुरु शिष्यास एकच अक्षर गुप्तपणें सांगतात. हे मेघासारखी गर्जना करितात. १० वचन. ११ पुष्कळ. १२ रमाण होतो, 'त्वत्कथामृतपाथोधौ विहरंतो महामुदः। कुर्वंति कृतिनः केचित्कृतार्थीं तृणोपमं ॥' १३ आधिक्यानें. १४ दिवस. १५ पूर्ण. १६ ल्या ठिकाणचीच. १७ उत्तम वाट.

गा सुभटा । [१]ते सोय पाहोनि अव्हां [२]स्वर्गापवर्ग ॥ ३१ ॥ [भजतां] ह्मणोनि तिहीं जें प्रेमें धरिलें । तेंचि आमुचें देणें [३]उपाइलें । परि आह्मी देयावें तेहीं केलें । तिहीं *ह्मणियें ॥ ३२ ॥ [प्रीतिपूर्वक] आतां यावरी येतुलें घडे । जे तेंचि सुख [४]आगळें वाढे । आणि काळाची दृष्टी न पडे । हें आह्मां करणें ॥ ३३ ॥ लळेयाचिया बाळका किरीटी । गवसणी करूनि स्नेहाचिया दिठी । जैसी खेळतां †पाठोपाठीं । माउली धांवे ॥ ३४ ॥ तें जो जो खेळ दावी । तो तो पुढें सोनियाचा करूनि ठेवी । तैसी [५]उपास्तीची पदवी । पोषित मी जायें ॥ ३५ ॥ [येन मामुपयांति ते] जिये पदवीचेनि पोषकें । ते मातें पावती यथासुखें । हे ‡पाळती मज विशेखें । आवडे करूं ॥ ३६ ॥ तूं गा भक्तासि माझें कोड । मज तया अनन्यगतीची चाड । कां जे प्रेमळाचें सांकड । आमुचिया घरीं ॥ ३७ ॥ [ददामि बुद्धियोगं तं] पाहें पां स्वर्ग मोक्ष [६]उपायिले । दोन्ही मार्ग तयांचिये [७]वांहणी केले । आह्मी आंगही §शेखीं वेचिलें । [८]लक्ष्मियेसि ॥ ३८ ॥ परि [९]औपणपेंवीण जें एक । तें ¶तैसेंचि सुख साजुक । सप्रेमालागिं देख । ठेविलें जतन ॥ ३९ ॥ हा [१०]ठायवरी किरीटी । आह्मी प्रेमळ घेवों आपण यासाठीं । या बोलीं $बोलाविया गोष्टी । तैसिया नव्हती गा ॥ १४० ॥

तेषामेवाऽनुकंपार्थमहमज्ञानजं तमः ।
नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥ ११ ॥

[तेषामेव] ह्मणोनि [११]मज आत्मयाचा भाव । जिहीं जियावया केला ठाव । [आत्मभावस्थः] एक मीवांचूनि [१२]वांव । येर मानिलें ॥ ४१ ॥ [अनुकंपार्थं] तयां तत्वज्ञान चोखटा । दिवी पोतासाचि सुभटा । [ज्ञानदीपेन भास्वता] मग मीचि होऊनि दिवटा । पुढां पुढां चालें ॥ ४२ ॥ [अज्ञानजं तमः] अज्ञानाचिये राती- । माजि तमाची [१३]मिळणी दाटती । [अहं नाशयामि] ते नाशूनि घालीं [१४]परौती । तयां करीं नित्योदय ॥ ४३ ॥ ऐसें प्रेमळाचेनि प्रियोत्तमें । बोलिलें जेथ पुरुषोत्तमें । तेथ अर्जुन मनोधर्मे । [१५]निवालों ह्मणतसे ॥ ४४ ॥ हांहो जी अवधारा । भला [१६]केरु फेडिला संसारा । जाहलों [१७]जननीजठरजोहरा- । वेगळा [१८]प्रभू ॥ ४५ ॥ जी जन्मलेपण आपुलें । हें आजि मियां डोळां देखिलें । जीवित हाता चढलें । ॥[१९]आवडे ऐसें ॥ ४६ ॥ आजि आथुस्या

---

* ह्मणिपें. † पाठींपाठीं. ‡ पालन. § शेषा वेंचिलें. ¶ तैसेंचि साजुक. $ बोलिजत. || आवडत असें.

---

१ तो मार्ग पाहिला असतां स्वर्ग व मोक्ष आडवाटाशा वाटतील.२ प्रेम असणें हें माझें देणें, पण तें कार्य त्यांणीं स्वतःच केलें.३ उत्पन्न झालें.४ अधिक. ५ गोजिरवाणा, उत्तम. ६ उपासनेचा मार्ग. ७ राखण.८ कौतुक. ९ संकोच, दुष्काळ. १० ओघीं, क्रमोद्गत. ११ लक्ष्मीसह. १२ जें सुख आत्मत्वावांचून होतें तें दिलें नाहीं. १३ यास्तव, इतके. १४ आत्मा जो मी त्या माझा भाव=भक्ति. १५ व्यर्थ. १६ कापुराची, कापसाची. १७ समुदाय.१८ पलीकडे. १९ शांत झालों. २० संसाररूप केर. २१ जठराग्नीहून निराळा, जन्मापासून मुक्त. २२ हवेंतसें.

उजवण जाहाली । माझिया दैवा दशा उदयली । जे वाक्यकृपा लाधली । दैविकेनि मुखें ॥ ४७ ॥ आतां येणें वचनतेजाकारें । फिटलें आंतील बाहेरील आंधारें । ह्मणोनि देखतसें साचोकारें । स्वरूप तुझें ॥ ४८ ॥

अर्जुन उवाच–परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ।
पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥ १२ ॥

[अर्जुन उवाच–परं ब्रह्मेति] तरि होसी गा तूं परब्रह्म । जें या महाभूतां विसवतें धाम । पवित्र तूं परम । जगन्नाथा॥४९॥ तूं परमदैवत तिहीं देवां । [पुरुषमिति] तूं पुरुष जी पंचविरहित । दिव्य तूं प्रकृतिभावा । पैलीकडील ॥ १५० ॥ अनादिसिद्ध तूं स्वामी । जो न लिजसी जन्मधर्मा । तो तूं हें आह्मी । जाणितलें आतां ॥ ५१ ॥ तूं या *कालयंत्रासि सूत्री । तूं जीवकळेची अधिष्ठात्री । तूं ब्रह्मकटाहधात्री । हें कळलें फुडें ॥ ५२ ॥

आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ।
असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ॥ १३ ॥

[आहुस्त्वामृषयः सर्वे] पैं आणीकही एकेपरी । इये प्रतीतीची येतसे थोरी । जे मागें ऐसेंचि ऋषीश्वरीं । सांगीतलें तूतें ॥ ५३ ॥ [स्वयं चैव ब्रवीषि मे] परि तया सांगितलियाचें साचपण । हें आतां माझें देखतसे अंतःकरण । जे कृपा केली आपण । ह्मणोनि देवा ॥ ५४ ॥ [देवर्षिर्नारदस्तथा] येऱ्हवीं नारद अखंड जवळां ये । तोही ऐसेंचि वचनीं गाये । परि अर्थ न बुजोनि ठाये । गीतसुखचि ऐकों ॥ ५५ ॥ जी आंधळेयाच्या गांवीं । आपणपें प्रगटले रवी । तरि तिहीं वोतपलीचि घ्यावी । वांचूनि प्रकाश कैंचा ॥ ५६ ॥ †परि देवर्षी अध्यात्म गातां । आंहिंच रागांगेंसी जे मधुरता । तेचि फावे येर चित्ता । नलगेचि कांहीं ॥ ५७ ॥ [असितो देवलो व्यासः] पैं असिता देवलाचेनि मुखें । मी ‡एवंविधा तूतें आइकें । परि तैं बुद्धी विषयविखें । धोरिली होती ॥ ५८ ॥ विषयविषाचा पडिपाडु । गोड परमार्थ लागे कडू । कडु विषय तो गोडु । जीवासि जाहाला ॥ ५९ ॥ आणि हें आणिकांचें काय सांगावें । रोंडळा आपणचि येऊनि व्यासदेवें । तुझें स्वरूप आघवें । सर्वदां सांगिजे ॥ १६० ॥ परि तो आंधारीं चिंतामणी देखिला । जेविं नव्हे या बुद्धी उपेक्षिला । पाठीं दिनोदयीं वोळखिला । होय ह्मणोनि

* कालत्रयासि. † एऱ्हवीं देवर्षी. ‡ एवं विविधा.

१ साफल्य. २ श्रीकृष्णमुखें. ३ यथार्थ, सत्यतेनें. ४ विश्रांतिस्थान. ५ ब्रह्मा, विष्णु, महेश यांस. ६ मायेच्या. ७ आकर्षला जात नाहींस. ८ कालरूप यंत्राचा चालक. ९ मुख्य देवता. १० ब्रह्मांडास आश्रयभूत. ११ स्पष्ट. १२ राहे. १३ कोवळें ऊन. १४ वरवरच. १५ यामकारचा. १६ व्यापिली. १७ थोरी. १८ घरीं.

॥ ६१ ॥ तैसीं व्यासादिकांचीं बोलणीं । *तिया मजपाशीं चिद्रत्नाचिया खाणी । परि उपेक्षिल्या जात होतिया तरणी । तुजवीण कृष्णा ॥ ६२ ॥

सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव ।
न हि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः ॥ १४ ॥

[सर्वमेतदृतं मन्ये] ते आतां वाक्यसूर्यकरें तुझे फांकले । आणि ऋषींनीं मार्ग होते जे कथिले । तयां आघवयांचेंचि फिटलें । अनोळखपण ॥ ६३ ॥ जी ज्ञानाचें बीज तंव तयांचे बोल । माजि हृदयभूमिके पडिले सैंखोल । वरि इये कृपेची जाहाली वोल । ह्मणोनि †संवादफळ ॥ ६४ ॥ ‡अहो नारदादिकां सतां । त्यांचिया उक्तिरूप सरितां । मी महोदधी जाहालों अनंता । संवादसुखाचा ॥ ६५ ॥ प्रभु आघवेनि येणें जन्में । जियें पुण्यें केलीं मियां उत्तमें । तयांचीं न टंकतीचि अंगीं कामें । सद्गुरु तुवां ॥ ६६ ॥ [यन्मां वदसि केशव] येन्हवीं वडिलवडिलांचेनि मुखें । मी सदां तुतें कानीं आइकें । परि कृपा न कीजेचि तुवां एकें । तंव नेणवेचि कांहीं ॥ ६७ ॥ ह्मणोनि भाग्य जैं सानुकूळ । जालिया केले उद्यम सदां सफळ । तैसें श्रुताधीत सकळ । गुरुकृपा साच ॥६८॥ जी बनकर झाडें सिंपी जीवें साटी । पाडूनि जन्में काढी आटी । परि फळेंसीं तैंचि भेटी । जैं वसंत पावे ॥ ६९ ॥ अहो विषमा जैं वोहट पडे । तैं मधुर तें मधुर आंवडे । पैं रसायन तैं गोडें । जैं आरोग्य देहीं ॥ १७० ॥ कां इंद्रियें वाचा प्राण । यां जालियांचें तैंचि सार्थकपण । जैं चैतन्य येऊनि आपण । संचरे माजी ॥ ७१ ॥ तैसें शब्दजात आलोडिलें । अथवा योगादिक जें अभ्यासिलें । तें तैंचि ह्मणोंये आपुलें । जैं सानुकूळ श्रीगुरु ॥ ७२ ॥ ऐसिये जालिये प्रतीतीचेनि माजें । अर्जुन निश्चयाचीं नाचतुसे भोजें । तेवींचि ह्मणे देवा तुझें । वाक्य मज मानलें ॥ ७३ ॥ [नहि ते भगवन्निति] तरि साचचि हें कैवल्यपती । मज त्रिशुद्धि आली प्रतीती । जे तूं देवां दानवांचिये मती । जोगा नव्हसी ॥ ७४ ॥ तुझें वाक्य व्यक्ती न येतां देवा । जो आपुलिया जाणे जाणिवा । §तो कहींचि नोहे हें सद्भावा । भरंवसेनि आलें ॥ ७५ ॥

---

* तियापासीं. † संवाद फळेंसीं उठिलें. ‡ श्रीकृष्णवाक्यसंवादें । फुलें आलीं मकरंदें । तें फळ जी विनोदें । दिधलें मज ॥ ६५ ॥. § तैसा.

---

१ तूं जो प्रकाशक सूर्य त्या तुजवांचून. २ किरण. ३ गूढ. ४ संवाद फळ आलें. ५ नदी. ६ जीं जीं. ७ रहात नाहींत. ८ ऐकिलेलें व अध्ययन केलेलें. ९ गुरुकृपेनें. १० बनकर=माळी जीवें साटी=आपल्या जीवास धोक्यांत घालून सुद्धां झाडांशीं जन्मानें आटी काढी=मेहनत करतो. ११ छाटतो. १२ श्रम. १३ विषमज्वर निघून गेला म्हणजे गोड पदार्थ गोड लागतात. आणि रसायन कडू असतांही ज्यापेक्षां तें आरोग्य करितें त्यापेक्षां तेंही गोड मानितो. १४ वेदशास्त्रादि. १५ अभ्यासिलें. १६ संतोषानें. १७ मुक्तिदाता श्रीकृष्ण. १८ मतीनें जाणण्याजोगा. १९ आकृतीस, अनुभवास. २० ज्ञानानें.

स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम ।
भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ॥ १५ ॥

[स्वयमेवात्मनात्मानमिति] एथ आपुलें [१]वाडपण जैसें । आपणचि जाणिजे आकाशें । कां मी येतुली घनवट ऐसें । पृथ्वीचि जाणे ॥ ७६ ॥ तैसा आपुलिये सर्वशक्ती । तुज तूंचि जाणसी लक्ष्मीपती । येर वेदादिक मती । मिरवती वायां ॥ ७७ ॥ हां गा मनातें मागां सांडावें । पवनातें [२]वांवीं मवावें । [३]आदिशून्य उतरोनि जावें । केउतें [४]बाहीं ॥ ७८ ॥ तैसें हें तुझें जाणणें आहे । ह्मणोनि कोणाही *ठावकें नोहे । आतां तुझें ज्ञान होय । तुजचि जोगें ॥ ७९ ॥ जी आपणयातें तूंचि जाणसी । आणिकांतें सांगावयाही समर्थ होसी । तरि आतां एकवेळ घाम पुसीं । [५]आर्तीचिये [६]निंडळींचा ॥ १८० ॥ [भूतभावनेति] हें आइकिलें कीं [७]भूतभावना । भवगजपंचानना । सकळदेवदेवतार्चना । जगन्नायका ॥ ८१ ॥ जरी थोरी तुझी पाहत आहों । तरी [८]पैसीं उभे ठाकावयाही योग्य नोहों । या †[९]शोच्यता [१०]जरी विनवूं [११]बिहों । तरी आन उपाय नाहीं ॥ ८२ ॥ भरले समुद्र सरिता चहूंकडे । तरि तें [१२]बापियासि कोरडें । कां जैं [१३]मेघौनि थेंबुटा पडे । तैं पाणि कीं तया ॥ ८३ ॥ तैसें श्रीगुरु सर्वत्र [१४]आंथि । परि कृष्णा आह्मां तूंचि गती । हें असो मजप्रती । विभूति सांगें ॥ ८४ ॥

वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ।
याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥ १६ ॥

[वक्तुमर्हसीति] जी तुझिया विभूती आघविया । परि व्यापिती शक्ति दिव्या जिया । तिया आपुलिया दावाविया । आपण मज ॥८५॥ [याभिर्विभूतिभिरिति] जिहीं विभूती ययां समस्तां । लोकांतें व्यापूनि [१५]आंहासी अनंता । तिया [१६]प्रधाना नामांकिता । प्रगटा करीं ॥ ८६ ॥

कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिंतयन् ।
केषु केषु च भावेषु चिंत्योऽसि भगवन्मया ॥ १७ ॥

[कथमिति] जी कैसें मियां तुतें जाणावें । काय जाणोनि सदां चिंतावें । जरी तूंचि ह्मणों आघवें । तरि चिंतनचि न घडे ॥ ८७ ॥ ह्मणोनि [१७]मागां [१८]भाव जैसे । आपुले सांगीतले तुवां [१९]उद्देशें । आतां विस्तारोनि तैसें । एकवेळ बोलें

---

* ठाकतें (पार लागण्याजोगें). † शोचतां.

---

१ मोठेपणा.२ इतकी निबिड भरलेली.३ वांवेनें मोजावें. ४ माया, अव्यक्त.५ वाहूंनीं. ६ आवडीचे. ७ कपाळाचा. ८ जग उत्पन्न करणारा. ९ जवळ. १० दीनतेनें, या संकटानें. ११ भिऊं. १२ चातकास. १३ मेघांतून थेंब. १४ आहे. १५ आहेस. १६ श्रेष्ठ, मुख्य. १७ अ० ७ श्लो. ८ यांत 'रसोऽहमप्सु कौंतेय' इत्यादि चार श्लोकांनीं. १८ पदार्थ, विभूति. १९ या १० व्या अध्यायाच्या 'बुद्धिर्ज्ञानमसंमोहः' इत्यादि श्लो. ४ पासून तीन श्लोकांनीं संक्षेपानें.

॥ ८८ ॥ [केषु केष्विति] जया जया भावाचिया ठायीं । तुतें चिंतितां मज सायास नाहीं । तो विवेक करूनि देईं । योग आपुला ॥ ८९ ॥

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन ।
भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥ १८ ॥

आणि पुसलिया जिया विभूती । [विस्तरेणात्मनो योगं विभूतिं चेति] त्याही बोलाविया भूपती । एथ ह्मणसी जरी पुढती । काय सांगों ॥ १९० ॥ तरी हा भाव मना । झेणें जाय हो जनार्दना । पैं प्राकृताही अमृतपाना । ना न ह्मणवे जेविं ॥ ९१ ॥ जें काळकूटाचें सहोदर । हें मृत्युभेणें प्याले अमर । तरि *देहाचे पुरंदर । चौदा जाती ॥ ९२ ॥ ऐसा कवण एक क्षीराब्धीचा रस । जयां वायांचि अमृतपणाचा आभास । तयाचाही मिठांश । जे पुरे ह्मणों नेदी ॥ ९३ ॥ तया पांबळयाहि येतुलेवरी । गोडियेची आथि थोरी । [अमृतं] मग हें तंव अवधारीं । परमामृत साचें ॥ ९४ ॥ जें मंदराचळ न ढाळितां । क्षीरसागर न ढहुळतां । अनादि स्वभावता । आइतें आहे ॥ ९५ ॥ †जें स्ववेना द्रवे नव्हे बद्ध । जेथ नेणिजती रस गंध । ‡जें भलतयाही सिद्ध । आठवलेंचि फावे ॥ ९६ ॥ [शृण्वतः] जयाची गोठीचि ऐकतखेंवो । आघवा संसार होय वावो । बळियां नित्यता लागे येवों । आपणपेयां ॥ ९७ ॥ जन्ममृत्यूची §भाख । हारपोनि जाय ¶निःशेख । आंत बाहेरि महासुख । वाढोंचि लागे ॥ ९८ ॥ [तृप्तिः] मग दैवगत्या जरी सेविजे । तरि तें आपणचि होऊनि ठाकिजे । [मे] तें तुज देतां चित्त माझें । [नास्ति] पुरे ह्मणों न शके ॥ ९९ ॥ तंव तुझें नामचि आह्मां आवडे । वरि भेटी होय आणि जेंवळिक जोडे । पाठीं गोठी सांगसी सुरेवाडें । आनंदाचेनी ॥ २०० ॥ आतां हें सुख कायिसयासारिखें । कांहीं निर्वचेना मज परितोखें । [भूयः कथय] तरी येतुलें जाणें जे येणें मुखें । पुनरुक्तही हो ॥ १ ॥ हां गा सूर्य काय शिळा । अग्नि ह्मणों येत आहे वोंविळा । कां नित्य वाहतया गंगाजळा । पारसेपण असे ॥ २ ॥ $तुवां स्वमुखें जें बोलिलें । हें आह्मी नाठादासि रूप देखिलें । आजि चंदनतरूचीं फुलें । तुरंबीत आहों मां ॥ ३ ॥ तया पार्थाचिया बोला । सर्वांगें श्रीकृष्ण डोलला । ह्मणे भक्तिज्ञानासि जाहाला । ओगर हा ॥ ४ ॥

---

* दिहाचे. † जें श्रवणाद्रवा नव्हे. ‡ जे भजले. § भाष. ¶ निःशेष. $ जी तुह्मी स्वमुखें, जी तुह्मी आणिक यावरी.

---

१ निर्मळ, स्पष्ट. २ कदाचित्. ३ लहानास, जगांतील साधारण जें अमृतपान तेंही पुरे असें वाटत नाहीं. ४ बंधु, अमृत. ५ दिवसाचे. ६ इंद्र. ७ तुच्छालाही, नाशवंतालाही. ८ न घुसळतां. ९ प्राप्त होतें. १० ऐकतांक्षणीं. ११ मिथ्या. १२ बळकट. १३ वार्ता. १४ सहवास. १५ आनंदानें, आधिक्यानें. १६ बोलवेना. १७ संतोषानें. १८ पुनः बोललेलें होईल. १९ ध्वनीला. २० हुंगीत. २१ मळा, स्थान.

ऐसा पतिकराचिया तोषाआंत । प्रेमाचा *ओघ उचंबळत । सायासें सांवरूनि अनंत । काय बोले ॥ ५ ॥

श्रीभगवानुवाच—हंत ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः । अ.
प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यंतो विस्तरस्य मे ॥ १९ ॥

[श्रीभगवानुवाच—हंत] मी पितामहाचा पिता । हें आठवितांही नाठवे चित्ता । कीं ह्मणतसे बा पांडुसुता । भलें केलें ॥ ६ ॥ अर्जुनातें बा ह्मणे एथ कांहीं । आह्मा विस्मो करावया कारण नाहीं । आंगें तो लेंकरूं काई । नव्हेचि नंदाचें ॥ ७ ॥ परि प्रस्तुत ऐसें असो । हें करवी आवडीचा अतिसो । [ति कथयिष्यामि] मग ह्मणे आइकें सांगतसों । धनुर्धरा ॥ ८ ॥ तरि तुवां पुसलिया विभूती । [नास्त्यंतो विस्तरस्य मे] तयांचें अपारपण सुभद्रापती । जे माझियाचि परी माझिये मती । आकळती ना ॥ ९ ॥ आंगींचिया रोमा किती । जयाचिया तयासि न गणवती । [दिव्या ह्यात्मविभूतयः] तैसिया माझिया विभूती । असंख्य मज ॥ २१० ॥ येरवीं तरी मी कैसा केवढा । ह्मणोनि आपणपयांही नव्हेचि कुडा । [प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ] यालागीं प्रधाना जिया नामीं रूढा । तिया विभूती आइकें ॥ ११ ॥ जिया जाणितलिया साठीं । आघविया जाणवतील किरीटी । जैसें बीज आलिया मुठी । तरूचि आला होय ॥ १२ ॥ कां उद्यान हाता चढिंनलें । तरि अपैसीं सांपडलीं फळें फुलें । तेविं देखिलिया जिया देखवलें । विश्व सकळ ॥ १३ ॥ येन्हवीं साचचि गा धनुर्धरा । नाहीं शेवट माझिया विस्तारा । पैं गगनाऐशिया अपारा । मनमाजि †असणें ॥ १४ ॥

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।
अहमादिश्च मध्यं च भूतानामंत एव च ॥ २० ॥

[अहमात्मेति] आइकें कुटिलालकमस्तका । धनुर्वेदत्र्यंबका । मी आत्मा असें एकैकां । भूतमात्राच्या ठायीं ॥ १५ ॥ आंतुलीकडे मीचि यांचे अंतःकरणीं । भूतां बाहेरी माझीचि गंवसणी । [अहमादिश्चेति] आदि मी निर्वाणीं । मध्यही मीचि ॥ १६ ॥ जैसें ‡मेघांयां तळींवरी । एक आकाशचि आंत बाहेरी । आणि आकाशींचि जाले अवधारीं । असणेंही आकाशीं ॥ १७ ॥ पाठीं लया जे वेळीं जाती । ते वेळीं आकाशचि होऊनि ठाती । तेविं आदि स्थिती §अंतगती । भूतांसि मी ॥ १८ ॥ ऐसें बहुवस आणि व्यापकपण ।

* वेग. † लपणें. ‡ मेघांतें यां. § जाती.

१ अनुभवाच्या. २ ब्रह्मदेवाचा. ३ आश्चर्य. ४ नंदाचें शिशुत्व पत्करणाराला अर्जुनाचें महत्व आश्चर्यकारक नव्हे. ५ आधिक्य. ६ प्रकट. ७ मुख्य. ८ असतां. ९ बाग. १० एवढें गगनही माझ्यांत सांटवतें. ११ काळे कुरळे केश मस्तकीं धारण करणाऱ्या. १२ धनुर्विद्येविषयीं शिवच. १३ आच्छादन. १४ खालींवर. १५ राहतात. १६ उत्पत्ति, स्थिति व नाश.

*माझें विभूतीयोगें जाण । तरी जीवेंचि करूनि श्रवण । †आइकोनि आइक ॥ १९ ॥ याहीवर त्या विभूती । सांगणें ठेलें ‡सुभद्रापती । सांगेन ह्मणितलें §तुजप्रती । त्या प्रधाना आइकें ॥ २२० ॥

आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ।
मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ॥ २१ ॥

हें बोलोनि तो कृपावंत । ह्मणे [आदित्यानामहं विष्णुः] विष्णु मी आदित्यांत । [ज्योतिषां रविरंशुमान्] रवी मी रश्मिवंत । सुप्रभांमाजी ॥ २१ ॥ [मरीचिर्मरुतामस्मि] मरुद्गणांच्या वर्गीं । मरीचि ह्मणे मी शार्ङ्गी । [नक्षत्राणामहं शशी] चंद्र मी गगनरंगीं । तारांमाजी ॥ २२ ॥

वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः ।
इंद्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ॥ २२ ॥

[वेदानामिति] वेदा आंत सामवेदु । तो मी ह्मणे गोविंदु । देवांमाजि जगद्बंधु । महेंद्र तो मी ॥ २३ ॥ [इंद्रियाणामिति] इंद्रियांमाजि अकरावें । मन तें मी हें जाणावें । भूतांमाजि स्वभावें । चेतना ते मी ॥ २४ ॥

रुद्राणां शंकरश्चाऽस्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ।
वसूनां पावकश्चाऽस्मि मेरुः शिखरिणामहम् ॥ २३ ॥

[रुद्राणामिति] अशेषांही रुद्रांमाझारी । शंकर जो मदनारी । तो मी येथ न धरीं । भ्रांति कांहीं ॥ २५ ॥ यक्षरक्षोगणांआंत । शंभूचा सखा जो धनवंत । तो कुबेर मी हें अनंत । ह्मणता जाहाला ॥ २६ ॥ [वसूनामिति] मग आठांही वसूंमाझारीं । पावक तो मी अवधारीं । शिखराधिलियां सर्वोपरी । मेरु तो मी ॥ २७ ॥

पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ।
सेनानीनामहं स्कंदः सरसामस्मि सागरः ॥ २४ ॥
महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् ।
यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ॥ २५ ॥

[पुरोधसामिति] जो स्वर्गसिंहासना सावावो । ¶सर्वज्ञते आदिचा ठावो । तो पुरोहितांमाजि रावो । बृहस्पती मी ॥ २८ ॥ [सिनानीनामिति] त्रिभुव-

* माझा विभूतियोग. † आइकणें. ‡ तुजप्रती. § निगुती. ¶ सर्वज्ञतेचा आदि ठावो.

१ श्रवणरूप जीव करून. २ देवांत. ३ किरणवान्. ४ शार्ङ्गनांवाचें धनुष्य धारण करणारा श्रीकृष्ण. ५ इंद्र. ६ जीवकला. ७ शिखरें आहेत अशा पर्वतांत. ८ सहाय, सचिव.

नींचिया सेनापती । आंत स्कंध तो मी महामती । जो हरवीर्यें अग्निसंगती । कृत्तिकांत जाहाला ॥ २९ ॥ सकळिकां सरोवरांसी । *माजि समुद्र तो मी जळराशी । [महर्षिणामिति] महर्षीआंत तपोराशी । भृगु तो मी ॥ २३० ॥ अशेषांही वाचा । माजी नटनाच सत्याचा । तें अक्षर एक मी वैकुंठींचा । वेल्हाळ ह्मणे ॥ ३१ ॥ [यज्ञानामिति] समस्तांही यज्ञांच्यापैकीं । जपयज्ञ तो मी ये लोकीं । जो कर्मत्यागें प्रेणवादिकीं । निपजविजे ॥ ३२ ॥ नामजपयज्ञ तो परम । बाधूं न शके स्नानादि कर्म । नामें पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म †वेदार्थीं ॥ ३३ ॥ स्थावरां गिरीआंत । ‡पुण्यपूज्य जो हिमवंत । तो मी ह्मणे कांत । लक्ष्मियेचा ॥ ३४ ॥

अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ।
गंधर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ॥ २६ ॥
उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ।
ऐरावतं गजेंद्राणां नराणां च नराधिपम् ॥ २७ ॥

[अश्वत्थ इति] कल्पद्रुम हेंन पारिजात । गुणें चंदनही वाड विख्यात । तरि ययां वृक्षजातां आंत । अश्वत्थ तो मी ॥ ३५ ॥ देवऋषीआंत पांडवा । नारद तो मी जाणावा । [गंधर्वाणामिति] चित्ररथ मी गंधर्वी । सकळिकांमाजी ॥ ३६ ॥ ययां अशेषांही सिद्धां । माजि कपिलाचार्य मी प्रबुद्धा । [उच्चैःश्रवसमिति] तुरंगजातां प्रसिद्धां । आंत उच्चैःश्रवा मी ॥ ३७ ॥ [ऐरावतमिति] राज्यभूषणां गजांआंत । अर्जुना मी गा ऐरावत । पयोराशि सुरमथित । §वियाला तो मी ॥ ३८ ॥ ययां नरांमाजि राजा । तो विभूतिविशेष माझा । जयातें सकळ लोक प्रजा । होऊनि सेविती ॥ ३९ ॥

आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ।
प्रजनश्चाऽस्मि कंदर्पः सर्पाणामस्मि वासुकिः ॥ २८ ॥
अनंतश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ।
पितॄणामर्यमा चाऽस्मि यमः संयमतामहम् ॥ २९ ॥

[आयुधानामिति] पैं आघवेया हतियेरां । आंत वज्र तें मी धनुर्धरा । जें शतमखोत्तीर्णकरा । आरूढोनि असे ॥ २४० ॥ धेनूंमध्यें कामधेनु । ते मी ह्मणे विष्वक्सेनु । [प्रजन इति] जन्मवितया आंत मदनु । तो मी जाणें

* माझारीं. † वेदार्थें. ‡ पुण्यपुंज. § अमृतांश तो मी.

१ कार्तिकस्वामी. २ नटासारखें नृत्य. ३ विलासी. ४ ओंकारादिकांनीं. ५ पर्वतांमध्यें. ६ आणि. ७ मोठा. ८ ज्ञानवंता. ९ सर्व घोड्यांत. १० इंद्राचा घोडा. ११ समुद्र. १२ शंभर यज्ञ करून उत्तीर्ण झालेल्या इंद्राच्या हातास. १३ श्रीकृष्ण.

॥ ४१ ॥ [अनंत इति] सर्पकुळाआंत अधिष्ठाता । वासुकी मी कुंतीसुता । नागांमाजि समस्तां । अनंत तो मी ॥ ४२ ॥ अगा यादसांआंतु । जो पश्चिमप्रमदेचा कांत । तो वरुण मी हें अनंत । सांगत असे ॥ ४३ ॥ पितृणामिति] आणि पितृगणां समस्तां । माजि अर्यमा जो पितृदेवता । तो मी हें तत्त्वता । बोलत आहे ॥ ४४ ॥ जगाचीं शुभाशुभें लिहिती । प्राणियांच्या मानसाचा झाडा घेती । मग केलियानुरूप होती । भोगनियम जे ॥ ४५ ॥ तयां नियमितयांमाजि यम । जो कर्मसाक्षी धर्म । तो मी ह्मणे आत्माराम । रमापती ॥ ४६ ॥

प्रह्लादश्चाऽस्मि दैत्यानां कालः कलयतामहम् ।
मृगाणां च मृगेंद्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥ ३० ॥

[प्रह्लाद इति] अगा दैत्यांचिया कुळीं । प्रल्हाद तो मी न्यहाळीं । ह्मणोनि दैत्यभावादिमेळीं । लिंपेचिना ॥ ४७ ॥ पैं कळितयांमाजि महाकाळ । तो मी ह्मणे गोपाळ । [मृगाणामिति] श्वापदांमाजि शार्दूळ । तो मी जाण ॥ ४८ ॥ पक्षिजातीमाझारीं । गरुड तो मी अवधारीं । यालागीं जो पाठीवरी । वाहों शके मातें ॥ ४९ ॥

पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् ।
झषाणां मकरश्चाऽस्मि स्रोतसामस्मि जाह्नवी ॥ ३१ ॥

[पवन इति] पृथ्वीचिया पैसारा । माजि घडी न लगतां धनुर्धरा । एकेचि उड्डाणें सातांही सागरां । प्रदक्षिणा *कीजे ॥ २५० ॥ तयां वेहिलियां गतिमंतां । आंत पवन तो मी पांडुसुता । शस्त्रधरां समस्तां । माजि श्रीराम तो मी ॥ ५१ ॥ जेणें सांकडलिया धर्माचे कैवारें । आपणपयां धनुष्य करूनि दुसरें । विजयलक्ष्मीये एक मोहरें । केलें त्रेतीं ॥ ५२ ॥ [झषाणामिति] पाठीं उभें ठाकूनि सुवेळीं । प्रतापलंकेश्वराच्या सिसाळीं । गगनीं उदो ह्मणतया हस्तबळी । दिधली भूतां ॥ ५३ ॥ जेणें देवांचा मान गिंवसिला । धर्मासि जीर्णोद्धार केला । सूर्यवंशीं उदेला । सूर्य जो कां ॥ ५४ ॥ तो हातियेरपराजितयाआंत । रामचंद्र मी †रमाकांत । मकर मी पुच्छवंत । जळचरांमाजी ॥ ५५ ॥ [स्रोतसामस्मि जाह्नवी] पैं समस्तांही वोघां- । मध्यें जे भगीरथें ‡आणितां गंगा । जन्हूनें गिळिली मग जंघा । फाडूनि दिधली ॥ ५६ ॥ ते §त्रि-

* करी जो. †सीताकांत. ‡ आणिली. § त्रिभुवनैकतारिणी सरिता.

१ जलचरांत. २ पश्चिम दिशेचा. ३ शासन करणारांत. ४ दैत्यस्वभावानें. ५ लिप्त होत नाहीं. ६ हरण करणारांत. ७ वायु. ८ विस्तारा. ९ सर्व वेगवानांत. १० वारा. ११ संकटांत पडलेल्या धर्माच्या पक्षानें. १२ मागें, लक्षानें. १३ मस्तकपंक्तीनें हातवळी दिधली. १४ प्रकटलेला. १५ शस्त्र धारण करणारांत.

भुवनैकसरिता । जान्हवी मी पांडुसुता । जळप्रवाहां समस्तां । माझारी जाणें ॥ ५७ ॥ ऐसेनि वेगळालां सृष्टिपैकीं । विभूती नाम ठेवितां एकेकीं । सेंगळेन जन्मसहस्रें अवलोकीं । अर्ध्या नव्हती ॥ ५८ ॥

सर्गाणामादिरंतश्च मध्यं चैवाऽहमर्जुन ।
अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ॥ ३२ ॥
अक्षराणामकारोऽस्मि द्वंद्वः सामासिकस्य च ।
अहमेवाक्षयः कालो धाताऽहं विश्वतोमुखः ॥ ३३ ॥

[अहं विश्वतोमुखः] जैसीं अवघींचि नक्षत्रें वेंचावीं । ऐसी चौड उपजेल जैं जीवीं । तैं गगनाची बांधावी । लोथ जेवीं ॥ ५९ ॥ कां पृथ्वीये परमाणूचा उगाणा घ्यावा । तरि भूगोलचि काखे सुवावा । तैसा विस्तार माझा पाहावा । तरि जाणावें मातें ॥ २६० ॥ जैसें शाखांसी फूल फळ । एकीहेळा वेटाळूं ह्मणिजे सकळ । तरी उपडूनियां मूळ । जेविं हातीं घेपे ॥ ६१ ॥ तेवीं माझे विभूतिविशेष । जरी जाणों *पाहिजेती अशेष । तरी स्वरूप एक निर्दोष । जाणिजे माझें ॥ ६२ ॥ येऱ्हवीं वेगळालिया विभूती । †कायिएक परिससी किती । ह्मणोनि एकीहेळां महामती । सर्व मी जाण ॥ ६३ ॥ [सर्गाणामिति] मी आघवियेचि सृष्टी । आदि ‡मध्यांतीं किरीटी । वोतप्रोत पटीं । तंतु जेविं ॥ ६४ ॥ ऐसिया व्यापका §मातें जैं जाणावें । तैं विभूतिभेदें काय करावें । परि हे तुझी योग्यता नव्हे । ह्मणोनि असो ॥ ६५ ॥ कां जे तुवां पुसिलिया विभूती । ह्मणोनि तिया आईक सुभद्रापती । [अध्यात्मेति] तरि विद्यांमाजि प्रस्तुती । अध्यात्मविद्या ते मी ॥ ६६ ॥ अगा बोलतयांचिया ठायीं । वाद तो मी पाहीं । जो सकळशास्त्रसंमतें कहीं । सरेचिना ॥ ६७ ॥ जो निर्वचूं जातां वाढे । आईकतयां ¶उत्प्रेक्षा सळ चढे । जयावरी बोलतियांची $गोडें । बोलणीं होती ॥ ६८ ॥ ऐसा प्रतिपादनामाजि वाद । तो मी ह्मणे गोविंद । [अक्षराणामिति] अक्षरांमाजि विशद । अकार तो मी ॥ ६९ ॥ पैं गा समासांमाझारीं । द्वंद्व तो मी अवधारीं । [अहमेवाक्षयः कालः] मशकालागोनि ब्रह्मादेवीं । ग्रासिता तो मी ॥ २७० ॥ मेरुमंदरादिकीं सर्वीं । सहित पृथ्वीतें विरवी । जो एकाणवातेंही जिरवी । जेथिंचा तेथें ॥ ७१ ॥ जो प्रळयतेजा देत मिठी । सगळिया पवनातें गिळी किरीटी । आकाश जयाचिया पोटीं । सामा-

* पाहिजती. † कांहीं एक. ‡ मध्यांत. § मातें जाणावें. ¶ उत्प्रेक्षा सकळ, सवळ. $ गाढें.

१ त्रैलोक्यांतील मुख्य नदी. २ सगळ्या. ३ इच्छा. ४ मोट. ५ झाडा. ६ घालावा. ७ एकवेळेस गुंडाळूं. ८ घ्यावें. ९ कालत्रयीं. १० उभा अडवा व्याप्त.११ वेदांत. १२ निश्चय करतां. १३ तर्कास बळ. १४ माशीपासून तों ब्रह्मदेवापर्यंत. १५ थिरघळवी, नाशी. १६ प्रलयीं समुद्रमय झालेल्या जगास.

वलें ॥ ७२ ॥ ऐसा अपार जो काळ । तो मी ह्मणे लक्ष्मीलीळ । [उद्भवश्च भविष्यतां] मग पुढती सृष्टीचा मेळ । सृजिता तो मी ॥ ७३ ॥

मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् ।
कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ॥ ३४ ॥

[धाता श्लो० ३३, उद्भवश्च भविष्यतां] आणि सृजिलिया भूतांतें मीचि धरीं । सकळां जीवनही मीचि अवधारीं । [मृत्युः सर्वहरश्चाहं] शेखीं सर्वांतें या संहारीं । तेव्हां मृत्युही मीचि ॥ ७४ ॥ [कीर्तिरिति] आतां स्त्रीगणाच्या पैकीं । माझिया विभूती सात आणिकी । तिया ऐक कवतिकीं । सांगिजतील ॥७५॥ तरी नित्य नवी जे कीर्ती । अर्जुना ते माझी मूर्ती । आणि औदार्यैसीं जे संपत्ती । तेही मीचि जाणें ॥ ७६ ॥ आणि ते गा मी वाचा । जे सुखासनीं न्यायाच्या । आरूढोनि विवेकाच्या । मार्गीं चाले ॥ ७७ ॥ देखिलेनि पदार्थें । जे आठवूनि दे मातें । ते स्मृतिही एथें । त्रिशुद्धी मी ॥ ७८ ॥ पैं स्वहिता *अनपायिनी । मेधा ते गा मी इये जनीं । धृती मी त्रिभुवनीं । क्षमा ते मी ॥ ७९ ॥ एवं नारीमाझारीं । या सातही शक्ति मी अवधारीं । ऐसें संसारगजकेसरी । ह्मणता जाहाला ॥ २८० ॥

बृहत्साम तथा साम्नां गायत्री छंदसामहम् ।
मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ॥ ३५ ॥

[बृहत्सामेति] वेदराशीचिया सामा । आंत बहत्साम जें प्रियोत्तमा । तें मी ह्मणे रमा- । प्राणेश्वर ॥ ८१ ॥ गायत्रीछंद जें ह्मणिजे । तें सकळां छंदांमाजि माझें । स्वरूप हें जाणिजे । निभ्रांत तुवां ॥ ८२ ॥ [मासानामिति] मासांआंत मार्गशिर । तो मी ह्मणे शार्ङ्गधर । ऋतूंमाजि कुसुमाकर । वसंत तो मी ॥८३॥

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।
जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्वं सत्ववतामहम् ॥ ३६ ॥
वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पांडवानां धनंजयः ।
मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ॥ ३७ ॥

[द्यूतमिति] छळितयां विंदाणा- । माजि जूं तें मी विचक्षणा । ह्मणोनि चोहटां चोरी परि कवणा । निवारूं नये ॥ ८४ ॥ अगा अशेषांही तेजसां । आंत तेज तें मी भरंवसा । [जयोऽस्मीति] विजयो मी कार्योद्देशां । सकळांमाजी

* अनुयायिनी.

१ लक्ष्मीशीं लीला करणारा श्रीकृष्ण. २ उत्पन्नकर्ता. ३ स्मरणशक्ति. ४ अपाय न करणारी. ५ बुद्धी, धारणाशक्ति. ६ धैर्य. ७ संसाररूप हत्तीला सिंह=कृष्ण. ८ सर्व वेदांमधील. ९ पुष्पांची खाण. १० प्रकारांत. ११ चवाट्यास.

॥ ८५ ॥ जेणें चोखाळत[1] दिसे न्याय । तो व्यवसायांत[2] व्यवसाय[3] । माझें स्वरूप हें राय । सुरांचा ह्मणे ॥ ८६ ॥ सत्वाथिलियांआंत[4] । सत्व मी ह्मणे अनंत । [वृष्णीनामिति] यादवांमाजि श्रीमंत[5] । तोचि तो मी ॥ ८७ ॥ जो देवकी वसुदेवास्तव *जाहाला[6] । कुमारीसाठीं गोकुळीं †गेला[7] । तो मी प्राणासकट ‡पियाला[8] । पूतनेतें ॥ ८८ ॥ नुघडतां बाळपणाची फुली[9] । जेणें मिया अदानवी[10] सृष्टि केली । करीं गिरि धरूनि डोंमाणिली[11] । महेंद्रमहिमा ॥ ८९ ॥ कालिंदीचें[12] हृदयशल्य फेडिलें । जेणें मियां जळत गोकुळ राखिलें । वासरुवांसाठीं लाविलें । विरंचीस[13] पिसें ॥ २९० ॥ प्रथमदशेचिये[14] पहांटे- । माजि कंसाऐशीं अचाटें । महाधेंडीं अवचटें । लीळांचि[15] नासिलीं ॥ ९१ ॥ हें काय किती एक सांगावें । तुवांही देखिलें ऐकिलें असे आघवें । तरि यादवांमाजि जाणावें । हेंचि स्वरूप माझें ॥ ९२ ॥ आणि सोमवंशीं तुह्मां पांडवां- । माजि अर्जुन तो मी जाणावा । ह्मणोनि एकमेकांचिया प्रेमभावा । बिघड न पडे ॥ ९३ ॥ संन्यासी तुवां होऊनि जनीं । चोरूनि नेली माझी भगिनी । तन्हीं विकल्प[16] नुपजे मनीं । मी तूं दोन्ही स्वरूप एक ॥ ९४ ॥ [मुनीनामिति] मुनीआंत व्यासदेव[17] । तो मी ह्मणे यादवराव । कवीश्वरांमाजि धैर्या ठाव । उशनाचार्य[18] तो मी ॥ ९५ ॥

दंडो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ।
मौनं चैवाऽस्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥ ३८ ॥

[दंड इति] अगा दमितयांमाझारीं । अनिवार दंड तो मी अवधारीं । जो मुंगियेलागोनि ब्रह्मावेरीं[19] । नियमित पावे ॥ ९६ ॥ पैं सारासार निर्धारितयां । धर्मज्ञानाचा पक्ष धरितयां । सकळशास्त्रांमाजि ययां । नीतिशास्त्र तें मी । ॥ ९७ ॥ [मौनमिति] आघवियाचि गूढां- । माजि मौन तें सुहाडा[16] । ह्मणोनि न बोलतयां पुढां । स्वार्थाही नेणें[17] होय ॥ ९८ ॥ अगा ज्ञानियांचिया ठायीं । ज्ञान तें मी पाहीं । आतां असो हें ययां कांहीं । पार न देखों ॥ ९९ ॥

यच्चाऽपि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।
न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥ ३९ ॥
नांतोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप ।
एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥ ४० ॥

[नांतोऽस्तीति] पैं पर्जन्याचिया धारा । वरी लेखें[19] करवेल धनुर्धरा । कां पृ-

* जाहालों. † गेलों. ‡ पियालों.

१ निर्मळ. २ उद्योग, व्यापार. ३ सत्वधीरांत. ४ मुद्रा. ५ दैत्यरहित. ६ मोजली. ७ यमुनेचें. ८ कालियसर्प. ९ ब्रह्मदेवास. १० बाल्यदशा. ११ सहज. १२ भेद. १३ शुक्राचार्य. १४ ब्रह्मदेवापर्यंत. १५ शासन करीत. १६ सुहृदा अर्जुना. १७ ब्रह्मदेव. १८ अज्ञानी. १९ गणना.

थ्वीचिया तृणांकुरां । होईल [१]ठी ॥३००॥ पैं महोदधीचिया तरंगां । व्यवस्था धरूं नये जेविं गा । तेविं माझिया विशेषांलिंगा [२] । नाहीं मिती ॥ १ ॥ [एष तूद्देशतः प्रोक्तः] ऐशियाही सांत पांच या प्रधाना । विभूती सांगीतलिया तुज अर्जुना । तो हा उद्देश *जो गा मना । आहाच गमला [३] ॥ २ ॥ [विभूतेर्विस्तरो मया] येरां विभूतिविस्तारांसि कांहीं । एथ सर्वथा लेख नाहीं । ह्मणोनि परिससी तूं काई । आह्मी सांगों किती ॥३ ॥ [यच्चापीति] यालागिं एंकीहेळां तुज । दाऊं आतां वर्म निज । सर्वभूतांकुरें बीज । विरूढत असे तें मी ॥ ४ ॥ [न तदस्तीति] ह्मणोनि सांनें थोर न ह्मणावें । उंच नीच भाव सांडावे । एक मीचि ऐसें मानावें । वस्तुजातातें ॥ ५ ॥ तरी यावरी साधारण । आईक पां आणीकही खुण । तरिं अर्जुना ते तूं जाण । विभूती माझी ॥ ६ ॥

यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवाऽवगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम् ॥ ४१ ॥

[यद्यदिति] जेथ जेथ संपत्ति आणि दया । दोन्ही वसती आलिया †ठाया । [तत्तदिति] ते ते जाण धनंजया । ‡अंश माझे ॥ ७ ॥

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवाऽर्जुन ।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥ ४२ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विभूतिविस्तारयोगो नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥

[अथवा] अथवा एकलें एक बिंब गगनीं । परि प्रभा फांके त्रिभुवनीं । तेविं मज §एकाची सकळ जनीं । आज्ञा पाळिजे ॥ ८ ॥ ¶तयातें एकले झणीं ह्मण । तो निर्धन या भाषा नेण । काय कामधेनूसवें सर्व [४] सोहान । चालत असे ॥ ९ ॥ तियेतें जें जेधवां जो मागे । तें [५] ते [६] एकसरेंचि प्रसवों लागे । तेविं विश्वविभव [७] तया आंगें । होऊनि असती ॥ ३१० ॥ तयातें वोळखावया हेचि संज्ञा [८] । जे जगें नमस्कारिजे आज्ञा । ऐसें [९] गाथि ते जाण प्राज्ञा । अवतार माझे ॥ ११ ॥ [विष्टभ्याहमिदं कृत्स्नं] आणि स मान्य विशेष । हें जाणणें एथ $महादोष । कां जे मीचि एक अशेष । ||वि [१०] आहें ह्मणोनि ॥ १२ ॥ [बहुनैतेन]

---

* गा जो मना. † जया ठाया. ‡ विभूति माझी. § एकाकियाचि. ¶ जयातें. $ सदोष. || विश्व हें ह्मणोनी.

---

१ शेवट. २ विभूतींस. ३ पंचाहत्तर. ४ मुख्यमुख्य विभूति सांगाव्या हा उद्देश मनाला उगाच वाटला म्हणून सांगितल्या. ५ वरवर. ६ एकवार. ७ लहान. ८ कदाचित्. ९ सामुग्री. १० कामधेनु. ११ एकदम. १२ सर्व ऐश्वर्ये त्याच्या अंगी उत्पन्न होतात. १३ खूण.

तरी आतां साधारण आणि चांग । ऐसा कैसेनि पां कल्पावा विभाग । वायां आपुलिये मती वेंग[1] । भेदाचा लावावा ॥ १३ ॥ येऱ्हवीं तूप कासया घुसळावें । अमृत कां रांधूनि अधैं करावें । हां गा वायूसि काय पां डावें उजवें । आंग आहे ॥ १४ ॥ पैं सूर्यबिंबासि पोट पाठी । पहातां नासेल आपुली[2] दिठी । तेविं माझ्या स्वरूपीं[3] गोठी । सामान्यविशेषाची नाहीं ॥१५॥ [किं ज्ञातेन तवार्जुन] आणि सिनाना[4] इहीं विभूतीं । मज अपारातें मविसील[5] किती । ह्मणोनि किंबहुना सुभद्रापती । असो हें जाणणें ॥ १६ ॥ [एकांशेन स्थितो जगत्] आतां पैं माझेनि एकें अंशें । हें जग व्यापिलें असे । यालागीं भेद सांडूनि सरिसें । साम्यें भज ॥ १७ ॥ ऐसें विबुधवनवसंतें[6] । तेणें विरक्तांचेनि एकांतें । बोलिलें जेथ श्रीमंतें । श्रीकृष्णदेवें ॥ १८ ॥ तेथ अर्जुन ह्मणे स्वामी । येतुलें हें *रोंभस्य[7] बोलिलें तुह्मी । जे भेद एक आणि आह्मी । सांडावा एकीं ॥ १९ ॥ हां हो सूर्य ह्मणे काय जगातें । आंधारें दवडा कां परौतें[8] । तेविं धसाळ ह्मणों देवातें । तरीं अधिक हा बोल ॥ ३२० ॥ तुझें नामचि एक कोण्ही वेळे । जयांचिये मुखासि कां काना मिळे । तयांचिया हृदयातें सांडूनि पळे । भेद जी साच ॥२१॥ तो तूं परब्रह्मचि ऐसकें[9] । मज देवें दिधलासि हस्तोदकें[10] । तरीं आतां भेद कायसा कें । देखावा कवणें ॥२२॥ जी चंद्रबिंबाचा †गाभारां । रिगालिया[11]वरी ही उबारा । परि राणेपणें[12] शार्ङ्गधरा । बोला हें तुह्मी ॥ २३ ॥ तेथ सोवियाचि[13] परितोषोनि देवें । अर्जुनातें आलिंगिलें जीवें । मग ह्मणे तुवां न कोपावें । आमुचिया बोला ॥ २४ ॥ आह्मी तुज भेदाचिया वाहिणी[14] । सांगीतली जे विभूतींची कहाणी । ते अभेदें काय अंतःकरणीं । मानली कीं न मने ॥ २५ ॥ हेंचि पाहावयालागीं[15] । नावेक बोलिलों[16] जाहेरिसवडिया भंगीं । तंव विभूती तुज चांगी । आलिया बोधा ॥ २६ ॥ [उत्तराध्यायबीजं] तेथ अर्जुन ह्मणे देवें । हें आपुलें आपण जाणावें । परि देखतसें विश्व आघवें । तुवां भरलें ॥ २७ ॥ पैं राया तो पांडुसुत । ऐसिये प्रतीतीसि[17] जाहाला ‡वरितें[18] । संजयाचिया बोला निवांत । धृतराष्ट्र §आहे ॥ २८ ॥ कीं संजय दुखवलेनि अंतःकरणें । ह्मणतसे नवल नव्हे ¶दैवा दवडणें । हा जो वीं धडसा आहे मी ह्मणे । तंव आंतही आंधळा ॥ २९ ॥ परि असो हें तो अर्जुन । स्वहिताचा वाढवीतसे मान । कीं याहीवरी तया आन । धिंवसा[19] पनला ॥ ३३० ॥ ह्मणे हेचि हृदया-

---

* रहस्य. † मासारां. ‡ पैं रत. § हे. ¶ दैवाचें.

---

१ कलंक. २ दृष्टि. ३ विचार, गोष्ट. ४ वेगळाल्या. ५ मोजशील. ६ ज्ञानी हेंच कोणी वन त्यास वसंतरूप अशा श्रीकृष्णानें. ७ चापल्य. ८ अविचेर. ९ सर्व. १० प्रवेश केल्यावर. ११ राजेपणें. १२ तत्काळ. १३ मार्गीं, प्रवाहीं. १४ क्षणभर. १५ बाह्यदृष्टीच्या रीतीनें. १६ योग्य. १७ उत्कंठा. १८ उत्पन्न झाला.

आंतुली प्रतीती । बाहेरि [1]अवतरो कां डोळयांप्रती । इये [2]आर्तीचिया पाउलीं मती । उठती जाहाली ॥ ३१ ॥ मियां इहींच दोंही डोळां । झोंबावें विश्वरूपा सकळा । येवढी हांव तो [3]दैवा आगळा । ह्मणऊनि करी ॥ ३२ ॥ आजि [4]तो कल्पतरूची शाखा । ह्मणोनि *[5]वांझोळें न लगती देखा । जें जें येईल तयाचिया मुखा । तें तें साचचि करीतसे [6]येरु ॥ ३३ ॥ जो प्रल्हादाचिया बोला । विषाही सकट आपणचि जाहाला । तो सद्गुरु असे जोडला । किरीटीसीं ॥ ३४ ॥ ह्मणोनि विश्वरूप पुसावयालागीं । पार्थ [7]रिगता होईल कवणें †[8]भंगीं । तें सांगेन पुढलिये [9]प्रसंगीं । ज्ञानदेव ह्मणे निवृत्तीचा ॥३३५॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां दशमोऽध्यायः ॥ १० ॥

श्लोक ४२, ओंव्या ३३५.

---

* वांझोळीं. † भागीं.

१ प्रगट होवो. २ इच्छेच्या. ३ मोठ्या दैवाचा. ४ तो अर्जुन कल्पवृक्षाची शाखा = श्रीकृष्णाच्या आश्रयानें असणारा म्हणून त्याला वांझोळें = वांझ फुलें येत नाहींत (त्याचे बोल व्यर्थ जात नाहींत.) ५ श्रीकृष्ण. ६ आरंभ करील. ७ रीतीनें. ८ अध्यायीं.

ज्ञानेश्वरी.

अध्याय ११ वा.

आतां यावरी एकादशी । कथा आहे दोहीं[1] रसीं । जेथ पार्था विश्वरूपेंसीं । होईल भेटी ॥ १ ॥ जेथ शांताचिया घरा । अद्भुत आला आहे पाहुणेरा[3] । आणि येरांही रसां पांतिकरां । जाहाला मान ॥ २ ॥ अहो वधूवरांचिये मिळणी[5] । जैसीं वराडियांही लुगडीं लेणीं । तैसे देशियेच्या[6] सुखासनीं[7] । मिरवले रस ॥ ३ ॥ परि शांताद्भुत बरवे । जे डोळयांच्या अंजळीं[8] घ्यावे । जैसे हरिहर प्रेमभावें । आले खेवां[9] ॥ ४ ॥ ना तरीं अंवसेच्या दिवसीं । भेटलीं बिंबें[11] दोनी[12] *सरसीं । तेविं एकवळा[13] रसीं । केला एथ ॥ ५ ॥ मिनले[13] गंगेयमुनेचे ओघ । तैसें रसां जाहालें प्रयाग । ह्मणोनि सुस्नात[14] होत जग । आघवें एथ ॥ ६ ॥ माजि गीता सरस्वती गुप्त । आणि दोनी रस ते ओघ मूर्त । यालागिं त्रिवेणी हे उचित । फावली बापा ॥ ७ ॥ एथ श्रवणाचेनि[15] द्वारें । तीर्थीं रिघतां सोपारें[16] । ज्ञानदेव ह्मणे दातारें[17] । माझेनि केलें ॥ ८ ॥ तीरें संस्कृताचीं गहनें[18] । तोडोनि, †मऱ्हाठीशब्द सोपानें[19] । रचिलीं धर्मनिधानें । श्रीनिवृत्तिदेवें ॥ ९ ॥ ह्मणोनि भलतेणें[20] एथ सद्भावें नाहावें । प्रयागमाधव विश्वरूप पहावें । येतुलेनि संसारासि द्यावें । तिळोदक[21] ॥ १० ॥ हें असो ऐसे सांवयव[22] । एथ सांसिनले[23] ‡आथि रसभाव । जेथ श्रवणमुखाची राणीव[23] । जोडली जगा ॥ ११ ॥ जेथ शांताद्भुत रोकडे । आणि येरां रसां पडेपे[23] जोडे । हें अल्पचि परि उघडें । कैवल्य[24] जेथ ॥ १२ ॥ तो हा अकरावा अध्याव । जो देवाचा आपणपें विसवंता[25] ठाव । परि अर्जुन सदैवांचा[26] राव । जे एथही पातला ॥ १३ ॥ एथ अर्जुनचि काय ह्मणों पातला । आजि आवडतयाही[27] सुकाळ जाहाला । जे गीतार्थ आला । मऱ्हाठिये ॥१४॥ याचिलागीं माझें । विनविलें आइकीजे । तरि अवधान दीजे । सज्जनीं तुह्मी ॥ १५ ॥ तेवींचि तुह्मां संतांचिये सभे । ऐसी सलगी कीर करूं नलभे[28] । परि मानावें

---

* जैसीं. † मह्राटिया. ‡ आहाति.

---

१ शांत व अद्भुत दोनी रसांत. २ मेजवानीस, पाहुणचारास. ३ पंक्तीस आलेल्यांस. ४ लग्नसमारंभांत. ५ अलंकार. ६ मराठी भाषेच्या. ७ पालखींत. ८ ओंजळींत. १० आलिंगनास. ११ सूर्य चंद्र बिंबें. १२ एकोपा. १३ मिळाले. १४ पवित्र. १५ कर्णेंद्रियद्वारा. १६ निवृत्तिनाथानें, दात्यानें. १७ अगम्य. १८ घाट. १९ फांटा. २० मूर्तिमंत. २१ भरास आले. २२ राज्य. २३ आश्रय, महत्व. २४ मोक्षसुख. २५ मूळ जागा, जेथून बाहेर पडावयाचें. २६ भाग्यवानांचा. २७ भलत्या कोणासही. २८ योग्य नाहीं.

जी तुह्मी लोभें । अपत्या मज ॥ १६ ॥ अहो पुंसा[1] आपणचि पढविजे । मग *पढे तरी माथा तुकिजे[2] । कां करविलेनि चोजें[3] न रिझे । बाळका †माय ॥ १७ ॥ तेविं मी जें जें बोलें । तें प्रभु तुमचेंचि शिकविलें । ह्मणोनि अवधारिजो आपुलें । आपण देवा ॥ १८ ॥ हें सारस्वताचें[4] गोड । तुह्मीचि लाविलें जी झाड । तरी आतां अवधानामृतें[5] वाड[6] । सिंपोनि कीजे ॥ १९ ॥ मग हें रसभाव फुलीं फुलेल । नानार्थ फळभारें फळा येइल । तुमचेनि धर्में[8] होइल । सुरवाड[9] जगा॥२०॥ या बोला संत रिझले[11] । ह्मणती तोषलों गा भलें केलें । आतां सांगें जें बोलिलें । अर्जुनें तेथें ॥ २१ ॥ तंव निवृत्तिदास ह्मणे । जी कृष्णार्जुनाचें बोलणें । मी प्राकृत काय सांगों जाणें । परि सांगवा तुह्मी ॥ २२ ॥ अहो रानींचिया पालेखाइरा[12] । ‡नेवाणें[13] करविलें लंकेश्वरा । एकला अर्जुन परी अक्षौहिणी अकरा । न जिणेचि[14] काई ॥ २३ ॥ ह्मणोनि समर्थ जें जें करी । तें §नहोनये[15] चराचरीं । तुह्मी संत तयापरी । बोलवा मातें ॥ २४ ॥ आतां बोलिजतसे आइका । हा गीताभाव निका । जो श्रीवैकुंठनायका । मुखौनि[16] निघाला ॥ २५ ॥ बापबाप ग्रंथ गीता । जो वेदीं प्रतिपाद्य देवता । तो श्रीकृष्ण वक्ता । जिये ग्रंथीं ॥ २६ ॥ तेथिंचें गौरव कैसें वानावें[17] । जें श्रीशंभूचिये मती[18] नागवे । ते आतां नमस्कारिजे जिवें भावें । हेंचि भलें ॥ २७ ॥ मग आइका तो किरीटी । घालूनि विश्वरूपीं दिठी[19] । पहिली कैसी गोठी[20] । करिता जाहाला ॥ २८ ॥ हें सर्वही सर्वेश्वर । ऐसा प्रतीतिगत जो ¶पतिकर[21] । तो बाहेरि होआवा गोचर[22] । लोचनासी ॥ २९ ॥ हे जिवाआंतुली चाड[23] । परि देवासि सांगतां सांकड[24] । कां जें विश्वरूप गूढ[25] । कैसेनि पुसावें ॥ ३० ॥ ह्मणे मागा कवणी कहीं । जें पढियंतेनें[26] पुसिलें नाहीं । तें सहसा कैसें काई । सांगा ह्मणों ॥ ३१ ॥ मी जरी सलगीचा[27] चांग । तरि काय ओ-इसीहूनि अंतरंग[28] । परि तेही हा प्रसंग । बिहाली[30] पुसों ॥ ३२ ॥ माझी आवडे तैसी सेवा जाहाली । तरि काय होईल गरुडाचिया येतुली । परि तोही हे बोली । करीचिना ॥ ३३ ॥ मी काय सनकादिकांहूनि जवळां । परि तयांही नागवेचि हा चाळा । मी आवडेन काय प्रेमळां[31] । गोकुळींचिया ऐसा ॥ ३४ ॥ तयांतेंही लेंकुरपणें झेंकविलें[32] । ऐंकाचे[33] गर्भवासही साहिले । परि

---

* पुढें तरी. † माये. ‡ निर्वाण. § नचि होय. ¶ प्रतिकर.

१ राघूला. २ डोलवावा. ३ कौतुकानें. ४ श्रवण करावें. ५ विद्येचें. ६ एकाग्र अंतःकरणरूप अमृतानें, (पाण्यानें.) ७ वाढिवणें. ८ अनेकविध अर्थ. ९ योगें. १० सुख. ११ प्रसन्न झाले. १२ पाला खाणाऱ्या वांदरांकरवीं. १३ पराभव. १४ जिंकणार नाहीं काय? १५ न होण्याजोगेंही घडून येतें. १६ मुखांतून. १७ वर्णावें. १८ बुद्धीला आकळत नाहीं. १९ दृष्टि. २० गोष्ट. २१ अनुभव. २२ प्रत्यक्ष. २३ इच्छा. २४ संकट. २५ गुह्य. २६ आवडल्यानें. २७ चांगल्या खेहांतला. २८ लक्ष्मीपेक्षां. २९ जिवलग. ३० भ्याली. ३१ भाविक गोपाळां. ३२ फसविलें. ३३ अंबरीषार्थ.

विश्वरूप हें राहाविलें । नदावीच कवणा ॥ ३५ ॥ हा ठायवरी गुंज । याचिये अंतरींचें हें निज । केवि *उराउरी मज । पुसों ये पां ॥ ३६ ॥ आणि न पुसेंचि जरी ह्मणे । तरि विश्वरूप देखिलियाविणें । सुख नोहेचि परि जिणें । तेंही विपायें ॥ ३७ ॥ ह्मणोनि आतां पुसों अळुमाळसें । मग करूं देवा ठाक तैसें । येणें प्रवर्तला साध्यसें । पार्थ बोलों ॥ ३८ ॥ परि तेंचि ऐसेनि भावें । †जे एका दों उत्तरांसवें । दावी विश्वरूप आघवें । झाडा देउनी ॥ ३९ ॥ अहो वासरूं देखिलियाचिसाठीं । धेनु खडबडोनि मोहें उठी । मग स्तनामुखाचिये भेटी । काय पान्हा धरे ॥ ४० ॥ पाहा पां तया पांडवाचेनि नांवें । जो कृष्ण रानींही प्रतिपाळूं धांवे । तयातें अर्जुनें जंव पुसावें । तंव साहील काई ॥ ४१ ॥ तो सहजेंचि स्नेहाचें अवतरण । आणि येरू स्नेहा घातलें आहे माजवण । ऐयिसे मिळणी वेगळेपण । उरे हेंचि बहु ॥ ४२ ॥ ह्मणोनि अर्जुनाचिया बोलासरिसा । देव विश्वरूप होईल आपैसा । तोचि पहिला प्रसंग ऐसा । ऐकिजे तरी ॥ ४३ ॥

अर्जुन उवाच–**मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ।**
यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥ १ ॥

[अर्जुन उवाच–] मग पार्थ देवातें ह्मणे । [मदनुग्रहाय] जी तुह्मी मजकारणें । मज वाच्य केलें जें न बोलणें । कृपानिधे ॥ ४४ ॥ [परमं] जैं महाभूतें ब्रह्मीं आटती । जीव महदादिचे ठाय फिटती । तैं जें देव होऊनि ठाकती । तें विसवणें शेषींचें ॥४५॥ [गुह्यं] होतें हृदयाचिये परिवरी । ‡ठेविलें कृपणाचिये परी । शब्दब्रह्मासिही चोरी । जयाची केली ॥४६॥ [अध्यात्मसंज्ञितं] तें तुह्मी आजि आपुलें । मजपुढां हियें §फोडिलें । जेथा अध्यात्मा वोंवाळिलें । ऐश्वर्य हरें ॥ ४७ ॥ [यत्त्वयोक्तं वचस्तेन] ते वस्तु मज स्वामी । एंकीहेळा दिधली तुह्मी । हें बोलों तरी आह्मी । ¶तुजपासोनि भिन्न कैंचे ॥ ४८ ॥ [मोहोऽयं विगतो मम] परि साचचि महामोहाचिये पुरीं । बुडिलिया देखोनि सीसवरी । तुवां आपणपें घालोनि श्रीहरी । मग काढिलें मातें ॥ ४९ ॥ एक तूंवांचूनि कहीं । विश्वीं दुजियाची भोष नाहीं । कीं आमुचें कर्म पाहीं । जे आह्मी आंथी ह्मणों ॥ ५० ॥ मी जगीं एक अर्जुन । ऐसा देहीं वाहे अभिमान । आणि कौरवांतें इया स्वजन । आपुले ह्मणें ॥ ५१ ॥ याहीवरी यांतें मी मा-

---

* उठाउठीं. † जैसा एका. ‡ रोविलें. § फेडिलें. ¶ तुजपावोनि.

---

१ हे एवढे, आजपर्यंत. २ गुह्य. ३ झडकर. ४ वांचणें. ५ व्यर्थ, क्वचित्. ६ थोडकेंसें. ७ भयानें. ८ पान्हा चोरवे. ९ उपेक्षील काय. १० मूर्ति. ११ कैफ. १२ चमत्कार. १३ आपोआप, सहज. १४ प्रकृति, अविद्या. १५ राहाती. १६ आवारांत. १७ वेदास. १८ हृदयींचें गुह्य. १९ ज्या आध्यात्मासाठीं शिवानें ऐश्वर्य सोडून स्मशानवास केला. २० एका क्षणांत. २१ डोक्यापर्यंत. २२ नांव. २३ आहे म्हणतों.

रीन[१]। ह्मणें तेणें पापें कें रिगेन[२]। ऐसें देखत होतों दुःस्वप्न। तों चेवविला प्रभु ॥ ५२ ॥ देवा गंधर्वनगरींची[३] वस्ती। *सोडूनि निघालों लक्ष्मीपती। होतों उदकाचिया आंतीं[४]। रोहिणी[५] पीत ॥ ५३ ॥ जी किरडूं तरी कापडाचें। परी लहरी येतहोतिया साचें। ऐसें वायां मरतयां जीवांचें। श्रेयें[६] तुवां घेतलें ॥ ५४ ॥ आपुलें प्रतिबिंब नेणतां। सिंह †कुवां[७] घालील देखोनि आतां। ऐसा धरिजे तेविं अनंता। राखिलें मातें ॥ ५५ ॥ येन्हवीं माझा तरी येतुलेवरी। एथ निश्चय होता अवधारीं। जे आतांचि सातांही सागरीं। एकत्र मिळिजे ॥ ५६ ॥ हें जगचि आघवें बुडावें। वरि आकाशही तुटोनि पडावें। परि जुंझणें न घडावें। गोत्रजेंसी मज ॥५७॥ ऐसिया अहंकाराचिये ‡वोढी[१०]। मियां आग्रहजळीं दिधली होती बुडी। चांगचि तूं जवळां येन्हवीं काढी। कवण मातें ॥ ५८ ॥ नाथिलें[११] आपणपां एक मानिलें। आणि नव्हेतया[१२] नाम गोत्र ठेविलें। थोर पिसें होतें लागलें। परि राखिलें तुझी ॥ ५९ ॥ मागां जळत काढिले जोहरीं[१३]। §तैं तें देहासीच भय अवधारीं। आतां हे ¶जोहरवाहार दुसरी। चैतन्यासकट ॥ ६० ॥ दुराग्रहें हिरण्याक्षें। माझी बुद्धी वसुंधरा सूदली काखे। मग मोहार्णव[१४] गवाक्षें[१५]। रिघोनि ठेला ॥६१ ॥ तेथ तुझेनि गोसांवीपणें[१६]। एकवेळ बुद्धीचिया ठाया येणें। हें दुसरें वराह होणें। पडिलें तुज ॥ ६२ ॥ ऐसें अपार तुझें केलें। एकी वाचा काय मी बोलें। परि पांचही[१७] पालव[१८] मोकलिले। मजप्रति ॥ ६३ ॥ तें कांहीं न वचेचि वायां। भलें यश फावलें[१९] देवराया। जे सांद्यंत माया। निरसिली माझी ॥ ६४ ॥ अजी आनंदसरोवरींचीं कमळें। तैसे हे जे तुझे डोळे। आपुलिया प्रसादाचीं रोंउळें[२०]। जयालागीं करिती ॥ ६५ ॥ हां हो तयांही आणि मोहाची भेटी। हे कायसी पांबळी[२१] गोठी। केउती[२२] मृगजळाची वृष्टी। वडवानळेंसीं ॥६६॥ आणि मी तंव दातारा। ये कृपेचिये निधोनि गाभारां। घेत आहें चारा। ब्रह्मरसाचा ॥ ६७ ॥ तेणें माझा जी मोह जाये। एथ विस्मो[२३] कांहीं काय आहे। तरी उद्धरलों कीं तुझे पाये। ॥शिवतले आहाती ॥ ६८ ॥

---

* सांडूनि. † कुहा. ‡ वाढी (अतिशयानें). § तैं देहासीच. ¶ जोहरबाधाहर. $ गवाखें. || देखिले.

---

१ कोठें. २ जागा केला. ३ आकाशांतील ढगांवर कल्पित नगरींची. ४ इच्छेनें. ५ मृगजळ. ६ पुण्य. ७ छाया. ८ विहिरींत. ९ येथवर. १० ओढ्यांत, अल्प नदींत. ११ लटकें. १२ नसणाऱ्या. १३ लाक्षागृहांतून. १४ अग्नीपीडा. १५ झरोक्यांतून. १६ सामर्थ्यानें. १७ पंचप्राण, अंतःकरणपंचक. १८ दिले. १९ जोडलें. २० विश्रांतिमंदिरें. २१ तुच्छ. २२ कोणीकडे. २३ नवल.

भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया ।
त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाऽव्ययम् ॥ २ ॥

[त्वत्तः कमलपत्राक्ष] पैं कमलायतडोळसा । सूर्यकोटितेजसा । मियां तुजपासोनि महेशा । परिसिलें आजि ॥ ६९ ॥ [भवाप्ययौ हि भूतानामिति] इयें भूतें जयापरी होती । अथवा लया हन जैसेनि जाती । ते मजपुढां प्रकृती । विवंचिली देवें ॥ ७० ॥ [माहात्म्यमपि चाव्ययं] आणि प्रकृती कीर उगाणा दिधला । परपुरुषाचाही ठाव दाविला । जयाचा महिमा पांधरोनि जाहला । धडौता वेद ॥ ७१ ॥ जी शब्दराशि वाढे जीये । कां धर्माऐशिया रत्नातें विये । *ते एथिचे प्रभेचे पांये । वोळगे ह्मणोनि ॥ ७२ ॥ ऐसें अगाध माहात्म्य । जें सकळ मार्गैकगम्य । जें स्वात्मानुभवरम्य । तें इयापरी दाविलें ॥ ७३ ॥ जैसा केरु फिटलिया आभाळीं । दिठी रिगे सूर्यमंडळीं । कां हातें सारूनि बाबुळि । जळ देखिजे ॥ ७४ ॥ ना †तरी उकलूनियां सापाचे वेढे । जैसें चंदना खेंव देणें घडे । अथवा विवसी पळे मग चढे । निधान †हाता ॥ ७५ ॥ तैसी प्रकृती हे आड होती । ते देवेंचि §सारोनि परौती । मग ¶परतत्व मीजिये मती । शेजार केलें ॥ ७६ ॥ ह्मणोनि इयेविषयींचा मज देवा । भरंवसा कीर जाहाला जीवा । परि आणिक एक हेवा । उपनला असे ॥ ७७ ॥ तो भिडों जरी ह्मणों राहो । तरी आंना कवणा पुसों जावों । काय तुजवांचोनि ठावो । जाणत आहों आह्मी ॥ ७८ ॥ जळचर जळाचा ओभार धरी । बाळक स्तनपानीं उपरोध करी । तरी तया जिणयां श्रीहरी । आन उपायो असे ॥ ७९ ॥ ह्मणोनि भीडसांकड न धरावें । जीवा आवडे तेंही तुजपुढां बोलावें । तंव राहें ह्मणितलें देवें । चाड सांगें ॥ ८० ॥

एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर ।
द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥ ३ ॥

[एवमेतद्यथात्थ त्वं] मग बोलिला तो किरीटी । ह्मणे तुह्मीं केली जे गोठी । तिया प्रतीतीची दिठी । निवाली माझी ॥ ८१ ॥ [परमेश्वर] आतां जयाचेनि संकल्पें । हे लोकपरंपरा होय हारपे । [आत्मानं] जया ठायातें औपणपें । मी ऐसें ह्मणसी ॥ ८२ ॥ [रूपमैश्वरं] तें मुदल रूप तुझें । जेथूनि इयें द्विभुजें

---

* तेथिचे. † तरी उकलतया. ‡ हातीं. § सारिली. ¶ परत्वा.

---

१ कमलपत्रवत् विस्तीर्ण आहेत नेत्र ज्याचे अशा. २ विचारपूर्वक सांगितली. ३ मायेचा. ४ झाडा. ५ परमात्म्याचा. ६ धड वस्त्रयुक्त. ७ शब्दसमूह. ८ आश्रय करी. ९ सर्व मार्गांनीं एकच जाणण्यास योग्य. १० अभ्रादिकाची फलकट. ११ गोंडाळ, शेवाळ. १२ आलिंगन. १३ ठेवा. १४ माझे मतीस परतत्त्व हें शेजार=निद्रास्थान केलें (मति तत्त्वनिष्ठ केली). १५ इच्छा. १६ उत्पन्न झाला. १७ मर्यादेनें. १८ दुसऱ्याला. १९ उपकार. २० भीड. २१ वांचण्याला. २२ संकोच. २३ आपणाला.

हन चतुर्भुजें । सुरकार्याचेनि व्याजें । घेवोंघेवों येसी ॥ ८३ ॥ पैं जळशयनाचिया[1] अवगणिया । कां मत्स्यकूर्म इया मिरवणिया । खेळ सरलिया तूं गुणिया[2] । सांठविसी जेथ ॥ ८४ ॥ उपनिषदें जें गाती । योगिये हृदयीं रिगोनि[3] पाहाती । जयातें सनकादिक आहाती । पोटाळुनियां[4] ॥ ८५ ॥ [द्रष्टुमिच्छामि ते] ऐसें अगाध जें तुझें । विश्वरूप कानीं ऐकिजे । तें देखावया चित्त माझें । उतावीळ देवा ॥ ८६ ॥ देवें फेडूनियां सांकड[5] । लोभें पुसिली जरी चाड । तरिं हेचि एकी वोड[6] । आर्ति[7] जी मज ॥ ८७ ॥ तुझें *विश्वरूप आघवें । माझिये दिठीसी गोचर होआवें । ऐशी थोर आस जीवें । बांधोनि आहें ॥ ८८ ॥

मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ।
योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥ ४ ॥

[मन्यसे यदि तच्छक्यं मया] परि आणीक एक एथ शाङ्गीं । तुज विश्वरूपातें देखावयालागीं । पैं योग्यता माझिया आंगीं । असे कीं नाहीं ॥ ८९ ॥ हें आपलें आपण मी नेणें । तें कां नेणसी जरी देव ह्मणे । तरी[8] सेम्मिया काय जाणे । निदान[9] रोगाचें ॥ ९० ॥ आणि जी आर्तीचेनि पडिभरें । आर्त आपली ठाकी[10] पैं विसरे । जैसा तान्हेला ह्मणे न पुरे । समुद्र मज ॥ ९१ ॥ ऐसा सचाडपणाचिये भुली । न सांभाळवे संमस्या[11] आपुली । यालागीं योग्यता जेवीं माउली । बाळकाची जाणे ॥ ९२ ॥ [द्रष्टुमिति प्रभो] तयापरी श्रीजनार्दना । विचारिजो माझी संभावना[12] । मग विश्वरूपदर्शना । उपक्रम[13] कीजे ॥ ९३ ॥ तरि ऐसी ते कृपा करा । येन्हवीं नव्हे हें ह्मणा अवधारा । वायां पंचमालापें[14] बधिरा । सुख केउतें[15] देणें ॥ ९४ ॥ येन्हवीं एकले बापियाचे तृषे[16] । मेघ जगापुरतें काय न वर्षे । परी जाहालीही वृष्टि उपखे[17] । जन्हीं खडकीं होय ॥ ९५ ॥ चकोरा चंद्रामृत फावलें[18] । येरां आण वाहूनि काय वारिलें । परि डोळयांवीण पाहिलें[19] । वायां जाय ॥ ९६ ॥ [दर्शयात्मानमव्ययं] ह्मणोनि विश्वरूप तूं सहसा । दाविसी कीर हा भरवसा । कां जे कैडाडा[20] आणि गंहिसा[21] । माजि नित्य नवा तूं कीं ॥ ९७ ॥ [योगेश्वर ततो मे त्वं] तुझें औदार्य जाणों स्वतंत्र । देतां न ह्मणसी पात्रापात्र । पैं कैवल्य ऐसें पवित्र । वैरियांही दिधलें ॥ ९८ ॥ मोक्ष दुराराध्य कीर होय । परि तोही आराधी तुझे पाय । ह्मणोनि धाडिसी तेथ जाय । पाईका[22] जैसा ॥ ९९ ॥ तुवां सन-

* विश्वरूपपण.

१ तिरस्कार, सोंवानें. २ गारुड्या. ३ आलिंगून. ४ संकोच. ५ मोठी. ६ इच्छा. ७ कारण. ८ आसक्तीनें. ९ योग्यता, हांव. १० शंका. ११ भक्ति. १२ प्रारंभ. १३ पंचमस्वरानें. १४ कसें. १५ चातकाचे. १६ व्यर्थ जाते. १७ प्राप्त झालें. १८ उजाडलें. १९ पढिकास, जाणत्यास. २० अनधीतास, नेणत्यास. २१ चाकर.

कादिकांचेनि मानें । सायुज्यीं सौरस दिधला पूतने । जे विषाचेनि स्तनपानें । मारूं आली ॥ १०० ॥ हां गा राजसूय यागाचिया सभासदीं । देखतां त्रिभुवनाची मांदी । कैसा शतधा *दुर्वाक्य शब्दीं । निस्तेजिलासी ॥ १ ॥ ऐशिया अपराधिया शिशुपाळा । आपणपें ठावो दिधला गोपाळा । आणि उत्तानचरणाचिया बाळा । काय ध्रुवपदीं चाड ॥ २ ॥ तो वना आला याचि लागीं । जे वैसावें पितयाचिया वोसंगीं । कीं तो चंद्रसूर्यादिकांपरिस जगीं । श्लाघ्य केला ॥ ३ ॥ ऐसा वनवासियां सकळां । देता एकचि तूं धसाळा । पुत्रा आळवितां अजामिळा । आपणपें देसी ॥ ४ ॥ जेणें उरीं हाणितलासि पांपरा । तयाचा चरण वाहासी दातारा । अझुनी वैरियांचिया कलेवरा । विसंबसीना ॥ ५ ॥ ऐसा अपकारियां तुझा उपकार । तूं अपात्रींही परि उदार । †दे दान ह्मणोनि दोरवंठेकार । जाहालासि बळीचा ॥ ६ ॥ तूतें आराधीना आयकें । होती पुंसी बोलावीत कौतुकें । तिये वैकुंठीं तुवां गणिके । सुरवाड केला ॥ ७ ॥ ऐसीं पाहूनि वायाणीं मिषें । आपणपें देवों लागसी वानिवसें । तो तूं कां अनारिसें । मजलागीं करिसी ॥ ८ ॥ हां गा दुभतयाचेनि पवाडें । जे जगाचें फेडी सांकडें । तिये कामधेनूचे पांडे । काय भुकेले ठाती ॥ ९ ॥ ह्मणोनि मियां जें विनविलें कांहीं । तें देव न दाखविती हें कीर नाहीं । परि देखावयालागीं देईं । पात्रता मज ॥ ११० ॥ तुझें विश्वरूप ओकळे । ऐसे जरी जाणसी माझे डोळे । तरि आर्तीचे ‡डोहळे । पुरवीं देवा ॥ ११ ॥ ऐसी §ठेयिंठाव विनंती । जंव करूं सरेला सुभद्रापती । तंव तया षड्गुणचक्रवर्ती । साहवेचिना ॥ १२ ॥ तो कृपापीयूषसजळू । आणि येरु जवळां आला वर्षाकाळू । नेणों श्रीकृष्ण कोकिळू । अर्जुन वसंत ॥१३॥ ना तरी चंद्रबिंब ¶वाटोळें । देखोनि क्षीरसागर उचंबळे । तैसा दुर्णेंही वरी प्रेमबळें । उल्लसित जाहाला ॥१४॥ मग तिये प्रसन्नतेचेनि ओटोपें । गोजोनि ह्मणितलें सकृपें । पार्था देख देख अमुपें । स्वरूपें माझीं ॥ १५ ॥ [श्रीभगवानुवाच—एक विश्वरूप देखावें । ऐसा मनोरथ केला पांडवें । कीं विश्वरूपमय

---

* दुर्वादीं. † दान मागोनि. ‡ सोहळे. § ठायठाय. ¶ वाढोळें.

---

१ अपमानला गेलास. २ उत्तानपादाच्या. ३ अढळपदीं. ४ मांडीवर. ५ स्तुत्य. ६ आपन्नांला. ७ उदारा. ८ पुत्रमिषानें नारायणनामोच्चार घडलेल्या अजामिळाला. ९ लाथेनें. १० शरीराला. ११ सोडीत नाहींत. १२ द्वारपाळ. १३ राघूला. १४ सुख. १५ व्यर्थ. १६ वैकुंठरूप घर. १७ वेगळें. १८ अधिकपणानें. १९ संकट. २० वासरें. २१ योग्यता. २२ जाणतां येईल. २३ इच्छेचे. २४ यथायोग्य. २५ पुढें जाहाला. २६ ज्ञान, वैराग्य, यश, श्री, ऐश्वर्य, धर्म, यांचा राजा. २७ कृपामृतयुक्त. २८ अथवा. २९ पूर्णचंद्र. ३० दुपटीपेक्षां अधिक. ३१ मोठेपणानें. ३२ गर्जोनि. ३३ बहुत. ३४ "ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः । ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा" या पद्यांत भगवच्छब्दस्थ षड्गुणैश्वर्याची व्याख्या असून पुढील ओव्यांत तींच स्पष्ट दाखविली आहे.

आघवें । करूनि घातलें ॥ १६ ॥ ['धर्मस्य'] बाप उदार देव अपरिमित । याचक स्वेच्छा सदोदित । असे सहस्रवरी देत । सर्वस्व आपुलें ॥१७॥ ['ज्ञानस्य'] अहो शेषाचेहि डोळे चोरिले । वेद जयालागीं झकविले । लक्ष्मियेही राहाविलें । जिव्हार जें ॥ १८ ॥ ['श्रियः'] तें आतां *प्रगटुनी अनेकधा । करीत विश्वरूपदर्शनाचा धींदा । बाप भाग्या अगाधा । पार्थाचिया ॥ १९ ॥ ['यशसः'] जो जागता स्वप्नावस्थे जाये । तो जेवीं स्वप्नींचें आघवें होये । तेविं अनंत ब्रह्मकटाह आहे । आपणचि जाहाला ॥ १२० ॥ ['वैराग्यस्य' समग्रस्येति प्रत्येकमन्वेति] ते सहसा मुद्रा सोडिली । आणि स्थूळदृष्टीची जेवनीक फेडिली । किंबहुना उघडली । योगऋद्धी ॥२१॥ परि हा हें देखेल कीं नाहीं । ऐसी सेचि न करी कांहीं । एकसरां ह्मणतसे पाहीं । स्नेहातुर ॥ २२ ॥

[षड्गुणैश्वर्यमेवेतोऽष्टाविंशतिभिः श्लोकैस्तत्र पूर्वं त्रिभिः समग्रमैश्वर्यमाह]

श्रीभगवानुवाच—**पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः ।**
नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥ ५ ॥

[पश्य मे पार्थ रूपाणि 'करुणारसः'] अर्जुना तुवां एक दावा ह्मणितलें । आणि तेंचि दावूं तरि काय दाविलें । आतां देखें आघवें भरिलें । माझ्याचि रूपीं ॥२३॥ [शतशोऽथ सहस्रशः] एकें कृशें एकें स्थूलें । एकें ह्रस्वें एकें विशालें । पृथुतरें सरळें । अप्रांतें एकें ॥ २४ ॥ एकें अनावरें प्रांजळें । सव्यापारें एकें निश्चळें । उदासीनें स्नेहाळें । तीव्रें एकें ॥ २५ ॥ एकें घृणितें सावधें । असंलगें एकें अगाधें । एकें उदारें अतिबद्धें । †क्रुद्धें एकें ॥ २६ ॥ एकें शांतें ‡सदामिदें । स्तब्धें एकें सानंदें । गर्जितें निशब्दें । सौम्यें एकें ॥ २७ ॥ एकें साभिलाषें विरक्तें । उन्निद्रितें एकें निद्रितें । परितुष्टें एकें आर्तें । प्रसन्नें एकें ॥ २८ ॥ एकें अशस्त्रें सशस्त्रें । एकें रौद्रें अति मित्रें । भयानकें एकें विचित्रें । लयस्थें एकें ॥ २९ ॥ एकें जननलीलाविलासें । एकें पालनशीलें लोलसें । एकें संहारकें सावेशें । साक्षिभूतें एकें ॥ १३० ॥ [नानाविधानि दिव्यानि] एवं नानाविधें परि बहुवसें । आणि दिव्यतेजप्रकाशें । तेवींचि एकएका ऐसे । वर्णही नव्हे ॥ ३१ ॥ [नानावर्णाकृतीनि च] एकें तांतलें सोंडिपंधरें । तैसीं कपिलवर्णें अपारें । एकें §सर्वांगीं जैसें सिंदुरें । डवरलें नभ ॥ ३२ ॥ एकें सावियाचि चुळुकीं । जैसें ब्रह्मकटाह खचिलें माणिकीं । एकें अरुणोदयासा-

---

*प्रगट मी. †कृपणें एकें. ‡सन्मदें. §एकें सरागें.

---

१ गुप्त ठेविलें, फसविलें. २ जिवाचें गुह्य. ३ धंदा. ४ ब्रह्मांड. ५ कृष्णरूप आकार. ६ कृष्णाला मनुष्यदृष्टीनें पाहण्याची. ७ आड येणारा पडदा. ८ एकदम. ९ प्रेमव्याप्त. १० ठेंगणीं. ११ जाड. १२ अपार. १३ न आवरणारीं. १४ असावध. १५ सोपीं. १६ शब्दरहित. १७ जागृत. १८ दुःखी. १९ समाधिस्थ. २० अवतार धरणारीं. २१ प्रीतियुक्त. २२ क्रोधयुक्त. २३ तापलेलें. २४ सोनें. २५ पिंगट. २६ माखलें. २७ सहज. २८ सुंदर.

रिखीं । कुंकुमवर्णें ॥ ३३ ॥ एकें शुद्धस्फटिकसोज्वळें । एकें इंद्रनीळसुनीळें । एकें अंजनवर्णें[1] सकाळें । रक्तवर्णें एकें ॥ ३४ ॥ एकें लसत्कांचनसम[2] पिंवळीं । एकें सजलजलदश्यामळीं । एकें चांपेगौरीं[3] केवळीं । हरितें[4] एकें ॥ ३५ ॥ एकें तप्ततांम्रतांबडीं[5] । एकें श्वेतचंद्र चोखडीं । ऐसीं नानावर्णें रूपडीं । देखें माझीं ॥ ३६ ॥ हे जैसे कां अनानावर्ण[6] । तैसें आकृतींही अनारिसेपण । लाजा[7] कंदर्प[8] रिघाला शरण । तैसीं सुंदरें एकें ॥ ३७ ॥ एकें अतिलावण्यसाकारें । एकें स्निग्धवपु[9] मनोहरें । शृंगारश्रियेचीं भांडारें । उघडिलीं जैसीं ॥ ३८ ॥ एकें पीनावयवमांसळें[10] । एकें शुष्कें अतिविक्राळें । एकें दीर्घकंठें[11] वितांळें[12] । विकटें एकें ॥ ३९ ॥ एवं नानाविधाकृती । इया पाहातां पार नाहीं सुभद्रापती । ययांच्या एकेकीं अंगप्रांतीं[13] । देख पां जगा ॥ १४० ॥

पश्यादित्यान्वसून् रुद्रानश्विनौ मरुतस्तथा ।
बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ॥ ६ ॥

[पश्यादित्यान्] जेथ उन्मीलन[14] होत आहे दिठी । तेथ पसरती आदित्यांचिया सृष्टी । पुढती निमीलनीं[15] मिठी । देत आहाती ॥ ४१ ॥ [वसून्] अदनींचिया वाफेसवें । होत ज्वाळामय आघवें । जेथ पावकादिक पावे । समूह[16] वसूंचा ॥ ४२ ॥ [रुद्रान्] आणि अलंतांचे[17] शेवट । कोपें मिळों पाहती एकवाट । तेथ रुद्रगणाचे संघाट[18] । अवतरत[19] देखें ॥ ४३ ॥ [अश्विनौ मरुतस्तथा] पैं सौम्यतेचा कोलावा । मिती[20] नेणिजे अश्विनौदेवां । श्रोत्रीं[21] होती पांडवा । अनेक वायु ॥ ४४ ॥ [बहून्यदृष्टपूर्वाणि] यापरि एकेकाचिये लीळे । जन्मती सुरसिद्धांचीं कुळें । ऐसीं अपारें आणि विशाळें । रूपें इयें पाहीं ॥ ४५ ॥ जयातें सांगावया वेद बोबडे । पाहावया काळाचेंही आयुष्य थोकडें[22] । धैर्यातयाही परि न सांपडे । ठाव जयाचा ॥ ४६ ॥ जयातें वेदत्रयी[23] कधीं नायके । [पश्याश्चर्याणि भारत] तियें इयें प्रत्यक्ष देख अनेकें । भोगीं आश्चर्याचीं कवतिकें । महासिद्धी ॥ ४७ ॥

इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ।
मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ ७ ॥

[मम देहे गुडाकेश] इया मूर्तींचिया किरीटी । रोममूळीं देखें पां सृष्टी ।

---

१ काजळासारखीं. २ दिव्य सुवर्णवर्ण. ३ चांफ्याच्या फुलाप्रमाणें. ४ हिरव्या रंगाचीं. ५ तापलेल्या तांब्यासारखीं लाल. ६ भिन्न भिन्न. ७ लाजेनें. ८ मदन. ९ तेजःपुंज शरीरें. १० पुष्ट शरीर मांसभरित. ११ लांब कंठाचीं. १२ मोठ्या टाळूचीं. १३ अंगप्रदेशीं. १४ उघडणें. १५ मिटण्यांत. १६ अष्टवसूंचा समुदाय. १७ भिवयांचे. १८ समुदाय. १९ उपजत. २० संख्या. २१ कानांत. २२ अल्प. २३ ब्रह्मदेवालाही.

सुरतरूतळवटीं । तृणांकुर जैसे ॥ ४८ ॥ *वातायनाचेनि प्रभासें । उडत परमाणु दिसती जैसे । भ्रमत ब्रह्मकटाह तैसे । अवयवसंधीं ॥ ४९ ॥ [इहैकस्थमिति] एथ एकैकाचिया †प्रांतदेशीं । विश्व देख विस्तारेसीं । [यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि] आणि विश्वाही परौतें मानसीं । जरी देखावें वर्तें ॥ १५० ॥ ‡तरी इयेही विषयींचें कांहीं । एथ सर्वथा सांकडें नाहीं । सुखें आवडे तें माझिया देहीं । देखसी तूं ॥ ५१ ॥ ऐसें §विश्वमूर्ती तेणें । बोलिलें कारुण्यपूर्णें । तंव देखत आहे कीं नाहीं न ह्मणे । निवांतचि येरु ॥ ५२ ॥ एथ कां पां हा उगला । ह्मणोनि श्रीकृष्णें जंव पाहिला । तंव आर्तीचें लेणें लेइला । तैसाचि आहे ॥ ५३ ॥

नतु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥ ८ ॥

[नतु मामिति श्लोकद्वयेन समग्रज्ञानमाह] मग ह्मणे उत्कंठे वोहट न पडे । अझुनी सुखाची सोय न सांपडे । परि दाविलें तें फुडें । नाकळेचि यया ॥ ५४ ॥ हें बोलोनि देव हांसिले । हांसोनि देखणिया ह्मणितलें । आह्मी विश्वरूप तरी दाविलें । परि देखसीच ना तूं ॥ ५५ ॥ यया बोला येरें विचक्षणें । ह्मणितलें हां जी कवणासि तें उणें । तुह्मीं बैकाकरवीं चांदिणें । चरऊं पहा मा ॥ ५६ ॥ हांहो उटोनियां आरिसा । आंधळिया दाऊं बैसा । बहिरिया पुढें हृषीकेशा । गीणीव करा ॥ ५७ ॥ मकरंदकणाचा चारा । जाणतां घालूनि दर्दुरा । वायां ¶धांडा शार्ङ्गधरा । कोपा कवणा ॥ ५८ ॥ जें अतींद्रिय ह्मणोनि व्यवस्थिलें । केवळ ज्ञानदृष्टीचिया भागा फिटलें । तें तुह्मी चर्मचक्षूपुढें $सोदलें । मी कैसेनि देखें ॥ ५९ ॥ परि हें तुमचें उणें न बोलावें । मीचि सोहें तेंचि बरवें । एथ आंथि ह्मणितलें देवें । मानूं बापा ॥ १६० ॥ साच विश्वरूप जरि आह्मी दावावें । तरी आधीं देखावया सामर्थ्य कीं द्यावें । परि बोलत प्रेमभावें । धसाळ गेलों ॥ ६१ ॥ काय जाहालें न वोहतां ||भुई पेरिजे । [दिव्यं ददामि ते चक्षुः] तरी तो +वेलु विलया जाइजे । तरीं आतां माझें निजरूप देखिजे । ते दृष्टी देवों तुज ॥ ६२ ॥ [पश्य मे योगमैश्वरं] मग तिया दृष्टी पांडवा । आमुचा ऐश्वर्ययोग आघवा ।

---

* वातायन आणि. † प्रदेशीं. ‡ तियेही. § विश्वमूर्तीनें. ¶ धाडा मग. $ सोदलें. || भोई, भोंय. + वेल लया, वेल शिंपलिया कीर वांयां घाडिजे.

१ खिडकीच्या उजेडानें. २ अवयवभागांत. ३ विश्वरूपी श्रीकृष्णानें. ४ अर्जुन. ५ उगाच. ६ आवड हेच अलंकार. ७ कमीपणा. ८ मार्ग. ९ स्पष्ट. १० पाहाणाऱ्यास. ११ बुद्धिवानानें. १२ हा दोष कोणाकडे. १३ बगळ्याच्या हातून. १४ पाहतां ना? १५ स्वच्छ पुसून. १६ गायन. १७ पुष्प परागांचा. १८ घालवितां. १९ इंद्रियांस अगोचर. २० शास्त्रानें सांगितलें. २१ प्राप्त झालें. २२ ठेवलें. २३ उगा रहावें. २४ खरें आहे. २५ विस्मरण झालें. २६ न नांगरतां.

देखोनियां अनुभवा । माजिवडा[1] करीं ॥ ६३ ॥ ऐसें तेणें वेदांतवेद्यें[2] । सकळलोकैकआद्यें[3] । बोलिलें आराध्यें[4] । जगाचेनि ॥ ६४ ॥

संजय उवाच-एवमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः ।
दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम् ॥ ९ ॥

[संजय उवाच—राजन्] पैं कौरवकुळचक्रवर्ती । मज हाचि विस्मय पुढतपुढती । जे श्रियेहूनि त्रिजगती । सदैव असे कवणी ॥ ६५ ॥ [महायोगेश्वरः] ना तरी खुणेचें वोनावयालागीं[5] । श्रुतीवांचूनि दावा पां जगीं । ना सेवकपण तरी आंगीं । शेषाच्याचि आथि ॥ ६६ ॥ हां हो जयाचेनि सोसें[6] । शिणत आठही पाहार[7] योगी जैसे । अनुसरले गरुडाऐसें । कवण आहे ॥६७॥ परि तें आघवेंचि एकीकडे ठेलें । *सर्वें कृष्णसुखा ऐकंदरें[8] जाहालें । जिये दिवसींहूनि जन्मले । पांडव हे ॥ ६८ ॥ परि पांचांही आंत अर्जुना । श्रीकृष्ण सावियाचि जाहाला अधीना[9] । कामुक कां जैसा अंगना[10] । आपैता[11] कीजे ॥ ६९ ॥ पढविलें पाखिरूं ऐसें न बोले । यापरी क्रीडामृगही तैसा न चले । कैसें दैव एथें सुरवाडलें[12] । तें जाणों[13] नये ॥ १७० ॥ आजि परब्रह्म हें सगळें । भोगावया सदैव याचेचि डोळे । कैसे वाचेचे हन लळे । पाळीत असे ॥ ७१ ॥ हा कोपे कीं निवांत साहे । हा रुसे तरी बुझावति[14] जाये । नवल पिसें लागलें आहे । पार्थाचें देवा ॥ ७२ ॥ येन्हवीं विषय जिणोनि[15] जन्मले । जे शुकादिक दांडुले[16] । ते विषयचि †वानितां[17] जाहाले । भाट[18] ययाचे ॥ ७३ ॥ हा योगियांचें समाधिधन[19] । कीं होऊनि ठेलें पार्थाअधीन । यालागिं विस्मय माझें मन । करीतसे राया ॥ ७४ ॥ तेवींचि संजय ह्मणे कायसा । विस्मयो एथें कौरवेशा[20] । श्रीकृष्णें स्वीकारिजे तया ऐसा । भाग्योदय होय ॥७५॥ [एवमुक्त्वा] ह्मणोनि तो देवांचा रावो । ह्मणे पार्थातें तुज दिव्य दृष्टि देवों । जया विश्वरूपाचा ठावो । देखसी तूं ॥ ७६ ॥ [ततः] ऐसीं श्रीमुखेंनि[21] अक्षरें । निघती ना ‡जंव एकसरें । तंव अविद्येचें आंधारें । जावोंचि लागे ॥ ७७ ॥ तीं अक्षरें नव्हती देखा । ब्रह्मसाम्राज्यदीपिका[22] । अर्जुनालागीं चित्कळिका[23] । उजळलिया श्रीकृष्णें ॥७८॥ [दर्शयामास पार्थाय] मग दिव्यचक्षुप्रकाश जाहाला । तया ज्ञानदृष्टी फांटा फुटला । ययापरी दाविता जाहाला । ऐश्वर्य आपुलें ॥ ७९ ॥ [परमं] हे अक्तार जे सकळ । ते जिये समुद्रींचे कां कल्लोळ । विश्व

---

* कृष्ण थोरसुखा भरले, कृष्ण सुख एकंदर. † निवांत जाहाले. ‡ तंव.

---

१ मध्यें, अनुभवांतर्गत. २ उपनिषदांनींच ज्ञेय अशा कृष्णानें. ३ मूळपुरुषानें. ४ पूज्य. ५ वर्णन करावयाकरितां. ६ इच्छेनें. ७ योग्याप्रमाणें आठही प्रहर शिणून असणाऱ्या गरुडासारखें कोण आहे? ८ सांप्रत. ९ एकवट. १० स्त्रियेनें. ११ स्वाधीन. १२ अनुकूळ झालें. १३ जाणतां येत नाहीं. १४ समजावीत. १५ जिंकून. १६ समर्थ. १७ वर्णितां. १८ स्तुतिपाठक. १९ समाधिरूप भाग्य. २० धृतराष्ट्रा. २१ श्रीकृष्णाच्या मुखांतून. २२ दिवटी, मशाल. २३ ज्ञानदीप.

हें मृगजळ । जया [१]रश्मीस्तव दिसे ॥ १८० ॥ जिये अनादिभूमिके [२]निटे । चराचर हें चित्र उमटे । [३]आपणपें श्रीवैकुंठें । दाविलें तया ॥ ८१ ॥ मागां बाळपणीं येणें श्रीपती । जैं एकवेळ खादली होती माती । तैं कोपोनियां हातीं । यशोदां धरिला ॥ ८२ ॥ मग [४][५]भेणें भेणें जैसें । मुखीं झाडा द्यावयाचेनि मिसें । चवदाही भुवनें सावकाशें । दाविलीं तिये ॥ ८३ ॥ ना तरी मधुवनीं [६]ध्रुवासि केलें । जैसें कैंपोल शंखें शिवंतलें । आणि वेदांचियेही मती ठेलें । तें लागला बोलों ॥ ८४ ॥ [७]तैसा अनुग्रह पैं राया । [हरिः] श्रीहरी केला धनंजया । आतां कवणेकडे ही माया । ऐसी भाष नेणेचि तो ॥ ८५ ॥ [रूपमैश्वरं] एकसरें ऐश्वर्यतेजें [८]पाहलें । तया चमत्काराचें [९]एकार्णव जाहालें । चित्त [१०]समाजीं बुडोनि ठेलें । विस्मयाचिया ॥ ८६ ॥ जैसा [११]ब्रह्म पूर्णोदकीं । पोहे मार्कंडेय एकाकी । तैसा विश्वरूपकौतुकीं । पार्थ लोळे ॥८७ ॥ ह्मणे केवढें गगन एथ होतें । तें कवणें नेलें पां [१२]केउतें । *तीं चराचरें महाभूतें । काय जाहालीं ॥ ८८ ॥ दिशांचे ठावही हारपले । अधोर्ध्व काय नेणों जाहालें । चेइलियां [१३]स्वप्न तैसे गेले । लोकाकार ॥ ८९ ॥ [१४]नाना सूर्यतेजप्रतापें । सचंद्र [१५]तारांगण जैसें लोपे । तैसी गिळिली विश्वरूपें । प्रपंचरचना ॥ १९० ॥ तेव्हां मनासी मनपण न स्फुरे । बुद्धि आपणपें न सांवरे । इंद्रियांचे [१६]रश्मी माघारे । हृदयवरी भरले ॥ ९१ ॥ तेथ [१७]तटस्था ताटस्थ्य पडिलें । [१८]टेंकासी टक लागलें । जैसें मोहनास्त्र घातलें । विचारजातां ॥९२॥ तैसा विस्मित पाहे [१९]कोडें । तंव पुढां होतें चतुर्भुज रूपडें । तेंचि नानारूप चहूंकडे । मांडोनि ठेलें ॥ ९३ ॥ जैसे वर्षाकाळींचे [२०]मेघौडे । कां महाप्रळयींचें तेज वाढे । तैसें आपणावीण कवणीकडे । नेदीचि उरों ॥ ९४ ॥ प्रथम स्वरूपसमाधान । पावोनि ठेला अर्जुन । सवेंचि †उघडिले लोचन । तंव विश्वरूप देखे ॥ ९५ ॥ [२३]इहींचि दोहीं डोळां । पाहावें विश्वरूपा सकळा । तो श्रीकृष्णें सोहळा । पुरविला ऐसा ॥९६॥ [इतः पंचभिः श्लोकैः समग्रां श्रियमाह]

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् ।

अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ॥ १० ॥

[अनेकवक्त्रनयनं 'शृंगाररसः'] मग तेथ सैंघें [२४]देखे वदनें । जैसीं रमानाय-

---

* ते चराचरें. † उघडी.

१ किरणांच्या योगानें. २ नीट, स्वच्छ. ३ मूळस्वरूपानें. ४ श्रीकृष्णानें. ५ भीत भीत. ६ स्तुति करूं इच्छिणाऱ्या ध्रुवाला. ७ गाल. ८ स्पर्शिलें. ९ उपदेश. १० उजाडलें. ११ समुद्रमय. १२ समुदायांत. १३ ब्रह्मापर्यंत. १४ कोणीकडे. १५ जागा झालेल्याला. १६ अथवा. १७ नक्षत्रसमूह. १८ वृत्ति. १९ स्तब्धतेला. २० ताटस्थ्य, लक्ष. २१ आवडीनें. २२ मेघ. २३ या ज्ञानदृष्टीनें. २४ पुष्कळ.

काचीं राजभुवनें । नाना प्रगटलीं निधानें । लावण्यश्रियेचीं ॥ ९७ ॥ कीं आनंदाचीं वनें [१]सासिन्नलीं । जैसी सौंदर्या राणीव जोडली । तैसीं मनोहरें देखिलीं । हरीचीं वक्त्रें तेणें ॥ ९८ ॥ तयाहीमाजि एकैकें । [२]सोवियाचि भयानकें । काळरात्रीचीं [३]कटकें । उठावलीं जैसीं ॥ ९९ ॥ कीं मृत्यूसीचि मुखें जाहालीं । हो कां जे भयाचीं दुर्गें पन्नासिलीं । कीं महाकुंडें उघडलीं । प्रळयानळाचीं ॥ २०० ॥ तैसीं अद्भुतें भयासुरें । तेथ वदनें देखिलीं वीरें । आणिकें असाधारणें साळंकारें । सौम्यें बहुतें ॥ १ ॥ पैं ज्ञानदृष्टीचेनि अवलोकें । परि वदनाचा शेवटु [४]नं टके । मग लोचन ते कवतिकें । लागला पाहों ॥ २ ॥ तंव नानावर्णें कमळवनें । विकासिलीं तैसे अर्जुनें । नेत्र देखिलें *[५]पालिंगनें । आदित्यांचीं ॥ ३ ॥ तेथेंचि कृष्णमेघाचिया दाटी । माजि कल्पांत विजूचिया फुटी । तैसिया वन्हिपिंगळा[६] दिठी । [७]भ्रूभंगातळीं ॥ ४ ॥ [अनेकाद्भुतदर्शनं] हें एकैक आश्चर्य पाहातां । तिये एकेचि रूपीं पांडुसुता । दर्शनाची अनेकता । प्रतिफळली ॥५॥ मग म्हणे चरण ते कवणेकडे । केउते [१२]मुकुट कें दोदेंडें । ऐसी वाढविताहे कोडें । चाड देखावयाची ॥ ६॥ तेथ भाग्यनिधि पार्था । कां विफलत्व होईल मनोरथा । काय †[१३]पिनाकपाणीचिया भाता । ‡[१४]वायकांडीं आहाती ॥ ७ ॥ ना तरी [१५]चतुराननाचिये वाचे । काय आहाती लटिकिया अक्षरांचे सांचे । म्हणोनि साद्यंतपण अपाराचें । देखिलें तेणें ॥ ८ ॥ जयाची सोय [१६]वेदां नाकळे । तयाचे सकळावयव एकेचि वेळे । अर्जुनाचे दोन्ही डोळे । भोगिते जाहाले ॥ ९ ॥ [१७]चरणौनी मुकुटवरी । देखत विश्वरूपाची थोरी । [अनेकदिव्याभरणं] जे नाना रत्न अळंकारीं । भिरवत असे ॥ २१० ॥ परब्रह्म आपुलेनि आंगें । त्यावया जाहाला आपणचि [१९]अनेगें । तियें [२०]लेणीं मी सांगें । काइसयासारिखीं ॥ ११ ॥ जिये प्रभेचिये [२१]झळाळा । [२२]उजाळू चंद्रादित्यमंडळा । [२३]जे महातेजाचा जिव्हाळा । जेणें विश्व प्रगटे ॥ १२ ॥ तो दिव्यतेजशृंगार । कोणाचिये मतीसी होय गोचर । देव आपणपेंचि लेइले ऐसें वीर । देखत असे ॥ १३ ॥ [दिव्यानेकाद्यतायुधं] मग तेथेंचि ज्ञानाचिया डोळां । §पहात [२४]करपल्लवां जंव सरळा । तंव तोडित कल्पांतीचिया ज्वाळा । तैसीं शस्त्रें झळकत देखे ॥ १४ ॥ आपण आंग आपण अळंकार । आपण हात आपण हतियार । आपण जीव आपण शरीर । देखे

---

* पालेगनें. † पिनाकपाणियाचा. ‡ वायकांड. § पाहातां.

---

१ भरास आलीं. २ सहज. ३ सैन्यें. ४ शृंगारिलीं, रचिलीं. ५ पहाण्यानें. ६ न लागे. ७ समुदाय. ८ विकास. ९ पिंगट. १० भिवयांखालीं. ११ अनुभवास आली. १२ बाहू. १३ महादेवाच्या भात्यांत. १४ निष्फळ बाण. १५ ब्रह्मदेवाच्या. १६ मार्ग. १७ न सांपडे. १८ चरणांपासून. १९ पुष्कळ, अनेक. २० अलंकार. २१ प्रकाशानें. २२ प्रकाशवान. २३ प्रभा. २४ हस्ताग्रांस.

चराचर कोंदलें देवें ॥ १५ ॥ जयाचिया किरणाचे[1] निखरेपणें । नक्षत्रांचे होत फुटाणे । तेजें खिरडला[2] वन्हि ह्मणे । समुद्रीं रिघों ॥ १६ ॥ मग काळकूट-कल्होळीं कवळिले । नानामहाविजूंचे[3] दींग उमटले । तैसे अपार कर देखिले । उद्यतायुधीं[4] ॥ १७ ॥

दिव्यमाल्यांबरधरं दिव्यगंधानुलेपनम् ।
सर्वाश्चर्यमयं देवमनंतं विश्वतोमुखम् ॥ ११ ॥

[दिव्यमाल्यांबरधरं] कीं भेणें[5] तेथूनि काढिली दिठी । मग कंठमुगुट पाहातसे किरीटी । तंव सुरतरूची सृष्टी । जयापासोनि कां जाहाली ॥ १८ ॥ जियें महासिद्धीचीं मूळपीठें । शिणली कैमळा जेथ[6] वावटे । तैसीं कुसुमें अतिचोखटें[7] । तुरंबिलीं[8] देखिलीं ॥ १९ ॥ मुगुटावरी स्तबक[9] । ठायीं ठायीं पूजाबंध अनेक । कंठीं रुळताति[10] अलौकिक । माळादंड[11] ॥ २२० ॥ स्वर्गे सूर्यतेज वेढिलें[12] । जैसें पंथरेनें[13] मेरुतें मढिलें[14] । तैसें नितंबावरी[15] गोंढिलें[16] । पीतांबर झळके ॥ २१ ॥ [दिव्यगंधानुलेपनं] श्रीमहादेव कापुरें उटिला । कां कैलास *पारदें[17] डवरिला[18] । नाना क्षीरोदकें[19] पांघरविला । क्षीरार्णव जैसा ॥ २२ ॥ जैसी †चंद्रमयाची[20] घडी उपलविली[21] । मग गगनाकरवीं[22] बुंथी[23] घेवविली । तैसी चंदन पिंजरी[24] देखिली । सर्वांगीं तेणें ॥ २३ ॥ ‡जेणें[25] स्वप्रकाशा कांती चढे । ब्रह्मानंदाचा निर्दोष[26] मोडे । जयाचेनि सौरभ्यें जीवित जोडे । वेदवतीये[27] ॥ २४ ॥ §जयाचे निर्लेप अनुलेप करी । जें[28] अनंगही[29] सर्वांगीं धरी । तया सुगंधाची थोरी । कवण वर्णी[30] ॥ २५ ॥ [सर्वाश्चर्यमयं देवं] ऐसी एकैक शृंगारशोभा । पाहातां अर्जुन जातसे क्षोभा[31] । तेवींचि देव बैसला कीं उभा । ¶कीं सन्मुख हें नेणवे ॥ २६ ॥ बाहेर दिठी उघडूनि पाहे । तंव आघवें मूर्तिमय देखत $आहे । मग आतां न पाहें ह्मणोनि उगा राहे । तरी आंतही तैसेंचि ॥ २७ ॥ अनावर[32] मुखें समोर देखे । तया भेणें पाठीमोरा जंव ठाके । तंव तयाहीकडे श्रीमुखें । कर चरण तैसेचि ॥ २८ ॥ अहो पाहातां कीर प्रतिभासे । एथ नवलावो[33] काय असे । परि न पाहातांही दिसे । चोज[34] आइका ॥ २९ ॥ कैसें अनुग्रहाचें[35] करणें । पार्थाचें पाहाणें आणि न पाहणें । तयाही सकट ना-

---

* पारजें. † चंद्रम्याची. ‡ तेणें. §जयाचेनि लेप. ¶कीं शयालु हें. $ जाये.

---

१ तीव्रपणानें. २ मागें हटला. ३ अरण्य. ४ उचलेल्या आयुधांसहित. ५ भयानें. ६ आद्यस्थानें. ७ लक्ष्मी. ८ विश्रांति पावे. ९ चांगलीं. १० मस्तकावर ठेविलीं. ११ घोस. १२ शोभतात. १३ पुष्पमाला. १४ सोन्यानें. १५ कटिप्रश्चाद्भागावर. १६ नेसविलें. १७ पान्यानें. १८ लिंपला. १९ पांढऱ्या वस्त्रानें. २० चांदिण्याची. २१ उकलिली. २२ खोळ, बुरखा. २३ उटी. २४ दाह. २५ पृथ्वीस. २६ ब्रह्म.२७ शरीररहित. २८ वर्णन करी.२९ अशांततेस.३० आवरण्यास अशक्य. ३१ आश्चर्य. ३२ नवल. ३३ कृपेचें.

रायणें । व्यापूनि[6] घेतलें ॥ २३० ॥ ह्मणोनि आश्चर्याच्या पुरीं[7] एकीं । पडिला ठायेंठाव[8] तैडीं[9] ठाकी । तंव चमत्काराचिया आणिकीं । महार्णवीं पडे ॥ ३१ ॥ [अनंतं विश्वतोमुखं] ऐसा अर्जुन असाधारणें । आपुलिया दर्शनाचेनि विंदाणें[10] । कवळूनि[11] घेतला तेणें । अनंतरूपें ॥ ३२ ॥ तो[12] विश्वतोमुख स्वभावें । आणि तेंचि दावावयालागीं पांडवें । प्रार्थिला आतां आघवें । होऊनि ठेला ॥ ३३ ॥ आणि दीपें कां सूर्यें प्रगटे । अथवा निर्मुटलिया देखावेंचि खुंटे । तैसी दिठी नव्हे जे वैकुंठें[13] । दिधली आहे ॥ ३४ ॥ ह्मणोनि किरीटीसि दोहीं परी । *ते देखणें देखें[14] आंधारीं[15] । हें संजय हस्तिनापुरीं । सांगतसे राया ॥ ३५ ॥ ह्मणे किंबहुना अवधारिलें । पार्थें विश्वरूप देखिलें । नाना आभरणीं भरलें । विश्वतोमुख ॥ ३६ ॥

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।
यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ॥१२॥

[दिवि सूर्येति] तिये अंगप्रभेचा देवो[16] । नवलावा कौंइसयाऐसा सांगावा[17] । कल्पांतीं एकचि मेळावा । द्वादशादित्यांचा होय ॥ ३७ ॥ तैसे ते दिव्यसूर्य सहस्रवरी । जरी उदयजती कां एकेचि अवसरीं । तऱ्ही तया तेजाची थोरी । उपमूं नये ॥३८॥ आघवयाचि विजूंचा मेळावा कीजे । आणि प्रळयाग्नीची सर्व सामग्री आणिजे । तेवींचि दशकही[18] मेळविजे । महातेजांचा ॥ ३९ ॥ [यदि भाः सदृशीति] तऱ्हीं तिये अंगप्रभेचेनि पाडें[19] । हें तेज कांहीं कांहीं होईल थोडें । आणि तया ऐसें कीर चोखडें । त्रिशुद्धी नोहे ॥ २४० ॥ ऐसें माहात्म्य या श्रीहरीचें सहज । फांकतसे सर्वांगींचें तेज । तें मुनिकृपा[20] जी मज । दृश्य जाहालें ॥ ४१ ॥

तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ।
अपश्यद्देवदेवस्य शरीरे पांडवस्तदा ॥ १३ ॥

[तत्रेति] आणि तिये विश्वरूपीं एकीकडे । जग आघवें आपुलेनि पवाडें[21] । जैसे महोदधीमाजि बुडबुडे । सिनाने[22] दिसती ॥ ४२ ॥ कां आकाशीं [18]गंधर्वनगर । भूतळीं पिपीलिका बांधे घर । ना ना मेरुवरी सपुर[19] । परमाणु जैसे ॥ ४३ ॥ [अपश्यदिति] विश्व आघवेंचि तयापरी । तिया देवचक्रवर्तीचिया शरीरीं । अर्जुन तिये अवसरीं । देखता जाहाला ॥ ४४ ॥

---

* तें देखावेंचि पडताहे.

---

१ पूरांत, प्रवाहांत. २ तत्काळ. ३ तीरीं. ४ विशेषेंकरून. ५ कलेनें, कौशल्यानें. ६ व्यापून. ७ सर्वव्यापी ईश्वर. ८ झांकली असतां. ९ कृष्णानें. १० उजेडांत. ११ हे राजन्. १२ कशासारखा. १३ दश संख्यारूप आवरणाग्नि. १४ योग्यतेनें. १५ व्यासाच्या कृपेनें. १६ विस्तारानें. १७ निरनिराळे. १८ मेघावरणावर कल्पित नगर. १९ बारीक.

ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजयः ।
प्रणम्य शिरसा देवं कृतांजलिरभाषत ॥ १४ ॥

[तत इत्यर्धं, अत्राष्टविधसात्विकान्भावानाह—"स्तंभः स्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्विका मताः"] **तेथ एक विश्व एक आपण । ऐसें अळुमाळु होतें जें दुजेपण । तेंही आटोनि गेलें अंतःकरण । विरालें सहसा ॥ ४५ ॥** ['स्वरभंगः'] **आंतु*आनंदा चेइरें जाहालें । ['स्तंभः'] बाहेरि गात्रांचें बळ हारपोनि गेलें । ['रोमांचः'] आपाद पां गुंतलें । पुलकांचलें ॥ ४६ ॥ वार्षिये प्रथमदशे । वोहळलया शैलांचें सर्वांग जैसें । विरूढे कोमलांकुरीं तैसे । रोमांच जाहाले ॥ ४७ ॥** ['स्वेदः'] **शिवतला चंद्रकरीं । सोमकांत द्राव धरी । तैसिया स्वेदकणिका शरीरीं । दाटलिया ॥ ४८ ॥** ['वेपथुः'] **माजि सांपडलेनि अलिंडळें । जळावरी कमळकळिका जेविं आंदोळे । तेविं आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें । बाहेरि कांपे ॥ ४९ ॥** ['अश्रुः'] **†कर्पूरकर्दळीचीं गर्भपुटें । उकलतां कापुराचेनि कोंदाटें । ‡पुळिका गळती तेविं थेंबुटे । नेत्रौनि पडती ॥ २५० ॥** ['वैवर्ण्यं'] **उदयलेनि सुधाकरें । जैसा भरलाचि समुद्र भरे । तैसा वेळोवेळां ऊर्मिभरें । उचंबळत असे ॥५१॥** ['प्रलयः'] **ऐसा सात्विकांहीं आठां भावां । परस्परें वर्ततसे हेवा । तेथ ब्रह्मानंदाची जीवा । राणीव फावली ॥ ५२ ॥** [प्रणम्येति] **तैसाचि तया सुखानुभवापाठीं । केला द्वैताचा सांभाळ दिठी । मग उसंसोनि किरीटी । वासि पाहिली ॥ ५३ ॥ §तेथ बैसला होता जियो सवा । तियाचिकडे मस्तक खालाविला देवा । मग जोडूनि करसंपुट बरवा । बोलत असे ॥ ५४ ॥** [पश्यामीति चतुर्भिः श्लोकैः समग्रं यश आह]
अर्जुन उवाच—

पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसंघान् ।
ब्रह्माणमीशं कमलासनस्थमृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान् ॥१५॥

[अर्जुन उवाच—पश्यामि देवांस्तव देव देहे 'अद्भुतरसः'] **म्हणे जयजयाजी स्वामी । नवल कृपा केली तुह्मी । जें हें विश्वरूप कीं आह्मी । ¶प्राकृत देखों ॥ ५५ ॥ परि साचचि भलें केलें गोसाविया । मज परितोष जाहाला सोविया । जी देखिलासि जो इया । सृष्टीसि तूं आश्रय ॥ ५६ ॥ देवा मंदराचेनि अंगलगें ।**

---

* महाआनंदा. † कर्पूरकेळीचेनि. ‡ फुलिंगा. § जेथ. ¶ प्राकृतें.

---

१ कांहींसें. २ जागेपण. ३ रोमांचांनीं. ४ ओहळून गेल्यावर. ५ पर्वतांचें. ६ घामाचे बिंदु. ७ भ्रमरसमुदायानें. ८ हाले, आपटे. ९ कापुरकेळीचीं. १० गाभ्याचे पडदे. ११ दाट भरणीनें. १२ अंश, शिंतोडे. १३ डोळ्यांवाटे. १४ चंद्रानें. १५ लाटांनीं. १६ राज्य प्राप्त झालें. १७ स्वस्थपणानें. १८ वाट. १९ ज्या बाजूस, ज्यासह. २० सामान्य. २१ संतोष. २२ सहज. २३ संबंधानें.

ठायीं ठायीं श्वापदांचीं[1] दाटणें. तैसीं इयें तुझ्या देहीं अनेगें. देखतसें भुवनें ॥ ५७ ॥ अहो आकाशाचिये[2] खोळे. दिसती ग्रहगणांचीं कुळें. कां महावृक्षीं *अविसाळें. पक्षिजातीचीं ॥ ५८ ॥ तयापरी श्रीहरी. तुझिया विश्वात्मकीं इये शरीरीं. स्वर्ग देखतसें अवधारीं. सुरगणेंसीं ॥ ५९ ॥ [सर्वीस्तथा भूतविशेषसंघान्] प्रभु महाभूतांचें पंचक. येथ देखत आहें अनेक. आणि भूतग्राम[5] एकेक. भूतसृष्टीचे ॥ २६० ॥ [ब्रह्माणमीशं कमलासनस्थं] जी सत्यलोक तुजमाजि आहे. देखिला चतुरानन[6] हा नोहे. आणि येरीकडे जंव पाहे. तंव कैलासही दिसे ॥ ६१ ॥ श्रीमहादेव भवानियेसीं. तुझ्या †दिसतसे एके अंसीं. आणि तूतेंही गा हृषीकेशी. तुजमाजि देखें ॥ ६२ ॥ [ऋषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान्] पैं कश्यपादिऋषिकुळें. इयें तुझिया स्वरूपीं सकळें. देखतसें पाताळें. पन्नगेंसीं ॥ ६३ ॥ किंबहुना त्रैलोक्यपती. तुझिया एकेकाचि अवयवाचिये भिंती. इयें चतुर्दशभुवनें चित्राकृती. अंकुरलीं जाणों ॥ ६४ ॥ आणि तेथिंचे जे जे लोक. ते चित्ररचना जी अनेक. ऐसें देखतसें अलोलिक. गांभीर्यें[15] तुझें ॥ ६५ ॥

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनंतरूपम्।
नांतं न मध्यं न पुनस्तवादिं पश्यामि विश्वेश्वर विश्वरूपम् १६

[अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं] या दिव्यचक्षूचेनि पैसें[17]. चहूंकडे जंव पाहत असें. तंव दोर्दंडिकां[18] जैसें. आकाश कोंभिलें[19] ॥ ६६ ॥ तैसे ‡एकचि निरंतर. देवा देखत असें तुझे कर. करीत आघवेचि व्यापार. एकेचि काळीं ॥ ६७ ॥ मग महाशून्याचेनि पैसारें[20]. उघडलीं ब्रह्मकटाहाचीं भांडारें. तैसीं देखतसें अपारें. उदरें तुझीं ॥ ६८ ॥ जी सहस्रशीर्षयाचे §दाखले. कोटीवरी होतांति एकीवेळे. कीं परब्रह्मचि वदनफळें. ¶मोडोनि[16] आलें ॥ ६९ ॥ तैसीं वक्त्रें जेउतीं तेउतीं. तुझीं देखतसें विश्वमूर्ती. आणि तयाचिपरी नेत्रपंक्ति. अनेका सैंधर्व[21] ॥ २७० ॥ [त्वां सर्वतोऽनंतरूपं] हें असो स्वर्गपाताळ. कीं भूमी दिशा अंतराळ. हे विवंक्षा ठेली सकळ. मूर्तिमय देखतसें ॥ ७१ ॥ तुजवीण एकादियाकडे. परमाणूहि एंतुला[22] कोंडे. अवकाश पाहातसें परि न सांपडे. ऐसें व्यापिलें तुवां ॥ ७२ ॥ इयें $नानापरी अपरिमितें. जेतुलीं सांठविलीं होतीं महाभूतें. तेतुलाही पैवाड[23] तुवां

---

* आमिसाळें. † देखत आहे, दिसत आहें. ‡ एकैक. § देखिलें. ¶ मांडोनि. $ नानाभूतीं.

---

१ अरण्यें. २ डेऱ्यांत. ३ समुदाय. ४ घरटीं. ५ प्राणिमात्र. ६ ब्रह्मदेव. ७ पार्वतीसह. ८ सर्पांसह. ९ चितारलीं. १० अगाधपण. ११ मार्गानें. १२ बाहुदंडांत. १३ उपजलें, कोंदलें. १४ केवळ ब्रह्माचे. १५ विस्तारानें. १६ भरभराडून. १७ जेवढीं, तेवढीं. १८ पुष्कळ. १९ बोलण्याची इच्छा. २० एवढा. २१ विस्तार.

विचार

अनंतें । कोंदला[1] देखतसें ॥ ७३ ॥ ऐसा कवणेठायाहूनि तूं आलासी । एथ बैसलासि कीं उभा आहेसी । आणि कवणिये मायेचिये पोटीं होतासी । तुझें ठाण[2] केवढें ॥ ७४ ॥ तुझें रूप वय कैसें । तुज पैलीकडे काय असे । तूं कायिसयावरी आहासि ऐसें । पाहिलें मियां ॥७५॥ तंव देखिलें जी आघवेंचि । तरि आतां तुझा ठाव तूंचि । तूं कवणाचा नव्हेसि ऐसाचि । अनादि[3] आयता ॥ ७६ ॥ तूं उभा ना बैठा । दिंधडा[4] ना खुंजटा । तुज तळीं वरी वैकुंठा । तूंचि आहासी ॥ ७७ ॥ तूं रूपें आपणयांचि ऐसा । देवा तुझी तूंचि वयसा । पाठी पोट परेशा । तुझें तूं गा ॥७८॥ किंबहुना आतां । तुझें तूंचि आघवें अनंता । हें पुढतपुढती पाहातां । देखिलें मियां ॥ ७९ ॥ [नांतं न मध्यं न पुनस्तवादिं] परि या तुझिया रूपा आंत । जी उणीव एक असें देखत । जे आदि मध्य अंत । तीन्ही नाहीं ॥ २८० ॥ येन्हवीं गिंवसिलें[5] आघवाठायीं । परि सोय[6] न लाहेचि कहीं । ह्मणोनि त्रिशुद्धी हे नाहीं । तिन्ही एथ ॥ ८१ ॥ एवं आदिमध्यांतरहिता । [पश्यामि विश्वेश्वर विश्वरूपं] तूं विश्वेश्वरा अपरिमिता । देखिलासि जी तत्त्वता । विश्वरूपा ॥ ८२ ॥ तुज महामूर्तीचिया आंगीं । उमटलिया पृथक् मूर्ती अनेगी । लेइलासि वानेपरिची[7] आंगी । ऐसा *आंवडतु[8] आहासी ॥ ८३ ॥ नाना पृथक् मूर्ती तिया द्रुमवल्ली[9] । तुझिया स्वरूपमहाचळीं । दिव्यालंकार फुलीं फळीं । सासिन्नलियां[10] ॥ ८४ ॥ हो कां जे महोदधी तूं देवा । जाहालासि तरंगमूर्तीहेलावा । कीं तूं एक वृक्ष बरवा । †मूर्तिफळीं फळलासी ॥ ८५ ॥ जी भूतीं भूतळ मांडिलें[11] । जैसें नक्षत्रीं गगन गुंढारलें[12] । तैसें मूर्तिमय भरलें । देखतसें तुझें रूप ॥ ८६ ॥ जी एकेकीच्या अंगप्रांतीं[13] । होय जाय हे त्रिजगती[14] । एवढिया ही तुझ्या आंगीं मूर्ती । कीं रोमां जालिया[15] ॥ ८७ ॥ ऐसा पवाड[16] मांडूनि विश्वाचा । तूं कवण पां एथ कोणाचा । हें पाहिलें तंव आमुचा । सारथी तोचि तूं ॥८८॥ तरि मज पाहातां मुकुंदा । तूं ऐसाचि व्यापक सर्वदा । मग भक्तानुग्रहें तया[17] मुग्धा । रूपातें धरिसी ॥ ८९ ॥ कैसें चहूं भुजांचें सांवळें । पाहातां वोल्हावती[18] मन डोळे । ‡खेंव[19] देऊं जाइजे तरि आकळे[20] । दोहींचि बाहीं ॥ २९० ॥ ऐसी मूर्ति कोडिसवाणी[21] कृपा । करूनि §होसी ना विश्वरूपा । कीं आमुचियाचि दिठीचा[22] लेपा । जे सौमान्यत्वें[23] देखती ॥ ९१ ॥ तरि आतां दिठीचा विटाळु गेला । तुवां सहजें दिव्यचक्षू केला । ह्मणोनि यथारूपें[24] देखवला । महिमा तुझा ॥ ९२ ॥ परि

* अवघडतु. † मूर्तिकफळीं. ‡ खेंव देवूं. § होसी गा.

१ व्यापिला. २ स्थान, आकृति. ३ जन्मरहित. ४ दीर्घ. ५ लघु. ६ शोधिलें. ७ सर्व ठिकाणीं. ८ पत्ता लागत नाहीं. ९ अनेक प्रकारचे रंग. १० वाटतो आहेस. ११ वृक्ष व वेली. १२ भरास आल्या. १३ आच्छादिलें, व्यापिलें. १४ अंगप्रदेशांत. १५ त्रैलोक्य. १६ केसांत झाल्या, त्या मूर्तिच रोम झाल्या. १७ विस्तार. १८ तें मुग्ध सगुण अशा. १९ शांत होती. २० आलिंगन. २१ सांपडे. २२ लहान. २३ मलिन दृष्टीला. २४ साधारणपणानें. २५ सांग, नखशिखाग्र.

मकरतुंडामागिलेकडे । होतासि तोचि तूं एवढें । रूप जाहालासि *हें फुडें । वोळखिलें मियां ॥ ९३ ॥

किरीटिनं गदिनं चक्रिणं च तेजोराशिं सर्वतो दीप्तिमंतम् ।
पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समंताद्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥१७॥

[किरीटिनं गदिनं चक्रिणं च] नोहे तोचि हा शिरीं । मुकुट लेइलासि श्रीहरी । परि आतांचें तेज आणि थोरी । नवल कीं बहु हें ॥ ९४ ॥ तेंचि हें वरिलीयेचि हातीं । चक्र परिजितया आयती । सांवरितासि विश्वमूर्ती । ते न मोडे खुण ॥ ९५ ॥ येरीकडे तेचि हे नोहे गदा । आणि तळिलिया दोनी भुजा निरायुधा । †वांगोरे सांवरावया गोविंदा । संसरिलिया ॥ ९६ ॥ आणि तेणेंचि वेगें सहसा । माझिया मनोरथासरिसा । जाहालासि विश्वरूपा विश्वेशा । ह्मणोनि जाणें ॥ ९७ ॥ [तेजोराशिं सर्वतो दीप्तिमंतं] परि कायसें बा हे चोजे । विस्मय करावयाहि ‡पाड नाहीं मज । चित्त होऊनि जातसे निर्बुजे । आश्चर्यें येणें ॥ ९८ ॥ हें एथ आथी कां येथ नाहीं । §ऐसें ~~आसीं~~ही नये कांहीं । नवल अंगप्रभेची नवाई । कैसी कोंदली सैंघे ॥ ९९ ॥ [दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयं] एथ अग्नीचीही दिठी करपत । सूर्य खद्योत तैसा हारपत । ऐसें तीव्रपण अद्भुत । तेजाचें यया ॥ ३०० ॥ ¶हो कां महातेजाचिया महार्णवीं । बुडोनि गेली सृष्टि आघवी । कीं युगांतविजूंच्या पालवीं । झांकलें गगन ॥ १ ॥ ना तरी संहारतेजाचिया ज्वाळा । तोडोनि मोंच बांधला अंतराळां । [दुर्निरीक्ष्यं] आतां दिव्यज्ञानाचिया डोळां । पाहवेना ॥ २ ॥ उज्वळ अधिकाधिक बहुवस । धडाडीत आहे अतिदाहस । पडत दिव्यचक्षूसही त्रास । न्याहाळितां ॥ ३ ॥ हो कां जे महाप्रळयींचा भेडाड । होता कालाग्निरुद्राचियाठायीं गूढ । तो तृतीयनयनाचा मेढे । फुटला जैसा ॥ ४ ॥ तैसें पसरलेनि प्रकाशें । सैंव $पांचवनिचेया ज्वाळांचे वेळसे । पडतां ब्रह्मकटाह ||कोळिसे । होत आहाती ॥ ५ ॥ [पश्यामि त्वां] ऐसा अद्भुत तेजोराशी । जन्मा नवल म्यां देखिलासि । नाहीं +व्यासी आणि कांतीसी । पार जी तुझिये ॥ ६ ॥

---

* हें पुढें. † वागारे. ‡ पवाड. § ऐसें विवरों न ये कांहीं. ¶ कां जे. $ पांचवह्निचेया, पांचवनिया. || कोळसे. + व्यासीसी.

---

१ मगराच्या तोंडाच्या आकाराचा रथाचा भाग, रथचिन्ह. २ खरें. ३ घोड्याचे वाग्दोर, लगाम. ४ सरसावल्या. ५ नवल. ६ योग्यता. ७ थक्क, मोहित. ८ चमत्कार. ९ बहुत. १० काजवा. ११ पदरांनीं. १२ माचा, माळा, लांकडें ठेवण्याकरितां मंडपाकार करतात तो. १३ भडभडाट. १४ गुत. १५ कलिका. १६ फुलला. १७ हे पंचाग्नि=प्रलयानल, विद्युदनल, वडवानल, शिवनेत्रानल, व द्वादशादित्यानल यांच्या. १८ वेढे.

त्वमक्षरं परमं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥१८॥
अनादिमध्यांतमनंतवीर्यमनंतबाहुं शशिसूर्यनेत्रम् ।

[त्वमव्यय इति] देवा तूं अक्षर । औटाविये[1] मात्रेसि पर । श्रुती जयाचें घर । *गिंवसीत[2] आहाती ॥ ७ ॥ जें आकाराचें आयतन[3] । जें विश्वनिक्षेपैक-निधान । [त्वमस्य विश्वस्य परं निधानं] तें अव्यय तूं गहन । अविनाश जी ॥ ८ ॥ तूं धर्माचा वोलावा । अनादिसिद्ध तूं नित्य नवा । जाणें मी सैंतिसावा[4] । पुरुष विशेष तूं ॥ ९ ॥ [अनादिमध्यांतमनंतवीर्यं] तूं आदिमध्यांतरहित । स्वसामर्थ्यें तूं अनंत । विश्वबाहु अपरिमित । विश्वचरण तूं ॥ ३१० ॥ [शशिसूर्यनेत्रं] पैं चंद्र चंडांशु डोळां । दाविताति कोपप्रसाद लीळा । एकां रुससी तमाचिया डोळां । एकां पाळितोसि कृपादृष्टी ॥ ११ ॥ [पश्यामीत्यादिसार्धत्रयोदशभिः श्लोकैः समग्रं वैराग्यमाह]

पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं स्वतेजसा विश्वमिदं तपंतम् १९॥

[पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं] जी एवंविधा तूतें । मी †देखतसें हें निरुतें[5] । पेटलें प्रळयाग्नीचें उजितें[6] । तैसें वक्त्र हें तुझें ॥ १२ ॥ वणिवेनि पेटले पर्वत । कवळूनि ज्वाळांचे उभड[7] उठत । तैसी चाटीत दाढा ‡दांतांत । जीभ लोळे ॥ १३ ॥ [स्वतेजसा विश्वमिदं तपंतं] इये वदनींचिये उंबा[8] । आणि जी सर्वांगकांतीचिया प्रभा । विश्व तेंतिलें[9] अति क्षोभा । जात आहे ॥ १४ ॥

द्यावापृथिव्योरिदमंतरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः ।
दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ॥ २० ॥

[द्यावापृथिव्योरिति] कां जे द्यौलोक[10] आणि पाताळ । पृथिवी आणि अंतराळ[11] । अथवा दशदिशा समाकुळ । §दिशाचक्र ॥ १५ ॥ हें आघवेंचि तुवां एकें । भरलें देखत आहें कौतुकें । परि गगनाही सकट भयानकें । आप्रुविजे जेवीं[12] ॥ १६ ॥ [दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं] ना तरी अद्भुतरसाचिया कल्होळीं[13] । जाहाली चवदाही भुवनासि[14] कंडियाळी[15] । तैसें आश्चर्यच मग मी आकळीं । काय एक ॥ १७ ॥ नावरे व्याप्ती हे असाधारण । न साहवे रूपाचें उग्रपण । सुख दूरी गेलें परी प्राण । विपायें[16] धरी जग ॥ १८ ॥ देवा ऐसें देखोनि तूतें । नेणों कैसें आलें भयाचें भरितें । [लोकत्रयं प्रव्यथितं महा-

---

* गिवसिताती. † देखत आहें. ‡ दांतांआंत. § तेजचक्र.

---

१ साडितीन मात्रांच्या पलीकडे. २ शोधितात. ३ घर. ४ ठेवण्याचा एक ठेवा. ५ छत्तिस तत्वांहून पर. ६ सूर्य. ७ खरें. ८ लखलखाट. ९ उमाळे. १० उबाऱ्यानें. ११ पोळलें. १२ स्वर्ग. १३ अंतरिक्षलोक. १४ बुडविजे. १५ वेष्टण, माळ. १६ क्वचित्, कष्टानें.

त्मन्] आतां दुःखकल्लोळीं झळंबतें। तीन्हीं भुवनें ॥ १९ ॥ येन्हवीं तुज महात्मयाचें देखणें। *तरि भयदुःखासि कां मेळवणें। परि हें सुख नव्हेचि जेणें गुणें। तें जाणवत आहे मज ॥ ३२० ॥ जंव तुझें रूप नोहे दिठें। तंव जगासि संसारिक गोमटें। आतां देखिलासि तरी विषयविटें। उपजला त्रास ॥ २१ ॥ तेवींचि तुज देखिलियासाठीं। काय †सहसा तुज देवों येईल मिठी। आणि नेदीं तरी शोकसंकटीं। राहों केविं ॥ २२ ॥ ह्मणोनि मागां सरों तंव संसार। अडवीत येतसे अनिवार। आणि पुढां तूं तंव अनावर। नयेसि घेवों ॥ २३ ॥ ऐसा माझारिलिया सांकडां। बापुडया त्रैलोक्याचा ‡होतसे हुंरडा। ऐसा हा ध्वनी जी फुंडा। चोजवंला मज ॥ २४ ॥ जैसा आरंबळला आगीं। तो समुद्रा ये निवावयालागीं। तंव कल्लोळपाणियांचिया तरंगीं। आंगळा बिहे ॥ २५ ॥ तैसें या जगासि जाहालें। तूतें देखोनि तळमळित ठेलें ॥

अमी हि त्वां सुरसंघा विशंति केचिद्भीताः प्रांजलयो गृणंति।
स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसंघाःस्तुवंति त्वां स्तुतिभिःपुष्कलाभिः

['भयानकरसः' अमी हि त्वां सुरसंघाः विशंति] §यामाजि पैल भले। ¶सुरांचे मेळावे ॥ २६ ॥ हे तुझेनि आंगिकें तेजें। जाळूनि सर्वकर्मांचीं बीजें। मिळत तुजआंत निजें। सद्भावेसीं ॥ २७ ॥ [केचिद्भीताः प्रांजलयो गृणंति] आणिक एक सांवियाचि भेंयभीरु। सर्वस्वें धरूनि तुझी मोहरु। तुज प्रार्थितातिं करुं। जोडोनियां ॥ २८ ॥ देवा अविद्यार्णवीं पडिलों। जी विषयवासुरें आंतुडलों। स्वर्गसंसाराचिया सांकेडलों। दोहीं भागीं ॥ २९ ॥ ऐसें आमुचें सोडवणें। तुजवांचोनि कीजेल कवणें। तुज शरण गा सर्वप्राणें। ह्मणत देवा ॥ ३३० ॥ [स्वस्तीति] आणि महर्षी अथवा सिद्ध। विद्याधरसमूह विविध। हे बोलत तुज स्वस्तिवाद। करिती स्तवन ॥ ३१ ॥

रुद्रादित्या वसवो ये च साध्या विश्वेश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च।
गंधर्वयक्षासुरसिद्धसंघा वीक्षंते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ॥ २२ ॥

[रुद्रादित्या इति] हे रुद्रादित्यांचे मेळावे। वसु हन साध्य आघवे। अश्विनौ देव $विश्वेदेव विभवें। वायुही हे जी ॥ ३२ ॥ अवधारा ||पितर [गंधर्वयक्षासुरसिद्धसंघाः] हन गंधर्व। पैल यक्षरक्षोगण सर्व। जी महेंद्र-

---

* भयदुःखासि दुरावणें. † सहसा देवों. ‡ होत हुरडा. § ययांमाजि. ¶ ज्ञानसुरांचे. $ विश्वे. || अग्नि आणि गंधर्व.

---

१ बुडतात, विरघळतात. २ भासत. ३ दृष्टिगोचर. ४ संसारिक सुख. ५ जन्ममरण. ६ मधल्या कचाटींत. ७ भाजणूक. ८ संशय. ९ स्पष्ट. १० वाटला. ११ पोळला. १२ लाटा, खळाळ. १३ जास्ती भितो. १४ समुदाय. १५ सहजच. १६ भयभीत. १७ मार्ग. १८ हात. १९ विषयजाळ्यांत. २० सांपडलों. २१ पेंचांत पडलों. २२ कल्याणकारक भाषण. २३ वैभवानें. २४ इंद्रादिक.

मुख्य देव । कां सिद्धादिक ॥ ३३ ॥ [वीक्षंते त्वां विस्मिताश्चैव सर्वे] हे आघवेचि आपुलालिया लोकीं । उत्कंठित अवलोकीं । हे महामूर्ती दैविकी[1] । पाहात आहती ॥ ३४ ॥ मग पाहत पाहत प्रतिक्षणीं । विस्मित होऊनि अंतःकरणीं । [स्तुवंति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः श्लो. २१] करित निजमुकुटीं वोवाळणी । प्रभुजी तुज ॥ ३५ ॥ ते जयजय घोष केलिरवें[2] । स्वर्गी गाजविती आघवें । ठेवित ललाटावरी बरवे । करसंपुट[3] ॥ ३६ ॥ तिये विनयद्रुमाचिये *अडवीं[4] । सुरवाडली सात्विकांची माधवी[5] । ह्मणोनि करसंपुटपल्लवीं । तूं होतासि फळ ॥ ३७ ॥

रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं महाबाहो बहुबाहूरुपादम् ।
बहूदरं बहुदंष्ट्राकरालं दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाऽहम् ॥२३॥

[रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं] जी लोचनां भाग्य उदेलें । मना सुखाचें सुयाणें[6] पाहलें । जे अगाध तुझें देखिलें । विश्वरूप इहीं ॥ ३८ ॥ हें लोकत्रयव्यापक रूपडें । पाहातां देवांही चाचक[7] पडे । याचें सन्मुखपण जोडे । भलतयाकडुनी ॥ ३९ ॥ ऐसें एकचि परि विचित्रें । आणि भयानक वक्त्रें । बहुलोचन [महाबाहो बहुबाहूरुपादं] †हे सशस्त्रें[8] । अनंतभुज ॥ ३४० ॥ अनंत ऊरु बाहु चरण । [बहूदरं बहुदंष्ट्राकरालं] बहूदर आणि नानावर्ण । कैसें प्रतिवदनीं मातलेपण । आवेशाचें ॥ ४१ ॥ हो कां महाकल्पाचिया अंतीं । तेवकलेनि यमें जेउतेतउतीं[9] । प्रळयाग्नीचीं उंजिती[10] । आंबुखिलीं[11] जैसीं ॥ ४२ ॥ ना तरी संहारत्रिपुरारीचीं यंत्रें । कीं प्रळयभैरवाचीं क्षेत्रें[12] । नाना युगांतशक्तीचीं पात्रें[13] । भूतांखिचा वोडविलीं[14] ॥ ४३ ॥ तैसीं जियेतियेकडे । तुझीं वक्त्रें जीं प्रचंडें । ‡न समाती दरीमाजि सिंहोडें[15] । तैसे §दशन दिसती रागिट ॥ ४४ ॥ जैसें काळरात्रीचेनि आधारें । उल्हासत निघती संहारखेचरें[16] । तैसिया वदनीं प्रळयरुधिरें । कांटलिया[17] दाढा ॥ ४५ ॥ हे असो काळें अवंतिलें[18] रण । कां सर्वसंहारें मातलें मरण । तैसें अतिभिंगुळवाणेंपण[19] । वदनीं तुझिये ॥ ४६ ॥ [दृष्ट्वा लोकाः प्रव्यथिताः] ¶हे बापडी लोक सृष्टी । $मोटकीयेचि पाहिली दिठी[20] । आणि दुःखकाळिंदीचिया तटीं । झाड होऊनि ठेली ॥ ४७ ॥ तुज महामृत्यूचिया सागरीं । आतां हे त्रैलोक्यजीविताची तरी[21] । शोक दुर्वा-

---

* आडवीं. † बहु शस्त्रें. ‡ उफाळत वरीमाजि. § दशन रागिट. ¶ इये बापडिये. $ मोटकिये विपाइली.

१ देवस्वरूप. २ मंजुळ शब्दानें. ३ बद्धहस्त. ४ अनुकूळ झाली. ५ वसंतकाळ. ६ सुकाळ. ७ उजाडलें. ८ रागावलेला, बळावलेला. ९ जेवढीं तेवढीं. १० आगट्या पसरल्या. ११ समुदाय. १२ भांडीं. १३ भूतांच्या नाशाला. १४ प्राप्त झालीं. १५ सिंह. १६ नाश करणारीं पिशाचें. १७ लिप्त झाल्या, किटल्या. १८ आमंत्रिलें. १९ भयंकरपणा. २० तूं अमळ वांकड्या दृष्टीनें पाहातां भयंकर कालिंदीतीरस्थ वृक्षांप्रमाणें करपून गेली. २१ नौका.

तलहरी । [१]आंदोळत असे ॥ ४८ ॥ [तथाहं] एथ कोपोनि जरी वैकुंठें । ऐसें हन म्हणिपैल [२]अवचटें । जे तुज लोकांचें काइ वाटे । तूं ध्यानसुख हें भोगीं ॥ ४९ ॥ तरी जी लोकांचें कीर साधारण । वांयां [३]आड सूतसें वोडंण । केविं सहसा म्हणें प्राण । माझेचि कांपती ॥ ३५० ॥ ज्या मज संहाररुद्र वासिपे । ज्या मजभेणें मृत्यु लपे । तो मी *[४]एथें [५]अहाळबाहळिं कांपें । ऐसें तुवां केलें ॥५१॥ परि नवल बापा हे महामारी । इया नाम विश्वरूप जरी । हें †[६]भ्यासुरपणें [७]हारी । भयासि आणी ॥ ५२ ॥

नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितांतरात्मा धृतिं न विंदामि शमं च विष्णो

[नभःस्पृशं] ठेलीं महाकाळेंसीं हंटतटें । तैसीं कितीएकें मुखें रागिटें । इहीं वाढोनियां धाकुटें । आकाश केलें ॥ ५३ ॥ गगनाचेनि [८]वाडपणें [९]नांकळे । त्रिभुवनींचियाही वारिया [१०]नें वेंटाळे । [दीप्त] ययाचेनि वाफा [११]आंगी जळे । कैसें धडाडीत असे ॥ ५४ ॥ [अनेकवर्ण] तेविंचि एकासारिखें एक नोहे । एथ वर्णावर्णाचा भेद आहे । हो कां जे प्रळयीं [१२]सांवावो लाहे । वन्हीं ययांचा ॥५५॥ जयाचिये आंगींची दीप्ती येवढी । जे त्रैलोक्य कीजे राखोंडी । [व्यात्ताननं] कीं तयाही तोंडें आणि तोंडीं । दांत दाढा ॥ ५६ ॥ कैसा वारया धनुर्वात चढला । ‡समुद्र कीं महापूरीं पडिला । विषाग्नि [१३]मोरा प्रवर्तला । वडवानळासी ॥ ५७ ॥ हळाहळ अग्नि पियालें । नवल मरण मारा प्रवर्तलें तैसें संहारतेजा या जाहालें । वदन देखा ॥ ५८ ॥ परि कोणें मानें विशाळ । जैसें तुटिलिया अंतराळ । §आकाशासि [१४]कव्हाळ । पडोनि ठेलें ॥ ५९ ॥ ना तरी काखे [१५]सूनि [१६]वसुंधरी । जैं हिरण्याक्ष ¶[१७]रिगाला विवरीं । तैं उघडलें [१८]हाटकेश्वरीं । जेविं पाताळ कुहर ॥ ३६० ॥ तैसा वक्त्रांचा विकाश । माजि जिव्हांचा आगळाचि आवेश । विश्व न पुरे म्हणोनि घांस । न भरीचि कोडें ॥ ६१ ॥ आणि पातालव्याळांचिया फूत्कारीं । गरळज्वाळा लागती अंबरीं । तैसी पसरलिये वदनदरी । माजि हे जिव्हा ॥ ६२ ॥ काढूनि प्रळयविजूचीं जुंबाडें । [१९]जैसे [२०]पेन्हासिले गगनाचे [२१]हुंडे । तैसे [२२]ओवाळुवांवरी आंकडे । धगधगीत दाढांचे ॥ ६३ ॥ [दीप्तविशालनेत्रं] आणि ललाटपटाचिये खोळे । जैसे भयातें भेडवितांति डोळे । हो कां जे महामृत्यूचे [२३]उमाळे । [२४]केंवसां रा-

---

* येथ थरथरां कांपें. † भयानकपण. ‡ समुद्रासि महापूर आला. § नभासि कव्हळ. ¶ निघाला.

---

१ आदळत, डळमळत. २ अकस्मात्. ३ आड घालितसें. ४ ढाल. ५ भय पावे. ६ अत्यंत, बहुत. ७ पराभव करी. ८ बलात्कारानें. ९ मोठेपणानें. १० आकळेना. ११ न वेष्टवे. १२ अग्नि पेटतो. १३ सहाय. १४ मारण्याला. १५ वेढा, ग्रास. १६ घालून. १७ पृथ्वी. १८ पाताळांतील महादेवानें. १९ समुदाय. २० शृंगारिले. २१ बुरूज. २२ ओंठाबाहेर. २३ प्रवाह. २४ कोनांत, आंधारांत.

हिले ॥ ६४ ॥ [दृष्ट्वा हि त्वां] ऐसें *वाऊनि भयाचें भोज[9] । एथ काय निपजवूं पाहातोसि काज । तें नेणों परि मज । मरणभय आलें ॥ ६५ ॥ देवा विश्वरूप पाहावयाचे डोहळे । केले तियें पावलों प्रतिफळें । बापा देखिलासि आतां डोळे । निवावे तैसे निवाले ॥६६॥ [प्रव्यथितांतरात्मा] अहो देह पार्थिव[3] कीर जाये । ययाची काकुळती कवणा आहे । परि आतां चैतन्य माझें विपायें[4] । वांचेल कीं न वांचे ॥६७॥ येऱ्हवीं भयास्तव आंग कांपे । नावेक आगळें तरि मन तापे । अथवा बुद्धीही वोसंपे[5] । अभिमान विसरिजे ॥६८॥ परि येतुलियाहि वेगळा । जो केवळ आनंदैककळा । तया अंतरात्मयाही †निश्चळा । आली शाँती[6] ॥६९॥ बाप साक्षात्काराचा वेर्धे[7] । कैसा देशेधडी[8] केला बोध । हा गुरुशिष्यसंबंध । विपायें[10] नांदे ॥३७०॥ देवा तुझ्या ये दर्शनीं । जें वैकल्य[11] उपजलें आहे अंतःकरणीं । तें सांवरावयालागीं गंवसणी । धैर्याची करितसें ॥७१॥ [धृतिं न विंदामि शमं च विष्णो] तंव माझेनि नामें धैर्य हारपलें । कीं तयाहीवरी विश्वरूपदर्शन जाहालें । हें असो परि मज भलें आंतुडविलें[13] । उपदेशाइया॥७२॥ जीव विसंवोवयाचिया[12] चाडा । सैंघ[13] धांवाधांवी करितसे बापुडा । परि सोय ही कवणेंकडां । नलभे एथ ॥ ७३ ॥ ऐसें विश्वरूपाचिया महामारी । जीवित्व गेलें आहे चराचरीं । जी न बोलें तरि काय करीं । कैसेनि राहें ॥ ७४ ॥

दंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैव कालानलसन्निभानि ।
दिशो न जाने न लभे च शर्म प्रसीद देवेश जगन्निवास ॥ २५ ॥

[दंष्ट्राकरालानीति] पैं अखंड डोळयांपुढें । ‡फुटलें जैसें महाभयाचें भांडें । तैसीं तुझीं मुखें वितंडें[14] । पसरलीं देखें ॥ ७५ ॥ असो दांतदाढांची दाटी[15] । न झांकवे मा दोहों वोठीं । सैंघ प्रळयशस्त्रांचिया दाट कोंटी[16] । लागलिया जैशा ॥ ७६ ॥ जैसें तक्षका विष भरलें । हो कां जे काळरात्री भूत संचरलें । कीं आग्नेयास्त्र §पेरिजिलें[17] । वज्राग्नीं[18] जैसें ॥ ७७ ॥ तैसीं तुझीं वक्त्रें प्रचंडें । वरि आवेश हा बाहेरि वोसंडे । आले मरणरसाचे लोंढे । आह्मावरी ॥ ७८ ॥ संहारसमयींचा चंडानिळ । आणि महाकल्पांत प्रळयानळ । या दोहीं जैं होय मेळ । तैं काय एक न जळे ॥ ७९ ॥ तैसीं संहारकें तुझीं मुखें । देखोनि धीर कां आह्मा पारुखे[19] । [दिशो न जाने] आतुं[1] भुललों मी दिशा न देखें । आपणपें नेणें ॥ ३८० ॥ [न लभे च शर्म] मोटकें विश्वरूप डोळां देखिलें । आणि

* दाऊनि. † निर्मळ । आलीं शियारीं. ‡ जैसें पसरलें. § पेरिलें.

१ महत्त्व. २ पृथ्वीचा, मातीचा. ३ कदाचित्. ४ क्षणभर. ५ नाश पावे. ६ याहून. ७ कांटा, कंप. ८ छंद. ९ देशपार. १० विकलपणा, व्याकुलता. ११ मिळविलें. १२ विसावा घेण्याकरितां. १३ पुष्कळ. १४ मोठीं. १५ कांटे. १६ प्रेरिलें. १७ विद्युत्. १८ उचंबळें. १९ नष्ट होतो. २० थोडकेंच.

सुखाचें अवर्षण पडिलें । आतां [१] जापाणि [२] जापाणि आपुलें । अस्ताव्यस्त हें ॥ ८१ ॥ ऐसें करिसी ह्मणोनि जरि जाणें । तरि हे गोष्टि सांगावी कां मी ह्मणें । आतां एकवेळ वांचवीं जी प्राणें । *[३]या स्वरूप प्रळयापासोनी ॥ ८२ ॥ जरि तूं गोसावी आमुचा अनंता । तरि सुई [४] वोडंण माझिया जीविता । सांटवीं पसारा हा मागुता । महामारीचा ॥ ८३ ॥ [जगन्निवास] आइकें सकळ देवांचिये †[५]परदेवते । तुवां चैतन्यें गा विश्ववसतें । तें विसरलासि हें [६]उपरतें । संहारूं आदरिलें ॥ ८४ ॥ [प्रसीद देवेश] ह्मणोनि वेगीं प्रसन्न होईं देवराया । संहरीं संहरीं आपुली माया । काढीं मातें महाभया- । पासोनियां ॥ ८५ ॥ हा [७]ठायवरी पुढतपुढती । तूतें ह्मणिजे बहुवा काकुळती । ऐसा मी विश्वमूर्ती । भेडंका जाहालों ॥ ८६ ॥ जैं अमरावतीये आला [८]धाडा । तैं म्यां एकलेनि केला [९]उवेडा । जो मी काळाचिया ही तोंडा । [१०]वांसिपु न धरीं ॥ ८७ ॥ परि [११]तया ‡आंतुल नव्हे हें देवा । एथ मृत्यूसही §करूनि [१२]चढावा । तुवां आमुचाचि घोट भरावा । या सकळविश्वेसीं ॥८८॥ कैसा नव्हता प्रळयाचा वेळ । ¶[१३]गोरवां-तुचि [१४]मिनलासि काळ । बापुडा हा त्रिभुवनगोळ । अल्पायु जाहाला ॥ ८९ ॥ अहा भाग्या विपरीता । विघ्न उठिलें शांतिकरितां । कटकटा विश्व गेलें आतां । तूं लागलासि ग्रासूं ॥ ३९० ॥ हें नव्हे मां रोकडें । [१५]सेंघ पसरूनियां तोंडें । कवळितासि चहूंकडे । सैन्यें इयें ॥ ९१ ॥

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः सर्वे सहैवावनिपालसंघैः ।
भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथाऽसौ सहास्मदीयैरपि योधमुख्यैः२६

['रौद्ररसः' अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः] [१६]नोहेति हे कौरव कुळींचे वीर । आंधळिया धृतराष्ट्राचे कुमर । हे गेले गेले सहपरिवार । $तुझिया वदनीं ॥ ९२ ॥ [सर्वे सहैवावनिपालसंघैः] आणि जे जे यांचेनि [१७]सांवायें । आले देशोदेशींचे राये । तयांचें सांगावया जावों न लाहे । ऐसें [१८]सरकटित आहासी ॥ ९३ ॥ [१९]मदमुखाचिया संघटा । घेत आहासि घटघटां । [२०]औरणी हन थाटा । देतासि मिठी ॥ ९४ ॥ जंत्रांवरिचील मार । [२१]पदातीचे [२२]मोगरे । मुखाआंत भार । हारपताति मा ॥ ९५ ॥ कृतांताचिया [२३]जोंवळी । जें एकचि विश्वातें गिळी । तियें कोटीवरी सगळीं । गिळितासि शस्त्रें ॥ ९६ ॥ [२४]चतुरंगा परि-

---

* या विश्वरूप. † परम देवते. ‡ तुल्य नव्हे. § न करवे हेवा. ¶ हो कां तूंचि. $ वदनीं इये.

---

१ आटप आटप. २ धनी. ३ घाल. ४ आड. ५ उलटें. ६ येथपर्यंत पुनः पुनः याप्रमाणें. ७ मित्रा. ८ छापा. ९ पराभव. १० भय. ११ त्यापेकीं. १२ चढाई. १३ मध्येंच. १४ प्राप्त झालास. १५ पुष्कळ. १६ हे नव्हे काय ? १७ साहाय्य. १८ गिळीत. १९ हत्तींचा समुदाय २० युद्ध. २१ तोफा, बंदुकी. २२ पायदळ. २३ मुद्गर. २४ भावंड. २५ हत्ती, घोडे, रथ व पायदळ यांस.

वारा । संजोडियां[१] रहंवरा । दांत न लविसी मा परमेश्वरा । कैसा तुष्टलासि बरवा ॥ ९७ ॥ [भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ] हां गा भीष्म ऐसा कवण । सत्यशौर्यनिपुण । तोही आणि ब्राह्मण द्रोण । ग्रासिलासि[३] कैटकटा ॥ ९८ ॥ अहा सहस्रकराचा[३] कुमर । एथ गेला गेला कर्ण वीर । [सहास्मदीयैरपि योधमुख्यैः] आणि आमुचिया आघवयांचा केरें[४] । फेडिला देखें ॥ ९९ ॥ कैटकटा[५] धातया । कैसें जाहालें अनुग्रहा[६] यया । मियां प्रार्थूनि जगा बापुडिया । आणिलें मरण ॥ ४०० ॥ मागां थोडिया[७] बहुवा उपपत्ती । येणें सांगीतलीया विभूती[८] । तैसा नसेचि मा पुढती । बैसलों पुसों ॥ १ ॥ ह्मणोनि भोग्य[९] तें त्रिशुद्धी न चुके । आणि बुद्धीही होणारासारिखी ठाके । माझ्या कपाळीं पिटावें लोकें । तें लोटलें[१०] काह्या ॥ २ ॥ पूर्वी अमृतही हाता आलें । परि देव नसतीचि[११] उगले[१२] । मग काळकूट उठविलें । शेवटीं जैसें ॥ ३ ॥ परि तें ऐकेबगीं[१३] थोडें । केलिया पतिकारामाजिवडें[१४] । आणि तिये अवसरींचें तें सांकडें[१५] । निस्तरविलें शंभू ॥ ४ ॥ आतां हा जळता वारा कें वेंटाळे[१६] । कोणीही[१७] विषा भरलें गगन गिळे । महाकाळेंसि[१८] कें खेळें । आंगवत[१९] असे ॥ ५ ॥ ऐसा अर्जुन दुःखें शिणत[२०] । शोचितें असे जिवाआंत । परि न देखे तो प्रस्तुत । अभिप्राय देवाचा ॥ ६ ॥ जे मी मारिता हे कौरव मरते । ऐसेनि वेंटाळिला होता मोहें बहुतें । तो फेडावयालागीं अनंतें । हें दाखविलें निज ॥ ७ ॥ अरे कोणीतें कोणहा न मारी । एथ मीचि हो सर्व संहारीं । हें विश्वरूपव्याजें हरी । प्रकटित असे ॥ ८ ॥ परि वायांचि व्याकुळता । तें न चोजवेचि[२०] पंडुसुता । मग अहा[२१] कंप नव्हता । वाढवित असे ॥ ९ ॥

वक्त्राणि ते त्वरमाणा विशंति दंष्ट्राकरालानि भयानकानि ।
केचिद्विलग्ना दशनांतरेषु संदृश्यंते चूर्णितैरुत्तमांगैः ॥ २७ ॥

[वक्त्राणि ते त्वरमाणा विशंति] *तेथ ह्मणे पाहा हो एके वेळे । सोसिकवचेंसि[२२] दोन्ही दळें । वदनीं गेलीं आभाळें । गगनीं कां जैसीं ॥ ४१० ॥ कां महाकल्पाचिया शेवटीं । जैं कृतांत कोपला होय सृष्टी । तैं ऐकविसांहि[२३] स्वर्गा मिठी[२४] । पाताळासकट दे ॥ ११ ॥ ना तरी उदासीनें[२५] दैवें । संचेंकाचीं वैभवें[२६] । जेथिंचीं तेथ स्वभावें । विलया जाती ॥ १२ ॥ तैसीं सोसिंनलीं[२७] सैन्यें

* मग ह्मणे.

१ घोडे जोडलेल्या रथास. २ हाय हाय. ३ सूर्याचा. ४ किरकिर. ५ हे ब्रह्मदेवा. ६ प्रसाद. ७ थोड्याबहुत युक्तीनें. ८ ईश्वरमूर्ती. ९ भोगावयाचें प्रारब्ध. १० चुकेल कशानें. ११ निरिच्छ. १२ एकप्रकारें, एकपक्षीं. १३ अनुभवानें पाहिलें असतां. १४ संकट. १५ अटोपेल. १६ कोण बरें. १७ महाकाळाशीं कोणाला मानवेल? १८ सामर्थ्य. १९ शोक करीत. २० समजे. २१ उगाच. २२ तरवार कवचासकट. २३ एकवीस. २४ अनतुकूल. २५ संग्रह करणाराचीं. २६ ऐश्वर्ये. २७ पसरलीं.

एकवटें । इयें मुखीं जाहालीं प्रविष्टें । परि एकही तोंडौनि न सुटे । कैसें कर्म देखा ॥ १३ ॥ अशोकाचे अंगवसे । चघळिले *केरनि जैसे । लोक वक्त्रामाजि तैसे । वायां गेले ॥१४॥ [दंष्ट्राकरालानि] परि सिंसाळें मुकुटेंसीं । पडिलीं दाढांचे सांडसीं । पीठ होत कैसीं । दिसत आहाती ॥ १५ ॥ [केचिद्विलग्ना दशनांतरेषु] तियें रहें दांतांचिये सवडी । कूट लागलें जिभेच्या बुडीं । कांहीं कांहीं आगरडीं । दंष्ट्रांचीं माखलीं ॥ १६ ॥ हो कां जे विश्वरूपें काळें । ग्रासिलीं लोकांचीं शरीरें बळें । परि †जीवित्व देहींचीं सिंसाळें । अवश्य कीं राखिलीं ॥ १७ ॥ [संदृश्यंते चूर्णितैरुत्तमांगैः] तैसीं शरीरामाजि चोखडीं । इयें उत्तमांगें होतीं फुडीं । ह्मणोनि महाकाळाचियाहि तोंडीं । परि उरलीं शेखीं ॥ १८ ॥ [भयानकानि] मग ह्मणे हें काई । जन्मलयां आंनमोहरचि नाहीं । जग आपैसेंचि वदनडोहीं । संचरता हे या ॥ १९ ॥ यया आपेंआप आघविया सृष्टी । लागलिया आहाति वदनाचिया ‡शेवटीं । आणि हा जेथिंचिया तेथ मिठी । देतसे उगला ॥ ४२० ॥ ब्रह्मादिक समस्त । उंचा मुखांमाजि धांवत । येर सामान्य हे भरत । ऐलीच वदनीं ॥ २१ ॥ आणीकही भूतजात । तें उपजलेंचि ठायीं ग्रासित । परि याचिया मुखा निभ्रांत । न सुटेचि कांहीं ॥ २२ ॥

यथा नदीनां बहवोऽबुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवंति ।
तथा तवामी नरलोकवीरा विशंति वक्त्राण्यभिविज्वलंति॥२८॥

[यथा नदीनामिति] जैसे महानदीचे वोघ । वेंहिले ठाकिती समुद्राचें आंग । [तथा तवामी नरलोकवीरा विशंति] तैसें आघवांचिकडूनि जग । प्रवेशत मुखीं ॥ २३ ॥ आयुष्यपंथें प्राणिगणीं । करोनि अहोरात्रांची §सोवणी । [वक्त्राण्यभिविज्वलंति] वेगें वक्त्रमिळणीं । साधिजत आहाती ॥ २४ ॥

यथा प्रदीप्तं ज्वलनं पतंगा विशंति नाशाय समृद्धवेगाः ।
तथैव नाशाय विशंति लोकास्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः॥२९॥

[यथेति] जळतया गिरीच्या ¶गंवाखा- । माजि घेपती पतंगाचिया $झोंका । [तथैवेति] तैसे समग्र लोक देखा । इये वदनीं पडती ॥ २५ ॥ [समृद्धवेगाः] परि जेतुलें येथ प्रवेशलें । तें ||तेंतलिया लोहें पाणिपां गिळिलें । वहिवटींहि पुसिलें । नाम रूप तयाचें ॥ २६ ॥

---

* कहेनि. † जीव. ‡ वाटीं, पाठीं. § गगणीं. ¶ अंगवखा (आंगावर.) $ झोंका. || तेतुलियां.

---

१ अग्रभाग, कोंबारे. २ उठानें. ३ मस्तकें. ४ चिमट्यांत. ५ तुकडे. ६ टोंकें, अग्रें. ७ दाढांचीं. ८ मस्तकें. ९ प्राण्याला. १० दुसरा मार्ग. ११ निरिच्छ. १२ सत्वर. १३ प्राणिसमुदायांनीं. १४ पायऱ्या. १५ छिद्रांमध्यें. १६ पडतात. १७ उड्या. १८ तापलेल्या लोखंडानें. १९ वहिवाटीस.

लेलिह्यसे ग्रसमानः समंताल्लोकान् समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः ।
तेजोभिरापूर्य जगत्समग्रं भासस्तवोग्राः प्रतपंति विष्णो ॥ ३० ॥

[बीभत्सरसः' ग्रसमानः] आणि *येतुलियाही[1] आरोगण[2]। करितां भुके नाहीं उणेपण। कैसें दीपन[3] असाधारण। उदयलें यया ॥ २७ ॥ [लेलिह्यसे] जैसा रोगिया ज्वराहूनि उठिला। कां भेणगा[4] दुकाळ पाहला। तैसा जिभांचा लळलळाट देखिला। आवाळुवें[5] चाटितां ॥२८॥ [समंतात्] तैसें आहाराचेनि नांवें कांहीं। तोंडापासूनि उरलेंचि नाहीं। कैसी समसमित[6] नवाई। भुकेलेपणाची ॥ २९ ॥ काय सागराचा घोंट भरावा। कीं पर्वताचा घांस करावा। ब्रह्मकटाह घालावा। आघवाचि दाढे ॥४३०॥ दिशा सगळियाचि गिळाविया। चांदिणिया चाटूनि घ्याविया। ऐसें वर्तत आहे सांविया। †लोलुप्य[7] बा तुझें ॥ ३१ ॥ [वदनैर्ज्वलद्भिः] जैसा भोगीं काम वाढे। कां इंधनें आगीसि हिकाक[8] चढे। तैसीं खातखातांचि तोंडें। खाखातें[9] ठेलीं ॥ ३२ ॥ कैसें एकचि केवढें पसरलें। त्रिभुवन जिव्हाग्रीं आहे टेंकलें। जैसें कां कैवींठ[10] घातलें। वडवानळीं ॥ ३३ ॥ ऐसीं अपार वदनें। आतां येतुलीं कैंचीं त्रिभुवनें। कां आहार न मिळतां येणें मानें। वाढविलीं सैंध[11] ॥ ३४ ॥ अगा हा लोक बापुडा। जाहाला वदनज्वाळां वैरपडा[12]। जैसीं वणवेयाचिया वेढां। सांपडती मृगें ॥ ३५ ॥ [तेजोभिरापूर्य जगत्समग्रं] आतां तैसें या विश्वा जाहालें। देव नव्हे हें कर्म आलें। कां जगजळचरां पोंगिलें[13]। ‡जाळें काळें[14] ॥ ३६ ॥ [भासस्तवोग्राः प्रतपंति] आतां इये अंगप्रभेचिये वोगुरे[15]। कोणीकडूनि निगिजैल चराचरें। हीं वक्त्रें नोहेति §जोहरें[16]। वोडवलीं जगा ॥ ३७ ॥ आगी आपुलेनि दाहकपणें। कैसेनि पोळिजे तें नेणें। परि जया लागे तया प्राणें। सुटिका नाहीं ॥ ३८ ॥ ना तरी माझेनि तिखटपणें। कैसें निवटे[17] हें शस्त्र कायि जाणे। कां आपुलियां मारा नेणे। विष जैसें ॥ ३९ ॥ तैसी तुज कांहीं। आपुलिया उग्रपणाची सेचि नाहीं। परि ऐलीकडिले मुखीं खोई[18]। हों सरली[19] जगाची ॥ ४४० ॥ [विष्णो] अगा आत्मा तूं एक। सकळ विश्वव्यापक। तरि कां आह्मा अंतक। तैसा वोडवलासी ॥ ४१ ॥ तरि मियां सांडिली जीवित्वाची चाड। आणि तुवांही न धरावी भीड। मनीं आहे तें उघड। बोल पां सुखें ॥ ४२ ॥ केवी वाढविसी या उग्ररूपा। आंगींचें भगवंतपण आठवीं बापा। नाहीं तरि कृपा। मजपुरती पाहीं ॥ ४३ ॥

---

* येतुलीहि. † लौल्य, आसह्या. ‡ जाळ काळें, जाहालें काळें. § जोहारें.

१ भोजन. २ अष्टाग्निप्रदीप्तपण. ३ भिकारी. ४ ओष्ठाग्रें. ५ चमचमीत, खरोखर. ६ सर्वथा. ७ लंपटपण. ८ हलकल्लोळ. ९ खाईन खाईन करणारीं. १० कंवठीचें फळ. ११ पुष्कळ, एकदम. १२ प्राप्त. १३ पसरलें, लावलें. १४ जाळ्यांतून. १५ लाक्षाग्नीचीं घरें. १६ मरे. १७ नाश, क्षय. १८ सरसावली. १९ प्राप्त झालास.

आख्याहि मे को भवानुग्ररूपो नमोस्तु ते देववर प्रसीद ।
विज्ञातुमिच्छामि भवंतमाद्यं नहि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ३१॥

[आद्य] तरि एक वेळ वेदवेद्या । जी त्रिभुवनैकआद्या । विनवणी विश्ववंद्या । आइकें माझी ॥ ४४ ॥ [नमोस्तु ते देववर प्रसीद] ऐसें बोलोनि वीरें । चरण नमस्कारिले शिरें । [विज्ञातुमिच्छामि भवंतं] मग म्हणे तरी सर्वेश्वरें । अवधारि जो ॥ ४५ ॥ मियां होआवया समाधान । जी पुसिलें विश्वरूपध्यान । आणि एकेचि काळें त्रिभुवन । गिळितचि उठिलासि ॥ ४६ ॥ [को भवानुग्ररूपो] तरि तूं कोण कां येतुलीं । इयें भ्यासुरें मुखें कां मेळविलीं । अवधियाचि करीं परिजलीं । शस्त्रें काढ्या ॥ ४७ ॥ जी जंव तंव रागीटपणें । वाढोनि गगना आणितोसि उणें । कां डोळे करूनि भिंगुळवाणे । भेडसावीत आहासी ॥ ४८ ॥ [नहि प्रजानामि तव प्रवृत्तिं] एथ कृतांतेंसीं देवा । कासया किजतसे हेवा । [आख्याहि मे] हा आपुला तुवां सांगावा । अभिप्राय मज ॥ ४९ ॥ या बोला म्हणे अनंत । मी कोण हें आहासी पुसत । आणि कायिसयालागीं असें वाढत । उग्रतेसीं ॥ ४५० ॥

श्रीभगवानुवाच–

कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः ।
ऋतेऽपि त्वां नभविष्यंति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः३२

[श्रीभगवानुवाच—कालोऽस्मीत्यर्धं] तरि मी काळ गा हें फुंडें । लोक संहारावयालागीं वाढें । सैंघ पसरिलीं आहाती तोंडें । आतां ग्रासीन हें आघवें ॥ ५१ ॥ [ऋतेऽपि त्वां] एथ अर्जुन म्हणे कटकटा । उबगिलों मागिल्या संकटा । म्हणोनि आंळविला तंव वोखटा । *उधाइला हा ॥ ५२ ॥ तेविंचि कठिण बोलें आंसतुटी । †अर्जुन होईल हिंपुटी । म्हणोनि सवेंचि म्हणे किरीटी । परि आन एक असे ॥ ५३ ॥ तरि आतांचि ये संहार वाहरें । तुह्मी पांडव ‡असा बाहिरे । तेथ जातजातां धनुर्धरें । सांवरिले प्राण ॥ ५४ ॥ होता मरणमहामारीं गेला । तो मागुता सावध जाहाला । मग लागला बोला । चित्त देऊं ॥ ५५ ॥ ऐसें म्हणिजत आहे देवें । अर्जुना माझे तुह्मी हें जाणावें । [नभविष्यंति सर्वे] येर जाण मी आघवें । सैरलों ग्रासूं ॥ ५६ ॥ वज्रानळीं चंडीं । जैसी धांपे लोणियाची उंडी । तैसें जग हें माझिया तोंडीं । तुवां देखिलें जें ॥ ५७ ॥ [येऽवस्थिताः] तरि तयामाझारीं कांहीं । भरवसेनि उणें

---

* उधाइला, उधवला. † तेणें अर्जुन. ‡ एक बाहिरे.

---

१ एवढीं. २ भयंकर. ३ धारण केलीं. ४ कशाकरितां. ५ भयंकर. ६ मत्सर, तिरस्कार. ७ खरें. ८ बहुत. ९ कंटाळलों. १० प्रार्थिला. ११ वाईट. १२ प्रगटला. १३ निराश. १४ खिन्न. १५ संकटांतून, बाधेंतून. १६ बाहेर आहां. १७ प्रवर्तलीं. १८ सांपडे.

नाहीं । इयें वायांचि सैन्यें पाहीं । *वल्गिजत आहाती ॥ ५८ ॥ ऐशा चतुरंगाचिया संपदा । करित महाकाळेंसीं स्पर्धा । वांटिवेचियें मदा । वेळंघले जे ॥ ५९ ॥ हे जे मिळोनियां मेळे । कुंथती वीरवृत्तीचेनि बळें । जम्मावरी गजदळें । वाखाणिजताती ॥ ४६० ॥ ह्मणती सृष्टीवरी सृष्टी करूं । आण वाहूनि मृत्यूतें मारूं । आणि जगाचा भरूं । घोंट यया ॥ ६१ ॥ पृथ्वी सगळीचि गिळूं । आकाश वरिचावरी जाळूं । काय बाणवरी खिळूं । वीरयातें ॥ ६२ ॥ बोल हैतियेराहूनि तिखट । दिसती अग्नीपरिस दांसट । मारकपणें कालकूट । मेंदुर ह्मणत ॥ ६३ ॥ तरि हे गंधर्वनगरींचे उमाळे । जाण पोकळीचे पेंडवळे । अगा चित्रींचे पुतळे । वीर हे देखें ॥ ६४ ॥ हांगा मृगजळाचा पूर आला । दळ नव्हे कापडाचा साप केला । इया शृंगारूनियां खोळां । †मांडिलिया पैं [एतदंतमेव षड्गुणैश्वर्यवर्णनमष्टाविंशतिभिः श्लोकैरुक्तं] ॥ ६५ ॥

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लस्वभ जित्वा शत्रून्भुंक्ष्व राज्यं समृद्धम् ।
मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्॥३३॥

[मयैवैते निहताः पूर्वमेव] येर चेष्टवितें जें बळ । ‡तें मागांचि मियां ग्रासिलें सकळ । आतां कोल्हेरिचे वेतोळ । तैसे निर्जीव हे आहाती ॥ ६६ ॥ हालविती दोरी तुटली । तरि तियें खांबावरील बाहुलीं । भलतेणें लोटिलीं । उलथोनि पडती ॥ ६७ ॥ तैसा सैन्याचा §इया बेगा । मोडतां वेळ नलगे पैं गा । [तस्मात्त्वमुत्तिष्ठ] ह्मणोनि उठीं उठीं वेगां । शाहाणा होईं ॥ ६८ ॥ [जित्वा शत्रून्] तुवां गोग्रहणाचेनि अवसरें । घातलें मोहनास्त्र येकसरें । मग विराटाचेनि मेंहाभेडें उत्तरें । आंसडूनि नागविलें ॥ ६९ ॥ आतां हें त्याहूनि निर्पटारें जाहालें । निर्वेटीं आयितें ¶रण पडिलें । [यशो लभस्व] घेईं यश रिपु जिंतिले । एकलेनि $अर्जुनें ॥ ४७० ॥ [भुंक्ष्व राज्यं समृद्धं] आणि कोरडें यशचि नोहे । समग्र राज्यही आलें आहे । [निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्] तूं निमित्तमात्रचि होयें । सव्यसाची ॥ ७१ ॥

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च कर्णं तथान्यानपि योधवीरान् ।
मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा युद्ध्यस्व जेताऽसि रणे सपत्नान्

[द्रोणमिति] द्रोणाचा पाड न करीं । भीष्माचें भय न धरीं । कैसेनि कर्णावरी । पेंजूं हें न ह्मणें ॥ ७२ ॥ कोण उपाय जयद्रथा कीजे । हें न चिंतू

---

* मिरवताती, वरवजत आहाती. † मांडिलेया कीं. ‡ तें म्यां मागांचि. § इया. ¶ रण म्यां पाडिलें. $ अर्जुनें ऐसें.

---

१ बडबडत. २ पराक्रमाच्या. ३ चढले. ४ शूरवृत्तीच्या. ५ वाऱ्याला. ६ शस्त्रापेक्षां. ७ दाहक. ८ मधुर. ९ लोट. १० भेंडोळे. ११ सैन्य. १२ बाहुल्या. १३ चित्रींचे. १४ पुतळे. १५ आकार. १६ भित्र्या. १७ हिसकावून. १८ निकृष्ट, हीन. १९ संहारीं. २० शस्त्र धारण करूं.

चित्त तुझें । आणीकही आथि जे जे । नावाणिगे[1] वीर ॥ ७३ ॥ [मया हतान्] । तेही एक एक आघवे । चित्रींचे सिंहाडे मानावे । जैसे बोलेनि हातें घ्यावे । पुसोनियां ॥ ७४ ॥ यावरी पांडवा । कायसा युद्धाचा मेळावा । हा आभास[2] गा आघवा । येर ग्रासिलें मियां ॥ ७५ ॥ जेव्हां तुवां देखिले । हे माझिया वदनीं पडिले । तेव्हांचि यांचें आयुष्य सरलें । आतां रितीं सोपें[3] ॥ ७६ ॥ [त्वं जहि] ह्मणोनि वेंहिला उठीं । मियां मारिले तूं निवटीं । [मा व्यथिष्ठाः] न रिघें शोकसंकटीं । नाथिलिया ॥ ७७ ॥ [युध्यस्व] आपणाचि आडखिळा[4] कीजे । तो कौतुकें जैसा विंधोनि पाडिजे । तैसें देखें गा तुझें । निमित्त आहे ॥७८॥ बापा विरुद्ध जें जाहालें । तें उपजतांचि वाधें नेलें । आतां राज्येंसीं संचलें । यश तूं भोगीं ॥ ७९ ॥ [रणे सपत्नान्] सावियाचि उंतत[5] होते दायाद[6] । आणि बळिये जगीं दुर्मद । ते वधिले विषद[7] । सायास न लगतां ॥४८०॥ [जेतासि] ऐसिया इया गोष्टी । विश्वाच्या वांकपटीं[8] । लिहूनि घालीं किरीटी । विजयी होईं ॥ ८१ ॥

संजय उवाच–एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य कृतांजलिर्वेपमानः किरीटी।
नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ॥३५॥

[संजय उवाच-एतत्] ऐसी आघवीचि हे कथा । तया अपूर्णमनोरथा । संजय सांगे कुरुनाथा । ज्ञानदेव ह्मणे ॥ ८२ ॥ [वचनं] मग सत्यलोकौनि गंगाजळ । सुटलिया *वाजत[9] खळाळ[10] । तैसी वाचा विशाळ । बोलतां तया ॥ ८३ ॥ ना तरी महामेघांचे उमाळे । घडघडीत एके वेळे । कां घुमघुमिला[11] मंदराचळें । †क्षीराब्धि जैसा ॥ ८४ ॥ [केशवस्य] तैसें गंभीरें महानादें । ‡हें वाक्य विश्वकंदें । बोलिलें अगाधें । अनंतरूपें ॥ ८५ ॥ [किरीटी] तें अर्जुनें मोटकें[12] [श्रुत्वा] ऐकिलें । [वेपमानः] आणि सुख कीं भय दुणावलें । हें नेणों परि कांपिनलें । सर्वांग तयाचें ॥ ८६ ॥ सखोलपणें वळली मोट । [कृतांजलिः] आणि तैसेचि जोडले करसंपुट । [नमस्कृत्वा] आणि वेळोवेळां ललाट । चरणीं ठेवी ॥८७॥ [सगद्गदं] तेविंचि कांहीं बोलों जाये । तंव गळा बुजलाचि[13] ठाये । हें सुख कीं भय होये । हें विचारा तुह्मी ॥ ८८ ॥ परि तेव्हां देवाचेनि बोलें । अर्जुना हें ऐसें जाहालें । मियां पदावरूनि देखिलें । श्लोकाचिया ॥ ८९ ॥ [भीतभीतः] मग तैसाचि §भेणें भेणें । [प्रणम्य] पुढती जोहारूनि[14] चरण । [भूय एवाह कृष्णं] मग ह्मणे जी आपण । ऐसें बोलिलेति ॥ ४९० ॥

---

* वाजती. † क्षीरार्णव. ‡ तियें वाक्यें श्रीविश्वकंदें । बोलिलीं अगाधें । श्रीविश्वरूपें. § भेणभेण.

१ नामांकित, प्रख्यात. २ मिथ्या भास. ३ सोपटें. ४ लवकर. ५ लटक्या. ६ लगोऱ्या. ७ उन्मत्त. ८ भाऊबंद. ९ स्पष्ट, विष देणारे. १० वाणीरूप पटावर. ११ खळाळल्याप्रमाणें वाजणारे. १२ दणाणला. १३ अमळसें. १४ भरून आला. १५ नमस्कारून.

अर्जुन उवाच–**स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ।**
रक्षांसि भीतानि दिशो द्रवंति सर्वे नमस्यंति च सिद्धसंघाः३६

[अर्जुन उवाच–स्थाने हृषीकेश] ना तरी अर्जुना मी काळ । आणि ग्रसिजे तो माझा खेळ । हा बोल तुझा कीर अढळ । मानूं आह्मी ॥ ९१ ॥ परि तुवां जी काळें । आजि स्थितीचिये वेळे । ग्रासिजे हें नेमिले । विचारासी ॥ ९२ ॥ कैसेनि आंगींचें तारुण्य काढावें । कैंचें नव्हे तें वार्धक्य आणावें । ह्मणोनि करूं ह्मणसी तें नव्हे । बहुत करुनी ॥ ९३ ॥ हां जी चौपाहरी न भरतां । कोणेही वेळे श्रीअनंता । काय मध्यान्हीं सवितां । मावळत आहे ॥ ९४ ॥ [तव प्रकीर्त्या] पैं तुज अखंडिता काळा । तिन्हीं आहाती जी वेळा । त्या तिन्हीं परी सबळा । आपुलालिया समयीं ॥ ९५ ॥ जे वेळीं होंलागे उत्पत्ती । ते वेळीं स्थिती प्रळय हारपती । आणि स्थितिकाळीं न मिरवती । उत्पत्ति प्रळय ॥ ९६ ॥ पाठीं प्रळयाचिये वेळे । उत्पत्ति स्थिति मावळे । हें कायसेनही न ढळे । अनादि ऐसें ॥ ९७ ॥ ह्मणोनि आजि तंव भरें भोगें । स्थिती वर्जित आहे जगें । एथ ग्रसिसी तूं हें नलगे । माझ्या जीवीं ॥ ९८ ॥ तंव संकेतें देव बोले । अगा या दोहीं सैन्याचें भरण पुरलें । तें प्रत्यक्षचि तुज दाविलें । येर यथा काळें जाण ॥ ९९ ॥ हा संकेत जंव अनंता । वेळ लागला बोलतां । तंव अर्जुनें लोक मागुता । देखिला यथास्थिति ॥ ५०० ॥ [जगत्प्रहृष्यति] मग ह्मणतसे देवा । तूं सूत्री विश्वलाघवा । जग आला मा आघवा । पूर्वस्थिती पुढती ॥ १ ॥ परि पडिलिया दुःखसागरीं । तूं काढिसी कां जया परी । ते कीर्ति तुझी श्रीहरी । आठवित असें ॥ २ ॥ कीर्ति आठवितां वेळोवेळां । भोगीतसें महासुखाचा सोहळा । तेथ हर्षामृतकल्लोळा- । वरि लोळत आहें ॥ ३ ॥ [अनुरज्यते च] देवा जियालेपणें जग । धरी तुझ्याठायीं अनुराग । आणि दुष्टां तयां भंग । अधिकाधिक ॥ ४ ॥ [रक्षांसि भीतानि दिशो द्रवंति] पैं त्रिभुवनीचिया राक्षसां । महाभय तूं हृषीकेशा । ह्मणोनि पळताती दाही दिशा । पैलीकडे ॥ ५ ॥ [सर्वे नमस्यंति च सिद्धसंघाः] *एथ सुर नर सिद्ध किन्नर । किंबहुना चराचर । ते तुज देखोनि हर्षनिर्भर । नमस्कारित असती ॥ ६ ॥

कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे ।
अनंत देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥ ३७ ॥

[कस्माच्च ते न नमेरन्] एथ गा कवणा कारणा । राक्षस हे नारायणा । न

---

* येर सुरनर.

---

१ स्वास्थ्याचे, पालनाचे. २ जुळत नाहीं. ३ दिवसाचे चार प्रहर. ४ सूर्य. ५ बळयुक्त. ६ स्वास्थ्य, पालन. ७ कशानेंही. ८ संक्षेपानें, खुणेनें. ९ आयुष्य. १० पूर्ववत्. ११ सूत्रधार. १२ जिवंतपणें. १३ प्रीति. १४ हर्षयुक्त.

लगतीचि चरणा । पळते जाहाले ॥ ७ ॥ आणि हें काय तूतें पुसावें । येतुलें आह्मासिही *जाणते । तरीं सूर्योदयीं राहावें । कैसेनि तमें ॥८॥ [महात्मन्] जी तूं स्वप्रकाशाचा आगर । आणि जाहाला आहासि गोचर । ह्मणोनियां निशाचरां केरे । फिटला सहजें ॥ ९ ॥ [गरीयसे] हें येतुले दिवस आह्मा । कांहीं नेणवेचि श्रीरामा । आतां देखतसें महिमा । गंभीर तुझा ॥ ५१० ॥ [ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे] जेथूनि नाना सृष्टीचिया † वोळी । पसरती भूतग्रामाचिया ‡ वेळी । तया महद्ब्रह्मातें व्याली । दैविकी इच्छा ॥ ११ ॥ [अनंत देवेश] देव निःसीम सत्व सदोदित । देव निःसीमगुण अनंत । देव निःसीम §साम्य सतत । नरेंद्र देवांचा ॥ १२ ॥ [जगन्निवास] जी तूं त्रिजगतिये वोलावा । [त्वमक्षरं सदसत्तत्परं यत्] अक्षर तूं सदाशिवा । तूंचि सदसत् देवा । तयाही अतीत तें तूं ॥ १३ ॥

त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
वेत्ताऽसि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनंतरूप॥३८॥

[त्वमादिदेवः पुरुषः पुराणः] तूं प्रकृतिपुरुषांचिया आदी । जी महत्तत्त्वा तूंचि अवधी । स्वयें तूं अनादी । पुरातन ॥ १४ ॥ [त्वमस्य विश्वस्य परं निधानं] तूं सकळविश्वजीवन । जीवांसि तूंचि निधान । [वेत्तासि] भूतभविष्याचें ज्ञान । तुझ्याचि हातीं ॥ १५ ॥ [वेद्यं च] जी श्रुतीचिया लोचना । स्वरूपसुख तूंचि अभिन्ना । [परं च] ¶त्रिभुवनाचिया आयतना । आयतन तूं ॥१६॥ ह्मणोनि जी परम । [धाम] तूतें ह्मणिजे महाधाम । कल्पांतीं महद्ब्रह्म । $तुजमाजि रिगे ॥ १७ ॥ [त्वया ततं विश्वमनंतरूप] किंबहुना तुवां देवें । विश्व विस्तारिलें आहे आघवें । तरि अनंतरूपा वानावें । कवणें तूतें ॥ १८ ॥

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशांकः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ३९॥
नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोस्तु ते सर्वत एव सर्व ।
अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः॥४०॥

[नमः] जी काय एक तूं नव्हसी । कवणेठायीं नससी । हें असो जैसा आहासी । तैसिया नमों ॥ १९ ॥ [वायुरित्यर्थः] वायु तूं श्रीअनंता । यम तूं नियमिता । प्राणिगणीं वसता । अग्नि तो तूं ॥ ५२० ॥ वरुण तूं सोम । स्रष्टा तूं ब्रह्म । पितामहाचाही परम । आद्य जनक तूं ॥ २१ ॥ [नमोस्तु ते] आणीकही जें जें कांहीं । रूप आथि अथवा नाहीं । तया नमों तुज तैसयाही ।

* जाणावें. † वोळी. ‡ वेळीं. § साम्यें. ¶ त्रिभुवनिचेया. $ तुझिया अंकीं.

१ अंधकारानें. २ अडचण झाली. ३ ओली. ४ महत्तत्त्वाख्य मायेस. ५ शिवशक्ती. ६ गुणसाम्य मायेला. ७ शेवट. ८ आश्रयास. ९ आश्रयस्थान. १० लीन होतें. ११ शासनकर्ता.

श्रीजगन्नाथा ॥ २२ ॥ ऐसें सानुरागें चित्तें । नमन केलें पांडुसुतें । [भूयोऽपि नमोनमस्ते] मग पुढती ह्मणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥ २३ ॥ पाठीं तिये साद्यंतें । न्याहाळी श्रीमूर्तीतें । आणि पुढती ह्मणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥२४॥ पाहत पाहतां प्रांतें । समाधान पावे चित्तें । आणि पुढती ह्मणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥ २५ ॥ इयें चराचरीं *जी भूतें । †सर्वत्र देखे तयातें । [पुनश्च] आणि पुनःपुना ह्मणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥ २६ ॥ ऐसीं रूपें तियें अद्भुतें । आश्चर्यें स्फुरती अनंतें । तंव तंव नमस्ते । नमस्तेचि ह्मणे ॥ २७ ॥ आणिक स्तुतीही नाठवे । आणि निवांतही [1]नसवे । नेणें कैसा प्रेमभावें । गाजोंचि लागे ॥ २८ ॥ [सहस्रकृत्वः] किंबहुना इयापरी । नमन केलें [2]सहस्रवरी । [नमः पुरस्तात्] कीं पुढती ह्मणे श्रीहरी । तुज सन्मुखा नमों ॥ २९ ॥ [अथ पृष्ठतस्ते] देवासि पाठि पोट आथि कीं नाहीं । येणें उपयोग आह्मा काई । तरि तुज पाठिमोरेयाही । नमों स्वामी ॥ ५३० ॥ उभा माझिये पाठीसीं । ह्मणोनि पाठिमोरें ह्मणावें तुह्मासी । सन्मुख विमुख जगेंसीं । न घडे तुज ॥ ३१ ॥ [नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व] आतां वेगळालिया अवयवां । नेणें रूप करूं देवा । ह्मणोनि नमों तुज सर्वा । सर्वात्मका ॥ ३२ ॥ [अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं] जी अनंत बळसंभ्रमा [3]। तुज नमों अमितविक्रमा । [सर्व समाप्नोषि ततोऽसि सर्वः] सकळकाळीं समा । ‡सर्वदेशा ॥ ३३ ॥ आघविया आकाशीं जैसें । अवकाशचि होऊनि आकाश असे । तूं सर्वपणें तैसें । पातलासि सर्व ॥ ३४ ॥ किंबहुना केवळ । सर्व हें तूंचि निखिळ । परि क्षीरार्णवीं कल्लोळ । पयाचे जैसे ॥ ३५ ॥ ह्मणोनियां देवा । तूं वेगळा नव्हसी सर्वां । हें आलें मज सेद्धावा । आतां तूंचि सर्व ॥ ३६ ॥

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति ।
अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वाऽपि ॥ ४१ ॥

[सखेति मत्वा] परि ऐसिया तूतें स्वामी । कहींच नेणों जी आह्मी । ह्मणोनि सोयरे §संबंधधर्मीं । रौहटलों तुजसीं ॥ ३७ ॥ अहा थोर वाउर जाहालें । अमृतें संमार्जन म्यां केलें । [4]वारिकें धेऊनि दिधलें । कामधेनूतें ॥ ३८ ॥ परिसाचा [5]खडवाचि जोडला । कीं फोडूनि आह्मी [6]गाडोरां घातला । कल्पतरू [7]तोडोनि केला । [8]कूंपें शेता ॥ ३९ ॥ चिंतामणीची खाणी लागली । तेणेंकरूनि [9]वोढाळें [10]वोल्हांटिलीं । तैसी तुझी जवळीक धाडिली । सांगातीपणें ॥ ५४० ॥ [प्रसभं यदुक्तं] हें आजिचेंचि पाहें पां रोकडें । कवण जुंझ हें केवढें ।

---

* जे भूतें. † अखंडित. ‡ सर्वरूपा. § समधर्मी.

१ न राहवे. २ सहस्रवेळा. ३ समारंभरूपा. ४ शुद्ध. ५ प्रत्यवास. ६ सोयरेपणाच्या नात्यानें. ७ वागलों. ८ वाईट. ९ सडासारवण. १० कोंकरूं. ११ पर्वतच. १२ गडगा, पायाभरणीस. १३ कुंपण. १४ ओढाळ गुरें. १५ हांकून लाविलीं.

एथ परब्रह्म तूं उघडें । सारथी केलासी ॥ ४१ ॥ ययां कौरवांचिया घरा । शिष्टाई धाडिलासि दातारा । ऐसा वणिजेसाठीं जगेश्वरा । विकलासि आह्मी ॥ ४२ ॥ [अजानता महिमानं तवेदं] तूं योगियांचें समाधिसुख । कैसा जाणेंचिना मी मूर्ख । उपरोध जी सन्मुख । तुजसीं करूं ॥ ४३ ॥

यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु ।
एकोऽथवाऽप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ४२

[तत्समक्षं] तूं या विश्वाची अनादि आदी । बैससी जिये सभासदीं । [यच्चावहासार्थं] तेथें सोयरीकीचिया संबंधीं । रळीं बोलों ॥ ४४ ॥ [असत्कृतोऽसि] विपायें राउळा येवों । तरि तुझेनि अंगें मान पावों । न मानिसी तरी जावों । रुसोनि सलगी ॥ ४५ ॥ पायां लागोनि बुझावणी । तुझ्याठायीं शार्ङ्गपाणी । पाहिजे ऐशी करणी । बहु केली आह्मी ॥ ४६ ॥ स्वजनपणाचिया वाटा । तुजपुढें बैसें उपराटा । हा पांड काय वैकुंठा । परि चुकलों आह्मी ॥ ४७ ॥ [विहारशय्यासनभोजनेषु] देवेंसि कोलेकाठी धरूं । आखाडां झोंबीलोंबी करूं । सारी खेळतां तस्कारू । निकरेंही भांडों ॥ ४८ ॥ चांग तें उराउरी मागों । सर्वज्ञासि कीं बुद्धी सांगों । तेवींचि ह्मणों काय लागों । तुझे आह्मी ॥ ४९ ॥ ऐसा अपराध हा आहे । जो त्रिभुवनीं न समाये । जी नेणतांचि कीं पाय । शिवतिले तुझे ॥ ५५० ॥ देव बोनयाच्या अवसरीं । लोभें कीर आठवण करी । परि माझा निसुंग गर्व अवधारीं । जे फुगूनचि बैसें ॥ ॥ ५१ ॥ देवाचिया भोगायतनीं । खेळतां आशंकेना मनीं । जी रिगोनियां शयनीं । सेरिसा पहुडें ॥ ५२ ॥ [हे कृष्ण हे यादव हे सखेति] कृष्णा ह्मणोनि हेकारिजे । यादवपणें तूतें लेखिजे । आपली आण घालिजे । जातां तुज ॥ ५३ ॥ [एकोऽथवाप्यच्युत] मज एकासनीं बैसणें । कां तुझा बोल न मानणें । हें *वोतटीचेनि दाटपणें । बहुत घडलें ॥ ५४ ॥ [तत्क्षामये त्वामहं] ह्मणोनि काय काय आतां । निवेदिजेल अनंता । मी राशि आहें समस्तां । अपराधांची ॥ ५५ ॥ यालागीं पुढां अथवा पाठीं । जियें राहाटलों बहुवें वोखटीं । तियें मायेचिया परि पोटीं । सामावीं प्रभो ॥ ५६ ॥ †जी कोण्ही एके वेळे । सरिता घेऊनि येती खेडुळें । तियें सामाविजेति सिंधुजळें । आन उपाय नाहीं ॥ ५७ ॥ [मया प्रमादात्प्रणयेन वापि] तैसीं प्रीती कां प्रमादें । देवेंसी मजविरुद्धें । बोलविलीं तियें मुकुंदें । उपसाहावीं जी ॥५८॥ आणि देवाचेनि

---

* वोळखीचे. † जियें.

---

१ वाणिज्यार्थ, उदिमासाठीं. २ आग्रह, हट्ट. ३ विनोदानें. ४ कदाचित्. ५ समजूत. ६ पाठमोरा. ७ योग्यता. ८ श्रीकृष्णा. ९ दांडपट्टा. १० कुस्ती. ११ सोंगट्या. १२ तिरस्कार करूं. १३ बरोबरीनें. १४ जेवणाच्या. १५ रिकामा. १६ विलासगृहांत. १७ शेजारीं निजें. १८ हाक मारावी. १९ अत्यंत संवट्टणाचे. २० वाईट रीतीनें. २१. गढूळ उदकें.

क्षमत्वें क्षमा । आधार जाली आहे या भूतग्रामा । ह्मणोनि जी पुरुषोत्तमा । विनवूं तें थोडें ॥ ५९ ॥ [अप्रमेयं] *तरि आतां अप्रमेया । मज शरणागता आपुलिया । क्षमा कीजो जी यया । अपराधांसी ॥ ५६० ॥

पितासि लोकस्य चराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः॥

[पिताऽसि लोकस्य चराचरस्य] जी जाणीतलें मियां साचें । महिमान आतां देवाचें । देवो होय चराचराचें । जन्मस्थान ॥ ६१ ॥ [त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान्] हरिहरादि समस्तां । देवा तूं परमदेवता । वेदातेंही पढविता । आद्य गुरु तूं ॥६२॥ गंभीर तूं श्रीरामा । नानाभूतैकसमा । सकळगुणी अप्रतिमा । अद्वितीया ॥ ६३ ॥ [न त्वत्समोऽस्ति] तुजसीं नाहीं सरिसें । हें प्रतिपादनचि कायसें । तुवां जालेनि अवकाशें । सामाविलें जग ॥ ६४॥ [अभ्यधिकः कुतोऽन्यः] तया तुझेनि पाडें दुजें । ऐसें बोलतांचि लाजिजे । तेथ अधिकचि कीजे । गोष्टी केवीं ॥ ६५ ॥ [लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः] ह्मणोनि त्रिभुवनीं तूं एक । तुजसारिखा नाहीं आणिक । तुझा महिमा †अलौलिकु । नेणिजे वानूं ॥६६॥

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ४४

[तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं] ऐसें अर्जुनें ह्मणितलें । मग पुढती दंडवत घातलें । तेथें सात्विकाचें आलें । भरतें तया ॥ ६७ ॥ [प्रसादये त्वामहमीशमीड्यं] मग ह्मणतसे प्रसीद प्रसीद । वाचा होतसे सद्गद । काढीं जी अपराध । समुद्रौनी ॥ ६८ ॥ तुज विश्वसुहृदातें कहीं । सोयरेपणें न मनुंचि पाहीं । तुज विश्वेश्वराचिया ठायीं । ‡आश्चर्य केलें ॥ ६९ ॥ तूं वर्णनीय परी लोभें । मातें वर्णिसी पां सभे । तरि मियां §वगिलजे क्षोभें । अधिकाधिक ॥ ५७० ॥ आतां ऐसिया अपराधां । मर्यादा नाहीं मुकुंदा । ह्मणोनि रक्ष रक्ष प्रमादा । पासोनियां ॥ ७१ ॥ [पितेव पुत्रस्य] जी हेंचि विनवावयालागीं । कैंची योग्यता माझिया आंगीं । परि अपत्य जैसें सलगी । बापेंसि बोले ॥ ७२ ॥ पुत्राचे अपराध । जरी जाहाले अगाध । तरी पिता साहे निर्द्वंद्व । तैसें साहिजो जी ॥ ७३ ॥ सख्याचें उद्धत । सखा साहे निवांत । तैसें तुवां समस्त । साहिजो जी ॥ ७४ ॥ [सखेव सख्युः] प्रियाचियाठायीं सन्मान । प्रियु न पाहे सर्वथा जाण । तेविं उच्छिष्ट काढिलें आपण । तें क्षमा कीजो जी ॥ ७५ ॥ [प्रियः प्रियायार्हसि देव सोढुं] ना तरी प्राणाचें सोयरें भेटे । मग जीवें ¶भूतलीं जियें सं-

---

* परी. † अलौकिक. ‡ ऐश्वर्य. § बगिलजे. ¶ वर्तलीं.

---

१ क्षमारूपानें. २ अतर्का, अनिर्वचनीया. ३ तुल्य. ४ आकाशें. ५ सांठवलें. ६ बरोबरीनें. ७ अपूर्व. ८ कृपा कर. ९ समुद्रांतून. १० वर्णिजे, बडबड करावी. ११ चुकी. १२ लडिवाळपणानें. १३ दुजाभाव सोडून. १४ दांडगेपणा. १५ अनुभवलीं, झालीं.

कटें । तियें निवेदितां न वाटे । संकोच कांहीं ॥ ७६ ॥ कां [1]उखितें आंगें जीवें । आपणपें दिधलें जिया मनोभावें । तिया [2]कांत मिनलिया न राहावें । *हृदय जेविं ॥ ७७ ॥ तयापरी जी मियां । हें विनविलें तुमतें गोसांविया । आणीक कांहीं एक ह्मणावया । कारण असे ॥ ७८ ॥

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितं मनो मे ।
तदेव मे दर्शय देव रूपं प्रसीद देवेश जगन्निवास ॥४५॥

[अदृष्टपूर्वं] तरि देवेंसीं सलगी केली । जे विश्वरूपाची [3]ओळी घेतली । ते मायबापें पुरविली । स्नेहाळाचेनि ॥ ७९ ॥ सुरतरूचीं झाडें । आंगणीं लावावीं [4]कोडें । देयावें कामधेनूचें [5]पाडें । खेळावया ॥ ५८० ॥ मियां नक्षत्रीं डाव पाडावा । चंद्र चेंडु[6]वालागीं †आणावा । हा छंद सिद्धी नेला आघवा । माउलिये तुवां ॥ ८१ ॥ जिया अमृतलेशालागीं सायास । त्याचा पाउस केला चारि मास । पृथ्वी वाहुन [7]चौसेचास । चिंतामणी पेरिले ॥ ८२ ॥ ऐसा कृतकृत्य केला स्वामी । बहु लळा पाळिला तुह्मी । दाविलें जें ‡हरब्रह्मीं । नायकिजे कानीं ॥ ८३ ॥ मा देखावयाची [8]केउती गोठी । जयाची उपनिषदां नाहीं भेटी । ते जिव्हारींची गांठी । मजलागीं सोडिली ॥ ८४ ॥ जी कल्पादि [9]लागौनी । आजिची घडी धरुनी । माझीं जेतुलीं होउनी । गेलीं जन्में ॥८५॥ तया आघवियांचिआंत । §[10]घरडोळी घेऊनि असें पाहत । परि ही देखिली ऐकिली मात । [11]आंतुडेचि ना ॥ ८६ ॥ बुद्धीचें जाणणें । कहीं नवचेचि यावेनि आंगणें । हें ¶[12]सांदही अंतःकरणें । करवेचिना ॥८७॥ तेथ डोळयां [13]देखी होआवी । ही गोष्टीचि कायसया करावी । किंबहुना ऐसें पूर्वीं । [14]दृष्ट ना श्रुत ॥ ८८ ॥ [हृषितोऽस्मि दृष्ट्वा] तें हें विश्वरूप आपुलें । तुह्मी मज डोळां दाविलें । तरि माझें मन झालें । [15]हृष्ट देवा ॥ ८९ ॥ परि आतां ऐशी चाड जीवीं । जे तुजसी गोठी करावी । जवळीक हे भोगावी । आलिंगावयासी ॥ ५९० ॥ तें इयेचिरूपीं करूं ह्मणिजे । तरि कोणे एके मुखेंसीं [16]चांवळिजे । आणि कवणा खेंव देइजे । तुज [17]लेखें नाहीं ॥ ९१ ॥ [भयेन च प्रव्यथितं मनो मे] ह्मणोनि वारियासवें धांवणें । [18]नेठके गगना खेंव देणें । [19]जळकेळी खेळणें । समुद्रीं $केउतें ॥ ९२ ॥ यालागीं जी देवा । एथिचें भय उपजतसे जीवा । ह्मणोनि येतुला

---

* हृदयीं. † देयावा, आवा. ‡ हरिहरब्रह्मीं. § घर ढांडोळी. ¶ साध्यही. $ केउती.

---

१ जिया, जिणें ज्याला आपलें उखितें, सर्वस्व अर्पण केलें तो कांत, नवरा तिला प्राप्त झाला असतां तिच्यानें गुप्त गोष्ट ठेववत नाहीं. २ नवरा. ३ छंद. ४ आवडीनें. ५ वांसरूं. ६ चेंडू ह्मणून. ७ वाफ्यावाफ्यानें. ८ तर मग. ९ काय गोष्ट. १० अंतरंग. ११ प्रारंभापासून. १२ प्रत्येक घराचा झाडा. १३ सांपडेना. १४ शब्द. १५ दृष्ट, गोचर, पाहणें. १६ पाहिलें नाहीं, ऐकिलें नाहीं. १७ आनंदित. १८ बोलिजे. १९ गणना. २० नघडे. २१ जलक्रीडा.

लळा पाळावा । जे पुरे हें आतां ॥ ९३ ॥ [तदेव मे दर्शय देव रूपं] पैं चराचर विनोदें पाहिजे । मग तेणें सुखें घरीं राहिजे । तैसें चतुर्भुज रूप तुझें । तो विसावा आह्मां ॥ ९४ ॥ आह्मी योगजात[1] अभ्यासावें । तेणें याचि अनुभवा यावें । शास्त्रांतें [2]~~मोलेडमवें~~ । परि सिद्धांत तो हाचि ॥ ९५ ॥ आह्मीं यजनें किजती सकळें । परि तियें फळावीं येणेंचि फळें । तीर्थें होतु सकळें । याचिलागीं ॥ ९६ ॥ आणीकही कांहीं जें जें । दान पुण्य आह्मी कीजे । तया फळीं फळ तुझें । चतुर्भुज रूप ॥९७॥ ऐसी तेथिंची जीवा आवडी । ह्मणोनि तेंचि देखावया [3]लवडसवडी । वर्तत असे ते सांकडी । फेडिजे वेगीं ॥ ९८ ॥ [जगन्निवास] अगा जीवींचें जाणतेया । सकळ विश्वर्वसवितेया । [प्रसीद देवेश] प्रसन्न होईं पूजितया । देवांचिया देवा ॥ ९९ ॥

किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।
तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ४६ ॥

[तथैव] कैसें नीलोत्पलातें रांवितें[4] । आकाशाही रंग लावित । तेजाची वोर्ज[5] दावित । इंद्रनीळा ॥ ६०० ॥ जैसा परिमळ जाहाला मरगजा[6] । कां आनंदासि निघालिया भुजा । ज्याचे जानूवरी मकरध्वजा[7] । जोडली बरव[8] ॥ १ ॥ [किरीटिनं] मस्तकीं मुकुटातें लेवविलें । *कीं मुकुटा मुकुट मस्तक झालें । शृंगारा लेणें लाधलें । आंगाचेनि जया[9] ॥ २ ॥ इंद्रधनुष्याचिये आडणी[10] । माजि मेघ गगनरंगणीं । तैसें आवरिलें शार्ङ्गपाणी । वैजयंतिया[11] ॥ ३ ॥ [गदिनं चक्रहस्तं] आतां कवणी ते उदार गदा । असुरां देत कैवल्यपदा । कैसें चक्र हन गोविंदा । सौम्यतेजें मिरवे ॥ ४ ॥ [इच्छामि त्वां द्रष्टुमहं] किंबहुना स्वामी । तें देखावया उत्कंठित पां मी । [तेनैव रूपेण चतुर्भुजेन] ह्मणोनि आतां तुह्मी । तैसया होआवें ॥ ५ ॥ हे विश्वरूपाचे सोहळे । भोगूनि निवाले जी डोळे । आतां होताति †आंधळे[12] । कृष्णमूर्तिलागीं ॥ ६ ॥ तें साकार कृष्णरूपडें । वांचूनि पाहों नावडे । तें न देखतां थोडें । मानिताति हे ॥ ७ ॥ आह्मां भोगमोक्षाचियाठायीं । श्रीमूर्तिवांचूनि नाहीं । [सहस्रबाहो भव] ह्मणोनि तैसाचि साकार होईं । हें [13]उपसंहारीं[14] आतां ॥ ८ ॥

श्रीभगवानुवाच–**मया प्रसन्नेन तवार्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात् ।**
तेजोमयं विश्वमनंतमाद्यं यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वं ४७

या अर्जुनाचिया बोला । विश्वरूपा विस्मयो जाहाला । ह्मणे ऐसा नाहीं

---

* कीं मस्तकचि मुकुट झालें. † आंधळे.

---

१ यमनियमादि सर्व योग. २ उलटून अध्ययन करावें, विचारावें. ३ लगबग. ४ अडचण. ५ काढ. ६ वसविणाऱ्या. ७ रंगवित. ८ चांगुलपणा. ९ पाचेस, मरकत मण्यास. १० मदनास. ११ शोभा. १२ जसा आकाशांत इंद्रधनुष्याचे आडणी, घडवंचीवर मेघ दिसतो तसें वैजयंतीनें कृष्णाला आवरिलें, वेष्टिलें होतें. १३ पाहिले, अगोदरच्याप्रमाणें भुकेले. १४ आटोप.

देखिला । [1]धसाळ कोणी ॥ ९ ॥ ['शांतरसः' श्रीभगवानुवाच-] कोण हे वस्तु पावला आहासी । तया लाभाचा तोष न धेसी । मा भेणें काय नेणों बोलसी । *[2]हेकेंड ऐसा ॥ ६१० ॥ [मया प्रसन्नेन] आह्मी [3]सांवियाचि जैं प्रसन्न होणें । तैं [4]आंगचिवरी ह्मणे देणें । वांचोनि जीव असे वेचणें । कवणासिं गा ॥ ११ ॥ [तवार्जुनेदं] तें हें तुझिये चाडे । [आत्मयोगात्] आजि जीवाचेंचि द[5]ळवाडें । [6]कामऊनियां येवढें । रचिलें ध्यान ॥ १२ ॥ [दर्शितं] ऐसी काय नेणों तुझिये आवडी । जाहाली प्रसन्नता आमुची वेडी । ह्मणोनि गौप्याचीही †[7]गुंढी । उभविली जगीं ॥ १३ ॥ [रूपं परं] तें हें अपरांअपार । स्वरूप माझें परात्पर । एथूनि ते अवतार । कृष्णादिक ॥ १४ ॥ [तेजोमयं विश्वमनंतमाद्यं] हें ज्ञानतेजाचें निर्खिळ । विश्वात्मक केवळ । अनंत हें अढळ । आद्य सकळां ॥ १५ ॥ [यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वं] हें तुजवांचोनि अर्जुना । पूर्वीं श्रुत दृष्ट नाहीं आना । जे जोगें नव्हे साधना । ह्मणोनियां ॥ १६ ॥

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैर्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः ।
एवंरूपः शक्य अहं नृलोके द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ४८

[न वेदयज्ञाध्ययनैः] याची सोयें पातले । आणि वेदीं मौनचि घेतलें । [8]यज्ञ कीर माघौते आले । ‡स्वर्गोनियां ॥ १७ ॥ साधकीं देखिला आयास । ह्मणोनि [9]वोळिला योगाभ्यास । आणि अध्ययनें सौरस्[10] । नाहीं एथ ॥ १८ ॥ [न च क्रियाभिः] [11]सोगेचीं सत्कर्में । §धर्मिन्नलीं [12]स्वसंभ्रमें । तिहीं बहुतेकीं श्रमें । सत्यलोक ठोकिला ॥ १९ ॥ [न तपोभिरुग्रैः] तपीं ऐश्वर्य देखिलें । आणि [13]उभयांचि उग्रपण सांडिलें । एवं तपसाधना जें ठेलें । [14]अपारांतरें ॥ ६२० ॥ [न दानैः एवंरूप इति] तें हें तुवां अनायासें । विश्वरूप देखिलें जैसें । इये मनुष्यलोकीं तैसें । न [15]फावेचि कवणा ॥ २१ ॥ आजि ध्यानसंपत्तिलागीं । तूं एकचि आथिला जगीं । हें परमभाग्य आंगीं । विरंचीही नाहीं ॥२२॥

मा ते व्यथा मा च विमूढभावो दृष्ट्वा रूपं घोरमीदङ्ममेदम् ।
व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं तदेव मे रूपमिदं प्रपश्य॥४९॥

[मा ते व्यथा] ह्मणोनि विश्वरूपलाभें [16]श्लाघ । ¶एथिचें भय नेघ नेघ । हें वांचूनि अन्य चांग । न मनीं कांहीं ॥ २३ ॥ हांगा समुद्र अमृताचा भ-

---

* हेकडु, भेकाड. † परि गुढी. ‡ स्वर्गोनिचि. § धांविनली स्वधर्मे. ¶ एथिंचें तप.

---

१ अविचारी. २ आडाणी, एककल्ली. ३ सहजच. ४ स्वतःस. ५ समुदाय. ६ श्रमपूर्वक तयार करून. ७ ध्वज. ८ सर्वस्व. ९ मार्ग. १० यज्ञानें स्वर्गापर्यंतच जाऊन परत यावें लागतें. ११ लागिला. १२ गोडी. १३ पूर्ण. १४ आपल्या मोठेपणानें. १५ प्राप्त करून घेतला. १६ उभ्याउभ्याच. १७ तप या साधनाला अत्यंत दूर पडतें. १८ प्राप्त होत नाहीं. १९ स्तुतीस पात्र.

रला । आणि [१]अवसांत [२]वेरपडा जाहाला । मग कोणीही आथि वोसंडिलें [३]। बुडिजेल ह्मणोनि ॥ २४ ॥ ना तरी सोनयाचा डोंगर । येसणा *न चले हा थोर । ऐसें ह्मणोनि अव्हेर । करणें घडे ॥ २५ ॥ दैवें चिंतामणी लेइजे । कीं हें ओझें ह्मणोनि सांडिजे । कामधेनू दवडिजे । न पोसवे ह्मणोनी ॥२६॥ चंद्रमा आलिया घरा । ह्मणिजे निगें करितोसि [४]उंबारा । [५]पैंडिसायि पाडितोसि दिनकरा । परता सर ॥२७॥ तैसें ऐश्वर्य हें महातेज । आजि हातां आलें आहे सहज । कीं एथ तुज गजबज । होआवी कां ॥ २८ ॥ [मा च विमूढभावः] परि नेणसीच गांवढिया । काय कोपों आतां धनंजया । आंग सांडोनि छाया । आलिंगितोसि मा ॥२९॥ हें नव्हे जो मी साचें । एथ मन करूनियां काचें । प्रेम धरिसी †आंग[६]णियेचें । चतुर्भुज जें ॥६३०॥ तरि आझुनिवरी पार्था । सांडीं सांडीं हे अवस्था । यियेविषयीं अनवस्था । [७]करिसी झणें ॥ ३१ ॥ [दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदं] हें रूप जरि घोर । ‡[८]विकृती आणी थोर । तरि कृतनिश्चयाचें घर । हेंचि करीं ॥ ३२ ॥ कृपणचित्तवृत्ति जैसी । रोंवोनि घाली [९]ठेवियापासीं । मग [१०]नुसधेन देहेंसीं । आपण असे ॥ ३३ ॥ कां [११]अजातपक्षिया जवळा । जीव ठेऊनि [१२]अविसाळा । पक्षिणी अंतराळा- । माजि जाय ॥ ३४ ॥ नाना गाय चरे डोंगरीं । परि चित्त बांधिलें वत्सें घरीं । तैसें प्रेम एथिंचें करीं । स्थानपती ॥३५॥ येरें वरिचिलेनि चित्तें । बाह्य §सख्य सुखापुरतें । भोगि जो कां श्रीमूर्तितें । चतुर्भुज ॥ ३६ ॥ परि पुढतपुढती पांडवा । हा एक बोल न विसरावा । जे यिये रूपींहुनी सद्भावा । नेदिंवें [१३]निघों ॥ ३७ ॥ [व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं] ¶हें कहीं नव्हतेंचि देखिलें । ह्मणोनि भय जें तुज उपजलें । तें सांडीं एथ संचलें । असों दे प्रेम ॥ ३८ ॥ [तदेव मे रूपमिदं प्रपश्य] आतां करूं तुज यासारिखें । ऐसें ह्मणितलें [१४]विश्वतोमुखें । तरि मागील रूप सुखें । न्याहाळीं पां तूं ॥ ३९ ॥

संजय उवाच–इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा स्वकं रूपं दर्शयामास भूयः
आश्वासयामास च भीतमेनं भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ५०

[संजय उवाच—इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा] ऐसें वाक्य बोलें[१५]तखेवों । मागुता मनुष्य जाहला देवो । हें ना परि [१६]नवलावो । आवडीचा तिये ॥ ६४० ॥ श्रीकृष्णचि कैवल्य [१७]उघडें । वरि सर्वस्व विश्वरूपायेवढें । हातीं दिधलें कीं नावडे । अर्जुनासी ॥ ४१ ॥ वस्तु घेऊनि [१८]वोळिजे । जैसें रत्नासि दूषण ठेविजे । ना तरी कन्या पाहूनियां ह्मणिजे । मना नये हे ॥ ४२ ॥ तया वि-

---

* नुचले. † अवगणियेचें. ‡ विकृत आणि. § सखया. ¶ कधीं नव्हतें हें देखिलें.

---

१ अकस्मात्. २ प्राप्त झाला. ३ त्यागिला. ४ एवढा. ५ उष्मा, तलखी. ६ पडछाया पाडतोस. ७ आकृतीचें, एच्छिक. ८ करूं नको. ९ कंटाळा आणितें, 'विकृत' अशा पाठीं विक्राळ. १० द्रव्याच्या ठेव्याजवळ. ११ केवळ. १२ पक्ष फुटले नाहींत अशा पिल्लास. १३ घरटें. १४ देऊं नये. १५ श्रीकृष्णानें. १६ बोलतांक्षणींच. १७ आश्चर्य. १८ परब्रह्म. १९ टाकावें.

श्वरूपायेवढी दशा । करितां प्रीतिचा वाढ कैसा । शेल दिधलीसे उपदेशा । किरीटीसि देवें ॥ ४३ ॥ मोडोनि भांगाराचा रवा । लेणें घडिलें आपलिया सेवा । मग नावडे जरी जीवा । तरी आटिजे पुढती ॥ ४४ ॥ तैसें शिष्याचिये प्रीती जाहालें । कृष्णत्व होतें तें विश्वरूप *जालें । तें मना नयेचि मग आणिलें । कृष्णपण मागुतें ॥ ४५ ॥ हा ठाववरी शिष्याची निकैसी । साहाते गुरु आहाती कवणे देशीं । परी नेणिजे आवडी कैशी । संजय ह्मणे ॥ ४६ ॥ [स्वकं रूपं दर्शयामास भूयः] मग विश्व व्यापूनि भगवंतें । जें दिव्यतेज प्रकटलें होतें । तेंचि सामावलें मागुतें । कृष्णरूपीं तिये ॥ ४७ ॥ जैसें त्वंपद हें आघवें । तत्पदीं सामावे । अथवा द्रुमाकार सांठवे । बीजकणिके जैवें ॥ ४८ ॥ ना तरी स्वप्नसंभ्रम जैसा । †गिळी चेइलेली जीवदशा । श्रीकृष्णें योग हा तैसा । संहारिला तो ॥ ४९ ॥ जैसी प्रभा हारपली बिंबीं । कीं जळदसंपत्ती नभीं । नाना भरतें सिंधुगर्भीं । रिगाले राया ॥ ६५० ॥ होकां जे कृष्णाकृतीचिये मोडी । होती विश्वरूपपटाची घडी । ते अर्जुनाचिये आवडी । उकलूनि दाविली ॥ ५१ ॥ ‡तंव परिमाणु वा रंग । तेणें §देखिले सावियां चांग । तेथ आहकीये नव्हेचि लाग । ह्मणोनि घडी केली पुढती ॥ ५२ ॥ [भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा] तैसें वाढीचेनि बहुवसपणें । रूपें विश्व जिंतिलें जेणें । तें सौम्य कोडिसवाणें । साकार जाहालें ॥ ५३ ॥ किंबहुना अनंतें । धरिलें धाकुटपण मागुतें । [आश्वासयामास च भीतमेनं] परि आश्वासिलें पार्थातें । बिहालियासी ॥ ५४ ॥ जो स्वप्नीं स्वर्गा गेला । तो अवसांत जैसा चेइला । तैसा विस्मय जाहाला । किरीटीसी ॥ ५५ ॥ ना तरी गुरुकृपेसवें । वोसरलेया प्रपंचज्ञान आघवें । स्फुरे तत्त्व तेविं पांडवें । श्रीमूर्ति देखिली ॥ ५६ ॥ तया पांडवा ऐसें चित्तीं । आड विश्वरूपाची जवनिका होती । ते फिटोनि गेली परौती । हें भलें जाहालें ॥ ५७ ॥ काय काळातें जिणोनि आला । कीं महावात मागां सांडिला । आपुलिया बाहीं उतरला । सातही सिंधु ॥५८॥ ऐसा संतोष बहु चित्तें । घेइजत असे पंडुसुतें । विश्वरूपापाठीं कृष्णातें । देखोनियां ॥ ५९ ॥ मग सूर्याचिया अस्तमानीं । मागुती तारा उगवती गगनीं । तैसा देखों लागला अवनी । लोकांसहित ॥ ६६० ॥ पाहे तंव तेंचि कुरुक्षेत्र । तैसेंचि देखे दोहीं भागीं गोत्र । वीर वर्षताति शस्त्रास्त्र । ¶संघाटवरी ॥ ६१ ॥ तया बाणाचिया मांडवाआंत । तैसाचि रथ देखे निवांत । धुरे बैसला लक्ष्मीकांत । आपण तळीं ॥ ६२ ॥

---

* केलें. † गिळिजे. ‡ तंतूप्रमाणरंग. § देखिला. ¶ संघटवरी.

---

१ उत्तम वांटा. २ सोन्याचा रज. ३ साटीं. ४ किरकिर, जिकीर. ५ सहन करणारे. ६ जीवदशा. ७ ब्रह्मरूपीं. ८ स्वप्नाचा विस्तार, घोटाळा. ९ जागृत झालेली. १० शिरलें. ११ आकार. १२ परिमाण गुण पोत इ० कापडाचें. १३ गिराईक. १४ सुंदर. १५ भ्यालेल्यास. १६ अकस्मात्. १७ लय पावल्यावर. १८ पडदा. १९ बाहूंनीं. २० शस्त्रास्त्रांच्या समुदायानें.

रूपं तव सौम्यं जनार्दन ।
संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ॥ ५१ ॥

गतः] एवं मागिलें जैसें तैसें । तेणें देखिलें
जयालों ऐसें । जाहालें आतां ॥ ६३ ॥ बुद्धीतें
वलें रान । अहंकारेंसीं मन । देशधडी जाहालें
भुललीं । वाचा वाचकपण चुकली । ऐसी आ-
ली । शरीरग्रामीं ॥ ६५ ॥ तियें आघवींचि मागुतीं ।
प्रकृतीं । आतां जिताणें श्रीमूर्ती । जाहालें यियां ॥ ६६ ॥
घेतलें । [दृष्ट्वेदं मानुषं रूपं] मग श्रीकृष्णातें ह्मणितलें । मियां
खिलें । मानुष हें ॥ ६७ ॥ [तव सौम्यं जनार्दन] हें रूप दाख-
या । कीं मज अपत्या चुकलिया । बुंझावोनि तुवां माया । स्तन-
घलें ॥ ६८ ॥ [इदानीमस्मि संवृत्तः] जी विश्वरूपाचिया सागरीं । होतों
मवित वांवेवरी । तो इये निजमूर्तीच्या तीरीं । निगालों आतां ६९ ॥
आइकें द्वारकापुरसुहाडा । मज सुकतिया जी झाडा । हे भेटी नव्हे बहुंडा ।
मेघाचा केला ॥ ६७० ॥ जी सांवियाचि तृषा फुटला । तया मज अमृतसिंधू
हा भेटला । आतां जिणेयाचा फिटला । अभरंसा ॥ ७१ ॥ माझिया हृदय-
रंगणीं । होताहे हर्षलतांची लावणी । सुखेंसीं बुझावणी । जाहाली मज॥७२॥

श्रीभगवानुवाच–सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।
देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकांक्षिणः ॥ ५२ ॥

[श्रीभगवानुवाच—] यया पार्थाचिया बोलासवें । हें काय ह्मणितलें देवें । तुवां
प्रेम ठेवूनि यावें । विश्वरूपीं कीं ॥ ७३ ॥ मग इये श्रीमूर्ती । भेटावें सांडिया
आयती । ते शिकवण सुभद्रापती । विसरला मा ॥ ७४ ॥ †अगा आंध-
ळिया अर्जुना । हाता आलिया मेरुही होय साना । ऐसा आथि मना । ‡चु-
कीचा भावो ॥ ७५ ॥ [सुदुर्दर्शमिति] तरि विश्वात्मक रूपडें । जें दाविलें
आह्मी तुजपुढें । [देवा इति] तें शंभूही परि न जोडे । तपें करितां ॥ ७६ ॥
आणि अष्टांगादिसंकटीं । योगी शिणताति किरीटी । परि अवसर नाहीं
भेटी । जयाचिये ॥ ७७ ॥ तें विश्वरूप एकादे वेळ । कैसेनि देखों अळुमाळ ।
ऐसें स्मरतां काळ । जातसे देवा ॥ ७८ ॥ आशेचिया अंजुळी । ठेऊनि हृद-
याचिया निंडळीं । ते चातक निराळीं । लागले जैसे ॥ ७९ ॥ तैसे उत्कंठा-

* भेटलीं तिये प्रकृती. † अवचटें हाता आलिया अर्जुना । मेरूही होय साना. ‡ दुःस्वभाव.

१ वांचलों. २ वेंघलें, शिरलें. ३ दुर्दशा. ४ सांप्रत. ५. यांला श्रीमूर्तीच वांचविणारी झाली. ६ ओवाळणी. ७ समजूत करून. ८ मोजीत. ९ मित्रा. १० फेरा, परावर्तन. ११ एकाएकींच. १२ आयुष्याचा. १३ संगरहित. १४ किंचित्. १५ कपाळीं. १६ अंतराळीं. १७ आशाभरित.

निर्भर । होऊनियां सुरवर । घोकीत आठही प
परि विश्वरूपासारिखें । स्वप्नींही कोण्ही न दे
देखिलें हें ॥ ८१ ॥

नाहं वेदैर्न तपसा न दानेन न
शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मे

[नाहं वेदै:] पैं उपायासि वाटा । न वाहती पथ सुभट
हटा । वाइला[1] वेदीं ॥ ८२ ॥ [न तपसा] मज विश्वरूपाचि
लावया धनुर्धरा । तपांचियाही सर्वभारा[2] । नव्हेचि लाग
नेन] आणि *दानादि कीर कांनडें[3] । [न चेज्यया] मी यज्ञाही
पडें । [दृष्टवानसि मां यथा] जैसेनि कां सुरवाडें[4] । देखिला तुवां
मी एकीचि परी । आतुडें[5] गा अवधारी । जरी भक्ती येऊनि
त्तातें गा ॥ ८५ ॥

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥ ५४ ॥

[भक्त्या त्वनन्यया शक्यः] परि तेचि भक्ती ऐसी । पर्जन्याची सुंटिका[6] जैसी ।
धरावांचूनि अनारिसी[7] । गतीचि नेणे ॥ ८६ ॥ कां सकळ जळसंपत्ति । घे-
ऊनि समुद्रातें गिवसिती[8] । गंगा जैसी अनन्यगती । मिनलीच मिळे ॥८७॥
तैसें सर्वभावसंभारें । न धरंत[9] प्रेम एकसरें । †मजमाजि संचरे । मीचि हो-
उनी ॥ ८८ ॥ [अहमेवंविधोऽर्जुन] आणि तेविंचि मी ऐसा । थेंडिये[10] आणि मा-
झारीं सरिसा । क्षीराब्धि कां जैसा क्षीराचाचि ॥ ८९ ॥ तैसें मजलागुनी
मुंगीवरी । किंबहुना चराचरीं । भजनासि कां दुसरी । परीचि नाहीं ॥६९०॥
[ज्ञातुं द्रष्टुं च] तयाचि क्षणासवें । एवंविध मी जाणवें । जाणितला तरी स्व-
भावें । दृष्टही होय ॥ ९१ ॥ [तत्त्वेन] मग इंधनीं[12] अग्नि उद्दीपे । आणि इंधन
हे भाष हारपे । तें अग्नीचि होऊनि आरोपे[13] । मूर्त जेविं ॥ ९२ ॥ कां उदय
न कीजे तेजाकारें । तंव गगनचि होऊन असे आंधारें । मग उदैलियां एक-
सरें । प्रकाश होय ॥ ९३ ॥ [प्रवेष्टुं च परंतप] तैसें माझिये साक्षात्कारीं । सरे
अहंकाराची वारी[14] । अहंकारलोपीं अवधारीं । द्वैत जाय ॥ ९४ ॥ मग मी तो
हें आघवें । एक मीचि आथि स्वभावें । किंबहुना सामावे । समरसें तो॥९५॥

---

* दानासि, दानादिकां. † तूं मजमाजि.

---

१ सहा शास्त्रांसहित-ओहोटीं धरिला. २ मार्गानें. ३. कठिण. ४ अनायासें. ५ सांपडें. ६ अंगिकारी. ७ मोकळी. ८ पृथ्वी. ९ अन्य. १० प्रेम न सांवरे. ११ शेवटीं आणि मध्यें सारखा. १२ जळणांत, काष्ठांत. १३ राहे. १४ यात्रा.

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः ।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव ॥ ५५ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विश्वरूपदर्शनयोगो नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

[मत्कर्मकृत्] जो मजचि एकालागीं । कर्में वाहतसे आंगीं । जया मजवांचोनि जगीं । गोमटें नाहीं ॥ ९६ ॥ [मत्परमः] दृष्टादृष्ट सकळ । जयाचें मीचि केवळ । जेणें जिणयाचें फळ । मजचि नाम ठेविलें ॥ ९७ ॥ [निर्वैरः सर्वभूतेषु] मग भूतें हे भाष विसरला । जे दिठी मीचि आहे सूदला । ह्मणोनि निर्वैर जाहाला । [मद्भक्तः] सर्वत्र भजे ॥ ९८ ॥ [संगवर्जितः] ऐसा जो भक्त होये । तयाचें त्रिधातुक[1] हें जैं जाये । [यः स मामेति पांडव] ते मीचि होऊनि ठाये । पांडवा गा ॥ ९९ ॥ ऐसें जगदुदरदोंदिलें । तेणें करुणारसरसाळें । संजयो ह्मणे बोलिलें । श्रीकृष्णदेवें ॥ ७०० ॥ ययावरी तो पांडुकुमरु । जाहाला आनंदसंपदा थोरु । आणि कृष्णचरणचतुरु । एक तो जगीं ॥१॥ तेणें देवाचिया दोनही मूर्ती । निकिया न्याहाळिलिया चित्तीं । तंव विश्वरूपाहूनि कृष्णाकृतीं । देखिला लाभु ॥ २ ॥ परि तयाचिये जाणिवे । मान न कीजेचि देवें । [2]जे व्यापकाहूनि नव्हे । [3]एकदेशी ॥ ३ ॥ हेंचि [4]समर्थावया लागीं । एक दोन चांगी । उपपत्ती शार्ङ्गी । दाविता जाहाला ॥ ४ ॥ तिया ऐकोनि सुभद्राकांत । चित्तीं आहे ह्मणत । तंरि होय बरवें दोहींआंत । तें पुढती पुसों ॥ ५ ॥ ऐसा [5]आलोच करूनि जीवीं । आतां पुसती वोजें[6] बरवी । आदरील ते परिसावी । पुढें कथा ॥ ६ ॥ [7]प्रींजळ ओवीप्रबंधें । गोष्टी सांगिजेल विनोदें । तें परिसा आनंदें । ज्ञानदेवो ह्मणे ॥ ७ ॥ भरोनि सद्भावाची अंजुळी । मियां वोवियाफुलें मोकळीं । अर्पिलीं अंघ्रियुगुलीं[8] । विश्वरूपाच्या ॥ ७०८ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

श्लोक ५५, ओंव्या ७०८.

---

१ कफ–वात–पित्तात्मक शरीर. २ कारण कीं व्यापक स्वरूपावरून एकदेशी जें स्वरूप, चतुर्भुज त्यावर आलेली म्हणून मान्य नाहीं. ३ सिद्ध करण्यास. ४ विचार. ५ इच्छित. ६ स्पष्ट. ७ दोहों पायांवर.

ज्ञानेश्वरी.

अध्याय १२ वा.

जयजय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे । अनवरत आनंदे । वर्षतिये ॥ १ ॥ विषयव्याळें मिठी । दिधलिया नुठी *ताटी । ते तुझिये कृपादृष्टी । निर्विष होय ॥ २ ॥ तरि कवणातें ताप पोळी । कैसेनि वो शोक जाळी । जरि प्रसादरसकल्लोळीं । पुरें येसि तूं ॥ ३ ॥ योगसुखाचे सोहळे । सेवकां तुझेनि स्नेहाळें । सोहंसिद्धीचे लळे । पाळसी तूं ॥ ४ ॥ आधारशक्तीचिया अंकीं । वाढविसी कौतुकीं । †हृदयाकाशपाळखीं । परिये देसी निजें ॥ ५ ॥ प्रत्यक्ज्योतीचीं वोवाळणीं । करिसी मनपवनाचीं खेळणीं । आत्मसुखाचीं बाळलेणीं । लेववसी ॥ ६ ॥ सतराविये चें स्तन्य देसी । अनाहताचा हुंबर गासी । समाधिबोधें निजविसी । बुझाउनी ॥ ७ ॥ ह्मणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझिया पाउलीं । याकारणें मी साउली । नसंडीं तुझी ॥ ८ ॥ अहो सद्गुरुचिये कृपादृष्टी । तुझें कारुण्य जयातें अधिष्टी । तो सकळ विद्यांचिये सृष्टी । धात्रा होय ॥ ९ ॥ ह्मणोनि अंबे श्रीमंते । निजजनकल्पलते । आज्ञापीं मातें । ग्रंथनिरूपणीं ॥ १० ॥ नवरसीं भरवीं सागर । करवीं उचितरत्नाचे ‡आगर । भावार्थाचे गिरिवर । निफजवीं माये ॥ ११ ॥ साहित्यसोनियांचिया खाणी । उघडवीं देशियेचिया क्षोणी । विवेकवल्लीची लावणी । हों देईं सैंघ ॥ १२ ॥ संवादफळनिर्धानें । प्रमेयाचीं उद्यानें । लावीं ह्मणें गहनें । निरंतर ॥ १३ ॥ पाखांडाचे दरकुटे । मोडीं वाग्वाद अव्हांटे । कुतर्काचीं दुष्टें । सावजें फेडीं ॥ १४ ॥ श्रीकृष्णगुणीं मातें । सर्वत्र करीं वो सरतें । राणिवे बैसवीं श्रोतयांतें । श्रवणाचिये ॥ १५ ॥ ये मन्हाठियेचिया नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळ करीं । घेणें देणें सुखचिवरी । हों देईं या जगा ॥ १६ ॥ तूं आपुलेनि स्नेहपल्लवें । मातें पांघुरविशील सदैवें । तरि आतांचि हें आघवें । §निर्मीन माये ॥ १७ ॥ इये विनवणीयेसाठीं । अवलोकिलें गुरुकृपादृष्टी । ह्मणे गीतार्थेंसीं उठी । न बोलें बहु ॥ १८ ॥ तेथ जी जी

---

* ताठी. † हृदयाकाशपळघंकीं (पलंग). ‡ आकर (खाणि). § निमीन.

१ उदार, सद्गुरुकृपादृष्टी. २ निरंतर. ३ मूर्च्छा. ४ भाज्ञी. ५ पूरानें. ६ योगाच्या मांडीवर, मूलाधारचक्राच्या मांडीवर. ७ पाळणा. ८ झोंके. ९ निजगुजानें, गुह्य उपदेशानें. १० प्रत्यगात्मा. ११ जीवनकळा. १२ गाणें. १३ आश्रय देई. १४ ब्रह्मदेव. १५ अलंकारांचे. १६ देशभाषारूप जमिनींत. १७ पुष्कळ. १८ ठेव. १९ गुहा. २० पळवीं. २१ श्रेष्ठ. २२ केवळ सुखाचे. २३ कृपारूपपदरानें. २४ बरोबर.

महाप्रसाद । ह्मणोनि साविया[१] जाहाला आनंद । आतां निरोपीन प्रबंध । अवधान दीजे ॥ १९ ॥

अर्जुन उवाच–**एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।**
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १ ॥

[अर्जुन उवाच–] तरि सकळवीराधिराज । जो सोमवंशीं विजयध्वज । तो बोलता जाहाला आत्मज । पांडुनृपाचा ॥ २० ॥ *कृष्णातें ह्मणे अवधारिलें । आपण विश्वरूप मज दाविलें । तें नेवल[३] ह्मणोनि बिहालें[४] । चित्त माझें ॥२१॥ आणि इये कृष्णमूर्तीची सेवें[५] । यालागीं सोय धरिली जीवें । तंव नको ह्मणोनि देवें । वारिलें[६] मातें ॥२२॥ तरि व्यक्त[७] आणि अव्यक्त[८] । हें तूंचि एक निभ्रांत । भक्तीं[९] पाविजे व्यक्त । अव्यक्त योगें ॥ २३ ॥ या दोनी जी वाटा । तूतें पावावया वैकुंठा । व्यक्ताव्यक्त दोरवंटा[१०] । रिगिजे † येथ ॥ २४॥ पैं जे वांनी[११] श्यामतुका[१२] । तेचि वेगळिये वाला येका । ह्मणोनि एकदेशीया व्यापका । सरिसी[१३] पाड ॥ २५ ॥ अमृताचिया सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी । तेचि दे अमृतलहरी । चुळी घेतलिया ॥२६॥ हे कीर माझ्या चित्तीं । प्रतीति आथि जी निरुती[१४] । परि पुसणें योगपती । तें याचिलागीं ॥ २७ ॥ जे देवा तुह्मी नावेक । अंगीकारिलें व्यापक[१५] । तें साचचि कीं कवतिक । हें जाणावया ॥२८॥

[एवं सततयुक्ता इति] तरि तुजलागिं कर्म । तूंचि जयाचें परम । भक्तीसि मनोधर्म । विकोनि ‡घातला[१६] ॥ २९ ॥ इत्यादि सर्वोपरी । जे भक्त तूतें श्रीहरी । बांधोनियां जिव्हारीं[१७] । उपासिती ॥ ३० ॥ [ये चापि] आणि जें प्रणवापैलीकडे । [अक्षरमव्यक्तं] वैखरीयेसि जें कोंनडें[१८] । कायिसयाहि सांगडें[१९] । नव्हेचि जें वस्तु ॥ ३१ ॥ तें अक्षर जी अव्यक्त । निर्दोष देशरहित । सोहंभावें[२०] उपासित । ज्ञानिये जें ॥ ३२ ॥ [तेषां के योगवित्तमाः] तयां आणि जी भक्तां । येरयेरांमाजि अनंता । कवणें योग तत्त्वता । जाणितला सांग ॥ ३३ ॥ इया किरीटीचिया बोला । तो जगद्बंधु संतोषला । ह्मणे हो प्रश्न भला । जाणसी करूं ॥ ३४ ॥

श्रीभगवानुवाच–**मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।**
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥

[श्रीभगवानुवाच–श्रद्धया परयोपेताः] तरि अस्तगिरीचिया उपकंठीं[२१] । रिगालिया रविबिंबापाठीं । रश्मी जैसे किरीटी । §संचरती ॥ ३५ ॥ कां वर्षाकाळीं सरिता । जैसी चढों लागे पांडुसुता । तैसी ¶नीचें[२२] नवी भजतां । श्रद्धा दिसे

---

* मग ह्मणे कृष्णातें. † जेथ. ‡ घातले. § संचरती गा. ¶ दुणेहीवरी.

---

१ तात्काळ. २ अद्भुत. ३ भिऊन गेलें. ४ सवय, चटक. ५ निवारण केलें. ६ साकार. ७ निराकार. ८ भक्तीनें. ९ उमरा. १० कस. ११ शंभर भार वजनाचा, शंभर वालांस. १२ तुल्य योग्यता. १३ खरी. १४ विराट्रूप. १५ अंतःकरणीं. १६ अवघड. १७ सारखें, संगत, युक्त. १८ तो मी या भावानें. १९ समीप. २० नित्य.

॥ ३६ ॥ [मय्यावेश्य मन इति] परी ठाकिलियाहि सागर । जैसा मागीलही यावा अनिवार । तिये गंगेचिये ऐसा पडिभर । प्रेमभावा ॥ ३७ ॥ तैसें सर्वेंद्रियांसहित । मजमाजि सूनि चित्त । जे *रात्रि दिवस न ह्मणत । उपासिती ॥ ३८ ॥ [ते मे युक्ततमा मताः] इयापरी जे भक्त । आपणपें मज देत । तेंचि मी योगयुक्त । परम मानीं ॥ ३९ ॥

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।
सर्वत्रगमचिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ ३ ॥

[ये त्वक्षरं] आणि येर तेही पांडवा । जे आरूढोनि सोहंभावा । झोंबती निरवयवा । अक्षरासि ॥ ४० ॥ [अनिर्देश्यं] †मनाची नेणी न लगे । जेथ बुद्धीची दृष्टी न रिगे । इंद्रियां कीर जोगें । काय होईल ॥ ४१ ॥ [अव्यक्तं] परि ‡ध्यानाही कुवाडें । ह्मणोनि एके ठायीं न सांपडे । व्यक्तीसि माजिवडें । कवणेही नोहे ॥ ४२ ॥ [सर्वत्रगं] जया सर्वत्र सर्वपणें । सर्वांही काळीं असणें । [अचिंत्यं च] जें पावूनि चिंतवणें । हिंपुटी जाहलें ॥ ४३ ॥ जें होय ना नोहे । जें नाहीं ना आहे । ऐसें ह्मणोनि उपाये । उपजतीचिना ॥ ४४ ॥ [कूटस्थमचलं ध्रुवं] जें चळे ना ढळे । सरे ना मैळे । [पर्युपासते] तें आपुलेनिचि बळें । आंगविलें जिहीं ॥ ४५ ॥

संनियम्येंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।
ते प्राप्नुवंति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥

[संनियम्येंद्रियग्रामं] पैं वैराग्यमहापावकें । जाळूनि विषयांचीं कटकें । अधपलीं तवकें । इंद्रियें धरिलीं ॥ ४६ ॥ मग संयमाची थाटी । सूनि मुरडिलीं उपराटीं । इंद्रियें कोंडिलीं कपाटीं । हृदयाचिया ॥ ४७ ॥ अपानींचिया तोंडा । लावोनि आसनमुद्रा सुहाडा । मूळबंधाचा हुडा । पन्नासिला ॥ ४८ ॥ आशेचे लोंग तोडिले । अधैर्याचे कैंडे §झाडिले । निद्रेचें शोधिलें । काळवखें ॥ ४९ ॥ वज्राग्नीचिया ज्वाळीं । करूनि सप्तधातूंची होळी । व्याधीच्या सिसाळीं । पूजिलीं यंत्रें ॥ ५० ॥ मग कुंडलिनियेचा टेंभा । आधारीं केला उभा । तया चोजवलें प्रभा । निर्मथावरी ॥ ५१ ॥ नवद्वारांचिया चौचेकीं । बांधूनि संयतीची अडवंकी । उघडली खिडकी । कैकारांतींची ॥५२॥

* रात्रदिवो. † जेथ मनाची. ‡ ध्यानासिही कुहाडें. § सांडिलें.

१ प्राप्त झाला, मिळाली असतांही. २ लोट. ३ अधिकपण. ४ घालून. ५ नख स्पर्शत नाहीं. ६ गूढ. ७ मध्यें. ८ चिंतणें. ९ कष्टी. १० स्वाधीन केलें. ११ सैन्यें. १२ होरपळलीं, त्वेषानें. १३ फांस. १४ गुहेंत. १५ दृढ, चांगल्या. १६ बुरुज. १७ शृंगारिला. १८ संबंध. १९ खोल पर्वतभाग दूर केले. २० मूळबंधोत्पन्न ज्वालाग्नीनें. २१ शिरांची पंक्ती. २२ शरीरस्थयंत्रदेवता. २३ पलिता. २४ मस्तकापर्यंत. २५ प्राणायाम करून. २६ कपाटांत घालून. २७ खीळ. २८ सुषुम्ना.

प्राणशक्तिचामुंडे । प्रहारूनि संकल्पाचे मेंडे । मनोमहिषाचेनि मुंडें । दिधली बळी ॥ ५३ ॥ चंद्रसूर्यां बुझावणी । करूनि अनाहताची सुंडावणी । सतरावियेचें पाणी । जिंकिलें वेगीं ॥ ५४ ॥ मग मैध्यमा मध्यविवरें । तेणें कोरिवें दादरें । ठाकिलें चेवरें । ब्रह्मरंध्र ॥ ५५ ॥ वरी मकरांत सोपान । तें सांडोनियां गहन । काखे सुनियां गगन । भरलें ब्रह्मीं ॥ ५६ ॥ [सर्वत्र समबुद्धयः] ऐसे जे समबुद्धी । मिळावया सोहंसिद्धी । आंगविताति निरवधी । योगदुर्गें ॥ ५७ ॥ [ते प्राप्नुवंति मामेव] आपुलिया सांटोवाटीं । शून्य घेती उठाउठी । तेही मातेंचि किरीटी । पावती गा ॥५८॥ वांचूनि योगाचेनि बळें । अधिक कांहीं मिळे । ऐसें नाहीं आंगळें । कष्टचि तया ॥ ५९ ॥

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥

[सर्वभूतहिते रताः श्लो० ४] जिहीं सकळभूतांचिया *हितीं । [अव्यक्तासक्तचेतसां] निरालंबीं अव्यक्तीं । पसरलिया आसक्ती । भक्तीविणें ॥ ६० ॥ [क्लेशोऽधिकतरस्तेषां] तयां महेंद्रादि पदें । करिताति वाटवधें । आणि ऋद्धिसिद्धीचीं दंदें । पडोनि ठाती ॥ ६१ ॥ कामक्रोधाचे विलेग । उठावती अनेग । आणि शून्येंसीं आंग । जुंझवावें कीं ॥ ६२ ॥ ताहानें ताहानचि पियावी । भुकेलिया भूकचि खावी । अहोरात्र वोंवीं । मेळावा वारा ॥ ६३ ॥ उनिदियाचें पहुडणें । निरोधाचें वेल्हावणें । झाडांसि सांजणें । चोवळावें गा ॥ ६४ ॥ शीत वेढावें । उष्ण पांघुरावें । वृष्टीचिया असावें । घराआंत ॥६५॥ किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेश नित्य नवा । अतारावीण करावा । तो हा योग ॥ ६६ ॥ एथ स्वामीचें काज । ना बापिकें व्याज । परि मरणेंसीं जुंझ । नित्य नवें ॥ ६७ ॥ ऐसें मृत्यूहूनि तिख । कां घोंटे कढत विख । डोंगर गिळतां मुख । न फाटे काई ॥ ६८ ॥ [अव्यक्ता हि गतिर्दुःखं] ह्मणोनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा । तयां दुःखाचाचि वांटा । भागा आला ॥६९॥ [देहवद्भिरवाप्यते] पाहें पां लोहाचे चणे । जैं बोचरियां पडती खाणें । तैं पोट भरणें कीं मरणें । शुद्धी नेणे ॥ ७० ॥ ह्मणोनि समुद्र बाहीं । तरणें आथि

* अहितीं.

१ प्राणशक्तिरूप चामुंडा देवीला. २ मेंढा. ३ इडा पिंगला नाडींच्या समजावणीस. ४ अनुहत ध्वनी. ५ ध्वनी, गजर. ६ जीवनकलेचें. ७ सुषुम्ना नाडीचे मध्य विवरानें. ८ प्राप्त केलें. ९ शेवटलें. १० तुर्यावस्था. ११ काखेस मारून. १२ स्वाधीन करतात. १३ योग हेच कोणी किल्ले. १४ मोबदल्यास. १५ अधिक, जास्ती. १६ कल्याणाकरितां. १७ अनाश्रय अशा. १८ वाटमारेपण. १९ उपद्रव. २० हाताच्या वावांनीं. २१ मोजावा. २२ जागृतीचें. २३ पसरणें. २४ मित्रभावानें. २५ बोलावें. २६ कुलधर्माचें. २७ निमित्त. २८ बोथऱ्याला.

केंही[१] । कां गगनामाजि पाई । खोलिंजत[२] असे ॥ ७१ ॥ वळघलिया रणाची थाटी[३] । आंगीं न लगतां *काठी । सूर्याची पाउठी[४] । कां होय गा ॥ ७२ ॥ यालागीं पांगुळा हेवा[५] । नव्हे वायूसि पांडवा । तेविं देहवंतां जीवां । अव्यक्तीं गति ॥ ७३ ॥ ऐसाही जरी धिंवसा[६] । बांधोनियां आकाशा । झोंबती तरी क्लेशा । पात्र होती ॥ ७४ ॥ ह्मणोनि येर ते पार्था । नेणतीचि हे व्यथा । जे कां भक्तिपंथा । वोठंगले[७] ॥ ७५ ॥

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥

[ये तु सर्वाणि कर्माणि] कर्मेंद्रियें सुखें । करिती कर्में अशेखें । जियें कां वर्णविशेखें । भागा आलीं ॥ ७६ ॥ विधीतें पाळित । निषेधातें गाळित । [मयि संन्यस्य] मज देऊनि जाळित । कर्मफळें ॥ ७७ ॥ ययापरी पाहीं । अर्जुना माझेठाईं । संन्यसूनि नाहीं । करिती कर्में ॥ ७८ ॥ [मत्पराः] आणीकही जे जे सर्व । कायिक वाचिक मानसिक भाव । तयां मीवांचूनि धांव । आनौती[८] नाहीं ॥ ७९ ॥ ऐसे जे मत्पर । [मां ध्यायंत उपासते] उपासिती निरंतर । ध्यानमिषें घर । माझें झाले ॥ ८० ॥ [अनन्येनैव योगेन] जेथींचिये[९] आवडी । केली मजशीं क्रीळवाडी[१०] । भोग मोक्ष बापुडीं । त्याजिलीं कुळें ॥ ८१ ॥ ऐसे अनन्ययोगें । विकले जिवें मनें आंगें । तयांचें काय एक सांगें । जे †सर्व मी करीं ॥ ८२ ॥

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥

[तेषां] किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा । तो मातेचा सोयरा । केतुला[११] पां[१२] ॥ ८३ ॥ तेवीं मी तयां । जैसे असती तैसियां । कळिकाळ ‡नौकोनियां[१३] । घेतला पेटा[१४] ॥ ८४ ॥ येऱ्हवीं तरी माझियां भक्तां । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता । §कोराव्र मागे ॥ ८५ ॥ तैसे ते माझे । कलत्र हें जाणिजे । कायिसेनिही न लाजे । तयाचेनि मी ॥ ८६ ॥ [मृत्युसंसारसागरात्] जन्ममृत्यूचिया लोटीं[१५] । झळंबती[१६] इया सृष्टी । तें देखोनियां पोटीं । ऐसें[१७] जाहालें ॥ ८७ ॥ भवसिंधूचेनि माजें । कवणासि धाक नुपजे । तेथ जरी कीं माझे । बिहिती[१८] हन ॥ ८८ ॥ [न चिरात्पार्थ] ह्मणोनि गा पां-

* कांटीं. † मी न करीं. ‡ नौकुनियां. § भुकेतें शोची.

१ कोठेंही. २ चालणें होतें. ३ समुदाय, कांट्याचा भारा. ४ पायरी. ५ पैज. ६ धैर्य. ७ आश्रय करून राहिलें. ८ कर्तव्यकर्मांतें. ९ अन्यत्र, दुसरी. १० ज्यांनीं आवडीनें. ११ उदीम. १२ कितीसा वरें. १३ पदरांत लपवून, पराभवून. १४ अधिकार. १५ लाटांनीं. १६ बुडतात. १७ वक्ष्यमाण. १८ भिती.

डवा । मूर्तीचा मेळावा । करूनि त्यांचिया गांवा । धांवत आलों ॥ ८९ ॥ नामाचेया सहस्रवरी । नावा इया अवधारीं । सजूनियां संसारीं । तारू जाहलों ॥ ९० ॥ सांडे जे देखिले । ते ध्यान कासे लाविले । *परीग्रही घातले । तरियावरी ॥ ९१ ॥ प्रेमाची पेटी । बांधली एकाचिया पोटीं । मग आणिले तटीं । सायुज्याचिया ॥ ९२ ॥ परि भक्तांचेनि नांवें । चतुष्पदादि आघवे । वैकुंठींचिये राणिवे । योग्य केले ॥ ९३ ॥ [अहं समुद्धर्ता] ह्मणोनि गा भक्तां । नाहीं एकही चिंता । तयांतें समुद्धर्ता । [भवामि] †आथि मी सदा ॥ ९४ ॥ [मय्यावेशितचेतसां] आणि जेव्हांचि कां भक्तीं । दिधली आपुली चित्तवृत्ती । तेव्हांचि मज सूति । त्यांचिये नाटीं ॥ ९५ ॥ याकारणें गा भक्तराया । हा मंत्र तुवां धनंजया । शिकिजे जे यया । मार्गा भजिजे ॥ ९६ ॥

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।
निवसिष्यसि मय्येव अतऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥

[मय्येव मन आधत्स्व] अगा मानस हें एक । माझ्या स्वरूपीं ‡सांवृत्तिक । [मयि बुद्धिं निवेशय] करूनि घालीं निष्टंकें । बुद्धि निश्चयेंसीं ॥ ९७ ॥ [निवसिष्यसि मय्येव] इयें दोनीसरिसीं । मजमाजि प्रेमेंसीं । रिगालीं तरि पावसी । मातें तूं गा ॥ ९८ ॥ जे मनबुद्धि इहीं । घर केलें माझ्याठायीं । तरि सांगें मग काई । मी तूं उरे ॥ ९९ ॥ [अतऊर्ध्वं] ह्मणोनि दीप पालवे । सेंवेंचि तेज मालवे । कां रविबिंबासवें । प्रकाश जाय ॥ १०० ॥ उचललेया प्राणासरिसीं । इंद्रियेंही निगती जैसीं । तैसा मनबुद्धिपासीं । अहंकार ये ॥ १ ॥ [न संशयः] ह्मणोनि माझिया स्वरूपीं । मनबुद्धी इयें निक्षेपीं । येतुलेनि सर्वव्यापी । मीचि होसी ॥ २ ॥ यया बोला कांहीं । अनारिसें नाहीं । आपली आण पाहीं । वाहतसें गा ॥ ३ ॥

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥ ९ ॥

[अथ चित्तमिति] अथवा हें चित्त । मनबुद्धिसहित । माझ्या हातीं अचुंबित । न शकसी देवों ॥ ४ ॥ [अभ्यासयोगेनेति] तरि गा ऐसें करीं । यया आठां पाहरांमाझारीं । मोटकें निमिषभरी । देत जाईं ॥ ५ ॥ मग जें जें कां निमिखें । देखेल माझें सुख । तेतुलें अरोचक । विषयीं घेइल ॥ ६ ॥ जैसें

* परि गृही. † आथि सदा. ‡ वृत्तिक.

१ अवतार. २ नाव. ३ निस्पृह. ४ गृहस्थास, सपरिवार खटलेवाल्यास. ५ नावेवर. ६ सांगड. ७ गजेंद्रादि. ८ संबंध. ९ सर्व चरित्रीं, ठिकाणीं. १० वतनदार. ११ अक्षत, अव्याहत. १२ बरोबर. १३ लय होतांच. १४ गंतुकाम झालेल्या. १५ ठेव. १६ अन्य, वेगळें. १७ वासनारहित. १८ प्रहरांमध्यें. १९ अल्प. २० क्षण. २१ अरुचि.

शरत्काल रिगे । आणि सरिता वोहटूं लागे । तैसें चित्त काढेल वेगें । प्रपंचौनी ॥ ७ ॥ मग पुनवेहूनि जैसें । शशिबिंब दिसें[१] । दिसें[१] हारपत अंवसे[२] । नाहींचि होय ॥ ८ ॥ तैसें भोगाआंतूनि निगतां । चित्त मजमाजि रिगतां । हळूहळू पांडुसुता । *मीचि होसिल ॥ ९ ॥ अगा अभ्यासयोग ह्मणिजे । तो हा एक जाणिजे । येणें कांहीं न निपजे । ऐसें नाहीं ॥ ११० ॥ पैं अभ्यासाचेनि बळें । एकां गति अंतराळें[३] । व्याघ्र सर्प प्रेंजळे[४] । केले एकीं ॥ ११ ॥ विष कीं आहारीं पडे । समुद्रीं पायवाट जोडे । एकीं वाग्ब्रह्म थोकडें । अभ्यासें केलें ॥ १२ ॥ ह्मणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाहीं । यालागिं माझ्या ठाईं । अभ्यासें †मिळें ॥ १३ ॥

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ॥ १० ॥

[अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि] कां अभ्यासाही लागीं । कैस[५] नाहीं तुझिया आंगीं । तरि आहासी जया ‡भागीं । तैसाचि अस ॥ १४ ॥ इंद्रियें न कोंडीं । भोगातें न तोडीं । अभिमान न सांडीं । स्वजातीचा ॥ १५ ॥ कुळधर्म चाळीं । §विधिनिषेध पाळीं । मग सुखें तुज सरळी[६] । दिधली आहे ॥ १६ ॥ [मत्कर्मपरमो भव] परि मनें वाचा देहें । जैसा जो व्यापार होये । तो ¶मी करीत आहें । ऐसें न ह्मणें ॥ १७ ॥ करणें कां न करणें । हें आघवें तोचि जाणे । विश्व चैळतसे जेणें । परमात्मेनि ॥ १८ ॥ उणयापुरेयाचें कांहीं । उरों नेदीं आपुलियाठायीं । $स्वजातीहि करूनि घेई । ||जीवित्व हें ॥ १९ ॥ मोळियें जेउतें[७] नेलें[८] । तेउतें[९] निवांतचि गेलें । तया पाणिया ऐसें केलें । होआवेंगा॥१२०॥ [मदर्थमपि कर्माणि कुर्वन्] ह्मणोनि प्रवृत्ति आणि निवृत्ती[१०] । इयें वोझीं नेघे[११] मती । अखंड चित्तवृत्ति । माझ्याठायीं ॥ २१ ॥ येऱ्हवीं तरी सुभटा । उजू कां अडेहांटा[१२] । रथ काई खटपटा । करित असे ॥ २२ ॥ आणि जें जें कर्म निपजे । तें थोडें बहु न ह्मणिजे । निवांताचि अर्पिजे । माझ्याठायीं ॥ २३ ॥ [सिद्धिमवाप्स्यसि] ऐसिया मद्भावना । तेंतुल्यागीं[१३] अर्जुना । तूं सायुज्यसदना । माझिया येसी ॥ २४ ॥

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥

[अथैतदप्यशक्तोऽसि] ना तरी हेंही तुज । नेदवे[१४] कर्म मज । [कर्तुं मद्योगमाश्रितः]

---

* मीचि होई. † मिळ. ‡ भंगीं. § विधिपालननिषेधताळीं. ¶ आपण. $ सजातचि. || जीवित.

---

१ दिवसेंदिवस. २ अमावास्येस. ३ अंतरिक्षांत. ४ आप्त. ५ बळ. ६ मोकळीक. ७ आपापले व्यापार करतें. ८ सार्थक. ९ माळ्यानें. १० जिकडे. ११ तिकडे. १२ घेऊं नको. १३ आडवाट. १४ मरणसमयीं, शरीरत्यागकालीं. १५ न देववे.

*तरि गा तूं बुज । पांडुकुमरा ॥ २५ ॥ बुद्धीचिये पाठीं पोटीं । कर्माआदि कां शेवटीं । मातें बांधणें किरीटी । दुवाड जरी ॥ २६ ॥ तरि हेंही असो । सांडीं माझा अतिसो । [यतात्मवान्] †परि संयतिसीं वसो । बुद्धि तुझी॥२७॥ [ततः] आणि जेणें जेणें वेळे । [सर्वकर्मफलत्यागं] घडती कर्में सकळें । तयांचीं तियें फळें । त्यजित [कुरु] जाय ॥ २८ ॥ वृक्ष कां वेली । लोटती फळें आलीं । तैसीं सांडीं निपजलीं । कर्में सिद्धें ॥ २९ ॥ परि मातें मनीं धरावें । कां मज उद्देशें करावें । हें कांहीं नको आघवें । जाऊं दे शून्यीं ॥ १३० ॥ खडकीं जैसें वर्षलें । कां आगीमाजि पेरिलें । कर्म मानीं देखिलें । स्वप्न जैसें ॥ ३१ ॥ अगा आत्मजेच्या विषीं । जीव जैसा निरभिलाषी । तैसा कर्मीं अशेषीं । निष्काम होई ॥३२॥ वन्हीची ज्वाळा जैसी । वायां जाय आकाशीं । क्रिया जिरोंदे तैसी । शून्यामाजी ॥३३॥ अर्जुना हा फलत्याग । आवडे कीर असलग । परि योगामाजि योग । धुरेचा हा ॥३४॥ येणे फलत्यागें सांडे । तें तें कर्म न विरूढे । एकचि ‡वेळुं झाडें । वांझें जैसीं ॥ ३५ ॥ तैसें येणेंचि शरीरें । शरीरा येणें सरे । किंबहुना येरझारें । चिरी पडे ॥ ३६ ॥ [अथ चित्तं इत्यादि श्लोकचतुष्टयभावार्थः] पैं अभ्यासाचिया पाउटीं । ठाकिजे ज्ञान किरीटी । ज्ञानें येइजे भेटी । ध्यानाचिये ॥ ३७ ॥ मग ध्यानासि खेंव । देती आघवेचि भाव । तेव्हां कर्मजात सर्व । दूरी ठाके ॥ ३८ ॥ कर्म जेथ दुरावे । तेथ फलत्याग संभवे । त्यागास्तव आंगवे । शांति सगळी ॥ ३९ ॥ म्हणोनि §यावया शांति । हाचि क्रम सुभद्रापती । अभ्यासचि प्रस्तुतीं । करणें एथ ॥ १४० ॥

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम् ॥ १२ ॥

[श्रेय इति] अभ्यासाहूनि गहन । पार्था मग ज्ञान । ज्ञानापासोनि ध्यान । विशेषिजे ॥ ४१ ॥ [ध्यानादिति] मग कर्मफलत्याग । तो ध्यानापासोनि चांग । त्यागाहूनि भोग । शांतिसुखाचा ॥ ४२ ॥ ऐसिया यया वाटा । इहींचि पेणीं सुभटा । शांतीचा माजिवटा । ठाकिला जेणें ॥ ४३ ॥

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ १३ ॥

[अद्वेष्टा सर्वभूतानां] ¶जो सर्व भूतांच्या ठायीं । द्वेषातें नेणेंचि कहीं । आप-

* तरी तें तूं बुज. † तरी संयतिं वसो. ‡ वेळझाडें. § पावावया. ¶ जो सर्व.

न कर. २ मनांत दृढ धरणें. ३ कठिण. ४ नियमनांत, इंद्रियनिग्रहांत. ५ त्यागिती. ६ कर्त्येविषयीं. ८ निश्चयेंकरून सोपा वाटे. ९ श्रेष्ठ. १० वेळूचीं झाडें. ११ समाप्ति होय. १२ आलिंगन. १३ स्वाधीन. १५ सांप्रत. १६ कर्माच्या फलाची इच्छा सोडणें. १७ क्षमानें. १८ मध्यें. १९ पावला.

पर नाहीं । चैतन्या *जैसा ॥ ४४ ॥ उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे । हें कांहींचि नेणिजे । वसुधा जेवीं ॥ ४५ ॥ [मैत्रः] कां रायाचें देह चाळूं । रंका परौतें गाळूं । हें न ह्मणेचि कृपाळू । प्राण पैं गा ॥ ४६ ॥ [करुण एव च] गाईची तृषा हरूं । व्याघ्रा विष होऊनि मारूं । ऐसें नेणेचि †कां करूं । तोय जैसें ॥ ४७ ॥ तैसी आघवियांचि भूतमात्रीं । एकपणें जया मैत्री । कृपेसि धात्री । आपण जो ॥ ४८ ॥ [निर्ममः इति] आणि मी हे भाष नेणे । माझें कांहींचि न ह्मणे । सुख दुःख जाणणें । नाहीं जया ॥४९॥ तेवींचि क्षमेलागीं । पृथ्वीसि पवाड आंगीं । संतोषा उत्संगीं । दिधलें घर ॥ १५० ॥

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १४ ॥

[संतुष्टः सततं] वार्षियेवीण सागर । जैसा जळें निर्भरें । तैसा निरुपचार । संतोषी जो ॥ ५१ ॥ [यतात्मा दृढनिश्चयः] वाहूनि आपली आण । धरी जो अंतःकरण । निश्चया साचपण । जयाचेनी ॥ ५२ ॥ [योगी] जीव परमात्मा दोनी । ब्रह्मलें एकासनीं । जयाचिया हृदयभुवनीं । विराजती ॥ ५३ ॥ ऐसा योगसमृद्धि । होऊनि जो निरवधि । [मय्यर्पितमनोबुद्धिः] अर्पी मनोबुद्धि । माझ्याठायीं ॥ ५४ ॥ आंत बाहेरि योग । निर्वाळलेयाही चांगु । तरि माझा अनुराग । सप्रेम जया ॥ ५५ ॥ [यो मद्भक्तः स मे प्रियः] अर्जुना तो भक्त । तोचि योगी तोचि मुक्त । तो वल्लभा मी कांत । ऐसा पांढिये ॥ ५६ ॥ हें ना तो आवडे । मज जीवाचेनि पोडें । हेंही एथ थोकडें । रूप करणें ॥ ५७ ॥ तरि पढियंतयाची काहाणी । हे भुलीची भोरणी । इयें तंव न बोलणीं । परि बोलवी श्रद्धा ॥ ५८ ॥ ह्मणोनि गा आह्मा । वेगा आली उपमा । येरहवीं काय प्रेमा । अनुवाद असे ॥ ५९ ॥ आतां असो हें किरीटी । पैं प्रियाचिया गोष्टी । दुणा थांव उठी । आवडी गा ॥ १६० ॥ तयाही वरी विपायें । प्रेमवसंवादिया होये । तिये गोडीसि आहे । कांटाळें मग ॥ ६१ ॥ ह्मणोनि गा पांडुसुता । तूंचि प्रिय आणि तूंचि श्रोता । वरि प्रियाची वार्ता । प्रसंगें आली ॥ ६२ ॥ तरि आतां बोलों । भले या सुखा मीनलों । ऐसें ह्मणतखेंवी डोलों । लागला देवो ॥ ६३ ॥ मग ह्मणे जाण । तया भक्ताचें लक्षण । जया नी अंतःकरण । बैसों घालीं ॥ ६४ ॥

---

* जेवीं. † गा करूं. ‡ संवादिये.

---

१ पृथ्वी. २ बोल. ३ पृथ्वीसारखी योग्यता. ४ मांडीवर. ५ पूर्ण भरलेला. ६ निर्म झाल्यावरही. ७ प्रीति. ८ स्त्री. ९ पती. १० आवडता होय. ११ समतेनें. १२ उणें. १४ हें बोलून दाखऊं नये. १५ दुप्पट रंग वाढे. १६ क्वचित्. १७ उपमा. १८ प्राप्त झ १९ म्हणतांक्षणीं.

[1]खांडावया घाव घाली । कां लावणी जयानें केली । दोघां एकचि साउली । *वृक्ष दे जैसा ॥ ९९ ॥ ना तरी इक्षुदंडु । पाळितया †गोडु । गाळितया कडु । नोहेचि जेवीं ॥ २०० ॥ अरिमित्रीं तैसा । अर्जुना जया भाव ऐसा । [तथा मानापमानयोः] मानापमानीं सरिसा । होत जाय ॥ १ ॥ [शीतोष्णसुखदुःखेषु समः] तिहीं [2]ऋतूं समान । जैसें कां गगन । तैसा एकचि मान । शीतोष्णीं जया ॥ २ ॥ दक्षिण उत्तर [3]मारुता । मेरु जैसा पांडुसुता । तैसा सुखदुःखप्राप्तां । मध्यस्थ जो ॥ ३ ॥ माधुर्यें चंद्रिका । सरिसी राया रंका । तैसा जो सकळिकां । भूतां सम ॥ ४ ॥ आघविया जगा एक । सेव्य जैसें उदक । तैसे जयातें तीन्ही लोक । कांक्षिती गा ॥ ५ ॥ [संगविवर्जितः] ‡जो सबाह्यसंग । सांडोनियां [4]लाग । एकाकी असे आंग । आंगीं सूनीं ॥ ६ ॥

तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित् ।
अनिकेतस्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ १९ ॥

[तुल्यनिंदास्तुतिः] जो निंदेतें नेघे । स्तुती न [5]श्रीधे । आकाशा न लगे । लेप जैसा ॥ ७ ॥ तैसें निंदे आणि स्तुती । मान करूनि एके §पंक्ती । विचरे प्राण वृत्ती । जनीं वनीं ॥ ८ ॥ [मौनी] साच लटिकें दोन्हीं । न बोले जाहला मौनी । जो भोगितां [6]उन्मनी । [7]आंरायेना ॥ ९ ॥ [संतुष्टो येनकेनचित्] जो यथालाभें संतोखे । अलाभें न पारुखे । पाउसेंवीण न सुके । समुद्र जैसा ॥ २१० ॥ [अनिकेतः] आणि वायूसि एकेठायीं । बिढार जैसें नाहीं । तैसा न धरीच कहीं । आश्रय जो ॥ ११ ॥ [स्थिरमतिः] आघवाचि आकाशस्थिति । जेविं वायूसि नित्य वस्ती । तेविं जगचि विश्रांति- । स्थान जया ॥१२॥ हें विश्वचि माझें घर । ऐसी मती जयाची स्थिर । किबहुना चराचर । आपण जाहाला ॥ १३ ॥ [भक्तिमान्मे प्रियो नरः] मग ¶यावरीही पार्था । माझ्या भजनीं आस्था । तरि तयातें मी माथां । मुकुट करीं ॥ १४ ॥ उत्तमासि मस्तक । [8]खालविजे हें काय कौतुक । परि मान करिती तीन्ही लोक । [9]पांयवणियां ॥ १५ ॥ तरि श्रद्धावस्तूशी आदरु । करिता जाणिजे प्रकारु । जरी होय श्रीगुरु । सदाशिव ॥ १६ ॥ परि हें असो आतां । महेशातें [10]वानितां । आत्मस्तुती होतां । संचार असे ॥ १७ ॥ ययालागीं हें नोहे । ह्मणितलें [11]रमानाहें । अर्जुना मी वाहें । शिरीं तयातें ॥ १८ ॥ जे पुरुषार्थसिद्धी [12]चौथी । घेऊनि आपुलिया हातीं । रिगाला भक्तिपंथीं । जगा देत ॥ १९ ॥ कैवल्याचा अधिकारी । मोक्षाची [13]सोडी [14]बांधी करी । कीं जळाचिये परी ।

---

* वृक्ष जैसी. † जैसा गोडु. ‡ तो. § पांती. ¶ ययाहीवर पार्था.

---

१ तोडण्यासाठीं. २ ऋतूंला. ३ वायूला. ४ संबंध. ५ घालूत. ६ महत्व मानीत नाहीं. ७ उन्मनीअवस्थेस विराम. पावत नाहीं. ८ रुष्ट होत नाहीं. ९ नम्र करिजे. १० पायाच्या तीर्थास. ११ वर्णितां. १२ रमानाथानें. १३ मोक्ष. १४ बंधन हातानें सोडतो.

तळवट घे ॥ २२० ॥ ह्मणोनि गा नमस्कारूं । तयातें आह्मी माथां मुकुट करूं । तयाची टांच धरूं । हृदयीं आह्मी ॥ २१ ॥ तयाचिया गुणांचीं लेणीं । लेववूं आपुलिये वाणीं । तयाची कीर्ती श्रवणीं । आह्मी लेऊं ॥ २२ ॥ तो पाहावा हे डोहळे । ह्मणोनि अचक्षुसी मज डोळे । हातींचेनि लीलाकमळें । पूजूं तयातें ॥ २३ ॥ दोंवरी दोनी । भुजा आलों घेऊनी । आलिंगावयालागुनी । तयाचें आंग ॥ २४ ॥ तयासंगाचेनि सुरवाडें । मज विदेहा देह धरणें घडे । किंबहुना आवडे । निरुपम ॥ २५ ॥ तेणेंसीं आह्मा मैत्र । एथ कायसें विचित्र । परि तयाचें चरित्र । ऐकती जे ॥ २६ ॥ तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें । जे भक्तचरित्रातें । प्रशंसिती ॥ २७ ॥ जो हा अर्जुना साचंत । सांगीतला प्रस्तुत । भक्तियोग समस्त । योगरूप ॥ २८ ॥ *जे मी प्रीति करीं । कां मनीं शिरसा धरीं । येवढी थोरी । जया स्थितिये ॥ २९ ॥

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥ २० ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

[ये तु धर्म्यामृतमिदं] ते हे गोष्टी रम्य । अमृतधारा धर्म्य । करिती प्रतीतिगम्य । आइकोनि जे ॥ २३० ॥ [श्रद्दधानाः] †तैसीचि श्रद्धेचेनि आदरें । जयाचेठायीं विस्तरे । जीवीं जयां थारे । जे अनुष्ठिती ॥ ३१ ॥ [यथोक्तं पर्युपासते] परि निरूपिली जैसी । तैसीच स्थिती मानसीं । मग सुक्षेत्रीं जैसी । पेरणी जाहाली ॥ ३२ ॥ [मत्परमाः] परि मातें परम करूनि । इये अर्थीं प्रेम धरूनि । हें सर्वस्व मानूनि । घेती जे पैं ॥ ३३ ॥ [भक्तास्ते] पार्था गा जगीं । तेचि भक्त तेचि योगी । उत्कंठा तयांलागीं । अखंड मज ॥ ३४ ॥ ते तीर्थ ते क्षेत्र । जगीं तेचि पवित्र । भक्तिकथेसि मैत्र । जयां पुरुषां ॥ ३५ ॥ [अतीव मे प्रियाः] आह्मी जयांचें करूं ध्यान । ते आमुचें देवतार्चन । तेवांचूनि आन । गोमटें न मनूं ॥ ३६ ॥ तयांचें आह्मा व्यसन । ते ‡आमुचे निधिनिधान । किंबहुना समाधान । ते मिळती तैं ॥ ३७ ॥ पैं प्रेमळाची वार्ता । जे अनुवादती पांडुसुता । ते मानूं परमदेवता । आपुली आह्मी ॥ ३८ ॥ ऐसें निजजनानंदें । तेणें जगदादिकंदें । बोलिलें मुकुंदें । संजयो ह्मणे ॥ ३९ ॥ राया जो निर्मळु । निष्कलंक लोककृपाळु । शरणागतां स्नेहाळु । शरण्य

* जेणें मीं. † तैसिये. ‡ आमुचें निधान.

१ नम्रता धरी. २ अनुकूलतेनें. ३ खरें. ४ ज्या स्थितीस. ५ धर्मास अनुकूल. ६ अनुभवास येण्याजोगें. ७ चांगल्या क्षेतांत. ८ शरण जाण्यास योग्य.

जो ॥ २४० ॥ पैं *सुरसहायशीळ । लोकलालनलीळ । प्रणतप्रतिपाळ[1] । खेळ जयाचा ॥ ४१ ॥ जो धर्मकीर्ति धवळ । अगाधदातृत्वें सरळ । अतुळबळें प्रबळ । बळिबंधन ॥ ४२ ॥ जो भक्तजनवत्सल । प्रेमळजनप्रांजल । सत्यसेतु सकळ । कलानिधि ॥ ४३ ॥ तो श्रीकृष्ण वैकुंठींचा । चक्रवर्ती निजांचा । सांगे येरू दैवांचा । आइकत असे ॥ ४४ ॥ आतां ययावरी । निरूपिती परी । संजय ह्मणे अवधारीं । धृतराष्ट्रातें ॥ ४५ ॥ तेचि रसाळ कथा । मऱ्हाटिया †प्रतिपथा[2] । आणिजेल आतां । अवधारिजो ॥ ४६ ॥ ज्ञानदेव ह्मणे तुह्मी । संत वोळगावेति[3] आह्मी । हें पढविलें स्वामी । निवृत्तिदेवें ॥ २४७ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

श्लोक २०, ओंव्या २४७.

---

* साह्यशील. † परिपथा.

१ शरणागतरक्षक. २ दुसऱ्या मार्गास. ३ शरण जावें.

ज्ञानेश्वरी.

अध्याय १३ वा.

जयांचें केलिया स्मरण । होय सकळ विद्यांचें [2]अधिकरण । *तेचि वंदूं चरण । श्रीगुरूचे ॥ १ ॥ जयांचेनि आठवें । [3]शब्दसृष्टी [3]आंगवे । [3]सारस्वत आघवें । जिव्हेसि ये ॥ २ ॥ वक्तृत्व गोडपणें । अमृतातें †पारुष ह्मणे । रस होती वोळंगणे । अक्षरांसी ॥ ३ ॥ भावाचें [6]अवतरण । ‡अवतरविती खुण । हाता चढे संपूर्ण । तत्त्वबोध ॥ ४ ॥ श्रीगुरूचे पाय । जैं हृदय गिंवसूनि ठाय । तैं येवढें भाग्य होय । [1]उन्मेषासी ॥ ५ ॥ ते नमस्कारूनि आतां । जो [11]पितामहाचा पिता । लक्ष्मीयेचा भर्ता । ऐसें ह्मणे ॥ ६ ॥

श्रीभगवानुवाच–**इदं शरीरं कौंतेय क्षेत्रमित्यभिधीयते ।**
एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञमिति तद्विदः ॥ १ ॥

[श्रीभगवानुवाच–इदमिति] तरि पार्था परिसिजे । देह हें [12]क्षेत्र ह्मणिजे । [एतदिति] हें जाणे तो बोलिजे । [13]क्षेत्रज्ञ एथें ॥ ७ ॥

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ २ ॥

[क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि] तरि क्षेत्रज्ञ जो एथें । तो मीचि जाण [14]निरुतें । [सर्वक्षेत्रेषु भारत] जो सर्वक्षेत्रातें । [15]संगोपोनि असे ॥ ८ ॥ [क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं] क्षेत्र आणि क्षेत्रज्ञातें । जाणणें जें निरुतें । [यत्तज्ज्ञानं मतं मम] ज्ञान ऐसें तयातें । मानूं आह्मी ॥ ९ ॥

तत्क्षेत्रं यच्च यादृक् च यद्विकारि यतश्च यत् ।
स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु ॥ ३ ॥

[तत्क्षेत्रं यच्च] तरि क्षेत्र येणें नांवें । हें शरीर जेणें [16]भावें । ह्मणितलें तें आघवें । सांगों आतां ॥ १० ॥ [यादृक् च] हें क्षेत्र कां ह्मणिजे । [यतश्च यत्] कैसें [17]कें हें उपजे । [यद्विकारि] कवण कवणीं वाढविजे । विकारीं एथ ॥ ११ ॥ हें

---

* ते वंदूं श्रीचरण. † पारुखें. ‡ अवतरवी निजखुण.

---

१ आश्रयस्थान. २ वाचाबळ, कविताशक्ति. ३ प्राप्त होते. ४ सर्व विद्या. ५ शिळें. ६ आश्रयनूत. ७ अभिप्रायाचें, गर्भित अर्थाचें. ८ आगमन. ९ धरून. १० विचाराला, ज्ञानाला. ११ ब्रह्मदेवाचा पिता, श्रीकृष्ण. १२ शेत. १३ जीव..१४ खरें. १५ पोसून. १६ अभिप्रायें. १७ कोठें.

[1]औट हात मोटकें । कीं केवढें पां केतुकें । [3]बरड कीं पिके । [यत्प्रभावश्च] कोणाचें हें ॥ १२ ॥ [स च यः] इत्यादि सर्व । जे जे याचे भाव । [तत्समासेन मे शृणु] ते *बोलिजती सावेव । अवधान देईं ॥ १३ ॥ पैं याचि स्थळाकारणें । श्रुति सदां बोबाणें । [8]तर्क येणेंचि ठिकाणें । तोंडाळ केला ॥ १४ ॥ चाळितां हेंचि बोली । [9]दर्शनें शेवटा आलीं । तेवींचि नाहीं बुझविलीं । अझुनी द्वंद्वें ॥ १५ ॥ शास्त्रांचिये सोयरिके । विचळिजे येणेंचि एकें । याचेनि ऐकवकें । जगा वाद ॥ १६ ॥ तोंडेंसी तोंडा न पडे । बोला बोलेंसि न घडे । इया युक्ति बडबडे । [11]त्रांय जाहाली ॥ १७ ॥ नेणों कोणाचें हें स्थळ । परि कैसें अभिलाषाचें बळ । जें घरोघरीं कपाळ । पिटवीत असे ॥ १८ ॥ नास्तिका द्यावया तोंड । वेदांचें [12]गोंढें बंड । तें देखोनि पाषांड । आनचि [13]वोजे ॥ १९ ॥ ह्मणे तुह्मी निर्मूळ । लटिकें [14]वोगजाळ । ना ह्मणसी तरि पोफळ [15]। घातलें आहे ॥ २० ॥ पाषांडाचिये कडे । [16]नागवीं लुंचिती मुंडें । नियोजिलीं [17]वितंडें । तळासि येती ॥ २१ ॥ मृत्युबळाचेनि माजें । हें जाईल वीर्ण [18]काजें । तें देखोनियां [19]व्याजें । निघाले योगी ॥ २२ ॥ मृत्यूसि †[20]आंधाधिले । तिहीं निरंजन [21]सेविलें । यमनियमाचे केले । मेळावे पुरे ॥ २३ ॥ येणेंचि क्षेत्राभिमानें । राज्य त्यजिलें [23]ईशानें । ‡[24]गुंति जाणोनि श्मशानें । वास केला ॥ २४ ॥ ऐसिया पैजा महेशा । पांघुरणें दाही दिशा । [25]लांचकर ह्मणोनि कोळसा । [26]काम केला ॥ २५ ॥ पैं [27]सत्यलोकनाथा । वदनें आलीं बळार्था । तन्हीं तो सर्वथा । जाणेचि ना ॥ २६ ॥

ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधैः पृथक् ।
ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥ ४ ॥

[ऋषिभिर्बहुधा गीतं] [26]एक ह्मणती हें स्थळ । जीवाचेंचि समूळ । मग प्राण हें कुळ । तयाचें एथ ॥ २७ ॥ जया प्राणाचे घरीं । अंगें राबती [30]भोंड चारी । आणि [31]मैना ऐसा [32]आवरी । कुळवाडी [33]करी ॥ २८ ॥ तयातें इंद्रियबैलांची [34]पेटी । न ह्मणे अवसीं पाहाटीं । विषयक्षेत्रीं [35]आटी । [36]कोढी भली ॥ २९ ॥ मग [37]धीची वाफ चुकवी । आणि अन्याय बीज [38]वाफवी । कुकर्माचा करवी । राब

* बोलती. † अधाधिले. ‡ युक्ति जिणोनि.

१ साडेतीन हात. २ अल्प. ३ नापीक जमीन. ४ सांग. ५ बडबडे. ६ न्यायशास्त्र. ७ सहा शास्त्रें. ८ चालतात. ९ ऐक्यस्थापना, मूळ. १० रक्षण. ११ मोठें. १२ बडबडे. १३ शब्दपांडित्य. १४ प्रतिज्ञा, सुपारी. १५ दिगंबरवादी. १६ हजामत, डोकीचे केस उपटतात. १७ विरुद्ध. १८ निरर्थक. १९ निमित्तानें. २० भ्याले. २१ एकांत. २२ समुदाय. २३ शिवानें. २४ बंधन, उपाधि. २५ लांचखाऊ. २६ मदन. २७ ब्रह्मा. २८ कर्मवादी. २९ अपान, व्यान, समान, उदान. ३० कर, हात मनासारखा सर्व उदीम करतो. ३१ आवरतो. ३२ जोडी. ३३ मेहनत. ३४ रावे. ३५ कर्तव्यकर्माची ऊब. ३६ पेरी, वाफेंत घाली.

जरी ॥ ३० ॥ तरि तयाचिसारिखें । असंभाव्य पाप पिके । मग जन्मकोटी दुःखें । भोगी जीव ॥ ३१ ॥ ना तरी विधीचिये वाफे । सत्क्रिया बीज आरोपे । तरि जन्मकोटिमापें । सुखचि मविजे ॥ ३२ ॥ तंव आणिक ह्मणती हें नव्हे । हें जिवाचेंचि न ह्मणावें । आमुतें पुसा आघवें । क्षेत्राचें या ॥ ३३ ॥ अहो जीव एथ उंखिता । वस्तीकर वाटे जातां । आणि प्राण हा बैलौता । ह्मणोनि जागे ॥ ३४ ॥ अनादि जे प्रकृति । सांख्य जियेतें गाती । क्षेत्र हे वृत्ति । तियेची जाणा ॥ ३५ ॥ आणि तियेतेंचि आघवा । आथी घरमेळावा । ह्मणोनि ते वाहिवा । घरीं वाहे ॥ ३६ ॥ वाहिव्याचिये रहाटी । जे मुदल तिघे इये सृष्टी । ते तियेचियां पोटीं । जाहाले गुण ॥ ३७ ॥ रजोगुण पेरी । तेतुलें सत्व सोकरी । मग वेळे तम करी । संवगणी ॥ ३८ ॥ रचूनि *महत्तत्वाचें खळें । मळी एके कोळुगेनि पोळें । ते अव्यक्ताची मिळे । सांज भली ॥ ३९ ॥ तंव एकीं मतिमतीं । या बोलाचिया खंती । ह्मणितलें यया ज्ञप्ती । अर्वाचीना ॥ ४० ॥ हां हो परतत्त्वाआंत । कें प्रकृतीची मात । हा क्षेत्रवृत्तांत । उगेचि आइका ॥ ४१ ॥ शून्यसेज †साळिये । सुलीनतेचिये तुळिये । निद्रा केली होती बळियें । संकल्पें येणें ॥ ४२ ॥ तो अवसांत चेइला । उद्यमीं सदैव भला । ह्मणोनि ठेवा जोडला । ‡इच्छावशें ॥४३॥ निरालंबींची वोडी । होती त्रिभुवनायेवढी । हे तयाचिये जोडी । रूपा आली ॥ ४४ ॥ मग महाभूतांचें एकवाट । सैरा वेंटाळूनि भोट । भूतग्रामाचें ओघाट । चिरिले चौरी ॥ ४५ ॥ यावरी आदी । §पांचवटेयांची बांधी । बांधली प्रभेदीं । पांचभौतिकीं ॥ ४६ ॥ कर्माकर्माचे गुंडे । बांध घातले दोहींकडे । नपुंसकें बरडें । रानें केलीं ॥ ४७ ॥ तेथ येरझारे लागीं । जन्ममृत्यूची सुरंगी । सुहाविली निलागी । संकल्पें येणें ॥ ४८ ॥ मग अहंकारासि एकलाधी । करूनि जीवितावधी । वेहाविलें बुद्धी । चराचर ॥ ४९ ॥ यापरी निराळीं । वाढे संकल्पाची डोंळी । ह्मणोनि तो मुळीं । प्रपंचा यया ॥ ५० ॥ ययापरि ¶मतमुक्तकीं । तेथ पडिघायिले आणिकीं । ह्मणती हांहो विवेकी ।

---

* महत्वाचें. † साउलिये. ‡ इच्छेसवें. पांच § विषयांची. ¶ मतमौक्तिकीं.

१ मोजी. २ सांख्य. ३ उपरि, उदासीन. ४ बलुतेदार. ५ वतन. ६ कारभार, वहिवाट. ७ लागवडीच्या. ८ ब्रह्मा, विष्णु व महेश. ९ प्रकृतीच्या. १० राखी. ११ कणीसतोडणी. १२ गुणसाम्य मायेचें. १३ काळनामक बैलाकडून. १४ रास, सांचे. १५ मायावादी. १६ तिरस्कारानें. १७ ज्ञान. १८ आलीकडील. १९ मायेच्या शय्यामंदिरांत अभ्यासाच्या चौथ्या भूमिकेंत. तुळिये=गादीवर. २० बासनेनें. २१ अकस्मात्. २२ जागा झाला. २३ परब्रह्मींची. २४ बाग. २५ लाभास, नफ्यास. २६ ऐक्य. २७ यथेच्छ. २८ पडित जमीन, उखरभूमि २९ भाग. ३० चतुर्विध सृष्टि. ३१ पांच विषयांचीं. ३२ वेगळाले. ३३ दगड. ३४ सुरंगाची वाट. ३५ सुशोभित कल्पिली. ३६ निराश्रित. ३७ एकमत, एकबुद्धि. ३८ लागवडीस लाविलें. ३९ आकाशांत. ४० डाहाळी. ४१ निराधार मतवाले. ४२ खंडण केले. ४३ स्वभाववादी.

*कैसे तुह्मी ॥ ५१ ॥ [१]परतत्त्वाचिया गांवीं । संकल्पसेज[२] देखावी । तरि कां पां न मनावी । प्रकृती [३]तेयाचि ॥ ५२ ॥ परि असो हें नव्हे । तुह्मी या न लगावें । आतांचि हें आघवें । सांगिजैल ॥ ५३ ॥ तरि आकाशीं कवणें । केलीं मेघाचीं भरणें । अंतरिक्षतारांगणें । धरी कवण ॥ ५४ ॥ गगनाचा चांदवा । कोणें ओढिला केधवां । पवन हिंडत असावा । हें कवणाचें [४]मत ॥ ५५ ॥ रोमा कवण पेरी । सिंधू कवण भरी । पर्जन्याचिया करी । धारा कवण ॥ ५६॥ तैसें क्षेत्र हें स्वभावें । वृत्ती कवणाची नव्हे । हें [५]वाहे तया फावे । येरां तुटे ॥ ५७ ॥ तंव [६]आणिकें एकें । †क्षोभें ह्मणितलें निकें । तरि भोगिजे एकें । काळें केविं हें ॥ ५८ ॥ तरि ययाचा [७]मार । देखतांति अनिवार । तरि स्वमतीं भर । अभिमानियां ॥ ५९ ॥ हें जाणें मृत्यू रागिटा । [८]सिंहाडयाचा [९]दुरकुटा । परि काय कीजे [१०]वांजटा । पूरिजेत[११] असे ॥ ६० ॥ महाकल्पापरौती । [१२]कवें घालूनि अवचितीं । सत्यलोकभद्रजाती । [१३]आंगविजे ॥ ६१ ॥ लोकपाळ नित्य नवे । दिग्गजांचे मेळावे । स्वर्गींचिये [१४]आडवे । रिगोनि मोडी ॥ ६२ ॥ येर ययाचेनि अंगवातें । जन्ममृत्यूचिये गर्ते । निर्जीवें होऊनि भ्रमतें । जीवमृगें ॥ ६३ ॥ न्याहाळीं पां केव्हडा । पसरलासे [१५]चवंडा । करूनियां [१६]मोंजिवडा । आकारगज ॥ ६४ ॥ ह्मणोनि काळाची सत्ता । हाचि बोल निरुता । ऐसे वाद पांडुसुता । क्षेत्रालागीं ॥ ६५ ॥ हे बहु [१७]उंखिविखी । ऋषीं केली नैमिषीं । पुराणें इयेविषीं । [१८]मतपत्रिका ॥ ६६ ॥ [छंदोभिर्विविधैः पृथक्] अनुष्टुभादि छंदें । प्रबंधीं जियें विविधें । तें [१९]पवित्रावलंबन [२०]मेदें । करिती अझुनी ॥ ६७ ॥ [ब्रह्मसूत्रपदैश्चैव] वेदींचें बृहत्सामसूत्र । जें देखणेपणें पवित्र । परि तयाही हें क्षेत्र । नेणवेचि ॥ ६८ ॥ [हेतुमद्भिर्विनिश्चितैः] आणीक आणिकींही बहुतीं । महाकवीं हेतुमंतीं । यालागीं मती । वेचिलिया ॥ ६९ ॥ परि ऐसें हें एवढें । कीं अमुकेयाचेंचि [२१]फुडें । हें कोण्हाही [२२]वरपडे । होयचिना ॥७०॥ आतां यावरी जैसें । क्षेत्र हें असे । तुज सांगों तैसें । साद्यंत गा ॥ ७१ ॥

महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।
इंद्रियाणि दशैकं च पंच चेंद्रियगोचराः ॥ ५ ॥
इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ।
एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ ६ ॥

[संक्षेपार्थः] तरि महाभूतपंचक । आणि अहंकार एक । बुद्धि अव्यक्त द-

* तरी तुह्मी भले. † रोषें.

१ परब्रह्माच्या. २ शेजार. ३ संकल्पालाच. ४ मतानें. ५ वतन. ६ मानील. ७ कालवादी. ८ नाश. ९ सिंहाचा. १० गुहा. ११ वृथा. १२ पोषित. १३ मिठी. १४ स्वाधीन करून घेतो, लागतो. १५ अरण्य. १६ पंजा. १७ मध्यें. १८ वादविवाद, भवति न भवति. १९ अभिप्रायपत्रें. २० ग्रंथाश्रय. २१ गर्वानें. २२ स्पष्ट. २३ प्राप्त.

शक । इंद्रियांचा ॥ ७२ ॥ मन आणीकही एक । विषयांचा दशक । द्वेष सुख दुःख । संघात इच्छा ॥ ७३ ॥ आणि चेतना धृति । एवं क्षेत्रव्यक्ती । सांगीतली तुजप्रती । आघवीचि ॥ ७४ ॥ आतां महाभूतें कवणें । कवण विषय कैसीं करणें । हें वेगळालेपणें । एकैक सांगों ॥ ७५ ॥ [महाभूतानि] तरी पथ्वी आप तेज । वायु व्योम इयें तुज । सांगीतलीं बुझ । महाभूतें ॥ ७६ ॥ [अहंकारः] आणि जागतिये दशे । स्वप्न लपालें असे । ना तरी अंवसे । चंद्र गूढ ॥ ७७ ॥ नाना अप्रौढ[1]बाळकीं । तारुण्य राहे थोकीं[2] । कां न फुलतां कळिकीं । आमोद जैसा ॥ ७८ ॥ किंबहुना काष्ठीं । वन्हि जेविं किरीटी । तेविं प्रकृतीचिया पोटीं । गोप्य जो[3] असे ॥७९॥ जैसा ज्वर धातुगत । अपथ्याचें मिष पाहत । मग जालिया आंत । बाहेरि व्यापी ॥ ८० ॥ तैसी पांचांही गांठी पडे । जैं देहाकार उघडे । तैं नाचवी चहूंकडे । तो अहंकार गा ॥८१॥ नवल अहंकाराची गोठी । विशेषें[4] न लगे अज्ञानापाठीं । सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी ॥ ८२ ॥ [बुद्धिः] आतां बुद्धि जे ह्मणिजे । ते ऐशिया चिन्हीं जाणिजे । बोलिलें यदुराजें । आइकें सांगों ॥ ८३ ॥ तरि कंदर्पाचेनि[5] बळें । इंद्रियवृत्तीचेनि[6] मेळे । विभांडूनि[7] येती पाळे । विषयांचे ॥ ८४ ॥ तो सुखदुःखाचा नागोवा[8] । जेथ उगाणों[9] लागे जीवा । तेथ दोहींसी बरवा । पाडु जे धरी ॥ ८५ ॥ हें सुख हें दुःख । हें पुण्य हे दोष । हें मैळ हें चोख । ऐसें निवडिजे ॥ ८६ ॥ जिये अधमोत्तम सुझे[10] । जिये साने थोर बुझे[11] । जियां[12] दिठी पारखिजे[13] । विषो जीवें ॥ ८७ ॥ जे तेजतत्त्वांची[14] आदी[15] । जे सत्वगुणाची वृद्धी[16] । जे आत्मया जीवाची संधी । वसवीत असे ॥ ८८ ॥ अर्जुना ते गा जाण । बुद्धि तूं संपूर्ण । आतां आईक वोळखण । अव्यक्ताचें ॥ ८९॥ [अव्यक्तमेव च] पैं सांख्याचिया सिद्धांतीं । प्रकृती जे महामती । तेचि एथें प्रस्तुतीं । अव्यक्त गा ॥ ९० ॥ आणि सांख्ययोगमतें । प्रकृती परिसविली तुतें[17] । ऐसी दोहीं *परी जेथें । विवंचिली[18] ॥ ९१ ॥ तेथ दुजी जे जीवदशा । तिये नांव वीरेशा । अव्यक्त एथ ऐसा । पर्याय हा ॥ ९२ ॥ तरि पाहालया[19] रजनी । तारा लोपती गगनीं । कां हारपे अस्तमानीं । भूतक्रिया[20] ॥ ९३ ॥ ना तरी देह गेलिया पाठीं । देहादिक किरीटी । उपाधि लपे पोटीं । कृतकर्मांच्या ॥ ९४ ॥ कां बीजमुद्रे[21]आंतु । थोके[22] तरू समस्तु । कां वस्त्रपण तंतु-।

---

* परींची.

१ लहान बाळकाच्या ठायीं. २ गुप्त. ३ अहंकार. ४ अधिक. ५ कामाचे. ६ समागमें. ७ मोडून. ८ टोळ्या, समुदाय. ९ लूट. १० अनुभवूं लागे, हिशोब देणें. ११ समजे. १२ कळे. १३ ज्या दृष्टीनें. १४ ज्ञानेंद्रियांची. १५ मूळ. १६ वाढतीदशा. १७ विस्तारानें सांगितली. १८ अध्याय ७ श्लोक ५ 'अपरेयं' यांत सांगितलेली. १९ रात्रउजाडल्यावर. २० प्राणिमात्रांचे व्यापार. २१ बीजाच्या आकारांत. २२ थांबून राहे.

दशे राहे ॥ ९५ ॥ तैसें सांडूनियां स्थूळधर्म । महाभूतें भूतग्राम । लया जाती सूक्ष्म । होऊनि जेथ ॥ ९६ ॥ अर्जुना तया नांवें । अव्यक्त हें जाणावें । आतां आईक आघवे । इंद्रियभेद ॥ ९७ ॥ [इंद्रियाणि दश] तरि श्रवण नयन । त्वचा घ्राण रसन । इयें जाण ज्ञान-१ करणें पांचे ॥ ९८ ॥ इये तत्त्वमेळापंकीं । सुखदुःखाची उखिविखी । बुद्धि करिते मुखीं२ । पांचें इहीं ॥ ९९ ॥ मग वाचा आणि कर । चरण आणि अधोद्वार । पायू हे प्रकार । पांच आणिक ॥ १०० ॥ कर्मेंद्रियें ह्मणिपती । तियें इयें जाणिती । आइकें कैवल्यपती । सांगतसें ॥ १ ॥ पैं प्राणाची अंतौरी३ । क्रियाशक्ति जे शरीरीं । तियेचि रिगिनिगी४ द्वारीं । पांचें इहीं ॥ २ ॥ एवं दाहाही करणें । सांगीतलीं देव ह्मणे । [एकं च] परिस आतां *फुडेपणें५ । मन तें ऐसें ॥ ३ ॥ जें इंद्रियां आणि बुद्धी । माझारिलिये संधी । रजोगुणाच्या खांदीं । तेरळत६ असे ॥ ४ ॥ नीळिमा अंबरीं । कां मृगतृष्णा लहरी । †तैसे वायांचि फेरारीं७ । वावो८ ‡जाहालेंसे ॥ ५ ॥ आणि शुक्रशोणिताचा सांधा । मिळतां पांचांचा बांधा९ । वायुतत्त्व दशधा । एकचि जाहालें ॥ ६ ॥ मग §तिहीं दाहींभागीं । देहधर्माच्या खेवगीं१० । अधिष्ठिलें आंगीं । आपुलाल्या ॥ ७ ॥ तेथ चांचल्य निखळ । एकलें ठेलें निढाळ११ । ह्मणोनि रजाचें बळ । धरिलें तेणें ॥ ८ ॥ तें बुद्धिसी बाहेरी । अहंकाराच्या उरावरी । ऐसे ठायीं माझारीं । बळियावलें ॥ ९ ॥ वायां मन हें नांव । यन्हवीं कल्पनाचि सावेव । जयाचेनि संगें जीव-१२ दशा वस्तु ॥११०॥ जें ¶प्रकृतीस मूळ । कामा जयाचें बळ । जें अखंड $सुये१३ सुळ । अहंकारासी ॥ ११ ॥ जें इच्छेतें वाढवी । आशेतें चढवी । जें पाठी पुरवी । भयासि गा ॥ १२ ॥ द्वैत जेथ उठी । अविद्या जेणें लोटी१४ । जें इंद्रियांतें लोटी । विषयांमाजी ॥ १३ ॥ संकल्पें सृष्टी घडी । सवेंचि विकल्पूनि मोडी । मनोरथांच्या उतरडी१५ । उतरी रची ॥ १४ ॥ जें भुलीचें कुहर१६ । वायुतत्त्वाचें अंतर । बुद्धीचें द्वार । ||झांकविलें जेणें ॥ १५ ॥ तें गा किरीटी मन । या बोला नाहीं आन । आतां विषयाभिधान-१७ । भेद आइकें ॥१६॥ [पंच च] तरी स्पर्श आणि शब्द । रूप रस गंध । हा विषय पंचविध । ज्ञानेंद्रियांचा ॥ १७ ॥ इहीं पांचै द्वारीं । ज्ञानासि धांव बाहेरी । जैसा कां +हिरविया चारीं । भांबावे पशु ॥ १८ ॥ ['चकारार्थः'] मग स्वर१८ वर्ण१९ विसर्ग । अथवा स्वीकार त्याग । क्रमण२० उत्सर्ग२१ ।

---

* पुढेंपणें. † तैसें. ‡ जाहालें. § तेंही. ¶ प्रवृत्तिस. $ सुयेळ. || झांकलें. + हिरवें.

१ ज्ञानेंद्रियें. २ विचार. ३ सुख. ४ उपस्थ. ५ श्रवणादि. ६ वायको. ७ गमनागमन. ८ निश्चयानें. ९ खेळत असे. १० व्यर्थ. ११ मास. १२ निर्फळ. १३ स्त्रीपुंबीजांचा. १४ ऐक्य. १५ बलानें. १६ केवळ. १७ बळ घाली. १८ दांडगी. १९ एकावर एक रचलेली मडकीं. २० कोठार. २१ विषय असे ज्याचें अभिधान त्याचे भेद आईक. २२ वर्णोच्चार. २३ चालणें. २४ त्याग.

विण्मूत्राचा ॥ १९ ॥ हे कर्मेंद्रियांचे पांच । विषय गा साच । जे बांधोनियां[1] मांच । क्रिया धांवे ॥ १२० ॥ [इंद्रियगोचराः] ऐसे हे दाही । विषय गा इये देहीं । आतां इच्छा तेही । सांगिजैल ॥ २१ ॥ [इच्छा] तरि भूतलें[2] आठवे । कां बोलें[3] न झांकवे । ऐसियावरी चेतवे । जे गा वृत्ती ॥ २२ ॥ इंद्रियविषयांचिया भेटी । सरसीच जे गा उठी । कामाची बाहुटी[4] । धरूनियां ॥ २३ ॥ जियेचेनि उठिलेपणें । मना सैंधें[5] धांवणें । न रिघावें तेथ करणें[6] । तोंडें[7] सुती ॥ २४ ॥ जिये वृत्तीचिया आवडी । बुद्धी होय वेडी । विषयां जिया गोडी । ते गा इच्छा ॥ २५ ॥ [द्वेषः] आणि इच्छिलिया सांगडें[8] । इंद्रियां अमिष न जोडे । ऐसा जो डाव पडे । तोचि द्वेष ॥ २६ ॥ [सुखं] आतां यावरी सुख । तें एवंविध देख । जेणें एकेंचि अशेष[9] । विसरे जीव ॥ २७ ॥ मना वाचे काये । जे आपुली आण[10] वाये । देहस्मृतीची त्राये[11] । मोडित[12] ये जें ॥ २८ ॥ जयाचेनि जालेपणें । पांगुळा होइजे प्राणें[13] । सात्विकासी दुर्गे[14] । वरीही लाभ ॥ २९ ॥ कां आघवियाचि इंद्रियवृत्ती । हृदयाचिया एकांतीं । थापटूनि सुषुप्ति[15] । आणी जें गा ॥ १३० ॥ किंबहुना सोय[16] । जीवें[17] आत्मयाची लाहे । तेथ जें होय । तया नाम सुख ॥ ३१ ॥ [दुःखं] आणि ऐसी हे अवस्था । न जोडतां पार्था । *जे कीजे तेंचि सर्वथा । दुःख जाण ॥ ३२ ॥ तें †मनोरथसंगें न होये । येरवीं सिद्धि गेलेंचि आहे । हे दोनीचि[17] उपाये । सुखदुःखासी॥३३॥ [चेतना] आतां असंगा साक्षिभूता । देहीं चैतन्याची जे सत्ता । तिये नाम पांडुसुता । चेतना येथ ॥ ३४ ॥ जे नखांनि[18] केशवरी । उभीं जागे शरीरीं । जे तिहीं[19] अवस्थांतरीं । पालटेना ॥३५ ॥ मनबुद्ध्यादि आघवीं । जियेचेनि टवटवी । प्रकृतिवनमाधवी[20] । सदांचि जे ॥ ३६ ॥ जडाजडीं अंशीं । राहाटे[21] जे सरिसी । ते चेतना गा तुजसीं । लटिकें नाहीं ॥३७॥ पैं रावो[22] परिवारु[23] नेणे । आज्ञाचि परचक्र[24] जिणे । कां चंद्राचेनि पूर्णपणें । सिंधु भरती ॥ ३८ ॥ नाना[25] भ्रामकाचें[26] सन्निधान । लोहो करी सचेतन[27] । कां सूर्यसंग जन । चेष्टवी गा ॥ ३९ ॥ अगा मुखमेळेंविण[28] । पिलियाचें पोषण । करी निरीक्षणें[29] । कूर्मी जेवीं ॥ १४० ॥ पार्था तयापरी । आत्मसंगती इये शरीरीं । सजीवत्वाचा करी । ‡उपयोग जडा ॥ ४१ ॥ मग तियेतें चेतना । ह्मणिपे पैं अर्जुना । आतां धृतीविवंचना[30] । भेद आइकें ॥ ४२ ॥ [धृतिः] तरि तत्त्वां परस्परें । उघड जाती

---

* जी जेतें. † मनोरथभंगें होय. ‡ उपेगु.

---

१ मार्ग. २ मागलें. ३. हात. ४ जिकडे तिकडे, पुष्कळ. ५ इंद्रियें. ६ तोंडें घालितात. ७ बरोबर. ८ विषयभोग. ९ संपूर्ण. १० शपथ वाही. ११ त्राण, रक्षण. १२ लंगडा. १३ दुप्पट. १४ निद्रा. १५ मार्ग. १६ जीवाला. १७ मनोरथसंग आणि मनोरथत्याग हे दोन उपाय. १८ नखांपासून केसांपर्यंत. १९ जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तिहींत. २० मायारूप वनाला वसंत. २१ संचार करी. २२ राजा. २३ लवाजमा, खटला. २४ जिंकी. २५ अथवा. २६ लोहचुंबकाचें. २७ चंचळ. २८ स्तनास तोंड लावल्यावांचून. २९ अवलोकन. ३० धैर्याच्या विचाराचे.

स्वभाववैरें । नोहे पथ्वीतें नीरें । *न [१]नाशिजे ॥ ४३ ॥ [२]नीरातें आटी तेज । तेजा वायूसिं जुंझ । आणि गगन तें सहज । †वायूसि भक्षी ॥४४॥ तेवींचि कोणेही वेळे । आपण कायसयाही न मिळे । आंत रिघोनि वेगळें । आकाश हें ॥ ४५ ॥ ऐसीं हीं पांचही भूतें । न साहती एकमेकातें । कीं तियेंही ऐक्यातें । देहा येती ॥ ४६ ॥ द्वंद्वाची [३]उखिविखी । सोडूनि वसती एकीं । एक एकातें पोखी । निजगुणें गा ॥ ४७ ॥ ‡ऐसें न मिळे तयां [४]साजणें । §चळे धैर्यें जेणें । तिये नाम मी ह्मणे । धृती पैं गा ॥ ४८ ॥ [संघातः] आणि जीवेंसीं पांडवा । या छत्तिसांचा मेळावा । तो हा एथ जाणावा । संघात पैं गा ॥ ४९ ॥ [एतत्क्षेत्रं समासेन] एवं छत्तीसही भेद । सांगीतले तुज विशद । [प्रथमश्लोकस्थं क्षेत्रमित्यभिधीयते इति पदं व्याचष्टे] यया येतुलेयातें प्रसिद्ध । क्षेत्र ह्मणिजे ॥ १५० ॥ रथांगांचा मेळावा । जेविं रथ ह्मणिजे पांडवा । कां अधोर्ध्व अवेवां । नाम देह ॥ ५१ ॥ करीतुरंगसमाजें । सेना नाम निपजे । कां वाक्यें ह्मणिपती पुंजे । अक्षरांचे ॥ ५२ ॥ कां जळधाराचा मेळा । वाच्य होय [५]आभाळा । नाना लोकां सकळां । नाम जग ॥ ५३ ॥ कां स्नेहसूत्रवन्ही । मेळ एकिये स्थानीं । धरिजे तो जनीं । दीप होय ॥ ५४ ॥ तैसीं छत्तीसही इयें तत्त्वें । मिळती जेणें एकत्वें । तेणें समूहपरत्वें । क्षेत्र ह्मणिजे ॥ ५५ ॥ आणि [६]वाहतेनि भौतिकें । पाप पुण्य एथ पिके । ह्मणोनि आह्मी कौतुकें । क्षेत्र ह्मणों ॥ ५६ ॥ आणि एकाचेनि मतें । देह ह्मणती ययातें । परि असो हें [७]अनंतें । नामें यया ॥ ५७ ॥ पैं परतत्त्वा अरौतें । ¶[८]स्थावराआंतौतें । जें कांहीं होतें जातें । तें क्षेत्रचि हें ॥ ५८ ॥ [सविकारमुदाहृतं] परि सुर नर उरगीं । घडत आहे योनिविभागीं । तें गुणकर्मसंगीं । [९]पडिलें सातें ॥ ५९ ॥ हेचि गुणविवंचना । [१०]पुढां ह्मणिपेल अर्जुना । प्रस्तुत तुज ज्ञाना । रूप दावूं ॥ १६० ॥ क्षेत्र तंव सविस्तर । सांगितलें सविकार । ह्मणोनि आतां [११]उदार । ज्ञान आइकें ॥ ६१ ॥ जया ज्ञानालागीं । गगन गिळिताति योगी । स्वर्गाची [१२]आडवंगी । [१३]उमरडोनी ॥ ६२ ॥ न धरिती ऋद्धीची भीड । न करिती सिद्धीची चाड । योगा ऐसें दुवाड । [१४]हेळसिती ॥ ६३ ॥ [१५]तपोदुर्गें वोलांडित । क्रतुकोटि वोवांडित [१६]। उलथूनि सांडित । [१७]कर्मवल्ही ॥ ६४ ॥ नानाभजनमार्गीं । धांवत उघडिया आंगीं । एक रिघताति [१८]सुरंगीं । सुषुम्नेचिये

---

* विनाशिजे. † वायू भक्षी. ‡ आणि ऐसेनि मिळे. § चाले. ¶ स्थावर तीं अतौतें.

---

१ संहारी. २ उदकाला शोषी. ३ वादविवाद. ४ मैत्री, सज्जपणें. ५ समुदाय. ६ अभ्रास. ७ तेल, वात व अग्नि. ८ सव्यापार. ९ शरीरें. १० अपार. ११ जडाच्या. १२ पडले असतां. १३ चतुर्दशाध्यायांत. १४ उत्तम. १५ आडमार्ग. १६ ओलांडून. १७ ~~काम्यकर्मात~~. १८ तपाचे किल्ले. १९ ओवाळीत. २० कर्मकांड. २१ गुप्तमार्गी.

॥६५॥ ऐसी जिये ज्ञानी । *मुनीश्वरांची उतान्ही । वेदतरूच्या पानोवानीं । हिंडताती ॥ ६६ ॥ देईल गुरुसेवा । इया बुद्धी पांडवा । जन्मशतांचा सांडोवा । टाकित जे ॥ ६७ ॥ जया ज्ञानाची रिगवणी । अविद्ये उणें आणी । जीवा आत्मया बुझावणी । मांडूनि दे ॥ ६८ ॥ जें इंद्रियांचीं द्वारें आडी । प्रवृत्तीचे पाय मोडी । जें दैन्याचि फेडी । मानसाचें ॥ ६९ ॥ द्वैताचा दुकाळ पाहे । साम्याचें सुयाण होये । जया ज्ञानाची सोये । ऐसें करी ॥ १७० मदाचा ठावोचि पुसी । जें महामोहातें ग्रासी । नेदी आपपर ऐसी । भाष उरों ॥७१॥ जें संसारातें उन्मूळी । संकल्पपंक †प्रक्षाळी । अनावव्वरातें वेंटाळी । ज्ञेयातें जें ॥७२॥ जयाचेनि जालेपणें । पांगुळ होइजे प्राणें । जयाचेनि विदाणें । जग हें चेष्टे ॥ ७३ ॥ जयाचेनि उजाळें । उघडती बुद्धीचे डोळे । जीव दोंदावरी लोळे । आनंदाचिये ॥ ७४ ॥ ऐसें जें ज्ञान । पवित्रैक-निधान । जेथ विटाळलें मन । चोखें कीजे ॥ ७५ ॥ आत्मया जीवबुद्धी । जे लागली होती क्षयव्याधी । ते जयाचिया सन्निधी । निरुजा कीजे ॥ ७६ ॥ तें अनिरूप्य कीं निरूपिजे । ऐकतां बुद्धी आणिजे । वांचूनि डोळां देखिजे । ऐसें नाहीं ॥ ७७ ॥ मग तेंचि इये शरीरीं । जैं आपुला प्रभावो करी । तैं इंद्रियांचिया व्यापारीं । ‡डोळांहि दिसे ॥ ७८ ॥ पैं वसंताचें रिगवणें । झाडांचेनि साजेपणें । जाणिजे तेविं करणें । सांगती ज्ञान ॥ ७९ ॥ अगा वृक्षासि पांताळीं । जळ सांपडे मूळीं । तें शाखांचिये बोहाळीं । वरिही दिसे ॥ १८० ॥ कां भूमीचें मार्दव । सांगे कोंभाची लवलव । नाना आचार गौरव । सुकुलीनाचें ॥ ८१ ॥ अथवा संभ्रमाचिया आयती । स्नेह जैसा ये व्यक्ती । कां दर्शनाचिये प्रशस्ती । पुण्यपुरुष ॥ ८२ ॥ ना तरी केळीं कापूर जाहाला । जेविं परिमळें जाणों आला । कां भिंगारीं दीप ठेविला । बाहेरि फांके ॥ ८३ ॥ तैसें हृदयींचेनि ज्ञानें । जिये देहीं उमटती चिन्हें । तियें सांगों आतां अवधानें । चांगें आइक ॥ ८४ ॥

अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवम् ।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ ७ ॥

[अमानित्वं–'अस्मिन्नव लक्षणानि'] तरी कवणेही विषयींचें । §साम्य होणें न

---

* मुनीश्वरांसी. † पाखाळी. ‡ दृष्टीही. § जीवा साम्य.

१ इच्छा. २ वेद हाच एक तरू त्याच्या पानोपानीं. ३ ओवाळणी, त्याज्य पदार्थ. ४ शिरकावा-वरोवर. ५ समजूत. ६ अडसर घाली, बंद करी. ७ द्वैताचा अभाव होतो. ८ सुकाळ. ९ आरंभ. १० उपटी. ११ परब्रह्मातें. १२ कळसूत्रानें, कौशल्यानें. १३ प्रकाशानें. १४ शुद्ध. १५ निरोगी. १६ सामर्थ्य. १७ शिरणें. १८ टवटवीतपणानें. १९ इंद्रियें. २० खालीं. २१ विस्तारांत, शेंड्यावर. २२ मृदुपणा. २३ कोमळपण. २४ सुकुलीनाचें गौरव आचार सांगतें. २५ समारंभाचा विस्तार. २६ प्रशस्तपणानें. २७ तावदानीं.

रुचे । संभावितपणाचें । वोझें जया ॥ ८५ ॥ [1]आथिलेचि गुण [2]वानितां । मान्यपणें मानितां । योग्यतेचें येतां । आंगा रूप ॥ ८६ ॥ तैं [3]गेजबजों लागे कैसा । व्याधें रुंधेला [4]मृग जैसा । कां बाहीं तरतां [5]वेंळसा । [6]दाटला जेवीं ॥ ८७ ॥ पार्था तेणें पाडें । सन्मानें जो सांकडे । [7]गरिमेतें आंगाकडे । येवोचि नेदी ॥ ८८ ॥ पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ति कानीं नायकावी । हा अमुका ऐसी नोहावी । सेचिं [8]लोकां ॥ ८९ ॥ तेथ सत्काराची कें गोठी । कें आदरा देईल भेटी । मरणेसीं [9]साटी । नमस्कारितां ॥ १९० ॥ [10]वाचस्पतीचेनि पाडें । सर्वज्ञता तरी जोडे । परि वेडिवेमाजि दडे । [11]महिमे भेणें ॥९१॥ चातुर्य लपवी । महत्व हारवी । पिसेपण मिरवी । आवडोनी ॥ ९२ ॥ लौकिकाचा [12]उद्वेग । शास्त्रांवरी [13]उबग । उगेपणीं चांग । आथी भर ॥ ९३ ॥ जगें [14]अवज्ञाचि करावी । [15]संबंधीं सोयचि न धरावी । ऐसी ऐसी जीवीं । चाड बहु ॥ ९४ ॥ [16]तळवटपण बाणे । आंगीं हिणावो [17]खेवणें । तें तेंचि करणें । बहुतकरुनी ॥ ९५ ॥ [18]हा जीवंत ना नोहे । लोक कल्पी येणें भावें । तैसें जिणें होआवें । ऐसी आशा ॥ ९६ ॥ [19]पैल चालत *कीं नोहे । कीं वारेनि जात आहे । जना ऐसा भ्रम जाये । तैसें होइजे ॥ ९७ ॥ माझें असतेपण लोपो । नामरूप हारपो । मज झणें [20]वासिपो । भूतजात ॥ ९८ ॥ ऐसी जयांचीं [21]नवसियें । जो नित्य एकांता जात †जाये । नामेंचि जो जिये । विजनाचेनी ॥९९॥ वायू आणि [22]तया पडे । गगनेसी बोलों आवडे । ‡जीवें प्राणें झाडें [23]पढियंतीं जया ॥ २०० ॥ किंबहुना §ऐसऐसीं । चिन्हें जया देखसी । जाण तया ¶ज्ञानेसीं । शेजें [24]जाहाली ॥ १ ॥ पैं अमानित्व पुरुषीं । तें जाणावें इहीं मिषीं । आतां अदंभाचिया वोळखीसी । सौरसें [25]देवों ॥ २ ॥ [अदंभित्व] तरि अदंभित्व ऐसें । लोभियाचें मन जैसें । जीव जावो परि [26]नेमसे । ठेविला ठावो ॥ ३ ॥ तयापरी किरीटी । पडिलाही प्राणसंकटीं । परि सुकृत ना प्रकटी । [27]आंगें बोलें ॥ ४ ॥ [28]खंडाणे आला पान्हा । पळवी जेवीं अर्जुना । कां लपवी [29]पैण्यांगना । वडिलपण ॥ ५ ॥ [30]आढ्य आतुडे [31]अंडवी । मग आढ्यता जेविं हारवी । ना तरी कुळवधू लपवी । अवयवांतें ॥ ६ ॥ ना ना [32]कृषीवळ आपुलें । [33]पांघुरवी पेरिलें । तैसें झांकी निपजलें । दानपुण्य ॥ ७ ॥

---

* ना नोहे. † आहे. ‡ जीव प्राण. § ऐसीं. ¶ ज्ञानासी.

---

१ समृद्धीनें, आहे तेच. २ घावरों लागे. ३ आडविला. ४ भोंवऱ्यांत. ५ सांपडला. ६ मोठेपणातें. ७ आठवणच न व्हावी. ८ बरोबर. ९ बृहस्पतीबरोबर. १० अज्ञानांत. ११ महत्वाच्या भयानें. १२ भीति. १३ उपेक्षा. १४ अपमान. १५ आप्तांनीं. १६ नीचपणा. १७ हीनपण हें भूषण. १८ हा जीवंत आहे किंवा नाहीं. १९ चालत आहे किंवा नाहीं. २० भिवो. २१ नवसाचीं देवतें. २२ प्रिय. २३ शेजार. २४ चिन्हें. २५ अभिप्राय. २६ उघडा न करी. २७ आपल्या मुखानें. २८ लाथरी गाय. २९ वेश्या. ३० धनवान अरण्यांत सांपडला असतां. ३१ शेतकरी. ३२ आच्छादी.

वरिवरी देह न पूजी । लोकांतें न रंजी[१] । स्वधर्म वाग्ध्वजीं । बांधों नेणें ॥ ८ ॥ परोपकार न बोले । न मिरवी अभ्यासिलें । न शके विकूं जोडलें । स्फीतीसाठीं[२] ॥ ९ ॥ शरीरभोगाकडे । पाहातां कृपण आवडे[३] । येऱ्हवीं धर्मविषयीं थोडें । बहू न ह्मणे ॥ २१० ॥ *घरीं दिसे सांकड[४] । देहींची आयती रोड[५] । परि दानीं ज्या होड[६] । सुरतरूसीं ॥११॥ किंबहुना स्वधर्मीं थोर[७] । अवसरीं उदार । आत्मचर्चे चतुर । येऱ्हवीं वेडा ॥ १२ ॥ केळीचें दळवाडें[८] । हळु पोकळ आवडे । परि फळोनि गाढें[९] । रसाळ जैसें ॥ १३ ॥ कां मेघाचें आंग झीलें[१०] । दिसे वारेनि जैसें जाईल । परि वर्षती नवल । घनवट ते ॥ १४ ॥ तैसा जो †पूर्णपणीं[११] । पाहातां धाती[१२] आयणी[१३] । येऱ्हवीं तरी वाणी[१३] । तोचि ठाय ॥१५॥ हें असो या चिन्हाचा । नटनाचें[१४] ठायीं जयाच्या । जाण ज्ञान तयाच्या । हाता चढलें ॥ १६ ॥ पैं गा अदंभपण । ह्मणितलें तें हें जाण । आतां आईक खुण । अहिंसेची ॥ १७ ॥ [अहिंसा] तरि अहिंसा बहुतीं परी । बोलिली असे अवधारीं । आपुलालिया मतांतरीं । निरूपिली ॥ १८ ॥ परि ते ऐसी देखा । जैशा खांडूनियां[१५] शाखा । मग तयाचिया बुंडंखा[१६] । ‡कुंप[१७] कीजे॥१९॥ कां बाहू तोडोनि §पेचविजे[१८] । मग भुकेची पीडा राखिजे । ना ना देऊळ मोडूनि कीजे । पोळि[१९] देवा ॥ २२० ॥ तैसी हिंसाचि करूनि अहिंसा । निपजविजे हा ऐसा । पैं पूर्वमीमांसा[२०] । निर्णय केला॥२१॥ जे अवृष्टीचेनि उपद्रवें । ¶गादेलें[२१] विश्व आघवें । ह्मणोनि पर्जन्येष्टी करावे । नाना याग ॥ २२ ॥ तंव तिये इष्टीचिया बुडीं । पशुहिंसा[२२] तेथ रोकडी । मग अहिंसेची थडी । कैंची दिसे ॥२३॥ पेरिजे नुसंधी[२३] हिंसा । तेथ उगवेल काय अहिंसा । परि नवल बापा धिंवसा[२४] । या याज्ञिकांचा ॥ २४ ॥ आणि आयुर्वेद[२५] आघवा । तो याच मोहरा[२६] पांडवा । जो जीवाकारणें करावा । जीवघात ॥२५॥ $नानारोगें आहाळलीं[२७] । लोळती भूतें देखिलीं । ते हिंसा निवारावया केली । चिकित्सा पैं ॥ २६ ॥ तंव ते चिकित्सेपहिलें । एकाचे कंद खाणविले । आणि एका उपडविलें । समूळीं सपत्नीं ॥ २७ ॥ एकें आंड[२८] मोडविलीं । अजंगमाची खोल[२९] काढविली । एकें ||गर्भिणीं उकडविलीं । पुटामाजी ॥ २८ ॥ अजातशत्रू तरुवरां । सर्वांगीं देवविल्या शिरा । ऐसे जीव घेऊनि धनुर्धरा । कोरडे[३०] केले ॥ २९ ॥ आणि जंगमाही हात । लाऊनि काढिलें पित्त । मग राखिले शि-

---

* परी. † पूर्णपुण्यीं. ‡ कूप. § विकिजे. ¶ गादेल. $ नानारोगीं. || गर्भी.

---

१ खुशामत न करी. २ कीर्तीसाठीं, प्रतिष्ठेसाठीं. ३ वाटे. ४ संकट. ५ सामुग्री. ६ पैज. ७ प्रसंगीं. ८ समुदाय. ९ बळकट. १० हलकें. ११ गारा. १२ समृद्धि. १३ कंगालपणा. १४ उत्कर्ष. १५ तोडून. १६ मुळाला. १७ शिजवावें. १८ आवार. १९ कर्मकांडामध्यें. २० गांजलें. २१ केवळ. २२ धैर्य. २३ वैद्यक. २४ मार्गीचा. २५ पोळलीं. २६ तोडून साफ केली. २७ वृक्षाची. २८ साल. २९ वाळविले.

णत । आणिक जीव ॥ २३० ॥ अहो वसतीं धवळारें । मोडूनि *केलीं देन्हारें । नागऊनि वेन्हारें । गेंवादी घातली ॥ ३१ ॥ मस्तक पांधुरविलें । तंव तळवटीं उघडें पडिलें । घर मोडोनि केले । मांडव पुढें ॥३२॥ नानापांधुरणें । जाळूनि जैसें तापणें । कां जालें आंगधुणें । कुंजराचें ॥ ३३ ॥ ना तरी बैल विकूनि गोठा । †पुंसें लावोनि बांधिजे गोठा । इया करणी कीं चेष्टा । काइ हंसों ॥ ३४ ॥ ['बौद्धमतं'] एकीं धर्माचिया वाहणी । गाळूं आदरिलें पाणी । तंव गाळितया आहाळणी । जीव मेले ॥ ३५ ॥ एक न पचवितीचि कण । इये हिंसेचे भेण । तेथ कदर्थले प्राण । तेचि हिंसा ॥३६॥ एवं हिंसाचि अहिंसा । कर्मकांडीं हा ऐसा । सिद्धांत सुमनसा । वोळखें तूं ॥ ३७ ॥ पहिलें अहिंसेचें नांव । आह्मी केलें जंव । तंव स्फूर्ती बांधली हांव । इये मती ॥ ३८ ॥ तरि कैसेनि इयेतें गाळावें । ह्मणोनि पडिलें बोलावें । तेवींचि तुवांही जाणावें । ऐसा भाव ॥ ३९ ॥ बहुतकरूनि किरीटी । हाचि विषय इये गोठी । येन्हवीं कां अव्हाटीं । धांविजेल गा ॥ २४० ॥ आणि स्वमताचिया निर्धारा । लागोनियां धनुर्धरा । प्राप्ता मतांतरा । निर्वेचे कीजे ॥ ४१ ॥ ऐसी हे अवधारीं । निरूपिती परी । आतां ययावरी । मुख्य जें गा ॥ ४२ ॥ तें स्वमत बोलिजेल । अहिंसेरूप किजेल । जिया उठलिया ‡आंतुल । ज्ञान दिसे ॥ ४३ ॥ ['अहिंसा त्रिधा । कायिकी वाचिकी मानसिकी चेति । तत्र कायिकी त्रिधा । पादेंद्रियसाध्या हस्तेंद्रियसाध्या चक्षुरिंद्रियसाध्या च । सा क्रमेण व्याचष्टे'] परि तें अधिष्ठिलेनि आंगें । §जाणिजे आचरतेनि बेंगें । जैसी कसवटी सांगे । वानियातें ॥ ४४ ॥ तैसें ¶ज्ञानामनाचिये भेटी । सरिसेंचि अहिंसेचें बिंब उठी । तेंचि ऐसें किरीटी । परिस आतां ॥ ४५ ॥ ['पादेंद्रियसाध्या'] तरि तरंग नोलांडिती । लहरी पायें न फोडित । सांचलु न मोडत । पाणियाचा ॥ ४६ ॥ वेगें आणि लेसों । दिठी घालूनि $आंविसों । जळीं बक जैसा । पाउल सुये ॥ ४७ ॥ कां कमळावरी भ्रमर । पाय ठेविती हळुवार । कुचंबेल केसर । इया शंका ॥ ४८ ॥ तैसे परमाणु पां गुंतले । जाणूनि जीव सांनुले । तेथ कारुण्यामाजि पाउलें । लपवूनि चाले ॥ ४९ ॥ ते वाट कृपेची करित । ते दिशाचि स्नेहभरित । जीवातळीं आंथरित । आपुला जीव ॥ २५० ॥ ऐसिया जतना । चालणें जया अर्जुना । हें अनिर्वाच्य परिमाणा । पुरिजेना ॥ ५१ ॥ पैं मोहाचेनि सांगडें । लोंसी पिलीं धरी तोंडें । तेथ दांतांचे अंगरडे । लागती जैसे ॥ ५२ ॥ कां

* केलें. † पुंसा. ‡ आंतिल. § आणिजे. ¶ ज्ञान. $ आमिषा कैसा.

१ व्यापारीं. २ अन्नछत्र. ३ हत्तीचें. ४ राघु. ५पिंजरा. ६धर्मसंप्रदायानें. ७त्रासानें. ८दुखावले. ९ प्रसन्नमनाच्या (अर्जुना.) १० बुद्धीनें इच्छा धरिली. ११ आडमार्गी. १२ निवड. १३ अहिंसा वर्णन करूं. १४ बाणला असतां. १५ कृतीनें, मार्गानें. १६ सोन्याचे प्रकार हीन मध्यम इत्यादि. १७ न ओलांडून. १८ संचय, चाहुल. १९ हळू. २० आमिषार्थ. २१ ठेवी. २२ चुरडेल. २३ या भीतीनें. २४ अतिशय बारीक. २५ माटी, मांजरी. २६ अर्भे.

पुणे नगर वाचन मंदिर, पु

स्नेहाळ माये । तान्हयाची वास[1] पाहे । तिये दिठी आहे । हळुवार[2] जें ॥५३॥ नाना कमळदळें । डोलविजती ढाळढाळें[3] । तो जेणें पाडें बुबुळें । वारा घेपे ॥ ५४ ॥ तैसेनि मार्दवें पाय । भूमीवरी न्यसीत[4] जाय । लागती तेथ होय । जीवां सुख ॥ ५५ ॥ ऐसिया लघिमा चालतां । कृमि कीटक पांडुसुता । देखे तरि *माघुता । हळूचि निघे ॥ ५६ ॥ ह्मणे †पाय धेंडफडील[5] । तरि स्वामीची निद्रा मोडेल । रेंचलेपणा[6] पडेल । झोंती[7] हन ॥ ५७ ॥ इया काकुळती । वाहाणी धे माघुती । कोणेही व्यक्ती । न वचे वरी ॥ ५८ ॥ जीवाचेनि नांवें । तृणातेंही नोलांडवे । मग न लेखितां जावें । हे कें गोठी ॥ ५९ ॥ मुंगिये मेरु नोलांडावें । मशका सिंधु न तरवे । तैसें भेटलियां न करवे । अतिक्रम ॥ २६० ॥ ऐसी जयाची चाली । कृपा ‡फुलीं[8] फळा आली । देखसी जियाली[9] । दया वाचे ॥ ६१ ॥ ['वाचिकी'] स्वयें श्वसणेंचि तें सुकुमार[10] । मुख मोहाचें माहेर । माधुर्या जाहाले अंकुर । दंशन[11] तैसे ॥ ६२ ॥ पुढां स्नेह पाझरे । माघां चालती अक्षरें । शब्द पाठीं §अवतरे[12] । कृपा आधीं ॥ ६३ ॥ तंव बोलणेंचि नाहीं । बोलों ह्मणे जरी कांहीं । तरि बोल कोणाही । खुंपेल[13] कां ॥ ६४ ॥ बोलतां अधिकही निघे । तरि कोणाचिया वर्मीं न लगे । आणि कोणासि न रिघे । शंका मनीं ॥ ६५ ॥ मांडिली गोठी हन मोडेल । वासिपेलें[14] कोणी उडेल । आइकोनि वोवांडिलें[15] । कोण्ही जरी ॥ ६६ ॥ तरि दुंवाळी[16] कोणा नोहावी । भंवई कवणाची नुचलावी । ऐसा भाव जीवीं । ¶ह्मणोनियां ॥ ६७ ॥ मग प्रार्थिला विपायें[17] । जरि लोभें बोलों जाये । तरि परिसत्या[18] होये । मायबाप ॥ ६८ ॥ कां नादब्रह्मचि मुंसें[19] आलें । कीं गंगापय अंसळलें[20] । पतिव्रते आलें । वार्धक्य जैसें ॥ ६९ ॥ तैसे साच आणि मवाळ[21] । मितलें आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥ २७० ॥ विरोधवादबळु[22] । प्राणितोपढाळु[23] । उपहास कृळु[24] । वर्मस्पर्श ॥ ७१ ॥ आंदुवेग[25] विदीर्ण[26] । आशा शंका प्रेतारण[27] । हे संन्यासिले अवगुण । जया वाचा ॥७२॥ ['चक्षुरिंद्रियसाध्या'] आणि तयाचिपरी किरीटी । थोंड[28] जयाचिया दिठी । सांडिलिया भृकुटी । मोकळिया ॥ ७३ ॥ कां जे भूतीं वस्तु[29] आहे । तिये रूपों शके विपायें । ह्मणोनि वास न पाहे । बहुतकरूनि ॥ ७४ ॥ ऐसाही कोणे एके वेळे । भितरले कृपेचेनि बळें । उघडोनि डोळे । दृष्टी घाली ॥७५॥ तरि चंद्रबिंबौनि धारा । निघतां नव्हती गोचरा[30] । परि एकसरें चकोरां । निघती दोंदें ॥ ७६ ॥ तैसें

---

* माघौता. † पावो. ‡ फळीं. § अंतरे. ¶ ह्मणोनि उगा.

---

१ वाट. २ पानोपानीं. ३ ठेवीत. ४ हळू. ५ आटपेल. ६ निद्रासुखास. ७ विक्षेप. ८ मार्ग. ९ मूर्तिमंत. १० दांत. ११ खोंचेल. १२ भीति पावेल. १३ उपेक्षील, ओलांडील. १४ शंका, क्लेशबुद्धि. १५ कदाचित्. १६ ऐकणाराला. १७ मूर्तिमान् झालें. १८ उसळलें. १९ मृदु, मधुर. २० परिमित. २१ विरुद्धवादाचें बळ. २२ प्राण्यास कासावीस करणें. २३ कठीण, अर्थदूषित, कोरडें लाघव. २४ कपट. २५ ठकबाजी. २६ प्रांजळता. २७ ब्रह्म. २८ वाट. २९ दृष्ट, स्पष्ट.

प्राणियां होये । जरी तो कहीं वास पाहे । तया अवलोकनाची सोये । कूर्मीही नेणे ॥ ७७ ॥ किंबहुना ऐसी । दिठी जयाची भूतांसी । [हस्तेंद्रियसाभ्या] करही देखसी । तैसेचि ते ॥ ७८ ॥ तरि होऊनियां कृतार्थ । राहिले सिद्धांचे मनोरथ । तैसे जयाचे हात । निर्व्यापार ॥ ७९ ॥ अक्षम आणि संन्यासिलें । कां निरिंधन आणि विझालें । मुकेनि घेतलें । मौन जैसें ॥ २८० ॥ तयापरी कांहीं । जयां करां करणें नाहीं । जे अकर्तृत्वाच्याठायीं । बसों येती ॥ ८१ ॥ ओसुडेल वारा । नख लागेल अंबरा । इया बुद्धी करां । चळों नेदी ॥ ८२ ॥ तेथ आंगावरिलीं उडवावीं । कां डोळां रिगतें झाडावी । पशुपक्ष्यां दावावी । त्रासमुद्रा ॥ ८३ ॥ इया केउतिया गोठी । नावडे दंडकाठी । मग शस्त्राचें किरीटी । बोलणें कें ॥ ८४ ॥ लीलाकमळें खेळणें । कां पुष्पमाळा झेलणें । न करी म्हणे गोफणें । ऐसें होइल ॥ ८५ ॥ हालवतील रोमावळी । यालागीं आंग न कुरवाळी । नखांची गुंडाळी । बोटांवरी ॥ ८६ ॥ तंव करणेयाचाचि अभाव । परि ऐसाही पडे डाव । तरि हातां हाचि सराव । जे जोडिजती ॥ ८७ ॥ कां नाभिकारा उचलिजे । हेत पडिलियां देइजे । ना तरि आर्तातें स्पर्शिजे । अळुमाळु ॥ ८८ ॥ हेंही उपरोधें करणें । तरी आर्तभय हरणें । नेणती चंद्रकिरणें । जिव्हाळा तो ॥ ८९ ॥ पावोनि तो स्पर्शु । मळयानिळ खरपुसु । येणें मानें पशु । कुरवाळणें ॥ २९० ॥ जे *सदांचि ते मोकळे । जैशीं चंदनांगें †शीतळें । न फळतांही निर्फळें । होतीचि ना ॥ ९१ ॥ आतां असो हें वाग्जाळ । जाणें तें करतळ । सज्जनांचे शीळ । स्वभाव जैसे ॥ ९२ ॥ [मानसिकी] आतां मन तयाचें । सांगों म्हणों साचें । तरी सांगीतले कोणाचे । विलास हे ॥ ९३ ॥ काई शाखा नव्हे तरु । जळेंवीण असे सागरु । तेज आणि तेजाकारु । आन काई ॥ ९४ ॥ अवयव आणि शरीर । हे वेगळाले काय कीर । कीं रस आणि नीर । ‡सिनेनीं आथी ॥ ९५ ॥ म्हणोनि हे जे सर्व । सांगीतले बाह्यभाव । तें मनचि सावयव । ऐसें जाण ॥ ९६ ॥ जें भुईं बीज खोंविलें । तेंचि वरी रुखें जाहालें । तैसें इंद्रियद्वारां फांकलें । तें अंतरंचि कीं ॥ ९७ ॥ पैं मानसींचि जरी । अहिंसेची अवसरी । तरि कैंची बाहेरी । वोसंडेल ॥ ९८ ॥ आवडे ते वृत्ती किरीटी । आधीं मानौनीचि उठी । मग ते वाचे दिठी । करांसि ये ॥ ९९ ॥ वांचूनि मनींचि नाहीं । तें वाचेसि उमटेल काई । बीजेंवीण भुईं । अंकुर असे ॥ ३०० ॥ म्हणोनि मनपण जैं मोडे । तैं इंद्रिय आधींचि उबडें । सूत्रधारेंवीण

* सदां रिते. † निसळें. ‡ सिनें आथि.

१ कांसवी. २ अशक्त. ३ काष्ठरहित. ४ अकर्तृत्वाच्या. ५ ओढला जाईल. ६ हालूं देत नाहीं. ७ शिरणारीं. ८ भीतिकारक चिन्ह. ९ कोणीकडे १० गोफण. ११ प्रसंग पडे. १२ अभ्यास. १३ अभयवचन. १४ पडलेल्यास हात देतो. १५ हळूच. १६ संकटानें. १७ तीव्र, कठीण. १८ निरनिराळें. १९ वृक्ष. २० मनच. २१ प्रतिबंध. २२ टाकली जाईल. २३ पालथें, पराङ्मुख.

साइखडें । वावो जैसें ॥ १ ॥ उगमींचि वाळूनि जाये । तें वोघीं कैचें वाहे । जीवो गेलिया आहे । चेष्टा देहीं ॥ २ ॥ तैसें हें पांडवा । मूळ इंद्रिय भावा । हेंचि राहटे आघवा । द्वारीं इहीं ॥ ३ ॥ परि जियेवेळीं जैसें । जें होऊनि अंत असे । बाहेरि ये तैसें । व्यापाररूपें ॥ ४ ॥ यालागीं साचोकारें । मनीं अहिंसा थोंवे थोरें । जैसी पिकली *द्रुती आदरें । बोभात निघे ॥ ५ ॥ ह्मणोनि इंद्रियें तेचि संपदा । वेचितां हीं उदावादा । अहिंसेचा धंदा । करितें आहाती ॥ ६ ॥ समुद्रीं दाटे भरितें । तैं समुद्रचि भरी तंत्र्यांतें । तैसें स्वसंपत्ती चित्तें । इंद्रियां केलें ॥ ७ ॥ हें बहु असो पंडित । धरूनि बाळाचा हात । †वोळी लिही सुव्यक्त । आपणचि ॥ ८ ॥ तैसें दयालुत्व आपुलें । मनें हातापायां आणिलें । मग तेथ उपजविलें । अहिंसेतें ॥ ९ ॥ याकारणें किरीटी । इंद्रियांचिया गोठी । मनाचियेचि राहाटी । रूप केलें ॥ ३१० ॥ ऐसा मनें देहें वाचा । सर्व संन्यास दंडीचा । जाहाला ठायीं जयाचा । देखशील ॥ ११ ॥ तो जाण वेल्हाळ । ज्ञानाचें वेळांउळ । हें असो निखिळ । ज्ञानचि तो ॥ १२ ॥ जें अहिंसा §कानें ऐकिजे । ग्रंथाधारें निरूपिजे । ते पाहावी ऐसें जैं उपजे । तैं तोचि पाहावा ॥ १३ ॥ ऐसें ह्मणितलें देवें । [इति अहिंसा लक्षणं, परपीडाजननमहिंसेति वक्तव्ये मतांतरनिरासेन विशेषतो व्याख्याने कारणमाह—] तें बोलें एकें सांगावें । परि ¶फांकलें हें उपसाहावें । तुह्मी मज ॥ १४ ॥ ह्मणाल हिरवे चारीं गुरूं । विसरे मागील मोहरूं धरूं । कां वारेलगें पाखिरूं । गगनीं भरे ॥ १५ ॥ तैसिया प्रेमाचिया स्फूर्ती । फावलिया रसवृत्ती । वाहविला मती । आकळेना ॥ १६ ॥ तरि तैसें नोहे अवधारा । कारण असे विस्तारा । येऱ्हवीं पदें तरी अक्षरां । तिहींचेंचि ॥ १७ ॥ अहिंसा ह्मणतां थोडी । परि तैंचि हे होय उघडी । जैं लोटिजती कोडी । मतांचिया ॥ १८ ॥ येऱ्हवीं प्रांसें मतांतरें । थोंतबूनि आंगभरें । बोलिजेल तें नसरे । तुह्मापासीं ॥ १९ ॥ रत्नपारखियाचिया गांवीं । जाईल गंडकी तरि सोडावी । काश्मीरीं न करावी । मिडंगण तेथें ॥ ३२० ॥ काइसा वास कापुरा । मंद जेथ अवधारा । पिठाचा विकरा । तियेसांते ॥ २१ ॥ ह्मणोनि इये सभे । बोलकेपणाचेनि क्षोभें । लोंग सर न लभे । बोला प्रभू ॥ २२ ॥ सा-

* द्रती. † तरियंति. ‡ वोळ. § कानीं. ¶ हिरवा.

१ कळसूत्री बाहुली. २ व्यर्थ. ३ खरेपणानें. ४ स्थिरावे. ५ सुवास. ६ बोभाट करीत, पसरत. ७ इंद्रियांस तीच संपदा, अहिंसारूप संपत्ति, मनानें दिली असतां तीं इंद्रियेंही अहिंसेचाच उदावादा, व्यापार करतात. ८ खाड्यांतें, (समुद्रांतून निघणारे) फांटे. ९ पंतोजी. १० अगदीं स्पष्ट. ११ व्यापारांचें. १२ हिंसेचा. १३ विस्तृत. १४ घर. १५ सर्व. १६ विस्तारलें. १७ मार्ग. १८ वाऱ्याच्या वेगानें. १९ 'अहिंसा' हें पद. २० खंडण केल्या जातात. २१ प्राप्त झालेलीं अन्य मतें. २२ निरसून. २३ जशींच्यातशींच. २४ चालणार नाहीं. २५ कसवटीचा दगड. २६ काश्मिरी दगडानें. २७ स्तुति, रंग देणें. २८ त्यावरोवर. २९ संबंध लागूं शकत नाहीं.

कानामनाचेया

मान्या आणि विशेषा । *सकळै कीजेल देखा । तरि †का नाचेया मुखा- । कडे न्याल ना तुह्मी ॥ २३ ॥ शंकेचेनि गदळें । जैं शुद्ध प्रमेय मैळे । तैं मागुतिया पाउलीं पळे । अवधान येतें ॥ २४ ॥ कां करूनि बाबळियेची बुंथी । जळें जियें ‡ठाती । तयांची वास पाहाती । हंस काई ॥ २५ ॥ कां अभ्रा पैलीकडे । जैं येत चांदिणें कोडें । तैं चकोरें । चांचुवडें । §उचलीतना ॥ २६ ॥ तैसें तुझी वास न पाहाल । ग्रंथ नेघा वरि कोपाल । जरी अविसंवाद नोहेल । निरूपण ॥ २७ ॥ न बुझावितां मतें । ¶निफजे आक्षेपाचें लागतें । तें व्याख्यान जी तुमतें । $जोडूनि नेदी ॥ २८ ॥ आणि माझें तंव आघवें । ग्रंथन येणेंचि भावें । जे तुह्मी संतीं होआवें । सन्मुख सदां ॥ २९ ॥ येऱ्हवीं तरी साचोकारें । तुह्मी गीतार्थाचे सोयरे । जाणोनि गीता ॥एकसरें । धरिली मियां ॥ ३३० ॥ जे सर्वस्व आपुलें द्याल । मग इयेतें सोडवूनि न्याल । ह्मणोनि ग्रंथ नव्हे वोलें । साचचि हे ॥ ३१ ॥ कां सर्वस्वाचा लोभ धरा । वोलीचा अव्हेर करा । तरि गीते मज अवधारा । एकचि गती ॥३२॥ किंबहुना मज । तुमचिया कृपा काज । तिये लागीं व्याज । ग्रंथाचें केलें ॥ ३३ ॥ तरि तुह्मा रसिकांजोगें । व्याख्यान शोधावें लागे । ह्मणूनि जी मीतांगें । बोलों गेलों ॥ ३४ ॥ तंव कथेसि पसरु जाहाला । श्लोकार्थ दूरि गेला । कीजो क्षमा यया बोला । अपत्या मज ॥ ३५ ॥ आणि घांसाआंतिल हरळ । फेडितां लागे वेळ । तें दूषण नव्हे खंडळ । सांडावा कीं ॥ ३६ ॥ कां संवचोरां चुकवितां । दिवस लागलिया मोंता । कोपावें कीं जीवितां । जितेंणें कीजे ॥ ३७ ॥ परि यावरील हें नव्हे । तुह्मी उपसाहिलें तेंचि बरवें । आतां अवधारिजो देवें । बोलिलें ऐसें ॥ ३८ ॥ ह्मणे उन्मेषसुलोचना । सावध होईं अर्जुना । करूं तूज ज्ञाना । वोळखी आतां ॥ ३९ ॥ [क्षांतिः] तरि ज्ञान गा तें एथें । वोळख तूं निरुतें । ओक्रोशेंवीण जेथें । क्षमा असे ॥३४०॥ अगाधसरोवरीं । कमळिणी जियापरी । कां सदैवांचिया घरीं । संपत्ति जैसी ॥ ४१ ॥ पार्था तेणेंपाडें । क्षमा जयातें वाढे । तेही लेक्षे तें फुडें । +लक्षण सांगों ॥ ४२ ॥ तरि पढियंतें लेणें । आंगीं भावें जेणें । धरिजे तेविं सा-

---

*सुकळ. †कानामनाचेया. ‡वाहाती. §उचलती ना. ¶न फिटे. $जोडूंनेदी. ॥ जीवसरें. + लक्षणीं.

---

१ न्यायाच्या पुढें. २ मुख्यार्थ. ३ लक्ष. ४ शेवाळाचें, गोंडाळाचें. ५ पांघरूण. ६ राहाती. ७ चोंचा. ८ घेणार नाहीं आणि मग रागावाल. ९ विरोधरहित. १० समजूत करतां. ११ संशयाचें. १२ प्रतिपादन. १३ गीतेला. १४ तारण. १५ कृपेशींच कार्य. १६ निमित्त. १७ अन्य मतें, दृष्टांत. १८ खडा, माती. १९ खरा कचरा. २० मातेनें. २१ वांचण्यास. २२ कुरवंडी. २३ ज्ञानोत्तमनयना. २४ दुःखरहित. २५ ह्यामाणें. २६ क्षमा. २७ लक्षांत येईल. २८ स्पष्ट. २९ आवडते अलंकार. ३० ज्या भावनेनें.

हणें । सर्वचि जया ॥ ४३ ॥ त्रिविध[1] मुख्य आघवे । उपद्रवांचे मेळावे[2] । वरि पाडिलिया[3] नव्हे । वांकडा जो ॥ ४४ ॥ अपेक्षित[4] पावे । तें जेणें तोषें मानावें । अनपेक्षिताही[5] करवे । *मान तोचि ॥ ४५ ॥ जो मानापमानातें साये सुखदुःख जेथ सामाये[6] । निंदास्तुती नोहे । दुखंड[7] जो ॥ ४६ ॥ उन्हाळेनि[8] जो न तापे । हिमवंतीं न कांपे । कायसेनिही न वासिपे[9] । पातलेया ॥ ४७ ॥ स्वशिखरांचा भारु । नेणे जैसा मेरु । कीं धरा यज्ञसूकरु[10] । वोझें न ह्मणे ॥ ४८ ॥ ना ना चराचरीं भूतीं । दाटणी नव्हे क्षिती । तैसा नाना द्वंद्वप्राप्ती[11] । धामेजेना[12] ॥ ४९ ॥ घेऊनि जळाचे लोट । आलिया नदीनदांचे संघाट[13] । करी वाड[14] पोट । समुद्र जेवीं ॥ ३५० ॥ तैसें जयाचिया ठायीं । न साहणें कांहींचि नाहीं । आणि साहतसें ऐसेंही । स्मरण नुरे ॥ ५१ ॥ शरीरा जें पातलें । तें करूनि घाली आपुलें । तेथ सोहतेनि[15] नवलें । घेपिजेना[16] ॥ ५२ ॥ हे अनाक्रोश[17] क्षमा । जेथ आथी प्रियोत्तमा । जाण तेणें महिमा । ज्ञानासि गा ॥ ५३ ॥ तो पुरुष पांडवा । ज्ञानाचा कोलावा[18] । [आर्जवं] आतां परिस आर्जवा[19] । रूप करूं ॥ ५४ ॥ तरि आर्जव तें ऐसें । प्राणाचें सौजन्य जैसें । आवडतयाही[20] †दोषें[21] । एकचि पैं गा ॥ ५५ ॥ कां तोंड पाहुनि प्रकाशु[22] । न करी जेविं चंडांशु[23] । जगा एक अवकाशु । आकाश जैसें ॥ ५६ ॥ तैसें जयाचें मन । माणुसाप्रति आन आन । नोहे आणि वर्तन । ऐसें पैं तें ॥ ५७ ॥ जे जगचि सनोळख[24] । जगेंसीं जुनाट सोयरिक । आप पर हे भोंख[25] । जाणणें नाहीं ॥ ५८ ॥ भलतेणेंसीं मेळ । पाणिया ऐसा ढाळ[26] । कवणेविखीं आंडळ[27] । नेघे चित्त ॥ ५९ ॥ वारियाची धांव । तैसे सरळ भाव । शंका आणि हांव । नाहीं जया ॥ ३६० ॥ मायेपुढें बाळका । रिगतां नाहीं शंका । तैसें मन देतां लोकां । नाहीं[28] लोची जो ॥ ६१ ॥ फांकालिया[29] इंदीवरां[30] । ‡परिवेरु[31] नाहीं धनुर्धरा । तैसा कोनकोंपरा । नेणेचि जो ॥ ६२ ॥ चोखाळपण[32] रत्नाचें । रत्नावरी §किरणाचें । तैसें पुढें मन जयाचें । करणें पाठी ॥ ६३ ॥ आलोचूं[33] जो नेणें । अनुभवचि जोगावणें[34] । धरी मोकळीं अंतःकरणें । नोहे जया ॥ ६४ ॥ दिठी नोहे भिंधी[35] । बोलणें नाहीं संदिग्धीं[36] । कवणेसीं हीन-

* तोचिमानु. † उद्देशें. ‡ परिकर. § किळेचें.

१ आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक. २ समुदाय. ३ प्राप्त झाले असतां. ४ मनोरथ. ५ अनिष्टास. ६ सामावलें जातें. ७ दुभंगलेला. ८ हिवाळ्यानें. ९ भीत नाहीं. १० वराहावतार. ११ सुखदुःखादि द्वंद्वें आलीं असतां. १२ श्रमी होत नाहीं. १३ समुदाय. १४ मोठें. १५ सहन केल्याच्या. १६ गुंडाळला जात नाहीं. १७ दुःखरहित शांति. १८ जिव्हाळा. १९ सरळपणाला. २० पाहिजे त्या. २१ उद्देशें. २२ सूर्य. २३ ओळखीचे. २४ बोलणें. २५ वर्तणूक, रीत. २६ प्रतिबंध. २७ न विचारी. २८ फुललेल्या. २९ कमळा. ३० गुप्तपण. मुकुलितभाव. ३१ चकचकाट. ३२ बोलावयास. ३३ पालन करणें. ३४ ओशाळी, सकपट, ३५ संशयित विषयांत.

बुद्धी । राहाटों नेणे ॥ ६५ ॥ दाहाही इंद्रियें प्रांजळें । निःप्रपंचें निर्मळें । पांचही पालव मोकळे । आठही पाहर ॥ ६६ ॥ अमृताची धार । तैसें उजू अंतर । किंबहुना जो माहेर । या चिन्हाचें ॥ ६७ ॥ तो पुरुष सुभटा । आर्जवाचा आंगवटा । जाण तेथेंचि घरटा । ज्ञानें केला ॥ ६८ ॥ [आचार्योपासनं] आतां ययावरी । गुरुभक्तीची परी । सांगोंगा अवधारीं । चतुरनाथा ॥ ६९ ॥ अघवीयाचि दैवां । जन्मभूमी हे सेवा । जे ब्रह्म करी जीवा । *शोच्यातेंही ॥ ३७० ॥ ते आचार्योपास्ती । सांगिजेल तुजप्रती । बैसोंदे एक पांती । अवधानाची ॥ ७१ ॥ तरि सकळ जळसमृद्धी । घेऊनि गंगा निघाली उदधी । कीं श्रुती हे महापदीं । पैठी जाहाली ॥ ७२ ॥ ना ना वेंटाळूनि जीवितें । गुणागुण उखितें । प्राणनाथासि उचितें । दिधलें प्रिया ॥ ७३ ॥ तैसें सबाह्य आपुलें । जेणें गुरुकुळीं वोपिलें । आपणपें केलें । भक्तीचें घर ॥ ७४ ॥ [सा भक्तिर्नवविधा—"श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनं" इति (भा. स्कं ७) 'तत्र स्मरणभक्तिमाह—'] गुरुगृह जिये देशीं । तो देशचि वसे मानसीं । विरहिणी कां जैसी । वल्लभातें ॥ ७५ ॥ तियेकडोनि येतसे वारा । देखोनि धांवे सामोरा । आंड पडे ह्मणे घरा । बीजें कीजो ॥ ७६ ॥ साचा प्रेमाचिया भुली । तिये †दिशेसीचि आवडे बोली । जीव थानपती करूनि घाली । गुरुगृहीं जो ॥ ७७ ॥ परि गुरुआज्ञा धरिलें । देह गांवीं असे एकलें । वांसरुवा लाविलें । दावें जैसें ॥ ७८ ॥ ह्मणें कैं हें बिरडें फिटेल । कैं तो स्वामी भेटेल । युगाहूनि वेडिल । निमिषें मानी ॥ ७९ ॥ ऐसे या गुरुग्रामीचें आलें । कां स्वयें गुरूनींचि धाडिलें । तरि गतायुष्या जोडलें । आयुष्य जैसें ॥ ३८० ॥ कां सुकतया अंकुरा । वरि पडलिया पीयूषधारा । ना ना अल्पोदकींचा सागरा । आला मासा ॥ ८१ ॥ ना तरी रंकें निधान देखिलें । कां आंधळिया डोळे उघडले । भेणंगाचिया आंगा आलें । इंद्रपद ॥ ८२ ॥ तैसा गुरुकुळींचेनि नांवें । महासुखें अति थोरावे । जे ‡कोडें हन पोटाळवे । आकाश कां ॥ ८३ ॥ पैं गुरुकुळीं ऐसी । आवडी जया देखसी । जाण ज्ञान तयापासीं । पाइकी करी ॥ ८४ ॥ ['अर्चनं'] आणि अभ्यंतरिलियेकडे । प्रेमाचेनि पवाडें । श्रीगुरूचें रूपडें । उपासी ध्यानीं

---

* अशुचीतें. † देशींची, दिशांसी. ‡ कोडें ही

१ पंचप्राण. २मूर्तिमान्. ३शोकग्रस्तातें. ४सर्व अवधानें एक पाती, एकत्र होवोत. ५ समुद्रास. ६ ब्रह्मपदीं. ७ प्रविष्ट. ८ अवघें, उक्तें. ९ श्रीमद्भागवताच्या ७ व्या स्कंधांत प्रल्हादानें हिरण्यकशिपूला ही नवविध भक्ति सांगितली आहे. १० आडवा नमस्कार घाली. ११ आगमन करावें. १२ स्थानपती. १३ पेंडें. १४ मोठें. १५ क्षण. १६ भिकाऱ्याचा. १७ आवडीनें सहज आकाशही वेंगाटून धरील इतका थोर होतो. १८ आलिंगावें. १९ अंतःकरणांत. २० मोठ्या प्रेमानें. २१ भजे, सेवी.

॥८५॥ हृदयशुद्धीचिया आवारीं । आराध्य तो निश्चळ *धुर करी । मग सर्व भावेंसीं परिवारीं । आपण होय ॥ ८६ ॥ कां चैतन्याचिये पोवेळीं । माजि आनंदाचिया राउळीं । श्रीगुरूलिंगा ढाळी । ध्यानामृत ॥ ८७ ॥ उदयिजतां बोधार्का । बुद्धीची डाळ सात्विका । भरोनियां त्र्यंबका । लाखोली वाहे ॥८८॥ काळशुद्धी त्रिकाळीं । जीवदशा धूप जाळी । ज्ञानदीपें वोंवाळी निरंतर ॥ ८९ ॥ सामरस्याची रसशेय । अखंड अर्पित जाय । आपण भराडा होय । गुरू तो लिंग ॥ ३९० ॥ ['सख्यं'] ना तरी जिवाचिये सेजे । गुरु कांत करूनि भुंजे । ऐसी †प्रेमाचेनि भोजें । बुद्धि वाहे ॥ ९१ ॥ कोणेएके अवसरीं । अनुराग भरे अंतरीं । कीं तया नाम करी । क्षीराब्धी ॥ ९२ ॥ तेथ ध्येयध्यान बहु सुख । तेंचि शेषतुळिका निर्दोख । वरि जळशयन देख । भावी गुरु ॥ ९३ ॥ मग वोळंगती पाय । ते लक्ष्मी आपण होय । गरुड होऊनि उभा राहे । आपणचि ॥ ९४ ॥ नाभीं आपण जन्मे । ऐसें गुरुमूर्ति प्रेमें । अनुभवी मनोधर्मे । ध्यानसुख ॥ ९५ ॥ एकाधियेवेळे । गुरु माय करी भाववळें । मग स्तन्यसुखें लोळे । अंकावरी ॥ ९६ ॥ ना तरी गा किरीटी । चैतन्यतरुतळवटीं । गुरु धेनु आपण पोटीं । वत्स होय ॥ ९७ ॥ गुरुकृपास्नेहसलिलीं । आपण होय मासोळी । कोणे एके वेळीं । हेंचि भावी ॥ ९८ ॥ गुरुकृपामृताचें वडप । आपण ‡सेवावृत्तीचें होय रोप । ऐसेसे संकल्प । मनचि विये ॥ ९९ ॥ चैक्षुपक्षेंवीण । पिलूं होय आपण । कैसें पैं अपारपण । आवडीचें ॥ ४०० ॥ गुरूतें पक्षिणी करी । चारा वे चांचूवरी । गुरु तोरू धरी । आपण कास ॥ १ ॥ ऐसे प्रेमाचेनि थोवें । ध्यानचि ध्यानातें प्रसवे । पूर्णसिंधू हेलावे । फुटती जैसे ॥ २ ॥ किंबहुना यापरी । श्रीगुरुमूर्ती अंतरीं । भोगी आतां अवधारीं । बाह्यसेवा ॥ ३ ॥ ['दास्यं'] तरि जीवीं ऐसे आंवांके । ह्मणे दास्य करीन निकें । जैसेनि गुरू कौतुकें । माग ह्मणती ॥ ४ ॥ तैसिया साचा उपासी । गोसांवी प्रसन्न होती । तेथ मी विनंती । ऐसी करीन ॥ ५ ॥ ह्मणेन तुमचा देवा । परिवार जो आघवा । तेतुले रूपें होआवा । मीचि एक ॥ ६ ॥ आणि उपकरतीं आपुलीं । उपकरणें आथि जेतुलीं । माझीं रूपें तेतुलीं । §होआवीं स्वामी ॥ ७ ॥ ऐसा मागेन वरु । तेथ हो ह्मणती श्रीगुरु । मग तो परिवारु । मीचि होईन ॥ ८ ॥ उपकरणजात सकळिक । तें मीचि होईन एकैक । तेव्हां उपास्तीचें कौतुक । देखिजेल ॥९॥

* ध्रुव. † प्रेमाचीं. ‡ सेवावृत्ती होय. § होआवींजी.

१ अग्रभाग. २ ज्ञानाच्या. ३ आवारांत. ४ अभिषेकी. ५ परडी. ६ शिवगुरूला. ७ ज्याला तीन्ही काळीं काळशुद्धि आहे. ८ ऐक्याची. ९ पाकसिद्धि. १० पूजारी, भक्त. ११ प्रतिमा. १२ संतोषानें. १३ प्रीति. १४ गुरुध्यान. १५ शेषनागाची गादी. १६ विष्णु. १७ सेवा करणारी. १८ प्राप्त होईल. १९ वृष्टी. २० पंखांवांचून. २१ चोंचीनें. २२ तारक. २३ स्थिरतेनें, बळानें. २४ अवसान धरी. २५ भक्तीनें. २६ उपयोगी पडणारीं. २७ पूजापात्रें.

गुरु बहुतांची माये । परि येकोलंती होऊनि ठाये । तैसें करूनि आण वाये । कृपे तिये ॥ ४१० ॥ तया अनुरागा वेधु लावीं । एकपत्नीव्रत घेववीं । क्षेत्रसंन्यास करवीं । लोभाकरवीं ॥ ११ ॥ चतुर्दिक्षु वारा । न लाहे *निघोनि बाहिरा । तैसा गुरुकृपे पांजिरा । मीचि होईन ॥ १२ ॥ आपुलिया गुणांचीं लेणीं । करीन गुरुसेवे स्वामिणी । हें असो होईन गंवसणी । गुरुभक्तीसी ॥ १३ ॥ गुरुस्नेहाचिये वृष्टी । मी पृथ्वी होईन तळवटीं । ऐसिया मनोरथांचिया सृष्टी । अनंता रची ॥ १४ ॥ ह्मणे श्रीगुरूचें †भुवन । आपण मीं होईन । आणि दास होऊनि करीन । दास्य तेथिंचें ॥ १५ ॥ निर्गमागमीं दातारें । जे वोलांडिजती उंबरे । ते मी होईन आणि द्वारें । द्वारपाळ ॥ १६ ॥ पाउवा मी होईन । तियां मीचि लेववीन । छत्र मी आणि करीन । बैरीपण ॥ १७ ॥ मी तळ उपर जाणविता । चवरधर हात देता । स्वामीपुढें खोलंता । होईन मी ॥ १८ ॥ मीचि होईन ‡सोंगळा । करू सुईन गुरुळां । सांडिती तो नेपाळा । पिंडिघा मीचि ॥ १९ ॥ हंडप मी वोळगेन । मीचि उगाळु घेईन । उळिग मी करीन । आंघोळीचें ॥४२०॥ होईन गुरूचें आसन । अळंकार परिधान । चंदनादि होईन । उपचार ते ॥ २१ ॥ मीचि होईन सुआरु । वोगरीन उपहारु । आपणपें श्रीगुरु । वोवाळीन ॥ २२ ॥ जेवेळीं देवो आरोगिती । तेव्हां पांतीकरें मीचि पांती । मीचि होईन पुढती । देईन वीडा ॥ २३ ॥ ताट मी काढीन । ['पादसेवनं'] सेज मी झाडीन । चरणसंवाहन । मीचि करीन ॥ २४ ॥ सिंहासन होईन आपण । वरि गुरु करिती आरोहण । होईन पुरेपण । वोळगेचें ॥ २५ ॥ ['श्रवणं'] श्रीगुरूचें मन । जया देईल अवधान । तो मी पुढां होईन । चमत्कार ॥ २६ ॥ तया श्रवणाचे आंगणीं । होईन शब्दांचिया अक्षौहिणी । स्पर्श होईन घसणी । आंगाचिया ॥ २७ ॥ श्रीगुरूचे डोळे । अवलोकनें स्नेहाळें । पाहाती तियें सकळें । होईन रूपें ॥ २८ ॥ तिये रसने जो रुचेल । तो तो रस म्यां होइजेल । गंधरूपें कीजेल । घ्राणसेवा ॥ २९ ॥ एवं बाह्यमनोगत । श्रीगुरुसेवा समस्त । वेटाळीन वस्तुजात । होऊनियां ॥ ४३० ॥ जंव देह हें असेल । तंव वोळंगी ऐसी कीजेल । ['आत्मनिवेदनं'] मग देहांतीं नवल । बुद्धि §आहे ॥ ३१ ॥ इये शरीरींची माती । मेळवीन तिये क्षिती । जेथ श्रीचरण उभे ठाती । श्रीगुरूचे ॥ ३२ ॥ माझा

* निघे. † भवन. ‡ सगळा. § वाहे.

१ एकत्याची. २ शपथ वाहे. ३ छंद. ४ चहूं दिशांकडून. ५ पिंजरा. ६ अलंकार. ७ जाण्यायेण्याचे वेळीं. ८ पादुका. ९ छत्र धरणें. १० चवरी धरणारा. ११ दिवट्या. १२ झारी धरणार. १३ गुळणी, पीक. १४ चूळ. १५ तस्त, पिकदानी. १६ पानदान. १७ पिक, चावलेला विडा. १८ कर्पूर. १९ आचारी. २० वाढीन. २१ भोजन करिती. २२ पंक्तीस. २३ पाय दावणें. २४ सेवेचें. २५ असंख्य समुदाय. २६ आटोपीन. २७ सेवक. २८ पृथ्वीला. २९ राहती.

स्वामी कवतिकें । स्पर्शतां जियें उदकें । तेथ लया नेईन निकें । आपीं आप ॥ ३३ ॥ श्रीगुरू वोंवाळिजती । कां भुवनीं *जे उजळिजती । तयां दीपांचिया दीप्तीं । ठेवीन तेज ॥ ३४ ॥ चवरी हन विंजणा । तेथ लय करीन प्राणा । मग आंगाचा वोळंगणा । होईन मी ॥ ३५ ॥ जिये जिये आवकाशीं । श्रीगुरू असती परिवारेंसीं । आकाश लया आकाशीं । नेईन तिये ॥ ३६ ॥ परि जीत मेला न संडीं । †निमेष लोकां न धाडी । ऐसेनि गणावया कोडी । कल्पांचिया ॥ ३७ ॥ येतुलेवरी धिंवसा । जयाचिया मानसा । आणि करूनिही तैसा । अपार जो ॥ ३८ ॥ रात्र दिवस नेणे । थोडें बहु न ह्मणे । ह्मणियाचेनि दाटपणें । साजा होय ॥ ३९ ॥ तो व्यापार येणेंनावें । गगनाहूनि थोरावे । एकला करी आघवें । एकेचि काळीं ॥ ४४० ॥ हृदयवृत्ती पुढां । आंगचि घे दवडा । काज करी होडा । मानसेसीं ॥ ४१ ॥ एखादिया वेळां । श्रीगुरूचिया खेळा । लोण करी सकळा । जीवितांचें ॥ ४२ ॥ जो गुरुदास्यें कृश । जो गुरुप्रेमें संपोष । जो गुरुआज्ञे निवास । आपणचि ॥ ४३ ॥ जो गुरुकुळें सुकुळीन । जो गुरुबंधुसौजन्यें ‡सुजन । जो गुरुसेवाव्यसनें सव्यसन । निरंतर ॥ ४४ ॥ गुरुसंप्रदायधर्म । तेचि जयाचे वर्णाश्रम । गुरुपरिचर्या नित्यकर्म । जयाचेंगा ॥ ४५ ॥ गुरु क्षेत्र गुरु देवता । गुरु माता गुरु पिता । जो गुरुसेवेपरता । मार्ग नेणे ॥ ४६ ॥ श्रीगुरूचें द्वार । तें जयाचें सर्वस्व सार । गुरुसेवकां सहोदर । प्रेमें भजे ॥ ४७ ॥ ['कीर्तनं'] जयाचें वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र । गुरुवाक्यावांचूनि शास्त्र । हातीं न शिवे ॥ ४८ ॥ ['वंदनं'] शिवतलें गुरुचरणीं । भलतैसें हो पाणी । तया तीर्थयात्रे आणी । तीर्थें त्रैलोक्यींचीं ॥ ४९ ॥ श्रीगुरूचें उशिटें । लाहे जैं अवचटें । तैं तेणें लाभें विटे । समाधीसी ॥४५०॥ कैवल्य सुखासाठीं । परमाणु घे किरीटी । उधळती पायांपाठीं । चालतां जे ॥ ५१ ॥ हें असो सांगावें किती । नाहीं पार गुरुभक्ती । परी गा उत्क्रांतमती । कारण हें ॥ ५२ ॥ जया इये भक्तीची चाड । जया इये विषयींचें कोड । जो हे सेवेवांचून गोड । न मनी कांहीं ॥ ५३ ॥ तो तत्त्वज्ञानाचा ठावो । ज्ञाना तेणेंचि आंवो । हें असो तो देवो; ज्ञान-भक्त ॥ ५४ ॥ हें जाण पां साचोकारें । तेथ ज्ञान उघडोनि द्वारें । नांदत असे गा पुरे । इया रीती ॥ ५५ ॥ जिये गुरुसेवेविखीं । माझा जीव अभिलाखी । ह्मणोनि सोयेचुकी । बोली केली ॥ ५६ ॥ येऱ्हवीं असतां हातीं खुंळा ।

---

* जियें. † निमेषोन्मेष, निमेखु. ‡ सज्जन.

---

१ उदक. २ सेका. ३ अशाच कल्पकोटि गणाव्या, कल्पकोटीपर्यंत असेंच करीन. ४ धैर्य. ५ आज्ञा केलेल्या कार्याच्या. ६ टवटवीत. ७ धांव. ८ पैजेनें. ९ ओवाळणी. १० पुष्ट. ११ सेवा. १२ उष्टेअन्नादि. १३ गुरुपदरज. १४ व्यापकबुद्धि. १५ आवड. १६ डौल. १७ फार काय! तो देव आणि ज्ञान हीं त्याचे भक्त असा तो होतो. १८ खरेपणानें. १९ विषयीं. २० मार्ग सोडून. २१ थोंटा.

भजनावधानीं आंधळा । परिचर्येलागीं[1] पांगुळा । पैसूनि[2] मंद ॥ ५७ ॥ गुरुवर्णनीं मुका । आळशी पोशिजे फुका । परि मनीं आथी निका । सानुरागे[3] ॥ ५८ ॥ तेणें पैं कारणें । हें स्थूळ पोसणें[4] । पडलें मज ह्मणे । ज्ञानदेवो[5] ॥ ५९ ॥ परि तो बोल उपसाहावा । आणि वोळगे अवसर देयावा । आतां ह्मणेन जी बरवा । ग्रंथार्थचि ॥ ४६० ॥ ['आचार्योपासनं'] परिसा परिसा श्रीकृष्णु । जो भूतभारसहिष्णु[6] । तो बोलतसे विष्णु । पार्थ ऐके ॥६१॥ ['शौचं'] ह्मणे शुचित्व गा ऐसें । जयापाशीं दिसे । *आंग मन जैसें । कापुराचें ॥६२॥ कां रत्नाचें दीवळवाडें[7] । जैसें सबाह्य चोखडें । आंत बाहेरि एके पाडें । सूर्य जैसा ॥ ६३ ॥ बाहेरि कर्में क्षाळला[8] । भीतरी ज्ञानें उजळला । इहीं दोहीं परी आला । पोखाळा[9] एका ॥ ६४ ॥ मृत्तिका आणि जळें । बाह्य येणें मेळें[10] । निर्मळ होय बोलें[11] । वेदाचेनी ॥ ६५ ॥ भलतेथ[12] बुद्धि बळी । रजें[13] आरिसा उजळी । सौंदणी[14] फेडी थिगळी । वस्त्रांचिया ॥ ६६ ॥ किंबहुना यियापरी । बाह्य चोख अवधारीं । आणि ज्ञानदीप अंतरीं । ह्मणौनि शुद्ध ॥ ६७ ॥ येऱ्हवीं तरीं पांडुसुता । अंतर शुद्ध नसतां । बाहेरि कर्म तो सर्वथा । विटंबु गा ॥६८॥ मृत जैसा शृंगारिला । गाढव तीर्थीं न्हाणिला । कडु-दुधिया माखिला । गुळें जैसा ॥ ६९ ॥ वोसगृहीं तोरण बांधिलें । कां उपवासी अन्नें लिंपिलें । कुंकुमसेंदुर केलें । कांतहीननें[15] ॥ ४७० ॥ कलश ढिमोचे[16] पोकळ । जळो वरील ते झळाल[17] । काय करूं चित्रींव फळ । आंत शेण ॥ ७१ ॥ तैसें कर्मी वरिचिलेकडां । न सरे थोर मोलें कुडा[18] । नव्हे मदिरेचा घडा । पवित्र गंगे[19] ॥ ७२ ॥ ह्मणोनि अंतरीं ज्ञान व्हावें । मग बाह्य लाभे स्वभावें[20] । वरि †ज्ञान कर्में संभवे । ऐसें कें ‡जोडे[21] ॥ ७३ ॥ यालागीं बाह्यभाग । कर्में धुतला चांग[22] । ज्ञानें फिटला वंग[23] । अंतरींचा ॥ ७४ ॥ तेथ अंतरबाह्य गेलें । निर्मळत्व एक जाहालें । किंबहुना उरलें । शुचित्वचि ॥ ७५ ॥ ह्मणोनि सद्भाव जीवगत । बाहेरि दिसती फांकत । स्फटिकगृहींचे डोलत । दीप जैसे ॥ ७६ ॥ विकल्प जेणें उपजे । नोथिली[24] विकृती निपजे । अप्रवृत्तीचीं[25] बीजें । अंकुर घेती ॥७७॥ तें आइके अथवा भेटे । परि मनीं कांहींचि नुमटे । मेघरंगें न कांटे[26] । व्योम जैसें ॥ ७८ ॥ येऱ्हवीं इंद्रियांचेनि मेळें । विषयांवरी तरी लोळे । परि वि-

---

* आगमन जैसें. † ज्ञानें. ‡ घडे.

---

१ सेवेकरितां. २ जवळ असून. ३ प्रीतिमान्. ४ वर्णन. ५ सेवेला. ६ सहनकर्ता. ७ घनवटपण, समुदाय. ८ धुतला गेला. ९ स्वच्छतेस. १० याचे योगें. ११ आझेनें. १२ पाहिजे तेथें बुद्धिच बलवती आहे. १३ मळ. १४ परटाच्या पात्रांतील धुण्याचें पाणी घेऊन डाग दूर करी. १५ मुलाम्याचे. १६ चकचकाट. १७ वाईट. १८ गंगेनें. १९ सहज. २० कलंक, डाग. २१ लटकी. २२ कुमार्गाचीं. २३ किटे.

काराचेनि विटाळें । लिंपिजेना ॥ ७९ ॥ भेटलेया वाटेवरी । चोखी आणि माहारी । तेथ नातळे तियापरी । राहाटों जाणे ॥ ४८० ॥ कां पतिपुत्रांतें आलिंगी । एकचि ते तरुणांगी । तेथ पुत्रभावाच्या आंगीं । न रिगे काम ॥ ८१ ॥ तैसें हृदय चोख । संकल्पविकल्पीं सैनोळख । कृत्याकृत्य विशेख । फुडें जाणे ॥ ८२ ॥ पाणियें हिरा न भिजे । आधणीं हरेळ न शिजे । तैसी विकल्पजातीं न लिंपिजे । मनोवृत्ती ॥ ८३ ॥ ['स्थैर्य'] तया नांव शुचित्वपण । पार्था गा संपूर्ण । हें देखसी तेथ जाण । ज्ञान असे ॥ ८४ ॥ आणि स्थिरता साचें । घर रिगाली जयाचें । तो पुरुष ज्ञानाचें । आयुष्य गा ॥ ८५ ॥ देह तरी वरिचिलीकडे । आपुलिया परि हिंडे । परि बैसेका न मोडे । मानसींची ॥ ८६ ॥ वत्सावरूनि धेनूचें । स्नेह राना न वचे । नव्हती भोग सतियेचे । प्रेमभोग ॥ ८७ ॥ कां लोभिया दूर जाये । परि जीव ठेवाँ ठाये । तैसा देह चालतां न होये । चळचित्ता ॥ ८८ ॥ जातया अभ्रासवें । जैसें आकाश न धांवे । *भ्रमणचक्रीं न भंवे । ध्रुव जैसा ॥ ८९ ॥ पांथिकाचिया येरझारा । सवें पंथ न चले धनुर्धरा । कां नाहीं जेवीं तरुवरां । येणें जाणें ॥ ४९० ॥ तैसा चळणवळणात्मकीं । असोनि ये पांचभौतिकीं । भूतोमीं एकीं । चळिजेना ॥ ९१ ॥ वाहुटोळीचेनि बळें । पथ्वी जैसी न ढळे । तैसा उपद्रव उमाळें । न लोटे जो ॥ ९२ ॥ दैन्यदुःखीं न तपे । भयशोकीं न कंपे । देहमृत्यु न वासिपे । पातलेनी ॥ ९३ ॥ आर्ति आशा पंडिभरें । वय व्याधीं गजरें । उजू असतां पाठिमोरें । नव्हे चित्त ॥ ९४ ॥ निंदा निस्तेज दंडी । काम लोभ वरपडी । परी रोम नव्हे वांकुडी । मानसाची ॥ ९५ ॥ आकाश हें वोसरी । पृथ्वी वरि विरो । परि नेणे मोहरो । चित्तवृत्ती ॥ ९६ ॥ हाँती हाला फुलीं । पासावणा जेवीं न घाली । तैसा न †लोटे दुर्वाक्यशेलीं । सेलिळी सांता ॥ ९७ ॥ क्षीराणवाचिया कल्लोळीं । कंप नाहीं मंदराचळीं । आकाश न जळे जाळीं । वणवियाच्या ॥ ९८ ॥ तैशा ‡आल्या गेल्या ऊर्मी । नव्हे गजबज मनोधर्मी । किंबहुना §धैर्य क्षमी । कल्पांतींहीं ॥ ९९ ॥ पैं स्थैर्य ऐसी भाष । बोलिजे जे सविशेष । ते हे दशा गा देख । देखणेया ॥ ५०० ॥ हें स्थैर्य निधडें । जेथ आंगें जीवें जोडे । तें ज्ञानाचें उघडें । निधान साचें ॥ १ ॥ [आत्मविनिग्रहः] आणि ईसाळु जैसा घरा । कां दंदिया हतियेरा । न विसंबे भांडारा । लुब्धक जैसा ॥ २ ॥ कां एकलौतिया बाळका । वरि प-

* भगणचक्रीं. † न हटे. ‡ आलागेला. § धीरु क्षमीं.

१ उत्तम वर्ण. २ न शिवे. ३ परिचित. ४ वाळू, खडा. ५ आत्मरूपीं पडलेली बैठक. ६ टेवलेल्या द्रव्याजवळ राहतो. ७ भूतमात्राच्या विकारानें. ८ लोटानें. ९ भीत नाहीं. १० भरानें. ११ हलकल्लोळानें. १२ अपमान. १३ मिठी पडली असतां. १४ लय पावो. १५ मागें फिरो. १६ हत्ती हलक्या फुलानें हणतां जसा मागें हटत नाहीं. १७ शल्यानें. १८ छळिला, मारला असतां. १९ धैर्य क्षमायुक्त. २० बळकट. २१ इच्छालु, लोभी, ब्रह्मराक्षस. २२ योद्धा. २३ एकुलताएक.

डोनि ठाके अंबिका । मधुविषीं मधुमक्षिका । लोभिणी जैसी ॥ ३ ॥ अर्जुना जो यापरी । अंतःकरण जतन करी । नेदी उभें ठाकों द्वारीं । इंद्रियांच्यां ॥ ४ ॥ ह्मणे काम बागुल ऐकेल । हे आशा सियारी देखेल । तरी जीवा टेंकेल । ह्मणोनि बिहे ॥ ५ ॥ बाहेरी धीटें जैसी । दादुगा पति कळासी । करी टेहेणी तैसी । प्रवृत्तीसीं ॥ ६ ॥ सचेतनीं वाणेपणें । देहासकट आटणें । संयमावरी करणें । बुझनि घाली ॥ ७ ॥ मनाचिया महाद्वारीं । प्रेताहाराचिया ठाणांतरीं । यमदम शरीरीं । जागवी उभे ॥ ८ ॥ आधारीं नाभीं कंठीं । बंधत्रयाची घरटी । चंद्रसूर्यसंपुटीं । सुये चित्त ॥ ९ ॥ समाधीचे शेजेपासीं । बांधोनि घाली ध्यानासी । चित्तचैतन्य समरसीं । *अंतरतें ॥ ५१० ॥ अगा अंतःकरणनिग्रहो जो । तो हा हें जाणिजो । हा आथी तेथ विजयो । ज्ञानाचा पैं ॥ ११ ॥ जयाची आज्ञा आपण । शिरीं वाहे अंतःकरण । मनुष्याकारें जाण । ज्ञानचि तो ॥ १२ ॥

इंद्रियार्थेषु वैराग्यममहंकार एव च ।
जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ॥ ८ ॥

['लक्षणत्रयं' इंद्रियार्थेषु वैराग्यं] आणि विषयांविखीं । वैराग्याची निकी । पुरवणी मानसीं कीं । जिती आथी ॥ १३ ॥ वमिलिया अन्ना । लाळ न घोंटी जेविं रसना । आंग न सूये आलिंगना । प्रेताचिया ॥ १४ ॥ विष खाणें नागवे । जळत घरीं न रिघवे । व्याघ्रविवरा न वचवे । वस्ती जेवीं ॥ १५ ॥ धडाडीत लोहरसीं । उडी न घालवे जैसी । न करवे उशी । अजगराची ॥ १६ ॥ अर्जुना तेणें पाडें । जयासी विषयवार्ता नावडे । नेदी इंद्रियांचेनि तोंडें । कांहींच जावों ॥ १७ ॥ जयाचे मनीं आलस्य । देहीं अतिकार्श्य । शमदमीं सौरस्य । जयासि गा ॥ १८ ॥ तपोव्रतांचा मेळावा । जयाचेठायीं पांडवा । युगांत जया गांवा । आंत येतां ॥ १९ ॥ बहु योगाभ्यासीं हांव । विजनाकडे धांव । न साहे जो नांव । संघाताचें ॥ ५२० ॥ नाराचांचीं आंथुरणें । पूयपंकीं लोळणें । तैसें लेखी भोगणें । ऐहिकींचें ॥ २१ ॥ आणि स्वर्गातें मानसें । ऐकोनि मानी ऐसें । कुहिलें पिशित जैसें । श्वानाचें कां ॥ २२ ॥ तें हें विषयवैराग्य । आत्मलाभाचें भाग्य । येणें ब्रह्मानंदा योग्य । होती जीव ॥ २३ ॥ ऐसा उभयभोगीं त्रास । देखसी जेथ बहुवस । जाण तेथें र-

* अंतःकरण. ०३१८३१८

१ डाकीण. २ व्यभिचारिणी. ३ दांडगा नवरा. ४ रक्षण, अटकाव. ५ आत्मस्वरूपीं तोटा झाला तरी खेदो अशा बुद्धीनें. ६ इंद्रियें. ७ विषयांपासून उपरम पावलेल्या बुद्धीच्या. ८ पाहाऱ्याच्या जागेंत. ९ मूलाधारचक्रीं. १० मणिपूरचक्रीं. ११ विशुद्धचक्रीं. १२ वज्र, ओढियाण, जालंधर. १३ गस्त. १४ इडापिंगलांच्या संगमस्थानीं. १५ घाली. १६ आंत रत होतें. १७ न रुचे. १८ वाघाच्या गुहेंत. १९ अरण्याकडे. २० बाणांचीं. २१ कुजलेलें मांस.

हिवास । ज्ञानाचा तूं ॥ २४ ॥ [अनहंकार एव च] आणि सचाडाचियेपरी । ईष्टापूर्तें करी । परी केलेपण शरीरीं । वसों नेदी ॥ २५ ॥ वर्णाश्रमपोषकें । कर्में नित्यनैमित्तिकें । यामाजि कांहीं नठके । आचरतां ॥ २६ ॥ परि हें मियां केलें । कीं हें माझेनि सिद्धी गेलें । ऐसें नाहीं ठेविलें । वासनेमाजी ॥ २७ ॥ जैसें अवचितपणें । वायूसीं सर्वत्र विचरणें । कीं निरभिमान उदैजणें । सूर्याचें जैसें ॥ २८ ॥ कां श्रुति स्वभावता बोले । गंगा काजेंविण चाले । तैसें अवष्टंभहीन भलें । वर्तणें ज्याचें ॥ २९ ॥ ऋतुकाळीं तरी फळती । परि फळलों हें नेणती । तयां वृक्षांचिये ऐसी वृत्ती । कर्मीं सदां ॥५३०॥ एवं मनीं कर्मीं बोलीं । जेथ अहंकारा उखी जाहाली । ऐकावळीची काढिली । दोरी जैसी ॥ ३१ ॥ संबंधेंवीण जैसीं । अभ्रें असती आकाशीं । देहीं कर्में तैसीं । जयासि गा ॥ ३२ ॥ मद्यपाआंगींचें वस्त्र । कां लेपाहातींचें शस्त्र । बैलावरी शास्त्र । बांधलें आहे ॥ ३३ ॥ तयापाडें देहीं । जया मी आहें हे सेचि नाहीं । निरहंकारता पाहीं । तया नांव ॥३४॥ हें संपूर्ण जेथें दिसे । तेथींचि ज्ञान असे । इयेविषीं अनारिसें । बोलों नये ॥ ३५ ॥ [जन्मेलधी] जन्म मृत्यु जरा दुःखें । व्याधिवार्धक्यकलुषें । तियें आंगा न येतां देखे । दुरूनि जो ॥ ३६ ॥ साधक विवसिया । कां उपसर्ग योगिया । पावे उणेयापुरेया । वोथंबा जेवीं ॥ ३७ ॥ [जन्मेत्यादि समस्यंतैकपदस्थानि सप्तपदानि विविच्य व्याख्यायते 'जन्म'] वैर जन्मांतरींचें । सर्पा मनौनि नवचे । तेविं अतीता जन्मांचें । उणें जो वाहे ॥ ३८ ॥ डोळां हरळ न विरे । घाई कोत न जिरे । तैसें काळींचें न विसरे । जन्मदुःख ॥ ३९ ॥ ह्मणे पूयगर्ते रिघाला । अहा मूत्ररंध्रें मिघाला । कंटारें मियां चाटिला । कुचस्वेद ॥ ५४० ॥ ऐसऐसिया परी । जन्माचा कांटाळा धरी । ह्मणे आतां तें मी न करीं । जेणें ऐसें होय ॥ ४१ ॥ हारी उमचावया । जुंवारी जैसा ये डाया । कीं वैरा बापाचेया । पुत्र *जाचे ॥ ४२ ॥ मारिलियाचेनि रागें । पाठीचा जेवीं सूड †मागे । तेणें आक्षेपें लागे । जन्मापाठीं ॥ ४३ ॥ परि जन्मती ते लाज । न सांडी जयाचें निज । संभाविता निस्तेज । न जिरे जेवीं ॥ ४४ ॥ [मृत्युः] आणि मृत्यु पुढां आहे । तोचि कल्पांतीं कां पाहे । परि आजीच होये । सावध जो ॥ ४५ ॥ माजि अथाव ह्मणतां । थडियेचि पांडुसुता । पोहणार आइता । ‡कासेसि जेवीं ॥ ४६ ॥ कां न पवतां रणाचा ठावो । सांभाळिजे जैसा आवो । वोडणें

* जाचे. † माघे. ‡ कास जेवीं. + 5711 (illegible)

१ आशाखोरासारखा. २ यज्ञ व तलाव, बाग आदि. ३ अहंकारावांचून. ४ नाश, उठवणीस येणें. ५ एकेरी हाराची. ६ चित्राचे हातचें. ७ मल, पाप. ८ विवशीला. ९ उपद्रव. १० आश्रय, लंवक. ११ दूषण. १२ खडा, रेती. १३ भाला, शल्य. १४ पुवाचा खाडा. १५ मूत्रमार्गे. १६ हाहा दैवा. १७ हरल्यावर. १८ फेडण्यासाठीं. १९ जपे. २० हट्टानें. २१ मन. २२ अपकीर्ति. २३ खोल. २४ कंवरेस. २५ ढाल.

सुइजे धावो । न लागतांचि ॥ ४७ ॥ [1]पाहेचा [2]पेणा [3]पाटवधा । तंव आजीचि होइजे सावधा । जीव न [4]वचतां औषधा । धांविजे जेवीं ॥ ४८ ॥ येरवीं ऐसें घडे । जो जळत घरीं सांपडे । तो मग न *[5]पवाडे । कुहा खणों ॥ ४९ ॥ [6]चोंढिये पोंथर गेला । तैसेनि जो बुडाला । तो बोंबेंही सकट निमाला । कोण सांगे ॥ ५५० ॥ ह्मणोनि समर्थेंसीं वैर । जया पडिलें [7]हौडखाइर । तो जैसा आठही पाहर । [8]पैरजूनि असे ॥ ५१ ॥ ना तरी [9]केवळली नोवरी । कां संन्यासी जयापरी । तैसा न मरतां जो करी । मृत्युसूचना ॥ ५२ ॥ पैं गा जो ययापरी । जन्मेंचि जन्म निवारी । मरणें मृत्यु मारी । आपण उरे ॥५३॥ तया घरीं ज्ञानाचें । सांकडें नाहीं साचें । जया जन्ममृत्यूचें । निमालें शल्य ॥ ५४ ॥ [जरा] आणि तयाचिपरी जरा । न टेकतां शरीरा । तारुण्याचिया भरा । माजि देखे ॥५५॥ ह्मणे आजिच्या अवसरीं । पुष्टि [10]आहे शरीरीं । ते होईल [11]कांचरी । वाळली जैसी ॥ ५६ ॥ निदैवाचे व्यवसाय । तैसे ठाकती हातपाय । अमंत्रीराजाची [12]पैरी आहें । बळा यया ॥ ५७ ॥ फुलांचिया भोगा- । लागीं प्रेम [13]लागो । तें करेयांचा गुडघा । तैसें होईल ॥५८॥ वोढाळाच्या खुरीं । आषाढवार्ते [14]बुरी । ते दशा †मा या शिरीं । पावेल गा ॥ ५९ ॥ पद्मदळेसी इसों[15]ळें । भांडताति हे डोळे । ते होती पडवळें । पिकलीं जैसीं ॥५६०॥ भवईचीं [16]पडळें । वोमथती [17]शिंसाळें । उर कुहिजेलें [18]जळें । [19]आंसुवांचेनी ॥ ६१ ॥ जैसें बाभुळीचें खोड । गिरेंबडूनि जाती सरड । तैसें पिचेंडी तोंड । [20]सेरकटिजेल ॥६२॥ रांधवणी चुलीपुढें । पैंहवे ‡[21]उंह्मातति [22]खोतवडें । तैसींचि यें नाकाडें । बिडबिडेंती ॥ ६३ ॥ तांबूलें [23]वोंठ [24]राऊं । हांसतां दांत दाऊं । [25]सेनागर मिरऊं । बोल जेणें ॥६४॥ तयाचिया तोंडा । येईल जळंबेठाचा लोंढा । इया [26]उंमळती दाढा । §दांतांसींही ॥ ६५ ॥ [27]कुळवाडी रिणें दाटली । कीं वांकडिया [28]ढोरें बैसलीं । तैसी ¶नुठी कांहीं केली । जीभची हे ॥ ६६ ॥ कुसळें कोरडी । वारेनें जाती बरडीं । तैसी $आपदा तोंडीं । दाढियेसी ॥ ६७ ॥ आंषाढींचेनि जळें । जैसीं झिरपती शैलाचीं [29]मौळें । तैसे [30]खोंडीहूनि लाळें । पडती पुर ॥ ६८ ॥ वाचेसि [31]अंपवाड । कानीं [32]अनुघड । पिंड [33]गरुवा

---

* पाडे. † माझ्या. ‡ वुदमाती, वाहवती. § दांतांसहित. ¶ नुठेल. $ आपत्ति तोंडीं. ढाळियेसी.

---

१ उद्यांचा मुक्काम. २ प्रवर्ते. ३ डोहीं. ४ दगड. ५ हाडास भेदणारें. ६ शस्त्र धारण करून, सज्ज. ७ सती जाणारी. ८ विचार. ९ वाळविलेली माजी. १० प्रमाणें. ११ मस्तक. १२ उंटाचा. १३ खांडुक. १४ स्पर्धेनें. १५ पडदे. १६ लोंबतात. १७ जुन्या साळीप्रमाणें. १८ कुजेल. १९ अश्रूंच्या. २० खरवडती. २१ थुंक्यानें. २२ भरेल. २३ चर. २४ वाहतात. २५ उकिर्डे. २६ वरवटती. २७ रंगवूं. २८ चांगले. २९ लाळेचा, खांकराचा. ३० उसळती. ३१ शेतकी, व्यापार. ३२ झर्डीत. ३३ शिखरें. ३४ तोंडांतून. ३५ अनिवार. ३६ अस्पष्ट. ३७ हा पिंड = देह गरुवा = मोठ्या माकडाप्रमाणें दिसेल.

माकड । होईल हा ॥ ६९ ॥ तृणाचें बुझवणें । आंदोळे वारेनुगुणें । तैसें येईल कांपणें । सर्वांगासी ॥ ५७० ॥ पायां पडती वेंगडी । हात वळती मुरकुंडी । बरवेपणा बोंगडी । नाचविजेल ॥ ७१ ॥ मळमूत्रद्वारें । होऊनि ठाती खोंकरें । नवसियें होती इतरें । माझिया निधनीं ॥ ७२ ॥ देखोनि थुंकील जंग । मृत्यूचा पडेल पींग । सोइरियां उबग । येईल माझा ॥ ७३ ॥ स्त्रिया ह्मणती विवसी । बाळें जाती मूर्छेसी । किंबहुना चिळसी । पात्र होइन ॥ ७४ ॥ उंभळीचा उजगरा । *सेजारिया सोइलियां घरा । शिणवील ह्मणती ह्मातारा । बहुतांतें हा ॥ ७५ ॥ ऐसी वार्धक्याची सूचणी । आपणियां तरुणपणीं । देखे मग मनीं । विटे जो गा ॥ ७६ ॥ ह्मणे पाहे हें येईल । आणि आतांचें भोगितां जाईल । मग काय उरेल । हितालागीं ॥ ७७ ॥ ह्मणोनि नाइकणें पावे । तंव आइकोनि घाली आघवें । पंगु न होतां जावें । तेथुनियां ॥ ७८ ॥ दृष्टी जंव आहे । तंव पाहावें तेतुलें पाहे । मूकत्वा आधीं वाचा वाहे । सुभाषित ॥ ७९ ॥ हात होती खुळे । हें पुढील मोटकें कळे । तंव करूनि घाली सकळें । दानादिकें ॥ ५८० ॥ ऐसी दशा येईल पुढें । तैं मन होईल वेडें । तंव चिंतूनि ठेवी चोखडें । आत्मज्ञान ॥ ८१ ॥ जैं चोर पाहे झोंबती । तंव †आजीचि रिसिजे संपत्ती । कां झांकाझांकि वाती । न वचतां कीजे ॥ ८२ ॥ तैसें वार्धक्य यावें । मग जें वायां जावें । तें आतांचि आघवें । बस्तें करी ॥ ८३ ॥ आतां मोडूनि ठेलीं दुर्गें । कां वेंळित धरिलें खुगें । तेथ उपेक्षूनि जो ‡निघे । तो नागवला कीं ॥ ८४ ॥ तैसें वृद्धाप्य होय । आलेपण वायां जाय । जे तो शतवृद्ध आहे । नेणों कैंचा ॥ ८५ ॥ झाडिलींचि कोळें झाडी । तया न फळे जेविं बोंडी । जाहाला अग्नी तरी राखोंडी । जाळील कांई ॥ ८६ ॥ ह्मणोनि वार्धक्याचेनि आठवें । वार्धक्या जो नागवे । तयाच्याठायीं जाणावें । ज्ञान आहे ॥ ८७ ॥ [व्याधिः] तैसेंचि नाना रोग । पडिघाती ना जंव पुढां आंग । तंव आरोग्याचे उपेग । करूनि घाली ॥८८॥ सापाच्या तोंडीं । पडिली जे उंडी । ते §लाऊनि सांडी । प्रबुद्ध जैसा ॥ ८९ ॥ [दुःखदोषानुदर्शनं] तैसा वियोग जेणें दुःखें । विपत्ति शोक पोखे । तें स्नेह

---

* सेजयां सोइलयां, सेजेया होईल या घरा. †आधींच. ‡न रिघे. §लागूनि.

---

१ वाऱ्याच्या योगानें. २ पायांत पाय गुंतणें, वळणें. ३ श्रमानें. ४ सोंग, चेष्टा. ५ फुटकी भांडी. ६ नवस केलेलीं दैवतें. ७ दीनदशा. ८ कंटाळा. ९ खोकल्याची उबळ. १० सोयऱ्यांला. ११ उद्यां. १२ बहिरेपण. १३ खुळखुळ, पंगु. १४ अल्प. १५ शुद्ध. १६ प्रातःकाळीं, उदयीक. १७ दूर करावी. १८ दिवा गेला नाहीं तोंच सर्व झांकूच नीट ठेवावें. १९ ठीक. २० भरभराटीस आलीं. २१ माघार घेतली. २२ वळवाच्या पावसानें. २३ शतायु. २४ तिळांचीं बोंडें. २५ न सांपडे. २६ न दाबिती, प्रतिघाति, जों आंगावर आदळत नाहींत.

सांडूनि सुखें । उदास होय ॥ ५९० ॥ आणि जेणेंजेणें कडें । दोष सूतील तोंडें । तयां कर्मरंध्रीं गुंडे । नियमाचे दाटी ॥ ९१ ॥ ऐसऐसिया आइती । जयाची परी असती । तोचि तो ज्ञानसंपत्ती । गोसांवी गा ॥ ९२ ॥ आतां आणीकही एक । लक्षण अलौकिक । सांगेन आइक । धनंजया ॥ ९३ ॥

असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ।
नित्यं च समचित्तत्वमिष्टाऽनिष्टोपपत्तिषु ॥ ९ ॥

['लक्षणद्वयं' असक्तिः] तरि जो या देहावरी । उदास ऐसिया परी । उखिता जैसा बिढारीं । *बैसला आहे ॥ ९४ ॥ [अनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु] कां वृक्षाची साउली । वाटे जातां मिनली । घरावरी तेतुली । †आस्था नाहीं ॥९५॥ साउली सरिसीचें असे । परी असे हें नेणिजे जैसें । स्त्रियेचें तैसें । लोलुप्य नाहीं ॥ ९६ ॥ आणि प्रजा जे जाली । तियें ‡वस्तीकरें आलीं । कां गोरुवें बैसलीं । रुखातळीं ॥ ९७ ॥ जो संपत्तिमाजि असतां । ऐसा गमे पांडुसुता । जैसा कां वाटे जातां । साक्षी ठेविला ॥ ९८ ॥ किंबहुना पुसों । पांजरियामाजि जैसा । वेदाज्ञेसी तैसा । बिहूनि असे ॥ ९९ ॥ येन्हवीं दारागृहपुत्रीं । नाहीं जया मैत्री । तो जाणपां धात्री । ज्ञानासि गा ॥६००॥ [नित्यं च समचित्तत्वं] महासिंधू जैसें । ग्रीष्म वर्षा सरिसें । [इष्टानिष्टोपपत्तिषु] इष्टानिष्ट तैसें । जयाच्याठायीं ॥ १ ॥ कां तीन्हीं काळ होतां । त्रिधा नव्हे सविता । तैसा सुखदुःखीं चित्ता । भेदु नाहीं ॥ २ ॥ जेथ नभाचेनि पाडें । समत्वा न्यून न पडे । तेथ ज्ञान रोकडें । वोळख तूं ॥ ३ ॥

मयि चाऽनन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥

['लक्षणद्वयं' मयि चानन्ययोगेन] आणि मीवांचूनि कांहीं । आणीक गोमटें नाहीं । ऐसा निश्चय §तिहीं । जयाचा केला ॥ ४ ॥ शरीर वाचा मानस । पियालीं कृतनिश्चयाचा ¶कोश । एक मीवांचूनि वासें । न पाहती आन ॥ ५ ॥ [अव्यभिचारिणी] किंबहुना निकट निर्ज । जयाचें जाहालें मज । तेणें आपणयां आह्मा सेज । एकी केली ॥ ६ ॥ रिगतां वल्लभापुढें । नाहीं आंगीं जीवीं सांकडें । तिये कांतेचेनि पाडें । ¶एकसरला जो ॥ ७ ॥ [अव्यवहिता] मिळोनि मिळतचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें । मीं होऊनि मज तैसें । सर्वस्वें भ-

* बैसविला. † जया. ‡ वस्ती कीर. § पाहीं. ¶ अनुसरला.

१ निरिच्छ. २ ज्या ज्या कडेनें दोष तोंड घालतील. ३ कर्मेंद्रियांच्या छिद्रांत. ४ युक्ती. ५ वाटसरू, प्रवासीन. ६ सांपडली. ७ समागम. ८ सुलें. ९ वाटसरू. १० गुरें. ११ वृक्षाखालीं. १२ पोपट. १३ रक्षक, स्थान, पोषण करणारा. १४ चांगलें. १५ कायावाचामनांनीं. १६ तीर्थ, शपथ. १७ वाट. १८ एकसरला. १९ अनुसरला.

जती ॥ ८ ॥ सूर्याच्या होण्या[1] होइजे । कां सूर्यासवेंचि जाइजे । हें विकलेपण[2] साजे । प्रभेसि जेवीं ॥ ९ ॥ पैं पाणियांचिये भूमिके । पाणी तळपे[3] *कौतुकें । ते लहरी ह्मणती लौकिकें । येन्हवीं तें पाणी ॥ ६१० ॥ जो अनन्य यापरी । मी जाहाला ही मातें वरी । तोचि तो मूर्तधारी[4] । ज्ञान पैं गा ॥ ११ ॥

[विविक्तदेशसेवित्वं] आणि तीर्थें धौतें[5] तटें । तपोवनें चोखटें । आवडती कपाटें[6] । वसवूं जया ॥ १२ ॥ शैलकक्षांचीं कुहरें[7] । जळाशयपरिसरें । अधिष्ठी[8] जो आदरें । नगरा नये ॥ १३ ॥ [अरतिर्जनसंसदि] बहु एकांतावरी प्रीती । जया जनपदाची खंती[9] । जाण मनुष्याकारें मूर्ती । ज्ञानाची तो ॥१४॥ आणिकही पुढती । चिन्हें गा सुमती । ज्ञानाचिये निरुती[10]- । लागीं सांगों ॥ १५ ॥

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ ११ ॥

['लक्षणद्वयं' अध्यात्मज्ञाननित्यत्वं] तरि परमात्मा ऐसें । जें एक वस्तु असे । तें जया दिसे । ज्ञानास्तव ॥ १६ ॥ तें एकवांचूनि आनें । जियें भवस्वर्गादि ज्ञानें । तें अज्ञान ऐसा मनें । निश्चय केला ॥ १७ ॥ स्वर्गा जाणें हें सांडी । भवविषयीं[11] कान झाडी[12] । दे अध्यात्मज्ञानीं बुडी । सद्भावाची ॥ १८ ॥ भंगलिये[13] वाटे[14] । शोधूनियां अडव्हाटे[15] । निधिजे जेविं निटें । राजपंथें ॥ १९ ॥ तैसें †ज्ञानजाता करी[16] । आघवेंचि एकीकडे सारी । मग मन बुद्धि मोहरी[17] । अध्यात्मज्ञानीं ॥ ६२० ॥ ह्मणे एक हेंचि आथी । येर जाणणें ते भ्रांति । ऐसी निकरेंसी[18] मती । मेरु[19] होय ॥ २१ ॥ एवं निश्चय जयाचा । द्वारीं अध्यात्मज्ञानाचा । ध्रुव देवो गगनींचा । तैसा राहिला ॥ २२ ॥ तयाचियाठायीं ज्ञान । या बोला नाहीं आन । जे ज्ञानीं बैसलें मन । तेव्हांचि तो[20] मी ॥ २३ ॥ तरि बैसलेपणें जें होये । तें बैसतांचि बोलें न होये । तरि ज्ञाना तया आहे । सरिसा[21] पाड ॥ २४ ॥ [तत्त्वज्ञानार्थदर्शनं] आणि तत्त्वज्ञान निर्मळ । फळे[22] जें एक फळ । ते ज्ञेयही वरी ‡सरळ[23]- । दिठी जेणें ॥ २५ ॥ येन्हवीं बोधा आलेनि ज्ञानें । जरी ज्ञेय न दिसेचि मनें । तरि ज्ञानलाभही न मने । जोहाला[24] सांता ॥ २६ ॥ आंधळेया हातीं दिवा । ¶देऊनि कांय करावा । तैसा ज्ञाननिश्चय आघवा । वायांचि जाय ॥ २७ ॥ जरि ज्ञानाचेनि प्रकाशें । परतत्त्वीं दिठी न पैसे[25] । ते स्फूर्तीचि[26] असे । अंध होउनी ॥ २८ ॥ ह्मणोनि ज्ञान जेतुलें दावी ।

* लौकिकें. † अज्ञान. ‡ सकळ. § जया. ¶ घेऊनि.

१ होण्यानें. २ अभेद. ३ हाले. ४ एकनिष्ठ. ५ साक्षात्. ६ पवित्र. ७ गुहा. ८ पर्वताच्या गुहा. ९ उदकाच्या जवळचीं स्थळें. १० आश्रय करी. ११ वस्तीची. १२ निश्चयासाठीं १३ संसाराविषयीं. १४ ओसाड, दुर्भागलेली. १५ अडवाटा. १६ वळवी, १७ सारांश १८ दृढ. १९ तो तो. २० सारखी योग्यता. २१ प्रसवे. २२ पर्यंत. २३ समान दृष्टीनें. २४ असतां. २५ न पसरे. २६ बुद्धी.

तेतुली वस्तुचि आघवी । ते देखे ऐसी व्हावी । बुद्धी चोख ॥ २९ ॥ यालागीं ज्ञानें[1] निर्दोषें । दाविलें ज्ञेय देखे । तैसेनि उन्मेषें[2] । आथिला[3] जो ॥ ६३० ॥ जेवढी ज्ञानाची वृद्धी । तेवढी जयाची बद्धी । तो ज्ञान हें शब्दीं । करणें न लगे ॥ ३१ ॥ पैं ज्ञानाचिये प्रभेसवें[4] । जयाची मती ज्ञेयीं पावे । तो *हातधरणिया[5] शिवे । परतत्त्वातें ॥ ३२ ॥ तोचि ज्ञान हें बोलतां । विस्मयो कवण पांडुसुता । काय सवितयातें सविता । ह्मणावें असे ॥ ३३ ॥ तंव श्रोते ह्मणती असो । न सांगें तयाचा अतिसो । ग्रंथोक्ती तेथ[6] आडसो । घालिसी कां हा ॥ ३४ ॥ तुझां हाचि आह्मा थोर[7] । वक्तृत्वाचा[8] पाहुणेर[9] । जे ज्ञानविषो फार[10] । निरोपिला ॥ ३५ ॥ रस होआवा अतिमात्रु । हा घेतासि कवि[11]मंत्रु । तरी अवंतूनि शत्रु । करितोसि कां गा ॥३६॥ ठर्यीं बैसतिये वेळे । जे रससोय[12] वेऊनि पळे । तियेचा येर[13]° वोडव मिळे । कोणा अर्था ॥ ३७ ॥ आघवाचि विषयीं भादी[14] । परि †सांजवणी टेकों नेदी । ते ‡खुरखोडी[15] नुसधी । पोषी कवण ॥ ३८ ॥ तैसी ज्ञानीं मती न फांके । येर जल्पती नेणों केतुकें[16] । परि तें असो निकें । केलें तुवां ॥ ३९ ॥ जया ज्ञानलेशोद्देशें[17] । किजती योगादि सायासें । तें धणी[18]चें आणि तुझिया ऐसें । निरूपण ॥ ६४० ॥ अमृताची सांतवांकडी[19] । लागो कां अनुघडी[20] । सुखाच्या दिवसीं कोडी[21] । गणिजेतुकां ॥ ४१ ॥ पूर्णचंद्रेसीं राती । §युग एक असोनि पोहती[22] । तरि काय न पाहत आहाती । चकोर ते ॥ ४२ ॥ तैसें ज्ञानाचें बोलणें । आणि येणें रसाळपणें । आतां पुरे कोण ह्मणे । आकर्णितां[23] ॥ ४३ ॥ आणि सभाग्य[24] पाहुणा ये । सुभगाचि[25] वाढती होये । तैं सरों नेणें रससोये[26] । ऐसें आथी ॥ ४४ ॥ तैसा जाहाला प्रसंग । जे ज्ञानीं आह्मासि लाग[27] । आणि तुजही अनुराग[28] । आथि तेथ ॥४५॥ ह्मणोनि यया ¶व्याख्याना-[29] । पासीं से[30] आली चौगुणा[31] । ना $ह्मणोनयेसी देखणा । होसी ज्ञानी ॥ ४६ ॥ तरी आतां ययावरी[32] । प्रज्ञेचा[33] मांज धरीं । पदें साच करीं । निरूपणीं ॥ ४७ ॥ या संतवाक्यासरिसें । ह्मणितलें निवृत्तिदासें । माझेंही जी ऐसें । मनोगत ॥ ४८ ॥ यावरी आतां तुह्मी । आज्ञा-

---

* हात धरूनियां. † सांजवणें. ‡ खोडी. § असो युगाची पाती । तरी चकोरें चिंतिती । आन काई. ¶ वाखाणा । प्रेमचढे चौगुणा. $ ह्मणोनयें देखणा.

---

१ ज्ञानानें. २ संपन्न झाला. ३ प्रकाशावरोबर. ४ हातासरसा, हांहां म्हणतां. ५ अडथळा. ६ ज्ञानमंत्र. ७ आमंत्रण करून. ८ पात्रावर. ९ स्वयंपाक. १० आदर. ११ चांगली. १२ धार. १३ लाथाळ गाय. १४ भलमलतें. १५ ज्ञानांशाच्या उद्देशानें. १६ तृप्तीचें. १७ सात दिवसांची झड. १८ उघडीवांचून एकसारखी. १९ सुखाचे दिवसांत कोट्यवधि दिवस गेले तरी गणले जात नाहींत. २० उगवलेली. २१ ऐकतां. २२ श्रीमान्. २३ सुश्रण, देववती. २४ स्वयंपाक अशा वेळीं सरावयाचा नाहीं. २५ प्राप्ति, आवड. २६ प्रीतिं. २७ स्मरण. २८ चौपट. २९ बुद्धिचा. ३० आधिक्य, मध्यघरीं.

पिला स्वामी । तरि वायां *वाग्जाळ मी । वाढों नेदीं ॥ ४९ ॥ [एतज्ज्ञान मिति प्रोक्तं] एवं इयें अठरा । ज्ञानलक्षणें अवधारा । श्रीकृष्णें धनुर्धरा । निरूपिलीं ॥ ६५० ॥ मग ह्मणे यानावें । ज्ञान एथ जाणावें । हें स्वमत आणि आघवे । ज्ञानियेही ह्मणती ॥ ५१ ॥ करतळावरी वाटोळा । डोलत देखिजे आंवळा । तैसें ज्ञान आह्मी डोळां । दाविलें तुज ॥ ५२ ॥ आतां धनंजया महामती । अज्ञान ऐसी वेदंती । तेही सांगों व्यक्ती । लक्षणेसी ॥ ५३ ॥ [अज्ञानं यदतोन्यथा] येन्हवीं ज्ञान फुडें जालिया । अज्ञान जाणवे धनंजया । जें ज्ञान नव्हे तें अपैसया । अज्ञानचि ॥ ५४ ॥ पाहें पां दिवस आंधवा सरे । मग रात्रीची वैरी वावरे । वांचूनि कांहीं तिसरें । नाहीं जेवीं ॥ ५५ ॥ तैसें ज्ञान जेथ नाहीं । तें अज्ञानचि पाहीं । तरि सांगों कांहीं कांहीं । चिन्हें तियें ॥ ५६ ॥ [अथ मानित्वाद्यष्टादशलक्षणान्याह—'मानित्वं'] तरि संभावेंने जिये । जो मानाची वाट पाहे । सत्कारें होये । तोष जया ॥ ५७ ॥ गर्वें पर्वतार्चीं शिखरें । तैसा महत्वावरूनि नुतरे । तयाचियाठायीं पुरें । आज्ञान आहे ॥ ५८ ॥ [दंभित्वं] आणि स्वधर्माची मांगळी । बांधे वाचेच्या पिंपळीं । उभिला जैसा देउळीं । जाणोनि कुंचा ॥ ५९ ॥ घाली विद्येचा पसारा । सुये सुकृताचा डांगोरा । करी तेतुलें मोहरा । स्फीतीचिया ॥ ६६० ॥ आंग वरिवरी चर्ची । जनातें अर्चिता वंची । तो जाण अज्ञानाची । खाणी एथ ॥ ६१ ॥ [हिंसा] आणि वन्ही वनीं विचरे । तेथ जळती जैसीं जंगमस्थावरें । तैसें जयाचेनि आचारें । जगा दुःख ॥ ६२ ॥ कौतुकें जें जें जल्पे । तें सबळाहूनि तीखें रुपे । विषाहूनि संकल्पें । मारक जें ॥ ६३ ॥ तयातें बहु अज्ञान । तो अज्ञानाचें निधान । हिंसेसि आयतन । जयाचें जिणें ॥ ६४ ॥ [अक्षांतिः] आणि फुंके भाता फुगे । रेचिलियां सवेंचि उफगे । तैसा संयोगवियोगें । चढे बोहटे ॥ ६५ ॥ पडली वारयाचिया वळसां । धुळी रिघे आकाशा । हरिखें वळघे तैसा । स्तुती वेळे ॥ ६६ ॥ निंदा मोटकी आइके । आणि कपाळ धरूनि ठाके । थेंबें विरे वारेनि †शोखे । चिखल जैसा ॥६७॥ तैसा मानापमानीं होये । जो कोण्हीचि ऊर्मी न साहे । तयाच्याठायीं आहे । अज्ञान पुरें ॥ ६८ ॥ [अनार्जवं] आणि जयाचिया मनीं गांठी । वरिवरी मोकळी वाचा दिठी । आंगें मिळे जीवें पाठी । ‡भलतया दे ॥६९॥ व्याधाचें चारा घालणें । तैसें प्रांजळ जोगावणें । चांगाचीं अंतःकरणें । विरुद्ध करी ॥६७०॥

* वाग्मी. † सोके. ‡ भलतयादि.

१ व्यर्थ बडबड, चव्हाट. २ लोकवार्ता, प्रसिद्ध. ३ सहज. ४ पाळी, यात्रा. ५ प्रतिष्ठेसाठीं. ६ दिवाळी दिवशीं दोरांचें वेटोळें करून मांगलोक चावडीवर ठेवतात तें. ७ जसा देवळामध्यें कुंचा=झाडू उभा ठेवल्याप्रमाणें मोळांच्या वेंट बांधणें, किंवा मोरचेल झिरमिळीचें मोतीं. ८ प्रतिष्ठेस. ९ या परमात्मविद्येंत, जगांत. १० बर्ची, पाहार. ११ तीक्ष्ण. १२ घर. १३ सोडला असतां. १४ रिकामा पडे. १५ लाभालाभानें. १६ वावटळींत. १७ हर्षास चढे. १८ अल्प. १९ शोषे. २० उत्कर्ष, तरंग. २१ जीवानें भलत्यासच मिळतो. २२ निर्मळ. २३ पालन करणें, पुरवून खाण्यास घालणें.

गार[1] शेवाळें *गुंडाळली । कां निंबोळी जैसी पिकली । तैसी जयाची भली । बाह्यक्रिया ॥ ७१ ॥ अज्ञान तयाचियाठायीं । ठेविलें असे पाहीं । या बोला आन नाहीं । सत्य मानीं ॥ ७२ ॥ ['आचार्योपासनराहित्यं'] आणि गुरुकुळीं लाजे । जो गुरुभक्ति उभजे[3] । विद्या घेऊनि माजे । गुरूसींचि जो ॥ ७३ ॥ तयाचें नाम घेणें । तें †वाचे शूद्रान्न[4] होणें । परि घडलें लक्षणें । बोलतां इयें ॥ ७४ ॥ आतां गुरुभक्तांचें नांव घेवों । तेणें वाचे प्रायश्चित्त देवों । गुरुभक्तांचें नाम पाहों । सूर्य जैसा ॥ ७५ ॥ येतुलेनि पोंगू[5] पापाचा । निस्तरेल हे वाचा । जो गुरुतल्पगाचा । नामीं[6] जाला ॥ ७६ ॥ हा ठायवरी । तया नामाचें भय हरी । मग ह्मणे अवधारीं । आणिकें चिन्हें ॥ ७७ ॥ ['अशौचं'] तूरि आंगें कर्में ढिला[7] । जो मनें विकल्पें भरला । अंडवीचा[8] अवगळला । कुंहा[9] जैसा ॥ ७८ ॥ तया तोंडीं कांटिवडें[10] । आंत नुसधीं हाडें । अशुचि तेणें पाडें । सबाह्य जो ॥ ७९ ॥ जैसें पोटालागीं सुंणें[11] । उघडें झांकलें न ह्मणे । तैसें आपलें परावें नेणे । द्रव्यालागीं ॥ ६८० ॥ इया ग्रामसिंहाचिया[12]ठायीं । जैसा मिळेणी[13] ठावो अठावो नाहीं । तैसा स्त्रीविषयीं कांहीं । विचारीना ॥८१॥कर्माचा वेळ चुके । कां नित्य नैमित्तिक ठाके । तें जया न दुखे । जीवामाजी ॥८२॥पापीं जो निसुग[14] । पुण्याविषयीं अति निर्लागु[15] । जयाचिया मनीं वेगु । विकल्पाचा ॥८३॥ तो जाण निखिळा[16] । अज्ञानाचा पुतळा । जो बांधोनि असे डोळा । वित्तीशेतें[17] ॥ ८४ ॥ ['अशौचं'] आणि स्वार्थें अळुमाळें[18] । जो धैर्यापासोनि चळे । जैसें तृणबीज ढळे । मुंगियेचेनि ॥ ८५ ॥ पांवो[19] सूदलिया सवें । जैसें थिल्लर[20] कालवे । तैसा भयाचेनि नांवें । गजबजे जो ॥ ८६ ॥ मनोरथांचिया धारसा[21] । वाहणें जयाचिया मानसा । पूरीं पडिला जैसा । दुधिया पाहीं ॥ ८७ ॥ वायूचेनि सांवाये[22] । ‡धूई[23] दिगंतरा जाये । दुःखवार्ता होये । तैसें जया ॥ ८८ ॥ वांउधणाचिया[24] परी । आश्रय कहींचि न धरी । क्षेत्रीं तीर्थीं पुरीं । थारों नेणे ॥ ८९ ॥ कां मातलिया सरडा । पुढती[25] §बुड पुढती शेंडा । हिंडणें[26] वारा कोरडा । तैसा जया ॥६९०॥ जैसा रोंविल्याविणें । रांजण थारों[27] नेणे । तैसा पडे तैं राहाणें । येन्हवीं हिंडे ॥ ९१ ॥ तयाच्याठायीं उदंड । अज्ञान असे वितंडें[28] । जो चांचल्यें भावंड । मर्कटाचें ॥ ९२ ॥ ['आत्मविनिग्रहाभावः'] आणि पैं गा धनुर्धरा । जयाचिया अंतरा । नाहीं वोढांवारा[29] । संयमाचा ॥ ९३ ॥ लेंडिये[30] आला लोंढा । न मनीं वाळुवेचा ¶वरंवंडा[31] । तैस

*गुडली. †वाचा शुद्ध न होणें. ‡धूळि. §बुडख. ¶वरंडा.

१ शिळा. २ त्रासे. ३ शूद्राचें अन्न भक्षणें. ४ हीनत्व. ५ मात्रागमनाचा. ६ दोषी. ७ रानांतला ८ अमंगळ. ९ विहीर. १० कांटेरीं. ११ कुत्रें. १२ कुत्र्याच्या. १३ अंगसंगास. १४ भ्रष्ट १५ सर्व. १६ द्रव्यासक्तीला. १७ अल्पस्वल्प. १८ पाय घालण्याबरोबर. १९ डबकांतील घाणपाणी २० धारेवर. २१ सहवासानें. २२ धूळ, धुकें. २३ वादळाच्या. २४ झाडाच्या वर जावे खालीं उतरावें. २५ परिभ्रमण. २६ स्थिरावों. २७ मोठें. २८ धरबंध. २९ ओहळास. ३० बांध.

निषेधाचिया तोंडा । बिहेना जो ॥ ९४ ॥ व्रतातें आड मोडी । स्वधर्म पायें वोलांडी । नियमाची आश[1] तोडी । जयाची क्रिया ॥ ९५ ॥ नाहीं पापाचा कंटाळा । नेणे पुण्याचा जिव्हाळा । लाजेचा पेंडवळा[2] । खाणोनि घाली ॥ ९६ ॥ कुळेंसीं[3] जो पाठमोरा । वेदाज्ञेसीं दुऱ्हा । कृत्याकृत्यव्यापारा । निवाड[4] नेणें ॥ ९७ ॥ वेसू[5] जैसा मोकाट[6] । वारा जैसा *अफाट । फुटला जैसा पाट । †निरंजनीं[7] ॥ ९८ ॥ आंधळें हातिरूं[8] मातलें । कां डोंगरीं जैसें पेटलें । तैसें विषयीं सुटलें । चित्त जयाचें ॥ ९९ ॥ पैं उकरडां काय न पडे । मोकाट कोणां नातुडे । ग्रामद्वारींचें आडें[9] । नोलांडी कोण ॥ ७०० ॥ जैसें सत्रीं अन्न जालें । कां सामान्या बीकें[10] आलें । ‡नाम्ष्येचें[11] उंभलें[12] । कोण न रिगे ॥ १ ॥ तैसें जयाचें अंतःकरण । तयाच्याठायीं संपूर्ण । अज्ञानाची जाण । ऋद्धि आहे ॥ २ ॥ [इंद्रियार्थेष्ववैराग्यं] आणि विषयांची गोडी । जो जीत मेला न सांडी । स्वर्गीही खावया जोडी । एथुनीचि ॥ ३ ॥ जो अखंड भोगा जांचे[13] । जया व्यसन कामक्रीडेचें[14] । मुख देखोनि विरक्ताचें । सचैल[15] करी ॥ ४ ॥ विषो शिणोनियां राहे । परि न शिणे सावध नोहे । कुहिलीं[16] हातीं खाये । कोढी जैसा ॥ ५ ॥ खरी[17] टेंकों नेदी उडे । लोतौनि[18] फोडी नाकाडें । तऱ्हीं जेवीं न काढे । माघौता खर ॥ ६ ॥ तैसा जो विषयांलागीं । उडी घाली जळते आगीं । व्यसनाचीं आंगीं । लेणीं मिरवी ॥ ७ ॥ फुटोनि[19] पडे तंव । मृग वाढवी हांव । परि न ह्मणे ते मांव[20] । रोहिणीची[21] ॥ ८ ॥ तैसा जन्मोनि मृत्युवरी । विषयीं त्रासितां बहुतीं परी । तऱ्ही त्रास नेघे धरी । अधिक प्रेमा ॥ ९ ॥ पहिलिये बाळदशे । आई बोहेंचि[22] पिसें । तें सरे मग स्त्री मांसें । भुलोनि ठाके ॥ ७१० ॥ मग स्त्री भोगितां थावो[23] । वृद्धाप्य लागे येवों । तेव्हां तोचि प्रेमभावो । बाळकासि आणी ॥ ११ ॥ आंधळें व्यालें जैसें । तैसा बाळें परिसे[24] । परि जीव मरे तों न त्रासे । विषयांसि जो ॥ १२ ॥ जाण तयाच्या ठायीं । अज्ञानासि पार नाहीं । आतां आणीक कांहीं । चिन्हें सांगों ॥ १३ ॥ ['अहंकारः'] तरि देहचि आत्मा । ऐसेया जो मनोधर्मा । वेळघोनियां[25] कर्मा । आरंभ करी ॥ १४ ॥ आणि उर्णे कां पुरें । जें जें कांहीं आचरे । तयाचेनि आविष्कारें[26] । कुंथों लागे ॥ १५ ॥ डोइये[27] ठेविलेनि भोजें । देवलेविसें[28] जेवीं फुंजे[29] । तैसा विद्यावयसा माजे । उताणा चाले ॥ १६ ॥ ह्मणे मीचि एक अर्थी । माझ्याचि घरीं संपत्ती । माझी आचरती रीती । कोणा आहे ॥ १७ ॥

---

* सैराट. † निर्जनी. ‡ वाणसीये.

---

१ सीमा, मर्यादा. २ कुळधर्माला. ३ निर्णय. ४ बैल. ५ मोकळा. ६ जळीं. ७ हत्ती. ८ पोळ. ९ अटकाव. १० वेड्येला. ११ तेज, बळ. १२ दारांत. १३ श्रम करतो. १४ कामनिक कर्माचें. १५ सचैल स्नान करी. १६ कुजलेल्या. १७ गाढवी. १८ लाथांनीं. १९ तोंड फुटोन. २० कम्पट. २१ मृगजळाची. २२ बाहूंवर. २३ अंगवळें. २४ स्पर्शे. २५ चढोन. २६ आविर्भावानें. २७ डोईवर घेतलेल्या महत्वानें. २८ पुजारी, देवर्षी. २९ अभिमान धरी.

नाहीं माझेनि पाडें पाड । मी सर्वज्ञ एकचि रूढ । ऐसा सर्व तुष्टीगंड । घेऊनि ठाके ॥ १८ ॥ व्याधि लागलिया माणुसा । नयेचि भोग दाऊं जैसा । निकें न साहे जो तैसा । पुढिलांचें ॥ १९ ॥ पैं गुण तेतुला खाय । स्नेह कीं जाळित जाय । जेथ ठेविजे तेथ होय । मसी ऐसें ॥ ७२० ॥ जीवनें शिंपिला तिंडपिडी । वीजिला प्राण सांडी । लागला तरी काडी । उरों नेदी ॥ २१ ॥ अळुमाळ प्रकाश करी । तेतुलेनीच उबारा धरी । तैसिया दीपाचिया परी । सुविद्यं जो ॥ २२ ॥ औषधाचेनि नांवें अमृतें । जैसा नवज्वर आंबुथे । कां विषचि होऊनि परते । सर्पा दूध ॥ २३ ॥ तैसा सद्गुणी मत्सर । व्युत्पत्ती अहंकार । तपोज्ञानें अपार । ताठा चढे ॥ २४ ॥ अंत्यज राणिवे बैसविला । औरें धारण गिळिला । तैसा गर्वें फुगला । देखसी जो ॥ २५ ॥ जो लाटणें ऐसा न लवे । पाथर तेविं न द्रवे । गुणियासि नागवे । फोडसें जैसें ॥ २६ ॥ किंबहुना तयापासीं । अज्ञान आहे वाढीसीं । हें निकेरें गा तुजसीं । बोलत असों ॥ २७ ॥ [जन्माद्यदर्शनं] आणीकही धनंजया । जो गृहदेह सामग्रिया । न देखे *कोंलचेया । जन्मातें गा ॥ २८ ॥ कृतघ्न उपकार केला । कां चोरा व्यवहार दिधला । निसुग स्तविला । विसरे जैसा ॥ २९ ॥ वोढाळतां लाविलें । तें तैसेंचि कान पुसें वोलें । कीं पुढती वोढाळूं आलें । सुणें जैसें ॥ ७३० ॥ बेडूक सापाचिया तोंडीं । जातसे सबुडबुडीं । तो मक्षिकांचिया कोडी । स्मरेना †कांहीं ॥ ३१ ॥ तैसीं नवही द्वारें स्रवती । आंगीं देहाची लुती जिती । जेणें जाली तें चित्तीं । सलेना जया ॥ ३२ ॥ मातेच्या उदरकुहरीं । ‡सूनि विष्ठेच्या दोंथरीं । जठरीं नवमासवरी । उकडला जैं ॥३३॥ ते गर्भींची जे व्यथा । कां जें जालें उपजतां । तें कांहींचि सर्वथा । नाठवी जो ॥ ३४ ॥ मळमूत्रपंकीं । जें लोळतें बाळ अंकीं । देखोनि जो न थुंकी । त्रास नेघे ॥ ३५ ॥ कालचि ना जन्म गेलें । पाहेच पुढती आलें । ऐसें हें कांहीं वाटलें । नाहीं जया ॥ ३६ ॥ [मृत्योरदर्शनं] आणि पैं तयाचि परी । जीवितांची फेरारी । देखोनि जो न करी । मृत्युचिंता ॥ ३७ ॥ जिणेयाचेनि विश्वासें । मृत्यु एक एथ असे । हें जयाचेनि मानसें । मानिजेना ॥ ३८ ॥ अल्पोदकींचा मासा । हें नोटे ऐसिया आशा । न वचेचि कां जैसा । अगाध

* काळीचिया. † जेवीं ‡ पचूनि.

१ प्रसिद्ध. २ गर्व. ३ दुसऱ्याचें. ४ वात. ५ पाण्यानें. ६ तडतड. ७ वारा घातला तर. ८ स्पर्शला. ९ किंचित्. १० ज्ञानी. ११ दुधानें. १२ प्रकोपे, प्रदीप्त. १३ राज्यावर. १४ अजगरानें. १५ वाळकें काष्ठ. १६ गारुड्यास, विषवैद्यास. १७ फुरसें. १८ वाढते दशेस. १९ निश्चयानें, आवेशानें. २० पुढें होणाऱ्या किंवा गत जन्मातें. २१ व्यापारास. भांडवल. २२ निर्लज्ज. २३ ओढाळपण करितां. २४ शेंपूट. २५ कुत्रें. २६ मुळासहित. २७ कोटी. २८ मुख, मलद्वार, मूत्रद्वार, नेत्र २, कान २, नासारंध्रें २. २९ कुजलेली. ३० गर्भगुहेंत. ३१ उकाड्यांत. ३२ मांडीवर. ३३ उजाडतांच. ३४ ओढाताण, चांचल्य. ३५ आटणार नाहीं.

डोहां ॥ ३९ ॥ कां गौरीचियां[1] भुली । मृग व्याधा दृष्टी न घाली । गळ न पाहतां गिळिली । उंडी मीनें[2] ॥ ७४० ॥ दीपाचिया झगमगा[3] । जाळील हें पतंगा । नेणवेचि पैं गा । जयापरी ॥ ४१ ॥ गर्वार[4] निद्रासुखें । घर जळत असे तें न देखे । नेणतां जेवी विखें[5] । रांधिलें अन्न ॥ ४२ ॥ तैसा जीविताचेनि मिषें । हा मृत्यूचि आला असे । हें नेणेचि राजसें । सुखें जो गा ॥४३॥ शरीरींची वाढी । अहोरात्रांची जोडी । विषयसुखप्रौढी । साचचि मानी ॥ ४४ ॥ परि बापुडा ऐसें नेणें । जे वेश्येचें सर्वस्व देणें । तेंचि तें नागवणें । रूप एथ ॥ ४५ ॥ संचचोरांचें साजणें । तेंचि तें प्राण घेणें । लेपा[6] स्वपन करणें । तोचि नाश ॥ ४६ ॥ पांडुरोगें आंग सुटलें । तें तयाचि नांवें खुंटलें । तैसें नेणे *भुले । आहारनिद्रा ॥ ४७ ॥ सन्मुख शूळा[7] । धांवतया पायें चपळा । प्रतिपदीं जवळा । मृत्यु जेवीं ॥ ४८ ॥ तेविं देहा जंव जंव वाढ । जंव जंव दिवसांचा पवाड । जंव जंव सुरवाड[8] । भोगाचा यया ॥ ४९ ॥ तंव तंव अधिकाधिकें । मरण आयुष्यातें जिंके । मीठ जेविं उदकें । घांसिजत[9] असे ॥ ७५० ॥ तैसें †जीवित्व जाये । तयास्तव ‡काळाचें पाहे । हें हातोहातींचें §न होये । ठाउवें जया ॥ ५१ ॥ किंबहुना पांडवा । हा आंगींचा मृत्यु नित्य नवा । न देखे जो मोवा । विषयांचिया ॥ ५२ ॥ तो अज्ञानदेशींचा रावो । या बोला महाबाहो । न पडे गा ठावो । आणिकांचा ॥ ५३ ॥ ['जराया आदर्शनं'] पैं जीविताचेनि तोषें । जैसा कां मृत्यु न देखे । तैसाचि तारुण्यें पोखे[10] । जरा न गणी ॥ ५४ ॥ कडाडीं[11] लोटला गाडा । कां शिखरौनि सुटला धोंडा । तैसा न देखे जो पुढां । वार्धक्य आहे ॥ ५५ ॥ कां ओडवोहळा[12] पाणी आलें । कां जैसें हंसयाचें[13] जुंझ मातलें । तैसें तारुण्याचें चढलें । भुरें[14] जया ॥ ५६ ॥ पुष्टि लागे विघरीं[15] । कांति पाहे निसरों । ¶मस्तक आदरी शिरी[16]- । $भागीं कंप ॥ ५७ ॥ दाढी साउळ धरी[17] । मान हालौनि वारी । तरी जो करी । मायेचा पैसु[18] ॥ ५८ ॥ पुढील उरीं आदळे । तंव न देखे जेविं आंधळें । कां डोळियावरले निगेळें[19] । आळसी तोपे ॥ ५९ ॥ तैसें तारुण्य आजिचें । भोगितां वृद्धाप्य पाहेचें[20] । न देखे तोचि साचें । अज्ञान गा ॥ ७६० ॥ ['व्याध्यदर्शनं'] देखे अक्षमें[21] कुब्जे । कीं विटेवूं[22] लागे

---

* भुलले. † जीवित. ‡ काळ पाहे. § नव्हे. ¶ माथा. $ बागी बळ.

---

१ पारध्याच्या गाण्यास. २ मत्स्यानें. ३ प्रकाशानें. ४ मूर्ख. ५ खाई. ६ रजोगुणसुखानें. ७ तन मन धन अर्पण करणें. ८मैत्री. ९मातीच्या चित्राला स्नान, भिंतीवर काढलेल्या चित्रांस अंघोळ. १० सुळाच्या.११ अनुकूलता. १२ घांसलें जातें. १३ यमाला. १४ भुलीनें, कपटानें. १५ पुष्ट होई. १६ डोंगराच्या कड्यावर. १७आडरानांतल्या ओहळास.१८रेड्याचें. १९वेड. २०नाश पावूं. २१मानेला. २२ पांढरेपण, शौक्ल्य. २३ विस्तार. २४ गळतें घर. २५ उद्यांचें. २६ अशक्त. २७ वेडावूं.

फुंजें[1]। परि न ह्मणे पाहें[2] माझें। *ऐसेंचि होईल ॥ ६१ ॥ आणि आंगीं वृद्धतेची[3]। संज्ञा[4] ये मरणाची। परि जया तारुण्याची। भुली न फिटे ॥ ६२ ॥ तो अज्ञानाचें घर। हें साचचि घे उत्तर। तेवींचि परियेसीं थोर। चिन्हें आणिक ॥ ६३ ॥ तरि वाघाचिये अंडवे[5]। एकवेळ आला चरोनि[6] दैवें। तेणें विश्वासें पुढती धांवे। वेसू[7] जैसा ॥ ६४ ॥ कां सर्पधरा[8]आंत। अवचटें ठेवा आणिला स्वस्थ। येतुलियासाठीं निश्चित। नास्तिक होय ॥ ६५ ॥ तैसेंचि अचवटें हें। एकदोनी वेळांचि लाहे। एथ †उरग[9] एक[10] आहे। हें मानीना जो ॥ ६६ ॥ वैरिया निद आली। आतां द्वंद्वें माझीं सरलीं। हें मानी तो संपिलीं। मुकला जेवीं ॥ ६७ ॥ तैसी आहारनिद्रेची उजरी[11]। रोग निवांत जोंवरी। तंव जो न करी। व्याधींची चिंता ॥ ६८ ॥ ['दुःखादर्शनं'] आणि स्त्रीपुत्रादिमेळें। संपत्ती जंव जंव फळे। तेणें रजें[12] डोळे। जाती जयाचे ॥ ६९ ॥ सवळेंचि[13] वियोग पडेल। विळौनि[14] विपत्ति येईल। हें दुःख पुढील। देखेना जो ॥ ७७० ॥ तो अज्ञान गा पांडवा। ['दोषादर्शनं'] आणि तोही तोचि जाणावा। जो इंद्रियें अंहासवा[15]। चारी एथ ॥ ७१ ॥ वयसेचेनि[16] उवायें[17]। संपत्तीचेनि[18] सावायें[19]। सेव्यासेव्य जाये। सरकटित[20] ॥७२॥ न करावें तें करी। असंभाव्य मनीं धरी। चिंतूं नये तें विचारी। जयाची मती ॥ ७३ ॥ रिघे जेथ न रिघावें। मागे जें न घ्यावें। स्पर्शें जेथ न लगावें[21]। आंग मन ॥ ७४ ॥ न जावें तेथ जाये। न पाहावें तें जो पाहे। न खावें तें खाये। तेवींचि तोषे ॥ ७५ ॥ न धरावा तो संग। न लगावें तेथ लाग। नाचरावा तो मार्ग। आचरे जो ॥ ७६ ॥ नायकावें तें आइके। न बोलावें तें बोके[22]। परि दोष होतील हें न देखे। प्रवर्तता ॥ ७७ ॥ आंगा मनासि ‡रुचावें। येतुलेनि कृत्याकृत्य नाठवे। जो करणेंयाचेनि नांवें। भलतेंचि करी ॥ ७८ ॥ परि पाप मज होईल। कां नरकयातना येईल। हें कांहींचि पुढील। देखेना जो ॥ ७९ ॥ तयाचेनि आंगलगें[23]। जगीं अज्ञान दोंदुगें[24]। जें सज्ञानाहीसंगें। झोंबों सके ॥ ७८० ॥ परि असो हें आइक। अज्ञानचिन्हें आणिक। जेणें तुज सम्यक। जाणवेल ॥ ८१ ॥ ['आसक्तिः'] तरि जयाची प्रीति पुरी। गुंतली देखसी घरीं। नवगंधकेसरीं। भ्रमरी जैसी ॥८२॥ साकरेचिया राशी। बैसली §नुठे माशी। तैसेनि स्त्रीचित्त आवेशी। जयाचें मन ॥ ८३ ॥ ठेलां[25] बेडूक कुंडीं। मशक गुंतला शेंबुडीं। जैसा ढोर सेंबुडबुडीं[26]। रुतला पंकीं ॥ ८४ ॥ तैसें घरींहूनि निघणें। नाहीं ¶जीवें मनें प्राणें। जया साप होऊनि

* हेंचि भवे. † रोग. ‡ रुचियावें. § नुडे. ¶ जीवितें मरणें.

१ फुगाऱ्यानें. २ उद्यां. ३ वृद्धत्व हेंच मरणाची खूण. ४ रानांत. ५ पोळ. ६ विळांतून. ७ सर्प. ८ भांडणें. ९ समूळ. १० उत्कर्ष. ११ धुळीनें. १२ तात्काळ. १३ वेळानें. १४ पाहिजेतशीं. १५ तारुण्याच्या. १६ उत्कर्षानें, सुखांत. १७ साह्यानें, सहवासानें. १८ सरसकट मानी. १९ स्पर्शूं नये. २० बडबडे. २१ समागमानें. २२ दांडगें. २३ राहिला. २४ समूळ.

असणें । भाटीं तिये ॥ ८५ ॥ प्रियोत्तमाचिया कंठीं । प्रेमदा घे आठी । तैसी जीवेंसी कोंपटी । धरूनि ठाके ॥ ८६ ॥ मधुरसोद्देशें । मधुकर जैचे जैसें । गृहसंगोपन तैसें । करी जो गा ॥ ८७ ॥ ह्मातारपणीं जालें । रॅल एक विर्‍हाइलें । तयाचें कां जेतुलें । मातापितरां ॥ ८८ ॥ तेतुलेनि पाडें पार्था । घरीं जया प्रेमआस्था । [अभिष्वंगः पुत्रादिष्वहमेवेतिबुद्धिः] आणि स्त्रीवांचूनि सर्वथा । जाणेना जो ॥ ८९ ॥ तैसा स्त्रीदेहीं जो जीवें । पडोनियां सर्वभावें । कोण मी काय करावें । कांहीं नेणे ॥ ७९० ॥ महापुरुषाचें चित्त । जालिया वस्तुगत । ठाके व्यवहारजात । जयापरी ॥ ९१ ॥ हानि लज्जा न देखे । परापवाद नाइके । जयाचीं इंद्रियें एकेमुखें । स्त्रिया केलीं ॥ ९२ ॥ चित्त आराधी स्त्रियेचें । आणि तियेचेचि *छंदें नाचे । माकड गारुडियाचें । जैसें होय ॥ ९३ ॥ आपणपेंही शिणवी । इष्टमित्र †दुखवी । मग कवडाचि वाढवी । लोभी जैसा ॥ ९४ ॥ तैसा दानपुण्यें खांची । गोत्रकुटुंबा वंची । परि ‡बाइणी स्त्रियेची । उणी हों नेदी ॥ ९५ ॥ पूजितीं दैवतें जोगवी । गुरूतें बोलें झकवी । माय बापा दावी । निदारपण ॥ ९६ ॥ स्त्रियेच्या तरी विखीं । भोगसंपत्ति अनेकीं । आणी वस्तु निकी । जे जे देखे ॥ ९७ ॥ प्रेमाथिलेनि भक्तें । जैसेनि भजिजे कुळदैवतें । तैसा एकाग्रचित्तें । स्त्री जो उपासी ॥ ९८ ॥ साच आणि चोख । तें स्त्रियेसीचि अशेख । येरींविषयीं जोगावणूक । तेही नाहीं ॥ ९९ ॥ इयेतें हन कोणी देखेल । इयेसी वेखासें जाईल । तरि युगचि बुडेल । ऐसें जया ॥ ८०० ॥ नायटया भेण । न मोडिजे नागांची आण । तैसी पाळी उणखुण । स्त्रियेची जो ॥ १ ॥ किंबहुना धनंजया । स्त्रीचि सर्वस्व जया । आणि तियेचिया जोलियां- । लागीं प्रेम ॥ २ ॥ आणीकही जें समस्त । तियेचें संपत्तिजात । तें जीवाहूनि आप्त । मानी जो कां ॥ ३ ॥ तो अज्ञानासी मूळ । अज्ञाना तेणें बळ । हें असो केवळ । तो तेंचि रूप ॥ ४ ॥ [इष्टानिष्टोपपत्तिषु असमचित्तत्वं] आणि मातलिया सागरीं । §मोकळिलिया तरी । लाटांच्या येरझारीं । आंदोळे जेवीं ॥ ५ ॥ तेविं प्रियवस्तु पावे । आणि सुखें जो उंचावे । तैसाचि अप्रियासवें । तळवट घे ॥ ६ ॥ ऐसेनि जयाचे चित्तीं । ¶वैषम्याची वोळखती । वाहे तो महामती । अज्ञान गा ॥ ७ ॥ [अन्ययोगेन मयि व्यभिचारिणी भक्तिः सनिमित्ता] आणि माझ्याठायीं भक्ती । फळालागीं जया आर्ती ।

* संदें. † दुःहावी. ‡ गारभरी. § मोकळिल्या, मोकळिलें तरी त्या भीतरी. ¶ वैषम्यसाम्याची वाखती.

१ ऊषर, ओसाड जमिनींत. २ स्त्री. ३ मिठी. ४ खोंपट. ५ जाच सोशी. ६ घराचें संरक्षण. ७ मूल. ८ एकुलतें, वाणीतिणीचें. ९ सिद्धांचें. १० ब्रह्मगत. ११ निंदा. १२ एकाकार. १३ धनच. १४ कमी करी. १५ वायदे. १६ झोका देतो. १७ दरिद्रता. १८ आणतो. १९ चांगली. २० प्रेमळ. २१ कसा तरी निर्वाह. २२ विरुद्ध. २३ नायटा होईल त्या भयानें. २४ मनोगत. २५ पुत्रादिकांवर. २६ खवळलेल्या. २७ लघुत्व. २८ चिंता.

धनोदेशें विरक्ती । नटणें जेवीं ॥ ८ ॥ ['व्यभिचारिणी'] ना तरी कांताच्या मानसीं । रिगोनि स्वैरिणी[1] जैसी । राहाटे जारेसीं । जावयालागीं ॥ ९ ॥ तैसा मातें किरीटी । भजती गा पाउटी[2] । करूनि जो दिठी । विषो सूये[3] ॥ ८१० ॥ ['व्यवहिता'] आणि भजिनलियासवें । तोचि विषय जरी न पावे । तरी सांडी ह्मणे आघवें । टवाळ हें ॥ ११ ॥ कुणबट कुळवाडी । तैसा आन आन देव मांडी । आदिलाची पैरवडी[4] । करी तया ॥१२॥ तया गुरुमार्गा टेंके । जयाचा सुगरवा[5] देखे । तरि तयाचा मंत्र शिके । येर नेघे ॥ १३ ॥ प्राणिजातेंसी निष्ठुर[6] । स्थावरीं बहु भर । तेवींची नाहीं एकसर[7] । निर्वाह जया ॥ १४ ॥ माझी मूर्ती निफजवी । ते घराचे कोनीं बैसवी । आपण देवो देवी । यात्रे जाय ॥ १५ ॥ नित्य आराधन माझें । कांजीं[8] कुळदेवता भजे । पर्वविशेषें कीजे । पूजा आना[9] ॥ १६ ॥ माझें अधिष्ठान घरीं । आणि *वोवसे[10] आनाचे करी । पितृकार्यावसरीं[11] । पितरांचा होय ॥ १७ ॥ एकादशीच्या दिवसीं । जेतुला पाड आह्मासीं । तेतुलाचि नागांसी । पंचमीच्या दिवशीं ॥१८ ॥ चौथे[12] मोटकी पाहे । आणि गणेशाचाचि होये । †चवदसी[13] ह्मणे माये । तुझाचि वो दुगें ॥ १९ ॥ नित्य नैमित्तिकें कर्में सांडी । मग बैसे नवचंडी[14] । आदित्यवारीं वाढी । बहिरवां पात्रीं ॥ ८२० ॥ पाठीं सोमवार पावे । आणि बेलेंसीं लिंगा धांवे । ऐसा एकलाचि आघवे । जोगावी[15] जो ॥ २१ ॥ ऐसा अखंड भजन करी । उगा नोहे क्षणभरी । अवघेन[16] गांवद्वारीं । अहेव[17] जैसी ॥ २२ ॥ ऐसेनि जो भक्त । देखसी सैरा[18] धांवत । जाण अज्ञानाचा मूर्त । अवतार तो ॥ २३ ॥ ['अविविक्तदेशसेवित्वं'] आणि एकांतें चोखटें । तपोवनें तीर्थें तटें । देखोनि जो गा विटे । तोही तोचि ॥ २४ ॥ ['जनसंसदि रतिः'] जया जनपदीं[19] सुख । गजबजेचें कवतिक । वानूं आवडे लौकिक । तोही तोचि ॥ २५ ॥ ['अध्यात्मज्ञाननित्यत्वाभावः'] आणि आत्मा गोचर होये । ऐसी जे विद्या आहे । ते आइकोनी डोरे[20] ‡वाहे । §विद्वांसू जो ॥ २६ ॥ उपनिषदांकडे न वचे । योगशास्त्र न रुचे । अध्यात्मज्ञानीं जयाचें । मनचि नाहीं ॥ २७ ॥ आत्मचर्चा[21] एकी आथी । ऐसिये बुद्धीची भिंती । पाडूनि जयाची मती । वोढाळ जाहाली ॥ २८ ॥ कर्मकांड तरी जाणे । मुखोद्गत पुराणें । ज्योतिषीं तो ह्मणे । तैसेंचि होय ॥ २९ ॥ शिल्पीं[22] अति निपुण । सूपकर्मीही[23] प्रवीण । विधि आं-

---

* वौसे. † चावदसी. ‡ वाये. § विद्वांस.

१ व्यभिचारिणी. २ कामनायुक्त पाऊल. ३ घाली. ४ प्रकार. ५ सुगरपण. ६ एकनिष्ठपणा. ७ कार्यासाठीं. ८ दुसऱ्याच्या. ९ सत्ता. १० नवस. ११ श्राद्धकाळीं. १२ चतुर्थी. १३ चतुर्दशीच्या दिवशीं. १४ नवरात्र, चंडीपाठादि. १५ सेवी. १६ सर्वप्रकारें. १७ अखंडसौभाग्यवती, वेश्या. १८ स्वेच्छा. १९ वस्तींत, देशांत. २० गोंधळ्याचें वाजविण्याचें वाद्य. तद्वत् बडबड करतो, उपहासितो. २१ आत्मानात्मनिरूपण. २२ कलाकौशल्यांत. २३ पाककर्मांत. २४ अथर्वणवेदप्रतिपादक.

थर्वण । हातीं आथी ॥ ८३० ॥ कोंकीं[1] नाहीं ठेलें । भारत क्षीर[2] म्हणितलें । आगम[3] आपाविले । मूर्त होती ॥ ३१ ॥ नीतिजात[4] सुझे । वैद्यकही बुझे । काव्यनाटकीं दुजें । चतुर नाहीं ॥ ३२ ॥ स्मृतींची चर्चा । दर्श[5] जाणे गारुडींचा । *निघंटे[6] प्रज्ञेचा । पाइकी करी ॥ ३३ ॥ पैं व्याकरणीं चोखडा । तर्कीं अतिगाढा । परि एक आत्मज्ञानीं कुंडा[7] । जात्यंध जो ॥ ३४ ॥ तें एकवांचूनि आघवां शास्त्रीं । सिद्धांत निर्माणधात्री[8] । परि जळो तें मूळनक्षत्री[9] । न पाहें गा ॥ ३५ ॥ मोरा आंगीं अशेषें । पिसें असती डोळसें[10] । परि एकली दृष्टी नसे । तैसें तें गा ॥ ३६ ॥ जरी परमाणुएवढें । संजीवनीमूळ[11] जोडे । तरि बहु काय गाडे । भरणें येरें ॥ ३७ ॥ आयुष्यावीण लक्षणें । सिसेंवीण[12] अळंकरणें । वोहरेंवीण[13] बांधांवणें[14] । तो विटुंबु गा ॥ ३८ ॥ तैसें शास्त्रजात जाण । आघवेंचि अप्रमाण । पार्था अध्यात्मज्ञानेंविण । एकलेनी ॥ ३९ ॥ यालागीं अर्जुना पाहीं । अध्यात्मज्ञानाच्याठायीं । जया नित्यबोध नाहीं । शास्त्रमूढा ॥ ८४० ॥ तया शरीर जें जालें । तें अज्ञानाचें बीं वीरूढलें । तयाचें व्युत्पन्नत्व गेलें । अज्ञानवेलीं[15] ॥ ४१ ॥ तो जें जें बोले । तें अज्ञानचि फुललें । तयाचें पुण्य जें फळलें । तें अज्ञान गा ॥ ४२ ॥ ['तत्त्वज्ञानार्थदर्शनं'] आणि अध्यात्मज्ञान कांहीं । जेणें मानिलेंचि नाहीं । तो ज्ञानार्थ न देखे काई । हें बोलावें असे ॥ ४३ ॥ ऐलीचि थडी न पवतां[16] । पळे जो माघौता[17] । तया पैलद्वीपींची[18] वार्ता । काय होय ॥४४॥ कां दोरवंठाचि[19] जयाचें । शीर रोंविलें खांचे[20] । तो केविं परिवरींचें[21] । ठेविलें देखे ॥ ४५ ॥ तेविं अध्यात्मज्ञानी जया । अनोळख धनंजया । तया ज्ञानार्थ देखावया । विषो काई[22] ॥ ४६ ॥ म्हणोनि आतां विशेषें । तो ज्ञानाचें तत्व न देखे । हें सांगावें आंखेंलेखें[23] । न लगे तुज ॥ ४७ ॥ जेव्हां सगर्भे वाढिलें । तेव्हांचि पोटिचें धालें । तैसें मागिले पदें बोलिलें । तेंचि होय ॥ ४८ ॥ वांचूनियां वेगळें । रूपकरणें हें न मिळे । जेविं अवंतिलें[24] आंधळें । तें दुजेनसीं[25] ये ॥ ४९ ॥ एवं इयें[26] उपरतीं । ज्ञानचिन्हें मागुती । अमानित्वादिं प्रभृती । वाखाणिलीं ॥ ८५० ॥ जे ज्ञानपदें अठरा । केलियां येरी[27] मोहरां । अज्ञान या आकारा । सहजें येती ॥ ५१ ॥ मागां श्लोकाचेनि अर्धार्धें । ऐसें सांगीतलें श्रीमुकुंदें । ना उफराटीं इयें ज्ञानपदें । तेंचि अज्ञान ॥ ५२ ॥ म्हणोनि इयें[28] वाहणी । केली म्यां उपलवणी[29] । वांचूनि

* निघंटु.

१ कामशास्त्रांत. २ आपलेसे केले. ३ समजे. ४ मर्म. ५ कोश. ६ खरा. ७ पृथ्वीतुल्य आधारभूत. ८ मूळनक्षत्रीं जन्मल्याप्रमाणें. ९ नेत्राकार चिन्हयुक्त. १० मृतसंजीवनीची मुळी. ११ मस्तकावांचून. १२ वधूवरांशिवाय. १३ वाजंत्रें वाजविणें. १४ अज्ञानरूप वेलीवर. १५ परतीराची. १६ उंबऱ्यांतच. १७ दडपलें. १८ आवारांतलें, घरींचें. १९ गम्य. २० फार विस्तारें. २१ आमंत्रणानें बोलाविलें. २२ या उलटरीत्या. २३ दुसऱ्या पक्षाकडे. २४ अशा प्रकारें. २५ विस्तार.

दुधा मेळऊनि पाणी । फार कीजे काई ॥ ५३ ॥ तैसें जी न बडबडीं । पदाची कोर[1] न सांडीं । मूळध्वनींचिये वाढी । निमित्त जाहालों ॥ ५४ ॥ तंव श्रोते ह्मणती राहें । कें परिहारा[2] ठाव आहे । बिहिसी[3] कां वायें । कविपोषका ॥ ५५ ॥ तूतें श्रीमुरारी । ह्मणितलें प्रकट करीं । जे अभिप्राय गव्हरीं[4] । झांकिले आह्मी ॥ ५६ ॥ तें देवाचें मनोगत । दावित आहासी तूं मूर्त । हेंही ह्मणतां चित्त । दाटेल[5] तुझें ॥ ५७ ॥ ह्मणोनि असो हें न बोलों । परि सांविया[6] गा तोषलों । जे ज्ञानतरिये मेळविलों । श्रवणसुखाचे ॥ ५८ ॥ आतां इयावरी । जे तो श्रीहरी । बोलिला तें करीं । कथन वेगां ॥ ५९ ॥ इया संतवाक्यासरिसें । ह्मणितलें निवृत्तिदासें । जी अवाधारा तरी ऐसें । बोलिलें देवें ॥ ८६० ॥ ह्मणती तुवां पांडवा । हा चिन्हसमुच्चय आघवा । आयिकिला तो जाणावा । अज्ञानभाग ॥ ६१ ॥ इया अज्ञानभागा । पाठी देऊनि पैं गा । ज्ञानविखीं चांगा । दृढा होइजे ॥ ६२ ॥ मग निर्वाळिलेनि ज्ञानें । ज्ञेय[7] भेटेल मनें । तें जाणावया अर्जुनें । आस केली ॥ ६३ ॥ तंव सर्वज्ञांचा रावो । ह्मणे जाणोनि तयाचा भावो । परिसें ज्ञेयाचा अभिप्रावो । सांगों आतां ॥ ६४ ॥

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।
अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १२ ॥

[ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि] तरि ज्ञेय ऐसें ह्मणणें । वस्तु तें येणेंचि कारणें । जें ज्ञानेंवांचूनि कवणें । उपाया नये ॥ ६५ ॥ [यज्ज्ञात्वामृतमश्नुते] आणि जाणितलेंयांवरौतें । कांहीं करणें नाहीं जेथें । जाणणेंचि तन्मयातें[11] । आणी जयाचें ॥ ६६ ॥ जें जाणितलेयासाठीं[12] । संसार काढूनियां[13] कांटीं[14] । जिरोनि जाइजे पोटीं । नित्यानंदाच्या ॥ ६७ ॥ [अनादिमत्] तें ज्ञेय गा ऐसें । आदि जया नसे । [परं ब्रह्म] परब्रह्म आपैसें । नाम जया ॥ ६८ ॥ [न सत्तन्नासदुच्यते] जें नाहीं ह्मणों जाइजे । तंव विश्वाकारें देखिजे । आणि विश्वचि ऐसें ह्मणिजे । तरि हे माया ॥ ६९ ॥ रूप वर्ण व्यक्ति । नाहीं दृश्य द्रष्टा स्थिती । तरि कोण कैसें आथी । ह्मणावें पां ॥ ८७० ॥ आणि साचचि जरी नाहीं । तरि महदादि कोणेठाईं । स्फुरत[15] कैंचें काई । तेणेंवीण असे ॥ ७१ ॥ ह्मणोनि आथी नाथी हे बोली । जें देखोनि मुकी जाहाली । *विचाराची मोडली ।

---

* विचारासि.

---

१ कडा, कांठ. २ निरास करण्याला. ३ व्यर्थ भितोस. ४ गुप्तस्थळीं. ५ भरून येईल. ६ सर्वथा. ७ ऐकण्यास सुखकारक अशी ज्ञाननौका आम्हांस प्राप्त झाली. ८ समुदाय. ९ शुद्ध. १० जाणण्यास योग्य वस्तु. ११ तदाकारतेस. १२ जाणलें असतां. १३ कांठास, किंवा संसाराला कांटीं लावून, विरजण घालून. १४ भासमान.

वाट जेथें ॥ ७२ ॥ जैसी भांडघटशरावीं । तदाकार असे पृथ्वी । तैसें सर्व होऊनियां सर्वीं । असें जे वस्तु ॥ ७३ ॥

सर्वतःपाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १३ ॥

[सर्वतःपाणिपादं तत्] आघवांचि देशीं काळीं । नव्हतां देशकालांवेगळी । जे क्रिया स्थूळास्थूळीं । तेचि हात जयाचे ॥ ७४ ॥ तयातें याकारणें । विश्वबाहु ऐसें ह्मणणें । जे सर्वचि सर्वपणें । सर्वदा करी ॥ ७५ ॥ आणि समस्तांही ठायां । एकेकाळीं धनंजया । आलें असे ह्मणोनि जया । विश्वांघ्रि नाम ॥ ७६ ॥ [सर्वतोक्षिशिरोमुखं] पैं सवितया आंग डोळे । नाहींत वेगळे वेगळे । तैसें सर्वद्रष्टें सकळें । स्वरूपें जें ॥ ७७ ॥ ह्मणोनि विश्वतश्चक्षु । हा अचक्षूच्याठायीं पक्षु । बोलावया दक्षु । जाहाला वेद ॥ ७८ ॥ जें सर्वांचे *शिरावरी । †जें नित्य नांदे सर्वांपरी । ऐसिये स्थितीवरी । विश्वमूर्धा ह्मणिपे ॥ ७९ ॥ पैंगा मूर्ति तेंचि मुख । हुताशना जैसें देख । तैसें ‡सर्वपणें अशेख । भोक्तें जें ॥ ८८० ॥ यालागीं तया पार्था । विश्वतोमुख हे व्यवस्था । आली वाक्पथा । श्रुतीचिया ॥ ८१ ॥ [सर्वतःश्रुतिमल्लोके] आणि वस्तुमात्रीं गगन । जैसें असे संलग्न । तैसे शब्दजातीं कान । सर्वत्र जया ॥ ८२ ॥ [सर्वमावृत्य तिष्ठति] §ह्मणोनि आह्मी तयातें । ह्मणों सर्वत्र. ओइकतें । एवं जें सर्वांतें । आवरूनि असे ॥ ८३ ॥ येऱ्हवीं तरी महामती । विश्वतश्चक्षु इया श्रुती । तयाचिये व्याप्ति । रूप केलें ॥ ८४ ॥ वांचूनि हस्त नेत्र पाये । हे भाष तेथ कें आहे । सर्व शून्यत्वाचा ¶साहे । निष्कर्ष जें ॥ ८५ ॥ पैं कल्लोळातें कल्लोळें । ग्रसिजत असे ऐसें कळे । परि ग्रसितें ग्रासावेगळें । असे काई ॥८६॥ तैसें साचचि जें एक । तेथ कें व्याप्यव्यापक । परि बोलावया नाहीवेक । करावें लागे ॥ ८७ ॥ पैं शून्य जैं दावावें जाहालें । तैं बिंदुलें एक केलें । तैसें अद्वैत सांगावें बोलें । तैं द्वैत कीजे ॥ ८८ ॥ येऱ्हवीं तरी पार्था । गुरुशिष्यसत्पथा । आडळ पडे सर्वथा । बोल खुंटे ॥ ८९ ॥ ह्मणोनि गा श्रुती । द्वैतभावें अद्वैतीं । निरूपणाची वाहती । वाट केली ॥ ८९० ॥ तेंचि आतां अवधारीं । इये नेत्रगोचरें आकारीं । तें ज्ञेय गा जयापरी । व्यापक असे ॥ ९१ ॥

---

* शरीरावरी. † नित्यानंदें सर्वांच्यापरी. ‡ सर्वपणीं अशेष. § यालागीं. ¶ न साहे.

---

१ डेरा, घागर, परळ इत्यादिकांत. २ सदासर्वकाळ आणि सर्वत्र. ३ न होतां. ४ ज्याचे पाय सर्वत्र आहेत. ५ सूर्याला. ६ सर्वत्र डोळे असणारा. ७ शहाणा. ८ सर्वप्रकारें. ९ अग्नीला. १० सर्वत्र तोंडें आहेत असा. ११ बोलण्यांत. १२ ओतप्रोत भरलेलें. १३ ऐकणारें. १४ सिद्धांत. १५ तरंगाला. १६ क्षणभर, उगाच. १७ वर्तुळ. १८ गुरुशिष्यसंप्रदायांत. १९ आडखीळ.

सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् ।
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १४ ॥

[सर्वेंद्रियगुणाभासं] तरि तें गा किरीटी ऐसें । अवकाशीं आकाश जैसें । पटीं पट होऊनि असे । तंतु जेवीं ॥ ९२ ॥ उदक होऊनि उदकीं । रस जैसा अवलोकीं । दीपपणें दीपकीं । तेज जैसें ॥ ९३ ॥ कर्पूरत्वें कापुरीं । सौरभ्य[1] असे जयापरी । शरीर होऊनि शरीरीं । कर्म[2] जेवीं ॥ ९४ ॥ किंबहुना जैसें पांडवा । सोनेचि सोनयाचा रवा । तैसें जें या सर्वां । सर्वांगीं असे ॥ ९५ ॥ परि असे रूपेपणामाजिवडें । तंव रवा ऐसें आवडे[3] । वांचूनि सोनें सांगडें[4] । सोनया जेवीं ॥ ९६ ॥ पैं गा वोघचि वांकुडा[5] । परि पाणी उजू सुहाडा[6] । वन्हि आला लोखंडा । लोह नव्हे कीं ॥ ९७ ॥ घटाकारें वेंटाळे । तेथ नभ गमे वाटोळें । मठीं तरी चौफेळें[7] । आर्यें दिसे ॥ ९८ ॥ [सर्वेंद्रियविवर्जितं] परि ते अवकाश जैसे । नोहिजतीचि आकाशें । जें विकार होऊनि तैसें । विकारी नोहे ॥ ९९ ॥ मनमुख्य इंद्रियां । सत्वादिगुणां यया । सारिखें ऐसें धनंजया आवडे कीर ॥ १०० ॥ पैं गुळाची गोडी । नोहे बांधेया सांगडीं । तैसीं गुण इंद्रियें फुडीं । नाहीं तेथ ॥ १ ॥ अगा क्षीराचिये दशे । घृत क्षीराकारें असे । परि क्षीरचि नोहे जैसें । कपिध्वज्ञा ॥ २ ॥ तैसें जें इये विकारीं । विकार नोहे अवधारीं । पैं आकारा नाम भोंवरी[8] । येर सोनें तें सोनें ॥ ३ ॥ इया उघड मन्हाटिया । तें वेगळेपण धनंजया । जाण गुणइंद्रियां । पासोनियां ॥ ४ ॥ नामरूपसंबंध । जातिक्रियाभेद । हा आकारासीच प्रवाद[9] । वस्तूसि नाहीं ॥ ५ ॥ [असक्तं सर्वभृच्चैव] तें गुण नव्हे कहीं । गुणा तया संबंध नाहीं । परि तयाच्याचिठाईं[10] । आभासती[11] ॥ ६ ॥ येतुलेयासाठीं । संभ्रांताच्या पोटीं[12] । *ऐसें जाय किरीटी । जे हेंचि धरी ॥ ७ ॥ तरि तें गा धरणें ऐसें । अभ्रातें जेविं आकाशें । कां प्रतिवेदन[13] जैसें । आरसेनी[14] ॥ ८ ॥ ना तरी सूर्य प्रतिमंडळ । †जैसेनि धरी सलिल । कां रश्मिकरीं[15] मृगजळ । धरिजे जेवीं[16] ॥ ९ ॥ तैसें गा संबंधेंविण । यया सर्वांतें धरी निर्गुण । परि[17] तें वायां जाण । मिथ्यादृष्टी[18] ॥ ९१० ॥ [निर्गुणं गुणभोक्तृ च] आणि यापरी निर्गुणें । गुणातें भोगणें । रंका राज्य करणें । स्वप्नीं जैसें ॥ ११ ॥ ह्मणोनि गुणाचा संग । अथवा गुणभोग । हा निर्गुणीं लाग । बोलों नये ॥ १२ ॥

---

* ऐसें गमे जया. † जैसें.

---

१ सुगंध. २ क्रिया. ३ तुकड्यामध्यें. ४ वाटे. ५ समागमें. ६ हे सुहृदा. ७ चतुष्कोणाकार. ८ नाश पावती. ९ ढेपीएवढी. १० बुगडी, बाजुबंद. ११ लौकिकसंज्ञा. १२ भासमान होतात. १३ अज्ञानाच्या. १४ मुखाचें प्रतिबिंब. १५ सूर्यकिरणांमुळें. १६ परंतु व्यर्थ आहे असें समज. १७ भ्रामकदृष्टीमुळें.

बहिरंतश्च भूतानामचरं चरमेव च ।
सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चांतिके च तत् ॥ १५ ॥

[भूतानामचरं चरमेव च] जें चराचरभूतां- । माजि असे पांडुसुता । नाना वन्हीं उष्णता । अभेदें जैसी ॥ १३ ॥ [सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं] तैसेनि अविनाशभावें । जैं सूक्ष्मदशे आघवें । व्यापूनि असे तें जाणावें । ज्ञेय एथ ॥ १४ ॥ [बहिरंतश्च] जें एक आंत बाहेरी । [दूरस्थं चांतिके च तत्] जें एक जवळ दूरी । जें एकवांचूनि परी । दुजी नाहीं ॥ १५ ॥ क्षीरसागरींची गोडी । माजि बहू थडिये थोडी । हें नाहीं *[3]तया परवडी । पूर्ण जें गा ॥ १६ ॥ स्वेदज[2]प्रभृती । वेगळाल्या भूतीं । जयाचिये [3]अनुस्यूती । खोंमणें नाहीं ॥ १७ ॥ पैं †श्रोतेमुख्यटिळका । घटसहस्रा अनेका- । माजि बिंबोनि चंद्रिका । न भेदे जेवीं ॥ १८ ॥ नाना लवणकणाचिये राशी । क्षारता एक जैसी । कां कोडी एकीं उसीं । एकचि गोडी ॥ १९ ॥

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।
भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥ १६ ॥

[अविभक्तं च भूतेषु] तैसें अनेकीं भूतजातीं । जें आहे एकी व्याप्ती । विश्वकार्या सुमती । कारण जें गा ॥ ९२० ॥ [विभक्तमिव च स्थितं] ह्मणोनि हा भूताकार । जेथूनि तेंचि तया आधार । कल्लोळ सागर । जियापरी ॥ २१ ॥ बाल्यादि तीन्हीं वयसीं । काया एकचि जैसी । तैसें [8]आदिस्थितिग्रासी । अखंड जें ॥ २२ ॥ सायंप्रातर्मध्यान्ह । होतां जातां दिनमान । जैसें कां गगन । पालटेना ॥ २३ ॥ [प्रभविष्णु च] अगा सृष्टीवेळे प्रियोत्तमा । जया नाम ह्मणती ब्रह्मा । [भूतभर्तृ च] ‡स्थिती जें विष्णुनामा । पात्र जाहालें ॥ २४ ॥ [ग्रसिष्णु] मग आकार हा हारपे । तेव्हां रुद्र जें ह्मणिपे । [तत्] तेंही गुणत्रय जेव्हां लोपे । तैं जें शून्य ॥ २५ ॥ नभाचें शून्यत्व गिळून । गुणत्रयातें नुरउन । तें शून्य तें [9]महाशून्य । श्रुतिवचनसंमत ॥ २६ ॥

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ।
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् ॥ १७ ॥

[ज्योतिषामपि तज्ज्योतिः] जें अग्नीचें दीपन[10] । जें चंद्राचें जीवन । सूर्याचे नयन । देखती जेणें ॥ २७ ॥ जयाचे §उजियेडें । तारागण उघडें । महातेज [11]सुरवाडें । ¶राहाटे जेणें ॥ २८ ॥ [तमसः परमुच्यते] आदीची जें आदी । वृ-

* तयापरी. † श्रोतृमुखटिळका. ‡ व्याप्ति जे. § उजिवडें. ¶ जेंणे राहाटे.

१ ल्या रीतीनें. २ स्वेदापासून उत्पन्न झालेले जीव. ३ व्याप्तीस. ४ अडथळा, न्यूनत्व. ५ कोट्यवधि उसांत. ६ हेतु. ७ भूताकाराला. ८ उत्पत्तिस्थितिसंहारीं. ९ ब्रह्म. १० प्रकाशक. ११ सुखानें.

द्धीची जें वृद्धी । बुद्धीची जें बुद्धी । जीवाचा जीव ॥ २९ ॥ जें मनाचें मन । जें नेत्राचें नयन । कानाचे कान । वाचेची वाचा ॥ ९३० ॥ जें प्राणाचा प्राण । जें गतीचे चरण । क्रियेचें कर्तेपण । जयाचेनी ॥ ३१ ॥ आकार जेणें आकारे । विस्तार जेणें विस्तारे । संहार जेणें संहारे । पांडुकुमरा ॥ ३२ ॥ जें मेदिनीची मेदिनी । जें पाणी पिऊनि असे पाणी । तेजा दिवेलावणी । जेणें तेजें ॥ ३३ ॥ जें वायूचा श्वासोश्वास । जें गगनाचा अवकाश । हें असो आघवाचि भास । आभासे जेणें ॥ ३४ ॥ [ज्ञेयं] किंबहुना पांडवा । जें आघवेंचि असे आघवा । जेथ नाहीं रिगावा । द्वैतभावासी ॥ ३५ ॥ जें देखिलियाचि सर्वें । दृश्य द्रष्टा हें आघवें । एकवट कालवे । सामारस्यें ॥ ३६ ॥ [ज्ञानं] मग तेंचि होय ज्ञान । *ज्ञाता ज्ञेय हन । [ज्ञानगम्यं] जेणें गमिजे स्थान । तेंहि तेंचि ॥ ३७ ॥ जैसें सरलियां लेखें । आंख होती एक । तैसें साध्यसाधनादिक । ऐक्यासि ये ॥ ३८ ॥ अर्जुना जियेठाईं । न सरे द्वैताची वेही । [हृदि सर्वस्य धिष्ठितं] हें असो जें हृदयीं । सर्वांच्या असे ॥ ३९ ॥

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ।
मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥ १८ ॥

[इति क्षेत्रं तथा ज्ञानं] एवं हें तुजपुढां । आदीं क्षेत्र सुहाडा । दाविलें फाडोवाडां । विवंचुनी ॥ ९४० ॥ तैसेंचि क्षेत्रापाठीं । जैसेनि देखसी दिठी । तैसें ज्ञानही किरीटी । सांगीतलें ॥ ४१ ॥ अज्ञानाही कौतुकें । रूप केलें निकें । जंव आयणी तुझी टेकें । पुरे ह्मणें ॥ ४२ ॥ [ज्ञेयं च] आणि आतां हें रोकडें । उपपत्तीचेनि पवाडें । निरूपिलें उघडें । ज्ञेय पैं गा ॥ ४३ ॥ [उक्तं समासतः] हे आघवीच विवंचना । बुद्धी भरोनि अर्जुना । †मत्सिद्धिभावना । माझिया येती ॥ ४४ ॥ [मद्भक्तः] देहादिपरिग्रहीं । संन्यास करूनियां जिहीं । जीव माझ्याठाईं । वृत्तिकें केला ॥ ४५ ॥ [एतद्विज्ञाय] ते मातें किरीटी । हेंचि जाणोनियां शेवटीं । आपणपयां साटोवाटी । मीचि होती ॥ ४६ ॥ [मद्भावायोपपद्यते] मीचि होती परी । हे मुख्य गा अवधारीं । सोहोपी सर्वोपरी । रचिली आह्मी ॥ ४७ ॥ कडां पायरी कीजे । निराळीं माच बांधिजे । अथावीं सुइजे । तैरी ‡जैसी ॥ ४८ ॥ येऱ्हवीं आघवेंचि आत्मा । हें सांगोनि वीरोत्तमा । परी तुझिया मनोधर्मा । मिळेल ना ॥ ४९ ॥ ह्मणोनि एकचि संचलें । चतुर्धा आह्मीं केलें । §जें आंदळपण देखिलें । तुझिये प्रज्ञे ॥ ९५० ॥ पैं बाळ जैं जेव-

---

* ज्ञानें. † सायुज्यसिद्धिभुवना । माजि येती. ‡ ऐसी. § जें आंधळेपण.

---

१ ब्रह्मरूपांत. २ जाणावें, पावावें. ३ गणना. ४ प्रतिबंध, ५ प्रियमित्रा. ६ स्पष्टपणानें. ७ इच्छा. ८ विश्रांति पावे. ९ विस्तारानें. सर्व संगाच्या ठाईं. १० माझ्या प्राप्तीच्या भावनेनें. ११ मद्भक्ताला. १२ परिवारगणांत. १३ वतनदार. १४ आपल्या मोबदल्याचें, विनियोगानें. १५ होण्याचा प्रकार. १६ खोल पाण्यांत नौका घालावी. १७ अल्पता, अदृढता.

विजे । तैं घांस एक विसां ठायीं कीजे । तैसें एकचि हें चतुर्व्याजें । कथिलें आह्मी ॥ ५१ ॥ एक क्षेत्र एक ज्ञान । एक ज्ञेय एक अज्ञान । भाग केले अवधान । जाणोनि तुझें ॥ ५२ ॥ आणि ऐसेनही पार्था । जरी हा अभिप्रावो तुज हाता । नये तरी हे व्यवस्था । एक वेळ सांगों ॥ ५३ ॥ आतां चौंठायीं न करूं । एकही ह्मणोनि नें सरूं । आत्मानात्मया धरूं । सरिसाचि पाड ॥ ५४ ॥ परि तुवां येतुलें करावें । मागों तें आह्मा देआवें । जे कानाचें नांव ठेवावें । आपणपयातें ॥ ५५ ॥ या श्रीकृष्णाचिया बोला । पार्थ रोमांचित जाहाला । तेथ देव ह्मणती भला । उंचंबळें ना ॥ ५६ ॥ ऐसेनि तो येतां वेग । धरूनि ह्मणे श्रीरंग । प्रकृतिपुरुषविभाग । परिसें सांगों ॥ ५७ ॥ जया मार्गातें जगीं । सांख्य ह्मणती योगी । जयाचिये भेटिवेलागीं । मी कपिल जाहालों ॥ ५८ ॥ तो आईक *निर्दोख । प्रकृतिपुरुषविवेक । ह्मणे आदिपुरुख । अर्जुनातें ॥ ५९ ॥

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥ १९ ॥

[प्रकृतिं पुरुषं चैव] तरी पुरुष अनादि आथी । आणि तैंचिलागोनि प्रकृती । सवें सरिसी दिवोराती । †जयापरी ॥ ९६० ॥ कां रूप नोहे वायां । परी रूपा लागली छाया । निकण वाढे धनंजया । कणेसीं कोंडा ॥ ६१ ॥ [विद्ध्यनादी उभावपि] तैसीं जाण जैंवटें । दोन्हीं इयें एकवटें । प्रकृतिपुरुषें प्रकटें । अनादिसिद्धें ॥ ६२ ॥ पैं क्षेत्र येणें नांवें । जें सांगीतलें आघवें । तेंचि एथ जाणावें । प्रकृति हे गा ॥ ६३ ॥ आणि क्षेत्रज्ञ ऐसें । जयातें ह्मणितलें असे । तो पुरुष हें अनारिसें । नें बोलों घेई ॥ ६४ ॥ इयें आनानें नांवें । परि निरूप्य आन नोहे । हें लक्षण न चुकावें । पुढतपुढती ॥ ६५ ॥ तरी केवळ हे सत्ता । तो पुरुष गा पांडुसुता । प्रकृतीतें समस्तां । क्रिया नाम ॥ ६६ ॥ [विकारांश्च गुणांश्चैव] बुद्धि इंद्रियें अंतःकरण । इत्यादि विकारभरण । आणि ते तीन्ही गुण । सत्वादिक ॥६७॥ [विद्धि प्रकृतिसंभवान्] हा आघवाचि मेळावा । प्रकृती जाहाला जाणावा । हेचि हेतु संभवा । कर्माचिया ॥ ६८ ॥

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥ २० ॥

[कार्यकारणकर्तृत्वे] तेथ इच्छा आणि बुद्धी । घडवी अहंकारेंसीं आधीं । मग

---

* निर्दोष. † दोनी जैसीं.

१ चार प्रकारेंकरून. २ न मानूं. ३ उचंबळेना, हालेना, तटस्थ झाला. ४ वर्णनासाठीं. ५ तेव्हांपासून. ६ कणरहित. ७ जोड गव्हांसारखीं, जुळीं. ८ वेगळें. ९ न बोलतां घेई. १० कारण. ११ कर्माच्या उत्पत्तीस.

तिया लाविती[१] वेधीं । कारणाच्या ॥६९॥ तेंचि कारण ठाकावया । जें सूत्र धरणें उपाया । तया नांव धनंजया । कार्य पैं गा ॥ ९७० ॥ आणि इच्छामदाच्या[२] थावीं । लागली मनातें उठवी । तें इंद्रियें रहाटवी । हें कर्तृत्व पैं गा ॥ ७१ ॥ [हेतुः प्रकृतिरुच्यते] ह्मणोनि तीन्ही या जाणा । कार्य कर्तृत्वकारणा । प्रकृती मूळ हें राणा । सिद्धांचा ह्मणे ॥ ७२ ॥ [पुरुष इति] एवं तिहींचेनि समवायें । प्रकृति कर्मरूप[३] होये । परि जया गुणा वाढे[४] त्रायें । त्यांचि[५] सारिखी ॥ ७३ ॥ जें सत्वगुणें अधिष्ठिजे । तें सत्कर्म ह्मणिजे । रजोगुणें निपजे । मध्यम तें ॥ ७४ ॥ जे कां केवळ तमें । होती जियें कर्में । निषिद्धें[६] *अधर्में । ज्ञाण तियें ॥ ७५ ॥ ऐसेनि संतासंतें । कर्म प्रकृतीस्तव होतें । तयापासोनि निर्वाळतें[७] । सुख दुःख गा ॥ ७६ ॥ असंतीं दुःख उपजे । सत्कर्मीं सुख निफजे । तया दोहींचा बोलिजे । भोग पुरुषा ॥ ७७ ॥ सुखदुःखें जंववरी । निफजती साचोकारीं । तंव प्रकृति उद्यम करी । पुरुष भोगी ॥ ७८ ॥ प्रकृतिपुरुषांची कुळवाडी[८] । सांगतां असंगडी[९] । जे आंबुली[१०] जोडी । आंबुला[११] खाय ॥ ७९ ॥ आंबुलिया आंबुलिये । संगती ना सोये । कीं आंबुलि[१२] जग विये । चोजे ऐका ॥ ९८० ॥

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान् ।
कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥ २१ ॥

[पुरुषः] जे अनंग[१३] तो पेंधा । निकेवडा[१४] नुसधा । जीर्ण अतिवृद्धा- । पासूनि वृद्ध ॥ ८१ ॥ तया आडनांव पुरुष । येरहवीं स्त्री ना नपुंसक । किंबहुना एक । निश्चयो नाहीं ॥ ८२ ॥ तो अचक्षु अश्रवण । अहस्त अचरण । रूप ना वर्ण । नाम आथी ॥ ८३ ॥ [प्रकृतिस्थो हि] अर्जुना कांहींचि †जेथ नाहीं । तो प्रकृतीचा ‡भर्तार पाहीं । कीं भोगणें ऐसयाही । सुखदुःखाचें ॥ ८४ ॥ तो तरी अकर्ता । उदास अभोक्ता । परि इया पतिव्रता । भोगविजे ॥ ८५ ॥ जियेतें अळुमाळ[१५] । रूपागुणाचा चौळढाळ[१६] । ते भलतैसाही खेळ । लेखी[१७] आणी ॥ ८६ ॥ इये प्रकृती तंव । गुणमयी हेंचि नांव । किंबहुना सावेव । गुण तेचि हे ॥ ८७ ॥ हे प्रतिक्षणीं नित्य नवी । रूपा गुणाचीच आघवी । जडातेंही माजवी । इयेचा माज ॥ ८८ ॥ नामें इये प्रसिद्धें । स्नेह इया स्निग्धें । इंद्रियें प्रबुद्धें । इयेचेनी ॥८९॥ कायि मन हें नपुंसक । कीं §तें हिंडवी तिन्ही लोक । ऐसें ऐसें अलौकिक । करणें इयेचें ॥ ९९० ॥ हे भ्रमाचें महाद्वीप । हे

---

* अधर्में. † एथें. ‡ भर्ता पाहीं. § तें भोगवी.

---

१ नादीं. २ उन्मत्ततेच्या आश्रयानें. ३ क्रियारूप. ४ रक्षण, आश्रय. ५ त्या गुणासारखी. ६ अशास्त्रीय. ७ निवडलें जातें. ८ कुणबावा, शेतकी. ९ अघटित. १० स्त्री. ११ पति. १२ नवल. १३ निराकार. १४ दरिद्री, लंगडा. १५ अकिंचन केवळ. १६ किंचित्. १७ हालचाल. १८ गणतीस.

व्याप्तीचें रूप । विकार [1]उमप । इया केले ॥ ९१ ॥ हे कामाची [2]गांडवी । हे मोहवनींची [3]माधवी । इये प्रसिद्धचि [4]दैवी । माया हें नाम ॥ ९२ ॥ हे वाद्ययाची वाढी । हे साकारपणाची जोडी । प्रपंचाची [5]धाडी । अभंग हे ॥ ९३ ॥ कळा येथूनि जालिया । विद्या इयेच्या केलिया । इच्छा ज्ञान क्रिया । वियाली हे ॥ ९४ ॥ हे [6]नादाची टांकसाळ । हे चमत्काराचें वेळाउळ । किंबहुना सकळ । खेळ इयेचा ॥ ९५ ॥ जे उत्पत्ति प्रलय होत । ते इयेचे सांयंप्रात । हें असो अद्भुत । मोहन हे ॥ ९६ ॥ हे अद्वयाचें दुसरें । हे निःसंगाचें सोयरें । *हे [7]निराळेंसि घरें । नांदत असे ॥ ९७ ॥ इयेतें [8]येतुलावरी । सौभाग्यव्याप्ती थोरी । ह्मणोनि तया [9]आवरी । अनावरातें ॥ ९८ ॥ तयाच्या तंव ठायीं । निपटूनि [10]कांहींचि नाहीं । [प्रकृतिजान् गुणान्] कीं तया आघवेंही । आपणचि होय ॥ ९९ ॥ तया स्वयंभाची [11]संभूती । तया अमूर्ताची मूर्ती । आपण होय [12]स्थिती । ठावो तया ॥ १०० ॥ तया [13]अनार्तांची आर्ती । तया पूर्णाची तृप्ती । तया अकुळाची जाती । गोत होय ॥ १ ॥ तया [14]अचर्चाचें चिन्ह । तया अपाराचें [15]मान । तया [16]अमनस्काचें मन । बुद्धी ही होय ॥ २ ॥ तया निराकाराचा आकार । तया निर्व्यापाराचा व्यापार । निरहंकाराचा अहंकार । होऊनि ठाके ॥ ३ ॥ तया अनामाचें नाम । तया अजाचें जन्म । आपण होय कर्म । क्रिया तया ॥ ४ ॥ तया निर्गुणाचे गुण । तया अचरणाचे चरण । तया अश्रवणाचे श्रवण । अचक्षूचे चक्षू ॥ ५ ॥ तया भावातीताचे भाव । तया निरवयवाचे अवयव । किंबहुना होय सर्व । पुरुषाचें हे ॥ ६ ॥ ऐसेनि इया प्रकृती । आपुलिया सर्वव्याप्ती । तया अविकारातें विकृती । माजी कीजे ॥ ७ ॥ तेथ पुरुषत्व जें असे । †तें ये प्रकृति[17]देशे । चंद्रमा अंवसे । ‡हरपला जेवीं ॥ ८ ॥ विदळें [18]बहु चोखा । मीनलिया वाला एका । कस होय §[19]पांचेका । जयापरी ॥ ९ ॥ कां साधूतें गोंधळी । संचरोनि [20]सूये मैळीं । नाना सुदिनाच्या आभाळीं । [21]दुर्दिनें कीजे ॥ १०१० ॥ जेविं पय पशूच्या पोटीं । कां वन्हि जैसा काष्ठीं । गुंडूनि [22]घेतला पटीं । रत्नदीप ॥ ११ ॥ राजा पराधीन जाहाला । कीं सिंह रोगें [23]रुंधेला । तैसा पुरुष प्रकृती आला । स्वतेजा मुके ॥ १२ ॥ जागता नर सहसा । निद्रा पाडूनि जैसा । स्वप्नींचिया [24]सोसां । वश्य कीजे ॥ १३ ॥ [भुंके] तैसें प्रकृति जालेपणें । पुरुषा गुण भो-

* हें निरालंबें न सिरे. † तें इये. ‡ पडला. § पाचिका.

१ उपमारहित. २ मंडपी. ३ वसंत ऋतु. ४ देवाची माया. ५ वेदशास्त्रांची. ६ घाड. ७ नादब्रह्माची. ८ घर. ९ निरालंबास. १० येथवर. ११ आटोपी. १२ अजीवात. १३ उत्पत्ति. १४ रक्षणाचें स्थान, गति. १५ इच्छारहिताची. १६ अनिर्वचनीयाचें. १७ इयत्ता. १८ मनोविकाररहितांचें. १९ प्रकृतिस्थितींत. २० डांक, हीण. २१ हीणकस. २२ दुर्जन साधूच्या मनांत शिरून त्यास पापकर्मांत घालतो. २३ मेघाच्छादित. २४ झांकून, गुंडाळून. २५ व्यापला. २६ सुखदुःख भोगास.

गणें । उदास *अंतुरीगुणें । आतुडे जेवीं ॥ १४ ॥ [कारणं गुणसंगोऽस्य] तैसें अजा निला होये । आंगीं जन्ममृत्यूचे घाये । वाजती जंव लाहे । गुणसंगातें ॥ १५ ॥ परि तें ऐसें पंडुसुता । तांतलें लोह पिटितां । जेवीं वन्हीसीचि घाता । †बोलती तया ॥ १६ ॥ कां आंदोळलिया उदक । प्रतिभा होय अनेक । तें ज्ञानात्व ह्मणती लोक । चंद्रीं जेवीं ॥ १७ ॥ दर्पणाचिया जवळिका । दुजेपण जैसें ये मुखा । कां कुंकुमें स्फटिका । लोहितत्व ये ॥ १८ ॥ तैसा गुणसंगमें । अजन्मा हा जन्मे । पावत ऐसा गमे । येरव्हवीं नाहीं ॥१९॥ [सदसद्योनिजन्मसु] अधमोत्तम योनी । यासि ऐसिया मानीं । जैसा संन्यासी होय स्वर्गी । अंत्यजादि जाती ॥ १०२० ॥ ह्मणोनि केवळा पुरुषा । नाहीं होणें भोगणें देखा । एथ गुणसंगचि अशेखा- । लागीं मूळ ॥ २१ ॥

उपद्रष्टाऽनुमंता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥ २२ ॥

[उपद्रष्टा] हा प्रकृतिमाजी उभा । परि जुई जैसा वोथंबा । इया प्रकृती पृथ्वीनभा । लेतुला पाड ॥ २२ ॥ प्रकृतिसरितेच्या तटीं । मेरु होय हा किरीटी । माजि बिंबे परी लोटीं । लोटों नेणें ॥ २३ ॥ [अनुमंता] प्रकृति होय जाये । हा तो असतचि आहे । [भर्ता] ह्मणोनि आब्रह्माचें होये । शासन हा ॥ २४ ॥ प्रकृति येणें जिये । याचिया सत्ता जग विये । इयालागीं इये । ‡वरयितु हा ॥ २५ ॥ अनंतें काळें किरीटी । जिया मिळती इया सृष्टी । तिया रिगती ययाच्या पोटीं । कल्पांतसमयीं ॥ २६ ॥ [भोक्ता महेश्वरः] हा महब्रह्म गोसावी । ब्रह्मगोलकलाघवी । अपारपणें मवी । प्रपंचातें ॥ २७ ॥ [परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्] पैं या देहामाझारीं । परमात्मा ऐसी जे परी । बोलिजे तें अवधारीं । ययातेंचि ॥ २८ ॥ [पुरुषः परः] अगा प्रकृतिपरौता । एक आथी पंडुसुता । ऐसा प्रवाद तो तत्त्वता । पुरुष हा पैं ॥ २९ ॥

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ।
सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥ २३ ॥

[य एवं वेत्ति पुरुषं] जो निखळपणें येणें । पुरुषा यया जाणे । [प्रकृतिं च गुणैः सह] आणि गुणांचें करणें । प्रकृतीचें तें ॥ १०३० ॥ हें रूप हे छाया । पैल जळ हे माया । ऐसा निवाड धनंजया । जेविं कीजे ॥ ३१ ॥ तेणें पाडें

---

* अंतरीं. † बोलिजती तिये. ‡ वर येतु.

---

१ स्त्रीयोगानें. २ जन्मरहिताला. ३ तापलेलें. ४ हाललें असतां. ५ प्रतिबिंब. ६ आरक्तता. ७ मानतो, समजतो. ८ वोथंबा, खांब, वेलीस आश्रयभूत काठी असते ती. ९ प्रवाहीं वाहूं न शके. १० संहारकर्ता, प्रवर्तक. ११ भर्ता. १२ सूत्रधार. १३ गणना करी. १४ चर्चा. १५ शुद्धपणें. १६ गुणकर्म सर्व प्रकृतिमूलक होय. १७ मृगजळ.

अर्जुना । प्रकृतिपुरुषविवंचना । जयाचिया मना । गोचर जाहाली ॥ ३२ ॥ [सर्वथा वर्तमानोऽपि] तो शरीराचेनि मेळें । करू कां कर्मैं सकळें । परि आकाश धुई[1] न मैळे । तैसा असे ॥ ३३ ॥ [न स भूयोऽभिजायते] आथिलेनि देहें । जो न धेपे देहमोहें । देह गेलिया नोहे । पुनरपि तो ॥ ३४ ॥ ऐसा तया एक । प्रकृतिपुरुषविवेक । उपकार अलौकिक । करी पैं गा ॥ ३५ ॥ परि हाचि अंतरीं । विवेक भानूचियापरी । उदैजे ते अवधारीं । *उपाय बहुत ॥ ३६ ॥

ध्यानेनात्मनि पश्यंति केचिदात्मानमात्मना ।
अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चाऽपरे ॥ २४ ॥

[केचिदात्मानमात्मना] कोणी एक सुभटा । विचाराचा आंगिटा[3] । आत्मानात्माकिटा[4] । पुटें देउनी ॥ ३७ ॥ छत्तीसही वानी[5] भेद । तोडोनि निर्विवाद । निवडिती शुद्ध । अपणपें ॥ ३८ ॥ [ध्यानेनात्मनि पश्यंति] तया आपणपयाच्या पोटीं । †आत्मध्यानाचिया दिठी । देखती गा किरीटी । आपणपेंचि ॥ ३९ ॥ [अन्ये सांख्येनेति] आणि पैं दैवबगें[6] । चित्त देती सांख्ययोगें । एक ते अंगेंलगें[7] । कर्माचेनी ॥ १०४० ॥ ~~या चतुर्विध प्रकारें । जे मज मिनले पुरे । तयांसि कांहीं नुरे । भोक्तव्य गा ॥ ४१ ॥~~

अन्ये त्वेवमजानंतः श्रुत्वान्येभ्य उपासते ।
तेऽपि चातितरंत्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ २५ ॥

[अन्ये त्वेवमजानंतः] येणें येणें प्रकारें । निस्तरती साचोकारें । हें ‡भव कां उरें । आघवेंचि ॥ ४२ ॥ परि ते करिती ऐसें । अभिमान दवडूनि देशें । एकाचिया विश्वासें[10] । टेंकती[11] बोला ॥ ४३ ॥ जे हिताहित देखती । हानिकणवा[12] धेपती । पुसोनि शीण हरिती । देती सुख ॥ ४४ ॥ [श्रुत्वान्येभ्य उपासते] तयाचेनि मुखें जें निघे । तेतुलें आदरें[13] चांगें । ऐकोनियां आंगें । मनें होती ॥ ४५ ॥ [श्रुतिपरायणाः] तैसा ऐकणे§याचेनि नांवें[13] । ठेवती गा आघवें । तया अक्षरांसी जीवें । लोण[14] करिती ॥ ४६ ॥ [तेऽपीति] तेही अंतीं कपिध्वजा[15] । इया मरणार्णवसमाजा । पासूनि निघती वोजा[16] । गोमटेया ॥ ४७ ॥ ऐसैसे हे उपाये । बहुवस एथें पाहें । जाणावया होये । एकी वस्तु ॥ ४८ ॥ आतां पुरे हें बहुत । पैं सर्वार्थाचें मथित । सिद्धांतनवनीत । देऊं

---

* उपायें बहुतें. † अध्यात्मज्ञानाचिया. ‡ भय कां उरे. § याचे नांवें.

---

१ धुक्यानें, धुरळ्यानें. २ प्राप्त झालेल्या. ३ आगींत, शेगडींत. ४ अनात्मडाकाला. ५ कसाचे भेद. ६ दैवयोगानें. ७ आश्रयानें. ८ खरेपणानें. ९ भ्रांति, भय. १० श्रद्धेनें आश्रय करितात, धरिती. ११ दया, नाश पाहून कळवळा घेणारे. १२ चांगलें. १३ ते ऐकण्याचें नांव घेतांच सर्व व्यापार ठेवून ऐकतात. १४ निंबलोण. १५ मृत्युसमुद्रसमुदाय. १६ रीतीनें, स्वच्छता.

तुज ॥ ४९ ॥ येतुलेनि पंडुसुता । अनुभव लाहाणा आयिता । येर तंव तुज होतां । सायास नाहीं ॥ १०५० ॥ म्हणोनि मी बुद्धि रचूं । मतवाद खांचूं । सोलींव निर्वंचूं । फलितार्थचि ॥ ५१ ॥

यावत्संजायते किंचित्सत्वं स्थावरजंगमम् ।
क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ॥ २६ ॥

[क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्] तरी क्षेत्रज्ञ येणें बोलें । तुज आपणपें जें दाविलें । आणि क्षेत्रही सांगीतलें । आघवेंचि ॥ ५२ ॥ तया येरयेरांच्या मेळीं । [यावत्संजायते इति] होइजे भूतीं सकळीं । अनिलसंगें सलिलीं । कल्लोळ जैसे ॥ ५३ ॥ कां तेजा आणि उखरा । भेटी जालिया वीरा । मृगजळांचिया पूरा । रूप होय ॥ ५४ ॥ नाना धाराधरधारीं । झळंबलिया वसुंधरी । उठिजे जेविं अंकुरीं । *नानाविधीं ॥ ५५ ॥ तैसें चराचर आघवें । जें कांहीं जीव एणें नांवें । [तद्विद्धि भरतर्षभ] तें तों उभययोगें संभवे । ऐसें जाण ॥ ५६ ॥ इयालागीं अर्जुना । क्षेत्रज्ञा प्रधाना- । पासूनि न होती भिन्ना । भूतव्यक्ति॥५७॥

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम् ।
विनश्यत्स्वविनश्यंतं यः पश्यति स पश्यति ॥ २७ ॥

[समं सर्वेषु भूतेषु] पैं पंटत्व तंतू नव्हे । †तरि तंतूचि तें आहे । ऐसें खोलीं डोळां पाहें । ऐक्य हें गा ॥ ५८ ॥ भूतें आघवींचि होती । एकाचीं एक आहाती । परि पैं भूतप्रतीती । वेगळाली असे ॥ ५९ ॥ यांचीं नामेंही आनानें । अनारिसीं वर्तनें । वेषही सिनाने । आघवेयांचे ॥१०६०॥ ऐसें देखोनि किरीटी । भेद सुसी हन पोटीं । तरि जन्माचिया कोटी । न लाहसी निर्घो ॥ ६१ ॥ पैं नानाप्रयोजनशीळें । दीर्घें वक्रें वर्तुळें । होती ‡एकीचींच फळें । तुंबिणीयेचीं ॥ ६२ ॥ होतु कां उजू वांकुडे । परि बोरीचे हें न मोडे । तैसीं भूतें अवघडें । परि वस्तु उजू ॥ ६३ ॥ अंगारकणीं बहुवसीं । उष्णता समान जैसी । [तिष्ठंतं परमेश्वरं] तैसा नाना जीवराशीं । परेश असे ॥ ६४ ॥ गगनभरी धारा । परि पाणी एकचि वीरा । तैसा या भूताकारा । सर्वांगीं तो ॥ ६५ ॥ हे भूतग्राम विषम । परि वस्तु ते एथ सम । घटमठीं व्योम । जियापरी ॥ ६६ ॥ [विनश्यत्स्वविनश्यंतं] हा नाशतां भूताभास । एथ आत्मा तो अविनाश । जैसा केयूरादिकीं कस । सुवर्णाचा ॥ ६७ ॥ [यः पश्यति] एवं

* नानाविधें. † तंतूसिचि तें. ‡ एकीच.

१ प्राप्त. २ खंडण करूं. ३ सांगूं. ४ माळजमिनीवर. ५ पर्ज्यन्यधारीं. ६ पृथ्वी भिजली असतां. ७ पुरुष प्रकृति. ८ वस्त्रपण. ९ भूतभाव, जीवभाव. १० भिन्नभिन्न. ११ तन्हत-हेचे. १२ धरिशी. १३ निर्घूं शकणार नाहींस. १४ अनेक कार्योपयोगी. १५ भोंपळीचीं. १६ सरळ. १७ निखाऱ्यांत. १८ बाहुभूषणाच्या ठाईं.

जीवधर्महीन । जो जीवेंसीं अभिन्न । देखे तो सुनयन । ज्ञानियांमाजी ॥ ६८ ॥ [स पश्यति] ज्ञानाचा डोळा डोळसां- । माजि डोळस तो वीरेशा । हे स्तुति नोहे बहुवसा । भाग्याचा तो ॥ ६९ ॥

समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।
न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ॥ २८ ॥

[न हिनस्त्यात्मनात्मानं] हे गुणेंद्रिय *धोकटी । देह धातूंची त्रिकुटी । पांचमेळावा वोखटी । दारुण हे ॥ १०७० ॥ हे उघड पाँचवेउली । पंचधा आंगीं लागली । जीवपंचानना सांपडली । हरिणकुटी हे ॥ ७१ ॥ ऐसा असोनि इये शरीरीं । कोण नित्यबुद्धीची सुरी । अनित्यभावाच्या उदरीं । दाटीचिनाँ ॥ ७२ ॥ [ततो याति परां गतिं] परि इये देहीं असतां । जो नयेचि आपणया घाता । आणि शेखीं पंडुसुता । तेथेंचि मिळे ॥ ७३ ॥ जेथ योगज्ञानाचिया प्रौढी । वोलांडूनियां जन्मकोडी । न निगों ईया भाषा बुडी । देती योगी ॥ ७४ ॥ जें आकाराचें पैल तीर । जें नादाची पैल मेरं । तुर्येचें माजघर । परब्रह्म जें ॥ ७५ ॥ मोक्षासगट गती । जेथें येती विश्रांती । गंगादि अपांपती । सरिता जेवीं ॥ ७६ ॥ तें सुख येणेंचि देहें । पायपाखाळणिया लाहे । [समभिति] जो भूतवैषम्यें नोहे । विषमबुद्धी ॥ ७७ ॥ [समवस्थितमीश्वरं] दीपांचिया कोडीं जैसें । एकचि तेज सरिसें । तैसा जो असतचि असे । सर्वत्र ईश ॥ ७८ ॥ ऐसेनि समत्वें पंडुसुता । जिये जो देखतसाता । तो मरणा आणि जीविता । नाँगवे फुडा ॥ ७९ ॥ ह्मणोनि तो दैवागळा । वानीत असों वेळोवेळां । जे साम्यसेजे डोळा । लागला तया॥ १०८०॥

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ।
यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥ २९ ॥

[प्रकृत्यैवेति सचतुरक्षरार्धं] आणि †मनोबुद्धिप्रमुखें । कर्मेंद्रियें अशेखें । करी प्रकृतीचि हें देखे । साचें जो गा ॥ ८१ ॥ [तथात्मानमकर्तारं] घरींचीं राहटती घरीं । घर कांहीं न करी । अभ्र धांवे अंबरीं । ‡अंबर तें उगें ॥ ८२ ॥ तैसी प्रकृति आत्मप्रभा । खेळे गुणीं विविधारंभा । येथ आत्मा तो वोथंबा ।

---

* धोकौटी. † मनबुद्धि. ‡ अंबर उगें.

---

१ जीवधर्मरहित जें ब्रह्म तें जीवाहून भिन्न नाहीं असें पाहतो तोच सुनयन, खरा डोळस. २ पिशवी. ३ त्रिधातु, वात, पित्त, कफ. ४ पांच नांग्यांची इंगळी, पांच पायांची. ५ जीवरूप वाघास (पांच ज्ञानेंद्रियांनीं भोग करणारा.) ६ सांपळा, विषयस्थान. ७ भोकसी नाहीं. ८ या प्रतिज्ञेनें. ९ कडा. १० समुद्राप्रत. ११ गुरुभक्तीनें, पादप्रक्षालन. १२ कोट्यवधींत. १३ पाहत असतां. १४ न सांपडे. १५ खरोखर. १६ वर्णन करीत. १७ घरांतील माणसें. १८ आत्म्याच्या प्रकाशानें. १९ अनेक कार्यारंभास. २० आश्रयस्तंभ.

नेणे कोण ॥ ८३ ॥ [स पश्यति] ऐसेनि येणें निवाडें । जयाच्या जीवीं उजिवडे । अकर्तयातें फुडें । देखिलें तेणें ॥ ८४ ॥

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।
तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ॥ ३० ॥

[यदेति त्रयः पादाः] येन्हवीं तेंचि अर्जुना । होइजे ब्रह्मसंपन्ना । जैं या भूताकृती भिन्ना । दिसती एकी ॥ ८५ ॥ लहरी जैसिया जळीं । परमाणुकणिका स्थळीं । रश्मीकरमंडळीं । सूर्याच्या जेवीं ॥ ८६ ॥ ना तरी देहीं अवेव । मनीं आघवेचि भाव । विस्फुलिंग सर्व । वन्हीं एकीं ॥ ८७ ॥ तैसे भूताकारएकाचे । *हें दिठी रिगे जैं साचें । [ब्रह्म संपद्यते तदा] तैंचि ब्रह्मसंपत्तीचें । तौरूं लागे ॥ ८८ ॥ मग जया तया कडे । ब्रह्मचि दिठी उघडे । किंबहुना जोडे । अपार सुख ॥ ८९ ॥ येतुलेनि तुज पार्था । प्रकृतिपुरुषव्यवस्था । ठायें ठावो प्रतीतिपथा- । माजि जाहाली ॥ १०९० ॥ अमृत जैसें ये चुळा । कां निधान देखिजे डोळां । तेतुला जिव्हाळा । मानावा हा ॥ ९१ ॥ जी जाहालिये प्रतीती । घर बांधणें जें चित्तीं । तें आतानां सुभद्रापती । इयावरी ॥ ९२ ॥ तरि एक दोनी ते बोल । बोलिजती सखोल । देईं मनातें वोलें । मग ते घेईं ॥ ९३ ॥ ऐसें देवें ह्मणितलें । मग बोलों आदरिलें । तेथें अवधानाचेंचि केलें । सर्वांग येरें ॥ ९४ ॥

अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः ।
शरीरस्थोऽपि कौंतेय न करोति न लिप्यते ॥ ३१ ॥

[परमात्मायं] तरि परमात्मा ह्मणिपे । तो ऐसा जाण स्वरूपें । जळीं जळे न लिंपे । सूर्य जैसा ॥ ९५ ॥ कां जे जळा आदी पाठीं । तो असतचि असे किरीटी । माजि बिंबे तें दृष्टी । आणिकांचिये ॥९६॥ [शरीरस्थोऽपि कौंतेय] तैसा आत्मा देहीं । आथि ह्मणिपे हें कांहीं । साचें तरी नाहीं । तो जेथिंचा तेथें ॥ ९७ ॥ आंरिसामुख जैसें । बिंबलिया नाम असे । देहीं वसणें तैसें । आत्मतत्त्वा ॥ ९८ ॥ तया देहा ह्मणती भेटी । हे सर्पायी निर्जीव गोठी । वारिया वाळुवे गांठी । केंही आहे ॥ ९९ ॥ आगी आणि †कापुसा । दोरा सुवावा कैसा । केउता सांदा आकाशा । ‡पृथ्वीयेसी ॥ ११०० ॥ एक निघे पूर्वेकडे । एक तें पश्चिमेकडे । तिये भेटीचेनि पाडें । संबंध हा ॥ १ ॥ उजियेडा आणि

* येथ दृष्टि, ये दिठी. † पाउसा. ‡ पाषाणेसी.

१ प्रकाशे. २ अकर्त्या आत्म्याला. ३ एकरूपाकार. ४ किरणमय सूर्यमंडळांत. ५ ठिणग्या. ६ दृष्टींत भरे. ७ जहाज. ८ तत्काळ, वास्तविक. ९ गहाण. १० आरशांत प्रतिबिंब पडल्यामुळें त्या मुखास आरसामुख म्हणतात, तसें. ११ संबंध. १२ सर्वथैव. १३ घालावा. १४ प्रमाणें.

आंधारेया । जो पाड मृता [1]उभया । तोचि गा आत्मया । देहा जाण ॥ २ ॥ रात्री आणि दिवसा । [2]केनका आणि कापुसा । [3]अपाड कां जैसा । तैसाचि यासी ॥ ३ ॥ देह तंव पांचांचें जालें । हें कर्माचे [4]गुणीं गुंथलें । भंवतसे चाकीं [5]सूदलें । जन्ममृत्यूच्या ॥ ४ ॥ हें काळानळाच्या [6]कुंडीं । घातली लोणियाची उंडी । माशी पांखें पाखंडी । तंव हें सरे ॥ ५ ॥ हें विर्पायें आगींत पडे । तरि भस्म होऊनि उडे । जाहालें श्वाना वरपडें । तरि ते विष्ठा ॥ ६ ॥ या चुके दोहीं काजा । तरि होय कृमींचा पुंजा । हा परिणाम कपिध्वजा । क-[7]ईमल गा ॥ ७ ॥ या देहाची हे दशा । [अनादित्वात्] आणि आत्मा तो ऐसा । पैं [8]शुद्ध नित्य अपैसा । अनादिपणें ॥ ८ ॥ [निर्गुणत्वात्] सकळ ना निष्कळ । अक्रिय ना क्रियाशील । कृश ना स्थूळ । निर्गुणपणें ॥ ९ ॥ साभास ना निराभास । प्रकाश ना अप्रकाश । अल्प ना बहुवस । अरूपपणें ॥ ११० ॥ रिता ना भरित । रहित ना सहित । मूर्त ना अमूर्त । शून्यपणें ॥ ११ ॥ आनंद ना निरानंद । एक ना विविध । मुक्त ना बद्ध । आत्मपणें ॥ १२ ॥ येतुला ना तेतुला । आइता ना रचिला । बोलता ना [9]उगला । अलक्षपणें ॥ १३ ॥ [अव्ययः] सृष्टीचा होणें [10]न रचे । सर्वसंहारें न वेंचे । आथी नाथी या दोहींचें । पंचत्वें [11]हा ॥ १४ ॥ [12]मेवे ना चर्चे । वाढे ना खांचे । विटे ना वेंचे । अव्ययपणें ॥ १५ ॥ एवंरूप पैं आत्मा । देही जें ह्मणती प्रियोत्तमा । [13]तें मठाकारें व्योमा । नाम जैसें ॥ १६ ॥ [न करोति] तैसें तयाचिये [14]अनुस्यूती । होती जाती देहाकृती । तो घे ना सांडी सुमती । जैसा तैसा ॥ १७ ॥ अहोरात्रें जैसीं । येती जाती आकाशीं । आत्मसत्ते तैसीं । देहें जाण ॥ १८ ॥ ह्मणोनि इये शरीरीं । कांहीं *करवी ना करी । [15]अंयताही व्यापारीं । [16]सज्जे †न होय ॥ १९ ॥ [न लिप्यते] यालागीं स्वरूपें । उणा पुरा न घेपे । हें असो तो न लिंपे । देहीं देहा ॥ ११२० ॥

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ।
सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥ ३२ ॥

[यथा सर्वगतमिति] अगा आकाश कें नाहीं । हें न रिघेचि कवणेठायीं । परि कायिसेनि कहीं । ‡गादिजेना जैसें ॥ २१ ॥ [सर्वत्रेति] तैसा सर्वत्र सर्वदेहीं । आत्मा असतचि असे पाहीं । परि संगदोषें एकेंही । लिप्त नोहे ॥ २२ ॥ [17]पुंडतपुडती एथें । हेंचि लक्षण निरुतें । जे जाणावें क्षेत्रज्ञातें । क्षेत्रविहीना ॥ २३ ॥

* न करवी करी. † नोहे. ‡ गादेना.

१ उभ्याला, जीवंताला. २ सुवर्णाला. ३ असाम्य. ४ दोऱ्यांत गुंतलें. ५ घातलें. ६ तोंडी. ७ पंख झाडी. ८ कदाचित्. ९ प्राप्त. १० वाईट. ११ सहज. १२ मौनी. १३ होण्यानें. १४ लयस्थान. १५ मोजला जात नाहीं, बोलला जात नाहीं. १६ व्याप्तीनें, संबंधानें. १७ अकृत व्यापारींही सक्त नाहीं. १८ पीडा पावेना. १९ वारंवार.

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ।
क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥ ३३ ॥

[यथा प्रकाशयतीति] संसर्गें[5] चेष्टिजे लोहें । परि लोह भ्रामक नोहे । क्षेत्र-क्षेत्रज्ञां आहे । तेतुला पाड ॥ २४ ॥ दीपकाची अर्चीं[3] । राहाटी वाहे घरींची । परि वेगळीक कोडीची[4] । दीपा आणि घरा ॥ २५ ॥ पैं काष्टाच्या पोटीं । वन्हि असे परि किरीटी । काष्ट नोहे या दृष्टी । पाहिजे हा ॥ २६ ॥ अंपाड[6] नभा आभाळां । रवि आणि मृगजळा । तैसाचि हाही डोळां । *देखावा पैं ॥ २७ ॥ हें आघवेंचि असो एक । गगनौनि जैसा अर्क । प्रकटवी लोक । नावें[7] नावें ॥ २८ ॥ [क्षेत्रमिति] एथ क्षेत्रज्ञ तो ऐसा । प्रकाशक क्षेत्राभासा । †यावरुतें हें न पुसा । शंका नेघा ॥ २९ ॥

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमंतरं ज्ञानचक्षुषा ।
भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यांति ते परम् ॥ ३४ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगो नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

[क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवं] शब्दतत्त्वसारज्ञा । पैं[2] देखणी तेचि प्रज्ञा । जे क्षेत्रक्षेत्रज्ञा । अंपाड[6] देखे ॥ ११३० ॥ [अंतरं ज्ञानचक्षुषा] इया दोहींचें अंतर । देखावया चतुर । ज्ञानियांचें द्वार । आराधिती ॥ ३१ ॥ याचिलागीं सुमती । जोडिती शांतिसंपत्ती । शास्त्रांचीं दुभतीं । पोषिती घरीं ॥ ३२ ॥ योगाचिया आकाशा । वैळघिजे[8] येवढा धिंवसा[9] । याचियाचि आशा । पुरुषासि गा ॥ ३३ ॥ शरीरादिसमस्त । मानिताति तृणवत । जीवें संतांचे होत । वाहणधर[10] ॥३४॥ ऐसैसिया परी । ज्ञानाचिया ‡भरोवरी[11] । करूनियां अंतरीं । निरुते[12] होती ॥ ३५ ॥ मग क्षेत्र क्षेत्रज्ञाचें । जे अंतर देखती साचें । ज्ञानें उन्मेख[13] तयांचे । वोवाळूं आह्मी ॥ ३६ ॥ [भूतप्रकृतिमोक्षं च] आणि महाभूतादिकीं । प्रभेदलीं[14] अनेकीं । पसरलीसे लटिकी । प्रकृति जे हे ॥ ३७ ॥ जे शुकनळिकान्यायें[15] । न लगती लागली आहे । जें जैसें तैसें होये । §ठाउवें[16] जयां ॥ ३८ ॥ जैसी माळा ते माळा । ऐसीचि देखिजे डोळां । सर्पबुद्धि टवाळा[17] । उखी होउनी ॥ ३९ ॥ कां शुक्ति ते शुक्ती । हे साच होय प्रतीती । रुपयाची भ्रांती । जाऊनियां ॥ ११४० ॥ तैसी वेगळी वेगळेपणें । [ये विदुर्यांति ते परं] ¶प्रकृती जे अंतःकरणें । देखती ते मी ह्मणें । ब्रह्म होती ॥ ४१ ॥ जें आकाशाहूनि वाड[18] ।

* देखसी जरी. † यावरौतें. ‡ सरोभरी. § ठाउकें. ¶ प्रकृतिपुरुषें.

१ जवळ असतां हालावें. २ ज्योती. ३ व्यवहार चालवी. ४ कोट्यंशाचें अंतर. ५ वैलक्षण्य. ६ नेहमीं. ७ चढावें. ८ धैर्य. ९ पादुकाधारक. १० साधनें. ११ निश्चल. १२ ज्ञान. १३ पान. १०७ अध्याय ६ ओ० ७६, ७७, ७८. पहा. १४ ठाऊक. १५ लटकी. १६ नाश. १७ मोठें.

जें [1]अव्यक्ताची पैल कड । जें भेटलिया [2]अंपाडा पाड । [3]पैडों नेदी ॥ ४२ ॥ आकार जेथ सरे । जीवत्व जेथें विरे । द्वैत जेथ नुरे । अद्वय जें ॥ ४३ ॥ तें परमतत्त्व पार्था । होती ते सर्वथा । जे आत्मानात्मव्यवस्था । [4]राजहंस ॥४४॥ ऐसा हा जी आघवा । श्रीकृष्णें तया पांडवा । [5]उगाणा दिधला जीवा । जीवाचिया ॥ ४५ ॥ येर [6]कलशींचें येरीं । रिचविजे जयापरी । आपणपें तया श्रीहरी । दिधलें तैसें ॥ ४६ ॥ आम्हि कोणा देता कोण । तो नर तैसा नारायण । वरि अर्जुनातें श्रीकृष्ण । हां मी ह्मणें ॥ ४७ ॥ परि असो तें नाथिलें । न पुसतां *कां मी बोलें । किंबहुना दिधलें । सर्वस्व देवें ॥ ४८ ॥ [उत्तराध्यायबीजं] कीं तो पार्थ जी मनीं । अझुनी तृप्ती न मनी । अधिकाधिक [8]उतान्ही । वाढवीत असे ॥ ४९ ॥ स्नेहाचिया [9]भरोवरी । †[10]आंबुथिला [11]दीप घे थोरी । चाड अर्जुना अंतरीं । परिसतां तैसी ॥ ११५० ॥ तेथ ‡सुगरणी आणि उदारे । रसज्ञ आणि जेवणारे । मिळती मग अवतरे । हात जैसा ॥ ५१ ॥ तैसें जी होतसे देवा । तया अवधानाचिया [12]लवलवा । पाहातां व्याख्यान [13]चढलें थांवा । चौगुणें वरी ॥ ५२ ॥ [14]सुवायें मेघ सांवरे । जैसा चंद्रें सिंधू भरे । तैसा मातला रस आदरें । श्रोतयांचेनि ॥ ५३ ॥ आतां आनंदमय आघवें । विश्व कीजेल देवें । तें रायें परिसावें । संजयो ह्मणे ॥ ५४ ॥ एवं जे महाभारतीं । श्रीव्यासें अप्रांतमती । भीष्मपर्व संगतीं । ह्मणितली कथा ॥ ५५ ॥ तो श्रीकृष्णार्जुनसंवाद । [15]नागरीबोलीं विशद । सांगोनि दाऊं प्रबंध । वोवियेचा ॥ ५६ ॥ नुसधीचि शांतिकथा । आणिजेल कीर वाक्पथा । जे शृंगाराच्या माथां । पाय ठेवी ॥ ५७ ॥ दाऊं वेल्हाळ[16]देशी नवी । जे साहित्यातें [17]वोजावी । अमृतातें चुकी ठेवी । गोडसपणें ॥ ५८ ॥ बोल [18]वेल्हाळवितेनि गुणें । चंद्रासि घे [19]उमाणे । रसरंगा भुलवणें । नाद लोपी ॥ ५९ ॥ [20]खेचराचियाही मना । आणी सात्विकाचा पान्हा । श्रवणासवें [21]सुमना । समाधी जोडे ॥ ११६० ॥ तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थेंसी विश्व भरूं । आनंदाचा [22]औवारू । मांडूं जगा ॥ ६१ ॥ फिटो विवेकाची [23]वोंणी । हो काना मना [24]§जिणीं । देखो [25]आवडे तो खाणी । ब्रह्मविद्येची ॥ ६२ ॥ दिसो परतत्त्व

---

* कां बोलिलें. † आंबुखिला. ‡ सुगरण. § धणी.

---

१ प्रकृति. २ साम्यासाम्य. ३ उरूं देत नाहीं. ४ विवेचन करणारे. ५ प्रत्यय, अनुभव. ६ घागरींतील पाणी. ७ ओतावें. ८ अर्जुनाकडे बोट दाखवून हाच मी आहें असें म्हणे. 'पांडवानां धनंजयः' (अस्मि) पान २२७ अध्याय १० श्लोक ३७. ९ इच्छा, तृष्णा. १० मैत्रीच्या. ११ भरपूर साधनाचें. १२ प्रदीप्त, शिपिला. १३ आस्थेनें, चळवळीनें. १४ वळास चढलें. १५ अनुकूल वाऱ्यानें. १६ उत्तम शब्दानें. १७ आवडती, विस्तृत देशभाषा. १८ दाखवी, शिकवी. १९ शांत करणाऱ्या गुणांनीं, भिजविणाऱ्या, आर्द्र करणाऱ्या. २० बरोबरी करणें, माप घेणें. २१ पिशाचाच्या. २२ निर्मळ मनाला. २३ पटांगणाचा बांध. २४ दुष्काळ, दैन्य. २५ सजीवदशा. २६ पाहिजे तो.

डोळां । पाहो सुखाचा सोहळा । रिघो महाबोध सुकाळा- । माजी विश्व ॥ ६३ ॥ हें निफजेल आतां आघवें । ऐसें बोलिजेल बरवें । जे अधिष्ठिला असें परमदेवें । श्रीनिवृत्ती मी ॥६४॥ ह्मणोनि अक्षरीं सुभेदीं । उपमा श्लोक कोंदाकोंदी[1] । झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासी ॥ ६५ ॥ हा ठावोवरी मातें । पुरतया[2] सारस्वतें[3] । केलें असे श्रीमंतें । श्रीगुरुरायें ॥ ६६ ॥ तेणें जी कृपासा-[4]वायें । मी बोलें तेतुलें सामाये । आणि तुमचिये सभे लाहें । गीता ह्मणों ॥ ६७ ॥ वरि तुह्मां संतांचे पाये । आजि मी लाधलों आहें । ह्मणोनि जी नोहे । अटक कांहीं ॥ ६८ ॥ प्रभु काश्मीरीं[5] मुकें । नुपजेही कौतुकें । नाहीं उणीं सामुद्रिकें[6] । लक्ष्मीयेसी ॥ ६९ ॥ तैसी तुह्मा संतांपासीं । अज्ञानाची गोठी कायसी । यालागीं नवरसीं । वरुषेन मी ॥ ११७० ॥ ॥ किंबहुना आतां देवा । अवसरू मज देयावा । ज्ञानदेव ह्मणे बरवा । सांगेन ग्रंथ ॥ ११७१ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

श्लोक ३४, ओंव्या ११७१.

---

१ दाट. २ परिपूर्ण. ३ कृपेच्या साहाय्यानें. ४ सरस्वतीच्या ठाईं. ५ सामुद्रिक लक्षणें.

ज्ञानेश्वरी.

अध्याय १४ वा.

जयजय आचार्या । समस्तसुरवर्या । प्रज्ञाप्रभातसूर्या[1] । सुखोदेया[2] ॥ १ ॥ जयजय सर्वविसांवया । सोहंभावसुहावया[3] । नाना लोक हेलावया[4] । समुद्रा तूं ॥ २ ॥ आइकें गा आर्तबंधू । निरंतरकारुण्यसिंधू । विशदविद्यावधू[5] । वल्लभा जी ॥ ३ ॥ तूं जयाप्रति लपसी । तया विश्व हें दाविसी । प्रकट तैं करिसी[6] । आघवेंचि तूं ॥ ४ ॥ कीं पुढिलाची दृष्टी चोरिजे[7] । हा दृष्टिबंध निफजे[8] । परि नवल लाघव तुझें[9] । जें आपणपें चोरे[10] ॥ ५ ॥ जी तूंचि तूं सर्वा[11] यया । मा †कोणा बोध कोणा माया । ऐसिया आपें आप लाघविया[12] । नमों तुज ॥ ६ ॥ जाणो जगीं आप[13] वोलें । तें तुझिया वोला सुरस जालें । तुझेनि क्षमत्व[14] आलें[15] । पृथ्वीयेसी ॥ ७ ॥ रविचंद्रादि शुक्ती[16] । उदय करिती त्रिजगती[17] । ते तुझिया दीप्ती[18]- । तेजतेजां ॥ ८ ॥ जें चळवळिजे अनिळें[19] । तें दैविकेनि जी निजबळें । नभ तुजमाजी खेळे । ‡लपिथपि[20] ॥ ९ ॥ किंबहुना माया[21] अशेष । ज्ञान जी तुझेनि डोळस[22] । असो वानणें सायास[23] । श्रुतीसि हें ॥१०॥ वेद वानूनि तंवचि चांग[24] । जंव न दिसे तुझें आंग[25] । मग आह्मां तया मुंग[26] । एके पांती ॥ ११ ॥ जी ऐकार्णवाचे ठाईं[27] । पाहातां प्रळयमेघाचा पाड[28] नाहीं । मा महानदी काई । निवडूं येती ॥ १२ ॥ कां उदयलिया भास्वत[29] । चंद्र जैसा खद्योत । आह्मां श्रुती[30] तुज आंत । तो पाड असे ॥ १३ ॥ आणि दुर्जया[31] थांव मोडे । जेथ परेशीं[32] वैखरी बुडे । तो तूं मां कोणें तोंडें । वानावासि ॥ १४ ॥ यालागीं आतां । स्तुती सांडूनि निवांतां[33] । चरणीं ठेविजे माथा । हेंचि भलें ॥ १५ ॥ तरि तूं जैसा आहासि तैसिया । नमों जी गुरुराया । मज ग्रंथोद्यमा[34] फळावया । वेव्हारा होईं[35] ॥ १६ ॥ आतां कृपा भांडवल सोडीं । भरीं माझे मतीची पोतडी । करीं ज्ञानपद्य जोडी[36] । §थोरा मातें ॥ १७ ॥

* सुखोदयाजी. † कोणा बंध. ‡ लपथपि. § थोरावीं.

१ बुद्धिरूप प्रातःकाळच्या. २ सुखाच्या उदयकर्त्या. ३ मी ब्रह्म असा भाव सुशोभित करणाऱ्या. ४ किंवा. ५ लाटा. ६ शुद्ध. ७ दुसऱ्याची. ८ बांधिजे. ९ नजरबंध. १० नाटकीपणा. ११ आत्मरूपाप्रत. १२ पाणी, आर्द्रतेनें. १३ सहनशीलता. १४ मोठी शिंपी. १५ तुझ्या दीप्तीच्या तेजाच्या तेजानें. १६ देवाच्या. १७ लपंडाव. १८ ही अशेष माया आहे असें जें ज्ञान तें तुझ्या योगानें डोळस, पाहणारें होतें. १९ वर्णन. २० चांगलें. २१ मौन. २२ समुद्रमय झालेल्यांत. २३ थोरीव, योग्य. २४ सूर्य. २५ वेदाला. २६ द्वैतांचें बळ मोडतें. २७ पहिल्या वाचेशीं त्रवथी वाचा. २८ मुकाट्यानें. २९ ग्रंथ उदीम. ३० व्यापारी. ३१ ज्ञानरूप बंधारणयुक्त कवितेची. ३२ नफा.

मग मी संसरेन[1] तेणें । संतांतें कर्णभूषणें । लेववीन सुलक्षणें । विवेकाचीं ॥ १८ ॥ जी गीतार्थनिधान[2] । काढूं माझें मत । सुयीं[3] स्नेहांजन । आपलें तूं ॥ १९ ॥ हे वाक्सृष्टी एकेवेळे । देखोतु माझे बुद्धीचे डोळे । *तैसा उदैजो जी निर्मळें । कारुण्यबिंबें ॥ २० ॥ माझी प्रज्ञावेली वेल्हाळ[4] । काव्यें होय सफळ । तो वसंत होयीं स्नेहाळ । शिरोमणी ॥ २१ ॥ प्रमेय महापूरें । हे मतिगंगा ये थोरे । तैसा वर्ष[6] उदारे । दिठी[7]वेनी ॥ २२ ॥ अगा विश्वैकधामा । तुझा प्रसादचंद्रमा । करू मज पूर्णिमा । स्फूर्तीची जी ॥ २३ ॥ जी अवलोकिलिया मातें । उन्मेषसागरीं[8] भरितें । वोसंडेलें[9] स्फूर्तीतें । रसवृत्तीचे ॥२४॥ तंव संतोषोनि श्रीगुरुराजें । ह्मणितलें विनतिल्याजें[10] । मांडिलें देखोनि दुजें[11] । स्तवनमिषें[12] ॥ २५ ॥ हें असो आतां वांजटा[13] । तो †ज्ञानार्थ[14] करूनि गोमटा । ग्रंथार्थ दावीं उत्कंठा । भंगों नेदीं ॥ २६ ॥ हो कां जी स्वामी । हेंचि पाहत होतों मी । जे श्रीमुखें ह्मणा तुह्मीं । ग्रंथ सांग ॥ २७ ॥ परि हें स्यां केलें । कीं हें माझेनि जालें । ऐसें नाहीं ठेविलें । वासनेमाजि ॥ २८ ॥ सहजें दूवेंचा डिरु[15] । आंगेंचि तंव अमरु । वरी आला पूरु । पीयूषाचा ॥ २९ ॥ तरि आतां येणें प्रसादें । विन्यासें[16] विदग्धें । मूळशास्त्रपदें । वाखाणीन ॥ ३० ॥ परि जीवा[17] आंतुलीकडे । जैसी संदेहाची डोणि[18] बुडे । ना श्रवणीं तरि चाडे । ‡वाढी दिसे ॥ ३१ ॥ तैसी बोली साचारी । अवतरो माझी माधुरी[19] । मोले[20] मागूनि घरीं । गुरुकृपेच्या ॥ ३२ ॥ तरि मागां त्रयोदशीं । अध्यायीं गोठी ऐसी । श्रीकृष्ण अर्जुनेंसी । चावळले[21] ॥ ३३ ॥ जे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगें । होइजे येणें जगें । आत्मा गुणसंगें । संसरिया[22] ॥ ३४ ॥ आणि हाचि प्रकृतिगतु[23] । सुखदुःख §भोगि हेतु[24] । अथवा गुणातीतु । केवळ हा ॥ ३५ ॥ तरि कैसा पां असंगा संग । कोण तो क्षेत्रक्षेत्रज्ञयोग । सुखदुःखादि भोग । केविं तया ॥ ३६ ॥ गुण ते कैसे किती । बांधती कवणेरिती । ना तरी गुणातीतीं । चिन्हें काई ॥ ३७ ॥ एवं इया आघवेया । अर्था रूपें[25] करावया । विषो येथ चौदावया । अध्यायासी ॥३८॥ तरि तो आतां ऐसा । प्रस्तुत परियेसा । अभिप्राय विश्वेशा । वैकुंठिचा ॥३९॥ [श्रीभगवानुवाच–]तो ह्मणे गा अर्जुना । अवधानाची सर्व सेना । मेळऊनि इया ज्ञाना । झोंबावें हो ॥ ४० ॥ आह्मीं मागां तुज बहुतीं । ¶दाविलें हें उपपत्ती[26] । तरि आझुनी प्रतीती । कुशीं[27] न रिघे ॥ ४१ ॥

* तैसा उदयी जो, तैसें. † ज्ञानार्थ. ‡ वाढ. § भोगितु. ¶ दाविली हे.

१ सांवरेन. २ ठेव. ३ घालीं. ४ विस्तृत. ५ सिद्धांत वस्तूच्या. ६ वृष्टि कर. ७ कृपादृष्टीनें. ८ स्फुरणाची, आविर्भावाची. ९ ज्ञानसमुद्रीं. १० भरून सांडेल. ११ स्तुतीच्या मिषानें, द्वैत मांडलेलें पाहून, नम्रतेच्या मिषानें म्हटलें. १२ द्वैत. १३ हें आतां निष्फळ बोलणें असो. १४ जाणावयाचा विषय. १५ अंकुर. १६ चतुर निरूपणानें, प्रशस्त बोलानें. १७ आंत. १८ नौका. १९ वाचा. २० खंडोबाचे माले, (गळ्यांत नांगर घालून भिक्षा मागणें). २१ बोलले. २२ संसारी. २३ मायोपाधिक. २४ फलाशेनें. २५ स्पष्ट, उपक्रम. २६ युक्तीनें. २७ मनांत शिरत नाहीं.

श्रीभगवानुवाच–परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम्।
यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ॥ १ ॥

[भूयः] ह्मणौनि गा पुढती । [प्रवक्ष्यामि] सांगिजेल *तुजप्रती । †पर ह्मण ह्मणोन श्रुतीं । डाहारिलें जें ॥ ४२ ॥ [परं] येन्हवीं ज्ञान हें आपुलें । परि पर ऐसेनि जालें । जे आवडोनि घेतलें । भवस्वर्गादिक ॥ ४३ ॥ अगा याचिकारणें । हें उत्तम सर्वांपरी मी ह्मणें । [ज्ञानानां] जे वन्हि हें तृणें येरें ज्ञानें ॥ ४४ ॥ जियें भवस्वर्गातें जाणती । यागचि चांग ह्मणती । पारखी फुडी आथी । भेदीं जयां ॥ ४५ ॥ तियें आघवींचि ज्ञानें । केलीं येणें स्वप्नें । [ज्ञानमुत्तमं] जैशा वातोर्मी गगनें । गिळिजती अंतीं ॥ ४६ ॥ कां उदितें रश्मिराजें । लोपिलीं चंद्रादि तेजें । नाना प्रळयांबुमाजें । नदी नद ॥ ४७ ॥ तैसें येणें पाहलेया । ज्ञानजात जाय लया । ह्मणोनियां धनंजया । उत्तम हें ॥ ४८ ॥ [यज्ज्ञात्वा] अनादि जे मुक्तता । आपली असे पंडुसुता । तो मोक्ष हाता येता । होय जेणें ॥ ४९ ॥ [मुनयः सर्वे] जयाचिया प्रतीती । विचारवीरीं समस्तीं । नेदिजेचि संसृती । माथा उधंडं ॥ ५० ॥ [परां सिद्धिमितो गताः] मनें मन घालूनियां मागें । विश्रांति जालिया आंगें । ते देहीं देहा जोगे । होतीचि ना ॥ ५१ ॥ मग तें देहाचें बळें । बोलांडुनि एकेचि वेळे । संवतुकी कांटाळें । माझे जाले ॥ ५२ ॥

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।
सर्गेऽपि नोपजायंते प्रलये न व्यथंति च ॥ २ ॥

[मम साधर्म्यमागताः] जे माझिया नित्यता । तेणें नित्य ते पंडुसुता । परिपूर्ण पूर्णता । माझियाचि ॥ ५३ ॥ मी जैसा अनंतानंद । जैसाचि सत्यसंध । तैसेचि ते भेद । उरेचि ना ॥ ५४ ॥ जें मी जेव्हढें जैसें । तें तेचि जाले तैसें । घटभंगीं घटाकाशें । आकाश जेवीं ॥ ५५ ॥ ना तरि ‡दीप मूळकीं । दीपशिखा अनेकी । मिनलिया अवलोकीं । होय जैसें ॥ ५६ ॥ अर्जुना तयापरी । सरली द्वैताची वारी । नांदे नामार्थ एकाहारीं । मींतूंविणें ॥ ५७ ॥ [सर्गेऽपि नोपजायंते] येणेंचि पैं कारणें । जैं पहिलें सृष्टीचें जुंपणें । तैंही तया होणें । पडेचिना ॥ ५८ ॥ सृष्टीचिये सर्वादी । जयां देहाची नाहीं बांधी । [प्रलये न व्यथंति च] ते कैंचे प्रळयावधी । निमेंतील पां ॥ ५९ ॥ [इदं ज्ञान-

* प्रतिपत्ति, प्रतीति. † परी. ‡ दिवा.

१ प्रसिद्ध केलें. २ पळीकडे. ३ ज्यामुळें. ४ कारण, हें ज्ञान अग्नि, बाकीचीं ज्ञानें तृणें. ५ इतर. ६ परीक्षा. ७ भेदच श्रेय असे ज्यास. ८ वृद्धीनें. ९ उगविल्या. १० वर करूं, उद्धरूं. ११ बळ, कुंपणाच्या आडा. १२ समतोल. १३ ताजवा. १४ सत्यप्रतिज्ञ. १५ मूळज्योतींत. १६ लहान लहान ज्योति, वाती. १७ गती, येरझार. १८ संज्ञेचा अर्थ होऊन. १९ कल्पिल्यापूर्वी. २० रचणें. २१ बंधन. २२ नासतील.

मुपाश्रित्य] ह्मणौनि जन्मक्षयां । अतीत धनंजया । मी जाले ज्ञाना इया । अनुसरोनि ॥ ६० ॥ ऐसी ज्ञानाची वाढी । वानिली देवें आवडी । तेविंचि पार्थाही गोडी । लावावया ॥ ६१ ॥ तंव तया जालें ज्ञान । सर्वांगीं निघाले कान । संपाई[1] अवधान । आतलें[2] पां ॥ ६२ ॥ आतां देवाचिया ऐसें । जाकळीजत[3] असे वोरसें[4] । ह्मणोनि निरूपण आकाशें । वेंटाळेना ॥ ६३ ॥ मग ह्मणे गा प्रज्ञाकांता । उजवली[5] आजि वक्तृत्वता[6] । जे बोला येवढा श्रोता । जोडलासी ॥ ६४ ॥ तरि एक मी अनेकीं । गोविंजे देहपाशकीं । त्रिगुणीं लुब्धकीं । कवणेपरी ॥ ६५ ॥ कैसा क्षेत्रयोगें । वियें इयें जगें । तें परिस सांगें । कवणेपरी ॥ ६६ ॥ *पैं क्षेत्र येणें व्याजें[7] । यालागीं हें बोलिजे । जे मत्संगबीजें । भूतीं पिके ॥ ६७ ॥

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥

[मम योनिर्महद्ब्रह्म] येरहवीं तरी महद्ब्रह्म[8] । यालागीं हें ऐसें नाम । जे महदादिविश्राम । शाळिका[9] हें ॥ ६८ ॥ विकारां बहुवस थोरी । अर्जुना हेंचि करी । ह्मणौनि अवधारीं । महद्ब्रह्म ॥ ६९ ॥ अव्यक्तवादमतीं । अव्यक्त ऐसी वदंती । सांख्याचिया प्रतीतीं । प्रकृती हेचि ॥ ७० ॥ वेदांतीं इयेतें माया । ऐसें ह्मणिजे प्राज्ञराया । असो किती बोलों वायां । अज्ञान हें ॥ ७१ ॥ आपला आपणपयां । विसर जो धनंजया । तेंचि रूप इया । अज्ञानासी ॥ ७२ ॥ आणिकही एक असे । जें विचारावेळे न दिसे । वातीं[10] पाहतां †जैसें । आंधारें कां ॥ ७३ ॥ हालविलिया जाये । निश्चळीं तरी होये । दुधीं जैसी साय । दुधाची ते ॥ ७४ ॥ पैं जागर ना स्वप्न । ना स्वरूप अवस्थान । ते सुषुप्ति कां घन[11] । जैसी होय ॥ ७५ ॥ कां ‡न वियेतां[12] वायूतें । वांझें आकाश रितें[13] । तया ऐसें निरुतें । अज्ञान गा ॥ ७६ ॥ पैल खांबु कां पुरुख । ऐसा निश्चय नाहीं एक । परि काय नेणों ओलोक[14] । दिसत असे ॥ ७७ ॥ तेविं वस्तु जैसी असे । तैसी कीर न दिसे । परि कांहीं अनारिसें[15] । देखिजेना ॥ ७८ ॥ ना राती ना तेज । ते संधि जेविं सांज । तेविं विरुद्ध[16] ना निज[16] । ज्ञान आथी ॥ ७९ ॥ ऐसी कोण्ही एकी दशा । तिये वाद अज्ञान ऐसा । [तस्मिन्गर्भं दधाम्यहं] तया गुंडलिया प्रकाशा । क्षेत्रज्ञ नाम ॥ ८० ॥

---

* कैसा क्षेत्रज्ञयोगें । वियें इयें जगें । तें परिस सांगें । कोणे परी. † न दिसे. ‡ निवांता.

---

१ संपूर्ण, समूळ. २ नटला. ३ व्यापित. ४ स्नेहभरित पान्ह्यानें. ५ बुद्धीच्या पति. ६ विवाहित झाली. ७ भाषाशैली. ८ पारध्यानें. ९ मिषानें. १० मूळमाया. ११ भूमी. १२ दिव्यानें. १३ वायु उत्पन्न होण्याचे पूर्वी आकाशस्थिति असते ती. १४ आभास. १५ वेगळें. १६ विरुद्ध = अनात्म, असत् आणि निज = आत्म, सत् या दोहोंच्या मधील.

अज्ञान थोरिये आणिजे । आपणपें तरी नेणिजे । तें रूप जाणिजे । क्षेत्रज्ञाचें ॥ ८१ ॥ हाचि उभय योग । बुझें बापा चांग । सत्तेचा नैसर्ग । स्वभाव हा ॥ ८२ ॥ [संभवः सर्वभूतानां] आतां अज्ञानासारिखें । वस्तु आपणपांचि देखे । परि रूपें अनेकें । नेणों कोणें ॥ ८३ ॥ जैसा रंक भ्रमला । ह्मणे जा रे मीं रावो आला । कां मूर्छित गेला । स्वर्गलोका ॥ ८४ ॥ तेविं लेंचकलिया दिठी । मग देखणें जें जें उठी । तया नाम सृष्टी । मीचि वियें पैं गा ॥ ८५ ॥ जैसें कां स्वप्नमोहा । तो एकाकी *देखे बहुवा । तोचि पाड आत्मया । स्मरणेंवीण असे ॥ ८६ ॥ हेंचि निर्भ्रांति । प्रमेयें उपलवूं पुढती । परि तूं प्रतीती । याची घे पां ॥ ८७ ॥ ['पुनः' मम योनिर्महद्ब्रह्म] तरि माझी हे गृहिणी । अनादि तरुणी । अनिर्वाच्यगुणी । अविद्या हे ॥ ८८ ॥ इयें नाहीं हेंचि रूप । ठाणें हें अति उमप । हे निद्रितां समीप । चेतां दुरी ॥ ८९ ॥ [तस्मिन्गर्भं दधाम्यहं] पैं माझेनिचि आंगें । पहुडल्या हे जागे । आणि सत्तासंभोगें । गुर्विणी होय ॥ ९० ॥ महद्ब्रह्माउदरीं । प्राकृतीं आठै विकारीं । गर्भाची करी । पेलोवेली ॥ ९१ ॥ उभयसंगें पहिलें । बुद्धितत्त्व प्रसवलें । बुद्धितत्त्वें झंभारलें । होय मन ॥ ९२ ॥ तरुणी ममता मनाची । अहंकार तत्त्व रची । तेणें महाभूतांची । अभिव्यक्ति होय ॥ ९३ ॥ आणि विषयेंद्रियां गौसी । स्वभावें तंव भूतांसी । ह्मणोनि येती सरिसीं । तियेंही रूपा ॥ ९४ ॥ जालेनि विकारक्षोभें । पाठीं त्रिगुणाचें उभें । तेव्हां ये वासना गर्भें । ठायेंठाव ॥ ९५ ॥ रुखाचा आंवांका । जैसी बीजकणिका । जीवीं बांधे उदका । भेटतखेवों ॥ ९६ ॥ तैसी माझेनि संगें । अविद्या नाना जगें । और घेवों लागे । अणियाची ॥ ९७ ॥ [संभवः सर्वभूतानामिति] मग गर्भगोळा तया । कैसें रूप तें ये आंया । तें परियेसें राया । सुजनाचिया ॥ ९८ ॥ पैं मणिजें स्वेदजें । उद्भिजें जरायुजें । उमटती सहज । अवयव हे ॥ ९९ ॥ व्योमवायुवशें । वाढलेनि गर्भरसें । मणिज उंससे । अवयव तो ॥ १०० ॥ पोटीं सूनि तमरजें । आंगळिकां तोय तेजें । उठितां निपजे । स्वेदज गा ॥ १ ॥ आपपृथ्वी उत्कटें । आणि तमोमात्रें निकृष्टें । स्थावर उमटे । उद्भिज हा ॥ २ ॥ पांचां पांचही विरजीं । होती मनबुद्ध्यादि सोजीं । हीं हेतु

* देखिजे.

१ जीवात्म्याचें. २ जाण. ३ साहजिक. ४ तरळली, चळली. ५ स्वप्नभ्रांतीनें. ६ ज्ञानेश्वरांनीं 'मम योनिः' या पद्याचा 'येन्हवीं तरी' ह्या ६८ व्या ओवीपासून इतर मतानुसारि अर्थ दाखविला आणि आतां स्वतांचें मत 'हेंचि निर्भ्रांति' या ओवीपासून दाखवितात. ७ तात्पर्य. ८ विस्तारूं. ९ अभावरूपही आहे. १० आकृति. ११ मोटी. १२ जागे होतां. १३ निजल्यावर. १४ गर्भार. १५ महद्ब्रह्मरूप उदरांत. १६ वृद्धि. १७ महत्तत्त्व. १८ स्पष्टदशा. १९ शोधी, परस्परसंबंधरूप सांखळ. २० वास्तविक. २१ वृक्षाचा. २२ आकार. २३ भेटतांच. २४ अंकुर. २५ अग्रयुक्त. २६ आकारास. २७ अंड्यांपासून उत्पन्न होणारे. २८ स्वेदापासून होणारे. २९ जभिनीपासून. ३० जरायूपासून. ३१ जीवन पावतो. ३२ आधिक्यानें. ३३ सहायानें. ३४ सज्ज, सिद्ध.

जारजीं । ऐसें जाण ॥ ३ ॥ ऐसें चासी हे सरळ । करचरणतळ । महाप्रकृति स्थूळ । तेंचि शिर ॥ ४ ॥ प्रवृत्ती [९]पेललें पोट । निवृत्ती ते पाठि निट । सुरयोनी आंगें [१]ओठ । ऊर्ध्वांचीं ॥ ५ ॥ कंठ उल्हासता स्वर्ग । मृत्युलोक *मध्यभाग । अधोदेश चांग । नितंबें [३]तो ॥ ६ ॥ ऐसें लेंकरूं एक । प्रसवली हें देख । जयाचें तिन्ही लोक । बाळसें गा ॥ ७ ॥ चौऱ्याशीं लक्ष योनी । तियें कांडा पेरां सांदणी । वाढे प्रतिदिनीं । बाळक हें ॥ ८ ॥ नाना देह अवयवीं । नामाचीं लेणीं लेववी । मोहस्तन्यें वाढवी । नित्य नवें ॥ ९ ॥ सृष्टी वेगळवेगळीया । तिया करांघ्री [४]आंगोळिया । †[५]भिन्नाभिमान सूदलिया । मुदिया [६]तेथें ॥ १० ॥ हें येकोलतें चराचर । अविचारित सुंदर । प्रसवोनि थोर-थोरावली ॥ ११ ॥ पैं ब्रह्मा प्रातःकाळ । विष्णू तो मध्यान्ह वेळ । सदाशिव सायंकाळ । बाळा यया ॥ १२ ॥ महा प्रळयसेजे । ‡[७]खेळोनि निवांत निजे । विषमज्ञानें उमजे । कल्पोदयीं ॥ १३ ॥ अर्जुना इयापरी । मिथ्यादृष्टीच्या [८]घरीं । युगानुवृत्तीच्या करी । चोजें पाउलें ॥ १४ ॥ संकल्प जयाचा इष्ट । अहंकार तो §[९]विनट । ऐसिया होय शेवट । ज्ञानें यया ॥ १५ ॥ आतां असो हे बहु बोलीं । ऐसें विश्व माया व्याली । तेथ सांग जाली । माझी सत्ता ॥१६॥

सर्वयोनिषु कौंतेय मूर्तयः संभवंति याः ।
तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥ ४ ॥

[तासां ब्रह्म महद्योनिः] याकारणें मी पिता । मेंहद्ब्रह्म हे माता । अपत्य पंडुसुता । जगडंबर ॥ १७ ॥ [सर्वयोनिषु कौंतेय] आतां शरीरें बहुतें । देखोनि न भेद हो चित्तें । जे मनबुद्ध्यादि भूतें । एकेंचि येथें ॥ १८ ॥ [मूर्तयः संभवंति याः] हां गा एकचि देहीं । काय [१०]अंनारिसे अवयव नाहीं । तेविं विचित्र विश्व पाहीं । एकचि हें ॥ १९ ॥ पैं उंचा नीचा डाहाळिया । विषमा वेगळालिया । येकाचि जेवीं जालिया । बीजाचिया ॥ १२० ॥ [अहं बीजप्रदः पिता] आणि संबंध तोही ऐसा । मृत्तिके घट लेंकें [११]जैसा । कां पटत्व कापुसा । नातू होय ॥ २१ ॥ नां ना कल्लोळपरंपरा । संतती जैसी सागरा । आह्मा आणि चराचरा । संबंध तैसा ॥ २२ ॥ झणौनि वन्हि आणि ज्वाळ । दोन्ही वन्हीचि केवळ । तेविं मी गा सकळ । संबंध [१२]¶वांव ॥ २३ ॥ जालेनि जगें मी झांकें । तरि जगत्वें कोण फांकें । [१३]किळेवरी माणिकें । लोपिजे काई

* मध्य अर्ध भाग. † भिन्नाभिमानीं. ‡ खेळोनि आलें निदिजे. § निकट. ¶ वावो.

१ पुढें झालें, दोंद वाढलें. २ आठ प्रकारचा देवसर्गः—("देवसर्गश्चाष्टविधो विबुधास्सरसोऽसुराः१, गंधर्वाप्सरसः २, सिद्धाः ३, यक्षरक्षांसि ४, चारणाः ५, भूतप्रेतपिशाचाश्च ६, विद्याध्राः ७. किन्नरादयः ८" श्रीमद्भागवत स्कंध ३ अध्याय १० श्लोक २७.) ३ कमरेचा पाठीमागचा भाग, ४ अंगुलि, बोटें. ५ वेगळ्या अभिमानाचे पुरुष तेच आंगड्या. ६ मिथ्यादृष्टि हेंच घर. ७ आवड. ८ खेळगडी, सेवक, हुजरे. ९ माया. १० पृथक् पृथक्. ११ मुलगा. १२ व्यर्थ. १३ कांतीनें.

॥ २४ ॥ अळंकारातें आलें । तरि सोनेपण काइ गेलें । कीं कमळ फांकलें । कमळत्वा मुकें ॥ २५ ॥ सांग पां धनंजया । अवयवीं अवयविया । आच्छादिलें कीं तया । तेंचि रूप ॥ २६ ॥ विरूढलिया जोंधळा । कणिसाचा निर्बाळा[1] । वेंचेला[2] कीं आगळा । दिसतसे ॥ २७ ॥ ह्मणौनि जग परौतें । सारूनि पाहिजे मातें[3] । तैसा नोहें उखितें[4] । आघवें मीचि ॥ २८ ॥ हा तूं सोचोकारा[5] । निश्चयाचा खरा । गांठी बांध वीरा । जीवाचिये ॥ २९ ॥ आतां मिया *मी दाखविला । शरीरीं वेगळाला । गुणीं मीचि बांधला । ऐसा आवडें[6] ॥ १३० ॥ जैसें स्वप्नीं आपण । उठूनियां आत्ममरण । भोगिजे गा जाण । कपिध्वजा ॥ ३१ ॥ कां कवळातें डोळे । प्रकाशूनि पिंवळे । देखती तेंही कळे । तयांसीचि ॥ ३२ ॥ नाना[7] सूर्य प्रकाशें । प्रकटी †तैं अभ्र भासे । तो लोपला हेंही दिसे । सूर्यांचि कीं ॥ ३३ ॥ पैं आपणपेनि जालिया । छाया गा आपुलिया । पाहोनि बिहालिया[8] । आन आहे ॥ ३४ ॥ तैसीं इयें नाना देहें । दाऊनि मी नाना होयें । तेथ ऐसा जो बंध आहे । ‡तेंही देखें ॥ ३५ ॥ बंधचि कीं न बंधिजे । हें जाणणें मज माझें । नेणणेनि[9] उपजे । आपलेनि ॥३६॥ तरि कोणें गुणें कैसा । मजचि मीं बंध ऐसा । आवडे तें परियेसा[10] । अर्जुनदेवा ॥ ३७ ॥ गुण ते किती किंधर्म[11] । कायि ययां रूपनाम । कें जाले हें वर्म । अवधारीं पां ॥ ३८ ॥

सत्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः ।
निबध्नंति महाबाहो देहे देहिनमव्ययं ॥ ५ ॥

[सत्वं रजस्तम इति गुणाः] तरि सत्वरजतम । तिघांसि हें नाम । [प्रकृतिसंभवाः] आणि प्रकृति जन्म[12]- । भूमिका ययां ॥ ३९ ॥ येथ सत्व तें उत्तम । रज तें मध्यम । तिहींमाजि तम । सोवियाधारें[13] ॥ १४० ॥ हें एकेचि वृत्तीच्या ठायीं । त्रिगुणत्व आवडे पाहीं । वयसात्रय[14] देहीं । येकीं जेविं ॥ ४१ ॥ कां मिनलेनि[15] कीडें । जंवजंव तूकें[16] वाढे । तंवतंव सोनें हीन पडे । पांचिकां[17] कसीं ॥ ४२ ॥ पैं सावधपण जैसें । वाहविलें आळसें । सुषुप्ती बैसे । घेणावोनि[18] ॥ ४३ ॥ तैसी अज्ञानांगीकारें । निगाली वृत्ति विखुरे । ते सत्वरजद्वारें । तमही होय ॥ ४४ ॥ [निबध्नंति महाबाहो] अर्जुना गा जाण । ययां नाम गुण । आतां दाखऊं खुण । बांधती ते ॥ ४५ ॥ [देहे देहिनमव्ययं] तरि

---

* मज. † तैं अभ्र, ऐसा अभ्र. ‡ तोही; तो हेंही देखे.

---

१ निष्पन्न, प्रत्यय, दाखला. २ उणा झाला. ३ पाहावें. ४ संपूर्ण. ५ सिद्धांत. ६ वाटे, मान. ७ नाहींतरी. ८ भ्यालास. ९ माझ्या नेणण्येनि अज्ञानानें मी बद्ध आहें किंवा अबद्ध आहें हे धर्म उत्पन्न होतात (या दोनी गोष्टी अज्ञानमूलक आहेत.) १० काय धर्माचे. ११ जन्मस्थान. १२ साह्याच्या आधारानें. १३ बाल्य, तारुण्य व वार्धक्य. १४ डांकानें. १५ वजन. १६ हिणकटाच्या फिक्या कसानें. १७ दृढ होऊन. १८ पसरे.

क्षेत्रज्ञदशे । आत्मा मोटका[१] पैसे[२] । हें देह मी ऐसें । मुहूर्त[३] करी ॥ ४६ ॥ आजन्ममरणांतीं । देहधर्मीं समस्तीं । महत्वाची सूती[४] । घे ना जंव ॥४७॥ जैसी मीनाच्या तोंडीं । पडेना जंव उंडी । तंव गळ आसुडी[५] । जळपारधी ॥ ४८ ॥

तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् ।
सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चाऽनघ ॥ ६ ॥

[तत्र सत्त्वमित्यर्धं] तेविं सत्वें लुब्धकें । सुखज्ञानाचीं पाशकें । वोढिर्जती मग *खुडके[६] । मृग जैसा ॥ ४९ ॥ मग ज्ञानें चडफडी । जाणिवेचे खुरखोडी[७] । स्वयं सुख हें धाडी । हातींचें गा ॥ १५० ॥ [सुखसंगेन] तेव्हां विद्यामानें तोखे[८] । लाभमात्रें हरिखे[९] । मी संतुष्ट हेंही देखे । श्लाघों लागे ॥ ५१ ॥ ह्मणे भाग्य ना माझें । आजि सुखिये नाहीं दुजे । विकाराष्टकें फुंजे[१०] । सात्विकाचेनि[११] ॥ ५२ ॥ [ज्ञानसंगेन चानघ] आणि येणेंही न सरे । लांकणें[१२] लागे दुसरें । जे विद्वत्तेचें भरे । भूत आंगीं ॥ ५३ ॥ आपणचि ज्ञानस्वरूप आहे । तें गेलें हें दुःख न वाहे । कीं विषयज्ञानें[१३] होये । गगनायेवढा ॥ ५४ ॥ रावो जैसा स्वप्नीं । रंकपणें रिघे धोनीं[१४] । तो दोंदीणा[१५] मानी । इंद्र ना मी ॥ ५५ ॥ तैसें †गा देहातीता । जालेया देहवंता । होंलागे पंडुसुता । बाह्यज्ञानें ॥ ५६ ॥ प्रवृत्तिशास्त्र बुझे । यज्ञविद्या उमजे । किंबहुना सुंझे[१६] । स्वर्गवरी ॥ ५७ ॥ आणि ह्मणे आजि आन । मीवांचूनि नाहीं सज्ञान । चातुर्थचंद्रा गगन । चित्त माझें ॥ ५८ ॥ [बध्नाति] ऐसें सत्व सुखज्ञानीं । जीवासि लाउनि कोनी[१७] । बैलाची करी वोनी[१८] । पांगुळाचिया ॥ ५९ ॥ आतां हाचि शरीरी । रजें जियापरी । बांधिजे तें अवधारीं । सांगिजेल ॥ १६० ॥

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवं ।
तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनं ॥ ७ ॥

[रजो रागात्मकं विद्धि] हें रज याचि कारणें । जीवातें रंजऊं जाणें । हें अभिलाखाचें तरुणें । सदाचि गा ॥ ६१ ॥ हें जीवीं मोटकें[२०] रिगे । [तृष्णासंगसमुद्भवं] आणि कामाच्या मर्दीं लागे । मग वारया वेळघे[२१] । तृष्णेचिया ॥ ६२ ॥ घृतें

---

* सुडके. † या.

---

१ अल्प. २ होय. ३ प्रारंभ करी. ४ अभिमान, संबंध, रिघावा. ५ हिसका देतो, ओढी. ६ कोळी. ७ पारधीनें. ८ सौख्य अशी समजूत हाच कोणी एक पाश त्याणें ओढले जातात. ९ तडफडे. १० लाथाळी करून. ११ सुखावे. १२ सत्वाचे अष्टविकार त्यांनीं फुगे. १३ बंधन, लेप. १४ पदार्थज्ञानानें. १५ शहरीं. १६ भिक्षेच्या दोन दाण्यांनीं फुगलेला. १७ समजे. १८ काढण्या, दांड्याचीं शेवटें. १९ बैलासारखा. २० अल्प. २१ चिकटे.

[1]आबुखूनि [3]आगियाळें । [3]वज्राग्नीचें [4]सांदुकलें । आतां बहु [5]थेंकुलें । आहे तेथ ॥ ६३ ॥ तैसी खवळे चाड । होय दुःखासकट गोड । इंद्रश्रीहि [6]सांकंड । गमों लागे ॥ ६४ ॥ तैसी तृष्णा वाढिनलिया । मेरूही हाता आलिया । तऱ्ही ह्मणे एखादिया । [7]दारुणा वळघों ॥ ६५ ॥ जीविताची [8]कुरोंडी । वो-वाळूं लागे [9]कवडी । मानी तृणाचिये [10]जोडी । कृतकृत्यता ॥ ६६ ॥ आजि असतें वेंचिजेल । परि [11]पाहे पां कीजेल । ऐसा [12]पांगी [13]वडील । व्यवसाय मांडी ॥ ६७ ॥ ह्मणे स्वर्गा हन जावें । तरि काय तेथें खावें । [कर्मसंगेन] इयालागीं धांवे । याग करूं ॥ ६८ ॥ व्रतापाठीं व्रतें । आचरे इष्टा-पूर्तें । काम्यवांचूनि हातें । शिवणें नाहीं ॥ ६९ ॥ पैं ग्रीष्मांतींचा वारा । विसांवो नेणें वीरा । तैसा न ह्मणे व्यापारा । रात्र दिवस ॥ ७० ॥ काय चं-चळ मासा । कामिनीकटाक्ष जैसा । [14]लेंवलाहो तैसा । विजूही नाहीं ॥ ७१ ॥ तेतुलेनि गा वेगें । स्वर्गसंसार[15]पांगें । आगिमाजि रिगे । क्रियांचिये ॥ ७२ ॥ [देहिनं] ऐसा देहीं देहावेगळा । *[16]ले तृष्णेचिया सांखळा । खटाटोप वाहे गळां । व्यापाराचा ॥ ७३ ॥ [तन्निबध्नाति कौंतेय] हें रजोगुणाचें दारुण । देहीं देहियासि बंधन । परिस आतां [17]विंदाण । तमाचें तें ॥ ७४ ॥

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।
प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥ ८ ॥

[तमस्तु] व्यवहाराचेहि डोळे । मंद जेणें [2]पडळें । मोहरात्रीचें काळें । मे-[21]हुडें जैसे ॥ ७५ ॥ [अज्ञानजं विद्धि] अज्ञानाचें जियालें [22]। जया एका लागलें । [मोहनं] जेणें विश्व भुललें । नाचत असे ॥ ७६ ॥ अविवेकमहामंत्र । जें मौ-ढ्यमद्याचें पात्र । हें असो मोहनास्त्र । जीवांसि जें ॥ ७७ ॥ पार्था तें गा तम । [23]रचूनि ऐसें [24]वर्म । [25]चौखुरी देहात्म । [26]मांनियातें ॥ ७८ ॥ [सर्वदेहिनां] हें ये-कचि कीर शरीरीं । माजों लागे चराचरीं । आणि तेथ दुसरी । गोठी नाहीं ॥ ७९ ॥ [आलस्य-] सर्वेंद्रियां जाड्य । मनामाजि मौढ्य । [27]मोंल्हाती दार्ढ्य । आलस्याचें ॥ १८० ॥ आंगें आंग मोडामोडी । कार्यजातीं अनावडी । नुसती †[28]परवडी । जांभयांची ॥ ८१ ॥ उघडियाचि दीठी । देखणें नाहीं किरीटी । [29]नोळवितांचि उठी । वो ह्मणौनि ॥ ८२ ॥ पडिलिये [30]धोंडी । [31]नेणे कानी मु-

* लेइला. † परिवडी.

१ शिंपडून. २ अग्निकुंड. ३ वज्रासन-आधारमुद्रेच्या अग्नीचें. ४ पेटिवलें. ५ थोडें. ६ संकुचित. ७ विषयेच्छा. ८ सुवर्णपर्वत. ९ जगड्वाळ भ्रांतीकरितां भयंकर गोष्टीला. १० ओवाळणी. ११ क-वडीकरितां. १२ लामानें. १३ उद्यां. १४ आशेनें, गरजेनें. १५ मोठा. १६ चपल, चांचल्य. १७ इच्छेनें, न्यूनतेनें. १८ घेई. १९ कौतुक, कौशल्य. २० पडद्यानें. २१ मेघ. २२ जिव्हाळा. २३ करून. २४ लक्षण. २५ चहूंकडून ताणून बांधी. २६ देहात्मा मानणारातें. २७ आश्रय पावे. अंगिकारी. २८ आवृत्ती. २९ हाक न मारतां. ३० शिळा. ३१ कोपऱ्यावर फिरणें (कुशी वळणें) होत नाहीं.

रडी । तयाचि परी मुरकुंडी । उकलूं नेणें ॥ ८३ ॥ पृथ्वी पाताळीं जावो । कां आकाशाही वरी येवो । परी उठणें हा भावो । उपजों नेणें ॥ ८४ ॥ उचितानुचित आघवें । झांसुरतां[1] नाठवे जीवें । जेथिंचा तेथ लोळावें । ऐसी मेधा ॥ ८५ ॥ उभऊनि करतळें । पडिधाये[2] कपोळें[3] । पायाचें शिरियाळें[4] । मांडूं लागे ॥ ८६ ॥ [निद्राभिः] आणि निद्रेविषयीं चांग । जीवीं आथि लाग[5] । झोंपीं जातां स्वर्ग । वावो म्हणे ॥ ८७ ॥ ब्रह्मायु[6] होइजे । मा निजेलियाचि असिजे । हें वांचूनि दुजें । व्यसन नाहीं ॥ ८८ ॥ कां वाटे जातां वोघें[7] । कल्हातां[8] ही डोळा लागे । अमृतही परी नेघे । जरी निद आली ॥ ८९ ॥ [प्रमाद-] तेविंचि आक्रोशबळें[9] । व्यापारे कोणे एके वेळे । निगालें तरी आंधळें । रोषें जैसें ॥ १९० ॥ केधवां कैसें राहाटावें । कोणेसीं काय बोलावें । हें ठाकतें कीं नागवे[10] । हेंही नेणे ॥ ९१ ॥ वणवा मियां आघवा । पांखें[11] पुसोनि घेयावा । पतंग या हांवा[12] । घाली जेविं ॥ ९२ ॥ तैसा वेळघे[13] साहसा । अकरणींचि[14] धिंवसा[15] । किंबहुना ऐसा । प्रमादु रुचे ॥ ९३ ॥ [तन्निबध्नाति भारत] एवं निद्रालस्यप्रमादीं । तम इया *त्रिबंधीं । बांधे निरुपाधि । चोखटातें[16] ॥ ९४ ॥ [देहे देहिनमव्ययमिति पंचमश्लोकस्थपादं सुखबोधाय पुनर्व्याचष्टे] जैसा वन्हि काष्टीं भरे । तैं दिसे काष्ठाकारें । व्योम घटें आवरे । तैं घटाकाश ॥ ९५ ॥ नाना सरोवर भरलें । तैं चंद्रत्व तेथें बिंबलें । तैसें †गुणपाशीं बांधलें । आत्मत्व गमे ॥ ९६ ॥

सत्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत ।
ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत ॥ ९ ॥
रजस्तमश्चाऽभिभूय सत्वं भवति भारत ।
रजः सत्वं तमश्चैव तमः सत्वं रजस्तथा ॥ १० ॥

[तमः सत्वं रजस्तथा] पैं परिहरूनि कफवात । जैं देहीं आटोपे पित्त । तत्करी संतप्त । देह जेविं ॥ ९७ ॥ [रजस्तमश्चाभिभूयेति] कां घर्म[17] आतप[18] जैसें । जिणौनि शीतचि दिसे । तेव्हां होय हिंव ऐसें । आकाश हें ॥ ९८ ॥ [रजः सत्वं तमश्चैव] नाना स्वप्न जागृती । लोपूनि ये सुषुप्ती । तैं क्षण एक चित्तवृत्ती । तेचि होय ॥ ९९ ॥ [सत्वं सुखे संजयति] तैसीं रजतमें हारवी । जैं सत्व माजु

---

* त्रिविधि. † गुणाभासीं.

---

१ आळस येतां, स्वस्थ पडला असतां. २ ताडी. ३ गाल, डोकें. ४ मस्तकाधार. ५ प्रीतीची इच्छा. ६ ब्रह्मदेवाचें आयुष्य. ७ सहज. ८ कलत, उगाच. ९ बलात्कारें. १० साध्य. ११ असाध्य. १२ पंखांनीं. १३ इच्छेनें. १४ प्रवृत्त होतो. १५ न करण्याच्या कामीं. १६ धैर्य. १७ चांगल्यास, आत्म्यास. १८ वृष्टि. १९ उष्मा.

भिरवी । तैं जीवाकरवीं ह्मणवी । सुखिया ना मी ॥ २०० ॥ [ज्ञानमावृत्य तु तमः] तैसेंचि सत्व रज । लोपूनि तमाचें भोज[1] । वळघे तैं सहज । प्रमादी[2] होय ॥ १ ॥ [रजः कर्मणि भारत] तयाचि गा परिपाटीं । सत्व तमातें पोटीं । घालूनि जेव्हां उठी । रजोगुण ॥ २ ॥ तेव्हां कर्मावांचूनि कांहीं । आन गोमटें नाहीं । ऐसें मानी देहीं । देहराज ॥ ३ ॥ *त्रिगुणनिरूपण । तीं[3] श्लोकीं सांगीतलें जाण । आतां †सत्वादिवृद्धिलक्षण । सादर परियेसा ॥ ४ ॥

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्वमित्युत ॥ ११ ॥

लोभः प्रवृत्तिरारंभः कर्मणामशमः स्पृहा ।
रजस्येतानि जायंते विवृद्धे भरतर्षभ ॥ १२ ॥

अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।
तमस्येतानि जायंते विवृद्धे कुरुनंदन ॥ १३ ॥

यदा सत्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।
तदोत्तमविदाँल्लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४ ॥

रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते ।
तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥ १५ ॥

[सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्] पैं रजतमाविजयें । सत्व गा देहीं इये । वाढतां चिन्हें तियें । ऐसीं होती ॥ ५ ॥ जे प्रज्ञा आंतुलीकडे । न समाती बाहेरी वोसंडे[4] । वसंतीं पद्मखंडें । द्रुती[5] जैसी ॥ ६ ॥ सर्वेंद्रियांच्या आंगणी । विवेक करी राबणी । साचचि करचरणीं । होती डोळे ॥ ७ ॥ [प्रकाश उपजायते] राजहंसापुढें । चांचूचें आंगरडें[6] । तोडी जेविं झगडे । क्षीरनीराचे ॥ ८ ॥ तेविं दोषादोषविवेकीं । इंद्रियेंचि होती पारखी । नियम बारे पैंयिकीं[7] । वोळगे तैं ॥ ९ ॥ नायिकणें तें कानचि वाळी[8] । न पाहणें तें दिठीचि गाळी । अवाच्य तें टाळी । जीभचि गा ॥ २१० ॥ वातीपुढां जैसें । पळों लागे काळवसें[9] । निषिद्ध इंद्रियां तैसें । समोर नोहे ॥ ११ ॥ धाराधरकाळें[10] । महानदी

* त्रिगुणवृद्धि. † सत्ववृद्धि.

१ महत्व, राज्य. २ असावध. ३ 'तत्र सत्त्वं निर्मलत्वात्' इत्यादि या अध्यायाच्या साहाव्या श्लोकापासून ३ तीन श्लोकांनीं. ४ सांडत निघे. ५ सुवास. ६ टोंच, अग्र. ७ चाकरी करण्यास. ८ दूर टाकी. ९ अंधार. १० पर्जन्यकाळीं.

उचंबळे । तैसी बुद्धी पघळे । शास्त्रजातीं ॥ १२ ॥ [ज्ञानं यदेत्यधी] अगा पुनवेच्या दिवशीं । चंद्रप्रभा धांवे आकाशीं । ज्ञानीं वृत्ति तैसी । फांके सैंघ[1] ॥ १३ ॥ वासना ऐकवटे[2] । प्रवृत्ति वोहटे । मानस विटे । विषयांवरी ॥ १४ ॥ [यदा सत्त्वे प्रवृद्धे तु] एवं सत्व वाढे । तैं हें चिन्ह फुडें । [प्रलयं याति देहभृत्] आणि निधनही घडे । तेव्हांचि जरी ॥ १५ ॥ कां पाहालेनि सुयाणें[3] । जालया परगुणें[4] । पढियंतें *पाहुणें । स्वर्गोनि ये ॥ १६ ॥ [तदोत्तमविदोंऽलोकानिति] तरि जैसीचि घरींची संपत्ती । आणि तैसीच औदार्यधैर्यवृत्ती । मा परत्रा[5] आणि कीर्ती । कां नोहावें ॥ १७ ॥ मग गोमटेया तया । †जांवळी[6] असे धनंजया । तेविं ‡सत्वें जाणे देहा । कें आथि गा ॥ १८ ॥ जे स्वगुणीं उद्भट । घेऊनि सत्व चोखट । निघे सांडूनि कोपट[7] । भोगमोक्ष हें[8] ॥ १९ ॥ अवचटें ऐसा जो जाये । तो सत्वाचाचि नवा होये । किंबहुना जन्म लाहे । ज्ञानियांमाजि ॥ २२० ॥ सांग पां धनुर्धरा । रावो रायपणें डोंगरा । गेलिया अपुरा । होय काई ॥ २१ ॥ ना तरि येथिंचा दिवा । नेलिया सेजियां[9] गांवा । तो तेथें तरि पांडवा । दीपचि कीं ॥ २२ ॥ तैसी ते सत्वशुद्धी । आगळी ज्ञानेंसी वृद्धी । तरंगावों[10] लागे बुद्धी । विवेकावरी ॥ २३ ॥ पैं महदादिप[11]रिपाटी । विचारूनि शेवटीं । विचारासकट पोटीं । जिरोनि जाय ॥ २४ ॥ छत्तीसां[12] सततीसावें । चोविसां[13] पंचवीसावें । तिन्हीं[14] नुरोनि स्वभावें । चतुर्थ[15] जें ॥ २५ ॥ ऐसें सर्व जें सर्वोत्तम । जालें असे जया सुगम । तयासवें निरुपम[16] । लाहे देह ॥ २६ ॥ इयाचि परी देख । तमसत्व अधोमुख । बैसौनि जैं आगळीक । धरी रज ॥ २७ ॥ [रजस्येतानि जायंते] आपलिया कार्याचा । धुमाड[17] गांवीं[18] देहाचा । माजवी तैं चिन्हाचा । उदय ऐसा ॥ २८ ॥ पांजरेली[19] वाहटुळी । करी वेगळ वेंटाळी । तैसी विषयीं सैरळी[20] । §इंद्रियां होय ॥ २९ ॥ [लोभः] परदारादिक पडे । परि विरुद्ध ऐसें नावडे । मग शेळियेचेनि तोंडें । सैंघ[21] चारी ॥ २३० ॥ हा ठायवरि लोभ । करी स्वैरत्वाचा[22] राब । वेटाळितां अलाभ । तें तें उरे ॥ ३१ ॥ [प्रवृत्तिः] आणि आड पडलिया । उद्यमजातां भलतिया । प्रवृत्ती धनंजया । हात न काढी ॥ ३२ ॥ [आरंभः] तेविंचि एखादा प्रासाद[23] । कां करावा अश्वमेध । ऐसा अचाट छंद । घेऊनि उठी ॥ ३३ ॥ नगरेंचि रचावीं । जळाशयें निर्मावीं । महावनें लावावीं । नानाविधें ॥ ३४ ॥

---

* ये पाहुणें । स्वर्गोनियां. † जवळीं. ‡ सत्वीं. § इंद्रियें होती.

---

१ पुष्कळ. २ आकुंचित होई. ३ उदय पावल्यानें. ४ सुकाळ. ५ पक्वान्न, सण. ६ स्वर्ग. ७ शेजाऱ्यासारखें, उपमा. ८ शरीर, खोंपट. ९ विषयभोगीं सामर्थ्यवान्. १० शेजारच्या. ११ पोंहूं लागे. १२ महत्तत्वादिकांचा क्रम. १३ छत्तीस तत्वांला. १४ देहत्रयवअवस्थात्रय. १५ ब्रह्म. १६ बसवून. १७ धूर. १८ शरीररूप गांवांत. १९ उठलेली, पिंजारलेली. २० मोकळीक. २१ बहुत. २२ स्वेच्छाचारी वर्तन. २३ देवालयादि.

[कर्मणां] ऐसैसां अफाटीं कर्मीं । समारंभ [1]उपक्रमी । [अशमः] आणि दृष्टादृष्ट-[2]कामीं । पुरें न ह्मणे ॥ ३५ ॥ सागरही *सांडीं पडे । आगी न लाहे तीन [3]कवडे । ऐसें अभिलाषीं जोडे । दुर्भरत्व ॥ ३६ ॥ [स्पृहा] [4]स्पृहा मना पुढां । आशेचा घे [5]दवडा । विश्व घापे चाडा । पायांतळीं ॥ ३७ ॥ [विवृद्धे भरतर्षभ] इत्यादि वाढतां रजीं । इयें चिन्हें होती साजीं । [रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते] आणि ऐशा †समाजीं । वेंचे जरी देह ॥ ३८ ॥ तरि आघवाचि इहीं । परिवारला आनी देहीं । रिगे परि योनिही । मानुषीचि ॥ ३९ ॥ [6]सुरवाडेंसि भिकारी । वसो पां राजमंदिरीं । तरी काय अवधारीं । रावो होइल ॥२४०॥ बैल तेथें [7]करेबाडें । हें न चुके गा फुडें । नेइजो कां वन्हाडें । समर्थाचेनि ॥ ४१ ॥ ह्मणौनि व्यापाराच्या हातीं । [8]उसंतु [9]देहीं ना राती । तैसयाचिये [10]पांतीं । जुंपिजे तो ॥ ४२ ॥ [11]कर्मजडाच्या ठायीं । किंबहुना होय देही । जो रजोवृत्तीच्या डोहीं । बुडोनि [12]निमे ॥ ४३ ॥ मग तैसाचि पुढती । रजसत्ववृत्ती । ‡गिळूनि ये उन्नती । तमोगुण ॥ ४४ ॥ तैंचि जियें [13]लिंगें । देहींचीं सबाह्य सांगें । तियें परिस चांगें । श्रोत्रबळें ॥ ४५ ॥ [अप्रकाशः] तरी होय ऐसें मन । जैसें रविचंद्रहीन । रात्रीचें कां गगन । अंवसेचिये ॥ ४६ ॥ [अप्रवृत्तिश्च] तैसें अंतर [14]असोस । होय स्फूर्तिहीन [15]उद्वस । विचाराची भाष । हारपे तैं ॥ ४७ ॥ [प्रमादः] बुद्धि मेचवेना [16]धोंडी । हा ठायवरी [17]मवाळें सांडी । आठवो देशधडी । जाला दिसे ॥ ४८ ॥ [मोह एव च] अविवेकाचेनि माजें । सबाह्यशरीर गाजे । एकलेनि घेपे दीजे । मौढ्यें तेथ ॥४९॥ आचारभंगाचीं हाडें । रूपती इंद्रियांपुढें । [18]मेरे जरी तेणे कडे । क्रियां जाय॥२५०॥पैं आणिकही एक । दिसे । जे दुष्कृतीं चित्त §उल्हासे । आंधारीं देखणें जैसें । [19]डुंडुळाचें ॥ ५१ ॥ तैसें निषिद्धाचेनि नांवें । भलतेही भरे हांवे । तियेविषयीं [20]धांवे । घेती [21]करणें ॥ ५२ ॥ [22]मंदिरा न घेतां डुले । सन्निपातेंवीण बरळे । निष्प्रेमेंचि भुले । पिसें जैसें ॥ ५३ ॥ चित्त तरी गेलें आहे । परि [23]उन्मनी ते नोहे । ऐसें [24]मोल्हातिजे मोहें । [25]माजिरेनि ॥ ५४ ॥ [तमसि] किंबहुना ऐसैसीं । इये चिन्हें तम पोषी । जैं वाढे [26]आयितीसी । आपुलिया ॥ ५५ ॥ [तथा प्रलीनस्तमसि

---

* सांडोवा. † माजीं. ‡ गाळूनि. § उससे.

---

१ प्रारंभ करी. २ स्थूलसूक्ष्म, लहानमोठें. ३ पराजय पावे, हारे. ४ कवड्या. ५ अपहारांविषयीं. ६ इच्छा. ७ धांव. ८ घातलें जातें. ९ सिद्ध. १० आशा इत्यादिक परिवारासह. ११ सुखासहित. १२ कडवा. १३ विसावा. १४ दिवसा. १५ पंक्तीला. १६ कर्मांविषयीं श्रद्धालूंच्या. १७ मरे. १८ चिन्हें. १९ गडद, फार, अत्यंत. २० शून्य. २१ तुळवेना, इच्छवेना. २२ मृदुपण. २३ मरेल जर तर त्या कडेनें क्रिया जाईल. २४ घुवडाचें. २५ धांव. २६ इंद्रियें. २७ मद्य, दारू. २८ मनाचा लय जींत होतो ती पांचवी अवस्था. २९ आश्रय पावे, उन्मत्त. ३० उन्मत्तपणानें. ३१ सामुग्रीसहित.

मूढयोनिषु जायते] आणि हेंचि होय प्रसंगें । मरणाचें जरी पडे खांगें[1] । तरि तेतुलेनि निगे । तमेंसीं तो ॥ ५६ ॥ राई राईपण बीजीं । सांठवूनियां अंग त्यजी । मग निरूढे[2] तैं दुणी । गोठी आहे ॥ ५७ ॥ पैं होऊनि दीपकलिका । येरु आगी विझो कां । कां जेथ लागे तेथ असका[3] । तोचि आहे ॥ ५८ ॥ ह्मणोनि तमाचिये लौथे[4] । बांधोनियां संकल्पातें । देह जाय तैं मागौतें । तमाचेंचि होय ॥ ५९ ॥ आतां काय येणें बोलें । जो तमोवृद्धि मृत्यु लाहे । तो पशु कां पक्षी होये । झाडा हा कृमी ॥ २६० ॥

कर्मणः सुकृतस्याहुः सात्विकं निर्मलं फलम् ।
रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ॥ १६ ॥

[कर्मणः सुकृतस्याहुरिति] येणेंचि पैं कारणें । जें निपजे सत्वगुणें । तें सुकृत ऐसें ह्मणें । *श्रौतसमो ॥ ६१ ॥ ह्मणौनि तया निर्मळा । सुखज्ञानी सरळा । अपूर्व ये फळा । सात्विक तें ॥ ६२ ॥ [रजसस्तु फलं दुःखं] मग राजसा जिया क्रिया । तया †इंद्रावणी फळलिया । जे सुखें चिंतारूनियां । फळती दुःखें ॥ ६३ ॥ कां निंबोळियेचें पिक । वरि गोड आंत विख । तैसें तें राजस देख । क्रियाफळ ॥ ६४ ॥ [अज्ञानं तमसः फलं] तामस कर्म जितुकें । अज्ञान फळेंचि पिके । विषांकुर विखें । जियापरी ॥ ६५ ॥

सत्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ।
प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥ १७ ॥

[सत्वात्संजायते ज्ञानं] ह्मणौनि बारे अर्जुना । येथ सत्वचि हेतु ज्ञाना । जैसा कां दिनमाना । सूर्य हा पैं ॥ ६६ ॥ [रजसो लोभ एव च] आणि तैसेंचि हें जाण । लोभासि ‡रज कारण । आपलें विस्मरण । अद्वैता जेवीं ॥ ६७ ॥ [प्रमादमोहौ इत्यर्धं] मोह अज्ञान प्रमादा[5] । ययां मैळेया दोषवृंदा । पुढती पुढती प्रबुद्धा । तमचि मूळ ॥ ६८ ॥ ऐसे विचाराच्या डोळां । तिन्हीं गुण वेगळवेगळां । दाविले जैसा आंवळा । तळहातींचा ॥ ६९ ॥ तंव रजतमें दोन्हीं । देखिलीं प्रौढपतनीं । सत्वावांचुनि नाणी । ज्ञानाकडे ॥ २७० ॥ ह्मणौनि सात्विकवृत्ती । एक जाले §जन्मव्रती[11] । सर्व त्यागें चतुर्थी[12] । भक्ति जैसी ॥ ७१ ॥

ऊर्ध्वं गच्छंति सत्वस्था मध्ये तिष्ठंति राजसाः ।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छंति तामसाः ॥ १८ ॥

[ऊर्ध्वं गच्छंति सत्वस्थाः] तैसें सत्वाचेनि ¶नटनाचें[13] । असणें जाणें जयांचें ।

* श्रुतिसमूह. † इंद्रवारुणी. ‡ जय. § जन्मवृत्ती. ¶ नडनाचें.

१ खळें, पेणें. २ वाढे. ३ सर्व. ४ गांठोड्यांत, मोटेंत. ५ बहुभाषणानें. ६ श्रुतिसमुदाय. ७ सहज. ८ कडू वृंदावन. ९ दाखवून, रंगवून. १० असावधपणा. ११ आजन्म व्रताचरण करणारे. १२ 'आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानं च–' इत्यादि चतुर्विध भक्तींतील चवथी ज्ञानभक्ति. १३ विकसितपणानें.

ते तनुत्यागीं स्वर्गींचे । राय होती ॥ ७२ ॥ [मध्ये तिष्ठंति राजसाः] इयाचि परी रजें । जिहीं कां जीजे मरिजे । तिहीं मनुष्य होइजे । मृत्युलोकीं ॥ ७३ ॥ तेथ सुखदुःखाचें खिचटें । जेविजे एकेचि तांटें । जेथ इये मरणवाटे । पडिलें नुठी ॥ ७४ ॥ [जघन्यगुणवृत्तिस्थाः] आणि तयाचिस्थिती तमीं । जे वाढोनि निमती भोगेक्षमीं । ते घेती नरकभूमी । मूळपत्र ॥ ७५ ॥ एवं वस्तूचिया सत्ता । त्रिगुणासि पंडुसुता । दाविली सकारणता । आघवीचि ॥ ७६ ॥ [एवं चतुर्दशश्लोकैर्गुणव्याख्या समाप्ता । प्रकरणार्थमुपसंहरति] पैं वस्तु वस्तुत्वें असिकें । तें आपणपें गुणासारिखें । देखोनि कार्यविशेखें । अनुकरे गा ॥ ७७ ॥ जैसें कां स्वप्नीचेनि राजें । जैं परचक्र देखिजे । हारि जैत होइजे । आपणचि ॥ ७८ ॥ तैसे मध्योर्ध्व अध । जे हे गुणवृत्तिभेद । ते दृष्टिवांचुनि शुद्ध । वस्तुचि असे ॥ ७९ ॥

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टाऽनुपश्यति ।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥ १९ ॥

[नान्यं गुणेभ्यः कर्तारं] परि हे वाहणी असो । तरि तुज आन न दिसो । परिसें ते सांगतसों । मागील गोष्टी ॥ २८० ॥ ['सत्त्वं रजस्तम इति' इति पंचमश्लोकाभिप्रायं दर्शयति] तरि ऐसें *जाणिजे । सामर्थ्यें तिन्ही सहजें । होती देहाव्याजें । गुणचि हे ॥ ८१ ॥ इंधनाचेनि आकारें । अग्नि जैसा अवतरे । कां आंबेनि तरुवरें । भूमिरस ॥ ८२ ॥ ना ना दहियाचेनि मिसें । परिणमे दूधचि जैसें । कां मूर्त होय उंसें । गोड जेवीं ॥ ८३ ॥ तैसें हें सांतःकरण । †देहचि होती त्रिगुण । ह्मणोनि बंधासि कारण । घडे कीर ॥ ८४ ॥ परि चोज हें धनुर्धरा । जे ‡ही गुंफिरी । मोक्षाचा संसारा । उणा नोहे ॥ ८५ ॥ त्रिगुण §आपलालिया धर्मे । देहींचें मागुतें सांडमें । चाळितांही न खोमे । गुणातीतता ॥ ८६ ॥ ऐसी मुक्ती असे सहज । तें आतां परिसऊं तुज । जे तूं ज्ञानांबुज । द्विरेफ कीं ॥ ८७ ॥ [गुणेभ्यश्च परं वेत्ति] आणि गुणीं गुणाजोगें । चैतन्य नोहे भोगें । बोलिलों तें खोगें । तेवींचि हें ॥ ८८ ॥ तरि पार्था जैं ऐसें । बोधलेनि जीवें दिसे । स्वप्न कां जैसें । चेइलेनि ॥ ८९ ॥ ना तरी आपण जळीं । बिंबलों तीरोनि न्याहाळी । चलण

* निजनिजें. † देहींच. ‡ हा. § आपुलालेनि.

१ वांचावें. २ खिचडी. ३ देहच ताट त्यांत. ४ त्याचप्रमाणें. ५ देहीं. ६ आमंत्रणचिठी. ७ संपूर्ण. ८ गुणानुकूल आत्मस्वरूप पाहून. ९ जय, पराजय. १० गुणदृष्टीवांचून. ११ बोलणें. १२ देहाच्या निमित्तानें. १३ साकार दिसे. १४ पाणी. १५ नवल. १६ एवढ्याही गुंतागुंतीनें (बंधनानें) मोक्षाचे वृद्धीस न्यूनता नाहीं. १७ देहींचें मागचें पुढचें जन्ममृत्यु कार्यकारणकर्तृत्व. १८ समोर. १९ उणी न होणें. २० ज्ञानकमलावरचा भ्रमर. २१ अध्याय १३ श्लोक २१ 'अनादित्वान्निर्गुणत्वात्' या श्लोकांत सांगितलेलें. २२ तात्पर्य, प्रमेय.

होतां कल्होळीं । अनेकधा ॥ २९० ॥ कां नटलेनि लाघवें । नट जैसा न झकवे । तैसें गुणजात देखावें । न होनियां ॥ ९१ ॥ पै ऋतुत्रय आकाशें । धरूनियांही जैसें । नेदिजेचि येवों *वेसें । वेगळेपणा ॥ ९२ ॥ तैसें गुणीं गुणापरौतें । जें आपणपें असे आयितें । तिये अहं बैसे अहंते । मूळकेचिये ॥ ९३ ॥ [यदा द्रष्टानुपश्यति] पैं तेथूनि मग पाहतां । ह्मणे साक्षी मी अकर्ता । हे †गुणाचि क्रियाजातां । नियोजित ॥ ९४ ॥ सत्वरजतमाच्या । भेदीं प्रैसर कर्माचा । होत असे तो गुणांचा । विकार हा ॥ ९५ ॥ ययामाजि मी ऐसा । वनीं कां वसंत जैसा । वनलक्ष्मी विलासा । हेतुभूत ॥ ९६ ॥ कां तारांगणीं लोपावें । सूर्यकांतीं उदीपावें । कमळीं विकासावें । जावें तमें ॥ ९७ ॥ यया कोणाचें कांहीं । सविता जैसा देखत नाहीं । तैसा अकर्ता मी देहीं । सत्तारूप ॥ ९८ ॥ मी दाउनी गुण देखे । गुणता हे मियां पोखे । ययाचेनि निःशेषें । उरे तें मी ॥ ९९ ॥ ऐसेनि विवेकें जया । उदय होय धनंजया । ये गुणातीतता तया । ऊर्ध्वपंथें ॥ ३०० ॥

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् ।
जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥ २० ॥

[गुणानिति] आतां निर्गुण असे आणिक । तें तो जाणे अचुक । जे ज्ञानें केलें टीक । तयाचिवरी ॥ १ ॥ [मद्भावं सोऽधिगच्छति] किंबहुना पंडुसुता । ऐसी तो मींजी सत्ता । पावे जैसी सरिता । सिंधुत्व गा ॥ २ ॥ नळिकेवरूनि उठिला । जैसा शुक शाखे बैसला । तैसा मूळअहंता ठाकिला । तो मी ह्मणौनि ॥ ३ ॥ अगा अज्ञानाचिया निदें । जो घोरतें होता बदबदा । तो स्वरूपीं प्रबुद्धा । चेईला कीं ॥ ४ ॥ पैं बुद्धिभेदाचा आरिसा । तयाहातोनि पडिला वीरेशा । ह्मणौनि प्रकृति मुखाभासा । मुकला तो ॥ ५ ॥ देहाभिमानाचा वारा । आतां वाजों ठेला वीरा । तैं ऐक्य वीचिसागरां । जीवेशां हें ॥ ६ ॥ ह्मणौनि मद्भावेंसीं । प्राप्ति पाविजे तेणेंसरिसी । वर्षांतीं आकाशीं । घनजात जेवीं ॥ ७ ॥ तेविं मीं होऊनि निरुता । मग देहींचि ये असतां । नागवे देहसंभूतां । गुणांसि तो ॥ ८ ॥ जैसा भिंगाचेनि घरें । दीपप्रकाश नोवरे । कां न विझेचि सागरें । वडवानळ ॥ ९ ॥ तैसा ओ-

* वोसे. † गुणाची. ‡ नियोजना.

१ ठकबाजीनें, कौशल्यानें. २ वश्य, 'वोसे' अशा पाठीं कमीपणा. ३ गुणांत असून जें गुणांच्या पलीकडे आहे. ४ मूळवस्तूप्रत. ५ सर्व कर्मांला. ६ योजितात. ७ विस्तार. ८ शोभेला. ९ प्रकाशावें, पेटावें. १० पोसली जाते. ११ निखालस, निरासानें. १२ उत्तम मार्गानें, ऊर्ध्वगतीनें. १३ भूषण, टिळा. १४ मद्भाव, माझेप्रत. १५ अहंब्रह्म येणेंकरून. १६ निद्रेनें. १७ मी माझें ह्मणणें इत्यादिरूप घोरणें. १८ जागा झाला. १९ मायामुखाच्या प्रतिबिंबाला. २० तरंगाला व समुद्राला. २१ आवरत नाहीं. २२ येण्याजाण्यानें.

लागेला गुणाचा । बोधें[1] न मैळे[2] तयाचा । तो देहीं जैसा व्योमींचा । चंद्र जळीं ॥ ३१० ॥ तिन्हीं गुण आपुलालिये प्रौढी । देहीं नाचविती बागडीं[3] । तो पाहोंही न धाडी । अहंतेतें ॥ ११ ॥ हाठायवरी । नेहटोनि[4] ठेला अंतरीं । आतां काय वर्ते शरीरीं । हेंही नेणें ॥ १२ ॥ सांडूनि आंगींची खोळी[5] । सर्प रिगालिया पाताळीं । ते त्वचा कोण सांभाळी । तैसें जालें ॥ १३ ॥ कां सौरभ्य जीर्ण[6] जैसा । आमोद मिळोनि जाय आकाशा । माघारा कमळकोशा । नयेचि तो ॥ १४ ॥ पैं स्वरूपसमरसें[7] । ब्रह्मही[8] गा जालें तैसें । तेथ किंधर्म हें कैसें । नेणे देह ॥ १५ ॥ [जन्मेत्यर्ध] ह्मणौनि जन्मजरामरण । इत्यादि जे साही गुण । ते देहींचि ठेले कारण । नाहीं तयां ॥ १६ ॥ घटाचिया खापरिया । घटभंगीं फेडिलिया । महदाकाश अपैसया[9] । जालेंचि असे ॥ १७ ॥ तैसी देहबुद्धि जाये । जैं आपणपां[10] आंठौ[11] होये । तैं आन कांहीं आहे । तेंवांचुनी ॥ १८ ॥ येणें थोर बोधलेपणें । तयासि गा देहीं असणें । ह्मणूनि तो मी[12] ह्मणें । गुणातीत ॥ १९ ॥ यया दैवाचिया बोला । पार्थ अतिसुखावला । मेघें संबोखिलें[13] । मयूर जैसा ॥ ३२० ॥

अर्जुन उवाच–कैर्लिंगैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ।
किमाचारः कथं चैतांस्त्रीन् गुणानतिवर्तते ॥ २१ ॥

[अर्जुन उवाच—कैरिति] तेणें तोषें वीर पुसे । जी कोण्हीं चिन्हीं तो दिसे । जयामाजी वसे । ऐसा बोध ॥ २१ ॥ [किमाचार इति] तो निर्गुण काय आचरे । कैसेनि गुण निस्तरे[14] । हें सांगिजो माहेरें । कृपेचेनि ॥ २२ ॥ यया अर्जुनाचिया प्रश्ना । [श्रीभगवानुवाच–] तो षड्गुणांचा राणा । परिहार[15] ऐकर्णा[16] । बोलत असें ॥ २३ ॥ ह्मणे पार्था तुझी नवाई[17] । हें येतुलेंचि पुससी काई[18] । तें नामचि तया पाहीं । साच लटिकें ॥ २४ ॥ गुणातीत जया नांव । तो गुणाधीन तरी नव्हे । ना होय तरी नागवे[19] । गुणां यया ॥ २५ ॥ परि अधीन कां नागवे । हेंचि कैसेनि जाणावें । गुणांचिये रवैरवे[20] । माजि असतां ॥ २६ ॥ हा संदेह जरी वाहसी । तरि सुखें पुसों लाहसी । परिस आतां तयासी । रूप करूं ॥ २७ ॥

श्रीभगवानुवाच–प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव ।
न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति ॥ २२ ॥

[प्रवृत्तिं च] तरि रजाचेनि माजें । देहीं कर्मांचें आणोजें[21] । प्रवृत्ती जैं

---

१ शुद्धज्ञान. २ मळत नाहीं. ३ सोंगें. ४ निश्चयानें. ५ कांत. ६ अत्यंत परिमल. ७ जिरलेला. ८ सुगंधयुक्त वारा. ९ स्वतःचे ब्रह्मस्वरूपास ऐक्यत्व होऊन. १० आपणच. ११ आठवण. १२ श्रीकृष्ण. १३ तृप्त केला. १४ निवारी. १५ उत्तर. १६ ऐका. १७ गुणातीत हें नांव. १८ न सांपडे. १९ गुंताड्यामध्यें. २० मोड, अंकुर.

घेइजे । वेंटाळूनि ॥ २८ ॥ तैं मीचि कां कर्मठ । *ऐसेनये श्रीमंठ । कां दरिद्रलिये बुद्धी वीट । तोही नाहीं ॥ २९ ॥ [प्रकाशं च] अथवा सत्वेंचि अधिकें । जैं सर्वेंद्रियीं ज्ञान फांके । तैं सुविद्यतातोखें । उंभेजेही ना ॥ ३० ॥ [मोहमेव च पांडव] कां वाढिनलेनि तमें । न गिळेजेचि मोहभ्रमें । तैं अज्ञानत्वें न श्रमें । घेणेंही नाहीं ॥ ३१ ॥ [न द्वेष्टीति] पैं मोहाच्या अवसरीं । ज्ञानाची चाड न धरी । ज्ञानें कर्मे नादरी । होतां न दुःखी ॥ ३२ ॥ सायंप्रातर्मध्यान्हा । या तिहीं काळांची गणना । नाहीं जेविं तपना । तैसा असे ॥ ३३ ॥ तया वेगळाचि काय प्रकाशें । ज्ञानित्व यावें असे । काय जळार्णव पाउसें । साजा होय ॥ ३४ ॥ ना प्रवर्तलेनि कर्मे । कर्मठत्व तया कां गमे । सांगें हिमवंत हिमें । कांपे काय ॥ ३५ ॥ ना तरि मोह आलिया । काइ पां ज्ञाना मूकिजेल तया । महा आगीतें उन्हाळेया । जाळवत असे ॥ ३६ ॥

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ।
गुणा वर्तंत इत्येव योऽवतिष्ठति नेंगते ॥ २३ ॥

[आसीनः] तैसें गुणागुण कार्य हें । आघवेंचि आपण आहें । ह्मणोनि एकेका नोहे । तंडातोडी ॥ ३७ ॥ [उदासीनवत्] येवढेया गा प्रतीती । तो देहा आलासे वस्ती । †वाटे जातां गुंती- । माजि जैसा ॥ ३८ ॥ तो जिणंता ना हारवी । तैसा गुण नव्हे ना करवीं । जैसी कां श्रोणवी । संग्रामींची ॥ ३९ ॥ कां शरीराआंतील प्राणु । घरीं आतिथ्याचा ब्राह्मणु । नाना चोहटांचा स्थाणू । उदास जैसा ॥ ३४० ॥ [गुणैर्यो न विचाल्यते] आणि गुणाचा यावा जावा । ढळे चळे ना पांडवा । मृगजळाचा हेलावा । मेरु जैसा ॥ ४१ ॥ हें बहुत काय बोलिजे । व्योमवारेनि न वीजिजे । कां सूर्य ना गिळिजे । अंधकारें ॥ ४२ ॥ स्वप्न कां गा जियापरि । जागतयातें न सिंतरी । गुणी तैसा अवधारीं । न बंधिजे तो ॥ ४३ ॥ [गुणा वर्तंत इत्येव] गुणासि कीर नातुडे । परि दुरूनि जैं पाहे कोडें । तै गुणदोष सांथिखडें । सभ्य जैसा ॥ ४४ ॥ सत्कर्मे सात्विकीं । रज तें रजोविषयकीं । तममोहादिकीं । वर्तत असे ॥ ४५ ॥ [योऽवतिष्ठति नेंगते] परिस तयाचिया गा सत्ता । होती गुणक्रिया समस्ता । हें फुडें जाणें सविता । लौकिकीं जेविं ॥ ४६ ॥ समुद्रचि भरती । सोमकांतची द्रवती । कुमुदें विकासती । चंद्र तो उगा ॥ ४७ ॥ कां वाराचि वाजे विझे ।

---

* ऐसा नये. † वाटेमाजि गुंती । जातां जैसी.

---

१ लक्ष्मीमान, श्रीमद. २ दारिद्र्यामुळें. ३ अति विद्वान या गर्वानें. ४ संतोषत नाहीं. ५ सूर्याला. ६ ताजा. ७ करतांना. ८ वेगळा. ९ अडथळा. १० जय पावणार. ११ हरणार. १२ निशाण, भूमि. १३ येण्याजाण्यानें. १४ हेलाव्यानें. १५ हाले. १६ भ्रमवी, फसवी. १७ चित्र, बाहुली. १८ पाहणार, सभासद. १९ जाणतो. २० लोकव्यवहाराला. २१ उगा राहे.

गगनें निश्चळ असिजे । तैसा गुणाचिये गजबजे । डोलेना जो ॥ ४८ ॥ अर्जुना येणें लक्षणें । तो गुणातीत जाणणें । परिस आतां आचरणें । तयाचीं जीं ॥ ४९ ॥

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकांचनः ।
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ॥ २४ ॥

[समदुःखसुखः] तरि वस्त्रासि पाठीं पोटीं । नाहीं सुतावांचूनि किरीटी । ऐसें सुये दिठी । चराचर मद्रूपें ॥ ३५० ॥ ह्मणोनि सुखदुःखासारिसें । कांटाळें आचरे ऐसें । रिपुभक्तां जैसें । हरीचें देणें ॥ ५१ ॥ येरवीं तरि सहजें । सुखदुःख तैंची सेविजे । देहजळीं होइजे । मासोळी जैं ॥ ५२ ॥ [स्वस्थः] आतां तें तंव तेणें सांडिलें । आहे स्वस्वरूपेंसींचि मांडिलें । सैस्यांतीं निवडिलें । बीज जैसें ॥ ५३ ॥ कां बोध सांडूनि गंगा । रिघोनि समुद्राचे आंगा । निस्तरली लगबगा । खळाळाची ॥ ५४ ॥ तेविं आपणपांचि जया । वस्ती जाली गा धनंजया । तया देहीं अपैसया । सुख तैसें दुःख ॥ ५५ ॥ रात्रि तैसें पाहलें । हें धारणा जेविं एक जालें । आत्मारामा *देहीं आतलें । द्वंद्वें तैसें ॥ ५६ ॥ पैं निद्रिताचेनि आंगेंसि । सांप तैशी उर्वशी । तेविं स्वरूपस्था सरिसीं । देहीं द्वंद्वें ॥ ५७ ॥ [समलोष्टाश्मकांचनः] ह्मणौनि तयाच्या ठायीं । शेणा सोनया विशेष नाहीं । रत्ना गुंडेया कांहीं । नेणिजे भेद ॥ ५८ ॥ [तुल्यप्रियाप्रियः] घरा येवो पां स्वर्गु । कां वैरिपडो वाघु । परि आत्मबुद्धीसी भंगु । कदा नोहे॥५९॥ [धीरः] निवटलें न उपवढे । जळींनलें न विरूढे । साम्यबुद्धी न मोडे । तयापरी ॥ ३६० ॥ [तुल्यनिंदात्मसंस्तुतिः] हा ब्रह्मा ऐसेनि स्तविजो । कां नीच ह्मणोनि निंदिजो । परि नेणे जळों विझों । राख जैसी ॥ ६१ ॥ तैसी निंदा आणि स्तुती । नये कोण्हेचि व्यक्ती । नाहीं आंधारें कां वाती । सूर्या घरीं ॥ ६२ ॥

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ।
सर्वारंभपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ २५ ॥

[मानापमानयोस्तुल्यः] ईश्वर ह्मणोनि पूजिला । कां चोर ह्मणोनि गांजिला । वृषगजीं वेढिला । केला रावो ॥ ६३ ॥ [तुल्यो मित्रारिपक्षयोः] कां सुहृद पासीं आलें । अथवा वैरी वैरपडे जाले । परि नेणे राती पाहालें । तेज जेविं ॥६४॥ साही ऋतु येतां आकाशें । लिंपिजेचि ना जैसें । तेविं वैषम्य मानसें । जाणिजेना

---

* देहा.

१ समतोल. २ ताजवा. ३ धान्य मळण्याच्या प्रसंगीं. ४ आत्मस्वरूपीं. ५ आपोआप. ६ दिवसाचें. ७ बुद्धीला, स्तंभाला. ८ प्राप्त झालें. ९ सुखदुःखादि. १० सर्पाप्रमाणें. ११ दगडाला. १२ प्राप्त होवो. १३ मेलें. १४ जागें होत नाहीं. १५ उगवत नाहीं. १६ वैल हत्ती यांनीं. १७ प्राप्त.

॥६५॥ [सर्वारंभपरित्यागी] आणीकही ऐक पाहीं। आचार तयाच्या ठायीं । तरि व्यापारासि नाहीं। जालें[1] दिसे॥६६॥सर्वारंभा[2] उटकलें। प्रवृत्तीचें तेथ *मावळलें। जळती गा कर्म फळें । ते[3] तो आगी ॥६७॥ इष्टादृष्टाचेनि[4] नांवें । भावचि जीवीं नुगवे । तें सेवी जें स्वभावें । पैठें[5] होये ॥ ६८ ॥ सुखे †ना शिणे । पाषाण जेणें मानें । तैसीं सांडि मांडी मनें । वर्जिली असे ॥ ६९ ॥ [गुणातीतः स उच्यते] आतां किती हा विस्तार । जाणें ऐसा आचार । जयाचा तोचि साचार। गुणातीत ॥ ३७० ॥ गुणातें अतिक्रमणें[6] । घडे उपायें जेणें । तो आतां आईक ह्मणे । श्रीकृष्णनाथ ॥ ७१ ॥

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥ २६ ॥

[संक्षेपार्थः] तरि व्यभिचाररहित[7] चित्तें। भक्तियोगें मातें। सेवी तो गुणातें। ‡जाकळूं[8] शके ॥ ७२ ॥ तरि कोण मी कैसी भक्ति । अव्यभिचारा काय व्यक्ति[9] । हे आघवीचि निरुती[10] । होआवी लागे ॥ ७३ ॥ [मां च यः] तरी पार्था परियेसा । मी तंव येथ ऐसा । रत्नीं किळावो[11] जैसा । रत्नचि तो ॥ ७४ ॥ कां द्रवपणचि नीर । अवकाशचि अंबर[12] । गोडी तेचि साखर । आन नाहीं॥७५॥ वन्हि तेचि ज्वाळ । दळाचि[13] नांव कमळ । रूख तेंचि §डोळ[14] । फळादिक ॥ ७६ ॥ अगा हिम जें आकर्षलें[15] । तेंचि हिमवंत जेविं जालें । नाना दूध मुरालें । तेंचि दहीं ॥ ७७ ॥ [अव्यभिचारेण] तैसें विश्व येणें नांवें । हें मीचि पैं आघवें । घेईं चंद्रबिंब सोलावें । न लगे जेविं ॥ ७८ ॥ घृतार्चे थिजलेपण । न मोडितां घृतचि जाण । कां ¶ नाटितां[16] कांकण । सोनेंचि तें ॥ ७९ ॥ न उकलितां पट । तंतूचि असे स्पष्ट । न विरवितां घट । मृत्तिका जेविं ॥ ३८० ॥ ह्मणोनि विश्वपण जावें । मग तैं मातें धेयावें । तैसा नव्हे आघवें । सकटचि मीं ॥ ८१ ॥ ऐसेनि मातें जाणिजे । ते अव्यभिचारी भक्ति ह्मणिजे । येथ भेद कांहीं देखिजे । तरि व्यभिचार तो ॥ ८२ ॥ [भक्तियोगेन] याकारणें भेदातें । सांडूनि अभेदें चित्तें । आपणयासकट[17] मातें । जाणावें गा ॥ ८३ ॥ पार्था सोनयाची टिक । सोनयासी लागली देख । तैसें आपणपें आणिक । मानावें ना ॥ ८४ ॥ तेजाचा तेजौनि निघाला । परि तेजींचि असे लागला । तया रश्मी ऐसा भला । बोध होआवा ॥ ८५ ॥ पैं परमाणु भूतळीं । हिमकण हिमाचळीं । मजमाजी न्याहाळीं । अहं[18] तैसें ॥ ८६ ॥ हो कां तरंग लाहान । परि सिंधूसीं नाहीं भिन्न । तैसा ईश्वरीं मी आन । नोहेचि $मा ॥८७॥ ऐसेनि बा

---

* मावळें. † ना शीण नेणे. ‡ जाकळूं. § ढाळ. ¶ पाटितो. $ गा.

---

१ दूर झालें. २ ती आग तों आहे. ३ इहलोक व स्वर्ग. ४ प्राप्त. ५ लागालागी. ६ एकनिष्ठेनें. ७ लिंकूं, व्यापूं. ८ लक्षण. ९ निश्चय, व्याख्या. १० तेज. ११ आकाश. १२ कमलपत्रालाच, पानालाच. १३ फांदी. १४ आटलें नाहीं तरी. १५ ऐक्यानें. १६ मी असें.

समरसें । दृष्टी जैं उल्लासे । ते भक्ति पैं ऐसें । आह्मीं ह्मणों ॥ ८८ ॥ आणि ज्ञानाचें चांगावें । इये दृष्टी मानावें । योगाचेंही आघवें । सर्वस्व हें ॥ ८९ ॥ [सिवते] सिंधू आणि जळधरा- । माजी लागली अखंड धारा । तैसी वृत्ति वीरा । प्रवर्ते ते ॥ ३९० ॥ कां कुंहेसीं आकाशा । तोंडीं सांदा नाहीं जैसा । तो परमपुरुषीं तैसा । एकवटे गा ॥ ९१ ॥ प्रतिबिंबौनि बिंबवरी । प्रभेची जैसी उजरी । ते सोहंवृत्ती अवधारीं । तैसी होय ॥ ९२ ॥ ऐसेनि मग परस्परें । ते सोहंवृत्ति जैं अवतरे । तैं तियेही सकट सरे । अपैसया ॥ ९३ ॥ जैसा सैंधवाचा रवा । सिंधुमाजि पांडवा । विरालेया विरवावा । हेंही ठाके ॥ ९४ ॥ ना तरि जाळूनि तृण । वन्हिही विझे आपण । तैसें भेद नाशूनि जाण । *ज्ञानही नुरे ॥ ९५ ॥ [स गुणान्समतीत्यैतान्] माझें पैलपण जाये । भक्त हें ऐलपण ठाये । अनादि ऐक्य जें आहे । तेंचि निवडे ॥ ९६ ॥ आतां गुणातें तो किरीटी । जिणें या नव्हती गोष्टी । जे एकपणाही मिठी । पडों सरली ॥९७॥ किंबहुना ऐसी दशा । तें ब्रह्मत्व गा सुदंशा । [यः] हें तो पावे जो ऐसा । मातें भजे ॥ ९८ ॥ [ब्रह्मभूयाय कल्पते] पुढती इहीं लिंगीं । भक्त जो माझा जगीं । हे ब्रह्मता तयालागीं । पतिव्रता ॥ ९९ ॥ जैसें गंगेचेनि वोघें । डोंळमळीत जळ जें निघे । सिंधुपद तयाजोगें । आन नाहीं ॥ ४०० ॥ तैसा ज्ञानाचिया दिठी । जो मातें सेवी किरीटी । तो होय ब्रह्मतेच्या मुकुटीं । चूडारत्न ॥ १ ॥ यया ब्रह्मत्वासीचि पार्था । सायुज्य ऐसी व्यवस्था । याचि नांव चौथा । पुरुषार्थ गा ॥ २ ॥ परी माझें आराधन । ब्रह्मत्वीं होय सोपान । तेथ मी हन साधन । गमेल हो ॥ ३ ॥ तरि झणीं ऐसें । तुझ्या चित्तीं पैसे । पैं ब्रह्म आन नसे । मीवांचूनि ॥ ४ ॥

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ।
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकांतिकस्य च ॥ २७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

[ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहं] अगा ब्रह्म या नांवा । अभिप्राय मी पांडवा । [अमृतस्याव्ययस्य च] मीचि बोलिजे आघवा । शब्दीं इहीं ॥ ५ ॥ पैं मंडळ आणि चंद्रमा । दोनी नव्हती सुवर्मा । तैसा मज आणि ब्रह्मा । भेद नाहीं ॥ ६ ॥ [शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्य] अगा नित्य जें निष्कंप । अनावृत धर्मरूप । सुख जें

* ज्ञान मुरे. ० ९५ ०

१ विकासे. २ ज्ञानालाच. ३ चांगुलपण. ४ कूप. ५ उत्कर्ष. ६ जिंकी. ७ मर्मज्ञा. ८ जो ऐशा मातें भजे, तो हें ब्रह्मत्व पावे. ९ स्पष्टपणें. १० वाहात. ११ ह्यास सिंधुपदच योग्य, दुसरें योग्य नाहीं. १२ मुकुटमणी. १३ नांव. १४ जिना. १५ मला. १६ वाटेल. १७ विस्तरेल. १८ मर्मज्ञा. १९ उघड.

जें [1]उमपे[2]। अद्वितीय ॥ ७ ॥ [ऐकांतिकस्य च] विवेक आपलें काम । सारूनि ठाकी जें धाम । [3]निष्कर्षीचें निःसीम । किंबहुना मी ॥ ८ ॥ ऐसेसें हो अवधारा । तो [3]अनन्याचा सोयरा । सांगतसे वीरा । पार्थासि पैं ॥ ९ ॥ येथ धृतराष्ट्र ह्मणे । संजया हें तूतें कोणें । पुसिलेनिविण [4]वायाणें । कां बोलसी ॥ ४१० ॥ माझी [5]अवसरी ते फेडीं । विजयाची सांगें गुढी । येरु जीविं ह्मणे सांडी । गोठी यिया ॥ ११ ॥ संजय विस्मयमानसीं । आहा करुनि [6]रसरसीं । ह्मणे कैसें पां [7]दैवेंसीं । द्वंद्व यया ॥ १२ ॥ तरि कृपाळु तो तुष्टो । यया विवेक हा घोंटो [8]। मोहाचा फिटो । महारोग ॥ १३ ॥ संजय ऐसें चिंतितां । संवाद तो सांभाळितां । हरिखाचा येत चित्ता । महापूर ॥ १४ ॥ ह्मणोनि आतां येणें । उत्साहाचेनि अवतरणें । श्रीकृष्णाचें बोलणें । सांगिजेल ॥ १५ ॥ तया अक्षराआंतील भाव । पाववीन मी तुमचा ठाव । आइका ह्मणे ज्ञानदेव । निवृत्तीचा ॥ ४१६ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

श्लोक २७, ओव्या ४१६.

---

१ अपार. २ सिद्धांतांचे. ३ एकनिष्ठेचा, अनन्यभक्तीचा. ४ व्यर्थ. ५ शंका. ६ दुःखानें. ७ मिळो. ८ हर्षाचा. ९ हृदयास.

ज्ञानेश्वरी.

अध्याय १५ वा.

आतां हृदय हें आपुलें । [1]चौफाळूनियां भलें । वरी बैसऊं पाडलें । श्रीगुरूचीं ॥ १ ॥ ऐक्यभावाची अंजुळी । सर्वेंद्रिय [2]कुडमळीं । भरूनियां पुष्पांजुळी । अर्घ्य देवों ॥ २ ॥ [3]अनन्योदकें धुवट । वासना जे [4]तन्निष्ठ । तें लाविलेंसे बोट । चंदनाचें ॥ ३ ॥ प्रेमाचेनि भांगारें । निर्वाळूनि नूपुरें । लेवऊं सुकुमारें । पदें तियें ॥ ४ ॥ [5]धणावली आवडी । अव्यभिचारें चोखडी । तिये घालूं [6]जोडी । आंगोळिया ॥ ५ ॥ [7]आनंदामोदबहुळ । [8]सात्विकाचें [9]मुकुळ । तें उमळलें अष्टदळ । ठेऊं वरी ॥ ६ ॥ तेथें अहं हा धूप जाळूं । [10]नाहं तेजें वोवाळूं । सामरस्यें [11]पोटाळूं । निरंतर ॥ ७ ॥ माझी तनु आणि प्राण । *इया [12]पाउवा लेऊं श्रीचरण । करूं भोग मोक्ष निंबलोण । पायां तयां ॥ ८ ॥ इया श्रीगुरुचरणसेवा । हों [13]पात्र तया दैवा । जें †सकळार्थमेळावा । [14]पाट ‡ [15]बांधे ॥ ९ ॥ ब्रह्मीचें [16]विसवणेंवरि । [17]उन्मेष लाहे [18]उजरी । जें वाचेतें इये करी । सुधासिंधू ॥ १० ॥ पूर्णचंद्राचिया [19]कोडी । वक्तृत्वा [20]धांपे कुरोंडी । तैसी आणी गोडी । अक्षरांतें ॥ ११ ॥ सूर्यें [21]अधिष्ठिली प्राची । जगा [22]रोणीव दे प्रकाशाची । तैशी वाचा श्रोतयां ज्ञानाची । दिवाळी करी ॥ १२ ॥ [23]नादब्रह्म खुजें । कैवल्यही तैसें न [24]सजे । ऐसा बोल देखिजे । जेणें [25]दैवें ॥ १३ ॥ §श्रवण सुखाच्या मांडवीं । विश्व भोगी [26]माधवी । तैसी ¶[27]सासिने बरवी । वाचावल्ली ॥ १४ ॥ ठाय न पावतां जयाचा । मनेसीं मुरडली वाचा । तो देव होय शब्दाचा । चमत्कारु ॥ १५ ॥ [28]जें ज्ञानासि न [29]चोजवे । ध्यानासिही जें [30]नांगवे । तें अगोचर [31]फावे । गोठीमाजि ॥ १६ ॥ येवढें एक सौभाग । [32]वळघे

---

* इया दोन्ही. † सकळार्थाचा. ‡ बांधों. § जैसी चंद्राची कळा । निववी जनपदा सकळा । तैसा ज्ञानाचा ओल्हावा डोळां । देखिला संतांचिये ॥ १४ ॥ ¶ सासिन्नली.

---

१ चौसंग करून. २ कळ्यांनीं. ३ अभेदरूप जळानें. ४ श्रीगुरुनिष्ठ. ५ गाळून. ६ घट्ट झालेली. ७ जोडवीं. ८ आनंद हाच सुवास. ९ सत्वाचें. १० कळी. ११ निरभिमान. १२ आलिंगूं. १३ पादुका. १४ योग्य. १५ पट्टाभिषेक करूं. १६ विश्रांतीपर्यंत. १७ ज्ञान. १८ स्वच्छता. १९ कोटि. २० घालावी. २१ आश्रयिली. २२ संपत्ति, श्रीमत्ता. २३ वेद. २४ शोभे. २५ गुरुदेवें. २६ वसंत. २७ मरास येते. २८ जाणणें. २९ जाणवे. ३० नाटोपे. ३१ सांपडे. ३२ सौभाग्य. ३३ आश्रय करी.

वाचेचें आंग । श्रीगुरुपादपद्मराग । लाहे जैं कां ॥ १७ ॥ तरि बहु बोलूं काई । आजि तें आनठाईं । मातेंवांचूनि नाहीं । ज्ञानदेव ह्मणे ॥ १८ ॥ जे तान्हेनि[1] मियां अपत्यें । आणि माझे गुरु एकलौते[2] । ह्मणोनि कृपेसिं ऐकहातें[3] । जालें तिये ॥ १९ ॥ पाहा पां भरोवरी[4] आघवी । मेघ चातकांसी रिचवी[5] । मजलागीं गोसांवी[6] । तैसें केलें ॥ २० ॥ ह्मणोनि रिकामें तोंड । करूं गेलें बडबड । कीं गीता ऐसें गोड । आतुडलें[7] ॥ २१ ॥ होय अदृष्ट आपैते[8] । तैं वाळूंचि रवें परते[9] । उजू[10] आयुष्य तैं मारिते[11] । लोभ करी ॥ २२ ॥ आधणीं घातलिया हरळ[12] । होती अमृताचे तांदुळ । जरी भुकेची राखे वेळ । श्रीजगन्नाथ ॥ २३ ॥ तयापरी श्रीगुरु । करिती जैं अंगिकारु । तैं होऊनि ठाके संसारु । मोक्षमय आघवा ॥ २४ ॥ पाहा पां काई श्रीनारायणें । तया *पांडुवांचें उणें । कीजेचि ना पुराणें । विश्ववंद्यें ॥ २५ ॥ तैसें श्रीनिवृत्तिराजें । अज्ञानपण हें माझें । आणिलें वोजे[13] । ज्ञानाचिया ॥२६॥ परि हें असो आतां । प्रेम रुळतसे[14] बोलतां । कें गुरुगौरव वर्णितां । उन्मेष[15] असे ॥ २७ ॥ आतां तेणेंचि पैसायें[16] । तुह्मां संतांचे मी पाये । वोळगेन[17] अभिप्रायें । श्रीगीतेचेनी ॥ २८ ॥ [प्रस्तुताध्यायसंगतिः] तरि तोचि प्रस्तुतीं । चौदाविया अध्यायाच्या अंतीं । निर्णय कैवल्यपती । ऐसा केला ॥ २९ ॥ जे ज्ञान जयाच्या हातीं । तोचि समर्थ मुक्ती । जैसा शतमख[18] संपत्ती । स्वर्गींचिये ॥ ३० ॥ कां शत एक जन्मा । जो जन्मोनि ब्रह्मकर्मा । करी तोचि ब्रह्मा । आन नोहे ॥ ३१ ॥ ना तरी सूर्याचा प्रकाश । लाहे जेविं डोळस । तेविं †ज्ञानियां सौरस[19] । मोक्षाचा तो ॥ ३२ ॥ तरि तया ज्ञानालागीं । कवणा पां योग्यता आंगीं । हें पाहतां जगीं । देखिला एक ॥ ३३ ॥ जे पाताळिचेंही निधान । दावील कीर अंजन । परि होआवे लोचन । पायाळाचे ॥ ३४ ॥ तैसें मोक्ष देईल ज्ञान । येथ कीर नाहीं आन । परि तेंचि थोर[20] ऐसें मन । शुद्ध होआवें ॥ ३५ ॥ तरि विरक्तीवांचूनि कहीं । ज्ञानासि तेंगणें[21] नाहीं । हें विचारूनि ठाईं[22] । ठेविलें देवें ॥ ३६ ॥ आतां विरक्तीची कवण परी । जे येऊनि मनातें वरी । हेंही सर्वज्ञें श्रीहरी । ‡देखिलें असे ॥ ३७ ॥ जे विषें रांधिली रसें[23]सोये । जैं जेवणारा ठाउवी होये । तैं तो ताटचि सांडुनि जाये । जयापरी ॥ ३८ ॥ तैसी संसारा या समस्ता । जाणिजे जैं अनित्यता । तैं वैराग्य दवडितां । पाठी लागे ॥ ३९ ॥ आतां अनित्यत्व या कैसें । तेंचि वृक्षाकारमिषें । सांगिजत असे विश्वेशें । पंचदशीं ॥ ४० ॥ उपडिलें कवतिकें । झाड येरि-

* पांडवांकारणें. † विज्ञानियां, ज्ञानेंचि. ‡ बोलिलें.

१ तान्हा जो मी बाळ तो ल्या गुरूला एकुलता एक आहें. २ एकहाती गाय. ३ सामुग्री. ४ ओती. ५ सद्गुरूनें. ६ सांपडलें. ७ प्रारब्ध. ८ अनुकूळ. ९ परिणाम पावे. १० अखंड. ११ मारणार. १२ खडे. १३ चांगुलपणास. १४ दृढ होत आहे. १५ सावधान. १६ प्रसादें. १७ आश्रय करीन. १८ इंद्र. १९ गोडी. २० स्थीर होय. २१ टिकाव. २२ स्थापन केलें. २३ स्वयंपाक.

मोहरा ठाके[1]। तें वेगें जैसें सुके। तैसें हें नोहे ॥ ४१ ॥ *याचि एकेपरी। रूपकाचिया कुसरी[2]। सारीतसे वारी[3]। संसाराची ॥४२॥ करूनि संसार वावो[4]। स्वरूपीं अहंतेचा[5] ठावो। होआवया अध्यावो। पंधरावा हा ॥ ४३ ॥ आतां हेंचि आघवें। ग्रंथगर्भींचें चांगावें[6]। उपलविजेल[7] जीवें। आकर्णिजो ॥ ४४ ॥ [श्रीभगवानुवाच–] तरि महानंदसमुद्र। जो पूर्ण पूर्णिमाचंद्र। तो द्वारकेचा नरेंद्र। ऐसें ह्मणे ॥४५॥ [वृक्षरूपकालंकारेण संसारं वर्णयति] अगा पैं पंडुकुमरा। येतां पैं स्वरूपाचिया घरा। करीतसे आडवारा[8]। विश्वाभास जो ॥ ४६ ॥ तो हा जगडंबरु। नोहे येथ संसारु। हा जाणिजे महातरु। थांबला[9] असे ॥ ४७ ॥ परि येरां रुखांसारिखा। तळीं मुळें वरी शाखा। तैसा नोहे ह्मणोनि लेखा[10]। नयेचि कवणा ॥ ४८ ॥ आगी कां कुऱ्हाडी। होय रिगोवा[11] जरी बुडीं। तरी हो कां भलतेवढी[12]। वरिचील वाढी ॥ ४९ ॥ जे तुटलिया मुळापासीं। डवलेंडेल[13] कां शाखांसीं। परि तैसी गोठी कायसी। हा सोपा नव्हे ॥ ५० ॥ अर्जुना हें कवतिक। सांगतां असे अलौकिक। जे वाढी अधोमुख। रुखा यया ॥ ५१ ॥ जैसा भानु उंचि नेणो कें। रश्मिजाळ तळीं फांके। संसार हें कोंवरुखें[14]। झाड तैसें ॥ ५२ ॥ आणि आथी नाथी तितुकें। रुंधलें[15] असे येणेंचि एकें। कल्पांतींचेनि उदकें। व्योम जैसें ॥ ५३ ॥ कां रवीच्या अस्तमानीं। आंधारेनि कोंदे रजनी। तैसाचि हा गगनीं। मांडला असे ॥ ५४ ॥ यया फळ ना चुंबितां[16]। फूल ना तुरंबितां[17]। जें कांहीं[18] पंडुसुता। तें रुखचि हा ॥ ५५ ॥ हा ऊर्ध्वमूळ आहे। परि उन्मूळिला[19] नोहे। येणेंचि हा होये। शेंडुळ[20] गा ॥ ५६ ॥ [ऊर्ध्वमूलमित्यादिश्लोकद्वयभावार्थः श्रुत्यनुसारेण संक्षेपतो व्याचष्टे] †आणि ऊर्ध्वमूळ ऐसें। निगदिलें कीर असे। परी अधींही असोसें[21]। मूळें यया ॥ ५७ ॥ प्रबळला[22] चौमेरीं[23]। पिंपळा कां वडाचिया परी। जे पारंबियामाझारीं। डाहाळिया असती ॥ ५८ ॥ तेविंचि गा धनंजया। संसारतरू यया। अधींचि[24] आथी खांदिया। हेंही नाहीं ॥ ५९ ॥ तरी ऊर्ध्वाहीकडे। शाखांचे मांदोडे[25]। दिसताति अपाडें[26]। सांसिन्नले[27] ॥ ६० ॥ जालें गगनचि पालवीये। कां वारा मांडला रुखाचेनिआयें[28]। नाना अवस्थात्रयें[29]। उदय केला असे ॥ ६१ ॥ ऐसा हा एक। विश्वाकार विटंकें[30]। उदयला

---

* इया. † हा ऊर्ध्वमूळ. ० पालवियेसे

---

१ उलटें. २ चतुराई. ३ दवडी. ४ वेरझार. ५ मिथ्या. ६ सोहं, मीपणाचा. ७ चांगुलपणें. ८ विस्तारिजेल. ९ प्रतिबंध. १० दृढ झाला, वाढला. ११ समजुतीस. १२ प्रवेश. १३ केवढीही. १४ उपडेल. १५ आश्चर्यकारक. १६ व्यापलें. १७ चोखले असतां. १८ वास घेतला असतां. १९ यद्यपावत् जें कांहीं तें हा वृक्षच म्हणून वास घेण्यास फूल नाहीं व चुंबन करण्यास फळही नाहीं. २० उपटलेला. २१ ऊर्ध्वमूलच. २२ हिरवागार. २३ पुष्कळ. २४ चहूंकडे. २५ खालीं. २६ जुंबाडे. २७ विस्तारले. २८ न्यायें. २९ तीन अवस्था उत्पन्न झाल्या. ३० मोठा, निबिड.

जाण रुख । ऊर्ध्वमूळ ॥ ६२ ॥ आतां ऊर्ध्व या कवण । येथें मूळ तें किंलक्षण । कां अधोमुखपण । शाखा कैसिया ॥ ६३ ॥ अथवा द्रुमा यया । अधीं जिया मुळिया । तिया कोण कैसिया । ऊर्ध्व शाखा ॥ ६४ ॥ आणि अश्वत्थ हा ऐसी । प्रसिद्धी कायसी । आत्मविदविलासीं । निर्णय केला ॥ ६५ ॥ हें आघवेंचि बरवें । तुझिये प्रतीतीसि फावे । तैसेनि सांगों सोलिवे । विन्यासें गा ॥ ६६ ॥ परी ऐकें गा सुभगा । हा प्रसंग असे तुजचिजोगा । कांनचि करी हो सवांगा । *हियें आथिलिया ॥ ६७ ॥ ऐसें प्रेमरसें †सुरफुरें । बोलिलें जंव यादववीरें । तंव अवधान अर्जुनाकारें । मूर्त जालें ॥ ६८ ॥ देव निरूपिती तें थेंकुलें । येवढें श्रोतेपण फांकलें । जैसें आकाशा खेंवें पसरिलें । दाहीं दिशीं ॥ ६९ ॥ श्रीकृष्णोक्तिसागरा । हा आगस्तीचि दुसरा । ह्मणौनि घोट भरों पाहे एकसरा । अवघेयाचा ॥ ७० ॥ ऐसी सोयें सांडूनि खवळिली । आवडी अर्जुनीं देवें देखिली । तेथ जालेनि सुखें केली । कुरवंडी तया ॥ ७१ ॥

श्रीभगवानुवाच-ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥ १ ॥

[ऊर्ध्वमूलं] मग ह्मणे धनंजया । तें ऊर्ध्व गा तरू यया । ‡येणें रुखेंचि कां जया । ऊर्ध्वता गमे ॥ ७२ ॥ येन्हवीं मध्योर्ध्व अध । हे नाहीं जेथ भेद । अद्वयासीं एकेवद । जयाठायीं ॥ ७३ ॥ जो नाइकिजता नाद । जो असौरभ्य मकरंद । जो आंगाथिला आनंद । सुरतेविण ॥ ७४ ॥ जया जें आन्हां परौतें । जया जें पुढें माघौतें । दिश्येंवीण देखतें । अदृश्य जें ॥ ७५ ॥ उपाधीचा दुसरा । घालितां वोपसरा । नामरूपाचा संसारा । होय जयातें ॥ ७६ ॥ ज्ञातृज्ञेयाविहीन । नुसधेंचि जें ज्ञान । सुखा भरलें गगन । गाळींव जें ॥७७॥ जें कार्य ना कारण । जया दुजें ना एकपण । आपणयां जें जाण । आपणचि ॥ ७८ ॥ ऐसें वस्तु जें साचें । तें ऊर्ध्व गा यया तरूचें । तेथ और घेणें मूळाचें । तें ऐसें असे ॥ ७९ ॥ तरी माया ऐसी ख्याती । नसतीच यया आथी । कां वांझेची संतती । वांनणें जैसें ॥८०॥ तैसी सत् ना असत् होय । जे विचाराचें नाम न साहे । ऐसे या परीची आहे । अनादि ह्मणती ॥ ८१ ॥ जे नाना तत्त्वांची मांदुस । जे जगदभ्राचें आकाश । जे आकारजाताचें दुस । घडी केलें ॥ ८२ ॥ जे भवद्रुमबीजिका । जे प्रपंचचित्रभूमिका । विपरीतज्ञा-

* इये अर्थी. † सुरेश्वरें. ‡ तेणें.

१ खालीं. २ आत्मज्ञान्यांनीं. ३ अनुभवास. ४ निरूपणेंकरून. ५ अवधानसंपन्न अशा सर्वांगाला कान कर. ६ अंतःकरणपूर्वक. ७ भरपूर. ८ लहान. ९ आलिंगन. १० मर्यादा. ११ वृक्षानें. १२ ऐक्य. १३ अंगींच असलेला. १४ रतीशिवाय. १५ अलिकडे. १६ मिना. १७ केवळ. १८ परमात्मा. १९ अंकुर घेणें. २० वर्णन करणें. २१ पेटी. २२ वस्त्र.

नदीपिका । सांचली जे ॥ ८३ ॥ ते माया वस्तूच्या ठायीं । असे जैसेनि नाहीं । मग वस्तुप्रभावचि पाहीं । प्रगट होय ॥ ८४ ॥ जेव्हां आपणयां आली निद । करी आपणपें जेवीं मुग्ध । कां काजळी आणी मंद । प्रभा दीपीं ॥ ८५ ॥ स्वप्नीं प्रियांपुढें तरुणांगी । निदेली चेवउनि[1] वेगीं । आलिंगिलेनिवीण आलिंगी । सकाम करी ॥ ८६ ॥ तैसी स्वरूपीं जाली माया । आणि स्वरूप नेणणें जें धनंजया । तेंचि तरू यया । मूळ पहिलें ॥ ८७ ॥ वस्तूसी आपला जो अबोध । तो ऊर्ध्वीं आढुळेजे[2] कंद । वेदांतीं हाचि प्रसिद्ध । बीजभाव ॥ ८८ ॥ धन[3] अज्ञान सुषुप्ती । तो बीजांकुरभाव ह्मणती । येर स्वप्न हेंन[4] जागृती । हा फळभाव तियेचा ॥ ८९ ॥ ऐसी यया वेदांतीं । निरूपण-भाषाप्रतीति । परी तें असो प्रस्तुतीं । अज्ञान मूळ ॥ ९० ॥ तें ऊर्ध्व आत्मा निर्मळें । अधोर्ध्व सूचिती[5] मूळें । बळिया बांधोनि आळें । मायायोगाचें ॥ ९१ ॥ [अधःशाखं] मग आधिलीं[6] संदेहांतरें । उठती जियें अपारें । तें चौपाँसी घेऊनि आगारें । खालावती[7] ॥ ९२ ॥ ऐसें भवद्रुमाचें मूळ । हें ऊर्ध्वीं करी बळ । मग अश्वत्थाचें[8] बेंबळ[9] । अधीं दावी ॥ ९३ ॥ तेथ चिद्वृत्ती पहिलें । महतत्त्व उमललें[11] । तें पान वोलेंदुल्हें[12] । एक निघे ॥ ९४ ॥ मग सत्वरजतमात्मक । त्रिविध अहंकार जो एक । तो तिवणा[13] अधोमुख । डिरे[14] फुटे ॥ ९५ ॥ तो बुद्धीची घेऊनि आंगारी[15] । भेदाची वृद्धी करी । तेथ मनाचें *जळ धरी । साजेपणें ॥ ९६ ॥ ऐसा मूळाचिया गाढिकां[16] । विकल्परस कोंवळिका । चित्तचतुष्टय डाहाळिका । †कोंभेजेतों[17] ॥ ९७ ॥ मग आकाश वायु द्योतक[18] । आप पृथ्वी हे पांच फोक[19] । महाभूतांचे सरोखे[20] । सरळे होती ॥ ९८ ॥ तैसीं श्रोत्रादि तन्मात्रें[22] । तियें अंगवसां[23] गर्भपत्रें । लुळलुळितें[24] विचित्रें । उमळती गा ॥ ९९ ॥ तेथ शब्दांकुर वेरिपडी[25] । श्रोत्रा वाढी देव्हेंढी[26] । होता करित ‡कांडीं । आकांक्षेचीं ॥ १०० ॥ अंगत्वचेचे वेलपल्लव । स्पर्शांकुरीं घेती धांव । तेथें बांबेळ[27] पडे अभिनव । विकारांचें ॥ १ ॥ पाठीं रूपपत्र[28] पालोवेलीं । चक्षुलांब तें कांडें घाली । ते वेळीं व्यामोहता भली । §पान्हेली[29] जाय ॥ २ ॥ आणि रसाचें आंगवसें[30] । वाढतां वेगें बहुवसें[31] । जिव्हे आतींची अंसोसें[32] । निघती बेंचें[33] ॥ ३ ॥ तैसेंचि कोंभेलेनि गंधें । घ्राणाची डिरि थांव[34] बांधे । तेथ घे स्वानंदें । प्रलोभाचा

*डाळ. †कोंभेजतां. ‡कांडेन. §पाहाळीं. ० गाधिरात्चे

१ जागी केली. २ बांधी. ३ घट्ट. ४ आणि. ५ निघती. ६ पहिलीं. ७ चहूंकडे. ८ अंकुर. ९ खालीं जाती. १० जुंबाडा. ११ अंकुरलें. १२ अतिप्रिय. १३ तीनपानी. १४ अंकुर. १५ लागवड, डाहाळी. १६ दृढतेनें. १७ भेद. १८ अंकुर घेतो. १९ तेज. २० नीट सरळ गेलेले वृक्षाचें शाखाकांड. २१ रोकडें. २२ सूक्ष्मभूतें. २३ साल. २४ कोंवळीं, सुंदर. २५ प्राप्त होय. २६ दुप्पट मोठी. २७ आधिक्य. २८ रूप हेंच पान. २९ पान्हा फुटतो. ३० फार, जोरानें. ३१ पानांतलें पान. ३२ बळ.

॥ ४ ॥ एवं *महदहंबुद्धि । मन महाभूतसमृद्धि । इये संसाराचिया अवधि । सासनिजे ॥ ५ ॥ किंबहुना इहीं आठे । आंगीं हा अधिक फांटे । परि शिपीचियेवढें उमटे । रुपें जेविं ॥ ६ ॥ कां समुद्राचेनि पैसारें । वरी तरंगता †आस्तरे । तैसें ब्रह्मचि होय वृक्षाकारें । अज्ञानमूळ ॥ ७ ॥ ‡आतां याचाचि हा विस्तार । हाचि यया पैसार । जैसा आपणचि स्वप्नीं परिवार । येकाकिया ॥ ८ ॥ परि तें असो हें ऐसें । कोंवरें झाड उंससे । यया महदादि आरवसें । अधोशाखा ॥ ९ ॥ [[अश्वत्थं प्राहुः] आणि अश्वत्थ ऐसें ययातें । ह्मणती जे जाणते । तेंही परिस हो येथें । सांगिजेल ॥ ११० ॥ तरि अश्वत्थ ह्मणिजे उंखा । तोंवरी एकसारिखा । नाहीं निर्वाह यया रुंखा । प्रपंचरूपा ॥ ११ ॥ जैसा न लोटतां क्षण । मेघ होय नानावर्ण । कां विजू नसे संपूर्ण । निमेषभरी ॥ १२ ॥ §कांपतया पद्मदळा । वरीलिया बैसका नाहीं जळा । कां चित्त जैसें व्याकुळा । माणुसाचें ॥ १३ ॥ तैसीचि ययाची स्थिती । नासत जाय क्षणक्षणाप्रती । ह्मणौनि ययातें ह्मणती । अश्वत्थ हा ॥ १४ ॥ आणि अश्वत्थ येणें नांवें । पिंपळ ह्मणती स्वभावें । परि तो अभिप्राय नोहे । श्रीहरीचा ॥ १५ ॥ येऱ्हवीं पिंपळ ह्मणतां विखीं । मियां गती देखिली असे निकी । परि तें असो काय लौकिकीं । ¶तुह्मा काज ॥ १६ ॥ ह्मणौनि हा प्रस्तुत । अलौकिक परिसा ग्रंथ । तरि क्षणिकत्वेंचि अश्वत्थ । बोलिजे हा ॥ १७ ॥ आणीकही येक थोर । यया अव्ययत्वाचा डेंगर । आथी परी तो भीतर । ऐसा आहे ॥ १८ ॥ जैसा मेघाचेनि तोंडें । सिंधु एके आंगें काढे । आणि नदी येरीकडे । भरितीचि असती ॥ १९ ॥ तेथ बोहटे ना चढे । ऐसा परिपूर्णचि आवडे । परि ते फुंली जंव नुघडे । मेघानदीची ॥ १२० ॥ ऐसेया रुखांचें होणें जाणें । न तर्के होतेंनि वेंहिलेपणें । ह्मणोनि ययातें लोक ह्मणे । अव्यय हा ॥ २१ ॥ येऱ्हवीं दानशीळ पुरुष । वेंचकपणेचि संचक । तैसा व्ययेंचि हा रुख । अव्यय गमे ॥ २२ ॥ जातां वेगें बहुवसें । न वचे कां भूमी रुतलें असें । रथाचें चक्र दिसे । जिया परी ॥ २३ ॥ तैसें काळातिक्रमें जे वाळे । ते भूतशाखा जेथ गळे । तेथ कोडीवरी उमाळे । उठती आणिक ॥ २४ ॥ परी येकी केधवां गेली । शाखाकोडी केधवां जाली । हें नेणवे जेविं उमललीं । आषाढअभ्रें ॥ २५ ॥ महाकल्पाच्या शेवटीं ।

---

* महदादि अहं. † आसारे. ‡ याचा हाच विस्तार, यांचाच पैसार. § ना न कांपत. ¶ हेतु काज.

---

१ तयार होतो. २ प्रकारानें. ३ पघळे. ४ पसारा. ५ भ्रमात्मक, आश्चर्यकारक. ६ जीवन पावे. ७ अंकुर. ८ प्रातःकाळ. ९ वृक्षाला. १० विषयीं. ११ प्रसिद्धि. १२ आंत, अंतर्गत अर्थ. १३ मुद्रा, संयोग. १४ सत्वरपणें. १५ खचिकपणानें.

*उदेलिया[१] उमळती[२] सृष्टी । तैसेंचि आणिखीचें[३] दोंग उठी । सासिन्नलें[४]॥ २६ ॥ संहारवातें प्रचंडें । पडतीं प्रळयांतींचीं सालडें[५] । तंव कल्पादीचीं जुंबाडें । पाल्हेजती ॥ २७ ॥ रिगे मन्वंतर मनुपुढें । वंशावरी वंशांचें मोंडे[६] । जैसी इक्षुवृद्धी कांडेंनकांडें । जिंके[७] जेवीं ॥ २८ ॥ कलियुगांतीं कोरडीं । चहूंयुगांचीं †सालें सांडी । तंव कृतयुगाची पेली[८] देर्‍हडी । पडे पुढती ॥ २९ ॥ वर्ततें वर्ष जाये । तें पुढिला मुळहारी[९] होये । जैसा दिवस जात कीं येत आहे । हें चोजवेना[१०]ं ॥ १३० ॥ जैसा वारियाचा झुळकां । सांदा ठाउवा नव्हे देखा । तैसिया उठती पडती शाखा । नेणों किती ॥ ३१ ॥ एकी देहाची डिरी[११] तुटे । तंव देहांकुरीं बहुवी फुटे । ऐसेनि भवतरु हा वाटे । अव्यय ऐसा ॥ ३२ ॥ जैसें वाहतें पाणी जाय वेगें । तैसेंचि आणिक मिळे मागें । येथ असंतचि असिजे जगें । मानिजे संत ॥ ३३ ॥ कां लागोनि डोळा उघडे । तंव कोडीवरी[१२] घडे मोडे । नेणतया तरंग आवडे । नित्य ऐसा ॥ ३४ ॥ वांयसा[१३] एकें बुबुळें दोहीं कडे । डोळा चाळितां अपाडें[१४] । दोन्ही आथी ऐसा पडे । भ्रम जेवीं जगा ॥ ३५ ॥ पैं भिंगोरी[१५] निधिये[१६] पडली । ते गमे भूमीसीं जैसी जडली । ऐसा वेगातिशय भुली । हेतु होय ॥ ३६ ॥ हें बहु असो ‡झडती[१७] । आधारें भोवंडितां कोलती । ते दिसे जैसी आयती[१८] । चक्राकार ॥ ३७ ॥ हा संसारवृक्ष तैसा । मोडत मांडत सहसा । न देखोनि लोक पिसा । अव्यय मानी ॥ ३८ ॥ [यस्तं वेद स वेदवित्] परि ययाचा वेग देखे । जो हा क्षणिक[१९] ऐसा वोळखे । जाणे कोडिवेळा निमिखें । होत जात ॥ ३९ ॥ नाहीं अज्ञानावांचूनि मूळ । ययाचें असिलेपण टवाळ । ऐसें झाड सिनेसाल[२०] । देखिलें जेणें ॥ १४० ॥ तयातें गा पंडुसुता । मी सर्वज्ञही म्हणें जाणता । पैं वोग्रह्मीं[२१] सिद्धांता । वंद्य तोचि ॥ ४१ ॥ योगजाताचें जोडलें । तया येकासींचि उपयोगा गेलें । किंबहुना जियेलें[२२] । ज्ञानही तेणें ॥ ४२ ॥ हें असो बहु बोलणें । वांनिजेल[२३] तो कवणें । जो भवरुख जाणे । उखि[२४] ऐसा ॥४३॥

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।
अधश्च मूलान्यनुसंततानि कर्मानुबंधीनि मनुष्यलोके ॥२॥

[अधश्चोर्ध्वं] मग ययाचि प्रपंचरूपा । अधोशाखिया पादपा । डाहाळिया

---

* निदेलया उन्मूळती. † सलें. ‡ झडती.

१ उपटून पडतात. २ अरण्यें. ३ विस्तृत. ४ साली. ५ विस्तार, अंकुर. ६ जीववी. ७ ओली साल. ८ दुप्पट. ९ आमंत्रण. १० जाणवेना. ११ अंकुर. १२ कोट्यवधि. १३ कावळ्याला. १४ सत्वर, विलक्षणपणानें. १५ वाव्हटळ, भोंवरा. १६ अतिभ्रमणांत. १७ झपाट्यानें, लवकर. १८ विस्तृत. १९ क्षणिक, शीर्ण होणारें. २० वेदांतील. २१ सिद्धांताप्रमाणें. २२ सफळ झालें, जिवंत, मूर्तिमान्. २३ कोणाच्यानें वर्णन केला जाईल. २४ व्यर्थ, अनित्य.

जाती उमपा । ऊर्ध्वांही उजू ॥ ४४ ॥ [अधश्च मूलानि] आणि [3]अधीं फांकलीं डाळें । तियें होती मूळें । तयांही तळीं पघळे । वेल पालव ॥ ४५ ॥ ऐसें जें आहीं । ह्मणितलें [4]उपक्रमीं । तेंही परिसें सुगमीं । बोलीं सांगों ॥ ४६ ॥ तरि बद्धमूळ अज्ञानें । महदादिकीं [5]शासनें । वेदांचीं [6]थोरवनें । घेऊनियां ॥ ४७ ॥ परि आधीं तंव स्वेदज । जरायुज उद्भिज अंडज । हें बुडौनि महाभुज । उठती चारी ॥ ४८ ॥ [प्रसृतास्तस्य शाखाः] यया एकैकाचेनि [7]आंगवटें । चौऱ्यांशीं *लक्षधा फुटे । ते वेळीं जीवशाखीं फांटे । [8]सैंधचि होती ॥ ४९ ॥ प्रसवत शाख सरळिया । नानासृष्टि डाहाळिया । आड फुटती [9]माळिया । जातीचिया ॥ १५० ॥ स्त्री पुरुष नपुंसकें । हे व्यक्तिभेदांचे [10]टंके । आंदोळती आंगिकें । विकारभारें ॥ ५१ ॥ जैसा वर्षाकाळ गगनीं । [11]पाल्हेजे नवघनीं । तैसें आकारजात अज्ञानीं । वेलीजाय ॥ ५२ ॥ [गुणप्रवृद्धाः] मग शाखांचेनि आंगभारें । लवोनि गुंफती परस्परें । गुणक्षोभाचे वारे । उदयजती ॥ ५३ ॥ तेथ तेणें अचाटें । गुणाचेनि झडझडाटें । तिहीं ठायीं हा फांटे । ऊर्ध्वमूळ ॥ ५४ ॥ [रजोगुणवृद्धाः शाखा आह] ऐसा रजाचिया झुळुका । झडाडितां आगळिका । मनुष्यजातीं शाखा । थोरावती ॥ ५५ ॥ तिया ऊर्ध्वीं ना अधीं । माझारींचि कोंदाकोंदी । आड फुटती खांदी । चतुर्वर्णाच्या ॥ ५६ ॥ [छंदांसि यस्य पर्णानि] तेथ विधिनिषेध [12]सपल्लव । वेदवाक्याचे [13]अभिनव । पालव डोलती [14]बरव । आपुलालियापरी ॥ ५७ ॥ अर्थ काम पसरे । अग्रवनें घेती थारे । तेथ क्षणिकें [15]पदांतरें । इहभोगाचीं ॥ ५८ ॥ [कर्मानुबंधीनि] तेथ प्रवृत्तीचेनि वृद्धिलोभें । [16]खोंकरेजती शुभाशुभें । नाना कर्मांचे खांबे । नेणों किती ॥ ५९ ॥ तेवींचि †भोगक्षीणें मागिलें । पडैती ‡देहांचीं [17]बुडसळें । तंव पुढां वाढी पेले । नवेया देहांची ॥ १६० ॥ [विषयप्रवालाः] आणि शब्दादिक [18]सुहावे । सहज रंगें [19]हेवावे । विषयपल्लव नवे । नित्य होती ॥ ६१ ॥ [मनुष्यलोके] ऐसें रजोवातें प्रचंडें । मनुष्यशाखांचे [20]मांदोडे । वाढती तो एथ रूढे । मनुष्यलोक ॥ ६२ ॥ तैसाचि तो रजाचा वारा । [21]नावेक धरी [22]वोसरा । [तमोगुणवृद्धाः शाखा आह] मग वाजों लागे घोरा । तमाचा तो ॥ ६३ ॥ [अधःशाखमिति पूर्वश्लोकस्थं पदं पुनर्व्याचष्टे] तेथवां याचिया मनुष्यशाखा । नीच वासना अधीं देखा । [कर्मानुबंधीनीति] पाल्हेजती डाहाळिका । कुकर्माचिया ॥ ६४ ॥ [23]अप्रवृत्तीचे [24]खणुवाळे । §कोंभ निघती सरळे । घेत पान पालव [3]डाळें । प्रमादाचीं

* अधो फुटे. † भोगक्षण. ‡ देहांतींच. § फोक.

१ खालीं. २ डाहाळ्या. ३ आरंभीं. ४ आज्ञा. ५ 'छंदांसि यस्य पर्णानि' याचा तात्पर्यानुवाद. ६ मोठीं पानें. ७ शरीरीं. ८ बहुत. ९ आडव्या फांद्या. १० प्रतिमा, डाहाळ्यांचीं अग्रें. ११ विस्तारे. १२ विस्तार पावे. १३ सविस्तर. १४ नवीन. १५ उत्कृष्ट. १६ अन्य स्थानें. १७ तयारी करतात. १८ शुष्क काष्ठ. १९ चांगलेपणा, साह्यकर्ते. २० शोभित. २१ समुदाय. २२ क्षणभर. २३ ओहट. २४ कुमार्गाचे. २५ कठीण, खडबडीत.

॥ ६५ ॥ [छंदांसीति] बोलती निषेधनियमें । जिया ऋचा यजुःसामें । तो पाला तया धुमे । टेकेयावरी ॥ ६६ ॥ [विषयप्रवालाः] प्रतिपादिती अभिचार । आगम जे पैरमार । *तिहींपानीं घेती प्रसर । वासना वेली ॥ ६७ ॥ तंव तंव होती थोराडें । अकर्मांचीं तळबुडें । आणि जन्मशाखा पुढेंपुढें । घेती धांव ॥ ६८ ॥ [मनुष्यलोके] तेथ चांडाळादि निकृष्टा । दोषजातीचा थोर फांटा । जाळ †पडे कर्मभ्रष्टां । भुलोनियां ॥ ६९ ॥ पशु पक्षी सूकर । व्याघ्र वृश्चिक विखार । हे आडशाखानिर्कर । थोरावती ॥ १७० ॥ परि ऐशा शाखा पांडवा । सर्वांगींही नित्य नवा । नरकभोग यावा । फळाचा तो ॥ ७१ ॥ आणि हिंसाविषयपुढारी । कुकर्मसंगें धुरधुरी । जन्मवरी आंगारी । वाढतीचि असे ॥ ७२ ॥ ऐसे होती तरुतृण । लोह लोष्ठ पाषाण । इया खांदिया तेवींचि जाण । फळेंही हेंचि ॥ ७३ ॥ अर्जुना गा अवधारीं । मनुष्यालागोनि इया परी । वृद्धि स्थावरांतवरी । अधोशाखांची ॥७४॥ [अधश्च मूलानि] ह्मणोनि जे मनुष्य डोळे । इयेंचि जाणावीं अधींचीं मूळें । जे एथूनि हा पांघळे । संसारतरु ॥ ७५ ॥ येऱ्हवीं ऊर्ध्वींचें पार्था । मुदल मूळ पाहातां । अधींचिया मध्यस्था । शाखा इया ॥ ७६ ॥ [अनुसंततानि] परि तामसी सात्विकी । सुकृतदुष्कृतात्मकी । विरूढती या शाखीं । अधोर्ध्वींचिया ॥ ७७ ॥ [छंदांसीति] आणि वेदत्रयाचिया पाना । नये अन्यत्र लागों अर्जुना । जे मनुष्यावांचूनि विधाना । विषय नाहीं ॥ ७८ ॥ ह्मणोनि तनुमानुषा । इया ऊर्ध्वमूळौनि जरी शाखा । तरी कर्मवृद्धीसि देखा । इयेंचि मूळें ॥ ७९ ॥ आणि आनीं तरी झाडीं । शाखा वाढतां मुळें गोंढीं । मूळ गाढें तंव वाढी । पैस आथी ॥१८०॥ [क्रमेति] तैसेंचि इया शरीरा । कर्म तंव देहीं संसारा । आणि देह तंव व्यापारा । ना ह्मणोंचि नये ॥८१॥ ह्मणोनि देहें मानुषें । इयें मूळें होती न चुके । ऐसें जगज्जनकें । बोलिलें तेणें ॥८२॥ मग तमाचें तें दारुण । स्थिरावलेया वाडधाण । [सत्त्ववृद्धिमाह–ऊर्ध्वं प्रसृताः] सत्वाची सुटे सेंद्राण । वाहुटळी ॥ ८३ ॥ तैं याचि मनुष्याकारा । मुळीं सुवासना निघती आंरा । घेऊनि फुटती कोंबारा । सुकृतांकुरीं ॥ ८४ ॥ उकलतेनि उन्मेखें । प्रज्ञाकुशलतेंचि तिखें । डिरिया निघती निमिखें । ‡बाबळेजुनी ॥ ८५ ॥ मतीचे सोट वांवे । घालिती स्फूर्तीचे थांवे । बुद्धिप्रकाश घे धांवे । §विवेकावरी ॥ ८६ ॥ तेथ मेधांरसें सगर्भ । आस्थापत्रीं सबोंब । सरळ निघती कोंभ । सद्वृत्तीचे ॥ ८७ ॥ [छंदांसीति] सदाचाराचिया सहसा । टेकी उठती बहुवसा ।

---

* तिहींपाणी. † पडों लागे. ‡ बाबळेजती. § विवेकाचेनि.

---

१ हाले. २ अग्रभागीं. ३ जारणमारण. ४ परपीडा. ५ मुळें. ६ जाणें. ७ सर्प. ८ समूह. ९ पुढेंपुढें. १० अंकुर. ११ ढहाळ्या. १२ विस्तारे. १३ दृढ. १४ देहाचा संसार. १५ कर्माला. १६ वादळ. १७ सवेग, थोर. १८ अंकुर. १९ कोंभ. २० तीक्ष्ण. २१ विस्तारून. २२ फोक. २३ अवकाश, विस्तारून. २४ बळ. २५ बुद्धीनें. २६ सुशोभित. २७ ठसे, अंकुर.

धुमधुमिती घोषा । वेदपद्याच्या ॥ ८८ ॥ शिष्टागमविधानें[1] । विविधयाग-वितानें[2] । इयें पानावरी पानें । *पालेजती ॥ ८९ ॥ [तस्य शाखाः] ऐशा यमदमीं घोंसाळिया[3] । उठती तपाचिया डाहाळिया । देती वैराग्यशाखा कैवळिया[4] । वेल्हाळपणें[5] ॥ १९० ॥ विशिष्टां व्रतांचे फोक । †धीराच्या अणगटी[6] तिख । जन्मवेगें ऊर्ध्वमुख । उंचावती ॥ ९१ ॥ माजि वेदाचा पाला दाट । तो करी सुविद्येचा झडझडाट । जंव वाजे अचाट । सत्वानिळ ॥ ९२ ॥ [विषयप्रवालाः] तेथ धर्मडाळ[7] बाहाळी । दिसती जन्मशाखा सरळी । तिया आड फांटती फळीं । स्वर्गादिकीं ॥ ९३ ॥ पुढां उपरति रोगें लोहिवी[8] । धर्ममोक्षाची शाखा पालवी । पाल्हाजत नित्य नवी । वाढतीचि असे ॥ ९४ ॥ पैं रवि चंद्रादि ग्रहवर । पितृ ऋषि विद्याधर । हे आडशाखाप्रकार । पैस येती ॥९५॥ याहीपासून उंचवडें । गुंढले[9] ‡फळाचेनि बुडें । इंद्रादिक ते मोंदोडे[10] । थोर शाखांचे ॥ ९६ ॥ मग तयांही उपरी डाहाळिया । तपोधनीं उंचावलिया । मरीची कश्यपादि इया । उपरी शाखा ॥ ९७ ॥ एवं माळोवाळीं[11] उत्तरोत्तर । ऊर्ध्वशाखांचा पैसार । बुडीं साना अग्रीं थोर । फळाढ्य हा ॥९८॥ वरी उपरिशाखाही पाठीं । येती फळभार जे किरीटी । ते ब्रह्मेशांत[12] अणगटीं[13] । कोंभ निघती ॥ ९९ ॥ फळाचेनि वोझेपणें । ऊर्ध्वीं वोंवाडे[14] दुणें । जंव माघौतें बैसणें । मूळींचि होय ॥ २०० ॥ प्राकृताही तरी रुखा । जे फळें दाटली होय शाखा । ते वोवांडली देखा । बुडासिं ये ॥ १ ॥ तैसें जेथुनि हा आघवा । संसारतरूचा उठावा । तिये मूळीं टेंकती पांडवा । वाढतेनि ज्ञानें ॥ २ ॥ ह्मणौनि ब्रह्मेशानापरतें[15] । वाढणें नाहीं जीवातें । तेथूनि मग तरौतें[16] । ब्रह्मचि कीं ॥ ३ ॥ परि हें असो ऐसें । ब्रह्मादिक ते आंगवैसें[17] । ऊर्ध्वमूळासरिसें[18] । न तूकती गा ॥ ४ ॥ आणिकही शाखा उपरता[19] । जिया सनकादिकनामें विख्याता । तिया फळीं मूळीं नांडळतां । भरलिया ब्रह्मीं ॥ ५ ॥ ऐसी§ मनुष्यापासूनि जाणावी । ऊर्ध्वीं ब्रह्मादिशेषे[20] पालवी । शाखांची वाढी बरवी । उंचावे पैं ॥६॥ पार्था ऊर्ध्वींचिया ब्रह्मादि । मनुष्यत्वचि होय आदि । ह्मणौनि इयें अधीं । ह्मणीतलीं मूळें ॥ ७ ॥ एवं तुज अलौकिक । हा अधोर्ध्वशाख । सांगीतला भवरूख । ऊर्ध्वमूळ ॥ ८ ॥ आणि अधिंचीं[21] हीं मूळें । ¶उपपत्ती परिसविलीं सविवेळें[22] । आतां परिस उन्मूळे[23] । कैसेनि हा ॥ ९ ॥

---

* पांजरती. † धैर्याच्या. ‡ उबडें. § मनुष्यालागोनि. ¶ उपपत्ती दाविलीं.

---

१ शिष्टाचार व वेदोक्त आचरण. २ विस्तार. ३ घोंस. ४ कवळून, आलिंगून. ५ विस्तारानें. ६ मुळ्या. ७ जाडी साल. ८ विस्तार. ९ रंगानें. १० लाल. ११ झांकले. १२ मंडप. १३ माळयामाळयावर. १४ ब्रह्मदेव व शिव यांपर्यंत, मुळांत. १५ लवे. १६ ब्रह्मा व शिव यांपलीकडे. १७ आकृतीनें. १८ संसारवृक्षासमान गणले जात नाहींत. १९ वरच्या. २० न स्पर्शतां. २१ समग्र. २२ खालचीं. २३ सविस्तर. २४ उपडेल.

न रूपमस्येह तथोपलभ्यते नांतो न चादिर्न च संप्रतिष्ठा ।
अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसंगशस्त्रेण दृढेन छित्वा ॥ ३ ॥

[अश्वत्थमेनं सुविरूढमूलं] परि तुझ्या हन पोटीं । ऐसें गमेल किरीटी । जे येवढें झाड उत्पाटी । ऐसें कायि असे ॥ २१० ॥ कीं ब्रह्मयाच्या शेवटवरी । ऊर्ध्व शाखांची थोरी । आणि मूळ तंव निराकारीं । ऊर्ध्वीं असे ॥ ११ ॥ हा स्थावराही तळीं । फांकत असे अधींच्या डाळीं । माजि धांवतसे दुजा मुळीं । मनुष्यरूपीं ॥ १२ ॥ ऐसा गाढा आणि अफाट । आतां कोण करी यया शेवट । तरि झणि हा हळुवट । धरिसी भाव ॥ १३ ॥ [इह] तरि हा *उन्मूळावया दोषें । येथ सायासचि कायिसे । [न रूपमस्य] काय बाळा बागुल देशें । दवडावा आहे ॥ १४ ॥ गंधर्वदुर्ग काय पाडावें । काय शशविषाण मोडावें । होआवें मग तोडावें । खपुष्प कीं ॥ १५ ॥ तैसा संसार हा वीरा । रूख नाहीं साचोकारा । मा उन्मूळणीं दरारा । कायिसा तरी ॥ १६ ॥ आह्मीं सांगीतली जे परी । मूळडाळांची उजरी । ते वांझेचीं घरभरी । लेंकुरें जैसीं ॥१७॥ काय कीजति चेइलेपणीं । स्वप्नींचीं तियें बोलणीं । तैसी †जाण ते काहाणी । डुंगळीचि ते ॥ १८ ॥ [तथा] वांचूनि आह्मीं निरूपिलें जैसें । ययाचें अचळ मूळ असे तैसें । [उपलभ्यते] आणि तैसाचि जरी हा असे । साचोकारा ॥ १९ ॥ तरि कोणाचेनि संतोंनें । निपजती तया उन्मूळणें । काय फुंकिलिया गगनें । जाइजेल गा ॥ २२० ॥ ह्मणौनि पैं धनंजया । आह्मी वानिलें रूप तें माया । कासवीचेनि तुपें राया । वोगरिलें जैसें ॥२१॥ मृगजळाचीं गा तळीं । तिये दिठी दुरूनि न्याहाळीं । वांचूनि तेणें पाणियें साळी केळी । लाविसी काई ॥ २२ ॥ मूळ अज्ञानचि तंव लटिकें । मा तयाचें कार्य हें केतुकें । ह्मणौनि संसाररुख सटिकें । वावोचि गा ॥ २३ ॥ [नांतः] आणि अंत यया नाहीं । ऐसें बोलिजे जें कांहीं । तेंही साचचि पाहीं । येके परी ॥ २४ ॥ तरि प्रबोध जंव नोहे । तंव निद्रे काय अंत आहे । ‡कीं रात्री सरे तंव पाहे । तया आरौतें ॥ २५ ॥ तैसा जंव पार्था । विवेक नुघवी माथा । तंव अंत नाहीं अश्वत्था । भवरूपा यया ॥ २६ ॥ वाजतें वारें निवांत । न राहे जेथिचें तेथ । तंव तरंगता अनंत । ह्मणावीच कीं ॥ २७ ॥ ह्मणौनि सूर्य जैं हारपे । तैं मृगजळाभास लोपे । कां प्रभा जाय दीपें । मालवलेनि ॥ २८ ॥ तैसें मूळबीज अविद्या खाये । तें ज्ञान जैं उभें होये । तैंचि यया अंत आहे । येन्हवीं नाहीं

* उन्मूळावयोद्देशें. † जागयां. ‡ कां रात्र सरे कें पाहे.

१ उपटी. २ ब्रह्मलोकपर्यंत. ३ बळकट. ४ हलकट, क्षुद्र. ५ उद्देशें. ६ खरेपणाला. ७ फांद्यांची. ८ ज्ञाल्याला, (समज.) ९ दुर्बळ. १० कोणा लेंकाच्यानें. ११ मेजवानी केली. १२ कोठून, कितकें. १३ सत्यत्वेंकरून. १४ प्रातःकाळ. १५ आलीकडे. १६ वर न करी.

॥ २९ ॥ [न चादिः] तेविंचि हा अनादी । ऐसी ही आथी [1]शाब्दी । तो [2]आळु नोहे [3]अनुरोधी । बोलातें यया ॥ २३० ॥ जे संसारवृक्षाच्याठाईं [4]। [5]साचोकार तंव नाहीं । मा नाहीं तया आदि काई । कोण होईल ॥ ३१ ॥ जो साच जेथुनि उपजे । तयातें आदि हें साजे । आतां नाहींचि तो ह्मणिजे । कोठूनियां ॥ ३२ ॥ ह्मणौनि जन्मेना आहे । ऐसिया सांगों कवण [6]मीये । यालागीं नाहींपणेंचि होये । अनादि हा ॥३३॥ वांझेचिया लेंका । कैंची जन्मपत्रिका । नभीं नीळी भूमिका । कें कल्पूं पां ॥ ३४ ॥ व्योम[7]कुसुमांचा पांडवा । कवणें [8]दंट तोडावा । ह्मणौनि नाहीं ऐसिया भावा । आदि कैंची ॥ ३५ ॥ जैसें घटाचें नाहींपण । असतचि असे केलेनिविण । तैंसा समूळ वृक्ष जाण । अनादि हा ॥ ३६ ॥ अर्जुना ऐसेनि पाहीं । आद्यंत ययासी नाहीं । [न च संप्रतिष्ठा] माजि स्थिती आभासे कांहीं । परि [9]टवाळ [10]ते गा ॥ ३७ ॥ ब्रह्मगिरीहूनि न निगे । आणि समुद्रींही कीर न रिगे । तरि माजि दिसे वाउगें । [11]मृगाबु जैसें ॥ ३८ ॥ तैसा आद्यंत कीर नाहीं । आणि साचही नोहे कहीं । परी लटिकेपणाची नवाई । *[12]पडिभासे गा ॥ ३९ ॥ नाना रंगीं [13]गजबजे । जैसें इंद्रधनुष्य देखिजे । तैसा [14]नेणतया [15]ओपजे । आहे ऐसा ॥ २४० ॥ ऐसेनि स्थितीचिये वेळे । भुलवी अज्ञानाचे डोळे । [16]लौंघवी हरी मेखळे । लोक जैसा ॥ ४१ ॥ आणि नसतीचि [17]श्यामिका । व्योमीं दिसे तैसी दिसो कां । तरी दिसणेंही क्षणा एका । होय जाय ॥ ४२ ॥ स्वप्नींही मानिलें लटिकें । तरी निर्वाहो कां एकसारिखें । तेविं आभास हा क्षणिकें । †रीतीचा गा ॥ ४३ ॥ देखतां आहे [18]आवडे । घेऊं जाइजे तरि नातुडे । जैसा टिकु[19] कीजे [20]मोंकडें । जळामाजि ॥ ४४ ॥ तरंगभंग ‡संडीपडे [19]। विजूही §न पुरे [20]होडे । आभासासि तेणें पाडें । होणें जाणें गा ॥ ४५ ॥ जैसा ग्रीष्म[21]शेषींचा वारा । नेणिजे समोर कीं पाठिमोरा । तैसी स्थिती नाहीं तरुवरा । भवरूपा यया ॥ ४६ ॥ एवं आदि ना अंत स्थिती । ना रूप ययासि आथी । आतां कायसी कुंथाकुंथी । उन्मूळनीं गा ॥ ४७ ॥ आपुलिया अज्ञानासाठीं । नव्हता [22]थोंवला [8]किरीटी । [असंगशस्त्रेण] तरि आतां आत्मज्ञानाच्या लोटीं । [23]खांडेनि गा ॥ ४८ ॥ वांचूनि ज्ञानेवीण एकें । उपाय करिसी जितुके । तिहीं गुंफसि अधिकें । रुखीं इये ॥ ४९ ॥ मग किती खांदोखांदीं । यया हिंडावें ऊर्ध्वीं

---

* पढियासे. † रिताचि गा. ‡ सांडीं. § नुपकरे.

---

१ वार्ता. २ आळ. ३ अनुकूळ नव्हे. ४ सत्यता. ५ आई. ६ आकाशपुष्पांचा. ७ स्थिति. ८ त्र्यंबकेश्वरचा पर्वत. ९ मृगजळ. १० प्रतिभासे. ११ भरे. १२ उत्पन्न. १३ सोंगाडी, बहुरूपी. १४ वेष, सोंग. १५ निळेपणा. १६ वाटतो. १७ स्थिति. १८ प्रतिबिंबित माकड. १९ एकीकडे जाई. २० पैज. २१ ग्रीष्मांतींचा. २२ बळावला. २३ शस्त्रानें.

अर्धीं । ह्मणौनि मूळचि अज्ञान छेदीं । सम्यक्ज्ञानें ॥ २५० ॥ येन्हवीं दोरीचिया उरगा । डांगा मेळवितां पैं गा । तो *शिणचि वाउगा । केला होय ॥ ५१ ॥ तरावया मृगजळाची गंगा । डोणीलागीं धांवतां दांगा- । माजि वोहळें बुडिजे पैं गा । साच जेवीं ॥ ५२ ॥ तेविं नाथिलिया संसारा । उपाईं जाचतया वीरा । आपणपें लोपे वारा । विकोपीं जाय ॥ ५३ ॥ ह्मणोनि स्वमीचिया †धाया । औषध चेवोचि धनंजया । तेविं अज्ञानमूळा यया । ज्ञाननचि खड्ग ॥ ५४ ॥ [दृढेन] परि तेंचि लीला पैरजवे । तैसें वैराग्याचें नवें । अभंगबळ होआवें । बुद्धीसि गा ॥ ५५ ॥ उठिलेनि वैराग्यें जेणें । ‡हा त्रिवर्ग ऐसेनि सांडणें । जैसें वमुनियां सुणें । आतांचि गेलें ॥ ५६ ॥ हाठायवरी पांडवा । पदार्थजाती आघवा । विटवी तो होआवा । वैराग्य लाटु ॥ ५७ ॥ [छित्वा] मग देहाहंतेचेंदळें । सांडूनि एकेचि वेळे । प्रत्यक्बुद्धी करतळें । होतवसावे ॥ ५८ ॥ निसळें विवेकसोहणें । जे ब्रह्माहमस्मिबोधें सणाणें । मग पुरतेनि बोधें उटणें । एकलेचि ॥ ५९ ॥ परि निश्चयाचें मुष्टिबळ । पाहावें एकदोनवेळ । मग तुळावें अति चोखाळ । §मननवरी ॥ २६० ॥ पाठी हतियेरां आपणयां । निदिध्यासें एक जालिया । पुढें दुजें नुरेल घाया- । पुरतें गा ॥ ६१ ॥ तें आत्मज्ञानाचें खांडें । अद्वैत प्रभेचेनि वाडें । नेदील उरों कवणेकडे । भववृक्षासि ॥ ६२ ॥ शरदागमींचा वारा । जैसा केर फेडी अंबरा । कां उदयला रवी आंधारा । घोंट भरी ॥ ६३ ॥ नाना उपवढ होत खेवो । नुरे स्वप्नसंभ्रमाचा ठावो । स्वप्रतीतिधारेचा वोहो । करील तैसें ॥ ६४ ॥ तेव्हां ऊर्ध्व कां अधोमूळ । कां अधीचें हन शाखाडाळ । तें कांहींचि न दिसे मृगजळ । चांदिणा जेविं ॥ ६५ ॥ ऐसेनि गा वीरनाथा । आत्मज्ञानाचिया खड्गलता । छेदूनियां भवाश्वत्था । ऊर्ध्वमूळातें ॥ ६६ ॥

ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन् गता न निवर्तंति भूयः ।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ ४ ॥

[ततः पदं तत्] मग इंदंतेसि वाळलें । जें मीपणेंवीण डोहारलें । तें रूप पाहिजे आपलें । आपणचि ॥ ६७ ॥ [परिमार्गितव्यं] परि दर्पणाचेनि आधारें । एकचि करून दुसरें । मुख पाहाती ¶गोंबरें । तैसें नको हो ॥ ६८ ॥ हें

* वावोचि भारुगा. † क्षया, भया. ‡ यात्रिवींणका. §मननेवरी. ¶गव्हारें.

१ काढ्या. २ होडी. ३ अरण्य. ४ लटका. ५ उपायाचे कष्ट करणारास. ६ वार केल्यानें, विकोपास जाईल. ७ धारण करतां यावें. ८ धर्म, अर्थ आणि काम. ९ सुकाळ. १० अंतरनिष्ठ बुद्धीस. ११ कवच. १२ हातीं ध्यावें. १३ पाजविलें. १४ सहाणेवर. १५ तीक्ष्ण, खणखणीत. १६ एकाला जो बोध त्याणें उटणें. १७ हत्याराच्या निदिध्यासानें आपण तद्रूप झाल्यावर. १८ शस्त्र. १९ वाढे. २० जागृति. २१ प्रवाह, तीक्ष्णता. २२ बोट दाखवून हें म्हणतां येत नाहीं. २३ प्रसिद्ध झालें. २४ पाहावें. २५ गव्हार.

हें पाहाणें ऐसें असे वीरा । जैसा *नमोडलिया विहिरा । मग आपलीया उगमीं झरा । भरोनि ठाके ॥ ६९ ॥ नातरि आटलिया अंभ । निजबिंबीं प्रतिबिंब । नेहटे कां नभीं नभ । घटाभावीं ॥ २७० ॥ ना ना इंधनांश सरलेया । वन्हि परते जेविं आपणपयां । तैसें आपेंआप धनंजया । न्याहाळणें जें ॥ ७१ ॥ जिव्हे आपली चवी चाखणें । चक्षु निज बुबुळ देखणें । आहे तया ऐसें निरीक्षणें । आपुले पैं ॥ ७२ ॥ कां प्रभेसि प्रभा मिळे । गगन गगनावरी लोळे । नाना पाणी भरलें खोळे । पाणियाचिये ॥ ७३ ॥ आपणेंचि आपणयातें । पाहिजे जें अद्वैतें । तें ऐसें होय निरुतें । बोलिजतु असे ॥ ७४ ॥ [तमेव चाद्यं पुरुषं] जें पाहिजतेनवीण पाहिजे । कांहीं नेणणाचि जाणिजे । आद्यपुरुष ह्मणिजे । जया ठायातें ॥ ७५ ॥ तेथही उपाधीचा वोथंबा । घेऊनि श्रुति उभविती जिभा । मग नामरूपाचा बैंडंबा । करिती वायां ॥ ७६ ॥ [प्रपद्ये] पैं भवस्वर्गा उबगले । मुमुक्षु योगज्ञाना वेळघले । पुढती नयों इया निगाले । पैजा जेथ ॥ ७७ ॥ संसाराचिया पायां पुढां । पळती वीतरागा होडां । ओलांडोनि ब्रह्मपदाचा कर्म कडा । घालिती मागां ॥ ७८ ॥ अहंतादिभावां आपुलियां । झाडा देऊनि आघवेयां । पत्र घेती ज्ञानिये जया । मूळघरासी ॥ ७९ ॥ [यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी] पैं जेथुनी हे येवढी । विश्वपरंपरेची विरूढी । वाढती आशा जैसी कोरडी । निदैवाची ॥ २८० ॥ जिये कां वस्तूचें नेणणें । आणिलें थोर जगा जाणणें । नाहीं तें नांदविलें जेणें । मी तूं जगीं ॥ ८१ ॥ पार्था तें वस्तु पाहिलें । †आपण पैं आपुलें । पाहिजे जैसें हिंवलें । हिंव हिंवें ॥ ८२ ॥ [यस्मिन् गाता न निवर्तंति भूयः] आणीकही एक तया । वोळखण असे धनंजया । तरी कां जया भेटलिया । येणेंचि नाहीं ॥ ८३ ॥ ‡परि तया भेटती ऐसे । जे ज्ञानें सर्वत्र सरिसे । महाप्रळयांबूचें जैसें भरलेपण ॥ ८४ ॥

निर्मानमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।
द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छंत्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ ५ ॥

[निर्मानमोहाः] जया पुरुषांचें कां मन । सांडोनि गेले मोह मान । वर्षातीं जैसे घन । आकाशातें ॥ ८५ ॥ [जितसंगदोषाः] निकंवड्या निष्ठुरा । उबगिजे जेविं सोयरा । §तैसे नागवती विकारां । वेटाळूं जे ॥ ८६ ॥ [अध्यात्मनित्याः]

---

*बुडलिया. † आपणपें. ‡ परी ते. § तेवीं नावथे विकारां, वेटाळूं जया.

---

१ पाणी. २ मिळे. ३ पाहणें. ४ पाहुणाराबांचून. ५ अज्ञान्यानें. ६ आश्रय. ७ गलबला. ८ कंटाळलें. ९ अनुसरलें. १० न येऊं. ११ प्रतिज्ञेनें. १२ विरक्त. १३ पैजेनें. १४ ब्रह्मपदाचा कडा, प्रांतभाग उल्लंघून कर्म मागें टाकतात. १५ पोंचती. १६ स्थिति. १७ जसें थंडीनें थंडीला थंडवावें तसें. १८ अभिमान. १९ पावसाळा सरल्यावर. २० अतिदरिद्र्याला. २१ तिरस्कार करतात. २२ आप्त. २३ न आटोपती.

फळली केळी [1]उन्मूळे । तैसी आत्मलाभें प्रबळें । जयाची क्रिया [2]ढाळेंढाळें । गळती आहे ॥ ८७ ॥ [विनिवृत्तकामाः] आगी लागलिया रुखीं । देखोनि सैरा पळती पक्षी । तैसें सांडिलें अशेखीं । विकल्पीं जे ॥ ८८ ॥ आइकें [3]सकळ दोषतृणीं । अंकुरिजति जिये मेदिनी । तिये भेद[4]बुद्धीची काहाणी । नाहीं जयातें ॥ ८९ ॥ सूर्योदयासरिसी । रात्री पळोनि जाय अपैसी । गेली देह-अहंता तैसी । अविद्येसवें ॥ २९० ॥ [द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैः] पैं आयुष्य-हीना जीवातें । शरीर सांडी जेविं अवचितें । तेविं निद्रसुरें [5]द्वैतें । सांडिले जे ॥ ९१ ॥ लोहाचें [6]सांकडें परिसा । न जोडे अंधार [7]रवी जैसा । द्वैतबुद्धीचा तैसा । दुकाळ सदां [8]ज्झा ॥ ९२ ॥ अगा सुखदुःखाकारें । द्वंद्वें देहीं जियें गोचरें । तियें जयां कां समोरें । होतींचि ना ॥ ९३ ॥ स्वप्नींचें राज्य कां मरण । नोहे हर्षशोकांसि कारण । *[9]उपवढलिया जाण । जियापरी ॥९४॥ तैसे सुखदुःखरूपीं । द्वंद्वीं जे पुण्यपापीं । न [10]घेपीजती सर्पीं । गरुड जैसे ॥ ९५ ॥ [गच्छंति] आणि [11]अनात्मवर्गनीर । सांडूनि आत्मरसाचें क्षीर । †[12]चरेताति जे सविचार । राजहंस ॥९६॥ जैसा वर्षोनि भूतळीं । आपला रस [13]अंशुमाळी । मागौता आणी रश्मिजाळीं । बिंबासीचि ॥ ९७ ॥ तैसें आत्म-भ्रांतीसाठीं । वस्तु विखरली बारावाटीं । ते एकवटिती ज्ञानदृष्टी । अखंड जे ॥ ९८ ॥ किंबहुना आत्मयाचा । निर्धारीं विवेक जयांचा । बुडाला वोघ गंगेचा । सिंधुमाजि जैसा ॥ ९९ ॥ [अमूढाः] पैं आघवेंचि आपुलेपणें । नुरेचि जयां अभिरूपणें । जैसें येथुनि पैल्हा जाणें । आकाशा नाहीं ॥ ३०० ॥ जैसा आम्रीचा डोंगर । नेघे कोणी बीज अंकुर । तैसा मनीं जयांचा विकार । उदयजेना ॥ १ ॥ जैसा काढिलिया मंदराचळ । राहे क्षीराब्धी निश्चळ । तैसा नुठी जयां सळ । कामोर्मींचा ॥२॥ चंद्रमा कळीं धोला । न दिसे कोणें आंगीं वोसावला । तेविं अपेक्षेचा अवखळा । नपडे जयां ॥ ३ ॥ हें किती बोलूं असांगडें । जेविं परमाणु नुरे वायुपुढें । तैसें विषयाचें नावडे । नांवचि जयां ॥४॥ एवं जे जे कोणी ऐसे । केले ज्ञानाख्यहुताशें । [तत्]ते तेथ मिळती जैसें । हेमीं हेम ॥ ५ ॥ ‡तेथ ह्मणिजे कवणे ठाईं । ऐसेंही पुससी कांहीं । [पदमव्ययं] तरि तें पद गा नाहीं । वेंचुं जया ॥ ६ ॥ दृश्यपणें देखिजे । कां ज्ञेयत्वें जाणिजे । अमुकें ऐसें ह्मणिजे । तें जें नव्हे ॥ ७ ॥

---

* उपवढ जालिया. † विचरताति. ‡ तें ज्ञान ह्मणसी कोण । तरी तें अध्यात्म गा जाण । जेथ नित्य वस्तूचें साधन । कामरहित ॥ ३०६ ॥

---

१ उपटून पडते. २ क्रमाक्रमानें. ३ सकळ दोषरूप तृणें जिच्यावर अंकुर घेतात अशा पृथ्वीरूप भेदबुद्धीची कहाणी, गोष्ट जेथें नाहीं. ४ दारिद्र्य, दुष्काळ. ५ रवीला. ६ जागे झाल्यावर. ७ पराजित केले जात नाहींत. ८ जड समुदायरूप जल. ९ वागतात. १० सूर्य. ११ पसरली. १२ पलीकडे. १३ आश्रय, छल, कढ. १४ षोडश कलांनीं भरला. १५ न्यून नाहीं. १६ न्यूनता. १७ निरुपम. १८ नाश.

न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ।
यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥

[न तदिति] पैं *दीपाचिया बंबाळीं । कां चंद्र हन जें उजळी । हें काय बोलों अंशुमाळी । प्रकाशी जें ॥ ८ ॥ तें आघवेंचि दिसणें । जयाचें कां न देखणें । विश्व भासतसे जेणें । लपालेनी ॥ ९ ॥ जैसें शिंपीपण हारपे । तंव तंव खरें होय रुपें । कां दोरी लोपतां सापें । फार होइजे ॥ ३१० ॥ तैसीं चंद्रसूर्यादि थोरें । इयें तेजें जियें फारें । तियें जयाचेनि †आधारें । प्रकाशती ॥ ११ ॥ [तद्धाम परमं मम] ते वस्तु कीं तेजोराशी । सर्वभूतात्मक सरिसी । चंद्रसूर्याच्या मानसीं । प्रकाशे जे ॥ १२ ॥ ह्मणौनि चंद्रसूर्य कैंडवसां । पडती वस्तूच्या प्रकाशा । यालागीं तेज जें तेजसा । तें वस्तूचें अंग ॥ १३ ॥ आणि जयाच्या प्रकाशीं । जग हारपे चंद्रार्केसीं । सचंद्रनक्षत्रें जैसीं । दिनोदयीं ॥ १४ ॥ ना तरी प्रबोधलिये वेळे । ते स्वप्नींची डिंडी मावळे । कां नुरेचि सांजवेळे । मृगतृष्णिका ॥ १५ ॥ तैसा जिये वस्तूच्या ठायीं । कोण्हीच कां आभास नाहीं । तें माझें निजधाम पाहीं । पाटाचें गा ॥ १६ ॥ [यद्गत्वा न निवर्तंते] पुढती जे तेथ गेले । ते न घेती माघौतीं पाउलें । महोदधीं कां मिनले । ‡स्रोत जैसे ॥ १७ ॥ कां लवणाची कुंजरी । सुदलिया लवणसागरीं । होयचि ना माघारी । परती जैसी ॥ १८ ॥ नाना गेलियां अंतराळा । न येतीचि वन्हिज्वाळा । नाहीं तप्तलोहौनि जळा । निघणें जेविं ॥ १९ ॥ तेविं मजसीं एकवट । जे जाले ज्ञानें चोखट । तयां पुनरावृत्तीची वाट । मोडली गा ॥ ३२० ॥ [अयमर्जुनाभिप्रायः] तेथ प्रज्ञापृथ्वीचा रावो । पार्थ ह्मणे जी जी §पसावो । परि विनंती एकी देवो । चित्त देतु ॥ २१ ॥ तरी देवेंसि स्वयें एक होती । मग माघौती जे न येती । ते देवेंसि भिन्न आथी । कीं अभिन्न जी ॥ २२ ॥ जरि भिन्नाचि अनादिसिद्ध । तरी न येती हें असंबद्ध । जे फुलां गेले षट्पद । ते फुलेंचि होती का ॥ २३ ॥ पैं लक्षाहूनि अनारिसे । बाण लक्षीं शिवोनि जैसे । मागुते पडती तैसे । येतीचि ते ॥२४॥ ना तरि तूंचि ते स्वभावें । तरि कोण कोणेसीं मिळावें । आपणयासी आपण रुपावें । शस्त्रें केविं ॥ २५ ॥ ह्मणौनि तुजसीं अभिन्नां जीवां । तुझा संयोगवियोग देवा । नये बोलों अवयवां । शरीरेंसीं ॥ २६ ॥ आणि जे सदां वेगळे तुजसीं । तयां मिळणी नाहीं कोणें ¶दिवसीं । मा येती न येती हे कायसी । वायवुद्धि ॥ २७ ॥ तरि कोण गा ते तूतें । पावोनि न येती माघौते । हें

* दीपियाचा. † आंधारें. ‡ सरिता स्रोत. § महत्पसावो, परिसावो. ¶ देशीं.

१ सूर्य. २ प्रसृत. ३ समान. ४ कवडसा. ५ तेजवंतास. ६ जागृतीनंतर. ७ स्वारी. ८ मुख्य, अधिकाराचें. ९ मिळाले. १० हत्तीण. ११ घातली असतां. १२ प्रसाद. १३ वायफळ. १४ निशाणाहून. १५ भिन्न. १६ भोसकावें. १७ ऐक्य. १८ व्यर्थमति.

विश्वतोमुखा मातें । बुझावीं जी ॥ २८ ॥ इये *अपेक्षीं अर्जुनाच्या । तो शिरोमणी सर्वज्ञांचा । तोषला बोध शिष्याचा । देखोनियां ॥ २९ ॥ मग ह्मणे गा महामति । मातें पावोनि न येती पुढती । ते भिन्नाभिन्न रिती । आहाती दोनी ॥ ३३० ॥ जैं विवेकें खोलें पाहिजे । तरि मी तेचि ते सहजें । ना आहाचवाहाच तरि दुजे । ऐसेंही गमती ॥ ३१ ॥ जैसें पाणियावरी वेगळ । †तळपतां दिसती कल्लोळ । येरहवीं तरी निखिळ । पाणीचि तें ॥ ३२ ॥ कां सुवर्णाहूनि आनें । लेणीं गमती भिन्नें । मग पाहिजे अंत सोनें । आघवेंचि तें ॥ ३३ ॥ तैसें ज्ञानाचिये दिठी । मजसीं अभिन्नचि ते किरीटी । येर भिन्नपण तें उठी । अज्ञानास्तव ॥ ३४ ॥ आणि साचोकारेनि वस्तुविचारें । कैंचें मज एकासि दुसरें । जें भिन्नाभिन्नव्यवहारें । उमसिजेलें ॥ ३५ ॥ आघवेंचि आकाश सूनि पोटीं । बिंबचि जैं आते खोटी । तैं प्रतिबिंब कें उठी । कें रश्मि शिरे ॥ ३६ ॥ कां कल्पांतींचिया पाणिया । काय वोत भरिती धनंजया । ह्मणौनि कैंचे अंश अविक्रिया । एका मज ॥ ३७ ॥ परि वोघाचेनि मेळें । पाणि उजू परि वांकुडें जालें । रवी दुजेपण आलें । तोयबगें ॥ ३८ ॥ व्योम चौफेळें कीं वाटोळें । हें ऐसें कायसया मिळे । परि घटमठीं वेटाळें । तैसेंही ‡आथी ॥ ३९ ॥ हां गा निद्रेचेनि आधारें । काय एकलेनि जग न भरे । स्वप्नींचेनि जैं अवतरे । रायपणें ॥ ३४० ॥ कां मिनलेनि किडाळें । वानिभेदोंसि ये सोळें । तैसा स्वमायें वेंटाळें । शुद्ध जैं मी ॥ ४१ ॥ तैं अज्ञान एक रूढे । तेणें कोहंविकल्पाचें मांडें । मग विवरूनि कीजे फुडें । देहोहं ऐसें ॥ ४२ ॥

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।
मनःषष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ ७ ॥

[ममैवांशः] ऐसें शरीराचियेवढें । जैं आत्मज्ञान वेगळें पढे । तैं माझा अंश आवडे । थोडेपणें ॥ ४३ ॥ समुद्र कां वायुवशें । तरंगाकार उल्हसे । तो समुद्रांश ऐसा दिसे । सोनिवा जेविं ॥ ४४ ॥ [जीवलोके] तेविं जडातें जीवविता । देह अहंता उपजविता । मी जीव गमे पंडुसुता । जीवलोकीं ॥ ४५ ॥ पैं जीवाचिया बोधा । गोचर जो हा धींदा । तो जीवलोकशब्दा । अभिप्राय

* आक्षेपीं. † आपजतां. ‡ गमे.

१ सर्वत्र मुखें आहेत ज्याला अशा श्रीकृष्णा. २ समजाव. ३ वरवरच. ४ पाण्यावर कल्लोळ दिसतात, तेव्हां वेगळेपणा भासतो. ५ अलंकार. ६ खरें पाहिलें असतां. ७ उद्भविजेल. ८ घालून, शिरवून. ९ व्यापी. १० गोळा. ११ लहोटी. १२ विकार न पावणाराला. १३ पाण्याच्या संबंधानें, योगें. १४ चतुष्कोण. १५ कशानें. १६ हिणकट मिश्रित झालें असतां. १७ भिन्न कसोटीस. १८ मांडते. १९ स्पष्ट. २० देहच मी असें तादात्म्य. २१ लहान. २२ वाटूं लागतो. २३ अखंडत्व, व्यापार.

॥ ४६ ॥ अगा उपजणें निर्मणें[1]। हें साचचि जें कां मानणें। तो जीवलोक मी ह्मणे। संसार हन ॥ ४७ ॥ एवंविध जीवलोकीं। [जीवभूतः सनातनः] तूं मातें ऐसा अवलोकीं। जैसा चंद्र कां उदकीं। उदकातीत ॥ ४८ ॥ पैं काश्मीराचा[2] रवा। कुंकुमावरी पांडवा। आणिकां गमे लोहिंवा[3]। तो तरी नव्हे ॥ ४९ ॥ तैसें अनादिपण न मोडे। माझें अक्रियत्व न खंडे। परि कर्ता भोक्ता ऐसें आवडे। ते जाण गा भ्रांती ॥ ३५० ॥ किंबहुना आत्मा चोखट। होउनि प्रकृतीसि एकवट। बांधे प्रकृतिधर्मांचा पोट। आपणपयां ॥ ५१ ॥ [मनःषष्ठानींद्रियाणि] पैं मनेसी साही इंद्रियें। श्रोत्रादि [प्रकृतिस्थानि] प्रकृतिकार्यें। [कर्षति] तियें माझीं ह्मणौनि होये। व्यापारारूढ ॥ ५२ ॥ जैसें स्वर्गीं पैरिव्राजें। आपणपयां आपण कुटुंब होइजे। मग तयाचेनि धांविजे। मोहें सैरा ॥ ५३ ॥ तैसा आपलिया विस्मृती। आत्मा आपणचि प्रकृती-। सारिखा गमोनि पुढती। तियेसीचि भजे ॥ ५४ ॥ मनाच्या *रथीं वळघे। श्रवणाच्या द्वारें निघे। मग शब्दाचिया रिघे। रानामाजि ॥ ५५ ॥ तोचि प्रकृतीचा वागोरा[4]। करी त्वचेचिया मोहरा[5]। आणि स्पर्शाचिया घोरा। वना जाय ॥ ५६ ॥ कोणे एके अवसरीं। रिघोनि नेत्राच्या द्वारीं। मग रूपाच्या डोंगरीं। सैरा हिंडे ॥ ५७ ॥ कां रसनेचिया वाटा। निघोनि गा सुभटा। रसाचा दरकुटा[6]। भरोंचि लागे ॥ ५८ ॥ ना तरि येणेंचि घ्राणें। †मदंश[7] करी निघणें। मग गंधाचीं दारुणें। आडवें लंघी ॥ ५९ ॥ ऐसेनि देहेंद्रियनायकें। धरूनि मन जवळिकें। भोगीजती शब्दादिकें। विषयभरणें ॥३६०॥

शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः।
गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात् ॥ ८ ॥

[ईश्वरः] परि कर्ता भोक्ता ऐसें। हें जीवाचें तैंचि दिसे। [शरीरं यदवाप्नोति] जैं शरीरीं कां पैसे[8]। येकाधिये ॥ ६१ ॥ जैसा आंथिला[9] आणि विलासिया। तैंचि वोळखों ये धनंजया। जैं राजसेज्या ठाया[10]। वस्तीसि ये ॥ ६२ ॥ तैसा अहंकर्तृत्वाचा वाढ[11]। कां विषयेंद्रियांचा धुमाड[12]। हा जाणिजे तैं निवाड[13]। जैं देह पावे ॥ ६३ ॥ [यच्चाप्युत्क्रामतीश्वरः] अथवा शरीरातें सांडी। [गृहीत्वैतानि संयाति]‡ तन्हीं इंद्रियांची तांडी[14]। हे आपणपयां सवें§ जोडी। घेऊनि जाय ॥ ६४ ॥ [वायुर्गंधानिवाशयात्] । जैसा अपमानिला अतिथि ने। सुकृताची संपत्ती। कां साइखडेयाची[15] गती। सूत्रतंतू ॥ ६५ ॥ ना ना मावळ-

* हातीं वळघे. † देहांतूनि करी, देहांश करी. ‡ चित्त इंद्रियांचि. § काडी.

१ मरणें. २ स्फटिकाचा. ३ लाल. ४ स्वीकारी. ५ अधिकार. ६ मायिक. ७ संन्यासानें. ८ चढे. ९ वाग्दोर, लगाम. १० सन्मुख. ११ दरी, गुहा. १२ माझा अंश, जीव. १३ अरण्यें. १४ जीवानें. १५ पोषण. १६ प्रवेशे. १७ संपन्न. १८ नगराला. १९ आधिक्य. २० योग. २१ विवेचन. २२ समुदाय. २३ कळसूत्री बाहुलीची.

[1]तेंनि [2]तपनें । नेइजती लोकांचीं दर्शनें । हें असो [3]द्रुती पवनें । *नेइजे जैसी ॥ ६६ ॥ तेविं [4]मनःषष्ठां ययां । इंद्रियांतें धनंजया । देहेंराज [5]ने देहा- । पासुनि गेला ॥ ६७ ॥

श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ।
अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥ ९ ॥

[श्रोत्रं चक्षुरिति] मग येथें अथवा स्वर्गीं । जेथ †जेथ जैं देह औंपंगी । तेथ तैसेंचि पुढती पांगी । मनादिक ॥ ६८ ॥ जैसा मालवलिया दिवा । प्रभेसि जाय पांडवा । मग उंजळिजे तेथ तेधवां । तैसाचि फांके ॥ ६९ ॥ [विषयानुपसेवते] तरि ऐसैसिया राहाटी । अविवेकियांचे दिठी । येतुलें हें किरीटी । गमेचि गा ॥ ३७० ॥ जे आत्मा देहासि आला । आणि विषय येणेंचि भोगिला । अथवा [6]देहोनि गेला । हें साचचि मानिती ॥७१॥ येन्हवीं येणें आणि जाणें । कां करणें हन भोगणें । हें प्रकृतीचें तेणें । मानियेलें ॥ ७२ ॥

उत्क्रामंतं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम् ।
विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषः ॥ १० ॥
यतंतो योगिनश्चैनं पश्यंत्यात्मन्यवस्थितम् ।
यतंतोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यंत्यचेतसः ॥ ११ ॥

[स्थितं वापि] परि देहाचें मोटकें उभें । आणि चेतना तेथ [7]उपलभे । तिये चळवळेचेनि लोभें । आला ह्मणती ॥ ७३ ॥ [भुंजानं वा गुणान्वितं] तैसेंचि तया संगती । इंद्रियें आपलालां अर्थीं वर्तती । तया नांव सुभद्रापती । भोगणें जया ॥ ७४ ॥ [उत्क्रामंतं] पाठीं भोगक्षीण अपैसें । देह गेलिया †ते न दिसे । तेथें गेला गेला ऐसें । [8]बोभाती ॥ ७५ ॥ [विमूढा नानुपश्यंति] पैं [9]रुखें डोलत देखावा । तरी वारा वाजत मानावा । रुख न दिसे तथें पांडवा । नाहीं तो गा ॥ ७६ ॥ कां आरसा समोर ठेविजे । आणि आपणपें तेथ देखिजे । तरि तेधवांचि जालें मानिजे । काय आधीं नाहीं ॥ ७७ ॥ कां परता केलिया आरिसा । लोप जाला तया आभासा । तरी आपणपें नाहीं ऐसा । निश्चय करावा ॥ ७८ ॥ शब्द तरि आकाशाचा । परि [10][11]कपाळीं पिटे मेघाचा । कां चंद्रीं वेग अभ्राचा । आरोपिजे ॥ ७९ ॥ तैसें होइजे जाइजे देहें । तें

* निगे. † जैसें ‡ जें न.

१ सूर्यानें. २ सुवास. ३ मन आहे साहावें ज्यांला अशीं पांच ज्ञानेंद्रियें. ४ जीव. ५ आश्रय करी, स्वीकारी. ६ विस्तारी. ७ लाभावा. ८ देहांतून. ९ मोटकुलें, लहान. १० मिळे. ११ हाक मारितात, म्हणतात. १२ वृक्ष. १३ मस्तकीं ठेविती.

आत्मसत्ते अविक्रिये । निष्टंकिती[१] गा मोहें । आंधळे ते ॥ ३८० ॥ [पश्यंति ज्ञानचक्षुषः] येथ आत्मा आत्मयाच्याठायीं । देखिजे देहींचा धर्म देहीं । ऐसे देखणे[२] ते पाहीं । आन *आहाती[३] ॥८१॥ [यतंतो योगिन इत्यर्थः] ज्ञानें कां जयाचे डोळे । देखोनि न राहाती देहींचे खोळे[४] । सूर्यरश्मी आणियेले[५] । ग्रीष्मीं जैसे ॥ ८२ ॥ †तैसी[६] विवेकाचेनि पैसें[७] । जयांची स्फूर्ती स्वरूपीं बैसे । ते ज्ञानिये देखती ऐसें । आत्मयातें ॥ ८३ ॥ जैसें तारांगणीं भरलें । गगन समुद्रीं बिंबलें । परि तें तुटोनि नाहीं पडिलें । ऐसें निवडे ॥ ८४ ॥ गगन गगनींचि आहे । हें आभासे तें वांये[८] । तैसा आत्मा देखती देहें । गांवसिलाही[९] ॥ ८५ ॥ ‡खळाळाच्या लगबगी[१०] । फेडूनि खळाळाच्या भागीं । देखिजे चंद्रिका कां जगीं । चंद्रीं जेवीं ॥ ८६ ॥ कां नाडरचि भरे शोषे । सूर्य तो जैसा तैसाचि असे । देह होतां जातां तैसें । देखती मातें ॥ ८७ ॥ घट मठ घडले । तेचि पाठीं मोडले । परि आकाश तें संचलें । असतचि असे ॥ ८८ ॥ तैसें अखंडे आत्मसत्ते । अज्ञानदृष्टि कल्पिते । हें देहचि होतें जातें । जाणती फुंडें[११] ॥८९॥ चैतन्य[१२] चढे ना वोहटे । चेष्टवी ना चेष्टे । ऐसें आत्मज्ञानें[१३] चोखटें[१४] । जाणती ते ॥ ३९० ॥ [यतंतोऽप्यकृतात्मान इति] आणि ज्ञानही अपैतें[१५] होइल । प्रज्ञा परमाणुही उगाणा[१६] देईल । सकळ शास्त्रांचें येइल । सर्वस्व हाता ॥९१॥ परी ते व्युत्पत्ती ऐसी । जरी विरक्ती न रिगे मानसीं । तरी सर्वात्मका मजसीं । नव्हेचि भेटी ॥ ९२ ॥ पैं तोंड भरो कां विचारा । आणि अंतःकरणीं विषयांसी थारा । तरी नातुडें धनुर्धरा । त्रिशुद्धी मी ॥ ९३ ॥ हां गा §वोसणतयाच्या[१७] ¶ग्रंथीं[१८] । काइ तुटती संसारगुंती । कीं ||परिवासिलिया[१९] पोथी । वाचिली होय ॥ ९४ ॥ ना ना बांधोनियां डोळे घ्राणीं । लाविजती मुक्ताफळें । तरी तयांचें काय कळे । मोल मान ॥ ९५ ॥ तैसा चित्तीं अहंते ठावो । आणि जिभे सकळशास्त्रांचा सरावो[२०] । ऐसेनि कोडी[२१] एक जन्म जावो । परी न पविजे मातें ॥ ९६ ॥ जो एक मी कां समस्तीं । व्यापक असें भूतजातीं । ऐक तिये व्याप्ती । रूप करूं[२२] ॥ ९७ ॥

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ।
यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥ १२ ॥

[यदादित्यगतं तेजः] तरी सूर्यासकट आघवी । [जगद्भासयतेऽखिलं] हे विश्वर-

---

* आथी. † तैरो. ‡ खळाळाचिये. § वोसणतेया. ¶ ग्रंथी. || परिवेसलिया, परिवसिलिया.

१ निश्चयिती, निष्कर्ष करिती. २ पाहणारे. ३ पदरांत. ४ प्रखर, बारीक, तीव्र. ५ पसाऱ्यानें ६ व्यर्थ. ७ आढळला. ८ वेगांत. ९ डबक, थिल्लर. १० स्पष्ट. ११ ब्रह्म. १२ यथार्थ. १३ प्राप्त. १४ झाडा. १५ स्वप्नांत बोलणाऱ्याच्या. १६ स्पर्शलिया. १७ अभ्यास. १८ कोट्यवधि. १९ स्पष्ट प्रतिपादन करूं.

चना जे दावी । [तत्तेजो विद्धि मामकं] ते [१]दीप्ति माझी जाणावी । आद्यंतीं आहे ॥ ९८ ॥ [यच्चंद्रमसि] जळ शोषुनि गोलिया सविता । *ओलांश पुरवीतसे जे माधौता । ते चंद्रीं पंडुसुता । [२]ज्योत्स्ना माझी ॥ ९९ ॥ [यच्चाग्नौ] आणि [३]दहन पाचनसिद्धी । करीतसे जे निरवधी । ते [४]हुताशीं तेजोवृद्धी । माझीचि गा ॥ ४०० ॥

गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ।
पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ॥ १३ ॥

[गामाविश्य च] मी रिगालों असें भूतळीं । ह्मणौनि समुद्र महाजळीं । हे [५]पांसूची ढेंपुळी । विरेचिना ॥ १ ॥ [भूतानि धारयाम्यहमोजसा] आणि भूतेंहि चराचरें । हे धरीतसे जिये अपरें । †तियें मीचि धरीं [६]धरे । रिगोनियां ॥ २ ॥ [सोमो भूत्वा रसात्मकः] गगनीं मी पंडुसुता । चंद्राचेनि मिसें अमृता । भरला जालों चालता । सरोवर ॥ ३ ॥ [पुष्णामि चौषधीः सर्वाः] तेथुनि फांकती रश्मि ‡कर । ते पौंट पेलूनि अपार । सर्वौषधींचे आगर । भरित असें मी ॥ ४ ॥ ऐसेनि सस्यादिकां सकळां । करीं धान्यजाती सुकाळा । हें अन्नद्वारा जिव्हाळा । भूतजातां ॥ ५ ॥

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥ १४ ॥

आणि निपजविलें अन्न । तरि तैसें कैचें दीपन । जेणें जिरूनि समाधान । भोगिती जीव ॥ ६ ॥ [अहमिति] ह्मणौनि प्राणिजातांच्या घटीं । करूनि [७]कंदावरी [८]आंगिठी । दीप्ति जठरींही किरीटी । मीचि जालों ॥ ७ ॥ [प्राणेति] प्राणापानाच्या जोडभातीं । फुंकफुंकोनियां अहोराती । [९]आटीतसें नेणों किती । उदरामाजी ॥ ८ ॥ शुष्कें अथवा स्निग्धें । सुपक्कें कां [१०]विदग्धें । § परि मीचि गा चतुर्विधें । अन्नें पचीं ॥ ९ ॥ एवं मीचि आघवें जन । ¶जना [११]निरविते मीचि जीवन । जीवनीं मुख्यसाधन । वन्हिही मीचि ॥ ४१० ॥ आतां ऐसियाहीवरी काई । सांगों [१२]व्याप्तीची नवाई । येथ दुजें नाहींचि घेई । सर्वत्र मी गा ॥११॥ तरि कैसेंनि पां [१३]वेखें । सदां सुखियें येकें । येकें तियें बहुदुःखें क्रांत भूतें ॥१२॥ जैसीं सगळिये [१४]पाटणीं । [१५]ऐकेचि दीपें दिवेलावणी । जालिया कां न देखणी । उरलीं एकें ॥ १३ ॥ ऐसी हन [१६]उखिविखी । करित आहासी

* ओल्हास. † ते मीचि. ‡ कीर. § एवंमीचि. ¶ जनाविरहितें तें.

१ प्रकाश. २ उजेड, कांति. ३ भाजणें. ४ अग्नींत. ५ रजःकणांची ढेंप, पृथ्वी. ६ जमिनींत. ७ ओघ करून. ८ धान्यादिकांला. ९ नाभिकंदावर. १० शेगडी. ११ पचवीतसें. १२ भाजलेलीं. १३ निर्वाहक. १४ व्यापकपणाची अपूर्वता. १५ वेषानें. १६ नगरांत. १७ एकच उजेड जर सर्व शहरभर केला तर कोणास दिसावें व कोणास दिसूं नये असें कां बरें. १८ तर्कवितर्क.

मानसिकी । तरि परिस तेही निकी । शंका फेडूं ॥ १४ ॥ पैं अवघा मीचि असें । येथ नाहीं कीर अनारिसें । परि प्राणियांचिया उल्लासें । बुद्धिऐसा ॥ १५ ॥ जैसें एकाचि आकाशध्वनी । वाद्यविशेषीं आनानी । वाजावें पडे भिन्नीं । नादांतरीं ॥ १६ ॥ कां *लोकचेष्टीं वेगळाला । जो हा एकचि भानु उगवला । तो आनानी परी गेला । उपयोगासी ॥ १७ ॥ ना ना बीजधर्मानुरूप । झाडां उपजवी आप । तैसें परिणमलें स्वरूप । माझें जीवा ॥ १८ ॥ अगा नेणा आणि चतुरा । पुढां नीळेयांचा दुसरा । नेणा सर्प जाला येरा । सुखालागीं ॥ १९ ॥ हें असो स्वातीचें उदक । शुक्तीं †मोतीं व्याळीं विख । तैसा सज्ञानांसी मी सुख । दुःख तों अज्ञानासी ॥ ४२० ॥

सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदांतकृद्वेदविदेव चाहम् ॥ १५ ॥

[सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टः] येऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं । मी अमुका आहें ऐसी । जे बुद्धि स्फुरे अहर्निशीं । ते वस्तु गा मी ॥ २१ ॥ [मत्तः स्मृतिः] परि संतासवें वसतां । योगज्ञानी पैसतां । गुरुचरण उपासितां । वैराग्येसीं ॥२२॥ येणेंचि सत्कर्मे । अशेषही अज्ञान विरमे । जयांचें अहं विश्रामे । आत्मरूपीं ॥ २३ ॥ ते आपेंआप देखोनि देखीं । मियां आत्मेनि सदा सुखी । येथें मीवांचून अवलोकीं । आन हेतु असे ॥ २४ ॥ [ज्ञानं] अगा सूर्योदय जालिया । सूर्यें सूर्यचि पाहावा धनंजया । तेविं मातें मियां जाणावया । मींचि हेतु ॥ २५ ॥ [अपोहनं च] ना शरीरपरातें सेवितां । संसारगौरवचि ऐकतां । देहीं जयांची अहंता । बुडोनि ठेली ॥ २६ ॥ ते स्वर्गसंसारालागीं । धांवतां कर्ममार्गीं । दुःखाच्या सेलैभागीं । विभागी होती ॥ २७ ॥ परि हेंही होणें अर्जुना । मजचिस्तव तया अज्ञाना । जैसा जागताचि हेतु स्वप्ना । निद्रेतें होय ॥ २८ ॥ पैं अभ्रें दिवस हरपला । तोही दिवसेंचि जाणों आला । तेविं मी नेणोनि विषय देखिला । मजचिस्तव भूतीं ॥ २९ ॥ एवं निद्रा कां जागणिया । प्रबोधचि हेतु धनंजया । तेविं ज्ञाना अज्ञाना जीवांचिया । मींचि मूळ ॥ ४३० ॥ जैसें सर्पत्वा कां दोरा । दोरचि मूळ धनुर्धरा । तैसा ज्ञाना अज्ञानाचिया संसारा । मियांचि सिद्धि ॥ ३१ ॥ [वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः] ह्मणौनि जैसा असें तैसया । मातें नेणोनि धनंजया । वेद जाणों गेला तंव तया । जालिया शाखा ॥ ३२ ॥ तरि तिहीं शाखाभेदीं । मीचि जाणिजे त्रिशुद्धी । जैसा पूर्वापरा नदी । समुद्रचि ठी ॥ ३३ ॥ [वेदांतकृत्] आणि महासिद्धांतापासीं । श्रुति हारपती शब्देंसी । जैसिया सगंधा आकाशीं । वात-

* चेष्टा. † मोतियें. ० ४१७

१ २ बुद्धीसारखा. ३ भिन्नभिन्न. ४ उदक. ५ नीळमण्यांचा. ६ दोन सरांचा हार. ७ अभ्या . ८ लय पावे. ९ शेवटीं. १० विभाग. ११ स्थान. १२ सुगंधयुक्त.

लहरी ॥ ३४ ॥ तैसें समस्तही श्रुतिजात । ठाके लाजिलें ऐसें निवांत । तें मींचि करीं यथावत । प्रकटोनियां ॥ ३५ ॥ [वेदविदेव चाहं] पाठीं श्रुतीसहित अशेष । जग हारपे जेथ निःशेष । तें निजज्ञानही चोख । जाणता मीचि ॥ ३६ ॥ जैसें निदेलिया जागिजे । तेव्हां स्वप्नाचें कीर नाहीं दुजें । परि एकत्वही देखों पाविजे । आपलेंचि ॥ ३७ ॥ तैसें आपलें अद्वयपण । मी जाणतसें दुजेनवीण । तयाही बोधाकारण । जाणता मीचि ॥ ३८ ॥ मग आगी लागलिया कापुरा । काजळी ना वैश्वानरा । उरणें नाहीं वीरा । जयापरी ॥ ३९ ॥ तेविं समूळ अविद्या खाये । तें ज्ञानही जैं बुडोनि जाये । तन्हीं नाहीं कीर नोहे । आणि न साहे असणेंही ॥ ४४० ॥ पैं विश्व घेऊनि गेला मागेसीं । तया चोरातें कवण कें गिंवसी । जे कोणी एकी दशा ऐसी । शुद्ध ते मी ॥४१॥ ऐसी जडाजडव्यासी । रूप करितां कैवल्यपती । ठी केली निरुपहितीं । आपुल्या रूपीं ॥ ४२ ॥ तो आघवाचि बोध सहसा । अर्जुनीं उमटला कैसा । व्योमींचा चंद्रोदय जैसा । क्षीरार्णवीं ॥ ४३ ॥ कां प्रतिभिंती चोखटे । समोरील चित्र उमटे । तैसा अर्जुनें आणि वैकुंठें । नांदतसे बोध ॥ ४४ ॥ तरि बाप वस्तुस्वभाव । फावे तंव तंव गोडिये थांव । ह्मणौनि अनुभवियांचा राव । अर्जुन ह्मणे ॥ ४५ ॥ जी व्यापकपण बोलतां । निरुपाधिक जें आतां । स्वरूप प्रसंगता । बोलिले देवो ॥ ४६ ॥ तें एकवेळ अव्यंगवाणें । कीजो कां मज सांगणें । तेथ द्वारकेचा नाथ ह्मणे । भलें केलें ॥ ४७ ॥ पैं अर्जुना आह्माहि वांडेंकोडें । अखंड बोलों आवडे । परि काय कीजे न जोडे । पुसतें ऐसें ॥ ४८ ॥ आजि मनोरथांसि फळ । जोडलासि तूं केवळ । जे तोंड भरूनि निखळ । आलासि पुसों ॥ ४९ ॥ जें अद्वैतावरीही भोगिजे । तें अनुभवींचें तुं विरिजें । पुसोनि मज माझें । देतोसि सुख ॥ ४५० ॥ जैसा आरसा आलिया जवळां । दिसे आपणपें आपला डोळा । तैसा संवादियां तूं निर्मळा । शिरोमणी ॥ ५१ ॥ तुवां नेणोनि पुसावें । मग आह्मी परिसऊं बैसावें । तो गा हा पांड नव्हे । सोयरेया ॥ ५२ ॥ ऐसें ह्मणौनि आलिंगिलें । कृपादृष्टी अवलोकिलें । मग देव काय बोलिले । अर्जुनेंसीं ॥ ५३ ॥ पैं दोहीं वोठीं एक बोलणें । दोहीं चरणीं एक चालणें । तैसें पुसणें सांगणें । तुझें माझें ॥ ५४ ॥ एवं आह्मी तुह्मी येथें । देखावें एका अर्थातें । सांगतें पुसतें येथें । दोन्हीं एक ॥ ५५ ॥ ऐसा बोलत देव भुलला मोहें । अर्जुनातें आलिंगूनि ठाये । मग बिहालों ह्मणे नोहे । आवडी हे ॥ ५६ ॥ जाले इक्षुरसाचे ढोळ । तरि लवण देणें किडाळ । *जे संवादसुखाचें र-

* तैसें संवाद.

१ मागासकट. २ शोधी. ३ निर्गुणी, उघड, उपाधिरहित. ४ प्रतिबिंबत्वानें बिंबव परिपूर्ण. ६ आवडीनें. ७ प्रश्नकर्ता. ८ निर्मळ साधन. ९ डोळ्यानें. १० योग्यता. ११ भ्याल रसपुट. १३ हीन.

साळ । नासेल [१]थितें ॥ ५७ ॥ आधींच आह्मां यया कांहीं । नरनारायणासी *भिन्न नाहीं । परी आतां जिरो माझ्याठाईं । वेगु हा माझा ॥ ५८ ॥ इया बुद्धी सहसा । श्रीकृष्ण ह्मणे वीरेशा । पैं गा तो तुवां कैसा । प्रश्न केला ॥ ५९ ॥ जो अर्जुन श्रीकृष्णीं विरत होता । तो परतोनियां मागुता । प्रश्नावळीची कथा । ऐकों आला ॥ ४६० ॥ तेथ सद्गदें बोलें । अर्जुनें जी जी ह्मणितलें । निरुपाधिक आपुलें । रूप सांगा ॥ ६१ ॥ यया बोला तो शार्ङ्गी । तेंचि सांगावयालागीं । उपाधी दोहीं [२]भागीं । निरूपीत असे ॥ ६२ ॥ पुसिलिया [३]निरुपहित । उपाधि कां सांगे येथ । हें कोण्हाही प्रस्तुत । गमे जरी ॥ ६३ ॥ तरि ताकाचे अंश फेडणें । तयाचें नांव लोणी काढणें । चोखाचिये शुद्धी तोडणें । कीडचि जेविं ॥ ६४ ॥ [४]बाबुळीचि सारावी हातें । परि पाणी तंव असे आइतें । अभ्रचि जावें गगन तें । सिद्धचि कीं ॥ ६५ ॥ वरिल कोंडियाचा गुंडाळा । झाडूनि केलिया वेगळा । कण घेतां विरंगोळा । असे काई ॥ ६६ ॥ तैसा उपाधि उपहितां । शेवट जेथ विचारितां । तें कोणातेंही न पुसतां । निरुपाधिक ॥ ६७ ॥ जैसें न सांगणेवरी । बाळा पतीसी रूप करी । बोल निमालेपणें विवरी । [५]अर्चचीतें ॥ ६८ ॥ पैं सांगणेयाजोगें नव्हे । तेथिचें सांगणें ऐसें आहे । ह्मणौनि उपाधिलक्षण हें । बोलिजे आदि ॥ ६९ ॥ †पाडिव्याची चंद्ररेखा । निरुती दावावया शाखा । दाविजे तेविं औपाधिका । बोली इया ॥ ४७० ॥

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ १६ ॥

[द्वाविमौ पुरुषौ लोके] मग तो ह्मणे गा सव्यसाची । पैं इये संसार पाटणीची । वस्ती [६]सांविया टांची । [७]दुपुरुषीं ॥ ७१ ॥ जैसी आघवांचि गगनीं । नांदत दिवोरात्रि दोन्हीं । तैसे संसारराजधानीं । दोन्हीचि हे ॥ ७२ ॥ आणिकही तिजा पुरुष आहे । परि तो या दोन्हींचें नांव न साहे । जो उदेला गांवेंसी खाये । दोहींतें ययां ॥ ७३ ॥ परि ते तंव गोठी असो । आधीं दोन्हीचि हे परियेसों । जे संसारग्रामीं [८]वसों । आले असती ॥ ७४ ॥ एक आंधळा वेडा पंगु । येर सर्वीगें पुरता चांगु । परि ग्रामगुणें संगु । घडला दोघां ॥ ७५ ॥ [क्षरश्चाक्षर एव च] तया एका नाम क्षरु । एकातें ह्मणती अक्षरु । इहीं दोहींचि

---

* सिनें नाहीं. † पाडवाचि.

---

१ स्थित, जमून आलेलें. २ प्रकारीं. ३ निर्गुण. ४ शेवाळ. ५ अडथळा, सायास. ६ उपाधिवान. ७ कुलस्त्रियेला जवळ असलेला पतीचें नांव काय असें विचारिलें असतां ती मान खालीं करते, मौन्य हेंच पतीचें नामरूप. ८ ज्याची चर्चा करितां येत नाहीं अशाला. ९ निश्चयानें. १० वस्ति टांची, उणी, सर्वथा थोडी. दोघांहून तिसरें कांहींच नाहीं. ११ गांवांत.

परि संसार । कोंदला असे ॥ ७६ ॥ आतां क्षर तो कवण । अक्षर तो किंल-क्षण । हे अभिप्राय संपूर्ण । विवंचूं गा ॥ ७७ ॥ [क्षरः सर्वाणि भूतानीति] तरी महदहंकारा-। लागुनियां धनुर्धरा । तृणांतींचा पोंगोरा । वेरि पैं गा ॥७८ ॥ जें कांहीं सानें थोर । चालतें अथवा स्थिर । किंबहुना गोचर । मनबुद्धीसि जें ॥ ७९ ॥ जेतुलें पांचभौतिक घडतें । जें नामरूपा सांपडतें । गुणत्रयाच्या पडतें । कोंमठा जें ॥ ४८० ॥ भूताकृतीचें नाणें । घडत भांगारें जेणें । काळा-सिं जूं खेळणें । जिहीं कवडां ॥ ८१ ॥ *जाणणेंनिचि विपरीतें । जें जें कांहीं जाणिजेतें । जें प्रतिक्षणीं निमतें । होऊनियां ॥ ८२ ॥ अगा काढूनि भ्रांतीचें दोंग । उभवी सृष्टीचें आंग । हें असो बहु जग । जया नाम ॥ ८३ ॥ पैं अष्टधा भिन्न ऐसें । जें दाविलें प्रकृतिमिसें । जें क्षेत्रद्वारा छत्तीसें । भागीं केलें ॥ ८४ ॥ हें मागील सांगों किती । अगा आतांचि जें प्रस्तुतीं । वृक्षाकार †रूपकरीती । ‡निरूपिलें ॥ ८५ ॥ तें आघवेंचि साकार । कल्पुनी आपणयां पुरें । जालें असे तदनुसार । चैतन्यचि ॥ ८६ ॥ जैसा कुहां आपणचि बिंबे । सिंह प्रतिबिंब पाहतां क्षोभे । मग क्षोभला समारंभें । घाली तेथ ॥ ८७ ॥ कां सलिलीं असतचि असे । व्योमावरी व्योम बिंबे जैसें । अद्वैत होऊनि तैसें । द्वैत घेपे ॥ ८८ ॥ अर्जुना गा यापरी । साकार कल्पूनि पुरी । आत्मविस्मृतीची करी । निद्रा तेथ ॥ ८९ ॥ पैं स्वप्नीं सेजार देखिजे । मग पेंडुणें जैसें तेथ कीजे । तैसें पुरीं शयन देखिजे । आत्मयासी ॥ ४९० ॥ पाठीं तिये निद्रेचेनि भरें । मीं सुखी दुःखी ह्मणत घोरें । अहंममतेचेनि थोरें । वोसणाये सादें ॥ ९१ ॥ हा जनक हे माता । हा मी गौर हीन पुरता । पुत्र वित्त कांता । माझें हें ना ॥ ९२ ॥ ऐसिया वळघोनि स्वप्ना । धांवत भवस्वर्गाचिया राना । तया चैतन्या नाम अर्जुना । क्षर पुरुष गा ॥ ९३ ॥ आतां ऐक क्षेत्रज्ञ येणें । नामें जयातें बोलणें । जगज्जीव कां ह्मणे । जिये दशेतें ॥ ९४ ॥ जो आपुलेनि विसरें । सर्व भूतत्वें अनुकरे । तो आत्मा बोलिजे क्षरें । पुरुषनामें ॥ ९५ ॥ जे तो वस्तुस्थिती पुरता । ह्मणोनि आली पुरुषता । वरी देहपुरीं निदैजतां । पुरुषनामें ॥ ९६ ॥ आणि क्षरपणाचा नाथिला । आळ यया ऐसेनि आला । जे उपाधीचि आंतला । ह्मणोनियां ॥ ९७ ॥ जैसी खळाळींचिया उदका । सरसीं दाटे चंद्रिकां । तैसा विकारां औपाधिका । ऐसाचि गमे ॥ ९८ ॥ कां खळाळ मोटेका शोषे । आणि चंद्रिका तैं सरिसीच भ्रंशे । तैसा उपाधिनाशीं

---

* जाणणेंचि. † रूपकृति. ‡ निरूपिती.

१ भरला. २ अग्रापर्यंत, बारीक मुळापर्यंत. ३ टांकसाळेंत. ४ सोन्यानें. ५ जुवा खेळ. ६ कवड्यांनीं, द्रव्यानें. ७ नाश पावतें. ८ घेऊन. ९ अरण्य. १० अवयव. ११ वृक्षाकार रूपकानें. १२ निजणें. १३ बरळे. १४ शब्दें. १५ हीनांग. १६ सांग, पुरा. १७ चिकटून, आश्रय करून. १८ शरीर आहे तोंपर्यंत, वस्तु व्यापून. १९ स्पर्शला. २० हाले. २१ अमळसा.

न दिसे । औपाधिक ॥ ९९ ॥ ऐसें उपाधीचेनि पाडें । क्षणिकत्व यातें जोडे । तेणें खोंकरपणें[1] घडे । क्षर हें नाम ॥ ५०० ॥ एवं जीव चैतन्य आघवें । हें क्षर पुरुष जाणावें । आतां रूप करूं बरवें । अक्षरासी ॥ १ ॥ [कूटस्थः] तरि अक्षर जो दुसरा । पुरुष पैं धनुर्धरा । तो मध्यस्थ गा गिरिवरां । मेरु जैसा ॥ २ ॥ जे तो पृथ्वी पाताळ स्वर्गीं । इहीं न भेदे तिहीं भागीं । तैसा दोहीं ज्ञानाज्ञानांगीं । पडेना जो ॥ ३ ॥ ना यथार्थज्ञानें एक होणें । ना अनेकत्वें दुजें घेणें । ऐसें निखिळ जें नेणणें । तेंचि तें रूप ॥ ४ ॥ पांसुता[2] निःशेष जाये । ना घटभांडादि होये । तया मृत्पिंडाऐसें आहे । मध्यस्थ जें ॥ ५ ॥ पैं आटोनि गेलिया सागर । मग तरंग ना नीर । तया ऐशी अनाकार[3] । जे दशा गा ॥ ६ ॥ पार्था जागणें तरी बुडे । परि स्वप्नाचें कांहीं न मांडे । तैसिये निद्रे *सांगडें । न्याहाळणें जें ॥ ७ ॥ विश्व आघवेंचि मावळे । आणि आत्मबोध तरी नुजळे । तिये अज्ञानदशे केवळे । अक्षरनाव ॥ ८ ॥ †सर्वा कळीं सांडिलें जैसें । चंद्रपण उरे अंवसे । रूप जाणावें तैसें । अक्षराचें ॥ ९ ॥ पैं सर्वोपाधिविनाशें । हे जीवदशा जेथ पैसे[4] । फळपाकांत[5] जैसें । झाड बीजीं ॥ ५१० ॥ तैसें उपाधीसि उंपहित[6] । थोकोनि ठाके जेथ । तयातें अव्यक्त । बोलती गा ॥ ११ ॥ धन[7] अज्ञान सुषुप्ती । तो बीजभाव ह्मणती । येर स्वप्न हन जागृती । फळभाव तो ॥१२॥ जयासी कां बीजभाव । वेदांतीं केला ऐसा आंव[8] । तो तया पुरुषा ठाव । अक्षराचा ॥ १३ ॥ जेथुनी अन्यथा ज्ञान । फांकोनि जागृती स्वप्न । नाना बुद्धींचें रान । रिगालें असे ॥ १४ ॥ जीवत्व जेथूनि किरीटी । विश्व उठवितचि उठी । ते उभय भेदांची मिठी । अक्षर पुरुष ॥ १५ ॥ येर क्षर पुरुष कां जनीं । देहीं खेळे जागृती स्वप्नीं । तिया अवस्था जो दोन्ही । वियाला गा ॥ १६ ॥ पैं अज्ञानघनसुषुप्ती । ऐसैसी जे कां ख्याती[9] । या[10] उणी येकी प्राप्ती । ब्रह्मांची[11] जे ॥ १७ ॥ साचचि पुढती वीरा । जरि न येता स्वप्न जागरां । तरी ब्रह्मभावो साचोकारा[12] । ह्मणों येता ॥ १८ ॥ परि प्रकृति पुरुष दोनी । अभ्रें जालीं जिये गगनीं । क्षेत्रक्षेत्रज्ञ स्वप्नीं । देखिला जिये ॥ १९ ॥ हें असो अधोशाखा । या संसाररूपा रुखा । मूळ तें पुरुषा । अक्षराचें ॥ ५२० ॥ हा पुरुष कां ह्मणिजे । जे पूर्णपणेंचि निजें । पैं मायापुरीं पहुडिजे[13] । तेणेंही बोलें ॥ २१ ॥ आणि विकारांची जे वारी[14] । ते विपरीतज्ञानाची परी[15] । नेणिजे जिये माझारीं । ते सुषुप्ती गा हा ॥ २२ ॥

---

* सांकडें. † अजा ह्मणतां जन्म नाहीं । त्यासी नाश कैंचा कायी । यालागीं अक्षर पाहीं । अज्ञानघन ॥ ५०९ ॥ ‡

---

१ फुटकेपणें. २ रजःकणत्व. ३ आकाररहित. ४ सारखें. ५ प्रवेशे. ६ फल पिके तोंपर्यंत. ७ उपाधींत पडलेलें. ८ गुप्त होऊन राहे. ९ दृढ. १० डौल, आकार. ११ नाम. १२ या एका वक्ष्यमाण गोष्टीवांचून जी ब्रह्माचीच प्राप्ती. १३ खरा. १४ शयन करतो. १५ यात्रा. १६ प्रकार.

[अक्षरः] ह्मणौनि यया [1]आपैसें । क्षरणें पां नसे । आणिकेंही हा न नाशे । [2]ज्ञानावणें ॥ २३ ॥ [उच्यते] यालागीं हा अक्षर । ऐसा वेदांतीं डंगर । केला [3]देशीं थोर । सिद्धांताचा ॥ २४ ॥ ऐसें जीवकार्यकारण । जया मायासंगचि लक्षण । अक्षर पुरुष जाण । चैतन्य तें ॥ २५ ॥

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ १७ ॥

[उत्तमः पुरुषस्त्वन्यः] आतां अन्यथाज्ञानी । या दोनी [4]अवस्था जया जनीं । तया हरपती घनीं । अज्ञानतत्वीं ॥ २६ ॥ तें अज्ञान ज्ञानीं बुडालिया । ज्ञानें कीर्तिमुं[5]खत्व केलिया । जैसा वन्हि काष्ठ जाळूनियां । स्वयें जळे ॥ २७॥ तैसें अज्ञान ज्ञानें नेलें । आपणहि वस्तु देउनि गेलें । ऐसें जाणणेंनिवीण उरलें । जाणतें जें ॥ २८ ॥ तें तो गा उत्तम पुरुष । जो तृतीय कां निष्कर्ष । दोहींहून आणिक । [6]मागिलां जो ॥२९॥ सुषुप्ती आणि स्वप्ना- । पासूनि [7]बहुवें अर्जुना । जागणें जैसें आना । बोधाचेंचि ॥ ५३० ॥ कां [8]रश्मी आणि मृगजळा । पासूनि अर्कमंडळा । अफाट तेविं वेगळा । उत्तम गा ॥ ३१ ॥ हें ना काष्ठींच्या काष्ठींहुनी । [9]अनारिसा जैसा वन्ही । तैसा क्षराक्षरापासुनी । आनचि तो ॥ ३२ ॥ पैं ग्रसूनि आपली मर्यादा । एक करीत नदीनदां । उठी कल्पांतीं [10]उदावादा । एकार्णवाचा ॥ ३३ ॥ तैसें स्वप्न ना सुषुप्ती । ना जागराची गोठी आथी । जैसी गिळिली दिवोराती । प्रळयतेजें ॥ ३४ ॥ [परमात्मेत्युदाहृतः] मग एकपण ना दुजें । [11]ऐसे नाहीं हें नेणिजे । अनुभव [12]निर्बुजे । बुडाला जेणें ॥ ३५ ॥ ऐसें आथि जें कांहीं । तें तो उत्तम पुरुष पाहीं । जें परमात्मा इहीं । बोलिजे नामीं ॥ ३६ ॥ तेंही येथ न *[13]मिसळतां । बोलणें जीवत्वें पंडुसुता । जैसी बुडणेयाची वार्ता । [14]थंडियेचा कीजे ॥ ३७ ॥ तैसें विवेकाचिये कांठीं । उभें ठाकलिया किरीटी । [15]परावराचिया गोठी । करणें वेदां ॥ ३८ ॥ ह्मणौनि पुरुष क्षराक्षर । दोन्ही देखोनि [16]अंवर । यातें ह्मणती पर । आत्मरूप ॥ ३९ ॥ अर्जुना ऐसिया परी । परमात्मा शब्दवरी । [17]सूचिजे गा अवधारीं । पुरुषोत्तम ॥ ५४० ॥ येऱ्हवीं न बोलणेनि बोलणें । जेथिचें सर्व नेणिवा जाणणें । कांहींच न होनि होणें । जे वस्तु गा ॥ ४१ ॥ सोहं तेही अस्तवलें । जेथ सांगतेंचि सांगणें जालें । द्रष्टृत्वेंसी गेलें । देखणें जेथ ॥ ४२ ॥ आतां बिंबा आणि प्रतिबिंबा- । माजि कैंची हें ह्मणों नये प्रभा । जऱ्ही कैसेनि हे

* मिळतां.

१ आपोआप. २ ज्ञानावांचून. ३ प्रसिद्धी. ४ वेदांतांत. ५ जाग्रत्स्वप्नरूप. ६ सन्मुखपणा. ७ शेवट. ८ मागें सांगितलेल्या दोहींहून वेगळा. ९ अधिक. १० किरण. ११ वेगळा. १२ पूर्णत्व. १३ आहे किंवा नाहीं हेंही न समजावें. १४ घावरे. १५ मिळालें असतां. १६ किनाऱ्यावरच्यानें. १७ पलीकडे किंवा आलीकडे. १८ अलीकडचे. १९ ओळखावा.

लाभा[1] । जायेचिना ॥ ४३ ॥ कां घ्राणा[2] फुला दोहीं । द्रुती[3] असे माझारिला ठायीं । ते न दिसे तरी नाहीं । ऐसें बोलों नये ॥ ४४ ॥ तैसें द्रष्टा दृश्य हें जाये । मग कोण ह्मणे काय आहे । हेंचि अनुभवें[4] तेंचि पाहे । रूप[5] तया ॥ ४५ ॥ [य ईश्वरः] जो प्रकाश्येंवीण प्रकाश । जो ईशितव्येंवीण ईश । आपणेंनीचि अवकाश[6] । वसवीत असे जो ॥ ४६ ॥ जो नादें ऐकिजता नाद[7] । स्वादें *चाखिजता स्वाद[8] । जो भोगीजतसे आनंद[9] । आनंदेंचि ॥ ४७ ॥ जो पूर्णतेचा परिणाम । पुरुष गा सर्वोत्तम । †विश्रांतीचाही विश्राम । विराला जेथें ॥ ४८ ॥ सुखासी सुख जोडलें । जें तेज तेजासि सांपडलें । शून्यही बुडालें । महाशून्यीं जिये ॥ ४९ ॥ जो विकासाही[10] वरी उरता । ग्रासातें ही ग्रासूनि पुरता । जो बहुतें पाडें बहुतां । पासूनि बहु ॥ ५५० ॥ [लोकत्रयमाविश्य] पैं नेणतयाप्रती । रुपेपणाची प्रतीती । रुपें न होनि शुक्ती । दावी जेवीं ॥ ५१ ॥ कां नाना अलंकारदशे । सोने न लपत लपालें असे । विश्व न होनियां तैसें । [बिभर्ति] विश्व जो धरी ॥ ५२ ॥ हें असो जल तरंगा । नाहीं सिनानपण[11] जेविं गा । तेविं ‡सत्ताप्रकाश जगा । आपणचि जो ॥ ५३ ॥ आपलिया संकोचें[12] विकाशा । आपणचि रूप वीरेशा । हा जळीं चंद्र हन जैसा । समग्र गा ॥ ५४ ॥ तैसा विश्वपणें कांहीं होये । ना विश्वलोपीं केंहीं जाये । जैसा रात्रि §दिवसें नोहे । द्विधा रवि ॥ ५५ ॥ [अव्ययः] तैसा कांहींचि कोणीकडे । कायिसेनिहि वेंचीं न पडे । जयाचें सांगडें[13] । जयासीचि ॥ ५६ ॥

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥ १८ ॥

[यस्मात्] जो आपणपेंचि आपणया । प्रकाशीतसे धनंजया । काय बहु बोलों जया । नाहीं दुजें ॥ ५७ ॥ [अतोऽस्मि] तो गा मी निरुपाधिक । [क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः] क्षराक्षरोत्तम एक । [लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः] ह्मणोनि ह्मणे वेद लोकें[14] । पुरुषोत्तम ॥ ५८ ॥

यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् ।
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥ १९ ॥

[यो मामेवं] परि हें असो ऐसिया । [पुरुषोत्तमं] मज पुरुषोत्तमातें धनंजया । जाणे जो पाहलेया[15] । ज्ञानमित्रें ॥ ५९ ॥ [असंमूढः] चेइलियां[16] आपुलें ज्ञान ।

---

* चाखविजतां. † विश्रांतीसही. ‡ दिसतां प्रकाश. § दिवस नोहे.

१ जाणतां येतच नाहीं. २ नाकाला. ३ सुगंध. ४ कशानेही जरी अनुभवास येत नाहीं तरी हेंचि अनुभवानें पाहणें तेंच त्याचें रूप. ५ उदयावर. ६ वेगळेपणा. ७ अस्त. ८ उदय. ९ आकार. १० तुलना. ११ जन. १२ उजाडलेल्या. १३ जागृत झाल असतां.

जैसें नाहींचि होय स्वप्न । तैसें स्फुरतें त्रिभुवन । वावो[1] जालें ॥ ५६० ॥ कां हातीं घेतलिया माळा । फिटे सर्पाभासाचा कंटाळा[2] । तैसा माझेनि बोधें टवाळा[3] । नागवे तो ॥ ६१ ॥ [जानाति] लेणें सोनेंचि जो जाणे । तो लेणेंपण तें वाव[4] ह्मणे । तेविं मीं जाणोनि जेणें । वोंळिला भेद ॥ ६२ ॥ [स सर्ववित्] मग ह्मणे सर्वत्र सच्चिदानंद । मीचि एक स्वतःसिद्ध । जो आपणेनसीं भेद । नेणोनि जाणे ॥ ६३ ॥ तेणेंचि सर्व जाणितलें । हेंही ह्मणणें थेंकुलें[5] । जें तया सर्वत्र उरलें । द्वैत नाहीं ॥ ६४ ॥ [भजति मां] ह्मणोनि माझिया भजना । उचित तोचि अर्जुना । गगन जैसें आलिंगना । गगनाचिया ॥ ६५ ॥ क्षीरसागरा परी[6]गुणें । कीजे क्षीरसागरचिपणें । अमृतचि होऊन मिळणें । अमृतीं जेविं ॥६६॥ साडेपंधरा मिसळावें । तैं साडेपंधरांचि होआवें । तेविं मी जालिया संभवे । भक्ति माझी ॥६७॥ हां गा सिंधूसि आनी होती । तरि गंगा कैसेनि मिळती । ह्मणौनि मी न होतां भक्ती । अन्वय आहे॥६८॥ [सर्वभावेन भारत] ऐसियालागीं सर्व प्रकारीं । जैसा कल्लोळ अनन्य सागरीं । तैसा मातें अवधारीं । भजिन्नला जो ॥ ६९ ॥ सूर्या आणि प्रभे । एकवंकी जेणें लोभें । तो पाड मानूं लाभे । भजना तया ॥ ५७० ॥

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।
एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥ २० ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे पुरुषोत्तमयोगो नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥

[इति गुह्यतमं] एवं कथिलयादारभ्य[7] । जें हें सर्वशास्त्रैकलभ्य[8] । उपनिषदां सौरभ्य[9] । कमळदळां जेविं ॥ ७१ ॥ हें शब्दब्रह्माचें *मंथितें[10] । श्रीव्यासप्रज्ञेचेनि हातें । मथूनि काढिलें आयितें । सार आह्मीं ॥ ७२ ॥ जे ज्ञानामृताची जान्हवी । जे आनंदचंद्रींची सतरावी । विचारक्षीरार्णवींची नवी । लक्ष्मी जे हे ॥ ७३ ॥ ह्मणोनि आपुलेनि पदें वर्णें[11] । अर्थाचेनि जीवेंप्राणें[12] । मीवांचोनि हों[13] नेणें । आन कांहीं ॥ ७४ ॥ क्षराक्षरत्वें समोर[14] जाले । तयाचें पुरुषत्व वोंळिलें[15] । मग सर्वस्व मज दिधलें । पुरुषोत्तमीं ॥ ७५ ॥ [शास्त्रं] ह्मणौनि जगीं गीता । मियां आत्मेनि पतिव्रता । जे हे प्रस्तुत तुवां आतां । आकर्णिली ॥ ७६ ॥ [इदं] साचचि बोलाचें नव्हे हें शास्त्र । पैं संसार जिणे[16] तें शस्त्र । आत्मा अवतरवी[17] ते मंत्र । अक्षरें इयें ॥ ७७ ॥ [उक्तं मया] परि तुजपुढां सां-

* निववितें.

१ व्यर्थ. २ भय, त्रास. ३ मिथ्याजगास. ४ टाकिला. ५ अल्प. ६ पाहुणचार. ७ प्राप्ति. ८ एकाकार. ९ पंधराव्या अध्यायाच्या आरंभापासून. १० केवळ शास्त्रानेंच प्राप्त होणारें. ११ सुवास. १२ नवनीत, सार. १३ गीतेच्या. १४ प्रेमानें. १५ होऊं १६ स्पष्ट. १७ टाकलें. १८ जिंकणारे. १९ प्रकट करते.

गीतलें । तें अर्जुना ऐसें जालें । [गुह्यतमं] जे गौप्यधन काढिलें । माझें आजि तुवां ॥ ७८ ॥ मज चैतन्यशंभूचा माथा । जो निपेक्षे होता पार्था । तया गौतम जालासि औस्था । निधी तूं गा ॥ ७९ ॥ चोखटिवा आपुलिया । पुढिला उगाणा घेयावया । तया दर्पणाचीचि परी धनंजया । केली आह्मां ॥ ५८० ॥ कां भरलें चंद्रतारांगणीं । नभ सिंधु आपणयामाजि आणी । तैसा गीतेसीं मी अंतःकरणीं । मुदला तुवां ॥ ८१ ॥ [अनघ] जे त्रिविधमळकटा । तूं सांडलासि सुभटा । ह्मणौनि गीतेसीं मज वसौटा । जालासि गा ॥ ८२ ॥ [एतद्बुध्वा] परि हे बोलों काय गीता । जे हे माझी उन्मेषलता । जाणे तो समस्ता । मोहा मुके ॥ ८३ ॥ सेविली अमृतसरिता । रोग दवडूनि पंडुसुता अमरपण उचितां । देऊनि घाली ॥ ८४ ॥ तैसी गीता हे जाणितलिया । काय विस्मय मोह जावया । [बुद्धिमान् स्यात्] परि आत्मज्ञानें आपणपयां । मिळिजे येथ ॥ ८५ ॥ जया आत्मज्ञानाच्या ठायीं । कर्म आपुलेया जीवितां पाही । होऊनियां उतराई । लया जाय ॥ ८६ ॥ हरपलें दावुनि जैसा । माग सरे वीरविलासा । ज्ञानचि कळस वळघे तैसा । कर्मप्रासादाचा ॥ ८७ ॥ [कृतकृत्यश्च भारत] ह्मणौनि ज्ञानिया पुरुषा । कृत्य करूं सरलें देखा । ऐसा अनाथाचा सखा । बोलिला तो ॥ ८८ ॥ तें श्रीकृष्णवदनामृत । पार्थीं भरोनि असे वोसंडत । मग व्यासकृपा प्राप्त । संजयासी ॥ ८९ ॥ तो धृतराष्ट्राया । सूतसे पान करावया । ह्मणौनि जीवितांतया । नोहेचि भारी ॥ ५९० ॥ येऱ्हवीं गीताश्रवण अवसरीं । आवडों लागतां अनधिकारी । परि सेखीं तेचि उजरी । पातला भली ॥ ९१ ॥ जेव्हां द्राक्षीं दूध घातलें । तेव्हां वायां गेलें गमलें । परि फळपाकीं दुणावलें । देखिलें जेवीं ॥ ९२ ॥ तैसीं श्रीहरिवक्त्रींचीं अक्षरें । संजयें सांगीतलीं आदरें । तिहीं अंधु तोही अवसरें । सुखिया जाला ॥ ९३ ॥ तेंचि मन्हाटेनि विन्यासें । मियां उन्मेषें ठसेंठोंबसें । जी जाणें नेणे तैसें । निरोपिलें ॥ ९४ ॥ सेवंतीये *अरसिकांहीं । आंग पाहतां विशेष नाहीं । परि सौरभ्य नेलें तिहीं । भ्रमरीं †जाणिजे ॥९५ ॥ तैसें घडतें प्रमेय

---

* अशेष कांहीं. † जाणिजे जेवीं.

---

१ जीवशिवांचा. २ गंगारूप ठेवा. ३ इच्छेनें. ४ चांगुलपणास. ५ अनुभव. ६ घातला. ७ काम, क्रोध व लोभ. ८ आश्रय. ९ ज्ञानवल्ली. १० निष्कर्म होय. ११ सर्व वीरांचें विलासस्थान अशा अर्जुना. १२ चढे. १३ सांडत. १४ देत असे. १५ जीवितांतसमयीं, प्राणांतीं. १६ हवा तो, वाटो. १७ उत्कर्ष. १८ द्राक्षाचे घोस आल्यावर, परिणामीं. १९ धृतराष्ट्र. २० निरूपणें. २१ लहानमोठें. २२ सिद्धांत.

घेइजे । उणें तें *मग देइजे । जें नेणणें हेंचि सहजें । रूप कीं बाळा ॥ ९६ ॥ तरि नेणतें जन्ही होये। तन्ही देखोनि बाप कीं माये । हर्ष केंही न समाये । चोज[1] करिती ॥ ९७ ॥ तैसें संत माहेर माझें । तुह्मीं मिनलिया[2] मी लाडें जें । तेंचि ग्रंथाचेनि व्याजें । जाणिजो जी ॥ ९८ ॥ आतां विश्वात्मक माझा । स्वामी श्रीनिवृत्तिराजा । तो अवधारू[3] वाक्य पूजा । ज्ञानदेव ह्मणे ॥ ५९९ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥

श्लोक २०, ओव्या ५९९.

---

* मज देइजे.

१ कौतुक, नवल. २ मिळालेत. ३ ऐको.

ज्ञानेश्वरी.

अध्याय १६ वा.

मावळवीत विश्वाभास । नवल उदयला चंडांश । अद्वयाब्जिनीविकाश । वंदूं आतां ॥ १ ॥ जो अविद्याराती रुसोनियां । गिळी ज्ञानाज्ञानचांदणियां । जो सुदिन करी ज्ञानियां । स्वबोधाचा ॥ २ ॥ जेणें विवळतिये सवळे । लोहोनि आत्मज्ञानाचे डोळे । सांडिती देहाहंतेचीं अविसाळें । जीवपक्षी ॥३॥ लिंगदेह कमळाचा । पोटीं वेर्च तया चिद्भ्रमराचा । बंदि मोक्ष जयाचा । उदैलो होय ॥ ४ ॥ शब्दाचिया आंसकडीं । भेदनदीच्या दोहीं थडीं । *आरडत विरहवेडीं । बुद्धिबोध ॥ ५ ॥ तया चक्रवाकांचें मिथुन । सामरस्याचें समाधान । भोगवी जो चिद्गगन । भुवनदिवा ॥६॥ जेणें पोहालिये पाहांटे । भेदाची †चोरवेळी फिटे । रिघती आत्मानुभववाटे । पांथिक योगी ॥ ७ ॥ जयाचेनि विवेककिरणसंगें । उन्मेखसूर्यकांत फुणगे । दीपले जाळिती दोंगें । संसाराचीं ॥ ८ ॥ जयाचा रश्मिपुंज निबर । होतां स्वरूप उखरीं स्थिर । ये महासिद्धीचा पूर । मृगजळ तें ॥ ९ ॥ जो प्रत्यग्बोधाचिया माथया । सोहंतेचा मध्यान्ही आलिया । लपे आत्मभ्रांति छाया । आपणपां तळीं ॥ १० ॥ ते वेळीं विश्वस्वप्नासहितें । कोण अन्यथामती निद्रेतें । सांभाळी नुरेचि जेथें । मायाराती ॥ ११ ॥ ह्मणौनि अद्वयबोधपाटणीं । तेथ महानंदाची दाटणी । मग सुखानुभूतीचीं घेणीं देणीं । मंदावों लागती ॥ १२ ॥ किंबहुना ऐसैसें । मुक्तकैवल्य सुदिवसें । सदां लाहिजे कां प्रकाशें । जयाचेनि ॥ १३ ॥ जो निजधामव्योमींचा रावो । उदैलोचि उदैजत खेंवो । फेडी पूर्वादिदिशांसि ठावो । ‡उदयास्ताचा ॥ १४ ॥ नें दिसणें दिसणेंनसीं मावळवी । दोहीं

---

* आक्रंदत. † चोरवेळ लोटे. ‡ उदो अस्तुचा.

---

१ अद्वैतरूप कमलिनीचा प्रकाश करणारा. २ अविद्यारूप रात्र दूर करून. ३ आत्मबोधाचा. ४ उजाडल्यावर होणाऱ्या प्रातःकाळीं. ५ प्राप्त होऊन. ६ घरटीं. ७ वासनात्मक सूक्ष्मदेह. ८ मरण. ९ जीवचैतन्य भ्रमराचा. १० बंधन झालें असतां. ११ सुटका. १२ उदयानें. १३ बुद्धीला मोह करणाऱ्या शास्त्रादिकांच्या. १४ अडचणीच्या जाग्यांत. १५ जीवेश्वर या विषयींची भिन्नबुद्धी. १६ जीव, ईश्वर. १७ ऐक्याचें. १८ ब्रह्मरूप आकाश. १९ उजाडलेली. २० चोरवेळ. २१ अरण्यें. २२ ज्ञानसूर्याचा. २३ तीव्र. २४ आत्मस्वरूप. २५ अज्ञानरूप माळ जमिनीवर. २६ आत्मबोधाच्या. २७ विपरीत ज्ञान. २८ शहरांत. २९ आनंदानुभवाचीं. ३० उगी होऊं. ३१ नेहमीं उदय पावलेलाच आहे. ३२ पूर्वादि दिशांसह उदयास्त नाहींसे करितो. ३३ अज्ञान ज्ञानासकट. ३४ नामरूपांनीं.

झांकिलें तें सैंघ [1]पालवी । काय बहु बोलों ते आघवी । [3]उखाचि आनी ॥१५॥ तो अहोरात्रांचा पैलकड । कोणें देखावा ज्ञानमार्तंड । जो [3]प्रकाशेंवीण सुरवाड । प्रकाशाचा ॥ १६ ॥ तया चित्सूर्या श्रीनिवृत्ती । आतां नमोचि ह्मणों पुढतपुढती । जे *बोधका येइजतसे स्तुती । बोलाचिया ॥ १७ ॥ देवाचें महिमान पाहोनियां । स्तुती तरि येइजे चांगावया । जरि [8]स्तव्यबुद्धीसीं लया । जाइजे कां ॥ १८ ॥ जो सर्वनेणिवां जाणिजे । मौनाचिया मिठीया वानिजे । कांहींच न होनि आणिजे । आपणपयां जो ॥ १९ ॥ †जया तुझिया उद्देशासाठीं । [9]पश्यंती मध्यमा पोटीं । [9]सूनि परेसीही पाठीं । वैखरी विरे ॥ २० ॥ तया तूतें मी सेवकपणें । लेववीं बोलकेया स्तोत्राचें लेणें । हें [10]उपसाहावेंही ह्मणतां उणें । अद्वयानंदा ॥ २१ ॥ परि [11]रंकें अमृताचा सागर । देखिलिया पडे उचिताचा [12]विसर । मग करूं धांवे पाहुणेर । ‡शाकांचा तया ॥ २२ ॥ तेथ शाकही कीर बहुत ह्मणावा । तयाचा हर्षवेगचि तो घ्यावा । उजळोनि दिव्य तेजा हातिवा । [13]ते भक्तीचि [14]पाहावी ॥२३॥ बाळा [15]उचितें जाणणें होये । तरि बाळपणचि कें आहे । परि साचचि येरी माये । ह्मणोनि तोषे ॥ २४ ॥ हां गा [16]गांवरसें भरलें । पाणी पाठीं पाय देत आलें । तें गंगा §काय ह्मणीतलें । परतें सर ॥ २५ ॥ जी भृगूचा कैसा [17]अपकार । कीं तो मानूनि प्रियोपचार । काय तोषेचि ना शार्ङ्गधर । गुरुत्वासी ॥ २६ ॥ कीं आंधारें [18]खंतेलें अंबर । जालें दिवसनाथा समोर । तेणें तयातें ¶[19]पैल्हा सर । ह्मणीतलें काई ॥२७॥ तेविं भेदबुद्धीचिये तुळे । घालूनि $सूर्यशशीचें [20]कांटाळें [21]। तुकिलासि तें येकी वेळे । उपसाहिजो जी ॥ २८ ॥ जिहीं [22]ध्यानाचा डोळां पाहिलासी । वेदादिवाचा वानिलासी । जें उपसाहिलें तयांसीं । तें आह्मांही करीं ॥ २९ ॥ परि मी आजि तुझ्या गुणीं । लांचावलों [23]अपराध न गणीं । भलतें करीं परी [24]अर्धधणीं । नुठी कदा ॥ ३० ॥ मियां गीता येणें नांवें । तुझें पसायामृत [25]सुहावें । वानूं लाधलों तें [26]दुर्गेंन थावें । दैवें[27]लों दैवें ॥ ३१ ॥ माझिया स त्यवादाचें तप । वाचा केलें बहुत कल्प । तया फळाचें हे [28]महाद्वीप । पातली प्रभु ॥ ३२ ॥ पुण्यें पोशिली[29] असाधारणें । तियें तुझे गुण वानणें । देवुनि

---

* बोधकां. † तया. ‡ शाखांचा. § काय देखिलें । आन दृष्टि. ¶ परतें सर. $ सूर्यशशीचें.

---

१ प्रकटवी. २ दुसराच प्रातःकाळ. ३ प्रकाशित होणाऱ्या पदार्थांवांचून. ४ सुकाळ. ५ कारण, स्तुति म्हटली म्हणजे बोलाची बाधकता (उपाधि लागते.) ६ चांगुलपणाला. ७ गुरुस्तवन करण्यास योग्य अशा बुद्धीसहित. ८ चार वाणींतील दुसरी. ९ पाठीमागें घालून. १० सहन करावें. ११ भिकाऱ्यानें. १२ योग्याचा. १३ काडवात. १४ पाहवितो. १५ योग्यपणानें. १६ गटाराचें पाणी. १७ लत्ताप्रहार, अन्याय. १८ भरलें. १९ पलीकडे हो. २० उपमेचें. २१ तराजू. २२ तोललास. २३ योग्यांनीं. २४ सवकलों. २५ पाहिजे तें कर. २६ अर्धवट तृप्त. २७ सेवावें, आवडतें. २८ दुपट बळानें. २९ दैववान झालों. ३० गीतानामक द्वीप. ३१ आचरिलीं.

राजकुन राम भेट

मज [1]उत्तीर्णे । जालीं आजि ॥ ३३ ॥ जी जीवित्वाच्या [2]ओडवीं । [3]आंतुडलों होतों मरण गांवीं । ते [4]अवदसाचि आघवी । फेडिली *आजी ॥ ३४ ॥ जे गीता येणें नांवें नांवाणिगी । जे अविद्या जिणोनि दांडुगी । ते कीर्ति तुझी आह्मा †जोगी । वानावया जाली ॥ ३५ ॥ पैं निर्धनाघरीं [5]वांनिवसें । महालक्ष्मी येऊनि बैसे । तयातें निर्धन ऐसें । ह्मणो ये काई ॥ ३६ ॥ कां अंधकाराचिया ठाया । दैवें सूर्य आलिया । तो अंधकारचि जगा यया । प्रकाश नोहे ॥ ३७ ॥ जया देवाची पाहातां थोरी । विश्व परमाणुही दशा न धरी । तो [6]भावाचिये ‡सरोबरी । नव्हेचि काई ॥ ३८ ॥ तैसा मी गीता वाखाणीं । हे [7]खेपुष्पाची [8]तुरंबणी । परि समर्थें तुवां §[9]शिरयाणी । फेडिली ते ॥ ३९ ॥ ह्मणौनि तुझेनि प्रसादें । मीं गीतापद्यें अगाधें । निरूपीन जी वि-[10]शदें । ज्ञानदेव ह्मणे ॥ ४० ॥ [अध्यायसंगतिः] तरि अध्यायीं पंधरावां । श्रीकृष्णें तया पांडवा । शास्त्रसिद्धांत आघवा । [11]उगाणिला ॥ ४१ ॥ जे वृक्षरूपक परिभाषा । केलें उपाधिरूप [12]अशेषा । सद्वैद्यें जैसें दोषा । [13]अंगलीना ॥ ४२ ॥ आणि [14]कूटस्थ जो [15]अक्षर । दाविला पुरुषप्रकार । तेणें उपहितांही [16]ओंकार । चैतन्या केला ॥ ४३ ॥ पाठीं उत्तमपुरुष । शब्दाचें करूनि मिष । दाविलें चोख । आत्मतत्त्व ॥ ४४ ॥ आत्मविषयीं [17]आंतुवट । साधन जें [18]आंगवट । ज्ञान हेंही स्पष्ट । [19]चावळला ॥४५॥ ह्मणौनि इये अध्यायीं । [20]निरूप्य नुरेचि कांहीं । आतां गुरुशिष्यां दोहीं । स्नेह [21]लोहणा ॥ ४६ ॥ एवं इयेविषयीं कीर । जाणते [22]बुझावले अपार । परि मुमुक्षु इतर । [23]साकांक्ष जाले ॥ ४७ ॥ त्या मज पुरुषोत्तमा । ज्ञानें भेटे जो [24]सुवर्मा । तो सर्वज्ञ तोचि सीमा । भक्तीचीही ॥ ४८ ॥ ऐसें हें त्रैलोक्यनायकें । बोलिलें अध्यायांत श्लोकें । तेथें ज्ञानचि [25]बहुतेकें । वानिलें तोषें ॥ ४९ ॥ भरूनि प्रपंचाचा घोंट । कीजे देखतांचि देखतया दृष्ट । आनंदसाम्राज्यीं [26]पाट । बांधिजे जीवां ॥ ५० ॥ येवढेया [27]लोंठेपणाचा ¶उपावो । आन नाहींचि ह्मणे देवो । हा [28]सम्यक् ज्ञानाचा रावो । उपायांमाजि ॥ ५१ ॥ ऐसे [29]आत्मजिज्ञासु जे होते । तिहीं तोषलेनि चित्तें । आदरें तया ज्ञानातें । वोवाळिलें जीवें ॥ ५२ ॥ आतां आवडी जेथ पडे । तयाचि [30]अवसरी पुढें पुढें । रिगों लागे हें घडे । प्रेम ऐसें ॥ ५३ ॥ ह्मणौनि

---

* हेळां. † लागीं. ‡ सरोभरी. § शिराणी. ¶ उवावो.

---

१ उतराई. २ अरण्यांत. ३ सांपडलों. ४ पीडा. ५ नामांकित. ६ बळवान. ७ कौतुकानें. ८ भक्तीची बरोबरी. ९ मिथ्या आकाशपुष्पांची. १० वास घेणें. ११ उणीव, आवड, हौस. १२ स्पष्ट. १३ सांगितला. १४ वस्तूला. १५ अंगांत मुरलेला. १६ देहांतील शुद्ध आत्मा. १७ अविनाशी. १८ उपाधीला. १९ स्पष्ट केलें. २० अंतरंग. २१ बळकट, घट्ट. २२ बोलला. २३ सांगण्याजोगें. २४ प्राप्त झाला. २५ समजाविले. २६ शंकित. २७ मर्मज्ञ. २८ पराकाष्टा. २९ बहुधा. ३० पट्टाभिषेक. ३१ बलाढ्य साधनाचा. ३२ श्रेष्ठ, उत्तम. ३३ आत्मज्ञानेच्छु. ३४ वेळी.

पुणे. लाल वाचन मंदिर. पु

जिज्ञासूंच्यापैकीं । ज्ञानीं प्रतीति होय ना जंव निकी । तंव योगें क्षेमें ज्ञान-
विखीं । स्फुरेलचि कीं ॥ ५४ ॥ ह्मणोनि तेंचि सम्यक्ज्ञान । कैसेनि होय
स्वाधीन । जालिया वृद्धियत्न । घडेल केविं ॥ ५५ ॥ कां *उपजोंचि जें न
लाहे । जें उपजलेंही अव्हाटा सूंये । †तें ज्ञानीं विरुद्ध काय आहे । हें जाणावें
कीं ॥ ५६ ॥ मग जाणतया जें विरूं । तयाची वाट वाहती करूं । ज्ञानहित
तें विचारूं । सर्वभावें ॥ ५७ ॥ ऐसा ज्ञानजिज्ञासु तुह्मी समस्तीं । भावें जो
धरिला असे चित्तीं । तो पुरवावया लक्ष्मीपती । बोलिजेल ॥ ५८ ॥ ज्ञानासि
सुजन्म जोडे । आपली विश्रांतीहीवरी वाढे । ते संपत्तीचें पवाडे । सांगेल
दैवी ॥ ५९ ॥ आणि अज्ञानाचेनि ‡कोंमाकारें । जे रागद्वेषांसि दे थारें । तिये
आसुरियेहि घोरे । करील रूप ॥ ६० ॥ सहज इष्टानिष्टकरणी । दोघींचि
इया कवतुकिणी । हे नवमाध्यायीं उभारणी । केली होती ॥ ६१ ॥ तेथ सो-
उमा ¶घेयावा उवावो । तंव वोडवला आंन प्रस्तावो । तरी तया प्रसंगें आतां
देवो । निरूपीत असे ॥ ६२ ॥ तया निरूपणाचेनि नांवें । अध्याय पद सो-
ळावें । लावणी पाहतां जाणावें । मोगिलावरी ॥ ६३ ॥ परि हें असो आतां
प्रस्तुतीं । ज्ञानाच्या हिताहितीं । समर्थी संपत्ती । इयाचि दोन्ही ॥ ६४ ॥ जे
मुमुक्षुमार्गींची बोळींवी । जे मोहरात्रीची धर्मदिवी । ते आधीं तंव दैवी ।
संपत्ति ऐका ॥ ६५ ॥ जेथ एक एकातें पोखी । ऐसे बहुत पदार्थ येकीं । सं-
पादिजेती ते लोकी । संपत्ति ह्मणिजे ॥ ६६ ॥ ते दैवी सुखसंभवी । तेथ दै-
वगुणें येकोपजीवी । जाली ह्मणौनि दैवी । संपत्ती हे ॥ ६७ ॥

श्रीभगवानुवाच–अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥ १ ॥

[श्रीभगवानुवाच–अभयं] आतां तयाचि दैवगुणा- । माजि धुरेचा बैसणा ।
बैसे तया ओंकर्णा । अभय ऐसें ॥ ६८ ॥ तरि नें घलूनि महा पुरीं । न घेपे
वुडणयाची शिरीं । कां रोग न गणिजे घरीं । पथ्याचिया ॥ ६९ ॥ तैसा
कर्माकर्मांचिया मोहरीं । उठूं नेदुनि अहंकारा । संसाराचा दरारा । सांडणें

* उमजों. † ऐसें. ‡ कामारें. ¶ घेयावया.

१ अनुभव. २ अप्राप्ताची प्राप्ति. ३ प्राप्ताचें संरक्षण. ४ विकल्पादिक. ५ आडवाटीं. ६ व्याली. ७ विघ्न करणारें. ८ जिज्ञासूला. ९ विरुद्ध. १० शांतीपर्यंत. ११ विवेक वैराग्यादि दैवी संपत्ती. १२ अंकितपणानें. १३ ठिकाण देतें. १४ प्रत्यक्ष. (पुढें अवकाश घेतां यावा इतक्यांत.) १५ घेतां यावा. १६ विचार. १७ दुसरा प्रसंग. १८ संबंध. १९ मागल्यावरून. २० सोबतीण. २१ चंद्रज्योत. २२ एके ठिकाणीं. २३ संपादन केले जातात. २४ तिला. २५ एकच आश्रय. २६ अग्रभागींचा. २७ ऐका. २८ उडी न घालून. २९ भय, कंप. ३० मार्गास.

येणें ॥ ७० ॥ अथवा *ऐक्यभावाचेनि[१] पैसें[२]। दुजे मानूनि[३] आत्मा ऐसें। भय-वार्ता देशें। दडवणें जें ॥ ७१ ॥ पाणी बुडऊं ये मिठातें। तंव मीठचि पाणी[४] आते। तेविं आपण जालेनि अद्वैतें। नाशे भय ॥ ७२ ॥ अगा अभय येणें नांवें। बोलिजे तें हें जाणावें। सम्यक्ज्ञानाचें आघवें। धावणें हें ॥ ७३ ॥

[सत्त्वसंशुद्धिः] आतां सत्वशुद्धी जे ह्मणिजे। ते ऐशा चिन्हीं जाणिजे। तरी जळे ना विझे। राखोंडी जैसी ॥ ७४ ॥ कां पाडिंवा वाढी †न[५] मगे। अंवसे तुटी[६] सांडूनि मागें। माजी अतिसूक्ष्म अंगें। चंद्र जैसा राहे ॥ ७५ ॥ ना तरि वर्षाविया[७] सांडिली। ग्रीष्में नाहीं मांडिली[८]। माजि निजरूपें निवडली। गंगा जैसी ॥ ७६ ॥ तैसी संकल्पविकल्पाचि वोढी। सांडूनि रजतमाची ‡कावडी[९]। भोगितां निजधर्माची आवडी। बुद्धि उरे ॥ ७७ ॥ इंद्रियवर्गीं दाखविलिया। विरुद्धा अथवा भलीया। विस्मय कांहीं केलिया। नुठी चित्तीं ॥ ७८ ॥ गांवा गेलिया वल्लभ[१०]। पतिव्रतेचा विरह क्षोभ। §भलतेसणी[११] हानी लाभ। न मनी जेवीं ॥ ७९ ॥ तेविं सत्स्वरूप रुचलेपणें। ¶बुद्धी जें ऐसें अ-नन्य होणें[१२]। ते सत्वशुद्धी ह्मणे। केशिहंता[१३] ॥ ८० ॥ [ज्ञानयोगव्यवस्थितिः] आतां आत्मलाभाविखीं। ज्ञानयोगामाजी एकीं। जे आपुलिया ठाकीं। हांवे भरे ॥ ८१ ॥ तेथ सगळिये चित्तवृत्ती। त्याग करणें या रीती। निष्कामें पूर्णा-हुती। हुताशीं जैसी ॥ ८२ ॥ कां सुकुळीने[१४] आपुली। आत्मजा सत्कुळींचि दिधली। हें असो लक्ष्मी स्थिरावली। मुकुंदीं जैसी ॥ ८३ ॥ तैसें $निर्विकल्पपणें[१५]। जें योगज्ञानींच या वृत्तिक[१६] होणें। तो तिजा[१७] गुण ह्मणे। कृष्णनाथ ॥ ८४ ॥ [दानं] आतां देहवाचाचित्तें। यथासंपन्नें वित्तें। वैरी जालियाही आर्तातें। न वंचणें[१८] जें कां ॥ ८५ ॥ फुलीं फळीं छाया। मुळीं पत्रींही धनंजया। वाटेचा नचुके आलिया। वृक्ष जैसा ॥ ८६ ॥ तैसें मनौनि[१९] धनवरी। विद्यमानें[२०] आल्या अवसरीं[२१]। श्रोतांचिये मनोहारीं[२२]। उपयोगा जाणें ॥ ८७ ॥ तया नांव जाण दान। जें मोक्षनिधानाचें अंजन। हें असो [दमश्च] आयिक चिन्ह। दमाचें तें ॥ ८८ ॥ तरि विषयेंद्रियमिळणी। करूनि घापे वितुंटणी[२३]। जैसें तोडिजे ||खडूळपाणी। पोरकेया[२४] ॥ ८९ ॥ तैसा विषयजातांचा वारा। वाजों नेदिजे इंद्रियद्वारां। इयें बांधोनि प्रेत्याहारा[२५]। हातीं वोपी ॥ ९० ॥

---

* ऐक्यभावनेचेनि. † नघे. ‡ वांकडी. § भलतैसाही. ¶ बुद्धीचें जें. $ विकलेपणें, अविकलपणें. || खडूपाणी.

---

१ योगानें. २ सर्व जग आत्मस्वरूप आहे असें मानून. ३ व्याप्त, पाणीमय. ४ प्रतिपदा. ५ क्षय. ६ वर्षाऋतु. ७ ओढ. ८ स्वस्वरूपधारणेची. ९ पति. १० भलत्यानें, पाहिजे तेवढा. ११ केशी दैत्यास मारणारा श्रीकृष्ण. १२ कुलवंतानें. १३ वतनदार. १४ तिसरा ज्ञानयोग. १५ विन्मुख करणें. १६ मनापासून. १७ प्रस्तुत. १८ प्रसंगीं. १९ दमलेल्यास त्याचे मनोनुरूप. २० वियोग. २१ निवळीच्या वियांनीं. २२ नियमनाच्या. २३ देतो.

*आंतुला चित्ताचे अंगवरी । †प्रवृत्ति पेलूनि माघारी । सुयिजे दाहींही द्वारीं । वैराग्याची ॥ ९१ ॥ श्वासोश्वासाहुनी बहुवसें । व्रतें आचरे खरपुसें । वोसंतितां रात्रिदिवसें । नाराणुक जया ॥ ९२ ॥ पैं दम ऐसा म्हणिपे । तो हा जाण स्वरूपें । यज्ञार्थही संक्षेपें । सांगों ऐक ॥ ९३ ॥ [यज्ञश्च] तरि ब्राह्मण करूनि धुरे । स्त्रियादिक पैल मेरे । माझारीं अधिकारें । आपुलालेनि ॥९४॥ जया जें सर्वोत्तम । भजनीय देवताधर्म । तें तेणें यथागम । विधी यजिजे ॥ ९५ ॥ जैसा द्विज षट्कर्मे करी । शूद्र तयातें नमस्कारी । कीं दोंहींसिही सरोबरी । निपजे याग ॥ ९६ ॥ तैसें अधिकारपर्यालोचें । हें यज्ञ करणें सर्वांचें । परि विष फळाशेचें । न घापे माजी ॥ ९७ ॥ आणि मी कर्ता ऐसा भावो । नेदिजे देहाचेनि द्वारें जावों । नां वेदाज्ञेसी तरी ठावो । होइजे स्वयें ॥ ९८ ॥ अर्जुना एवं ‡यज्ञ । सर्वत्र जाण §सोज्ञ । कैवल्यमार्गींचा अभिज्ञ । सांगाती हा ॥ ९९ ॥ [स्वाध्यायः] आतां चेंडुवें भूमी हाणिजे । हें नव्हे तो हाता आणिजे । ¶कीं शेतीं बीं विखुरिजे । परी पिकीं लक्ष ॥ १०० ॥ ना तरि ठेविलें देखावया । आदर कीजे दिविया । कां शाखा फळें यावया । सिंपिजे मूळ ॥ १ ॥ हें बहू असो आरिसा । आपणपें देखावया जैसा । पुढतपुढती बहुवसा । $डंटिजे प्रीती ॥ २ ॥ तैसा प्रतिपाद्य जो ईश्वर । तो होवयालागीं गोचर । श्रुतीचा निरंतर । अभ्यास करणें ॥ ३ ॥ तें द्विजांसीच ब्रह्मसूत्र । येरां स्तोत्र कां नाममंत्र । आवर्तणें पवित्र । पावावया तत्त्व ॥ ४ ॥ पार्था गा स्वाध्यावो । बोलिजे तो हा म्हणे देवो । आतां तपशब्दाभिप्रावो । आईक सांगों ॥ ५ ॥ [तपः] तरी दानें सर्वस्व देणें । वेंचणें तें व्यर्थ करणें । जैसें फळोनि स्वयें सुकणें । $ओषधीचें ॥ ६ ॥ ना ना धूपाचा अग्निप्रवेश । कनकीं तुंकाचा नाश । पितृपक्ष पोपितां ऱ्हास । चंद्राचा जैसा ॥ ७ ॥ तैसा स्वरूपाचिया प्रसरा- । लागीं प्राणेंद्रियशरीरां । आंटणी करणें जें वीरा । तेंचि तप ॥ ८ ॥ अथवा अनारिसें । तपाचें रूप जरी असे । तरि जाण जेविं दुधीं हंसें । सांदली चांचू ॥ ९ ॥ तैसें देहजीवाचिये मेळणीं । जो उदेयजत सूये पाणी । तो विवेक अंतःकरणीं । जागवी जो ॥ ११० ॥ पाहातां आत्मयाकडे । परि बुद्धीचा पैस सांकडे । सनिद्र स्वप्न बुडे । जागणीं जैसें ॥ ११ ॥ तैसा आत्मपर्या-

* भीतरील. † सांडूनि प्रवृत्ति पडे परबाहेरी. ‡ संज्ञ. § यज्ञ. ¶ कां क्षेत्रीं बीज पेरिजे. $ इंद्रायणी जेवीं.

१ स्थानापर्यंत. २ फिरवून. ३ घालावी. ४ प्रखर, उत्तम. ५ आचरितां, करितां. ६ अग्रभागीं. ७ यथाशास्त्र. ८ (यजन १, याजन २, अध्ययन ३, अध्यापन ४, दान ५, व प्रतिग्रह ६) हीं षट्कर्मे. ९ साम्य. १० विचारानें. ११ नाहींतर. १२ सशास्त्र. १३ पेरावें. १४ साफ करणें. १५ जप करणें. १६ अध्ययन. १७ खर्च करणें. १८ वजनाचा. १९ प्राप्तीसाठीं. २० झिजविणें, श्रम. २१ घातली. २२ जन्मतांच. २३ पाणी सोडतो, त्याग करतो. २४ आत्मविचार. २५ मार्ग अडचण पावतो. २६ निद्रेसकट. २७ आत्मावलोकन.

लोच । प्रवर्तें जो साच । तपाचा हा निर्वेच[1] । धनुर्धरा ॥ १२ ॥ [आर्जवं] आतां बाळाच्या हितीं स्तन्य । जैसें नानाभूतीं चैतन्य । तैसें प्राणिमात्रीं सौजन्य[3] । आर्जव तें ॥ १३ ॥

अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥ २ ॥

[अहिंसा] आणि जगाचिया सुखोद्देशें । शरीरवाचामानसें । राहाटणें[3] तें अहिंसे । रूप जाण ॥ १४ ॥ [सत्यं] आतां तीख होउनि मेंवाळ[4] । जैसें जातीचें मुकुळ[5] । कां तेज परी शीतळ । शशांकाचें[6] ॥ १५ ॥ शके दावितांचि रोग फेडूं । आणि जिभे तरि नव्हे कडु । तें वोखद नाहीं मा[7] घडु । उपमा कैंची ॥ १६ ॥ तरि मउपणें बुबुळें । झगडतांही परि नाडळे । येरवीं फोडी कोराळें[8] । पाणी जैसें ॥ १७ ॥ तैसें तोडावया संदेह । तीख जैसें कां लोह । श्राव्यत्वें[9] तरि माधुर्य । पायीं[10] घाली ॥ १८ ॥ ऐकों ठातां कौतुकें । कानातें निघती मुखें । जें साचारिवेचेनि[12] बिकें[13] । ब्रह्मही भेदी ॥ १९ ॥ किंबहुना प्रियपणें । कोणातेंही झकऊं नेणें । यथार्थ तरी खुपणें । नाहीं कवणा ॥१२०॥ येन्हवीं गोरी[14] कीर काना *गोड । परि साचाचा[15] पाखाळीं कीड । आगियेचें करणें उघड । परि जळों तें साच ॥ २१ ॥ कानीं लागतां मेहुर[16] । अर्थें विभांडी[17] जिव्हार[18] । ते वाचा नव्हे सुंदर । लांवचि[19] पां ॥ २२ ॥ परि अहितीं कोपोनि सोपें[20] । लालनीं मउ जैसें पुष्प । तिये मातेचें स्वरूप । जैसें कां होय ॥ २३ ॥ तैसें श्रवणसुखचतुर । परिणमोनि साचार । बोलणें जें अविकार । तें सत्य येथें ॥ २४ ॥ [अक्रोधः] आतां घालितांही पाणी । पाषाणीं न निघे आणी[21] । कां मथिलिया लोणी । †कांजी नेदी ॥ २५ ॥ त्वचा[22] पायें शिरीं । हालेयाही फडे न करी । वसंतीं ही अंबरीं[23] । न होती फुलें ॥ २६ ॥ ना ना रंभेचेनिही रूपें । शुकीं नुठिजेचि कंदर्पें[24] । कां भस्मीं वन्हि न ‡उद्दीपे । घृतेंही जेविं ॥ २७ ॥ तेविंचि कुमारु[25] क्रोधें भरे । तैसिया मंत्रांचीं बीजाक्षरें[26] । तियें निमितेंतेंही अपारें[27] । मीनलिया ॥ २८ ॥ पैं §धातयाही[28] पायां पडतां । नुठी गतायू पंडुसुता । तैसी नुपजे उपजवितां । क्रोधोर्मि गा ॥ २९ ॥ अक्रोधत्व ऐसें । नांव तें ¶ये दशे । जाण ऐसें श्रीनिवासें । ह्मणीतलें तया ॥ १३० ॥ [त्यागः] आतां मृत्तिकात्यागें घट । तंतुत्यागें पट । त्यजिजे जेविं

* कोड. † कांहींच. ‡ नाटोपे. § धाताही. ¶ तिये.

१ सिद्धांत. २ मैत्री. ३ वर्तणें. ४ मृदु. ५ जाईची कळी. ६ चंद्राचें. ७ तर मग देऊं. ८ प्रतिबंध न पावे. ९ पर्वताचा कडा, दगड. १० ऐकलें असतां. ११ नमस्कार करूं लावी. १२ साहा शास्त्रें, व चार वेद यांच्या. १३ बळानें. १४ पारध्याचें गायन. १५ शुद्ध सुवर्णांत असलेले हीनकट स्वच्छ करून काढतो. १६ मधुर. १७ फोडी. १८ काळिज. १९ विवशी. २० पोकळ. २१ अंकुर. २२ कांत. २३ हाणतां. २४ मुद्रा. २५ शिव्या. २६ निमतात, लय पावतात. २७ ब्रह्मदेवाच्या.

वट । बीजत्यागें ॥ ३१ ॥ कां त्यजूनि भिंतिमात्र । त्यजिजे आघवेंचि चित्र । कां निद्रात्यागें विचित्र । स्वप्नजाळ तें ॥ ३२ ॥ ना ना जळत्यागें तरंग । वर्षात्यागें मेघ । त्यजिजती *जैसे भोग । धनत्यागें ॥ ३३ ॥ तेविं बुद्धिमंतीं देहीं । अहंता सांडून पाहीं । सांडिजे अशेषही । संसारजात ॥ ३४ ॥ तया नांव त्याग । ह्मणे तो यज्ञांग । हें मानूनि सुभग । पार्थ पुसे ॥ ३५ ॥ आतां शांतीचें लिंग । तें व्यक्त मज सांग । देवो ह्मणती चांग । अवधान देईं ॥३६॥ [शांतिः] तरी गिळोनि ज्ञेयातें । ज्ञाता ज्ञानही माघौतें । हारपे निरुतें । ते शांति पैं गा ॥ ३७ ॥ जैसा प्रळयांबूचा उंभड । बुडऊनि विश्वाचा पवाड । होय आपणपें †निबिड । आपणचि ॥ ३८ ॥ मग उगम ओघें सिंधू । हा नुरेचि व्यवहार भेदु । परि जलैक्याचा बोधु । तोही कवणा ॥ ३९ ॥ तैसी ज्ञेया देतां मिठी । ज्ञातृत्वही पडे पोटीं । मग उरे तेंचि किरीटी । शांतीचें रूप ॥ १४० ॥ [अपैशुनं] आतां कैदर्थवित व्याधी । बळीकरणाचिया आधीं । आप पर न शोधी । सद्वैद्य जैसा ॥ ४१ ॥ कां चिखलीं रुतली गाये । धैंड भाकड न पाहे । जो तियेचिया ग्लानी होये । कैलाभुला ॥ ४२ ॥ ना ना बुडतयातें सकरुण । ‡न पुसे अंत्यज कीं ब्राह्मण । काढूनि राखे प्राण । हेंचि जाणे ॥ ४३ ॥ कीं §मांयवणी पापिये । उघडी केली विपायें । ¶ते नेसविल्यावीण न पाहे । शिष्ट जैसा ॥ ४४ ॥ तैसें अज्ञानप्रमादादिकीं । कां प्राक्तनींही सदोषीं । निंद्यत्वाच्या सर्वविषीं । खिळिले जे ॥ ४५ ॥ तयां आंगीक आपुलें । देउनियां भलें । विसरविजती सलें । सलतीं तियें ॥ ४६ ॥ अगा पुढिलाचे दोष । करूनि आपुलिये दिठी चोख । मग घापे अवलोक । तयावरी ॥४७॥ जैसा पुजूनि देव पाहिजे । पेरूनि शेता जाइजे । तोषौनि प्रसाद घेइजे । अतिथीचा ॥ ४८ ॥ तैसें आपुलेनि गुणें । पुढिलाचें उणें । फेडुनियां पाहणें । तयाकडे ॥ ४९ ॥ वांचूनि न विंधिजे वर्मीं । नातुडविजे अकर्मीं । न बोलविजे नामीं । सदोषीं तिहीं ॥ १५० ॥ वरि कोणे एकें उपायें । पडिलें तें उभें होये । तेंचि कीजे परि घाये । नेदावे वर्मीं ॥ ५१ ॥ पैं उत्तमाचिया साठीं । नीचें मानिजे किरीटी । हें वांचोनि दिठी । दोष न घेपे ॥ ५२ ॥ अगा अपैशुन्याचें लक्षण । अर्जुना हें फुडें जाण । मोक्षमार्गींचें सुखासन । मुख्य हें गा ॥ ५३ ॥ [दया भूतेषु] आतां दया ते ऐसी । पूर्णचंद्रिका जैसी । निववितां

---

* जेवीं. † निवाड. ‡ न पुसे उत्तम हीन । काढूं रक्षूं प्राण । हेंचि जाण. § पैं माहेवणी. ¶ ते सलजा न पाहे । न पांघुरवितां.

---

१ भाग्यवान. २ उमाळा, झरा. ३ घनदाट. ४ उत्पत्तीचें स्थळ, प्रवाह, व समुद्रास मिळणें. ५ नासवीत, मारीत, कमी करीत. ६ निरोगी होण्याच्या. ७ दूध देणारी किंवा न देणारी. ८ दुःखानें. ९ कासावीस. १० पतिव्रता. ११ कष्टले. १२ सहाय. १३ दुःख. १४ संतोष करून. १५ आशीर्वाद. १६ ठिकाणीं. १७ नीचालाही उत्तम असें समजतो. १८ उणें न पाहाण्याचें.

न कडसी[१]। साने थोर ॥ ५४ ॥ तैसें दुःखितांचें शिणणें। हिरतां सेकणव-[२]पणें। उत्तमाधम नेणें। विवंचूं गा ॥ ५५ ॥ पैं जगीं जीवेंनासारिखें[३]। वस्तु अंगेंवरी उपखे। परि जातें जीवित राखे। तृणाचेही ॥ ५६ ॥ तैसें पुढिलां-चेनि तापें। कळवळलीये कृपे। *दिधलेंही आपणपें। न्यूनचि मानी ॥५७॥ निम्न[४] भरलिया उणें। पाणी ढळोंचि नेणें। तेविं †श्रांता[५] तोषौनि जाणें। सामोरें पां ॥ ५८ ॥ पैं पायीं कांटा नेहटे। तंव व्यथा जीवीं उमटे। तैसा पोळे संकटें। पुढिलांचेनि ॥ ५९ ॥ कां पावो[६] शीतळता लाहे। कीं ते डो-ळयाचिलागीं होये। तैसा परसुखें जाये। सुखावत जो ॥ १६० ॥ किंबहुना तृषितालागीं। पाणी आरायिलें[७] असे जगीं। तैसें दुःखितांचें सेलेंभागीं[८]। जिणें जयाचें ॥ ६१ ॥ तो पुरुष वीरराया। मूर्तिमंत जाण दया। मी उदय-जतांचि तया। ऋणिया ‡लाभें ॥ ६२ ॥ [अलोलुपं] आतां सूर्यासि जीवें। अनुसरलिया रोजीवें[९]। परि तें तो न शिवे। सौरभ्य जैसें ॥ ६३ ॥ कां वसं-ताचिया वोहाणीं[१०]। आलिया वनश्रीच्या[११] अक्षौहिणी। ते न करीतचि घेणी। निगाला तो ॥ ६४ ॥ हें असो महासिद्धीसी। लक्ष्मीही आलिया पाशीं[१२]। परि महाविष्णु जैसी। न गणीच ते ॥ ६५ ॥ तैसें ऐहिकींचे[१३] कां स्वर्गींचे। भोग पाइक जालिया इच्छेचे। परि भोगावें हें न रुचे। मनामाजी ॥ ६६ ॥ बहुवें काय कौतुकीं। §जीव नोहे विषयाभिलाखी। अलोलुप्त्वदशा[१४] ठा-उकी। जाण ते हे ॥ ६७ ॥ [मार्दवं] आतां माशियां जैसें मोहळ। जळचरां जेविं जळ। कां पक्षियां अंतराळ। मोकळें हें ॥ ६८ ॥ ना तरी बाळकोदेशें। मातेचें स्नेह जैसें। कां वसंतींच्या स्पर्शें। मउ मलयानिल ॥ ६९ ॥ डोळयां प्रियांची भेटी। कां पिलियां कूर्मींची दिठी। तैसी भूतमात्रीं राहटी। मवाळ[१५] ते ॥ १७० ॥ स्पर्शें अतिमृदु। मुखीं घेतां सुस्वादु[१६]। घ्राणासि सुगंधु। उजाळ आंगें ॥ ७१ ॥ तो आवडे ¶तेवढा घेतां। विरुद्ध जरी न होता। तरी उपमे येता। कापुर कीं ॥ ७२ ॥ परि महाभूतें पोटीं वाहे। तेवींचि परमाणु माजि सामाये। या विश्वानुसार होये। गगन $जैसें ॥ ७३ ॥ काय सांगों ऐसें जिणें। जें जगाचेनि जीवे[१७] प्राणें। तया नांव ह्मणें। मार्दव मी ॥ ७४ ॥ [ह्रीः] आतां पराजयें राजा। जैसा कैदेर्थिजे[१८] लाजा। कां मानिया निस्तेजा। निकृष्टास्तव[१९] ॥ ७५ ॥ ना ना चांडाळमंदिराशीं। अवचटें ओलिया[२०] संन्यासी।

---

* सर्वस्वेंसी दिधलें आपणपें। तऱ्ही थोडेंचि गमे. † श्रांत तोषऊनि. ‡ कीजे. § तो नोहे. ¶ तेधवां. $ ऐसा.

---

१ न परीक्षी. २ सदयतेनें. ३ पाण्याप्रमाणें. ४ आंग वेष्टून. ५ नाश पावे. ६ सखल जागा. ७ श्रमलेल्याला. ८ पाय. ९ उत्पन्न केलें, अनुकूल. १० वऱ्यासाठीं, उत्तमभागीं. ११ कमळानें. १२ मार्गीं. १३ वनशोभेच्या. १४ या लोकींचें. १५ कोणच्याही विषयावर आसक्त नसणें. १६ मृदु. १७ रुचिकर. १८ जगतो. १९ दुःख देतो, त्रासवितो. २० नीचपणामुळें. २१ एकाएकीं.

मग लाज होय जैसी । उत्तम तया ॥ ७६ ॥ क्षत्रियां रणीं पळोनि जाणें । ते कोण साहे लाजिरवाणें । कां वैधव्यें *पाचारणें । महासतीयेतें ॥ ७७ ॥ रूपसा उदयलें कुष्ठ । संभावितां कुटीचें बोट । तया लाजा प्राणसंकट । होय जैसें ॥ ७८ ॥ तैसें औटेहातपणें । जें शव होउनि जिणें । उपजों उपजों मरणें । नावा नावा ॥ ७९ ॥ तियें †गर्भमेदमुसें । रक्तमूत्ररसें । वोंतीव होऊनि असे । तें लाजिरवाणें ॥ १८० ॥ हें बहु असो देहपणें । नामरूपासि येणें । नाहीं लाजिरवाणें । ‡तयाहूनि ॥ ८१ ॥ ऐसैसिया अवकळा । घेपे शरीराचा कंटाळा । ते लाज पैं निर्मळा । निसुगा गोड ॥ ८२ ॥ [अचापलं] आतां सूत्रतंतू तुटलिया । चेष्टाचि ठाके सायखडिया । तैसी प्राणजयें कर्मेंद्रियां । खुंटे गती ॥ ८३ ॥ कीं मावळलिया दिनकर । सरे किरणांचा प्रसर । तैसा मनोजयें प्रकार । बुद्धींद्रियां ॥ ८४ ॥ एवं मनपवननियमें । होती दाही इंद्रियें अक्षमें । तें अचापल्य वर्मे । येणें होय ॥ ८५ ॥

तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।
भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ ३ ॥

[तेजः] आतां ईश्वरप्राप्तीलागीं । प्रवर्ततां ज्ञानयोगी §धिवसेयाच्या आंगीं । ¶वोसिवा नव्हे ॥ ८६ ॥ वोखटें मरणाऐसें । तेंही आलें अग्निप्रवेशें । परी प्राणेश्वरोद्देशें । न गणीचि सती ॥ ८७ ॥ तैसें आत्मनाथाचिया आधीं । लोऊनि विषयविषाची बाधी । धावों आडवे पाणधीं । शून्याचिये ॥ ८८ ॥ न ठाके निषेध आड । न पडे विधीची भीड । नुपजेचि जीवीं कोड । महासिद्धीचें ॥ ८९ ॥ ऐसें ईश्वराकडे निजें । धांवे आपसया सहज । तया नांव तेज । आध्यात्मिक तें ॥ १९० ॥ [क्षमा] आतां सर्वही साहातिया गरिमां । गर्वा नये तेचि क्षमा । जैसें देह वाहोनि रोमा । वाहणें नेणें ॥ ९१ ॥ [धृतिः] आणि मातलिया इंद्रियांचे वेग । कां $प्राचीनें खवळले रोग । अथवा योगवियोग । प्रियाप्रियाचे ॥ ९२ ॥ यया आघवियाचाचि थोर । एके वेळे आलिया पूर । तरी ||अगस्त्याहूनि धीर । उभा ठाके ॥ ९३ ॥ आकाशीं धूमाची रेखा । उठिली बहुवा आगळिका । ते गिळी येकीं झुळुका । वारा जेवीं ॥ ९४ ॥ तैसें अधिभूताधिदैवां । अध्यात्मादि उपद्रवां । पातलेयां पांडवा । गिळूनि घाली ॥ ९५ ॥ ऐसें चित्तक्षोभाच्या अवसरीं । उचलूनि धैर्या जें चां-

---

* वेळ नेणें. † गर्भमध्य. ‡ याहीहूनि. § धिवसेयाची. ¶ उणीव नव्हे. $ प्राचीनीं. || अगस्त्य कां धरून.

१ हाक मारणें. २ निंदापर, आळ. ३ साडेतीन हात. ४ दुश्चिन्ह. ५ साधूला. ६ कोडग्याला. ७ बाहुलीला. ८ पंगु. ९ धैर्याच्या. १० न्यूनता. ११ पतीकरतां. १२ जाडून, दूर करून, तोडून. १३ समुदाय. १४ कांटेरी मार्गानें. १५ मन. १६ साहजिक. १७ महत्त्व. १८ पूर्वकर्मानें. १९ अतिशय.

गावें करी । धृती ह्मणिपे अवधारीं । तियेतें गा ॥९६॥ [शौचं] आतां निर्वाळूनि[1] कनकें । भरिला गोंगेपीयूषें[2] । तया कलशाचिया सारिखें । शौच असे ॥ ९७ ॥ जे आंगीं निष्काम आचार । जीवीं विवेक साचार । तो सबाह्य घडला आकार । शुचित्वाचाचि ॥ ९८ ॥ [अद्रोहः] *कां फेडित पाप ताप । पोखीतें[3] तीरींचे पादप[4] । समुद्रा जाय आप । गंगेचें जैसें ॥ ९९ ॥ कां जगाचें †आंध्य फेडित । श्रियेचीं राउळें उघडित । निघे जैसा भास्वत[5] । प्रदक्षिणे ॥ २०० ॥ तैसीं बांधलीं सोडित । बुडालीं काढित । सांकडी फेडित । आर्तीचिया ॥ १ ॥ किंबहुना दिवसराती । पुढिलांचें सुख उन्नति । आणित आणित स्वार्थी । प्रवेशिजे ॥ २ ॥ वांचूनि आपुलिया काजालागीं । प्राणिजातांच्या अहितभागीं । संकल्पाचीही आडवंगी । ‡न करणें जें ॥ ३ ॥ पैं अद्रोहत्व ऐशिया गोष्टी । ऐकसी जिया किरीटी । तें सांगीतलें हे दिठी । पाहों ये तैसें ॥ ४ ॥ [नातिमानिता] आणि गंगा शंभूच्या माथां । पावोनि संकोचेली जेविं पार्था । तेविं मान्यपणें सर्वथा । लाजणें जें ॥ ५ ॥ तें हें पुढतपुढती । अमानित्व जाण सुमती । मागां सांगीतलेंसे किती । तेंचि तें बोलों ॥ ६ ॥ [भवंतीति] एवं इहीं सव्विसें । ब्रह्मसंपदा हे वसत असे । मोक्षचक्रवर्तिचें जैसें । अग्रहार होय॥७॥ ना ना हे संपती दैवी । या गुणतीर्थांची नित्य नवी । निर्विण्णसगराच्या दैवीं । गंगाचि आली॥८॥ कीं गुण कुसुमांची माळा । हे घेऊनि मुक्तिबाळा । वैराग्यनिरपेक्षाचा गळा । गिंवसीत असे ॥ ९ ॥ कीं सव्विसगुणज्योती । इहीं उजळूनि आरती । गीता आत्मया निजपती । नीरांजना आली ॥ २१० ॥ उगळिते निर्मळें । गुण इयेंचि मुक्ताफळें । दैवी शुक्ती कळे । गीतार्णवींची ॥ ११ ॥ काय बहु वानूं ऐसी । अभिव्यक्ति ये अपैसी । केलें दैवी गुणराशि । संपत्तीरूप ॥ १२ ॥ आतां दुःखाची आंतुवट वेली । दोषकांत्याची जरी भरली । तरी निजाभिधानीं §घातली । आसुरी ते ॥ १३ ॥ पैं त्याज्य त्यजावयालागीं । जाणावी जरी अनुपयोगी । तरी ऐका ते चांगी । श्रोत्रशक्ती ॥ १४ ॥ तरी नरकव्यथा थोरी । आणावया दोषीं अघोरीं । मेळ केला ते आसुरी । संपत्ति हे ॥ १५ ॥ ना ना विषवर्ग एकवट । तया नांव जैसें बाँसट । आसुरी संपत्ती हा खोट । दोषांचा तैसा ॥ १६ ॥

---

* आतां फोडित. † अंधकार. ‡ नलगणें जें. § घाली.

---

१ शुद्ध, निर्मळ करून. २ गंगोदकानें. ३ पोषीत. ४ वृक्ष. ५ वनशोभेचीं ठिकाणें, कमळें, पुष्पें. ६ सूर्य. ७ संकटें. ८ अडथळा, कुमार्ग. ९ लाजली. १० श्रीविष्णूचें. ११ इनाम. १२ विरक्त सगर राजाचे. १३ शोधीत. १४ आर्ती ओवाळावयास. १५ उघडीत. १६ शकलें. १७ प्रकट. १८ आंतील. १९ आपल्या सांगण्याचे क्रमांत ओंवली. २० काळकूट. २१ गोळा.

दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥ ४ ॥

[दंभः] तरी तयाचि आसुरा । दोषांमाजी जया वीरा । [१]वाडपणाचा डांगोरा । तो दंभ ऐसा ॥ १७ ॥ जैसी आपुली जननी । नग्न दाविलिया जनीं । तें तीर्थचि परि पतनीं । कारण होय ॥ १८ ॥ कां विद्या गुरूपदिष्टा । बो[२]भाइलिया चोहटां । तरि इष्टदाचि परि अनिष्टा । हेतु *होती ॥ १९ ॥ पैं आंगें बुडतां महापुरीं । जे वेगें काढी पैल तीरीं । ते नावचि बांधिलिया शिरीं । बुडवी जैसी ॥ २२० ॥ कारण जें जीविता । तें [३]वानिलें जरि सेवितां । तरि अन्नचि पंडुसुता । होय विष ॥ २१ ॥ तैसा [४]इष्टादृष्टाचा सखा । धर्म जाला तो फोकारिजे देखा । तरि तारिता तोचि दोखा- । लागीं होय ॥ २२ ॥ ह्मणौनि वाचेचा चौबारा [५]। घातलिया धर्माचा पसारा । धर्मचि तो अधर्म होय वीरा । तो दंभ जाणें ॥ २३ ॥ [दर्पः] आतां मूर्खांचिये जिभे । अक्षरांचा आंबुखा [६]सुभे । आणि तो †ब्रह्मसभे । न रिझे जैसा ॥ २४ ॥ कां [७]मादुरी लोकांचा घोडा । गजपतीही मानी थोडा । कां कांटियेवरिल्या सरडा । स्वर्गही नीच ॥ २५ ॥ तृणाचेनि इंधनें । आगी धांवे गगनें । थिल्लरबळें मीनें । न गणिजे सिंधू ॥ २६ ॥ तैसा माजे स्त्रिया धनें । विद्या स्तुती बहुतें मानें । एके दिवसींचेनि परान्नें । [८]अल्पकु जैसा ॥ २७ ॥ अभ्रच्छायेचिया जोडी । निदैव घर मोडी । मृगांबु देखोनि फोडी । [९]‡पाणियाढें [१०]मूर्ख ॥ २८ ॥ किंबहुना ऐसैसें । [११]उतणें जें संपत्तिमिसें । तो दर्प गा अनारिसें । न बोलें घेईं ॥ २९ ॥ [अभिमानश्च] आणि जगा वेदीं विश्वास । आणि विश्वासीं पूज्य ईश । जगीं एक तेजस । §सूर्यचि हा ॥ २३० ॥ जगस्पृहे [१२]आस्पद । एक सार्वभौमपद । न मरणें निर्विवाद । जगा [१३]पढियें ॥ ३१ ॥ ह्मणौनि जरी उत्साहें । यातें वानूं जाये । कीं तें आइकोनि मत्सर वाहे । फुगों लागे ॥ ३२ ॥ ह्मणे ईश्वरातें खाये । तया वेदा विष सूये । गौरवामाजी [१४]न्हाये । भंगीत असे ॥३३॥ पतंगा नावडे ज्योती । खद्योता भानुची खंती । [१५]टिटिभेनें अपांपती । वैरी केला ॥३४॥ तैसा ¶अभिमानाचेनि मोहें । ईश्वराचेंही नाम न साहे । बापातें ह्मणे मज हे । सवती जाली ॥ ३५ ॥ ऐसा मान्यतेचा [१६]पुष्टगंड । तो अभिमानी [१७]परमलंड । रौरवांचा [१८]रूढ । मार्गचि पैं ॥ ३६ ॥ [क्रोधः] आणि पुढिलांचे सुख । देखणियांचें होय मिष । चढे क्रोधाग्नीचें विख । मनोवृत्ती ॥ ३७ ॥ शीतज-

* होय. † ब्रह्मविदसभे. ‡ पाणिभांडें. § सूर्य जैसा. ¶ अहंमानाचे.

१ मोठेपणाचा. २ चवाट्यावर जर उघड केली. ३ पुष्कळ खातां. ४ इहपरलोकींचा. ५ उघड कीजे. ६ चवाटा. ७ शिंतोडा. ८ घातला. ९ चाबुकस्वाराचा. १० दरिद्री. ११ तळें. १२ माजणें. १३ इच्छेचें स्थान. १४ आवडतें. १५ महत्वाच्या योगानें. १६ सत्ता. १७ टिटवीनें समुद्राशीं वैर मांडलें. १८ मोठा ताठा. १९ उन्मत्त. २० प्रसिद्ध (आरूढ).

ळाचिये भेटी। [1]तातला तेलीं आंगी उठी। चंद्र देखोनि जळे पोटीं। कोल्हा जैसा ॥ ३८ ॥ विश्वाचें आयुष्य जेणें उजळे। तो सूर्य उदैला देखोनि *[3]सवळे। पापिया फुटती डोळे। [3]डुंडुळाचे ॥ ३९ ॥ जगाची सुखपहांट। चोरां मरणाहूनि निकृष्ट। दुधाचें काळकूट। होय व्याळीं ॥ २४० ॥ अगाधें समुद्रजळें। प्राशितां अधिक जळे। वडवाग्नी न मिळे। शांति कहीं ॥ ४१ ॥ तैसा विद्याविनोदविभवें। देखे पुढिलांचीं दैवें। तंव तंव रोष दुणावे। क्रोध तो जाण ॥ ४२ ॥ [पारुष्यमेव च] आणि मन सर्पांची [6]कुटी। डोळे [7]नाराचांची [8]सुटी। बोलणें ते वृष्टी। इंगळांची ॥ ४३ ॥ येर जें क्रियाजात। तें तिर्खयाचें कवंत। ऐसें सबाह्य ‡खसखसित। जयाचें गा ॥ ४४ ॥ तो मनुष्यांत अधम जाण। [9]पौरुष्याचें [10]अवतरण। आतां आइक खुण। अज्ञानाची ॥ [अज्ञानं चेति] तरी शीतोष्णस्पर्शा। निवाड नेणें पाषाण जैसा। कां [11]बधिरांधि आणि दिवसा। [12]जात्यंध तो ॥ ४६ ॥ आगी उठिला [13]औरोगणें। जैसा खाद्य न ह्मणे। कां परिस [14]पांड नेणे। सोनया लोहा ॥ ४७ ॥ ना ता नानारसीं। रिघोनि [15]दर्वी जैसी। परि रसस्वादासी। चाखों नेणें ॥ कां वारा जैसा पारखी। नव्हेचि गा मार्गामार्गाविखीं। तैसें कृत्याकृत्यांवेकीं। अंधपण जें ॥ ४९ ॥ हें चोख हें मैळ। ऐसें नेणोनियां बाळ। देखे तें केवळ। मुखींचि घाली ॥ २५० ॥ तैसें पापपुण्याचें [16]खिचेटें। करोनि खातां [17]बुद्धिचेष्टे। कडु मधुर न वाटे। ऐसी जे दशा ॥ ५१ ॥ तिये नाम अज्ञान। या बोला नाहीं आन। एवं साही दोषांचें चिन्ह। सांगितलें ॥ ५२ ॥ इहींच साही दोषांगीं। हे आसुरी संपत्ति [18]दांडुगी। §जैसें थोर विष भुजंगीं। अंग [19]सोनें ॥ ५३ ॥ कां तिघां वन्हीच्या [20]पांती। पाहतां थोडे ठाय गमती। परि विश्वही प्राणाहुती। करूं न पुरे ॥ ५४ ॥ [21]धांतयाही गेलिया शरण। त्रिदोषीं न चुके मरण। तयां तिहींची दुणी जाण। ¶साही दोष हे ॥ ५५ ॥ इहीं साही दोषीं संपूर्णीं। जाली इयेची उभारणी। ह्मणोनि आसुरी उणी। संपदा नव्हे ॥ ५६ ॥ परि [22]क्रूरग्रहांची जैसी। [23]मांदी मिळे एकेचि राशी। कां येती निंदकापासीं। अशेष पापें ॥ ५७ ॥ मरणाराचें आंग। [24]पेंडिवाती अवघेचि रोग। कां कुमुहूर्तीं दुर्योग। एकवटती ॥ ५८ ॥ विश्वासला [25]आंतुडवीजे चोरा। शिणला [26]सुईजे महापुरा। तैसें दोषीं इहीं नरा। अनिष्ट कीजे

* सवेळे. † कुटी. ‡ खसासित. § जैसे थोर विषय सुभगे अंगीं. ¶ लागली आहे.

१ तापलेल्या. २ प्रातःकाळीं. ३ घुबडाचे. ४ वाईट. ५ ऐश्वर्यानें. ६ वारूळ. ७ बाणांचें सुटणें. ८ पोलादी. ९ काठिण्याचें. १० मूर्ती. ११ जन्मांध. १२ खावयाला. १३ साम्य. १४ पळी. १५ खिचडी. १६ बुद्धिव्यापारास. १७ बलाढ्य. १८ लहान. १९ प्रळयाग्नि, विद्युताग्नि, वडवाग्नि. २० पंक्तींत. २१ ब्रह्मदेवाला. २२ मंगळ-शनीची. २३ समुदाय. २४ व्यापिती. २५ धरिजे, सांपडे. २६ घालावा.

॥ ५९ ॥ कां आयुष्य जातिये वेळे । शेळिये [1]सातवेउळि मिळे । तैसे साही दोष सगळे । जोडती तया ॥ २६० ॥ मोक्षमार्गाकडे । जयाचा [2]आंबुखा पडे । *न निघे ह्मणौनि बुडे । संसारीं जो ॥६१॥ अधमां योनींच्या [3]पाउटीं । उतरत जो किरीटी । स्थावरांही तळवटीं । बैसणें घे ॥ ६२ ॥ हें असो तयाच्या ठायीं । मिळोनि साही दोषीं इहीं । आसुरी संपत्ती पाहीं । वाढवीजे ॥ ६३ ॥ ऐसिया या दोनी । संपत्ती प्रसिद्धा जनीं । सांगीतलिया चिन्हीं । वेगळाल्या ॥ ६४ ॥

दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ।
मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥ ५ ॥

[दैवी संपद्विमोक्षाय] इया दोन्हींमाजी पहिली । दैवी जे ह्मणीतली । ते मोक्षसूर्ये [4]पाहली । [5]उखाचि जाण ॥ ६५ ॥ [निबंधायासुरी मता] येरी जे दुसरी । [6]त कां आसुरी । ते †मोहलोहाची खरी । सांखळी जीवा ॥ ६६ ॥ [मा परि हें आइकोनि झणें । भय धेसी हो मनें । काय रात्रीचा दिनें । धाक धरिजे ॥ ६७ ॥ हे आसुरी संपत्ति तया । [7]बंधालागीं धनंजया । जो साहीं दोषां ययां । आश्रय होय ॥ ६८ ॥ [संपदं दैवीमिति] तूं तंव पांडवा । सांगीतलेया दैवा । ‡गुणनिधी बरवा । जन्मलासी ॥ ६९ ॥ ह्मणोनि पार्था तूं या । दैवीसंपत्ती स्वामियां । होउनि यावें [8]उंवाया । कैवल्याचिया ॥ २७० ॥

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च ।
दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु ॥ ६ ॥

[द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्] आणि दैवां आसुरां । संपत्तिवंतां नरां । अनादिसिद्ध §[9]उजगरा । राहाटींचा आहे ॥ ७१ ॥ जैसें रात्रीच्या अवसरीं । व्यापारिजे निशाचरीं । दिवसा सुव्यवहारीं । मनुष्यादिकीं ॥७२॥ [दैव आसुर एवच] तैसिया आपलालिया राहाटीं । वर्तती दोनी सृष्टी । दैवी आणि किरीटी । आसुरी येथ ॥ ७३ ॥ [दैवो विस्तरशः प्रोक्तः] तेवींचि विस्तारूनि दैवी । ज्ञानकथनादि [10]प्रस्तावीं । मागीलग्रंथीं बरवी । सांगीतली ॥ ७४ ॥ [आसुरं पार्थ मे शृणु] आतां आसुरी जे सृष्टी । तेथिंची [11]उपलऊं गोठी । अवधानाची दिठी । दे पां निकी ॥ ७५ ॥ तरी वाद्यवीण नाद । नेदी कवणाही [12]सांद । कां अपुष्पीं [13]मकरंद । न लभे जैसा ॥ ७६ ॥ तैसी प्रकृति हे आसुर । एकली नोहे गोचर । जंव एकार्धे शरीर । [14]मोल्हाती ना ॥ ७७ ॥ मग आविष्करला [15]लां-

* तैं न निघे. † लोभमोहाची. ‡ गुणाचा निधि. § उजरा.

१ सात नांग्यांची इंगळी. २ शिंतोडा, गंवसणी. ३ पावलांनीं. ४ उजडविली. ५ प्रातःकाळ. ६ संसाररूप जो बंध त्याला कारण. ७ सुखाप्रत. ८ जागरण. ९ प्रसंगें. १० सांगूं. ११ शब्द, ध्वनि, उत्तर. १२ पुष्परस. १३ अंगीकारीना. १४ प्रकट केलेला.

कुडें । पावक जैसा जोडे । तैसी प्राणिदेहीं सांपडे । आटोपली हे ॥ ७८ ॥ ते वेळीं जे वाढी उंसा । तेचि आंतुला रसा । देहाकार होय तैसा । प्राणियांचा ॥ ७९ ॥ आतां तयांचि प्राणियां । रूप करूं धनंजया । घडले जे आसुरीया । *दोषवृंदीं ॥ २८० ॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ।
न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥ ७ ॥

[प्रवृत्तिं च निवृत्तिं च] तरि पुण्यालागीं प्रवृत्ती । कां पापाविषयीं निवृत्ती । या जाणणेयाची राती । तयांचें मन ॥ ८१ ॥ [जना न विदुरासुराः] निगणेया आणि प्रवेशा । चित्त नेदीत [१]आवेशा । कोशकीट[२] जैसा । जाचिंनला पैं ॥८२॥ कां दिधलें मागुती येइल । कीं नये हें पुढील । न पाहातां दे भांडवल । मूर्ख चोरां ॥ ८३ ॥ तैसिया [३]प्रवृत्ति निवृत्ति दोनी । नेणिजती आसुरीं जनीं । [न शौचं] आणि †शौच तें स्वप्नीं । देखती ना ते ॥ ८४ ॥ काळिमा सांडील कोळसा । वरि [४]चोखी होईल वायसा । राक्षसही मांसा । विटों शके ॥ ८५ ॥ परि आसुरां प्राणियां । शौच नाहीं धनंजया । पवित्रत्व §जेविं भांडिया । मद्याचिया ॥ ८६ ॥ [नापि चाचारो] ¶वाढविती विधीची आस । $कां पाहाती वडिलांची [५]वास । कर्में आचरती हे भाष । नेणतीचि ते ॥ ८७ ॥ जैसें चरणें शेळियेचें । कां धांवणें वारियाचें । जाळणें अग्नीचें । भलतेउतें ॥ ८८ ॥ तैसें [६]पुढांसूनि स्वैरें । आचरती ते गा आसुर । [न सत्यं तेषु विद्यते] सत्येंसि कीर वैर । सदांचि तयां ॥ ८९ ॥ जरी नांगिया आपुलिया । विंचू करी गुदगुलिया । तरी साचा बोलिया । बोलती ते ॥ २९० ॥ अपानाचेनि तोंडें । जरि सुगंधा येणें घडे । तरि सत्य तयां जोडे । आसुरांतें ॥ ९१ ॥ ऐसें ते नकरितां कांहीं । आंगेंचि [७]वोखटें ‖पाहीं । आतां बोलती ते नवाई । सांगिजेल ॥ ९२ ॥ येन्हवीं करेयांच्याठायीं चांग । तें तयासि कैचें नीट आंग । तैसा असुरांचा प्रसंग । प्रसंगें परिस ॥ ९३ ॥ [८]उधवणीचें जेविं तोंड । [९]उगळी धुंवाचे [१०]उभड । हें जाणिजे तेविं उघड । सांगों ते बोल ॥ ९४ ॥

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।
अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥ ८ ॥

[असत्यं] तरि विश्व हा अनादि ठावो । येथ नियंता ईश्वररावो । चावडिये

---

* दोषवृद्धि. † शुचित्व. ‡ न देखती ते. § जेवीं मद्याचिया । भांडा नये. ¶ अढविती विधीची आस । कां पाहिजे वडिलांची वास । क्रमें अचरती. $ पाहातां. ‖ नाहीं.

---

१ आवेशानें, त्वरेनें. २ कोशकार किडा. ३ शास्त्रविहित धर्मांविषयीं विधिवाक्य, व शास्त्रनिषिद्ध आचाराचा निषेध. ४ पांढरेपण. ५ वाट. ६ प्राङ्मुख. ७ यथेष्ट. ८ वाईट. ९ अपूर्वता. १० उंटाच्या. ११ धुरांड्याचें. १२ ओकी. १३ धुराचे. १४ लोट, उमाळे.

न्यावो अन्यावो । निवडी वेद ॥ ९५ ॥ वेदीं अन्यायी पडे । तो निरयभोगें दंडे । संन्यायी तो सुरवाडें । स्वर्गीं जिये ॥ ९६ ॥ ऐसी हे विश्वव्यवस्था । अनादि जे पार्था । इयेतें ह्मणती ते वृथा । अवघेंचि हें ॥ ९७ ॥ यज्ञमूढ ठकिले यागीं । देवपिसे प्रतिमालिंगीं । नागवले भगवे योगी । समाधिभ्रमें ॥ ९८ ॥ येथ आपलेनि बळें । भोगिजे जें जें वेंटाळे । हेंवांचोनि *वेगळें । पुण्य आहे ॥ ९९ ॥ ना अशक्तपणें आंगिकें । वेगळ वेंटाळीं नें टके । ऐसा गादिजेवीण †विषयसुखें । तेंचि पाप ॥ ३०० ॥ प्राण घेपती संपन्नांचे । तें पाप जरी साचें । तरी सर्वस्व हाता ये तयांचें । हें पुण्यफळ कीं ॥ १ ॥ बळी अबळातें खाय । हेंचि बाधित जरी होय । तरी मांसयां कां न होय । निसंतान ॥ २ ॥ [अप्रतिष्ठं] आणि कुळें शोधूनि दोन्ही । कुमारेंचि शुभलग्नीं । मेळवीजती प्रजासाधनीं । हेतु जरी ॥ ३ ॥ तरी पशुपक्ष्यादि जाती । जयां मिति नाहीं संतती । तयां कोणें प्रतिपत्ती । विवाह केले ॥ ४ ॥ चोरियेचें धन आलें । तरि तें कोणासि विष जालें । वोलभें परद्वार केलें । कोढी कोणी होय ॥ ५ ॥ [अनीश्वरं] ह्मणोनि देव गोंसावी । तो धर्माधर्म भोगवी । [किमन्यत्] आणि परत्राच्या गांवीं । करी तो भोगी ॥ ६ ॥ परि परत्र ना देवो । न दिसे ह्मणोनि तें वावो । आणि कर्ता निमे मा ठावो । भोग्यासि कवण ॥ ७ ॥ [कामहैतुकं] येथ उर्वशिया इंद्र सुखी । जैसा कां स्वर्गलोकीं । तैसाचि कृमिही नरकीं । लोळत श्लोगे ॥ ८ ॥ ह्मणौनि नरक स्वर्ग । नव्हे पापपुण्यभाग । जे दोहीं ठायीं सुखभोग । कामाचाचि तो ॥ ९ ॥ [अपरस्परसंभूतं] याकारणें कामें । स्त्रीपुरुषयुग्में । मिळती तेथ जन्में । [जगत्] आघवें जग ॥ ३१० ॥ आणि जें जें अभिलाषें । स्वार्थालागीं पोषे । पाठीं परस्पर द्वेषें । कामचि नाशी ॥ ११ ॥ एवं कामावांचूनि कांहीं । जगा मूळचि आन नाहीं । ऐसें बोलती पाहीं । आसुर गा ते ॥ १२ ॥ आतां असो हें किर्डाळ । बोलीं न करूं पघळ । सांगतांचि सफोल । होतसे वाचा ॥ १३ ॥

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ।
प्रभवंत्युग्रकर्माणः क्षयाय जगतो हिताः ॥ ९ ॥

[एतां दृष्टिमवष्टभ्य] आणि ईश्वराचिया खंती । नुसधियाचि करिती चोंथी । हेंही नाहीं चित्तीं । निश्चय एक ॥ १४ ॥ [अल्पबुद्धयः] किंबहुना उघड ।

---

* कें वेगळें. † दुखें.

---

१ न्याय, अन्याय. २ नरक भोगानें. ३ सुखानें. ४ मूर्तीत. ५ बळानें. ६ एकवट झालेलें. ७ न भोगवे. ८ दुःखेंवीण. ९ पाप. १० मत्स्यांला. ११ विधीनें. १२ आवडीनें. १३ व्यभिचार. १४ परलोकीं. १५ मरे. १६ संतोष मानी. १७ आसक्ती, मनोरथ. १८ खोटें. १९ व्यर्थ. २० खेद. २१ बडबड. २२ खेद व बडबड करणें एवढेंच आहे काय? पण तेंही नाहीं. कोणाचा एक निश्चय देखील नाहीं.

आंगीं लाऊनियां पाखंड । नास्तिकपणाचें हाड । रोंविलें जीवीं ॥ १५ ॥ ते वेळीं स्वर्गालागीं आदर । कां नरकाचा अडदर । या वासनांचा अंकुर । जळोनि गेला ॥ १६ ॥ [नष्टात्मानः] मग केवळ ये देहखोडां । अमेध्योदकाचा बुडबुडा । विषयपंकीं सुंहाडा । बुडालेगा ॥ १७ ॥ [प्रभवंत्युग्रकर्माण इति] जैं आटावे होती जळचर । तैं डोहीं मिळती ढीवर । कां पडावें होय शरीर । तैं रोगां उदय ॥ १८ ॥ उदैजणें केतूचें जैसें । विश्वा *अनिष्टोद्देशें । जन्मती ते तैसे । लोकां आटूं ॥ १९ ॥ विरूढलिया अशुभ । फुटती तैं ते कोंभ । पापाचे कीर्तिस्तंभ । चालते ते ॥ ३२० ॥ आणि मागां पुढां जाळणें । वांचूनि आगी कांहीं नेणे । तैसें विरुद्धचि एक करणें । भलतेयां ॥ २१ ॥ परि तेंचि गा करणें । आदरिती संभ्रमें जेणें । तो आईक पार्था ह्मणे । श्रीनिवास ॥२२॥

काममाश्रित्य दुष्पूरं दंभमानमदान्विताः ।
मोहाद्गृहीत्वाऽसद्ग्राहान्प्रवर्ततेऽशुचिव्रताः ॥ १० ॥

[काममाश्रित्य दुष्पूरं] तरि जाळ पाणियें न भरे । आगी इंधनें न पुरे । तयां दुर्भरांचिये धुरे । भुकाळु जो ॥ २३ ॥ तया कामाचा वोलावा । जीवीं धरूनि पांडवा । [दंभमानमदान्विताः] दंभमानाचा मेळावा । मेळविती ॥ २४ ॥ मातलिया कुंजरा । आगळी जाली मदिरा । तैसा मदाचा ताठा तंव जरा । चढतां आंगीं ॥ २५ ॥ [मोहाद्गृहीत्वा] आणि आग्रहा तोचि ठावो । वरि मौळ्या ऐसा सांवावो । मग काय वानूं निर्वाहो । निश्चयाचा ॥ २६ ॥ [असद्ग्राहान्] जिहीं परोपतापु घडे । परावा जीवु रगडे । तिहीं कर्मीं होउनि गाढे । जन्मवृत्ती ॥ २७ ॥ [प्रवर्तते] मग आपुलें केलें फोकारिती । आणि जगातें धिक्कारिती । दाहीदिशीं पसरिती । स्वहाजाळ ॥ २८ ॥ [अशुचिव्रताः] ऐसेनि गा आटोपें । थोरिये आणिती पापें । धर्मधेनू †खुरपें । सुटलें जैसें ॥ २९ ॥

चिंतामपरिमेयां च प्रलयांतामुपाश्रिताः ।
कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ॥ ११ ॥

[चिंतां] याचि येका आयती । तयाचिया कर्मप्रवृत्ती । आणि जिणियांही परौती । वाहती चिंता ॥ ३३० ॥ [अपरिमेयां च] पाताळाहूनि निम्नें ।

* अनिष्टाच्या दोषें. † खरपें । सुदेले जैसे.

१ भय. २ देहरूप खोड्यामध्यें. ३ अपवित्र जलाचा. ४ मुहृदा अर्जुना. ५ मारावे अशी ईश्वरीच्छा होते. ६ कोळी. ७ अकल्याणार्थ. ८ नाशास्तव. ९ समारंभानें. १० जाळें. ११ काष्टांनीं. १२ बांबूच्या अग्रभागीं. १३ जिव्हाळा. १४ सहाय, मदत. १५ दुसऱ्यास ताप. १६ अन्याचा. १७ प्रसिद्ध करिती. १८ इच्छेचें जाळें. १९ उंचदशेस. २० हरळीमध्यें. २१ साधनानें. २२ जीवापलीकडील. २३ खोल.

जियेचिये[1] उंचिये सानें गगन । जे पाहातां त्रिभुवन । अणुही नोहे ॥ ३१ ॥ [प्रलयांतामुपाश्रिताः] ते योगपटाची[2] मेवणी[3] । जीवीं अनियम चिंतवणी । जे सांडूं नेणें मरणीं । वल्लभा[4] जैसी ॥ ३२ ॥ तैसी चिंता अपार । वाढविती निरंतर । [कामोपभोगपरमाः] जीवीं सूनि[5] असार । विषयादिक ॥ ३३ ॥ स्त्रिया गाइलें आइकावें । स्त्रीरूप डोळां देखावें । सर्वेंद्रियें *आलिंगावें । स्त्रियेतेंचि ॥ ३४ ॥ कुरवंडी कीजे अमृतें । [एतावदिति निश्चिताः] ऐसें सुख स्त्रियेपरौतें । नाहींचि ह्मणौनि चित्तें । निश्चय केला ॥ ३५ ॥ मग तयाचि स्त्रीभोगा- । लागीं पाताळ स्वर्गा । धांवती दिग्विभागा । परौतेही ॥ ३६ ॥

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।
ईहंते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥ १२ ॥

[आशापाशशतैर्बद्धाः] आमिषकवळु[6] थोरी आशा । न विचारितां गिळी मासा । तैसें कीजे विषयाशा । तयांसि गा ॥ ३७ ॥ वांछित तंव न पवती । मग कोरडियेचि आशेची संतती । वाढऊं वाढऊं होती । कोशकिडे[7] ॥ ३८ ॥ [कामक्रोधपरायणाः] आणि पसरिला अभिलाष । अपूर्व[8] होय तोचि द्वेष । एवं काम क्रोधाहूनि अधिक । पुरुषार्थ नाहीं ॥ ३९ ॥ †दिहा[9] खोलिणें[10] रात्री जागोवा[11] । ठाणांतरिया[12] जैसा पांडवा । अहोरात्रिही विसावा । भेटेचिना ॥ ३४० ॥ तैसें उंचौनि लोटिलें कामें । ‡नेहटती[13] क्रोधाचिये[14] ढिमें । तरी रागद्वेष प्रेमें । न माती केंही ॥ ४१ ॥ [ईहंते कामभोगार्थं] तेविंचि जीवीं- चिया हांवा । विषयवासनांचा मेळावा । केला परी तो भोगावा । अर्थें कीं ना ॥ ४२ ॥ ह्मणोनि भोगावया जोगा । पुरता अर्थ पैं गा । आणावया जगा । झोंबती सैरा[15] ॥ ४३ ॥ [अन्यायेनार्थसंचयान्] एकातें साधूनि मारिती । एकाचीं सर्वस्वें हरिती । एकालागीं उभारिती[16] । अपाययंत्रें[17] ॥ ४४ ॥ पाशिकें[18] पोतीं वागुरा[19] । सुंणी[20] ससाणे चिकाटी[21] खोंचारा[22] । धेऊनि निघती डोंगरा । पारधी जैसे ॥ ४५ ॥ ते पोसावया पोट । मारूनि प्राणियांचे संघाट[23] । आ- णिती ऐसें निकृष्ट । तेंही करीती ॥ ४६ ॥ परप्राणघातें । मेळविती वित्तें । मिळाल्या चित्तें । तोषणें कैसें ॥ ४७ ॥

इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।
इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥ १३ ॥

[इदमद्य मया लब्धं] ह्मणे आजि मियां । संपत्ती बहुतेकांचिया । आपुल्या

---

* आश्लेषावें. † दिवसा. ‡ निहटती.

१ ज्या चिंतेला. २ योगबलानें रिद्धिसिद्ध्यादिक अधिकाराच्या. ३ निस्सीम आशेची धांव, मोजणी. ४ स्त्री. ५ घालून. ६ दिशांच्या सीमांबाहेर. ७ मांसाचे गोळे. ८ कोसले नांवाचे किडे. ९ दिवसा. १० मुक्तद्वार. ११ जागृति. १२ देवडीवाला. १३ आदळती. १४ टेंकडीवर. १५ यथेच्छ, हवेतसे. १६ उभी करितात, उपासिती. १७ नाशाच्या युक्ती. १८ पाश. १९ जाळें. २० शिकारी कुत्रीं. २१ चिकटण्या. २२ भाले. २३ समुदाय.

हातीं केलिया । धन्य ना मी ॥ ४८ ॥ [इमं प्राप्स्ये मनोरथं] ऐसा श्लाघों जंव जाये । तंव मन आणीकही वाहे । सवेंचि ह्मणे पाहे । आणिकांचेंही आणूं ॥ ४९ ॥ [इदमस्तीदमिति] हें जेतुलें असे जोडिलें । तयाचेनि भांडवलें । लाभा घेईन उरलें । चराचर हें ॥ ३५० ॥ ऐसेनि धना विश्वाचिया । मीचि होईन स्वामिया । मग दिठी पडे तया । उरों नेदीं ॥ ५१ ॥

असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी ॥ १४ ॥

[असौ मया हतः शत्रुः] हे मारिले वैरी थोडे । [हनिष्ये चापरानपि] आणीकही साधीन गाढे । मग नांदेन पवाडें । येकलाचि मी ॥ ५२ ॥ [ईश्वरोऽहमहं भोगी] मग माझीं होतील कामारीं । तियेंवांचूनि येरें मारीं । किंबहुना चराचरीं । ईश्वर तो मी ॥ ५३ ॥ मी भोगभूमीचा रावो । आजि सर्वसुखासी ठावो । ह्मणोनि इंद्रही वावो । *मातें पाहूनि ॥ ५४ ॥ [सिद्धोऽहं] मी मनें वाचा देहें । करीं तें कैसें नोहे । कें मजवांचूनि आहे । आज्ञासिद्ध आन ॥ ५५ ॥ [बलवान्सुखी] तंवचि बळिया काळ । जंव न दिसें मीं अतुर्बळ । सुखाचा कीर निखिळ । रासिवा मींचि ॥ ५६ ॥

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ।
यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥ १५ ॥

[आढ्यः] कुबेर आथिला होये । परी तो नेणे माझी सोये । संपत्ती मजसम नव्हे । श्रीनाथाही ॥ ५७ ॥ [अभिजनवानस्मि] माझिया कुळाचा उजाळु । कां जातीगोतांचा मेळु । पाहातां ब्रह्माही हळु । उणाचि दिसे ॥ ५८ ॥ [कोन्योऽस्ति सदृशो मया] ह्मणोनि मिरविती नांवें । वायां ईश्वरादि आघवे । नाहीं मजसीं सरी पावे । ऐसें कोण्ही ॥ ५९ ॥ [यक्ष्ये] आतां लोपला अभिचार । त्याचा करीन मी जीर्णोद्धार । प्रतिष्ठीन परमार । यागवरि ॥३६०॥ [दास्यामि] मातें गाती वानिती । नटनाचें रिझविती । तयां देईन मागती । ते ते वस्तु ॥ ६१ ॥ [मोदिष्ये] मांजिरा अन्नपानीं । प्रमदांच्या आलिंगनीं । मी होईन त्रिभुवनीं । आनंदाकार ॥ ६२ ॥ [इत्यज्ञानविमोहिताः] काय बहु सांगों ऐसे । ते आसुरीप्रकृती पिसे । तुरंबिती असोसें । गगनौळें तियें ॥६३॥

---

* मजपासून.

---

१ स्तवन करूं. २ मारीन. ३ लौकिकानें. ४ सेवक. ५ व्यर्थ. ६ महाबळवान. ७ राशी. ८ संपन्न. ९ विष्णूला. १० नांवलौकिक. ११ नीच, हलका. १२ जारणमारणादि. १३ परपीडा. १४ वर्णिती. १५ संतोषविती. १६ माजलेला, मद्य, उन्मत्त. १७ भूषिती, वास घेती. १८ अपरमित इच्छेनें. १९ आकाशपुष्प.

अनेकचित्तविभ्रांता मोहजालसमावृताः ।
प्रसक्ताः कामभोगेषु पतंति नरकेऽशुचौ ॥ १६ ॥

[अनेकचित्तविभ्रांताः] ज्वराचेनि आटोपें । रोगी भलतैसें जल्पे[1] । चावळती[2] संकल्पें । जाण ते तैसे ॥ ६४ ॥ अज्ञाना आतुले[3] धुळी । झणौनि आशा वाहटुळी[4] । भोवंडीजती अंतराळीं । मनोरथांच्या ॥६५॥ अनियम आषाढ मेघ । कां समुद्रोर्मी अभंग । तैसे कामिती[5] अनेग । अखंड काम ॥ ६६ ॥ [मोहजालसमावृताः] मग पैं कामनाचि तया । जिवीं जाल्या वेलरिया[6] । वोरपिलीं[7] कांटिया । कमळें जैसीं ॥६७॥ कां पाषाणाचिया माथां । हांडी फुटली पार्था । जीवीं तैसे सर्वथा । कुटके जाले ॥ ६८ ॥ तेव्हां चढतीये *रयणीं[8] । तमाची होय पुरवणी[9] । तैसा मोह अंतःकरणीं । वाढोंचि लागे ॥६९॥ [प्रसक्ताः कामभोगेषु] आणि वाढे जंव जंव मोहो । तंव तंव विषयीं रोहो[10] । विषय तेथ ठावो । पातकासी ॥ ३७० ॥ पापें आपलेनि थोंवें[11] । जंव करिती मेळावे । तंव जितांचि आघवे । येती नरक ॥७१॥ [पतंति नरकेऽशुचौ] झणौनि गा सुमती । †जे कुमनोरथां पाळिती । ते आसुर येती वस्ती । तया ठाया ॥७२॥ जेथ असिपत्र[12] तरुवर । खदिरांगाराचे डोंगर । तातला तेलीं सागर । उततातीं ॥ ७३ ॥ जेथ यातनांची श्रेणी । हे नित्य नवी यमजाचणी । पडती तिये दारुणीं । नरकलोकीं ॥ ७४ ॥ ऐसे नरकाचिये सेले[13] । भागीं ‡जे जे जन्मले । तेही देखों भुलले । यजिती यागीं ॥ ७५ ॥ येऱ्हवीं यागादिक क्रिया । आहाणतेचि[14] धनंजया । परि विफळती[15] आचरोनियां । नाटकी जैसे ॥ ७६ ॥ वल्लभाचिया उजरिया[16] । आपणयाप्रति कुस्त्रिया । जोडोनि तोषिती जैसिया । अहेवपणें[17] ॥ ७७ ॥

आत्मसंभाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः ।
यजंते नामयज्ञैस्ते दंभेनाऽविधिपूर्वकम् ॥ १७ ॥

[आत्मसंभाविताः] तैसें आपणयां आपण । मानितां महंतपण । फुगती असाधारण । गर्वें तेणें ॥ ७८ ॥ [स्तब्धाः] मग लवों नेणती कैसे । आटिवां लोहाचे खांब जैसे । कां उंधवले[18] आकाशें । शिळाराशी[19] ॥ ७९ ॥ तैसे आपुलिये बरवे । आपणचि रिझेतां[20] जीवें । तृणाहीहूनी आघवें । मानिती नीच ॥ ३८० ॥ [धनमानमदान्विताः] वरि धनाचिया मदिरा । माजूनि धनुर्धरा । कृत्याकृत्यविचारा । सांवतें[21] केलें ॥ ८१ ॥ जया आंगीं आंयती[22] ऐसी । तेथ

* रजनी. † या कुमनोरथां. ‡ ते जन्मले । आणि ते.

१ बडबडे. २ बरळती. ३ प्रात झाले. ४ वावटळ. ५ इच्छिती. ६ मनोरथांनीं. ७ वेलीच्या जाळ्या. ८ ओरबडलीं. ९ रात्र. १० वृद्धि. ११ बळानें, ठिकाणीं. १२ तरवारीसारख्या पानांचे. १३ तापलेल्या. १४ वांटा. १५ हानि. १६ व्यर्थ करिती. १७ आश्रयानें. १८ सौभाग्यानें. १९ उंचलले. २० पर्वत. २१ संतोषतां. २२ वैरी, वेगळें केलें. २३ सामग्री.

यज्ञाची गोठी कायसी । तरि काय काय पिसीं । न करिती गा ॥ ८२ ॥ ह्य-
णौनि कोणे येके वेळे । मौढ्यमद्याचेनि बळें । [यजंते नामयज्ञैः] यागाचींही
[1]टवाळें । आदरिती ॥ ८३ ॥ ना कुंड मंडप वेदी । ना उचित साधनसमृद्धी ।
[ते अविधिपूर्वकं] आणि तयांसी तंव विधि । द्वंद्वेंचि सदा ॥ ८४ ॥ देवां ब्राह्म-
णांचेनि नांवें । आड [3]वैरेनहि नोहावें । ऐसें आथी तेथ यावें । लागे कवणा
॥ ८५ ॥ [दंभेन] पैं [4]वासरुवाचा भोकैसा । गाईपुढें ठेऊनि जैसा । [5]उगाणा
घेती क्षीररसा । बुद्धिवंत ॥८६॥ तैसें यागाचेनि नांवें । जग *[6]वाउनि हांवे ।
नागविती आघवें । अहेरावारीं ॥ ८७ ॥ †ऐशा कांहीं आपुलिया । होमिती
जें उजरिया । तेणें कामिती प्राणियां । सर्वनाश ॥ ८८ ॥

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ।
मामात्मपरदेहेषु प्रद्विषंतोऽभ्यसूयकाः ॥ १८ ॥

[अहंकारं] मग पुढां भेरी निशाण । लाउनी ते दीक्षितपण । जगीं फोकां-
रिती ‡आपण । [7]वांवो वावो ॥ ८९ ॥ तेव्हां महत्त्वें तेणें अधमा । गर्वा चढे
महिमा । जैसे [11]लेवे दिधले तमा । काजळाचे ॥ ३९० ॥ तैसें मौढ्य [12]घणावें ।
[13]औद्धत्य उंचावे । अहंकार दुणावे । अविवेकही ॥ ९१ ॥ [बलं] मग दुजयाची
भाष । नुरवावया निःशेष । बळियेपणा अधिक । होय बळ ॥ ९२ ॥ ऐसा
अहंकार बळा । जालया [14]येकवळा । [दर्पं] दर्पसागर मर्यादवेळा । सांडूनि
[15]उते ॥ ९३ ॥ मग [16]वोसंडलेनि दर्पें । [कामं क्रोधं च] कामाही पित्त [17]कुरुपे ।
तया [18]धगीं सैंध [19]पळिपे । क्रोधाग्नि तो ॥ ९४ ॥ [संश्रिताः] तेथ उन्हाळां
आगी खरमरा । तेला तुपाचिया कोठारा । लागला आणि वारा । सुटला
जैसा ॥ ९५ ॥ तैसा अहंकार बळा आला । दर्प कामक्रोधीं गूढला । या दों-
हींचा मेळ जाला । जयांच्या ठायीं ॥ ९६ ॥ [मामात्मपरदेहेषु प्रद्विषंतः] ते आपु-
लिया सवेशा [21]। मग कोणी कोणी हिंसा । या प्राणियांतें वीरेशा । न साधिती
गा ॥ ९७ ॥ पहिलें तंव धनुर्धरा । आपुलिया मांसरुधिरा । [22]वेंचें करिती
[23]अभिचारा । लागोनियां ॥ ९८ ॥ तेथ जाळिती जियें देहें । यामाजि जो मीं
आहें । तया आत्मया मज घाये । वाजती ते ॥ ९९ ॥ आणि [23]अभिचारकीं
तिहीं । उपद्रविजे जेतुलें कांहीं । तेथ चैतन्य मी पाहीं । सीण पावे ॥ ४०० ॥
[अभ्यसूयकाः] आणि अभिचारावेगळें । विषयीं [24]जें [25]अवेगळे । तया टाकिती

---

* वाहऊनि. † ऐशा कामीं. ‡ आण.

---

१ टवाळक्या. २ वैमनस्य. ३ वाऱ्यानें. ४ वासराचा. ५ पेंढा भरून जनावराचा कृतिम केलेला पांजरा. ६ झाडा. ७ वेधून-लोभानें. ८ उत्कर्षासाठीं. ९ प्रगट करिती. १० व्यर्थ व्यर्थ, वाहून वाहून. ११ लेप. १२ दृढ होतें. १३ उद्धटपणा. १४ ऐक्य. १५ वाहूं लागतो, भरे. १६ अतिशयित भरून वाहाणाऱ्या. १७ प्रकोप पावे. १८ उवाऱ्यानें. १९ अनिवार. २० पेटे. २१ स्वेच्छा. २२ खर्च. २३ जारणादि प्रयोगासाठीं. २४ क्वचित्. २५ प्राप्त झाले.

इटाळें[1]। पैशुन्याचीं ॥ १ ॥ सती आणि सत्पुरुख। दानशीळ याज्ञिक। तपस्वी अलौकिक। संन्यासी जे ॥ २ ॥ कां भक्त हन महात्मे। इयें माझीं निजांचीं धामें[2]। निर्वाळलीं[3] होमधर्में। श्रौतादिकीं ॥ ३ ॥ तयां द्वेषाचेनि काळकूटें। बासटोनि[4] तिखटें। कुबोलांचीं सेदटें[5]। सूति कौंडें[6] ॥ ४ ॥

तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान्।
क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥ १९ ॥

[तानहं] ऐसे आघवाचि परी। प्रवर्तले माझ्या वैरीं। तया पापियां जें मी करीं। तें आइक पां ॥ ५ ॥ [द्विषतः] तरी मनुष्यदेहाचा तागा। घेऊनि रुसती[7] जे जगा। ते पदवी हिरोनि पैं गा। ऐसे ठेवीं ॥ ६ ॥ जे क्लेशगांवींचा उकरडा। भवपुरीचा पांनवडा[8]। ते तमोयोनी[9] तयां मूढां। वृत्तिचि दें ॥ ७ ॥ [क्रूरान्] मग आहाराचेनि नांवें। तृणही जेथ नुगवे। ते व्याघ्र वृश्चिक आंडवे[10]। तैसीये करी ॥ ८ ॥ [संसारेषु] तेथ क्षुधादुःखें बहुतें। तोडूनि खाती आपणयातें। मरमारों मागुते। होतचि असती ॥ ९ ॥ [अशुभान्] कां आपला गरळजाळीं। *जाळिती[11] आंगाची पेंदळी[12]। ते सर्पचि करीं बिळीं। निरुंधला[13] ॥ ४१० ॥ [नराधमान्] परी घेतला श्वास घापे[14]। येतुलेनही मापें[15]। विसांवा तयां नाटोपे। दुर्जनासी ॥ ११ ॥ [क्षिपाम्यजस्रं] ऐसेनि कल्पांचिया कोडी। गणितांही संख्या थोडी। तेतुला वेळ न काढीं। क्लेशौनि तयां ॥ १२ ॥ [आसुरीष्वेव योनिषु] तरि तयांसी जेथ जाणें। तेथिंचें हें पहिलें पेणें[16]। ते पावोनि येरें दारुणें। न होती दुःखें ॥ १३ ॥

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि।
मामप्राप्यैव कौंतेय ततो यांत्यधमां गतिम् ॥ २० ॥

[आसुरीं] हाठायवरी[17] जेथी। संपत्ती ते आसुरी। अधोगति अवधारीं। जोडिली तिहीं ॥ १४ ॥ [योनिमापन्नाः] पाठीं व्याघ्रादि तामसा। योनी तो अळुमाळ[18] ऐसा। देहाधाराचा उसासा[19]। आथी जोही ॥ १५ ॥ [मूढाः] तोही मी वोल्हावा हिरें। मग तमचि होती एकसरें। जेथ गेलें आंधारें। कोंळवंडेजे[20] ॥ १६ ॥ [जन्मनि जन्मनि] जयांची पापा चिळसी[21]। नरक घेती †विवसी। शीण जाय मूर्छी। शिणें जेणें ॥ १७ ॥ मळ जेणें मैळे। ताप जेणें पोळे।

---

* जाळीत. † विशेषीं.

---

१ कोलितें. २ आवडतीं, मनाचीं. ३ निर्मळ केलीं. ४ माखून. ५ वळकट. ६ टोंचतात, घालिती. ७ बाण. ८ दोरा, खटारा. ९ जगापासून खिन्न होती. १० पाणवाट. ११ मूढयोनि–वृक्षादि. १२ अरण्यवासी. १३ त्वचा, पुष्टि. १४ संकोचला. १५ टाकावयास. १६ मुक्काम. १७ थोडासा, किंचित्. १८ स्वस्थता. १९ काळोख करणारे काळानें. २० कंटाळा. २१ भयें.

जयाचेनि नांवें [१]सळे । महाभय ॥ १८ ॥ पापा जयाचा कंटाळा । उपजे अमंगळ अमंगळा । विटाळही विटाळा । [२]बिहे जया ॥ १९ ॥ [ततो यांत्यधमां गतिं] ऐसे विश्वाच या वोखटेयाँ । अधम जे धनंजया । ते ते होती भोगूनियां । तामसा योनी ॥ ४२० ॥ [मामप्राप्यैव कौंतेय] अहा सांगतां वाचा रडे । आठवितां मन [४]खिरडे । कटिरे मूर्खीं केवढे । जोडले निरय ॥ २१ ॥ कायिसया ते आसुर । संपत्ति पोषिती वाउर । जिया दिधलें घोर । पतन ऐसें ॥ २२ ॥ ह्मणौनि तुवां धनुर्धरा । नोहावें गा तिया मोहरा । जेउता वास आसुरा । संपत्तिवंता ॥ २३ ॥ आणि दंभादिदोष साही । हे संपूर्ण जयांच्याठायीं । ते त्यजावे हें काई । ह्मणों कीर ॥ २४ ॥

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ २१ ॥

[त्रिविधं] परि काम क्रोध लोभ । या तिहींचेंचि *थोंबें । थांवे तेथें अशुभ । पिकलें जाण ॥ २५ ॥ [नरकस्येदं] सर्वदुःखा आपुलिया । [९]दर्शना धनंजया । [१०]पांढाऊ हे भलतया । †दिधले आहाती ॥ २६ ॥ कां पापियां नरकभोगीं । [१२]सुवावयालागीं जगीं । पातकांची [१३]दांटुगी । सभाचि हे ॥ २७ ॥ ते रौरव गा तंवचि वरी । आइकिजती [१५]पाटांतरीं । जंव हे तिन्ही अंतरीं । उठती ना ॥ २८ ॥ अपाय तिहीं [१७]आंशलुग । यातना इहीं सवंग । हाणी हाणी नोहे हे तिघ । हेचि हाणी ॥ २९ ॥ [द्वारं] काय बहु बोलूं सुभटा । सांगीतलिया निकृष्टा । नरकाचा [१९]दारवंटा । ‡त्रिशंकु हा ॥ ४३० ॥ [नाशनमात्मनः] या कामक्रोधलोभां- । माजि जीवें जो होय [२०]उभा । तो निरयपुरींची सभा । §येथ पावे ॥ ३१ ॥ [कामेति] ह्मणौनि पुढतपुढती किरीटी । हे कामादिदोषत्रिपुटी । त्यजावीचि गा वोखटी । आघवाविषयीं ॥ ३२ ॥

एतैर्विमुक्तः कौंतेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ।
आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥ २२ ॥

[एतैर्विमुक्तः कौंतेय] धर्मादिकां चौंहीआंत । पुरुषार्थांची तैंचि मात । करावी जैं संघात । सांडील हा ॥३३॥ हे तिन्ही जीवीं जंव जागती । तंववरी निकियांची [२१]प्राप्ती । हे माझे कान नाइकती । देवही ह्मणे ॥ ३४ ॥ जया आ[२१]पैंपें पढिये । आत्मनाशा जो बिहे । तेणें न धरावी हे सोये । सावध हो-

* स्तोभ. † दिनले. ‡ त्रिधातु. § सन्मान पावे.

१ भिये. २ भीति पावे. ३ निकृष्ट, नाशास्तव. ४ मार्गे सरे. ५ हायरे हाय. ६ वावगी, वाईट. ७ मार्गी. ८ जेथें. ९ बंड, प्रतिष्ठा. १० दाखविण्यास, अनुभवास. ११ वाटाडे, बोधक. १२ घालावया. १३ बलाढ्य. १४ परोक्षत्वें. १५ सोपे. १६ दरवाजा. १७ तीन खिळे मारलेला. १८ उद्युक्त, अनुकूळ. १९ कल्याणाची. २० स्वतःविषयींचें प्रेम. २१ मार्ग.

इजे ॥ ३५ ॥ पोटीं बांधोनि पाषाण । समुद्रीं बाहीं आंगवण । कां जियावया जेवण । काळकूटाचें ॥ ३६ ॥ इहीं कामक्रोधलोभेंसी । कार्यसिद्धि जाण तैसी । ह्मणोनि ठावोचि पुसीं । ययांचा गा ॥ ३७ ॥ [तमोद्वारैस्त्रिभिर्नरः] जैं कहीं अवचटें । हे तिकडी सांखळ तुटे । तैं सुखें आपलिये वाटे । चालों लाभे ॥ ३८ ॥ त्रिदोषीं सांडिलें शरीर । त्रिकुटीं फिटलिया नगर । *त्रिदाह निमालिया अंतर । जैसें होय ॥ ३९ ॥ तैसा कामादिकीं तिघीं । सांडिला सुख पावोनि जगीं । [आचरत्यात्मनः श्रेयः] संग लाहे मोक्षमार्गीं । सज्जनाचा ॥ ४४० ॥ मग सत्संगें प्रबळें । सच्छास्त्राचेनि बळें । जन्ममृत्यूचीं निमोळें । निस्तरे रानें ॥४१॥ [ततो याति परां गतिं] ते वेळीं आत्मानंदें आघवें । जें सदा वसतें बरवें । तें तैसेंचि पैंटण पावे । गुरुकृपेचें ॥ ४२ ॥ तेथ प्रियाची †परमसीमा । तो भेटे माउली आत्मा । तये खेवीं आटे डिंडिमां । सांसारिक हे ॥ ४३ ॥ ऐसा जो कामक्रोधलोभां । झाडी करूनि ठाके उभा । तोचि येवढिया लाभा । गोसावी होय ॥ ४४ ॥

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ २३॥

[यः] ना हें नावडोनि कांहीं । कामादिकांच्याचिठायीं । दोंटिली जेणें डोई । आत्मचोरें ॥ ४५ ॥ [शास्त्रविधिमुत्सृज्य] जो जगीं समान सकृप । हिताहित दाविता दीप । तो अमान्य केला बापु । वेद जेणें ॥ ४६ ॥ न धरीचि विधीची भीड । न करीचि औपली चाड । [वर्तते कामकारतः] वाढवीत गेला कोड । इंद्रियांचें ॥ ४७ ॥ कामक्रोधलोभांची कास । न सोडीच पाळिली भोष । ‡स्वैराचाराचें असोस । वेळघला रान ॥ ४८ ॥ [न स सिद्धिमवाप्नोति] तो सुटकेचिया वाहिणीं । मग पिवों न लाहे पाणी । स्वप्नींही §ते सुखकाहाणी । दूरीचि तया ॥ ४९ ॥ आणि परत्र तंव जाये । हें कीर तया आहे । [न सुखं] परी ऐहिकही न लाहे । भोग भोगूं ॥ ४५० ॥ तरि माशालागीं भुलला । ब्राह्मण पाणबुडा रिघाला । कीं तेथही पावला । नास्तिकवाद ॥ ५१ ॥ [न परां गतिं] तैसें विषयांचेनि कोडें । जेणें परत्रा केलें उंबडें । तंव तोचिआणिकीकडे । मरणें नेला ॥ ५२ ॥ एवं परत्र ना स्वर्ग । ना ऐहि-

---

* त्रिदाघ. † पैल सीमा. ‡ खैराचारें. § ते काहाणी.

---

१ बाहुशक्ति, सामर्थ्य. २ पुसून टाक. ३ चाहाडी, चोरी व शिंदळकी यांनीं. ४ त्रिविध ताप. ५ खचरट. ६ उल्लंघी. ७ नगर. ८ आवडत्याची. ९ त्या क्षणीं. १० डंका व गलबल. ११ झाडा. १२ घातली. १३ आत्मप्राप्तीची इच्छा. १४ शपथ. १५ विचारस्वातंत्र्यानें, स्वेच्छा आचरणाचें. १६ अतिशयेंकरून. १७ लंपट झाला, वेंधला. १८ नदींत, मार्गात. १९ कोळ्याच्या जातींत. २० उपडें.

कही विषयभोग । तेथ केउता[1] प्रसंग । मोक्षाचा तो ॥ ५३ ॥ ह्मणौनि कामाचेनि बळें । जो विषय सेऊं पाहे सळें[2] । तया विषय ना स्वर्ग मिळे । ना उद्धरे तो ॥ ५४ ॥

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥ २४ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरसंपद्विभागयोगो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

[तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते] याकारणें पैं बापा । जया आथी आपली कृपा । तेणें वेदांचिया निरोपा । आंन[3] न कीजे ॥ ५५ ॥ पतीचिया मता । अनुसरोनि पतिव्रता । अनायासें आत्महिता । भेटेचि ते ॥ ५६ ॥ ना तरी श्रीगुरुवचना । दिठी देतु जतना । शिष्य आत्मभुवना- । माजि पैसे[4] ॥ ५७ ॥ हें असो आपुला ठेवा । हाता आथी जरी यावा । तरी आदरें जेविं दिवा । पुढां कीजे ॥ ५८ ॥ तैसा अशेषांही पुरुषार्था । जो गोसांवी हो ह्मणे पार्था । तेणें श्रुतिस्मृती माथां । बैसणें घापे[5] ॥ ५९ ॥ [कार्याकार्यव्यवस्थितौ] शास्त्र ह्मणेंक जें सांडावें । तें राज्यही तृण मानावें । जें *घेववी तें न ह्मणावें । विषही †विरुं[6] ॥ ४६० ॥ ऐसिया वेदैकनिष्ठा । जालिया जरी सुभटा । तरि कें आहे अनिष्टा । भेटणें गा ॥६१॥ पैं अहितापासूनि काढिती । हित देउनी वाढविती । नाहीं श्रुतीपरौती । माउली जगा ॥ ६२ ॥ [ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं] ह्मणौनि ब्रह्मेसीं मेळवी । तंव हे कोण्हे न सांडावी । अगा ‡तुवांही ऐसी भजावी । विशेषेंसी ॥ ६३ ॥ जे आजि अर्जुना तूं येथें । करावया सत्य शास्त्रें सौर्थें[7] । जन्मलासि बळार्थें[8] । धर्माचेनि ॥६४॥ आणि धर्मानुज हें ऐसें । ओघेंचि आलें अपैसें । ह्मणौनि अनारिसें[9] । करूं नये ॥ ६५ ॥ कार्याकार्यविवेकीं । शास्त्रेंचि करावीं पारखीं[10] । अकृत्य तें कुडें लोकीं । वाळावें[11] गा ॥ ६६ ॥ [कर्म कर्तुमिहार्हसि] मग कृत्यपणें खरें निगे । तें तुवां आपलेनि आंगें । आचरोनि आदरें चांगें । सारावें गा ॥ ६७ ॥ जे विश्वप्रामाण्याची[12] मुदी । आजि तुझ्या हातीं असे सुबुद्धी । लोकसंग्रहासि त्रिशुद्धी । योग्य

---

* घेववील. † विरुद्ध. ‡ तूंही.

१ कसचा. २ बळानें. ३ अवज्ञा, अपमान. ४ पावे. ५ घालावें. ६ विरुद्ध. ७ अर्थासहित, यथार्थ. ८ धर्माचें बळ तुझ्याठायीं आहे. ९ अन्यथा. १० पारख, ओळख. ११ त्यागावें. १२ जगास प्रमाण ठेवण्यायोग्य असा शिक्का.

होसी ॥ ६८ ॥ एवं आसुरवर्ग आघवा । सांगोनि तेथींचा निगावा[1] । तोही देवें पांडवा । निरूपिला ॥ ६९ ॥ इयावरी तो पंडूचा । कुमर सद्भाव जीवींचा । पुसेल तो चैतन्याचा[2] । कानीं ऐका ॥ ४७० ॥ *संजयें व्यासाचिया निरोपा । तो वेळें[3] फेडिला तया नृपा । तैसा मीही निवृत्तिकृपा । सांगेन तुह्मां ॥ ७१ ॥ तुह्मी संत माझिया कडा । दिठीचा कराल बेंहुडा[4] । तरि तुह्मां माने येवढा । होईन मी ॥ ७२ ॥ ह्मणोनि निजें[5] अवधान । मज वोळगे[6] पसैंयदान[7] । दीजो जी सनाथ होईन । ज्ञानदेव ह्मणे ॥ ४७३ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

श्लोक २४, ओव्या ४७३.

---

* संजयो.

१ निघण्याचा प्रकार. २ जीवात्म्याचा. ३ वेळ घालविला. ४ वर्षाव. ५ मनाचें. ६ आश्रितास. ७ प्रसाद.

ज्ञानेश्वरी.

अध्याय १७ वा.

*विश्वविकासित[1] मुद्रा । जया सोडवी[0] तुझी योगनिद्रा[2] । तया नमोजी गणेंद्रा । श्रीगुरुराया ॥ १ ॥ त्रिगुण त्रिपुरीं[3] वेढिला । जीवत्वदुर्गीं[4] आडिला । तो †आत्मशंभूनें सोडविला । तुझिया स्मृती ॥ २ ॥ म्हणोनि[5] शिवेंसी कांटाळा । गुरुत्वें तूंचि[6] आगळा । तऱ्ही ‡हळु मायाजळा । माजि §तारुनि ॥ ३ ॥ जे तुझ्याविखीं मूढ । तयांलागीं तूं वक्रतुंड । ज्ञानियांसि तरी अखंड । उजूचि आहासी ॥ ४ ॥ दैविकी[7] दिठी पाहतां सानी[8] । तऱ्ही मीलनोन्मीलनीं[9] । उत्पत्ति प्रळय दोन्ही । लीलाचि करिसी ॥ ५ ॥ प्रवृत्तिकर्णांच्या[10] चाळी[11] । उठिलीं मदगंधानिळीं[12] । पूजीजसी नीळोत्पळीं[13] । जीवभृंगांच्या[14] ॥६॥ पाठीं[15] निवृत्तिकर्णतालें[16] । आंहालली[17] ते पूजा विधुळे[18] । तेव्हां मिरविसी मोकळें । आंगाचें लेणें ॥ ७ ॥ वामांगीचा लास्यविलास[19] । जो हा जगद्रूप आभास । तो तांडवमिसें कैळास[20] । दाविसी तूं ॥ ८ ॥ हें असो विस्मय दातारा । तूं होसी जयाचा सोयरा । सोइरिकेचिया व्यवहारा । मुकेचि तो ॥ ९ ॥ फेडितां बंधनाचा ठावो । तूं जगद्बंधू ऐसा भावो । धरूं वोळंगे[21] उवावो[22] । तुझाचि आंगीं ॥ १० ॥ दुजयाचेनि नांवें तया । देहही नुरेचि पैं देवराया । जेणें तूं आपणपयां । केलासि दुजा ॥ ११ ॥ तूतें करूनि[23] पुढें[24] । जे उपायीं घेती दवडे[25] । तया ठाँसी[26] बहुवें पाडें[27] । मागांचि तूं ॥ १२ ॥ जो ध्यानें[28] सूये मानसीं । तया लागीं नाहीं तूं त्याचे देशीं । ध्यानही विसरे तेणेंसीं । वोलभ[29] तुज ॥ १३ ॥ तूतें सिद्धचि जो नेणे । तो नांदे सर्वज्ञपणें । वेदांही येवढें बोलणें । नेघसी कानीं ॥ १४ ॥ मौन गा तुझें राशिनांव । आतां

* विश्वविकाशिती. † आत्मशंभू. ‡ हेळा. § तारिसी. ० २८८७

१ जगरूप प्रफुल्लित मायेची आकृति. २ योगरूप अवस्था, ध्यान. ३ तारकासुराच्या तीन पुत्रांना चतुर्मुख प्रसन्न होऊन अंतरिक्षांत त्रिपुरें बांधून दिलीं होतीं. त्या तिघांनीं सर्व त्रिभुवन त्रासवून टाकिलें होतें, देव व ऋषि विष्णूस शरण गेले व त्या सर्वांनीं शिवाचें स्मरण करून त्या त्रिपुरांच्या त्रासापासून त्रैलोक्य मुक्त करविलें. त्याप्रमाणें त्रिगुणांनीं त्रासलेला जीवात्मा सद्गुरुस्मरणेंकरून शिवानें (आत्मशंभूनें) सोडविला. (शिवलीलामृत अ० १३ पहा म्हणजे हें रूपक ध्यानांत येईल.) ४ किल्ल्यांत. ५ शिवावरोवर. ६ अधिक. ७ दैवीदृष्टि. ८ लहान. ९ उघडणें व झांकणें यांत. १० संसारिक वृत्तीच्या. ११ हालविण्यानें. १२ वायूनें. १३ जीव हेच भ्रमर त्यांनीं युक्त नीलकमलांनीं पूजिला जातोस. १४ नंतर. १५ अंतर्मुखत्व वृत्ति. १६ हालली असतां. १७ नाश पावे. १८ नृत्य क्रीडा. १९ कौशल्य, चातुर्य. २० राहे. २१ प्रसर. २२ निराळा. २३ धांवे. २४ राहसी. २५ सर्व प्रकारें. २६ घाली. २७ आवडी, प्रियत्व.

स्तोत्रीं कें बांधों हांव । दिसती तेतुली माव । भजों काई ॥ १५ ॥ दैविकें[9] सेवक हों पाहों । तरि भेदितां द्रोहाचि लाहों । ह्मणोनि आतां कांहीं नोहों । तुजलागीं जी ॥ १६ ॥ जैं सर्वथा सर्वही नोहिजे । तैं अद्वया तूतें लाहिजे । हें जाणें मी वर्म तुझें । आराध्यलिंगा[3] ॥ १७ ॥ तरि नुरोनि वेगळेपण । रसीं[3] भजिनलें लवण । तैसें नमन माझें जाण । बहु काय बोलों ॥ १८ ॥ आतां रिता कुंभ समुद्रीं रिगे । तो उचंबळत भरोनि निगे । कां दशी[4] दीप-संगें । दीपचि होय ॥१९॥ तैसा तुझिया प्रणतीं[5] । मी पूर्ण जालों श्रीनिवृत्ती । आतां आणीन व्यक्ती । गीतार्थ तो ॥ २० ॥ [अध्यायसंगतिः] तरि षोडशाध्या-यशेखीं । तिये समाप्तीच्या श्लोकीं । जो ऐसा निर्णयो निष्टंकीं[6] । ठेविला देवें ॥ २१ ॥ जे कृत्याकृत्यव्यवस्था । अनुष्ठावया पार्था । शास्त्रचि एक सर्वथा । प्रमाण तुज ॥ २२ ॥ तेथ अर्जुन मानसें । ह्मणे हें ऐसें कैसें । जे शास्त्रेंवीण नसे । सुटिका कर्मा ॥ २३ ॥ तरी तक्षकाची फडे । ठाकोनि कैं तो मणि काढे । कैं नाकींचा केश जोडे । सिंहाचिये ॥ २४ ॥ मग तेणें तो वोविजे । तरीच लेणें पाविजे । येऱ्हवीं काय असिजे । रिक्तकंठीं ॥ २५ ॥ तैसी शा-स्त्रांची मोकळी[7] । थां कैं कोण वेंटाळी[8] । एकवाक्यतेच्या फळीं । पैसिजे[9] कैं[10] ॥ २६ ॥ जालयाही एकवाक्यता । *के लाभें वेळ अनुष्ठितां । कैंचा पैसारु[11] जीविता । येतुलालिया ॥ २७ ॥ आणि शास्त्रें अर्थें देशें काळें । या चहूंही जें एकफळें[12] । तो †उपावो कें मिळे । आघवयांसी[13] ॥ २८ ॥ ह्मणौनि शास्त्राचें धडतें[14] । नोहे प्रकारें[15] बहुतें । तरि मूर्खा मुमुक्षां येथें । काय गती पां ॥ २९ ॥ हा पुसावया अभिप्राव । जो अर्जुन करी प्रस्ताव । तो सतराविया ठाव । अध्याया येथ ॥ ३० ॥ [अर्जुन उवाच—] तरि सर्वविषयीं वितृष्ण[16] । जो सकळ-कळीं प्रवीण । कृष्णाही[16] नवल कृष्ण । अर्जुनत्वें जो ॥ ३१ ॥ शौर्या जोडला आधार । जो सोमवंशाचा शृंगार[17] । सुखादि उपकार[17] । जयाची लीळा ॥ ३२ ॥ जो प्रज्ञेचाही[17] प्रियोत्तम[18] । ब्रह्मविद्येचा विश्राम । सहचर[19] मनोधर्म । देवाचा जो ॥ ३३ ॥

अर्जुन उवाच–ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजंते श्रद्धयान्विताः ।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वमाहो रजस्तमः ॥ १ ॥

तो अर्जुन ह्मणे गा तमालश्यामा[20] । इंद्रियां फावलिया[21] ब्रह्मा । तुझा बोल

---

* कां लाभे. † विपावो.

---

१ तूं देव अशा नात्यानें. २ हे आराध्यमूर्ते. ३ उदकानें. ४ वात. ५ नमस्कारेंकरून. ६ सिद्धांतीं. ७ सर्पाची. ८ अनेकत्वें मोकळेपणा. ९ शास्त्रांला. १० मार्ग सांपडे. ११ पैस, दीर्घपणा. १२ एकत्र होतें. १३ सर्वांला. १४ साधन. १५ निरिच्छ. १६ काळा नसतां. १७ बुद्धीचा. १८ आवडता. १९ समागमें असणारा. २० हे तमालपत्राप्रमाणें नीलवर्णा, हे कृष्णा. २१ प्राप्त होण्यासारखा असतां.

आह्मां । [१]साकांक्ष पैं जी ॥ ३४ ॥ जें शास्त्रेंवांचूनि आणिकें । प्राणियां स्वमोक्ष न देखे । ऐसें का *[२]कैं पखें । बोलिलासी ॥ ३५ ॥ [ये शास्त्रविधिमुत्सृज्य] तरि न मिळेचि तो देश । नव्हेचि काळा अवकाश । [३]जो करवी शास्त्राभ्यास । तोही दुरी ॥ ३६ ॥ आणि अभ्यासीं विरजिर्येा । होती जिया सामग्रिया । त्याही नाहीं आपैतिर्येा । तिये वेळीं ॥ ३७ ॥ [४]उजू नोहेचि प्राँचीन । नेदीचि प्रज्ञा संवाहन । ऐसें ठेलें [५]आपादन । शास्त्राचें जया ॥ ३८ ॥ किंबहुना शास्त्रावियिखीं । येकही न लाहातीचि [६]नखी । ह्मणुनि [७]उखिविखी । सांडिली जिहीं ॥ ३९ ॥ [यजंते श्रद्धयान्विताः] परि निर्धारूनि शास्त्रें । अर्थानुष्ठानें पवित्रें । नांदताति [८]परत्रें । साचारें जे ॥४०॥ तयां ऐसें आह्मी होआवें । ऐसी चाड बांधोनि जीवें । घेती तयांचे [९]मागावे । आचरावया ॥४१॥ धडयाचिया †आखरा । तळीं बाळ लिहे दातारा । कां पुढांसूनि ‡[१०]पेंडिकरा । [११]अक्षम चाले ॥ ४२ ॥ तैसें सर्वशास्त्रनिपुण । तयाचें जें आचरण । तेंचि करिती प्रमाण । आपलिये श्रद्धे ॥४३॥ मग शिवादिकें पूजनें । भूम्यादिकें महादानें । अग्निहोत्रादि यजनें । करिती जे श्रद्धा ॥ ४४ ॥ [तिषामिति] तयां सत्वरजतमां- । माजि कोण पुरुषोत्तमा । गति होय ते आह्मां । सांगिजो जी ॥ ४५ ॥ तंव वैकुंठपीठिचें लिंग । जो निगमपद्माचा पराग । [१२]जिये जयाचेनि हें जग । [१३]अंगच्छाया ॥ ४६ ॥ काळ सावियात्रि वाढ । §[१४]लोकोत्तर प्रौढ । अद्वितीय गूढ । आनंदघन ॥ ४७ ॥ इयें श्लाघीजती जेणें बिकें । तें जयाचे आंगीं [१५]अंसिकें । [श्रीभगवानुवाच—] तो श्रीकृष्ण स्वमुखें । बोलत असे ॥ ४८ ॥

श्रीभगवानुवाच–त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ।
सात्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु ॥२॥

ह्मणे पार्था तुझा [१६]अतिसो । ¶घेईं गा आह्मीं जाणतसों । शास्त्राभ्यासाचा [१७]ओडसो । मानितोसि कीं ॥ ४९ ॥ [श्रद्धा] नुसधियाचि श्रद्धा । झोंबों पाहसी परमपदा । तरि तैसें हें प्रबुद्धा । सोहोपें नोहे ॥ ५० ॥ श्रद्धा ह्मणीतलियासाठीं । पांतेजों नयें किरीटी । काय द्विज अंत्यजघृष्टीं । अंत्यज नोहे ॥ ५१ ॥ गंगोदक जरी जालें । तरि मद्यभांडा आलें । तें घेऊं नये कांहीं केलें । विचारीं पां ॥ ५२ ॥ चंदन होय शीतळु । परि अग्नीसी पावे मेळु । तैं हातीं धरितां जाळूं । न शके काई ॥ ५३ ॥ कां किडोंचिये आटतिये पुटीं । पडिलें

---

* कैं पक्षें. † अक्षरा. ‡ काठीकरा. § तो लोकोत्तर. ¶ हेंही गा.

---

१ आकांक्षायुक्त. २ कोणच्या पक्षानें. ३ गुरु. ४ सहाय. ५ स्वाधीन. ६ अनुकूळ. ७ पूर्वकर्म. ८ सहाय. ९ संपादन. १० युक्ति. ११ विचार, वादविवाद. १२ परलोकीं. १३ मार्ग. १४ डोळस, काठीवाला. १५ अंधळा. १६ वांचे. १७ सांवळीनें. १८ अलौकिक. १९ शक्तीनें. २० असे. २१ कल, हट्ट. २२ प्रतिबंध. २३ विश्वासूं नये. २४ अंत्यजाच्या समागमें. २५ हिणकटाच्या.

सोळें किरीटी । घेतलें चोखटासाठीं । नागवीना ॥ ५४ ॥ तैसें श्रद्धेचें देवळवाडें । आंगें कीर चोखडें । [देहिनां सा स्वभावजा] परि प्राणियाच्या पडे । विभागीं *जैं ॥ ५५ ॥ तैं प्राणिये तंव स्वभावें । अनादिमाया प्रभवें । त्रिगुणाचेचि आघवे । वळिले आहाती ॥ ५६ ॥ तेथही दोन गुण खांचती । मग एक धरी उन्नती । तैं तैसियाचि होती वृत्ती । जीवांचिया ॥ ५७ ॥ वृत्ति ऐसें मन धरिती । मना ऐसी क्रिया करिती । केलिया ऐसीं वरिती । मरोनि देहें ॥ ५८ ॥ बीज मोडे झाड होये । झाड मोडे बीजीं सामाये । ऐसेनि कल्पकोडी जाये । परी जाति †न नाशे ॥ ५९ ॥ तियापरि यियें अपारें । होत जात जन्मांतरें । त्रिगुणत्व न व्यभिचरे । प्राणियांचें ॥ ६० ॥ [त्रिविधा भवति] ह्मणुनि प्राणियांच्यापैकीं । पैंडिली श्रद्धा अवलोकीं । ते होय गुणांसारिखी । तिहीं ययां ॥ ६१ ॥ [सात्विकी] विपायें वाढे सत्व शुद्ध । तेव्हां ज्ञानासी करी ‡साध्य । परि एका दोषे वोखद । येर आहाती ॥ ६२ ॥ सत्वाचेनि आंगलगें । ते श्रद्धा मोक्षफळा रिगे । तंव रज तम उगे । कां पां राहाती ॥ ६३ ॥ [राजसी चैव] मोडोनि सत्वाची श्राये । रजोगुण आकाशें जाये । तेव्हां तेचि श्रद्धा होये । कर्मकेरसुणी ॥ ६४ ॥ [तामसी चेति तां शृणु] मग तमाची उठी आगी । तेव्हां तेचि श्रद्धा भंगी । होंलागे भोगालागीं । भलतेया ॥ ६५ ॥

सत्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ।
श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥ ३ ॥

[सत्वानुरूपा सर्वस्य] एवं सत्वरजतमा- । वेगळी श्रद्धा सुवर्मा । नाहीं गा जीवग्रामा- । माजी यया ॥ ६६ ॥ [श्रद्धा भवति भारत] ह्मणोनि श्रद्धा स्वाभाविक । असे पैं त्रिगुणात्मक । रजतमसात्विक । भेदीं इहीं ॥ ६७ ॥ [श्रद्धामयोऽयं पुरुषः] जैसें जीवनचि उदक । परि विषीं होय मारक । कां मिरयामाजि तीख । उंशीं गोड ॥ ६८ ॥ [यो यच्छ्रद्धः स एव सः] तैसा बहुवसें तमें । जो सदाचि होय निमे । तेथ श्रद्धा परिणमे । तेंचि होउनी ॥ ६९ ॥ मग काजळा आणि मसी । न दिसे विवंचना जैसी । तेवीं श्रद्धा तामसी । सिनी नाहीं ॥ ७० ॥ तैसीच राजसी जीवीं । रजोमय जाणावी । सात्विकीं आघवी । सत्वाचीच ॥ ७१ ॥ ऐसेनि हा सकळ । जगडंबर निखिळ । श्रद्धेचाचि केवळ । वोतला असे ॥ ७२ ॥ [तां शृणु इति पूर्वश्लोकस्थं पदं] परि गुणत्रयवशें । त्रिविधपणाचें लोंसें । श्रद्धे जें उठिलें असे । तें वोळख तूं ॥ ७३ ॥ तरि जाणिजे झाड फुलें । कां मानस जाणिजे बोलें । भोगें जाणिजे केलें ।

* जैसें. † न नसे. ‡ साद.

१ म्हणून. २ बुडविणार नाहीं काय. ३ समूह, स्वरूप. ४ दवती. ५ धारण करिती. ६ मध्यें. ७ प्राप्त झाली. ८ विरुद्ध. ९ आश्रय, चौकी. १० कर्म करणारी. ११ सुज्ञा. १२ जीवसमूहांत. १३ जन्मतो व मरतो. १४ वेगळी. १५ सर्व जग. १६ चिन्ह, डाग.

पूर्वजन्मींचें ॥ ७४ ॥ तैसीं जिहीं जिहीं चिन्हीं । श्रद्धेचीं रूपें तिन्हीं । देखीजतीं ते [१]वानी । अवधारीं पां ॥ ७५ ॥

यजंते सात्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ।
प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजंते तामसा जनाः ॥ ४ ॥

[यजंते सात्विका देवान्] तरि सात्विक श्रद्धा । *जयांचा होय बांधा[३] । तयां बहुत करूनि मेधा[३] । स्वर्गीं आथी ॥ ७६ ॥ ते विद्याजात[४] पढती । यज्ञक्रिये निवडती । किंबहुना पडती । देवलोकीं ॥ ७७ ॥ [यक्षरक्षांसि राजसाः] आणि श्रद्धा राजसा । घडले जे वीरेशा । ते भजती राक्षसां । खेचरां[५] हन ॥ ७८ ॥ श्रद्धा जे कां तामसी । ते मी सांगेन तुजपाशीं । जे केवळ पापराशी । अतिकर्कशी निर्दयत्वें ॥ ७९ ॥ जीववधें साधूनि बळी । भूतप्रेतकुळें मैळीं । स्मशानीं संध्याकाळीं । पूजिती जे ॥ ८० ॥ [यजंते तामसा जनाः] ते तमोगुणाचें सार । काढूनि निर्मिले नर । जाण तामसियेचें घर । श्रद्धेचें तें ॥ ८१ ॥ [श्लोकत्रयाभिप्रायः] ऐसी इहीं तिहीं लिंगीं । त्रिविध श्रद्धा जगीं । पैं हें यालागीं । सांगत असें ॥ ८२ ॥ जे हे सात्विक श्रद्धा । जतन धरावी प्रबुद्धा । येरी दोनी विरुद्धा । सांडाविया ॥ ८३ ॥ हे सात्विकमाते जया । †निर्वाहति[६] होय धनंजया । बागूल नोहे तया । कैवल्य तें ॥ ८४ ॥ तो न पढो कां ब्रह्मसूत्र । न [७]लोढो सर्व शास्त्र । सिद्धांत न होत स्वतंत्र । तयाच्या हातीं ॥ ८५ ॥ परी श्रुतिस्मृतींचे अर्थ । जे आपण होऊन [८]मूर्त । अनुष्ठानें ‡गाजत । वडील §जे हे ॥ ८६ ॥ तयांचीं आचारस्तीं[९] पाउलें । पाऊनि सात्विकी श्रद्धा चाले । तो तेंचि फळ ठेविलें । ऐसें लाहे ॥ ८७ ॥ पैं एक दीप लावी सायासें । आणिक तेथें लाऊं बैसे । तरि तो काय प्रकाशें । वंचिजे[१०] गा ॥ ८८ ॥ कां येकें मोल अपार । वेंचोनि केलें [११]धवळार । तो [१२]सुरवाड वस्तीकर । न भोगी काई ॥ ८९ ॥ हें असो जो तळें करी । तें तयाचीच तृषा हरी । कीं [१३]सुआरासीचि अन्न घरीं । येरां नोहे ॥ ९० ॥ ¶बहुत काय बोलों पैं गा । येका गौतमासीच गंगा । येरां समस्तां काय जगा । वोहाळ[१४] जाली ॥ ९१ ॥ ह्मणौनि [१५]ओपलीया परी । शास्त्र अनुष्ठिती [१६]कुसरी । जाणे तयातें श्रद्धाळु जो [१७]वरी । तो मूर्खही तरे ॥ ९२ ॥

अशास्त्रविहितं घोरं तप्यंते ये तपो जनाः ।
दंभाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥ ५ ॥

[अशास्त्रविहितं] ना शास्त्राचेनि कीर नावें । [१८]स्वीकरोंही नेणती जीवें । परि

---

* जैं यांचा. † निर्वाहो होय. ‡ जगा देत. § जे जे. ¶ हें बहुकाय.

१ मासल्यावरून, प्रकारावरून. २ देहाकृति. ३ बुद्धि. ४ सकळ विद्या. ५ पिशाचांला. ६ संरक्षण. ७ चाखो, पढो. ८ प्रकट. ९ प्राप्त होई, लाभे. १० फसविल काय. ११ घर. १२ सुखकर. १३ स्वयंपाक्यास. १४ ओढा. १५ आपल्यापेक्षां. १६ दक्षतेनें. १७ आचरी. १८ आरंभ करूं.

शास्त्रज्ञांही शिवें[१] । टेंको नेदिती ॥ ९३ ॥ वडिलांचिया क्रिया । देखोनि वेंती[२] वांकुलिया । पंडितां डोंकुलिया[३] । वाजविती ॥ ९४ ॥ [दंभाहंकारसंयुक्ताः] आपलेनीचि आटोपें[४] । धनित्वाचेनि दर्पें । [तप्यंते ये तपो जनाः] साचचि पाखंडार्चीं तपें । आदरिती ॥ ९५ ॥ [घोरं] आपुलिया पुढिलांचिया । आंगीं घालूनि कातिया[५] । रक्तमांसाप्रणीतया[६] । भरभरों ॥९६॥ रिचविती[७] जळतकुंडीं । लाविती चेडंयाच्या तोंडीं[८] । नवसियां देती उंडी[९] बाळकाची ॥ ९७ ॥ अग्रहाचिया उंजरियां[१०] । क्षुद्रदेवतां वरियां[११] । अन्नत्यागें सांतरिया[१२] । ठाकती येक ॥ ९८ ॥ [कामरागबलान्विताः] अगा आत्मपरपीडा । बीज तमक्षेत्रीं सुहाडा[१३] । पेरिती मग पुढां । तेंचि पिके ॥ ९९ ॥ बाहू नाहीं आपलिया । आणि नावेतेंही धनंजया । न धरी होय तया । समुद्दीं जैसें ॥ १०० ॥ कां वैद्यातें करी सेळा[१४] । रसें[१५] सांडीं *पायखोळा[१६] । तो रोगिया जेविं विव्हळा[१७] । सेवता होय ॥ १ ॥ ना ना पडिकाराचेनि सेळें[१८] । काढी आपलेचि डोळे[१९] । तें वानवेंसां[२०] आंधळें । जैसें ठाके ॥ २ ॥ तैसें तया असुरां होये । जे निंदूनि शास्त्रांची सोये[२१] । सैंघ[२२] धांवताती मोहें । आडवी जे कां ॥ ३ ॥ काम करवी ते करिती । क्रोध मारवी तें मारिती । किंबहुना मातें †पुरिती । दुःखाचा ‡गुंडा[२३] ॥ ४ ॥

कर्षयंतः शरीरस्थं भूतग्राममचेतसः ।
मां चैवांतःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥ ६ ॥

[कर्षयंत इति पादत्रयं] आपलां परावां देहीं । दुःख देती जें जें कांहीं । मज आत्मया तेतुलाही । होय सीण ॥ ५ ॥ [तान्विद्ध्यासुरनिश्चयान्] पैं वाचेनिही पालवें । पापियां तया नोंतळावें[२४] । परि पडिलें सांगावें । त्यजावया ॥ ६ ॥ प्रेत बाहिर घालिजे । कां अंत्यज संभाषणीं त्यजिजे । हें असो हातें क्षाळिजे । केंश[२५]मळातें ॥ ७ ॥ §येथ शुद्धीचिया आशा । तो लेपु न मानवे[२६] जैसा । तयांतें सांडावया तैसा अनुवाद हा ॥ ८ ॥ तरि अर्जुना तूं तयांतें । देखसी तैं स्मर हो मातें । जें आन प्रायश्चित्त येथें । मानेल[२७] ना ॥ ९ ॥ ह्मणौनि श्रद्धा जे सात्विकी । पुढती तेचि पैं येकी । जतन करावी निकी । सर्वोपरी ॥ ११० ॥ तरि धरावा तैसा संग । जेणें पोखे सात्विक लाग । सत्ववृद्धीचा भाग । आहार घेपे ॥ ११ ॥ येऱ्हवीं तरी पाहीं । स्वभाववृद्धीच्या ठाईं । आहारावांचूनि नाहीं । बळी हेतु ॥ १२ ॥ प्रत्यक्ष पाहें पां वीरा । जो सावध घे मदिरा । तो

* पायखळा. † दुखविती. ‡ कुंडा. §तेथ बुद्धी.

१ हद्दीवर. २ वेडावून दाखवितात. ३ चुटक्या. ४ व्यापानें. ५ कोयता. ६ यज्ञपात्रें. ७ ओततात, घालितात. ८ चेटुकाच्या. ९ आढ्यतेनें, उत्कर्षानें. १० इतर लहान देवतांपासून (अलौकिक सामर्थ्य) प्राप्तीकरितां. ११ सात दिवसपर्यंत, एकवीस दिवसपर्यंत. १२ सुज्ञा. १३ द्वेष. १४ काढा. १५ लाथेनें. १६ व्याकुळ. १७ व्रतांत. १८ डोळसाच्या. १९ स्पर्धेनें. २० माजवरी. २१ मार्ग. २२ अनिवार. २३ दगडांत. २४ न स्पर्शावें. २५ पातकातें. २६ मानवे. २७ योग्य नाहीं.

होऊनि ठाके माजिरा । तियेचि क्षणीं ॥ १३ ॥ कां जो *सावियां अन्नरस सेवी । तो व्यापिजे वातश्लेष्मस्वभावीं । काय ज्वर जालिया निववी । पैयादिक ॥ १४ ॥ ना तरि अमृत जयापरी । †घेतलिया मरण वारी । कां आपुलिया ऐसें करी । जैसें विष ॥ १५ ॥ तेविं जैसा घेपे आहार । धातु तैसाचि होय अकार । आणि धातुऐसा अंतर । भाव पोखे ॥१६॥ जैसें भांडियांचेनि तापें । आंतुलें उदकही तापे । तैसी धातुवशें आटोपे । चित्तवृत्ती ॥ १७ ॥ ह्मणोनि सात्विक रस सेविजे । तैं सत्वाची वाढि पाविजे । राजसा तामसा होइजे । येरीं रसीं ॥ १८ ॥ तरी सात्विक कोण आहार । राजसतामसा कायि आकार । हें सांगों करीं आदर । ऑकर्णनीं ॥ १९ ॥

आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ।
यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु ॥ ७ ॥

[आहार इति] आणि एकसरें आहारा । कैसेनि तिनी मोहरा । जालिया तेंही वीरा । रोकडें दाऊं ॥ १२० ॥ तरि जेवणाराचिया रुची । निष्पत्ति कीं बोनियांची । आणि जेविता तंव गुणाची । दासी येथ ॥ २१ ॥ जो जीव कर्ता भोक्ता । तो गुणास्तव स्वभावता । पावोनियां त्रिविधता । चेष्टे त्रिधा ॥२२॥ ह्मणौनि त्रिविध आहार । [यज्ञ इति] यज्ञही त्रिप्रकार । तप दान हन व्यापार । त्रिविधचि ते ॥ २३ ॥ पैं आहारलक्षण पहिलें । सांगों जें ह्मणीतलें । तें आईक गा ‡भलें । रूप करूं ॥ २४ ॥

आयुःसत्ववलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।
रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्विकप्रियाः ॥८॥

[सात्विकप्रियाः] तरी सत्वगुणाकडे । जैं दैवें भोक्ता पडे । तैं मधुरीं रसीं वाढे । मेचुं तया ॥ २५ ॥ आंगेंचि द्रव्यें सुरसें । जे आंगेंचि पदार्थ गोडसे । आंगेंचि स्नेहें बहुवसें । सुपकें जियें ॥ २६ ॥ [स्निग्धाः] आकारें नव्हती डगळें । स्पर्शें §अति निबळें । ¶जिभेलागीं स्नेहाळें । स्वादें जियें ॥ २७ ॥ रसें गोढीं वरी ढिलीं । द्रवभावीं आथिलीं । ठायें ठाँव सांडिलीं । अग्नितापें ॥ २८ ॥ [स्थिराः] आंगें सानें परिणामें थोर । जैसें गुरुमुखींचें अक्षर । तैसा अल्पीं जिहीं अपार । तृप्ति राहे ॥२९॥ [हृद्याः] आणि मुखीं जैसीं गोडें । $तैसी

* सावियां रस. † घेतलें. ‡ भागलें. § अति मवाळें. ¶ जिभे लागती. $ तैसींच हितीं.

१ उन्मत्त. २ नेहमींचा. ३ दूध आदि. ४ घ्यावा. ५ अंतर्गत. ६ पोसे. ७ श्रवणीं. ८ एकदम. ९ तीन प्रकार झालें. १० अन्नाची. ११ वागे. १२ आवड, इच्छा. १३ स्वतः. १४ मोठे. १५ मऊ. १६ सघन. १७ वास्तविक.

चिहि ते आंतुलेकडे । *तिये अन्नीं प्रीति वाढे । सात्विकांसी ॥१३०॥ [आहाराः] एवं गुणलक्षण । सात्विक भोज्य जाण । [आयुः] आयुष्याचें त्राण । नीच नवें हें ॥३१॥ येणें सात्विकरसें । जंव देही मेहो[1] वरिसे । तंव आयुष्यनदी उससे । देहाचि[2] देहा ॥३२॥ [सत्वं] सत्वाचिये कीर पाळती[3] । कारण हाचि सुमती । दिवसाचिये उन्नती । भानु जैसा ॥३३॥ [बलं-] आणि शरीरा हन मानसा । बळाचा पैं †कुंवासा[4] । हा आहार तरी दशा । कैंची रोगां ॥ ३४ ॥ हा सात्विक होय भोग्य । तेंचि भोगावया आरोग्य । शरीरासी भाग्य । उदयलें जाणों ॥ ३५ ॥ [सुख-] आणि सुखाचें घेणें देणें । निकें[5] उवाया ये[6] भेणें[7] [प्रीति-] हें असो वाढे साजणें । आनंदेंसी ॥ ३६ ॥ ['विवर्धनाः' इतिपदं प्रत्येकं संबध्यते] ऐसा सात्विक आहार । परिणमला थोर । करी हा उपकार । सबाह्यासी ॥३७॥ आतां राजसासि प्रीती । जिहीं रसीं आथी । करूं तयाही व्यक्ती[8] । प्रसंगें गा ॥३८॥

कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ।
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥ ९ ॥

[कटु-] तरी मारें[9] उर्णें[10] काळकूट । तेणें मानें जें कडुवट । [अम्ल-] का चुनियाहूनि दांसट[11] । आम्ल हन ॥ ३९ ॥ [लवण-] कणिकीतें जैसें पाणी । तैसें मीठ बांधया[12] आणी । तेतुलीच मेळवणी । रसांतरांची ॥१४०॥ ऐसें खारट अपाडें[13] । राजसा तया आवडे । [अत्युष्ण-] उन्हाचेनि मिषें तोंडें । आगीचि गिळी ॥ ४१ ॥ वाफोचिया सिगे[14] । वातीही लाविल्या लागे । तैसें उन्ह मागे । राजस तो ॥४२॥ [तीक्ष्ण-] ‡चावदळ[15] पाडूनि ठाये । सांबेळ[16] डोहारला[17] आहे । तैसें तीर्ख[18] तो खाये । जें घायेविण रुपे ॥ ४३ ॥ [रूक्ष-] आणि राखेहूनि कोरडें । आंत बाहेरी येके पाडें । तो जिव्हादंश[19] आवडे । बहु तया ॥ ४४ ॥ परस्परें दांतां । आदळ होय खातां । तो गा मुखीं घेतां । तोषों लागे ॥४५॥ [विदाहिनः] आधींच द्रव्यें चुरमुरीं[20] । वरी परवडिजती[21] मोहरी । जियें घेतां होती धुवारी[22] । नाक तोंडा ॥ ४६ ॥ हें असो §उगें[23] आगीतें । झणें तैसें राइतें । [आहारा राजसस्येष्टाः] पढियें[24] प्राणापरतें । राजसासि गा ॥ ४७ ॥ ऐसा न पुरोनि तोंडा । जिभा केला वेडा । अन्नमिषें अग्नि भडभडां । पोटीं भरी ॥४८॥ [दुःखशोकामयप्रदाः] तैसाचि लेंवंधा[25] सुटे । मग भुई ना सेजे ¶[26]सांटे । पाणियाचें न सुटे । तोंडोनि पात्र ॥ ४९ ॥ ते आहार नव्हती घेतले ।

* तिहीं. † पैकु ऐसा. ‡ गडद पडूनि, फोडून. § उणें. ¶ दाटे.

१ मेघ वर्षे. २ दिवसानुदिवस. ३ रक्षणार्थ. ४ आहार. ५ आश्रय. ६ आकारास. ७ मैत्री. ८ परिणाम पावला. ९ उघड. १० मारकपणानें मात्र कमी. ११ दाहक, बळकट. १२ बांधावयास. १३ अतिशय. १४ अग्रावर. १५ दगड, वाऱ्याची वाहाटूळ, विजेचा आघात. १६ पाहार, शस्त्र. १७ प्रसिद्ध झाला. १८ तिखट. १९ तोंडीं लावणें. २० झणझणीत. २१ म्होवरी पसरतात, अनेक प्रकार करतात. २२ वेदना. २३ प्रिय वाटे. २४ दाह. २५ लोळे.

व्याधिव्याळ जे सुतले । ते चेवविया घातलें । मोजवण पोटीं ॥ १५० ॥ तैसें एकमेकां सेंळें । रोग उठती एके वेळे । ऐसा राजस आहार फळे । केवळ दुःखें ॥ ५१ ॥ एवं राजसा आहारा । रूप केलें धनुर्धरा । परिणामाचाही विसुरा । सांगीतला ॥ ५२ ॥ आतां तया तामसा । आवडे आहार जैसा । तेंही सांगों चिळसा । झणें तुह्मी ॥ ५३ ॥ तरि कुहिलें उष्टें खातां । न मनिजे तेणें अनहिता । जैसें कां उपहिता । ह्मैसी खाय ॥ ५४ ॥

यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥ १० ॥

[यातयामं] निपजलें अन्न तैसें । दुपाहरीं कां येरें दिवसें । [गतरसं] अतिकरे तैं तामसें । वेइजेतें ॥ ५५ ॥ ना तरि अर्ध उकडिलें । कां निपट करपोनि गेलें । तैसेंही खाय चुकलें । रसा जें येवों ॥ ५६ ॥ [पूति] जया कां आथि पूर्ण निष्पत्ती । जेथ रस धरी व्यक्ती । तें अन्न ऐसी प्रतीती । तामसा नाहीं ॥ ५७ ॥ ऐसेनि कहीं विपायें । सदन्ना वरपडा होये । तरी घाणी सुटे तंव राहे । व्याघ्र जैसा ॥ ५८ ॥ [पर्युषितं च यत्] कां बहुवे दिवशीं वोलांडिलें । स्वादपणें सांडिलें । शुष्क अथवा सडलें । गाभिणेंही हो ॥ ५९ ॥ [उच्छिष्टं] तेंही बाळाचे हातवरी । *चिवडिलें जैसी †राडी करी । कां सवें बैसोनि नारी । गोतांबील करी ॥ १६० ॥ ऐसेनि केइमळें जैं खाय । तैं तया सुखभोजन ऐसें होय । [अपिच] परि येणेंही न धाय । पापिया तो ॥ ६१ ॥ [अमेध्यं] मग चमत्कार देखा । निषेधाचा आंवुखा । जया कां सदोषा । कुद्रव्यासी ॥ ६२ ॥ तया अपेयांच्या पानीं । अखाद्यांच्या भोजनीं । वाढविजे उतान्ही । तामसें तेणें ॥ ६३ ॥ [भोजनं तामसप्रियं] एवं तामस जेवणारा । ऐसैसी मेचु हे वीरा । तयाचें फळ दुसरां । क्षणीं नाहीं ॥ ६४ ॥ जे जेव्हांचि हें अपवित्र । शिवे तयाचें वक्र । तेव्हांचि पापा पात्र । जाला तो कीं ॥ ६५ ॥ यावरतें जें जेवी । ते जेविती वोजें न ह्मणावी । पोटभरती जाणावी । यातना ते ॥ ६६ ॥ शिरच्छेदें काय होये । कां आगी रिघतां कैसें आहे । हें जाणावें काई पाहें । परि साहातचि असे ॥ ६७ ॥ ह्मणौनि तामसा अन्ना । परिणाम गा सिनाना । न सांगोंचि अर्जुना । देव ह्मणे ॥६८॥

* चिवडिलें जैसी घारी. † राहाडी.

१ सर्म. २ निजले. ३ जागृत करण्याकारितां. ४ कैफ. ५ स्पर्धेनें. ६ तात्पर्य, अभिप्राय. ७ किळस. ८ कुजलेलें. ९ आंववण. १० दोन प्रहर. ११ एक दिवस. १२ राहिलेलें, अतिक्रांत होई. १३ निःशेष. १४ निष्पन्न झालेला, उत्पादन. १५ कदाचित्. १६ उत्तम अन्न. १७ प्राप्त. १८ फुगलेलें. १९ हातानें. २० चिखल. २१ एका ताटांत सर्वांनीं जेवणें. २२ घाणेरेपणानें. २३ तृप्त होत नाहीं. २४ शिंतोडा, सेचन. २५ इच्छा. २६ आवड. २७ तत्क्षणीं. २८ रीत. २९ वेगळाला.

आतां ययावरी । आहाराचिया परी । यज्ञही अवधारीं । त्रिधा असे ॥ ६९ ॥
तरीं तिहींमाजी प्रथम । सात्विकयज्ञाचें वर्म । आईक पां सुमहिम- । शिरोमणी ॥ १७० ॥

अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ।
यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्विकः ॥ ११ ॥

[मनः समाधाय] तरि एक प्रियोत्तम । वांचोनि वाढों नेदी काम । जैसा कां मनोधर्म । पतिव्रतेचा ॥ ७१ ॥ ना ना सिंधूतें ठाकूनि गंगा । पुढारा न करीचि रिगा । कां आत्मा देखोनि उगा । वेद ठेला ॥ ७२ ॥ तैसें जे आपुल्या स्वहितीं । वेंचूनियां चित्तवृत्ती । नुरवितीचि अहंकृती । फळालागीं ॥ ७३ ॥ पातलेया झाडाचें मूळ । मागुतें सरों नेणेंचि जळ । जिरालें कां केवळ । तयाच्याचि आंगीं ॥ ७४ ॥ [यष्टव्यमेवेति] तैसें *मनें देहीं । यजननिश्चयाच्या- ठाईं । हारपोनि जे कांहीं । वांछितीना ॥ ७५ ॥ [अफलाकांक्षिभिः] तिहीं फळवांच्छात्यागीं । स्वधर्मावांचूनि विरागीं । कीजे जो यज्ञ सर्वांगीं । अळंकृत ॥ ७६ ॥ [विधिदृष्टः] परि आरिसा आपणपें । डोळां जैसें घेपे । कां तळहातीचें दीपें । रत्न पाहिजे ॥ ७७ ॥ ना ना उदितें दिवाकरें । गमावा मार्ग दिठी भरे । तैसा वेद निर्धारें । देखोनियां ॥ ७८ ॥ तियें कुंडें मंडप वेदी । आणीकही संभारसमृद्धि । ते मेळवणी जैसी विधी । आपणपां केली ॥७९॥ सकळावयव उचितें । लेणीं पातलीं जैसीं आंगातें । [य इज्यते] तैसे पदार्थ जेथिंचे तेथें । विनियोगुनी ॥ १८० ॥ काय वानूं बहुतीं बोलीं । जैसी सर्वाभरणीं भरली । ते यज्ञविद्याचि रूपा आली । यजनमिषें ॥ ८१॥ [यः यज्ञः] तैसा सांगोपांग । निपजे जो याग । नुठऊनियां लिंग । महत्त्वाचा ॥ ८२ ॥ [स सात्विकः] प्रतिपाळ तरी पाटाचा । झाडीं कीजे तुळसीचा । परी फळा फुला छायेचा । आश्रय नाहीं ॥ ८३ ॥ किंबहुना फळाशेवीण । ऐसेया निगुंती निर्माण । होय †तो याग जाण । सात्विक गा ॥ ८४ ॥

अभिसंधाय तु फलं दंभार्थमपि चैव यत् ।
इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ॥ १२ ॥

[अभिसंधाय तु फलं] आतां यज्ञ कीर वीरेशा । करी पैं ‡याचिऐसा । परि श्राद्धालागीं जैसा । अवंतिला रावो ॥ ८५ ॥ जरि राजा घरासि ये । तरी बहुत उपयोगा जाये । [दंभार्थमपि चैव यत्] आणि कीर्तीही होये । §जगा-

---

* देहमनें. † तो यज्ञ. ‡ याचिया ऐसा. § श्राद्ध न टके.

१ उत्तम महिमेच्या. २ वैराग्यपूर्वक. ३ आरशानें. ४ डोळ्यानें आपलें स्वरूप जसें घेतलें जातें. ५ उगवलेल्या. ६ गम्य, जाण्याचा. ७ डोळ्यापुढें येतो. ८ स्वतः विधीनेंच. ९ व्यवस्थेनें मांडून. १० इच्छा. ११ उत्तम प्रकारचा. १२ युक्तीनें. १३ आमंत्रण देऊन आणला.

माजी ॥ ८६ ॥ तैसा धरूनि आवांका[3]। ह्मणे स्वर्ग जोडेल असिंका[3]। दीक्षित होईन मान्य लोकां। घडेल याग ॥ ८७ ॥ [इज्यते इति] ऐसी केवळ फळालागीं। महत्त्व फोकेरावया[3] जगीं। पार्था निष्पत्ति जे यागीं। राजस पैं ते ॥ ८८ ॥

विधिहीनमसृष्टान्नं मंत्रहीनमदक्षिणम्।
श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥ १३ ॥

[विधिहीनं] आणि पशुपक्षिविवाहीं। जोसी कामापरौता[4] नाहीं। तैसा तामसा यज्ञा पाहीं। आग्रहचि मूळ ॥ ८९ ॥ वारया वाट न वाहे। कीं मरण मुहूर्त पाहे। निषिद्धांसीं बिहे। आगी जरी ॥ १९० ॥ तरी तामसाचिया आचारा। विधीचा आथी ना वोढावारा[5]। ह्मणूनि तो धनुर्धरा। उत्संखळु[6] ॥ ९१ ॥ नाहीं *विधीची तेथ चाड। [मंत्रहीनं] नये मंत्रादिक† तयाकड। अन्न जातां न सुंये[7] तोंड। ‡मासिये केविं ॥ ९२ ॥ [अदक्षिणं] वैरीचा बोध ब्राह्मणा। तेथ कें रिगेल दक्षिणा। अग्नि जाला वाडधाणा[8]। वैरपडा[9] जैसा ॥ ९३ ॥ [श्रद्धाविरहितं] तैसें वायांचि सर्वस्व वेचे। मुख न देखतां श्रद्धेचें। नागविलें निपुत्रिकाचें[10]। जैसें घर[11] ॥९४॥ [यज्ञं तामसं परिचक्षते] ऐसा जो यज्ञाभास[12]। तया नाम याग तामस। आइकें ह्मणे निवास। श्रियेचा तो ॥ ९५ ॥ §आतां गंगेचें एक पाणी। परि नेलें आनानीं[13] वाहणीं। एक ¶मळी एक आणी। शुद्धत्व जैसें ॥ ९६ ॥ तैसें तिहीं गुणीं तप। येथ जाहालें आहे त्रिरूप। तें एक केलें दे पाप। उद्धरी एक ॥ ९७ ॥ तरि तेंचि तिहीं भेदीं। कैसेनि पां ह्मणौनि सुबुद्धी। जाणों पाहासी तरि आधीं। तपचि[14] जाण ॥ ९८ ॥ येथ तप ह्मणिजे काई। तें स्वरूप दाऊं पाहीं। मग भेदिलें गुणीं तिहीं। तें पाठीं[15] बोलों ॥ ९९ ॥ तरि तप जें कां सम्यकें। तेंही त्रिविध आइक। शारीर मानसिक। शाब्द गा ॥ २०० ॥ आतां या तिहीं माझारीं। शारीर तंव अवधारीं। तरि शंभू[16] कां श्रीहरी। पाढियंता[16] होय ॥ १ ॥

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम्।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १४ ॥

[देव–'पूजनमिति प्रत्येकमन्वेति'] तया प्रिय देवतालया। यात्रादिकें करा-

* वेदाची. † तयाआड. ‡ मक्षिकेचें. § अगा. ¶ मैळ.

१ अवसान. २ सर्वथैव. ३ प्रसिद्धयर्थ. ४ विषयसेवनाहून पलीकडे. ५ मर्यादा, धरबंद. ६ अमर्याद. ७ घाली. ८ ब्राह्मणाविषयीं वैरभाव. ९ वादळाला. १० प्राप्त. ११ निपुत्रिकाच्या पश्चात् त्याचें घर कोणी तरी नागवावें तसें. १२ लबाडीचा यज्ञ. १३ निरनिराळ्या मार्गांनीं. १४ आधीं तप सांगतों ऐक. १५ मग. १६ शिव किंवा विष्णु यांतून आवडेल त्याचें.

वया । आठही पाहार जैसें पायां । उळिंग[1] घापे ॥ २ ॥ देवांगणमिरवणियां[2] । अंगोपचार[3] पुरवणियां । करावया ह्मणियां । शोभती हात ॥ ३ ॥ लिंग का प्रतिमा दिठी । देखत खेंवो अंगेष्टी[4] । लोटिजे कां काठी[5] । पडली जैसी ॥४॥ [प्राज्ञ-] आणि *विधिविनयादिकीं[6] । गुणीं वडील जे लोकीं । तयां ब्राह्मणाची निकी[7] । पाइकी[8] कीजे ॥ ५ ॥ [द्विज-] अथवा प्रवासें कां पीडा । कां शिणले जे सांकडां । ते जीव सुरवाडा[9] । आणीजती ॥ ६ ॥ [गुरु-] सकळ तीर्थांचिये धुरे । जिये कां मातापितरें । तयां सेवेसि कीर शरीरें । लोणें[10] कीजे ॥७॥ आणि संसारा ऐसा दारुण । जो भेटलाचि हरी शीण । तो ज्ञानदानीं सकरुण । भजिजे गुरु ॥ ८ ॥ [शौचं] आणि स्वधर्माचा आंगिठा[11] । देह जोड्याचिया[12] किटा । आवृत्तिपुटीं सुभटा । झाडी कीजे ॥ ९ ॥ वस्तु भूतमात्रीं नमिजे । परोपकारीं भजिजे । [ब्रह्मचर्यं] स्त्रीविषयीं नियमिजे । नांवेंनांव ॥२१०॥ [आर्जवं] जन्मतेनि[13] प्रसंगें । स्त्रीदेह[14] शिवणें आंगें । तेथूनि जन्म आघवें । सोविळें[15] कीजे ॥ ११ ॥ [अहिंसा च] भूतमात्राचेनि नांवें । तृणही नासुडावें[16] । किंबहुना सांडावे । छेद भेद ॥ १२ ॥ [शारीरं तप उच्यते] ऐसैसी जैं शरीरीं । राहाटीची पडे उजरी[17] । तैं शारीर तप धुमरी[18] । †आलें जाण ॥ १३ ॥ पार्था समस्तही हें करणें । देहाचेनि ‡प्रधानपणें[19] । ह्मणौनि ययातें मी ह्मणे । शारीर तप ॥ १४ ॥ एवं शारीर जें तप । तयाचें दाविलें रूप । आतां आईक निष्पाप । वाङ्मय[20] तें ॥ १५ ॥

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १५ ॥

[अनुद्वेगकरं वाक्यं] तरि लोहाचें आंग तुकें[21] । न तोडितांचि कनक । केलें जैसें देख । परिसें तेणें ॥ १६ ॥ तैसें न दुखवितां §सहजें । जीवळिया[22] सुख निपजे । ऐसें साधुत्व कां देखिजे । ¶बोलणा जिये ॥ १७ ॥ [सत्यं] पाणी मुदल झाडा जाये । तृण $ते प्रसंगेंचि जिये । तैसें एका बोलिलें होये । सर्वांहि हित ॥ १८ ॥ [प्रिय-] जोडे अमृताची सुरसरी[23] । तैं प्राणांतें अमर करी । स्नानें पाप ताप वारी । गोडीही दे ॥ १९ ॥ [हितं च यत्] तैसा अविवेकही फिटे । आपुलें अनादित्व भेटे । आइकतां रुचि न विटे । पीयूषीं[24] जैसी ॥ २२० ॥ जरी कोणी करी पुसणें । तरी होआवें ऐसें बोलणें । [स्वाध्यायेति] ना तरी

* विद्या. † आतलें. ‡ प्राधान्यपणें. § सेजे. ¶ बोलतां. $ तत्प्रसंगें.

१ वेंठ, विगार, भोंवरा. २ सुशोभित करण्यास. ३ गंधपुष्पादिक. ४ सेवा, पूजा. ५ साष्टांग, अंगयष्टि. ६ चाकरी. ७ सुखावस्थेस. ८ अग्रभागीं. ९ ओवाळून टाकावीं. १० अर्पीत, शेगडीत. ११ मळाच्या. १२ जन्मकालींच मात्र स्त्रीस्पर्श. १३ न आसडावें, ओढूं नये. १४ स्वच्छता. १५ भरपूर, घुमत. १६ मुख्यत्वें. १७ वाचिक. १८ आकार, वजन. १९ परक्यास. २० सरित्, गंगा. २१ अमृतीं.

आवर्तणें । निगम कां नाम ॥ २१ ॥ ऋग्वेदादि तिन्हीं । प्रतिष्ठीजती वाग्भुवनी । केली जैसी वदनीं । ब्रह्मशाळा ॥ २२ ॥ ना तरि एकार्धे नांव । तेंचि शैव कां वैष्णव । वाचे वसे तें वाग्भव । तप जाणावें ॥ २३ ॥ आतां तप जें मानसिक । तेंही सांगों आइक । ह्मणे लोकनाथनायक-। नायकचि तो ॥२४॥

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ १६ ॥

[मनःप्रसादः] तरि सरोवरतरंगीं । सांडिलें आकाश मेघीं । कां चंदनाचें उरगीं । उद्यान जैसें ॥ २५ ॥ नाना कळावैष्यम्यें चंद्र । कां सांडिला आधीं नरेंद्र । ना तरि क्षीरसमुद्र । मंदराचळें ॥ २६ ॥ तैसीं नानाविकल्पजाळें । सांडूनि गेलिया सकळें । मन राहे कां केवळें । स्वरूपें जें ॥ २७ ॥ [सौम्यत्वं] तेंपनेंवीण प्रकाश । जाड्येंवीण *रस । पोकळीवीण अवकाश । होय जैसा ॥ २८ ॥ तैसी आपली सोय देखे । आणि आपलिया स्वभावा मुके । हिंवली जैसी आंगिकें । हिवों नेदी ॥ २९ ॥ मग नचलतें कळकेंवीण । शशिबिंब जैसें नित्य परिपूर्ण । तैसें चोखी †शृंगारपण । मनाचें जें ॥ २३० ॥ [मौनं] बुजाली वैराग्याची वोरपें । जिराली मनाची धांप कांप । तेथ केवळ जाली वाफ । निजबोधाची ॥ ३१ ॥ ह्मणौनि विचारावया शास्त्र । राहाटवावें जें वक्र । तें वाचेचेंही सूत्र । हातीं न धरी ॥ ३२ ॥ [आत्मविनिग्रहः] तें स्वलाभ लाभलें लाभलेपणें । मन मनपणाही धरूं नेणें । शिवतलें जैसें लवणें । आपलें निजें ॥ ३३ ॥ [भावसंशुद्धिः] तेथ कें उठिती ते भाव । जिहीं इंद्रियमार्गीं धांव । घेऊनि ठाकावे गांव । विषयांचे ते ॥ ३४ ॥ ह्मणौनि तिये मानसीं । भावशुद्धीचि असे आपैसी । रोमशुचि जैसी । ‡तळहाताची ॥ ३५ ॥ [इत्येतत्तपो मानसमुच्यते] काय बहु बोलों अर्जुना । जैं हे दशा ये मना । तैं मनस्तपोभिधाना । पात्र होय ती ॥ ३६ ॥ परि तें असो हें जाण । मानसतपाचें लक्षण । देवो ह्मणे संपूर्ण । सांगितलें ॥ ३७ ॥ एवं देहवाचाचित्तें । जें पातलें त्रिविधत्वातें । तें सामान्य तप तूतें । परिसविलें गा ॥ ३८ ॥ आतां गुणत्रयसंगें । हेंचि विशेषें त्रिविधीं रिगे । तेंही आईक चांगें । प्रज्ञाबळें ॥ ३९ ॥

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः ।
अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्विकं परिचक्षते ॥ १७ ॥

[श्रद्धयेति] तरि हेंचि तप त्रिविधा । जें दाविलें तुज प्रबुद्धा । तेंचि करीं

---

* रसीं रस. † स्थिरपण. ‡ तळहातासी.

१ वेद. २ वाचारूप मंदिरांत. ३ वेदशाळा. ४ वाचेपासून झालेलें. ५ सापांनीं. ६ बाग. ७ कमजास्त कलांनीं. ८ राजा. ९ उष्णतेवांचून. १० मार्ग. ११ शरीरावयव. १२ उत्कंठा, इच्छा. १३ धांव. १४ कंप. १५ योग्यता. १६ संकल्पविकल्प. १७ आपली मूळप्रकृति = पाणी. १८ मानस तप अशा नांवाला. १९ तीन प्रकारांत शिरतें. २० बुद्धीच्या बळानें. २१ झाला.

पूर्णश्रद्धा । सांडूनि *फळ ॥ २४० ॥ [अफलेति] जैं पुरतिया सत्वशुद्धी । आचरिजे आस्तिक्यबुद्धी । तैं तयातेंचि गा प्रबुद्धीं । सात्विक ह्मणिपे ॥ ४१ ॥

सत्कारमानपूजार्थं तपो दंभेन चैव यत् ।
क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥ १८ ॥

[सत्कार-] ना तरि तपस्थापनेलागीं । दुजेपण मांडूनि जगीं । महत्त्वाद्रीच्या शृंगीं । बैसावया ॥ ४२ ॥ [मान-] त्रिभुवनींचिया सन्माना । न वचावें ठाया आना । धुरेचिया आसना । भोजनालागीं ॥ ४३ ॥ विश्वाचिया स्तोत्रा । आपण होआवया पात्रा । विश्वें आपलिया यात्रा । करावियां ॥ ४४ ॥ [पूजार्थं] लोकांचिया विविधा पूजा । आश्रय न धरावया दुजा । भोग भोगावे वोजा । महत्त्वाचिये ॥ ४५ ॥ [तपो दंभेन चैव यत्] †अगा बोल माखूनि तपें । विकावया आपणपें । अंगहीनें पेंडपे । जियापरी ॥ ४६ ॥ हें असो धनमानीं आस । वाढउनी तप [क्रियते तदिह प्रोक्तं] कीजे सायास । तैं तेंचि तप राजस । बोलिजे गा ॥ ४७ ॥ [चलं] परि ‡पैरहुणीं जें दुहिलें । तैं तें गुरूं न दुभेंचि व्यालें । कां उभें शेत चारिलें । पिकावया नुरें ॥ ४८ ॥ तैसें फोकाँरितां तप । कीजे जें साक्षेप । तें फळीं तंव सोपे । निःशेष जाय ॥ ४९ ॥ ऐसें निर्फळ देखोनि करितां । माझारीं सांडीं पंडुसुता । [अध्रुवं] ह्मणोनि नाहीं स्थिरता । तपा तया ॥ २५० ॥ येऱ्हवीं तरी आकाश मांडी । जो गर्जोनि ब्रह्मांड फोडी । तो अकाळ मेघ काय घडी । राहात आहे ॥ ५१ ॥ [राजसं] तैसें राजस तप जें होय । तें फळीं कीर वांझ जाये । परी आचरणींही नोहे । निर्वाहतें गा ॥ ५२ ॥ आतां तेंचि तप पुढती । तामसें येचि रीती । पैं परत्रा आणि कीर्ती । मुकोनि कीजे ॥ ५३ ॥

मूढग्राहेणात्मनो यत् पीडया क्रियते तपः ।
परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥ १९ ॥

[मूढग्राहेणात्मनो यत्] केवळ मूर्खपणाचा वारा । जीवीं घेऊनि धनुर्धरा । नाम ठेविजे शरीरा । वैरीयाचें ॥ ५४ ॥ पंचाग्नीची दंडगी । खोलवीजती शरीरालागीं । कां इंधन कीजे हें आगी । आंतु लावी ॥ ५५ ॥ माथां जाळिजती गुगुळ । पाठीं घालिजती गळ । आंग जाळिती इंगळ । जेऊतभीतां ॥ ५६ ॥ दवडोनि श्वासोश्वास । कीजतीं वायांचि उपवास । कां घेपती धूमाचे घांस ।

* फळें. † आंग बोल. ‡ पहुरणें.

१ महत्वपर्वताच्या शिखरावर. २ अग्रभागींच्या. ३ चांगलेपणानें. ४ वेश्या. ५ शृंगार करते. ६ ओंटी केलेली गाई विण्याच्यापूर्वी. ७ प्रसिद्धीस आणितां. ८ व्यर्थ. ९ मंडळी, मांडला जातो. १० टिकण्याजोगें. ११ तमोगुणी प्राण्याच्या. १२ परलोकाच्या. १३ शरीराला वैरी असें समजून. १४ तप्त ज्वाला. १५ लावितात. १६ पेटवी. १७ काष्टें.

अधोमुखें ॥ ५७ ॥ हिमोदकें[1] आकंठें[2]। खडकें[3] सेविजती तटें[4]। जितां मासाचे चिमुटे। तोडिती जेथ ॥ ५८ ॥ [पीडया] ऐसी नानापरी हे काया। धोय[5] सूतां पैं धनंजया। [क्रियते तपः] तप कीजे [परस्योत्सादनार्थं वा] नाशावया। पुढिलातें[6] ॥ ५९ ॥ आंगभारें सुटला धोंडा। आपण फुटोनि होय खंडखंडा। कां आड जालिया तें रगडा। करी जैसा ॥ २६० ॥ तेविं आपलिया आटणिया[7]। सुखें असतया प्राणिया। जियावया शिराणिया[8]। कीजती गा ॥६१॥ [तत्तामसमुदाहृतं] किंबहुना हे वोखटी[9]। घेऊनी क्लेशाची हातवटी[10]। तप निफजे तें किरीटी। तामस होय ॥ ६२ ॥ एवं सत्वादिकाच्या आंगीं। पडिलें तप तिहीं भागीं। जालें तेंही तुज चांगी। दाविलें व्यक्ती ॥ ६३ ॥ आतां बोलतां प्रसंगा। आलें ह्मणोनि पैं गा। करूं रूपदानलिंगा। त्रिविधा तया ॥ ६४ ॥ येथ गुणाचेनि *बळें। दानही त्रिविध असे जालें। तेंचि आइक पहिलें। सात्विक ऐसें ॥ ६५ ॥

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम् ॥ २० ॥

[दातव्यमिति] तरि स्वधर्मा[12] आंतौतें। †जें जें मिळेल आपणयातें। तें तें ‡दीजें बहुतें। सन्मानयोगे ॥ ६६ ॥ जालया सुबीजप्रसंग[13]। पडे क्षेत्रीं[14] वाफेचा[15] पांग। तैसाचि दानाचा हा लाग[16]। देखतसें ॥६७॥ अनैन्यं[17] रत्न हाता चडे। तैं भांगारांची[18] वोढी[19] पडे। दोनीं जालीं तरी न जोडे। लेतें[20] आंग ॥ ६८ ॥ परि सण सुहृद संपत्ति। ये तिन्ही येकीं मिळती। जैं भाग्य धरी उन्नती[21]। आपुल्याविषीं ॥ ६९ ॥ तैसें §निफजवावया दान। जैं सत्वासि ये संवाहन[22]। तैं देश काळ भोजन[23]। द्रव्यही मिळे ॥ २७० ॥ [देशे] तरि आधीं तंव प्रयत्नेंसी। होआवें कुरुक्षेत्र कां काशी। ना तरि तुके जो इहिंसीं। तो देशही हो ॥७१ ॥ [काले च] तेथ रविचंद्रराहुमेळ[24]। होतां पाहे पुण्यकाळ। कां तयासारिखा निर्मळ। ¶आनही जाला ॥ ७२ ॥ तैशा काळीं तिये देशीं। [पात्रे च] होआवी पात्रसंपत्ती ऐसी। मूर्ति आहे धरिली जैसी। शुचित्वेंचि कां ॥ ७३ ॥ आचाराचें मूळपीठ। वेदांची $उतरपेंठ[25]। तैसें द्विजरत्न चोखट। ||पावोनियां ॥ ७४ ॥ [दीयते] मग तयाच ठाईं वित्ता। निवर्तवावी स्वसत्ता[26]।

* बोलें. † जें मिळेल. ‡ तें देइजे करून बहुतें. § निष्फल जावया. ¶ आणीक दिवस. $ उत्तारपेंठ. || पाहोनियां.

१ कंठापर्यंत. २ खडकाळ. ३ नदीतट. ४ दुःखें सोशीत. ५ घालितां. ६ इतरांस. ७ नाशनें. ८ वांचायास, जिंकण्यास. ९ महत्वासही. १० वाईट. ११ रीत. १२ मध्यें, आंत. १३ उत्तम बीजाचा समय. १४ शेताला. १५ गरज. १६ प्रसंग, संबंध. १७ मोलवान्. १८ सोन्याची. १९ टंचाई. २० घालणाऱ्याचे अवयव. २१ उत्कर्ष. २२ साह्य. २३ दान देण्यास योग्य सत्पात्र. २४ सूर्यचंद्रग्रहण. २५ दूर करावी, आपली सत्ता सोडून दान द्यावें.

परि प्रियापुढें कांता । रिगे जैसेनि ॥ ७५ ॥ कां जयाचें ठेविलें तया । देउनि होय जे उतराइया[1] । नाना हेडपे[2] विडा राया । दिधला जैसा ७६ ॥ तैसेनि निष्कामें जीवें । भूम्यादिकें अर्पावें । किंबहुना हांवे । नेदावें उठों ॥ ७७ ॥ [अनुपकारिणे] आणि दान जया द्यावें । तयातें ऐसेया पाहावें । जया घेतलें नुमचवे[3] । कायसें नाहीं ॥ ७८ ॥ साद घातलिया आकाशा । नेदी प्रतिशब्द जैसा । कां पाहिला आरसा । येरीकडे[4] ॥ ७९ ॥ ना तरी उदकाचिये भूमिके । ओफळिलेनि[5] कुंदुकें[6] । उधळौनि[7] कवतिकें । न येइजे हाता ॥ २८० ॥ नाना वसो घातला चारु । माथां तुरंबिलें[8] बुरुं[9] । न करी प्रत्युपकारु । जियापरी ॥ ८१ ॥ तैसें दिधलें दातयाचें । जो कोणेही आंगें नुमजे[10] । अर्पिलया सौम्य तयाचें । कीजे पैं गा ॥ ८२ ॥ [तद्दानं सात्विकं स्मृतं] ऐसिया जें सामग्रिया । दान निफजे वीरराया । तें सात्विक दानवर्या[11] । सर्वांही जाण ॥ ८३ ॥ आणि तोचि देश काळ । घडे तैसाचि पात्रमेळ । दानभागही निर्मळ । न्यायगत[12] ॥ ८४ ॥

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ।
दीयते च परिक्लिष्टं तद्राजसमुदाहृतम् ॥ २१ ॥

[यत्तु प्रत्युपकारार्थं] परि मनीं धरूनि दुभतें । चारिजे जेविं गाईतें । कां पेंव करूनि आइतें । पेरूं जायिजे ॥ ८५ ॥ नां[13] ना दिठी घालूनि आहेरा । अवंतूं[14] जाइजे सोयिरा[15] । कां वाण धाडिजे घरा । वोवसीयाचे[16] ॥ ८६ ॥ पैं कळांतर[17] गांठीं बांधिजे । मग पुढिलाचें काज कीजे । पूजा घेऊनि[18] रसं[19] दीजे । पीडितांसि ॥ ८७ ॥ *तैसें जया जें दान देणें । †तो तेणेंचि गा[20] जीवनें । पुढती भजावा भावें येणें । दीजे जें कां ॥८८॥[फलमुद्दिश्य वा पुनः] अथवा कोणी वाटे जातां । घेतलें उमेचों[21] न शकता । मिळे जैं पंडुसुता । द्विजोत्तम ॥८९॥ तरी कवड्या एकासाठीं । अशेषां गोत्रांचीच किरीटी । सर्व प्रायश्चित्तें[22] सुये मुठी । तयाचिये ॥ २९० ॥ तेविंचि पारलौकिकें । फळें वांछिजती अनेकें । [दीयते च] आणि दीजे तरी भुंकें[23] । ‡येकाही नोहे ॥ ९१ ॥ [परिक्लिष्टं] तेंही ब्राह्मण नेवों सरे । कीं हाणिचेनि शिणें[24] झोंसुरे[25] । सर्वस्व जैसें चोरें । नागऊनि नेलें ॥ ९२ ॥ [तद्राजसमुदाहृतं] काय बहु सांगों सुमती । जें दीजे या मनोवृत्ती । तें दान गा त्रिजगतीं । राजस पैं ॥ ९३ ॥

---

* सेजया जें. † तें तेणेंचि. ‡ पुरतें नोहे.

---

१ उत्तीर्ण. २ खिसमतगारानें, विडा देणारानें. ३ केलेलें व दिलेलें मनास नये. ४ पाठीकडून, उलटा. ५ आपटलेल्या. ६ चेंडूनें. ७ उसळून. ८ नाहींतरी. ९ पूजीला. १० बुरा-कृतघ्न. ११ उपकार न करी. १२ दातृत्वाभिमान नाहीं. १३ श्रेष्ठ. १४ शास्त्रास अनुसरून. १५ किंवा. १६ आमंत्रण करूं. १७ व्रत करणाराच्या. १८ व्याज. १९ द्रव्य. २० काढा. २१ आश्रयानें. २२ प्रत्युपकार करूं न शकणारास. २३ हातावर घाली. २४ मुकेपुरती. २५ स्वस्थ बसे, झुरे.

अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ।
असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥

[अदेशे–] मग म्लेंछाचे[1] वसौटे[2]। दारंगाणे[3] हन कैकटे[4]। कां शिबिरें[5] चोहटे। नगरींचे ते ॥ ९४ ॥ [अकाले] तेही तेही ठाईं मिळणी। समय सांजवेळ कां रजनी। [यद्दानं] तेव्हां उदार होणें[6] धनीं[7]। चोरियेच्या ॥ ९५ ॥ [अपात्रेभ्यश्च] पात्रें भाट नागारी[8]। सामान्य स्त्रिया कां जुवारी। जियें मूर्तिमंतें भुररीं[9]। भुले तयां ॥ ९६ ॥ नृत्याची पुरवणी[10]। ते पुढां डोळे भारणी[11]। गीतें[12] भाटींव, तो श्रवणीं। कर्णजप[13] ॥ ९७ ॥ तयाहीवरी अळुमाळ[14]। जैं घे *फुलागंधाचा गुगुळ। तंव भ्रमाचा तो वेताळ। अवतरे तैसा ॥९८॥ [असत्कृतं] तेथ विभांडू[15]नियां जग। आणिले पदार्थ अनेग। †तेणें घालूं लागे मोतंग[16]। गंवादीसि[17] ॥ ९९ ॥ [दीयते] एवं ऐसेनि जें देणें। तें तामसदान मी ह्मणें। [अवज्ञातं] आणि घडे दैवगुणें। आणिकही ऐक ॥ ३०० ॥ विपायें घुणाक्षर[18] पडे। टाळिये कौंउळा[19] सांपडे। तैसें तामसां पर्व जोडे। पुण्यदेशीं ॥ १ ॥ तेथ देखोनि तो आथिला[20]। योग्य मार्गोही आला। तोही दर्पा चढला। भांबावे जरी ॥ २ ॥ तरी श्रद्धा न धरी जीवीं। तया माथाही न खालवी। स्वयें न करी ना करवीं। अर्घ्यादिक ॥ ३ ॥ आलिया न घली बैसों। तेथ गंधाक्षतांचा काय अंतिसो[21]। हा अप्रसंग कीर असो। तामसीं नरीं ॥ ४ ॥ पैं बोळविजे रिणाइत। तैसा झेंकवी[22] तयाचा हात। तूं करणें याचा बहुत। प्रयोग तेथ ॥ ५ ॥ आणि जया जें दे किरीटी। तयातें उमाणी[23] तयासाठीं। मग कुबेलें[24] कां लोटी। ‡अवज्ञेच्या ॥ ६ ॥ [तत्तामसमुदाहृतं] हें बहु असो यापरी। मोल वेंचणें जें अवधारीं। तया नांव चराचरीं। तामस दान ॥ ७ ॥ ऐसें आपुलाल्या चिन्हीं। अळंकृतें तिन्हीं। दानें दाविलीं अभिधानीं। §राजतनया ॥ ८ ॥ [श्रीभगवानिलाद्येकविंशतिश्लोकाभिप्रायः] तेथ मी जाणत असें। विपायें[25] तूं गा ऐसें। ¶कल्पिसील मानसें। विचक्षणा[26] ॥ ९ ॥ जे भवबंधमोचक। येकलें कर्म सात्विक। तरी कां वेखासीं[27] सदोख। येर बोलावीं ॥ ३१० ॥ परि नोसंतितां[28] विवसी[29]। भेटी नाहीं निधीसी। कां धूं[30] न साहतां जैसी। वाती न लगे ॥ ११ ॥ तैसें शुद्धसत्वाआड। आहे रजतमाचें कवाड। तें भेदणेयातें कीड[31]।

* पुष्पगंधाचा. †तें घालूनि. ‡अवज्ञाचि. §रजतमाचिया. ¶न कल्पीं मानसें.

१ स्थानीं. २ अरण्यें. ३ अपवित्र भूमी. ४ तंबू. ५ ल्या ल्याही. ६ लूट. ७ गारुडी. ८ वेश्या. ९ चेटकें. १० नेत्रसुख. ११ स्तुती. १२ थोडासा. १३ पराभवून. १४ मांग. १५ अन्नछत्रास. १६ किड्यानें लांकूड पोखरलें ह्मणजे अक्षरासारखें दिसतें तें. १७ कावळा. १८ श्रीमान्. १९ विशेषत्व. २० झुगारी. २१ बजावी, अपमान करी. २२ दुष्ट शब्दांनीं. २३ कदाचित्. २४ बुद्धिवंता. २५ आढेवेढे घेऊन. २६ न निवारितां. २७ समंध. २८ धूर. २९ हीनकस, वाईट.

ह्मणावें कां ॥ १२ ॥ आह्मीं श्रद्धादिदानांत । जें समस्तही क्रियाजात । सांगीतलें कां व्याप्त । तिहीं गुणीं ॥ १३ ॥ तेथ भरवसेनि तिन्ही । न सांगोंचि ऐसें मानीं । परि सत्व दावाया दोन्हीं । बोलिलों येरें ॥ १४ ॥ जें दोहींमाजि तिजें असे । तें दोही सांडितांचि दिसे । अहोरात्रत्यागें जैसें । संध्यारूप ॥ १५ ॥ तैसें रजतमविनासें । तिजें जें उत्तम दिसे । तें सत्व हें आपैसें । फावासि ये ॥ १६ ॥ एवं दावावया सत्व तुज । निरूपिलें तम रज । तें सांडूनि सत्वें काज । साधीं आपलें ॥ १७ ॥ सत्वेंचि येणें चोखाळें । करीं यज्ञादिकें सकळें । पावसी तैं करतळें । आपलें निज ॥ १८ ॥ सूर्यें दाविलें सातें । काय एक न दिसे तेथें । तेविं सत्वें केलें फळातें । काय नेदी ॥ १९ ॥ हे कीर आवडतांविखीं । शक्ति सत्वीं आथि निकी । परि मोक्षेंसी एकी । मिसळणें जें ॥ ३२० ॥ तें एक आनचि आहे । तयाचा सावावो जैं लाहे । तैं मोक्षाचाही होये । गांवीं सैरतें ॥ २१ ॥ पैं भांगार जन्हीं पंधरें । तन्ही राजावळीचीं अक्षरें । लाहे तैंचि सरें । जियापरी ॥ २२ ॥ स्वच्छें शीतळें सुगंधें । जळें होती सुखप्रदें । परि पवित्रत्व संबंधें । तीर्थाचेनि ॥ २३ ॥ नेयी हो कां भलतैसी थोरी । परि गंगा जैं अंगिकारी । तैंचि तिये सागरीं । प्रवेश गा ॥ २४ ॥ तैसें सात्विका कर्मा किरीटी । येतां मोक्षाचिये भेटी । न पडे आडकाठी । तें वेगळें आहे ॥ २५ ॥ हा बोल आंयकतखेवीं । अर्जुना आधि न माये जीवीं । ह्मणे देवें कृपा करावी । सांगावें तें ॥ २६ ॥ तेथ कृपाळुचक्रवर्ती । ह्मणे आईक तयाची व्यक्ती । जेणें सात्विक तें मुक्ती । *रल देखे ॥ २७ ॥

ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।

ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥ २३ ॥

[ब्रह्मणः] तरि अनादि परब्रह्म । जें जगदादि विश्रामधाम । तयाचें एक नाम । त्रिधा पैं असे ॥ २८ ॥ तें कीर अनाम अजाती । परि अविद्यावर्गाचिये राती माजि वोळखावया श्रुती । खूण केली ॥ २९ ॥ [निर्देशः] उपजलिया बाळकासी । नांव नाहीं तयापासीं । ठेविलेनि नांवेंसी । ओ देत उठी ॥३३०॥ कष्टले संसारशिणें । जे देवो येती गाऱ्हाणें । तयां ओ दे नांवें जेणें । तो संकेत हा ॥ ३१ ॥ ब्रह्माचा अबोला फिटावा । †अद्वैतत्वें तो भेटावा । ऐसा मंत्र देखिला कर्णवा । वेदें बापें ॥ ३२ ॥ मग दाविलेनि जेणें एकें । ब्रह्म आळविलें कवतिकें । मागां असत ठाके । पुढां उभें ॥ ३३ ॥ परि निर्ग-

* देखिलें. † अद्वैत द्वैतत्वें.

१ प्राप्त होतें. २ शुद्ध. ३ स्वरूप. ४ असतां. ५ सर्वथोपरी, पाहिजे त्याविषयीं. ६ साह्य. ७ वंद्य. ८ नदी. ९ विघ्न. १० ऐकतांच. ११ मनोव्यथा. १२ दयेचा सार्वभौम. १३ विश्रांतिस्थान. १४ नामजातिरहित.१५ खूण. १६ अनिर्वाच्यपण. १७ कृपेनें. १८ वेद हाच पर्वत त्याचे शिखरावर.

माचळशिखरीं । उपनिषदार्थ नगरीं । आहाति जे ब्रह्माच्या येकाहारीं[१] । तयांसीच कळे ॥ ३४ ॥ हेंही असो प्रजापती । शक्ति जे सृष्टि करिती । ते जया एका आवृत्ती[२] । नामाचिये ॥ ३५ ॥ [पुरा] पैं सृष्टीचिया उपक्रमा[३] । पूर्वी गा वीरोत्तमा । वेडा ऐसा ब्रह्मा । एकला होता ॥ ३६ ॥ मज ईश्वरातें नोळखे । ना सृष्टीही करूं शके । तो थोर केला ऐकें । नामें जेणें ॥३७॥ [त्रिविधः स्मृतः] जयाचा अर्थ जीवीं ध्यातां । जें वर्णत्रयचि जपतां । विश्वसृजनयोग्यता[४] । आली तया ॥ ३८ ॥ [ब्राह्मणास्तेन वेदाश्च] तेधवां रचिले ब्रह्मजन[५] । तयां वेद दिधले शासन[६] । यज्ञा ऐसें वर्तन । जीविके[७] केलें ॥ ३९ ॥ [विहिताः] पाठीं नेणों किती येर । सृजिले लोक अपार । जाले ब्रह्मदत्त अग्रहार[८] । तिन्हीं भुवनें ॥ ३४० ॥ ऐसें नाममंत्रें जेणें । धातया[९] अढळचि करणें । तयाचें स्वरूप आइक ह्मणें । श्रीकांत तो ॥ ४१ ॥ [ओं तत्सदिति] तरि सर्वमंत्रांचा राजा । तो प्रणव[१०] आदिवर्ण बुझा[११] । आणि तत्कार दुजा । तिजा सत्कार ॥ ४२ ॥ एवं ओंतत्सदाकार । ब्रह्मनाम हें त्रिःप्रकार । हें फुल तुरंबी[१३] सुंदर । *उपनिषद्[१४] । तें ॥ ४३ ॥ येणेंसीं गा होऊनि एक । जैं कर्म चाले सात्विक । तैं कैवल्यातें पोइक[१५] । घरिचें करी ॥ ४४ ॥ परि कापुराचें थोळेव[१६] । आणुनि देईल दैव । लेवों जाणणेंचि अडव[१७] । तेथ असे बापा ॥ ४५ ॥ तैसें आदरिजेल सत्कर्म । उच्चरिजेल ब्रह्मनाम । परि नेणिजेल जरि वर्म । विनियोगाचें[१८] ॥ ४६ ॥ तरि महंताचिया कोडी[१९] । घरा आलियाही वोढी[२०] । मानूं नेणता †परवडी[२१] । मुदल तुटे ॥ ४७ ॥ कां ल्यावया चोखट । टीक[२२] भांगार[२३] एकवट । घालूनि बांधली मोट । गळां जेवीं ॥ ४८ ॥ तैसें तोंडीं ब्रह्मनाम । हातीं तें सात्विक कर्म । विनियोगेंवीण काम । विफळ होय ॥ ४९ ॥ अगा अन्न आणि भूक । पासीं असे परि देख । जेऊं नेणतां बाळक । लंघनचि कीं ॥ ३५० ॥ कां स्नेह[२४] सूत्र वैश्वानरा । जालियाही संसारा[२५] । हातवटी नेणतां वीरा । प्रकाश नोहे ॥५१॥ तैसें वेळे कृत्य पावे । तेथिंचा मंत्रही आठवे । परि व्यर्थ तें आघवें । विनियोगेंवीण ॥ ५२ ॥ ह्मणौनि वर्णत्रयात्मक । जें हें परब्रह्मनाम एक । विनियोग तूं आइक । याचा आतां ॥ ५३ ॥

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ।
प्रवर्तंते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ॥ २४ ॥

[ब्रह्मवादिनां] तरि या नामीचीं अक्षरें तिन्हीं । कर्मा आदि मध्य निर्देनीं[२६] ।

---

* उपनिषदांतें. † अपरवडी.

१ पंक्तीस. २ अनुष्ठानानें, उच्चारानें. ३ आरंभाच्या. ४ उत्पत्ति करण्याचें सामर्थ्य. ५ ब्राह्मण. ६ आज्ञा. ७ निर्वाहासाठीं. ८ इनाम. ९ ब्रह्मदेवाला. १० श्रेष्ठ. ११ ओंकार. १२ समजा. १३ हुंगी. १४ चाकर. १५ अलंकार. १६ अडथळा. १७ व्यवस्थेचें. १८ कोटी. १९ ओढीनें. २० प्रकार. २१ पुण्याचा क्षय होई. २२ अलंकारविशेष, टीका. २३ सोनें. २४ तेल, वात व आग. २५ मेळणी. २६ शेवटीं.

प्रयोजावीं[1] पैं स्थानीं । इहीं तिन्हीं ॥ ५४ ॥ हेचि एकी हातवटी । घेउनी हन किरीटी । आले ब्रह्मविद[2] भेटी । ब्रह्माचिये ॥ ५५ ॥ ब्रह्मेसीं होआवया एकी । ते न वंचिती[3] यज्ञादिकीं । जें चावळलें वोळखी । शास्त्रांचिया ॥ ५६ ॥ [तस्मादोमित्युदाहृत्य]*तो आदि तंव ओंकार । ध्यानें करिती गोचर[4] । पाठीं आणिती उच्चार । वाचेही तो ॥ ५७ ॥ तेणें ध्यानें प्रकटें । प्रणवोच्चारें स्पष्टें । लागती मग वाटे । क्रियांचिये ॥ ५८ ॥ आंधारीं अभंग दिवा । आडवीं समर्थ बोळावा[5] । तैसा प्रणव जाणावा । कर्मारंभीं ॥ ५९ ॥ [यज्ञ-] उचितदेवोद्देशें । द्रव्यें धर्म्यें आणि बहुवसें । द्विजद्वारा हन हुताशें । यजिती पैं ते ॥ ३६० ॥ आहवनीयादि[6] वन्हीं । निक्षेपरूपीं हवनीं । यजिती पैं विधानीं । फुंडे[7] होउनी ॥ ६१ ॥ किंबहुना नाना याग । निष्पत्तीचें घेउनी अंग । करिती नावडतेया त्याग । उपाधीचा[8] ॥ ६२ ॥ [दान-] कां न्यायें जोडला पवित्रीं । भूम्यादिकीं स्वतंत्रीं । देशकाळशुद्ध पात्रीं । देती दानें ॥६३॥ [तपः-] अथवा एकांतरा[9] कृच्छ्रीं । चांद्रायणें मासोपवासीं । शोधूनि गा धातुराशी । करिती तपें ॥ ६४ ॥ एवं यज्ञदान तपें । जियें गाजती बंधरूपें । तिहींच होय सोपें[10] । मोक्षाचें तयां ॥ ६५ ॥ स्थळीं[11] नावा[12] जिया दाटिजे[13] । जळीं तियाचि जेवीं तरिजे[14] । तेविं बंधकीं कर्मीं सुटिजे । नामें येणें ॥ ६६ ॥ परि हें असो ऐसिया । [क्रियाः] या यज्ञदानादिक्रिया । [प्रवर्तते विधानोक्ताः सततं] ओंकारें[15] सोंवायिलिया[16] । प्रवर्तती ॥ ६७ ॥ तिया मोटकियो[17] जेथ फळीं । रिगों पाहाती निहाळीं[18] । प्रयोजिती तियेकाळीं । तच्छब्द तो ॥ ६८ ॥

तदित्यनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः ।
दानक्रियाश्च विविधाः क्रियंते मोक्षकांक्षिभिः ॥ २५ ॥

[तदिति] जें सर्वाही जगाप्रति[19]रौतें । जें एक सर्वही[20] देखतें । जें तच्छब्दें बोलिजेतें । ‡पैल वस्तु ॥ ६९ ॥ [दानेति] ते सर्वादिकत्वें चित्तीं । तद्रूप ध्यावुनियां सुमती । उच्चारेंही व्यक्ती । आणिती पुढती ॥ ३७० ॥ ह्मणती तद्रूपा ब्रह्मा तया । फळेंसीं क्रिया इया । तेचि होतु आह्मां भोगावया । कांहींचि नुरो ॥ ७१ ॥ ऐसेनि तदात्मकें ब्रह्में । तेथ उगाणूनि[21] कर्में । आंग झाडिती नेमेंमें[22] । येणें बोलें ॥ ७२ ॥ आतां ओंकारें आदरिलें । तत्कारें समर्पिलें । इया रिती जया आलें । ब्रह्मत्व कर्मा ॥ ७३ ॥ तें कर्म कीर ब्रह्माकारें । जालें तेणेंही न सरे । जें करी तेणेंसी दुसरें । आहे ह्मणौनि ॥ ७४ ॥ मीठ आगें

* ते आधीं तंव. † तैं हेंच. ‡ पहिल वस्तु.

१ योजावीं. २ ब्रह्मज्ञानी. ३ त्यागिती. ४ बोललें. ५ प्रत्यक्ष. ६ सोवती. ७ आहवनीय, दक्षिणाग्नि व गार्हपत्य हे अग्निहोत्राचे तीन अग्नि. ८ दक्ष. ९ अहंकृतीचा. १० एक दिवस मध्यें सोडून भोजन करणें. ११ कडेस. १२ तारूं. १३ बैसावें. १४ सांग झाल्यास. १५ अल्प. १६ पहा. १७ पलीकडे, निराळे. १८ प्रकाशक. १९ समर्पून. २० माझें नाहीं ह्मणून.

जळीं विरे । परि क्षारता वेगळी उरे । तैसें कर्म ब्रह्माकारें । गमें तें द्वैत ॥ ७५ ॥ आणि दुजें जंव जंव घडे । तंव तंव संसारभय जोडे । हें देवो आपलेनि तोंडें । बोलती वेदें ॥ ७६ ॥ ह्मणोनि परत्वें ब्रह्म असे । तें आत्मत्वें *परियेवसे । सच्छब्द या रिणादोषें । ठेविला देवें ॥ ७७ ॥ तरि ओंकार तत्कारीं । कर्म केलें जें ब्रह्मशरीरीं । जें प्रशस्तादि बोलवरी । वाखाणिलें ॥ ७८ ॥ प्रशस्तकर्मीं तिये । सच्छब्दा विनियोग आहे । तोचि आइका होये । तैसा सांगों ॥ ७९ ॥

सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते ।
प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते ॥ २६ ॥

[सद्भावे] तरि सच्छब्दें येणें । आदूनि असतायें नाणें । दाविजे अव्यंगवाणें । सत्तेचें रूप ॥ ३८० ॥ जे †सतचि काळें देशें । होऊं नेणेचि अनारिसें । आपणपां आपण असे । अखंडित ॥ ८१ ॥ [साधुभावे च] हें ‡दिसतें जेतुलें आहे । तें असतपणें जें नोहे । देखतां रूपीं सोये । लाभे जयाची ॥ ८२ ॥ [प्रशस्ते कर्मणि तथा] तेणेंसी प्रशस्त तें कर्म । जें जालें सर्वात्मक ब्रह्म । देखिजे करूनि सम । ऐक्यबोधें ॥ ८३ ॥ [सच्छब्दः पार्थ युज्यते] तरी ओंकार तत्कारें । जें कर्म दाविलें ब्रह्माकारें । तें §गिळूनि होइजे एकसरें । सन्मात्रचि ॥ ८४ ॥ ऐसा हा अंतरंग । सच्छब्दाचा विनियोग । जाणा ह्मणे श्रीरंग । मी न ह्मणें हो ॥ ८५ ॥ ना मीचि जरि हो ह्मणें । तरि श्रीरंगीं दुजें हेंचि उणें । ह्मणौनि हें बोलणें । देवाचेंचि ॥ ८६ ॥ [सदित्येतत्प्रयुज्यते] आतां आणिकीही परी । सच्छब्द हा अवधारीं । सात्विककर्मा करी । उपकार जो ॥ ८७ ॥ तरी सत्कर्मे चांगें । चालिलीं अधिकारबेगें । परि एकाधे कां आंगें । हिणावती जैं ॥ ८८ ॥ तैं उणें एकें अवयवें । शरीर ठाके आघवें । कां अंगहीना भांडावे । रथाची गती ॥ ८९ ॥ तैसें एकेचि गुणेंवीण । सतचि परी असतपण । कर्म धरी गा जाण । जिये वेळे ॥ ३९० ॥ तेव्हां ओंकार तत्कारीं । सांवायिला हा चांगी परी । सच्छब्द कर्मा करी । जीर्णोद्धार ॥ ९१ ॥ तें असतपण फेडी । आणी सद्भावाचिये रूढी । निजसत्वाचिये प्रौढी । सच्छब्द हा ॥ ९२ ॥ दिव्यौषध जैसें रोगिया । कां सांवावो ये भंगलिया । सच्छब्द कर्मा व्यंगलिया । तैसा जाण ॥ ९३ ॥ अथवा कांहीं प्रमादें । कर्म

---

* परिवसे. † सत्तेचे. ‡ दिसे तें. § गिळूनि.

१ आपलें तोंड हाच कोणी वेद ह्यणें. २ दुसरेपणें. ३ निद्रानास पावे. ४ ऋणोद्देशानें. ५ ब्राह्मणदेहीं. ६ ऐकण्याजोगा. ७ सांगोपांग. ८ वेगळें. ९ वाट, मार्ग. १० टाकून. ११ व्यवस्था. १२ उणीव. १३ मार्गे. १४ न्यून होती. १५ चक्रहीना. १६ बंद होते. १७ साध्यभूत असा, अवयवविशिष्ट झालेला. १८ आणतो. १९ सावयवत्व. २० न्यून झालें असतां, अंगरहिताला.

आपुलिये मर्यादे । चुकोनि पडे निषिद्धे । वाटे हन ॥ ९४ ॥ चालतयाचि मार्ग सांडे । पारखियाचि अेखरें पडे । राहाटीमाजि न घडे । काइ काइ ॥ ९५ ॥ ह्मणौनि तैसी कर्मा । रांभस्यें सांडे सीमा । असाधुत्वाचिया दुर्नामा । येवों *पाहे जें ॥ ९६ ॥ तेथ गा हा सच्छब्दु । येरां दोहींपरीस प्रबुद्धु । प्रयोजिला करी साधु । कर्मातें यया ॥ ९७ ॥ लोहा परिसाची घृष्टी । वोहळा गंगेची भेटी । कां मृता जैसी वृष्टी । पीयूषाची ॥ ९८ ॥ पैं असाधुकर्मा तैसा । सच्छब्दप्रयोग वीरेशा । हें असो गौरवचि ऐसा । नामाचा यया ॥ ९९ ॥ घेऊनि येथिंचें वर्म । जैं विचारिसी हें नाम । तैं केवळ हेंचि ब्रह्म । जाणसी तूं ॥ ४०० ॥ पाहेंपां ओं तत्सत् ऐसें । हें बोलणें तेथ नेतसे । जेथूनि कां हें प्रकाशे । दृश्यजात ॥ १ ॥ तें तंव निर्विशिष्टं । परब्रह्म चोखट । तयाचें हें आंतुवट । व्यंजक नाम ॥ २ ॥ परि आश्रय आकाशा । आकाशचि कां जैसा । या नामा नामीं आश्रय तैसा । अभेद असे ॥ ३ ॥ उदयिला आकाशीं । रवीचि रवीतें प्रकाशी । हे नामव्यक्ती तैसी । †ब्रह्मचि करी ॥ ४ ॥ ह्मणौनि त्र्यक्षर हें नाम । नव्हे जाण केवळ ब्रह्म । ‡याहीलागीं कर्म । जें जें कीजे ॥ ५ ॥

यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते ।
कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥ २७ ॥

[यज्ञे इति] ते याग अथवा दानें । तपादिकेंही गहनें । तियें निफजतु कां न्यूनें । होऊनि ठातु ॥ ६ ॥ परि परिसाचा वैरकळीं । नाहीं चोखाकीडाची बोली । तैसीं ब्रह्मीं §अर्पितां केलीं । ब्रह्मचि होती ॥ ७ ॥ उणिया पुरयाची परी । नुरेचि तेथ अवधारीं । निवडूं न येती सागरीं । जैसिया नदी ॥ ८ ॥ एवं पार्था तुजप्रती । ¶ब्रह्मनामाची हे शक्ती । सांगीतली उपपत्ती । डोळसा गा ॥ ९ ॥ आणि येकें कांहीं अक्षरा । वेगळवेगळा वीरा । विनियोगु नागरा । बोलिलों रीती ॥ ४१० ॥ एवं ऐसें सुमहिम । ह्मणौनि हें ब्रह्मनाम । आतां जाणीतलें कीं सुवर्म । राया तुवां ॥ ११ ॥ तरी येथुनि यांचि श्रद्धा । उपलविली हो सर्वदा । जयाचें जालें बंधा । उरों नेदी ॥ १२ ॥ [कर्म चैवेति] जिये कर्मीं हा प्रयोग । अनुष्ठिजे सद्विनियोग । तेथ अनुष्ठिला सांग । वेदचि तो ॥ १३ ॥

---

* पाहे जैं. † ब्रह्माकारी. ‡ यालागीं. § अर्पित कर्में. ¶ ब्रह्मज्ञानाची.

१ परीक्षकाची. २ श्रम, खरें नव्हे तें. ३ अविचारें. ४ ज्ञाता. ५ घर्षण. ६ ओढ्याला. ७ अमृताची. ८ उंचारिसी. ९ दृष्टिगोचर सर्व पदार्थ. १० अपरिच्छिन्न. ११ अंतर्गत. १२ जाणविणारें. १३ वाच्यवाचकत्व. १४ तीनअक्षरी. १५ उपजोत. १६ कसोटींत. १७ चांगल्यावाइटाची, उत्तम व हिणकट सोन्याची. १८ व्यवस्था. १९ चांगल्या. २० मोठ्या महिमेचें. २१ नामाची. २२ विस्तारिली. २३ जन्मबंधास.

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥ २८ ॥ ४१५

हरिः ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे श्रद्धात्रयविभागयोगो नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

[अश्रद्धया हुतं] ना सांडूनि हे सोये[1]. मोडूनि श्रद्धेची बाहे[2]. दुराग्रहाची त्राये[3]. वांढऊनियां ॥ १४ ॥ मग अश्वमेध कोडी कीजे । [दत्तं] रत्नें भरोनि पृथ्वी दीजे । [तपस्तप्तं] एकांगुष्टींही तपिजे । तपसाहस्रीं ॥ १५ ॥ [कृतं च यत्] जळाशयाचेनि नांवें । समुद्रही कीजती नवे । परि किंबहुना आघवें । वृथाचि तें ॥ १६ ॥ [असदित्युच्यते पार्थ] पाषाणावरी वर्षलें । जैसें भस्मीं हवन केलें[4]. कां खेंव[5] दीधलें । साउलिये ॥ १७ ॥ ना तरि जैसें चडकणी[6]. *गगन हाणीतलें अर्जुना । तैसा समारंभ सुंणा[7]. गेलाचि तो ॥ १८ ॥ घाणा गाळिले गुंडे । तेल ना पेंडी जोडे । तैसें दरिद्र तेवढें । ठेलेंचि आंगीं ॥१९॥ गांठीं बांधली खापरी । येथ अथवा पैलतीरीं । नसेरोनि[8] जैसी मारी । उपवासीं गा ॥ ४२० ॥ [न च तत्प्रेत्य नो इह] तैसें कर्मजातें तेणें । नाहीं ऐहिकींचें भोगणें । तेथ परत्र तें कवणें । †अपेक्षावें ॥ २१ ॥ ह्मणौनि ब्रह्मनामश्रद्धा । सांडूनि कीजे ‡जो धांदा । हें असो सिणू[9] नुसधा[10]. दृष्टादृष्टीं तो ॥ २२ ॥ ऐसें कलुषकरिकेसरी[11]. त्रितापतिमिरतमारी[12]. श्रीवर-वीर-नरहरी । बोलिलें तेणें ॥ २३ ॥ तेथ निजानंदा बहुवसा । माजि अर्जुन तो सहसा । हरपला चंद्र जैसा । चांदिणेनि ॥ २४ ॥ अहो संग्राम हा वाणिया[13]. मापें[14] नाराचांचिया आणिया । सूनि §मांस घे मवणिया[15]. जीवितेंसी ॥ २५ ॥ ऐसिया समयीं कर्कशें[16]. ¶भोगीजत स्वानंदराज्य कैसें । आजि भाग्योदय[17] हा नसे । आणिके ठाईं ॥ २६ ॥ संजय ह्मणे कौरवराया । गुणा रिझोये रिपूचिया । आणि गुरुही हा आमुचिया । सुखाचा येथ ॥ २७ ॥ हां न पुसता हे गोठी । तरि देव कां सोडिते गांठी । तरि कैसेनि आह्मां भेटी । परमार्थेंसीं ॥ २८ ॥ होतों अज्ञानाच्या आंधारां । वोसंतीतें[18] $जन्मवाहरा[19]. तों आत्मप्रकाशमंदिरा । आंत आणिलें ॥ २९ ॥ येवढा आह्मां तुह्मां थोर । केला येणें

---

* गगना हाणिलें. † आक्षेपावें. ‡ तो धांदा. § माप. ¶ मोजीत. $ जन्मकोटिवरी.

---

१ मार्ग. २ हात, आश्रय. ३ सत्ता. ४ अलिंगन. ५ धडपडीनें, थापटीनें. ६ शून्य. ७ कामी न पडे. ८ नुसता शीण. ९ इहपर. १० पातकरूप हत्तीला सिंह. ११ व्यापार. १२ बाणाचीं अग्रें. १३ मोजणीस. १४ कठोर. १५ प्रीति उत्पन्न होते. १६ करीत, आचरीत. १७ येरझार, वारी.

उपकार । ह्मणोनि हा व्याससहोदर । गुरुत्वें होय ॥ ४३० ॥ तेविंचि संजयो ह्मणे त्रिर्त्तीं । हा अतिशय या नृपती । खुपेल ह्मणौनि किती । *बोलत असों ॥ ३१ ॥ ऐसी हे बोली सांडिली । मग येरीचि गोठी आदरिली । जे पार्थें कां पुसिली । श्रीकृष्णातें ॥ ३२ ॥ याचें जैसें कां करणें । तैसें मीही करीन बोलणें । ऐकिजो ज्ञानदेव ह्मणे । निवृत्तीचा ॥ ४३३ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

श्लोक २८, ओव्या ४३३.

---

* बोललों असो.

१ व्यासाचा भाऊ. २ खोंचेल.

ज्ञानेश्वरी.

अध्याय १८ वा.

जयजय देव निर्मळ । निजजनाखिलमंगळ । जन्मजराजलदजाळ-। प्रभंजन ॥ १ ॥ जयजय देव प्रबळ । विदळितामंगळकुळ । निगमागमद्रुमफळ । फलप्रद ॥ २ ॥ जयजय देव सकळ । विगतविषयवत्सल । कलितकाळकौतूहल । कलातीत ॥ ३ ॥ जयजय देव निश्चळ । चलितचित्तपानतुंदिल । जगदुन्मीलनाविरळ । केलिप्रिय ॥ ४ ॥ जयजय देव निष्कळ । *स्फुरदमंदानंदबहळ । नित्यनिरस्ताखिलमळ । मूळभूत ॥ ५ ॥ जयजय देव स्वप्रभ । जगदंबुदगर्भनभ । भुवनोद्भवारंभस्तंभ । भवध्वंस ॥ ६ ॥ जयजय देव विशुद्ध । †अविद्योद्यानद्विरद । शमदममदनमदभेद । दयार्णव ॥ ७ ॥ जयजय देवैकरूप । अतिकृतकंदर्पसर्पदर्प । भक्तभाव‡भुवनदीप । तापापह ॥ ८ ॥ जयजय देव अद्वितीय । परिणतोपरमैकप्रिय । निजजनजित भजनीय । मायागम्य ॥ ९ ॥ जयजय देव श्रीगुरो । अकल्पनाकल्पतरो । स्वसंविद्रुमबीजप्ररो- । हणावनी ॥ १० ॥ हें काय एकैक ऐसें । नानापरिभाषावशें । स्तोत्र करूं तुजदोषें । निर्विशेषा ॥ ११ ॥ जिहीं विशेषणीं विशेषिजे । तें दृश्य नव्हे रूप तुझें । जें जाणें मी ह्मणोनि लाजें । वर्णना इहीं ॥ १२ ॥ परि मर्यादेचा सागर । हा तंवचि तया डोंगर । जंव न देखे सुधाकर । उदया आला

---

* स्फुरदानंदकंदल. † अविदुदयोद्यान, अविद्योदय,°दयोद्यानारविंद. ‡ भवनदीप.

---

१ स्वभक्तांला सर्वथैव मंगलकारक. २ जन्मवार्धक्यादिरूपी मेघाला. ३ नाशकर्ता वायु. ४ नाशिलीं आहेत अमंगलार्ची=अकल्याणाचीं कुळें ज्यानें. ५ विगतविषय=वैराग्यसंपन्न यांचा प्रिय. ६ कृतांतउत्साहनाशक. ७ चंचल चित्ताच्या प्राशनानें दोंदिल. ८ जगास प्रकट करून त्यांत व्यापक. ९ अत्यानंद स्फुरद्रूप करणारा अशा. १० सर्व पापींचा जेथें सर्वकाळ नाश आहे असा. ११ स्वयंप्रकाश. १२ जगद्रूप मेघाच्या आकाशा. १३ जगद्रूप उत्पत्तीचा मूळस्तंभ. १४ संसारनाशक. १५ उपाधिरहित, निर्मळ. १६ अविद्यारूप वनाचा नाश करणारा हत्ती. १७ कामनदाचा शमदमेंकरून नाश करणारा. १८ एक रूपच देव. १९ कामसर्पाच्या गर्वाचा तिरस्कार करणारा. २० भाविकभक्तचित्तमंदिराचा दीप. २१ परिपक्व आहे उपरम=शांति ज्यांस त्यांला एकप्रिय=अत्यंत प्रिय, पूर्णवैराग्यशील प्रिय ज्यास. २२ भक्ताधीन व भजनयोग्य असा. २३ मायेस अगम्य. २४ कल्पनारहित कल्पवृक्षा, संकल्पामाववदाता. २५ स्वकीय ज्ञानवृक्षाच्या बीजास उत्पत्तिस्थान. (हीं सर्व संबोधनें आहेत.) २६ अनेक प्रकारच्या प्रत्ययांनीं. २७ तुझ्या हेतूनें. २८ ज्यापेक्षां विशेष कांहीं नाहीं अशा. २९ बोलावें. ३० वर्णावयास. ३१ ख्याती, आळ, प्रतिबंध.

॥ १३ ॥ सोमकांत निजनिर्झरीं । चंद्रा *अर्घ्यादिक न करी । तें तोचि अवधारीं । करवी कीं जी ॥ १४ ॥ नेणों कैसी वसंतसंगें । अवचितिया वृक्षाचीं अंगें । फुटती तैं तयांही जोगें । धरणें नोहे ॥ १५ ॥ पद्मिनी रविकिरण । लाहे मग लाजे कवण । कां जळें शिंवतलें लवण । आंग भुले ॥ १६ ॥ तैसा तूतें जेथ मी स्मरें । तेथ मीपण मी विसरें । मग जोकळिला ढेंकरें । तृप्त जैसा ॥ १७ ॥ मज तुवां जी केलें तैसें । माझें मीपण दवडूनि देशें । स्तुतिमिषें पात्र पिसें । बांधलें वाचे ॥ १८ ॥ ना येन्हवीं तरी आठवीं । राहोनि स्तुति जै करावी । तैं गुणागुणीं धरावी । सैरोभरी कीं ॥ १९ ॥ तरि तूं जी एकरसाचें लिंग । केविं करूं गुणागुणीं विभाग । मोतीं फोडोनि सांधितां चांग । कीं तैसेंचि भलें ॥ २० ॥ आणि बाप तूं माय । इहीं बोलीं ना स्तुती होय । डिंभोपाधिक आहे । विटाळ तेथें ॥ २१ ॥ जी जालेनि पाइकें आलें । तें गोसांवीपण केविं बोलें । ऐसें उपाधी उर्शिटलें । काय वर्णूं ॥२२॥ जरि आत्मा तूं एकसरा । हेंही † ह्मणतां दातारा । तरी आंतुल तूं बाहेरा । †धांपतासी ॥ २३ ॥ ह्मणूनि सत्यचि तुजलागीं । स्तुती न देखों जी जगीं । मौनावांचूनि लेणें आंगीं । सुसीना मा ॥ २४ ॥ स्तुती कांहीं न बोलणें । पूजा कांहीं न करणें । सन्निधी कांहीं न होणें । तुझ्या ठायीं ॥ २५ ॥ तरि जितलें जैसें भुली । पिसें आलाप घाली । तैसें वानूं तें माउली । उपसाहावें तुवां ॥२६॥ आतां गीतार्थाची मुक्तमुदी । लेववीं माझिये वाग्वृद्धी । जेणें मानें हे सभा सदीं । सज्जनाच्या ॥ २७ ॥ तेथ ह्मणितलें श्रीनिवृत्ती । नको हें पुढतपुढती । परिसीं लोहा घृष्टी किती । वेळवेळा कीजे गा ॥ २८ ॥ तंव विनवी ज्ञानदेव । ह्मणे हो कां जी पैसाव । तरि अवधान देतु देव । ग्रंथा आतां ॥ २९ ॥ [प्रासादकलशरूपकत्वेनाष्टादशं वर्णयति] जी गीतारत्नप्रासादाचा । कळस अर्थचिंतामणीचा । सर्व गीतादर्शनाचा । पाढाऊ जो ॥ ३० ॥ लोकीं तरी आथी ऐसें । जे दुरूनि कळस दिसे । आणि भेटीचि होतवसे । देवतेची तियें ॥३१॥ तैसेंचि एथही आहे । जे एकेचि येणें अध्यायें । आघवाची दृष्ट होये । गीतागम हा ॥ ३२ ॥ मी कळस याचि कारणें । अठरावा अध्याय ह्मणें । §डवाइला, बादरायणें । गीताप्रासादा ॥ ३३ ॥ नोहे कळसापरतें कांहीं ।

* अर्घ्यादिक करी. † ह्मणों दातारा. ‡ व्यापितोसि. § वायिला.

१ अंगांतून पाझरलेल्या. २ व्यापिला, वश्य केला. ३ वेड. ४ साहित्य, बरोबरी. ५ अखंडकरसाची मूर्ती. ६ लेंकराच्या उपाधीचा. ७ श्रेष्ठता. ८ उष्टें. ९ एकदम. १० सांपडतास. ११ घालीत नाहींस कीं. १२ जिंकलें. १३ भ्रांतीनें. १४ भ्रमलेलें. १५ बडबड करी. १६ वर्णूं. १७ मोत्यांची आंगठी, अकुंठित मुद्रा. १८ मान्य होईल. १९ पुनःपुनः. २० घर्षण. २१ प्रसाद. २२ देवळाचा. २३ चिंतामणितुल्य अर्थयुक्त. २४ बोधक संग्रह. २५ हस्तगत होई. २६ गीताशास्त्र. २७ वर्णिला, 'वायिला' या पाठीं घातला, अर्पिला. २८ अधिदेव्यासानें. २९ शिखरापेक्षां श्रेष्ठ.

प्रासादी काम नाहीं । तें सांगतसे गीताही । संपलेपणें ॥ ३४ ॥ व्यास सहजे सूत्री बळी । तेणें निगमरत्नाचळीं । उपनिषदार्थांची माळी । माजी खांडिली ॥ ३५ ॥ तेथ त्रिवर्गाचा *अणुआरु । ओडऊ निघाला जो अपारु । तो महाभारतप्राकारु । भोंवता केला ॥ ३६ ॥ माजि आत्मज्ञानाचे एंकवट । दळवाडें झाडूनि चोखट । घडिलें पार्थवैकुंठ । संवाद कुंसरी ॥ ३७ ॥ निवृत्तिसूत्र-सोडणियां । सर्वशास्त्रार्थ पुरवणिया । आंवो साधिला मांडणिया । मोक्षरेखेचा ॥ ३८ ॥ ऐसेनि करितां उभारा । पंधरा अध्यायांत पंधरा । भूमी निवाळलिया पुरा । प्रासाद जाहाला ॥ ३९ ॥ उपरि सोळावा अध्याय । तो ग्रीवे घंटेचा आय । सप्तदश तो ठाय । पडघाणिये ॥ ४० ॥ तयाहीवरी अष्टादश । तो अंपैसा मांडला कळस । उभारि गीतादिकीं व्यास । ध्वज लागला ॥ ४१ ॥ ह्मणोनि मागील जे अध्याय । ते चढते भूमीचे आंय । तयांचें पुरें दावित्महे । आपुल्या आंगीं ॥ ४२ ॥ जालया कोंमा नाहीं चोरी । ते कळसें होय उजरी । तेविं अष्टादश विवरी । साद्यंत गीता ॥ ४३ ॥ ऐसा व्यासें विदोणिये । गीताप्रासादु †जोडणिये । आणूनि राखिले प्राणिये । नानापरी ॥ ४४ ॥ एक प्रदक्षिणा जपाचिया । बाहेरोनि करिती यया । एक ते श्रवणमिषें छाया । सेविती यायाची ॥ ४५ ॥ एक ते अवधानाचा पुरा । विडापाउड भीतरां । घेऊनि रिघती गाभारां । अर्थज्ञानाच्या ॥ ४६ ॥ ते निजबोधें उरोउरी । भेटती आत्मया श्रीहरी । परि मोक्षप्रासादीं सरी । सर्वांही आथी ॥ ४७ ॥ समर्थाचिये पंक्तिभोजनें । तळिल्या वरिल्या एक पक्वान्नें । तेविं श्रवणें अर्थें पठणें । मोक्षचि लाभे ॥ ४८ ॥ ऐसा गीतावैष्णव प्रासाद । अठरावा अध्याय कळस विदेश । म्यां ह्मणितला हा भेद । जाणोनियां ॥ ४९ ॥ [अष्टादशाध्यायोत्पत्तिप्रस्तावः] आतां सप्तदशपाठीं । अध्याय कैसेनि उठी । तो संबंध सांगों दिठी । दिसे तैसा ॥ ५० ॥ कां गंगायमुनाउदक । वोघबळें वेगळिक । दावी होऊनि एक । पाणीपणें ॥ ५१ ॥ न मोडतां दोन्ही आकार । घडिलें एक शरीर । हें अर्धनारीनटेश्वर । रूपीं दिसे ॥ ५२ ॥ ना ना वाढली दिवसें । कळा

---

* अनुकार. † सोडणिये.

१ श्रेष्ठ कारागीर, सुतार. २ जमिनींत. ३ धर्म, अर्थ, काम यांचा. ४ चाराचुरा. ५ गाळ, असार. ६ आवार, दुर्ग. ७ एकत्र. ८ चिरे वगैरे साहित्य. ९ कृष्णार्जुनसंवाद. १० चातुर्यानें. ११ अंतर्मुखतेची कारागिरी. १२ सांडण्यानें. १३ आकार. १४ मोक्षमर्यादेचा. १५ पंधरा अध्यायरूप थरांनीं पूर्ण सिद्ध झालेल्या. १६ गळमण्याचा आकार. १७ कळसाची बैठक, मध्यमघंटेची जागा. १८ आपोआप. १९ विस्तार. २० लांबीरुंदीचें प्रमाण. २१ पूर्णता. २२ काम राहिलें नाहीं. २३ स्पष्ट. २४ सांगे. २५ कारागिरीनें. २६ तयार करून. २७ नुसत्या पाठेंकरून-२८ विडापैसा. २९ गर्भगृहांत. ३० सत्वर, त्वरेनें. ३१ बरोबरी. ३२ स्पष्ट, स्वच्छ. ३३ आरंभापासून सतराव्या अध्यायापर्यंत. ३४ ओघाच्या बळानें.

बिंबीं पैसे[१०]। परि सिनाने[२] लेवे जैसे। चंद्रीं नाहीं ॥ ५३ ॥ तैसीं सिनानीं चारी पदें[३]। श्लोकें[४] श्लोकावच्छेदें। अध्याय अध्यायभेदें। गमे कीर ॥ ५४ ॥ परि *प्रमेयाची[५] उजरी। आनान रूप न धरी। नाना रत्नमणीं[६] दोरी। एकचि जैसी ॥ ५५ ॥ मोतियें मिळोनि बहुवें। एकावळीचा पाड आहे। परि शोभे रूप होये। एकचि तेथ ॥ ५६ ॥ फुलां फुलसरां[७] लेख चढे। द्रुतीं[८] दुजी †अंगुळी[९] न पडे। श्लोक अध्याय तेणें पाडें। जाणावे हे ॥ ५७ ॥ सात शतें श्लोक। अध्यायां अठरांचे लेख। परी देव बोलिले एक। जें दुजें नाहीं ॥५८॥ आणि म्यांही न सांडोनि तें सोये[१०]। ग्रंथव्यक्ती केली आहे। प्रस्तुत तेणें निर्वाहें। निरूपण आइका ॥ ५९ ॥ [अभ्यासंगतिः] तरी सतरावा अध्याव। पावतां पुरता ठाव। जे संपतां श्लोकीं देव। बोलिले ऐसें ॥ ६० ॥ अर्जुना ब्रह्मनामाच्याविखीं¶ बुद्धी सांडूनि आस्तिकीं[११]। कर्मे किजती तितुकीं[१२]। असतें होती ॥ ६१ ॥ हा ऐकोनि देवाचा बोल। अर्जुना आला डोलें[१३]। ह्मणे कर्मनिष्ठा मळ[१४]। ठेविला देखों ॥ ६२ ॥ तो अज्ञानांध तंव बापुडा। ईश्वरचि न देखे एवढा। तेथ ‡नावेक[१५] पुढां। कां सुझे तया ॥ ६३ ॥ आणि रज तमें दोन्हीं। गेलियावीण श्रद्धा सांनी[१६]। ते कां लागे अभिधानीं। ब्रह्माचिये ॥ ६४ ॥ मग कोंता खेवं[१७] देणें। वार्तेवरीलें[१८] धांवणें। §सांडीं[१९] पडे खेळवणे। नागिणीचें तें ॥ ६५ ॥ तैसीं कर्मे दुर्वाडें[२०]। तयां जन्मांतराची कडे। दुर्मेळावे[२१] येवढे। कर्माभाजी ॥ ६६ ॥ ना विपायें[२२] हें उजू होये। तरि ज्ञानाची योग्यता लाहे। येन्हवीं येणेंचि जाये। निरयालया[२३] ॥ ६७ ॥ कर्मी हांठायवरी[२४]। आहातीं बहुवा अवसरी[२५]। आतां कर्मठां ¶कें ये वारी[२६]। मोक्षाची हे ॥ ६८ ॥ तरी फिटो कर्माचा पांग[२७]। क्रीजो अवघाचि त्याग। आदरी जो अव्यंग[२८]। संन्यास हा ॥ ६९ ॥ कर्मबाधेचिया कहीं। जेथ भयाची गोठी नाहीं। तें आत्मज्ञान जिहीं। स्वाधीन होय ॥ ७० ॥ ज्ञानाचे आवाहनमंत्र[२९]। जे ज्ञानपिक तें सुक्षेत्र[३०]। ज्ञान आकर्षितेसूत्र[३१]। तंतु जे कां ॥ ७१ ॥ ते दोनीं संन्यास त्याग। अनुष्ठूनि सुटे जग। तरी हेंचि आतां चांग। व्यक्त[३२] पुसों ॥ ७२ ॥ ऐसें ह्मणोनि पार्थें। त्याग संन्यासव्यवस्थे। रूप होआवया जेथें। प्रश्न केला

---

* प्रेमाची. † आंगळी. ‡ नामचि. § संडीं पडे. ¶ कैं ये वारी.

---

१ प्रसार पावे. २ वेगळे लेप. ३ चरण. ४ छंद. ५ विषयाची. ६ रत्नांत किंवा मण्यांत. ७ फुलांतील दोरा. ८ सुगंधींत. ९ मार्ग. १० स्पष्टीकरण. ११ श्रद्धावंतांनीं. १२ वाईट, दुष्ट अर्शी. १३ प्रेमा. १४ कर्मावर श्रद्धा ठेवणारास दोष. १५ क्षणभर. १६ समजे. १७ अल्प. १८ भाल्याला, शस्त्राला. १९ आलिंगन. २० दोरीवर, शब्दावरील. २१ मरणास कारण होय. २२ दुर्घट, कठीण. २३ मेळ नसणें. २४ कदाचित्. २५ यथासांग. २६ नरकस्थानास. २७ येथपर्यंत. २८ समय. २९ कर्मकरणाराला. ३० प्राप्ति, गति. ३१ पराधीनता. ३२ सांगोपांग. ३३ आमंत्रणचिठी. ३४ उत्तम भूमि. ३५ ओढणारे कळदोरे. ३६ स्पष्ट. ३७ स्पष्टीकरण.

॥ ७३ ॥ तेथ प्रत्युत्तरें बोली । श्रीकृष्णें जे चावळिली । तया व्यक्ती जाली । अष्टादशा ॥ ७४ ॥ एवं जेंन्यजनकभावें । अध्याय अध्यायातें प्रसवे । आतां ऐका बरवें । पुसिलें जें ॥ ७५ ॥ तरि पंडुकुमरें तेणें । देवाचें सैरतें बोलणें । जाणोनि अंतःकरणें । कोंणी घेतली ॥ ७६ ॥ येऱ्हवीं तत्त्वविषयीं भला । तो निश्चित असे कीर जाहला । परि देवो राहे उंगला । तें साहावेना ॥ ७७ ॥ वत्स धालयाही वरी । धेनू न वचावी दुरी । अनन्य प्रीतीची परी । ऐसी आहे ॥ ७८ ॥ तेणें काजेंवीणही बोलावें । तें देखिलें तरी पाहावें । भोगितां चाड दुणावे । पैंढियंतयाठायीं ॥ ७९ ॥ ऐसी प्रेमाची हे जाती । आणि पार्थ तंव तेचि मूर्ती । ह्मणूनि करूं लाहे खंती । उगेपणाची ॥ ८० ॥ आणि संवादाचेनि मिषें । जे अव्यवहार वस्तु असे । तेचि भोगिजे कीं जैसें । दर्पणीं रूप ॥८१॥ मग संवाद तोही पोरुखे । तरि भोगितां भोगणें थोके । हें कां साहावेल सुखें । लांचावलेया ॥ ८२ ॥ यालागीं त्याग संन्यास । पुसावयाचें घेऊनि मिस । मग *उपलविलें दुसें । गीतेचें तें ॥८३॥ अठरावा अध्याय नोहे । हे एकाध्यायी गीताचि आहे । जैं वत्सचि धेनू दुहे । तैं वेळ कायसी ॥ ८४ ॥ तैसी संपतां अवसरीं । गीता आदरविली माघारीं । स्वामि भृत्याचा न करी । संवाद काई ॥ ८५ ॥ [अर्जुन उवाच—] परि हें असो ऐसें । अर्जुनें पुसिजत असे । ह्मणे विनंती विश्वेशें । अवधारिजो ॥ ८६ ॥

अर्जुन उवाच–संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥ १ ॥

[संन्यासस्य महाबाहो] हां जी संन्यास आणि त्याग । इयां दोंहीं एके अर्थीं लाग । जैसा संघात आणि संघ । संघातेंचि बोलिजे ॥ ८७ ॥ [त्यागस्य च हृषीकेश] तैसेंचि त्यागें आणि संन्यासें । त्यागचि बोलिजत असे । [तत्त्वमिच्छामि वेदितुं] आमचेनि तंव मानसें । जाणिजे हेंचि ॥ ८८ ॥ [पृथक्केशिनिषूदन] ना कांहीं आंथी अर्थभेद । तो देव करोतु विशद । †तेथ ह्मणती श्रीमुकुंद । भिन्नचि पैं ॥ ८९ ॥ [श्रीभगवानुवाच–] तरि अर्जुना तुझ्या मनीं । त्याग संन्यास दोनी । एकार्थ गमले हें मानी । मीही साच ॥ ९० ॥ इहीं दोहीं कीर शब्दीं । त्यागचि बोलिजे त्रिशुद्धी । परि कारण एथ भेदीं । येतुलेंचि ॥ ९१ ॥

* उपरतविलें. † जेथ ह्मणे.

१ बोलिली. २ कार्यकारणभावानें. ३ ग्राह्य, शेवटचें. ४ क्लेश. ५ गप्प. ६ तृप्त झाल्यावर. ७ आवडत्याच्याठायीं. ८ पारमार्थिक. ९ राहे. १० थांबे. ११ सहन करवेल. १२ संवकलेल्याला. १३ विस्तार केलें. १४ वक्ष, प्रमेय. १५ ऐकावी. १६ संबंध. १७ असेल. १८ स्पष्ट करोत. १९ द्वितीयाध्यायांत "एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु" या श्लोकापासून अध्यायसमाप्तीपर्यंत बुद्धियोग सांगितला तोच यांत "काम्यानां कर्मणां" या श्लोकापासून ११ श्लोकांनीं सांगतात. २० निश्चयानें.

निपटूनि[1] कर्म सांडिजे । तें सांडणें संन्यास ह्मणिजे । फळ मात्र कां त्यजिजे । तो त्याग गा ॥ ९२ ॥ तरी कोणा कर्माचें फळ । सांडिजे कोण कर्म केवळ । हेंही सांगों *विवळ[2] । चित्त देईं ॥ ९३ ॥ तरि आपैसीं[3] दोंगें डोंगर । झाडें लागती अपार । तैसे लांबे[4] रोजागर । नुठिती ते ॥९४॥ न पेरितां सैंव[5] तृणें । उठती तैसें स्राळीचें होणें । नाहीं गा रोंबाउणें[6] । जियापरी ॥ ९५ ॥ कां अंग जाहालें सहजें । परि लेणें उद्यमें[7] कीजे । नदी आपैसी आपादिजे[8] । विहिरी जेवि ॥ ९६ ॥ तैसें नित्य नैमित्तिक । कर्म होय स्वाभाविक । परि न कांमितां[9] कामिक । न निफजे[10] ॥ ९७ ॥

श्रीभगवानुवाच–काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ २ ॥

[श्रीभगवानुवाच–काम्यानां कर्मणां] कां कामनेचेंचि दळवाडें[11] । जें उभारावया घडे । अश्वमेधादिक फुडे[12] । याग जेथ ॥९८॥ वांपी कूप[13] आराम[14]। अग्रहारें[15] हन महाग्राम । आणीकही नानासंभ्रम[16] । व्रतांचे ते ॥९९॥ ऐसें इष्टापूर्त[17] सकळ । जया कामना एक मूळ । जें केलें भोगवी फळ । बांधोनियां ॥ १०० ॥ देहाचिया गांवा आलिया । जन्ममृत्यूचिया सोहळया । ना ह्मणों नये धनंजया । जियापरी ॥ १ ॥ कां ललाटींचें[18] लिहिलें । न मोडे गा कांहीं केलें । काळेगोरेपण धुतलें । फिटों[19] नेणे ॥ २॥ केलें काम्य कर्म तैसें । फळ भोगावया धरणें बैसे । न फेडितां ऋण जैसें । वोसंडीनां[20] ॥ ३ ॥ कां कामनाही न करितां । अवसांत[21] घडे पंडुसुता । तरि वोंबकांड[22] †जुंझतां । लागे जैसें ॥ ४ ॥ गुळ नेणतां तोंडीं । घातला देचि गोडी । आगी मानूनि राखोंडी । चेपिला पोळी[23] ॥ ५ ॥ काम्यकर्मी हें एक। सामर्थ्य आथी स्वाभाविक । ह्मणोनि नको कौतुक । मुमुक्षू एथ ॥ ६ ॥ [न्यासं] किंबहुना पार्था ऐसें । जें काम्य कर्म गा असे । तें त्यजिजे विष जैसें । वोकूनियां ॥ ७ ॥ [संन्यासं कवयो विदुः] मग तया त्यागातें जगीं । संन्यास ‡ऐसया[24] भंगीं । बोलिजे अंतरंगीं । सर्वद्रष्टा ॥ ८ ॥ हें काम्य कर्म सांडणें । तें कामनेतेंचि उपडणें । द्रव्यत्यागें दंवडणें[25] । भय जैसें ॥ ९ ॥ [सर्वकर्मफलत्यागं] आणि सोमसूर्यग्रहणें[26] । येऊनि करविती पर्वणें[27] । कां मातापितरमरणें । अंकित जे दिवस ॥११०॥ अथवा अतिथी हन पावे । हें ऐसैसें पडे जें करावें । तें तें कर्म जाणावें । नैमित्तिक गा

* एकवेळ. † न झुंजतां. ‡ ऐसिया भागीं.

१ सर्वथैव. २ स्पष्ट. ३ अरण्यें. ४ पाणी घातलेलें लांबीचें भात. ५ बाग. ६ बहुत. ७ शेतांत राब घालतात त्यावांचून. ८ उद्योगानें. ९ संपादावी. १० न इच्छितां सकाम. ११ उत्पन्न होत नाहीं. १२ विस्तार. १३ स्पष्ट. १४ पुष्करिणी. १५ बाग. १६ इनामें. १७ इष्ट=यज्ञादि, पूर्त=कूप, तलाव, बाग आदि. १८ नशिबांतील. १९ नाहींसें होऊं शकत नाहीं. २० सोडीत नाहीं. २१ अकस्मात्. २२ बाण. २३ पोळते. २४ खुणेनें. २५ घालविणें. २६ नित्य नैमित्तिक भेदानें दोन प्रकारचीं कर्में आहेत. त्यांतील नैमित्तिक कर्में. (चंद्रसूर्यग्रहणादिक.) २७ पर्वणीचे दिवस.

॥ ११ ॥ वार्षिया[1] क्षोभें गगन । वसंतें दुणावे वन । देहा शृंगारी यौवन[2]- । दशा जैसी ॥ १२ ॥ कां सोमकांत[3] सोमें पघळें । सूर्यें फांकतीं कमळें । एथ असतेंचि पालव्हाळे[4] । आन नये ॥१३॥ तैसें नित्य जें कां कर्म । तें निमित्ताचे लाहे नियम । एथ उंचावे तेणें नाम । नैमित्तिक होय ॥ १४ ॥ आणि सायं-प्रातर्मध्याह्नीं[5] । जें कां करणीय[6] प्रतिदिनीं । परि दृष्टि जैसी लोचनीं । अधिक नोहे ॥ १५ ॥ कां नापादितां[7] गती । चरणीं जैसी आथी । ना तरी ते दीप्ती । दीपबिंबीं ॥ १६ ॥ वास नेदितां जैसें । चंदनीं *सौरभ्य[8] असे । अधिकाराचें[9] तैसें । रूपचि जें ॥ १७ ॥ नित्य कर्म ऐसें जनीं । पार्था बोलिजे †तें मानी । एवं नित्य नैमित्तिक दोन्हीं । दाविलीं तुज ॥ १८ ॥ हेंचि नित्य नैमित्तिक । अनुष्ठेय[10] आवश्यक[11] । ह्मणोनि ह्मणों पाहती एक । वांझ[12] ययातें ॥ १९ ॥ परी भोजनीं जैसें होये । तृप्ती लाभे भूक जाये । तैसें नित्य नैमित्तिकीं आहे । सर्वांगीं फळ ॥ १२० ॥ कीड[13] आंगिठा[14] पडे । तरि मळ तुटे वांनी[15] चढे । यया कर्मा तया सांगडें[16] । फळ जाणावें ॥ २१ ॥. जे प्रत्यवाय[17] तंव गळे । स्वाधिकार[18] बहुवें उजळे । तेथ हांतोफळिया[19] मिळे । सद्गतीसी ॥ २२ ॥ येवढेवरी[20] दिसाळ[21] । नित्यनैमित्तिकीं आहे फळ । [त्यागं] परि तें त्यजिजे मूळ । नक्षत्री जैसें ॥ २३ ॥ लता पिके आघवी । तंव च्यूत[22] बांधे पालवी । मग हात न लावित माधवी । सोडूनि घाली ॥ २४ ॥ तैसी नोलांडितां कर्मरेखा[23] । चित्त दीजे नित्यनैमित्तिका । पाठी फळा कीजे अशेखा । वांतिचिये[24] वानी ॥ २५ ॥ [प्राहुस्त्यागं विचक्षणाः] यया कर्मफळत्यागातें । त्याग ह्मणती पैं जाणते । एवं त्याग संन्यास तूतें । परिसविले ॥ २६ ॥ हा संन्यास जैं संभवे । तैं काम्य बांधूं न पवे । निषिद्धें[25] तंव स्वभावें । निषिद्धें गेलें ॥ २७ ॥ आणि नित्यादिक जें असे । तें येणें फळत्यागें नाशे[26] । शिर लोटलियां[27] जैसें । येर आंग ॥ २८ ॥ मग सस्य[28] फळपाकांत । तैसें निमालिया कर्मजात । आत्मज्ञान गिंवसितें[29] । अपैसें ये ॥ २९ ॥ ऐसिया ‡निगुंती[30] दोनी । त्याग संन्यास अनुष्ठानीं । पडले गा आत्मज्ञानीं । बांधती पीठ[31] ॥ १३० ॥ ना तरी हे निगुंती[32] चुके । मग त्याग कीजे हांतुटें[33] । तें कांहीं न त्यजे अधिकें । गोवींचि पडे ॥ ३१ ॥ जें औषध व्याधी अनोळख । तें घेतलिया परते[34] विख । कां अन्न

* सौगंध्य. † तें हें मानीं. ‡ निरुती.

१ पर्जन्यकाळीं. २ तारुण्य. ३ चंद्रकांतमणि चंद्रकिरणांनीं द्रवतो. ४ विस्तारे. ५ त्रिकाळ करण्याचीं नित्य कर्में. ६ करावयास योग्य. ७ न चालतां. ८ आश्रय न देतां. ९ सुगंध. १० कर्ता, कर्म. ११ केलेंच पाहिजे. १२ निर्फळ. १३ हीण. १४ अशौत. १५ कस. १६ बरोबरीनें, प्रमाणें. १७ दोष. १८ हां हां ह्मणतां, जलदी. १९ येथवर. २० मोठें. २१ च्यूत = आम्रवृक्ष. २२ ओकारीसारखें. २३ निषिद्धकर्म. २४ तोडिलें असतां. २५ धान्य पिकेपर्यंत. २६ शोधीत. २७ युक्तीनें. २८ योग्यता. २९ युक्ति. ३० अटकळीनें. ३१ गुंताड्यांत. ३२ होतें.

न मानितां भूक । न मारी काय ॥ ३२ ॥ ह्मणोनि त्याज्य जें नोहे । तेथ त्यागातें न सुवावें । त्याज्यालागीं नोहावें लोभपर ॥ ३३ ॥ चुकलिया त्यागाचें वेंझें । केला सर्वत्यागही होय वोझें । निषिद्धें त्या सर्वत्र जुंझें । वीतरागु ते ॥ ३४ ॥

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः ।
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे ॥ ३ ॥

[दोषवदित्येके] एकां *फळत्याग न ठाके । तें कर्मातें ह्मणती बंधकें । जैसें आपण नग्न भांडकें । जगातें ह्मणें ॥ ३५ ॥ कां जिव्हालंपट रोगिया । अन्नें दूषी धनंजया । आंगा न रुसे कोढिया । मासियां कोपे ॥ ३६ ॥ तैसें फळकाम दुर्बळ । ह्मणती कर्मचि किडाळ । [त्याज्यं] मग निर्णय देती केवळ । त्यजावें ऐसा ॥ ३७ ॥ [यज्ञदानतपःकर्म] एक ह्मणती यागादिक । करावेंचि आवश्यक । जे यावांचूनि शोधकें । आन नसे ॥ ३८ ॥ मनशुद्धीच्या मार्गीं । जैं विजयी व्हावें वेगीं । तैं कर्म सबळालागीं । आळस न कीजे ॥ ३९ ॥ भांगोर आथि शोधावें । तरी आगी जेविं नुबगावें । कां दर्पणालागीं सांचावें । अधिक रजें ॥ १४० ॥ नाना वस्त्रें चोख होआवीं । ऐसें आथी जरी जीवीं । तरी †संवदणी न मानावी । ‡मलिन जैसी ॥ ४१ ॥ तैसीं कर्में क्लेशकारें । [न त्याज्यमिति चापरे] ह्मणोनि न त्यावीं अव्हेरें । कां अन्नलाभें अरुवारें । रांधितिये उर्णे ॥ ४२ ॥ इहीं इहीं गा शब्दीं । एक कर्मीं बांधती बुद्धी । ऐसा त्याग विसंवादीं । पडोनि ठेला ॥ ४३ ॥ तरि विसंवाद तो फिटे । त्यागाचा निश्चय भेटे । तैसें बोलों गोमटें । अवधान देईं ॥ ४४ ॥

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः ॥ ४ ॥

[त्यागो हीति] तरि त्याग एथें पांडवा । त्रिविध पैं जाणावा । तया त्रिविधाही बरवा । विभाग करूं ॥ ४५ ॥ त्यागाचे तीन्ही प्रकार । कीजती जरी गोचर । तरी तूं ईत्यर्थाचें सार । इतुलें जाण ॥ ४६ ॥ [निश्चयमिति] मज सर्वज्ञाचियेही बुद्धी । जें ओलोट माने त्रिशुद्धी । निश्चयतत्त्व तें आधीं ।

* फळाभिलाष न टके. † सौंदणी. ‡ मलिन ते. ०न दरवली सदाव

१ अत्याज्याचा त्याग व त्याज्याचा लोभ हीं नसावीं. २ घालावें, ३ सुईचें अग्र, युक्ति. ४ वैराग्यसंपन्न. ५ साधत नाहीं. ६ भांडखोर. ७ कुष्ठरोगी. ८ फलेच्छु. ९ हीन. १० शुद्धि करणारें. ११ वळकट. १२ सोनें. १३ न कंटाळावें. १४ संग्रह करावें. १५ मळ. १६ स्वच्छ. १७ धोब्याचें कपडे धुण्याचें धातुमय किंवा पाषाणमय पात्र. १८ हेळसांडीलें. १९ सुंदर. २० रांधल्याशिवाय. २१ विरुद्धवादांत. २२ तात्पर्याचें. २३ खरें.

अवधारीं पां ॥ ४७ ॥ तरि आपुलीये सोडवणे । जो मुमुक्षू जागों ह्मणे । तया सर्वस्वें करणें । हेंचि एक ॥ ४८ ॥

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ ५ ॥

[यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं] जियें यज्ञदानतपादिकें । इयें कर्में आवश्यकें । तियें न सांडावीं [1]पांथिकें । पाउलें जैसीं ॥ ४९ ॥ हरपलें न देखिजे । तंव तयाचा *मागु न सांडिजे । कां †तृप्त न होतां न लोटिजे । भोंणें जेवीं ॥१५०॥ नाव थडी न पवतां । न सांडिजे केळी न फळतां । कां ठेविलें न दिसतां । दीप जैसा ॥ ५१ ॥ तैसी आत्मज्ञानविखीं । जंव निश्चिती नाहीं [3]निकी । तंव नोहावें यागादिकीं । उदासीन ॥ ५२ ॥ [कार्यमेव तत्] तरि स्वाधिकारानुरूपें । तियें यज्ञदानें तपें । अनुष्ठावींचि साक्षेपें । [4]अधिकेंवर ॥ ५३ ॥ जें चालणें वेगावत जाये । तो वेग बैसावयाचि होये । तैसा कर्मातिशय आहे । नैष्कर्म्यालागीं ॥ ५४ ॥ अधिकें जंव जंव औषधी । [5]‡सेवायाची [6]माडी बांधीं । तंव तंव मुकिजे व्याधी । तयाचिये ॥ ५५ ॥ तैसीं कर्में हांतोपातीं । जैं कीजती यथानिगुती । तैं रजतमें झडती । झाडा देउनि ॥ ५६ ॥ कां पांठोवाटीं पुटें । भांगारा खार देणें घटे । तैं कीड [7]झडकरी तुटे । निर्व्याज होय ॥ ५७ ॥ तैसें निष्ठा केलें कर्म । तें सांडीं [8]करूनि रजतम । सत्वशुद्धीचें धाम । डोळां दावी ॥ ५८ ॥ ह्मणोनियां धनंजया । सत्वशुद्धी गिंवसीतया । तीर्थांचिया [9]सांवाया । आलीं कर्में ॥ ५९ ॥ तीर्थें बाह्यमळ क्षाळे । कर्में अभ्यंतर उजळे । एवं तीर्थें जाण निर्मळें । सत्कर्मेंचि ॥१६०॥ तृषार्ता मरुदेशीं । [10]झळे अमृतें §[11]वोळलीं जैसीं । कीं अंधालागीं डोळ्यांसीं । सूर्य आला ॥ ६१ ॥ बुडतया नदीच धाविन्नली । पडतया पृथ्वीच कळवळिली । [12]निर्मतया मृत्यूनें दिधली । आयुष्यवृद्धी ॥ ६२ ॥ ¶कर्में कर्मबद्धता । मुमुक्षू सोडविले पंडुसुता । जैसा [13]रसरीति मरतां । राखिला विषें ॥६३॥ तैसीं एके [14]हातवटिया । कर्में $कीजती धनंजया । बंधकेंचि सोडवावया । मुख्यें होती ॥ ६४ ॥ आतां तेचि हातवटी । तुज सांगों गोमटी । जया कर्मांतें किरीटी । कर्मेंचि [15]रुसे ॥ ६५ ॥

---

* मार्ग. † न धातां. ‡ सेवनेची, सेवेचि माडी बांधी. § ब्रोळलीं. ¶ तैसें कर्मी बांधितां. $ केलीं.

---

१ मार्गस्थानें. २ भोजन. ३ चांगली. ४ अधिक अधिक. ५ वाढत, वेगवत्तर. ६ कमर बांधतो. ७ लवकर, वारंवार. ८ विधिपूर्वक. ९ एकामागें एक. १० हीन. ११ निर्दोष, शुद्ध. १२ सत्वशुद्धीची इच्छा करण्यास. १३ बरोबरीस, सादृश्यास. १४ मारवाड देशांत. १५ उन्हाचे चटके. १६ उदकें. १७ मरणारास. १८ रसायनाप्रमाणें. १९ हातोटीनें. २० दूर करी.

एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च ।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥ ६ ॥

[एतान्यपि तु कर्माणि] तरि महायागप्रमुखें । कर्में निफजतांही अचुकें । [संगं त्यक्त्वा] कर्तेपणाचें न *ठाके । फुंजणें[1] आंगीं ॥ ६६ ॥ जो मोलें तीर्था जाये । तया मी यात्रा करित आहें । ऐसिये श्लाघ्यतेचा[2] नोहे । तोष जेवीं ॥ ६७ ॥ कां मुद्रा समर्थाचिया । जो ऐकवटु[3] झोंबे राया । तो मी †जिणता[4] ऐसिया । नयेचि गर्वा ॥ ६८ ॥ जो कांसे लागोनि तरे । तूया पोंहती ‡ऊर्मी[5] नुरे । पुरोहित नाविष्करे । दातेपणें ॥६९॥तैसें कर्तृत्व अहंकारें । नेघोनि यथा अवसरें । §कृत्यजातांचे मोहरें[6] । सारीजती ॥७०॥ [फलानि च] केल्या कर्मा पांडवा । जो आथी फळाचा गोवा । तया मोहरा हों नेदावा । मनोरथ॥७१॥ आधींचि फळीं आस तुटिया । कर्में आरंभावीं धनंजया । परांवें[7] बाळ धाया[8] । ¶पाहिजे जैसें ॥ ७२ ॥ पिंपरुवांचिया[9] आशा । न शिंपिजे पिंपळ जैसा । तैसिया फळनिराशा । कीजती कर्में ॥ ७३ ॥ सांडूनि दुधाची टेंकळी[10] । गोंवारी[11] गांवधेनु वेंटाळी । किंबहुना कर्मफळीं । तैसें कीजे ॥ ७४ ॥ [कर्तव्यानीति] ऐसी हे हातवटी । घेऊनि जे क्रिया उठी । आपणा आपुलिया गांठी । लाहेचि तो ॥७५॥ ह्मणोनि फळीं लोंग[12] । सांडोनि देहसंग[13] । कर्में करावीं हा चांग[14] । निरोप माझा ॥ ७६ ॥ जो जीवबंधें शीणला । सुटके जोंचें[15] आपला । तेणें पुढतपुढती या बोला । आन न कीजे ॥ ७७ ॥

नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ।
मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥ ७ ॥

[मोहादिति] ना तरी आंधाराचेनि[16] रोखें । जैसीं डोळां रोविजती नखें । तैसा कर्मद्वेषें अशेखें । कर्मेंचि सांडी ॥ ७८ ॥ तयाचें कर्मसांडणें । तें तामस मी ह्मणें । $शिसाराचे[17] रागें ||लोवणें[18] । शिसचि जैसें ॥ ७९ ॥ [नियतस्येति] हां गा मार्ग दुवाड[19] होये । तरी निस्तरितील पाये । कीं तेचि खांडणें[20] आहे । मार्गापराधें ॥ १८० ॥ भुकेलिया पुढें अन्न । हो कां भलतैसें +ऊन्ह । तरी बुद्धी न घेतां लंघन । **भाणें[21] पाप राहाल्या ॥८१॥ तैसा कर्माचा बांध[22] कर्में ।

---

* टके. † जाणतां. ‡ मी ऐसी ऊर्मी. § कृत्यजातांचीं निरहरें, नीहारें. ¶ पाळिजे. $ शिसाचें. || लोवणें. + उष्ण. ** लाथपापरा.

---

१ गर्व, अहंकार. २ स्तुतीचा. ३ एकटा. ४ जिंकणारा. ५ अभिमान. ६ आवेश न बाळगी. ७ बुद्धिवळांतील मोहऱ्यांप्रमाणें. ८ प्राप्ति. ९ मार्गी. १० दुसऱ्याचें. ११ दाईनें. १२ पिंपळफळाच्या. १३ इच्छा, आशा. १४ गुराख्या. १५ संबंध. १६ अभिमान. १७ काळजी धरी. १८ रागानें, रोषानें. १९ अर्धशिशी. २० जाळणें, कापणें. २१ दुर्गम. २२ चालूं न सकतील. २३ तोडणें. २४ लाथेनें हाणावें. २५ दोष.

निस्तरिजे करितेनि वर्में । हें तामस नेणें भ्रमें । माजविला ॥ ८२ ॥ कीं स्वभावें आलें विभागा । तें कर्मचि [१]वोसंडी पैंगा । तरि झणें [२]आतला त्यागा । तामसा तया ॥ ८३ ॥

दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत् ।
स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ॥ ८ ॥

[दुःखमित्येव यत्कर्म] अथवा स्वाधिकार [३]बुझे । आपलें विहितही सुंझे । परि करितया [४]उबजे । निर्[५]बरपणा ॥ ८४ ॥ जे *कर्माची ऐलीकॅड । नावेर्क दिसे दुवाड । जे वाहतिये वेळे जड । शिदोरी जैसी ॥ ८५ ॥ जैसा निंब जिभे कडवट । हिरडा पहिलें तुरट । तैसा कर्मा ऐल सेवट । खेणुवाळा होय ॥ ८६ ॥ कां धेनू दुवाड शिंग । [१०]शेवतिये [११]अडव आंग । भोजनसुख महाग । पाक करितां ॥ ८७ ॥ तैसें पुढतपुढती कर्म । आरंभींच अतिविषम । ह्मणोनि तो तें श्रम । करितां मानी ॥ ८८ ॥ येऱ्हवीं विहितत्वें मांडी । परि घालितां [१२]असुरवाडीं । तेथ पोळला ऐसा सांडी । आदरिलेंही ॥ ८९ ॥ [कायक्लेशभयात्त्यजेत्] ह्मणे वस्तु देहासारिखी । आली †बहुतीं भाग्यविशेखीं । मा [१३]जांचु कां कर्मादिकीं । पापिया जैसा ॥१९०॥ केले [१४]कर्मीं जें द्यावें । तें झणें मज होआवें । आजि ‡भोगुं ना बरवे । हातिंचे भोग ॥ ९१ ॥ ऐसा शरीराचिया क्लेशा । भेणें कर्में वीरेशा । सांडी तो [स कृत्वा राजसं त्यागं] परियेसा । राजस त्याग ॥ ९२ ॥ [नैव त्यागफलं लभेत्] येऱ्हवीं तेथही कर्म सांडे । परि तया त्यागफळ न जोडे । जैसें [१५]उतलें आगीं पडे । तें नलगेचि §होमा ॥ ९३ ॥ कां बुडोनि प्राण गेले । ते [१६]अर्धोदकीं निमाले । हें ह्मणों नये जाहालें । दुर्मरणचि ॥ ९४ ॥ तैसें देहाचेनि लोभें । जेणें कर्मा पाणी [१७]सुंभे । तेणें साच न लभे । त्यागाचें फळ ॥ ९५ ॥ किंबहुना आपुलें । जैं ज्ञान होय उदया आलें । ¶तें नक्षत्रातें [१८]पाहिलें । गिळी जैसें ॥ ९६ ॥ तैशा सकारण क्रिया । हारपती धनंजया । तो कर्मत्याग ये जया । मोक्षफळासी ॥ ९७ ॥ तें मोक्षफळ अज्ञाना । त्यागिया नाहीं अर्जुना । ह्मणोनि तो त्याग न $माना । राजसु तो ॥ ९८ ॥ तरि कोणे पां एथ त्यागें । तें मोक्षफळ घर रिघे । हेंही आइक प्रसंगें । बोलिजेल ॥ ९९ ॥

---

* कर्मारंभाची ऐल कड. † बहुवे. ‡ भोगूं कां ना. § सोमा. ¶ तेणें. $ नव्हे मना । राजस जो.

---

१ त्यागी. २ प्राप्त झाला. ३ समजे. ४ पाहे. ५ उपजे. ६ कठीणपणास. ७ प्रारंभ. ८ क्षणभर. ९ कठीण. १० शेवंतीच्या झाडास. ११ वाईट. १२ श्रमांमुळें. १३ कशासाठीं जाच सोसूं. १४ पूर्वी जें दिलें आहे तेंच मला मिळावें असें आहे. १५ ऊत आलेलें. १६ जळसमाधीसारख्या पुण्यरूप मरणानें मेले. १७ घातलें जातें. १८ सूर्योदय, प्रातःकाळ.

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ।
संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्विको मतः ॥९॥

[कार्यमिति] तरि स्वाधिकाराचेनि नांवें । जें वांटिया आलें स्वभावें । तें आचरे विधिगौरवें । शृंगारोनि ॥ २०० ॥ [संगं त्यक्त्वा फलं चैव] परि हें मी करित असें । ऐसा आठव त्यजी मानसें । तैसेंचि पाणी दे आशे । फळाचिये ॥ १ ॥ पैं अवज्ञा आणि कामना । मातेच्या ठायीं अर्जुना । केलिया दोनी पैतना । *कारण होती ॥ २ ॥ तरि दोनी यें त्यजावीं । मग माताचि ते भजावी । वांचूनि मुखालागीं वाळावी । गायचि सगळी ॥ ३ ॥ आवडतियेही फळीं । असारें साली आंठोळी । त्यासाठीं अवगळी । फळातें कोण्ही ॥ ४ ॥ तैसा कर्तृत्वाचा मद । आणि कर्मफळाचा आस्वाद । या †दोहींचें नांव बंध । कर्माचा कीं ॥ ५ ॥ तरि या दोहींच्या विखीं । जैसा बाप नातळे लेंकीं । तैसा हों न शके दुःखी । विहिता क्रिया ॥ ६ ॥ [स त्यागः सात्विको मतः] हा तों त्याग तरुवर । जो गा मोक्षफळें ये थोर । सात्विक ऐसा डंगर । ‡यासींच जगीं ॥ ७ ॥ आतां जाळूनि बीज जैसें । झाडा कीजे निर्वंशें । फळ §त्यागूनि कर्म तैसें । त्यजिलें जेणें ॥ ८ ॥ तया लागतखेंवो परिसीं । धातूचि गंधि काळिमा जैसी । जाती रजतमें तैसीं । तुटलीं दोन्ही ॥ ९ ॥ मग सत्वें चोखाळें । उघडती आत्मबोधाचे डोळे । तेथ मृगांबु सांजवेळे । होय जैसें ॥ २१० ॥ तैसा बुद्ध्यादिकांपुढां । असतचि विश्वाभास येन्हढा । तो न देखे कवणीकडां । आकाश जैसें ॥ ११ ॥

न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ।
त्यागी सत्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः ॥ १० ॥

[न द्वेष्टीति] आणि प्राचीनाचेनि बळें । आलीं कृत्यें कुशलाकुशलें । तियें व्योमाआंगीं आभाळें । विरालीं जैसीं ॥ १२ ॥ तैसीं तयाचिये दिठी । कर्मे चोखाळलीं किरीटी । ह्मणोनि सुखदुःखीं उठी । पडेना तो ॥ १३ ॥ तेणें शुभकर्म जाणावें । मग तें हर्षें करावें । कां अशुभालागीं व्हावें । द्वेषिया ना ॥ १४ ॥ [छिन्नसंशयः] तरि इया विषयींचा कांहीं । तया एकही संदेह नाहीं । जैसा स्वप्नाच्या ¶ठायीं । जागिन्नलिया ॥१५॥ [मेधावी] ह्मणऊनि कर्म आणि कर्ता । या द्वैतभावाची वार्ता । नेणे तो पंडुसुता । [त्यागी सत्वसमाविष्टो] सा-

---

*हेतु होती. † देहींचा नामें बंध. ‡ ययासि जगीं. § त्यजूनि. ¶ कां ठायीं.

१ हात देणें, तिलांजलि देणें. २ नरकपातास. ३ त्यजावी. ४ बी. ५ त्यागी. ६ गर्व. ७ तसा जो विहित क्रियेविषयीं = कर्तृत्व व फलेच्छा हीं टाकून विहित क्रिया करतो तो दुःखी होऊं शकत नाहीं. ८ प्रसिद्धि. ९ वृक्षाला. १० स्पर्शतांच. ११ परिसास. १२ अभंगळ काळिमा. १३ स्वच्छ. १४ मृगजळ. १५ प्रारब्ध, पूर्वसंचित. १६ बरीं वाईट.

त्विक त्याग ॥ १६ ॥ ऐसेनि कर्मे पार्था । त्याजिलीं त्यजिती सर्वथा । अधिकें बांधती अन्यथा । सांडिलीं तरी ॥ १७ ॥

न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ।
यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥ ११ ॥

[न हि देहभृतेति] आणि हांगा सव्यसाची । मूर्ति लाहोनि देहाची । खंती करिती कर्माची । ते गोंवढे गा ॥ १८ ॥ मृत्तिकेचा वीट । घेऊनि काय करील घट । केउतें तंतू पट । सांडील तो ॥ १९ ॥ तेवींचि वन्हित्व आंगीं । आणि उबे उंबगणे आगी । कीं तो दीप प्रभेलागीं । द्वेष करील काई ॥ २२० ॥ हिंग त्रासला घाणी । तरी कैंचें सुगंधत्व आणी । द्रव सांडूनि पाणी । कें राहे तें ॥ २१ ॥ तैसा शरीराचेनि आभासें । नांदत जंव असे । तंव कर्मत्यागाचें पिसें । काइसें तरी ॥ २२ ॥ आपण लाविजे टिळा । ह्मणोनि पुसों ये *अवलीळा । मा घाली फेडी निंडळा । कां करूं येगा ॥ २३ ॥ तैसें विहित स्वयें आदरिलें । ह्मणोनि त्यजूंये त्यजिलें । परि कर्मचि देह आंतलें । तें कां सांडील गा ॥ २४ ॥ जें श्वासोश्वासवरी । होत निजेलियाही वरी । कांहीं न करणेंचि परी । होती जयाची ॥ २५ ॥ या शरीराचेनि मिसकें । कर्मचि लागलें असिकें । जिता मेलया न ठाके । इया रिती ॥ २६ ॥ [यस्तु कर्मफलत्यागी] यया कर्मातें सांडिती परी । एकीचि ते अवधारीं । जे करितां न जाइजे हारी । फळाशेंचिये ॥ २७ ॥ कर्मफळ ईश्वरीं अर्पे । तत्प्रसादें बोध उद्दीपे । तेथ रज्जुज्ञानें लोपे । व्याळशंका ॥ २८ ॥ तेणें आत्मबोधें तैसें । अविद्येशीं कर्म नाशे । [स त्यागीत्यभिधीयते] पार्था त्यजिजे जैं ऐसें । तैं त्यजिलें होय ॥ २९ ॥ ह्मणोनि इयापरी जगीं । कर्मे त्यजी तो महात्यागी । येर मूर्छनें नांव रोगीं । विश्रांति जैसी ॥ २३० ॥ तैसा कर्मीं शिणे एकीं । तो विसावों पाहें आणिकीं । दांडेयाचे घाय बुकी । धोंडणें जैसें ॥ ३१ ॥ परि हें असो पुढती । तोचि त्यागी त्रिजगतीं । तेणें फळत्यागें निष्कृती । नेलें कर्म ॥ ३२ ॥

अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम् ।
भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥ १२ ॥

येऱ्हवीं तरी धनंजया । त्रिविधा †कर्मफळा गा यया । समर्थ ते कीं भोगावया । जे न सांडितीचि आशा ॥ ३३ ॥ आपणचि विऊनि दुहिता । कीं

* वेळवेळा, † करितां जाइजे. ‡ कर्मफळा यया.

१ त्यागिलीं तींच त्यजिलीं जातात. २ अडाणी. ३ मातीला कंटाळून. ४ कंटाळणें. ५ सहज. ६ लावावें. ७ पुसावें. ८ कपाळा. ९ व्यापलें. १० निमित्तें. ११ कर्म करीत असतां फलाशेचे हारी न जाणें हा एक कर्मत्यागाचा प्रकार होय. १२ ज्ञान प्रगटे. १३ मूर्च्छनेस निचेष्टतेला. १४ सोसणें. १५ निष्कर्म स्थितीस. १६ कन्या.

न मम ह्मणे प्रिता । तो सुटे कीं प्रतिग्रहिता । जावाई शिरके ॥ ३४ ॥ विषाचे आगरही वाहती । ते विकितां सुटले जिती । येर निमाले जें घेती । वेंचोनि मोलें ॥ ३५ ॥ तैसें कर्ता कर्म करू । अकर्ता फळाशा न धरू । एथ न शके आवरूं । दोंहींतें कर्म ॥ ३६ ॥ वाटे पिकलिया वृक्षाचें । फळ अपेक्षी तयाचें । तेविं साधारण कर्माचें । फळ घेतया ॥ ३७ ॥ परि करूनि फळ नेघे । तो जगाच्या कामीं न रिघे । जे त्रिविध जग *अवघें । कर्मफळ हें ॥ ३८ ॥ देव मनुष्य स्थावर । यया नांव जगडंबर । आणि हे तंव †तीन्ही प्रकार । कर्मफळाचे ॥ ३९ ॥ तेंचि एक गा अनिष्ट । एक तें केवळ इष्ट । आणि एक इष्टानिष्ट । त्रिविध ऐसें ॥ २४० ॥ [अनिष्टं] परि विषयमता बुद्धी । आंगीं सूनि अविधी । प्रवर्तती जे निषिद्धीं । कुव्यापारीं ॥ ४१ ॥ तेथ कृमि कीट लोष्ट । हें देह लाहती निकृष्ट । तया नाम तें अनिष्ट । कर्मफळ ॥ ४२ ॥ [इष्टं] कां स्वधर्मा मान देतां । स्वाधिकार पुढां सूतां । सुकृत कीजे पुसतां । ओन्हायातें ॥ ४३ ॥ तैं इंद्रादिक देवांचीं । देहें लाहिजती सव्यसाची । तया कर्मफळा इष्टाची । प्रसिद्धी गा ॥ ४४ ॥ [मिश्रं च] आणि गोड आंबट मिळे । तेथ रसांतर ‡फरसाळें । उठी दोहीं वेगळें । दोहीं जिणतें ॥ ४५ ॥ रेचकेंचि योगवशें । होय §स्तंभावया दोषें । तेविं सत्यासत्य समरसें । सत्यासत्याचि जिणिजे ॥ ४६ ॥ ह्मणोनि समभागें शुभाशुभें । मिळोनि अनुष्टानाचें उभें । तेणें मनुष्यत्व लाभे । तें मिश्र फळ ॥ ४७ ॥ [त्रिविधं कर्मणः फलं] ऐसें ¶त्रिविध यया भागीं । कर्मफळ मांडलेंसे जगीं । [भवत्यत्यागिनां प्रेत्य] हें न सांडी तयां भोगीं । जे सूदले आशा ॥ ४८ ॥ जेथ जिव्हेचा हेंत फांटे । तंव जेवितां वाटे गोमटें । मग परिणामीं शेवटे । अवश्य मरण ॥ ४९ ॥ संवचोर मैत्री चांग । जंव न पविजे तें दांग । सोमान्या भली आंग । न शिवे तंव ॥ २५० ॥ तैसीं कर्में करितां शरीरीं । लाहती महत्त्वाची फेरारी । पाठीं निधनीं एकसरी । पावती फळें ॥ ५१ ॥

---

* आघवें. † त्रिप्रकार. ‡ फळरसाळें. § स्तंभावयोद्देशें. ¶ त्रिविधा यया भंगी.

१ दान घेणारा. २ बाग. ३ वांचती. ४ मेले. ५ कर्म करो अथवा अकर्ता असो, कर्मफलाशा सोडील तर दोघांलाही कर्म बाधणार नाहीं. ६ अपेक्षा करणारालाच फळ मिळतें. ७ आशेंत. ८ प्रतिकूल. ९ अनुकूल. १० विषयप्रिय, ११ कुकर्मी. १२ मातीचें ढेंकूळ. १३ प्राप्त होती. १४ घालितां. १५ वेदाला. १६ मिळती. १७ भिन्नरुचित्व पावे. १८ मूळच्या दोहीं रसांस जिंकणारें. १९ नाकपुडीनें सोडण्याचा वायु. २० स्तंभन = प्रतिबंध करण्याच्या उद्देशानें. २१ ऐक्यानें. २२ जिंकावें. २३ दोनी. २४ परस्परांत मिसळलेलें. २५ आशेंत सांपडले. २६ रुचिभेदें वाढे. २७ सोवती चोर. २८ अरण्य. २९ वैश्या. ३० भास. ३१ मरणकाळीं.

जैसा समर्थ आणि ऋणिया । मागों आला बाइणिया[३] । न लोटे तैसा प्राणिया । पडे तो भोग ॥ ५२ ॥ मग कणिसौनि[३] कण झडे । तो विरूढला कणिसा चढे । पुढती भूमी पडे । पुढती उठी ॥ ५३ ॥ तैसें भोगीं जें फळ होय । तें फळांतरें वीत[५] जाय । चालतां पायें पाय । जिणिजे[६] जैसा ॥ ५४ ॥ उताराचिये[७] सांगडी । ठाके ते ऐलीचें[८] थडी । तेविं न *मूकीजती वोढी । भोग्याचिये ॥ ५५ ॥ पैं साध्य साधन प्रकारें । फळभोग तो पसरें । एवं गोविलें[९] संसारें । अत्यागी ते ॥ ५६ ॥ [नतु संन्यासिनां क्वचित्] येरवीं †जातिपुष्पांचें[१०] विकसणें । ‡त्याचि नाम जैसें सुकणें[११] । तैसें कर्मभिषें न करणें । केलें जिहीं ॥ ५७ ॥ बीजचि[१२] वरोसि वेंचे । तेथ वाढती कुळवाडी[१३] खांचे[१४] । तेविं फळत्यागें कर्माचें । सारिलें काम ॥ ५८ ॥ §ते सत्वशुद्धी साहाकारें । गुरुकृपामृततुषारें । सोसिन्नलेंनि[१५] वोसरे । द्वैत दैन्य ॥ ५९ ॥ तेव्हां जगदाभासमिषें[१६] । स्फुरे ते त्रिविध फळ नाशे । एथ भोक्ता भोग्य आपैसें । निमालें हें ॥ २६० ॥ घडे ज्ञान प्रधान ऐसा । संन्यास जया वीरेशा । तेचि फळभोगं सोसी[१७] । मुकले गा ॥ ६१ ॥ आणि येणें कीर संन्यासें । जैं आत्मरूपीं ¶दिठी[१८] पैसे । तैं कर्म एक ऐसें । देखणें आहे?॥ ६२ ॥ पडोनि गेलिया भिंती । चित्रांची केवळ होय माती । कां पाहालेया राती[१९] । आंधारें उरे ॥ ६३ ॥ जैं रूपचि नाहीं उभें । तैं छाया[२०] कोह्याची शोभे । $दर्पणेंवीण बिंबें । वदन केंपां[२१] ॥ ६४ ॥ फिटलिया निद्रेचा[२२] ठाव । कैंचा स्वप्नासि प्रस्ताव[२३] । मग ||सत्यकीं तें वांव[२४] । कोण ह्मणे ॥ ६५ ॥ तैसें गा संन्यासें येणें । तंव अविद्येसीचि[२५] नाहीं जिणें । मा तियेचें कार्य कोणें । घेपे[२६] दीपे ॥ ६६ ॥ ह्मणोनि संन्यासि यें पाहीं । कर्माची गोठी कीजेल काई । परि अविद्या आपुल्या देहीं । आहे जैं कां ॥ ६७ ॥ कर्तेपणाचेनि[२७] थांवें । आत्मा शुभाशुभीं धांवे । दृष्टि भेदाचिये[२८] राणिवे । रचलीसे जैं ॥ ६८ ॥ तैं तरी गा सुवर्मा । बिजावळी[२९] आत्मया कर्मा । अंपाडें[३०] जैसी पश्चिमा । पूर्वेसि कां ॥ ६९ ॥ ना तरी आकाशा कां आभाळा । सूर्या आणि मृगजळा । बिजावळी भूतळा । वा-

* मुक ती वोढी. † जाईच्या फुला फाकणें. ‡ तया नांव जैसें. § तयां. ¶ दृष्टि पैसे. $ आरसेन वीण. || साच.

१ वायद्याच्या मुदतीस, खोट्या सबबेनें. २ कणिसांतून. ३ उगवला असतां. ४ प्रसवत. ५ जिकावा. ६ उताराची सांगड=होडी वगैरे ज्या जागीं येईल तेथून तिला दुसऱ्या तीरीं गेलेंच पाहिजे, म्हणून तिला पलीकडचें तीर नाहीं. दोनी समानच. ७ अंतरती. ८ गुंतलें. ९ त्याग न करणारें. १० प्रफुल्लित होणें. ११ पोटगीस. १२ उदीम. १३ खचे, नासे. १४ सिद्ध झालेले. १५ हांव, दुःख. १६ दृष्टि. १७ उजाडल्यावर. १८ साउली. १९ कशाची. २० कोटें. २१ पुरे झाल्यावर. २२ प्रसंग. २३ मिथ्या. २४ अज्ञानाला. २५ घ्यावें व द्यावें. २६ बळानें. २७ ऐश्वर्यानें. २८ संबंध, दुजेपण. २९ विपरीत.

यूसि जैसी ॥ २७० ॥ पांघरोनि नईचें[1] उदक । असे नयीमाजि खडक । परि जाणिजे कां वेगळिक । कोडिची[2] ते ॥ ७१ ॥ हो कां उदकाजवळी । परि सिनीचि[3] ते बाबुळी[4] । काय संगास्तव काजळी । दीप ह्मणोंये ॥ ७२ ॥ जरी चंद्रीं जाला कलंक । तरि चंद्रेंसी नव्हे एक । आहे दृष्टी डोळयां विवेक । अेपाड[5] *जेतुला ॥ ७३ ॥ नाना वाटा वांटे जातया । वोघा वोघी वाहतया । आरसा आरसां पाहतया । अेपाड जेतुला ॥ ७४ ॥ पार्था गा तेतुलेनि मानें । आत्मेनिसीं कर्म सिनें । परि घेवविजे अज्ञानें । तें कीर ऐसें ॥ ७५ ॥ विकाशें[6] रवीते उपजवी । द्रुती अलीकरवीं[7] भोगवी । ते सरोवरीं कां बरवी । अब्जिणी[8] जैसी ॥ ७६ ॥ पुढतपुढती आत्मक्रिया[9] । †अन्यकारणकाचि[10] तैशिया । करूं पांचाही तया । कारणा रूप ॥ ७७ ॥

पंचैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ।
सांख्ये कृतांते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ॥ १३ ॥

[पंचैतानि महाबाहो कारणानि] आणि पांचही कारणें तियें । तूंही जाणसील विपायें[11] । [सांख्ये कृतांते प्रोक्तानि] जे शास्त्रें उभऊनि बाहे[12] । बोलती जयातें ॥ ७८ ॥ वेदरायाचिया राजधानीं । सांख्यवेदांताच्या भुवनीं । निरूपणाच्या ‡निशाणध्वनीं । गर्जती जियें ॥ ७९ ॥ [सिद्धये सर्वकर्मणां] जे सर्वकर्म सिद्धीलागीं । इयेंचि मुदलें[13] हो जगीं । तेथ न सुवावा[14] अभंगीं । आत्मराज ॥२८०॥ इया बोलाचे डांगुरटी[15] । तियें प्रसिद्धी आलीं किरीटी । ह्मणोनि तुझ्या हन कर्णपुटीं । §वसोत[16] का जें ॥ ८१ ॥ [निबोध मे] आणि मुखांतरीं आइकीजे । तैसें कायसें हें ओझें[17] । मी चिद्रत्न[18] तुझे । असतां हातीं ॥ ८२ ॥ दर्पण पुढां मांडलेया[19] । कां लोकांचिया डोळया । मान द्यावा पहावया । आपुलें निकें[20] ॥ ८३ ॥ भक्त जैसेनि जेथ पाहे । तेथ तें तेंचि होत जाये । तो मी तुझें जाहालों आहें । खेळणें आजी ॥ ८४ ॥ ऐसें हें प्रीतीचेनि वेगें । देव बोलतां से[21] नेघे । तंव आनंदामाजी आंगें । ¶विरत पार्थ ॥८५॥ चांदिणियाचा पडिभर[22] । होतां सोमकांताचा डोंगर । विधरोनि[23] सरोवर । हों पाहे जैसा ॥ ८६ ॥ तैसें सुख आणि अनुभूती[24] । या भावांची मोडूनि भिंती । आंतलें अर्जुनाकृती ।

---

* येतुला. † अन्य कारण कीं धनंजया, कारणका तैसिया. ‡ निःसाणध्वनी. § वसो काज, कां जे. ¶ विरतसे येरु.

---

१ नदीचें. २ कोटीपटीची. ३ निराळीच. ४ शेवाळ. ५ विलक्षण. ६ वाटसरू. ७ प्रकाशें. ८ मकरंद. ९ भ्रमराकडून. १० कमळीण. ११ आत्म्याच्याठायीं क्रिया ही अन्यकारणक आहे त्याचीं कारणें दाखवितों. १२ पहिल्या ओवींत जशी कमलक्रिया अन्यकारणक आहे तशी. १३ कदाचित्. १४ बाहु. १५ भांडवलें. १६ न घालावा. १७ दौडी. १८ ज्ञानरत्न. १९ चांगुलपण. २० आठवण. २१ भर. २२ पिघळून. २३ अनुभव. २४ व्यापलें.

सुखचि जेथ ॥ ८७ ॥ तेथ [१]समर्थ ह्मणोनि देवा । [२]अवकाश जाहाला आठवा । मग बुडतयाचा धांवा । जीवें केला ॥ ८८ ॥ अर्जुना [२]येसणें धेंडें । प्रज्ञापसरेंसीं बुडे । आलें भरतें एवढें । तें सावरूनि ॥ ८९ ॥ देव ह्मणे हां गा पार्था । तूं आपणपें देख सर्वथा । तंव [३]सावरूनि येरें माथा । तुकियेला ॥ २९० ॥ ह्मणे जाणसी दातारा । मी तुजसीं *व्यक्तिशेजारा । [४]डबगला आदीं एकाहारा । येवों पाहें ॥ ९१ ॥ तयाही हा ऐसा । लोभें देतसा जरी लालसा । तरि कां जी घालीतसा । [५]आड आड जीवा ॥ ९२ ॥ तेथ श्रीकृष्ण ह्मणती [१०]निकें । †अद्यापि नाहीं मा ठाउकें । वेड्या आणि चंद्रिके । न मिळणें [११]आहे ॥ ९३ ॥ आणि हाही बोलोनि भावो । तुज ‡दाऊं आह्मी भिवों । जे रुसतां बांधे [१२]थावो । तें प्रेम गा हें ॥ ९४ ॥ एथ एकमेकांचिये खुणे । विसंवाद [१३]तंवचि जिणें । ह्मणोनि असो हें बोलणें । इयेविषयींचें ॥ ९५ ॥ मग §कसकसें तें आतां । बोलत होतों पंडुसुता । सर्वकर्माभिज्ञता । आत्मेनिसीं ॥ ९६ ॥ तंव अर्जुन ह्मणे देवें । माझिये मनींचेचि स्वभावें । [१४]प्रस्ताविलें बरवें । प्रमेय [१५]तें जी ॥ ९७ ॥ जें सकळकर्मांचें बीज । कारणपंचक तुज । सांगेन ऐसी पैज । घेतली कां ॥ ९८ ॥ आणि आत्मया एथ कांहीं । सर्वथा लाग नाहीं । हें [१६]पुढारलासि तें देईं । [१७]लोहाणें माझें ॥ ९९ ॥ यया बोला विश्वेशें । ह्मणितलें तोषें बहुवसें । इयेविषयीं धरणें बैसे । ऐसें कें जोडे ॥ ३०० ॥ तरि अर्जुना निरूपिजेल । ¶तें कीर [१८]भाषेआंतुल । परि मेचुये [१९]$होइजेल । ऋणिया तुज ॥ १ ॥ तंव अर्जुन ह्मणे देवो । काई विसरले मागील भावो । इये गोठी कीं राखत आहों । मीतूंपण जी ॥ २ ॥ एथ श्रीकृष्ण ह्मणती होकां । आतां अवधानाचा पसर निका । करूनियां आइका । [२०]पुढारलों तें ॥ ३ ॥ तरि सत्यचि गा धनुर्धरा । सर्वकर्माचा उभारा । होतसे [२१]बाहीरबाहिरा । [२२]करणींपांचें ॥४॥ आणि पंचकारण दळवाडें । जिहीं कर्माकार मांडे । ते हेतु तंव उघडे । पांच आथि ॥ ५ ॥ येर आत्मतत्त्व उदासीन । तें ना हेतु ना उपादान । नातें अंगें करी [२३]संवाहन । कर्मसिद्धीचें ॥ ६ ॥ तेथ शुभाशुभीं अंशीं । निफजती कर्मे ऐसीं । राती [२४]देवो आकाशीं । जियापरी ॥ ७ ॥ तोय तेज धूम । यया वायूसीं संगम । जालिया होय अभ्रागम । व्योम तें नेणे ॥ ८ ॥ नाना काष्ठीं

---

* व्यक्तिशेजारा. † अझून. ‡ दाऊनि. § कैसी कैसी. ¶ जें कीर भासे. $ होईल.

१ देव समर्थ आहे म्हणून त्यास आठवणीला अवकाश झाला. २ येवढें थोर. ३ सावध होऊन. ४ डोलविला. ५ स्पष्टसान्निध्य. ६ त्रासला. ७ एकत्वास. ८ लाड. ९ जीवदशेस कां आणतां. १० खरें. ११ भितों. १२ बळ, ठिकाण. १३ परस्पर बोलणें. १४ सांगों आरंभिलें. १५ अर्थ, तात्पर्य. १६ बोललास. १७ देणें. १८ शब्दाचें वर्म. १९ प्राप्तीस्तव. २० बोललों. २१ स्पष्ट, दृष्टिगोचर. २२ पांच साधनांनीं. २३ साह्य. २४ दिवस.

नाव मिळे । ते नावाडेनि चळे । चालविजे अनिळें । उदक तें साक्षी ॥ ९ ॥ कां कवणे एकें पिंडें । वेंचितां अवतरे भांडें । मग भंवडीजे दंडें । भ्रमे चक्र ॥ ३१० ॥ आणि कर्तृत्व कुलालाचें । तेथ काय तें पृथ्वीयेचें । आधारावांचूनि वेंचे । विचारी पां ॥ ११ ॥ हेंहीं असो लोकांचिया । राहाटी होतां आघविया । कोण काम सवितया । आंगा आलें ॥ १२ ॥ तैसें पांचहेतु-मिळणी । पांचेंचि इहीं कारणीं । कीजे कर्मलतांची लावणी । आत्मा सिंना ॥ १३ ॥ आताचियें वेगळालीं । पांचही विवंचूं गा भलीं । तुकोनि घेतलीं । मोतियें जैसीं ॥ १४ ॥

२२ अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधा च पृथक् चेष्टा दैवं चैवाऽत्र पंचमम् ॥ १४ ॥

[अधिष्ठानं] तैसीं यथालक्षणें । आइकें पांचकारणें । तरि देह हें मी ह्मणें । पहिलें एथ ॥ १५ ॥ ययातें अधिष्ठान ऐसें । ह्मणिजे तें याचि दोषें । जे स्वभोग्येसीं वसे । भोक्ता एथ ॥ १६ ॥ इंद्रियांच्या दाहें हातीं । जांचोनि देवोराती । सुखदुःखें प्रकृती । जोडीजती जियें ॥ १७ ॥ तियें भोगावया पुरुखा । आन ठावोचि नाहीं देखा । ह्मणोनि अधिष्ठान भोखा । बोलिजे देह ॥ १८ ॥ हें चोविसांहीं तत्त्वांचें । कुटुंबघरवस्तीचें । तुटे बंधमोक्षांचें । *गुंथाडें एथ ॥ १९ ॥ किंबहुना अवस्थात्रया । हें अधिष्ठान धनंजया । ह्मणोनि देहा यया । हेंचि नाम ॥ ३२० ॥ [तथा कर्ता] आणि कर्ता हें दुजें । कर्माचें कारण जाणिजे । प्रतिबिंब ह्मणिजे । चैतन्याचें जें ॥ २१ ॥ आकाशचि वर्षे नीर । तें तळवटीं बांधे नाडर । मग बिंबोनि तदाकार । होय जेविं ॥ २२ ॥ कां निद्राभरें बहुवें । राया रायपण ठाउवें नव्हे । मग †स्वप्नींचिये सामावे । रंकपणीं ॥ २३ ॥ तैसें आपुलेनि विसरें । चैतन्यचि देहाकारें । आभासोनि आविष्करे । देहपणें जें ॥ २४ ॥ जया विचाराच्या देशीं । प्रसिद्धी गा जीव ऐसी । जेणें भाष केली देहेंसी । आघवाविषयीं ॥ २५ ॥ प्रकृती करी कर्में । तो म्यां केली ह्मणे भ्रमें । येथ कर्ता येणें नामें । बोलिजे जीव ॥ २६ ॥ [करणं च पृथग्विधं] मग पांतेयांच्या केशीं । एकीच उठती दिठी जैसी । मोकळी च वरी ऐसी । चिरीवं गमे ॥ २७ ॥ कां घराआंतुल एक । दीपाचा अवलोक । गवाक्षभेदें अनेक । आंवडे जेविं ॥ २८ ॥ कां एकचि

* गुतलें. † स्वप्नींच्या मायें.

१ आकारासी ये. २ सूर्याला. ३ कारणें मिळाल्यानें. ४ वेगळा, साक्षी. ५ वेगळीं करूं. ६ वजन करून. ७ आधार. ८ उद्देशें. ९ दहा हातांनीं. १० कष्ट सोसून. ११ प्रकृतीच्या योगानें. १२ शब्दानें. १३ जागृति, स्वप्न, सुषुप्ति. १४ ज्ञानाचें. १५ डबकें. १६ ठाऊक. १७ प्रकटे. १८ प्रतिज्ञाशब्द देणें. १९ पापण्यांच्या. २० चिरल्याप्रमाणें. २१ झरोका इत्यादिकांच्या योगानें. २२ वाटे.

पुरुष जैसा । अनुसरत नवां रसां । नवविध ऐसा । आवडों लागे ॥ २९ ॥ तेविं बुद्धीचे एक जाणणें । श्रोत्रादिभेदें *येणें । बाहेरि इंद्रियपणें । फांके जें कां ॥ ३३० ॥ तें [1]पृथग्विध करण । कर्माचें इया कारण । तिसरें गा जाण । नृपनंदना ॥ ३१ ॥ [विविधा च पृथक्चेष्टा] आणि पूर्वपश्चिमवाहणी । निघालिया वोघाचिया मिळणी । होय नदी नद पाणी । एकचि जेविं ॥ ३२ ॥ तैसी [3]क्रियाशक्ति पवनी । असे जे [4]अनपायिनी । ते पडिली नानास्थानीं । नाना होय ॥ ३३ ॥ जैं वाचे करी येणें । तैं तेचि होय बोलणें । हाता आली तरी घेणें । देणें होय ॥ ३४ ॥ अगा चरणाच्याठायीं । तरि गती तेचि पाहीं । [6]अधोद्वारीं दोहीं । क्षरणें तेचि ॥ ३५ ॥ †[7]कंदौनि हृदयवरी । [8]प्रणवाची उजरी । करितां तेचि शरीरीं । प्राण ह्मणिजे ॥ ३६ ॥ मग [9]ऊर्ध्वांचिया रिगा निगा । पुढती तेचि शक्ति पैं गा । [10]उदान ऐसिया [11]लिंगा । पात्र जाहाली ॥ ३७ ॥ अधोरंध्राचेनि वाहें । [12]अपान हें नाम लाहे । व्यापकपणें होये । [13]व्यान तेचि ॥ ३८ ॥ [14]आरोगिलेनि रसें । शरीर भरी सरिसे । आणि न सांडितां असे । सर्वसंधी ॥ ३९ ॥ ऐसिया इया राहटीं । मग तेचि क्रिया पाठीं । [15]समान ऐसी किरीटी । बोलिजे गा ॥ ३४० ॥ आणि जांभई शिंक ढेंकर । ऐसैसा होतसे व्यापार । [16]नागकूर्म कृकर । इत्यादि होय ॥ ४१ ॥ एवं वायूची हे चेष्टा । एकीचि परि सुभटा । वर्तनास्तव पालटा । येतसे जे ॥ ४२ ॥ [दैवं चैवाऽत्र पंचमं] ‡ते भेदली वृत्तिपंथें । वायुशक्ती गा एथें । कर्मकारण चौथें । ऐसें जाण ॥ ४३ ॥ आणि ऋतु बरवा [17]शारदु । §[18]शारदीं पुढती चांदु । चंद्रीं जैसा संबंधु । पूर्णिमेचा ॥ ४४ ॥ कां वसंतीं बरवा [19]आराम । आरामीं प्रियासंगम । संगमीं आगम । [20]उपचारांचा ॥ ४५ ॥ नाना कमळीं पांडवा । विकास जैसा बरवा । विकासीं ही [21]यावा । [22]परागाचा तो ॥ ४६ ॥ वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें [23]रसिकत्व । रसिकत्वीं [24]परतत्त्व । स्पर्श जैसा ॥ ४७ ॥ तैसी सर्ववृत्तिवैभवीं । बुद्धीचि एकली बरवी । बुद्धीही बरव नवी । इंद्रियप्रौढी ॥ ४८ ॥ इंद्रियप्रौढीमंडळा । [25]शृंगार एकचि निर्मळा । ¶[26]जे अधिष्ठात्रियां कां मेळा । दैवतांचा जो ॥ ४९ ॥ ह्मणूनि चक्षुरादिकीं दाहें । इंद्रियां [27]पोठीं [28]स्वानुग्रहें । सूर्यादिकां कां आहे । सुरांचें [29]वृंद ॥ ३५० ॥ तें देववृंद बरवें ।

---

* जेणें. † स्कंदौनि. ‡ ते वृत्ति भेदली पंथें. § शारदीं. ¶ जे.

---

१ निरनिराळें इंद्रिय. २ मार्गानें. ३ रजोगुणाची कर्तृत्वशक्ति. ४ प्राणवायु. ५ अविनाश. ६ मलमूत्रद्वारीं. ७ नाभीपासून हृदयापर्यंत. ८ ओंकाराची वृद्धि. ९ वरल्या रिघण्या निघण्यास. १० कंठस्थ वायु. ११ चिन्हास, संज्ञेस. १२ गुदस्थ वायु. १३ व्यापक शरीरस्थ वायु. १४ भक्षिलेल्या रसानें. १५ नाभिस्थ वायु. १६ नागादि उपप्राण. १७ शरदृतु. १८ बाग. १९ आदर इत्यादिकांचा. २० आगमन. २१ पुष्परजांचा. २२ गोडी. २३ परब्रह्मात्मरूप. २४ ऐश्वर्यानें. २५ शोभा. २६ आश्रय करून राहणाऱ्या. २७ ठायीं. २८ स्वकृपेनें. २९ समुदाय.

कर्मकारण पांचवें । अर्जुना एथ जाणावें । देव ह्मणे ॥ ५१ ॥ ऐसें माने तुह्मिये आयणी । तैसी कर्मजातांची हे खाणी । पंचविध आकर्णी । निरूपिली ॥ ५२ ॥ आतां हेचि खाणी वाढे । मग कर्माची सृष्टी घडे । जिहीं ते *हेतुही उघडे । †दाऊं पांचैं ॥ ५३ ॥

शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः ।
न्याय्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ॥ १५ ॥

[शरीरवाङ्मनोभिरिति 'तत्र मनसा'] तरि अवसांत आली माधवी । ते हेतु होय नवपल्लवीं । पल्लव पुष्पपुंज दावी । पुष्प फळातें ॥ ५४ ॥ कां वार्षिये आणिजे मेघ । मेघें वृष्टिप्रसंग । वृष्टीस्तव भोग । सस्यसुखाचा ॥ ५५ ॥ ना तरी प्राची अरुणातें विये । अरुणें सूर्योदय होये । सूर्यें सगळा पाहे । दिवस जैसा ॥ ५६ ॥ तैसें मन हेतु पांडवा । होय कर्मसंकल्पभावा । तो संकल्प लावी दिवा । वाचेचा गा ॥ ५७ ॥ [वाचा] मग वाचेचा तो दिवटा । दावी कृत्यजातांचिया वाटा । तेव्हां कर्ता रिगे कांमठा । कर्तृत्वाच्या ॥ ५८ ॥ [शरीरेण] तेथ शरीरादिक दळवाडें । शरीरादिकां हेतूचि घडे । लोहकाम लोखंडें । निर्वाळिजे जैसें ॥ ५९ ॥ कां तांथुवाचा ताणा । तांथु घालितां वैरणा । तो तंतूचि विचक्षणा । होय पट ॥ ३६० ॥ तैसें मनवाचादेहाचें । कर्म मनादि हेतुचि रचे । रचीं घडे रचाचें । दळवाडें जेविं ॥ ६१ ॥ [यत्] एथ शरीरादिकें कारणें । तेचि हेतु केविं हें कोणें । अपेक्षिजे तरि तेणें । अवधारि जो ॥ ६२ ॥ [तस्य हेतवः] आइका सूर्याचिया प्रकाशा । हेतु कारण सूर्यचि जैसा । कां उंसाचें कांडें उंसा । वांढि हेतु ॥ ६३ ॥ नाना वांदेवता वानावी । तैं वाचाचि लागे कांमवावी । कां वेदां वेदेंचि बोलावी । प्रतिष्ठा जेविं ॥ ६४ ॥ तैसें कर्मा शरीरादिकें । कारण हें कीर ठाउकें । परि हेंचि हेतु न चुके । हेंही एथ ॥ ६५ ॥ [कर्म प्रारभते नरः] आणि देहादिकीं कारणीं । देहादि हेतुमिळणी । होय जया उभारणी । कर्मजाता ॥ ६६ ॥ [न्याय्यं वा] तें शास्त्रार्थें मानिलेया । मार्गा अनुसरे धनंजया । तरि न्याय तो न्याया । हेतु होय ॥ ६७ ॥ जैसा पर्जन्योदकाचा लोट । विपायें धरी साळींचा पाट । तो जिरे परि अचाट । उपयोग आथी ॥ ६८ ॥ कां रोषें निघालें अवचटें । पडिलें द्वारकेचिये वाटे । तें शिणे परि सुनाटें । नवचती पदें ॥ ६९ ॥

---

* हेतु उघडे. † ते दाखऊं पांचैही.

---

१ अशा प्रकारें. २ आवडीसाठीं. ३ अकस्मात्. ४ वसंतशोभा. ५ कारण. ६ पावसाळ्यांत. ७ धान्याचा. ८ उजेडे. ९ मशाल. १० व्यापारांत, संग्रमांत. ११ समुदाय. १२ स्वच्छ कीजे. १३ तंतूचा. १४ थोडें थोडें घालतां. (जसें जांत्यांत वगैरे थोडें थोडें वैरण घालतात.) १५ जाणण्यास इच्छी. १६ वाढण्यास. १७ सरस्वती. १८ श्रमवावी. १९ अंगीकार करून. २० अवचित. २१ व्यर्थ. २२ पाउलें.

तैसें हेतुकारणमेळें । उठी कर्म जें आंधळें । तें शास्त्राचे लाहे डोळे । तैं न्याय्य[1] ह्मणिपे ॥ ३७० ॥ [विपरीतं वा] ना दूध वाढितां[2] *ठावो पावे । तंव उतोनि जाय स्वभावें । तोही वेंच परि नव्हे । वेंचिलें तें ॥ ७१ ॥ तैसें शास्त्रसाह्येंवीण । केलें नोहे जरी अकारण[3] । तरि लागो कां नागवण[4] । दान लेखीं ॥ ७२ ॥ अगा बावना वर्णांपरता[5] । कोण मंत्र आहे पंडुसुता । कां बावन ही नुच्चारितां । जीव आथि ॥ ७३ ॥ परि मंत्राची कडसणी[6] । जंव नेणिजे कोदंडपाणी । तंव उच्चार फळावाणी[7] । न पवे जेवीं ॥ ७४ ॥ तेविं कारणहेतुयोगें । जें बिसाट कर्म निगे । तें शास्त्राचिये न लगे । कांसे जंव ॥ ७५ ॥ कर्म होतचि असे तेव्हांही । परि तें होणें नव्हे पाहीं । तो अन्याय गा अन्यायीं । हेतु होय ॥ ७६ ॥

तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ।
पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥ १६ ॥

[पंचैते इति पूर्वश्लोकस्थं पदं] एवं पंचकारणा कर्मा । पांचही हेतु हे सुमहिमा । [तत्रैवमिति] आतां एथें पाहें पां आत्मा । सांपडला असे ॥ ७७ भानु न होनि रूपें जैसीं । †चक्षुरूपातें कां प्रकाशी । आत्मा न होनि कर्मे तैसीं । प्रकटित असे गा ॥ ७८ ॥ पैं प्रतिबिंब आरिसा । दोन्ही न होनि वीरेशा । दोहींतें प्रकाशी जैसा । न्याहाळिता[8] तो ॥ ७९ ॥ कां अहोरात्र हे सविता । न होनि करी पंडुसुता । तैसा आत्मा कर्म कर्ता । न होनि दावी ॥ ३८० ॥ [पश्यत्यकृतबुद्धित्वात्] परि ‡देहाहंमानभुली[9] । जयाची बुद्धी देहींच आंतली[10] । तया आत्मविषयीं जाली । मध्यरात्री गा ॥ ८१ ॥ जेणें चैतन्या[11] ईश्वरा ब्रह्मा । देहचि केलें परमसीमा । तया आत्मा कर्ता हे प्रमा[12] । अलोट उपजे ॥ ८२ ॥ आत्माचि कर्मकर्ता । हाही निश्चय नाहीं तत्त्वता । देहचि मी कर्मकर्ता । मानितो साच ॥८३॥ जे आत्मा मी कर्मातीत । सर्वकर्मसाक्षिभूत । हे आपुली कहीं मातु[13] । नायकेचि कानीं ॥ ८४ ॥ [न स पश्यति दुर्मतिः] ह्मणोनि §उमपा[14] आत्मयातें । देहचिवरी[15] मविजे एथें । विचित्र काई रात्रि दिवसांतें । डुडुळ[16] न करी ॥८५॥ पैं जेणें आकाशींचा कहीं । सत्य सूर्य देखिला नाहीं । तो थिल्लरींचें[17] बिंब काई । मानूं न लाहे ॥८६॥ थिल्लराचेनि जालेपणें । सूर्यासि आणी होणें । त्याच्या नाशीं नाशणें । कंपें कंप ॥ ८७ ॥ आणि निद्रिस्ता चेवो[18] नये ।

---

* ठावो न पवे. † रूपातें प्रकाशी. ‡ देहाहं अभिमान. § उपमा.

---

१ न्यायास अनुसरून. २ अवकाश वाढत जातां. ३ व्यर्थ. ४ द्रव्यहानि. ५ अक्षरांपलीकडे. ६ विवेचन. ७ फलद्रूप. ८ अनियमित. ९ पाहाणारा. १० व्यापली. ११ ज्ञानरूप अशा. १२ ज्ञान, प्रमाण. १३ मापातीत. १४ देहाएवढा. १५ मोजावा. १६ घुबड. १७ डबक्यांतील. १८ जागृती.

तंव स्वप्न साच हों लाहे । *रज्जु नेणतां सर्पा बिहे । विस्मो कवण ॥ ८८ ॥
जंव कवळ आथि डोळां । तंव चंद्र देखावा कीं पिंवळा । काय मृगीं ही मृगजळा । भाळावें नाहीं ॥ ८९ ॥ तैसा शास्त्रगुरूचेनि नांवें । जो वाराही टेकों नेदी सिवें । केवळ मौढ्याचेनिचि जीवें । जियाला जो ॥ ३९० ॥ तेणें देहात्मदृष्टीमुळें । आत्मया धापे देहाचें जाळें । जैसा †अभ्राचा वेग कोल्हें । चंद्रीं मानी ॥ ९१ ॥ मग तया मानणयासाठीं । देहबंदीशाळे किरीटी । कर्मांच्या वज्रगांठी । कळासे तो ॥ ९२ ॥ पाहें पां बंधभावना दृढा । नळियेवरी तो बापुडा । काय मोकळेयाही चवडा । न ठकेचि पुंसा ॥ ९३ ॥ ह्मणोनि निर्मळे आत्मस्वरूपीं । जो प्रकृतीचें केलें आरोपी । तो कल्पकोडीच्या मापीं । मवीचि कर्मे ॥ ९४ ॥ आतां कर्मामाजि असे । परि तयातें कर्म न स्पर्शे । वडवानळातें जैसें । समुद्रोदक ॥ ९५ ॥ तैसेनि वेगळेपणें । जयाचें कर्मीं असणें । तो कीर ‡बोळखावा कवणें । तरी सांगों ॥ ९६ ॥ जे मुक्तातें निर्धारितां । लाभे आपलीच मुक्तता । §जैसी दीपें दिसे पाहातां । आपली वस्तु ॥ ९७ ॥ ना तरी दर्पण जंव डेटिजे । तंव आपणपयां आपण भेटिजे । कां तोय पावतां तोय होइजे । लवणें जेविं ॥ ९८ ॥ हें असो परतोनि मागुतें । प्रतिबिंब पाहे बिंबातें । तंव पाहणें जाउनी आयितें । बिंबचि होय ॥ ९९ ॥ तैसें हारपलें आपणपें पावे । तैं संतांतें पाहातां गिंवसावें । ह्मणोनि वानावे ऐकावे । तेचि सदा ॥ ४०० ॥ परि कर्मीं असोनि कर्मे । जों ¶नागवे समविषमें । चर्मचक्षूचेनि चोंमें । दृष्टी जैसी ॥१॥ तैसा सोडवला जो आहे । तयाचें रूप आतां पाहें । उपपत्तीची बोहे । उभऊनि सांगों ॥ २ ॥

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वाऽपि स इमाँल्लोकान्न हंति न निबध्यते ॥ १७ ॥

[यस्य नाहंकृतो भावः] तरि अविद्येचिया निदौं । विश्वस्वप्नाचा ह्व धांदा । भोगित होता प्रबुद्धा । अनादि जो ॥ ३ ॥ तो महावाक्याचेनि नांवें । गुरुकृपेचेनि थांवें । माथां हात ठेवणें नव्हे । थापटिला जैसा ॥ ४ ॥ तैसा विश्वस्वप्नेंसीं माया । नीद सांडूनि धनंजया । $सहजेंचि चेइलेंला अद्वया-

---

* दोरी नेणतां सापें. † आभाळाचा. ‡ जाणावा. § जैसें दिसे दीपें. ¶ नावरे. $ सहसां.

---

१ खरें. २ नवल. ३ कावीळ नांवाचा रोग. ४ भुलावें. ५ हद्दीस. ६ बांचवा. ७ देहच आत्मा अशा दृष्टीमुळें. ८ घाली. ९ बळकट गांठींत. १० बांधला जाय. ११ पाय. १२ राघु. १३ मोजी. १४ निश्चय करितां. १५ स्वच्छ करावा. १६ संतांच्या दर्शनमात्रें करून प्राप्त होतें. १७ न सांपडे. १८ कातड्यानें. १९ बाहु. २० निद्रा. २१ धंदा. २२ योगानें. २३ वळानें. २४ जागा झाला.

नंदपणें जो ॥ ५ ॥ तेव्हां मृगजळाचे पुर । दिसते एक निरंतर । हारपती कां चंद्रकर[१] । फांकतां जैसे ॥ ६ ॥ कां बाळत्व निघोनि जाय । तैं बागुला नाहीं त्रोय[२] । पैं जळालिया इंधन न होय । *रंधन[३] जेंवि ॥ ७ ॥ ना ना चेवो[४] आलिया पाठीं । तैं स्वप्न न दिसे दिठी । तैसी अहंममता गा किरीटी । नुरेचि †तया ॥ ८ ॥ मग सूर्य आंधारालागीं । रिघो कां भलते सुरंगीं[५] । परि तो तयाच्या भागीं । नाहींचि जैसा ॥ ९ ॥ तैसा आत्मत्वें ‡वेष्टिला होये । तो जया तया दृश्यातें पाहे । तें दृश्य द्रष्टेपणेंसीं होत जाये । तयाचेंचि रूप ॥ ४१० ॥ जैसा वन्हि जया लागे । तें वन्हीचि §जालिया आंगें । दाह्यदाहकविभागें[६] । सांडिजे तें ॥ ११ ॥ तैसा कर्माकारा दुजेया[७] । तो कर्तेपणाचा आत्मया । आळ आला तो गेलिया । कांहीं बांहीं[८] जें उरे ॥ १२ ॥ तिये आत्मस्थितीचा जो रावो । मग तो देहीं इये जाणेल ठावो । काय प्रलयांबूचा[९] ओन्हाहो । वोघ मानी ॥ १३ ॥ तैसी ते पूर्ण अहंता । काई देहपणें पंडुसुता । आवरे काई सविता । बिंबें धरिला ॥ १४ ॥ पैं मथुनि लोणी घेपे[१०] । तें मागुती ताकीं घापे । तरि तें लिप्तपणें सिंपे[११] । तेणेंसी काई ॥ १५ ॥ नाना काष्ठौनि वीरेशा[१२] । ¶वेगळाविलिया हुताशा[१३] । राहे काष्ठाचिया मांदुसा[१४] । कोंडलेपणें ॥ १६ ॥ कां रात्रीचिया उदराआंत[१५] । रिगाला जो हा भास्वत[१६] । तो $रात्रीऐसी मात[१७] । ऐके काई ॥ १७ ॥ तैसें वेद्यवेदकपणेंसीं[१८] । पडिलें कां जयाच्या ग्रासी । तया देह मी ऐसी । अहंता कैंची ॥ १८ ॥ आणि आकाशें जेथें जेथुनी । जाइजे तेथ असे भरोनि । ह्मणोनि ठेलें कोंदोनी । आपेंआप ॥ १९ ॥ तैसें जें तेणें करावें । तो तेंचि आहे स्वभावें । मा कोणे कर्मीं ||वेष्टावें । कर्तेपणें ॥ ४२० ॥ नुरेचि गगनावीण ठावो । नोहेचि समुद्रा प्रवाहो । नुठीचि ध्रुवा[१९] जावों । तैसें जाहालें ॥ २१ ॥ ऐसेनि अहंकृतिभावो । जयाचा बोधी जाहाला वावो । तन्हीं देहा जंव निर्वाहो । तंव आथी कर्में ॥ २२ ॥ वारा जरी वाजोनि वोसरे[२०] । तरी तो डोल रुखीं उरे । कां सेंदे[२१] द्रुति राहे कापुरें[२२] । वेचलेनी[२३] ॥ २३ ॥ कां सरलेया गीताचा समारंभु । न वचे +वाहिवलेणाचा क्षोभु । भूमी लोळोनि गेलिया अंबु । वोल थारे ॥२४॥ अगा मावळलेंनि अर्कें । संध्येचिये भूमिके । ज्योतिदीप्तीकौतुकें । दिसे जैसी ॥ २५ ॥ पैं

---

* इंधन. † जया. ‡ वेंटला. § होय आंगें. ¶ केलिया. $ निशा ऐसी. || वटावें. + राहिलेपणाचा, राहिला मनाचा, रिझलेपणाचा.

---

१ चंद्रकिरण. २ रक्षण, उपयोग. ३ पाकक्रिया. ४ जागृती. ५ भुयारांत. ६ दाह्य=काष्ठें आदि व दाहक=अग्नि हा दोन प्रकारचा विभाग. ७ कांहीं, अवशेष. ८ वृद्धि. ९ स्पर्शे. १० पृथक् केला असतां. ११ पेटींत. १२ सूर्य. १३ जाणण्याचें वस्तु व जाणणारा. १४ ध्रुवमंडळाशीं. १५ आटोपे. १६ करंड्यांत, बेलक्यांत. १७ खपून गेला तरी. १८ वाहावा दिल्याचा.

लक्ष भेदिलियाही वरी । बाण धांवेचि तंववरी । जंव भरली आथी डेरी । बळाची तया ॥ २६ ॥ नाना* चक्रीं भांडें जालें । तें कुलालें परतें नेलें । परि भ्रमेंचि तें मागिलें । भोंवडिलेपणें ॥ २७ ॥ तैसा देहाभिमान गेलिया । देह जेणें स्वभावें धनंजया । जालें तें अपैसया । चेष्टवीच तें ॥ २८ ॥ संकल्पेंवीण स्वप्न । न लावितां दोंगीचें बन । न रचितां गंधर्वभुवन । उठी जैसें ॥ २९ ॥ आत्मयाचेनि उद्यमेंवीण । तैसें देहादिपंचकारण । होय आपणयां आपण । क्रियाजात ॥ ४३० ॥ पैं प्राचीनसंस्कारशेषें । पांचही कारणें सहेतुकें । कामवीजती गा अनेकें । कर्माकारें ॥ ३१ ॥ [हत्वापि स इमांल्लोकान्] तया कर्मामाजी मग । संहरो आघवें जग । अथवा नवें चांग । †अनुकरो ॥ ३२ ॥ परि कुमुद कैसेनि सुके । तें कमळ कैसें फांके । ये दोन्ही रवी न देखे । जया परी ॥ ३३ ॥ कां वीजु वर्षोनि आभाळ । ठिकरिया आतो भूतळ । अथवा करू शाङ्गळ । पर्जन्यवृष्टी ॥ ३४ ॥ तरि तया दोहींतें जैसें । नेणिजेचि कां आकाशें । तैसा देहींच जो असे । विदेहदृष्टी ॥ ३५ ॥ तो देहादिकीं चेष्टीं । घडतां मोडतां हे सृष्टी । न देखे स्वप्न ‡दृष्टी । चेइला जैसा ॥ ३६ ॥ येऱ्हवी चौमाचे डोळेवरी । जे देखती देहचिवरी । ते कीर तो व्यापारी । ऐसेंचि मानिती ॥ ३७ ॥ कां §तृणाचा बाहुला । जो आंगरामेरे ठेविला । तो सत्य राखता कोल्हा । न मनी काई ॥ ३८ ॥ पिसें नेसले कां नागवें । हें लोकीं येऊनि जाणावें । ठाणोरियाचे मवावे । आणिकी घाय ॥ ३९ ॥ कां महासतीचे भोग । देखे कीर सकळ जग । परि ते आगी ना आंग । ना लोक देखे ॥ ४४० ॥ तैसा स्वस्वरूपें उठिला । जो दृश्येंसी द्रष्टा ¶आटला । तो नेणे काय राहटला । इंद्रियग्राम ॥ ४१ ॥ अगा थोरीं कल्होळीं कल्होळ साने । लोपतां तिरींचेनि जनें । एकाएकीं गिळिलें हें मनें । मानिजे जन्ही ॥ ४२ ॥ तन्हीं उदकाप्रति पाहीं । कोण ग्रसितसे काई । तैसें पूर्णा दुजें नाहीं । जें तो मारी ॥ ४३ ॥ सुवर्णाचिया चंडिकां । सुवर्णशूळेंचि देखा । सुवर्णाचिया महिखा । नाश केला ॥ ४४ ॥ तो देवलवसिया कडा । व्यवहार गमला फुडा । वांचूनि महिष शूळ चौमुंडा । सुवर्णचि तें ॥ ४५ ॥ पैं चित्रींचें जळ हुताश । तो दृष्टीचाचि आभास । पटीं अग्नि $वोलांशें । दोन्ही नाहीं ॥ ४६ ॥ मु-

* चाकीं. † आन करो. ‡ किरीटी. § तणाचा. ¶ आतला. $ वोल्हाश.

१ निशाण. २ अवशिष्टता. ३ चक्र. ४ अरण्यांतलें. ५ पूर्व जन्मींच्या संस्कारानें. ६ क्रिया करविती, सिद्ध केल्या जातात. ७ रचो. ८ चंद्रविकासी कमल. ९ वीज पडून. १० तुकडे तुकडे होऊन व्यापो. ११ हिरवें तृण. १२ देहाभिमानरहित. १३ जागा झालेला. १४ चामड्याचे. १५ दृष्टीनें. १६ शेताच्या कडेस. १७ संरक्षक. १८ भ्रमिष्ठ. १९ लोकांनीं. २० युद्धीं मेलेल्यांचे. २१ व्यापला. २२ व्यवहारला. २३ इंद्रियसमुदाय. २४ लहान तरंग. २५ देवीनें. २६ महिषासुर. २७ गुरवाला. २८ खरा. २९ देवी. ३० अग्नि. ३१ गारठा.

क्ताचें देह तैसें । हाले चाले संस्कारवशें । तें देखोनि लोक पिसे । तो कर्ता ह्मणती ॥ ४७ ॥ [नहंति] आणि तयां करणेयांआंत । घडो त्रैलोक्या घात । परि तेणें केला हे मात । बोलों नये ॥ ४८ ॥ अगा अंधकार देखावा तेजें । मग तो *फेडिजे हें कें बोलिजे । तैसें ज्ञानियां नाहीं दुजें । तो मारील काई ॥ ४९ ॥ [बुद्धिर्यस्य न लिप्यते] ह्मणोनि तयाची बुद्धी । नेणे पापपुण्याची गंधी । गंगा मीनलिया नदी । †विटाळ जैसा ॥ ४५० ॥ अग्नीसि अग्नि झेंगटलिया । काय पोळे तो धनंजया । कीं ‡शस्त्र रुपे आपणया । आपणचि ॥ ५१ ॥ तैसे आपणपया परतें । जो नेणे क्रियाजातातें । तेथ काय लिंपवी बुद्धीतें । तयाचिये ॥ ५२ ॥ [न निबद्ध्यते] ह्मणोनि कार्य कर्ता क्रिया । हें स्वरूपचि जाहालें जया । नाहीं शरीरादिकीं तया । कर्मबंध ॥ ५३ ॥ जे कर्ता जीव विंदाणीं । काढूनि पांचही खाणी । घडित आहे करणीं । §आउती दाहें ॥५४॥ तेथ न्यावो आणि अन्यावो । हा द्विविध साधुनि आवो । उभारितां न लवी खेंवो । कर्म भुवनें ॥ ५५ ॥ या थोराडा कीर कामा । विरजा नोहे आत्मा । परि ह्मणसी हन उपक्रमा । हात लावी ॥ ५६ ॥ तो साक्षी चिद्रूप । कर्मप्रवृत्तीचा संकल्प । उठी तो कां ¶निरोप । आपणचि दे ॥ ५७ ॥ तरी कर्मप्रवृत्ती ही लागीं । तया आयास नाहीं आंगीं । जे प्रवृत्तीचेही उळिगीं । लोकचि आथी ॥ ५८ ॥ ह्मणोनि आत्मयाचें केवळ । जो रूपचि जाहाला निखिल । तया नाहीं बंदिशाळ । कर्माची हे ॥ ५९ ॥ परि अज्ञानाच्या पटीं । अन्यथा ज्ञानाचें चित्र उठी । तेथ चिंतारणी हे त्रिपुटी । प्रसिद्धजे कां ॥ ४६० ॥

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ।
करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ॥ १८ ॥

[परिज्ञाता] जें ज्ञान ज्ञाता ज्ञेय । हें जगाचें बीजत्रय । तें कर्माची निःसंदेह । प्रवृत्ती जाण ॥ ६१ ॥ आतां ययाची गा त्रया । व्यक्ती वेगळालिया । आईकें धनंजया । करूं रूप ॥ ६२ ॥ तरि जीवसूर्यबिंबाचे । $रश्मी श्रोत्रादिकें पांचें । धांवोनि विषयपद्माचे । फोडित मढ ॥ ६३ ॥ कीं जीवनृपाचे वारु उपलाणे । घेऊनि इंद्रियांचीं ||केकाणें । विषयदेशींचें नागवणें । आ-

* फेडी हें केवीं. † जैसा विटाळ नाहीं. ‡ कीं तें. § आहुती. ¶ निःशेष. $ ते रश्मि श्रोत्रादिकीं. || हिंसणें.

१ पूर्वकर्मानें. २ दूर करावा. ३ वार्ता, गंध. ४ भेटला असतां. ५ कोणता पदार्थ. ६ कार्य, तें करणारा, व करणें. ७ कौशल्यानें ८ हेतु. ९ इंद्रियरूप दाहा नांगरांनीं. १० न्याय. ११ आकार. १२ क्षणही. १३ मोळ्या. १४ साह्यकर्ता. १५ आरंभास. १६ ज्ञानस्वरूप. १७ बेगारींत. १८ चित्र काढणारी. १९ आकार. २० किरण. २१ कळी. २२ घोडे. २३ खोंगीर पाठीवर नसलेले घोडे. २४ नामें व रूपें. २५ सुखदुःखभोग.

णीत जे ॥ ६४ ॥ हें असो इहीं इंद्रियीं राहटे । जें सुखदुःखेसीं जीवा भेटे । तें सुषुप्तिकाळीं वोहटे । जेथ ज्ञान ॥ ६५ ॥ तया जीवा नांव ज्ञाता । आणि जें हें सांगीतलें आतां । तेंचि एथ पंडुसुता । ज्ञान जाण ॥ ६६ ॥ जें अविद्येचिये पोटीं । उपजतखेंवों किरीटी । आपणयातें वांटी । तिहीं ठायीं ॥६७॥ आपुलिये धांवे पुढां । घालूनि ज्ञेयाचा गुंडा । उभारीं मागिली कडां । ज्ञातृत्वातें ॥ ६८ ॥ [ज्ञानं] मग ज्ञातया ज्ञेया दोघां । तो नांदणुकेचा बगा । माजि जालेनि पैंगा । वाहे जेणें ॥ ६९ ॥ टाकूनि ज्ञेयाची शिंव । पुरे जयाची धांव । सकळ पदार्था नांव । सूतसे जें ॥ ४७० ॥ तें गा सामान्य ज्ञान । या बोला नाहीं आन । [ज्ञेयं] ज्ञेयाचेंही चिन्ह । आईक आतां ॥ ७१ ॥ तरि शब्दस्पर्श । रूप गंध रस । हा पंचविध आभास । ज्ञेयाचा तो ॥ ७२ ॥ जैसें एकेचि चूतफळें । इंद्रिया वेगळवेगळें । रसें वर्णें परिमळें । भेटिजे स्पर्शें ॥ ७३ ॥ तैसें ज्ञेय तरी एकसरें । परि *ज्ञान इंद्रिय द्वारें । घे ह्मणोनि प्रकारें । पांचें जालें ॥ ७४ ॥ आणि समुद्रीं वोघाचें जाणें । सरे लोणीपासीं धांवणें । कां फळीं सरे वाढणें । सस्याचें जेविं ॥ ७५ ॥ तैसें इंद्रियांच्या †वाहवटीं । धांवतया ज्ञाना ‡जेथ ठी । होय तें गा किरीटी । विषय ज्ञेय ॥ ७६ ॥ एवं ज्ञातया ज्ञाना ज्ञेया । तिहीं रूप केलें धनंजया । [त्रिविधा कर्मचोदना] हे त्रिविध सर्व क्रिया । प्रवृत्ति जाण ॥ ७७ ॥ जे शब्दादि विषय । हें पंचविध जें ज्ञेय । तेंचि प्रिय कां अप्रिय । एकेपरीचें ॥ ७८ ॥ ज्ञान मोटकें ज्ञातया । दावी ना जंव धनंजया । तंव स्वीकारा कीं त्यजावया । प्रवर्तेचि तो ॥ ७९ ॥ परि मीनातें देखोनि बकें । जैसा निधानातें रंक । कां स्त्री देखोनि कामुक । प्रवृत्ति धरी ॥ ४८० ॥ जैसें खोलारां धांवे पाणी । भ्रमर पुष्पाचिये घाणी । ना ना सुटला सांजवणी । वत्सचि पां ॥८१॥ अगा स्वर्गींची उर्वशी । ऐकोनि जेविं माणुसीं । §वेराता लावीजती आकाशीं । यागांचिया ॥ ८२ ॥ पैं पारिवो जैसा किरीटी । चढला नभाचिये पोटीं । पारवी देखोनि लोटी । आंगचि सगळें ॥ ८३ ॥ हें ना घनगर्जनासरिसा । मयूर वोवांडे आकाशा । ज्ञाता ज्ञेया देखोनि तैसा । धांवचि घे ॥ ८४ ॥ ह्मणोनि ज्ञान ज्ञेय ज्ञाता । हे त्रिविध गा पंडुसुता । होयचि कर्मा समस्तां । प्रवृत्ति येथ ॥ ८५ ॥ [कर्ता] परि तेंचि ज्ञेय विपायें । जरी ज्ञातयाचें प्रिय होये । तरी भोगावया न साहे ।

---

* ज्ञानेंद्रियद्वारें. † वाटीं, वाहते वाटीं. ‡ जेथ उठी. § वरता.

---

१ गाढ झोंपेत. २ अज्ञानाच्या. ३ उपजतांच. ४ जाणावयाचा विषयरूप दगड. ५ आपण मागें उभें राहून पुढें विषयवृत्ति. ६ मार्ग, संबंध. ७ ज्ञानें. ८ ठेवितसे, घालीतसे. ९ आम्रफळातें. १० शेवटापाशीं. ११ धान्याचें. १२ मार्गी. १३ शेवट. १४ अल्प, थोडें. १५ मत्स्याला. १६ बगळा. १७ द्रव्याला, ठेव्याला. १८ उतरणीकडे. १९ घ्राणीं, वासावर. २० संध्याकाळ, धार काढण्याची वेळ. २१ शिंग्या. २२ पारवा पक्षी. २३ उलटे. २४ कदाचित्.

क्षणही विलंब ॥ ८६ ॥ ना तरी [1]अवचटें । तेंचि विरुद्ध होऊनि भेटे । तरि [2]युगांत वाटे । सांडावया ॥ ८७ ॥ व्याळा कां हारा । [3]वैरपडा जालेया नरा । हर्ष आणि दरारा । सरसाचि उठी ॥ ८८ ॥ तैसें *[4]ज्ञेय प्रियाप्रियें । देखिलेनि [5]ज्ञातया होये । मग त्यागस्वीकारीं वाहे । व्यापारातें ॥ ८९ ॥ तेथ [6]रोगी प्रति-[7]मल्लाचा । गोसांवी सर्वदळाचा । रथ सांडूनि पाँयांचा । होय जैसा ॥४९०॥ तैसें ज्ञातेपणें जें असे । तें ये कर्ता ऐसिये दशे । [8]जैवितें बैसलें जैसें । रंधन [9]करूं ॥ ९१ ॥ कां [10]भंवरेंचि केला मळा । [11]वैरकल जाला †[12]अंकसळा । ना ना देव रिगाला देउळा- । चिया कामा ॥ ९२ ॥ तैसा [13]ज्ञेयांचि हांवा । [14]ज्ञाता इंद्रियाचा मेळावा । राहाटवी तेथ पांडवा । कर्ता होय ॥ ९३ ॥ आणि आपण होउनी कर्ता । ज्ञाना आणि [15]करणता । तेथें [16]ज्ञेयचि स्वभावता । कार्य होय ॥ ९४ ॥ ऐसा ज्ञानाचिये निजगती । पालट पडे गा सुमती । नेत्राची शोभा रातीं । पालटे जैसी ॥ ९५ ॥ कां [17]अदृष्ट जालिया उदासु । पालटे श्रीमंताचा विलासु । पूर्णिमेपाठीं शीतांशु । पालटे जैसा ॥ ९६ ॥ तैसा चालितां [18]करणें । ज्ञाता वेष्टिजे कर्तेपणें । तेथिचीं तियें लक्षणें । ऐक आतां ॥ ९७ ॥ तरि बुद्धि आणि मन । चित्त अहंकार हन । हें चतुर्विध चिन्ह । अंतःकरणाचें ॥ ९८ ॥ बाह्य त्वचा श्रवण । चक्षु रसना घ्राण । हें पंचविध जाण । इंद्रिय गा ॥९९॥ तेथ आंतुलें तंव [19]करणें । कर्ता कर्तव्या घे [20]उमाणें । मग तैं जरी जाणें । सुखा येतें ॥५००॥ तरि बाहेरिलें तियेंही । चक्षुरादिकें दाहाही । उठौनि लवलाहीं । व्यापारा [21]सुये ॥ १ ॥ मग तो इंद्रिय[22]कदंब । करविजे तंव [23]रोंच । जंव कर्तव्याचा लाभ । हातासि ये ॥ २ ॥ ना तें कर्तव्य जरी दुःखें । फळेल ऐसें देखे । तो लावी त्यागमुखें । तियें दाहाही ॥ ३ ॥ मग फिटे दुःखाचा ठावो । तंव राहाटवी रात्रिदिवो । ‡[24]विकणुवातें [25]करावो । जयापरी ॥ ४ ॥ तैसेंनि त्यागस्वीकारीं । वाहातां इंद्रियांची [26]धुरी । ज्ञातयातें अवधारी । कर्ता ह्मणिपे ॥ ५ ॥ [करण] आणि कर्तयाच्या सर्व कर्मीं । [27]ओउतांचिया परी [28]क्षेमी । ह्मणोनि इंद्रियांतें आह्मीं । [29]करणें ह्मणों ॥ ६ ॥ [कर्म] आणि हेचि करणेंवरी । कर्ता क्रिया ज्या उभारी । तिया व्यापे तें अवधारीं । कर्म एथ ॥ ७ ॥ सोनाराचिया बुद्धी लेणें । व्यापे चंद्रकरीं चांदिणें । कां

---

* ज्ञेयीं. † अंकशिळा. ‡ विकणवाते वहावो.

१ एकाएकीं. २ प्रलयासारखें संकट. ३ प्राप्त. ४ प्रिय किंवा अप्रिय ज्ञेय विषय पाहून झाल्याला तसें = पूर्वोक्तासारखें होतें. ५ प्रीति. ६ दुसऱ्या मल्लाच्या. ७ पार्यी चालणें. ८ जेवणारें. ९ स्वयंपाकास. १० भ्रमरानें. ११ कसोटी. १२ धातू लावून त्याची परीक्षा करणारा. १३ विषयेच्छेनें. १४ विषयज्ञ. १५ क्रियेचें साधन. १६ शरीरादि विषय. १७ दैव. १८ चंद्र. १९ इंद्रियें. २० मनादि क्रियासाधनें. २१ माप. २२ घाली. २३ समुदाय. २४ राबणूक. २५ फोलयुक्त धान्याला. २६ सुपाचा वारा. २७ प्रवृत्ति. २८ नांगरादि. २९ समर्थ. ३० क्रियासाधनें.

व्यापे वेल्हाळपणें । वेली जैसी ॥ ८ ॥ नो ना प्रभा व्यापे प्रकाशु । गोडिया इक्षुरसु । हें असो अवकाशु । आकाशीं जैसा ॥ ९ ॥ तैसें कर्तयाचिया क्रिया । व्यापलें जें धनंजया । तें कर्म गा बोलावया । आन नाहीं ॥ ५१० ॥ [इति] एवं कर्म कर्ता करण । या तिहींचेंही लक्षण । सांगीतलें तुज विचक्षण- । शिरोमणी ॥ ११ ॥ [त्रिविधः कर्मसंग्रहः] एथ ज्ञाता ज्ञान ज्ञेय । हें कर्माचें प्रवृत्तित्रय । तैसेंचि कर्ता *करण कार्य । हा कर्मसंचय ॥ १२ ॥ वन्हीं ठेविला असे धूम । आथि बीजीं जेवीं द्रुम । कां मनीं जोडे काम । सदां जैसा ॥ १३ ॥ तैसा कर्ता क्रिया करणीं । कर्माचें आहे जिंतवणी । सोनें जैसें खाणीं । सुवर्णाचिये ॥ १४ ॥ ह्मणोनि हें कार्य मी कर्ता । ऐसें आथि जेथ पंडुसुता । तेथ आत्मा दूरी समस्तां । †क्रियापासीं ॥ १५ ॥ यालागीं पुढतपुढती । आत्मा वेगळाचि सुमती । आतां असो हे किती । जाणतासि तूं ॥ १६ ॥

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः ।
प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि ॥ १९ ॥

[ज्ञानमिति] परि सांगीतलें जें ज्ञान । कर्म कर्ता हन । ते तीन्हीं तिहीं ठायीं भिन्न । गुणीं आहाति ॥ १७ ॥ ह्मणोनि ज्ञाना कर्मा कर्तया । पातेजों नये धनंजया । जे दोनी बांधती सोडावया । एंकचि प्रौढ ॥ १८ ॥ [प्रोच्यते गुणसंख्याने] तें सात्विक ठाउवें होये । तो गुणभेद सांगों पाहें । जो सांख्यशास्त्रीं आहे । उवाइला ॥ १९ ॥ जें विचारक्षीरसमुद्र । स्वबोधकुमुदिनीचंद्र । ज्ञानडोळसां नरेंद्र । शास्त्रांचा जें ॥ ५२० ॥ कीं प्रकृतिपुरुष दोनी । मिसळलीं दिवोरंजनी । तियें निवडिता त्रिभुवनीं । मार्तंड जें ॥ २१ ॥ जेथ अपारा मोहराशी । तत्त्वाच्या मापीं चोविसीं । उमाणें घेऊनि परेशीं । सुरवाडिजे ॥ २२ ॥ अर्जुना तें सांख्यशास्त्र । ‡पढे जयाचें स्तोत्र । [यथावच्छृणु तान्यपि] तें गुणभेदचरित्र । ऐसें आहे ॥ २३ ॥ §जे आपुलेनि आंगिकें । त्रिविधपणाचेनि अंकें । दृश्यजात तितकें । अंकित केलें ॥ २४ ॥ एवं सत्वरजतमा । तिहींची एवढी असे महिमा । जे त्रैविध्य आदिब्रह्मा । अतिक्रमी ॥ २५ ॥ परि विश्वींची आघवी मांदी । जेणें भेदलेनि गुणभेदीं । ¶पडिली तें तंव आदी । ज्ञान सांगों ॥ २६ ॥ $जे दिठी जरी चोख कीजे । तरी भलतेंही चोख सुंजे ।

* कारण. † क्रियापासाव. ‡ पुढें. § जेणें. ¶ पहिलें तें तंव सात्विक आधीं. $ तें दृष्टी.

१ विस्तारानें. २ अथवा. ३ कर्माचें साहित्य. ४ जिव्हाळा. ५ विश्वासूं नये. ६ रज व तम. ७ सत्व-समर्थ. ८ स्पष्ट केला. ९ आत्मबोधकमलास प्रफुल्लितकर्ता चंद्र. १० दिवसरात्रीप्रमाणें. ११ सूर्य. १२ माप. १३ परतत्त्वाशीं. १४ सुखी व्हावें. १५ स्तवन. १६ साह्यानें. १७ आकारानें. १८ त्रैविध्यवादी. १९ मेळा. २० कळे, समजे.

तैसें ज्ञानें शुद्धें लाहिजे । सर्वही शुद्ध ॥ २७ ॥ ह्मणोनि तें सात्विक ज्ञान । आतां सांगों दे अवधान । कैवल्यगुणनिधान । श्रीकृष्ण ह्मणे ॥ २८ ॥

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकम् ॥ २० ॥

[सर्वभूतेषु येनैकं] तरि अर्जुना गा तें फुडें । सात्विक ज्ञान चोखडें । जयाच्या उदयीं ज्ञेय बुडे । ज्ञातेनिसीं ॥२९॥ जैसा सूर्य न देखे आंधारें । सरिता नेणिजती सागरें । कां *कवळिलिया न धरे । आत्मच्छाया ॥ ५३० ॥ तयापरी जया ज्ञाना । शिवादि तृणावसाना । इया भूतव्यक्ति भिन्ना । नाडळती ॥ ३१ ॥ [भावमव्ययमीक्षते] †जैसें हातें चित्र पाहातां । होय पाणियें मीठ धुतां । कां चेवोनि स्वप्नायेतां । जैसें होय ॥३२॥ तैसें ज्ञानें जेणें करितां ज्ञातेंव्यातें पाहाणें । ‡जाणताना जाणणें । जाणावें उरे ॥३३॥ [अविभक्तं विभक्तेषु] पैं सोनें आटूनि लेणीं । न काढिती आपुलिया आयणी । कां तरंग न घेपती पाणी । गाळूनि जैसें ॥ ३४ ॥ तैसी जया ज्ञानाचिया हाता । न लगेचि §दृश्यकथा । [तज्ज्ञानं विद्धि सात्विकम्] तें ज्ञान जाण सर्वथा । सात्विक गा ॥ ३५ ॥ आरिसा पाहों जातां कोडें । जैसें पाहातेंचि कां रिगे पुढें । तैसें ज्ञेय लोटोनि पडे । ज्ञाताचि जें ॥ ३६ ॥ पुढती तेंचि सात्विक ज्ञान । जें मोक्षलक्ष्मीचें भुवन । हें असो ऐक चिन्ह । राजसाचें ॥ ३७ ॥

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ।
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥ २१ ॥

[पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं] तरि पार्था परियेस । तें ज्ञान गा राजस । जें भेदाची कांस । धरूनि चाले ॥ ३८ ॥ [नानाभावान्पृथग्विधान्] ¶विचित्रता भूतांचिया । आपण $आतोनि ठिकरिया । बहु चकें ज्ञातया । आणिली जेणें ॥ ३९ ॥ जैसें साचा रूपा आड । घालूनि विसराचें कवाड । मग स्वप्नाचें कोंबाड । विकरी निद्रा ॥ ५४० ॥ तैसें स्वज्ञानाचिये पौळी । बाहेरि $मिथ्यामोहाचे खळीं । तिहीं अवस्थांची ||वेव्हाळी । दावी जें जीवा ॥ ४१ ॥ आळंकारपणें झांकलें । बाळका सोनें कां वायां गेलें । तैसें नामीं रूपीं दुरावलें । अद्वैत जया ॥ ४२ ॥ अवतरली गाडग्यां घडां । पृथ्वी अनोळख जाली मूढां । वन्हि जाला कोनडा । दीपत्वासाठीं ॥ ४३ ॥ कां वस्त्रपणा-

---

* कवळियाही. † जेवीं. ‡ जाणतेनि. § दृश्यपथा. ¶ विचित्रभूतां. $ मिथ्याचा महिखळी. || व्याहाळी.

---

१ शुद्ध. २ नद्या. ३ गवतापर्यंत. ४ न दिसती. ५ सारवून. ६ जागें होऊन. ७ विषयाचें. ८ दृष्टीनें, बुद्धीनें. ९ आवडीनें. १० मंदिर. ११ व्यापून. १२ वेगवेगळीला. १३ चकभूल, भ्रम. १४ ओझें. १५ स्पष्ट करी. १६ आवार. १७ क्रीडा. १८ घागरीमध्यें. १९ अपरिचित.

चेनि आरोपें । मूर्खाप्रति तंतु हारपे । ना ना मुग्धां पट लोपे । दाऊनि चित्र ॥ ४४ ॥ तैसी जया ज्ञाना । [वेत्ति सर्वेषु भूतेषु] जाणोनि भूतव्यक्ती भिन्ना । ऐक्यबोधाची *भावना । निमोनि गेली ॥ ४५ ॥ मग इंधनीं भेदला अनळ । फुलावरी परिमळ । कां जळभेदें सकळ । चंद्र जैसा ॥ ४६ ॥ तैसे पदार्थभेद बहुवस । जाणोनि लहान थोर वेष । [तज्ज्ञानं विद्धि राजसं] आतलें तें राजस । ज्ञान येथ ॥ ४७ ॥ आतां तामसाचेंही लिंग । सांगेन तें वोळख चांग । डावलावया मातंग । सदन जैसें ॥ ४८ ॥

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् ।
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥

[यत्तु] तरि किरीटी जें ज्ञान । हिंडे विधीचेनि वस्त्रें हीन । श्रुति पाठमोरी नग्न । ह्मणौनि तया ॥ ४९ ॥ येरीही †शास्त्रबाह्यकारीं । जें निंदेचे विटाळवरी । बोळविलेंसे डोंगरीं । म्लेंच्छधर्मांच्या ॥ ५५० ॥ जें गा ज्ञान ऐसें । ‡गुणग्रहें तामसें । घेतलें भोंवे पिसें । होऊनियां ॥ ५१ ॥ जें सोयरिके बाध नेणे । पदार्थीं निषेध न ह्मणे । निरोपिलें जैसें सुणें । §शून्यग्रामीं ॥ ५२ ॥ तया तोंडीं जें नाडळे । कां खातां जेणें पोळे । तेंचि येक वाळे । येर घेचि तें ॥ ५३ ॥ पैं सोनें चोरितां उंदिर । न ह्मणे थोरविथर । नेणें मांसखोंडर । काळें गोरें ॥ ५४ ॥ ना ना वनामाजि बोहरी । कैडसणी जेविं न करी । कां जीत मेलें न विचारी । बैसतां मासी ॥ ५५ ॥ अगा वांता कां वाढिलेया । साजुक कां सेंडलिया । विवेक कावळिया । नाहीं जैसा ॥ ५६ ॥ तैसें निषिद्धें सांडूनि द्यावें । कां विहितें आदरें घ्यावें । हें विषयांचेनि नांवें । नेणेचि जें ॥ ५७ ॥ जेतुलें आड पडे दिठी । तेतुलें घेचि विषयासाठीं । मग ¶तें स्त्रीद्रव्य वांटी । शिश्नोदरां ॥ ५८ ॥ $तीर्थातीर्थ हे भोंष । उदकीं नाहीं सेनोळख । तृषा बोळे तेंचि सुख । ||वांचूनियां ॥ ५९ ॥ तयाचिपरी खाद्याखाद्य । न ह्मणे निंद्यानिंद्य । तोंडा आवडे तें मेध्य । ऐसाचि बोध ॥ ५६० ॥ आणि स्त्रीजात तितुकें । त्वचेंद्रियेंचि वोळखे । तियेविषईं सोय-

---

* वासना. † बटिकरीं. ‡ गुणाग्रहें. § सुणाग्रामीं. ¶ तें द्रव्य स्त्रियां वांटी. $ तीर्थ तीर्थ. || येर नेणे.

---

१ मूर्खांस. २ नाश पावली. ३ प्रतिबिंबत्वानें भेद. ४ व्यापलें. ५ मांगाचें घर. ६ विरुद्धाचरणातें. ७ निंदा करून विटाळून टाकलें. ८ तमोगुणरूप नक्कानें. ९ पिशाच, भ्रमिष्ट. १० शरीरसंबंधाविषयीं. ११ सोडिलें. १२ कुत्रें. १३ ओसाड गांवीं. १४ प्राप्त होत नाहीं. १५ त्यागी. १६ वरें वाईट. १७ व्याघ्रादिक. १८ अग्नी, वणवा. १९ विचार. २० ओकलेलें. २१ कुजलेलें. २२ अपवित्र. २३ शास्त्रप्रतिपादित. २४ ह्मणणें. २५ ओळखीची. २६ हरे. २७ भक्ष्याभक्ष्य. २८ पवित्र.

रिके । सादरचि बहु ॥ ६१ ॥ पैं स्वार्थीं जें [9]उपकरे । तयाचि नाम सोयिरें । देहसंबंध न सरे । जिये ज्ञानीं ॥ ६२ ॥ मृत्यूचें आघवेंचि अन्न । आगी आघवेंचि इंधन । तैसें जगचि आपलें धन । तामसज्ञाना ॥ ६३ ॥ [कृत्स्नवदेकस्मिन्] ऐसेनि विश्व सकळ । जेणें [3]विषयचि मानिलें केवळ । तया एक जाण फळ । देहभरण ॥ ६४ ॥ आकाशपतिता नीरा । जैसा सिंधुचि येक थारा । तैसें कृत्यजात उदरा- । लागींचि बुझे ॥ ६५ ॥ [अहैतुकं] वांचूनि स्वर्ग नरक आथी । तया हेतु प्रवृत्ति निवृत्ती । *इये आघवीयेचि राती । जाणिवेची जें ॥ ६६ ॥ [कार्ये सक्तं] जें देहखंडा नाम आत्मा । ईश्वर पाषाण प्रतिमा । यया परौती [11]प्रमा । ढळों नेणे ॥ ६७ ॥ [अतत्त्वार्थवत्] ह्मणे पडिलेनि शरीरें । [12]केलेनिसी आत्मा सरे । मा भोगावया उरे । कोण वेषें ॥ ६८ ॥ ना ईश्वर पाहातां आहे । तो भोगवी जरी हें होये । तरी देवचि खाये । विकूनियां ॥६९॥ गांवींचे देवळेश्वर । [14]नियामकचि होती साचार । तरि देशींचे डोंगर । उगे कां असती ॥५७०॥ [अल्पं च] ऐसा [15]विपायें देव मानिजे । तरि पाषाणमात्रचि जाणिजे । आणि आत्मा तंव ह्मणिजे । देहातेंचि ॥७१॥ येरें पापपुण्यादिकें । तें आघवेंचि करोनि लटिकें । हित मानी अग्निमुखें । [17]चरणें जें कां ॥ ७२ ॥ जें †[18]चोमाचे डोळे दाविती । जे इंद्रियें गोडी लाविती । तेंचि साच हे [19]प्रतीती । [20]फुंडी जया ॥ ७३ ॥ [तत्तामसं] किंबहुना ऐसी [21]प्रथा । वाढती देखसी पार्था । धूमाची वेली वृथा । आकाशीं जैसी ॥ ७४ ॥ कोरडा ना वोला । ‡उपयोगा आथी गेला । तो वाढोनि मोडला । [16]भेंड जैसा ॥७५॥ ना ना उसांचीं कणसें । कां नपुंसकें माणुसें । वन लागलें जैसें । [22]सांबरीचें ॥७६॥ ना तरी बाळकाचें मन । कां चोराघरींचें धन । अथवा गळस्तन । शेळियेचे ॥ ७७ ॥ तैसें जें [1]वायाणें । §[10]वोसाळ दिसे जाणणें । तयातें मी ह्मणें । तामस ज्ञान ॥ ७८ ॥ [उदाहृतं] तेंही ज्ञान इया भाषा । बोलिजे तो भाव ऐसा । जात्यंधाचा कां जैसा । डोळा [2]वांड ॥ ७९ ॥ कां बधिराचे नीट कान । अपेया नाम पान । तैसें आडनांव ज्ञान । तामसा तया ॥ ५८० ॥ हें असो किती बोलावें । तरि ऐसें जें देखावें । तें ज्ञान नोहे जाणावें । [23]डोळस तम ॥ ८१ ॥ एवं तिहीं गुणीं । भेदलें [13]यथालक्षणीं । ज्ञान श्रोतेशिरोमणी । दाविलें तुज ॥८२॥ आतां याचि त्रिप्रकारा । ज्ञानाचेनि धनुर्धरा । प्रकाशें होती गोचरा । [23]कर्तयांच्या क्रिया ॥ ८३ ॥ ह्मणौनि कर्म पैं गा । अनुसरे तिहीं

---

* इयेविषयीं आघवीचि राती. † चर्मचक्षु. ‡ ना उपेगा. § वोसळ.

१ कामास येतें. २ काष्ठ. ३ विषयच सर्व जग असें मानलें. ४ पोषण. ५ परिच्छिन्न देहाला. ६ बुद्धि. ७ लिंगदेहासह. ८ नासे. ९ एक नियंते. १० क्वचित्. ११ फिरणें. १२ चामड्याचे. १३ अनुभव. १४ खरी. १५ स्थिति, ख्याति. १६ भेंड्याचा वृक्ष. १७ निवडुंगाचें. १८ निरर्थक. १९ शून्य, ओशाळ, वाईट. २० मोठा. २१ प्रत्यक्ष अंधार. २२ सर्व लक्षणांनीं युक्त. २३ प्रत्यक्ष.

भागां । मोहरें[1] जालियां वोघा । तोय जैसें ॥ ८४ ॥ तेंचि ज्ञानत्रयवशें । त्रिविध कर्म जें असे । तेथ सात्विक तंव ऐसें । परिस आधीं ॥ ८५ ॥

नियतं संगरहितमरागद्वेषतः कृतम् ।
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्विकमुच्यते ॥ २३ ॥

[नियतं] तरि स्वाधिकाराचेनि मार्गें । आलें जें मानिलें आंगें । पतिव्रतेचेनि परिष्वंगें[2] । प्रियातें जैसें ॥ ८६ ॥ सांवळ्या[3] आंगा चंदन । प्रेमदालोचना[4] अंजन । तैसें अधिकारासी मंडण[5] । नित्यपणें जें ॥ ८७ ॥ तें नित्यकर्म भलें । होय नैमित्तिकीं सांवाइलें[6] । सोनयासि जोडलें । सौरभ्य[7] जैसें ॥ ८८ ॥ [संगरहितं] आणि आंगा जीवाची संपत्ती । वेंचूंनि करी बाळाची पाळती[8] । परि जीवें उबंगणें[9] हे स्थिती । न पाहे माय ॥ ८९ ॥ [अफलप्रेप्सुना कर्म] तैसें सर्वस्वें कर्म अनुष्ठी । परि फळ न सुंये[10] दिठी[11] । उखिती[12] क्रिया पैठी[13] । ब्रह्मींचि करी ॥ ५९० ॥ [अरागद्वेषतः कृतं] आणि प्रियें[14] आलिया स्वभावें । *शबळ[15] उरे वेंचे ठाउवें नव्हे । तैसें सत्प्रसंगें करावें । परंरुपे[16] जरी ॥ ९१ ॥ तरि अंकरणाचेनि[17] खेदें । द्वेषांतें जिवीं †न बांधे । जालियाचेनि आनंदें । फुंजों[18] नेणें ॥ ९२ ॥ ऐसऐसिया हातवटिया । कर्म निफजे जें धनंजया । [यत्तत्सात्विकमुच्यते] जाण सात्विक हें तया । गुणनाम गा ॥ ९३ ॥ ययावरी राजसाचें[19] । लक्षण सांगिजेल साचें । न करीं अवधानाचें । वोंणेंपण[20] ॥ ९४ ॥

यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः ।
क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥ २४ ॥

[यत्तु कामेप्सुना] तरि घरीं मातापितरां । धड बोली नाहीं संसारा । येर विश्व भरी आदरा । मूर्ख जैसा ॥ ९५ ॥ कां तुळशीचिया झाडा । दुरूनि न धापे[21] सिंतोडा । द्राक्षींचेया तरि बुडा । दूधचि लाविजे ॥ ९६ ॥ [कर्म] तैसीं नित्यनैमित्तिकें । कर्में जियें आवश्यकें । तयांचेविषीं न शके । बैसला उठूं ॥ ९७ ॥ ‡येरां काम्याचेनि तरि नांवें । §देह सर्वस्व आघवें । वेंचितांही न मनवे[22] । बहु ऐसें ॥ ९८ ॥ अगा देवढी[23] वाढी लाहिजे । तेथ मोल देतां न

---

* सामग्री. † न बंधे. ‡ येकां. § देहें.

---

१ मार्गास लागलेलें. २ आलिंगनानें. ३ श्यामवर्ण. ४ स्त्रियांच्या नेत्रांला. ५ भूषण. ६ साह्य झालें. ७ सुगंध. ८ खर्चून. ९ रक्षण. १० कंटाळणें, त्रासणें. ११ दृष्टीस न घाली. १२ अवघी. १३ अर्पिली, प्रविष्ट. १४ आवडतें. १५ अप्रिय. १६ राहे. १७ न केलें याविषयींच्या. १८ गर्वास चढत नाहीं. १९ रजोगुणयुक्ताचें. २० कमताथी. २१ न घालावा. २२ मानवत नाहीं. २३ दिढी दुपटीनें वाढ.

न धाइजे । पेरितां पुरे न झणिजे । बीज जेवीं ॥ ९९ ॥ कां परिस जालिया हातीं । लोहालागीं सर्वसंपत्ती । *वेंचितां न ये उन्नति । साधक जैसा ॥ ६०० ॥ तैसीं फळें देखोनि पुढें । काम्यकर्मे दुवाडें । [पुनः] करी परि तें थोडें । केलेंहि मानी ॥ १ ॥ तेणें फळकामुकें । यथाविधि नेटकें । काम्य कीजे तितकें । क्रियाजात ॥ २ ॥ [साहंकारेण वा] आणि तयाही केलियाचें ॥ तोंडीं लावी डौंडीचे । कर्मीं या नामश्रेष्ठाचें । वाणे सारी ॥ ३ ॥ तैसा भरे कर्माहंकारु । मग पिता अथवा गुरु । ते न मनी काळज्वरु । औषध जैसें ॥ ४ ॥ तैसेनि साहंकारें । फळाभिलाषियें नरें । कीजे गा आदरें । जें जें कांहीं ॥ ५ ॥ [क्रियते बहुलायासं] परि तेंही करणें बहुवसा । वळघोनि करी सायासा । जीवनोपाय कां जैसा । कोल्हांटियाचा ॥ ६ ॥ एका कणालागीं उंदीर । अवघा उपसे डोंगर । कां †शेवाळा दोपें दर्दुर । समुद्र डेहुळी ॥ ७ ॥ पैं भिकेपरतें न लाहे । तऱ्ही गारुडी साप वाहे । काय कीजे शीणचि होये । गोड येकां ॥ ८ ॥ हें असो परमाणूचेनि लाभें । पाताळ लंघिती ‡चोळंबे । तैसें स्वर्गसुख लोभें । विचंबणें जें ॥ ९ ॥ [यत्तद्राजसमुच्यते] तें काम्य कर्म सक्लेश । जाणावें येथ राजस । आतां चिन्ह परिस । तामसाचें ॥ ६१० ॥

अनुबंधं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषम् ।
मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥ २५ ॥

[अनुबंधं] तरि तें गा तामस कर्म । जें निंदेचें काळें धोम । निषेधाचें जन्म । साच जेणें ॥ ११ ॥ जें निपजविल्या पाठीं । कांहींच न दिसे दिठी । रेघ काढिलिया पोटीं । तोयाचे जेवीं ॥ १२ ॥ कां कांजी घुसळलिया । §कां राख फुंकिलिया । कांहीं न दिसे गाळिलिया । वाळुघाणा ॥ १३ ॥ ना ना उपणिलिया भूंस । कां विंधिलिया आकाश । ना ना मांडिलिया पाश । वारयासी ॥ १४ ॥ हें अवघेंचि जैसें । वांझें होऊनि नाशे । जें केलिया पाठीं तैसें । वायांचि जाय ॥ १५ ॥ [क्षयं] येऱ्हवीं नरदेहाही येवढें । धन आटणीये पडे । तें कर्म निफजवितां मोडे । जगाचें सुख ॥ १६ ॥ जैसा कमळवनीं ¶फांस । काढिलिया कांटसें । आपण झिजे नाश । कमळां करी ॥ १७ ॥ [हिंसां] कां आपण आंगें जळे । आणि नोगवी जगाचे डोळे । पतंग जैसा

* वेंचितां ये, वेंच करितां ये. † शेवाळोदेशें. ‡ वाळंबे. § कां साखर, कां राखोंडी, ¶ पाश.

१ तृप्त न व्हावें. २ उत्कर्षदशेस. ३ कठीण. ४ चांगलें. ५ प्रसिद्धीच्या. ६ त्यासारिखें करी. ७ आरूढ होऊन. ८ कष्टास. ९ आलोडी, ढवळी. १० वाळवी. ११ श्रम करणें. १२ घर. १३ अपवित्रतेचें. १४ पेज. १५ घाण्यांत वालु घातली तरी. १६ पाखडलें असतां. १७ खर्ची. १८ कांट्यांचा. १९ आंधार करी.

सळें । दीपाचेनि ॥ १८ ॥ तैसें सर्वस्व वायां जावो । वरी स्वदेहाही होय घावो । परि पुढिलां अपावो । निफजविजे जेणें ॥ १९ ॥ मासी आपणयातें गिळवी । परि पुढिलां वांती शिणवी । तें कश्मळ आठवी । आचरण जें ॥ ६२० ॥ [अनपेक्ष्य च पौरुषं] तेंही *करावया दोषें । मज सामर्थ्य असे कीं नसे । हेंही पुढील तैसें । न पाहातां करी ॥ २१ ॥ केवढा माझा उपावो । करितां कोण प्रस्तावो । केलियाही ओंवो । काय येथ ॥ २२ ॥ [मोहादारभ्यते कर्म] इये जाणिवेची सोये । अविवेकाचेनि पायें । पुसोनियां होये । सांटोप कर्मीं ॥ २३ ॥ आपला वसौटा जाळुनी । बिसांटे जैसा वन्ही । कां स्वमर्यादा गिळोनि । सिंधु उठी ॥ २४ ॥ मग नेणे बहु थोडें । न पाहे मागें पुढें । मार्गामार्ग येकवेढें । करीत चाले ॥ २५ ॥ [यत्तत्तामसमुच्यते] तैसें कृत्याकृत्य सैरकटित । आपपर †नुरवित । कर्म होय तें निश्चित । तामस जाण ॥२६॥ ऐसी गुणत्रयभिन्ना । कर्माची गा अर्जुना । हे केली विवंचना । उपपत्तीसीं ॥२७॥ आतां ययाचि कर्मा भजतां । कर्माभिमानिया कर्ता । तो जीवही त्रिविधता । पातला असे ॥२८॥ चतुराश्रमवशें । एकपुरुष चतुर्धा दिसे । कर्तया त्रैविध्य तैसें । कर्मभेदें ॥ २९ ॥ परि तयां तिहींआंत । सात्विक तंव प्रस्तुत । सांगेन दत्तचित्त । ऑकर्णीं तूं ॥ ६३० ॥

मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्विक उच्यते ॥ २६ ॥

[मुक्तसंगः] तरि फळोद्देशें सांडिलिया । वाढिती जेवीं सरळिया । शाखा कां चंदनाचिया । बांवनया ॥ ३१ ॥ कां न फळतांही सार्थका । जैसिया नागलतिका । तैसिया करी नित्यादिका । क्रिया जो कां ॥ ३२ ॥ परि फळशून्यता । नाहीं तया विफळता । पैं फळासीचि पंडुसुता । फळें कायिसीं ॥३३॥ [अनहंवादी] आणि आदरें करी बहुवसें । परि मी कर्ता हें नुमसे । वर्षाकाळींचें जैसें । मेघवृंद ॥ ३४ ॥ तेविंचि परमात्मलिंगा । समर्पावयाजोगा । कर्मकलाप पैंगा । निपंजावया ॥ ३५ ॥ तया काळांतें नुलंघणें । देशशुद्धीही साधणें । कां शास्त्रांच्या वार्तां पाहणें । क्रियानिर्णय ॥ ३६ ॥ [धृत्युत्साहसमन्वितः] ‡वृत्तीकरणा येकवळा । चित्त जावों नेदणें फळा । नियमाचिया सांखळा । §वाहे सदा ॥ ३७ ॥ हा निरोध साहावयालागीं । धैर्याचिया चां-

* करावयोद्देशें. † न विचारित. ‡ वृत्ती करणें एकवळा. § वाहणें.

१ द्वेषानें. २ सदोष. ३ प्रसंग. ४ तात्पर्य. ५ अहंतायुक्त. ६ वसतिस्थान. ७ पसरे. ८ एकत्र. ९ रगडीत. १० विवरण. ११ ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, व संन्यास यांच्या योगें. १२ चार प्रकारचा. १३ श्रवण कर. १४ फलेच्छा. १५ सरळ. १६ मलयाचलसंबंधीं. १७ नागवेल. १८ नुपजे. १९ समुदाय. २० उपजण्यासाठीं. २१ शास्त्ररूपदिव्यानें. २२ इंद्रियें, वृत्ती करणें अशा पाठीं बोलणें व चालणें याला. २३ ऐक्यता. २४ प्रतिबंध. २५ अटक.

गाचांगी । चिंतवणी[1] जिती[2] आंगीं । वाहे जो कां ॥ ३८ ॥ आणि आत्मया-
चिये आवडी । कर्मे करितां वरपडी[3] । देहसुखाचिये परवडी[4] । येवों न लाहे
॥ ३९ ॥ ऐसा निद्रा दुन्हावे । क्षुधा न बाणवे । सुरवाड[5] न पावे । आंगाचा
ठावो ॥ ६४० ॥ तंव अधिकाधिक । उत्साह धरी आगळीक[6] । सोनें जैसें *पुटीं
तुंक[7] । तुटलिया कसीं ॥ ४१ ॥ जरी आवडी आथी साच । तरी जीवितही
सलंच[8] । आगी[9] घालितां रोमांच । देखिजंती[10] सतिये ॥ ४२ ॥ मा आत्मया
येवढिया प्रिया । वालभेला[11] जो धनंजया । देहही सिदेतां[12] तया । काय खेद
होईल ॥ ४३ ॥ ह्मणौनि विषय सुरवाड तुटे । जंव जंव देहबुद्धि आटे । तंव
तंव आनंद दुणवटे । कर्मी जया ॥ ४४ ॥ [सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः] ऐसेनि जो
कर्म करी । आणि कोणे येके अवसरीं । तें ठाके[13] ऐसी सरी[14] । वाहे जरी
॥ ४५ ॥ †तरी कडोडी[15] मोडे गाडा । तो आपणपें न मनी अवघडा । तैसा
ठाकलेनिही थोडां[16] । नोहे जो कां ॥ ४६ ॥ ना तरि आदरिलें । अव्यंग सिद्धी
गेलें । तरि तेंही जिंतिलें । मिरऊं नेणें ॥ ४७ ॥ इया खुणा कर्म करितां ।
देखिजे जो पंडुसुता । [कर्ता सात्विक उच्यते] तयातें ह्मणिपे तत्त्वता । सात्विक
कर्ता ॥ ४८ ॥ आतां राजसा कर्तेया । वोळखणें हें धनंजया । जे अभिलाषा
जगाचिया । वसौटा[17] तो ॥ ४९ ॥

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥ २७ ॥

[रागी] जैसा गांवींचिया कश्मळा[18] । उकरडा होय येकवेळा[19] । कां स्मशानीं
अमंगळा । आघवयांचि ॥ ६५० ॥ तया परी जो अशेषा[20] । विश्वाचिया अ-
भिलाषा[21] । पायपाखाळणियां[22] दोषा । घरटा[23] जाला ॥ ५१ ॥ [कर्मफलप्रेप्सुः]
ह्मणोनि फळाचा लोंग[24] । देखे जिये असलग[25] । तिये कर्मीं चांग । रोहो[26] मांडी
॥ ५२ ॥ आणि आपण जालिये जोडी[27] । उपखों[28] नेदी कवडी । क्षणक्षणा कु-
रोंडी । जीवाची करी ॥ ५३ ॥ [लुब्धः] कृपणचित्तीं ठेवा आपुला । तैसा दक्ष
परावियां[29] ‡माला[30] । बक जैसा खुंतला[31] । मासेयासी ॥ ५४ ॥ [हिंसात्मकः]
आणि गोंवी[32] गेलिया जवळी । झिंगटलिया आंग फोडी[33] । §फळें तरी आंत

* पुठींतुक. † तरी मोडे जो गाडा. ‡ मोला. § फळें आंत.

१ चिंता. २ जिवंत, जागरूक. ३ प्राप्त. ४ अवस्थेस. ५ अनुभवास न्ये. ६ सुखावस्था. ७ अधिक. ८ वजन. ९ तुच्छ, दुःखरूप. १० आगींत उडी घालतांना सतीच्याही अंगावर भयानें रोमांच उभारतात. ११ आवडीनें युक्त झाला. १२ दुःख पावत असतां. १३ स्तब्ध राहे. १४ प्रकार. १५ डोंगराच्या अवघड ठिकाणीं. १६ लहान. १७ स्थान. १८ मळ, केरकचरा. १९ एक ठिकाण. २० संपूर्ण. २१ इच्छेसाठीं. २२ पादप्रक्षालनार्थ. २३ आश्रय. २४ संबंध. २५ सोपा. २६ उपक्रम. २७ लाभानें. २८ न खर्ची. २९ दुसऱ्याच्या. ३० ध्यानस्थ झाला. ३१ अडकवी. ३२ स्पर्श झाला असतां. ३३ फाडी.

पोकळीं । बोरांटी[1] जैसी ॥ ५५ ॥ तैसें मनें वाचा कायें । भलतया दुःख देत[2] जाये । स्वार्थ साधितां न पाहे । पराचें हित ॥ ५६ ॥ [अशुचिः] तेविंच आंगें[3] कर्मीं । आचरण नोहे क्षमी[4] । न निघे मनोधर्मीं[5] । अरोचक[6] ॥ ५७ ॥ कनकाचिया[7] फळा । आंत माज बाहेरी मौळा[8] । तैसा सबाह्य दुबळा । शुचित्वें जो ॥ ५८ ॥ [हर्षशोकान्वितः] आणि कर्मजात केलिया । फळ लाहे जरी धनंजया । तरि *हरिखें[9] जगा यया । वांकुलिया वाये ॥ ५९ ॥ [कर्ता राजसः परिकीर्तितः] अथवा जें आदरिलें । हीनफळ[10] होय केलें । तरि शोकें तेणें †जितिलें[11] । धिक्कारों लागे ॥ ६६० ॥ कर्मीं राहाटी ऐसी । जयातें होती देखसी । तोचि जाण त्रिशुद्धीसी[12] । राजस कर्ता ॥ ६१ ॥ आतां यया पाठीं येर[13] । जो कुकर्माचा आंगर[14] । तोही करूं गोचर[15] । तामस कर्ता ॥ ६२ ॥

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ॥ २८ ॥

[अयुक्तः] तरि मियां लागलिया कैसें । पुढील जळत असे । हें नेणिजे हुतासें[16] । जियापरी ॥६३॥ पैं शस्त्रें मियां तिखटें । नेणिजे कैसेनि निवटे[17] । कां नेणिजे काळकूटें । आपलें केलें ॥ ६४ ॥ तैसा पुढीलया आपुलया । ‡घात करीत धनंजया । आदरी वोखटियां[18] । क्रिया जो कां ॥ ६५ ॥ तिया करितां ही वेळीं । काय जालें हें न सांभाळी । चळला वायू वाहटुळी । चेष्टे[19] तैसा ॥ ६६ ॥ पैं करणिया आणि जया । मेळ नाहीं धनंजया । तो पाहूनि पिसेया[20] । कैंची त्रांय[21] ॥ ६७ ॥ [प्राकृतः] आणि §इंद्रियांचें वैरिलें[22] । चरोनि राखे जो जियालें[23] । बैलातळीं लागलें । गोचिड जैसें ॥ ६८ ॥ हांसेया[24] रुदना वेळ । नेणतां औंदरी बाळ[25] । राहटे उच्छळंखळ[26] । तयापरी ॥ ६९ ॥ जो प्रकृती आंतलेपणें[27] । कृत्याकृत्यस्वाद नेणे[28] । फुगे केरें धालेपणें[29] । उकरडा जैसा ॥ ६७० ॥ [स्तब्धः] ह्मणौनि मान्याचेनि नांवें । ईश्वराही परी न[30] खालवे । स्तब्धपणें न मनवे । डोंगरासी ॥ ७१ ॥ [शठः] आणि मन जयाचें कैलाली[31] । राहाटी ¶फुंडी[32] चोरिली । दिठी कीर ते बोली । पैण्यांगनेची[33] ॥ ७२ ॥ किंब-

* हर्षें. † जियालें. ‡ घाय. § इंद्रियां ओगरिलें, वैरलें. ¶ फुली.

१ बोरीची ढाळी. २ अंगानें करवत नाहीं तथापि मनानें तरी ल्या वाईट गोष्टीची इच्छा करतो. ३ समर्थ. ४ अरुची. ५ धोतऱ्याच्या. ६ कांटवण. ७ हर्षानें. ८ वेडावी. ९ निर्फळ. १० वांचणें. ११ खचीत. १२ इतर, तामस. १३ मुख्य स्थान. १४ प्रत्यक्ष. १५ अग्नीनें. १६ मरे. १७ वाईट. १८ हाले. १९ वेड्याला, मूर्खाला. २० रक्षण. २१ तोंडीं दिलें. २२ जीव. २३ हंसण्यास व रडण्यास. २४ प्रारंभी. २५ यथेच्छ. २६ व्यापलेपणें. २७ कर्माकर्माची रुचि. २८ तृप्तपणानें. २९ न लवे. ३० कपटी, दारू विकणारासारखें लोकांस माल देऊनही वेड लावणारें. ३१ खरी. ३२ वेश्येची.

हुना कपटाचें । देहचि वळिलें तयाचें । तें जिणें कीं जुवाराचें । टिटिघर ॥७३॥ नोहे तयाचा प्रादुर्भावो । तो साभिलाषभिल्लांचा गांवो । ह्मणौनि नये येवों जावों । *तया ठाया ॥ ७४ ॥ [नैष्कृतिकः] †आणि आणिकाचें निकें केलें । विरु होय जया आलें । जैसें अपेय पैया मिनलें । लवण करी ॥ ७५ ॥ कां हवि ऐसा पदार्थ । घातलिया आगीआंत । तेचि क्षणीं धडाडित । अग्नि होय ॥ ७६ ॥ ना ना सुद्रव्यें गोमटीं । जालिया शरीरीं पैठी । होउनि ठाती किरीटी । मळचि जेवि ॥ ७७ ॥ तैसें पुढिलाचें बरवें । जयाच्या भीतरीं पावे । आणि विरुद्धचि आघवें । होऊनि निगे ॥ ७८ ॥ जो गुण घे दे दोष । अमृताचें करी विष । दूध पाजिलिया देख । व्याळ जैसा ॥ ७९ ॥ [अलसः] आणि ऐहिकीं जियावें । जेणें परत्रा साच यावें । तें उचित कृत्य पावे । अवसरीं जिये ॥ ६८० ॥ तेव्हां जया आपैसी । निद्रा ये ठेविली ऐसी । ‡दुर्व्यवहारी जैसी । विटाळें लोटे ॥ ८१ ॥ पैं द्राक्षरसा आम्ररसा । वेळे तोंड सडे वायसा । कां डोळे फुटती दिवसा । डुडुळाचे ॥ ८२ ॥ तैसा कल्याण काळ पाहे । तैं तयातें आळस खाये । ना प्रमादीं तरि होये । तो ह्मणे तैसें ॥ ८३ ॥ [विषादी] §जेविंचि सागराच्या पोटीं । जळे अखंड आगिठी । तैसा विषाद वाहे गांठीं । जिवाचिये जो ॥ ८४ ॥ लेंडोरांआगीं धूमावधि । कां अंपाना आंगीं दुर्गंधि । तैसा जो जीवितावधि । विषादें केला ॥ ८५ ॥ [दीर्घसूत्री च] आणि कल्पांताचिया पोरा । वेगळेंही जो वीरा । सूत्र धरी व्यापारा । साभिलाषा ॥ ८६ ॥ अगा जगाही परौती । ¶शुचा वाहे पैं चित्तीं । करितां विषीं हातीं । तृणही न लगे ॥ ८७ ॥ [कर्ता तामस उच्यते] ऐसा जो लोकाआंत । पापपुंज मूर्त । $देखसी तो अव्याहत । तामस कर्ता ॥ ८८ ॥ एवं कर्म कर्ता ज्ञान । या तिहींचें त्रिधा चिन्ह । दाविलें तुज सुजन । चक्रवर्ती ॥ ८९ ॥

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु ।
प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ॥ २९ ॥

[बुद्धेर्भेदं] आतां अविद्येच्या गांवीं । मोहाची वेढूनि मेदवी । संदेहार्चीं आघवीं । लेऊनि लेणीं ॥ ६९० ॥ आत्मा निश्चयाची बरव । जया आरिसां

---

* तिया वाटा. † मग आणिकांचें. ‡ दुहवेवारी. § तेवींचि. ¶ सुचना हे. $ देखिजे.

१ चोरी, चाहाडी, शिंदळकी, या तिघ्यावरचें घर. २ प्रगटपण. ३ विरुद्ध. ४ दुधाला. ५ घृत. ६ प्रज्वलित. ७ प्राप्त. ८ राहती. ९ सर्प. १० या लोकीं वांचावें. ११ परलोकीं. १२ दुष्ट स्त्री. १३ विटाळशी म्हणून संग राहावयी. १४ कावळ्याला. १५ घुबडाचे. १६ असावधपणीं. १७ तो तैसें होय ह्मणे. १८ खेद. १९ लेंडयांच्या विस्तवांत. २० गुदद्वारचा वारा. २१ पलीकडचे. २२ शोक. २३ पापाचा ढीग. २४ निरंकुश. २५ वस्त्र. २६ चांगुलपणा.

पाहे[1] सावयव । तिये बुद्धिचीही धांव । त्रिधा असे ॥ ९१ ॥ [गुणतस्त्रिविधं शृणु] अगा सत्वादिगुणीं इहीं । काइ एक तिहीं ठायीं । न कीजेचि येथ पाहीं । जगामाजी ॥ ९२ ॥ आगी *न वसतां पोटीं । कवण काष्ठ असे सृष्टी । तैसें तें कैचें[2] दृश्यकोटी । त्रिविध जें नोहे ॥ ९३ ॥ ह्मणौनि तिहीं गुणीं । बुद्धी केली त्रिगुणी । [धृतेश्चैव] धृतीसिही[3] वांटणी । तैसीचि असे ॥ ९४ ॥ [प्रोच्यमानमिति] तेंचि येक वेगळालें । †यथाचिन्हीं अळंकारलें । सांगिजेल उपाइलें[4] । भेदलेपणें ॥ ९५ ॥ परि बुद्धि धृति इयां । दोहीं भागांमाजि धनंजया । आधीं रूप बुद्धीचिया । भेदासि करूं ॥ ९६ ॥ तरि उत्तम मध्यम निकृष्टा[5] । संसारासि गा सुभटा । प्राणियां येतिया वाटा । तिनी आथी ॥ ९७ ॥ ‡जे[6] करणीय कांम्य निषिद्ध । ते हे मार्ग तिन्ही प्रसिद्ध । संसार §भय संबंध[7] । जीवा ययां ॥ ९८ ॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ।
बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी ॥३०॥

[प्रवृत्तिं च] ह्मणोनि अधिकारें मानिलें । जें विधीचेनि बोधें आलें । तें येकचि येथ भलें । नित्य कर्म ॥ ९९ ॥ [कार्ये] तेंचि आत्मप्राप्ति फळ । दिठी सूनि केवळ । कीजे जैसें कां जळ । सेविजे तांहने ॥ ७०० ॥ येतुलेनि तें कर्म । [अभये] सांडी जन्मभय विषम । करूनि दे सुगम । मोक्षसिद्धि ॥ १ ॥ ऐसें करी तो भला । संसारभयें सांडिला । करणीयत्वें[8] आला । मुमुक्षुभागा ॥ २ ॥ [मोक्षं च] तेथ जे बुद्धि ऐसा । बळिया बांधे भरंवसा । मोक्ष ठेविला ऐसा[9] । जोडेल येथ ॥ ३ ॥ ह्मणौनि निवृत्तिचि[10] मांडली । सूनि प्रवृत्तितळीं[11] । इये कर्मीं बुडकुळी[12] । द्यावी कीं ना ॥ ४ ॥ तृषार्ता उदकें जिणें । कां पुरीं पडलिया पव्हणें[13] । अंधकूपीं गति किरणें । सूर्याचेनि ॥ ५ ॥ ना ना पथ्येसीं औषध लाहे । तरी रोगें दाटलाही[14] जिये । कां मीनां[15] जिव्हाळा होये । जळाचा जरी ॥ ६ ॥ तरि तयाच्या जीविता । नाहीं ¶जेविं अन्यथा । तैसें कर्मीं इये वर्ततां । जोडेचि मोक्ष ॥ ७ ॥ हें करणीयाचिया कडे । जें ज्ञान[16] आंथी चोखडें । [निवृत्तिं च] आणि अकरणीय हें $फुडें[17] । ऐसें जाण ॥ ८ ॥ [अकार्ये] ||जीं तियें काम्यादिकें । संसारभयदायकें । अकृत्यपणाचें[18] आंबुखें[19] । पडिलें जयां ॥ ९ ॥ तिये कर्मीं अकार्यीं । [भये] जन्ममरण समर्यीं[20] । प्रवृत्ति पळवी पायीं । मागिलींचि ॥ ७१० ॥ पैं आगीमाजि न रिघवे[21] । अ-

* नसतां. † तेथ. ‡ जे अकारण. § भयें सबाध. ¶ जैसें. $ कुडें. || जियें तिन्हीं

१ मूर्तिमान. २ दृश्यवर्गात. ३ बुद्धीस. ४ आरंभिलेलें. ५ कनिष्ठ. ६ विहित निष्काम क ७ फलेच्छायुक्त कर्म. ८ तृषाशांत्यर्थ. ९ मुक्तिलाभ. १० निवृत्तीला=अंतर्मुखवृत्तीला प्रवृत्तीचे विषयोन्मुख वृत्तीचे खालीं घालून प्रवृत्तिमार्ग धरतो. ११ बुडी मारणें. १२ पोंहणें. १३ व्याप्त असतांही वांचतो. १४ मत्स्याला. १५ होतें. १६ स्पष्ट, खरें. १७ आवरण. १८ शिरवे.

थावीं न घलवे । धेंगधगीत नेंगवे । शूळ जेवीं ॥ ११ ॥ कां काळियानाग धुंधुवात । देखोनि न घालवे हात । न वचवे खोपेआंत । व्याघ्राचिये ॥१२॥ तैसें कर्म अकरणीय । देखोनि महाभय । उपजे निःसंदेह । बुद्धी जिये ॥१३॥ [बंधं] वाढिलें रांधूनि विषें । तेथ जाणिजे मृत्यु न चुके । तेविं *निषेधीं कां कां देखे । बंधातें जो ॥ १४ ॥ [या वेत्ति] मग बंधभयभरितीं । तियें निषिद्धीं ग्रासीं । विनियोग जाणे निवृत्ती । कर्माचिये ॥ १५ ॥ ऐसेनि कार्याकार्य-विवेकी । जे प्रवृत्ति निवृत्ति मापकीं । खरा कुंडा पारखी । जिया परी ॥१६॥ [बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी] तैसी कृत्याकृत्यशुद्धी । बुझे जे निरवधी । सात्त्विक म्हणिपे बुद्धी । तेचि तूं जाण ॥ १७ ॥

यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च ।
अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ॥ ३१ ॥

[ययेति] आणि बकाच्या गांवीं । घेपे क्षीरनीर सकेलवी । कां अहोरात्रींची गोंवी । आंधळें नेणे ॥ १८ ॥ जया फुलाचा मकरंद फावे । तो काष्ठें कोरूं धांवे । परि भ्रमरपणा नव्हे । अव्हांटा जेविं ॥ १९ ॥ तैसीं इयें कार्याकार्यें । धर्माधर्मरूपें जियें । [अयथावत्प्रजानाति] तियें न चोजवितां जाये । जाणती जे कां ॥ ७२० ॥ अगा डोळांवीण मोतियें । घेतां पोंड मिळे विपायें । न †मिळणें तें आहे । ठेविलें तेथें ॥२१॥ तैसें अकरणीय अवचटें । नोडवे तरीच लोटे । येरवीं जाणें एकवटें । दोन्हीं जे कां ॥ २२ ॥ [बुद्धिः सा पार्थ राजसी] ते गा बुद्धि चोखविखीं । जाण येथ राजसी । अक्षत टाकिली जैसी । मोंदिये-वरी ॥ २३ ॥

अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता ।
सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥ ३२ ॥

[अधर्ममिति] आणि राजा जिया वाटा जाये । ते चोरांसि ‡आडव होये । कां राक्षसां दिवो पाहे । राति होउनी ॥ २४ ॥ ना ना निधानचि निदैवा । होये कोळसयाचा उंडवा । पैं असतें आपणपें जीवा । नाहीं जालें ॥ २५ ॥ तैसें धर्म-जात तितकें । जिये बुद्धीसी पातकें । साच तें लटिकें । ऐसेंचि बुझे ॥ २६ ॥

* निषिद्धीं. † मिळणेंचि. ‡ आडवाट.

१ खोल पाण्यांत. २ प्रखर. ३ धरतां येत नाहीं. ४ फूत्कार टाकीत. ५ जाळींत. ६ निषिद्ध. ७ व्यवस्था. ८ बुद्धि. ९ मापानें. १० खोटा. ११ समजे. १२ अत्यंत. १३ बगळ्याच्या. १४ दूध व पाणी. १५ एकत्र मिश्र, सरसकट. १६ मिळे. १७ आडवाट होत नाहीं. १८ न जाणों येतां. १९ योग्यता. २० क्वचित्. २१ अकस्मात्. २२ प्राप्त न होय. २३ शुद्ध-विषयीं. २४ समेवर. २५ अरण्य. २६ दिवस उजाडे. २७ ठेवा. २८ भाग्यहीनाला. २९ रास, ढीग. ३० वाटे.

[सर्वेति] ते आघवेचि अर्थ । करूनि घाली अनर्थ । गुण ते ते व्यवस्थित । दोषचि मानी ॥ २७ ॥ किंबहुना श्रुतिजातें । अधिष्ठूनि[1] केलें सैरतें । तेतुलेंहि उपरतें[3] । जाणे जे बुद्धी ॥ २८ ॥ कोणातेंही न पुसतां । तामसी जाणावी पंडुसुता । रात्री[4] काय धर्मार्था । साच करावी[5] ॥ २९ ॥ एवं बुद्धीचे भेद । तिन्ही तुज विशद[6] । सांगीतले स्वबोध-[7]कुमुदचंद्रा ॥ ७३० ॥ आतां यायाचि बुद्धिवृत्ती । निष्टंकिला[8] कर्मजातीं । खांद *मांडिजे धृती[9] । त्रिविधा जया ॥ ३१ ॥ तिये धृतीचेही विभाग । तिन्हीं यथालिंग[10] । सांगीजति चांग । अवधान दे ॥ ३२ ॥

धृत्या यया धारयते मनःप्राणेंद्रियक्रियाः ।
योगेनाऽव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्विकी॥ ३३॥

[धृत्या यया] तरि उदेलिया दिनकर । चोरीसि थोके[11] †आंधार[12] । कां राजाज्ञा अव्यवहार[13] । कुंठवी जेवीं ॥ ३३ ॥ ना ना पवनाचा सांट[14] । वाजीनलिया नीट । आंगसीं[15] बोभाट । सांडिती मेघ ॥ ३४ ॥ कां अगस्तीचेनि दर्शनें । सिंधु घेउनी ठांती[16] मौनें । चंद्रोदयीं कमळवनें । मिठी[17] देती ॥ ३५ ॥ हें असो पावो उचलिला । मंदमुख[18] न ठेविती खालां । गर्जोनि पुढां जाला । सिंह जरी ॥ ३६ ॥ तैसा जो धीर । उठलिया अंतरें[19] । मनादिकें व्यापार । सांडिती उभीं ॥ ३७ ॥ [इंद्रियक्रियाः] इंद्रिया विषयांचिया गांठी । अपैसया सुटती किरीटी । मन मायेच्या पोटीं । रिगती दोंही[20] ॥ ३८ ॥ [प्राण-] अधोर्ध्व गुढें काढी[21] । प्राण नवांची पेंडी[22] । बांधोनि घाली उडी । मध्यमेमाजी[23] ॥ ३९ ॥ संकल्पविकल्पाचें लुगडें । सांडूनि मन उघडें । बुद्धि मागिलेकडे । उगीचि बैसे ॥७४०॥ [धारयते] ऐसी धैर्यराजें जेणें । मन प्राण करणें । स्वचेष्टांचीं संभाषणें । सांडवीजती ॥ ४१ ॥ [योगेन] मग आघवींचि सेडीं[24] । ध्यानाच्याआंतुल्या मेढीं[25] । कोंडिजती निरवडी[26] । योगाचिये ॥ ४२ ॥ [अव्यभिचारिण्या] परी परमात्मया चक्रवर्ती । उगाणिती[27] जंव हातीं । तंव लांच न घेतां धृती । धरिजती जिया ॥ ४३ ॥ [धृतिः सा पार्थ सात्विकी] ते गा धृति येथें । सात्विक हें निरुतें । आईक अर्जुनातें । श्रीकांत म्हणे ॥ ४४ ॥

---

* बांधिजे. † अंधकार.

---

१ स्थापून. २ मान्य. ३ उलटें, विपरीत. ४ धर्मार्थीला जी खरोखर रात्र=अभाव करणारी ती काय करावयाची. ५ स्पष्ट. ६ ज्ञानरूप कमलास प्रफुल्लित करणाऱ्या चंद्रा. ७ निश्चयात्मक झाला. ८ वेगवेगळेपणा. ९ धैर्य. १० जसे आहेत तसे. ११ थांबे. १२ आश्रयस्थान, अंधकार अशापाठीं चोरी व अंधकार हीं दोन्ही नाहींशीं होतात. १३ वेग. १४ वीज इत्यादि. १५ गर्जना. १६ राहाती. १७ मिटती. १८ हत्ती. १९ अंतरांतून. २० दाहा इंद्रियें. २१ खालतें वरतें. २२ आवरण. २३ सुषुम्नेंत. २४ शुद्ध, मोकळीं. २५ हृदयीं. २६ कुशलतेनें. २७ जाणती.

यया तु धर्मकामार्थान् धृत्या धारयतेऽर्जुन ।
प्रसंगेन फलाकांक्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥ ३४ ॥

[ययेति] आणि होऊनियां शरीरीं । स्वर्गसंसाराच्या दोहीं घरीं । नांदे जो पोटभरी । त्रिवर्गोपायें ॥ ४५ ॥ तो मनोरथांच्या सागरीं । धर्मार्थकामांच्या तारुवांवरी । जेणें धैर्यबळें करी । क्रिया वाणिज ॥ ४६ ॥ [प्रसंगेनेति] जें कर्म भांडवला सुये । तयाची चौगुणी *येती पाहे । येवढे †साहस वाहे । जया धृती ॥ ४७ ॥ ते गा धृती राजस । पार्था येथ परियेस । आतां आइक तामस । तिसरी जे कां ॥ ४८ ॥

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ।
न विमुंचति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ॥ ३५ ॥

[यथा] तरि सर्वांधमें गुणें । जयाचें कां रूपा येणें । कोळसा काळेपणें । वडला जैसा ॥ ४९ ॥ अहो प्राकृत आणि हीन । तयाही कीं गुणत्वाचा मान । परि न ह्मणिजे पुण्यजन । राक्षस काई ॥ ७५० ॥ पैं ग्रहांमाजि इंगळ । तयातें ह्मणिजे मंगळ । तैसा तमीं धसाळ । गुणशब्द हा ॥ ५१ ॥ ‡जे सर्वदोषांचा वसौटा । तमचि कामऊनि सुभटा । उभारिला आंगवठा । जया नराचा ॥ ५२ ॥ [स्वप्नं] तो आळस सूनि असे कांखे । ह्मणौनि निद्रे कहीं न मुके । पापें पोशितां दुःखें । न सांडिजे जेविं ॥ ५३ ॥ [भयं] आणि देहा धनाचिया आवडी । सदा भय तयातें न सांडी । विसंबूं न सके धोंडी । काठिण्य जैसें ॥ ५४ ॥ [शोकं] आणि पदार्थजातीं स्नेहो । बांधे ह्मणौनि तो शोकें ठावो । केला न शके पाप जावों । कृतघ्नौनि जैसें ॥ ५५ ॥ [विषादं] आणि असंतोष जीवेसीं । धरूनि ठेलों अहर्निशीं । ह्मणौनि मैत्री तेणेसीं । विषादें केली ॥ ५६ ॥ लसणातें न सांडी गंधी । कां अपथ्यशीळातें व्याधी । तैसी केली मरणावधी । विषादें तया ॥ ५७ ॥ [मदमेव च] आणि वयसा वित्तकाम । ययाचा वाढवी संभ्रम । ह्मणौनि मदें आश्रम । तोचि केला ॥ ५८ ॥ [धृतिः सा पार्थ तामसी] आगीतें न सांडी ताप । सेळातें जातीचा साप । कां जेंगाचा वैरी वांसिप । अखंड §जैसा ॥ ५९ ॥

---

* येती वाढी पाहें. † सायास. ‡ सर्वतमाचा तो लाठा । कीं अधर्मा तोचि पैठा । आगि जैसा आगिठां । तैसा धडके ॥ ७५२ ॥ तो सर्व. § वाहे.

---

१ धर्म, अर्थ, काम या तीन उपायांनीं. २ गलबतावर. ३ व्यापार. ४ घाली. ५ रजोगुणात्मक. ६ प्रसिद्धीस. ७ पुण्यवान लोक. ८ अग्नीसारखा क्रूर ग्रह. ९ कल्याण करणारा. १० स्थूल, अयथार्थ. ११ वसतिस्थान. १२ सिद्ध करून. १३ आकार. १४ घालून. १५ दगड. १६ प्रीति. १७ ठेवितो. १८ अनुपकाऱ्यापासून. १९ राहिला. २० खेदानें. २१ दुर्गंध. २२ आयुष्यधन वर्धनाची इच्छा. २३ मोठेपण. २४ द्वेषानें. २५ सर्वांशीं विरुद्ध. २६ भय.

ना तरि शरीरांतें काळ । न विसंबे कवणे वेळ । तैसा आथि अढळ । तामसीं मद ॥ ७६० ॥ [न विमुंचति दुर्मेधाः] एवं पांचही हे निद्रादिक । तामसाच्या ठाईं दोख । जिया धृती देख । धरिले आहाती ॥ ६१ ॥ तिये गा धृती नांवें । तामसी येथ हें जाणावें । ह्मणीतलें तेणें देवें । जगाचेनि ॥ ६२ ॥ एवं त्रिविध जे बुद्धि । कीजे कर्मनिश्चयो आधि । तो धृती या सिद्धि । नेइजो येथ ॥ ६३ ॥ सूयें[१] मार्ग गोचर[२] होये । आणि तो चालती कीर पाये । परि चालणें तें आहे । *धैर्यें[४] जेवीं ॥ ६४ ॥ तैसी बुद्धि कर्मातें दावी । तें करणसामग्री[३] निफजवी । परि निफजावया होआवी । धीरेंता[५] जे ॥ ६५ ॥ ते हे गा तुजप्रति । सांगीतली त्रिविध धृति । यया कर्मत्रया निष्पत्ति । जालिया मग ॥ ६६ ॥ येथ फळ जें एक निफजे । सुख जयातें ह्मणिजे । तेंही त्रिविध जाणिजे । कर्मवशें[६] ॥ ६७ ॥ तरि फळरूप तें सुख । त्रिगुणीं भेदलें देख । विवंचूं आतां चोख । चोखीं[७] बोलीं ॥ ६८ ॥ परि चोखी ते कैसी सांगें । पैं घेवों जातां बोलेंबगें[८] । कानींचियेही लागे । हातींचामळ[९] ॥ ६९ ॥ ह्मणौनि जयाचेनि अव्हेरें[१०] । अवधानही होय बाहिरें । तेणें आइक हो आदरें । जिवांचेनि[११] जिवें ॥ ७७० ॥ ऐसें ह्मणौनि देवो । त्रिविधा सुखाचा प्रस्तावो[१२] । मांडला तो निर्वाहो[१३] । निरूपित असे ॥ ७१ ॥

सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ ।
अभ्यासाद्रमते यत्र दुःखांतं च निगच्छति ॥ ३६ ॥

[सुखं त्विदानीमिति] ह्मणे सुखत्रयसंज्ञा । सांगों ह्मणौनि प्रतिज्ञा । बोलिलों तें प्रमाणा[१४] । ऐक आतां ॥ ७२ ॥ तरि सुख तें गा किरीटी । दाविजेल तुज दिठी । जें आत्मयाचिये भेटी[१५] । जीवासि होय ॥ ७३ ॥ [अभ्यासाद्रमते यत्र] परि मात्रेचेनि मापें[१६] । दिव्यौषध जैसें घेपे । कां कथिलाचें कीजे रुपें । रसभावनीं[१७] ॥ ७४ ॥ ना ना लवणाचें जळ । होआवया दोनि चार वेळ । देऊनि सांडिजती ढाळ[१८] । तोयाचे[१९] जेवीं ॥ ७५ ॥ तेविं जालेनि सुखलेशें । जीव भाविलिया अभ्यासें । [दुःखांतं च निगच्छति] जीवपणाचें नासे । दुःख जेथें ॥ ७६ ॥ तें येथ आत्मसुख । जालें असे त्रिगुणात्मक । तेंही सांगों एकैक । रूप आतां ॥ ७७ ॥

---

* मार्गच कीं.

---

१ प्रत्यक्ष. २ इंद्रियार्थ. ३ उत्पन्न करी. ४ धैर्य. ५ कर्माच्या योगानें. ६ स्पष्ट शब्दांनीं. ७ शब्दाच्या मार्गानें. ८ अंतःकरणयुक्त श्रवणानें. ९ करतलमलवत्. १० ज्याणें अव्हेरें=तिरस्कार केला असतां अवधान देखील बाहिरें=व्यर्थ होतें त्या जीवाचे जीवानें ऐक. ११ विवरण. १२ व्यवस्था. १३ बुद्धिमंता. १४ भेटीनें. १५ प्रमाणानें. १६ किमयेच्या कृतीनें. १७ पूर. १८ पाण्याचे.

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।
तत्सुखं सात्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥ ३७ ॥

[यत्तदग्रे विषमिव] आतां चंदनाचें बुड । सर्पी जैसें दुर्वाड । कां निधानांचें तोंड । विवसिया जेवि ॥ ७८ ॥ अगा स्वर्गींचें गोमटें । आडव यागसंकटें कां बाळपण दोसटें । त्रासकाळें ॥ ७९ ॥ हें असो दीपाचिये सिद्धी । अवघड धूम आधीं । ना तरि तो औषधीं । जिभेचा ठावो ॥७८०॥ तयापरि पांडवा । जया सुखाचा रिगावा । विषम तेथ मेळावा । यमदमांचा ॥ ८१ ॥ देत सर्वस्नेहा मिठी । आंगीं ऐसें वैराग्य उठी । स्वर्गसंसारा कांठी । काढितची ॥ ८२ ॥ विवेक श्रवणें खरपुसें । जेथ व्रताचरणें कर्कशें । करितां जाती भोकसे । बुध्यादिकांचे ॥ ८३ ॥ सुषुम्नेचेनि तोंडें । गिळिजे प्राणापानाचे लोंढे । बोहणियेसीचि येवढें । भारी जेथ ॥ ८४ ॥ जें सारसांही विघडतां । होय वोहाळूनि वत्स काढितां । ना भेणग दवडितां । भोणयावरूनी ॥ ८५ ॥ पैं मायेपुढौनि बाळक । काळें नेतां एकुलतें एक । होय कां उदक । तुटतां मीना ॥ ८६ ॥ तैसें विषयांचें घर । इंद्रियां सांडितां थोर । युगांत होय तें वीर । विराग साहाती ॥ ८७ ॥ ऐसा जया सुखाचा आरंभ । दावी काठिण्याचा क्षोभ । [परिणामेऽमृतोपमं] मग क्षीराब्धीं लाभ । अमृताचा जैसा ॥ ८८ ॥ पहिलया वैराग्यगरळा । धैर्यशंभु वोडवी गळा । तरि ज्ञानामृतें सोहळा । पाहे जेथें ॥ ८९ ॥ पैं *कोलिताहि कोपे ऐसें । द्राक्षांचें हिरवेपण असे । तें परिपाकीं कां जैसें । माधुर्य आते ॥ ७९० ॥ [आत्मबुद्धिप्रसादजं] तें वैराग्यादिक तैसें । पिकलिया आत्मप्रकाशें । मग वैराग्यें सींही नाशे । अविद्याजात ॥ ९१ ॥ तेव्हां सागरीं गंगा जैसी । आत्मीं मीनल्या बुद्धि तैसी । अद्वयानंदाची आपैसी । खाणी उघडे ॥ ९२ ॥ ऐसें स्वानुभवविश्रामें । वैराग्यमूळ जें परिणमे । [तत्सुखं सात्विकं प्रोक्तं] तें सात्विक येणें नामें । बोलिजे सुख ॥ ९३ ॥

विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥ ३८ ॥

[विषयेति] आणि विषयेंद्रिया । मळ होतां धनंजया । जें सुख जाय थडियां ।

---

* कवलिताही.

---

१ भयंकर. २ विघ्नदेवतेमुळें. ३ अरण्य. ४ यज्ञरूप क्लेशानें. ५ पीडाकारक. ६ औषधास. ७ विपरीत. ८ दांतखीळ. ९ कांटेरी. १० दूर करीतच. ११ तीव्र. १२ कठोर. १३ आंगच्या कातड्याचें भोंक. १४ मध्यनाडी. १५ प्रथमारंभीं. १६ चक्रवाकाच्या युग्मास. १७ कासेपासून. १८ भिकारी. १९ पात्रावरून. २० आईच्या पुढ्यांतून. २१ विरक्त. २२ विषाला. २३ पुढें करी. २४ कोलून झुगारणारीं द्राक्षें राखतांही, कवलिता अशा पाठीं तक्षक. २५ अज्ञानसमूह. २६ मिळाली असतां. २७ तीरें.

सांडूनि दोन्ही ॥ ९४ ॥ अधिकारिया[१] रिगतां[२] गांवो । होय जैसा उत्साहो । कां रिणावरी[३] विवाहो । विस्तारिला ॥ ९५ ॥ ना ना रोगिया जिभेपासीं । केळें गोड साखरेसीं । कां बचनागाची जैसी । *मधुरता पहिली ॥ ९६ ॥ पहिलें संव-चोराचें मैत्र । हाटभेटीचें[४] कलत्र । कां लाघवीयाचे[५] विचित्र । विनोद ते ॥ ९७ ॥ तैसें विषयेंद्रियदोखीं[६] । जें सुख जीवातें प्रोखी । [परिणामे विषमिव] मग †उपडिला[७] खडकीं । हंस जैसा ॥ ९८ ॥ तैसी जोडी[८] आघवी आटे । जीविताचा ठाय फिटे । सुकृताचियाही[९] सुटे । धनाची गाठी ॥ ९९ ॥ आणिक भोगिलें जें कांहीं । तें स्वप्न तैसें होय नाहीं । मग हानिचाचि[१०] धांई[११] । लोळावें उरे ॥ ८०० ॥ ऐसें आपत्तीं[१२] जें सुख । ऐहिकीं[१३] परिणमे देख । परत्रीं कीर विख । होउनि परते ॥ १ ॥ जे इंद्रियजाता[१४] लळा । दीधलिया धर्माचा मळा । जाळूनि भोगिजे सोहळा । विषयांचा जेथ ॥ २ ॥ तेथ पातकें बांधिती[१५] थावो । तियें नरकीं देती ठावो । जेणें सुखें हा अपावो[१६] । परत्रीं ऐसा ॥ ३ ॥ पैं नामें विष[१७] मधुरें । परि मारूनि अंतीं खरें । तैसें आदिजें[१८] गोडिरें[१९] । अंतीं कडु ॥ ४ ॥ [तत्सुखं राजसं स्मृतं] पार्था तें सुख साचें । वेंळिलें[२०] आहे रजाचें । ह्मणौनि न शिवें तयाचें । आंग ‡कहीं ॥ ५ ॥

यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मनः ।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ ३९ ॥

[यदग्रे इति] आणि अपेयाचेनि पानें । अखाद्याचेनि भोजनें । स्वैरस्त्रीसंनिधानें[२१] । होय जें सुख ॥६॥ कां पुढिलांचेनि मारें । नातरि परस्वापहारें । जें सुख अंवतरे[२२] । भाटाच्या बोलीं ॥ ७ ॥ [निद्रालस्यप्रमादोत्थं] जें आलस्यावरि पोखिजे[२३] । निद्रेमाजी जें देखिजे । जहाच्या आद्यंतीं भूलिजे । आपुली[२४] वाट ॥ ८ ॥ [तत्तामसमुदाहृतं] तें गा सुख पार्था । तामस जाण सर्वथा । हें बहु न सांगोंचि जे[२५] कथा । असंभाव्य हें ॥ ९ ॥ ऐसें कर्मभेदें मुदलें । फळसुखही त्रिधा जालें । तें हें यथागमें केलें । गोचर तुज ॥ ८१० ॥ तें कर्ता कर्म फळ । हे त्रिपुटी येकी केवळ । वांचूनि कांहींचि नसे स्थूळ । सूक्ष्मीं इये ॥ ११ ॥ आणि हे तंव त्रिपुटी । तिहीं गुणीं इहीं किरीटी । गुंफिली असे पटी । तांतुवीं[२६] जैसी ॥ १२ ॥

---

* महुरता. † उपटिला. ‡ कांहीं.

---

१ अधिकारी. २ शिरतां. ३ कर्जानें. ४ बाजारांतील स्त्री. ५ थट्टेखोराचे. ६ विषयांमुळें, उद्देशीं. ७ सांपडला. ८ संपादिलेलें. ९ पुण्यरूप धन. १० घायानें. ११ विपत्तिरूप. १२ या लोकांत. १३ परिणाम पावतें. १४ बळ. १५ अपाय. १६ मधुर नांवाचें विष. १७ मधुर. १८ बनविलें. १९ व्यभिचारिणीच्या संसर्गानें. २० प्रगटे. २१ पुष्ट होतें. २२ स्वधर्म. २३ कारण कीं. २४ त्याज्य, निंद्य. २५ तंतूंनीं.

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ।
सत्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥ ४० ॥

[सत्वं प्रकृतिजैरिति] ह्मणौनि प्रकृतीच्या आलोकीं । न बंधिजे इहीं सत्वादिकीं । [न तदस्तीति] तैसी स्वर्गीं ना मृत्युलोकीं । आथी वस्तु ॥१३॥ कैंचा लोवेवीण कांबळा । मातियेवीण मोदेळा । कां जळेंवीण कल्लोळा । होणें आहे ॥ १४ ॥ तैसें नहोनि गुणाचें । *सृष्टीचा रचना रचे । ऐसें नाहींच गा साचें । प्राणिजात ॥ १५ ॥ यालागीं हें सकळ । तिहीं गुणांचेंचि केवळ । घडलें आहे निखिळ । ऐसें जाण ॥ १६ ॥ गुणीं देवां त्रयी लाविली । गुणीं लोकीं त्रिपुटी पाडिली । चतुर्वर्णा घातलीं । सिनानीं उळिगें ॥ १७ ॥

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ ४१ ॥

[ब्राह्मणक्षत्रियेति] तेचि चारी वर्ण । पुससी जरी कोण कोण । तरि जयां मुख्य ब्राह्मण । धुरेचे कां ॥ १८ ॥ येर क्षत्रिय वैश्य दोन्ही । तेही ब्राह्मणाच्याचि मानिजे मानीं । जे ते वैदिकविधानीं । योग्य ह्मणौनी ॥ १९ ॥ चौथा शूद्र जो धनंजया । वेदीं लाग कीर नाहीं तया । तऱ्ही वृत्ति वर्णत्रया- । अधीन तयाची ॥ ८२० ॥ तिये वृत्तीचिया जवळिका । वर्णत्रयां ब्राह्मणादिकां । अहो शूद्रही कीं देखा । चौथा जाला ॥ २१ ॥ जैसा फुलाचेनि सांगातें । तांतु तुरंबिजे श्रीमंतें । तैसें द्विजसंगें शूद्रातें । स्वीकारी श्रुती ॥२२॥ ऐसैसी गा पार्था । हे †चतुर्वर्णव्यवस्था । करूं आतां कर्मपंथा । यांचियां रूप ॥ २३ ॥ [कर्माणि प्रविभक्तानि] जिहीं गुणीं ते वर्ण चारी । जन्ममृत्यूचिये कोंतरी । चुकोनियां ईश्वरीं । पैठे होती ॥२४॥ जियें आत्मप्रकृतीचे इहीं । गुणीं सत्वादिकीं तिहीं । कर्में चौघां चहूं ठाईं । वांटिलीं वर्णा ॥ २५ ॥ जैसें बापें जोडिलें लेंका । वांटिले सूर्ये मार्ग पांथिकां । नां ना व्यापार सेवकां । स्वामीनें जैसे ॥ २६ ॥ [स्वभावप्रभवैर्गुणैः] तैसी प्रकृतीच्या गुणीं । जया कर्मांची वेल्हावणी । केली आहे वर्णीं । चहूं इहीं ॥ २७ ॥ तेथ ‡सत्वें आपल्या आंगीं । समीननिमीन भागीं । दोघे केले नियोगी । ब्राह्मण क्षत्रिय ॥ २८ ॥ आणि रज परी सात्विक । तेथ ठेविले वैश्य लोक । रजचि तमेंभेषक । तेथ शूद्र ते गा ॥ २९ ॥ ऐसा येकाचि प्राणिवृंदा । भेद चौतुर्व-

* सृष्टीचा रचला रचे. † चातुर्वर्ण्य. ‡ सत्व.

१ आभासांत, जगांत, दृष्टींत. २ लोंकरीवांचून. ३ मातीचें ढेंकूळ. ४ ब्रह्मा, विष्णु, महेश. ५ कर्ता, कर्म, करणें इ०. ६ कार्ये. ७ अग्रभागींचे. ८ जीवनोपाय. ९ वृत्तीच्या सान्निध्यानें. १० दोरा धारण करावा. ११ या चारी वर्णांच्या कर्ममार्गांचें स्पष्टीकरण. १२ कातरीस. १३ प्रांतें. १४ वाटसरू लोकांस. १५ अथवा. १६ विस्तार. १७ अर्धोअर्ध, समविषमभावें. १८ स्वाधीन. १९ तमोभिश्र. २० वर्णपरत्वें चार प्रकारचा.

र्णधा । गुणींचि इहीं प्रबुद्धा । केला जाण ॥ ८३० ॥ मग आपलें ठेविलें जैसें । आइतेंचि दीपें दिसे । गुणभिन्न कर्म तैसें । शास्त्र दावी ॥ ३१ ॥ तेंचि आतां कोण कोण । वर्णविहिताचें लक्षण । हें सांगों ऐक श्रवण । सौभाग्यनिधी ॥ ३२ ॥

शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ ४२ ॥

[शमः] तरि सर्वेंद्रियांचिया वृत्ती । घेऊनि आपुल्या हातीं । बुद्धि आत्मया *मिळे येकांतीं । प्रिया जैसी ॥ ३३ ॥ ऐसा बुद्धीचा उपरम । तया नाम ह्मणिपे शम । तो †गुण गा उपक्रम । जया कर्माचा ॥ ३४ ॥ [दमः] आणि बाह्येंद्रियांचें धेंडें । पिटूनि विधीचेनि दंडें । नेदिजे अधर्माकडे । कहींचि जावों ॥ ३५ ॥ तो पैं गा शमा विरजा । दम गुण जेथ दुजा । आणि स्वधर्माचिया वोजा । जिणें जें कां ॥ ३६ ॥ [तपः] तेविंचि सटवीचिये राती । न विसंबिजे जेविं वांती । तैसा ईश्वरनिर्णय चित्तीं । वाहणें सदा ॥ ३७ ॥ तया नाम तप । हें तिजया गुणाचें रूप । [शौचं] आणि शौचेंही निष्पाप । द्विविध जेथ ॥ ३८ ॥ मन भावशुद्धी भरलें । आंग क्रियां अळंकारिलें । ऐसें सबाह्य जियालें । साजिरें जें कां ॥ ३९ ॥ तया नाम शौच पार्था । तो कर्मी गुण ‡जये चौथा । [क्षांतिः] आणि पृथ्वीचिया परी सर्वथा । सर्व जें साहाणें ॥ ८४० ॥ ते गा क्षमा पांडवा । गुण जेथ पांचवा । स्वरामाजिं सुहावा । पंचम जैसा ॥ ४१ ॥ [आर्जवमेव च] आणि वांकडेनि वोघेंसी । गंगा वाहे उजूचि जैसी । कां §पृष्ठीं वळला उसीं । गोडी जैसी ॥ ४२ ॥ तैसा विषमांहि जीवां- । लागीं उजुकार बरवा । तें आर्जव गा साहावा । जेथिंचा गुण ॥ ४३ ॥ [ज्ञानं] आणि पाणियें प्रयत्नें माळी । अखंड जेंचे झाडामुळीं । परि तें आघवेंचि फळीं । जाणें जेविं ॥ ४४ ॥ तैसें शास्त्राचारें तेणें । ईश्वरच येक पावणें । हें फुडें जें कां जाणणें । तें येथ ज्ञान ॥ ४५ ॥ तें गा कर्मी जिये । सातवा गुण होये । [विज्ञानं] आणि विज्ञान हें पाहें । एवंरूप ॥ ४६ ॥ तरि सत्वशुद्धीचिये वेळे । शास्त्रें कां ध्यानबळें । ईश्वरतत्वींचि मिळे । निष्टंकबुद्धी ॥ ४७ ॥ हें विज्ञान बरवें । तें गुणरत्न जेथ आ-

---

* मिळे कांति. † गुणोपक्रम. ‡ जेथ. § पुटिंबळा.

---

१ हे भाग्यवंता. २ विषयापासून उलटणें. ३ शांति. ४ आरंभ. ५ स्वारी. ६ साह्य. ७ रीतीनें. ८ वांचणें. ९ जन्मल्याच्या साहाव्या रात्रीं. १० दिवा. ११ शुद्धि. १२ विचारानें. १३ विहित कार्यांनीं भूषित केलें. १४ जाहालें, जीवित. १५ सुशोभित. १६ पंचम नांवाचा स्वर. १७ पाठीकडे वळले. १८ सरळ. १९ माळी नित्य झाडाच्या मुळांत पाणी घालून जचे=जपे, श्रम करितो परंतु ते श्रम फळीं जाणतो=फळानें श्रमांचें सार्थक्य होईल असें मानितो. २० सिद्धांतबुद्धीनें.

ठवें । [आस्तिक्यं] आणि आस्तिक्य जाणावें । नववा गुण ॥ ४८ ॥ पैं राजमुद्रा आथिलियां । प्रजा भजे भलतयां । तेविं शास्त्रें स्वीकारिलिया । मार्गमात्रातें ॥ ४९ ॥ आदरें जें कां मानणें । तें आस्तिक्य मी ह्मणें । तो नववा गुण जेणें । कर्म तें साच ॥ ८५० ॥ [ब्रह्मकर्म स्वभावजं] एवं नवही शमादिक । गुण जेथ निर्दोष । तें कर्म जाण स्वाभाविक । ब्राह्मणाचें ॥ ५१ ॥ तो नवगुणरत्नाकर । यया नवरत्नांचा हार । न फेडीत ले दिनकर । प्रकाश जैसा ॥ ५२ ॥ ना ना चांपा चांपौळीं पूजिला । चंद्र चंद्रिकां धवळला । कां चंदन निजें चर्चिला । सौरभ्यें जेविं ॥ ५३ ॥ तेविं नवगुणटिकलग । लेणें ब्राह्मणाचें अव्यंग । कहींचि न संडी आंग । ब्राह्मणाचें ॥ ५४ ॥ आतां उचित जें क्षत्रिया । तेंही कर्म धनंजया । सांगों ऐक प्रज्ञेचिया । भरोवरी ॥ ५५ ॥

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ ४३ ॥

[शौर्यं] तरि भानु हा तेजें । नापेक्षी जेविं विरजें । कां सिंहें न पाहिजे । जावळिया ॥ ५६ ॥ ऐसा स्वयंभ जो जीवें लांठ । सांवायेंवीण उद्भट । तें शौर्यं गा जेथ श्रेष्ठ । पहिला गुण ॥ ५७ ॥ [तेजः] आणि सूर्याचेनि प्रतापें । कोडिही नक्षत्र हारपे । ना तो तरि न लोपे । सचंद्रीं तिहीं ॥ ५८ ॥ तैसेनि पुले प्रौढिगुणें । *जगा या विस्मय देणें । आपण तरी न क्षोभणें । कायसेनही ॥ ५९ ॥ तें प्रागल्भ्यरूप तेजा । जिये कर्मीं गुण दुजा । [धृतिः] आणि धीर तो तिजा । †जेथिंचा गुण ॥ ८६० ॥ वरिपडेलिया आकाश । बुद्धीचे डोळे मानस । झांकी ना तें परियेस । धैर्य जेथें ॥ ६१ ॥ [दाक्ष्यं] आणि पाणी हो कां भलतेतुकें । परि तें जिणौनि पद्म फांके । कां आकाश उंचिया जिंके । ‡आवडे तयातें ॥ ६२ ॥ तेविं विविधा अवस्था । पातलिया जिणौनि पार्था । प्रज्ञाफळ तया अर्था । वेझ देणें जें ॥ ६३ ॥ तें दक्षत्व गा चोख । जेथ चौथा गुण देख । [युद्धे चाप्यपलायनं] आणि जुंझ अलौकिक । पांचवा गुण ॥ ६४ ॥ आदित्याचीं झाडें । सदां सन्मुख सूर्याकडे । तेविं समोर शत्रूपुढें । होणें जें कां ॥ ६५ ॥ §माहेवणी प्रयत्नेंसीं । चुकविजे सेजे जैसी । रिपू पाठी नेदिजे तैसी । समरंगणीं ॥ ६६ ॥ हा क्षत्रियाचेया आचारीं । पांचवा गुणेंद्र अवधारीं । चहूं पुरुषार्थां शिरीं । भक्ति जैसी ॥ ६७ ॥ [दानं] आणि जालेनि फुलें

* जगासि. † तेथिंचा. ‡ आवडतयातें. § माहेवती.

१ वस्तुसत्यताबुद्धि. २ राजचिन्हें असलेल्यांला. ३ तोच नवगुणरूप रत्नांचा समुद्र व तोच त्या नवरत्नांचा हार करून ले=आपल्या आंगावर घालितो. ४ चाफ्याच्या कळ्यांनीं. ५ चांदण्यानें शुभ्र केला. ६ शोभिवंत. ७ सामुग्रीनें. ८ साह्य. ९ सोबती. १० बळवान. ११ साह्यावांचून. १२ शूर. १३ कोट्यवधी. १४ कोसळल्यास. १५ भलत्या रीतीनें,कितीही. १६ जिंकून. १७ सूक्ष्ममार्ग. १८ रजस्वला. १९ मुख्य गुण.

फळें । शाखिया[1] जैसी मोकळे[2] । कां उदार परिमळें । पद्माकर ॥ ६८ ॥ ना ना आवडीचेनि मापें । चांदिणें भलतेणें धेपे । पुढिलांचेनि संकल्पें । तैसें जें देणें ॥ ६९ ॥ तें उमप[3] गा दान । जेथ सहावें गुणरत्न । [ईश्वरभावश्च] आणि आज्ञे एकायतन[4] । होणें जें कां ॥ ८७० ॥ पोषूनि अवयव आपुले । करविजती मारविले । तेविं पालणें लोभविलें । जग जें भोगणें ॥ ७१ ॥ तया नाम ईश्वरभावो । जो सर्वसामर्थ्याचा ठावो । तो गुणांमाजि रावो । सातवा जेथ ॥ ७२ ॥ [क्षात्रं कर्म स्वभावजं] ऐसें जें शौर्यादिकीं । इहीं सात गुणविशेखीं । अळंकृत सप्तऋखीं[5] । आकाश जैसें ॥ ७३ ॥ तैसें सप्तगुणीं विचित्र । कर्म जें जगीं पवित्र । तें सहज जाण *क्षात्र । क्षत्रियाचें ॥ ७४ ॥ ना ना क्षत्रिय नव्हे नरु । तो सत्व सोनयाचा मेरु । ह्मणौनि गुण स्वर्गा आधारु । सातां यियां ॥ ७५ ॥ ना तरि सप्तगुणार्णवीं । परिवारली[6] बरवी । हे क्रिया नव्हे पृथ्वी । भोगीतसे तो ॥ ७६ ॥ कां गुणाचे सातांही ओघीं । हे क्रिया ते गंगा जगीं । तया महोदधीचिया आंगीं । विलसे[7] जैसी ॥ ७७ ॥ परि हें बहु असो देख । शौर्यादि गुणात्मक । कर्म गा नैसर्गिक[8] । क्षत्रजातीसी ॥ ७८ ॥ आतां वैश्याचिये जाती । उचित जें महामती । तें ऐकें निरुती[9] । क्रिया सांगों ॥ ७९ ॥

कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥ ४४ ॥

[कृषि-] तरि भूमि बीज नागर । यया भांडवलाचा आधार । घेऊनि लाभ अपार । मेळवणें जें ॥ ८८० ॥ किंबहुना कृषीजिणें[10] । [गोरक्ष्य-] गोधनें राखोनि वर्तणें । [वाणिज्यं] कां समर्घाची[11] विकणें । †महार्घ[12] वस्तु ॥ ८१ ॥ [वैश्यकर्म स्वभावजं] येतुलालाचि पांडवा । वैश्यातें कर्माचा मेळावा । हा वैश्यजातिस्वभावा । आंतुला जाण ॥ ८२ ॥ [परिचर्येति] आणि वैश्य क्षत्रिय ब्राह्मण । हे द्विजन्मे[13] तीन्ही वर्ण । ययांचें जें शुश्रूषण । तें शूद्र कर्म ॥ ८३ ॥ पैं द्विजसेवेपरौतें । धांवणें नाहीं शूद्रातें । एवं चतुर्वर्णोचितें । दाविलीं कर्में ॥ ८४ ॥

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तच्छृणु ॥ ४५ ॥

[स्वे स्वे कर्मणि] आतां इयेचि विचक्षणा । वेगळालिया वर्णा । उचित जैसें

---

* क्षेत्र. † महार्घी.

१ वृक्ष. २ देतात. ३ मोठें. ४ वेदाज्ञेस एकनिष्ठ. ५ सप्तऋषींनीं. ६ वेष्टिली. ७ शोभे. ८ स्वाभाविक. ९ यथार्थ. १० शेतकीवर निर्वाह करणें. ११ स्वस्त दरानें घेतलेली वस्तु. १२ महाग. १३ दोन वेळ जन्म, पहिलें सर्वसामान्य शौक्र व दुसरें उपनयनांग सावित्री मंत्रोपदेशानें सावित्र हीं ज्यांस आहेत ते. (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य)

करणा । शब्दादिक ॥ ८५ ॥ ना तरि [1]जळदच्युता । पाणिया उचित सरिता । सरितेसी पांडुसुता । सिंधु उचित ॥ ८६ ॥ तैसें वर्णाश्रमवशें । जें करणीय आलें असे । *गोरेया आंगा जैसें । गोरेपण ॥ ८७ ॥ [अभिरतः] तया स्वभाववि[2]हिता कर्मा । शास्त्राचेनि मुखें वीरोत्तमा । प्रवर्तावयालागीं प्रेमा [3]। अढळ कीजे ॥ ८८ ॥ पैं आपुलेंचि रत्न थितें [4]। घेपे पारखियाचेनि हातें । तैसें स्वकर्म [5]आपैतें । शास्त्रें करावें ॥ ८९ ॥ जैसी दिठी असे आपुलियाठाईं । परि दीपेंवीण भोग नाहीं । मागुं न लाहतां †काई । पाय असतां होय ॥ ८९० ॥ ह्मणौनि ज्ञातिवशें साचार । सहज असे जो अधिकार । तो आपुलालिया शास्त्रें गोचर । आपण कीजे ॥ ९१ ॥ [संसिद्धिं लभते नरः] मग घरींचाचि ठेवा । जेविं डोळयां दावी दिवा । तरी घेतां काय पांडवा । [6]आडळ असे ॥ ९२ ॥ [स्वकर्मनिरतः] तैसें स्वभावें भागा आलें । वरी शास्त्रें खरें केलें । तें विहित जो आपुलें । आचरे गा ॥ ९३ ॥ परि आळस सांडुनी । फळकाम दवडुनि । आंगें जीवें मांडुनि । तेथेंचि [8]भरु ॥ ९४ ॥ वोघीं पडिलें पाणी । नेणे [9]आनानी वाहणी । तैसा जाय आचरणीं । व्यवस्थौनि ॥ ९५ ॥ [यथा] अर्जुना जो यापरी । तें विहित कर्म स्वयें करी । [सिद्धिं] तो मोक्षाच्या ‡ऐलतीरीं । [विंदति तच्छृणु] पैठा होय ॥ ९६ ॥ जे [10]अकरणा आणि निषिद्धा । [11]नवचेचि कांहीं संबंधा । ह्मणौनि [12]भेवा विरुद्धा । मुकला तो ॥ ९७ ॥ आणि काम्यकर्माकडे । न परतेचि जेथ [13]कोडें । तेथ चंदनाचेही [14]खोडे । न [15]लेचि तो ॥ ९८ ॥ येर नित्य कर्म तंव । फळत्यागें वेंचिलें सर्व । ह्मणौनि मोक्षाची शिव । [16]ठाकूं लाहे ॥ ९९ ॥ ऐसेनि शुभाशुभीं संसारीं । सांडिला तो अवधारीं । वैराग्य §मोक्षद्वारीं । उभा ठाके ॥ ९०० ॥ जें सकळभाग्याची सीमा । मोक्षलाभाची जें [17]प्रमा । नाना कर्ममार्गश्रमा । शेवटु जेथ ॥ १ ॥ मोक्षफळें दिधलीं वोलें [18]। जें सुकृततरूचें फूल । तये वैराग्यीं ठेवी पाउल । भंवरु [19]जैसा ॥ २ ॥ पाहीं आत्मज्ञानसुदिनाचा । ¶[20]वांधावा सांगतया अरुणाचा । उदय त्या वैराग्याचा । ठावो पावे ॥ ३ ॥ किंबहुना आत्मज्ञान । जेणें हाता ये निधान । तें वैराग्य दिव्यांजन । जीवें [21]ले तो ॥ ४ ॥ ऐसी मोक्षाची योग्यता । सिद्धी जाय तया पंडुसुता । अनुसरोनि विहिता । कर्मा यया ॥ ५ ॥ हें विहित कर्म पांडवा । आपुला [22]अनन्य वोलांवा [23]। आणि हेचि परम

---

* गोरया. † कायिपायी । असतां. ‡ ऐलद्वारीं. §मोक्षाच्या द्वारीं. ¶वर्धावं.

१ पडलेल्या मेघजळाला. २ बुद्धि, प्रमाण. ३ असलेलें. ४ प्राप्त. ५ अडथळा. ६ भर, आदर. ७ निरनिराळा प्रवाहमार्ग. ८ प्राप्त. ९ मुळींच कर्म न करण्याला. १० जातच नाहीं. ११ आत्मप्राप्तीस विरुद्ध जो संसार त्याला. १२ आवडीनें. १३ खोडा, प्रतिबंध. १४ स्वीकारित नाहीं. १५ प्राप्तीस लाभतो. १६ वैराग्य हें मोक्षाचें द्वार आहे. १७ प्रमाण. १८ तारण. १९ भ्रमर. २० वार्ता, उदय. २१ घाली. २२ एकनिष्ठ. २३ जिव्हाळा.

सेवा । मज सर्वात्मकाची ॥६॥ पैं आधवाचि भोगेंसी । पतिव्रता क्रीडे प्रियेंसी । कीं तयाचि नामें जैसीं । तपें तियां केलीं ॥ ७ ॥ कां बाळका एकी मायेवांचोनि जिणें काय आहे । ह्मणौनि सेविजे कीं तो होये । पोटाचा धर्म ॥८॥ ना ना पाणी ह्मणौनि मासा । गंगा न सांडितां जैसा । सर्वतीर्थ *सहवासा । वैरपडा जाला ॥ ९ ॥ तैसें आपलिया विहिता । उपाय असे न विसंबतां । ऐसा कीजे कीं जगन्नाथा । आभार पडे ॥ ९१० ॥ अगा जयाचें विहित । तें ईश्वराचें मनोगत । ह्मणौनि केलिया निश्चांत । सांपडेचि तो ॥ ११ ॥ पै जीवाचे कैसी उतरली । ते दासी कीं गोसांवीणें जाली । तैसी सेवेची तिया मविली । वैंहि जेविं ॥ १२ ॥ तैसें स्वामीचिया मनोभावा । न चुकिजे हेचि परमसेवा । येर तें गा पांडवा । वाणिज्य करणें ॥ १३ ॥

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥ ४६ ॥

[यतः प्रवृत्तिर्भूतानां] ह्मणौनि विहित क्रिया केली । नव्हे तयाची खूण पाळिली । जयापासूनि कां आलीं । आकारा भूतें ॥ १४ ॥ जो अविद्येचिया चिंधिया । गुंडूनि जीव बाहुलिया । खेळवीतसे तिगुणिया । अहंकाररज्जू ॥ १५ ॥ [येन सर्वमिदं ततं] जेणें जग हें समस्त । आंत बाहेरी पूर्ण भरित । जालें आहे दीपजात । तेजें †जैसें ॥ १६ ॥ [स्वकर्मणा तमभ्यर्च्य] तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा । पूजा केली होय अपारा । तोषालागीं ॥ १७ ॥ ह्मणौनि तिये पुजे । रिझलेनि आत्मराजें । वैराग्यसिद्धि देयिजे । पसाय तया ॥ १८ ॥ [सिद्धिं विंदति मानवः] जिये वैराग्यदशे । ईश्वराचेनि वेधवशें । हें सर्वही नावडे जैसें । वांत होय ॥ १९ ॥ प्राणनाथाचिया आंधी । विरहिणीतें जिणेंही बाधी । तैसें सुखजात ‡त्रिशुद्धी । §दुःखचि लागे ॥ ९२० ॥ सम्यक्ज्ञान नुदैजतां । वेधेंचि तन्मयता । उपजे ऐसी योग्यता । बोधाची लाहे ॥ २१ ॥ ह्मणौनि मोक्षलाभालागीं । जो व्रतें वाहतसे आंगीं । तेणें स्वधर्म आस्था- चांगी । अनुष्ठावा ॥ २२ ॥

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ ४७ ॥

[श्रेयान्स्वधर्मः] अगा आपला हा स्वधर्म । आचरणीं जरी विषम । तरी पाहावा तो परिणाम । फळेल जेणें ॥२३॥ [विगुणः] जैं सुखालागीं आपणपयां-

* सर्वेप्सा. † जेवीं. ‡ ऋद्धि, बाधी. § दुःखाच्या लागें.

१ पतीशीं विहार करी. २ त्याचप्रमाणें. ३ श्रेष्ठत्वाचा. ४ प्राप्त. ५ भार. ६ कसोटीस लावली- ७ धनीण. ८ साधली. ९ हद्द. १० संतुष्ट झाल्यानें. ११ प्रसाद. १२ छंदानें. १३ वमन. १४ मनोव्याधी. १५ वांचणें. १६ व्यर्थ. १७ ध्यासानें. १८ चांगल्या आस्थेनें. १९ कठीण.

निंबचि आथी धनंजया । तैं कडुवटपणा तयाचिया । [3]उबगिजे ना ॥ २४ ॥ फळणया ऐलीकडे । केळीतें पाहातां [2]आंस मोडे । ऐसी त्यजिली तरी जोडे । तैसें कें गोमटें ॥ २५ ॥ तेविं स्वधर्म सांकडु । देखोनि केला जरी कडु । तरी मोक्षसुरवाडु । अंतरला कीं ॥ २६ ॥ आणि आपली माये । कुब्ज जरी आहे । तरी *[3]जीजेतें नोहे । स्नेह [4]कुन्हें कीं ॥ २७ ॥ [परधर्मात्स्वनुष्ठितात्] येरी जिया परावियां । रंभेहूनि बरविया । तिया काय करावियां । बाळकें तेणें ॥ २८ ॥ अगा पाणियाहूनि बहुवें । तुपीं गुण कीर आहे । परि मीना काय होये । असणें तेथ ॥ २९ ॥ पैं आघविया जगा जें विख । तें विख-कीडिया पीयूख । आणि [5]गुंळ तें देख । मरण दे तया ॥ ९३० ॥ [स्वभावेति] ह्मणौनि जे विहित जया जेणें । फिटे संसाराचें धरणें । क्रिया कठोर तन्हि तेणें । तेचि करावी ॥ ३१ ॥ येरा पराचारा बरविया । ऐसें होईल टेंकलेया । पायांचें चालणें डोईया । केलें जैसें ॥ ३२ ॥ यालागीं कर्म आपलें । जें जातिस्वभावें असे आलें । तें करी तेणें जिंतिलें । कर्मबंधातें ॥ ३३ ॥ आणि स्वधर्मचि पाळावा । परधर्म तो गाळावा । हा नेमही पांडवा । न कीजेचि पैं ॥ ३४ ॥ तरी आत्मदृष्ट नोहे । तंव कर्म करणें कां ठाये । आणि करणें तेथ आहे । आयास आधीं ॥ ३५ ॥

सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत् ।
सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥ ४८ ॥

[सर्वारंभा हि दोषेण] ह्मणौनि भलतिये कर्मीं । आयास जन्ही उपक्रमीं । तरी काय स्वधर्मीं । दोष सांगें ॥ ३६ ॥ अगा उजू वाटा चालावें । तन्ही पायचि सिणवावे । ना आडरानें धांवावें । तन्ही तेंचि ॥ ३७ ॥ पैं शिळा [6]कां सिदोरिया । [7]दांटणें एक धनंजया । परि जें वाहातां [8]विसांवया । मिळिजे तें घेपे ॥ ३८ ॥ येऱ्हवीं [9]कणा आणि [10]भूसा । काढितांही सोसें [11]सरिसा । जेंचि [12]रंधन [13]श्रममांसा । तेंचि हवी ॥ ३९ ॥ दधी जळाचिया घुसळणा । व्यापार सारिखेचि विचक्षणा । वाळुवे तिळा घाणा । गाळणें एक ॥ ९४० ॥ [धूमेनाग्निरिवावृताः] पैं नित्यहोम देयावया । कां सैरा [14]आगीं सुवावया । फुंकितां धूम धनंजया । साहणें तेंचि ॥ ४१ ॥ [सदोषमपि] परी धर्मपत्नी [15]धींगडी । पोसितां जरी एकी वोढी । तरि कां [16]अपरवडी । आणावी आंगा ॥ ४२ ॥ हां

* जेणें, जियेतें.

१ त्रासूं नये, कंटाळूं नये. २ आशाभंग. ३ वांचिजेतें, जेणें वाचावें. ४ वांकडें. ५ गोड. ६ आश्रय कैल्यास. ७ डोक्यानें. ८ टाकावा. ९ कसें रहातें. १० दडपणें. ११ विश्रांतीस. १२ धान्य. १३ फोल. १४ श्रम सारखाच. १५ शिजविण्याची खटपट. १६ स्वेच्छ अग्नींत घालण्यास. १७ दांडगी, व्यभिचारिणी. १८ अन्यायवर्तन.

गा पाठीं लागला घाई । मरण न चुकेचि पाहीं । तरि [1]समोरला काई । [2]आगळें न कीजे ॥ ४३ ॥ कुळस्त्री दांडयाचे घाये । [3]परघर रिगालीहि जरि साहे । तरि स्वपतीतें वांयें । त्यजिलें कीं ॥ ४४ ॥ तैसे आवडतेंही करणें । न निपजे शिणल्याविणें । तरि विहित बारे [4]कोणें । बोलें भोरी ॥ ४५ ॥ वरि थोडेंचि अमृत घेतां । सर्वस्व वेंचो कां पंडुसुता । जेणें जोडे जीविता । अक्षयत्व ॥ ४६ ॥ येर कांहीं मोलें *वेचूनि । विष †पियावें घेउनि । आत्महत्येसि निमोनि । जायिजे जेणें ॥४७॥ तैसें जाचूनियां इंद्रियें । वेचूनि आयुष्याचेनि [5]दियें । सांचले पापी आन आहे । दुःखावांचूनि ॥ ४८ ॥ [सहजं कर्म कौंतेय] ह्मणोनि करावा स्वधर्म । जो करितां हिरोनि घे श्रम । उचित देईल परम । पुरुषार्थराज ॥ ४९ ॥ [न त्यजेत्] याकारणें किरीटी । स्वधर्माचिये राहटी । न विसंबिजे संकटीं । सिद्धमंत्र जैसा ॥ ९५० ॥ का नाव जैसी ‡उदधीं । महारोगीं दिव्यौषधी । न विसंबिजे तया बुद्धी । स्वकर्म येथ ॥ ५१ ॥ मग यायाचि गा कपिध्वजा । स्वकर्माचिया महापूजा । तोषला ईश तमरजा । §झाडा करूनि ॥ ५२ ॥ शुद्ध सत्वाचिया वाटा । आणी आपुली उत्कंठा । भव स्वर्ग काळकूटा । ऐसे दावी ॥ ५३ ॥ ¶जियें वैराग्य येणें बोलें । मागां संसिद्धी रूप केलें । किंबहुना तें आपुलें । मेळवी [6]खोंगें ॥ ५४ ॥ मग जिंतिलिया हे [7]ओये । पुरुष सर्वत्र $जैसा होये । कां जोलाहि जें लाहे । तें आतां सांगों ॥ ५५ ॥

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।
नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाऽधिगच्छति ॥ ४९ ॥

[असक्तबुद्धिः सर्वत्र] तरि देहादिक हें संसारें । सर्वही मांडलेंसे जें [8]गुंफिरें । तेथ [9]नातुडे तो [10]वांगुरे । वारा जैसा ॥ ५६ ॥ पैं परिपाकाचिये वेळे । फळ देठें ना देठ फळें । न धरे तैसें स्नेह [11]खुंटे । सर्वत्र होय ॥ ५७ ॥ पुत्र वित्त कलत्र । हे जालियाही स्वतंत्र । माझें न ह्मणें पात्र । विषाचें जैसें ॥ ५८ ॥ [जितात्मा] हें असो विषयजातीं । बुद्धि पोळली ऐसी माघौती । पाउलें घेउनि एकांतीं । हृदयाच्या रिघे ॥ ५९ ॥ ऐसया अंतःकरण । बाह्य येतां तयाची आण । न मोडी समर्था भेण । दासी जैसी ॥ ९६० ॥ तैसें ऐक्याचिये मुठी । माजिवडें चित्त किरीटी । करूनि ||[12]विधीं नेहटी । आत्मयाच्या ॥ ६१ ॥ [विगत-

* मोलें करून. † घ्यावें वणेजूनि. ‡ नावेसी जैसें उदधीं. § झड. ¶ जें वैराग्य. $ ऐसा. || विधी.

१ समोर होऊन केलेला घाय. २ ज्यास्ती. ३ दुसऱ्याचें घर. ४ कोणत्या शब्दानें कठीण असें ह्मणावें. ५ कशाला. ६ दिवस. ७ मोक्ष. ८ इहपरसंबंधी भोग. ९ मार्गे 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धौ' इत्यादिकानें सांगितलें. १० ठिकाण. ११ भूमि. १२ पूर्ण झालेला. १३ जाळें. १४ न सांपडे. १५ जाळ्यांत. १६ पांगळे, वेडानें. १७ छंदानें.

स्पृहः] तेव्हां [1]इष्टादृष्ट स्पृहे । [2]निर्मणें जालेचि आहे । आगीं दडपलिया धुयें । राहिजे जैसें ॥ ६२ ॥ ह्मणोनि नियमिलिया मानसीं । स्पृहा *नासोनि जाय आपैसी । किंबहुना तो ऐसी । भूमिका पावे ॥ ६३ ॥ [नैष्कर्म्यसिद्धि परमां] पैं [3]अन्यथाबोध आघवा । मावळोनि तया पांडवा । बोधमात्रींचि जीवा । ठाव होय ॥ ६४ ॥ †[4]धरवणी वेचें सरे । तैसें भोगें प्राचीन पुरे । नवें तंव [5]नुपकरे । कांहींचि करूं ॥ ६५ ॥ ऐशी कर्मे साम्य दशा । होय तेथ वीरेशा । मग श्रीगुरु आपैसा । भेटेचि गा ॥ ६६ ॥ रात्रीची चौपाहरी । वेंचलिया अवधारीं । डोळ्यां तमारी । मिळे जैसा ॥ ६७ ॥ कां येऊनि फळाचा घड । पौरुषवी केळीची वाढ । श्रीगुरू भेटोनि करी पाड । ‡[6]मुमुक्षू तैसा ॥ ६८ ॥ मग आलिंगिला पूर्णिमा । जैसा उणीव सांडी चंद्रमा । तैसें होय वीरोत्तमा । गुरुकृपा तया ॥ ६९ ॥ तेव्हां अबोधमात्र असे । तो तंव तया कृपा नाशे । तेथ निशिसवें जैसें । आंधारें जाय ॥ ९७० ॥ तैसी अबोधाचिये कुशी । कर्म कर्ता कार्य ऐशी । त्रिपुटी असे ते जैसी । [7]गाभिणी मारिली ॥ ७१ ॥ [संन्यासेनाधिगच्छति] तैसेंचि [8]अबोधनाशासवें । नाशे क्रियाजात आघवें । ऐसा समूळ संभवे । [9]संन्यास हा ॥ ७२ ॥ येणें मूळाज्ञानसंन्यासें । दृश्याचा जेथ ठावो पुसे । तेथ [10]बुझावें तें आपैसें । तोचि आहे ॥ ७३ ॥ [11]चेइलियावरि पाहीं । स्वप्नींचिया तिये डोहीं । आपणयातें काई । काढुं जाइजे ॥ ७४ ॥ §तैं मी नेणें आतां जाणेन । हें सरलें तया दुःस्वप्न । जाला [12]ज्ञातृज्ञेयाविहीन । चिदाकार ॥ ७५ ॥ मुखाभासेंसी आरिसा । परता नेलिया वीरेशा । पाहातेपणेंवीण जैसा । पाहाता [13]ठाके ॥ ७६ ॥ तैसें नेणणें जें गेलें । तेणें जाणणेंही नेलें । मग निष्क्रिय [14]उरलें । [15]चिन्मात्रचि ॥ ७७ ॥ तेथ स्वभावें धनंजया । नाहीं कोणीचि क्रिया । ह्मणौनि [16]प्रवाद तया । नैष्कर्म्य ऐसा ॥ ७८ ॥ [17]तें आपुलें आपणपें । ¶[18]असतचि होऊनि हारपे । तरंग कां वायुलोपें । समुद्र जैसा ॥ ७९ ॥ [परमां] तैसें न होणें निपजे । ते [19]नैष्कर्म्यसिद्धि जाणिजे । सर्वसिद्धींत सहजें । परम हेचि ॥ ९८० ॥ देउळाचिया कामा कळस । परम गंगेसी सिंधुप्रवेश । कां सुवर्णशुद्धी कस । [20]सोळावा जैसा ॥ ८१ ॥ तैसें आपुलें नेणणें । फेडिजे कां जाणणें । तेंहि गिळूनि असणें । ऐशी जे दशा ॥ ८२ ॥ तियेपरतें कांहीं । निपजणें येथ नाहीं । ह्मणौनि ह्मणिपे पाहीं । परमसिद्धि ते ॥ ८३ ॥

---

* निमौनि. † धारवणी. ‡ बुभुत्सु. §तें मी आतां. ¶असे तेंचि, असतेंचि.

१ इहपर भोगेच्छेनें. २ अंत, समाप्ति. ३ विपरीत ज्ञान. ४ धरून ठेवलेलें पाणी. ५ संचित. ६ आरंभ न करी. ७ थांबवी. ८ प्रकार, योग्यता. ९ अज्ञान. १० गर्भिणी. ११ अज्ञानाच्या नाशासह. १२ कर्मत्याग. १३ जाणावें. १४ जागें झाल्यावर. १५ जाणणारा व जाणण्याची वस्तु या भेदावांचून. १६ राहे. १७ क्रियारहित. १८ ज्ञानस्वरूप. १९ नांव, बोलणें. २० तें=जाणणें, असतचि=नेहमीं असणारें आत्मस्वरूप. २१ निष्कामकर्मता. २२ सोळा रुपये तोळा दराचा.

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाऽप्नोति निबोध मे ।
समासेनैव कौंतेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥ ५० ॥

[निष्ठा ज्ञानस्य या परा] परि हेचि आत्मसिद्धि । जो कोणी भाग्यनिधि । श्रीगुरुकृपा[1]लब्धि- । काळीं पावे ॥ ८४ ॥ उदयजतांचि दिनकर । प्रकाशचि [2]आते आंधार । कां दीपसंगें *कर्पूर । दीपचि होय ॥ ८५ ॥ तया लवणाची कणिका । मि[3]ळतखेंवो उदका । उदकचि होऊनि देखा । ठाके जेंवि ॥ ८६ ॥ कां निद्रित चेवविलिया । स्वप्नेंसी †नीदे वायां । ‡जाऊनि आपणपयां । मिळे जैसा ॥ ८७ ॥ तैसें जया कोण्हासि दैवें । गुरुवाक्य श्रवणाचिसवें । द्वैत गिळोनि वि[4]संवे । आपणया वृत्ती ॥ ८८ ॥ तयासी मग कर्म करणें । हें बोलिजेलचि कवणें । आकाशा येणें जाणें । आहे काई ॥ ८९ ॥ ह्मणौनि तयासि कांहीं । त्रिशुद्धि करणें नाहीं । परि ऐसें जरि हें कांहीं । नव्हे जया ॥ ९९० ॥ कैं[5]नां वचनाचिये भेटी- । सरिसाचि पैं किरीटी । [6]वस्तु होऊनि उठी । कवणि एक जो ॥ ९१ ॥ येऱ्हवीं स्वकर्माचेनि [7]वन्हीं । काम्यनिषिद्धाचिया इं[8]धनीं । रज तम कीर दोन्हीं । जाळिलीं आधीं ॥ ९२ ॥ पुत्र वित्त परलोक । यया तिहींचा अभि[9]लाख । घरीं होय पा[10]इक । हेंही जालें ॥ ९३ ॥ इंद्रियें सैरा पदार्थीं । रिगतां विटाळलीं होतीं । तियें प्रत्या[11]हारेतीर्थीं । न्हाणिलीं कीर ॥ ९४ ॥ आणि स्वधर्माचें फळ । ईश्वरीं अर्पूनि §बळ । घेऊनि केलें अढळ । वैराग्यपद ॥ ९५ ॥ ऐसी आत्मसाक्षात्कारीं । लाभे ज्ञानाची [12]उजरी । ते सामग्री कीर पुरी । मेळविली ॥ ९६ ॥ [सिद्धिं प्राप्तः] आणि तेचि समर्थी । ¶सद्गुरू भेटले पाहीं । $तेवींचि तिहीं कांहीं । ||वंचिजेना[13] ॥ ९७ ॥ [यथा] परि वोखद घेतखेंवो । कां[14]य लाभे आपला ठावो । कां उदयजतांची दि[15]वो । मध्यान्ह होय ॥ ९८ ॥ सुक्षेत्रीं आणि वो[16]लटें । बीजहि पेरिलें गोमटें । तरि [17]ओलोट फळ भेटे । परि वे[18]ळे कीं या ॥ ९९ ॥ जोडला मार्ग प्रां[19]जळे । मिनला [20]सुसंगा[21]चाही मेळ । तरि पाविजे [22]वांचूनि वेळ । लागेचि कीं ॥ १००० ॥ तैसा वैराग्यलाभ जाला । वरि सद्गुरूही भेटला । जीवीं अंकुर फुटला । विवेकाचा ॥ १ ॥ तेणें ब्रह्म एक आथि । येर आघवीचि भ्रांति । हेही कीर प्रतीति ।

* कापूर. † निज. ‡ दाऊनि. § सकळ. ¶ सद्गुरुही. $ तेवीं चित्तेंही. || राखिजेना.

१ प्राप्तीच्या वेळीं. २ व्यापी. ३ मिळतांक्षणीं. ४ जागृत केला असतां. ५ निद्रा. ६ विश्रांति पावे. ७ शिष्याचा कान व गुरुवचन यांची भेट. ८ लागलाच. ९ ब्रह्मस्वरूप. १० अग्नीमध्ये. ११ काष्ठांत. १२ इच्छा. १३ नोकर. १४ ब्रह्माकारतारूप तीर्थांत. १५ उत्कर्षदशा. १६ प्रतारणा केली जात नाहीं. १७ देह. १८ दिवस. १९ ओलसर भूमींत. २० अत्यंत. २१ प्राप्तिकाळीं. २२ स्पष्ट. २३ मिळाला. २४ साधुसंगतीचा. २५ परंतु.

गाढ केली ॥ २ ॥ [ब्रह्म] परि तेंचि जें परब्रह्म । सर्वात्मक सर्वोत्तम । मोक्षाचेंही काम । सरे जेथ ॥ ३ ॥ यया तिन्हीं अवस्था पोटीं । जिरवी जें गा किरीटी । तया ज्ञानासिही मिठी । दे जें वस्तु ॥ ४ ॥ ऐक्याचें एकपण सरे । जेथ आनंदकणही विरे । कांहींचि नुरोनि उरे । जें कांहीं गा ॥ ५ ॥ [आप्नोति] तियें ब्रह्मीं ऐक्यपणें । ब्रह्मचि होऊनि असणें । तें क्रमेंचि करून तेणें । पाविजे पैं ॥ ६ ॥ भुकेलियापासीं । वोगरिलें षड्रसीं । तो तृसी प्रतिग्रासीं । लाहे जेविं ॥ ७ ॥ तैसा वैराग्याचा *वोलावा । विवेकाचा तो दिवा । आंबुथितां आत्मठेवा । काढीचि तो ॥ ८ ॥ तरि भोगिजे आत्मऋद्धी । येवढी योग्यतेची सिद्धी । जयाच्या आंगीं निरवधी । लेणें जाली ॥ ९ ॥ [तथा] तो जेणें क्रमें ब्रह्म । [समासेनैव] होणें करी गा सुगम । [निबोध मे] तया क्रमाचें आतां वर्म । आईक सांगों ॥ १०१० ॥

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ॥ ५१ ॥

[बुद्ध्या विशुद्धया] तरि गुरू दाविलिया वाटा । येऊन विवेकतीर्थतटा । धुऊनियां मैळकटा । बुद्धीचा तेणें ॥ ११ ॥ [युक्तः] मग राहूनें उगळिली । प्रभा चंद्रें आलिंगिली । तैसी शुद्धत्वें जडली । आपणयां बुद्धि ॥ १२ ॥ सांडूनि कुळें दोन्ही । प्रियासी अनुसरे कामिनी । द्वंद्वत्यागें स्वचिंतनीं । पडली तैसी ॥ १३ ॥ [शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा] आणि ज्ञानाऐसें जिव्हार । नेवों नेवों निरंतर । इंद्रियीं केले थोर । शब्दादिक जे ॥ १४ ॥ तें रश्मिजाळ काढलेया । मृगजळ जाय लया । तैसें वृत्तिरोधें तयां । पांचांहीं केलें ॥ १५ ॥ नेणतां अंधमाचिया अन्ना । खादलिया कीजे वमना । तैसीं वोकविलीं सवासना । इंद्रियें †विषयीं ॥१६॥ [धृत्यात्मानं नियम्य च] मग प्रत्याहारवृत्ती चोखटें । लाविलीं गंगेचेनि तटें । ऐसीं प्रायश्चित्तें धुवटें । केलीं येणें॥१७॥ पाठीं सात्विकें धीरें तेणें । शोधोनि तियें करणें । मग मनेंसीं योगधारणें । मेळविलीं ॥ १८ ॥ [रागद्वेषौ व्युदस्य च] तेविंचि प्राचीनें इष्टानिष्टें । भोगेंसी येउनी भेटे । तेथ देखिलियाही वोखटें । द्वेष न करी ॥ १९ ॥ नां गोमटेंचि

* वोलवा. † विषया.

१ बळकट. २ वृत्तिगत आनंदाचा अंश. ३ षडसान्न वाढिलें. ४ आश्रय. ५ उजळितां, पेटला असतां. ६ विवेकरूप तीर्थाच्या कांठीं. ७ मळ. ८ ओकलेली. ९ प्रकाश. १० आत्मस्वरूपीं. ११ सासर व माहेर. १२ पतीला स्त्री अनुसरते. १३ द्वैत सोडल्यानें. १४ अंतर्गत, मित्र. १५ किरण काढून घेतांच. १६ अंतर्मुखतेनें. १७ पंचविषयांला. १८ नीचाचें अन्न. १९ वांति. २० वासनासहित विषय इंद्रियांकडून ओकविले. २१ आत्मस्वरूपाकारवृत्ति,=प्रत्याहाररूप गंगातीरीं पाठवून दिलें. २२ सत्वगुणानें. २३ शुद्ध केलीं. २४ इंद्रियें. २५ पूर्वसंस्कारानें अनुकूल व प्रतिकूल अशा. २६ अनिष्ट. २७ तिरस्कार. २८ नाहींतर.

विषायें[1]। तें आणूनि पुढां सूये[2]। तयालागीं न होये। साभिलाष ॥ १०२० ॥
यापरि इष्टानिष्टीं। रागद्वेष[3] किरीटी। त्यजूनि गिरिकंपाटीं[4]। निकुंजीं[5] वसे ॥ २१ ॥

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥ ५२ ॥

[विविक्तसेवी] गजबजा[6] सांडिलिया। वैसवी[7] वनस्थळिया। अंगाचिया[8] मांदिया। एकलेया ॥ २२ ॥ शमदमादिकीं खेळे। न बोलणेचि[9] चांवळे[10]। गुरुवाक्याचेनि मेळें। नेणे वेळ ॥ २३ ॥ [लघ्वाशी] आणि आंगा बळ यावें। ना तरि क्षुधा[11] जावें। कां जिभेचे पुरावे। मनोरथ ॥ २४ ॥ भोजन करितांविखीं[12]। यया तिहींतें न लेखी। आहारीं मिती[13] संतोषीं। मोप[14] न सूये ॥ २५ ॥ *अनशनाचेनि[15] पावकें। †हारपतां[16] प्राण पोखे। इतुकियाचि भाग मोटकें। अशन करी ॥ २६ ॥ [यतवाक्कायमानसः] आणि परपुरुषें कामिली[17]। कुळवधू आंग न घाली। निद्रालस्या न मोकळी[18]। ‡अशन तैसें ॥ २७ ॥ दंडवताचेनि प्रसंगें। भुयीं हन अंग लागे। वांचूनि येर नेघे। रोंभस्य[19] तेथ ॥ २८ ॥ देहनिर्वाहापुरतें। रोंहाटवी[20] हातापायांतें। किंबहुना आंपैतें[21]। सबाह्य केलें ॥ २९ ॥ आणि मनाचा उंबरा। वृत्तीसी देखों नेदी वीरा। तेथ कें व्यापारा[22]। अवकाश असे ॥ १०३० ॥ ऐसेनि देहवाचा मानस। हें जिणोनि[23] बाह्यप्रदेश। [ध्यान–] आकळिलें आकाश। ध्यानाचें तेणें ॥ ३१ ॥ गुरुवाक्यें उठविला। बोधीं निश्चय[24] ओला। न्याहाळी हातीं घेतला। आरिसां जैसा ॥ ३२ ॥ पै ध्याता आपणपेंचि परी। ध्यानरूप वृत्तिमाझारीं। ध्येयत्वें §धेहें[25] अवधारीं। ध्यानरूढी[26] गा ॥ ३३ ॥ तेथ ध्येय ध्यान ध्याता। ययां तिहीं एकरूपता। होय तंव पंडुसुता। कीजे तें गा ॥ ३४ ॥ ह्मणौनि तो मुमुक्षु। आत्मज्ञानीं जाला दक्षु[27]। [योगपरो नित्यं] परि पुढांसूनि[28] पक्षु[29]। योगाभ्यासाचा ॥ ३५ ॥ अपानरंध्रद्वया[30]- माझारीं धनंजया। पांपणी[31] पिडूनियां।

---

* अशनाचेनि † हारपती. ‡ आसन तैसें. § घेहे.

---

१ कदाचित्. २ ठेवी. ३ प्रियाप्रियता. ४ गुहेंत. ५ दाट झाडीच्या अरण्यांत. ६ जनसहवास. ७ वनांत स्थळ वसविलें. ८ अवयवसमुदाय. ९ मन इंद्रियांच्या अंतर्मुखतेंत. १० बोले. ११ क्षुधा मंद व्हावी. १२ विषयीं. १३ मोजलेला. १४ माप घालीत नाहींत. १५ जाठराग्नीनें, प्राण पोषण होतो. १६ इच्छिली किंवा बोलाविली. १७ दवडीत नाहीं. १८ विषयसुख, अविचार. १९ उपयोग करी. २० स्वाधीन. २१ शब्दास. २२ जिंकून. २३ ध्यान करण्यास योग्यपणानें. २४ ध्यान करितो. २५ प्रकार. २६ शहाणा. २७ पुढें करून. २८ प्रकार. २९ गुदशिश्नछिद्रांच्या. ३० खेंटेनें दाबून.

कांवरुमूळ ॥ ३६ ॥ आकुंचूनि अध । देऊनि तिन्ही बंध । करूनि एकवद वायू भेदी ॥ ३७ ॥ कुंडलिनी जागऊनि । मध्यमा विकाशूनि । आधारादि भेदूंनि । अग्निवरी ॥ ३८ ॥ सहस्रदळाचा मेघ । पीयूषें वर्षोनि चांग । तो मूळवरी वोघ । आणूनियां ॥ ३९ ॥ नाचतया पुण्यगिरी । चिद्भैरवाच्या खापुरीं । मनपवनाची खीच पुरी । वादुनियां ॥ १०४० ॥ जालिया योगाचा गोढा । मेळावा सूनि हा पुढां । ध्यान मागिलीकडां । स्वयंभ केलें ॥ ४१ ॥ आणि ध्यानयोगदोनी । इयें आत्मतत्त्वज्ञानी । पैठीं होआवया निर्विघ्नीं । आधींचि तेणें ॥ ४२ ॥ वीतरागतेसारिखा । जोडूनि ठेविला सखा । तो आघवियाचि भूमिकां- । सवें चाले ॥ ४३ ॥ पहावें दिसे तंववरी । दिठीतें न संडी दीप जरी । तरी कें अवसरीं । देखावया ॥ ४४ ॥ तैसें मोक्षीं प्रवर्तलया । वृत्ती ब्रह्मीं जाय लया । तंव वैराग्य आथी तया । भंग कैंचा ॥४५॥ ह्मणौनि सवैराग्य । ज्ञानाभ्यास तो सभाग्य । करूनि जाला योग्य । आत्मलाभा ॥ ४६ ॥ ऐसी वैराग्याची अंगी । बाणूनियां वज्रांगीं । राजयोगतुरंगीं आरूढला ॥ ४७ ॥ वरि आडपडिलें दिठी । सेनें थोर निवटी । तें बळी विवे । कमुष्टीं । ध्यानाचें खांडें ॥ ४८ ॥ ऐसेनि संसाररणआंत । आंधारीं सूर्य तैसा असे जात । मोक्ष विजयश्रिये वरैते । होआवयालागीं ॥ ४९ ॥

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शांतो ब्रह्मभूयाय कल्पते ॥ ५३ ॥

[अहंकारं] *तेथ आडवावया आले । दोषवैरी जे धोपटिले । तयांमाजी पहिले । देहाहंकार ॥ १०५० ॥ जो न मोकली मारूनी । जीवों नेदी उपजवोनी । विचंबवी खोडां घालुनी । हाडांचिया ॥ ५१ ॥ तयाचा देहदुर्ग हा थारा । मोडोनि घेतला तो वीरा । [बलं] आणि बळ हा दुसरा ।

---

* मग अडवावे या.

---

१ गुदशिश्नांस सांधणाऱ्या रेषाकृतीचें मूळ, चार बोटांचा मध्य. २ आकर्षण करून. ३ गुदस्थानचा वज्रबंध, नाभिस्थान उड्डियाणबंध व कंठस्थान जालंधरबंध. ४ नाभिस्थानींची. ५ कंठस्थानस्थ. ६ गुदस्थानच्या आधारचक्राचा भेद करून. ७ दोन भिवयांमधील सुषुम्ना. ८ मस्तकस्थित ब्रह्मरंध्रींचा. ९ मूलाधारगुदस्थित चक्रापर्यंत. १० द्विदलरूप कमल जें अग्निचक्र तद्रूप पर्वतावर. ११ चैतन्यरूप भैरवाच्या भिक्षापात्रांत ह्मणजे सहस्रदलरूप कमलमस्तकांत. १२ मनोरूप वायूची पूर्ण खिचडी. १३ बळकटी. १४ वर सांगितलेला समुदाय पुढें करून. १५ ब्रह्मध्यानाकडे. १६ स्थिर, प्राप्त. १७ वैराग्यासारखा. १८ अवस्थांसमागमें. १९ वेळ, अवकाश. २० अहंस्फुरण. २१ कवच. २२ वज्राप्रमाणें बळकट. २३ अद्वैतबोधरूप घोड्यावर. २४ स्थूल, सूक्ष्म, पांचभौतिक आणि लिंग. २५ संहारी. २६ खड्ग. २७ वरणारा, भर्ता. २८ भ्रमवी. २९ त्या अभिमानाचा. ३० देहरूप किल्ला.

मारिला वैरी ॥ ५२ ॥ जो विषयाचेनि नांवें । चौगुणेंही वरी थांवे । जेणें मृतावस्था धांवे । सर्वत्र जगा ॥ ५३ ॥ तो *विषयविषाचा ठावो । आघविया दोषांचा रावो । परी ध्यानखड्गाचा घावो । साहेल कैंचा ॥ ५४ ॥ [दर्पी] आणि प्रिय विषयप्राप्ती । करी जया सुखाची व्यक्ती । †तेचि घालूनि बुंथी । आंगीं जो वाजे ॥ ५५ ॥ जो सन्मार्गा भुलवी । मग अधर्माच्या आडवीं । सूनि वाघां सांपडवी । नरकादिकां ॥ ५६ ॥ तो विश्वासें मारिता रिपु । निवटूनि घातला दर्पु । [कामं] आणि जयाचा अहा कंपु । तापसांसी ॥ ५७ ॥ ‡क्रोधा ऐसा महादोख । जयाचा देख परिपाक । भरिजे तंव अधिक । रितां होय जो ॥ ५८ ॥ तो काम कोणेचठायीं । नसे ऐसें केलें पाहीं । [क्रोधं] कीं तेंचि क्रोधाही । सहजें आलें ॥ ५९ ॥ मुळाचें तोडणें जैसें । होय कां शाखोद्देशें । काम नाशलेनि नाशे । तैसा क्रोध ॥ १०६० ॥ ह्मणौनि काम वैरी । §जाला जेथ ठाणोरी । तेथ सरली वारी । क्रोधाचीही ॥ ६१ ॥ [परिग्रहं] आणि समर्थ आपुला खोडा । शिसें वाहवी जैसा होडा । तैसा भुंजौनि जो गाढा । परिग्रहो ॥ ६२ ॥ जो माथांचि पोलावणी । अंगा अवगुण घोंलवी । जीवें दांडी घेववी । ¶ममत्वाची ॥ ६३ ॥ $शिष्यशास्त्रादिविलासें । मेठादिमुद्रेचेनि मिसें । घातले आहाती फांसे । निःसंगा जेणें ॥ ६४ ॥ घरीं कुटुंबपणें सरे । तरीं वनीं वन्य होउनी अवतरे । नागवीयाही शरीरें । लागला आहे ॥ ६५ ॥ [विमुच्य] ऐसा दुर्जय जो परिग्रहो । तयाचा फेडूनि ठावो । भवविजयाचा उत्साहो । भोगीतसे जो ॥ ६६ ॥ [निर्ममः] तेथ अमानित्वादि आघवे । ज्ञानगुणाचे जे मेळावे । ते कैवल्यदेशींचे आघवे । राव जैसे आले ॥६७॥ तेव्हां सम्यक्ज्ञानाचिया । राणिवा उगाणूनि तया । परिवार होऊनियां । राहत आंगें ॥ ६८ ॥ ||प्रवृत्तीचिये राजबिदी । अवस्थाभेदप्रमदीं । कीजत आहे प्रतिपदीं । सुखाचें लोण ॥ ६९ ॥ पुढां बोधाचिये कांबीवरी । विवेक दृश्याची मांदी सारी । योगभूमिका आरती करी । येती जैसिया ॥ १०७० ॥ तेथ ऋद्धिसिद्धीचीं अनेगें । वृंदें मिळती प्रसंगें । तिये +पुष्पवर्षीं आंगें । नाहातसे तो ॥ ७१ ॥ ऐसेनि ब्रह्मैक्यासारिखें । स्वराज्य येतां जवळिकें ।

---

* विषय विषया अथावो. † तयाची. ‡ कामा ऐसा. § निमाला. ¶ महत्वाची. $ शिष्यशाखादि. || प्रकृतीचिये. + पीयूषवर्षी.

---

१ सर्व विषयांच्याठायीं. २ बळावे. ३ कसें सहन करील. ४ खोळ. ५ आदळे. ६ अरण्यांत. ७ घालून. ८ गुरुशास्त्रवचनीं विश्वासानें. ९ वधून. १० गर्व. ११ पक्कावस्था. १२ रिकामा. १३ इच्छा. १४ युद्धहत, युद्धकर्ता. १५ बेडी. १६ मस्तकें. १७ पैजेनें. १८ संग. १९ ओझें घाली, डोक्यावर बसतो. २० जडवी. २१ काठी. २२ शिष्यसंप्रदाय वाढविण्याचे बाजार. २३ मठ करणें, मुद्रा दाखविणें. २४ विरक्तास. २५ ज्या परिग्रहानें. २६ घरकुटुंब त्याग करून दूर झाला. २७ वन्यसंबधाचे विषयीं. २८ स्वामित्वानें. २९ झाडा करून. ३० राजमार्गावर. ३१ जागृति इत्यादिक स्त्रियांविषयीं. ३२ धनुष्यानें. ३३ नाहींशी करी. ३४ आरती करणाऱ्या. ३५ पुष्पवृष्टीनें.

*[1]झळंबित आहे हरिखें । तिन्ही लोक ॥ ७२ ॥ तेव्हां वैरिया कां मैत्रिया । तयासि माझें ह्मणावया । [2]समानता धनंजया । उरेचिही ना ॥ ७३ ॥ हें ना भलतेणे [3]व्याजें । तो जयातें ह्मणे माझें । तें नोडंवेचि कां [4]दुजें । अद्वितीय जाला ॥ ७४ ॥ पैं आपुलिया एकी सत्ता । सर्वही [5]कैवल्यनियां पंडुसुता । कहीं न लगती ममता । [6]धाडिली तेणें ॥ ७५ ॥ [शांतः] ऐसा जिंतिलिया रिपुवर्ग । अपमानिलिया हें जग । [7]अपैसा [8]योगतुरंग । स्थिर जाला ॥ ७६ ॥ वैराग्याचें [9]गोढलें । †अंगत्राण होतें भलें । तेंही नावेक ढिलें । तेव्हां करी ॥ ७७ ॥ आणि [10]निवृत्ती ध्यानाचें [11]खांडें । तें दुजें नाहींचि पुढें । ह्मणूनि हात [12]आंसुडे । वृत्तीचाही ॥ ७८ ॥ जैसें रसौषध खरें । आपुलें काज करूनि पुरें । आपणही नुरे । तैसें होतसे ॥ ७९ ॥ देखोनि ‡ठाकिता-[13]ठावो । धांवता थिरावे पावो । तैसा ब्रह्मसामीप्यें [14]थावो । अभ्यास सांडी ॥ १०८० ॥ घडतां महोदधीसी । गंगा वेग सांडी जैसी । कां कामिनी कांतापासीं । §स्थिर होय ॥८१॥ ना ना फळतिये वेळे । केळीची वाढि [15]मोंडुळे । कां गांवापुढें वळे । मार्ग जैसा ॥ ८२ ॥ तैसा आत्मसाक्षात्कार । होईल देखोनि गोचर । ऐसा साधनहतियेर [16] । हळूचि ठेवी ॥ ८३ ॥ ह्मणौनि ब्रह्मेंसी तया । ऐक्याचा [17]समो धनंजया । होतसे तैं उपाया । वोहटं [18]पडे ॥ ८४ ॥ मग वैराग्याची [19]गोंधळुक । जे ज्ञानाभ्यासाचें [20]वोंधक्य । योगफळाचाही [21]परिपाक । दशा जे कां ॥ ८५ ॥ ते शांति पैं गा ¶[22]सुभगा । संपूर्ण ये तयाचिया आंगा । [ब्रह्मभूयाय कल्पते] तैं ब्रह्म होआवयाजोगा । होय तो पुरुष ॥ ८६ ॥ पुनवेहुनि चतुर्दशी । जेतुलें उणेंपण शशी । कां $[23]सोळेया [24]ऊनि जैसी । पंधरावी [25]वोंनी ॥ ८७ ॥ सागरींही पाणी वेगें । संचरे तें रूप गंगे । येर निश्चळ जें उगें । तें समुद्र जैसा ॥ ८८ ॥ ब्रह्मा आणि ब्रह्महोतिये । योग्यते तैसा [26]पांड आहे । तेचि शांतीचेनि ||लाहे । हातें तो गा ॥ ८९ ॥ पैं [27]तेंचि होणेनवीण । [28]प्रतीती आलें जें ब्रह्मपण । ते [29]ब्रह्महोती जाण । योग्यता येथ ॥ १०९० ॥

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥ ५४ ॥

[ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा] ते ब्रह्मभावयोग्यता । पुरुष तो मग पंडुसुता । आत्मबोध

---

* झळंबत. † आंगीं त्राण होतें भरलें. ‡ ठाकिजतां. § मंथर होय. ¶ सुभग. $ सोळें पाऊनि. || लवलाहें । होय तें गा.

१ आनंदित, गुंडाळित. २ साम्यतेनें. ३ निमित्तानें. ४ प्राप्त होत नाहीं. ५ दुसरेपणानें. ६ वेष्टून. ७ कधीं. ८ फेडिली. ९ शत्रुसमुदाय. १० सहज. ११ योगरूप घोडा. १२ अंगावर बळकट घातलेलें. १३ कवच. १४ वधी. १५ खड्ग. १६ झुगारी. १७ विश्रांतिस्थान. १८ पाय स्थिर होतो. १९ बळ. २० सरे, कुंठे. २१ शस्त्र. २२ समय. २३ तूट. २४ मावळती वेळ. २५ वृद्धपणा. २६ परिणाम. २७ ऐश्वर्यवंता. २८ उणी. २९ कस. ३० साम्य. ३१ तें ब्रह्म झाल्यावांचून ब्रह्मपणा जो प्रतीतीस येतो ती ब्रह्म होण्याची योग्यता. ३२ ब्रह्म होण्याची.

प्रसन्नता । पदीं बैसे ॥९१॥ जेणें निपजे रससोय । तो *तापही जैं जाय । तौं तें[1] कां होय । प्रसन्न जैसी ॥ ९२ ॥ ना ना भरतिया[2] लगबगा । शरत्काळीं सांडिजे गंगा । कां गीत राहतां उपांगा[3] । वोहट पडे ॥ ९३ ॥ तैसा आत्मबोधीं उद्यम[4] । करितां होय जो श्रम । तोही †जेथें शम[5] । होऊनि जाय ॥ ९४ ॥ आत्मबोध ‡प्रशस्तीं[6] । हे तिये दशेची ख्याती । ते भोगीतसे महामती । योग्य तो गा ॥ ९५ ॥ [न शोचति न कांक्षति] तेव्हां आत्मत्वें शोचावें[7] । कांहीं पावावया कामावें । हें सरलें समभावें । भरितें तया ॥ ९६ ॥ [समः सर्वेषु भूतेषु] उदया येतां गभस्ती[8] । नाना नक्षत्रव्यक्ती[9] । हारवीजती दीप्ती । आंगिकां[10] जेवीं ॥ ९७ ॥ तेविं उठतिया आत्मप्रथा[11] । हे भूतभेदव्यवस्था । मोडीत मोडीत पार्था । वास[12] पाहे तो ॥ ९८ ॥ पाटियेवरील अक्षरें । जैसीं पुसतां[13] येती करें[14] । तैसीं हारपती भेदांतरें । तयाचिये दृष्टी ॥ ९९ ॥ §तैसेनि अन्यथाज्ञानें[15] । जियें घेपती[16] जागरस्वप्नें । तियें दोन्हीं केलीं लीनें । अव्यक्तामाजि[17] ॥ ११०० ॥ मग तेंही अव्यक्त । बोध वाढतां झिजत । पुरलां[18]-बोधीं समस्त । बुडोनि जाय ॥ १ ॥ जैसी भोजनाच्या व्यापारीं । क्षुधा जिरत जाय अवधारीं । मग तृप्तीच्या अवसरीं[19] । नाहींच होय ॥ २ ॥ नाना चालीचिया वाढी । वाट होत जाय थोडी । मग पातलाठायीं बुडी । देऊनि निमे[20] ॥ ३ ॥ कां जागृती जंव उदीपे[21] । तंव तंव निद्रा हारपे । मग जागीनलियां स्वरूपें । नाहींच होय ॥ ४ ॥ हें ना आपुलें पूर्णत्व भेटे । जेथ चंद्रासी वाडी खुंटे । तेथ शुक्लपक्ष आटे । निःशेष जैसा ॥ ५ ॥ तैसा बोध्यजात[22] गिळित । बोधबोधें ये मजआंत । मिसळला तेथ साद्यंत । अबोध[23] गेला ॥ ६ ॥ [मद्भक्ति] तेव्हां कल्पांताचिये वेळे । नदी सिंधूचे पेंडवळें[24] । मोडुनि भरिलें जळें । ओंब्रह्म जैसें ॥ ७ ॥ ना ना गेलिया घट मठ । आकाश ठाके एकवट । कां जळोनि काष्ठें काष्ठ । वन्हीचि होय ॥ ८ ॥ ना तरि लेणियांचे[25] ठसे । आटोनि गेलिया मुसे[26] । नामरूपभेदें जैसें । सांडिजे सोनें ॥ ९ ॥ हेंही असो चेइलेया[27] । हें स्वप्न नाहीं जालया । मग आपणचि आपणयां । उरिजे जैसें ॥११९०॥ [लभते परां] तैसा मी एकवांचूनि कांहीं । तया तयाहीसकट नाहीं । हे चौथीभक्ति[28] पाहीं । माझी तो लाहे[29] ॥ ११ ॥ येर आर्त[30] जिज्ञासु[31] अर्थार्थी[32] । हे भजती जिये पंथीं । ते तिन्ही पावोनि चौथी । ह्मणिपत आहे ॥ १२ ॥

* अग्निही. † तेथें सम. ‡ प्रसक्तीं. § ऐसेनि.

१ रससोय. २ आपणास पूर्ण करण्याची लगबग. ३ मृंदगादि. ४ उद्योग. ५ शांत. ६ मोठेपण ७ शोक करावा. ८ इच्छावें. ९ सूर्य. १० आंगच्या. ११ आत्मानुभव. १२ वाट. १३ हाताने पुसतां येतात तशीं. १४ विपरीत ज्ञानानें. १५ घेतलीं जाती. १६ सूक्ष्मवृत्तींत. १७ पूर्ण बोधकाळीं. १८ समयीं. १९ नाश पावे. २० प्रकाश पावे. २१ सर्व बोध, सर्व ज्ञान. २२ अज्ञान. २३ बांध, मर्यादा. २४ ब्रह्मलोकापर्यंत. २५ अलंकार घडण्याचे छाप. २६ मुशींत. २७ जागें झाल्यावर. २८ शुद्धज्ञान. २९ लाभे. ३० पीडित. ३१ ज्ञानेच्छु. ३२ द्रव्येच्छु.

येन्हवीं तिजी ना चौथी । हे पहिली ना सरती[१] । पैं माझिये सहजस्थिती[२] । भक्ति नाम ॥ १३ ॥ जे नेणणें माझें[३], प्रकाशूनि । अन्यथात्वें[४] मातें दाऊनि[५] । सर्वही सर्वीं भेजौनि[६] । बुझावीतसे ॥ १४ ॥ जो जेथ जैसें पाहों बैसें । तया तेथ तैसेंचि असे । हें उंजियेडें[७] कां दिसे । अखंडें जेणें ॥ १५ ॥ स्वप्नाचें दिसणें न दिसणें । जैसे आपलेनि असलेपणें । विश्वाचें आहे नाहीं जेणें । प्रकाशें तैसें ॥ १६ ॥ ऐसा हा सहज माझा । प्रकाश जो कपिध्वजा । तो भक्तिया वोजा[८] । बोलिजे गा ॥ १७ ॥ ह्मणौनि आर्तांच्याठायीं[९] । हें आर्ति होऊनि पाहीं । अपेक्षणीय[१०] जें कांहीं । तें मीचि केला ॥ १८ ॥ जिज्ञासुपुढां[११] वीरेशा । हेचि होऊनि जिज्ञासा । मी कां *जिज्ञास्यु ऐसा । दाखविला ॥ १९ ॥ हेंचि होऊनि अर्थना । मींचि माझ्या अर्थी अर्जुना । करूनि अर्थाभिधाना[१२] । आणी मातें ॥ ११२० ॥ एवं घेऊनि अज्ञानातें । माझी भक्ति जे हे वर्ते । ते दावी मज द्रष्टयातें[१३] । दृश्य करूनि ॥ २१ ॥ येथें मुखचि दिसे मुखें । या बोला कांहीं न चुके । परि दुजेपण हें लटिकें । आरिसा करी ॥ २२ ॥ दिठी चंद्रचि घे साचें । परि येतुलें[१४] हें तिमिरांचें[१५] । जे एकचि असे तयाचे । दोनी दावी ॥ २३ ॥ तैसा सर्वत्र मीचि मियां । घेपतसें[१६] धनंजया । परि दृश्यत्व हें वायां । अज्ञानवशें ॥ २४ ॥ तें अज्ञान आतां फिटलें । माझें द्रष्टृत्व[१७] मज भेटलें । निजबिंबीं एकवटलें । प्रतिबिंब जैसें ॥ २५ ॥ पैं जेव्हांही असें किडाळ[१८] । तेव्हांही सोनेंचि अढळ[१९] । परि तें कीड[२०] गेलिया केवळ । उरे जैसें ॥ २६ ॥ हांगा पूर्णिमे आधीं कायी । चंद्र सांवयव[२१] नाहीं । परि तिये दिवसीं भेटेपाहीं । पूर्णता तया ॥ २७ ॥ तैसा मीचि †ज्ञानद्वारें । दिसें परि हेस्तांतरें[२२] । मग दृष्टत्व तें सरे । मियांचि मी लाभें ॥ २८ ॥ ह्मणौनि दृश्यपथा । अतीत माझ्या पार्था । भक्तियोगें[२३] चवथा । ह्मणीतला गा ॥ २९ ॥

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् ॥ ५५ ॥

[भक्तया] इया ज्ञान भक्ती सहज । भक्त एकवटला मज । तो मीचि केवळ हें तुज । श्रुतही आहे ॥ ११३० ॥ जे उभऊनियां भुजा । ज्ञानिया तो आत्मा माझा । हें बोलिलों कपिध्वजा । समाध्यायीं[२४] ॥ ३१ ॥ ते हे केलेपादि[२५] भक्ति मियां । श्रीभागवतमिषें ब्रह्मया । उत्तम ह्मणौनि धनंजया । उ-

---

* जिज्ञासु. † अज्ञानद्वारें.

---

१ शेवटली. २ ब्रह्मरूप स्थिति. ३ अज्ञान. ४ अन्य प्रकारें. ५ भजवून. ६ समजावीत आहे. ७ प्रकाशानें. ८ भक्तीच्या रीतीनें. ९ पीडिताच्या. १० इच्छा करण्यास योग्य. ११ ज्ञानेच्छु. १२ अर्थादिक यां नांवांस. १३ सर्वसाक्षीला. १४ एवढें. १५ नेत्ररोगाचें. १६ घेतला जातों. १७ साक्षीरूपत्व. १८ डाकलग. १९ स्थिर. २० मूर्तिमंत. २१ उपाधीच्या योगानें हाताच्या अंतरानें. २२ ज्ञान. २३ 'ज्ञानी त्वात्मैव मे मतं' श्लो० १८ यांत. २४ जग निर्माणापूर्वी.

पदेशिली ॥ ३२ ॥ ज्ञानी इयेतें स्वसंविति । शैवें ह्मणती शक्ति । आह्मी परम भक्ति । आपली ह्मणों ॥ ३३ ॥ [मामभिजानाति] हे मज*मिळतिये वेळे । तयां कर्मयोगियां फळे । मग समस्तही निखिळें । मियांचि भरे ॥ ३४ ॥ तेथ वैराग्य विवेकेंसी । आंटे बंध मोक्षेंसी । वृत्ती तये अवृत्तीसी । वुडोनि जाय ॥ ३५ ॥ घेऊनि ऐलपणातें । पैरत्व हारपे जेथें । गिळूनि चान्ही भूतें । आकाश जैसें ॥ ३६ ॥ तया परि † थडथांद । साध्यसाधनातीत शुद्ध । तें मी होऊनि एकवद । भोगितो मातें ॥३७॥ घडोनि सिंधूचिया आंगा । सिंधूवरी तळपे गंगा । तैसा पोंड तया भोगा । आवधारी जो ॥ ३८ ॥ कां आरिसयासि आरिसा । ‡उठूनि दाविलिया जैसा । देखणा अतिशय तैसा । भोगणा तिये ॥ ३९ ॥ हें असो दर्पणें नेलिया । तो मुखबोधही गेलिया । देखलेंपण एकलेया । आस्वादिजे जेविं ॥ ११४० ॥ चेइलेया स्वप्न नाशे । आपलें ऐक्यचि दिसे । तें दुजेनवीण जैसें । भोगिजे कां ॥ ४१ ॥ §तेंचि जालिया भोग तयाचा । न घडे हा भाव जयांचा । तिहीं बोले केविं बोलाचा । उच्चार कीजे ॥ ४२ ॥ [यावान्] तयांच्या नेणो गांवीं । रवीं प्रकाशी हन दिवी । कीं व्योमालागीं मांडवी । उभिली तिहीं ॥ ४३ ॥ हां गा ¶राजनत्व नव्हतां आंगीं । रावो रायपण काय भोगी । कां आंधार हन आलिंगी । दिनकरातें ॥ ४४ ॥ आणि आकाश जें नव्हे । तया आकाश काय ॥ जाणवे । रत्नाच्या रूपीं मिरवे । गुंजांचें लेणें ॥ ४५ ॥ ह्मणौनि मी होणें नाहीं । तया मीचि आहे कांही । मग भजेल हें कायी । बोलों कीर ॥ ४६ ॥ यालागीं तो कर्मयोगी । मी जोलाचि मातें भोगी । तारुण्य कां तरुणांगी । जियापरि ॥ ४७ ॥ तरंगें सर्वांगीं तोय चुंबी । प्रभा सर्वत्र विलसे बिंबीं । ना ना अवकाश नभीं । लुंठतें जैसा ॥ ४८ ॥ तैसा रूप होऊनि माझें । मातें क्रियावीण तो भजे । $घनाकार कां सहजें । सोनयाते जेविं ॥ ४९ ॥ कां चंदनाची द्रुती जैसी । चंदनीं भजे अपैसी । कां अकृत्रिम शशीं । चंद्रिका ते ॥ ११५० ॥ तैसी क्रिया कीर न साहे । तन्हीं अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचिजोगें नव्हे ।

---

* मिसळतिये. † थडथाद. ‡ उठोनि. § तेचि. ¶ राजत्व. ‖ जाणावें. $ अलंकार.

---

१ स्वकीय ज्ञानकला. २ शिवोपासक. ३ ही भक्ति ते कर्मयोगी जेव्हां माझ्यार्शी ऐक्य पावतात तेव्हां त्यांस सफल होते. ४ लय पावे. ५ येरझारा. ६ त्वंपद. ७ तत्पद. ८ शुद्धस्वरूप कूटस्थ, ब्रह्म तटस्थ, उदासीन. ९ एकस्वरूप. १० शोभे. ११ पदवी. १२ पाहतां. १३ आरसा. १४ जागृतास. १५ तेंच झाला ह्मणजे त्याचा भोग घडत नाहीं असा ज्यांचा भाव आहे ते बोलानेंच बोलाचा कसा उच्चार करतात. १६ त्या प्रकाशकारांच्या गांवीं प्रकाश पाडण्यास रवि दिवा आहे असें वाटतें. १७ आकाशासाठीं मांडव. १८ उभारली. १९ राजेपणा. २० सूर्याला. २१ कोठें. २२ मद्रूप होऊन. २३ लाट. २४ पोकळी. २५ लोळे. २६ लगड. २७ सुवास. २८ साहजिक.

बोलाऐसें ॥ ५१ ॥ तेव्हां पूर्वसंस्कारछंदें । जें कांहीं तो अनुवादे । तेणें आळविलेनि *वो दें । बोलता मीचि ॥ ५२ ॥ बोलतया †बोलताचि भेटे । तेथें बोलेल हें न घटे । तें मौन तंव गोमटें । स्तवन माझें ॥ ५३ ॥ ह्मणौनि तया बोलतां । बोली बोलता मी भेटतां । मौन होय तेणें तत्त्वता । स्तवितो मातें ॥ ५४ ॥ तैसेंचि बुद्धी कां दिठी । जें तो देखों जाय किरीटी । तें देखणें दृश्य लोटी । देखतेंचि दावी ॥ ५५ ॥ आरिसया आधीं जैसें । देखतेंचि मुख दिसे । तयाचें देखणें तैसें । मेळवी द्रष्टें ॥ ५६ ॥ दृश्य जाउनियां द्रष्टें । द्रष्ट्यासिचि जैं भेटे । तैं एकलेपणें न घटे । द्रष्टेपणही ॥ ५७ ॥ तेथ स्वप्नींचिया प्रियेंा । चेवोनि झोंबों गेलिया । ठायिजे दोन्हीं न होनियां । आपणचि जैसें ॥ ५८ ॥ कां दोहीं काष्ठांचिये घृष्टी । माजी वन्हि येक उठी । तो दोन्हीं हे भोष आटी । आपणचि होय ॥ ५९ ॥ ना ना प्रतिबिंब हातीं । घेऊं गेलियां गभस्ती । बिंबताही असती । जाय जैसी ॥ ११६० ॥ तैसा मी होऊनि देखतें । तो घेऊं जाय दृश्यातें । ‡तेथ दृश्य ने थितें । द्रष्टृत्वेंसी ॥ ६१ ॥ रवि आंधार प्रकाशिता । नुरेचि जेविं प्रकाश्यता । तेविं दृश्यीं नाहीं द्रष्टता । मी जालिया ॥ ६२ ॥ मग देखिजे ना न देखिजे । ऐशी जे दशा निपजे । ते तें दर्शन माझें । सांचोकारें ॥ ६३ ॥ तें भलतयाही किरीटी । पदार्थांचिया भेटी । द्रष्टृदृश्यातीता §दिठी । भोगितो सदा ॥ ६४ ॥ [यश्चास्मि] आणि आकाश हें आकाशें । दाटलें न ढळे जैसें । मियां आत्मेन आपणपें तैसें । जालें तया ॥ ६५ ॥ कल्पांतीं उदक उदकें । रुंधिलियां वाहों ठाके । तैसा आत्मेनि मियां येकें । कोंदला तो ॥ ६६ ॥ पावो आपणपयां ¶वोळघे । केविं वन्हि आपणपयां लागे । आपणपां पाणी रिघे । स्नाना कैसें ॥ ६७ ॥ ह्मणोनि सर्व मी जालेपणें । ठेलें तया येणें जाणें । तेंचि गा यात्राकरणें । अद्वया मज ॥ ६८ ॥ पैं जळावरील तरंग । जरी धाविन्नला सवेग । तरी नाहीं भूमिभाग । क्रमिला तेणें ॥ ६९ ॥ जें सांडावें कां मांडावें । जें चालणें जेणें चालावें । तें तोयचि ऐक आघवें । ह्मणोनियां ॥ ११७० ॥ गेलियाही भलतेउता । उदकपणें पंडुसुता । तरंगाची एकात्मता । न मोडेचि जेविं ॥ ७१ ॥ तैसा मीपणें $हा लोटला । तो आघवेयाचि मज

* वोदे, वादें । बोलांत. † बोलांतचि. ‡ तेविं दृश्य. § दिठी. ¶ वळघे. $ हालों ठेला.

१ पूर्वपुण्यबलानें. २ बोले. ३ विनविल्यानें, हाक मारतांच मी ओ देतों. ४ दृष्टीनें. ५ पलीकडे सारी. ६ पाहणारास. ७ पतीला. ८ जागून होऊन. ९ भेटण्यास. १० घर्षणानें. ११ बोलणें संपलें. १२ सूर्य. १३ मूळ असणारें नेतें. १४ प्रकाशकपणा. १५ खरेपणानें. १६ प्रतिबंध केला असतां. १७ भरला. १८ उलंघे. १९ केवढाही.

आला । या यात्रा होय भला । कापडी माझ्या ॥ ७२ ॥ [ततो मां] आणि शरीर स्वभाववशें । कांहीं येक करूं जरी बैसे । तरि मीचि तो तेणें मिषें । भेटें तया ॥ ७३ ॥ तेथ कर्म आणि कर्ता । हें जाऊनि पंडुसुता । मियां आत्मेनि मज पाहतां । मीचि होय ॥ ७४ ॥ पैं दर्पणातें दर्पणें । पाहिलिया होय न पाहाणें । सोनें झांकिलिया सुवर्णें । न झांके जेविं ॥ ७५ ॥ दीपातें दीपें प्रकाशिजे । तें न प्रकाशणेंचि निपजे । तैसें कर्म मियां कीजे । तें करणें कैचें ॥ ७६ ॥ कर्महीं करितांचि आहे । जैं करावें हें भाष जाये । *तैं न करणेंचि होये । तयाचें केलें ॥ ७७ ॥ क्रियाजात मीं जालेपणें । घडे कांहींचि न करणें । तयाचि नांव पूजणें । खुणेचें माझें ॥ ७८ ॥ ह्मणौनि करि तयाही वोजा । तें न करणें हेंचि कपिध्वजा । निपजे तिया महापूजा । पूजी तो मातें ॥ ७९ ॥ एवं तो बोले तें स्तवन । तो देखे तें दर्शन । अद्वया मज गमन । तो चाले तेंचि ॥ ११८० ॥ तो करी तेतुली पूजा । तो कल्पी तो जप माझा । तो जिजे तेचि कपिध्वजा । समाधी माझी ॥ ८१ ॥ जैसें कैंकेंसीं कांकणें । असिजे अनन्यपणें । तो भक्तियोगें येणें । मजसीं तैसा ॥ ८२ ॥ उदकीं कल्लोळ । कापुरीं परिमळ । रत्नीं उंजाळ । अनन्य जैसा ॥ ८३ ॥ किंबहुना तंतूसीं पट । कां मृत्तिकेसीं घट । तैसा तो येकवट । मजसीं माझा ॥ ८४ ॥ इया अनन्यसिद्धा भक्ती । या आघवाचि दृश्यजातीं । मज आपणपें या सुमती । द्रष्टयातें जाणे ॥ ८५ ॥ तिन्ही अवस्थांचेनिद्वारें । उपाध्युपहिताकारें । भावाभावरूप स्फुरे । दृश्य जें हें ॥ ८६ ॥ तें हें आघवेंचि मी द्रष्टा । ऐसिया बोधाचा माजिवटा । अनुभवाचा सुभटा । धेंडा तो नाचे ॥ ८७ ॥ [तत्त्वतः] रज्जु दोर जालिया गोचर । आभासतां तो व्याळाकार । रज्जूच ऐसा निर्धार होय जेविं ॥ ८८ ॥ भांगारापरतें कांहीं । लेणें गुंजहीभरी नाहीं । हें आटुनियां ठायीं । कीजे जैसें ॥ ८९ ॥ उदका येकापरतें । तरंग नाहींचि हें निरुतें । जाणोनि तया आकारातें । न धेपे जेविं ॥ ११९० ॥ ना तरि †स्वप्नविकार समस्ता । चेउनियां उमाणें घेतां । तो आपणया परौता । न-दिसे जैसा ॥ ९१ ॥ तैसें जें कांहीं आथि नाथी । तेणें होय ज्ञेयस्फूर्ती । तें ज्ञाताचि मी हे प्रतीती । होऊनि भोगी ॥ ९२ ॥ [ज्ञात्वा] ‡जाणे अज मी अजर । अक्षय मी अक्षर । अपूर्व मीं अपार । आनंद मी ॥ ९३ ॥

* ऐसेनि. † स्वप्नविकारा. ‡ मग जाणें.

१ यात्रेकरू. २ आत्मत्वानें. ३ कर्ताच. ४ त्याचेंच नांव. ५ रीतीनें. निमित्तानें. ६ सुवर्णार्थी कंकणानें. ७ चकचकाट. ८ या अद्वैतभक्तीनें. ९ जागृति, स्वप्न, सुषुप्ती. १० माया शरीर या उपाधीच्या योगानें, उपाधीनें केलेला जो आकार त्याणें. ११ सोहळा. १२ दोर. १३ सोन्याहून. १४ एकत्र. १५ खरें. १६ उठून. १७ माप. १८ आहे व नाहीं अशा स्थितीनें. १९ जाणावयाच्या पदार्थाचें स्फुरण. २० उत्पन्न न होणारा. २१ वृद्धपणरहित. २२ नाशरहित. २३ अविनाश. २४ ज्याच्या पूर्वी कांहीं नाहीं असा.

[1]अचळ मी [2]अच्युत । [3]अनंत मी अद्वैत । [4]आद्य मी [5]अव्यक्त । व्यक्तही मी ॥९४॥ *[6][7]ईशित्व मी ईश्वर । अनादि मी अमर । अभय मी आधार । [8]आधेय मी ॥ ९५ ॥ [9]स्वामी मी सदोदित । सहज मी सतत । सर्व मी सर्वगत । [10][11]सर्वातीत मी ॥ ९६ ॥ नवा मी [12]पुराणु । [13]शून्य मी संपूर्ण । अस्थूळ [14]अनणु । जें कांहीं तें मी ॥ ९७ ॥ [15]अक्रिय मी एक । असंग मी अशोक । व्याप्त मी व्यापक । पुरुषोत्तम मी ॥ ९८ ॥ [16]अशब्द मी अश्रोत्र । अरूप मी अगोत्र । सम मी स्वतंत्र । ब्रह्म मी पर ॥ ९९ ॥ ऐसें आत्मत्वें मज एकातें । इया अद्वयभक्ती जाणोनि [17]निरुतें । आणि याहि बोधा जाणतें । तेंही मीचि जाणे ॥ १२०० ॥ पैं चेइलेर्यानंतरें । आपुलें एकपण उरे । तेंही तयावरी स्फुरे । तयाशींचि जैसें ॥ १ ॥ कां [19]प्रकाशतां अर्कें । तोचि होय प्रकाशक । तयाही [20]अभेदा द्योतक । तोचि जैसा ॥ २ ॥ तैसा वेद्यांच्या[21] विलयीं । केवळ [22]वेदक उरे पाहीं । तेणें जाणवे तया तेंही । हेंही जो जाणे ॥ ३ ॥ तया अद्वयपणा आपुलिया । जाणती [23]ज्ञेसी जे धनंजया । ते ईश्वरचि मी हे तया । बोधासि ये ॥ ४ ॥ [विशते तदनंतरं] मग द्वैताद्वैतातीत । मींचि आत्मा एक निभ्रांत । हें जाणोनि जाणणें जेथ । अनुभवीं रिघे ॥ ५ ॥ तेथ चेइलेयां[24] येकपण । दिसे जें आपुलया आपण । तेंही जातां नेणों कोण । होइजे जेविं ॥ ६ ॥ कां डोळां देखतिये क्षणीं । स्वरूपप्रभ सुवर्णीं । [25]नाटितां होय आटणी । अळंकाराचीही ॥ ७ ॥ ना ना [26]लवण तोय होये । मग क्षारता तोयत्वें राहे । तेही जिरतां जेविं जाये । जालेपण तें ॥ ८ ॥ तैसा मी तो हें जें असे । तें [27]स्वानंदानुभवसमरसें । कालवूनियां प्रवेशे । मजचिमाजि ॥ ९ ॥ [तत्त्वतः] आणि तो हे [28]भीष जेथ जाये । तेथें †मी हें कोण्हासी आहे । ऐसा[29] मी ना तो तिये [30]सोमाये । माझ्याचि रूपीं ॥ १२१० ॥ ‡तेव्हां कापुर जळों सरे । तयाचि नाम अग्नि [31]पुरे । मग [32]उभयातीत उरे । आकाश जेविं ॥ ११ ॥ कां [33]धांडिलिया एका

* ईश. † मीपण. ‡ जेव्हां.

१ चलन न पावणारा. २ पतित न होणारा. ३ अंतरहित. ४ पहिला. ५ निराकार, अस्पष्ट. ६ ईशितव्य. ७ समष्टिरूप, जीवधर्मरहित. ८ ज्या आधारावर सर्व ठेवलें जातें तें. ९ अधिपति. १० चेतनाचेतनांत भरून असणारा. ११ सर्वांच्या पलीकडे. १२ जुना. १३ अभावरूप. १४ अणूहून भिन्न. १५ क्रियारहित. १६ 'अशब्दमस्पर्शमरूपमव्ययं' या श्रुतीनें प्रतिपाद्य. १७ सत्यतेनें. १८ जागृतीनंतर. १९ सूर्यच आपणाला प्रकाशक करतो असा जो अभेद त्यालाही जसा सूर्यच प्रकाशक तसा. २० जाणण्यायोग्य पदार्थाच्या नाशानंतर. २१ ज्ञान. २२ ज्ञानकला. २३ दोहोंच्याही पलीकडे. २४ जागृतांस. २५ आटविल्यावांचून. २६ मीठ पाणी होऊन जातें. २७ पूर्णानंदाविर्भावानें. २८ शब्द. २९ असाच मी नाहीं व तोही नाहीं होऊन माझ्या स्वरूपीं मिळतो. ३० विझतो. ३१ अग्नि व कापूर यांहून भिन्न. ३२ एकांत एक वजा केला असतां बाकी शून्य.

एक । वाढे तो शून्यविशेख । तैसा आहे नाहींचा शेख । मीचि मग आथी ॥१२॥ तेथ ब्रह्म आत्मा ईश । यया बोला मोडे सौरस । न बोलणें याही पैसे । नाहीं तेथ ॥ १३ ॥ न बोलणेंही न बोलोनी । तें बोलिजे तोंड भरूनी । जाणिव नेणिव नेणोनी । जाणिजेतें ॥ १४ ॥ तेथ बुझिजे बोध बोधें । आनंद घेपे आनंदें । सुखवरी नुसधें । सुखचि भोगिजे ॥ १५ ॥ तेथ लाभ जोडला लाभा । प्रभा आलिंगिली प्रभा । विस्मय बुडाला उभा । विस्मयामाजी ॥ १६ ॥ शम तेथ *सामावला । विश्राम विश्रांती आला । अनुभव वेडावला । अनुभूतिपणें ॥ १७ ॥ किंबहुना ऐसें निखळ । मीपण जोडे तया फळ । सेवूनि वेली वेल्हाळ । कर्मयोगाची ते ॥ १८ ॥ पैं कर्मयोगा किरीटी । चक्रवर्तिच्या मुकुटीं । मी चिद्रत्न तें सांटोवाटीं । होय तो माझा ॥ १९ ॥ कीं कर्मयोगप्रासादाचा । कळस जो हा मोक्षाचा । तया वरील अवकाशाचा । उवावो जाला तो ॥ १२० ॥ ना ना संसार ओडवी । कर्मयोग वाट बरवी । जोडली ते मदैक्यगांवीं । पैठी जालीसे ॥ २१ ॥ हें असो कर्मयोगवोधें । तेणें †भक्तिचिद्रत्नें । मी स्वानंदोदधीवेगें । ठाकिला कीं गा ॥ २२ ॥ हा ठायवरी सुवर्मा । कर्मयोगीं आहे महिमा । ह्मणौनि वेळोवेळां तुह्मां । सांगतों आह्मीं ॥ २३ ॥ पैं देशें काळें पदार्थें । सांधूनि घेइजे मातें । तैसा नव्हे मी आयतें । सर्वांचें सर्वही ॥ २४ ॥ ह्मणौनि माझ्याठायीं । जोंचावें न लगे कांहीं । मी लाभें ‡इये उपायीं । साचचि गा ॥ २५ ॥ एक शिष्य एक गुरु । हा रूढला साच व्यवहारू । तो मत्प्राप्तिप्रकारू । जाणावया ॥ २६ ॥ अगा वसुधेच्या पोटीं । निधान सिद्ध किरीटी । वन्हि सिद्ध काष्ठीं । वोहां दूध ॥ २७ ॥ परि §लाभे तें असतें । तया कीजे उपायातें । येर सिद्धचि तैसा येथें । उपायीं मीं ॥ २८ ॥ हा फळवरी उपावो । कां पां प्रस्तावीतसे देवो । हें पुसतां तरि अभिप्रावो । येथिंचा ऐसा ॥ २९ ॥ जे गीतार्थाचें चांगावें । मोक्षोपायपर आ-

---

* शमावला. † भक्तीचि गंगे. ‡ तिये. § लाभेल.

१ अभिप्राय. २ अवकाश. ३ न बोलणेंही न बोलून मग तोंडभर बोललें जातें तसें जाणिव व नेणीव टाकून जाणलें जातें. ४ ज्ञानाज्ञान. ५ जाणावें. ६ सुखमय होऊन. ७ प्रभेनें, प्रकाशानें. ८ नवल, आश्चर्य. ९ विश्रांति पावला. १० संकोच पावला. ११ लाला कर्मयोगाची वेल्हाळ = सुंदर वेल सेविल्यानें मीपण = मी हेंच त्यास फळ मिळतें. १२ चैतन्य = ज्ञानरूपरत्न. १३ अदलाबदलीनें. १४ तो कर्मयोगी कर्मयोगप्रासादाचा = देवळाचा मोक्षरूप जो कळस त्यावरच्या आकाशाचा उवावो = प्रसर झाला. १५ अवकाश, प्रसर. १६ अरण्यांत. १७ माझ्यार्शी जें ऐक्य तद्रूप गांवांत. १८ प्रविष्ट. १९ भक्ति व ज्ञान एतद्रूप जी गंगा (या दोहींचा संगम). २० निजानंदरूप समुद्र. २१ एथपर्यंत. २२ मर्मज्ञा अर्जुना. २३ आपलासा करून. २४ शिणावें लागत नाहीं. २५ ह्या कर्मयोगानें. २६ पृथिवीच्या. २७ ऊधास (कांसेस). २८ असतें तेंच लाभतें, परंतु त्यास उपाय केला पाहिजे. २९ फलप्राप्तीपर्यंत. ३० चांगुलपण. ३१ मोक्षप्राप्ति विषयक.

घवें । आन शास्त्रोपाय कीं नव्हे । प्रमाणसिद्ध ॥ १२३० ॥ वारा आभाळचि फेडी[1] । वांचूनि सूर्यातें न घडी[2] । कां हात बाबुळी[3] धाडी । तोय न करी ॥ ३१ ॥ तैसा आत्मदर्शनीं आडळ[4] । असे अविद्येचा जो मळ[5] । तो शास्त्र येर निर्मळ[6] । मीं प्रकाशें स्वयें ॥ ३२ ॥ ह्मणौनि आघवींचि शास्त्रें । अविद्याविनाशाचीं पात्रें[7] । वांचोनि न होती स्वतंत्रें । आत्मबोधीं ॥ ३३ ॥ तया अध्यात्मशास्त्रांसीं[8] । जैं साचपणाची ये पुसी[9] । तै येइजे जया ठायासी[10] । ते हे गीता ॥ ३४ ॥ भानु भूषिता प्राचियां[11] । सतेजा दिशा आघविया । तैसी शास्त्रेश्वरा गीताया[12] । सनाथें[13] शास्त्रें ॥ ३५ ॥ हें असो येणें शास्त्रेश्वरें । मागां उपाय बहुवे[14] विस्तारें । सांगीतला जैसा[15] करें[16] । घेवों ये आत्मा ॥ ३६ ॥ परि प्रथमश्रवणासवें[17] । *अर्जुना विपायें[18] हें फावे[19] । हा भाव सकणवे[20] । धरूनि श्रीहरी ॥ ३७ ॥ तेंचि प्रमेयें[21] एकवेळ । शीर्ष्यीं होआवया अढळ । सांगतसे मुकुळ[22] । †मुद्रा आतां ॥ ३८ ॥ आणि ‡प्रसंग[23] गीता । §ठावही[24] हा संपता । ह्मणौनि दावी आद्यंता । एकार्थत्व ॥ ३९ ॥ ¶जे ग्रंथाच्या मध्यभागीं । नाना अधिकारप्रसंगीं । $निरूपण अनेगी[25] । सिद्धांतीं केलें ॥ १२४० ॥ तरि तेतुलेही[26] सिद्धांत । इये शास्त्रीं प्रस्तुत । हें पूर्वापर[27] नेणत । कोण्ही जैं मानी । ॥ ४१ ॥ तैं महासिद्धांताचा आवांका[28] । सिद्धांतकक्षा अनेका[29] । भिंडउनि आरंभ देखा । संपवीत असे ॥ ४२ ॥ येथ अविद्यानाश हें स्थळ । तेणें मोक्षोंपादन[30] फळ । या दोहीं केवळ । साधन ज्ञान ॥ ४३ ॥ हें इतुलेंचि नानापरी । निरूपिलें ग्रंथविस्तारीं । तें आतां ||दोही[31] अक्षरीं । अनुवादावें[32] ॥ ४४ ॥ ह्मणौनि उपेयही[33] हातीं । जोडिलया[34] उपायस्थिती । देव प्रवर्तले तें पुढती[35] । येणेंचि भावें ॥ ४५ ॥

---

* अर्जुनासि. † मुद्रेआंत. ‡ प्रसंगें. § ठावोही, हा ठायही. ¶ कीं. $ तेंचि निरूपण. || दों अक्षरीं.

---

१ निवारी. २ तयार करीत नाहीं. ३ शेवाळा, गोंडाळ दूर करी. ४ बंध. ५ अज्ञानाचा. ६ अज्ञान हरणारीं पात्रें, योग्य स्थलें.७ आत्मानात्मप्रतिपादक वेदांत शास्त्रांशीं. ८ जेव्हां खरोखर पुसण्याचें मनांत येई. ९ साह्य. १० पूर्वेस सूर्योदय होतांच. ११ प्रकाशमय. १२ शास्त्रांत श्रेष्ठ अशा या गीतेनें अन्य सर्व शास्त्रें सनाथें=समर्थ होतात. १३ बहुत. १४ आत्मा हस्तगत होईल असा. १५ नवविधभक्तींतील प्रथम जें श्रवण त्यावरावर. १६ कदाचित्. १७ प्राप्त होईल. १८ अभिप्राय. १९ दयेनें. २० तात्पर्य, सार. २१ संक्षिप्त स्वरूपानें, संक्षेपलक्षण, स्पष्ट लक्षण. २२ गीता हा प्रसंग व हें स्थान हीं दोनीही आतां संपण्यार्ची आहेत म्हणून. २३ आरंभापासून शेवटपर्यंत एकार्थता. २४ अनेक सिद्धांतांनीं. २५ तेवढेही सर्व. २६ पूर्वापार संगती ध्यानांत राहत नाहीं. २७ बळ. २८ सिद्धांताच्या युक्ति. २९ मिळवून. ३० मोक्षसंपादन. ३१ संक्षेपानें. ३२ पुनः बोलावें. ३३ उपायसाध्य, उपायानें साध्य होणारें. ३४ प्राप्त झालें असतां. ३५ पुनः.

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥ ५६ ॥

[सर्वकर्माण्यपि] मग ह्मणे गा सुभटा । तो कर्मयोगियां[1] निष्ठा । मी होउनी होय पैठा[2] । माझ्या रूपीं ॥ ४६ ॥ स्वकर्माच्या *चोखाळीं[3] । मज पूजा करूनि भली । तेणें प्रसादें आकळी । ज्ञाननिष्ठेतें ॥ ४७ ॥ ते ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे[4] । तेथ भक्ति माझी उल्हासे । तियेंा मजसीं समरसे[5] । सुखिया होय ॥ ४८ ॥ [मद्व्यपाश्रयः] आणि विश्वप्रकाशितया । †आत्मया मज आपुलिया । अनुसरे जो करूनियां । सर्वत्रैता हे ॥ ४९ ॥ सांडूनि आपला आडळ[6] । लवण आश्रयि जळ । कां हिंडोनि राहे निश्चळ । वायु व्योमीं[7] ॥ १२५० ॥ तैसा बुद्धी[8] वाचा कायें । जो मातें आश्रऊनि ठाये । [सदा कुर्वाणः] तो निषिद्धेंही विपायें[9] । कर्मे करू ॥ ५१ ॥ [मत्प्रसादादवाप्नोति] परि गंगेच्या संबंधीं[10] । ब्रिदी[11] आणि महा नदी । ऐक्य तेविं माझ्या बोधीं । शुभाशुभांसी ॥ ५२ ॥ कां बावनें[12] आणि धुरें[13] । हा निवाड तंवचि सरे । जंव न धेपती वैश्वानरें[14] । कवळूनि दोन्ही ॥ ५३ ॥ ना ना पांचिकें[15] आणि सोळें[16] । हें सोनया तंवचि आळें[17] । जंव परिस आंगमेळें । येकवटीना ॥ ५४ ॥ तैसें शुभाशुभ ऐसें । हें तंवचिवरी आभासे[18] । जंव येक न प्रकाशें । सर्वत्र मी ॥ ५५ ॥ अगा रात्रि आणि दिवो[19] । हा तंवचि द्वैतभावो । जंव न रिगिजे गांवो । गभस्तीचा[20] ॥ ५६ ॥ ह्मणौनि माझिया भेटी । तयाचीं सर्वकर्मे किरीटी । जाऊनि बैसे तो पाटीं[21] । सायुज्याच्या[22] ॥ ५७ ॥ [शाश्वतं पदमव्ययं] देशें काळें स्वभावें[23] । वेंचे जया न संभवे । तें पद माझें पावे । अविनाश तो ॥ ५८ ॥ किंबहुना पंडुसुता । मज आत्मयाची प्रसन्नता । लाहे तेणें नें[24] पविजता । लाभ कवण असे ॥ ५९ ॥

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः ।
बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥ ५७ ॥

[चेतसा सर्वकर्माणि] याकारणें गा तुवां इया । सर्व कर्मा आपुलिया । माझ्या स्वरूपीं धनंजया । संन्यास[25] कीजे ॥ १२६० ॥ परि तोचि संन्यास

---

* लाखोळी. † मज आत्मया.

---

१ या भावनेनें. २ प्रविष्ट. ३ चोख पुष्पांनीं. ४ हस्तगत होय. ५ भक्तीनें. ६ ऐक्य पावे, ७ पांचही कोशांत. ८ प्रतिबंध. ९ आकाशांत. १० कायावाचामनेंकरून. ११ क्वचित्. १२ ओहोळ. १३ भैलागिरी चंदन. १४ सामान्य काष्ठ. १५ हिनकट. १६ सोळांच्या दरायें. १७ आळ, अपवाद. १८ भासे, वाटे. १९ दिवस. २० सूर्याचा. २१ पदवीवर. २२ ब्रह्मांत लय पावणें. २३ नाश. २४ न पावण्याजोगा, अप्राप्य असें काय आहे. २५ त्याग.

वीरा । *[3]करणीयाचा झणें करा । आत्मविवेकीं [4]धीरा । चित्तवृत्ति हे ॥ ६१ ॥ [मयि] मग तेथें विवेकबळें । आपणपें कर्मावेगळें । माझ्या स्वरूपीं निर्मळें । देखिजेल सर्व ॥ ६२ ॥ [संन्यस्य] आणि कर्माची [5]जन्मभोये । प्रकृति जे कां आहे । ते [6]आपणयाहूनि बहुवे । देखसी दुरी ॥ ६३ ॥ तेथ प्रकृति आपणयां-। वेगळी नुरे धनंजया । रूपेंवीण कां छाया । जयापरी ॥ ६४ ॥ ऐसेनि प्रकृतिनाश । जालया कर्मसंन्यास । [7]सकारण ॥ ६५ ॥ [मत्परः] मग कर्मजात गेलया । मी आत्मा उरें आपणपयां । [बुद्धियोगमुपाश्रित्य] तेथ बुद्धि धापे करूनियां । पतिव्रता ॥ ६६ ॥ बुद्धि [8]अनन्य येणें योगें । मजमाजी जैं रिगे । [मच्चित्तः सततं भव] तैं चित्त [9]चैत्यत्यागें । मातेंचि भजे ॥ ६७ ॥ ऐसें चैत्यजातें सांडिलें । चित्त माझ्याठायीं जडलें । ठाके तैसें [10]वहिलें । सर्वदा करी ॥ ६८ ॥

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।
अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनंक्ष्यसि ॥ ५८ ॥

[मच्चित्तः] मग अभिन्ना इया सेवा । चित्त मियांचि भरेल जेव्हां । माझा प्रसाद जाण तेव्हां । संपूर्ण जाहाला ॥ ६९ ॥ [सर्वदुर्गाणि] तेथ सकळ दुःख-[11]धामें । भुंजीजेती जियें [12]मृत्युजन्में । तियें [13]दुर्गमेंचि सुगमें । होती तुज॥१२७०॥ सूर्याचेनि [14]सांवायें । डोळा [15]सांवाइला होये । तैं आंधाराचा आहे । [16]पाड तया ॥ ७१ ॥ [मत्प्रसादात्] तैसा माझेनि प्रसादें । जीवकण जयाचा उपमर्दे । तो संसाराचेनि [17]बोधे । [18]बांगुलें केविं ॥ ७२ ॥ [तरिष्यसि] ह्मणोनि धनंजया । तूं संसारदुर्गती यया । तरसील माझिया । प्रसादास्तव ॥ ७३ ॥ अथवा हन [19]अहंभावें । माझें बोलणें हें आघवें । कानामनाचिये [20]शिवें । नेदिसी टेंकों ॥ ७४ ॥ [अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि] तरि नित्यमुक्त अव्यय । तूं आहासि तें होवूनि [21]वांय । [विनंक्ष्यसि] देहसंबंधाचा घाय । [22]वोंजेल आंगीं ॥ ७५ ॥ जया देहसंबंधाआंत । [23]प्रतिपदीं आत्मघात । भुंजतां [24]उसंत । कहींच नाहीं ॥७६॥ येवढेनि [25]दारुणें । निर्मणेनवीण निमणें । पडेल जरी बोलणें । नेघसी माझें ॥ ७७ ॥

---

* करणीयेचा.

---

१ स्वधर्माचा. २ ठेवा. ३ जन्मभूमि. ४ स्वस्वरूपाहून. ५ आत्मस्वरूपाला. ६ कारणासहित. ७ सर्व कर्मसमुदाय. ८ घातली जाते. ९ द्वैतरहित. १० चित्ताचे चंचलादिक धर्मत्यागानें. ११ सत्वर. १२ दुःखाचीं स्थानें. १३ भोगिलीं जातात. १४ अवघड. १५ मदतीनें, साह्यानें. १६ साह्यभूत. १७ योग्यता, विशाद. १८ ज्याचा जीवकण=जीवांश उपमर्द=नासे किंवा नष्ट झाला. १९ पीडा पावेल. २० बुझावण्यानें. २१ अहंकारानें. २२ हट्टीस. २३ व्यर्थ. २४ आदळेल. २५ पावलोंपावलीं. २६ विसावा. २७ भयंकर. २८ न मरूनही मरणें. २९ घेत नाहींस.

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ ५९ ॥

[यदहंकारमाश्रित्य] *पथ्यद्वेषिया [1]पोषी ज्वर । कां दीपद्वेषिया अंधकार । विवेकद्वेषें अहंकार । पोषूनि तैसा ॥ ७८ ॥ स्वदेहा नाम अर्जुन । परदेहा नाम स्वजन । संग्रामा नाम मलिन । पापाचार ॥ ७९ ॥ इया मती आपुलिया । तिघां तीन नामें ययां । ठेऊनियां धनंजया । [न योत्स्य इति मन्यसे] न जुंझें ऐसा ॥ १२८० ॥ [मिथ्यैष व्यवसायस्ते] जीवामाजी [2]निष्टंकें । करिसी जो [3]आत्यंतिक । तो वायां धाडील नैसर्गिकें । [4]स्वभावचि तुझा ॥ ८१ ॥ आणि मी अर्जुन हे [5]आत्मिक । ययां वध करणें हें पातक । हे माया वांचूनि [6]तात्त्विक । कांहीं आहे ॥ ८२ ॥ आधीं जुंझार तुवां होआवें । मग जुंझावया शस्त्र घेयावें । कां न जुंझावया करावें । देवांगण ॥ ८३ ॥ ह्मणौनि न जुंझणें । ह्मणसी तें वायाणें । ना मानुं लोकपणें । लोकदृष्टीही ॥ ८४ ॥ [प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति] तन्ही न जुंझें ऐसें । [10]निष्टंकिसी जें मानसें । तें प्रकृति [11]अनारिसें । करवीलचि ॥ ८५ ॥

स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥ ६० ॥

[स्वभावजेन कौंतेय] पैं पूर्व वाहतां पाणी । [12]पंव्हिजे पश्चिमेचे [13]वाहणी । तरि आग्रहचि †उरे तें आणी । आपुलिया लेखां ॥ ८६ ॥ कां साळीचा [14]कण ह्मणे । मी [15]नुगवें साळीपणें । तरी आहे आन करणें । [16]स्वभावासि ॥ ८७ ॥ [निबद्धः स्वेन कर्मणा] तैसा क्षात्र संस्कारसिद्धा । प्रकृती घडिलासि प्रबुद्धा । आतां नुठीं ह्मणसी हा धांदा । परि ‡उठविजसीचि तूं ॥ ८८ ॥ पैं शौर्य तेज दक्षता । एवमादिक पंडुसुता । गुण दिधले जन्मतां । प्रकृती तुज ॥८९॥ तरि तयाचिया [17]समवाया- । §अनुरूप धनंजया । न करितां [18]उगलियां । नयेल असों ॥ १२९० ॥ ह्मणौनियां तिहीं गुणीं । बांधलासि तूं कोदंडपाणी । त्रिशुद्धि [19]निघसी [20]वाहाणी । [21]क्षौत्राचिया ॥ ९१ ॥ [कर्तुं नेच्छसि यन्मोहात्] ना हें आपुलें जन्ममूळ । न विचारीतचि केवळ । न जुंझें ऐसें अढळ । व्रत जरी घेसी ॥ ९२ ॥ [करिष्यस्यवशोऽपि तत्] तरि बांधोनि हात पाये । जो रथीं घातला होये । तो न [22]चले तरी जाये । दिगंता जेवीं ॥ ९३ ॥ तैसा तूं

*. जैसा पथ्यद्वेषी ज्वर. † उरे परी तें. ‡ उठविसी. § आन रूप.

१ राखी. २ शेवटचा सिद्धांत. ३ अतिशय. ४ तुझा नैसर्गिक स्वभाव = क्षात्रधर्म. ५ आपले जन. ६ तत्वदृष्टीनें. ७ युद्धकर्ता. ८ मिथ्यानिश्चय, गंधर्वनगर. ९ व्यर्थ. १० निर्धारिसी. ११ निराळें. १२ पोहावें. १३ मार्गानुरूप. १४ पलीकडे, हिशोबास, मार्गास. १५ दाणा. १६ उगवणार नाहीं. १७ प्रकृतिभावास. १८ कारणानुरूप. १९ साहजिक. २० खरेपणानें. २१ मार्गास. २२ क्षत्रियस्वभावाच्या. २३ चालत नसला तरी.

आपुलियाकडूनी । मीं कांहींच न करीं ह्मणौनी । ठासी[1], परि भरंवसेनी । *तूंचि करिसी ॥ ९४ ॥ उत्तर[2] वैराटिंचा राजा । पळतां तूं कां निघालासि जुंझा । हा क्षात्रस्वभाव तुझा । जुंझवील तुज ॥ ९५ ॥ महावीर अकरा अक्षौहिणी । तुवां येकें नागविले[3] रणांगणीं । तो स्वभाव कोदंडपाणी । जुंझवील तूतें ॥ ९६ ॥ हां गा रोग कायी रोगिया । आवडे दरिद्र दरिद्रिया । परि भोगविजे बळिया । अदृष्टें[4] जेणे ॥ ९७ ॥ तें अदृष्ट अनारिसें[5] । न करील ईश्वरवशें । तो ईश्वरही असे । हृदयीं तुझ्या ॥ ९८ ॥

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।

भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ ६१ ॥

[सर्वभूतानां] सर्वभूतांच्या अंतरीं । हृदय[6] महाअंबरीं[7] । चिद्वृत्तीच्या सहस्त्रकरीं[8] । उदयला असे जो ॥ ९९ ॥ अवस्थात्रय[9] तिन्हीं लोक । प्रकाशूनि अशेष । अन्यथादृष्टि[10] पांथिक । चेवविले[11] ॥ १३०० ॥ वेद्योदेकाच्या[12] सरोवरीं । फांकतां विषय कल्हारीं[13]. इंद्रियषट्पदा[14]. चोरी[15] †जीवभ्रमरातें ॥ १ ॥ [ईश्वरः] असो रूपक हें तो ईश्वर । सकळ भूतांचा अहंकार । पांघरोनि निरंतर । उल्हासत असे ॥ २ ॥ [मायया] स्वमायेचें आडवस्त्र । लावूनि एकला खेळवी सूत्र । बाहेरी ‡नटी[16] छायाचित्र । चौऱ्यांसीं[17] लक्ष ॥ ३ ॥ तया ब्रह्मादिकीटांतां[18] । अशेषांही भूतजातां । देहाकार योग्यता । पाहोनि दावी ॥ ४ ॥ [यंत्रारूढानि] तेथ जें देह जयापुढें । अनुरूपपणें[19] मांडे । तें भूततया[20] आरूढे । हें मी ह्मणौनि ॥ ५ ॥ सूत सूतें गुंतलें । तृण तृणेंचि बांधलें । कां आत्मबिंबा घेतलें । बाळकें जळीं ॥ ६ ॥ तयापरी देहाकारें । आपणपेंचि दुसरें । देखोनि §जीव[21] आविष्करे । आत्मबुद्धी[22] ॥ ७ ॥ ऐसेनि शरीराकारीं । यंत्रीं भूतें अवधारीं । [भ्रामयन्] वाहूनि हालवी दोरी । प्राचीनाची[23] ॥ ८ ॥ तेथ जया जें कर्मसूत्र । मांडूनि ठेविलें स्वतंत्र । तें तिये गती पात्र । होंचि लागे

---

* तेंचि. † जीव भ्रमें रतें. ‡ नट. § जीवत्वें.

---

१ स्वस्थ राहासी. २ तूं गोग्रहणप्रसंगीं उत्तराचा सारथि जेव्हां झालास तेव्हां तो युद्धांतून पळत असतांही तूं मुद्दाम त्याला सारथि करून युद्ध केलेंस, हा तुझा क्षात्रधर्म तुझ्याकडून युद्ध करवील. ३ फसविलें, पराभूत केलें. ४ दुष्कृत संचित प्रारब्धानें. ५ वेगळें. ६ हृदयलक्षण महाकाशीं. ७ चैतन्यवृत्तिरूप हजारों किरणांनीं. ८ जागृती, स्वप्न, सुषुप्ति. ९ स्वर्ग, मृत्यु, पाताळ. १० विपरीत ज्ञानानें भुललेले जीव, वाटसरू. ११ जागृत केले. १२ जाणण्यास योग्य दृश्य वस्तुरूप जलाच्या. १३ कमळांनीं. १४ भ्रमराच्या धोरणानें. १५ चारतो. १६ सूत्रधाराची स्त्री. १७—२० लक्ष वृक्ष, ११ लक्ष कीटक, ३० लक्ष पशु, ९ लक्ष जलचर, १० लक्ष पक्षी, ४ लक्ष मनुष्ययोनी. मिळून एकंदर ८४ लक्ष योनी. १८ ब्रह्मयापासून कीडमुंगीपर्यंत. १९ योग्यतानुरूप. २० भूत असें होऊन. २१ प्रगटे. २२ तें मी नसून मीच अशा बुद्धीनें. २३ पूर्वकर्माची.

॥ ९ ॥ किंबहुना धनुर्धरा । भूतांतें स्वर्गसंसारा- । माजि भोंवडी तृणें वारा । आकाशीं जैसीं ॥ १३१० ॥ भ्रामकाचेनि संगें । जैसें लोहो वेढां रिगे । तैसीं ईश्वरसत्तायोगें । चेष्टती भूतें ॥ ११ ॥ जैसे चेष्टा आपुलालिया । समुद्रादिक धनंजया । चेष्टती चंद्राचिया । सन्निधी येकी ॥ १२ ॥ तया सिंधू भरितें दाटे । सोमकांता पाझर फुटे । कुमुदांचकोरांचा फिटे । संकोचु तो ॥ १३ ॥ तैसीं बीजें-प्रकृतिवशें । अनेकें भूतें येकें ईशें । चेष्टवीजतीं तो असे । [हृद्देशेऽर्जुन तिष्ठति] तुझ्या हृदयीं ॥ १४ ॥ अर्जुनपण न घेतां । मीं ऐसें जें पंडुसुता । उठतसे तें तत्वता । तयाचें रूप ॥ १५ ॥ यालागीं तो प्रकृतीतें । प्रवर्तवील हें निरुतें । आणि ते जुंझवील तूतें । न जुंझसी जन्ही ॥ १६ ॥ ह्मणोनि ईश्वर गोसावी । तेणें प्रकृति हे नेमावी । तियां सुखें रांबवावीं । इंद्रियें आपुलीं ॥ १७ ॥ तूं करणें न करणें दोन्ही । लाऊनि प्रकृतीच्या मांनीं । प्रकृतीही कां अधीनी । हृदयस्था जया ॥ १८ ॥

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥६२॥

[तमेव शरणं गच्छेति] तया अहं वाचा चित्त आंग । देऊनियां शरण रिग । महोदधी कां गांग । रिगालें जैसें ॥ १९ ॥ [तत्प्रसादात्परां शांतिं] मग तयाचेनि प्रसादें । सर्वोपशांतिप्रमदे । कांत होऊनियां स्वानंदें । स्वरूपींच रमसी ॥ १३२० ॥ [स्थानं प्राप्यसि शाश्वतं] संभूति जेणें संभवे । विश्रांति जेथें विसंवे । अनुभूतिही अनुभवे । अनुभवा जया ॥ २१ ॥ तिये निजात्मपदींचा रावो । होऊनि ठाकसी अव्ययो । ह्मणे लक्ष्मीनाहो । पार्था तूं ॥ २२ ॥

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ ६३ ॥

[इति] हे गीतानाम विख्यात । सर्ववेदाद्रयाचें मथित । आत्मा जेणें हस्तगत । रत्न होय ॥ २३ ॥ [ज्ञानमाख्यातं] ज्ञान ऐसीया रूढी । वेदांतें जयाची प्रौढी । वानितां कीर्ति चोखडी । पातली जगीं ॥ २४ ॥ बुद्ध्यादिकें डोळसें । हें जयाचें कां केंडवसें । मी सर्वद्रष्टाहि दिसें । पाहिला जया ॥ २५ ॥ [गुह्याद्गुह्यतरं] तें हें गा आत्मज्ञान । मज गोप्याचेंही गुप्त

१ इहपरलोकीं. २ लोहचुंबकाच्या. ३ वाटोळें फिरे. ४ व्यवहार करतात. ५ चंद्रविकासी कमलांला. ६ मिटलेपणा. ७ प्रकृतिबीजाच्यानें, 'यथा बीजं तथांकुरः' या न्यायानें बीजाच्या प्रकृत्यनुसार=बीजासारखीं. ८ ईश्वर. ९ खरें. १० प्रकृति. ११ इंद्रियस्वामी. १२ प्रकृतीनें. १३ चेष्टवावीं. १४ धोरणानें. १५ त्या हृदयस्थाला. १६ ज्या कायावाचामनांला मी ह्मणतोस. १७ गंगोदक. १८ शांतिस्त्रीचा. १९ उत्पत्ति. २० राहासी. २१ लक्ष्मीपति. २२ वेदांचें. २३ प्रसिद्धि. २४ वर्णितां. २५ आभास, परावर्तन, प्रतिबिंब. २६ उदय पावलेला.

धन । परि तूं ह्मणूनि आन । केविं करूं ॥ २६ ॥ [मया] याकारणें गा पांडवा । आह्मी आपला हा गुरु ठेवा । [ते] तुज दिधला कैणवा । जाकळिलेपणें ॥ २७ ॥ जैसी भुलली वोरसें । माय बोले *बाळा दोषें । प्रीति ही परी तैसें । न करूंचि हो ॥ २८ ॥ येथ आकाश आणि गाळिजे । अमृताही साली फेडिजे । कां दिव्याकरवीं करविजे । दिव्य जैसें ॥ २९ ॥ जयाचेनि अंगप्रकाशें । पाताळींचा परमाणु दिसे । तया सूर्याहि कां जैसें । अंजन सुदलें ॥ १३३० ॥ तैसें सर्वज्ञेंही मियां । सर्वही निर्धारूनियां । निकें होय तें धनंजया । सांगीतलें तुज ॥ ३१ ॥ [विमृश्यैतदशेषेण] आतां तूं ययावरी । निकें हें निर्धारीं । निर्धारूनि [यथेच्छसि तथा कुरु] करीं । आवडे तैसें ॥ ३२ ॥ यया देवाचिया बोला । अर्जुन उगाचि ठेला । तेथ देवो ह्मणती भला । अवंचक होसी ॥ ३३ ॥ वाढितया पुढें भुकेला । उंतरोधें ह्मणे धाला । तैं तोचि पीडे आपला । आणि दोषही तया ॥ ३४ ॥ तैसा सर्वज्ञ श्रीगुरु । भेटलिया आत्मनिर्धारू । न पुसिजे जैं आभारू । धरूनियां ॥ ३५ ॥ तैं आपणपेंचि वंचे । आणि पापही वंचनाचें । आपणयाचि साचें । चुकविलें तेणें ॥ ३६ ॥ पैं उगेपणा तुझिया । हा अभिप्रावो कीं धनंजया । जें एकवेळ आवांकुनियां । सांगावें ज्ञान ॥ ३७ ॥ तेथ पार्थ ह्मणे दातारा । भलें जाणसी माझिया अंतरा । हें ह्मणों तरी दुसरा । जाणता असे काई ॥ ३८ ॥ येर ज्ञेय हें जी आघवें । तूं ज्ञाता येकचि स्वभावें । मा सूर्य ह्मणौनि वानावें । सूर्यातें काई ॥ ३९ ॥ या बोला श्रीकृष्णें । ह्मणीतलें काय येणें । हेंचि थोडें गा वानणें । जें बुझितासि तूं ॥ १३४० ॥

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः ।
इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ॥ ६४ ॥

[शृणु मे परमं वचः] तरि अवधान पैंघळ। करूनियां आणी एकवेळ । वाक्य माझें निर्मळ । अवधारीं पां ॥ ४१ ॥ [सर्वगुह्यतमं भूयः] हें वाच्य ह्मणोनि बोलिजे । कां श्राव्य मग आथिकिजे । तैसें नव्हे परि तुझें । भाग्य बरवें ॥४२॥ कूर्मीचिया पिलियां । दिठी पान्हा ये धनंजया । आकाश वाहे बापियां । घरींचें पाणी ॥ ४३ ॥ जो व्यवहार जेथ न घडे । तयाचें फळचि तेथ जोडे ।

* बाळोद्देशें.

१ कृपेनें. २ व्याप्त झाल्यानें. ३ पान्ह्यानें. ४ आकाश गाळावें, अमृताच्या साली काढाव्या व प्रकाशानें प्रकाश करावा ह्या असंभवनीय गोष्टी, तसें असंभाव्यही मी सर्वज्ञानें निर्धारून इत्यादि १३३१ ओवीशीं संबंध. ५ काजळ घातलें. ६ खरें. ७ वंचना न करणारा—आपणाला ठकविणारा (इष्ट वस्तु कोणी देत असतां ती नको ह्मणणारा) असा होणार नाहींस. ८ भिडेनें. ९ तृप्त झालों. १० क्षुधेनें पीडा पावतो. ११ भय, भार. १२ आपणाला फसविलें ह्मणून त्याला वंचनाचें पापही लागतें. १३ पूर्णपणें. १४ जाणावयाचें. १५ समजलास. १६ विस्तारलेलें असें. १७ बोलण्यासारखें. १८ श्रवण करण्यास योग्य. १९ दृष्टीनचें. २० चातकाला.

काय दैवें न सांपडे । सानुकूळें ॥ ४४ ॥ येरवीं द्वैताची [१]वारी । सारूनि ऐक्याच्या [२]परिवरीं । भोगिजे तें अवधारीं । [३]रहस्य हें ॥ ४५ ॥ आणि [४]निरुपचारा प्रेमा । विषय होय जें प्रियोत्तमा । तें दुजें नव्हे कीं आत्मा । ऐसेंचि जाणावें ॥ ४६ ॥ [इष्टोऽसि मे] *आरिसाचिया देखिलया । गोमटें कीजे धनंजया । तें तया नोहे आपणयां । लागीं जैसें ॥ ४७ ॥ तैसें पार्था तुझेनि [५]मिषें । मी बोलें आपणयाचि †[६]दोषें । माझ्या तुझ्याठाईं असे । मीतूंपण गा ॥४८॥ ह्मणौनि जिव्हा[७]रींचें गुज । सांगतसें जीवासीं तुज । हें [८]अनन्य गतीचें मज । आथी [९]व्यसन ॥ ४९ ॥ [दृढमिति] पैं जळा आपणपें देतां । लवण भुललें पंडुसुता । कीं आघवें तयाचें होतां । न लजेचि तें ॥ १३५० ॥ तैसा तूं माझ्याठाईं । राखों नेणसीचि कांहीं । तरी आतां तुज काई । गोप्य मी करीं ॥५१॥ [ततो वक्ष्यामि ते हितं] ह्मणौनि आघवींचि गूढें । जें पाऊनि अति उघडें । तें गोप्य माझें चोखडें । वाक्य आइक ॥ ५२ ॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥ ६५ ॥

[मन्मना भव] तरि बाह्य आणि अंतरा । आपुलिया सर्व व्यापारा । मज व्यापकातें वीरा । विषय करीं ॥ ५३ ॥ आघवा आंगीं जैसा । वायू मिळोनि आहे आकाशा । तूं सर्व कर्मीं तैसा । मजसींचि असे ॥ ५४ ॥ किंबहुना आपुलें मन । करी माझें [१०]एकायतन । माझेनि श्रवणें कान । भरूनि घालीं ॥ ५५ ॥ आत्मज्ञानें चोखडीं । संत जे माझीं रूपडीं । तेथ दृष्टि पडो आवडी । कामिनी जैसी ॥ ५६ ॥ मीं सर्ववस्तीचें [११]वसौटें । माझीं नामें जियें चोखटें । तियें ‡जीवा[१२] यावया वाटे । वाचेचिये लावीं ॥ ५७ ॥ हाताचें करणें । कां पायांचें चालणें । तें होय मजकारणें । तैसें करीं ॥ ५८ ॥ [मद्याजी] आपुला अथवा [१३]परावा । ठायीं [१३]उपकरसी पांडवा । तेणें यज्ञें होयीं बरवा । याज्ञिक माझा ॥ ५९ ॥ [मद्भक्तः] हें येकैक शिकऊं काई । पैं [१४]सेवकै आपुल्याठाईं । उरऊनि येर सर्वही । मी सेव्यचि करीं ॥ १३६० ॥ [मां नमस्कुरु] तेथ जाऊनि भूतद्वेषु । सर्वत्र [१५]नमवै नम मीचि येकु । ऐसेनि आश्रय [१६]आत्यंतिकु । लाहसी तूं माझा ॥ ६१ ॥ [मामेवैष्यसि] मग भरलेया जगाआंत । जाऊनि §[तिजयाची मात] । होऊनि ¶ठायील एकांत । आह्मां तुह्मां ॥ ६२ ॥ तेव्हां भलतिये अवस्थे । मी तूतें तूं मातें । भोगिसी ऐसें आइतें । वाढेल [१७]सुखें

---

* दर्पणाचिये. † उद्देशें. ‡ जिव्हे यावया. § दुजयाची. ¶ ठाकेल.

---

१ निवारण. २ घरीं. ३ गुह्य, तात्पर्य. ४ आदरयुक्त प्रेमानें. ५ निमित्तानें. ६ आपल्या उद्देशानें. ७ अंतर्गत. ८ एकनिष्ठतेचें. ९ चटक. १० एक स्थान. ११ वसतिस्थान. १२ दुसऱ्याचा. १३ उपयुक्त होशी. १४ सेवकपणा मात्र आपले ठिकाणीं ठेवून बाकी सर्व. १५ नमोनमः. १६ अतिशय. १७ प्रेम.

॥ ६३ ॥ आणि तिजें [१]आडळ करितें । नि[२]मालें अर्जुना जेथें । तें मीचि ह्मणौनि तूं मातें । पावसी शेखीं ॥ ६४ ॥ जैसी जळींची प्रतिभा । जळनाशीं बिंबा । येतां गा[३]भागोभा । *कांहीं आहे ॥ ६५ ॥ पैं पवन अंबेरा । कां कल्लोळ सागरा । मिळतां [४]आडवारा । कोणाचा गा ॥ ६६ ॥ ह्मणौनि तूं आणि आह्मीं । हें दिसताहे दे[५]हधर्मीं । मग ययाच्या वि[६]रामीं । मीचि होसी ॥ ६७ ॥ [सत्यं ते] यया बोलामाझारीं । होय नव्हे [७]झणें करीं । येथ [८]आन आथी तरी । तुझीच आण ॥ ६८ ॥ [प्रतिजाने] पैं तुझी आण वाहणें । हें [९]आत्मलिंगातें शिवणें । [प्रियोऽसि मे] प्रीतीची जाति [१०]लोंजणें । आठवों नेदी ॥ ६९ ॥ येऱ्हवीं ~~बेडूनि मर्पंच~~ । जेणें वि[११]श्वाभास हा साच । [१२]ओझेचा नटनाच । काळातें जिणें [१३]॥१३७०॥ तो देव मी [१४]सत्यसंकल्प । आणि जगाच्या [१५]हितीं बाप । [१६]मां आणेचा [१७]आक्षेप । कां करावा ॥ ७१ ॥ परी अर्जुना तुझेनि [१८]वेधें । मियां देवपणाचीं [१९]बिरुदें । सांडिलीं गा मी हें [२०]ओंधें । सगळेनि तुवां ॥ ७२ ॥ पैं काजा आपुलिया । रावो आपली आपणया । आण वाहे धनंजया । तैसें हें कीं ॥ ७३ ॥ तेथ अर्जुन ह्मणे देवें । [२१]अचाट हें न बोलावें । जें आमचें काज नांवें । तुझेनि एकें ॥ ७४ ॥ यावरी सांगों बैससी । कां सांगतां [२२]भोंपही देसी । या तुझिया विनोदा[२३]सी । पार आहे जी ॥ ७५ ॥ कमळवना विकाशु । करी रवीचा येक [२४]अंशु । तेथ आघवाचि प्रकाशु । नित्य देतो ॥ ७६ ॥ पृथ्वी निवऊनि सागर । भरीजती येवढें थोर । वर्षे तेथ मिषां[२५]तरें । चातक कीं ॥ ७७ ॥ ह्मणौनि औ[२६]दार्या तुझेया । मज निमित्त ना ह्मणावया । प्राप्ति असे [२७]दोंनी-राया । कृपानिधी ॥ ७८ ॥ तंव देव ह्मणती राहें । या बोलाचा [२८]प्रस्ताव नोहे । पैं मातें पावसी उपायें । साचचि येणें ॥ ७९ ॥ सैं[२९]धवें सिंधू पडिलिया । जो क्षण †धनंजया । तेणें विरेचि कीं उरावया । कारण कायी ॥ १३८० ॥ तैसें सर्वत्र मातें भजतां । सर्व मी होतां अहंता । निःशेष जाऊनि तत्वता । मीचि होसी ॥ ८१ ॥ एवं माझिये [३०]प्रांतीवरी । कर्मालागोनि अवधारीं । दाविली तुज [३१]उजरी । उपायांची ॥ ८२ ॥ जे आधीं तंव पंडुसुता । सर्व कर्मे मज अर्पिता । सर्वत्र प्रसन्नता । लाहिजे माझी ॥ ८३ ॥ [३२]पोटीं माझ्या इये प्रसादीं । माझें ज्ञान जाय सिद्धी । तेणें मिसळिजे त्रि-

*केहीं. † क्षण राहे. ०वदनिलयंचु

१ प्रतिबंध. २ गेलें. ३ प्रतिबंध. ४ आकाशास. ५ लाटा. ६ अडचण. ७ निरनिराळ्या शरीरांनीं. ८ अभावसमयीं. ९ करूं नको. १० अन्यथा असेल तर. ११ आत्मस्वरूपाला. १२ लज्जा. १३ हें सर्व दृश्य जग. १४ वेदाज्ञेचा प्रताप. १५ जिंकी. १६ सफलसंकल्पी. १७ कल्याणाविषयीं. १८ त्यापेक्षां. १९ शंका. २० छंदानें. २१ चिन्हें. २२ अर्थे. २३ अद्भुत. २४ वचन. २५ मौजेस. २६ किरण. २७ निमित्तांतर. २८ उदारपणाला. २९ धर्मात्मराजा, महादात्मा. ३० प्रसंग. ३१ मीठ. ३२ प्राप्तीपर्यंत. ३३ स्पष्टता. ३४ पूर्वी.

शुद्धी । स्वरूपीं माझ्या ॥ ८४ ॥ मग पार्था तियेठाईं । साध्य साधन होय नाहीं । किंबहुना तुज कांहीं । उरेचिना ॥ ८५ ॥ तरि सर्व कर्में आपलीं । तुवां सर्वदा मज अर्पिलीं । तेणें प्रसन्नता लाधली । आजि हे माझी ॥ ८६ ॥ म्हणौनि येणें प्रसादवळें । नवे जुंझाचेनि आडळें । न ठाकेचि येकवेळे । भाळलों तुज ॥ ८७ ॥ *जें संप्रपंच अज्ञान जाये । जेणें येक मी गोचर होयें । तें उपपत्तीचेनि उपायें । गीतारूप हें ॥ ८८ ॥ मियां ज्ञान तुज आपुलें । नानापरी उपदेशिलें । येणें अज्ञानजात सांडवलें । धर्माधर्म जें॥ ८९ ॥

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।

अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ ६६ ॥

[सर्वधर्मान्परित्यज्य] आशा जैसी दुःखातें । व्याली निंदा दुरितें । हें असो जैसें दैन्यातें । दुर्भगत्व ॥ १३९० ॥ तैसें स्वर्गनरकसूचक । अज्ञान व्यालें धर्मादिक । तें सांडूनि घालीं अशेख । ज्ञानें येणें ॥ ९१ ॥ हातीं घेऊनि तो दोर । सांडिजे जैसा सर्पाकार । कां निद्रात्यागें धैराचार । स्वप्नींचा जैसा ॥ ९२ ॥ ना ना सांडिलेनि कवळें । चंद्रींचें घुपें पिवळें । व्याधित्यागें कडुवाळें । पण मुखाचें ॥ ९३ ॥ अगा दिवसा पाठी देउनी । मृगजळ घापे त्यजूनी । कां काष्ठत्यागें वन्ही । त्यजिजे जैसा ॥ ९४ ॥ तैसें धर्माधर्मांचें टेंवाळ । दावी अज्ञान जें कां मूळ । तें त्यजूनि त्यजीं सकळ । धर्मजात ॥९५॥ [मामेकं] मग अज्ञान निमालिया । मीचि येक असे †अपैसया । सनिद्र स्वप्न गेलयां । आपणपें जैसें ॥ ९६ ॥ तैसा मी एकवांचूनि कांहीं । मग भिन्नाभिन्न आन नाहीं । सोऽहंबोधें तयाच्या ठायीं । अनन्य होय ॥ ९७ ॥ [शरणं व्रज] पैं आपलेनि भेदेंविण । माझें जाणिजे जें एकपण । तयाचि नांव शरण । मज येणें गा ॥ ९८ ॥ जैसें घटाचेनि नाशें । गगनीं गगन प्रवेशे । मज शरण येणें तैसें । ऐक्य करी ॥ ९९ ॥ सुवर्णमणि सोनयां । ये कल्लोळ जैसा पाणियां । तैसा मज धनंजया । शरण ये तूं ॥ १४०० ॥ [अहं त्वा सर्वपापेभ्यः] वांचूनि सागराच्या पोटीं । वडवानळ शरण आला किरीटी । ‡जाळूं न ठके तया गोठी । वोळूनि दे पां ॥ १ ॥ मजही शरण रिघिजे । आणि §जीवत्वेंचि असिजे । धिग् बोलीं यिया न लेंजे । प्रज्ञा केवि ॥ २ ॥ अगा प्राकृताही राया । आंगीं पडे जें धनंजया । तें दोसिरूंहि कीं तया । समान

* जे प्रपंच. † धनंजया. ‡ जाळूनि. § जीवित्वेंचि.

१ प्राप्त झाली. २ अटकावानें. ३ तुझ्या स्वाधीन झालों. ४ प्रपंचासह. ५ साक्षात्. ६ युक्तीच्या. ७ पातकें. ८ दुर्दैवपणा. ९ सोडून दे. १० प्रपंच. ११ कावीळ रोगानें. १२ चांदणें. १३ कडवटपणा. १४ बंड. १५ नाश पावल्यावर. १६ निद्रेसह. १७ भिन्नाभिन्न जें द्वैत त्याच्याठाईं. १८ घटाकाश आकाशांत मिळतें. १९ टाकून दे. २० लाजत नाहीं. २१ यत्किंचित् राजाच्या. २२ बटकूर.

होय ॥ ३ ॥ मा मी विश्वेश्वर भेटें । आणि जीवग्रंथी[1] न सुटे । हे बोल नको वोखटे[2] । कानीं[3] लाऊं ॥ ४ ॥ ह्मणौनि मी होऊनि मातें । सेवणें आहे आयितें । तैसें करीं हाता येतें । ज्ञानें येणें ॥ ५ ॥ मग ताकौनियां[4] काढिलें । लोणी मोघौतें ताकीं घातलें । परि न घेपेचि कांहीं केलें[5] । तेणें जेविं ॥ ६ ॥ तैसें अद्वयत्वें मज । शरण रिघालिया तुज । धर्माधर्म हे सहज । लागतील ना ॥ ७ ॥ लोह उभें खाय माती[6] । तें परिसाचिये संगती । सोनें जालया पुढती[7] । न शिविजे मळें ॥ ८ ॥ हें असो काष्ठापासोनि । मथूनि घेतलया वन्ही । मग काष्ठेंही कोंडोनि । न[8] ठके जैसा ॥ ९ ॥ अर्जुना काय दिनकर । देखत आहे आंधार । कीं *प्रबोधीं[9] होय गोचर । स्वप्नभ्रम ॥ १४१० ॥ तैसें मजसीं येकवटलेया । मी सर्वरूप वांचूनियां । आन कांहीं उरावया । कारण असे ॥ ११ ॥ [मोक्षयिष्यामि] ह्मणौनि तयाचें कांहीं । चिंतीं[10] ना आपुल्याठाईं । तुझें पापपुण्य पाहीं । मीचि होईन ॥ १२ ॥ तेथ सर्वबंधलक्षणें[11] । पापें उरावें दुजेपणें । तें माझ्या बोधीं वायाणें[12] । होऊनि जाईल ॥ १३ ॥ जळीं पडिलिया लवणा । सर्वही जळ होय विचक्षणा[13] । तुज मी अनन्यशरणा । होईन तैसा ॥ १४ ॥ येतुलेनि अपैसया । सुटलाचि आहासि धनंजया । [मा शुचः] घेईं मज प्रकाशोनियां[14] । सोडवीन तूतें ॥ १५ ॥ याकारणें पुढती । हे आंधी[15] न वाहें चित्तीं । मज एकासि ये सुमती । जाणोनि शरण ॥ १६ ॥ ऐसें सर्वरूपरूपसें[16] । सर्वदृष्टिडोळसें । सर्वदेशनिवासें । बोलिले श्रीकृष्णें ॥ १७ ॥ [स्वानुभवसुखोक्तयः] मग सांवळा सकर्कंण[17] । बाहु पसरोनि दक्षिण । आलिंगिला स्वशरण[18] । भक्तराज तो ॥ १८ ॥ न पर्वतां[19] जयातें । कोंखे[20] सूनि बुद्धीतें । बोलणें मागौतें[21] । वोसरलें ॥ १९ ॥ ऐसें जें कांहीं येक । बोला बुद्धीसिही अटंक[22] । तें द्यावया मिष । खेंवाचें[23] केलें ॥ १४२० ॥ हृदया हृदय येक जालें । ये हृदयींचें ते हृदयीं घातलें । द्वैत[24] न मोडितां केलें । आपणाऐसें अर्जुना ॥ २१ ॥ दीपें दीप लाविला । तैसा परिष्वंग[25] तो जाला । द्वैत न मोडितां केला । आपणपें पार्थ ॥ २२ ॥ तेव्हां सुखाचा मग तया । पूर आला जो धनंजया । तेथ वोंड[26] तन्हीं बुडोनियां । ठेला देव ॥ २३ ॥ सिंधु सिंधुतें पावों जाये । तें पावणें ठाके दुणा होये । वरी रिगे पुरवणिये[27] । आकाशही ॥ २४ ॥ तैसें तया दोघांचें मिळणें । दोघां नावरे

---

* प्रबोधा, प्रबोध.

---

१ जीवदशा. २ वाईट. ३ ऐकूं. ४ ताकांतून. ५ पुनः. ६ न राहे. ७ जागूतीत. ८ प्रत्यक्ष. ९ चिंतूं नको. १० सर्वथैव बंधाला कारण अशा. ११ व्यर्थ. १२ हे सुज्ञा. १३ प्रकट होऊन. १४ मनोव्यथा. १५ सर्व रूपें ज्याच्या योगानें रूपवान् होतात. १६ हस्तभूषणयुक्त. १७ केवळ आपल्यालाच शरण आलेला. १८ ज्या वस्तूची प्राप्ति न होतां बोलणें बुद्धीला काखेस मारून मागौतें=मागें हटतें अशी जी वस्तु. १९ मागें हटलें. २० दुःप्रवेश्य. २१ आलिंगनाचें निमित्त केलें. २२ दोघांचे देह तसेच असतां. २३ आलिंगन. २४ मोठा. २५ साह्यास.

जाणावें कवणें । किंबहुना श्रीनारायणें । विश्व कोंदलें[1] ॥ २५ ॥ ['गीतायाः गर्भे त्रिकांडोत्पत्ति व्याकरोति'] एवं वेदाचें मूळसूत्र । सर्वाधिकारैकपवित्र[2] । श्री कृष्णें गीताशास्त्र । प्रकट केलें ॥ २६ ॥ येथ गीता मूळ वेदां । ऐसें केविं पां भलें बोधा । हें ह्मणाल तरी प्रसिद्धा । उपपत्ति[3] सांगों ॥ २७ ॥ तरी जयाच्या निश्वासीं[4] । जन्म झालें वेदराशी । तो सत्यप्रतिज्ञ पैजेसी[5] । बोलिला स्वमुखें ॥ २८ ॥ ह्मणौनि वेदां मूळभूत । गीता ह्मणो हें होय उचित । आणिकही येकी येथ । उपपत्ति असे ॥ २९ ॥ जें न नासत[6] स्वरूपें । जयाचा विस्तार जेथ लपे । तें तयाचें ह्मणिपे । बीज जगीं ॥ १४३० ॥ तरि कांडत्रयात्मक । शब्दराशी अशेष । गीतेमाजि असे रूख[7] । बीजीं जैसा ॥ ३१ ॥ ह्मणोनि वेदांचें बीज । श्रीगीता होय हें मज । गंमे[8] आणि सहज । दिसतही आहे ॥ ३२ ॥ जे वेदांचे तिन्हीं भाग । गीते उमटले असती चांग । भूषणरलीं सर्वांग । शोभलें जैसें ॥ ३३ ॥ तियेंचि कर्मादिकें तिन्हीं । कांडें कोणकोणे स्थानीं । गीते आहाति तें नयनीं । दाखऊं आइक ॥ ३४ ॥ ['गीताशास्त्रोत्पत्त्यादिप्रस्तावना'] तरि पहिला जो अध्याव । तो शास्त्रप्रवृत्तिप्रस्ताव । द्वितीयीं सांख्यसद्भाव । प्रकाशिला ॥ ३५ ॥ मोक्षदानीं स्वतंत्र । ज्ञानप्रधान हें शास्त्र । येतुलालें[9] दुजीं सूत्र । उभारिलें ॥ ३६ ॥ ['कर्मकांड'] मग अज्ञानें बांधलेया । मोक्षपदीं बैसावया । साधनारंभ तो तृतीया- । ध्यायीं बोलिला ॥ ३७ ॥ जे देहाभिमानबंधें । सांडूनि काम्यनिषिद्धें । विहित परि अप्रमादें । अनुष्ठावें ॥ ३८ ॥ ऐसेनि सद्भावें कर्म करावें । हा तिजा अध्यायीं देवें । निर्णय केला तें जाणावें । कर्मकांड येथ ॥ ३९ ॥ ['उपासनाकांड'] आणि तेंचि नित्यादिक । अज्ञानाचें आवश्यक । आचरतां मोचक । केंवी होय पां ॥ १४४० ॥ ऐसी अपेक्षा[10] जालिया । बद्ध मुमुक्षुते[11] आलिया[12] । देवें ब्रह्मार्पणत्वें क्रिया । सांगीतली ॥ ४१ ॥ जे देह वाचा मानसें । विहित निपजे जें जैसें । तें येक ईश्वरोद्देशें[13] । कीजे ह्मणीतलें ॥ ४२ ॥ हेंचि ईश्वरीं कर्मयोगें । भजनकथनाचें खोंगें[14] । आदरिलें शेषभागें । चतुर्थाचेनी ॥ ४३ ॥ तें विश्वरूप अकरावा । अध्याय संपे जंव आघवा । तंव कर्में ईश भजावा । हें जें बोलिलें ॥ ४४ ॥ तें अष्टाध्यायीं[15] उघड । जाण येथें देवताकांड[16] । शास्त्र सांगतसे- ऑड[17] । मोडूनि बोले ॥ ४५ ॥ ['ज्ञानकांड'] आणि तेणेंचि ईशप्रसादें । श्रीगुरुसंप्रदायलब्धें । साच ज्ञान उद्बोधे । कोवळें जें ॥ ४६ ॥ तें अद्वेष्टादिप्रभृतिकीं[18] । अथवा अमानित्वादिकीं । वाढविजे ह्मणोनि लेखीं[19] । बारावा गणूं ॥ ४७ ॥ तो बारावा अध्याय आदी । आणि पंधरावा अवधि । ज्ञानफळपाकासिद्धि निरूपणासी

१ भरलें. २ सर्व अधिकारांत अतिशुद्ध. ३ सयुक्तिक कारण. ४ श्वासोच्छ्वासांपासून. ५ प्रतिज्ञेवर. ६ न नासतां. ७ कर्म-उपासना-ज्ञानरूप. ८ वेद. ९ वृक्ष. १० वाटे. ११ अशा प्रकारें. १२ इच्छा. १३ मोक्षेच्छुस्थितीला. १४ ठिकाण. १५ आठ अध्यायांत. १६ उपासनाकांड. १७ गीताशास्त्र. १८ प्रतिबंध निवारून, गोंधळून. १९ गणनेंत.

॥ ४८ ॥ ह्मणौनि चहूंही इहीं । [1]ऊर्ध्वमूळांतीं अध्यायीं । ज्ञानकांड ये ठायीं । निरूपिजे ॥ ४९ ॥ एवं *कांडत्रयरूपिणी । श्रुतीच हे कोडिसवाणी । [2]गीता-पद्यरत्नाचीं लेणीं । लेयिली आहे ॥ १४५० ॥ हें असो कांडत्रयात्मक । श्रुति मोक्षरूप फळ येक । †[3]बोभावे जें आवश्यक । ठाकावें ह्मणोनी ॥ ५१ ॥ ['षोडशाद्यध्यायत्रयकारणं दर्शयति'] तयाचेनि साधन ज्ञानेंसी । वैर करीं जो प्रतिदिवशीं । तो अज्ञानवर्ग षोडशीं । प्रतिपादिजे ॥ ५२ ॥ तोचि शास्त्राचा बोळावा । घेवोनि वैरी जिणावा । हा निरोप तो सतरावा । अध्याय येथ ॥ ५३ ॥ ऐसा प्रथमालागोनी । सतरावा [4]लोणी करूनी । [5]आत्मनिश्वास विवरूनी । दाविला देवें ॥ ५४ ॥ तया अर्थजातां अशेषां । केला तात्पर्याचा आवांका । तो हा अठरावा देखा । [6]कैलशाध्याय ॥ ५५ ॥ एवं सकळ [7]सांख्य-[8]सिंधु । श्रीभगवद्गीता[9]प्रबंधु । हा औदार्यें आगळा वेदु । [10]मूर्त जाण ॥ ५६ ॥ वेद [11]संपन्न होय ठाईं । परि [12]कृपण ऐसा आन नाहीं । जे कानीं लागला तिहीं । वर्णांच्याचि ॥ ५७ ॥ येरां भवव्यथा ठेलियां । स्त्रीशूद्रादिकां प्राणियां । [13]अनवसर मांडूनियां । राहिला आहे ॥ ५८ ॥ तरी [14]मंजपाहातां तें मागील उणें । फेडावया गीतापणें । वेद वेठला [15]भलतेणें । सेव्य होआवया ॥ ५९ ॥ ना हें अर्थें रिगोनि मनीं । श्रवणें लागोनि कानीं । जपमिषें वदनीं । वसोनियां ॥ १४६० ॥ ये गीतेचा पाठ जो जाणें । तयाचेनि सांगातीपणें । गीता लिहोनि वाहणें । पुस्तकमिषें ॥ ६१ ॥ ऐसैसा मी[16]संकटा । संसाराचा चोहटां । [17]गेवादि घालीत चोखटा । मोक्षसुखाची ॥ ६२ ॥ परि आकाशीं वसावया । पृथ्वीवरी बैसावया । रविदीप्ती [18]रोहाटावया । [19]ओवार नभ ॥ ६३ ॥ तेविं उत्तम ‡अधम ऐसें । सेवितां कवणातेंही न पुसे । [20]कैवल्यदानें सरिसें । निववीत जगा ॥ ६४ ॥ यालागिं [21]मोगिली कुटी- । भ्याला वेद गीतेच्या पोटीं । रिगाला आतां गोमटी । कीर्ति पातला ॥ ६५ ॥ ह्मणौनि वेदाची सुसेव्यता । ते हे मूर्त जाण श्रीगीता । श्रीकृष्णें पंडुसुता । उपदे-[22]शिली ॥ ६६ ॥ परि वत्साचेनि वोरसें । दुभतें होय घरा उद्देशें । जालें पांडवाचेनि मिषें । जगदुद्धरण ॥ ६७ ॥ चातकाचिये [23]कैणवे । मेव [24]पाणियेसिं धांवे । तेथ चराचर आघवें । [25]निवालें जेविं ॥ ६८ ॥ कां [26]अनन्यगती-कमळा- ।

* कांडत्रयनिरूपिणी । श्रुतीचि. † बोभाये. ‡ मध्यम.

१ पंधराव्याच्या. २ लहानशी. ३ गर्जून सांगे. ४ सोबती. ५ जिकावा. ६ शेवट. ७ वेद, वेद हे निःश्वासापासून झाले 'यस्य निःश्वसितं वेदा यो वेदेभ्योऽखिलं जगत् । निर्ममे—'. ८ विचार. ९ शिखररूप. १० प्रकृतिपुरुषांचें विवेचन ज्यानें केलें जातें तो सांख्यसमुद्र. ११ ग्रंथ. १२ प्रत्यक्ष. १३ समर्थ. १४ कदर्य. १५ अनधिकारी. १६ मला (ज्ञानदेवाला) असें वाटतें कीं. १७ आकारला. १८ भलत्या कोणासही. १९ मजसहित. २० चवाट्यावर. २१ सत्र. २२ फिरण्याला. २३ अवकाश. २४ मोक्षदानानें. २५ मागल्या निंदेला भ्याला. २६ पान्ह्यानें, ममतेनें. २७ दयेनें. २८ पाण्यासहित. २९ शांत झालें. ३० एकनिष्ठ अशा कमळासाठीं.

लागीं सूर्य ये वेळोवेळा । कीं सुखिया होइजे डोळा । त्रिभुवनीचा ॥ ६९ ॥ तैसें अर्जुनाचेनि व्याजें । गीता प्रकाशूनि श्रीराजें । संसारायेवढें थोर ओझें । [१]फेडिलें जगाचें ॥ १४७० ॥ सर्वशास्त्ररत्नदीप्ती । उजळिता हा त्रिजगती । सूर्य नव्हे लक्ष्मीपती । [२]वेऱ्हाकाशींचा ॥ ७१ ॥ बापकुळ तें पवित्र । जेथिंचा पार्थ या ज्ञाना पात्र । जेणें गीता *केलें स्वतंत्र । [३]आवार जगा ॥ ७२ ॥ हें असो मग तेणें । सद्गुरु-श्रीकृष्णें । पार्थाचें [४]मिसळणें । आणिलें द्वैता ॥ ७३ ॥ पाठीं ह्मणतसे पांडवा । शास्त्र हें मानलें कीं जीवा । तेथ येरू ह्मणे देवा । आपुलिया कृपा ॥ ७४ ॥ तरि निधान जोडावया । भाग्य घडे गा धनंजया । परि जोडिलें भोगावया । [६]विपायें होय ॥ ७५ ॥ पैं क्षीरसागरायेवढें । [७]अविरजी दुधाचें भांडें । सुरां असुरां केवढें । मथितां जालें ॥ ७६ ॥ तें साहसही फळा आलें । जें अमृतही डोळां देखिलें । परि †वरिचिल चुकले । [९]जैतनेतें ॥ ७७ ॥ तेथ अमरत्वा [१०]वोगरिलें । तें मरणाचिलागीं जालें । भोगों नेणतां जोडलें । ऐसें आहे ॥ ७८ ॥ नहुष [११]स्वर्गाधिपति जाला । परी [१२]रांहाटीं भांबावला । तो भुजंगत्व पावला । नेणसी कायी ॥ ७९ ॥ ह्मणौनि बहुत पुण्य तुवां । केलें तेणें धनंजया । आजि शास्त्रराजा [१३]इया । जालासि विषय ॥ १४८० ॥ तरि ययाचि शास्त्राचेनि । संप्रदायें [१४]पांघुरौनि । शास्त्रार्थ हा [१५]निकेनी । अनुष्ठीं हो ॥ ८१ ॥ येन्हवीं अमृतमथना- । सारिखें होईल अर्जुना । ‡जरि रिघसी अनुष्ठाना । संप्रदायेंवीण ॥ ८२ ॥ गाय घड जोडे गोमटी । ते तैंचि §[१६]पय दे किरीटी । जैं जाणिजे हातवटी । [१७]सींजवणीची ॥ ८३ ॥ तैसा श्रीगुरु प्रसन्न होये । शिष्य विद्याही कीर लाहे । परि ते फळें संप्रदायें । उपासिलिया ॥ ८४ ॥ ह्मणौनि शास्त्रीं जो इये । उचित संप्रदाय आहे । तो ऐक आतां बहुवें- । [१८]आदरेंसी ॥ ८५ ॥

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।

न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥ ६७ ॥

[इदं ते] तरि तुवां हें जें पार्था । गीताशास्त्र लाधलें आस्था । [नातपस्काय] तें तपोहीनां [१९]सर्वथा । [न] सांगावें ना हो ॥ ८६ ॥ [नाभक्ताय] अथवा तापस ही जाला । परि गुरुभक्तीं जो [२०]ढिलां । तो वेदीं अंत्यज वाळिला [२१] । तैसा

---

* केली. † वरिचिली चूकलें. ‡ संप्रदायेंवीण ज्ञाना । सांगसी जरी. § पिवोंये.

---

१ दूर केलें. २ मुखरूप आकाशींचा. ३ वसतिस्थान. ४ आलिंगन. ५ गुप्तधन. ६ क्वचित्. ७ न विरजलेलें. ८ जिवावर उदार होऊन झटणें. ९ संभाळण्याला. १० वाढिलें. ११ नहुष राजाला कांहीं दिवस स्वर्गाचें आधिपत्य मिळालें तेव्हां. १२ वर्तणुकींत चुकला. १३ या गीतेला. १४ धारण करून. १५ चांगलेपणानें. १६ दूध देते, पिवोंये अशा पाठीं धार काढणें. १७ दोहनाची. १८ आस्थापूर्वक. १९ अनुष्ठानादिरहिताला. २० उदासीन. २१ दूर केला.

[1]वाळी ॥ ८७ ॥ ना तरि पुरोडाशु जैसा । न घापे वृद्ध तरी वायसा । गीता नेदी तैसी तापसा । गुरुभक्तिहीना ॥ ८८ ॥ [न चाशुश्रूषवे वाच्यं] कां तपही जोडे देहीं । भजे गुरुदेवांच्या ठाईं । परि [3]आकर्णनीं नाहीं । [4]चाड जरी ॥८९॥ तरि मागील [5]दोहीं आंगीं । उत्तम होय कीर जगीं । परि या श्रवणालागीं । योग्य नोहे ॥ १४९० ॥ मुक्ताफळ भलतैसें । हो परि [6]मुख नसे । तंव गुँण प्रवेशे । तेथ कायी ॥ ९१ ॥ सागर गंभीर होये । हें कोण ना ह्मणत आहे । परि वृष्टी वायां जाये । जाली तेथ ॥ ९२ ॥ [7]धालिया दिव्यान्न [8]सुवावें । मग जें वायां [9]धांडावें । तें [10]आंतीं कां न करावें । उदारपण ॥ ९३ ॥ [कदाचन] ह्मणौनि योग्य भलतैसे । होत परी चाड नसे । तरि [12]झणे [13]वानिवसें । देसी हें तयां ॥ ९४ ॥ रूपाचा सुजाण डोळा । [14]वोडवूं ये कायि परिमळा । जेथ जें माने तें फळा । तेथचि गा ॥ ९५ ॥ ह्मणौनि तपीं भक्ति । पाहावे ते सुभद्रापति । परि शास्त्रश्रवणीं [15]अनासक्ति । [16]वाळावेचि ते ॥ ९६ ॥ [नच मां योऽभ्यसूयति] ना तरी तपभक्ति । होऊनि श्रवणीं आर्ति । आथी ऐसी ही [17]आंयती । देखसी जरी ॥ ९७ ॥ तरी गीताशास्त्रनिर्मिता । जो मी सकळलोकैकशास्ता [18]। तया मातें सामान्यता । बोलेल जो ॥ ९८ ॥ माझ्या सज्जनेसिं मातें । *[19]पैशुन्याचेनि [20]प्रहाते । येक आहाती तयांतें । योग्य न ह्मण ॥ ९९ ॥ तयांची येर आघवी । सामग्री ऐसी जाणावी । दीपेंवीण ठाणदिवी । रात्रिची जैसी ॥ १५०० ॥ अंग गोरें आणि तरुणें । वरि लेयिलें आहे लेणें । परि येकलेनि प्राणें । सांडिलें जेविं ॥ १ ॥ सोनयाचें सुंदर । [20]निर्वाळिलें होय घर । परि [21]सर्पांगना द्वार । [22]रुधलें आहे ॥ २ ॥ निपजे दिव्यान्न चोखट । परि माजी काळकूट । असो मैत्री [23]कपट- । गर्भिणी जैसी ॥ ३ ॥ तैसी [24]तेंपभक्तिमेधा । तयाची जाण प्रबुद्धा । जो माझयांची कां निंदा । माझीचि करी ॥ ४ ॥ याकारणें धनंजया । तो भक्त मेधावी [25]तपिया । तरि नको बापा इया । शास्त्रा [26]आंतळों देवों ॥ ५ ॥ काय बहु बोलों निंदका । योग्य [27]स्वेष्टयाहीसारिखा । गीता हे कवतिका- । लागीं ही नेदीं ॥ ६ ॥ ह्मणोनि तपाचा धनुर्धरा । तळीं दाटोनि †[28]गोंडोरा । वरि गुरुभक्तीचा पुरा । [29]प्रासाद जो जाला ॥ ७ ॥ आणि श्रवणेच्छेचा पुढां । [30]दारवंटा सदा उघडा । वरी [31]कैलश चोखडा । अनिंदारत्नांचा ॥ ८ ॥

---

* जे सदा करिते आघातें. † डांगोरा.

---

१ टाकला जातो. २ यज्ञाचा अवशेष चरु. ३ श्रवणीं. ४ इच्छा. ५ कर्मानुष्ठानांत. ६ छिद्र. ७ दोरा. ८ तृप्ताला. ९ वाढावें. १० दवडावें. ११ क्षुधिताला. १२ कदाचित्. १३ कौतुकानें. १४ पुढें करूं येईल. १५ आवड नसलेले. १६ लागावें. १७ सामुग्री. १८ शासन करणारा. १९ ताडणार्थें. २० प्रकाशमान. २१ नागिणीनें. २२ कोंडलें. २३ कपट आहे गर्भीत जिच्या=कापट्यरूप. २४ केवळ तपाविषयींच बुद्धि. २५ बुद्धिमान्. २६ स्पर्शों. २७ ब्रह्मदेवासारखा. २८ दगडाचा पाया. २९ देवालय. ३० दरवाजा. ३१ कळस.

य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ।
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ॥ ६८ ॥

[य इदं परमं गुह्यं] ऐशा भक्तालयीं चोखटीं । गीतारत्नेश्वर हा प्रतिष्ठीं । मग माझिया संवसाटी । तुकसी जगीं ॥ ९ ॥ कां जे एकाक्षरपणेंसी । त्रिमात्रकेचिये कुशी । प्रणव होता गर्भवासीं । सांकडला ॥ १५१० ॥ तो गीतेचिया *बाहळीं । वेदबीज गेलें †पाहाळीं । कीं गायत्री फुलींफळीं । श्लोकांच्या आली ॥ ११ ॥ ते हे मंत्ररहस्य गीता । मेळवी जो माझिया भक्ता । अनन्यजीवना माता । बाळका जैसी ॥ १२ ॥ [मद्भक्तेष्वभिधास्यति] तैसी भक्तां गीतेसीं । भेटी करी जो आदरेंसी । तो [मामेवैष्यत्यसंशयः] देहा पाठीं मजसीं । येकचि होय ॥ १३ ॥

न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ।
भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ॥ ६९ ॥

[तस्मात्] आणि देहाचेंही लेणें । लेऊनि वेगळेपणें । असे तंव जीवें प्राणें । तोचि पढिये ॥ १४ ॥ [मनुष्येषु] ज्ञानियां कर्मठां तापसां । यया खुणेचिया माणुसां- । माजि तो एक गा जैसा । पढिये मज ॥१५॥ [न च] तैसा भूतळीं आघवा । आन न देखें पांडवा । जो गीता सांगे मेळावां । भक्तजनाचा ॥१६॥ [भक्तिं मयि परां कृत्वा इति पूर्वश्लोकस्थं पदं] मज ईश्वराचेनि लोभें । हे गीता पढतां अक्षोभें । जो मंडन होय सभे । संतांचिये ॥ १७ ॥ नवपल्लवीं रोमांचित । मंदानिळें कांपवित । ओंमोदजळें वोलवित । फुलांचे डोळे ॥ १८ ॥ कोकिळा कलरवाचेनि मिषें । सद्गद बोलवीत जैसें । वसंत कां प्रवेशे । ‡मद्भक्तआरामीं ॥ १९ ॥ कां जन्माचें फळ चकोरां । होत जैं चंद्र ये अंबरा । ना ना नव घन मयूरां । वो देत पावे ॥ १५२० ॥ [कश्चिन्मे प्रियकृत्तमः] तैसा सज्जनाच्या मेळापीं । गीतापद्यरत्नीं उमपीं । वर्षे जो माझ्या रूपीं । हेतु ठेऊनि ॥ २१ ॥ [भवितेति] मग तयाचेनिपाडें । पढियंतें मजफुडें । नाहींचि गा मागेंफुडें । न्याहाळितां ॥ २२ ॥ अर्जुना हा ठायवरी । मीं तयातें सूयें जिव्हारीं । जो गीतार्थाचें करी । परेगुणें संतां ॥ २३ ॥

---

* बहळीं. † पाहाळीं. ‡ आरामामाजी.

---

१ स्थापन कर. २ बदलीस, साम्यतेस. ३ योग्य होशील. ४ अकार, उकार व मकार या तीन मात्रांच्या. ५ ओंकार. ६ संकुचित होऊन राहिला. ७ विस्तारामध्यें. ८ वृक्षरूपानें उंच. ९ मातेच्या स्तन्यावांचून अन्य जीविकेला साधन नाहीं अशा. १० अत्यंत प्रिय. ११ समुदायाला. १२ अहंकाररहित, स्थिरचित्तानें. १३ भूषणरूप. १४ सुगंधोदकानें. १५ मधुर स्वराच्या. १६ बगीचांत. १७ नूतन मेघ. १८ समुदायांत. १९ पुष्कळ. २० आवडतें. २१ हृदयांत ठेवतों. २२ पाहुणेर, मेजवानी.

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥ ७० ॥

[अध्येष्यते इति] पैं माझिया तुझिया मिळणीं[2] । वाढीनली जे हे काहाणी[1] । मोक्षधर्म कां *जिणी[3] । आलासे जेथें ॥ २४ ॥ तो हा सकळार्थप्रवृ[4]। आह्मां दोघांचा संवाद । न करितां पदभेद[5] । पाठेंचि जो पढे ॥ २५ ॥ [ज्ञानयज्ञेनेति] तेणें ज्ञानानळीं प्रदीप्तीं[6] । मूळ अविद्येचिया आहुतीं[7] । तोषविला होय सुमती । परमात्मा मी ॥ २६ ॥ घेऊनि गीतार्थ उगाणा[8] । ज्ञानिये जें विचक्षणा[9] । ठाकिती तें गाणावाणा[10] । गीतेचा तो लाहे ॥ २७ ॥ गीतापाठकासि †ऐसे[11] । फळ अर्थज्ञाचिसरिसें । गीता माउलिये कीं नसे । जाणेंतान्हें ॥२८॥

श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः ।
सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ॥ ७१ ॥

[श्रद्धावाननसूयश्च] आणि सर्वमार्गीं निंदा । सांडूनि आस्था पैं शुद्धा । गीताश्रवणीं श्रद्धा । उभारी जो ॥ २९ ॥ [शृणुयादपि यो नरः] तयाच्या श्रवणपुटीं । गीतेचीं अक्षरें जंव पैठीं[12] । होती ना तंव उठाउठी । पळेंचि पाप ॥ १५३० ॥ [पुण्यकर्मणां] ‡अटवीयेमाजि[13] जैसा । वन्हि रिघतां सहसा । लंघिती कां दिशा[14] । वनौकें तियें[15] ॥ ३१ ॥ कां उदयाचळकुळीं । झळकतां अंशुमाळी[16] । तिमिरें[17] अंतराळीं । हारपती ॥ ३२ ॥ तैसा कानाच्या महाद्वारीं । गीता गजर जेथ करी । तेथ सृष्टीचिये[18] आदिवरी । जायचि पाप ॥ ३३ ॥ ऐसी जन्मवल्ली[19] धुवट । होय पुण्यरूप चोखट । याहीवरी अंचाट[20] । लाहे फळ ॥ ३४ ॥ जे यिये गीतेचीं अक्षरें । जेतुलीं कां कर्णद्वारें । रिघती तेतुले होती पुरे । अश्वमेध कीं ॥ ३५ ॥ ह्मणौनि §श्रवणें पापें जाती । [शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्] आणि धर्म धरी उन्नती । तेणें स्वर्गराज्य संपत्ती । लाहेचि शेखीं[17] ॥ ३६ ॥ [सोऽपि मुक्तः] तो पैं मज यावयालागीं । पहिलें पेणें[18] करी स्वर्गीं । मग आवडे तंव भोगी । पाठीं मजचि मिळे ॥ ३७ ॥ ऐसी गीता धनंजया । ऐकतया आणि पढतया । फळे महानंदें मियां । बहु काय बोलों ॥ ३८ ॥

---

* जीवनी. † ऐसें. ‡ मग अरण्यामाजि. § गीताश्रवणें.

---

१ समागमांत. २ जगण्यास, हारीस. ३ एक पदसुद्धां न सोडतां, किंवा पदच्छेदादिक न करितां केवळ श्लोकांचा पाठ. ४ प्रज्वलित ज्ञानाग्नींत. ५ अज्ञानाच्या. ६ गीतेचा अर्थ उगाणा = अनुभवून जें ज्ञान्याला प्राप्त होतें तेंच गीतेच्या गाणावाणा = गाण्यानें व वर्णन करण्यानें प्राप्त होतें. ७ आहे. ८ जाणतें नेणतें. ९ प्रविष्ट. १० दाट अरण्यांत. ११ वनचरें, पशुपक्ष्यादि. १२ सूर्य. १३ अंधकार. १४ आधींचें. १५ जन्माची परंपरारूप वेल. १६ मोठें. १७ शेवटीं. १८ मुक्काम.

॥ ३८ ॥ याकारणें हें असो । परि जयालागीं शास्त्रातिसो । केला तें तंव तुज पुसों । काज तुझें ॥ ३९ ॥

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ।

कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय ॥ ७२ ॥

[कच्चिदेतच्छ्रुतं पार्थेति] तरि सांग पां पांडवा । हा शास्त्रसिद्धांत आघवा । तुज एकचित्तें फावा- । गेला आहे ॥ १५४० ॥ आह्मीं जैसें जया रीती । उगाणिलें कानांच्या हातीं । येरीं तैसेंचि तुझ्या चित्तीं । पैठें केलें कीं ॥ ४१ ॥ अथवा माझारीं । गेलें सांडी विखुरी । किंवा उपेक्षेवरी । वाळुनि सांडिलें ॥ ४२ ॥ जैसें आह्मीं सांगीतलें । तैसेंचि हृदयीं फावलें । तरी सांग पां वहिलें । पुसेन तें मी ॥ ४३ ॥ [कच्चिदज्ञानसंमोह इति ।] तरि स्वाज्ञानजनितें । मागिले मोहें तूतें । भुलविलें तो येथें । असे कीं नाहीं ॥ ४४ ॥ हें बहु पुसों काई । सांगें तूं आपुल्याठाईं । कर्माकर्म कांहीं । देखतासी ॥ ४५ ॥ पार्थ स्वानंदैकरसें । विरेल ऐसा भेददशे । आणिला येणें मिषें । प्रश्नाचेनि ॥ ४६ ॥ पूर्णब्रह्म जाला पार्थ । तरि पुढील साधावया कार्यार्थ । मर्यादा श्रीकृष्णनाथ । उल्लंघों नेदी ॥ ४७ ॥ येन्हवीं आपुलें करणें । सर्वज्ञ काय तो नेणे । परि केलें पुसणें । याचिलागीं ॥ ४८ ॥ एवं करोनियां प्रश्न । नसतेंचि अर्जुनपण । आणूनियां *जालें पूर्णपण । तें बोलवी स्वयें ॥ ४९ ॥ मग क्षीराब्धीतें सांडित । गगनीं पुंजमंडित । निवडे जैसा †न निवडित । पूर्णचंद्र ॥ १५५० ॥ तैसा ब्रह्म मी हें विसरे । तेथ जगचि ब्रह्मत्वें भरे । हेंही सांडी तरी विरे । ब्रह्मपणही ॥ ५१ ॥ ऐसा मोडत मांडत ब्रह्में । तो दुःखें देहाचिये सीमे । मी अर्जुन येणें नामें । उभा ठेला ॥ ५२ ॥ मग कांपतां करतळीं । दडपूनि रोमावळी । ‡पुलिका स्वेदजळीं । जिरऊनियां ॥ ५३ ॥ प्राणक्षोभे डोलतया । आंगा आंगचि §टेकया- । सूनि स्तंभ ¶चोळया । भुलौनियां ॥ ५४ ॥ नेत्रयुगुळाचेनि वातें । आनंदामृताचें भरितें । वोसंडत तें मागुतें । काढूनियां ॥ ५५ ॥

---

* आपण. † नवनीत. ‡ पुलकु. § टेंकावया, टेकलिया. ¶ चालतया.

---

१ अतिशय. २ समजून चुकला. ३ पदरीं घातलें. ४ लवंडून. ५ चालढकलीवर. ६ झुगारून दिलें. ७ प्रविष्ट झालें. ८ सत्वर. ९ स्वकीय अज्ञानापासून उत्पन्न. १० निजानंदरूप सामरस्यानें. ११ ओलांडूं देत नाहीं. १२ झालेलें पूर्णपण. १३ सोडीत. १४ तारागणाला शोभवीत. १५ विरघळे. १६ एथून आठ सात्विकभाव वर्णिले आहेत ते येणेप्रमाणें—'स्तंभः स्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्विका मताः'. १७ कांपत्य तळहातानें. १८ रोमांच. १९ प्राण्याच्या वाढीनें. २० टेंका देण्यास ठेवून. २१ कंप, चाळ्याला. २२ अश्रुप्रवाहानें. २३ उसळत.

विविधा औत्सुक्यांची दाटी । चीपे[1] दाटत होती कंठीं । ते करूनियां पैठी[2] । हृदयामाजी ॥ ५६ ॥ वाचेचें वितुळणें । सांवरूनि प्राणें । अक्रमाचें[3] श्वसणें । टेऊनि ठायीं ॥ ५७ ॥

अर्जुन उवाच–**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत ।**
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥ ७३ ॥

[नष्टो मोहः] मग अर्जुन ह्मणे काय देवो । पुसताति आवडे[4] मोहो । तरि तो सकुटुंब गेला जी ठावो । घेऊनि आपला ॥ ५८ ॥ पौसीं[5] येऊनि दिनकरें । डोळयातें आंधारें । पुसिजे हें कायि सरे । कोणें गांवीं ॥ ५९ ॥ तैसा तूं श्रीकृष्णराया । आमुचिया डोळयां । गोचर हेंचि कायिसया[6] । न पुरे[7] तंव ॥ १५६० ॥ वरि लोभें मायेपासूनि । तें सांगसी तोंड भरूनि । जें कौर्यीसेंनिही करूनि । जाणूं नये ॥ ६१ ॥ आतां मोह असे कीं नाहीं । हें ऐसें जी पूससी काई । कृतकृत्य जाहलों पाहीं । तुंझेपणें[8] ॥ ६२ ॥ गुंतलों होतों अर्जुनगुणें । तो मुक्त झालों तुझेपणें । आतां पुसणें सांगणें । दोन्ही नाहीं ॥ ६३ ॥ [त्वत्प्रसादान्मयाच्युत] *मी तुझेनि प्रसादें । लाधलेनि[9] आत्मबोधें । मोहाचे तया[10] कांदे । नेदीच उरों ॥ ६४ ॥ [स्मृतिर्लब्धा] आतां करणें कां न करणें । हें जेणें उठी दुजेपणें । तें तूंवांचूनि नेणें । सर्वत्र गा ॥ ६५ ॥ [स्थितोऽस्मि गतसंदेहः] येविषयीं माझ्याठायीं । संदेहाचें नुरेचि कांहीं । त्रिशुद्धी[11] कर्म जेथ नाहीं । तें मी जालों ॥ ६६ ॥ तुंझेनि[12] मज मी पावोनि । कर्तव्य गेलें निपटूनि । [करिष्ये वचनं तव] परि आज्ञा तुझीवांचोनि । आन नाहीं प्रभो ॥ ६७ ॥ कां जें दृश्य[13] दृश्यातें नाशी । जें दुजें[14] द्वैतातें ग्रासी । जें एक परि सर्वदेशीं । वसवी सदां ॥ ६८ ॥ जयाचेनि संबंधे बंध फिटे । जयाचिया आशा आंस[15] तुटे । जें भेटलयां सर्व भेटे । आपणपांचि ॥ ६९ ॥ तें तूं गुरुलिंग[16] जी माझें । जें येकलेपणीचें विरजें[17] । जयालागीं वोलांडिजे । अद्वैत बोध ॥ १५७० ॥ आपणचि होऊनि ब्रह्म । सारिजे कृत्याकृत्याचें काम । मग कीजे कां निःसीम । सेवा जयाची ॥ ७१ ॥ गंगा सिंधु सेवूं गेली । पावतांचि समुद्र जाली । तेविं भक्तां सेलें[18] दिधली । निजपदाची ॥ ७२ ॥ तो तूं माझा जी निरुपचारू[19] । श्रीकृष्णा सेव्य सद्गुरू । मा ब्रह्मतेचा उपकारू ।

---

* जी तुमचेनि.

---

१ स्वरभंग. २ प्रविष्ट. ३ क्रियारहितपणाचें. ४ आवडतां होतो. ५ समीप. ६ शिरके. ७ हेंच कोणत्या गोष्टीला पुरणार नाहीं? सर्व इतक्यानेंच होईल. ८ कळवळ्यानें, ममतापूर्वक. ९ कशाही प्रयासानें. १० त्वद्रूपत्वानें. ११ प्राप्त झालेल्या. १२ गड्डे, मुळ्या. १३ खरेपणानें. १४ तुझ्या योगानें मी माझ्या स्वरूपीं मिळून. १५ जें दृश्य प्रत्यक्ष होतांच. १६ द्वैत, गुरुशिष्यभाव. १७ आशा कुंठित होते. १८ गुरुमूर्ती. १९ साह्य. २० वांटा. २१ आदराचा.

हाचि मानीं ॥ ७३ ॥ जें मज तुह्मां आड । होतें भेदाचें[१] कवाड । तें फेडोनि केलें गोड । सेवासुख ॥ ७४ ॥ तरी आतां तुझी आज्ञा । सकळ देवाधिदेवराज्ञा । करीन देयीं अनुज्ञा । भलतियेविषयीं ॥ ७५ ॥ यया अर्जुनाचिया बोला । देव नाचे सुखें भुलला । ह्मणे विश्वफळा जाला । *फळ हा मज ॥ ७६ ॥ उणेनि[२] उमचला सुधाकर । देखुनी आपला कुमर[३] । मर्यादा क्षीरसागर । विसरेचिना[४] ॥ ७७ ॥ ऐसें संवादाचा बहुलां[५] । लग्न दोघांचिया आंतुलां[६] । लागलें देखोनि जाला । निर्भर संजय ॥ ७८ ॥ ~~तेथें ह्मणतसे संजयो । बाप कृपानिधीरावो । तो आपुला मनोभावो । अर्जुनेंसीं केला~~ ॥ ७९ ॥ तेथें उंचबळलेपणें[७] । संजय धृतराष्ट्रातें ह्मणे । जी कैसें बादरायणें । रक्षिलों दोघे ॥ १५८० ॥ आजि तुमतें आवधारा । नाहीं चर्मचक्षुही[८] संसारा । कीं ज्ञानदृष्टी व्यवहारा । आणिलेति ॥ ८१ ॥ आणि रथींचिये[९] राहाटी । घेइ जो घोडेयासाटीं । तया आह्मां या गोष्टी । गोचरा[१०] होती ॥ ८२ ॥ जुंझाचें[११] निर्वाण । मांडलें असे दारुण । दोहीं हारीं आपण । हारपिजे जैसें ॥ ८३ ॥ येवढा जिये सांकडां[१२] । कैसा अनुग्रहो पैं गाढा । जे ब्रह्मानंद उघडा । भोगवीतसे ॥ ८४ ॥ ऐसें संजय बोलिला । परि न द्रवे येरू[१३] उगला । चंद्रकिरणीं शिवतला । पाषाण जैसा ॥ ८५ ॥ हे देखोनि तयाची दशा । मग करीचिना[१४] सरिसा । परि सुखें जाला पिसा । बोलतसे ॥ ८६ ॥ भुलविला हर्षवेगें । ह्मणौनि धृतराष्ट्रा सांगे । येरहवीं नव्हे तयाजोगें । हें कीर जाणे ॥ ८७ ॥

संजय उवाच–इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ।
संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ॥ ७४ ॥

[इति] मग ह्मणे पैं कुरुराजा । ऐसा पृथापुत्र[१३] तो तुझा । बोलिला तें अधोक्षजा । गोड जालें ॥ ८८ ॥ [महात्मनः] अगा पूर्वापर सागर । यया नामासीचि सिनेर[१४] । येर आघवें तें नीर । एक जैसें ॥ ८९ ॥ तैसा श्रीकृष्ण पार्थ ऐसें । हें आंगाचिपासीं[१५] दिसे । मग संवादीं जी नसे । कांहींचि भेद ॥ १५९० ॥ पैं दर्पणाहूनि चोखें । दोन्ही होती सन्मुखें । तेथ येरीं येर देखे । आपणपें जैसें ॥ ९१ ॥ [संवादं] तैसा देवेंसी पंडुसुत । आपणपें देवीं देखत । पांड-

* सफळाफळ, सकळफळ.

१ प्रतिबंधक. २ कलंकयुक्त जाणला, क्षीरसागर आपला कुमार चंद्र याला पाहून उणेन उमचला=आनंदित व्हावें त्याहून कमी आनंद पावला (भरून आला तरी मर्यादेपर्यंतच.) ३ बहुल्यावर. ४ हृद्गत खुणेनें. ५ गहिंवरून. ६ व्यावहारिक दृष्टीनें. ७ अर्जुनाच्या रथाची राहटी चालली पाहिजे ह्मणून घोड्यांची संगति ज्यानें केली त्याच्या गोष्टी आम्हांस गोचरा=प्रत्यक्ष होतात. ८ युद्धप्रकरण. ९ उभय पक्ष. १० संकटांत. ११ धृतराष्ट्र. १२ संबंध. १३ पुतण्या (अर्जुन.) १४ वेगळेपण. १५ देहभिन्नतेच्या दृष्टीनें.

वेंसीं देखे अनंत । आपणपें पार्थीं ॥ ९२ ॥ देव देवा भक्तालागीं । जिये विवर[1] देखे आंगीं । *येरु तियेचिही भागीं । दोन्ही देखे ॥ ९३ ॥ आणिक कांहींचि नाहीं । ह्मणौनि करिती काई । दोघे येकपणें पाहीं । नांदताति ॥ ९४ ॥ आतां भेद जरी मोडे । तरी प्रश्नोत्तर कां घडे । ना भेदचि तरि जोडे । संवादसुख कां ॥ ९५ ॥ ऐसें बोलतां दुजेपणें । संवादीं द्वैतगिळणें । {इममश्रौषं} तें ऐकिलें बोलणें । दोघांचें मियां ॥ ९६ ॥ उटूनि दोन्ही आरसे । वोडविलीया[2] सरिसे । कोण कोणा पाहातसे । कल्पावें पां ॥ ९७ ॥ कां दीपासन्मुख । ठेविलया दीपक । कोण कोणा आर्थिक[3] । कोण जाणे ॥ ९८ ॥ ना ना अर्कापुढें अर्क । उदयलिया आणिक । कोण ह्मणे प्रकाशक । प्रकाश्य कवण ॥ ९९ ॥ [अद्भुतं] हें निर्धारूं जातां फुडें । निर्धारासि ठेंक[4] पडे । ते दोघे जाले येवढे । संवादें सरिसे ॥ १६०० ॥ [अहं] जी मिळतां दोन्ही उदकें-। माजि लवण वांरूं[5] ठाके । कीं तयासींही निर्मिखें[6] । तेंचि होय ॥१॥ तैसें श्रीकृष्ण अर्जुन दोन्ही । संवादले तें मनीं । धरितां मजही वांनी[7] । तेचि होतसे ॥ २॥ ऐसें ह्मणे ना मोटकें । तंव हिरोनि सात्विकें । आठव नेला नेणोकें । संजयपणाचा ॥ ३ ॥ [रोमहर्षणं] रोमांच जंव फरके[8] । तंव तंव आंग सुरंके[9] । स्तंभ[10] स्वेदांतें जिंके । एकला कंप ॥ ४ ॥ अद्वयानंदस्पर्शें । दिठी रसें[11]मय जाली असे । ते अश्रु नव्हती जैसें । द्रवत्वचि[12] ॥ ५ ॥ नेणों काय †माय पोटीं । काय नेणों गुंफे[13] कंठीं । वांगर्था[14] पडत मिठी । उसासाचिया[15] ॥ ६ ॥ किंबहुना सात्विका[16] आठां । ‡चौचर[17] मांडता उमेठां[18] । संजय जाहालासे चोहटां[19] । संवादसुखाचा ॥ ७ ॥ तया सुखाची ऐसी जाती । जे आपणचि धरी शांती । मग पुढती देहस्मृती । लाधली तेणें ॥ ८ ॥

व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम् ।
योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम् ॥ ७५ ॥

[व्यासप्रसादाच्छ्रुतवान्] तेव्हां बैसतेनि आनंदें । ह्मणे§ जी जें उपनिषदें । नेणती तें व्यासप्रसादें । ऐकिलें मियां ॥ ९ ॥ [एतद्गुह्यमहं परं] ऐकतांचि ते गोठी । ब्रह्मत्वाची पडिली मिठी । मीतूंपणेसी ¶दिठी[20] । विरोनि[21] गेली

* येरुही तियेचि. † न माय पोटीं. ‡ परस्पर होत उमेठा. § ह्मणे जें. ¶ दृष्टी.

१ छिद्र. २ समोरासमोर ठेविलें असतां. ३ प्रकाशक, इच्छा करणार. ४ स्तब्धता. ५ निवारण करण्यास राहे. ६ क्षणांत. ७ लवणाप्रमाणें. ८ थोडें बोलतो न बोलतो तों. ९ उभारे. १० संकोच पावे. ११ स्तब्धता व घाम यांस. १२ ब्रह्ममय. १३ पाझरच. १४ कंठरूप गुंफेंत. १५ शब्दार्थास. १६ श्वासोच्छ्वासाच्या. १७ आठ सात्विक भावांस. १८ बोबडी वळली असतां. १९ अतिशय. २० उपनिषत्सारसंवाद. २१ हारपली.

॥ १६१० ॥ [योगं योगेश्वरात्कृष्णात्] हे आघवेचि कां योग । जयाठाया येते मार्ग । तयाचें वाक्य सवंग । केलें मज व्यासें ॥ ११ ॥ [साक्षात्कथयतः स्वयं] अहो अर्जुनाचेनि मिषें । आपणपेंचि दुजें ऐसें । नटोनि आपणया *उद्देशें । बोलिले जें देव ॥ १२ ॥ तेथ कीं माझे श्रोत्र । पाटाचें[1] जाले जी पात्र । काय वानूं स्वतंत्र । सामर्थ्य श्रीगुरूचें ॥ १३ ॥

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् ।
केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥ ७६ ॥

[राजन् इमं अद्भुतं] राया हें बोलतां विस्मित होय । [केशवार्जुनयोः पुण्यं] तेणेंचि मोडावला[3] ठाये । रत्नीं कीं रत्नकिळा[4] ये । झांकोळित जैसी ॥ १४ ॥ [हृष्यामि च मुहुर्मुहुः] हिमवंतीचीं सरोवरें । चंद्रोदयीं होती कैरवें[5] । मग सूर्यागमीं माधारें । द्रवत्व ये ॥ १५ ॥ [संस्मृत्य संस्मृत्य संवादं] तैसा शरिराचिया स्मृती । तो संवाद संजय चित्तीं । धरी आणि पुढती । तेचि[6] होय॥१६॥

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ।
विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः॥७७॥

[राजन्] मग उठोनि ह्मणे नृपा । [तच्चेति] श्रीहरीचिया विश्वरूपा । देखिलया उगा कां पां । असों लाहसी ॥१७॥ न देखणेंनि[7] जें दिसे । नाहींपणेंचि जें असे । विसरें[8] आठवे तें कैसें । चुकऊं आतां ॥ १८ ॥ [विस्मयो मे महान्] देखोनि चमत्कार । कीजे तो नाहीं पैसार[9] । मजही सकट महापुर । नेत आहे ॥ १९ ॥ ऐसा श्रीकृष्णार्जुन- । संवादसंगमीं स्नान । करूनि देतसे तिळदान । अहंतेचें ॥ १६२० ॥ [हृष्यामि च पुनः पुनः] तेथ असंवरें[10] आनंदें । अलौकिकही कांहीं स्फुंदे[11] । श्रीकृष्ण ह्मणे सद्गदें । वेळोवेळां ॥ २१ ॥ या अवस्थांची कांहीं । कौरवातें परी नाहीं । ह्मणोनि रायें तें कांहीं । कल्पावें जंव ॥ २२ ॥ तंव जाला सुखलाभ । आपणपां करूनि स्वयंभ । बुझाविला[12] अवष्टंभ[13] । संजयें तेणें ॥ २३ ॥ तेथ कोणी येकी अवसरी[14] । होआवी ते करूनि दुरी । रावो ह्मणे संजया परी[15] । कैसी तुझी गा ॥ २४ ॥ तेणें तूतें येथें व्यासें । बैसविलें कायसा[16] †उद्देशें । अप्रसंगामाजि ऐसें । बोलसी काई ॥ २५ ॥ रानीचें राउळा नेलिया । दाही दिशा मानी सुनिया । कां रात्री होय पांहे-

*आपणया दोषें. † दोषें.

१ योग्यतेचें, अधिकाराचें पात्र. २ हिरमुसला होऊन राहे. ३ चकाकीला. ४ स्फटिकाकार. ५ शरीराच्या स्मृतीला संवादानें कांहीं वेळ धरलें = आवरलें पण पुनः तीच स्मृति झाली. ६ न दिसणें व दिसणें, नसणें व असणें, स्मृति व आठव असें जें अत्यद्भुत. ७ प्रसार. ८ न सांवरणाऱ्या. ९ छंदे, उसासा टाकी. १० निरविला. ११ सात्विकाहंकार. १२ प्रसंग. १३ रीत. १४ कोणत्या. १५ अवधान सोडून. १६ उजाडलें असतां.

लया । निशाचरा ॥ २६ ॥ जो जेथिचें गौरव नेणे । तयासि तें भिंगुळवाणें । ह्मणौनि अप्रसंग तेणें । ह्मणावा कीं तो ॥ २७ ॥ मग ह्मणें सांगें प्रस्तुत । उदयलेंसे जें उत्कळित । तें कोणासि बारे जैतें । देईल शेखीं ॥ २८ ॥ येऱ्हवीं विशेषें बहुतेक । आमुचें ऐसें मानसिक । जे दुर्योधनाचे अधिक । प्रताप सदा ॥ २९ ॥ आणि येरांचेनि पाडें । दळही याचें देव्हडें । ह्मणौनि जैत फुडें । आणील ना तें ॥ १६३० ॥ आह्मां तंव गमे ऐसें । मा तुझें जोतीषं कैसें । तें नेणों संजया असे । तैसें सांग पां ॥ ३१ ॥

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवानीतिर्मतिर्मम ॥ ७८ ॥

हरिः ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षसंन्यासयोगो नामाष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥

[यत्र योगेश्वरः कृष्णो] यया बोला संजयो ह्मणे । जी येरयेरांचें मी नेणें । परि आयुष्य तेथें जिणें । हें फुडें कीं गा ॥ ३२ ॥ चंद्र तेथें चंद्रिकेचा । शंभु तेथें अंबिका । संत तेथें विवेकेंचा । असणें कीं जी ॥ ३३ ॥ रावो तेथें कटक । सौजन्य तेथें सोइरीक । वन्हि तेथें दाहक । सामर्थ्य कीं ॥ ३४ ॥ दया तेथें धर्म । धर्म तेथें सुखागम । सुखीं पुरुषोत्तम । असे जैसा ॥ ३५ ॥ वसंत तेथें वनें । वन तेथ सुमनें । सुमनीं पालिंगेनें । सारंगांचीं ॥ ३६ ॥ गुरु तेथ ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन । दर्शनीं समाधान । आथि जैसें ॥ ३७ ॥ भाग्य तेथ विलास । सुख तेथें उल्लास । हें असो तेथ प्रकाश । सूर्य जेथें ॥ ३८ ॥ तैसे सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी कां सनाथ । तो श्रीकृष्ण रावो जेथ । [तत्र श्रीः] तेथ लक्ष्मी ॥ ३९ ॥ [भूतिः] आणि आपलेनि कांतेसीं । ते जगदंबा जयापासीं । अणिमादिकी काय दासी । नव्हती तयातें ॥ १६४० ॥ [विजयः] कृष्ण विजयस्वरूप निजांगें । तो राहिला असे जेणें भागें । तैं जय लागवेगें । तेथेंचि आहे ॥ ४१ ॥ [यत्र पार्थो धनुर्धरः] विजयी नामें अर्जुन । विख्यात । विजयस्वरूप श्रीकृष्णनाथ । श्रियेसीं विजय निश्चित । तेथेंचि असे ॥ ४२ ॥ तयाचिये देशींच्या झाडीं । कल्पतरूतें होडी । न जिणावें कां येवढीं । मायबापें असतां ॥ ४३ ॥ ते पाषाणही आघवे । चिंतारत्नें कां नोहावे । तिये भूमिके कां न यावें । सुवर्णत्व ॥ ४४ ॥ तयाचिया गांवींचिया । नदी अमृतें वाहाविया । नवल काय राया । विचारीं पां ॥ ४५ ॥

---

१ भयंकर. २ ज्याची मला उत्कंठा तें. ३ विजय. ४ इतर जे पांडव त्यांच्या योग्यतेस. ५ सैन्य. ६ अधिक. ७ गणित, भाकीत. ८ परस्परांचे. ९ चांदणें. १० ज्ञानाला. ११ राजा असेल तिकडे सैन्य. १२ पुष्पें. १३ समुदाय. १४ भ्रमरांचीं. १५ सुखोपभोग. १६ पतीसह. १७ अष्टसिद्धि. १८ लक्ष्मीसह. १९ पैज मारी. २० न जिंकावें. २१ चिंतामणी.

तयाचे बिसाट[1] शब्द । सुखें ह्मणों येती वेद । सदेह[2] सच्चिदानंद । कां *नोहावे ते ॥ ४६ ॥ पैं स्वर्गापवर्ग दोन्हीं । इयें पदें तया अधीनीं । श्रीकृष्ण बाप जननी । कमळा[3] जया ॥४७॥ ह्मणौनि †जियेंचा[4] बाहीं उभा । तो लक्ष्मीयेचा[5] वल्लभा । तेथ सर्वसिद्धि स्वयंभा । येर मी नेणें ॥ ४८ ॥ आणि समुद्राचा मेघ । उपयोगें तयाहूनि चांग । तैसा पार्थी आजि[6] लाग । आहे तये ॥ ४९ ॥ कैंनकत्वदीक्षागुरू[7] । लोहा परीस होय कीरू[8] । परि जगा पोसिता व्यवहारू[9] । तेंचि जाणें ॥ १६५० ॥ येथ गुरुत्वा येतसे उणें[10] । ऐसें ह्मणें कोण्ही ह्मणे । वन्हिप्रकाश दीपपणें । प्रकाशी आपला ॥ ५१ ॥ तैसा देवाचिया शक्ती । पार्थ देवांसीच[11] बहुती । परी[12] माने इये स्तुती । गौरव असे ॥ ५२ ॥ आणि पुत्रें मी सर्व गुणीं । जिणावा हे बापा शिराणी[13] । तरी ते शार्ङ्गपाणी । फळा आली ॥ ५३ ॥ किंबहुना ऐसा नृपा । पार्थ जालासे कृष्णकृपा । तो जयाकडे साक्षेपा[14] । रीती आहे ॥ ५४ ॥ तोचि गा विजयासि ठावो । येथ तुज कोण संदेहो । तेथ नये तरी वावो[15] । विजयोचि होय[16] ॥ ५५ ॥ ह्मणौनि जेथ श्री तेथ श्रीमंत । जेथ तो पंडुचा सुत । तेथ विजय समस्त । अभ्युदय[17] तेथ ॥ ५६ ॥ [ध्रुवा] जरी व्यासाचेनि साचें[18] । धीरें[19] मन तुमचें । तरी या बोलाचें । ध्रुवचि[20] माना ॥ ५७ ॥ [नीतिः] जेथ तो श्रीवल्लभ । तेथ भक्तकदंब[21] । तेथ सुख आणि लाभ । मंगळाचा ॥ ५८ ॥ [मतिर्मम] या बोला आन होये । तरि व्यासाचा अंकें[22] न वाहें । ऐसें गाजोनि[23] बाहे । उभिली तेणें ॥ ५९ ॥ ['श्लोकमाहात्म्यं'] एवं भारताचा ओवांका[24] । आणूनि श्लोकां येका । संजयें कुरुनायका । दीधला हातीं ॥ १६६० ॥ जैसा नेणो केवढा वन्ही । परि गुणाग्रीं[25] ठेऊनी । आणिजे सूर्याची होनी[26] । निस्तरावया ॥ ६१ ॥ तैसें शब्दब्रह्म अनंत । जालें सवालक्ष भारत । भारताचें शतें सात । सर्वस्व गीता ॥ ६२ ॥ तयाही सातां शतांचा । इत्यर्थ हा श्लोकांशेषींचा[27] । व्यासशिष्य संजयाचा । पूर्णोद्गार जो ॥ ६३ ॥ येणें येकेंचि श्लोकें । राहे तेणें असकें[28] । अविद्याजातांचें निकें । जिंतिलें होय ॥ ६४ ॥ ‡ऐसे श्लोकशतें सात । गीतेचीं पदें आंगें वा-

---

* न होआवा तो. † जे बाहे. ‡ ऐस या श्लोकां.

---

१ भलते, अव्यवस्थित. २ ते मूर्तिमंत सच्चिदानंदरूप कां न व्हावे, आहेतच. ३ लक्ष्मी. ४ ज्या पक्ष्याकडे, ज्या भागीं. ५ पति. ६ संबंध. ७ सुवर्णपणा येण्याची दीक्षा देणारा गुरु. ८ लोखंडाला सुवर्ण करणारा परिस आहे परंतु. ९ सुवर्णच. १० कदाचित्. ११ या स्तुतीनें देवालाच महत्व आहे. १२ प्रकारें. १३ इच्छा. १४ पक्षपातपूर्वक. १५ विजयाचें विजयत्व व्यर्थ होईल. १६ अधिक उदय. १७ खरेपणानें. १८ विश्वासे. १९ अडळत्वच. २० समुदाय. २१ कल्याणाचा. २२ अंकितपण, शिष्यत्वचिन्ह. २३ असें मोठ्यानें बोलून हात उभारला. २४ मतलब. २५ 'यत्र योगेश्वरः कृष्णो' ह्या शेवटच्या श्लोकांत २६ वातीच्या अग्नीं. २७ नाश दूर करायास. २८ संपूर्ण.

हत । पदें ह्मणों कीं परमामृत । गीताकाशींचें ॥ ६५ ॥ कीं आत्मराजाचिये सभे । गीते वोडवले हे खांबे । मज श्लोक प्रतिभे । ऐसे येत ॥ ६६ ॥ कीं गीता हे सप्तशती । मंत्रप्रतिपाद्य भगवती । मोहमहिषा मुक्ती । आनंदली असे ॥ ६७ ॥ ह्मणौनि मनें *कायें वाचा । जो सेवक होईल इयेचा । तो स्वानंदसाम्राज्याचा । चक्रवर्ती करी ॥ ६८ ॥ कीं अविद्यातिमिररोखें । श्लोक सूर्यातें पैजा जिंके । ऐसे प्रकाशिले गीतामिषें । रायें श्रीकृष्णें ॥ ६९ ॥ कीं श्लोकाक्षरद्राक्षलता । मांडव जाली आहे गीता । संसारपथ-श्रांता । विसंवावया ॥ १६७० ॥ कीं समाग्यसंतीं भ्रमरीं । †सेविले ते श्लोक कल्हारीं । श्रीकृष्णाख्यसरोवरीं । सांसिन्नली ‡हे ॥ ७१ ॥ कीं श्लोक नव्हती आन । गमे गीतेचें महिमान । वाखाणिते बंदिर्जन । उदंड जैसे ॥ ७२ ॥ कीं श्लोकांचिया आवारा । सात शतें करूनि सुंदरा । सर्वागम गीतापुरा । वसों आले ॥ ७३ ॥ कीं निजकांता आत्मया । आवडी गीता मिळावया । श्लोक नव्हती बाह्या । पसर कां जो ॥ ७४ ॥ कीं गीताकमळींचे भृंग । कीं हे गीतासागरतरंग । कीं हरीचे हे तुरंग । गीतारथींचे ॥ ७५ ॥ कीं श्लोक-सर्व तीर्थसंघात । आला श्रीगीतेगंगे आंत । जे अर्जुन सिंहस्थ । जाला ह्मणौनि ॥ ७६ ॥ कीं नोहे हे श्लोकश्रेणी । अचिंतचित्तचिंतामणी । कीं निर्विकल्पां लावणी । कल्पतरूंची ॥ ७७ ॥ ऐसिया शतेंसातश्लोका । परी आगळा येकयेका । आतां कोण वेगळिका । वानावों पां ॥ ७८ ॥ तान्ही आणि पोरठी । इया कामधेनूतें दिठी । सूनि जैसिया गोठी । कीजती ना ॥ ७९ ॥ दीपा आगिलें मागिल । सूर्य धाकुटा वडील । अमृतसिंधू खोल । उथळ कायसा ॥ १६८० ॥ तैसे पहिले सरते । श्लोक न ह्मणावे गीते । जुनीं नवीं पारिजातें । आहाती काई ॥ ८१ ॥ आणि श्लोका पाड नाहीं । हें कीर समर्थूं काई । येथ वाच्य वाचकही । भाग न धरी ॥ ८२ ॥ ['पाठमाहात्म्यं'] जे इये शास्त्रीं येक । श्रीकृष्णचि वाच्य वाचक । हें प्रसिद्ध जाणे लोक । भलताही ॥ ८३ ॥ येथें अर्थें तेंचि पाठें । जोडे येवढें निर्धटें । वाच्यवाचक येकवटें । साधितें §शास्त्र ॥ ८४ ॥ ह्मणोनि मज कांहीं । समर्थनीं आतां विषय नाहीं । गीता जाणा हे वाङ्मयी । श्रीमूर्ति प्रभूची ॥ ८५ ॥ शास्त्र वाच्यें अर्थें फळे । मग आपण मावळे । तैसें नव्हे हें सगळें । परब्रह्मची ॥ ८६ ॥ कैसा

---

* कानें. † सेविली. ‡ ये. § शास्त्रें.

---

१ गीता हीच काशी तिचें, स्वर्गीचें. २ प्रतिभारून येतात. ३ भ्रांति महिषासुराची मुक्तता निरास केल्यानें. ४ होईल. ५ अज्ञानांधकार आडवून. ६ कमळांनीं. ७ सिद्ध झाली. ८ स्तुतिपाठक. ९ वेदशास्त्रादि. १० भ्रमर. ११ अचिंत=विरक्त यांच्या चित्ताला चिंतामणि. १२ वर्णावा. १३ शुष्क. १४ दृष्टि देऊन. १५ पुढचामागचा. १६ श्रेष्ठ, शेवटले. १७ पारिजात जुना असो नवा असो, परिमळ सारखाच. १८ मोठ्या पराक्रमानें प्राप्त होण्याजोगें. १९ प्रतिपादनाला. २० वाणीरूप.

विश्वाचिया कृपा । करूनि महानंद सोपा । अर्जुनव्याजें रूपा । आणिला देवें ॥ ८७ ॥ चकोराचेनि निमित्तें । तिन्हीं भुवनें संतसें । निवविलीं कळावंतें । चंद्रें जेवीं ॥ ८८ ॥ कां गौतमाचेनि मिषें । कळिकाळ *ज्वरितोद्देशें । पाणिढाळ गिरीशें । गंगेचा केला ॥ ८९ ॥ तैसें गीतेचें हें दुभतें । वत्स करूनि पार्थातें । दुभीनली जगापुरतें । श्रीकृष्ण गाय ॥ १६९० ॥ येथें जीवें जरी न्याल । तरी हेंच कीर होआल । ना तरि पाठमिषें †तिंबाल । जीभचि जरी ॥ ९१ ॥ तरि लोह एकें अंशें । झगटलिया परिसें । येरीकडे अपैसें । सुवर्ण होय ॥ ९२ ॥ तैसी पाठाची ते ‡वाटी । श्लोक पाद लावावा जंव वोठीं । तंव ब्रह्मतेची पुष्टी । येयील आंगा ॥ ९३ ॥ ना येणेंसीं मुख वांकडें । करूनि ठाकाल कांनवडें । तरि कानींही घेतां पडे । तेचि लेख ॥ ९४ ॥ जे हे श्रवणें पाठें अर्थें । गीता नेदी मोक्षाअरौतें । जैसा समर्थ दाता कोण्हातें । नास्ति न ह्मणे ॥ ९५ ॥ ह्मणोनि §जाणतया सवा । गीताचि येकी सेवा । काय कराल आघवां । शास्त्रीं येरीं ॥ ९६ ॥ आणि कृष्णार्जुनीं मोकळी । गोठी चोवळिली जे निरौळीं । ते श्रीव्यासें केली करतळीं । घेवों ये ऐसी ॥ ९७ ॥ बाळकातें वोरसें । माय जैं जेवऊं बैसे । तैं तया ठाकती तैसे । घांस करी ॥ ९८ ॥ कां अफाटा समीरणा । ऑपैतें पण शाहाणा । केलें जैसें विंजणा । निर्मूनियां ॥ ९९ ॥ तैसें शब्दें जें न लभे । तें घडूनियां अनुष्टुभें । स्त्रीशूद्रादिप्रतिभे । सामाविलें ॥ १७०० ॥ स्वातीचेनि पाणियें । न होती जरी मोतियें । तरि आंगीं सुंदराचिये । कां शोभती तियें ॥ १ ॥ नाद वाद्या न येतां । तरि कां गोचर होता । ¶फुलें न होतां घेपता । अमोद केवि ॥२॥ $गोडीं न होती पक्कान्नें । तरि कां फावती रसने । दर्पणावीण नयनें । नयन कां दिसे ॥ ३ ॥ ||द्रष्टा श्रीगुरुमूर्ती । न रिगता दृश्यपंथीं । तरि कां ह्या उपास्ती । आकळता तो ॥ ४ ॥ तैसें वस्तु जें असंख्यात । तया संख्या शतें सात । न होती तरि कोणा येथ । फावों शकतें ॥ ५ ॥ मेघ सिंधूचें पाणी वाहे । तरी जग तयातेंचि पाहे । कां जें उंमप तें नोहे । ठाकतें कोण्हा ॥६॥

---

* ज्वरितदोषें. † तिमाल. ‡ वाटी । लावाल ना. § जाणा तया. ¶ पुष्प नव्हतां. $ गौल्यते न येती पक्कान्नें. || तैसा द्रष्टा.

---

१ जगावर कृपा करून. २ अर्जुनाच्या निमित्तानें. ३ प्रत्यक्षतेस. ४ कलिकालरूप जो, ज्वर त्याणें पीडित. ५ पायउतार. ६ भिजवाल. ७ एका अंगावर. ८ प्रकार. ९ नाहीं. १० झाल्याबरावर. ११ स्पष्ट. १२ बोलिली. १३ आकाशांत. १४ पान्हा दाटून आल्यानें, अति ममतेनें. १५ सोईस पडतील तसे. १६ वाऱ्याला. १७ आधीनपण, वश्यता. १८ पंखा. १९ प्रतिबिंबांत. २० फुलें उत्पन्न झालीं नसतीं तर सुगंध कसा घेतां येता. २१ पक्कान्नें गोड झालीं नसतीं तर जिभेला गोड कां लागतीं. २२ साक्षी. २३ साकार झाला नसता. २४ उपासनेला. २५ मिळूं शकतें. २६ अगणित.

आणि [१]वाचा जें न पवे । तें हे श्लोक न होते बरवे । तरि [२]कानें मुखें फावे । ऐसें कां होतें ॥ ७ ॥ ह्मणोनि श्रीव्यासाचा हा थोर । विश्वासि जाला उपकार । जे श्रीकृष्ण उक्ती आकार । ग्रंथाचा केला ॥ ८ ॥ आणि तोचि [३]हा मी आतां । श्रीव्यासार्ची पदें पाहातां *पाहातां । आणिला श्रवणपथा । मन्हाठिया ॥ ९ ॥ व्यासादिकांचे [४]उन्मेख । राहाटती जेथ [५]साशंक । तेथ मीही रंक येक । [६]वाचाळी करीं ॥ १७१० ॥ परि गीता ईश्वर भोळा । ले व्यासोक्तिकुसुममाळा । तरि माझिया दूर्वादळा । ना न ह्मणे कीं ॥ ११ ॥ आणि क्षीरसिंधूचिया तटा । पाणिया येती [७]गजघटा । तेथ काय मुरकुटा । वारिजत असे ॥ १२ ॥ [८]पाख-फुटे पाखिरूं । नुडे तरी नभींच स्थिरू । गगन आक्रमी सत्वरु । तो [९]गरुडही तेथ ॥ १३ ॥ राजहंसाचें चालणें । भूतळीं जालिया [१०]†शेहाणें । आणिकें काय कोणें । चालावेंचि ना ॥ १४ ॥ जी [११]आपुलेनि [१२]‡अवकाशें । अगाध जळ घेपे [१३]कैलशें । चुळीं चूळपणा ऐसें । भरूनि न निघे ॥ १५ ॥ दिवटीच्या आंगीं थोरी । तरि ते बहु तेज धरी । वाती आपुलिया परी । आणीच कीं ना ॥ १६ ॥ जी समुद्राचेनि पैसें । समुद्रीं आकाश आभासे । थिल्लरीं थिल्लराऐसें । विंबेचि पैं ॥ १७ ॥ तेविं व्यासादिक महामती । वावरों येती इये ग्रंथीं । मा आह्मी [१४]ठाकों हे युक्ती । न मिळे कीर ॥ १८ ॥ जिये सागरीं जळचरें । संचरती मंदराकारें । तेथ देखोनि §[१५]शफरें येरें । पोहों न लाहती ॥ १९ ॥ अरुण आंगार्जवळिके । ह्मणोनि सूर्यातें देखे । मा भू तळींची न देखे । मुंगी काई ॥ १७२० ॥ यालागीं आह्मां प्राकृतां । देशिकारें [१६]बंधे गीता । ह्मणणें हें [१७]अनुचिता । कारण नोहे ॥ २१ ॥ आणि बाप पुढां जाये । ते घेत [१८]पाउलाची सोये । बाळ ये तरि न लाहे । पावों कायी ॥ २२ ॥ तैसा व्यासाचा [१९]मागोवा घेत । भाष्यकारातें वाट पुसत । अयोग्यही मी [२०]नें पवत । [२०]कें जाइन ॥ २३ ॥ आणि पृथ्वी जयाचिया [२१]क्षेमा । [२२]नुवंगे स्थावर जंगमा । जयाचेनि अमृतें चंद्रमा । निववी जग ॥ २४ ॥ जयाचें [२३]आंगिकें

---

* पाहतां. † सिहाणें. ‡ अवकाश । जळ. § सपुरें.

---

१ जर हे श्लोक चांगले झाले नसते तर वाचा जें न पवे=वाणीला जें अगोचर तें कानें मुखें फावे=कानांला व मुखाला प्राप्त कसें झालें असतें. २ ग्रंथ. ३ ज्ञानोद्धार. ४ अनिर्धारित. ५ बडबड. ६ व्यासोक्तिरूप फुलांची माळा. ७ गजसमुदाय. ८ चिलटाला. ९ पंख फुटणारें पांखरूं व गरुड आपआपल्या सामर्थ्यानुरूप आकाशांत उडतात. सीमा दोघांलाही नाहीं. "नभः पतंत्यात्मसमं पतत्रिणः" भागवत. १० सुंदर. ११ कलश अगाध जलांत गेला तरी त्याच्या अवकाशाइतकेंच पाणी त्यांत रहातें. १२ तसे व्यासादि या ग्रंथांत वावरतात. आम्ही मात्र ठाको=हात टेंकावे हें जुळत नाहीं. १३ लहान मत्स्य. १४ अगदीं जवळ राहाणारा, सारथी. १५ देशभाषेनें. १६ अयोग्यपणाला. १७ पावलट. १८ माग घेत घेत. १९ न पावतां. २० कोणीकडे. २१ सहनशक्तीमुळें. २२ न कंटाळे. २३ संपूर्ण साह्य.

असिकें । तेज लाहोनि अर्कें । आंधाराचे [१]सावाइकें । लोटिजत आहे ॥ २५ ॥ समुद्रा जयाचें तोय । तोया जयाचें माधुर्य । माधुर्या सौंदर्य । जयाचेनि ॥ २६ ॥ पवना जयाचें बळ । आकाश जेणें [२]पांघळ । ज्ञान जेणें उज्वळ । चक्रवर्ति ॥ २७ ॥ वेद जेणें [३]सुभाषें । सुख जेणें सोल्हास । हें असो [४]रूपस । विश्व जेणें ॥ २८ ॥ तो सर्वोपकारी समर्थ । सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथ । राहटत असे मजहीआंत । रिघोनियां ॥ २९ ॥ आतां आयती गीता जगीं । मीं सांगें मन्हाठिया *[५]भंगीं । येथ कें विस्मयालागीं । ठाव आहे ॥ १७३० ॥ श्रीगुरुचेनि नांवें माती । डोंगरीं जयापासीं होती । तेणें कोळियें त्रिजगती । †[६]येकवेंद केली ॥ ३१ ॥ चंदनें वेधलीं झाडें । जालीं चंदनाचेनि पाडें । वसिष्ठें मांडली कीं भांडे । भानुसीं [७]शांटी ॥ ३२ ॥ मा मी तंव [८]चित्ताथिला । आणि श्रीगुरु ऐसा [९]दांदुला । जो [१०]दिठीवेनि आपुला । बैसवी पदीं ॥ ३३ ॥ आधींचि देखणी दिठी । वरी सूर्य पुरवी [११]पाठी । तैं न दिसे ऐसी गोठी । केंही आहे ॥ ३४ ॥ ह्मणोनि माझे नित्य नवे । श्वासोश्वासही [१२]प्रबंध होआवे । श्रीगुरुकृपा काय नोहे । ज्ञानदेव ह्मणे ॥ ३५ ॥ याकारणें मियां । श्रीगीतार्थ मन्हाठिया । केला लोकां यया । दिठीचां [१३]विषो ॥ ३६ ॥ परि ‡मन्हाठे बोलरंगें । कवळितां पैं गीतांगें । तैं गातयाचेनि [१४]पांगें । येकांड्यता [१५]नोहे ॥ ३७ ॥ §ह्मणौनि गीता गावों ह्मणे । तैं [१६]गोणिवे ¶होती लेणें । ना मोकळे तरि उणें । गीताही $आणित ॥ ३८ ॥ सुंदर आंगीं लेणें न सूये । तैं तो मोकळा शृंगार होये । ना लेइलें तरि आहे । तैसें कें उचित ॥ ३९ ॥ कां मोतियांची जैसी जाती । सोनयाही मान देती । ना तरि मानवती । अंगेंचि [१७]सेंडी ॥ १७४० ॥ ना ना गुंफिलीं कां मोकळीं । उणीं न होती परिमळीं । वसंतागमींचीं वाटोळीं । मोगरीं जैसीं ॥ ४१ ॥ ||तैसा गाणीवेनें मिरवी । गीतेवीणेंही रंग दावी । तो लोभाचा प्रबंध वोवीं । केला मियां ॥ ४२ ॥ तेणें [१८]ओबाळसुबोधें । वोविये चेनि प्रबंधें । ब्रह्मरससुस्वादें । अक्षरें +गुंथिलीं ॥ ४३ ॥ आतां चंदनाच्या तरुवरीं । परिमळालागीं [१९]फुलवरी ।

---

* भागीं. † एकवट. ‡ मन्हाठी. § ह्मणौनि गा गावों. ¶ होय. $ आणिती. || तैसी. + गुंफिलीं.

---

१ संपूर्ण ऐहिक. २ दूर करीत आहे. ३ विस्तार. ४ चांगलें बोलणारा. ५ प्रकाशित, देखणें. ६ भाषेच्या रीतीनें. ७ एकत्र. ८ इतर झाडें चंदनसहवासानें त्याच्या तुलनेस येतात. ९ भांडणाच्या निवाड्यासाठीं. १० छाटी. ११ चित्त सद्गुरुमय झालेला, सचेतन. १२ धनी. १३ दृष्टिमात्रानें. १४ पाठीराखा. १५ काव्य, ग्रंथ. १६ दृष्टिगोचर. १७ अधीनपणानें. १८ एकदेशित्व. १९ गाणीं. २० सुवर्णरहित, नुसतीं. २१ गाण्यावांचून. २२ आबालवृद्धांस सुगम. २३ सुवासासाठीं. फूल येण्यापर्यंत.

पारुखणें जियापरी । लागेना कीं ॥ ४४ ॥ तैसा प्रबंध हा श्रवणीं । लागतखेंवो समाधि आणी । ऐकिलियाही वाखाणी । काय *व्यसन न लवी ॥४५॥ †पाठ करितां व्याजें । पांडित्यें येती वेर्षेजें । तैं अमृतातें नेणिजे । फावलिया ॥ ४६ ॥ तैसेनि आइतेपणें । ‡कवित्वा जालें हें उपेणें । मनन निदिध्यास श्रवणें । जिंतिलें आतां ॥ ४७ ॥ हे स्वानंद भोगाची सेलें । भलतयासीचि देईल । सर्वेंद्रियां पोषवील । श्रवणाकरवीं ॥ ४८ ॥ चंद्रातें आंगवणें । भोगूनि चकोर शाहाणे । परि फावे जैसें चांदिणें । भलतयाही ॥ ४९ ॥ तैसें अध्यात्मशास्त्रीं यिये । अंतर्रगचि अधिकारियें । परि लोक वाक्चातुर्यें । होईल सुखिया ॥ १७५० ॥ ऐसें श्रीनिवृत्तिनाथाचें । गौरव आहे जी साचें । ग्रंथ नोहे हें कृपेचें वैभव तिये ॥ ५१ ॥ क्षीरसिंधूपरिसरीं । शक्तीच्या कर्णकुहरीं । नेणों कैं श्रीत्रिपुरारीं । सांगीतलें जें ॥ ५२ ॥ तें क्षीर कल्लोळाआंत । मंकरोदरीं गुप्त । होता तयाचा हात । पैठें जालें ॥ ५३ ॥ तो मत्स्येंद्र सप्तशृंगीं । भेंग्नावयवा चौरंगीं । भेटला कीं तो सर्वांगीं । संपूर्ण जाला ॥ ५४ ॥ मग समाधी अव्यत्यया । भोगावी वासना यया । ते मुद्रा श्रीगोरक्षराया । दिधली मीनीं ॥ ५५ ॥ तेणें योगाब्जिनीसरोवर । विषयविध्वंसैकवीर । तिये पदीं कां सर्वेश्वर । अभिषेकिले ॥ ५६ ॥ मग तिहीं तें शांभव । अद्वयानंदवैभव । संपादिलें सप्रभव । श्रीगैणीनाथा ॥ ५७ ॥ तेणें §कळिकळित भूतां । आला देखोनि निरुता । ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ॥ ५८ ॥ ना आदि गुरु शंकरा- । लागोनि शिष्यपरंपरा । बोधाचा हा संसरा । जाला जो आमुतें ॥ ५९ ॥ तो हा तूं घेऊनि आघवा । कळीं गिळितयां जीवां । सर्व प्रकारीं धांवा । करीं पां वेगीं ॥ १७६० ॥ आधींच तंव तो कृपाळु । वरि गुरुआज्ञेचा बोलु । जाला जैसा वर्षाकाळु । खवळणें मेघां ॥ ६१ ॥ मग औतांचेनि वोरसें । गीतार्थग्रंथनमिसें । वर्षला शांतरसें । तो हा ग्रंथ ॥ ६२ ॥ तेथ पुढां मीं बापियां । मांडला आर्ती आपुलिया । कीं यासाठीं येवढिया । आणिलों यशा ॥ ६३ ॥

---

* व्यसन लावी. † पाकु करिती व्याजें, पाडीतें येती वेसजें । तें अमृतानें नेणिजे । पावलिया. ‡ कवित्व. § कळिकाळ.

---

१ वाट पाहणें. २ लागण्यावरावर. ३ व्याख्यानरूपानें. ४ स्पष्ट. ५ प्राप्त झाल्यास. ६ विश्रांतिस्थान. ७ विभाग. ८ नवसानें, स्वभावें, आपल्या शक्तीनें. ९ प्राप्त होय. १० या आत्मानात्मविचारशास्त्रीं. ११ अंतर्मुख. १२ सन्निधभागीं. १३ पार्वतीच्या कानांत. १४ लाटांमध्यें. १५ माशाच्या पोटांत. १६ प्राप्त. १७ हातपाय तुटलेल्या चौरंगी माशास. १८ निर्विघ्न. १९ या वासनेनें, इच्छेनें. २० मत्स्येंद्रनाथांनीं. २१ योगरूप कमलिनीचें. २२ विषयनाशाला मुख्य कारण. २३ अध्यात्मविद्या. २४ मुळापासून. २५ कलीनें ग्रस्त अशा. २६ खरा. २७ विस्तार. २८ धांवून रक्षणें. २९ पीडितांच्या पान्ह्यासाठीं. ३० ग्रंथ करण्याच्या निमित्तानें. ३१ चातक.

एवं गुरुक्रमें लाधलें । समाधिधन जें आपुलें । तें ग्रंथें *बोधौनि दिधलें । गोसावीं मज ॥ ६४ ॥ वांचूनि पढे ना वाची । ना सेवाही जाणें स्वामीची । ऐशिया मज ग्रंथाची । योग्यता कें असे ॥ ६५ ॥ परि साचचि गुरुनाथें । निमित्त करूनि मातें । प्रबंधव्याजें जगातें । रक्षिलें जाणा ॥ ६६ ॥ तन्ही पुरोहितगुणें । मी बोलिलों पुरें उणें । तें तुह्मीं माउलीपणें । उपसाहिजो जी ॥ ६७ ॥ शब्द कैसा घडिजे । प्रमेयीं कैसें पां चढिजे । अळंकार ह्मणिजे । काय तें नेणें ॥ ६८ ॥ सायिखडेयाचें बाहुलें । †चालविल्या सूत्राचेनि चाले । तैसा मातें दावीत बोलें । स्वामी तो माझा ॥ ६९ ॥ यालागीं मी गुणदोष । विषीं क्षमाविना विशेष । जे मी संजात ग्रंथलों देख । आचार्यें कीं ॥१७७०॥ आणि तुह्मां संतांचिये सभे । जें उणिवेसीं ठाके उभें । तें पूर्ण नोहे तैं लोभें । तुह्मांसीचि ‡कोपों ॥ ७१ ॥ सिंवतलियाही परिसें । लोहत्वाचिये अवदसे । न मूकिजे अयसें । तैं कवणा बोल ॥ ७२ ॥ वोहळें हेंचि करावें । जे गंगेचें आंग ठाकावें । मगही गंगा जरी नोहावें । तैं तो काय करी ॥ ७३ ॥ ह्मणौनि भाग्ययोगें बहुवे पां हे । तुह्मां संतांचे मी पाये । पातलों आतां कें लाहें । उणें जगीं ॥ ७४ ॥ अहो जी माझेनि स्वामी । मज संत जोडूनि तुह्मीं । दिधलेति तेणें सर्वकामीं । परिपूर्ण जालों ॥ ७५ ॥ पाहा पां मातें तुह्मां सांगडें । माहेर तेणें सुरवाडें । ग्रंथाचें आळियाडें । सिद्धी गेलें ॥ ७६ ॥ जी कनकाचें निखळ । वोतूं येईल भूतळ । चिंतारत्नीं कुळाचळ । निर्मूं येती ॥७७॥ सातांही हो सागरांतें । सोपें भरितां अमृतें । दुर्वाड नोहे तारांतें । चंद्र करितां ॥ ७८ ॥ कल्पतरूचे आराम । लावितां नाहीं विषम । परी गीतार्थाचें वर्म । निवडूं नये ॥ ७९ ॥ तो मी येक सर्व मुका । बोलोनि मऱ्हाटिया भाषा । करीं डोळेवरी लोकां । घेवों ये ऐसें जें ॥ १७८० ॥ हा ग्रंथसागर येऱ्हडा । उतरोनि पैलीकडा । कीर्तिविजयाचा धेंडा । नाचें जें कां ॥ ८१ ॥ गीतार्थाचा आवारु । कलशेंसी महामेरू । रचूनि माजी श्रीगुरु । लिंग जें पूजीं ॥ ८२ ॥ गीता निष्कपट माय । चुकोनि तान्हें हिंडे जें वांय । ते मायपूतां भेटि होय । हा धर्म तुमचा ॥ ८३ ॥ तुह्मां सज्जनांचें केलें । आकळूनि जी मीं बोलें । ज्ञानदेव ह्मणे थेंकुलें । तैसें नोहे ॥ ८४ ॥ काय बहु बोलों स-

---

* बांधोनि. † चालविलेनि सूत्रें चाले. ‡ कोपें.

१ गुरुपरंपरेनें. २ परस्वाधीनपणानें. ३ क्षमा करा. ४ अर्थान्वयांत. ५ कळसूत्री बाहुली. ६ ग्रंथयुक्त बोललों, ग्रंथच मी झालों आहें. ७ कोपूं लागेन. ८ स्पर्शलेल्या. ९ वाईट स्थितीला. १० लोहानें. ११ प्रवाहानें. १२ तुमच्यासारखें. १३ अनुकूळ. १४ हट्ट. १५ सर्व. १६ पर्वत. १७ कठिण. १८ बाग. १९ विपरीत. २० प्रत्यक्ष, दृष्टिगोचर. २१ देऊळ. २२ व्यर्थ. २३ आईलेंकरांस. २४ तुझी संतांनीं केलेल्याचा विचार करून हें माझें बोलणें आहे केवळ थेंकुलें = ज्ञानेश्वराचें यःकश्चित् बोलणें नव्हे.

कळां । मेळविलों जन्मफळा । ग्रंथसिद्धीचा सोहळा । दाविला जो हा ॥८५॥ मियां जैसजैसिया आशा । केला तुमचा भरंवसा । ते पुरऊनि जी बहुवसा । आणिलों सुखा ॥ ८६ ॥ मजलागीं ग्रंथाची स्वामी । दुजी सृष्टी जे हे केली तुम्ही । ते पाहोनि हांसों आह्मीं । विश्वामित्रातेंही ॥ ८७ ॥ जे असोनि *त्रि-शंकुदोषें । धातयाही आणावें वोसें । तें नासतें कीजे कीं ऐसें । निमावें नाहीं ॥ ८८ ॥ शंभू उपमन्यूचेनि मोहें । क्षीसागरही केला आहे । येथ तोही उपमेसरी नोहे । जे विषगर्भ कीं ॥ ८९ ॥ अंधकार निशाचरा । गिळितां सूर्यें चराचरां । धांवा केला तरी खरा । ताउनी कीं तो ॥ १७९० ॥ तैंतलिया जगाकारणें । चंद्रें वेंचिलें चांदिणें । तया सदोषा केवि ह्मणें । सारिखें हें ॥ ९१ ॥ ह्मणोनि तुह्मीं मज संतीं । ग्रंथरूप जो हा त्रिजगतीं । उपयोग केला तो पुढती । निरुपम जी ॥ ९२ ॥ किंबहुना तुमचें केलें । धर्मकीर्तन हें सिद्धी नेलें । येथ माझें जी उरलें । पाईकपण ॥ ९३ ॥ आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पैंसायदान हें ॥ ९४ ॥ जे †खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ ९५ ॥ दुरितांचें तिमिर जावो । ‡विश्व स्वधर्मसूर्यें पाहो । §जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ९६ ॥ वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूतळीं । भेटो तया भूतां ॥ ९७ ॥ चेलां कल्पतरूचे आरव । चेतनां चिंतामणीचे गांव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ ९८ ॥ चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांहीं सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ९९ ॥ किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥ १८०० ॥ आणि ग्रंथोपजीवियें । विशेषीं लोकीं इये । दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ॥ १ ॥ येथ ह्मणे श्रीविश्वेशराव । हा होइल $दीनपसाव । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥ २ ॥ ऐसें युगीं परि कळीं । आणि महाराष्ट्रमंडळीं । श्रीगोदावरीच्या कूलीं । ॥दक्षिणिलीं ॥ ३ ॥ त्रिभुवनैकपवित्र । अनादि पंचक्रोशक्षेत्र । जेथ जगाचें जीवनसूत्र । श्रीमहालया असे ॥ ४ ॥ तेथ यदुवंशविलास । जो सकळकळानिवास । न्यायातें पोषी क्षितीश । श्रीरामचंद्र ॥ ५ ॥ तेथ महेशान्वयसंभूतें ।

---

* त्रिशंकुउद्देशें. † खळचें व्यंकटै, ची वंकटै. ‡ विश्वा. § जें वांछेल तें तें लाहे. ¶ आरव. $ दाय. || दक्षिण लिंगीं, दक्षिणलिंग.

---

१ त्रिशंकुराजाच्या हेतूनें. २ उणें. ३ दिला. ४ तत झालेल्या. ५ सेवकत्व. ६ ग्रंथरूप यज्ञानें. ७ प्रसाद. ८ वक्रदृष्टी. ९ भगवज्जनांची. १० समुदाय. ११ सर्वकाळ. १२ चालत्या. १३ कोटी, अंकुर. १४ जिवंत. १५ लांछनरहित. १६ सूर्यें. १७ श्रीगुरु. १८ दानप्रसाद. १९ कलियुगांत. २० दक्षिणभागच्या तीरीं. २१ पांच कोश विस्तृत, पंचक्रोशींत. २२ मोहनीराजदेव. २३ माधव. २४ आदिनाथपरंपरासंभूत, शिवसंप्रदाय.

श्रीनिवृत्तिनाथसुतें[1] । केलें ज्ञानदेवें गीतें । देशीकारलेणें[2] ॥६॥ एवं भारताच्या गांवीं । भीष्मनाम प्रसिद्ध पर्वीं । श्रीकृष्णार्जुनीं बरवी । गोठी जे केली ॥ ७ ॥ जें उपनिषदांचें सार । सर्वशास्त्रांचें माहेर । परमहंसीं सरोवर । सेविजे जें ॥ ८ ॥ तिये गीतेचा कैलश[3] । संपूर्ण हा अष्टादश । ह्मणे निवृत्तिदास । ज्ञानदेव ॥ ९ ॥ पुढती पुढती पुढती । इया ग्रंथपुण्यसंपत्ती । सर्वसुखीं सर्वभूतीं । संपूर्ण होइजे ॥ १८१० ॥ शके बाराशतें[4] बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें । सच्चिदानंदबाबा आदरें । लेखकु जाहाला ॥ १८११ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायामष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥

इति श्रीभावार्थदीपिका समाप्ता ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

श्लोक ७८, ओंव्या १८११.

श्रीशकेपंधराशें बारोत्तरीं । तारणनामसंवत्सरीं । येकाजनार्दन अत्यादरीं । गीता ज्ञानेश्वरीप्रति शुद्ध केली ॥ १ ॥ ग्रंथ पूर्वीच अतिशुद्ध । परी पाठांतरीं शुद्ध अबद्ध । तो शोधूनियां एवंविध । प्रतिशुद्ध सिद्धज्ञानेश्वरी ॥ २ ॥ नमो ज्ञानेश्वरा निष्कळंका । जयाची गीतेची वाचितां टीका । ज्ञान होय लोकां । अतिभाविकां ग्रंथार्थियां ॥ ३ ॥ बहुकाळपर्वणी गोमटी । भाद्रमासकपिलाषष्टी[5] । प्रतिष्ठानीं गोदातटीं । लेखनकामाठी संपूर्ण जाली ॥ ४ ॥ ज्ञानेश्वरीपाठीं । जो वोवी करील मन्हाटी । तेणें अमृताचे ताटीं । जाण नरोटी ठेविली ॥ ५ ॥

---

१ शिष्यानें. २ देशभाषाग्रंथ. ३ कळस. ४ उत्तरोत्तर.

श्रीज्ञानेश्वरीस्थगीतापद्यानामकारादि वर्णक्रमः ।

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
अकीर्तिं चापि भूतानि	२	३४	३५
अक्षरं ब्रह्म परमं	८	३	१५५
अक्षराणामकारो	१०	३३	२२६
अग्निर्ज्योतिरहः शुक्लः	८	२४	१६९
अच्छेद्योऽयमदाह्यो	२	२४	३१
अजोऽपि सन्नव्यया	४	६	७३
अज्ञश्चाश्रद्दधानश्च	४	४०	८५
अंतकाले च मामेव	८	५	१५७
अंतवत्तु फलं तेषाम्	७	२३	१४८
अंतवंत इमे देहाः	२	१८	३०
अत्र शूरा महेष्वासा	१	४	६
अथ केन प्रयुक्तोऽयम्	३	३६	६६
अथ चित्तं समाधातुं	१२	९	२८१
अथ चेत्त्वमिमं धर्म्यं	२	३३	३५
अथ चैनं नित्यजातं	२	२६	३२
अथवा योगिनामेव	६	४२	१३२
अथवा बहुनैतेन	१०	४२	२२९
अथ व्यवस्थितान् दृष्ट्वा	१	२०	११
अथैतदप्यशक्तोऽसि	१२	११	२८२
अदृष्टपूर्वं हृषितोस्मि	११	४५	२६८
अदेशकाले यद्दानम्	१७	२२	४४१
अद्वेष्टा सर्वभूतानाम्	१२	१३	२८३
अधर्मं धर्ममिति या	१८	३२	४८७
अधर्माभिभवात्कृष्ण	१	४१	१७
अधश्चोर्ध्वं प्रसृता	१५	२	३७४
अधिभूतं क्षरो भावः	८	४	१५६
अधियज्ञः कथं कोत्र	८	२	१५४

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
अधिष्ठानं तथा कर्ता	१८	१४	४६६
अध्यात्मज्ञाननित्यत्वं	१३	११	३१८
अध्येष्यते च य इमं	१८	७०	५३१
अनंतविजयं राजा	१	१६	९
अनंतश्चास्मि नागा	१०	२९	२२४
अनन्यचेताः सततम्	८	१४	१६२
अनन्याश्चिंतयंतो	९	२२	१९५
अनपेक्षः शुचिर्दक्षः	१२	१६	२८५
अनादित्वान्निर्गुण	१३	३१	३४१
अनादिमध्यांतमनं	११	१९	२५१
अनाश्रितः कर्मफलं	६	१	१०४
अनिष्टमिष्टं मिश्रं च	१८	१२	४६१
अनुद्वेगकरं वाक्यम्	१७	१५	४३६
अनुबंधं क्षयं हिंसाम्	१८	२५	४८१
अनेकचित्तविभ्रांता	१६	१६	४१८
अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं	११	१६	२४८
अनेकवक्त्रनयनम्	११	१०	२४३
अन्नाद्भवंति भूतानि	३	१४	५८
अन्ये च बहवः शूरा	१	९	७
अन्ये त्वेवमजानंतः	१३	२५	३३८
अपरं भवतो जन्म	४	४	७२
अपरे नियताहाराः	४	३०	८२
अपरेयमितस्त्वन्यां	७	५	१३८
अपर्याप्तं तदस्माकम्	१	१०	७
अपाने जुह्वति प्राणम्	४	२९	८१
अपि चेत्सुदुराचारो	९	३०	२०१
अपि चेदसि पापेभ्यः	४	३६	८४

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च	१४	१३	३५६
अफलाकांक्षिभिर्य	१७	११	४३४
अभयं सत्त्वसंशुद्धिः	१६	१	४०२
अभिसंधाय तु फलं	१७	१२	४३४
अभ्यासयोगयुक्तेन	८	८	१५९
अभ्यासेप्यसमर्थोसि	१२	१०	२८२
अमानित्वमदंभित्वम्	१३	७	२९८
अमी च त्वां धृत	११	२६	२५६
अमी हि त्वां सुर	११	२१	२५२
अयनेषु च सर्वेषु	१	११	८
अयतिः श्रद्धयोपेतो	६	३७	१३०
अयुक्तः प्राकृतः	१८	२८	४८४
अवजानंति मां मूढाः	९	११	१८३
अवाच्यवादांश्च बहून्	२	३६	३६
अविनाशि तु त	२	१७	३०
अविभक्तं च भू	१३	१६	३३२
अव्यक्तादीनि भू	२	२८	३३
अव्यक्ताद्व्यक्तयः स	८	१८	१६५
अव्यक्तोऽक्षर इ	८	२१	१६६
अव्यक्तोऽयमचिंत्यो	२	२५	३१
अव्यक्तं व्यक्तिमा	७	२४	१४८
अशास्त्रविहितं घो	१७	५	४२९
अशोच्यानन्वशोच	२	११	२७
अश्रद्दधानाः पुरुषाः	९	३	१७७
अश्रद्धया हुतं दत्तं	१७	२८	४४७
अश्वत्थः सर्ववृक्षा	१०	२६	२२४
असक्तबुद्धिः सर्वत्र	१८	४९	५००
असक्तिरनभिष्वंगः	१३	९	३१७
असत्यमप्रतिष्ठं ते	१६	८	४१३
असौ मया हतः श	१६	१४	४१७
असंयतात्मना योगो	६	३६	१३०
असंशयं महाबाहो	६	३५	१२९
अस्माकं तु विशिष्टा	१	७	६९
अहं क्रतुरहं यज्ञः	९	१६	१९१
अहंकारं बलं दर्पं	१६	१८	४१९
,,	१८	५३	५०५
अहमात्मा गुडाकेश	१०	२०	२२२
अहं वैश्वानरो भूत्वा	१५	१४	३८८
अहं सर्वस्य प्रभवो	१०	८	२१५
अहं हि सर्वयज्ञानाम्	९	२४	१९७
अहिंसा सत्यमक्रोधः	१६	२	४०५
अहिंसा समता तुष्टि	१०	५	२१३
अहो बत महत्पापम्	१	४५	१८

आ

आख्याहि मे को	११	३१	२६०
आचार्याः पितरः	१	३४	१५
आढ्योभिजनवान	१६	१५	४१७
आत्मसंभाविताः स्त	१६	१७	४१८
आत्मौपम्येन सर्वत्र	६	३२	१२८
आदित्यानामहं वि	१०	२१	२२३
आपूर्यमाणमचलप्र	२	७०	४८
आब्रह्मभुवनाल्लोकाः	८	१६	१६४
आयुधानामहं वज्रम्	१०	२८	२२४
आयुःसत्त्वबलारोग्य	१७	८	४३१
आरुरुक्षोर्मुनेर्योगं	६	३	१०५
आवृतं ज्ञानमेतेन	३	३९	६८
आशापाशशतैर्बद्धाः	१६	१२	४१६
आश्चर्यवत्पश्यति क	२	२९	३३
आसुरीं योनिमापन्ना	१६	२०	४२०
आहारस्त्वपि सर्वस्य	१७	७	४३१
आहुस्त्वामृषयः सर्वे	१०	१३	२१८

इ

इच्छाद्वेषसमुत्थेन	७	२७	१५०
इच्छा द्वेषः सुखं दुःखं	१३	६	२९३
इति गुह्यतमं शास्त्रं	१५	२०	३९६
इति ते ज्ञानमाख्यातं	१८	६३	५२०

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
इति क्षेत्रं तथा ज्ञानं	१३	१८	३३३
इत्यर्जुनं वासुदेवस्त	११	५०	२७१
इत्यहं वासुदेवस्य	१८	७४	५३४
इदमद्य मया लब्धं	१६	१३	४१६
इदं तु ते गुह्यतमम्	९	१	१७६
इदं ते नातपस्काय	१८	६७	५२८
इदं शरीरं कौंतेय	१३	१	२९०
इदं ज्ञानमुपाश्रित्य	१४	२	३४८
इंद्रियस्येंद्रियस्यार्थे	३	३४	६५
इंद्रियाणां हि चरतां	२	६७	४७
इंद्रियाणि पराण्याहु	३	४२	६९
इंद्रियाणि मनो बुद्धिः	३	४०	६८
इंद्रियार्थेषु वैराग्यम्	१३	८	३१३
इमं विवस्वते योगं	४	१	७१
इष्टान् भोगान् हि	३	१२	५६
इहैकस्थं जगत्कृत्स्नं	११	७	२४०
इहैव तैर्जितः सर्गो	५	१९	९५
ई			
ईश्वरः सर्वभूतानां	१८	६१	५१९
उ			
उच्चैःश्रवसमश्वानाम्	१०	२७	२२४
उत्कामंतं स्थितं	१५	१०	३८६
उत्तमः पुरुषस्त्वन्यः	१५	१७	३९४
उत्सन्नकुलधर्माणां	१	४४	१८
उत्सीदेयुरिमे लोका	३	२४	६१
उदाराः सर्व एवैते	७	१८	१४६
उदासीनवदासीनो	१४	२३	३६३
उद्धरेदात्मनात्मानं	६	५	१०६
उपद्रष्टानुमंता च	१३	२२	२३७
ऊ			
ऊर्ध्वं गच्छंति स	१४	१८	३५९
ऊर्ध्वमूलमधःशाख	१५	१	३७१
ऋ			
ऋषिभिर्बहुधा गीतं	१३	४	२९१
ए			
एतच्छ्रुत्वा वचनं के	११	३५	२६२
एतद्योनीनि भूतानि	७	६	१३९
एतन्मे संशयं कृष्ण	६	३९	१३१
एतान्न हंतुमिच्छामि	१	३५	१५
एतान्यपि तु कर्माणि	१८	६	४५८
एतां दृष्टिमवष्टभ्य	१६	९	४१४
एतां विभूतिं योगं च	१०	७	२१५
एतैर्विमुक्तः कौंतेय	१६	२२	४२१
एवमुक्तो हृषीकेशो	१	२४	१२
एवमुक्त्वाऽर्जुनः सं	१	४७	१९
एवमुक्त्वा ततो राज	११	९	२४२
एवमुक्त्वा हृषीकेशं	२	९	२६
एवमेतद्यथात्थ त्वम्	११	३	२३६
एवं परंपराप्राप्तम्	४	२	७१
एवं प्रवर्तितं चक्रं	३	१६	५९
एवं बहुविधा यज्ञाः	४	३२	८२
एवं बुद्धेः परं बुद्ध्वा	३	४३	६९
एवं सततयुक्ता ये	१२	१	२७७
एवं ज्ञात्वा कृतं कर्म	४	१५	७६
एषा तेऽभिहिता	२	३९	३८
एषा ब्राह्मी स्थितिः	२	७२	४९
ओ			
ॐतत्सदिति निर्देशो	१७	२३	४४२
ओमित्येकाक्षरं ब्रह्म	८	१३	१६२
क			
कच्चिन्नोभयविभ्रष्टः	६	३८	१३१
कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ	१८	७२	५३२
कटुम्ललवणात्युष्ण	१७	९	४३२
कथं न ज्ञेयमस्माभिः	१	३९	१६
कथं भीष्ममहं संख्ये	२	४	२३

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
कथं विद्यामहं योगिन्	१०	१७	२२०
कर्मजं बुद्धियुक्ता हि	२	५१	४२
कर्मणः सुकृतस्याहुः	१४	१६	३५९
कर्मणैव हि संसिद्धिम्	३	२०	६०
कर्मणो ह्यपि बोद्धव्यं	४	१७	७७
कर्मण्यकर्म यः पश्येत्	४	१८	७७
कर्मण्येवाधिकारस्ते	२	४७	४०
कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि	३	१५	५९
कर्मेंद्रियाणि संयम्य	३	६	५४
कर्षयंतः शरीरस्थं	१७	६	४३०
कविं पुराणमनुशा	८	९	१५९
कस्माच्च ते न नमेर	११	३७	२६३
काम एष क्रोध एष	३	३७	६७
कामक्रोधवियुक्तानां	५	२६	९९
काममाश्रित्य दुष्पूर	१६	१०	४१५
कामात्मानः स्वर्गपरा	२	४३	३९
कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः	७	२०	१४७
काम्यानां कर्मणां न्या	१८	२	४५४
कायेन मनसा बुद्ध्या	५	११	९२
कार्पण्यदोषोपहत	२	७	२४
कार्यकारणकर्तृत्वे	१३	२०	३३४
कार्यमित्येव यत्कर्म	१८	९	४६०
कालोऽस्मि लोकक्ष	११	३२	२६०
काश्यश्च परमेष्वासः	१	१७	१०
कांक्षंतः कर्मणां सि	४	१२	७५
किं कर्म किमकर्मेति	४	१६	७६
किं तद्ब्रह्म किमध्या	८	१	१५४
किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या	९	३३	२०४
किरीटिनं गदिनं च	११	४६	२६९
किरीटिनं गदिनं	११	१७	२५०
कुतस्त्वा कश्मल	२	२	२१
कुलक्षये प्रणश्यंति	१	४०	१७
कृपया परयाविष्टो	१	२८	१२
कृषिगोरक्षवाणिज्यं	१८	४४	४९६
कैर्लिंगैस्त्रीन्गुणानेता	१४	२१	३६२
क्रोधाद्भवति संमोहः	२	६३	४५
क्लैब्यं मास्मगमः पा	२	३	२२
क्लेशोऽधिकतरस्ते	१२	५	२७९
क्षिप्रं भवति धर्मा	९	३१	२०२
क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवं	१३	३४	३४३
क्षेत्रज्ञं चापि मां	१३	२	२९०
ग			
गतसंगस्य मुक्तस्य	४	२३	७९
गतिर्भर्ता प्रभुः साक्षी	९	१८	१९२
गाण्डीवं स्रंसते हस्ता	१	३०	१३
गामाविश्य च भूता	१५	१३	३८८
गुणानेतानतीत्य त्री	१४	२०	३६१
गुरूनहत्वा हि महा	२	५	२३
च			
चंचलं हि मनः कृष्ण	६	३४	१२९
चतुर्विधा भजंते मां	७	१६	१४५
चातुर्वर्ण्यं मया सृष्टं	४	१३	७५
चिंतामपरिमेयां च	१६	११	४१५
चेतसा सर्वकर्माणि	१८	५७	१६
ज			
जन्म कर्म च मे दिव्यं	४	९	७४
जरामरणमोक्षाय	७	२९	१५०
जातस्य हि ध्रुवो मृ	२	२७	३२
जितात्मनः प्रशांतस्य	६	७	१०७
ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये	९	१५	१८९
ज्ञानविज्ञानतृप्तात्मा	६	८	१०८
ज्ञानेन तु तदज्ञानं	५	१६	९४
ज्ञानं कर्म च कर्ता च	१८	१९	४७६
ज्ञानं तेऽहं सविज्ञानं	७	२	१३७
ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता	१८	१८	४७३
ज्ञेयः स नित्यसंन्यासी	५	३	८९

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि	१३	१२	३२९
ज्यायसी चेत्कर्मणस्ते	३	१	५०
ज्योतिषामपि तज्ज्यो	१३	१७	३३२
त			
तं तथा कृपयाविष्टं	२	१	२१
ततः पदं तत्परिमा	१५	४	३८०
तच्च संस्मृत्य संस्मृ	१८	७७	५३६
ततः शंखाश्च भेर्यश्च	१	१३	८
ततः श्वेतैर्हयैर्युक्ते	१	१४	९
ततः स विस्मयावि	११	१४	२४७
तत्त्ववित्तु महाबाहो	३	२८	६२
तत्र तं बुद्धिसंयोगं	६	४३	१३२
तत्र सत्त्वं निर्मलत्वा	१४	६	३५३
तत्रापश्यत्स्थितान्पा	१	२६	१२
तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं	११	१३	२४६
तत्रैकाग्रं मनः कृत्वा	६	१२	११४
तत्रैवं सति कर्तारं	१८	१६	४६९
तत्क्षेत्रं यच्च याद	१३	३	२९०
तदित्यनभिसंधाय	१७	२५	४४४
तद्धुद्धयस्तदात्मानः	५	१७	९४
तद्विद्धि प्रणिपातेन	४	३४	८३
तपस्विभ्योऽधिको	६	४६	१३४
तपाम्यहमहं वर्षं	९	१९	१९३
तमस्त्वज्ञानजं विद्धि	१४	८	३५४
तमुवाच हृषीकेशः	२	१०	२६
तमेव शरणं गच्छ	१८	६२	५२०
तं विद्याद्दुःखसंयोगं	६	२३	१२६
तस्माच्छास्त्रं प्रमाणं	१६	२४	४२३
तस्मात्प्रणम्य प्रणि	११	४४	२६७
तस्मात्त्वमिंद्रियाण्या	३	४१	६९
तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो	११	३३	२६१
तस्मात्सर्वेषु कालेषु	८	७	१५९
तस्मादसक्तः सततं	३	१९	६०

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
तस्मादज्ञानसंभूतं	४	४२	८६
तंस्मादोमित्युदाहृत्य	१७	२४	४४३
तस्माद्यस्य महाबाहो	२	६८	४७
तस्मान्नार्हा वयं हंतुं	१	३७	१६
तस्य संजनयन् हर्षं	१	१२	८
तानहं द्विषतः क्रूरान्	१६	१९	४२०
तानि सर्वाणि संयम्य	२	६१	४५
तुल्यनिंदास्तुतिर्मौनी	१२	१९	२८७
तेजः क्षमा धृतिः	१६	३	४०८
ते तं भुक्त्वा स्वर्गलो	९	२१	१९५
तेषामहं समुद्धर्ता	१२	७	२८०
तेषामेवानुकंपार्थं	१०	११	२१७
तेषां सततयुक्तानां	१०	१०	२१६
तेषां ज्ञानी नित्ययु	७	१७	१४५
त्यक्त्वा कर्मफलासंगं	४	२०	७८
त्याज्यं दोषवदित्येके	१८	३	४५६
त्रिभिर्गुणमयैर्भावैः	७	१३	१४२
त्रिविधा भवति श्रद्धा	१७	२	४२७
त्रिविधं नरकस्येदं	१६	२१	४२१
त्रैगुण्यविषया वेदाः	२	४५	४०
त्रैविद्या मां सोमपाः	९	२०	१९४
त्वमक्षरं परमं वेदि	११	१८	२५१
त्वमादिदेवः पुरुषः	११	३८	२६४
द.			
दंडो दमयतामस्मि	१०	३८	२२८
दंभो दर्पोभिमानश्च	१६	४	४१०
दंष्ट्राकरालानि च ते	११	२५	२५५
दातव्यमिति यद्दानं	१७	२०	४३९
दिवि सूर्यसहस्रस्य	११	१२	२४६
दिव्यमाल्यांबरधरं	११	११	२४५
दुःखमित्येव यत्कर्म	१८	८	४५९
दुःखेष्वनुद्विग्नमनाः	२	५६	४३
दूरेण ह्यवरं कर्म	२	४९	४१

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
दृष्ट्वा तु पांडवानीकं	१	२	५
दृष्ट्वेदं मानुषं रूपं	११	५१	२७३
वेदद्विजगुरुप्राज्ञ	१७	१४	४३५
देवान्भावयतानेन	३	११	५६
देही नित्यमवध्योऽ	२	३०	३४
देहिनोस्मिन्यथा देहे	२	१३	२८
दैवमेवापरे यज्ञं	४	२५	८०
दैवी ह्येषा गुणमयी	७	१४	१४२
दैवी संपद्विमोक्षाय	१६	५	४१२
दोषैरेतैः कुलघ्नानाम्	१	४३	१८
द्यावापृथिव्योरिदमं	११	२०	२५१
द्यूतं छलयतामस्मि	१०	३६	२२७
द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा	४	२८	८१
द्रुपदो द्रौपदेयाश्च	१	१८	१०
द्रोणं च भीष्मं च	११	३४	२६१
द्वाविमौ पुरुषौ लोके	१५	१६	३९१
द्वौ भूतसर्गौ लोके	१६	६	४१२
ध			
धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे	१	१	५
धूमो रात्रिस्तथा कृ	८	२५	१६९
धूमेनाव्रियते वह्निः	३	३८	६८
धृत्या यया धारयते	१८	३३	४८८
धृष्टकेतुश्चेकितानः	१	५	६
ध्यानेनात्मनि पश्यं	१३	२४	३३८
ध्यायतो विषयान्पुंसः	२	६२	४५
न			
न कर्तृत्वं न कर्माणि	५	१४	९३
न कर्मणामनारंभात्	३	४	५३
न कांक्षे विजयं कृ	१	३२	१४
न च तस्मान्मनुष्येषु	१८	६९	५३०
न च मत्स्थानि भू	९	५	१७९
न च मां तानि क	९	९	१८२
न चैतद्विद्मः कतरन्नो	२	६	२४

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
न जायते म्रियते वा	२	२०	३०
न तदस्ति पृथि	१८	४०	४९३
न तद्भासयते सूर्यो	१५	६	३८३
न तु मां शक्यसे	११	८	२४१
न त्वेवाहं जातु नासं	२	१२	२८
न द्वेष्ट्यकुशलं कर्म	१८	१०	४६०
न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य	५	२०	९६
न बुद्धिभेदं जनयेत्	३	२६	६२
नभःस्पृशं दीप्तम	११	२४	२५४
नमः पुरस्तादथ पृ	११	४०	२६४
न मां कर्माणि लिंपं	४	१४	७६
न मां दुष्कृतिनो	७	१५	१४५
न मे पार्थास्ति क	३	२२	६१
न मे विदुः सुर	१०	२	२१२
न रूपमस्येह तथो	१५	३	३७८
न वेदयज्ञाध्ययनै	११	४८	२७०
नष्टो मोहः स्मृति	१८	१३	५३३
नहि कश्चित्क्षणमपि	३	५	५३
नहि देहभृता शक्यं	१८	११	४६१
नहि प्रपश्यामि म	२	८	२५
नहि ज्ञानेन सदृशं	४	३८	८४
नांतोऽस्ति मम दिव्या	१०	४०	२२८
नात्यश्नतस्तु योगो	६	१६	१२३
नादत्ते कस्यचित्पापं	५	१५	९४
नान्यं गुणेभ्यः क	१४	१९	३६०
नासतो विद्यते भावः	२	१६	२९
नास्ति बुद्धिरयुक्तस्य	२	६६	४७
नाहं प्रकाशः सर्वस्य	७	२५	१४९
नाहं वेदैर्न तपसा	११	५३	२७४
नांतोऽस्ति मम दि	१०	४०	२२८
निमित्तानि च प	१	३१	१४
नियतस्य तु संन्यासः	१८	७	४५८
नियतं कुरु कर्म त्वं	३	८	५५

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
नियतं संगरहितं	१८	२३	४८०
निराशीर्यतचित्ता	४	२१	७८
निर्मानमोहा जितसं	१५	५	३८१
निश्चयं शृणु मे तत्र	१८	४	४५६
निहत्य धार्तराष्ट्रान्नः	१	३६	१६
नेहाभिक्रमनाशोऽ	२	४०	३८
नैते सृती पार्थ जा	८	२७	१७१
नैनं छिंदंति शस्त्राणि	२	२३	३१
नैव किंचित्करोमीति	५	८	९१
नैव तस्य कृतेनार्थो	३	१८	६०
प			
पंचैतानि महाबाहो	१८	३	४६४
पत्रं पुष्पं फलं तोयं	९	२६	१९९
परस्तस्मात्तु भावो	८	२०	१६६
परं ब्रह्म परं धाम	१०	१२	२१८
परं भूयः प्रवक्ष्यामि	१४	१	३४८
परित्राणाय साधूनाम्	४	८	७३
पवनः पवतामस्मि	१०	३१	२२५
पश्य मे पार्थ रूपाणि	११	५	२३९
पश्यादित्यान्वसून्रु	११	६	२४०
पश्यामि देवांस्तव	११	१५	२४७
पश्यैतां पांडुपुत्राणा	१	३	५
पार्थ नैवेह नामुत्र	६	४०	१३१
पांचजन्यं हृषीकेशो	१	१५	९
पितासि लोकस्य च	११	४३	२६७
पिताहमस्य जगतो	९	१७	१९१
पुण्यो गंधः पृथिव्यां	७	९	१४८
पुरुषः प्रकृतिस्थो हि	१३	२१	३३५
पुरुषः स परः पार्थ	८	२२	१६६
पुरोधसां च मुख्यं मां	१०	२४	२२३
पूर्वाभ्यासेन तेनैव	६	४४	१३३
पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं	१८	२१	४७७
प्रकाशं च प्रवृत्तिं च	१४	२२	३६२

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
प्रकृतिं पुरुषं चैव	१३	१९	३३४
प्रकृतिं स्वामवष्टभ्य	९	८	१८१
प्रकृतेः क्रियमाणानि	३	२७	६२
प्रकृतेर्गुणसंमूढाः	३	२९	६३
प्रकृत्यैव च कर्माणि	१३	२९	३४०
प्रजहाति यदा कामान्	२	५५	४३
प्रन्नाद्यतमानस्तु	६	४५	१३३
प्रयाणकाले मनसा	८	१०	१६०
प्रलपन्विसृजन्गृह्णन्	५	९	९१
प्रवृत्तिं च निवृत्तिं च	१६	७	४१३
,,	१८	३०	४८६
प्रशांतमनसं ह्येनम्	६	२७	१२७
प्रशांतात्मा विगतभी	६	१४	११६
प्रसादे सर्वदुःखानां	२	६५	४६
प्रह्लादश्चास्मि दैत्या	१०	३०	२२५
प्राप्य पुण्यकृताँल्लो	६	४१	१३२
ब.			
बलं बलवतां चाहं	७	११	१४०
बहिरंतश्च भूतानाम्	१३	१५	३३२
बहूनां जन्मनामंते	७	१९	१४६
बहूनि मे व्यतीतानि	४	५	७२
बंधुरात्मात्मनस्तस्य	६	६	१०७
बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा	५	२१	९६
बीजं मां सर्वभूता	७	१०	१४०
बुद्धियुक्तो जहातीह	२	५०	४२
बुद्धिर्ज्ञानमसंमोहः	१०	४	२१३
बुद्रेर्भेदं धृतेश्चैव	१८	२९	४८५
बुद्ध्या विशुद्धया	१८	५१	५०३
बृहत्साम तथा	१०	३५	२२७
ब्रह्मणो हि प्रतिष्ठा	१४	२७	३६६
ब्रह्मण्याधाय कर्माणि	५	१०	९१
ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा	१८	१४	४६६
ब्रह्मार्पणं ब्रह्महविः	४	२४	१११

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
ब्राह्मणक्षत्रियविशाम्	१८	४१	४९३
भ			
भक्त्या त्वनन्यया	११	५४	२७४
भक्त्या मामभिजा	१८	५५	५०९
भयाद्रणादुपरतं	२	३५	३६
भवान् भीष्मश्च कर्णश्च	१	८	६
भवाप्ययौ हि भूता	११	२	२३५
भीष्मद्रोणप्रमुखतः	१	२५	१२
भूतग्रामः स एवायम्	८	१९	१६५
भूमिरापोऽनलो वायुः	७	४	१३८
भूय एव महाबाहो	१०	१	२११
भोक्तारं यज्ञतपसाम्	५	२९	१००
भोगैश्वर्यप्रसक्तानाम्	२	४४	३९
म			
मच्चित्तः सर्वदुर्गाणि	१८	५८	५१७
मच्चित्ता मद्गतप्राणाः	१०	९	२१६
मत्कर्मकृन्मत्परमो	११	५५	२७५
मत्तः परतरं नान्यत्	७	७	१३९
मदनुग्रहाय परमम्	११	१	२३४
मनःप्रसादः सौम्यत्वं	१७	१६	४३७
मनुष्याणां सहस्रेषु	७	३	१३७
मन्माना भव मद्भक्तो	९	३४	२०७
,,	१८	६५	५२२
मन्यसे यदि तच्छक्यं	११	४	२३७
मम योनिर्महद्ब्रह्म	१४	३	३४९
ममैवांशो जीवलोके	१५	७	३५३
मया ततमिदं सर्वं	९	४	१७८
मयाध्यक्षेण प्रकृतिः	९	१०	१८३
मया प्रसन्नेन तवार्जु	११	४७	२६९
मयि चानन्ययोगेन	१३	१०	३१७
मयि सर्वाणि कर्माणि	३	३०	६३
मय्यावेश्य मनो ये	१२	२	२७७
मय्यासक्तमनाः पार्थ	७	१	१३७

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
मय्येव मन आधत्स्व	१२	८	२८१
महर्षयः सप्त पूर्वे	१०	६	२१४
महर्षीणां भृगुरहम्	१०	२५	२२३
महात्मानस्तु मां पार्थ	९	१३	१८६
महाभूतान्यहंकारो	१३	५	२९३
मां च योऽव्यभि	१४	२६	३६५
मा ते व्यथा मा च	११	४९	२७०
मात्रास्पर्शास्तु कौं	२	१४	२८
मानापमानयोस्तुल्यः	१४	२५	३६४
मामुपेत्य पुनर्जन्म	८	१५	१६२
मां हि पार्थ व्यपा	९	३२	२०३
मुक्तसंगोऽनहंवादी	१८	२६	४८२
मूढग्राहेणात्मनो यत्	१७	१९	४३८
मृत्युः सर्वहरश्चाहम्	१०	३४	२२७
मोघाशा मोघकर्मा	९	१२	१८५
य			
य इदं परमं गुह्यम्	१८	६८	५३०
य एनं वेत्ति हंतारं	२	१९	३०
य एवं वेत्ति पुरुषं	१३	२३	३३७
यच्चापि सर्वभूतानाम्	१०	३९	२२८
यच्चावहासार्थमस	११	४२	२६६
यजंते सात्त्विका दे	१७	४	४२९
यज्ज्ञात्वा न पुनर्मोहं	४	३५	८३
यततो ह्यपि कौंतेय	२	६०	४४
यतः प्रवृत्तिर्भूता	१८	४६	४९८
यतेंद्रियमनोबुद्धिः	५	२८	९९
यतो यतो निश्चरति	६	२६	१२६
यततो योगिनश्चैनं	१५	११	३८६
यत्करोषि यदश्नासि	९	२७	२०
यत्तदग्रे विषमिव	१८	३७	४९१
यत्तु कामेप्सुना कर्म	१८	२४	४८०
यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्	१८	२२	४७८
यत्तु प्रत्युपकारार्थं	१७	२१	४४०

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
यत्र काले त्वनावृत्तिं	८	२३	१६८
यत्र योगेश्वरः कृष्णो	१८	७८	५३७
यत्रोपरमते चित्तम्	६	२०	१२५
यत्सांख्यैः प्राप्यते	५	५	९०
यथाकाशः स्थितो	९	६	१८०
यथा दीपो निवात	६	१९	१२४
यथा नदीनां बहवो	११	२८	२५८
यथा प्रकाशयत्येकः	१३	३३	३४३
यथा प्रदीप्तं ज्वलनं	११	२९	२५८
यथा सर्वगतं सौ	१३	३२	३४२
यथैधांसि समिद्धो	४	३७	८४
यदग्रे चानुबंधे च	१८	३९	४९२
यदहंकारमाश्रित्य	१८	५९	५१८
यदक्षरं वेदविदो	८	११	१६१
यदा ते मोहकलिलं	२	५२	४२
यदादित्यगतं तेजो	१५	१२	३८७
यदा भूतपृथग्भावं	१३	३०	३४१
यदा यदा हि धर्मस्य	४	७	७३
यदा विनियतं चित्तं	६	१८	१२४
यदा सत्त्वे प्रवृद्धे तु	१४	१४	३५६
यदा संहरते चायं	२	५८	४४
यदा हि नेंद्रियार्थेषु	६	४	१०६
यदि मामप्रतीकारं	१	४६	१९
यदि ह्यहं न वर्तेयं	३	२३	६१
यदृच्छया चोपपन्नं	२	३२	३५
यदृच्छालाभसंतुष्टो	४	२२	७८
यद्यदाचरति श्रेष्ठः	३	२१	६०
यद्यद्विभूतिमत्सत्त्वं	१०	४१	२२९
यद्यप्येते न पश्यन्ति	१	३८	१६
यं यं वापि स्मरन्भावं	८	६	१५८
यया तु धर्मकामार्थान्	१८	३४	४८९
यया धर्ममधर्मं च	१८	३१	४८७
यया स्वप्नं भयं शोकं	१८	३५	४८९
यं लब्ध्वा चापरं लाभं	६	२२	१२५
यं संन्यासमिति प्राहुः	६	२	१०५
यं हि न व्यथयंत्येते	२	१५	२९
यः सर्वत्रानभिस्नेहः	२	५७	४२
यस्त्वात्मरतिरेव स्यात्	३	१७	५९
यस्त्विंद्रियाणि मनसा	३	७	५४
यस्मात्क्षरमतीतोहं	१५	१८	३९५
यस्मान्नोद्विजते लोको	१२	१५	२८५
यस्य नाहंकृतो भा	१८	१७	४७०
यस्य सर्वे समारंभाः	४	१९	७८
यज्ञदानतपः कर्म	१८	५	४५७
यज्ञशिष्टामृतभुजो	४	३१	८२
यज्ञशिष्टाशिनः संतो	३	१३	५७
यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र	३	९	५५
यज्ञे तपसि दाने च	१७	२७	४४६
यातयामं गतरसं	१७	१०	४३३
या निशा सर्वभूतानां	२	६९	४८
यामिमां पुष्पितां वाचं	२	४२	३९
यावत्संजायते किंचित्	१३	२६	३३९
यावदेतान्निरीक्षेऽहं	१	२२	११
यावानर्थ उदपाने	२	४६	४०
यांति देवव्रता देवान्	९	२५	१९७
युक्तः कर्मफलं त्यक्त्वा	५	१२	९३
युक्ताहारविहारस्य	६	१७	१२४
युधामन्युश्च विक्रांत	१	६	६
ये चैव सात्त्विका भा	७	१२	१४१
ये तु धर्म्यामृतमिदं	१२	२०	२८८
ये तु सर्वाणि कर्माणि	१२	६	२८०
ये त्वक्षरमनिर्देश्यं	२२	३	२७८
ये त्वेतदभ्यसूयंतो	३	३२	६४
येऽप्यन्यदेवताभक्ता	९	२३	१९६
ये मे मतमिदं नित्यं	३	३१	६३
ये यथा मां प्रपद्यंते	४	११	७५

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
ये शास्त्रविधिमुत्सृज्य	१७	१	४२६
येषामर्थे कांक्षितं नो	१	३३	१४
येषां त्वंतगतं पापम्	७	२८	१५०
ये हि संस्पर्शजा भोगाः	५	२२	९६
योगयुक्तो विशुद्धात्मा	५	७	९०
योगसंन्यस्तकर्माणं	४	४१	८६
योगस्थः कुरु कर्माणि	२	४८	४१
योगिनामपि सर्वेषाम्	६	४७	१३५
योगी युंजीत सततं	६	१०	१०९
योत्स्यमानानवेक्षेऽहं	१	२३	११
यो न हृष्यति न द्वेष्टि	१२	१७	२८६
योंऽतःसुखोंतरारामः	५	२४	९८
यो मामजमनादिं च	१०	३	२१३
यो मामेवमसंमूढो	१५	१९	३९५
यो मां पश्यति सर्वत्र	६	३०	१२७
यो यो यां यां तनुं	७	२१	१४८
योऽयं योगस्त्वया	६	३३	१२९
युंजन्नेवं सदाऽत्मानम्	६	१५	१२१
,,	६	२८	१२७
यः शास्त्रविधिमुत्सृज्य	१६	२३	४२२

र

रजस्तमश्चाभिभूय	१४	१०	३५५
रजसि प्रलयं गत्वा	१४	१५	३५६
रजो रागात्मकं विद्धि	१४	७	३५३
रसोऽहमप्सु कौंतेय	७	८	१३९
रागद्वेषवियुक्तैस्तु	२	६४	६४
रागी कर्मफलप्रेप्सुः	१८	२७	४८३
राजन् संस्मृत्यसंस्मृत्य	१८	७६	५३६
राजविद्या राजगुह्यं	९	२	१७७
रुद्राणां शंकरश्चास्मि	१०	२३	२२३
रुद्रादित्या वसवो ये	११	२२	२५२
रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं	११	२३	२५३

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०

ल

लभंते ब्रह्मनिर्वाणं	५	२५	९८
लेलिह्यसे ग्रसमानः	११	३०	२५९
लोकेऽस्मिन्द्विविधा	३	३	५२
लोभः प्रवृत्तिरारंभः	१४	१२	३५६

व

वक्तुमर्हस्यशेषेण	१०	१६	२२०
वक्त्राणि ते त्वरमाणा	११	२७	२५७
वायुर्यमोऽग्निर्वरुणः	११	३९	२६४
वासांसि जीर्णानि	२	२२	३१
विद्याविनयसंपन्ने	५	१८	९५
विधिहीनमसृष्टान्नं	१७	१३	४३५
विविक्तसेवी लघ्वाशी	१८	५२	५०४
विषया विनिवर्तंते	२	५९	४४
विषयेंद्रियसंयोगात्	१८	३८	४९१
विस्तरेणात्मनो योगं	१०	१८	२२१
विहाय कामान्यः	२	७१	४९
वीतरागभयक्रोधाः	४	१०	७४
वृष्णीनां वासुदेवोस्मि	१०	३७	२२७
वेदानां सामवेदोस्मि	१०	२२	२२३
वेदाविनाशिनं नित्यं	२	२१	३०
वेदाहं समतीतानि	७	२६	१४९
वेदेषु यज्ञेषु तपःसु	८	२८	१७२
व्यवसायात्मिका	२	४१	३८
व्यामिश्रेणेव वाक्येन	३	२	५०
व्यासप्रसादाच्छ्रुतवा	१८	७५	५३५

श

शक्नोतीहैव यः सोढुं	५	२३	९८
शनैः शनैरुपरमेद्	६	२५	१२६
शमो दमस्तपः शौचं	१८	४२	४९४
शरीरं यदवाप्नोति	१५	८	३८५
शरीरवाङ्मनोभिर्यत्	१८	१५	४६८
शुक्लकृष्णे गती ह्येते	८	२६	१७०

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
शुचौ देशे प्रतिष्ठाप्य	६	११	११३
शुभाशुभफलैरेवं	९	२८	२००
शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं	१८	४३	४९५
श्रद्धया परया तप्तं	१७	१७	४३७
श्रद्धावाननसूयश्च	१८	७१	५३१
श्रद्धावाँल्लभते ज्ञानं	४	३९	८५
श्रुतिविप्रतिपन्ना ते	२	५३	४२
श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञात्	४	३३	८३
श्रेयान्स्वधर्मो विगुणः	३	३५	६५
,,	१८	४७	४९८
श्रेयो हि ज्ञानमभ्या	१२	१२	२८३
श्रोत्रादीनींद्रियाण्यन्ये	४	२६	८०
श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च	१५	९	३८६
श्वशुरान्सुहृदश्चैव	१	२७	१२

स

स एवायं मया तेऽद्य	४	३	७१
सक्ताः कर्मण्यविद्वांसः	३	२५	६१
सखेऽति मत्वा प्रसभं	११	४१	१६५
स घोषो धार्तराष्ट्राणां	१	१९	१०
सततं कीर्तयंतो	९	१४	१८७
स तया श्रद्धया युक्तः	७	२२	१४८
सत्कारमानपूजार्थं	१७	१८	४३८
सत्त्वात्संजायते ज्ञानं	१४	१७	३५९
सत्त्वं रजस्तम इति	१४	५	३५२
सत्त्वं सुखे संजयति	१४	९	३५५
सत्त्वानुरूपा सर्वस्य	१७	३	४२८
सदृशं चेष्टते स्वस्याः	३	३३	६४
सद्भावे साधुभावे च	१७	२६	४४५
समदुःखसुखः स्वस्थः	१४	२४	३६४
समोहं सर्वभूतेषु	९	२९	२००
समं कायशिरोग्रीवं	६	१३	११५
समं पश्यन्हि सर्वत्र	१३	२८	३४०
समं सर्वेषु भूतेषु	१३	२७	३३९
समः शत्रौ च मित्रे	१२	१८	२८६
सर्गाणामादिरंतश्च	१०	३२	२२६
सर्वकर्माणि मनसा	५	१३	९३
सर्वकर्माण्यपि सदा	१८	५६	५१६
सर्वगुह्यतमं भूयः	१८	६४	५२१
सर्वतःपाणिपादं तत्	१३	१३	३३०
सर्वद्वाराणि संयम्य	८	१२	१६१
सर्वद्वारेषु देहेस्मिन्	१४	११	३५६
सर्वधर्मान्परित्यज्य	१८	६६	५२४
सर्वभूतस्थमात्मानम्	६	२९	१२७
सर्वभूतस्थितं यो मां	६	३१	१२८
सर्वभूतानि कौंतेय	९	७	१८०
सर्वभूतेषु येनैकं	१८	२०	४७७
सर्वमेतदृतं मन्ये	१०	१४	२१९
सर्वयोनिषु कौंतेय	१४	४	३५१
सर्वस्य चाहं हृदि	१५	१५	३८९
सर्वाणींद्रियकर्माणि	४	२७	८०
सर्वेंद्रियगुणाभासं	१३	१४	३३१
सहजं कर्म कौंतेय	१८	४८	४९९
सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा	३	१०	५५
सहस्रयुगपर्यंतम्	८	१७	१६४
साधिभूताधिदैवं मां	७	३०	१५१
सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म	१८	५०	५०२
सीदन्ति मम गात्राणि	१	२९	१३
सुखदुःखे समे कृत्वा	२	३८	३७
सुखमात्यंतिकं यत्तद्	६	२१	१२५
सुखं त्विदानीं त्रिविधं	१८	३६	४९०
सुदुर्दर्शमिदं रूपं	११	५२	२७३
सुहृन्मित्रार्युदासीन	६	९	१०९
संकरो नरकायैव	१	४२	१८
संकल्पप्रभवान्कामान्	६	२४	१२६
संतुष्टः सततं योगी	१२	१४	२८४
संनियम्येंद्रियग्रामं	१२	४	२७८

श्लोकप्रतीकं.	अ०	श्लो०	पृ०
संन्यासस्तु महाबाहो	५	६	९०
संन्यासस्य महाबाहो	१८	१	४५३
संन्यासः कर्मयोगश्च	५	२	८९
सन्यासं कर्मणां कृष्ण	५	१	८८
सांख्ययोगौ पृथग्बालाः	५	४	८९
स्थाने हृषीकेश तव	११	३६	२६३
स्थितप्रज्ञस्य का भाषा	२	५४	४२
स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यान्	५	२७	९९
स्वधर्ममपि चावेक्ष्य	२	३१	३४
स्वभावजेन कौंतेय	१८	६०	५१८
स्वयमेवात्मनात्मनं	१०	१५	२२०
स्वे स्वे कर्मण्यभिरतः	१८	४५	४९६

ह

हंत ते कथयिष्यामि	१०	१९	२२२
हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं	२	३७	३७
हृषीकेशं तदा वाक्यं	१	२१	११

समाप्तेयं गीतापद्यानामकाराद्यनुक्रमणी ।